श्रीमद्भागवतार्थदर्शन.

अनुक्रमणिका.

एकादशस्कंध (मुक्ति).

श्रीगणेशायनमः ॥ श्रीशुकसद्गुरुपरमेश्वराय नमः ॥ श्रीव्यासाय नमः ॥ श्रीबालकृष्णगुरुभ्योनमः ॥ श्रीबादरायणपुत्र (शुकाचार्य) ह्मणाले — राजा बळरामासहित श्रीकृष्णांनीं यादवांना साह्यार्थ बरोबर घेऊन अनेक दैत्यांचा वध केला व - कौरवपांडवांमध्यें - अतिप्रबळ कलह उत्पन्न करून भूमीचा भार उतरला ., ह्मणजे - दुर्योधनादि - नीं कपटद्यूत, अपमान, पत्नीकेशग्रहण, - विषदान, लाक्षागृहांत घालून जाळणें - इत्यादि अपकारांनीं - गांजून ज्यांना अत्यंत कोपविलें त्या पांडवांना निमित्त करून, ईश्वरानें, - भारतीयुद्धाचे प्रसंगीं कौरवपांडवांचे साह्यार्थ - उभयपक्षाकडे जमलेल्या राजांचा परस्परांकरवीं नाश केला आणि पृथ्वीचा भार उतरून टाकिला (किंवा, ' जे कोपले आणि ज्यांना त्यांनीं कोपविलें त्यांना परस्पर निमित्त करून मारविलें ' असाही अर्थ करावा. एकंदरींत आशय असा — पूतना, अघासुर बकासुर इत्यादि जे उघड उघड दैत्य होते त्यांचा श्रीकृष्णांनीं स्वतः नाश

श्रीबादरायणिः (बादरायणाचे ह्म० व्यासाचे पुत्र) उवाच— सरामः (बळरामसहित) यदुभिः वृतः (वेष्टिलेला) कृष्णः दैत्यवधं कृत्वा जविष्ठं (फार त्वरित) कलिं (कलह) जनयन् (उत्पन्न करणारा) [सन्] भुवः (पृथ्वीच्या) भारं अवतारयत् . ॥ १ ॥ ईशः सपत्नैः (शत्रूंनीं) ये पांडुसुताः दुर्द्यूतहेलनकचग्रहणादिभिः (वाईट द्यूत, अपमान, केश धरणें इत्यादींनीं) सुबहु (अतिशय) [यथा तथा] कोपिताः (चिडविलेले), तान् इतरेतरेण (परस्पर) निमित्तं कृत्वा, समेतान् (मिळालेल्या) नृपान् हत्वा (मारून)

श्रीबादरायणिरुवाच । कृत्वा दैत्यवधं कृष्णः सरामो यदुभिर्वृतः ॥ भुवो ऽवतारयद्भारं जविष्ठं जनयन्कलिम् ॥ १ ॥

ये कोपिताः सुबहु पांडुसुताः सपत्नैर्दुर्द्यूतहेलनकचग्रहणादिभिस्तान् ॥ कृत्वा निमित्तमितरेतरतः समेतान् हत्वा

नृपान्निरहरत्क्षितिभारमीशः ॥२॥ भूभारराजपृतना यदुभिर्निरस्य गुप्तैः स्वबाहुभिरचिंतयदप्रमेयः ॥ मन्ये ऽवनेर्ननु

गतो ऽप्यगतं हि भारं यद्यादवं कुलमहो अविषह्यमास्ते ॥ २ ॥

क्षितिभारं निरहरत् (दूर करिता झाला). ॥ २ ॥ अप्रमेयः (नाहीं तर्क करितां येत ज्याबद्दल तो) [कृष्णः] स्वबाहुभिः गुप्तैः (रक्षिलेल्या) यदुभिः भूभारराजपृतनाः (भूमीला भार झालेले राजे व त्यांचीं सैन्यें यांस) निरस्य (दूर करून) अचिंतयत् (विचार करूं लागला)— " ननु अवनेः (भूमीचा) [भार.] गतः अपि भारं अगतं (न गेलेला असा मन्ये मानितों) केला, व जे बांधवांच्या रूपानीं राहिले होते त्यांना परस्परांहातीं मारविलें, आणि अशा युक्तींनी भूमीचा भार नाहींसा केला) ॥ १ ॥ २ ॥ श्रीकृष्णाच्या मनांत काय यावेळ असे, तें कोणासच कळत नसे. त्यांनीं, आपल्या भुजदंडांनी रक्षिलेल्या यादवांकडून - विवाहादि विविध प्रसंगीं कांहीं तरी निमित्तें उकरून काढून - भूमीला भार झालेल्या अशा राजांचा आणि त्यांच्या सैन्यांचा नाश करविला, व आपल्याच मनाशीं विचार चालविला कीं ' अहो - लोकांच्या नजरेनें - भूमीचा भार उतरला असें जरी दिसतें तरी वाटतें तो अजून उतरला नाहींच. कारण, अद्यापि यादवांचें कुळ जसेंच्या तसेंच आहे! - ह्या कुळानें उपमर्द दुसऱ्याचें सहन होणें तर - तें कोणाहीं अवतारांत किंवा सामर्थ्यानें नाहीं ' - असें

आपणच यादवांना मारावें म्हटलें तर - स्वहस्तें स्वकुलाचा क्षय करणें अनुचित होय, अशी अडचण पुढें उभी राहते ! - ॥ ३ ॥ दुसऱ्या कोणाकडून (दैत्यादिकांच्यानें सुद्धा) ह्या कुलाचा पराभव होणें अगदींच शक्य नाहीं; कारण, एक तर ह्याला माझा आश्रय आहे, आणि शिवाय हत्ती, घोडे इत्यादि वैभवानीं हें नेहमीं इतकें उच्छृंखल (चढेल) होऊन गेलेलें असतें - कीं ह्याच्याकडे नुसत्या वक्र दृष्टीनें तरी पाहणार कोण ? तेव्हा आता आपण अशी युक्ति करावी कीं, - जसा वेळूंच्या बेटाचा - नाश करणें अमेल तर त्याच्या पोटात

यत् (ज्या अर्थी) अहो ! यादवं कुलं अविषह्यं (न सोसण्याजोगें, दुर्धर) आस्ते (आहे) ॥ ३ ॥ मत्संश्रयस्य (माझा आश्रय ज्याला अशा) नित्य विभव उद्वहनस्य (ऐश्वर्यानें उन्मत्त) अस्य (ह्या कुलाचा) अन्यतः (दुसऱ्यापासून) परिभवः (पराभव) कथंचित् (कोणत्याही रीतीनें) न—एव—भवेत् (नाहींच होणार) वेणुस्तंबस्य (वेळूंच्या बेटाच्या) [अंत] (मध्यें) वह्निं (अग्नीला) इव (तसें) यदुकुलस्य अंतः (मध्यें) कलिं (कलहाला) विधाय (करून) शांतिं, [तत.] धाम (स्वर्गीं, वैकुंठ) [च] उपैमि (जातों) ' ॥ ४ ॥

नैवान्यतः परिभवो ऽस्य भवेत्कथंचिन्मत्संश्रयस्य विभवोन्नहनस्य नित्यम् ॥ अंतः कलिं यदुकुलस्य विधाय वेणुस्तंबस्य वह्निमिव शांतिमुपैमि धाम ॥ ४ ॥ एवं व्यवसितो राजन्सत्य-संकल्प ईश्वरः ॥ शापव्याजेन विप्राणां संजह्रे स्वकुलं विभुः ॥ ५ ॥ स्वमूर्त्या लोकलावण्य-निर्मुक्त्या लोचनं नृणाम् ॥ गीर्भिस्ताः स्मरतां चित्तं पदैस्तानीक्षता क्रियाः ॥ ६ ॥

राजन्, एवं व्यवसितः (निश्चय केला ज्यानें असा) सत्यसंकल्पः विभुः ईश्वर. विप्राणां शापव्याजेन (शापाच्या निमित्तानें) स्वकुलं संजह्रे (संहार [illegible]) ॥ ५ ॥ ईश्वर लोक-लावण्यनिर्मुक्त्या (लोकांच्या सौंदर्याचा निरास ज्याच्यापासून असा, किंवा लोकांना लावण्य देणाऱ्या) स्वमूर्त्या नृणां लोचनं, गीर्भिः ([illegible]) ताः (त्यांना) स्मरतां (आठवणाऱ्या) चित्त, घर्षणानें - अग्नि सिद्ध करून दिला म्हणजे पुरे होतें तसा आपण यदुकुलामध्यें कलह उत्पन्न करून द्यावा आणि स्वस्थ रहावें - तो कलहाग्नि सगळ्या कुलाचा संहार केल्याशिवाय ह्या कार्यभाग आटोपला कीं - मग आपण आपल्या वैकुंठधामीं जाऊ. ' ॥ ४ ॥ राजा, त्या व्यापक ईश्वराचा संकल्प कधींही अन्यथा होत नाहीं त्यानें अशा प्रकारें निश्चय ठरविला आणि ब्राह्मणाचा शाप ह्या निमित्तानें आपल्या कुलाचा संहार केला ॥ ५ ॥ - अशा रीतीनें अवतारांतील [illegible] पूर्णपणें सिद्धीस [illegible] असता, • परमात्मा मनु-

१ अथवा ' हें कुल ऐश्वर्यानें मत्त होऊन गेलें आहे म्हणून त्याचा संहार अवश्य केला पाहिजे ' असा अर्थ करावा. २ [illegible] एक [illegible] दृष्टान्त दिला आहे [illegible] — [illegible] तों सार्थे तिळ यथेच्छ वाढू देतो; पण एकदा फळें पिकून हातीं आलीं कीं तो ते झाड तोडून टाकितो, [illegible] झालें तेव्हा आता यादवांचें मरण ठरलेलेंच आहे. ३ हें पद [illegible] ब्राह्मणांचा शाप [illegible]

[illegible] निश्चयात्मक साधन [illegible] उद्दसन्, [illegible] काव्याला उत्तम विषय [illegible] कीर्ति भूमीवर पसरून ठेवून निजधामी गेले. त्यांची मूर्ति इतकी सुंदर होती की निजकडे लक्ष दिलें असतां पाहणारांस लोकामध्यें लावण्य हा पदार्थ इतरत्र कोठें नाहींच असें वाटून [illegible] व त्याची दृष्टि त्या मूर्तीवर वेधून जाई. त्यांचीं भाषणें इतकीं मनोहर असत कीं त्यांचें ज्याला ज्याला स्मरण होई त्याच्या त्याच्या चित्तवृत्तीचा निकडेच [illegible] उत्तम उत-टलेलीं रमणीय पदचिन्हें दृष्टीस पडलीं की लोकांना नेथून दुसरेकडे जाऊच नये असें वाटे (एतावता. श्रीकृष्णांनी त्या वेळीं [illegible] इंद्रियवृत्ति केवळ पदैः तानि ईक्षतां (पाहणारांच्या) क्रियाः [च] आच्छिद्य (आकर्षून घेऊन) " अनया (हिच्या योगें तमः (अज्ञान संसार) नु अंजसा ([illegible]) [illegible] इति कौ (पृथ्वीवर) सुश्लोकां (उत्तम पद्यें जीवर अशा) कीर्ति वितत्य (पसरून) स्वं पदं अगात् (गेला) ॥ ६ ॥ ७ ॥ राजा उवाच — ब्रह्मण्यानां [illegible] वदान्यानां

आच्छिद्य कीर्तिं सुश्लोकां वितत्य ह्यंजसा नु कौ ॥ तमोऽनया तरिष्यंतीत्यगात्स्वं पदमीश्वरः ॥ ७ ॥

राजोवाच । ब्रह्मण्यानां वदान्यानां नित्यं वृद्धोपसेविनाम् ॥ विप्रशापः कथमभूद्वृष्णीनां कृष्णचेतसाम् ॥ ८ ॥

यन्निमित्तः स वै शापो यादृशो द्विजसत्तम ॥ कथमेकात्मनां भेद एतत्सर्वं वदस्व मे ॥ ९ ॥

(दाते) नित्यं वृद्धोपसेविनां (वृद्धांची शुश्रूषा करणारे) कृष्णचेतसां (कृष्णाकडे चित्तें ज्यांचीं अशा) वृष्णीनां (यादवांना) विप्रशापः कथं अभूत् ? ॥ ८ ॥ द्विजसत्तम, सः [illegible] स्वताकडेच निश्चळ लावून घेतल्या होत्या). ॥ ६ ॥ ७ ॥ राजानें प्रश्न केला — महाराज, जे लोक ब्राह्मणाचे द्वेषी, कृपण व [illegible] रागावतात. - यादव तर ब्राह्मणांच्या सेवेंत दक्ष, दानशूर व नित्य वृद्धजनांची शुश्रूषा करण्यांत तत्पर होते. मग त्यांना ब्राह्मणाचा शाप [illegible] सर्वदा श्रीकृष्णांकडे लागून राहिलेलीं असत, - म्हणून. यथाकथंचित् ब्राह्मण कोपले तरी, त्यांच्या शापाची बाधा यादवांना होणें सत्य [illegible] ब्रह्मकुलवरा, त्या शापाचें निमित्त कोणतें, स्वरूप काय व सगळे यादव एक विचारें वागत असतां त्यांमध्यें कलह कसा झाला, हें सगळें वृत्त [illegible] निवेदन करावें ॥ ९ ॥

१ नाथ म्हणतात :— ' श्रीकृष्णकीर्तिनामाक्षरें । रिघतांचि श्रवणद्वारें । भीतरील तम एकसरें । निघे बाहेरें गजबजोनी ' ॥ २६८ २ अथवा [illegible] असे म्हणजे ज्याला तिचा संपर्क होई त्याला लावण्य प्राप्त होत असे ' असा अर्थ घ्यावा. ३ नाथ म्हणतात :— ' श्रीकृष्णाचिया सौंदर्यापुढें । लक्ष्मी भुलोनि जाली वेडें मदन [illegible] बापुडें । तेथें कोणीकडे इंद्रचंद्र ' ॥ २३९ ४ नाथ म्हणतात :— ' चित्त चिंतिताच पाये । दिसपणा विसरून जाये । मग निश्चितपणें पाहे । कृष्णचरणीं राहे निवांत ' ॥ [illegible] ५ बालप्रबोधिनीकार म्हणतात :— शंकेचें बीज हें ' न वासुदेवभक्तानामशुभं विद्यते क्वचित् (वासुदेवाच्या भक्तानें अकल्याण केव्हांही होत नाहीं)' असें भारतोक्ति आहे [illegible]

श्रीशुकाचार्य म्हणाले : - हे राजा, - ह्या सगळ्या गोष्टीला कारण केवळ ईश्वराची इच्छा एवढेंच होय. - परमात्म्यानें जें शरीर कृष्णमूर्ति धारण केलें होतें तें - इतकें अलौकिक सुंदर दिसे कीं जसें कांहीं जगांतील - सगळ्या सुंदर वस्तु एकत्र जमवून त्याच्या योगें तें रचिलें होतें. त्या भगवताच्या सकल इच्छा सर्वदा परिपूर्ण असत परंतु तो भूमंडळीं लोकक [illegible] त्याच्यासाठीं - उत्तम (बहुफलदायक) कीर्ति पसरून ठेवावी अशा उद्देशानें परम मंगल कर्में आचरण करीत द्वारकेमध्यें रममाण होऊन राहिला होता. त्यानें, त्याना अवतारकालीं [illegible] त्या भूभारहरणरूप कार्यापैकीं कांहीं भाग अवशिष्ट राहिल्यामुळें, आपल्या कुळाचा संहार करण्याची अंतरीं इच्छा धरिली. ॥ १० ॥ - लोक जी कर्में करितात त्या प्रत्येक कर्मा- [illegible] सन्निविष्ट., यादृशः (ज्या रूपाचा), एकात्मना (एक चित्तें ज्याचा अशाचा) भेदः (फूट) कथं, एतत् सर्वं मे वदस्व (सांग) ॥ ९ ॥ श्रीशुक उवाच — सकलसुंदरसन्निवेशं (सगळ्या सुंदर वस्तूंची रचना ज्यात असा) वपुः (शरीरास) बिभ्रत् (धरणारा) भुवि सुमंगल कर्म आचरन् आप्तकामः (पूर्ण इच्छा ज्याच्या असा) धाम (द्वारकास्थानास) आस्थाय

श्रीशुक उवाच । बिभ्रद्वपुः सकलसुंदरसन्निवेशं कर्माचरन्भुवि सुमंगलमाप्तकामः ॥
आस्थाय धाम रममाण उदारकीर्तिः संहर्तुमैच्छत कुलं स्थितकृत्यशेषः ॥ १० ॥
कर्माणि पुण्यनिवहानि सुमंगलानि गायज्जगत्कलिमलापहराणि कृत्वा ॥ कालात्मना
निवसता यदुदेवगेहे पिंडारकं समगमन्मुनयो विसृष्टाः ॥ ११ ॥

(राहून) रममाणः उदारकीर्तिः स्थितकृत्यशेषः (राहिला कर्तव्यातील शेष ज्याच्या, असा) [कृष्ण.] कुलं संहर्तुं (संहारण्याकरितां) ऐच्छत (इच्छिता झाला) ॥ १० ॥ कालात्मना (कालरूपी) यदुदेवगेहे निवसता (राहणाऱ्या) [कृष्णेन] पुण्यनिवहानि (पुण्यदायक) सुमंगलानि (सुखकारक) गायज्जगत्कलिमल पहराणि ([illegible]) [illegible] पासून कांहीं विशिष्ट प्रकारचेंच फळ मिळतें जसें अश्वमेध केला तर पुण्यच मिळतें. पुत्रलालनानें सुखच प्राप्त होतें. प्रायश्चित्त घेतलें तर पातकाचाच नाश होतो इत्यादि [illegible] भगवंतानें जीं चरित्रें करून ठेविलीं, - त्यामध्यें सर्वप्रकारचीं उत्तम फलें देण्याचें सामर्थ्य आहे. यश गाइलीं असता - पुण्य प्राप्त होतें, अत्यंत सुख मिळतें आणि [illegible] जनसमूहाचे कलिसंबंधी सकल दोष नाश पावतात. असो. तो कालरूपी (संहारकारी) भगवान् वसुदेवाच्या गृहीं राहत असता. - यज्ञानुष्ठानानंतर बोलावून [illegible]

१ भगवंताच्या मनांत कुळाचा संहार करावयाचा होता म्हणूनच त्यानीं ऋषींना द्वारकेंतून जावयास सांगितलें, असा 'कल्पी' या विषयाचा आशय [illegible] - 'उदार मुनि संत दुरी गेले । तेथें अनर्थाचें केलें चाळें ' हें यादवनिधनालागीं वहिलें । केलें लाघव श्रीकृष्णें ॥ ३१.३ ॥ ऋषि ज्ञान होते आश्रमासी । त्यांते धाडवी हृषीकेशी । तीर्थमिषें [illegible] समस्तांसी । पिंडारकासी स्वयें धाडी ॥ ३१.७ ॥

तें कर्म समाप्त झाल्यावर - श्रीकृष्णांनीं निरोप दिला ह्मणून - द्वारकेंतून निघून तेथें जवळच असलेल्या - पिंडारक तीर्थी गेले. ॥ ११ ॥ ते ऋषि विश्वामित्र, असित, कण्व, दुर्वासा, भृगु, अंगिरा, कश्यप, वामदेव, अत्रि, वसिष्ठ व नारद इत्यादि होते. ॥ १२ ॥ - असो. ऋषींनीं कांहीं दिवस त्या क्षेत्रांत राहावयाचें योजिलें. पुढें एके वेळीं - यादवांचे उच्छृंखल मुलगे खेळतां खेळतां जांबवतीचा पुत्र जो सांब त्याला स्त्रीचा वेष देऊन बरोबर घेऊन, त्या ऋषींच्या सन्निध गेले व पाय धरून आणि वरवर नम्रपणा दाखवून त्यांना

सर्वही दोष दूर करणारीं) कर्माणि कृत्वा विसृष्टाः (पाठविलेले) (सू० १२) मुनयः पिंडारकं समगमन् ॥ ११ ॥ १२ ॥ कुमारा अविनीताः (दांडगे) यदुनंदना क्रीडंत (खेळणारे) [संतः] तान् उपव्रज्य (जवळ जाऊन) उपसंगृह्य (पाय धरून) विनीतवत् (नम्रासारखे) पप्रच्छुः (विचारू लागले) ॥ १३ ॥ ते जांबवतीसुत सांब स्त्रीवेषें वेषयित्वा (नटवून) [पप्रच्छुः]— अमोघदर्शनाः (नाहींत निरर्थक झा० चुकणाऱ्या दृष्टि ज्यांच्या असे) विप्रा , असितेक्षणा (काळे नेत्र जिचे अशी) प्रमोष्यन्ती (पुढे लवकरच प्रसूत होणारी अशी) पुत्रकामा

विश्वामित्रो ऽसितः कण्वो दुर्वासा भृगुरंगिराः ॥ कश्यपो वामदेवो ऽत्रिर्वसिष्ठो नारदादयः ॥ १२ ॥
क्रीडंतस्तानुपव्रज्य कुमारा यदुनंदनाः ॥ उपसंगृह्य पप्रच्छुरविनीता विनीतवत् ॥ १३ ॥
ते वेषयित्वा स्त्रीवेषैः सांबं जांबवतीसुतम् ॥ एषा पृच्छति वो विप्रा अंतर्वत्न्यसितेक्षणा ॥ १४ ॥
प्रष्टुं विलज्जती साक्षात्प्रभूतामोघदर्शनाः ॥ प्रमोष्यंती पुत्रकामा किंस्वित्संजनयिष्यति ॥ १५ ॥
एवं प्रलब्धा मुनयस्तानूचुः कुपिता नृप ॥ जनयिष्यति वो मंदा मुसलं कुलनाशनम् ॥ १६ ॥

साक्षात् प्रष्टुं विलज्जती (लाजणारी) एषा अंतर्वत्नी (गर्भिणी) [अस्मन्मुखेन] वः पृच्छति (विचारिते). किंस्वित् संजनयिष्यति (प्रसवेल)? प्रब्रूत (सांगा) " ॥ १४ ॥ १५ ॥ नृप, एवं प्रलब्धाः (फसविलेले) मुनयः कुपिताः [संतः] तान् ऊचुः— " मंदा व: कुलनाशन मुसलं जनयिष्यति. " ॥ १६ ॥

विचारूं लागले — ' ब्राह्मणहो, ही कृष्णनयना (जिचे नेत्र कृष्णवर्ण आहेत अशी) स्त्री गर्भिणी असून आपल्याला कांहीं विचारीत आहे ॥ १३ ॥ १४ ॥ हिला स्वतः होऊन विचारायाला लाज वाटते. हिची इच्छा पुत्र व्हावा अशी आहे. महाराज, आपल्या ज्ञानदृष्टि भूतभविष्यवर्तमानकाळीं घडणाऱ्या सकल गोष्टी जाणण्यास कधी चुकत नाहींत, तर सांगा कीं ही आतां लवकरच प्रसूत होणार तेव्हां हिच्या पोटीं काय (पुत्र किंवा कन्या) जन्मेल? ' ॥ १५ ॥ राजा, त्यांनी अशा प्रकारें कपट केलें ह्मणून मुनींनी मनापून

१ हें तीर्थ द्वारकेपासून जवळच उत्तरदिशेकडे होतें. वालप्रबो २ मुळींच ते त्यांना पोंच किंवा दूरदृष्टि कोठून असणार बालप्रबोधिनी

३ नाथ ह्मणतातः— " मुलांची ही कपटवृत्ति पाहून नारदमुनि कळवळून नाचूं लागले व ह्मणाले ' यादवांचें मरण ओढवलें खचित. मुंग्यांना पाख फुटले कीं त्यांचें आयुष्य भरलं ह्मणून समजावें तसेंच ब्राह्मणांच्या छळ करणाराचा कुलक्षय व्हावयाचाच. ' " ३५५ । ३६० ह्या ओंव्यांचा आशय.

त्यांना शाप दिला :- ' मूढांनो, हिच्या उदरीं तुमच्या कुळाचा नाश करणारें मुसळ जन्म पावेल ' ' ॥ १६ ॥ तें वचन कानीं पडताच ते मुलगे अतिशय घाबरून गेले व झटपट मावाचें पोट सोडून पाहतात तों त्यामध्यें खरोखरच एक लोहमय मुसळ त्यांच्या दृष्टीस पडलें ॥ १७ ॥ तेव्हा ' आम्हीं हतभाग्यांनीं हे काय करून घेतलें ' आता आम्हाला लोक काय म्हणतील ! ' अशा प्रकारें विलाप करीत ते मुलगे मुसळ घेऊन घरीं गेले ॥ १८ ॥ त्यांच्या मुखश्री अगदीं उतरून गेल्या होत्या त्यांनीं तें मुसळ सभेंत नेलें आणि घडलेला वृत्तांत सकल यादवांच्या समक्ष उग्रसेनराजाला कळविला - मात्र त्यांनीं ती वातमी श्रीकृष्णाला अगदीं कळू दिली नाहीं. - ॥ १९ ॥ राजा, कोणत्याही उपायांनीं टाळता येण्यास

तत् श्रुत्वा अतिसंत्रस्ताः (अत्यत भ्यालेले) ते सांबस्य उदरं सहसा विमुच्य (सोडून) तस्मिन् अयस्मयं (लोखंडी) मुसलं ददृशु (पाहते झाले) खलु. ॥ १७ ॥ ' मंदभाग्यैः (हतभागी) नः (आम्हीं) किं कृतं ! जनाः नः किं वदिष्यति (म्हणतील) ! " इति विह्वलिताः (व्याकुल) [सन.] मुसलं आदाय गेहान् (घरीं) ययु (गेले) ॥ १८ ॥ परिम्लानमुखश्रियः [ते] तत् सदसि (सभेंत) उपनीय (नेऊन) सर्वयादवसन्निधौ राज्ञे आवेदयाचक्रु. (कळविते झाले) ॥ १९ ॥ द्वारकौकस (द्वारकेंत राहणारे) अमोघ

तच्छ्रुत्वा ते ऽतिसंत्रस्ता विमुच्य सहसोदरम् ॥ सांबस्य ददृशुस्तस्मिन्मुसलं खल्वयस्मयम् ॥ १७ ॥
किं कृतं मंदभाग्यैर्नः किं वदिष्यंति नो जनाः ॥ इति विह्वलिता गेहानादाय मुसलं ययुः ॥ १८ ॥
तच्चोपनीय सदसि परिम्लानमुखश्रियः ॥ राज्ञ आवेदयाचक्रुः सर्वयादवसन्निधौ ॥ १९ ॥ श्रुत्वा ऽमोघं
विप्रशापं दृष्ट्वा च मुसलं नृप ॥ विस्मिता भयसंत्रस्ता बभूवुर्द्वारकौकसः ॥ २० ॥ तच्चूर्णयित्वा मुसलं
यदुराजः स आहुकः ॥ समुद्रसलिले प्रास्यल्लोहं चास्यावशेषितम् ॥ २१ ॥

(व मुसळाच्या) विप्रशापं श्रुत्वा (ऐकून) मुसलं च दृष्ट्वा विस्मिताः, भयसंत्रस्ताः [च] बभूवु. ॥ २० ॥ यदुराजः स. आहुक तत् मुसलं चूर्णयित्वा अस्य अवशेषितं लोहं च समुद्रसलिले (समुद्राच्या पाण्यात). प्रास्यत् (फेंकिता झाला). ॥ २१ ॥

असलेला असा तो ब्रह्मशाप ऐकून आणि तें मुसळ पाहून द्वारकावासी जनांना विलक्षण आश्चर्य वाटलें आणि सगळेजण अतिशय घाबरून गेले ॥ २० ॥ तेव्हा यदुराज उग्रसेनानें - कृष्णाला न विचारितां - त्या मुसळाचें चूर्ण करून समुद्राच्या पाण्यात टाकून दिलें, व चूर्ण करतांना शेवटीं जो लहानसा लोखंडाचा तुकडा उरला त्याचीही तीच व्यवस्था लाविली (तोही समुद्रात टाकिला). ॥ २१ ॥

तो लोहाचा तुकडा एका माशानें गिळला आणि चूर्णाचे कण तेथून लाटांनीं वाहत तीरावर लागले व तेथें लव्हाळे होऊन राहिले ॥ २२ ॥ इकडे तो मासा समुद्रामध्यें दुसऱ्या माशांबरोबर धीवरानीं जाळ्यांत धरिला त्याच्या पोटांत जें लोखंड होतें तें त्या पारध्यानें आपल्या बाणाच्या अग्रावर लावून ठेविलें ॥ २३ ॥ भगवंताला - कोणीं सांगितलें नाहीं तरी - तें सगळे वृत्त कळून आलें. व त्याच्या आंगीं सामर्थ्य असूनही त्यांनीं ब्राह्मणांचा शाप फिरविण्याची गोष्ट मनांत आणिली नाहीं तर त्याला अनुमोदन कश्चित् मत्स्य॰ लोहं अग्रसीत् (गिळिता झाला). ततः तरलैः (लाटांनीं) उह्यमानानि (वाहिलीं जाणारीं) वेलायां (किनाऱ्यावर) लग्नानि (लागलेलीं) चूर्णानि एरका॰ (लव्हाळे) आसन् किल. ॥ २२ ॥ मत्स्यघ्नैः (मासे मारणारी) अर्णवे (समुद्रांत) जालेन (जाळ्यानें) अन्यैः (इतर माशांनीं) सह मत्स्य॰ गृहीत. सः लुब्धक॰ (पारधी) तस्य उदरगत लोहं शल्ये (बाणाच्या टोकावर) अकरोत् (करिता, बसविता झाला) ॥२३। भगवान् ज्ञातसर्वार्थः ईश्वरः आपि विप्रशापं अन्यथाकर्तुं (फिरविण्यास) न – ऐच्छत् (नाहीं इच्छिता झाला), कालरूपी

कश्चिन्मत्स्योऽग्रसील्लोहं चूर्णानि तरलैस्ततः ॥ उह्यमानानि वेलायां लग्नान्यासन्किलैरकाः ॥ २२ ॥ मत्स्यो गृहीतो मत्स्यघ्नैर्जालेनान्यैः सहार्णवे ॥ तस्योदरगतं लोहं स शल्ये लुब्धकोऽकरोत् ॥ २३ ॥ भगवान् ज्ञातसर्वार्थ ईश्वरोऽपि तदन्यथा ॥ कर्तुं नैच्छद्विप्रशापं कालरूप्यन्वमोदत ॥ २४ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे विप्रशापो नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

श्रीशुक उवाच । गोविंदभुजगुप्तायां द्वारवत्यां कुरूद्वह ॥ अवात्सीन्नारदोऽभीक्ष्णं कृष्णोपासनलालसः ॥ १ ॥

[सः] अन्वमोदत (अनुमोदन देता झाला) ॥ २४ ॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे प्रथमोऽध्याय ॥ १ ॥

श्रीशुकः उवाच— कुरूद्वह (कुरुकुलांत उच्चस्थितीस नेणाऱ्या), कृष्णोपासनलालस (कृष्णसेवेची आवड ज्याला असा) नारदः गोविंदभुजगुप्तायां (गोविंदाच्या बाहूनीं रक्षिलेल्या) दिलें. कारण, ते कालरूपी होते (त्यांना यदुकुलाचा संहार करावयाचा होता). ॥ २४ ॥ ॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने एकादशस्कंधे प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

शुकाचार्य म्हणाले .– कुरुकुलोद्धारका राजा, नारदमुनींना श्रीकृष्णाच्या सेवेची फार आवड असल्यामुळें ते द्वारकेमध्यें वारंवार येऊन राहत असत - आतां दक्षाच्या शापामुळें त्यांना कोठेंही एके ठिकाणीं राहतां येत नाहीं ही गोष्ट खरी, पण द्वारकेंत शापाचा प्रभाव अगदीं चालत नसे. - कारण, श्रीकृष्णपरमात्म्याचे भुजदंड तिचें रक्षण करीत होते ॥ १ ॥

१ ' धीवरानें मासा फाडिला तों त्याच्या पोटांत लोखंड निघालें. तें पाहून त्याला हर्षानें ऐश्वर्य आलें असें वाटलें, व अतिशय आनंद झाला कारण माशाच्या पोटांत जें लोखंड सापडेल त्याचा अ[illegible] आहे कीं तें बाणावर बसविलें असतां निशाण अचुक मारतां येतें व पारधही पुष्कळ मिळते. ' एकनाथ ओंवी २८३ । ३८४

२ बालप्रबोधिनीकाराचे मतें, धीवर व पारधी हा दोन व्यक्ति वेगळ्या होत्या, असें दिसतें. कारण, ते म्हणतात ' ते लोखंड एका पारध्याच्या हातीं लागलें व त्यानें तें आपल्या बाणाच्या अग्रावर बसविलें

राजा, मोठमोठ्या देवांनीही ज्याची उपासना करणें योग्य त्या मुकुंदाच्या चरणकमळाची सेवा, जिकडून तिकडून मृत्यूच्या भयानें [illegible] अशा कोणता [illegible] इंद्रियवान् पुरुष करणार नाहीं[1] ? ॥ २ ॥ एके वेळी ते देवर्षि घरीं आले असतां वसुदेवानें त्यांची पूजा केली व ते सुखानें आसनावर बसले तेव्हां त्यांना [illegible] अभिवादन करून [illegible] प्रश्न केला :— ॥ ३ ॥ वसुदेव ह्मणाला :— 'मुने, जसें मातापितरांचें येणें मुलाच्या कल्याणासाठी असतें व पुण्यश्लोक प्रभूच्या प्रीतीचे मार्ग अशा सत्पुरुषांचें आगमन [illegible] दीन जीवांच्या उद्धारासाठी असतें, त्याप्रमाणेंच आपणही लोकामध्ये जें पर्यटण करितां, तें प्राणिमात्राच्या दुःखनिरसनासाठीं होय ॥ ४ ॥ - साधूंना देवाची उपमा देणें [illegible]

हारवार अभीक्ष्णं (वारवार) अवात्सीत् (राही). ॥ १ ॥ राजन्, सर्वतोमृत्युः (चहूंकडून मृत्यु ज्याला असा) कः तु इंद्रियवान् अमरोत्तमैः (मोठ्या देवांनी), उपास्यं ([illegible]) मुकुंदचरणांबुजं (मुकुंदाच्या चरणकमलास) न भजेत् (न भजेल) ? ॥ २ ॥ एकदा वसुदेवः गृहागतं अर्चितं सुखं [यथा तथा] आसीनं तं देवर्षि अभिवाद्य [illegible] अब्रवीत्— ॥ ३ ॥ वसुदेवः उवाच— " भगवन्, यथा पित्रोः (आईबापांचें) [दर्शनं] [अपत्यानां, तथा च] उत्तमश्लोकवर्त्मनां (पुण्यकीर्ति परमेश्वराच्या प्रमाणे [illegible]

को नु राजन्निंद्रियवान्मुकुंदचरणांबुजम् ॥ न भजेत्सर्वतोमृत्युरुपास्यममरोत्तमैः ॥ २ ॥ तमेकदा तु देवर्षिं वसुदेवो गृहागतम् ॥
अर्चितं सुखमासीनमभिवाद्येदमब्रवीत् ॥ ३ ॥ वसुदेव उवाच । भगवन्भवतो यात्रा स्वस्तये सर्वदेहिनाम् ॥ कृपणानां
यथा पित्रोरुत्तमश्लोकवर्त्मनाम् ॥ ४ ॥ भूतानां देवचरितं दुःखाय च सुखाय च ॥ सुखायैव हि साधूनां त्वादृशानच्यु-
तात्मनाम् ॥ ५ ॥ भजंति ये यथा देवान्देवा अपि तथैव तान् ॥ छायेव कर्मसचिवाः साधवो दीनवत्सलाः ॥ ६ ॥

साधूचें) [दर्शनं] कृपणानां (दीन जनांना), [तथा] भवतः (तुमची) यात्रा (फिरणें) सर्वदेहिनां (सर्व प्राण्याच्या) स्वस्तये (कल्याणार्थ). ॥ ४ ॥ देवचरितं ([illegible] कृति) भूतानां सुखाय, दुःखाय च. त्वादृशां (तुम्हासारिख्या) अच्युतात्मनां (अच्युताकडे लक्ष ज्यांचें असा) साधूनां [चरितं] सुखाय एव ॥ ५ ॥ ये देवान् यथा भजंति,

अयोग्यच कारण, - देवाच्या पुष्कळ कृति प्राण्यांना सुख देतात - खऱ्या पण त्याच्याच अतिवृष्ट्यादि - कृतींनीं प्राण्यांना दुःखही भोगावें लागतें आणि अच्यु-
ताकडे चित्त लावून राहणाऱ्या तुम्हासारख्या साधूंचीं चरित्रें तर प्राण्यांना नेहमीं सुखदायकच असतात - दुःख कधीं द्यावयाचीं नाहींत. - ॥ ५ ॥ - शिवाय
देवापासून सुख मिळणें तो केवळ व्यापार होय. पहा - जे लोक देवाची ज्या प्रमाणानें सेवा करितात, त्या लोकांना देवही त्याच प्रमाणाचीं फळें देतात [illegible]

१ ज्यानें मन व इंद्रियें हीं वश केलीं आहेत असा विवेकी पुरुष वाल्मबोधिनी. २ किंवा, देवाच्या पुष्कळ कृत्यांपासून कांहीं प्राण्यांना सुख मिळतें व कांहींना दुःख [illegible]
उदाहरण - पाऊस पडला तर मनुष्यांना आनंद होतो पण कित्येक कीटक मृत्युमुखीं पडतात. [illegible]

केला तर फळ अल्प मिळतें, मोठा केला तर पुष्कळ मिळतें इत्यादि). एकदेशीय देव छायेसारखे कर्माच्या माझ्याच अपेक्षा करणारे आहेत (छाया जशी पुरुष नाचेल तशी नाचते तसेंच देव प्राण्याला त्याच्या कर्मानुसार फळें देत असतात). माझी - गोष्ट तशी नाही तर ते निरपेक्ष बुद्धीने - दीनावर दयाच करितात ॥ ६ ॥ - असें आहे त्या अर्थी यद्यपि आम्ही तुझ्या आगमनानेंच कृतार्थ झालों आहों - तथापि, हे ब्रह्मन् तू ज्या धर्मांच्या आचरणानें भगवताला प्रसन्न करून घेतोस ते भागवतधर्म आम्ही तुला विचारितों. मनुष्याने ते धर्म विश्वासपूर्वक श्रवण केले असता तो सकल भयापासून मुक्त होतो. ॥ ७ ॥ - आता, एख द्यावा असा समज होण्याचा संभव आहे की, मी छाया इव कर्मसचिवाः (कर्म सहाय ज्याला असे) देवाः अपि तान् तथा एव [भजति]. साधवः दीनवत्सलाः (दीनाचे कनवाळू) ॥ ६ ॥ ब्रह्मन्, तथा अपि तव भागवतान् (अत्यंतास प्रिय असा) धर्मान् पृच्छामः (विचारितो), मर्त्यः श्रद्धया (विश्वासानें) यान् श्रुत्वा विश्वतोभयात् (सर्वप्रकारें भय ज्यात असा संसारातून) मुच्यते ॥ ७ ॥ पुरा अहं

ब्रह्मंस्तथाऽपि पृच्छामो धर्मान्भागवतांस्तव ॥ यान्श्रुत्वा श्रद्धया मर्त्यो मुच्यते सर्वतोभयात् ॥ ७ ॥
अहं किल पुराऽनंतं प्रजार्थो भुवि मुक्तिदम् ॥ अपूजयं न मोक्षाय मोहितो देवमायया ॥ ८ ॥
यथा विचित्रव्यसनाद्भवद्भिर्विश्वतोभयात् ॥ मुच्येम ह्यंजसैवाद्धा तथा नः शाधि सुव्रत ॥ ९ ॥

प्रजार्थः (संततीची इच्छा ज्याला असा) [सन्] भुवि मुक्तिदं (मोक्ष देणाऱ्या) अनंत अपूजयं किल, देवमायया मोहितः [सन्] मोक्षाय न [अपूजयं]' ॥ ८ ॥ सुव्रत, भवद्भिः विचित्रव्यसनात् (नानाप्रकारचीं दुःखे ज्यात असा) सर्वतोभयात् यथा अंजसा (अनायासें) एव अद्धा मुच्येमहि (सुटू) तथा नः शाधि (शिकवा)." ॥ ९ ॥ (वसुदेव) भगवंताच्या कृपेला खरा पात्र आहे, मजहून दुसरा योग्य अधिकारी सापडणें नाहीं म्हणून मीच स्वमुखानें त्याची स्थिति सांगतो - मी मोक्ष देण्यास समर्थ अशा अनंताचें पूर्वी आराधन केलें पण तें पुत्रप्राप्तीच्या (भगवंतानें आपला पुत्र व्हावें ह्या) उद्देशानें [3]केलें, मोक्षासाठीं केलें नाहीं. देवाच्या मायेनें त्या मोह पावल्या - व पूर्णपणे फसविले. - ॥ ८ ॥ म्हणून, हे नियमनिष्ठ मुने, ह्या विविध दुःखांनी भरलेल्या व चहूकडून भयांनी व्यापिलेल्या संसारातून तुमच्या निमित्तानें तरी आम्हाला अनायासें मुक्ति मिळेल अशा प्रकारें तुम्ही स्वतः आम्हाला सुबोध रीतीनें शिक्षण द्या.' ॥ ९ ॥

---

१ 'इतर देवांची तर गोष्ट राहू द्याच, पण थोरला देव देखील असाच पूर्ण सापेक्ष आहे, जोंव (सर्वस्व) दिलें नाही तोंपर्यंत कोणाला भेट द्यायाचा नाहीं सर्वस्वाचें निवेदन करून त्याचें भजन केलें की तो त्या भक्ताला आपलें अंग देखील देतो, पण अभक्ताच्या घराकडे चुकून सुद्धा वळायाचा नाहीं.' एकनाथ ६८।६९. २ प्रत्युपकाराची इच्छा न धरिता प्राण्याचे ताप दूर घालवितात बालबोधिनी

३ ह्यावर कोणी म्हणतील 'तुला पुत्र झाला आहे ना भगवान्? त्याला भागवतधर्म विचारून घे' तर त्याचें उत्तर—

'तो हा माझा पुत्र श्रीकृष्ण । परी मज न सांगे ब्रह्मज्ञान । तोचि वंदी माझे चरण । म्हणे बाळक पूर्ण मी तुझें ॥' एकनाथ ८७

शुकाचार्य ह्मणाले — राजा, बुद्धिमान् वसुदेवाने अशा प्रकारें प्रश्न केला असता देवर्षीला परम संतोष वाटला कारण, त्या प्रश्नामुळें हरीचे - गुण वर्णन करण्याचा प्रसग आला व - त्या गुणांनीं अर्थातच नारदाला हरीचें स्मरण करून दिलें - आणि ईशस्मरण झालें असता साक्षात्कारसपन्न भक्ताच्या अतरी प्रेमलहरी उचंबळणें अगदीं स्वाभाविक आहे. - ॥ १० ॥ नारद ह्मणाला '— हे यदुकुलवरा, भागवत धर्म सकल जगाला पवित्र करण्यास समर्थ आहेत. त्याविषयीं तू मला प्रश्न करीत आहेस, त्या अर्थी हा तुझा व्यवसाय अत्युत्तम होय. ॥ ११ ॥ कारण, वसुदेवा, भागवत धर्मांचें - माहात्म्यच तसे असाधारण आहे पहा - जे कोणी पुरुष त्याचें - श्रवण, पठण, चिंतन किंवा श्रद्धापूर्वक
श्रीशुक• उवाच— राजन्, धीमता वसुदेवेन एवं कृतप्रश्नः हरेः गुणैः संस्मारितः (आठवून दिला ज्याला असा) देवर्षिः प्रीतः [सन्] त आह— ॥ १० ॥ नारद उवाच— "सात्वतर्षभ, भवता एतत् सम्यक् (उत्तम) व्यवसितं (निश्चयिलें) यत् त्वं विश्वभावनान् (जगाचें कल्याण करणारे अशा) भागवतान् धर्मान् पृच्छसे ॥ ११ ॥ देव, श्रुतः,

श्रीशुक उवाच । राजन्नेवं कृतप्रश्नो वसुदेवेन धीमता ॥ प्रीतस्तमाह देवर्षिहरेः संस्मारितो गुणैः ॥ १० ॥
नारद उवाच । सम्यगेतद्व्यवसितं भवता सात्वतर्षभ ॥ यत्पृच्छसे भागवतान्धर्मांस्त्वं विश्वभावनान् ॥ ११ ॥
श्रुतोऽनुपठितो ध्यात आदृतो वाऽनुमोदितः ॥ सद्यः पुनाति सद्धर्मो देव विश्वद्रुहोऽपि हि ॥ १२ ॥
त्वया परमकल्याणः पुण्यश्रवणकीर्तनः ॥ स्मारितो भगवानद्य देवो नारायणो मम ॥ १३ ॥ अत्राप्युदाहरंतीमभितिहासं पुरातनम् ॥ आर्षभाणां च संवादं विदेहस्य महात्मनः ॥ १४ ॥

अनुपठितः (वर्णिलेला) ध्यातः, आदृतः (प्रोत्साहन दिले ज्याला असा). अनुमोदित' वा सद्धर्मः विश्वद्रुह' (समस्त जगाशीं द्वेष करणाऱ्या अशाना) अपि सद्य पुनाति (पवित्र करतो) ॥ १२ ॥ त्वया अद्य मम परमकल्याण पुण्यश्रवणकीर्तनः (पुण्यदायक आहे श्रवण व कीर्तन ज्याचें असा) भगवान् नारायण देव स्मारित ॥ १३ ॥ अत्र (याविषयीं, अपि
आचरण करितात अथवा दुसऱ्या कोणी आचरण चालविलें असता त्याना प्रोत्साहन देतात. ते सकल जगाशी द्वेष करणारे महापराधी असले तरी सुद्धा तत्क्षणीं कृतार्थ होतात ॥ १२ ॥ शिवाय, ज्याचें श्रवण व कीर्तन केलें असता पुण्य लागतें त्या परममंगलरूप व ज्ञानदायक अशा भगवान् नारायणाचें त्वा आज मला स्मरण करून दिलें हा तुझा मजवर मोठाच उपकार झाला. असो. ॥ १३ ॥ ह्या भागवत धर्मांच्या निर्णयाविषयींही एक प्राचीन इतिहास सागत असतात (प्रमाण मानिलेला आहे) तो इतिहास ह्मणजे ऋषभ-

१ नराणां समूहो नारं, तेन् अयन यस्य सः। नारायण ह्मणजे प्राणिसमूहाच्या अतरीं राहणारा, सर्वान्तर्यामी
२ हें नारदाचें वचन ऐकून एखाद्याला अशी शंका सहज उत्पन्न होईल कीं, तर मग नारदाला इतरवेळे विस्मरण पडलें होतें ह्मणावें, व आता वसुदेवानें आठवण करून दिली ह्मणून त्याचें भगवंताकडे लक्ष्य गेलें' तर ह्या शंकेचें निरसन नाथांनीं करून ठेविलें आहे तें असें:— 'अग्नि कुंडीं स्वयंभ असे। तो घृतावदानें अति प्रकाशे। तेवीं सप्रेम प्रश्नवशें। सुख उल्लासे भक्ताचें'। १२६।

देवाचे पुत्र (नऊ योगी) आणि महाज्ञानी राजा विदेह याचा संवाद होय ॥१४॥ स्वायंभुव मनूचा प्रियव्रत नावाचा जो पुत्र होता, त्याचा मुलगा आग्नीध्र. त्यापासून नाभि झाला. त्याचा (नाभीचा) पुत्र ऋषभ ह्या नावानें प्रख्यात आहे. ॥ १५ ॥ तो ऋषभदेव म्हणजे लोकांना मोक्षधर्माचा उपदेश करण्यासाठीं अवतरलेला वासुदेवाचा अंश होय, असें म्हणतात. त्याला वेदपारंगत असे शंभर पुत्र होते. ॥ १६ ॥ त्या सगळ्या मुलांत वडील जो भरत, तो नारायणाच्या सेवेमध्यें पूर्ण तत्पर असे - आपण ज्यावर महात्मनः विदेहस्य, आर्षभाणा (ऋषभाच्या मुलांचा) च संवादं इम पुरातनं (प्राचीन) इतिहासं उदाहरति (सांगत). ॥ १४ ॥ स्वायंभुवस्य मनो य ' प्रियव्रत." नाम सुतः तस्य आग्नीध्रः, ततः नाभिः. तत्सुत. ऋषभः स्मृतः ॥ १५ ॥ तं मोक्षधर्मविवक्षया (मोक्ष धर्म सांगण्याच्या इच्छेनें) अवतीर्णं वासुदेवांश आहु तस्य वेदपारग शुतशतं आसीत्. ॥ १६ ॥ तेषां ज्येष्ठः भरतः नारायणपरायण. यशास्ना अद्भुतं (आश्चर्यकारक) एतत् भारत वर्ष विख्यात. ॥१७॥ भुक्तभोगा (भोगले भोग ज्याने असा)

प्रियव्रतो नाम सुतो मनोः स्वायंभुवस्य यः ॥ तस्याग्नीध्रस्ततो नाभिर्ऋषभस्तत्सुतः स्मृतः ॥ १५ ॥
तमाहुर्वासुदेवांशं मोक्षधर्मविवक्षया ॥ अवतीर्णं सुतशतं तस्यासीद्ब्रह्मपारगम् ॥ १६ ॥ तेषां वै
भरतो ज्येष्ठो नारायणपरायणः ॥ विख्यातं वर्षमेतद्यन्नाम्ना भारतमद्भुतम् ॥ १७ ॥ स भुक्तभोगा
त्यक्त्वेमां निर्गतस्तपसा हरिम् ॥ उपासीनस्तत्पदवीं लेभे वै जन्मभिस्त्रिभिः ॥ १८ ॥ तेषां नव
नवद्वीपपतयो ऽस्य समंततः ॥ कर्मतंत्रप्रणेतार एकाशीतिर्द्विजातयः ॥ १९ ॥

इमां (ह्या भूमीला) त्यक्त्वा (सोडून) निर्गत (निघून गेलेला) हरिं उपासीनः (भजणारा) स. त्रिभिः जन्मभि. तत्पदवीं लेभे (पावला) ॥ १८ ॥ तेषां नव अस्य (ह्या भरतखंडाच्या) समंततः (सभोंवतीं) नवद्वीपपतयः (नऊ खंडांचे अधिपति); एकाशीति. (एक्यायशीं) द्विजातय (ब्राह्मण) कर्मतंत्रप्रणेतारः (कर्ममार्ग चालविणारे) [अभूवन्] ॥ १९ ॥ राहतों त्या - ह्या सकळ अद्भुत वस्तूंचें निधान अशा भूखंडाला भारत हें प्रसिद्ध अभिधान त्या भरताच्या नावावरून प्राप्त झालें. ॥ १७ ॥ तो (भरत) ह्या भूमीचे सकळ भोग (राज्यैश्वर्य) भोगल्यावर - सर्वसंगपरित्याग करून घरांतून - निघून गेला व हरीची आराधना चालवून तीन जन्मांनीं त्याच्या पदवीस प्राप्त झाला ॥ १८ ॥ त्या (बाकी राहिलेल्या नव्याण्णव) पुत्रांपैकीं नऊ ह्या भरतवर्षाच्या सोंवतीं असलेल्या नऊ खंडांचे अधिपति झाले, एक्यायशींजण ब्राह्मण होऊन कर्ममार्गाची प्रवृत्ति करू लागले, ॥ १९ ॥

---

१ पंचमस्कंधामध्यें प्रारंभीं ह्यांच्या वंशाचें विस्तारानें वर्णन आहे. २ पंचम स्कंध, अध्याय तिसरा, श्लोक एकोणिसावा पहा ३ ह्या खंडाला पूर्वी अजनाभ असें नाव होतें. प स्क अ सातवा श्लो तिसरा पहा. ४ ही कथा पंचम स्कंधाच्या सातव्यापासून चवदाव्यापर्यंत अध्यायांत वर्णिली आहे ५ पंच स्कं अ एकोणिसावा श्लो. दहावा पहा

आणि उरलेले नऊ महाभाग्यशाली पुरुष दिगंबर (नग्न) वृत्तीनें राहून आत्माभ्यासाचे श्रम करता करतां आत्मविद्येंत निष्णात व परमार्थतत्त्वाचे निरूपण करणारे असे मुनि (योगी) झाले. ॥ २० ॥ त्यांचीं नावें कवि, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविर्होत्र, द्रुमिल, चमस आणि करभाजन, अशीं होतीं ॥ २१ ॥ ते हे मुनि स्थूलसूक्ष्मात्मक विश्व भगवद्रूप होय व त्यामध्यें आणि आपल्यामध्यें भेदभाव नाहीं, अशी दृष्टि ठेवून भूमीवर पर्यटन करीत ॥ २२ ॥ ज्यांचीं चित्तें विषयावर कधींही

वंश महाभागा. अर्थशंसिनः (तत्त्वाचा उपदेश करणारे) श्रमणाः (योगाभ्यासाचे श्रम घेणारे) वातरशना[1] (वायु हा कडदोरा ज्याचा असे, दिगंबर, नग्न) आत्मविद्याविशारदाः (आत्मज्ञानात निपुण) मुनयः अभवन्. ॥ २० ॥ (सु०) ॥ २१ ॥ एते (हे) भगवद्रूप सदसदात्मक (स्थूलसूक्ष्मात्मक) विश्व आत्मनः अव्यतिरेकेण (अभिन्नभावाने) पश्यन्तः (पाहणारे)

नवाभवन्महाभागा मुनयो ह्यर्थशंसिनः ॥ श्रमणा वातरशना आत्मविद्याविशारदाः ॥ २० ॥ कविर्हरिरंतरिक्षः प्रबुद्धः पिप्पलायनः ॥ आविर्होत्रोऽथ द्रुमिलश्चमसः करभाजनः ॥ २१ ॥ त एते भगवद्रूपं विश्वं सदसदात्मकम् ॥ आत्मनोऽव्यतिरेकेण पश्यंतो व्यचरन्महीम् ॥ २२ ॥ अव्याहतेष्टगतयः सुरसिद्धसाध्यगंधर्वयक्षनरकिन्नरनागलोकान् ॥ मुक्ताश्चरंति मुनिचारणभूतनाथविद्याधरद्विजगवां भुवनानि कामम् ॥ २३ ॥

[संतः] महीं (पृथ्वीवर) व्यचरन् (फिरत). ॥ २२ ॥ अव्याहतेष्टगतयः (नाहीं कुंठित झाली, इच्छेस येईल तिकडे, गति ज्यांची असे) मुक्ताः सुरसिद्धसाध्यगंधर्वयक्षनरकिन्नरनागलोकान्, मुनिचारणभूतनाथविद्याधरद्विजगवां भुवनानि [च] कामं (यथेच्छ) चरंति (फिरतात) ॥ २३ ॥

गुंतावयाचीं नाहींत, त्या (मुक्त) पुरुषांना मनास येईल तिकडे जाण्यास अगदीं प्रतिबंध नसतो. ते देवांच्या, सिद्धांच्या, साध्यांच्या, गंधर्वांच्या, यक्षांच्या, मनुष्यांच्या, किन्नरांच्या व नागांच्या लोकांत किंवा मुनि, चारण, भूतनाथ, विद्याधर, द्विज आणि गाई यांच्या स्थानीं यथेच्छ संचार करीत असतात असो. ॥ २३ ॥

---

1 नाथांनीं या पुरुषांचें वर्णन फारच सुंदर केलें आहे. त्यांतील थोडा आशय येथे देतों:– ' ते पुरुष मनोमन चाळून बोळून ब्रह्मविद् होते [illegible] हे [illegible] ब्रह्मविद्येचें [illegible] त्यांना [illegible] एकत्र दोरा भरून पांघरूण केलें होतें व वायु हा कडदोरा करून त्याची अप्रमामीं गांठ दिली होती. त्यांनीं प्राण व अपान [illegible] वायूचें नियमन करून त्याची नाभिस्थळीं गांठ केली [illegible] जीवग्रंथि (अभिमान) सुटला. तेंच नवद्वीजणांचें ब्रह्मसूत्र ' १६५ । ६६ । ६८.

2 ' जग परिपूर्ण भगवंतें । आपण वेगळा नुरे तेथें । सव हो भगवद्रूप समस्तें । भूताकृति ते प्रकट देखे ' ॥ एकनाथ, १७७ [illegible] मुनि अद्यापि विश्वामध्यें फिरत असतात, असा चरंति या वर्तमानकाळी प्रयोगावरून अर्थ करावा.' पण आम्हाला, या एकदर [illegible]

एके वेळीं अजनाभ (भारत) वर्षामध्यें ऋषिजन परमप्रेमान्य अशा निमिराजाचे सत्रानुष्ठान चालवीत असतां ते नऊ मुनि सहजगत्या तेथे प्राप्त झाले ॥ २४ ॥ ते सूर्यासारखे तेजःपुंज महाभागवद्भक्त मुनि आले असें पाहून यजमान अग्नि व ब्राह्मण सर्वजण उठून उभे राहिले ॥ २५ ॥ ते नारायणाचे परम भक्त आहेत असें जाणून विदेहराजाला संतोष वाटला, आणि त्यानें त्या मुनींना आसनावर बसवून योग्यतेप्रमाणें क्रमानें त्यांची पूजा केली. ॥ २६ ॥ ते नऊ योगींद्र ब्रह्मपुत्र सनकादि मुनींप्रमाणें, केवळ स्वतःच्या कांतीनें

ते एकदा यदृच्छया (सहजगत्या) अजनाभे ऋषिभिः वितायमानं (विस्तारिलेलें) महात्मनः निमेः सत्रं उपजग्मुः (आले) ॥ २४ ॥ नृप तान् सूर्यसंकाशान् (सूर्यतुल्य) महाभागवतान् दृष्ट्वा यजमानः, अग्नयः, विप्राः [च] सर्वे एव उपतस्थिरे (उठले). ॥ २५ ॥ विदेह तान् नारायणपरायणान् अभिप्रेत्य (जाणून) प्रीतः [सन्] यथार्हतः (योग्यतेप्रमाणें) आसनस्थान् संपूजयांचक्रे. ॥ २६ ॥ परमप्रीतः प्रश्रयावनतः (विनयानें नम्र) नृपः स्वरुचा (आपल्या कांतीनें) रोचमानान् (शोभणाऱ्या) ब्रह्मपुत्रोपमान्

त एकदा निमेः सत्रमुपजग्मुर्यदृच्छया ॥ वितायमानमृषिभिरजनाभे महात्मनः ॥ २४ ॥ तान्दृष्ट्वा
सूर्यसंकाशान्महाभागवतान्नृप ॥ यजमानोऽग्नयो विप्राः सर्व एवोपतस्थिरे ॥ २५ ॥ विदेहस्तानभिप्रेत्य
नारायणपरायणान् ॥ प्रीतः संपूजयांचक्र आसनस्थान्यथाऽर्हतः ॥ २६ ॥ तान्रोचमानान्स्वरुचा
ब्रह्मपुत्रोपमान्नव ॥ पप्रच्छ परमप्रीतः प्रश्रयावनतो नृपः ॥ २७ ॥ विदेह उवाच । मन्ये भगवतः
साक्षात्पार्षदान्वो मधुद्विषः ॥ विष्णोर्भूतानि लोकानां पावनाय चरंति हि ॥ २८ ॥ दुर्लभो मानुषो देहो
देहिनां क्षणभंगुरः ॥ तत्रापि दुर्लभं मन्ये वैकुंठप्रियदर्शनम् ॥ २९ ॥

(ब्रह्मदेवाच्या पुत्राची म्ह० सनत्कुमारांची उपमा ज्यांना अशा) नव तान् पप्रच्छ— ॥ २७ ॥ विदेह. उवाच— " वः साक्षात् भगवतः मधुद्विषः पार्षदान् मन्ये हि विष्णोः भूतानि (आश्रित) लोकानां पावनाय (शुद्धीसाठीं) चरंति. ॥ २८ ॥ देहिनां (प्राण्यांना) क्षणभंगुर ([illegible]) शोभत होते (वस्त्रालंकारांनीं शृंगारिले नसतांही सुंदर दिसत होते). - त्यांना पाहून - राजाला परम संतोष झाला आणि त्यानें नम्रतेनें त्यांना प्रश्न केला — ॥ २७ ॥ विदेह म्हणाला —' मुनिवर्य, मला असें वाटतें कीं आपण साक्षात् भगवान् मधुसूदनाचे पार्षद आहां कारण विष्णूचे प्रिय भक्त लोकांना पवित्र करण्यासाठीं सर्वत्र [illegible] सनात (आह्माला कृतार्थ करावें ह्या उद्देशानें भगवत्पार्षदाचें येथें येणें संभवतें, ॥ २८ ॥ [illegible]

१ कारण, नाथ म्हणतातः — ' अमित सूर्यांचिया कोटी । हारपती नखतेजांपुढें । तो भगवान जिहीं वश्य [illegible] । त्यांच्या तेथींची गोष्टी अलौकिक ' ॥ [illegible] ॥

नसतात. परंतु त्यांत हा मनुष्यदेह क्षणभंगुर असूनही. दुर्लभ होये. - कारण, उत्तम पुरुषार्थांचें साधन काय तें ह्या देहामध्येंच व्हावयाचें व ... वस्तूंची ...
जाणवते. - करें यथाकथंचित् मनुष्यदेह मिळाला तरी त्यामध्यें विष्णूच्या प्रिय भक्तांचें दर्शन वडणें ह्मणजे कलियुगचा योग (परम दुर्मिळ). ॥ २९ ॥ ...
आज मी जीवांचें अत्युत्तम कल्याण कोणतें तें आपणांला विचारून घेतों. ह्या संसारामध्यें मनुष्यांना अर्धा क्षण पर्यंत जरी सत्समागम घडला तरी तो ... ठेवा ...
देहः दुर्लभः. तत्र अपि वैकुंठप्रियदर्शनं (विष्णु ज्यांना प्रिय किंवा विष्णूचे प्रिय अशा भक्तांचें दर्शन) दुर्लभं मन्ये. ॥ २९ ॥ अतः अनघाः (पापरहितांनो); ...
ज्यांच्या पलिकडे कांहीं उरलें नाहीं असें) क्षेमं (कल्याण) पृच्छामः. अस्मिन् संसारे क्षणार्धः अपि सत्संगः नृणां शेवधिः (निधि, द्रव्याचा ठेवा). ॥ ३० ॥ यदि ...

अत आत्यंतिकं क्षेमं पृच्छामो भवतोऽनघाः ॥ संसारेऽस्मिन्क्षणार्धोऽपि सत्संगः शेवधिर्नृणाम् ॥ ३० ॥
धर्मान्भागवतान्ब्रूत यदि नः श्रुतये क्षमम् ॥ यैः प्रसन्नः प्रपन्नाय दास्यत्यात्मानमप्यजः ॥ ३१ ॥

क्षमं (योग्य), [तर्हि] भागवतान् धर्मान् ब्रूत (सांगा). यैः प्रसन्नः अजः (जन्मरहित परमात्मा) प्रपन्नाय (भक्ताला) आत्मानं (स्वस्वरूप) अपि (देखील) दास्यति (देईल.) ॥ ३१ ॥
होय (द्रव्याचा ठेवा सांपडला असतां जसा आनंद होतो तसा साधूंचा सहवास घडला असतां परमानंद मिळतो). ॥ ३० ॥ - तेव्हां मुनिवरहो - भागवत धर्म कोणते, ते
ऐकण्याची आमच्या आंगीं योग्यता - आहे असें आपल्याला वाटत - असेल तर, ते आम्हांला सांगा. आम्ही असें ऐकतों कीं, ते धर्म आचरिले असता जन्मरहित

१ ह्या श्लोकावर नाथांचें मनोहर व विस्तीर्ण व्याख्यान आहे. त्यांतील अभिप्राय संक्षेपानें येथें देतों:-' पुण्य व पाप ह्यांचें प्रमाण समान झालें कीं मनुष्यदेह प्राप्त होतो, असा सिद्धांत आहे. तर मग सगळ्या मनुष्यांची समबुद्धि कां नसते? तर त्याचें कारण असें:- वजन करतांना तराजूच्या एका पारड्यांत मोठी थोरली पापाची धोंड घालावी आणि दुसऱ्या पारड्यात बारीक बारीक पुण्यकर्में ... तरी वजन बरोबर होण्याची मर केली, अशा रीतीनें ज्याला मनुष्ययोनि मिळाली त्याचें पापाकडे ओढ फार असणार हें उघड आहे; एकाचें पुण्य थोर आणि पाप किरकोळ, ... असतें, त्याची पुण्यबुद्धि दृढ असते. हेच (दुसऱ्या प्रकारचेच) लोक पुण्य व पाप या उभय कर्मांचा क्षय करून मुक्ति पावतात. ... मनुष्यदेह प्राप्त झाला असता जे लोक ... व्यर्थ विषयसुख भोगण्यामध्यें करितात, ते हातीं आलेलें अमृत देऊन त्याच्या बदली नडान ... मृगजळ मागवितात, किंवा ... राई घेऊन ... अथवा हातचें चिंतामणिरत्न देऊन गंधर्वनगरीचो ठायीं (आकाशांत तुरळक तुरळक ढगें असतीं ह्मणजे त्यावर ... काल्पनिक हत्ती, घोडे, नगरें, वाडे इत्यादि ऐश्वर्य) विकत घेतात, ... नानाप्रकारचे विनोद किंवा टवाळ्या करणें, सोंगट्या खेळणें, रिकामी ओरडाओरड इत्यादि कामांत नेहमीं ... रामनाम ... कीं ज्यो ... घरीं ... असतां हें लोक तिळ, पोसवत नाहीं ह्मणून, घालवून देतात! श्रीरामनाम उच्चारिलें तर जणें कांहीं त्यांचें गाठोडेंच बुडतें! ' २१४ ते २२८.

॥ ६ ॥

भगवान् प्रसन्न होऊन त्या शरणागताला आपलें स्वरूप देखील देतो. ॥ ३१ ॥ नारद ह्मणाला — वसुदेवा, निमिराजानें अशा प्रकारें प्रश्न केला [illegible] थोर पुरुष, प्रेमपूर्वक अभिनंदन करून, सदस्य व ऋत्विज यांसहित राजाला मांडं केलं (ऋत्विज सदस्य ही कर्तृ मळकें मुद्धा चित्त देऊन [illegible] होती :— ॥३२॥ कवि ह्मणाला :— राजा, ह्या संसारामध्यें मनुष्य मिथ्याभूत देहादिकांवर, हाच आत्मा, अशी भावना ठेवितो, ह्मणून त्याची बुद्धि [illegible]
नारदः उवाच— वसुदेव, एवं निमिना पृष्टाः ते महत्तमाः (अलंत थोर साधु) [illegible] ससदस्यर्त्विजं (सभासद व ऋत्विज यांसहित) नृपं प्रतिपूज्य ([illegible]
कविः उवाच—" अत्र नित्यं अच्युतस्य पादांबुजोपासनं अकुतश्चिद्भयं (कोठूनही भय ज्याला नाहीं) मन्ये (मानितो); यत्र असदात्मभावात् ([illegible]

नारद उवाच । एवं ते निमिना पृष्टा वसुदेव महत्तमाः ॥ प्रतिपूज्याब्रुवन्प्रीत्या ससदस्यर्त्विजं नृपम्

॥३२॥ कविरुवाच । मन्येऽकुतश्चिद्भयमच्युतस्य पादांबुजोपासनमत्र नित्यम् ॥ उद्विग्नबुद्धेरसदात्मभावाद्

विश्वात्मना यत्र निवर्तते भीः ॥ ३३ ॥ ये वै भगवता प्रोक्ता उपाया ह्यात्मलब्धये ॥ अंजः पुंसाम-

विदुषां विद्धि भागवतान्हि *तान् ॥ ३४ ॥

त्यामुळें) उद्विग्नबुद्धेः (खिन्न बुद्धि ज्याची त्या प्राण्याची) भीः (भीति) विश्वात्मना (सर्वथा) निवर्तते (दूर होते). ॥ ३३ ॥ अविदुषां (अज्ञानी) पुंसां (पुरुषांना) अंजः [illegible]
आत्मलब्धये (आत्मप्राप्तीअर्थी) भगवता ये वै उपायाः प्रोक्ताः (सांगितलेले), * तान् भागवतान् विद्धि (जाण); ॥ ३४ ॥
तर असा निश्चय झालेला आहे कीं, अच्युताच्या चरणकमलाची आराधना करणें हाच सर्वांचा निर्भय आश्रय होय. (आत्यंतिक क्षेम ह्मणजे [illegible] भगवच्चरणाची सेवा केली असतां भयें पूर्णपणें नाहींतशीं होतात. ॥ ३३ ॥ अज्ञानी जीवांना सुद्धां अनायासें आत्मप्राप्ति व्हावी ह्यासाठीं, भगवंतानें [illegible]

---

१ भगवद्धर्म-तद्भक्त-माया-तत्तरणानि च । ब्रह्म-कर्मा-ऽवतारेहा-ऽभक्तप्राप्य-युगक्रमान् ॥
प्रष्टुं क्रमेण कृतवान् नव प्रश्नान् निमिर्नृप । एकैकस्योत्तरं प्रोचुः कविमुख्या मुनीश्वराः ॥ टीकाकार श्रीधर.

(१) भागवतधर्म कोणते, (२) भगवद्भक्तांचें लक्षण काय, (३) माया कशाला ह्मणतात, (४) ती तरून जाण्याचे उपाय कोणते, (५) परब्रह्म कसें आहे, (६) कर्म कशाला ह्मणावें, (७) अवतार चरित्रे किती आहेत, (८) अभक्तांना कोणती गति मिळते, (९) आणि कोणत्या युगात कोणते धर्म आचरावे, असे नऊ प्रश्न निमिराजानें ज्ञानप्राप्तीसाठीं नऊ जणांना विचारिले. तेव्हां त्या कवि प्रभृति मुनीश्वरांनीं— एकेक प्रश्नाचें एकानें— अशीं उत्तरें दिलीं. * बालप्रबोधिनीकार 'हितान्' हें एक पद मानून तें 'भागवतान्' ह्याचें विशेषण करितात. हितान्= परमफलहेतुभूतान् हे भगवद्धर्म परम फल (मोक्ष) मिळविण्याचें साधन होत.

उपाय प्रसिद्धपणें सांगून ठेविले आहेत, ते भागवत धर्म होत, असें समज. ॥ ३४ ॥ - योगाभ्यासामध्यें किंवा कर्मानुष्ठानात विघ्नाची व प्रमाद घडण्याची फार भीति असते, आणि भागवत धर्म तर आचरण करण्यास अतिसुलभ आहेत पहा - राजा ह्या धर्माचा अवलंब केला असता मनुष्याच्या हातून प्रमाद कधीही होत नाही व तो डोळे मिटून (अज्ञानानें) धावत असला तरी ह्यामध्यें अडखळून नाही की पडत नाही (धावणें ह्मणजे नेहमीं ज्याप्रमाणें पावलें टाकतो त्यापेक्षा जलद पावलें टाकणें ... राजन्, नर यान् आस्थाय (आचरण करून) कर्हिचित् (कदापि) न—प्रमाद्येत (चुकत नाहीं), इह नेत्रे निमील्य (मिटून) धावन् वा (धावत) न—स्खलेत् (अडखळत नाहीं) न—पतेत् (पडणार नाहीं) ॥ ३५ ॥

यानास्थाय नरो राजन्न प्रमाद्येत कर्हिचित् ॥ धावन्निमील्य वा नेत्रे न स्खलेन्न पतेदिह ॥ ३५ ॥

धावणें ह्याचा अर्थ इतकाच कीं ठरीव क्रमापैकी काहीं अनुष्ठानें गाळून भराभर पुढील कर्तव्याचें अनुष्ठान चालवीत सुटणें. योगाभ्यासात किंवा कर्मकांडात अशी ... तर वैगुण्य पडून फळ मिळत नाहीं, पण भागवतधर्ममार्गातील एखादी पायरी मोडिली तरी प्रत्यवाय घडत नाहीं किंवा फळाला मुकावें लागत नाहीं) ॥ ३६ ॥

---

१ ' न करितां वेदशास्त्रव्युत्पत्ति । ऐशिया अज्ञाना निजात्मप्रगति । सुगम जे ब्रह्मस्थिति । यालागीं हरिनें प्रकाशिली देव ॥ एकनाथ, ३०१

२ श्रुतिस्मृती उभे नेत्रे विप्राणां परिकीर्तिते । एकेन विकलः काणो द्वाभ्यामन्धः प्रकीर्तित ॥

अर्थ.— श्रुति आणि स्मृति हे ब्राह्मणाचे दोन डोळे ह्मटले आहेत पैकीं एक ज्याला नसेल तो काणा, व दोन्ही नसतील तो आंधळा, ...

३ भागवत धर्म आचरण करण्यास किती सोपे आहेत, त्यांचें नाथांनीं सुंदर वर्णन केलें आहे तें असें —

इंद्रियें कोंडावीं न लगती । सहज राहे विषयासक्ति । पावढे सामर्थ्य हरिभक्ति । जाण निश्चयें नृपवर्या ॥ यागीं इंद्रियें कोंडिती । ते भक्त ... । ... विषय जे त्यागिती । ते भक्त अर्पिती भगवंतीं ॥ योगी विषय त्यागिती । ... देह दुःखी होती । भक्त ... । तेणें ते होती नित्यमुक्त । ... । २८० । २८९

एकनाथ ह्मणतात : भागवत धर्म पाळणारे ... —

जेवीं स्व... । ... । कर्म... ॥ २२८

इंद्रियांच्या योगें वाणीनें शरीरानें आणि स्वभावानुसार जें जें कर्म [illegible]

-जाता ते भागवत धर्म कोणते, तें सांगतोः- पुरुष मनानें, बुद्धीनें, चित्तानें (अथवा अहंकारानें), इंद्रियांच्या योगें वाणीनें शरीरानें आणि स्वभावानुसार जें जें कर्म करील तें सगळें त्यानें ' परमेश्वर नारायणाला ' म्हणून समर्पण करावें. - असें केलें असतां सगळें कर्म भागवतधर्माचरण होतें - ॥ ३६ ॥ - ज्ञानवान कोणी ज्ञानानें [illegible]

मनसा, बुद्ध्या, आत्मना, इंद्रियैः, वाचा (वाणीनें), कायेन (शरीरानें) अनुसृतस्वभावात् (स्वभावानुसार) वा यत् यत् करोति तत् सकलं परस्मै नारायणाय इति समर्पयेत्, [तत्] (अर्पण करावें). ॥ ३६ ॥ ईशात् (ईश्वरापासून) अपेतस्य (विमुख झालेल्या) तन्मायया अस्मृतिः (स्मरण नाहींसें होतें), [तत:] विपर्ययः ([illegible]), [ततः]

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुद्ध्याऽऽत्मना वाऽनुसृतस्वभावात् ॥ करोति यद्यत्सकलं परस्मै

नारायणायेति समर्पयेत्तत् ॥ ३६ ॥ भयं द्वितीयाभिनिवेशतः स्यादीशादपेतस्य विपर्ययोऽ

ऽस्मृतिः ॥ तन्मायया ऽतो बुध आभजेत्तं भक्त्यैकयेशं गुरुदेवतात्मा ॥ ३७ ॥

द्वितीयाभिनिवेशात् (दुसऱ्याच्या म्ह० देहाच्या अभिमानानें) भयं स्यात्. [तस्मात्] बुधः गुरुदेवतात्मा (गुरु हाच देव व प्रिय ज्याला असा) [सन्] एकया भक्त्या तं ईशं भजेत (भजो) ॥ ३७ ॥

[illegible] भय कशामुळें उत्पन्न होतें तें पाहूं या. - मनुष्य ईश्वरापासून विमुख (त्याची सेवा न करणारा) झाला की त्याला भगवंताच्या मायेमुळें परमात्मस्वरूपाचें विस्मरण पडतें व ' देहच मी ' या भ्रमामुळें कल्पिलें गेलें आहे. त्याची निवृत्ति ज्ञानानेंच होते. तें ज्ञान संपादावें म्हणजे झालें ईश्वरभक्तीचा खटाटोप पाहिजे कशाला? तर त्यालाही उत्तर सांगतो. आधीं आपण [illegible]

१ श्लोकामध्ये कायेन, वाचा, मनसा, असा क्रम आहे खरा, पण त्या क्रमाप्रमाणें अर्थ करणें प्रशस्त होणार नाहीं. कारण ईश्वरार्पण करण्याला प्रारंभ मनापासूनच झाला पाहिजे [illegible], मुख्य, त्यानें जोंपर्यंत तो मार्ग स्वीकारिला नाहीं तोंपर्यंत इतरानें केलेलें कर्म ईश्वरार्पण होणें शक्य नाहीं. करितां व्याख्यान [illegible] श्लोकाचा अनुक्रम फिरवून असा अर्थ करावा - प्रथम मानसिक कर्म [illegible], नंतर इंद्रियकृत, व शेवटीं शरीर नाथ म्हणतातः- ' या श्लोकींचें व्याख्यान। पहिलें मानसिक समर्पण। पाठीं इंद्रियें बुद्धि अभिमान। कायिक जाण श्लोकान्वयें ' २४० [illegible] भगवंतांनीं [illegible] आहे [illegible].

२ याचा आशय असा कीं, केवळ निर्बुद्ध जें कर्म केलें असेल तेवढेंच ईश्वराला अर्पण करायाचें असें नाहीं तर स्वभावानुसार जें लौकिकही कर्म घडेल तेंही अर्पण्याचें [illegible] ' यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्। यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम्॥ (अ ९।२७) अर्जुना तूं जें करितोस, जें भक्षितोस, जें हवन करितोस [illegible] आचरितोस ते सर्व मज अर्पित जा ' ३ भगवंतानीं गीतेंतही अर्जुनाला सांगितलें आहे कीं,

दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया। मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते॥ अ ७ श्लो १४.

मी आत्मा ! असा विपरीत ग्रह पडूं लागतो. अशा प्रकारें आत्म्याहून वेगळ्या दुसऱ्याचा (देहादिकाचा) अभिमान उद्भवला कीं भय पुढें उभें ठेवलेलेंच. - एतावता, भयाचें आदिकारण ईश्वराची सेवा न करणें हें होय. - म्हणून, समंजस प्राण्यानें गुरु हाच आपला देव व अत्यंत प्रिय अशी दृष्टि ठेवून अचल भक्तीनें, मायानियामक ईश्वराचें भजन करीत असावें. - ईश्वराच्या सेवकाला माया भय उत्पन्न करूं शकत नाहीं. - ॥ ३७ ॥ - ह्यावर अशी शंका सहज उद्भवते कीं ' प्राण्याचें मन विषयांच्या [illegible] चंचल असतें, तेव्हां अगोदर अचल भक्ति ठेवणेंच असंभवनीय दिसतें. मग भय दूर होण्याची गोष्ट तर लांबच राहिली. ' तिचें उत्तर : ही शंका, विषय जर [illegible], तर योग्य होईल. पण विषय मुळीं मनाचे काल्पनिक खेळ होत, खरे नव्हत. तें गारुडी मन आंवरून ईश्वरभजन चालविलें कीं भय दूर होण्यास कांहीं अडचण नाहीं. [illegible] : - द्वैत- यथा स्वप्नमनोरथौ, [तथा] अविद्यमानः (नसणारा) अपि द्वयः (द्वैतप्रपंच) ध्यातुः (चिंतणाराच्या) धिया (बुद्धीनें) अवभाति (भासतो), तत् बुधः कर्म[illegible]

अविद्यमानो ऽप्यवभाति हि द्वयो ध्यातुर्धिया स्वप्नमनोरथौ यथा ॥ तत्कर्मसंकल्पविकल्पकं मनो बुधो

निरुंध्यादभयं ततः स्यात् ॥ ३८ ॥ शृण्वन्सुभद्राणि रथांगपाणेर्जन्मानि कर्माणि च यानि लोके ॥

(कर्मांचे संकल्प व विकल्प करणाऱ्या) मनः निरुंध्यात् (आंवरो). ततः अभयं स्यात्. ॥३८॥ [बुधः] लोके रथांगपाणेः (रथाचें अंग म्हणजे चक्र हातीं ज्याच्या त्या विष्णूचीं) [illegible] प्रपंच (शरीर, इंद्रियें, घट, पट, इत्यादि) खरा नसतांही भासतो, तो केवळ चिंतन करणाराच्या बुद्धीमुळें. उदाहरण स्वप्नाचें व मनोराज्याचें (स्वप्नामध्यें [illegible] च्या योगें कल्पनामय प्रतिसृष्टि निर्मितो; ती खरी असते काय? तसेंच मनोराज्यांतही ' मी राजा झालों आहें, वाड्यात बसलों आहें, चाकरमाणसें [illegible] सहस्रावधि काल्पनिक सुखांचे अनुभव मनुष्य घेत असतो. स्वप्नांतील व मनोराज्यांतील विषय जसे खोटे तसेच व्यवहारदर्शन दृश्यमान शरीर, गृह, [illegible] मिथ्या समजावे). म्हणून, विचारी पुरुषानें विविध कर्मविषयांचे संकल्प व विकल्प चालविणाऱ्या मनाचें नियमन करावें. - मन स्वाधीन झालें कीं अचल भक्ति [illegible] भावानें ईश्वराची सेवा केली असतां - तेणेंकरून अभय मिळतें. ॥ ३८ ॥ - हें करणें (मनोनिग्रह) एखाद्याला अत्यंत अशक्य वाटेल, पण तें तसें नाहीं. [illegible]

(मागील टीप पुढें चालू.)

अर्थ :– ही माझी अद्भुत त्रिगुणात्मक माया उल्लंघून जाण्यास फार कठिण आहे. जे पुरुष मलाच शरण येतात, ते हिला तरून जातात.

मायेचें लक्षण नाथांनीं असें वर्णिलें आहे :—

त्या मायेचें मुख्य लक्षण । स्वस्वरूपाचें आवरण । द्वैताचें जें जें स्फुरे स्फुरण । मूळ माया जाण तिला नांव ॥ ब्रह्म [illegible] । ते स्वरूपीं [illegible] मायेचें मूळ स्थान । निश्चयें जाण नृपनाथा ॥ ४५१ । ५२

तो असा :- चक्रपाणीनें (ईश्वरानें) सृष्टीमध्यें अत्यंत मंगलकारक जे जे अवतार घेतले, ज्या ज्या लीला केल्या व त्या अवतारासाठी आणि लीलांकरिता जीं जीं नावें स्वीकारिलीं, - तीं असंख्य असल्यामुळें सगळीं कळण्याचा संभव नाहीं तरी त्यांपैकीं - लोकांत जीं गाइलीं जातात (प्रसिद्ध आहेत). त्यांचें मनुष्यानें अगदीं लाज न धरितां श्रवण व गायन करीत फिरत असावें; कसलीं इच्छा धरूं नये ॥ ३९ ॥ मनुष्यानें अशी वृत्ति स्वीकारिली म्हणजे आपल्या प्रिय ईश्वराच्या नामसंकीर्तनानें अंतरीं प्रेम उद्भवून त्याचें चित्त द्रवतें व मग तो - केव्हां केव्हां 'भक्तांनीं भगवंताला आकळिलें' असें मनांत आलें कीं - खदखदां हासतो, - एखादेवेळीं 'ईश्वरानें माझा फार

(अत्यंत मंगलदायक) जन्मानि, कर्माणि, तदर्थकानि (तीं जन्में व कर्में प्रयोजनें ज्यांचीं अशीं) नामानि च, [तानि] शृण्वन्, विलज्ज: गायन्, असंग (आसक्तिरहित, निःस्पृह) [सन्] विचरेत्. ॥ ३९ ॥ एवंव्रतः (असें व्रत ज्याचें असा) स्वप्रियनामकीर्त्या (आपल्याला प्रिय जो ईश्वर त्याच्या नामकीर्तनानें) जातानुराग (उद्भवलें प्रेम ज्याला असा) द्रुतचित्त.

गीतानि नामानि तदर्थकानि गायन्विलज्जो विचरेदसंगः ॥ ३९ ॥ एवंव्रतः स्वप्रियनामकीर्त्या

जातानुरागो द्रुतचित्त उच्चैः ॥ हसत्यथो रोदिति रौति गायत्युन्मादवन्नृत्यति लोकबाह्यः ॥४०॥

(द्रवलें चित्त ज्याचें असा) लोकबाह्यः (देहभानरहित, परवश) [भक्तः] उच्चैः (मोठ्यानें) हसति. अथो रोदिति (रडतो), रौति (ओरडतो), गायति उन्मादवत् (पिशाचानें धरलेल्याप्रमाणें) नृत्यति.

दिवस अंत पाहिला' असें वाटून - रडत सुटतो; - कधीं कधीं अतिशय उत्कंठेनें 'श्रीहरे, मजवर अनुग्रह कर' असा - आक्रोश करूं लागतो. - अन्य प्रसंगीं अत्यंत आनंदानें - गायन चालवितो; अथवा - 'जिंकिलें! मिळविली' असें म्हणून - नाचतच सुटतो. - पण तो ह्या कृति ढोंगासाठीं किंवा जनांकडून प्रेमळ ईश्वरभक्त म्हणवून घेण्याच्या उद्देशानें करीत नाहीं हो; तर - त्याची वृत्तिच एखाद्या पिशाचानें झपाटलेल्या मनुष्यासारखी झालेली असते. तो मुळीं देहभानावरच नसतो तर परवश होऊन वाटेल तें करीत असतो

---

१ बालबोधिनीकार 'तदर्थकानि' ह्याचा अर्थ, श्रवण कीर्तन करणाराना अपेक्षित पुरुषार्थाची प्राप्ति करून देणें हें ज्याचें प्रयोजन अशीं भगवंतानीं जन्मकर्में, असा करितात

२ श्रवणद्वारा ऐकण्यास चित्त किती तत्पर असावें ह्याविषयीं नाथाचा उत्तम दृष्टांतः–'चुकल्या पुत्राची शुद्धिवार्ता। जेणें आदरें ऐके माता। तेणें आदरें हरिकथा। सार्थकता परिसावी'॥५१७॥
मननावाचून श्रवण व्यर्थ आहे, ह्याचें निरूपण त्यांनीं अत्युत्तम केलें आहे, पण तें विस्तारभयास्तव येथें घेता येत नाहीं - 'कीर्तनानें लोकांचे समस्त दोष निर्दाळिले, म्हणून जपतपांना कोणी पुसेना, तीं

३ कीर्तनाचा प्रभाव किती वर्णावा' नाथ म्हणतात, जगामध्यें कीर्तन चालू झाल्याबरोबर किती तरी उलाढाली झाल्या – 'कीर्तनानें लोकांचे समस्त दोष निर्दाळिले, म्हणून जपतपांना कोणी पुसेना, तीं ... तेव्हां त्यांच्याकडे येतो कोण? यमनियमांना उपास पडूं लागले, व योगाभ्यास निराश होऊन बसले; यमनगरी ओसाड पडली, तिकडे कोणीच जाईना; तीर्थें पातक्याची वाट पाहून पाहून थकलीं पातक्च नाहीं तेव्हां त्यांच्याकडे येतो कोण? यमनियमांना उपास पडूं लागले, व योगाभ्यास

मरायला टेंकले' ५३१ । ३२

॥ ४० ॥ आणि तो प्रेमळ भक्त आकाश, वायु, अग्नि, उदक, पृथ्वी, नक्षत्रें, प्राणिसमूह, दिशा, वृक्षलतादिक, नद्या आणि समुद्र हे सर्व हरीचें शरीर होय अशा भावनेने यावत् पदार्थमात्राला अनन्यभावें वंदनही करितो. ॥ ४१ ॥ - ह्यावर अशी शंका येण्याचा संभव आहे की, ही गति ज्याचा योगाभ्यास दृढ झाला त्याला देखील पुष्कळ जन्मांनीही मिळण्यास कठीण, मग ती नुसत्या हरिकीर्तनानें एकाच जन्मात लाभावी कशी? तर तिचेंही उत्तर सांगतो - मनुष्य भोजन करायला बसला म्हणजे क्रमानें एकेक ग्रास घेत जातो तेव्हां प्रत्येक घास घेतला असता त्याला सुख, पोटाची भर आणि क्षुधेचा नाश हीं एकदम होतात की नाहीत? होतात - ग्रासाची गोष्ट कशाला हें एक उपलक्षण मानिलें, तर प्रत्येक

रता) नृत्यति च. ॥ ४० ॥ खं (आकाश), वायुं, अग्निं, सलिलं, महीं, ज्योतींषि (नक्षत्रें), सत्त्वानि (प्राणिसमूह), दिशः द्रुमादीन्, सरित्समुद्रान्, यत् किंच भूतं 'हरेः शरीरं' [इति ज्ञात्वा] अनन्यः (नाहीं हरीवांचून अन्य आश्रय ज्याला असा) [सन्] प्रणमेत् (वंदन करील) ॥४१॥ यथा अश्नतः (भोजन करणाराला) अनुघासं (प्रत्येक घासाला) तुष्टिः (संतोष)

खं वायुमग्निं सलिलं महीं च ज्योतींषि सत्त्वानि दिशो द्रुमादीन् ॥ सरित्समुद्रांश्च हरेः शरीरं

यत्किंच भूतं प्रणमेदनन्यः ॥ ४१ ॥ भक्तिः परेशानुभवो विरक्तिरन्यत्र चैष त्रिक एककालः ॥

प्रपद्यमानस्य यथाऽश्नतः स्युस्तुष्टिः पुष्टिः क्षुदपायोऽनुघासम् ॥ ४२ ॥

पुष्टि (पोषण, उदरभरण), क्षुदपायः (क्षुधेचा नाश) [च] स्युः (होतात), [एवं] प्रपद्यमानस्य (शरण गेलेल्याला) भक्तिः ([illegible] प्रेम) परेशानुभव (ईश्वराचा [illegible])

शीत जसजसें पोटांत जातें तसतसें त्याला सुख वाटतें, तितकी पोटाची भर होते आणि त्या मानानें क्षुधा कमी कमी होत जाते - जेवणाराला जसा सुख उदरभरण आणि क्षुधानाश ह्या तीन गोष्टी एका काली प्राप्त होतात, त्याप्रमाणेंच ईश्वराची सेवा करणाराला भगवंतावर प्रेम, भगवत्स्वरूपाचा साक्षात्कार आणि ते सुख मिळाल्यामुळें इतरांविषयीं (गृहस्त्री-पुत्रादिकांविषयी) वैराग्य (कंटाळा वीट) हें त्रिकूट एकेच वेळी (सेवा करतानाच) प्राप्त होतें ॥ ४२ ॥

---

१ 'जेवीं कांतोनियां रंभस्तंभे। स्फटिकदीपगृह अवघेंचि। चितारिलीं अभ्रगज्वळें। तो आसनी सोज्ज्वळ आतुडे दीप ॥ तेवी सोनसर्यादि तेजराशी। [illegible] जे लखलखती। जन्मयवादि निजदीप्ति। देखे आत्मज्योति सतेज'। ५७५। ३६ [illegible] — [illegible] काढून तिचें दीपगृह केले, भिंतीवरच एकमेकी हत्ती, घोडे, मैत्र, इत्यादि कोरून ठेविलीं आणि आत दिवा [illegible] लोकांच्या नेत्रांतील तारका हीं सर्वव्यापी आत्मज्योतीचें [illegible]

राजा, ह्याप्रमाणें संतत अच्युताच्या चरणाची सेवा करणाऱ्या भगवद्भक्ताला भक्ति, वैराग्य आणि भगवत्स्वरूपाचा साक्षात्कार ही पूर्ण प्राप्त होतात आणि त्यामुळें तो प्रत्यक्ष परम शांति पावतो. (पुष्कळ घास जेवणाराला जशी पुष्कळ सुख पुष्कळ उदरपूर्ति आणि क्षुधेचा पुष्कळ नाश हीं मिळतात तसेंच नमन सेवा करणाराला पूर्ण भक्तियोग, पूर्ण ज्ञान व पूर्ण वैराग्य हीं प्राप्त होऊन तो कृतार्थ होतो) ॥ ४३ ॥ - भगवद्भक्ताला भक्तियोगादि प्राप्त होतात असें ऐकून - विदेहराजानें प्रश्न केला – मुनिवर्य आता मला भगवद्भक्त कोणाला म्हणावे तें सांगा. तो कोणत्या धर्माचें आचरण करण्यात तत्पर असतो. त्याचा स्वभाव कसा असतो. मनुष्यामध्यें त्याची वागणूक कशी असते. तो बोलतो काय आणि तो भगवताला प्रिय होतो कोणत्या लक्षणानी १ ॥ ४४ ॥ हरिनामक योगी सांगू लागला – जो पुरुष, मी ब्रह्मरूपानें सर्वभूतामध्यें भरून राहिलेला आहे आणि अन्वय विरक्तिः (कंटाळा, वीट, वैराग्य) त्रयः त्रिक. (तिन्हींचा समुदाय) एककाल. (एक काल ज्याचा असा, एकदम होणारा). ॥ ४२ ॥ राजन्, इति अनुवृत्त्या (सेवेनें) अच्युताङ्घ्रिं (ईश्वरचरण) भजतः (भजणाऱ्या) भागवतस्य भक्तिः, विरक्तिः, भगवत्प्रबोधः (भगवताचें ज्ञान) [च] भवति ततः साक्षात् परां शांतिं उपैति (पावतो) ॥ ४३ ॥

इत्यच्युतांघ्रिं भजतोऽनुवृत्त्या भक्तिर्विरक्तिर्भगवत्प्रबोधः ॥ भवंति वै भागवतस्य राजं स्ततः
परां शांतिमुपैति साक्षात् ॥४३॥ राजोवाच । अथ भागवतं ब्रूत यद्धर्मो यादृशो नृणाम् ॥ यथा
चरति यद्ब्रूते यैर्लिंगैर्भगवत्प्रियः ॥ ४४॥ हरिरुवाच । सर्वभूतेषु यः पश्येद्भगवद्भावमात्मनः ॥
भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः ॥ ४५ ॥

राजा उवाच— " अथ यद्धर्मः (जो धर्म ज्याचा असा) यादृशः (स्वभावानें जसा) नृणां यथा चरति (वागतो), यत् ब्रूते (बोलतो), यैः लिंगैः (चिन्हांनीं) भगवत्प्रिय, [एनं] भागवतं ब्रूत. " ॥ ४४ ॥ हरिः उवाच— " यः (जो) आत्मनः (स्वतःचें) सर्वभूतेषु (सर्व प्राण्यांत) भगवद्भाव (भगवद्रूपत्व असणें), भगवति आत्मनि (स्वतःचे आश्रयावर) ब्रह्मरूप माझ्या आश्रयावर सर्व भूतें राहत असतात, अशी दृष्टि (अहं. ममत्व) ठेवितो तो उत्तम भगवद्भक्त होय (किंवा. ह्याच श्लोकाचा दुसरा अर्थ – आत्मा ह्याचें सर्वव्यापी हरि. हरि सगळ्या भूतामध्यें – कृमिकीटकांमध्येंसुद्धा – नियामक म्हणून भरून राहिला असताही त्याचें अत्युत्तम ऐश्वर्य जसेंच्या तसें आहे, क्षुद्र भूतांत शिरल्यामुळें त्याच्या ऐश्वर्यांत कांहीं कमीपणा झाला नाहीं, तसेंच हरीच्या ठिकाणी सर्व भूतें आहेत तथापि हरीचें ऐश्वर्य अखंडच आहे, त्या जड व मलिन भूतांना आश्रय दिला म्हणून त्याच्या सबंधानें जडपणा, मलिनता इत्यादि गुण येऊन त्याच्या ऐश्वर्यांत खंड पडला नाहीं. असें सर्वत्र परिपूर्ण भगवत्तत्त्व जो पहातो, तो उत्तम भगवद्भक्त होय) ॥ ४५ ॥

१ परम शांति म्हणजे संसारदुःखाची निवृत्ति होऊन परमानंदरूप भगवत्ताची प्राप्ति बालबोधिनी

२ ' सर्व भूतीं मी भगवंत । सर्व भूतें तीं मज आंत । भूतीं भूतात्मा मीचि समस्त । मीच मी येथ परमात्मा ' ॥ एकनाथ ६३२

ईश्वर, त्याचे आज्ञांकित (भक्त), मूढ जन आणि शत्रु ह्या चौघावर जो अनुक्रमें प्रेम, मैत्री, कृपा आणि उपेक्षा ठेवितो (जो पुरुष ईश्वरावर प्रेम ठेवितो, त्याच्या भक्ताची
मैत्री धरितो; अज्ञानी जनावर कृपा करितो; आणि शत्रूंनीं कितीही छळिलें तरी मनावर घेत नाही, त्याना शिक्षा करीत नाही स्वताच्या चित्ताची व्यग्रता होऊ देत नाहीं किंवा
आपला क्रम सोडीत नाहीं), तो मध्यम प्रतीचा भक्त होय. (कारण, ह्याच्या बुद्धीचा ग्रह ईश्वर, मी व इतर लोक भिन्न आहों असा असतो मागील श्लोकात सांगितलेला उत्तम
भक्त हा भेद पाहत नाहीं, तर सर्वत्र एक परब्रह्म अशी त्याची वृत्ति बनलेली असते). ॥ ४६ ॥ आणि जो पुरुष प्रतिमेवरच हरीची भक्तिपुरस्सर पूजा करितो, हरिभक्ताच्या
ठिकाणी देखील करीत नाहीं मग इतरावर करणार नाही - हें उघडच आहे, - तो भक्त अगदीं नवा (ज्यानें भक्तीला नुकताच प्रारंभ केला असा, होतकरू) समजावा ॥ ४७ ॥
भूतानि [च] पश्येत् (पाहील), एष. भागवतोत्तम. ॥ ४५ ॥ यः ईश्वरे, तदधीनेषु (त्याच्या भक्तावर), बालिशेषु (अज्ञ लोकावर), द्विषत्सु (शत्रूवर) च प्रेममैत्रीकृपो-
पेक्षाः करोति, सः मध्यमः. ॥ ४६ ॥ यः श्रद्धया अर्चायां (मूर्तीवर) एव हरये पूजां ईहते (करितो), तद्भक्तेषु (त्याच्या भक्तावर), अन्येषु च न [ईहते], स प्राकृत.

ईश्वरे तदधीनेषु बालिशेषु द्विषत्सु च ॥ प्रेममैत्रीकृपोपेक्षा यः करोति स मध्यमः ॥ ४६ ॥ अर्चायामेव हरये पूजां यः श्रद्धयेहते ॥
न तद्भक्तेषु चान्येषु स भक्तः प्राकृतः स्मृतः ॥ ४७ ॥ गृहीत्वाऽपीन्द्रियैरर्थान्यो न द्वेष्टि न हृष्यति ॥ विष्णोर्मायामिदं पश्यन्स वै
भागवतोत्तमः ॥४८॥ देहेन्द्रियप्राणमनोधियां यो जन्माप्ययक्षुद्भयतर्षकृच्छ्रैः ॥ संसारधर्मैरविमुह्यमानः स्मृत्या हरेर्भागवतप्रधानः ॥४९ ॥

(नवा अभ्यासी, होतकरू) स्मृतः. ॥ ४७ ॥ यः इन्द्रियैः अर्थान् (विषय) गृहीत्वा (स्वीकारून) अपि इदं (विश्व) विष्णो माया पश्यन् [सन्] न- द्वेष्टि (द्वेष करीत नाहीं),
न- हृष्यति (आनंद मानीत नाहीं), सः भागवतोत्तमः. ॥ ४८ ॥ यः हरेः स्मृत्या देहेन्द्रियप्राणमनोधियां जन्माप्ययक्षुद्भयतर्षकृच्छ्रैः (अप्यय म्ह० नाश, तर्ष म्ह० विषयेच्छा)
- उत्तम भगवद्भक्ताचीं आणखी लक्षणें सांगतों ऐक :- ज्याला इंद्रियानी विषयाचें ग्रहण केलें तरी खेदही वाटत नाहीं व हर्षही होत नाहीं तर हें सर्व विश्व हरीची माया होय
असें वाटत असतें, तोच उत्तम भागवत समजावा (चित्ताचा वासुदेवरूपी लय लागल्यामुळें ज्याला विषयाची आवडनिवड नसते अर्थात इंद्रियानीं बरेवाईट कसलेही विषय भोगिले
तरी ज्याला हर्षविषाद होत नाहींत. तर हें विश्व विष्णूच्या मायेचा खेळ आहे असें वाटत असतें तो उत्तम भगवद्भक्त होय) ॥ ४८ ॥ जन्म व मृत्यु हे धर्म देहाचे क्षुधा व
तृषा हे धर्म प्राणाचे· भय हा धर्म मनाचा, भोगेच्छा हा धर्म बुद्धीचा, आणि श्रम हा धर्म इंद्रियाचा जो पुरुष हरीचें नित्य स्मरण[3] ठेविल्यामुळें देह इंद्रियें, प्राण मन व बुद्धि

१ ' पाषाणप्रतिमा हाचि देवो । तेथेंचि ज्याचा पूर्ण भावो । भक्तजनासि पहा हो । अणुमात्र देहो लवो नेदी ॥ ते ठायीं साधारण जन । त्याची वार्ता पुसे कोण । त्यासे
स्पर्शीही नाहीं सन्मान । यापरी भजन प्राकृताचें ॥ ' एकनाथ ६४४।४५. २ ' मृगजळांत नाहणार जसा कोरडा राहतो, तसा जो विषय भोगूनही अलिप्त असतो तो उत्तम भक्त एकनाथ, ६४९
३ नाथ म्हणतात ' हरिस्मरणाचा अगाध विलक्षण प्रभाव आहे कीं, तें करणाराला क्षुधा, भय इत्यादि संसारधर्मानें स्पर्शच होत नाहीं ' ६८५ ते ८२

यांच्या जन्म, मरण, क्षुधा, भय, भोगेच्छा व श्रम ह्या संसारधर्मांनी मोह पावत नाहीं, तो भगवद्भक्तामध्यें प्रधान होय ॥ ४९ । विषयेच्छा, कर्मे आणि वासना यांचा ज्याच्या चित्तामध्यें अंकुरच उगवत नाहीं आणि वासुदेव हाच ज्याचा एक आश्रय, तो उत्तम भगवद्भक्त मानावा (भगवद्भक्ताची लोकामध्यें गणना कशी असते ' ह्या राजाच्या प्रश्नाचें उत्तर ४८, ४९, व ५० श्लोकांत आहे.) ॥ ५० ॥ चांगल्या कुळांत जन्म, तपश्चर्यादि कर्में, ब्राह्मणादि वर्ण ब्रह्मचर्यादि आश्रम, व जाति (अनुलोमज व प्रतिलोमज) ह्यामुळें ज्याचा ह्या देहावर अभिमान जडत नाहीं, तो पुरुष श्रीहरीला प्रिय होतो ('भक्त कोणत्या लक्षणांनी भगवताला प्रिय होतो ' ह्या राजाच्या प्रश्नाचें हें उत्तर) ॥ ५१ ॥ [यः संसारधर्मैः अविमुह्यमानः (मोहून न जाणारा) [भवति, सः] भागवतप्रधानः ॥ ४९ ॥ यस्य चेतसि (मनात) कामकर्मबीजानां (भोगेच्छा, कर्में व वासना यांचा) संभव न [च] वासुदेवैकनिलयः (वासुदेव हा एक आश्रय ज्याचा असा), सः भागवतोत्तमः. ॥ ५०॥ यस्य अस्मिन् देहे जन्मकर्मभ्यां (जन्मामुळें किंवा कर्मामुळें) अहंभाव (अहंकार) न – वर्णाश्रमजातिभिः [च] न, सः हरेः प्रियः ॥ ५१ ॥ यस्य वित्तेषु, आत्मनि वा स्वः (आपलें व आपण) परः (दुसऱ्याचें व दुसरा) इति भिदा सज्जते (वसत नाहीं),

न कामकर्मबीजानां यस्य चेतसि संभवः ॥ वासुदेवैकनिलयः स वै भागवतोत्तमः ॥ ५० ॥ न यस्य जन्मकर्मभ्यां न वर्णाश्रमजातिभिः ॥ सज्जतेऽस्मिन्नहंभावो देहे वै स हरेः प्रियः ॥ ५१ ॥ न यस्य स्वः पर इति वित्तेष्वाऽऽत्मनि वा भिदा ॥ सर्वभूतसमः शांतः स वै भागवतोत्तमः ॥ ५२ ॥ त्रिभुवनविभवहेतवेऽप्यकुंठस्मृतिरजितात्मसुरादिभिर्विमृग्यात् ॥ न चलति भगवत्पदारविंदाल्लवनिमिषार्धमपि यः स वैष्णवाग्र्यः ॥ ५३ ॥

(भेद) व, सर्वभूतसमः (सगळ्या प्राण्यांशीं समबुद्धीनें वागणारा) शांतः [च स्यात्], सः भागवतोत्तमः ॥ ५२ ॥ यः अकुंठस्मृतिः (नाहीं नष्ट झाली स्मृति ज्याची असा) [सन्] त्रिभुवनविभवहेतवे (त्रैलोक्याच्या राज्यैश्वर्यासाठीं) अपि अजितात्मसुरादिभिः (अजित म्ह० कोणीं न जिंकिलेला अशा परमात्म्यावर चित्त ज्यांचीं त्या देवादिकांनींही) विमृग्यात् (शोधण्या- ज्याला वित्ताविषयीं हें माझें आणि तें दुसऱ्याचें असा भेद वाटत नाहीं अथवा आत्म्याविषयीं हा मी आणि तो दुसरा अशी भेदबुद्धि असत नाहीं तर जो सर्व भूतांशीं सम भावानें वागतो व नित्य शांत असतो, तो उत्तम भगवद्भक्त होय. ॥ ५२ ॥ आणखी, त्रैलोक्याचें राज्यैश्वर्य मिळत असलें तरी जो भगवंताच्या चरणकमळापासून अर्धा लव किंवा अर्धा निमिष (चिपटीभर) सुद्धां ढळत नाहीं - कारण, ईश्वरचरणावेगळें दुसरें कोठें काहीं सार नाहीं अशी स्मृति ज्याच्या चित्तांत नेहमीं जागरूक असते, तो उत्तम विष्णुभक्त होय - परमेश्वराच्या चरणाचें माहात्म्य किती वर्णावें – हरीकडे सर्वदा लक्ष देऊन राहणारे देवादिक देखील त्याचा (हरीच्या चरणाचा) शोध करीत आहेत (देव देखील ज्याची

१ भक्ताला उच्च वर्णाचा अभिमान नसतो, ह्याला दृष्टांत– ' स्फटिक कुंकुमें दिसे रक्तवर्ण । मी लोहित (तांबडा) पूर्ण हें स्फटिक न म्हणे ' ॥ नाथ, ७०२.

प्राप्ति व्हावी म्हणून शोध करीत आहेत, त्या भगवत्पदापेक्षा उत्तम असें काहीच नाहीं, हो स्मृति असंग इइ असल्यामुळें जो क्षणभर सुद्धा भगवत्पदाला विसरत नाहीं तो उत्तम
वैष्णव). ॥ ५३ ॥ - आता, भोगेच्छा जर संताप देऊं लागेल तर विषयाकडे ओढ लागल्यामुळे चित्त भगवच्चरणापासून ढळण्याचा संभव आहे खरा पण भक्ताच्या अंतरीं
भोगेच्छा संताप उत्पन्न करूं शकतच नाहीं पहा - चंद्र उगवून आपल्या किरणांनीं संतापाचा नाश करीत आहे तर त्या स्थळीं (रात्रीच्या वेळीं) सूर्याचा ताप बाधा करितो
काय ? नाहीं. त्याचप्रमाणें भक्ताच्या हृदयातील सगळे ताप - अंतरीं राहणाऱ्या - महापराक्रमी अशा भगवच्चरणावरील नखरूप चंद्रकांत मण्याच्या शीतल प्रकाशानें दूर केले
जोग्या) भगवत्पदारविंदात् (भगवंताच्या चरणकमलापासून) लवनिमिषार्धं (अर्धा लव किंवा अर्धा निमिष सुद्धा) अपि न—चलति (ढळत नाहीं), स वैष्णवाग्र्य ॥ ५३ ॥
चंद्रे उदिते (उगवलेला) [सति], अर्कतापः (सूर्याचा ताप) इव भगवत. उरुविक्रमाङ्घ्रिशाखानखमणिचंद्रिकया (विपुल पराक्रम ज्याचे अशा पायाच्या शाखा ज्या अंगुळि त्यावरील
नखरूप चंद्रकांत मण्याच्या चांदण्यानें) निरस्ततापे (दूर केला ताप ज्यातील अशा) उपसीदतां (शरण जाणाऱ्या) हृदि (हृदयांत) सः कथं पुनः प्रभवति (उद्भवतो)[१] ॥ ५४ ॥ अवशा-

भगवत उरुविक्रमांघ्रिशाखानखमणिचंद्रिकया निरस्ततापे ॥ हृदि कथमुपसीदतां पुनः स प्रभवति चंद्र इवोदिते ऽर्कतापः ॥ ५४ ॥
विसृजति हृदयं न यस्य साक्षाद्धरिरवशाभिहितो ऽप्यघौघनाशः ॥ प्रणयरशनया धृतांघ्रिपद्मः स भवति भागवतप्रधान उक्तः ॥ ५५ ॥
इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे नारदवसुदेवसंवादे द्वितीयो ऽध्याय ॥ २ ॥

भिहितः (परवशानें उच्चारिलेला) अपि अघौघनाशः (पापसमूहाचा नाश करणारा) हरिः प्रणयरशनया (प्रेमरूप दोरीनं) धृताङ्घ्रिपद्म (बांधलें चरणकमल ज्याचे असा) साक्षात् यस्य
हृदय न—विसृजति (सोडीत नाहीं), सः भागवतप्रधानः उक्तः भवति. ” ॥ ५५ ॥ ॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे द्वितीयो ऽध्याय ॥ २ ॥
जातात. तेव्हा त्या ठिकाणीं भोगेच्छामूलक संताप उद्भवेल कसा ? असो. (५२, ५३ आणि ५४ श्लोकांतील निरूपण हें राजाच्या ' भक्ताचा स्वभाव कसा असतो ' ह्या
प्रश्नाचें उत्तर समजावें आणि ' भक्त काय बोलतो ? ' ह्याचें उत्तर ' हरिनामें जपतो ' हें जाणावें) ॥ ५४ ॥ - आता सगळ्या लक्षणाचें सार सांगतो एक - ज्याचे
अगदी परवश अथवा आतुर स्थितीत परमेश्वराचें नुसतें नाम उच्चारिलें तरी तो (परमात्मा) जगो प्रेमरज्जूनें चरणकमल बांधून ठेवल्यामुळे ज्याच्या हृदयाला कधींही सोडीत
नाहीं तो पुरुष भगवद्भक्तांतील अग्रगण्य म्हटला जातो ॥ ५५ ॥ ॥ इति श्रीमद्भागवतार्थदीपिकेंतील एकादशस्कंधे द्वितीयो ऽध्यायः ॥ २ ॥

१ महाशक्ति ईश्वर प्रेमानें कसा बांधिला जातो, ह्याला दृष्टांत :—
' बाळ पालवीं (पदरीं) घालीं पिळा । तेणें बाप राहे थोकला । तरी काय मी निर्बळ जाहला ना तो स्नेहें गुंतला उडतां । ना. ३ ११८

मागें हरियोगींद्रानें सांगितलें कीं, 'हे सगळें विश्व भगवंताची माया असें जो पाहतो, तो भगवद्भक्त.' हें ऐकून विदेहराजाला माया म्हणजे काय, तें समजून घेण्याची इच्छा झाली व त्यानें प्रश्न केला:- राजा म्हणाला:–सर्वज्ञ मुनिवरहो, सर्वशक्ति व विश्वव्यापक परमात्म्याची जी माया - ब्रह्मदेवासारख्या - मोठमोठ्या मायाव्यांनाही मोह पाडिते, तिचें लक्षण समजून घ्यावें, अशी आमची इच्छा आहे. करिता आपण तें आम्हाला सांगावें. ॥ १ ॥ हरिकथारूप अमृतानें भरलेलें आपलें भाषण हें संसारतापावर औषध होय. मी मर्त्ययोनींत जन्म पावलों असून संसारतापानें अत्यंत गांजलों आहें, म्हणून तुमचें भाषणामृत कितीही प्यावयास मिळालें तरी मला तृप्ति वाटत नाहीं ॥ २ ॥

राजोवाच । परस्य विष्णोरीशस्य मायिनामपि मोहिनीम् ॥ मायां वेदितुमिच्छामो भगवंतो ब्रुवंतु नः ॥ १ ॥

नानुतृप्ये जुषन्युष्मद्वचो हरिकथामृतम् ॥ संसारतापनिस्तप्तो मर्त्यस्तत्तापभेषजम् ॥ २ ॥ अंतरिक्ष उवाच ।

एभिर्भूतानि भूतात्मा महाभूतैर्महाभुज ॥ ससर्जोच्चावचान्याद्यः स्वमात्रात्मप्रसिद्धये ॥ ३ ॥

राजा उवाच— " परस्य ईशस्य विष्णोः मायिनां (मायाव्यांना—ब्रह्मदेव इत्यादिकांना) अपि मोहिनीं (मोह पाडणारी अशा) मायां वेदितुं (जाणण्यास) इच्छामः (इच्छितों), भगवंतः (ज्ञानसंपन्न असे आपण) नः (आम्हाला) ब्रुवंतु (सांगोत). ॥ १ ॥ संसारतापनिस्तप्तः (संसारांतील क्लेशांनीं अतिदुःखी) मर्त्यः (मरणधर्मी) [अहं] तत्तापभेषजं (त्या तापावरील औषध) हरिकथामृतं युष्मद्वचः (आपलें भाषण) जुषन् (सेवन करणारा) [सन्] न—अनुतृप्ये (तृप्त होत नाहीं)" ॥ २ ॥ अंतरिक्ष उवाच— महाभुज, आद्य (आदिपुरुष) भूतात्मा (भूतांचें कारणभूत) स्वमात्रात्मप्रसिद्धये (स्वतांची उपासना करणाऱ्या जीवाला उत्तम सिद्धि मिळावी म्हणून, किंवा, स्वताच्या अंशभूत जीवांना मात्रा म्ह० विषयभोग व आत्मा म्ह० मोक्ष

अंतरिक्ष नामक योगी म्हणाला:— हे महापराक्रमी राजा, - मायेचें स्वरूप अमुक प्रकारचें असें सांगता येत नाहीं, परंतु कार्यावरून तिचें स्वरूप ओळखिता येतें तें असें - आदि पुरुष (ईश्वर) ज्या आपल्या शक्तीच्या योगें भूतांचें कारण होऊन स्वताच निर्मिलेल्या महाभूतांच्या योगें उच्चनीच भूतें (पदार्थसमूह, शरीरें) उत्पन्न करिता झाला, - ती ही हरीची माया होय. - विश्वसृष्टि करण्यांत भगवंताचा उद्देश एवढाच असतो कीं, स्वतांची उपासना चालविणाऱ्या जीवाला उत्तम सिद्धि मिळवून द्यावी (किंवा, 'आपल्याच

---

१ मागल्या अध्यायाचा शेवटचा श्लोक पहा. २ मर्त्य म्ह० मरणारा; ज्याला मृत्यूचें भय आहे तो. मृत्युभयानें ग्रासलेल्या प्राण्याला अमृत प्यावयास मिळालें म्हणजे त्याची तृप्ति कधींच व्हावयाची ना ? हें उघडच आहे. ३ नाथ म्हणतात:— " अंतरिक्षानें राजाला उत्तर सांगितलें 'राजा, तूं मायेचें लक्षण विचारितोस पण हा तुझा प्रश्न अगदीं फुकट गेला. कारण, माया म्ह० खोटी, भूल, ती सांगणार कशी ? वांझेच्या मुलाची पत्रिका करावी लागली तर त्याचा उपयोग होईल काय ? मृगजळाची पाणपोय गंधर्वनगरींत (या शब्दाचा अर्थ मागील अध्यायाच्या एकोणतिसाव्या श्लोकाच्या टीपेंत पहा) घालून ज्यांनी, वाऱ्याची शेत वळून काजव्याच्या ज्योतीनें दिवा लावणें, आपल्या सावलीचें डोकें फोडू लागणें, आकाशाची साल काढणें, अंधार शिपेनें खरवडून घालवू पहाणें बागुलबोवाचा आणि त्या शशानें पराभव करणें, इत्यादि कार्यें करणें आणि मायेचें स्वरूप सांगायला लागणें ही दोन्ही सारख्याच योग्यतेचीं होत.' " ओव्या ३१ पासून ३५

४ याच अध्यायाच्या सोळाव्या श्लोकांतील 'एषा माया भगवतः' हें वाक्य घेऊन पुढील प्रत्येक श्लोकांत अन्वयासाठीं घ्यावें.

अंशमूत जीवाला विषयभोग व्हावे व आत्मप्राप्ति व्हावी ह्म० मोक्ष मिळावा, ह्यासाठीं भगवंतानें ज्या शक्तीच्या योगें ही सृष्टि निर्मिली ती माया होय ' असाही अर्थ करावा). ॥३॥ तो आदिपुरुष ईश्वर, अशा रीतीनें पांच महाभूतांच्या योगें निर्मिलेल्या विविध शरीरांमध्यें, अंतर्यामिरूपानें प्रविष्ट (जीव) होतो आणि आत्म्याचा एक (मन) आणि दहा (बाह्य इंद्रियें) अंशा - अकरा - प्रकारांनीं विभागून त्यांचे त्यांचे (मनाचे व इंद्रियांचे) विषय भोगवूं लागतो (अथवा, ' त्या आत्म्याला ह्मणजे इंद्रियांना विषय विभागून देऊन संतोष पावतो ' असाही अर्थ करावा). ॥ ४ ॥ तो जीव वस्तुतः महासमर्थ असतांही, अंतर्यामी राहणाऱ्या आत्म्यानें प्रकाशित केलेल्या इंद्रियांच्या द्वारानें विषय भोगूं लागतो

मिळण्यासाठीं) यः महाभूतैः उच्चावचानि (लहान मोठीं) भूतानि (शरीरें) ससर्ज (निर्मिता झाला). ॥३॥ एवं पंचधातुभिः (पंचमहाभूतांनीं) सृष्टानि (उत्पादिलेल्या) भूतानि प्रविष्टः आत्मा [illegible] एकधा-दशधा (अकरा प्रकारें) विभजन् (विभागणारा) [सन्] गुणान् (विषयांस) जुषते (सेवितो, किंवा संतुष्ट होतो). ॥ ४ ॥ आत्मप्रद्योतितैः (स्वतः प्रकाशिलेल्या) गुणैः (इंद्रियांनी)

एवं सृष्टानि भूतानि प्रविष्टः पंचधातुभिः ॥ एकधा दशधाऽऽत्मानं विभजन् जुषते गुणान् ॥ ४ ॥
गुणैर्गुणान्स भुंजान आत्मप्रद्योतितैः प्रभुः ॥ मन्यमान इदं सृष्टमात्मानमिह सज्जते ॥ ५ ॥
कर्माणि कर्मभिः कुर्वन्सनिमित्तानि देहभृत् ॥ तत्तत्कर्मफलं गृह्णन्भ्रमतीह सुखेतरम् ॥ ६ ॥

गुणान् (विषय) भुंजानः (भोगणारा) सः प्रभुः सृष्टं इदं (शरीर) आत्मानं मन्यमानः (मानणारा) [सन्] इह (शरीरादिकांवर) सज्जते (आसक्त होतो). ॥ ५ ॥ कर्मभिः सनिमित्तानि (वासनायुक्त) कर्माणि कुर्वन् (करणारा) सुखेतरं (सुखसहित इतर ह्म० दुःख) तत्तत्कर्मफल (त्या त्या कर्मांचे फळ) गृह्णन् (घेणारा) देहभृत् (देह धारण करणारा) इह

आणि, हें सृष्ट शरीरच आत्मा, असें मानून ह्या शरीरादिकांवर आसक्त होतो (अतिप्रेम ठेवितो), - ह्मणून त्याला जन्ममरणरूप संसारदुःखें भोगणें भाग पडतें. हीच ईश्वराची माया. - ॥ ५ ॥ - उपभोग संपल्यावर तरी तो मुक्त व्हावा. पण तसें होत नाहीं; कारण, - तो अंतःकरणांत विषयभोगाची वासना धरून कर्मेंद्रियांच्या योगें कर्में करीत असतो ह्मणून त्या त्या पूर्व कर्मांची फळें भोगण्यासाठीं त्याला नाना प्रकारचे देह धरणें (जन्म घेणें) भाग पडतें व तो ह्या संसारांत सुखदुःखरूप कर्मफळें भोगीत फिरत्या चालीत

---

१ स्क. स्कं. अ० सत्त्याऐशींवा, श्लो. दुसरा पहा. २ 'यासि ब्रह्मांडीं पुरुष हें नाम । पिंडीं यासि ह्मणती जीव । [illegible] 'प्रतिबिंबका देव जीवशिवरूपे' [illegible]

३ श्रोत्र, त्वचा, नेत्र, जिव्हा, घ्राण हीं पांच ज्ञानेंद्रियें आणि वाणी, हात, पाय, गुद व जननेंद्रिय हीं पांच कर्मेंद्रियें मिळून दहा. ४ [illegible] —

' जेंवि कां केळ बीजीं घडे । तो बाहेर ऊसरूपेंचि वाढे । जरी निम्न निम्न कांडें चढे । तरी नागे पुढें रस एक । तेवीं विषय आणि करणें । प्रकारांनि [illegible] । [illegible] विषयरस सेवणें । जीवपणें स्वयें सेवी ' ॥ एकनाथ १२९.

५ नाथ ह्मणतातः— ' फळ मिळविण्याच्या आसेनें केलेलीं कर्में अनिवार्य होत. जीव सुळका जन्ममरणरहित असतांना [illegible] ' १३८

राहतो, - मुक्त होत नाहीं. हा मायेचा प्रभाव. - ॥ ६ ॥ अशा रीतीनें पुरुषाला स्वकर्माच्या योगें अनेक दुःखें देणाऱ्या विविध गति प्राप्त होतात आणि तो परतंत्र (कर्माच्या अधीन) झाल्यामुळें, त्या गति भोगण्यासाठीं, जगाचा लय होई तोपर्यंत, जन्ममरणाच्या फेऱ्यांत पडून राहतो - भगवंताची माया ती हीच - ॥ ७ ॥ - ही मायामय सृष्टि सांगितली. आतां प्रलय निवेदन करितों :- महाभूतांचा क्षय होण्याचें निमित्त उपस्थित झालें असतां, द्रव्यें (स्थूल भूतें) व गुण (सूक्ष्म भूतें) मिळून समस्त कार्यवर्गाला काल प्रकृतीमध्यें नेऊन

प्रमाथि (क्षय पावतो). ॥ ६ ॥ इत्थं बह्वभद्रवहा (अनेक अकल्याणें करणाऱ्या) कर्मगती (कर्मानुरूप योनींस) गच्छन् (जाणारा) अवशः (पराधीन, कर्माधीन) पुमान् आभूतसंप्लवात् (भूतांचा लय होईपर्यंत) सर्गप्रलयौ (जन्ममृत्यु) अश्नुते (भोगितो) ॥ ७ ॥ धातूपप्लवे (भूतांचा लय) आसन्ने (समीप आलेला) [सति], अनादिनिधन (जन्ममृत्यु-रहित) कालः द्रव्यगुणात्मकं (स्थूल भूतें व सूक्ष्म भूतें एतद्रूप) व्यक्तं (कार्य) अव्यक्ताय (प्रकृतीकडे) अपकर्षति (ओढितो) ॥ ८ ॥ भुवि (पृथ्वीवर) शतवर्षा (शंभर वर्षें काल

इत्थं कर्मगतीर्गच्छन्बह्वभद्रवहाः पुमान् ॥ आभूतसंप्लवात्सर्गप्रलयावश्नुतेऽवशः ॥ ७ ॥

धातूपप्लव आसन्ने व्यक्तं द्रव्यगुणात्मकम् ॥ अनादिनिधनः कालो ह्यव्यक्तायापकर्षति ॥ ८ ॥

शतवर्षा ह्यनावृष्टिर्भविष्यत्युल्बणा भुवि ॥ तत्कालोपचितोष्णार्को लोकांस्त्रीन्प्रतपिष्यति ॥ ९ ॥

पातालतलमारभ्य संकर्षणमुखानलः ॥ दहन्नूर्ध्वशिखो विष्वग्वर्धते वायुनेरितः ॥ १० ॥

टिकणारी) उल्बणा (भयंकर) अनावृष्टिः (पर्जन्याचा अभाव) भविष्यति (होईल) तत्कालोपचितोष्णार्कः (त्या काळीं वाढली उष्णता ज्याची असा सूर्य) त्रीन् (तीन) लोकान् प्रतपिष्यति (तापवील). ॥ ९ ॥ वायुना ईरितः (प्रेरिलेला, पेटविलेला) ऊर्ध्वशिखः (वर जाणाऱ्या ज्वाला ज्याच्या, असा) संकर्षणमुखानलः (शेषाच्या मुखांतील अग्नि) पातालतलं आरभ्य (प्रारंभ करून) दहन् (जाळणारा) [सन्] विष्वक् (सभोंवतीं) वर्धते (वाढतो) ॥ १० ॥

पोंचविण्यासाठीं, आकर्षूं लागतो (मागें मागें खेंचीत नेतो). कालाला आदि व अंत नाहींत, - तो नेहमीं अखंड चाललेला आहे व नित्य असाच चालणार ॥ ८ ॥ पृथ्वीवर शंभर वर्षेंपर्यंत अतिभयंकर अवर्षण पडतें, त्या वेळीं सूर्याची उष्णता पुष्कळ वाढते आणि तो तीन्ही लोकांना अतिशय तापवून सोडितो ॥ ९ ॥ वारंवार शेषाच्या मुखांतील अग्नीच्या ज्वाला उंच उंच निघूं लागतात, तो अग्नि पातालापासून विश्वाला जाळण्यास प्रारंभ करितो व वायूचें साह्य मिळाल्यामुळें चहूंकडे पसरत जातो ॥ १० ॥

---

१ प्रलयाचें लौकिक उदाहरण— 'तृण इत्यादि नानाप्रकारचीं बीजें पावसाळ्यांत भूमीवर उगवतात, शरदृतूंत वाढून व पुष्ट होऊन फळें देतात, आणि ग्रीष्मऋतूंत पुन्हां सगळा रस ग्रहण करून शेवटीं पृथ्वीमध्यें लीन होऊन राहतात, तसाच काळाच्या प्रभावानें संसाराचा लय होतो ' एकनाथ, ५१।१४ २ ही निमित्त पुढील श्लोकांत सांगितलें आहे

॥ ११ ॥ राजा, मग, जसा अग्नि
पुढें प्रलय करणारा मेघसमूह हत्तींच्या सोंडासारख्या धारांनीं शंभर वर्षे पर्जन्यवृष्टि करितो, अशा रीतीनें विराट् (ब्रह्मांड) उदकामध्यें लय पावतो ॥ ११ ॥ राजा, मग, जसा अग्नि काष्ठें जळून गेलीं कीं मूळ रूपांत शिरतो, तसा विराजाचा अभिमानी पुरुष विराजाला सोडून सूक्ष्म प्रकृतिरूपात प्रवेश करितो ॥ १२ ॥ - हा विराजाचा लय सांगितला, आतां त्या विराजाचीं महत्तत्त्वापासून पृथिवीपर्यंत समळीं कारणें आपापल्या कारणांत कशीं विलय पावतात, तें सांगतों - पृथ्वीचा विशेष गुण गंध, तो (गंध) वायूनें हरण केला
सांवर्तकः (प्रलयकाळच्या) मेघगणः (मेघसमूह) हस्तिहस्ताभिः (हत्तीच्या सोंडेसारख्या) धाराभिः शतं समाः (वर्षें) वर्षति स्म. विराट् (ब्रह्मांड) सलिले (उदकांत) लीयते (लय पावतो) ॥ ११ ॥ नृप, ततः वैराजः (ब्रह्मांडरूप शरीरांत राहणारा, तदभिमानी) पुरुषः विराजं (ब्रह्मांडास) उत्सृज्य (सोडून) निरिंधनः (नाहींत काष्ठें ज्याला असा) अनलः (अग्नि) इव (प्रमाणें) अव्यक्तं (प्रकृति) सूक्ष्मं विशते (प्रविष्ट होतो). ॥ १२ ॥ वायुना हृतगंधा (हरिला गंध हा मुख्य गुण जिचा अशी) भूः (पृथ्वी) सलिलत्वाय (उदकरूपास) कल्पते

सांवर्तको मेघगणो वर्षति स्म शतं समाः ॥ धाराभिर्हस्तिहस्ताभिर्लीयते सलिले विराट् ॥ ११ ॥ ततो विराजमुत्सृज्य वैराजः पुरुषो नृप ॥ अव्यक्तं विशते सूक्ष्मं निरिंधन इवानलः ॥ १२ ॥ वायुना हृतगंधा भूः सलिलत्वाय कल्पते ॥ सलिलं तद्धृतरसं ज्योतिष्ट्वायोपकल्पते ॥ १३ ॥ हृतरूपं तु तमसा वायौ ज्योतिः प्रलीयते ॥ हृतस्पर्शोऽवकाशेन वायुर्नभसि लीयते ॥ कालात्मना हृतगुणं नभ आत्मनि लीयते ॥ १४ ॥

(पावते, मिळून जातें). सलिलं (उदक) तद्धृतरसं (वायूनें हरिला रस ज्याचा असें) [सत्] ज्योतिष्ट्वाय (तेजोरूपास) उपकल्पते (मिळतें). ॥ १३ ॥ ज्योतिः (तेज) तमसा (प्रलयकालच्या अंधकारानें) हृतरूपं (हरिलें रूप गुण ज्याचा असें) [सत्] वायौ प्रलीयते (लय पावतें) वायुः अवकाशेन (आकाशानें) हृतस्पर्शः (हरिला स्पर्श गुण ज्याचा असा) [सन्] म्हणजे पृथ्वी उदकांत मिळून जाते (गंध नाहींसा झाला कीं पृथ्वीची ओळख बुडते, तिचें पाणी होऊन जातें). उदकाचा विशेष गंध रस, तो वायूनें हरण केला कीं - उदकाचीही ओळख मोडून - तें तेजोरूपीं मिळून जातें. ॥ १३ ॥ प्रलयकालच्या अंधकारानें तेजाचा विशेष गुण रूप हरून घेतला कीं - तेजाची ओळख बुजून जाऊन - तें वायूमध्यें लीन

१ यावर कोणी अशी शंका घेतात कीं, " ज्याला विराट्शरीराचा अभिमानी म्हणतात तो (ब्रह्मा) महाभगवद्भक्त आहे, तेव्हां त्याला मोक्षच मिळाला पाहिजे, इतरप्रमाणें त्याचाही बुसता अव्यक्तरूपात (प्रकृति रूपीं) लय होतो व तो पुनः जन्म पावतो असें म्हणणें अयोग्य दिसतें, कारण, ' ब्रह्मणा सह ते सर्वे संप्राप्ते प्रतिसंचरे । परस्यान्ते कृतात्मानः प्रविशन्ति परं पदम् ॥ (ब्रह्मलोकीं राहणारे पुरुष ब्रह्म्यासह महाप्रलयानें अंतीं परमात्मपदीं प्रविष्ट होतात म्ह० मोक्ष पावतात)' अशी स्मृति आहे व न्याय दर्शन असेंच सांगतो कीं 'यावदधिकारमधिकारिणामवस्थिति (अधिकार आहे तोंपर्यंत अधिकारिवर्ग राहतो).' अर्थात अधिकार संपल्यावर ब्रह्मदेव मूळ ब्रह्मपदीं जावयाचा " शंका बरोबर आहे. पण, ब्रह्मा प्रकृतिरूपीं मिळतो असें सांगण्याचा अभिप्राय एवढाच कीं, भक्ति न राहणारे ... भक्ति न केल्यामुळें पुन्हा संसारांत येतात, इंद्रादि देवांसारख्यांस सुद्धां मोक्षपद मिळत नाहीं इतकें तें दुर्लभ आहे, असें श्रोत्यास कळवें, शिवाय, अश्वमेधादि यज्ञ करून ब्रह्मलोकीं गेलेले पुरुषही भक्ति न केल्यामुळें पुन्हा संसारांत येतात, हेंही सर्वश्रुत आहेच. (दशमस्कंध अ० १४ श्लो० १४ पहा) किंवा, 'अव्यक्तं विशते सूक्ष्मं' याचा अर्थ 'सूक्ष्म परब्रह्मरूपीं प्रविष्ट होतो' असा समजावा, म्हणजे शंकाच निर्मूल झाली. श्रीधर

होतें. वायूचा विशेष गुण स्पर्श आकाशानें हरिला असतां तोही आकाशात विलय पावतो. आकाशाचा गुण शब्द कालरूप ईश्वरानें हरण केला की आकाश तामसाहंकारात मिळून
जातें. ॥ १४ ॥ राजा, इंद्रियें व बुद्धि राजसाहंकारात मिळतात आणि इंद्रियांच्या देवतासह मन सात्त्विक अहंकारात प्रविष्ट होतें. अशा आपल्या त्रिविध कार्यासह अहंकार
महत्तत्त्वात मिळतो - आणि महत्तत्त्व प्रकृतींत लय पावतें. - ॥ १५ ॥ राजा, भगवताची त्रिगुणात्मक माया ती ही होय. ही जगाचे उत्पत्ति-स्थिति-लय
चालविते. आम्ही तुला हिचें वर्णन सांगितलें. आता पुन्हां तुम्ही काय ऐकायाची इच्छा आहे? ॥ १६ ॥ राजा म्हणाला - महामुने, ज्यानीं आपलीं चित्तें जिंकिली नाहींत,
नभसि (आकाशात) लीयते (लय पावतो). ॥ १४ ॥ नभः कालात्मना (कालरूप ईश्वरानें) हृतगुणं (हरिला गुण शब्द ज्याचा असें) [सत्] आत्मनि लीयते. नृप, इंद्रियाणि, मनः,
बुद्धिः [च] वैकारिकैः (सात्त्विकदेवतांसह) सह अहंकारं प्रविशंति (प्रविष्ट होतात). अहं (अहंकार) स्वगुणैः (आपल्या सत्त्वादि गुणांशीं) [सह] आत्मनि [प्रविशति] ॥१५॥

इंद्रियाणि मनो बुद्धिः सह वैकारिकैर्नृप ॥ प्रविशंति ह्यहंकारं स्वगुणैरहमात्मनि ॥ १५ ॥ एषा माया भगवतः

सर्गस्थित्यंतकारिणी ॥ त्रिवर्णा वर्णिता ऽस्माभिः किं भूयः श्रोतुमिच्छसि ॥ १६ ॥ राजोवाच । यथैतामैश्वरीं

मायां दुस्तरामकृतात्मभिः ॥ तरंत्यंजः स्थूलधियो महर्ष इदमुच्यताम् ॥ १७ ॥

अस्माभिः (आम्हीं) त्रिवर्णा (तीन वर्ण जिचे अशी) सर्गस्थित्यंतकारिणी (उत्पत्ति, पालन व नाश करणारी) एषा (ही) भगवतः माया वर्णिता (वर्णिली) भूयः (पुन्हा) किं श्रोतुं
(ऐकण्यास) इच्छसि ? ॥ १६ ॥ राजा उवाच— " महर्षे, स्थूलधियः (स्थूल शरीरावर अहंबुद्धि ज्यांची ते) अकृतात्मभिः (नाहीं जिंकिलें अंतःकरण ज्यानीं त्यानीं) दुस्तरा (तरून जा-
त्यांना ह्या ईश्वराच्या मायेंतून पार पडणें दुर्घट होय. म्हणून, स्थूल देहालाच आत्मा समजणारे अज्ञानी जन ह्या मायेला अनायासें कसे तरून जातात, तें मला निवेदन
करावें. ॥ १७ ॥ प्रबुद्ध योगी सांगूं लागला — - राजा, मायेंतून पार पडण्याचा उपाय भक्तीवाचून अन्य कोणताही नाहीं म्हणून, भक्ति व तिचीं साधनें मी तुला
सांगतों. प्रथम मनुष्यानें विषयांची निःसारता ओळखून गुरूला शरण जावें. जगाच्या रहाटीचें सूक्ष्म निरीक्षण केलें असता कोणालाही विषयसुखाचा लागलाच वीट येईल पहा -

१ एकनाथांचें मत येथें थोडें भिन्न आहे. ते म्हणतात ' दहा इंद्रियें राजसाहंकारात मिळतात, आणि अंतःकरणचतुष्टय (मन, बुद्धि, चित्त, अहंकार) व इंद्रियांच्या देवता हीं सात्त्विक अहंकारात लय-
पावतात ' १९६।९७ २ ' जेविं कुक्कुटीची पिलीं । कुक्कुटी पाखांतळीं घाली । मग ते स्वयें दिसे एकली । तेविं माया उरली कल्पांतीं ' ॥ एकनाथ, १९९. ३ बालप्रबोधिनीकार
म्हणतात ' प्रकृतीचाही महत्तवीं लय होतो. ' ४ बालप्रबोधिनीकार म्हणतात ' ज्यानीं आपलीं चित्तें भगवद्रूपीं लाविलीं नाहींत, त्यांना ' ५ नाथ म्हणतात ' माया तरून जावें कसें तें प्रबुद्धालाच (ज्ञान्या-
लाच) कळावयाचें ' २२५.

दुःखांचा नाश व्हावा आणि सुख मिळावें ह्यासाठीं लोक जोडपीं जोडपीं होऊन राहतात व नानाप्रकारचीं कर्मे (व्यवहार, व्यापार) आरंभीत असतात. पण त्यांना उलटून त्याच्या इच्छाविरुद्ध फलें प्राप्त होतात, ही गोष्ट लक्षात घ्यावी. ॥ १८ ॥ - आतां द्रव्याविषयीं विचार करूं - द्रव्य अगोदर मिळावयाचें कठिण बरें दैवात्कदाचित् मिळालें तरी नेहमीं दुःख देणार (मिळवितांना त्रास, मिळाल्यावर बाळगण्याची काळजी आणि हरवलें किंवा संपलें कीं शोक– मिळून द्रव्य आरंभीं, मध्यें व अंतीं दुःखदायकच असतें) इतकेंच नव्हे तर तें जवळ ठेवणें म्हणजे प्रत्यक्ष स्वताच्या मृत्यूला थारा देण्यासारखें आहे. (त्याच्या लोभास्तव कोण केव्हां घाला घालून मारील ह्याचा काय नियम सांगावा?)

[illegible] कठिण) एतां ऐश्वरीं मायां यथा अंजः (सहज, अनायासे) तरन्ति, इद (हें) उच्यतां (सांगावें). " ॥ १७ ॥ प्रबुद्ध उवाच—' दुःखहत्यै (दुःखनाशासाठीं) सुखाय च कर्माणि (उद्योग व्यापार) आरभमाणानां (आरंभणाऱ्या) मिथुनीचारिणां (स्त्रीपुरुष होऊन राहणाऱ्या) नृणां (मनुष्यांना) पाकविपर्यासं (फलाचा विपरीतपणा) पश्येत् (पहावा) ॥ १८ ॥ नित्यार्तिदेन (नित्य दुःख देणाऱ्या) दुर्लभेन (मिळण्यास कठिण अशा) आत्ममृत्युना (स्वताचा मृत्यु अशा) वित्तेन, साधितैः (संपादिलेल्या) चलैः (अस्थिर) गृहापत्याप्तपशुभिः (घर, मुलें

प्रबुद्ध उवाच । कर्माण्यारभमाणानां दुःखहत्यै सुखाय च ॥ पश्येत्पाकविपर्यासं मिथुनीचारिणां नृणाम् ॥१८॥
नित्यार्तिदेन वित्तेन दुर्लभेनाऽऽत्ममृत्युना ॥ गृहापत्याप्तपशुभिः का प्रीतिः साधितैश्चलैः ॥ १९॥ एवं लोकं परं
विद्यान्नश्वरं कर्मनिर्मितम् ॥ सतुल्यातिशयध्वंसं यथा मण्डलवर्तिनाम् ॥ २० ॥

आप्त व पशु यांनी) [च] का प्रीतिः ? ॥ १९ ॥ एवं यथा मण्डलवर्तिनां (भूमीच्या लहान लहान भागावर राज्य करणाऱ्या राजांना) तथा सतुल्यातिशयध्वंसं (आहेत तुल्य उच्च व नाश हीं ज्याला अशा) कर्मनिर्मितं परं लोकं नश्वरं विद्यात् (जाणावें) ॥ २० ॥

तसेंच घर, मुलें, आप्त, पशु (गुरें ढोरें) ही मिळविलीं तरी आपल्याजवळ नित्य थोडीच राहणार आहेत. तेव्हां अशा द्रव्यादिकांच्या सहवासानें सुख कोणतें बरें मिळणार ? ॥ १९ ॥ अशाच रीतीनें, स्वर्गादि परलोकही कर्मांनीं संपादिलेले अर्थात् नश्वर आहेत व जसे भूमीवरील लहानमोठ्या प्रदेशांचीं राज्यें करणारे (मांडलिक) राजे - बरोबरीच्याशीं भांडतात, मोठ्यांना उगाच खोड्या ठेवीत व निंदीत असतात आणि स्वनाशाचा विचार मनात आला कीं भिऊन जातात (एकंदरीत सुखी व स्वस्थ असे कोणत्याही स्थितींत नसतात) - तसाच प्रकार परलोकींही आहे, हें ध्यानांत वागवावें. कारण, तेथेंही बरोबरी, उच्च स्थिति आणि नाश हीं आहेतच ॥ २० ॥

१ किंवा 'आत्म्याला मरणरूप म्हणजे आत्मज्ञानाचें प्रतिबंधक' असाही अर्थ करावा. २ याला प्रमाण श्रुतिस्मृतिवचनें — 'तद्यथेह कर्मचितो लोकः क्षीयत एवमेवामुत्र पुण्यचितो लोकः क्षीयते' (जसे या लोकीं शेतकी इत्यादि कर्मांनीं संपादिलेले उपभोग नाश पावतात, तसेच परत्र पुण्यानें संपादिलेले लोकही क्षीण होतात) 'ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति' (यज्ञादि कर्मे करणारे पुरुष स्वर्गलोकींचे विपुल सुख भोगितात, पण पुण्य संपलें कीं पुन्हा मनुष्यलोकीं येतात)

- एतावेता, विषयापासून सुख नाहीं - ह्मणून मनुष्यानें उत्तम सुख कोणतें हे जाणण्याची इच्छा धरून सद्गुरूला शरण [illegible] अनुभव - (ब्रह्मसाक्षात्कारानें) निष्णात असावा (त्याला वेदार्थाचें न्यायदृष्टीनें पूर्ण ज्ञान नसेल तर शिष्याचे संशय दूर करतां येणार नाहीं व ब्रह्मसाक्षात्कार झालेला नसेल तर शिष्याच्या अंतरीं बोध ठसविता येणार नाहीं) - असा सद्गुरु ओळखिला यावा ह्मणून त्याचें रूप सांगतो :- तो शांतीचें केवळ माहेरघर असतो [illegible] । २ । येथें मनुष्यानें, गुरु आपला आत्मा व देव होय अशी बुद्धि ठेवून, त्याची निष्कपटपणें सेवा चालवावी आणि त्याजजवळ भागवत धर्म शिकावे त्या धर्मांच्या [illegible] पावतो तो

तस्मात् उत्तम श्रेयः (सुख, कल्याण) जिज्ञासु (जाणूं इच्छिणारा) शाब्द (वेद), परे ([illegible]) च ब्रह्मणि निष्णात ([illegible]) गुरु प्रपद्येत (शरण जावें) ॥ २१ ॥ तत्र गुर्वात्मदैवतः (गुरु हाच आत्मा व देव ज्याचा असा) [सन्] अमायया (निष्कपट [illegible]) अनुवृत्त्या [illegible] उपाय) धर्मान् शिक्षेत् (शिकावे), यैः आत्मदः (आत्मा व आत्मरूप देणारा) हरिः तुष्येत् ([illegible]) ॥ २२ ॥ आदौ ([illegible]) सर्वतः ([illegible]) मनसः

तस्माद्गुरुं प्रपद्येत जिज्ञासुः श्रेय उत्तमम् ॥ शाब्दे परे च निष्णातं ब्रह्मण्युपशमाश्रयम् ॥ २१ ॥ तत्र भागवतान्धर्मान् शिक्षेद्गुर्वात्मदैवतः ॥ अमाययाऽनुवृत्त्या यैस्तुष्येदात्माऽऽत्मदो हरिः ॥ २२ ॥ सर्वतो मनसोऽसङ्गमादौ सङ्गं च साधुषु ॥ दयां मैत्रीं प्रश्रयं च भूतेष्वद्धा यथोचितम् ॥ २३ ॥ शौचं तपस्तितिक्षां च मौनं स्वाध्यायमार्जवम् ॥ ब्रह्मचर्यमहिंसां च समत्वं द्वन्द्वसंज्ञयोः ॥ २४ ॥

असंगं (अनासक्ति), साधुषु सङ्गं (सहवास), यथोचित (योग्यतेस अनुरूप) अद्धा ([illegible]) भूतेषु दया, मैत्री, प्रश्रय (विनय) च [शिक्षेत्] ॥ २३ ॥ शौच ([illegible]), तप (स्वधर्माचरण), तितिक्षा (क्षमा), मौनं (निरर्थक भाषण न करणें), स्वाध्याय (वेदपाठ), आर्जव ([illegible]), ब्रह्मचर्य ([illegible]) अहिंसा ([illegible])

हरि सर्वांचा आत्मा असून उपासकाला आत्मस्वरूपाची प्राप्ति करून देणारा आहे. २२॥ प्रथम - देह, स्त्री, पुत्र इत्यादि - सर्व ठिकाणीं [illegible] शिकावें, पुढें साधूंची संगति धरावयास शिकावें, नंतर प्राणिमात्राशी ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें दया, मैत्री व विनय हीं ठेवण्याचा प्रकार [illegible] (दीनावर दया, समानाशी मैत्री व उत्तमाशी नम्रता करण्यास शिकावें), ॥ २३ ॥ पुढें शुद्धता (मृत्तिका जल इत्यादिकांच्या योगें शरीराची बाह्य शुद्धि आणि दंभ मान इत्यादि सोडून देणें ही आभ्यंतर शुद्धि), स्वधर्माचरण; क्षमा, निरर्थक भाषण न करणें अधिकारानुरूप वेदपाठादिक, [illegible] ब्रह्मचर्य (ऋतुकालीं स्त्रीशीं गमन इत्यादि जसें उचित असें)

---

१ ह्या श्लोकाच्या व्याख्यावेत एकनाथांनीं सद्गुरुचीं लक्षणें उत्तम प्रकारें वर्णिलीं आहेत ज्याला ह्यावरून सद्गुरूचें [illegible] आहे जाला, [illegible] राहणार नाहीं; पण, तीं विस्तारभयास्तव येथें देता येत नाहींत २ अद्धा निष्कपटपणें

प्राणिमात्रास पीडा न देणें; - शीत-उष्ण, सुख-दुःख, जय-अपजय ह्या - जोड्यापैकीं कोणतेंही भोगण्याचा प्रसंग आला तरी चित्तवृत्ति सम राखणें (सुख किंवा जय मिळाला तर आनंद मानावयाचा, दुःख किंवा अपजय झाला तर दुःखी व्हावयाचें असा प्रकार न करणें); ॥ २४ ॥ सर्वभूतीं सच्चिद्रूपानें आत्मा व नियामकरूपानें ईश्वर एक भरला आहे असें पाहणें; एकांतवासाची आवड धरणें; गृहादिकाचा अभिमान न बाळगणें, निर्जन प्रदेशी पडलेल्या चिंध्या, किंवा पवित्र वल्कलें पांघरणें जे कांही मिळेल त्या योगें संतोष मानणें; ॥ २५ ॥ भगवताचें प्रतिपादन करणाऱ्या शास्त्रावर विश्वासपूर्वक भक्ति ठेवणें पुन्हा इतर शास्त्राची निंदा न करणें, मनाचें, वाणीचें, आणि कर्माचें नियमन

(शास्त्राचा द्रोह न करणें) द्वंद्वसंज्ञयोः (द्वंद्व सं० जोड्या ही ज्याना संज्ञा त्यामध्ये; शीत—उष्ण, लाभ—अलाभ, जय—पराजय या प्रसंगीं) समत्व (चित्तवृत्ति सम राखणें) ॥ २४ ॥ सर्वत्र आत्मेश्वरान्वीक्षां (सत्यज्ञानरूपानें आत्मा व नियामकरूपानें ईश्वर राहतो असें पाहणें), कैवल्यं (एकांताची चाड) अनिकेतता (गृहादिकावर अभिमान नसणें), विविक्तचीरवसनं (निर्जन प्रदेशीं पडलेल्या चिंध्या, किंवा शुद्ध वल्कलें पांघरणें), येनकेनचित् (कशानेंही) संतोषं [च शिक्षेत्] ॥ २५ ॥ भागवते शास्त्रे श्रद्धा (विश्वास), अन्यत्र (इतर शास्त्रा-

सर्वत्राऽऽत्मेश्वरान्वीक्षां कैवल्यमनिकेतताम् ॥ विविक्तचीरवसनं संतोषं येनकेनचित ॥ २५ ॥ श्रद्धा भागवते शास्त्रे ऽनिंदामन्यत्र चापि हि ॥ मनोवाक्कर्मदंडं च सत्यं शमदमावपि ॥ २६ ॥ श्रवणं कीर्तनं ध्यानं हरेरद्भुतकर्मणः ॥ जन्मकर्मगुणानां च तदर्थेऽखिलचेष्टितम् ॥ २७ ॥ इष्टं दत्तं तपो जप्तं वृत्तं यच्चाऽऽत्मनः प्रियम् ॥ दारान्सुतान् गृहान्प्राणान्यत्परस्मै निवेदनम् ॥ २८ ॥

विषयीं) अनिंदा, मनोवाक्कर्मदंडं (मन, वाणी व कर्म याचें नियमन), सत्यं, शमदमौ (मनोनिग्रह, व इंद्रियनिग्रह) अपि ॥ २६ ॥ अद्भुतकर्मणः अद्भुत पराक्रम करणाऱ्या) हरेः जन्मकर्मगुणानां श्रवणं, कीर्तनं, ध्यानं च, तदर्थे (त्याच्या प्रीत्यर्थ) अखिलचेष्टितं [च शिक्षेत्] ॥ २७ ॥ इष्टं (यज्ञ), दत्तं (दान), तपः, जप्तं (जप), वृत्तं (सदाचार)

(मनाला प्राणायामांनीं ताब्यावर आणणें, वाणीचा मौनानें निग्रह करणें व कर्माचें उद्यम मोडिल्यानें नियमन करणें, खरें (यथार्थ) बोलणें, शम (अंतःकरणाचा निग्रह) दम (बाह्य इंद्रियें दमविणें); ॥ २६ ॥ अद्भुत लीला करणाऱ्या हरीच्या अवताराचें, चरित्राचें व गुणाचें श्रवण, कीर्तन आणि ध्यान करणें आणि सकल कर्मे ईश्वरोद्देशानें चालविणें, ही शिकावी. ॥ २७ ॥ व भजन, दान, तपश्चर्या, जप, सदाचरण, व स्वतास प्रिय वाटणारे गंधपुष्पादि पदार्थ ईश्वराला अर्पण करणें आणि स्त्री पुत्र, गृह व प्राण हे परमेश्वराच्या सेवेंत अर्पणें हा प्रकार अवगत करून घ्यावा ॥ २८ ॥

१ 'शरीर हिंव उरी फांटे । तेणें देह कांपे साधकु न कांपे । शरीर अति उष्णें तापे । परि साधकु न तापे देहनाशमर्जी ॥ [illegible]

२ शुद्ध वस्त्राचें तुकडे पांघरणें.

ह्याचप्रमाणें, कृष्णच ज्याचा आत्मा व धनी, त्या भक्तजनावर प्रेम ठेवणें. आणि स्थावर व जंगम असे उभयविध पदार्थ भगवंताच्या मूर्ति होत अशा भावनेनें त्यांची, विशेषतः मनुष्याची, त्यांतही स्वधर्मनिष्ठ पुरुषाची आणि त्यापेक्षांही मुख्यत्वें भगवद्भक्ताची सेवा करणें. हीं शिकावीं ॥ २९ ॥ भक्तजनांच्या समागमें राहून भगवंताच्या पवित्र कीर्तीविषयीं परस्परांशीं संभाषण करणें, - द्वेषादि भाव न धरितां - एकमेकांच्या संगतीनें रमणें, परस्परांच्या सहवासानें सुख मानणें व अन्योन्यसमागमानें स्वतांचीं समस्त दुःखें परिहरून घेणें हीं शिकावीं. ॥ ३० ॥ अशा प्रकारें जे पुरुष, परस्परांमध्यें, पापसमूहाचें निरसन करणाऱ्या हरीला आठवीत व दुसऱ्यांना त्याची आठवण करून देत

आत्मनः यत् प्रियं, [तत्], दारान् (स्त्री), सुतान्, गृहान्, प्राणान् [अपि च] परस्मै यत् निवेदन, [तत् च शिक्षेत] ॥ २८ ॥ एवं कृष्णात्मनाथेषु (कृष्ण आत्मा व धनी ज्याचा त्या) मनुष्येषु सौहृदं (प्रेम), उभयत्र (स्थावर व जंगम), नृषु, साधुषु (स्वधर्मशील पुरुषावर), महत्सु, (भगवद्भक्तावर), च परिचर्या (सेवा) [च शिक्षेत] २९ ॥ पावनं [यत्] भगवद्यशः (भगवंताची कीर्ति), तस्य परस्परानुकथनं, मिथः (परस्परांत) आत्मनः रतिः, मिथः तुष्टिः (सुख), मिथः निवृत्तिः (दुःखपरिहार), [एतां च

एवं कृष्णात्मनाथेषु मनुष्येषु च सौहृदम् ॥ परिचर्यां चोभयत्र महत्सु नृषु साधुषु ॥ २९ ॥

परस्परानुकथनं पावनं भगवद्यशः ॥ मिथोरतिर्मिथस्तुष्टिर्निवृत्तिर्मिथ आत्मनः ॥ ३० ॥ स्मरन्तः

स्मारयंतश्च मिथोऽघौघहरं हरिम् ॥ भक्त्या सजातया भक्त्या बिभ्रत्युत्पुलकां तनुम् ॥ ३१ ॥

क्वचिद्रुदंत्यच्युतचिंतया क्वचिद्धसंति नंदंति वदंत्यलौकिकाः ॥ नृत्यंति गायंत्यनुशीलयंत्यजं

भवंति तूष्णीं परमेत्य निर्वृताः ॥ ३२ ॥

शिक्षेत्]. ॥ ३० ॥ मिथः अघौघहरं (पापसमूह दूर करणाऱ्या) हरिं स्मरंतः, स्मारयतः (आठवून देणारे) च भक्त्या (साधनभक्तीनें) सजातया (उद्भवलेल्या) भक्त्या (सप्रेमभक्तीनें) उत्पुलकां (रोमांचयुक्त) तनुं (शरीर) बिभ्रति (धरितात) ॥ ३१ ॥ अलौकिकाः (लौकिक भान नाहीं ज्यांना असे) [भक्ताः] अच्युतचिंतया (परमेश्वराच्या ध्यानानें) क्वचित् रुदंति (रडतात), क्वचित् हसंति (हसतात), नंदंति (आनंद पावतात), वदंति (बोलतात), नृत्यंति (नाचतात), अजं (जन्मरहित परमात्म्याला) गायंति (गातात), अनुशीलयंति

राहतात, त्यांच्या अंतरीं ह्या साधनरूप भक्तीच्या योगें सप्रेम भक्ति उद्भवते आणि त्यांचे शरीर आनंदरोमांचांनीं थरारलेलें असतें, ॥ ३१ ॥ ते पुरुष अच्युताच्या चिंतनामध्यें गढून गेल्यामुळें लोकव्यवहार अगदीं विसरून जातात, आणि एकदे वेळीं रडत सुटतात. केव्हां हासूं लागतात कधीं आनंद पावतात अन्य प्रसंगीं अपल्याशींच कांहीं बोलत असतात कधीं नाचतात, केव्हां गातात, इतरवेळीं हरीच्या लीलांचें अनुकरण चालवितात व अशा रीतीनें परमेश्वराची प्राप्ति झाली असतां ते सुखी होऊन स्वस्थ राहतात ॥ ३२ ॥

१ रडण्याचीं, हांसण्याचीं वगैरे कारणें कोणतीं, त्यांच्या मनांत कोणते विचार उद्भवतात, ते मागील अध्यायाच्या चाळिसाव्या श्लोकाच्या टीकेंत सांगितले आहे तेथें पहावें

ह्याप्रकारें भागवत धर्म शिकणारा पुरुष त्या धर्मांपासून उद्भवणाऱ्या भक्तीच्या योगें नारायणाची आराधना करण्यांत तत्पर राहतो आणि मग, माया जरी तरून जाण्यास कठिण आहे, तरी तींतून तो अनायासें पार पडतो. ॥ ३३ ॥ राजा ह्मणाला — मुनिवर्य, ज्याला नारायण अशी संज्ञा आहे त्या ब्रह्मरूप, परमात्म्याचें यथार्थ स्वरूप आपण आह्माला निवेदन करावें. तें सांगण्याची खरी योग्यता आपणामध्यें आहे कारण, आपण ब्रह्मज्ञानी पुरुषांत परमश्रेष्ठ आहां (प्रश्नाचा आशय असा — नारायण, ब्रह्म परमात्मा इत्यादि विविध शब्दांनीं ज्याचें निरूपण केलें जातें, तें वस्तु कोणत्याही विशेष धर्मांनीं रहित एकच आहे किंवा त्यामध्ये काहीं विशेष अंश आहेत ?) ॥ ३४ ॥ पिप्पलायन मुनि

(लीलांचें अनुकरण चालवितात), परं प्राप्य (पावून) निर्वृता (सुखी) [सन्] तूष्णीं (स्वस्थ) भवति [च] ॥ ३२ ॥ इति भागवतान् धर्मान् शिक्षन् तदुत्थया (तत्पासून उद्भवणाऱ्या) भक्त्या नारायणपरः [सन्] दुस्तरां मायां अंजः (अनायासें) तरति (तरतो) ' ॥ ३३ ॥ राजा उवाच — ' नारायणाभिधानस्य ब्रह्मणः परमात्मनः निष्ठां

इति भागवतान्धर्मान् शिक्षन्भक्त्या तदुत्थया ॥ नारायणपरो मायामंजस्तरति दुस्तराम् ॥ ३३ ॥

राजोवाच । नारायणाभिधानस्य ब्रह्मणः परमात्मनः ॥ निष्ठामर्हथ नो वक्तुं यूयं हि ब्रह्मवि-

त्तमाः ॥ ३४ ॥ पिप्पलायन उवाच । स्थित्युद्भवप्रलयहेतुरहेतुरस्य यत्स्वप्नजागरसुषुप्तिषु सद्ब-

हिश्च ॥ देहेंद्रियासुहृदयानि चरंति येन संजीवितानि तदवेहि परं नरेंद्र ॥ ३५ ॥

(सत्य) नः वक्तुं अर्हथ. हि यूयं ब्रह्मवित्तमाः. ' ॥ ३४ ॥ पिप्पलायन उवाच — ' नरेंद्र, अहेतु [यः] अस्य स्थित्युद्भवप्रलयहेतु यत् स्वप्नजागरसुषुप्तिषु, बहिः (बाहेर, समाधींत) च सत्, देहेंद्रियासुहृदयानि (अनु प्राण मन) येन संजीवितानि [सन्ति] चरंति, तत् परं [तत्त्व] अवेहि (जाण) ॥ ३५ ॥

उत्तर सांगू लागला '— राजाधिराजा, ह्या विश्वाचें रक्षण, उत्पत्ति व लय होण्याला जो हेतु (कारण) आहे व ज्याला कोणताही हेतु (कारण) नाहीं, त्याला ' नारायण ' असें ह्मणतात, तरी वस्तुतः तो परम तत्त्वच होय तसेंच स्वप्न, जागृति आणि निद्रा ह्या तीन्ही अवस्थांमध्ये जें साक्षिरूपानें असून बाहेरही तीन्ही अवस्थांपलिकडे समाधींत येई असतें तें ' ब्रह्म ' ह्मटलें जातें, तरी वास्तविक तें परम तत्त्वच होय. आणि देह, इंद्रियें, प्राण व मन हीं, ज्याच्याकडून जीवन मिळाल्यामुळें आपआपल्या कार्याकडे प्रवृत्त होतात, त्याला ' परमात्मा ' असें ह्मणतात. - एवंच नारायण, ब्रह्म, परमात्मा अशीं नांवें लक्षणभेदानें दिलीं जातात तथापि सर्वत्र एकच तत्त्व भरलेलें आहे - असें त[illegible] ३६

---

१ ' जैसा सायंप्रातर्मध्याह्न । तिन्ही काळीं अलिप्त गगन । तेवीं उत्पत्तिस्थिति[illegible] [illegible] नारायण [illegible] [illegible]

- 'जाण' असें सांगितलें त्यावरून, ब्रह्मतत्त्व ज्ञानाचा विषय आहे, असा एखाद्याचा समज होईल पण तें तसें नाहीं. मन - मन त्याच्या ठिकाणीं प्रवेश करूं शकत नाहीं वाणीचाही तेथें प्रवेश नाहीं; तसेंच नेत्र, बुद्धि, प्राण व दुसरीही इंद्रियें त्या तत्त्वापर्यंत जाऊन पोंचत नाहींत. उदाहरण पहा - अग्नीची अतिशय ज्वाला, ठिणग्या, किटाळें वगैरे अग्नीला पूर्णपणें प्रकाशित करूं शकतात काय? नाहीं (त्याच प्रमाणें मन, वाणी इत्यादिक जड इंद्रियवृत्तींमध्यें दिसून येणारा त्या वृत्तींचा प्रकाशक जो आत्मप्रकाश तो त्या इंद्रियवृत्तिरूप प्रकाशकाचा प्रकाश्य विषय होत नाहीं). - श्रुतींनींही आत्मस्वरूपाचें 'प्राणांचा प्राण, नेत्राचें नेत्र, श्रोत्राचें श्रोत्र, अन्नाचें अन्न व मनाचें मन इ० प्राणादिकांच्या वृत्तींना प्रकाश पुरविणारें' असें आणि 'मनासह सर्व इंद्रियें ज्यापाशीं न पोंचता माघारी वळतात' असें वर्णन केलें आहे. ह्यावर कोणाला शंका येईल कीं 'मी तुला उपनिषदां-नी प्रतिपादिलेल्या पुरुषाविषयीं विचारितों' अशा अर्थाची श्रुति आहे तीवरून पुरुष (आत्मा) प्रश्नाचा इ० शब्दाचा विषय होतो असें उघड दिसतें तर ह्या शंकेचेंही यथा स्वाः अर्चिषः (ज्वाला ठिणग्या) अनलं (अग्नीला), [तथा] ततः एतत् न—विशति (शिरत नाहीं), तत् वाक्, चक्षु, आत्मा, प्राणेंद्रियाणि च [न विशन्ति]। शब्द

नैतन्मनो विशति वागुत चक्षुरात्मा प्राणेंद्रियाणि च यथा ऽनलमर्चिषः स्वाः ॥

शब्दो ऽपि बोधकनिषेधतया ऽऽत्ममूलमर्थोक्तमाह यदृते न निषेधसिद्धिः ॥ ३६ ॥

(वेद) अपि आत्ममूलं (आत्म्याविषयीं प्रमाण) [सत्] बोधकनिषेधतया (बोधक वचनें निषेधरूप असल्यामुळें) अर्थोक्तं (तात्पर्यानें सांगितलें जाईल अशा रीतीनें) [यथा तथा] आह (सांगतो) यत् ऋते (वाचून) निषेधसिद्धिः न ॥ ३६ ॥

उत्तर सांगतों - वेद देखील आत्माविषयक प्रमाणाचें (स्वतःला प्रमाणभूत इ० आधार असा सद्रूपाचें) निरूपण अर्थावरून तात्पर्य निघेल अशा रीतीनें करितो, - तें अमुक प्रकारचें असें प्रत्यक्ष सांगत नाहीं कारण पहा - वेदांतील आत्मस्वरूपाचीं बोधक वचनें निषेधरूप (आत्मा अमुक पदार्थ नव्हे, तमुक पदार्थ नव्हे, असें सांगणारीं) आहेत - ह्यावर कोणी म्हणेल कीं, तर मग वेदांनीं सद्रूप आत्म्याचें वर्णन केलेंच नाहीं म्हणा तर तसें मात्र नव्हे वेदवचनाच्या तात्पर्यावरून आत्म्याची सत्ता सिद्ध होते पहा - सत्य आधार असल्यावाचून निषेधवचन प्रवृत्त होणार नाहीं - निषेधाला काहीं तरी आश्रय असावा लागतो, असा नियम आहे लौकिक उदाहरण घ्या आपण एखाद्या चुकलेल्या

१ 'प्राणस्य प्राणमुत चक्षुषश्चक्षुरुत श्रोत्रस्य श्रोत्रमन्नस्यान्नं मनसो ये विदुः' (अर्थ वर आहेच) २ 'यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह' (अर्थ वर आहेच)

३ 'तं त्वौपनिषदं पुरुषं पृच्छामि' (अर्थ वर आहेच) ४ बलबोधिनीकार 'आत्मा' शब्दाचा अर्थ जीव असा करितात ५ 'यद्वाचाऽनभ्युदितं येन वागभ्युद्यते तदेव ब्रह्म त्वं विद्धि' (जें वाणीनें वर्णिलेलें नाहीं व जें वाणीला बोलवितें तें ब्रह्म तूं जाण) 'यन्मनसा न मनुते' (मन ज्याचा तर्क करूं शकत नाहीं) 'न चक्षुषा पश्यति कश्चनैनम्' (कोणी देखील त्याला डोळ्यांनें पाहत नाहीं) 'अस्थूलमनण्वह्रस्वमदीर्घम्' (जाड नव्हे, बारीक नव्हे, आखूड नव्हे, लांब नव्हे) इत्यादि वचन

"त्या स्वरूपाचा प्रवचनपाठ। करावया वेदें केली खटपट। तेथ श्रुतीचाही होसाट। ... " एकनाथ, ३८९

लहान मुलाला, त्याच्या पुढें शेंपन्नास लोक उभे करून, 'मुला बाप कोणता?' असें विचारिलें त्या मंडळींत तर त्याचा बाप नाहीं अर्थात तो मुलगा 'हा नव्हे, तो नव्हे, असें सांगत असेल. पण त्याच्या त्या 'नाहीं' म्हणण्याला आधार त्याच्या बुद्धीमध्ये 'आपला जनक आहे' असा पूर्ण समज असतो हा होय. तो 'हा नव्हे तो नव्हे' म्हणतो तेव्हा त्याला बापच नाहीं असें म्हणणे योग्य होणार नाहीं. त्याचप्रमाणें वेदवचनें अमुक आत्मा नव्हे, तमुक नव्हे असें सांगतात तरी पण तेवढ्यावरून आत्म्याची सत्ता सिद्ध होते - । ३६ ।

शिवाय, स्थूल कार्यें व सूक्ष्म कारणें हीं सर्व ब्रह्मच भासत आहे कारण, तें (ब्रह्म) त्या स्थूलसूक्ष्माहून पर म्हणजे त्याचेंही कारण होय - कार्य कारणाहून भिन्न नसतें असा

[यत्] आदौ एकं, [तत्] सत्त्वं, रजः, तमः इति त्रिवृत् (त्रिगुणात्मक प्रधान) [ततः] सूत्रं, [ततः] महान् (महत्तत्त्व) [ततः] 'अहं' (अहंकार) जीव

सत्त्वं रजस्तम इति त्रिवृदेकमादौ सूत्रं महानहमिति प्रवदति जीवम् ॥ ज्ञानक्रियार्थफलरूपतयोरुशक्ति

ब्रह्मैव भाति सदसच्च तयोः परं यत ॥ ३७ ॥

(जीवाचा उपाधि असतो) [च] प्रवदति (म्हणतात). यत् सत् (स्थूल), असत् (सूक्ष्म) च तयोः (त्यांचें) पर (कारण), [तत्] उरुशक्ति (अनेक शक्ति असलेलें ब्रह्म) एव ज्ञानक्रियार्थफलरूपतया भाति (भासतें). ॥ ३७ ॥

नियम आहे, त्या अर्थी स्थूलसूक्ष्में कारणरूप ब्रह्माहून भिन्न नाहींत हें उघड आहे ब्रह्माच्या शक्ति अनेक असल्यामुळे - तें एक असूनही अनेक भिन्न स्थूलसूक्ष्मांचें कारण होऊ शकतें. - बहुत प्रकारानीं कसें भासतें तेंही सांगतो : - आधी जें एक होतें तेंच ब्रह्म सत्त्व, रज, तम अशा तीन गुणानीं युक्त प्रकृति होतें तेंच क्रियाशक्तीनें सूत्र आणि महत्तत्त्व हीं नावें पावतें आणि त्यालाच अहंजीव इ० जीवोपाधि अहंकार अशी संज्ञा येते असे म्हणतात पुढें देवता, इंद्रियें विषय व सुखादि फळें या रूपानें तेंच भासत असतें - जें स्वतः सकल रूपांनी भासतें, त्या ब्रह्माला स्वतःचें अस्तित्व सिद्ध करण्यास इतर प्रमाणें नकोत, हें उघडच आहे - । ३७ ।

---

१ 'वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यं' (घागर, परळ इत्यादि कार्ये केवळ वाणीनें उच्चारण्याला आधार नावापुरती होत वस्तुतः ती सर्व मृत्तिकाच होत ...)

२ महाविष्णूच्या कटाक्षमात्रानें प्रकृतीपासून सृष्टि होते, असें सांगण्यासाठी नाथांनीं प्रकृतीचें वर्णन केलें आहे तें असें —

' अगाध तिचा पतिव्रताधर्म । नपुंसका उपजवी काम । सनाम्या ठेवी नाम । की निष्कामा करी तिजेरी ... ... प्रधानमहत्तत्त्वें गर्भा आली । तेथ त्रिगुणांतें व्याली विकारयुक्त ' ॥ ६९२ । ६९३ ॥

- ह्यावर अशी शंका सहज उद्भवते कीं, आत्मा सकलजगद्रूप आहे, तर जसे सगळ्या कार्यांना जन्मादि सहा विकार आहेत तसे आत्म्यालाही असावे तर निर्वेहा समाधान सांगतों - (१) आत्मा उत्पन्न आलेला नाहीं: - (२) उत्पत्तिच नाहीं तेव्हा त्याला उत्पत्तीनतरचें अस्तित्व नाहीं हें वेगळें सांगणें नलगे, तसेच - (३) तो वाढत नाहीं, - अर्थात (४) त्याला परिपक्व दशा म्हणून काहीं नाहींच. - त्याचप्रमाणें (५) तो क्षीण होत नाहीं व (६) मृत्युही पावत नाहीं कारण, तो, उत्पत्तिनाशवान् असे ज बालतरुणाचें देह, त्यांच्या त्यांच्या बाल्यतारुण्यादि अवस्थांचा साक्षी होय. - अवस्थावान् पदार्थांना पाहणारा त्या अवस्थांत सापडलेला नसतो हा नियमच आहे असा अवस्थातीत आत्मा तो कोणता तेंही सांगतों . - तो सर्व स्थलीं सर्वकाळीं सतत राहणारा केवळ ज्ञानरूप होय - ह्यावर कोणी म्हणेल कीं, ज्ञानाला नाश नाहीं असे नाहीं कारण 'निळेप-

असौ आत्मा न – जजान (जन्मला नाहीं), न – क्षीयते, (क्षीण होत नाहीं), न – मरिष्यति (मरणार नाहीं) [च] हि व्यभिचारिणां (चलन पावणाऱ्या–अस्थिर अशा–अवस्थांचा) सवनवित् (काल जाणणारा). यथा प्राणः, [तथा] सर्वत्र शश्वत् (नित्य) अनपायि (नाश न पावणारें) उपलब्धिमात्र (अनुभवरूप) सत् (ज्ञान) इंद्रियबलेन विकल्पित

नात्मा जजान न मरिष्यति नैधते ऽसौ न क्षीयते सवनविद्व्यभिचारिणां हि । सर्वत्र शश्वदनपाय्युपलब्धिमात्रं प्राणो यथेंद्रियबलेन विकल्पितं सत् ॥ ३८ ॥ अंडेषु पेशिषु तरुष्वविनिश्चितेषु प्राणो हि जीवमुपधावति तत्र तत्र ॥ सन्ने यदिंद्रियगणे ऽहमि च प्रसुप्ते

कूटस्थ आशयमृते तदनुस्मृतिर्नः ॥ ३९ ॥

(विविध कल्पिलेलें) [भवति]. ॥ ३८ ॥ प्राण. अंडेषु, पेशिषु (गर्भाशयातून जन्मणाराम्ध्यें), तरुषु, अविनिश्चितेषु (ज्यांबद्दल निश्चित नाहीं अहत कीं स्वेदज काहीं सागता येत नाहीं, त्या योनींत) [च] तत्र तत्र जीव उपधावति (अनुरोधानें वागतो) यत् [प्रसुप्तं (निद्रा), तस्मिन्] प्रसुप्ते इंद्रियगणे, अहमि (लिंगदेह) च सन्ने (लीन झालेला) [सति]

णाचें ज्ञान झालें व पिंवळेपणाचें ज्ञान नाश पावलें ' असें आपण व्यवहारांत स्वानुभवानें म्हणतों, तेव्हा निळेपणाच्या ज्ञानाची उत्पत्ति आणि पिंवळेपणाच्या ज्ञानाचा नाश झाला, असें नाहीं काय? तर ह्या शंकेचेंही उत्तर सांगतों - ज्ञान मूळचें असलेलें इंद्रियबलानें नाना प्रकारचें कल्पिलें आहे (निळें, पिंवळें इत्यादि आकाराच्या इंद्रियवृत्ति उद्भवतात व नाश पावतात, ज्ञानाला उत्पत्तिनाशादि नाहींत तें अनादिकालापासून सिद्धच आहे), ह्याला उदाहरण प्राणाचें प्राणवायु हा बाल्य, तारुण्य, वार्धक्य सगळ्या अवस्थांमध्यें देहाचें पोषण करीत राहिलेला असतो. म्हणून तो कधीं बाळ, तरुण किंवा वृद्ध होतो काय? नाहीं. कारण, तो नित्य सिद्धच असतो (तसेंच ज्ञान हें नित्यसिद्ध अर्थात उत्पत्तिनाशरहित आहे). ॥ ३८ ॥ अंडी (अंडजयोनि पक्षी). गर्भावरणें (जरायुज योनि मनुष्य, पशु इत्यादि), वृक्ष (उद्भिज्जयोनि) व ज्यांच्याबद्दल निश्चय सांगता येत

१ जायते, अस्ति, वर्धते, विपरिणमते, अपक्षीयते, नश्यति (जन्मतो, जन्मानंतर असतो, वाढतो, पूर्ण दशेस येतो, क्षीण होऊं लागतो व नाश पावतो हे सहा विकार)

२ ' जन्मापूर्वी बाळाचें नास्तिक्य । जन्मापाठीं मानिती आस्तिक्य । या अस्तिनास्तीचें भाष्य । आत्म्यासि देख असेना ' ॥ ना, ७०

३ ' तेंचि अर्थाचा पूर्ण दृष्टांत । जैसा प्राण देहातें वाढवित । तो देहांचि होय अवस्थाभूत । प्राण निरवस्थ जैसा तैसा ' ॥ ना, ७१५

नाहीं त्या योनि (स्वेदज ढेंकूण, पिस्वा इत्यादि) अशा प्रत्येक ठिकाणीं प्राणवायु जीवासमागनें वागत असतो, - तरी पण त्या विविध योनींच्या संबंधामुळें प्राणाला जन्म, मृत्यु इत्यादि कांहीं विकार नसतो. तशीच आत्म्याची स्थिति आहे. पहा : - आत्मा विकारयुक्त असें वाटतें केव्हां ? जागेपणीं आणि स्वप्नामध्यें, जागेपणीं इंद्रियसमुदाय असतो व स्वप्न-मध्यें इंद्रियसंस्कारानें युक्त असा अहंकार असतो म्हणून. परंतु - गाढ निद्रेच्यावेळीं इंद्रियसमुदाय लीन झालेला असतो व अहंकारही लय पावतो, पण तेव्हां देहादि लिंगशरीर-रूप उपाधि नसतांना, आत्मा निर्विकार जसाचा तसाच असलेला आपल्या सर्वांच्या अनुभवाला येतोच (उपाधीवांचून त्याची सत्ता जर अनुभवसिद्ध आहे तर तो निर्विकार आहे, हें उघडच झालें). - ह्यावर कोणी म्हणेल कीं, निद्रेमध्यें अहंकारासुद्धां सर्वांचा लय झाला असतां बाकी शून्य रहावें, तेव्हां निर्विकार आत्मा कसा समजतो ? ... शंकेचें उत्तर शोधायाला लांब जावयास नको. - आपल्याला त्या आत्म्याची स्मृति असते, हेंच तिचें समाधान (' इतका वेळ पर्यंत मी खुशाल सुखानें निजलों होतों, मला कांहीं कळलें नाहीं

अन्वयार्थ—स्मृते (लिंगदेहापासून) कूटस्थः (निर्विकार) [आत्मा वर्तते]. सः तद्वत्स्मृतिः (त्याचें अवधान) [भवति]. ॥ ३९ ॥ यर्हि अब्जनाभचरणैषणया ... विषयक इच्छेनें) उरुभक्त्या (विपुल भक्तीनें) गुणकर्मजानि (गुण व कर्म यामुळें उद्भवणारे) चेतोमलानि (अंतःकरणांतील मल) विधमेत् (दूर करील) [तदा] यथा ...

यर्ह्यब्जनाभचरणैषणयोरुभक्त्या चेतोमलानि विधमेद्गुणकर्मजानि ॥ तस्मिन्विशुद्ध

उपलभ्यत आत्मतत्त्वं साक्षाद्यथाऽमलदृशोः सवितृप्रकाशः ॥ ४० ॥

नेत्रांना) सवितृप्रकाशः (सूर्याचा प्रकाश), [तथा] विशुद्धे तस्मिन् साक्षात् आत्मतत्त्वं उपलभ्यते (अनुभवास येतें ." ॥ ४० ॥ राजा उवाच— ...

अशी झोंपेंतून उठल्यावर आपल्याला आठवण असते. एवढ्यावरून असें सिद्ध होत नाहीं काय कीं निद्रेमध्येंही, ज्याला दर्शन स्पर्श इत्यादि बाह्य विषयांचें ज्ञान नव्हतें असा कोणी साक्षी सुखानुभवरूप आत्मा असला पाहिजे ? कारण, जी गोष्ट अनुभवली नाहीं तिचें आपल्याला स्मरण कधींच व्हावयाचें नाहीं अर्थात सुषुप्तीमध्येंही ... आता तेथें विषयाचा संबंध नसल्यामुळें तो स्पष्ट समजत नाहीं एवढें खरें. तरी पण त्याची सत्ता नाहीं असें होत नाहीं) ॥ ३९ ॥ - आता, निद्रेमध्यें निर्विकार आत्मतत्त्वाचा अनुभव मिळतो तरी पुन्हां जीव संसारात पडतो, ह्याचें कारण त्यावेळीं अविद्या व तिचे संस्कार नष्ट झालेले नसतात हें होय त्याची निवृत्ति करणारा अनुभव केव्हां होतो ... ज्या वेळीं मनुष्य - स्त्री, पुत्र, द्रव्य इत्यादिकांविषयीं इच्छा सोडून - केवळ पद्मनाभ परमेश्वराच्या चरणीं इच्छा धरील आणि विपुल भक्तीच्या योगें, ... वासनारूप मल—हे कर्मांमुळें आणि गुणामुळें उद्भवलेले असतात—नष्ट करील तेव्हां अंतःकरण निर्मळ झालें असता, त्या पुरुषाला, जसा दृष्टि स्वच्छ असल्या कीं सूर्यप्रकाश दिसतो,

१ किंवा 'चित्त आत्म्यावरील गुणजन्य व कर्मजन्य वासनारूप मळ दूर करील ' असाही अर्थ करता

तसा आत्मतत्त्वाचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो. ॥ ४० ॥ - भक्ति कर्मयोगाधीन असल्यामुळे अगोदर कर्मयोग समजून घेण्यासाठी - विदेहराजानें प्रश्न केला — मुनिवरहो - मा-झ्या ऐकण्यांत असें आहे कीं - कर्मनिवृत्ति होईल तेव्हांच ज्ञान साध्य होतें व कर्मनिवृत्तीचें साधन कर्मांचे अनुष्ठान होय त्याच्या योगें पुरुष सुसंस्कृत होतो आणि ह्या जन्मींच सत्वर कर्मांचा त्याग करून ज्ञान मिळवितो. ह्मणून आपण मला कर्मयोग निवेदन करावा ॥ ४१ ॥ शिवाय, हाच प्रश्न पूर्वी मी पित्याच्या जवळ असतांना ब्रह्मदे-वाच्या पुत्रांना (सनत्कुमारांना) विचारिला होता, ते ऋषि - तर सर्वज्ञ आहेत. असें असून त्यांनी मला कर्मयोगाचा उपदेश केला नाहीं याचें कारण काय तेंही सांगावें

वदत (सांगा); येन संस्कृतः (शुद्ध) पुरुषः इह आशु (लवकर) कर्माणि विधूय (टाकून) नैष्कर्म्यं (कर्मनिवृत्तिमूलक ज्ञान) परं विदते (पावतो) ॥ ४१ ॥ पूर्वं पितुः अंतिके (समीप) ऋषीन् एवं प्रश्नं अपृच्छं (विचारिला होतो), ब्रह्मणः पुत्राः न अब्रुवन्. तत्र कारणं उच्यतां (सांगावें) " ॥ ४२ ॥ आविर्होत्र उवाच— " कर्म (विहित), अकर्म (निषिद्ध), वि-

राजोवाच । कर्मयोगं वदत नः पुरुषो येन संस्कृतः ॥ विधूयेहाशु कर्माणि नैष्कर्म्यं विदते परम् ॥ ४१ ॥

एवं प्रश्नमृषीन्पूर्वमपृच्छं पितुरंतिके ॥ नाब्रुवन्ब्रह्मणः पुत्रास्तत्र कारणमुच्यताम् ॥ ४२ ॥ आविर्होत्र उवाच ।

कर्माकर्मविकर्मेति वेदवादो न लौकिक ॥ वेदस्य चेश्वरात्मत्वात्तत्र मुह्यंति सूरय ॥ ४३ ॥

कर्म (विहित कर्म न करणें), इति वेदवादः (वेदानें सांगितलेला प्रकार), लौकिकः न. वेदस्य ईश्वरात्मत्वात् (ईश्वररूप, अपौरुषेय, असल्यामुळे) तत्र सूरयः (विद्वान्) मुह्यंति (मोह पड-

॥ ४२ ॥ आविर्होत्र मुनि सांगूं लागला — - राजा, हा विषय फार गहन आहे. - कर्म (विहित) कोणतें, अकर्म (निषिद्ध कर्म) कशाला ह्मणावें व विकर्म (विहित कर्म न करणें) ह्मणजे काय, ह्या गोष्टी केवळ वेदवचनाच्या आधारें कळावयाच्या, लौकिक वचनावरून नाहींत. आणि वेद तर ईश्वरापासून उद्भवलेले (अपौरुषेय), अर्थात - मनुष्यांच्या वाक्यांचा अर्थ त्याच्या अभिप्रायावरून काढिता येणें शक्य असतें, पण अपौरुषेय वाक्यांत तर केवळ पूर्वापरसंबंध लक्ष्यांत घेऊन तात्पर्य काढावयाचें असतें व तें करण्यास फार कठिण जातें. - ह्मणून त्या कर्मादिकाविषयीं मोठमोठ्या विद्वानांना देखील मोह पडतो (नक्की निर्णय करतां येत नाहीं - मग तुझ्यासारख्या अल्प [illegible]

१ कर्म, अकर्म व विकर्म या शब्दांचे अर्थ एकनाथाच्या मतें अगदीं भिन्न आहेत ते असे — ' कर्म अकर्म विकर्म जाण । एकचि परी त्रिविध भिन्न । तेही विभाग [illegible] अवधारीं ॥ जेवीं मधु मधुर । त्रिविधभेदें एक साकर । तेवीं एकाचे त्रिप्रकार । कर्मठ नर मानिती कर्म ॥ मुख्य मुद्दा जें का निपजे । कर्म देखें त्यातें ह्मणिजे । विहित [illegible]-हित क्रिया जे जे । विकर्म ह्मणिजे तया नांव ॥ कर्म अकर्मयोगें चळे । ऐसें विकर्मीं ज्यासि विवळे । त्यास निष्कर्मता आकळे । गुरुकृपाबळें तत्काळ ॥ ३६३ । ६७ । ६८ ६९

त्याचा खरा आशय कळेल कोठून? एवढ्यासाठीच मनत्कुमारानीं तो तुला सांगितला नाहीं. - ॥४३॥ - वडील माणसें लहान मुलाला - औषध - पाजावयाचें असलें ह्मणजे खडीसाखर लाडू वगैरे देऊं करितात; पण औषध पिण्याचें खरें फळ खडीसाखर किंवा लाडू खायला मिळणें हें असतें काय? नव्हे नर रोग जावा हें असते - त्याच प्रमाणे वेद अज्ञानी जनांना शिक्षण लावण्यासाठी (त्याची समजूत घालण्यासाठीं) - खरा उद्देश लपवून ठेवून - वरवर भलताच अर्थ सांगत असतो, आणि कर्में सुटावी ह्यासाठी लोकांना कर्मे करायला लावितो (यज्ञ केला असता स्वर्गादि फळें मिळतात, असा जरी वेदवचनाचा वरवर अर्थ दिसतो तरी तो मुख्य नव्हे, त्याचा अतस्थ वास्तविक हेतु लोकानीं कर्मांतून मुक्त व्हावें असा असतो. कर्मांतून मुक्तता होण्याचे साधन कर्मानुष्ठान हें होय. तिकडे विषयी लोकांची प्रवृत्ति व्हावी ह्मणून, औषध पाजताना मुलाला खाऊ देऊ करतात त्याप्रमाणें. तात). ॥ ४३ ॥ परोक्षवादः (खरें लपवून वरवर निराळेंच सांगणारा) अयं वेदः यथा अगदं (औषध), [तथा] बालानां अनुशासनं (शिक्षण लावणें) [यथा तथा] कर्ममोक्षाय (कर्म सुटावे यासाठीं) कर्माणि विधत्ते (सांगतो). ॥ ४४ ॥ अजितेंद्रियः (नाहीं जिंकिलीं इंद्रियें ज्यानें असा) अज्ञः (अज्ञानी) यः स्वयं (आपण होऊन, बुद्धिपुरःसर) वेदोक्तं न आचरेत्, सः

परोक्षवादो वेदोऽयं बालानामनुशासनम् ॥ कर्ममोक्षाय कर्माणि विधत्ते ह्यगदं यथा ॥४४॥ नाचरेद्यस्तु वेदोक्तं स्वयमज्ञोऽजितेंद्रियः ॥

विकर्मणा ह्यधर्मेण मृत्योर्मृत्युमुपैति सः ॥४५॥ वेदोक्तमेव कुर्वाणो निःसंगोऽर्पितमीश्वरे ॥ नैष्कर्म्यां लभते सिद्धिं रोचनार्था फलश्रुतिः ॥४६॥

विकर्मणा (विहित कर्म न करणें ह्या) अधर्मेण मृत्योः (मृत्यूमागून) मृत्युं उपैति (पावतो). ॥ ४५ ॥ निःसंगः (आसक्तिरहित) ईश्वरे अर्पितं वेदोक्तं एव कुर्वाणः नैष्कर्म्यां सिद्धिं लभते (पावतो). फलश्रुतिः रोचनार्था (गोडी लावणें हे प्रयोजन जिचें, अशी). ॥ ४६ ॥

वेदही. कर्मे केली असता अलौकिक सुखोपभोग मिळतात अशी गोड गोड वचनें देत असतो). ॥४४॥ - ह्यावर कोणी ह्मणेल. 'कर्में सुटणें हाच पुरुषार्थ ना? तर मग आरंभींच कर्मे सोडावी ह्मणजे झालें.' पण तसें करिता येत नाहीं. - ज्याचीं इंद्रियें स्वाधीन नाहींत अर्थात ज्याला तत्त्वज्ञान झालें नाहीं तो पुरुष स्वतः जर वेदोक्त कर्में आचरणें सोडील तर त्याच्या हातून विहित कर्में न करणें हा अधर्म घडल्यामुळें, त्याला मृत्यूमागून मृत्यु प्राप्त होतात (जन्ममरणपरंपरा भोगाव्या लागतात). [illegible] ॥ आणि जो पुरुष वेदानें जें सांगितलें आहे तेवढेंच—निषिद्ध मात्र नव्हे—कर्म ईश्वरार्पणबुद्धीनें—फळ मिळविण्यासाठीं नव्हे—करितो, त्याला नैष्कर्म्यरूप (कर्में सुटून ज्ञान मिळणें ही) सिद्धि प्राप्त होते मात्र

---

१ नाथ ह्मणतात. वेदानें कर्मानुष्ठानाचा उपदेश कर्मबंधन तुटण्यासाठीं केला आहे असें असता जो मनुष्य त्याचा उपयोग विषय भोगण्याकडे करितो [illegible]

'लोहाची बेडी पडली पायीं । ते तोडावया घणु आणिला पाहीं । तो घणू चि विकोन खादिला जिहीं । त्याचें बंधन कोण तोडील' १३१

२ मार्मिक श्लोकाच्या अर्थाविषयीं मतभेदाचें कारण नाथानीं येथें दिलें आहे —

'विकर्मणा ह्यधर्मेण । हें मूळींचें पदनिरूपण । तेथें विकर्मामाजी अधर्म पूर्ण । परी अकर्म तें जाण अधर्म नव्हे' १८८.

त्यानें कर्तृत्वाचा अभिमान धरिता कामा नये - कर्म केलें म्हणजे स्वर्गादि फल मिळालेंच पाहिजे असाही कांही अर्थ नाहीं; कारण, वेदार्थ - स्मृति - फलश्रुति केवळ कर्माचार्य, लोकांना आवड लावण्यासाठी आहेत. (खडीसाखर दिल्यावाचून जर मुलगा औषध पीत आहे, तर त्याला ती दिलीच पाहिजे असें कोण म्हणतो), - कर्मानी तोच ना म्हणने मनुष्य सहजच वेदवचनांच्या अर्थाचा विचार करूं लागतो. मग त्याला ' जो पुरुष आत्मरूपाचें ज्ञान न मिळवितां ह्या लोकांतून परत्र जातो, तो कृपण होय ' ह्या वचनाव रून आत्मज्ञान न मिळविणाराची मूढता कळून येते व 'ब्राह्मण त्या ह्या आत्म्याला वेदवचनाच्या आधारें व ब्रह्मचर्य, स्वधर्मानुष्ठान, गुरुवेदांतवचनावर विश्वास, यज्ञानुष्ठान आणि कर्मफलत्याग, ह्या साधनांनीं जाणूं इच्छितात ' ह्या उपनिषद्वाक्यावरून यज्ञादि कर्में ज्ञानाची साधनें होत असें कळू लागतें आणि त्याची निष्काम कर्में करण्याकडे प्रवृत्ति होते

य. आशु (लवकर) परात्मनः हृदयग्रंथिं (हृदयाची गांठ, अहंकार) निर्जिहीर्षुः (दूर करूं इच्छिणारा) [सः] तंत्रोक्तेन विधिना केशवं देवं उपचरेत् (सेवा करो) ॥ ४७ ॥ आचार्यात् लब्धानुग्रहः (मिळविला अनुग्रह ज्यानें असा) तेन संदर्शितागमः (दाखवून दिला पूजाप्रकार ज्याला असा) आत्मनः अभिमतया (प्रिय) मूर्त्या महापुरुषं (परमे

य आशु हृदयग्रंथिं निर्जिहीर्षुः परात्मनः ॥ विधिनोपचरेद्देवं तन्त्रोक्तेन च केशवम् ॥ ४७ ॥

लब्धानुग्रह आचार्यात्तेन संदर्शितागमः ॥ महापुरुषमभ्यर्चेन्मूर्त्याऽभिमतयाऽऽत्मनः ॥ ४८ ॥

शुचिः संमुखमासीनः प्राणसंयमनादिभिः ॥ पिंडं विशोध्य सन्न्यासकृतरक्षोऽर्चयेद्धरिम् ॥ ४९ ॥

श्वराला) अभ्यर्चयेत् . ॥ ४८ ॥ शुचिः (शुद्ध) संमुखं (समोर) आसीनः (बसणारा) प्राणसंयमनादिभिः पिंडं (शरीर) विशोध्य (शुद्ध करून) सन्न्यासकृतरक्षः उत्तम मग त्याला स्वर्गादि फलांची इच्छा नाही त्यार्थी तीं मिळावयाचीं नाहींतच. कारण कामना असेल तर स्वर्ग मिळेल, असें वेद सांगतो. अर्थात पुढें कर्मनिवृत्ति होऊन त्याला ज्ञान प्राप्त होतें. - ॥ ४६ ॥ जीव मूळ परमात्मस्वरूप असतांना त्याला अहंकाररूप जें बंधन प्राप्त झालें आहे, तें लवकर दूर करावें अशी ज्याची इच्छा असेल त्यानें ज्ञानदायक केशवाची तंत्रोक्त प्रकारानेंही (वेदोक्तविधीसह तंत्रोक्त विधीनें) पूजा करावी ॥ ४७ ॥ मनुष्यानें प्रथम गुरूपासून अनुग्रह (मंत्रोपदेश) मिळवावा आणि, गुरूनें पूजाप्रकार सांगून दिला असता त्या विधीप्रमाणें, आपल्याला जी मूर्ति प्रिय असेल तिच्या आश्रयानें महापुरुषाची (परमेश्वराची) पूजा करावी ॥ ४८ ॥ स्नान करून शुद्ध होऊन मूर्तीसमोर आसन मांडून बसावें, प्राणायाम, भूतशुद्धि इत्यादिकांच्या योगें देह पवित्र करावा, उत्तम न्यासाच्या योगें रक्षाबंधन करावें गंध फुलें इत्यादि सभार स्वच्छ करून ध्यावे

१ ' यो वा एतदक्षरमविदित्वा गार्ग्यस्माल्लोकात्प्रैति स कृपणः ' (अर्थ वर आहेच) २ 'तमेतं वेदानुवचनेन ब्राह्मणा विविदिषन्ति ब्रह्मचर्येण तपसा श्रद्धया यज्ञेनानाशकेन (अर्थ वर दिला आहेच). ३ ' स्वर्गकामो यजेत. ' ४ पूरक (एका नाकपुडीनें वायु वर ओढून घेणें), कुंभक (तो वायु आंत सांठवून धरणें), व रेचक (दुसऱ्या नाकपुडींतून वायु बाहेर सोडणें) ५ ' अपक्रामन्तु भूतानि पिशाचाः सर्वतोदिशम् ' इत्यादि मंत्र म्हणून भूत, पिशाचें दूर झालीं अशी भावना करणें

भूमि संमार्जनादिकांनीं शुद्ध करावी; आपलें चित्त निर्मळ राखावें (व्यग्र होऊं देऊं नये); मूर्तिही - पूर्वे दिवशीं लाविलेला गंधादिकांचा लेप - पुसून स्वच्छ करावी आणि पूजासंभार व आसन प्रोक्षून मूर्त्यादिकावर व हृदयांतही जितके मिळतील तितक्या उपचारांनीं पूजा चालवावी. ॥ ४९ ॥ ५० ॥ पाद्य, अर्घ्य इत्यादिकांचीं पात्रें सिद्ध करून ठेवावीं. एकाग्रपणें हृदयामध्यें पूजिलेल्या परमात्म्याचें प्रतिमेवर सन्निधान कल्पावें (हृदयस्थ परमात्मा मूर्तीमध्यें स्थापिला, अशी भावना करावी) नंतर 'हृदयाय नमः' [illegible]

व्यार्तांच्या योगें केलें रक्षबंधन ज्यानें असा) [सन्] हरिं अर्चयेत्. ॥ ४९ ॥ द्रव्यक्षित्यात्मलिंगानि (पूजा [illegible], भूमि [illegible] व मति याम) निष्पाद्य (शुद्ध करून घेऊन) आसनं प्रोक्ष्य (प्रोक्षण करून), पाद्यादीन् उपकल्प्य (सिद्ध करून, अथ सन्निधाप्य (आवाहन करून) समाहितः (स्थिर मन ज्याचें असा पुरुष) हृदादिभिः (हृदयाय नमः, शिरसे स्वाहा [illegible]) कृतन्यासः [सन्] मूलमंत्रेण यथालब्धोपचारकैः अर्चादौ (मूर्ति इत्यादिकावर) हृदये च अर्चयेत्. ॥ ५० ॥ ५१ ॥ सांगोपांगां (हृदयादि अंगें व चक्रादि उपांगें यांसहित [illegible])

अर्चादौ हृदये चापि यथालब्धोपचारकैः ॥ द्रव्यक्षित्यात्मलिंगानि निष्पाद्य प्रोक्ष्य चाऽऽसनम् ॥ ५० ॥

पाद्यादीनुपकल्प्याथ सन्निधाप्य समाहितः ॥ हृदादिभिः कृतन्यासो मूलमंत्रेण चार्चयेत् ॥ ५१ ॥

सांगोपांगां सपार्षदां तां तां मूर्तिं स्वमंत्रतः ॥ पाद्यार्घ्याचमनीयाद्यैः स्नानवासोविभूषणैः ॥ ५२ ॥

गंधमाल्याक्षतस्रग्भिर्धूपदीपोपहारकैः ॥ सांगं संपूज्य विधिवत्स्तवैः स्तुत्वा नमेद्धरिम् ॥ ५३ ॥

(परिवारासहित) तां तां मूर्तिं स्वमंत्रतः पाद्यार्घ्याचमनीयाद्यैः, स्नानवासोविभूषणैः (स्नान, वस्त्रें व अलंकार यांनीं), ॥ ५२ ॥ गंधमाल्याक्षतस्रग्भिः (गंध, फुलें, अक्षता, [illegible]) धूपदीपोपहारकैः [च] सांगं विधिवत् संपूज्य स्तवैः स्तुत्वा हरिं नमेत् (वंदन करावें). ॥ ५३ ॥

स्वाहा', 'शिखायै वषट्' इत्यादिमंत्रांनीं व मूलमंत्रानें (गुरूनें उपदेशिलेल्या अष्टाक्षरादि मंत्रानें) मूर्तीवर न्यास करावे आणि हृदयादि अंगें, सुदर्शनादि उपांगें व पार्षदगण यांसहित त्या त्या मूर्तीची मूलमंत्राच्या योगें पाद्य, अर्घ्य, आचमनीय, मधुपर्क, आचमन, स्नान, वस्त्रें, अलंकार, गंध, पुष्पें, अक्षता, माळा, धूप, दीप, नैवेद्य हे उपचार अर्पून पूजा करावी. यथाविधि सांग पूजा आटोपल्यावर स्तोत्रें म्हणून स्तव करावा आणि हरीला नमस्कार करावा ॥ ५१ ॥ ५२ ॥ ५३ ॥

---

१ 'ज्यासि ज्याची नये संपूर्ण । तेणें प्रतिमामूर्ति अधिष्ठान । तेथेंचि करावें पूजन । लब्धोपचारें आण आगमोक्त ॥ ज्यासि [illegible] ये मूर्ति [illegible] । [illegible] बाह्याचार । आटाआटी । सांडूनियां स्वानंदीं । करावी गोमटी मानसपूजा' ॥ नाथ, ८२३।९३. २ विष्णुपूजेंत अक्षता [illegible] तिलकाच्या [illegible] उपयोग करावयाचा नाहीं. कारण 'नाक्षतैरर्चयेद्विष्णुं न केतक्या महेश्वरम्' (अक्षतांनीं विष्णूची व केवड्यानें शंकराची पूजा [illegible])

आपला आत्मा तद्रूप आहे असें ध्यान करीत श्रीहरीची अर्चा पूजा करावी. - प्रसाद म्हणून - निर्माल्य मस्तकीं धरावा आणि मस्तकावर [illegible] उद्वासन करावे
(देव हृदयांत प्रविष्ट झाला असें कल्पून मूर्ति करंड्यांत ठेवावी). ॥ ५४ ॥ [illegible] जो पुरुष मस्तकांतर्यामी ईश्वराची अग्नि [illegible]
स्थानी पूजा करितो तो लवकरच मुक्ति पावतो. ॥ ५५ ॥ ॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने एकादशस्कंधे तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥
- आविर्होत्र मुनींनी आपणाला प्रिय असेल त्या मूर्तींच्या आधारें ईश्वराची पूजा व स्तुति करावी असें सांगितलें पण, [illegible]
म्हणजे त्यानें अवतार किती घेतले आणि त्यांत लीला काय काय केल्या त्याचें ज्ञान अवश्य पाहिजे तें कळून घेण्यासाठीं - परीक्षित् [illegible]
आत्मानं तन्मयं (तद्रूप) ध्यायन् (चिंतणारा) [सन्] हरेः मूर्तिं संपूजयेत्. शिरसि शेषां (प्रसाद निर्माल्य) आघ्राय ठेवून [illegible] [त] स्वधाम्नि
(आपल्या स्थानीं) उद्वास्य (ठेवून विसर्जन) [पूजां समापयेत्]. ॥ ५४ ॥ यः एव अग्न्यर्कतोयादौ (अग्नि, सूर्य, उदक इत्यादिकांत), अतिथौ [illegible]
(पूजितो), सः अचिरात् (लवकर) मुच्यते (मुक्त होतो).” ॥ ५५ ॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

आत्मानं तन्मयं ध्यायन्मूर्तिं संपूजयेद्धरेः ॥ शेषामाधाय शिरसा स्वधाम्न्युद्वास्य सत्कृतम् ॥ ५४ ॥ एवमग्न्यर्कतोयादावतिथौ

हृदये च यः ॥ यजतीश्वरमात्मानमचिरान्मुच्यते हि सः ॥ ५५ ॥ इति श्रीभा० महा० एकादशस्कंधे तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

राजोवाच । यानि यानीह कर्माणि यैर्यैः स्वच्छंदजन्मभिः ॥ चक्रे करोति कर्ता वा हरिस्तानि ब्रुवन्तु नः ॥ १ ॥ द्रुमिल उवाच ।

यो वा अनंतस्य गुणाननंताननुक्रमिष्यन्स तु बालबुद्धिः ॥ रजांसि भूमेर्गणयेत्कथंचित् कालेन नैवाखिलशक्तिधाम्न ॥ २ ॥

राजा उवाच— “ हरिः इह यानि यानि कर्माणि यैः यैः स्वच्छंदजन्मभिः (स्वेच्छेनें धरिलेल्या जन्मांनीं) चक्रे, करोति, कर्ता ([illegible]) तानि नः ब्रुवन्तु (सांगा) ”. ॥ १ ॥
द्रुमिलः उवाच— “ यः अनंतस्य अनंतान् गुणान् अनुक्रमिष्यन् (अनुक्रम लावणारा, मोजणारा) [भवति], सः तु बालबुद्धिः [illegible]
स्वच्छंदतः जे जे अवतार घेऊन जीं जीं चरित्रें केलीं. तसेंच सांप्रत त्याचा जो अवतार व ज्या लीला चालू असतील आणि भविष्यकाळीं [illegible]
असेल, तीं सर्व आपण आम्हाला निवेदन करावीं. ॥ १ ॥ द्रुमिल योगी सांगूं लागला — राजा, परमेश्वराच्या स्वरूपाचा अंत कोणालाही लागावयाचा नाहीं व त्याचे गुणही अनंत
आहेत. त्याच्या एकंदर गुणांची गणना करावी, असें जो कोणी मनांत आणील, त्या मनुष्याची बुद्धि लहान मुलाप्रमाणें मंद होय असें समजावें - [illegible] - एखादा

१ मागील अध्यायाच्या अखेरचा श्लोक पहा.

द-
त्व-
॥

- त्या नारायणाला, हा भगवंताचा अवतार, असें म्हणण्याचें कारण, त्याच्या ठिकाणीं अलौकिक शांतता वसत होती, हें होय, उदाहरणासाठीं थोडा इतिहास सांगतो. नारायणाची उग्र तपश्चर्या पाहून - इंद्राला भीति पडली कीं हा माझें स्थान (स्वर्गाचें राज्य) घेणार म्हणून त्यानें - नारायणाचा तपोभंग करण्यासाठी - [illegible] सहित मदनाला पाठवून दिलें. कामराजाची स्वारी अप्सरांचा मेळा, वसंतऋतु व मंद सुगंध वायु अशा आपल्या परिवारासह बदरिकाश्रमक आश्रमीं आली. नारायणाचें सामर्थ्य किती अगाध आहे, तें मदनाला कळलें नाहीं, म्हणून त्यानें नारायणावर स्त्रियांचे कटाक्ष हे बाण सोडण्याचा क्रम चालू केला ॥ ७ ॥ इंद्रानें आपली आगळीक केली ही गोष्ट आदिदेव-

इंद्रः " मम धाम (स्थान) जिघृक्षति (घेऊं इच्छितो) " इति विशंक्य (भिऊन) सगणं (परिवारसहित) कामं न्ययुंक्त (योजिला, [illegible]) स: अप्सरोगणवसंतसुमंदवातैः [सह] बदर्युपाख्यं (बदरीसंज्ञक) [आश्रमं] गत्वा (जाऊन) स्त्रीप्रेक्षणेषुभिः (स्त्रियांचे कटाक्ष या बाणांनीं) अविद्धत् (वेधिता झाला) ॥ ७ ॥ आदिदेव शक्रकृतं (इंद्रानें केलेला) अक्रम (अपराधाला) विज्ञाय (जाणून) प्रहस्य (हासून) गतविस्मय. (गेला गर्व ज्याचा असा) एजमानान् [illegible]

इंद्रो विशंक्य मम धाम जिघृक्षतीति कामं न्ययुंक्त सगणं स बदर्युपाख्यम् ॥ गत्वाऽप्सरोगणवसंतसुमंदवातैः स्त्रीप्रेक्षणेषुभिरवि-
ध्यदतन्महिज्ञः ॥ ७ ॥ विज्ञाय शक्रकृतमक्रममादिदेवः प्राह प्रहस्य गतविस्मय एजमानान् ॥ मा भैर्विभो मदन मारुत देववध्वो
गृह्णीत नो बलिमशून्यमिमं कुरुध्वम् ॥ ८ ॥ इत्थं ब्रुवत्यभयदे नरदेव देवाः सव्रीडनम्रशिरसः सघृणं तमूचुः ॥ नैतद्विभो त्वयि
परेऽविकृते विचित्रं स्वारामधीरनिकरानतपादपद्मे ॥ ९ ॥

(कंपायमान झालेल्या) [कामादीन्] प्राह— "भो मदन, मा भैः (भिऊं नकोस) मारुत (वायो), देववध्व (अप्सरांनो), [मा भैष्ट] (भिऊं नका) नः बलिं (आदरातिथ्य [illegible]) इमं (हा आश्रमाला) अशून्यं (ओसाड नाहीं, कृतार्थ, अशाच) कुरुध्व (करा)." ॥८॥ नरदेव अभयदे [नारायणे] इत्थं ब्रुवति [सति], देवाः सव्रीडनम्रशिरसः (लज्जायुक्त व नम्र मस्तकें [illegible])

ज्या (नारायणाच्या) लक्ष्यांत आली, - पण त्यानें इंद्राला शाप देण्याचा विचार देखील मनांत आणिला नाहीं वरें तसेंच, - त्याला स्वतःच्या वैराविषयीं गर्व अगदीं नव्हता - इकडे, आपल्याला शाप मिळतो कीं काय, अशा भीतीनें - मदनादि वीर सैनिक लटलटा कापूं लागले तेव्हां हसून* नारायण त्यांना म्हणाले — " भो मदना मदन", हे वायो अहो अप्सरांनो, भिऊं नका, आम्हांकडून अतिथिसत्कार घ्या आणि ह्या आश्रमाला कृतार्थ करा (आम्हीं आपलें आदरातिथ्य केलें नाहीं तर हा आश्रम असून नसून सारखा हे [illegible] तसें न व्हावें). " ॥ ८ ॥ हे नरपते (राजा), श्रीनारायणानीं अभय देत देत असें भाषण केलें. तेव्हां मदनादि देव, जणू मस्तकीं लाजेनें [illegible] पडल्यामुळेंच मस्तकें नमवून [illegible]

१ 'अपकाऱ्या उपकार करिती । त्याचि नांव गा परत्र ज्ञाती । ते शांतीची उत्कट गती । वाची लोकांप्रती आचरोनी ' ॥ [illegible]
* हसण्याचें कारण नारायणाच्या मनांत असें आलें कीं, इंद्राला इतका क्षुद्र मोह पडला ! २ ज्याहीं दसलिया पापा पडतो । तेवीं विमुख [illegible]
ते सुख पावती स्वानंदें ॥ ज्याही दसलिया कन्या न घाडी । अ तेथि दसलिया पुण्यकोडी । पूर्वापार जे का जोडी । तेही रोकडी [illegible] ॥ [illegible]

करुणा येईल अशा रीतीनें. विज्ञापना करूं लागले.— 'हे विश्वव्यापका, - आम्ही असावध केला असताही तुला क्रोध आला नाहीं [illegible] करीत आहेस, - ह्या तुझ्या कृत्याबद्दल विशेषसें आश्चर्य वाटण्याचें प्रयोजन नाहीं, कारण तू मायेहून पर अर्थात निर्विकार आहेस [illegible] अशा पुरुषाचे अनेक समुदाय तुझ्या चरणीं लीन होऊन राहिले असतात ॥ ९ ॥ - तसेंच, आम्हीं तुझा नपोभंग करण्याम प्रवृत्त झालों [illegible] नाहीं. [illegible] आश्चर्य नाहीं. पहा प्रभो, - जे कोणी लोक तुझी सेवा करूं लागतात, त्यांना इंद्रादि देवांकडून बहुत विघ्नें घडतातच. कारण तुझे सेवक जन इंद्रादिकांच्या [illegible] तुझ्या [illegible] जा- तात. - हा त्यांचा उत्कर्ष देवांना कसा बरें साहवेल? - इतरांना (तुझी सेवा न करणाऱ्यांना), अशीं विघ्नें येत नाहींत, कारण - [illegible] करतात. - तो [संतः] सघृणं (दयायुक्त होईल अशा रीतीनें) [यथा तथा] तं ऊचु —' इति संबंधः. परे (मायेहून पलिकडे असणाऱ्या) अविकृते (विकाररहित [illegible] (आत्मरूपीं रममाण व धैर्यसंपन्न अशा मुनींच्या समुदायानीं वंदिलें चरणकमल ज्याचें असा), त्वयि एतत् (हें आचरण) विचित्रं न ॥ ९ ॥ [illegible] ते (मुख्य) परमं (उत्तम) पदं (स्थानाप्रत) व्रजतां (जाणाऱ्या) त्वां सेवतां (भजन करणाऱ्यांना) सुरकृता: (देवांनीं केलेले) [illegible] अन्यस्य [illegible]

त्वां सेवतां सुरकृता बहवोऽन्तरायाः स्वौको विलंघ्य परमं व्रजतां पदं ते ॥ नान्यस्य बर्हिषि बलीन्ददतः स्वभागान्

धत्ते पदं त्वमविता यदि विघ्नमूर्ध्नि ॥ १० ॥ क्षुत्तृट्त्रिकालगुणमारुतजैह्व्यशैश्न्यानस्मानपारजलधीनतितीर्य केचित् ॥

क्रोधस्य यान्ति विफलस्य वशं पदे गोर्मज्जन्ति दुश्चरतपश्च वृथोत्सृजन्ति ॥ ११ ॥

(यज्ञात) स्वभागान् बलीन् ददतः न. यदि (ज्या अर्थी) त्वं अविता (रक्षक), [अत: भक्त] विघ्नमूर्ध्नि पदं धत्ते (ठेवितो) ॥ १० ॥ केचित् (कित्येक लोक) क्षुत्तृट्त्रिकालगुणमारुतजैह्व्यशैश्न्यान् (क्षुधा, तृषा, तीन्काळ ह्मणजे उन्हाळा, पावसाळा व हिंवाळा वायु, जिव्हाभोग, व मैथुनसुख ह्या) अस्मान् (आह्माला) अपार- पुरुष यज्ञामध्यें इंद्रादि देवांना त्यांचे पुरोडाशादि भाग अर्पण करीत असतो [illegible] आता, सगळ्या देवांचा अधीश्वर तू भक्ताचें रक्षण करीत आहेस ह्मणून तो (तुझा भक्त) वि- घ्नाच्या मस्तकावर पाय देऊन तुझी आराधना चालवीत असतो, - ही गोष्ट वेगळी. तुझ्या भक्ताची जर इतकी शक्ति तर तुझ्या स्वतःला विघ्नें [illegible] पाहिजे' - ॥ १० ॥ - तुझी सेवा न करितां केवळ तपश्चर्या चालविणाऱ्या लोकांना दोहोंपैकीं एक गति मिळते ह्मणजे ते एक आमच्या तरी अंकित होऊन राहतात किंवा क्रोधाच्या तरी गो- ष्यात सापडतात. त्यातही आमचे अंकित होऊन वसणारे लोक काही बरे, कारण, त्यांना निदान विषयोपभोग तरी भोगायाला मिळतात पण क्रोधाचे दास बनणारे पुरुष तर

१ किंवा 'सघृण' हें नारायणाचें विशेषण करावें दयालु अशा नारायणाला

अमर्दीच मूळ होत' पहा :- क्षुधा, तृषा, थंडी, ऊन्ह, पाऊस, वायु, चांगले चांगले पदार्थ खाण्याविषयीं जिभेची ओढ, मैथुनसुखाची आवड, असे हे आहीं म्हणजे एकेक अगस्त्य [illegible]
समुद्र पसरलेले आहे; पण एवढाल्या समुद्रातून पार पडून (आम्हां विषयवासनांना जिकून) कित्येक लोक गाईच्या, - [illegible] [illegible] - [illegible] [illegible] [illegible] [illegible]
बुडतात! - असेंच नाहीं तर दुसरें काय म्हणावें? कारण, ज्यांना जिंकणें अत्यंत दुर्घट त्या विषयवासनांना आवरून धरून शेवटीं - [illegible] निरर्थक [illegible] [illegible] [illegible]
आणि, - पाण्यांत बुडणाऱ्या मनुष्याच्या डोक्यावरील द्रव्याचें ओझेंही बुडते तशीच ह्याचीही स्थिति होते. - पुष्कळ दिवसपर्यंत मोठ्या कष्टानें घोर तप करून जी काही पुण्या-
ची गठडी माठवून ठेविली असेल तीही ते - क्रोधाच्या भरात एखाद्याला शाप वगैरे देण्यासाठी फुकट वाटून टाकतात' - ना [illegible] ना [illegible] अशी त्याची [illegible]
[illegible] (अपरंपार समुद्रास) विलंघ्य (ओलांडून) गो• (गाईच्या) पदे (पावलांत) मज्जन्ति (बुडतात), [यत] विफलस्य (निष्फळ) क्रोधस्य वशं ([illegible]) याति (जातात)
दुश्चरतप• (कठीण केलेलें तप) मुधा (फुकट) उत्सृजति (सोडितात) च ! " ॥ ११ ॥ विभु• इति प्रगृणता (बोलणाऱ्या) तेषां, शुश्रूषा (सेवा करणाऱ्या [illegible] [illegible] [illegible]

इति प्रगृणतां तेषां स्त्रियो ऽत्यद्भुतदर्शनाः ॥ दर्शयामास शुश्रूषां स्वर्चिताः कुर्वतीर्विभुः ॥ १२ ॥

ते देवानुचरा दृष्ट्वा स्त्रियः श्रीरिव रूपिणीः ॥ गंधेन मुमुहुस्तासां रूपौदार्यहतश्रियः ॥ १३ ॥

दिलेल्या) अत्यद्भुतदर्शनाः स्त्रियः दर्शयामास. ॥ १२ ॥ ते देवानुचराः (देवांचे सेवक) रूपिणीः (मूर्तिमंत) श्री इव स्त्रियः दृष्ट्वा (पाहून) तासां रूपौदार्यहतश्रियः ([illegible]
उत्कृष्टपणानें उतरली कांति ज्यांची असे) [संतः] गंधेन मुमुहुः (वेडे झाले). ॥ १३ ॥

हानि होते! - " ॥ ११ ॥ कामादि देव अशी प्रार्थना करीत असता, महासमर्थ नारायणानें योगसामर्थ्यानें - अलौकिक सौंदर्यसंपन्न स्त्रिया निर्माण करून त्या जाणी- ना-
[illegible]) सेवा चालवीत आहेत, असें त्यांना दाखविलें, त्या स्त्रियांच्या अंगावर उत्तम अलंकार घातलेले होते - असें करण्यांत नारायणाचा उद्देश हा होता, की, मदन
अप्सरा इत्यादिकांना स्वतःच्या सौंदर्याबद्दल जो गर्व असेल त्याचा परिहार व्हावा व त्यांच्या अंतःकरणांत [illegible] स्त्रिया केवळ [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]
त्याची तपश्चर्या भंगण्याच्या कामीं कोणाच्याही यत्न सिद्धीस नाहीं हें कळावें असें - [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]
अनुचरगण त्याच्या शरीराच्या सुगंधानें मोहून गेले व त्या स्त्रियांच्या रूपाची उत्कृष्टता पाहून मदनादिकांच्या कांति म्लान [illegible] [illegible]

1 'रूपिणीः' असा [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]

मोठमोठ्या (ब्रह्मादि) देवांचे अधिपति जे नारायण, त्यानीं, नम्र होऊन अग्रभागीं उभे असलेल्या त्या कामादि देवांना, हासत हासत म्हणाले — ' ह्या स्त्रियांपैकीं एक तुह्मी घेऊन चला. स्वरूपानें आपल्या बरोबरीची निवडून काढा - ह्मणजे झालें मग ' कोठें आह्मी क्षुद्र लोक व कोठें ह्यांचें असाधारण सौंदर्य असें मनांत घेऊन वैषम्य वाटण्याचें अथवा अवमान होण्याचें कारण राहणार नाहीं आता कदाचित् रूपानें तुमच्या बरोबरीची अशी ह्यांत एकही तुह्माला आढळत नसेल ('सगळ्याच आपल्यापेक्षा अधिक सुंदर आहेत ' असें वाटत असेल) तरी पण - स्वर्गाला भूषण ह्मणून - ह्यांपैकीं एक न्याच. - " ॥ १४ ॥ देवाच्या त्या सेवकांनी ' बरें ह्मणून ती आज्ञा स्वीकारिली सुरबंदिन देवदेवेशः प्रहसन् (हासणारा) इव प्रणतान् तान् आह—" आसां (ह्यांपैकीं) एकतमां (कोणती तरी एक) सवर्णां (अनुरूप) स्वर्गभूषणां वृङ्ध्वं (न्या) " ॥ १४ । सुरबंदिन (देवाचे सेवक) " ओं " (ठीक) इति आदेशं (आज्ञा) आदाय (घेऊन) व नत्वा (वंदून) अप्सरःश्रेष्ठां उर्वशीं पुरस्कृत्य (पुढें घालून) दिवं (स्वर्गास) ययु. (गेले), ॥ १५ ॥

तानाह देवदेवेशः प्रणतान्प्रहसन्निव ॥ आसामेकतमां वृङ्ध्वं सवर्णां स्वर्गभूषणाम् ॥ १४ ॥

ओमित्यादेशमादाय नत्वा तं सुरबंदिनः ॥ उर्वशीमप्सरःश्रेष्ठां पुरस्कृत्य दिवं ययुः ॥ १५ ॥

इंद्रायाऽऽनम्य सदसि शृण्वतां त्रिदिवौकसाम् ॥ ऊचुर्नारायणबलं शक्रस्तत्रास विस्मितः ॥१६॥

हंसस्वरूप्यवददच्युत आत्मयोगं दत्तः कुमार ऋषभो भगवान्पिता नः ॥ विष्णुः शिवाय

जगतां कलया ऽवतीर्णस्तेनाऽऽहृता मधुभिदा श्रुतयो हयास्ये ॥ १७ ॥

इंद्राय आनम्य (वंदून) सदसि (सभेंत) त्रिदिवौकसां (स्वर्गी राहणारे देव) शृण्वतां [सतां], नारायणबलं ऊचु.. शक्र. तत्र विस्मित (आश्चर्यचकित) आस ॥ १६ ॥ जगतां शिवाय (कल्याणासाठीं) कलया अवतीर्ण. अच्युत. विष्णु हंसस्वरूपी, दत्त, कुमार., नः पिता भगवान् ऋषभ. [च सन्] आत्मयोग अवदत् (सांगता झाला) तेन

आणि नारायणाला नमस्कार करून व श्रेष्ठ अप्सरा जी उर्वशी तिला अग्रभागीं चालवून (निवडून बरोबर घेऊन) स्वर्गलोकास प्रयाण केलें ॥ १५ ॥ - तेथें पोहोंचल्यावर - त्यानी, सभेमध्यें इंद्राला वंदन करून, सकल देव ऐकत असता, नारायणाचा प्रभाव निवेदन केला. तेव्हा इंद्राला भय पडलें व आश्चर्य वाटलें असो ॥ १६ ॥ तो स्वस्वरूपापासून कधींही च्युत न होणारा विष्णु जगाच्या कल्याणासाठी अंशानें हंसस्वरूप धरून अवतरला तसेच त्यानें दत्तात्रेय, सनत्कुमार व आमचा (नारायणाचा) पिता

---

१ सुरवंदिनः—देवयशोविवर्धनाः देवाची कीर्ति वाढविणारे. बालप्रबोधिनी. २ किंवा, ' तत्र शक्रः विस्मित आस ' असा अन्वय लावून ' तेथें इंद्र त्यांना भेट घालून बसला ' असा अर्थ करावा. ३ नाथ ह्मणतात.— ' इंद्रें देखोनि उर्वशी । तिसी भुलला अहर्निशीं । बाहेर यावें सभेसी । हें वर्षानुवर्षी ना वाटे ' ॥ १९८ ॥.

भगवान् ऋषभदेव हे अवतार घरिले, आणि त्या हंसादि प्रत्येक अवतारामध्यें - अधिकारिजनांना - आत्मयोगाचा उपदेश केला. त्याच परमेश्वरानें हयग्रीवरूपानें मधुदैत्याचा वध करून वेद परत आणिले. ॥ १७ ॥ त्यानेच मत्स्यावतारात वैवस्वत मनूचें, पृथ्वीचें आणि औषधींचें रक्षण केलें. वराहावतारात पृथ्वीचा उद्धार करतांना दैत्याचा वध केला; कूर्मावतारी अमृत वर काढितेवेळीं आपल्या पाठीवर पर्वत धरिला, आणि गजेंद्र दुःखाकुल होऊन शरण आला असता - इंद्रियजनक अनाथ ... त्याला नक्राच्या मुखांतून सोडविलें. ॥ १८ ॥ वालखिल्यऋषि - कश्यपाला समिधा आणून देण्यासाठी वनात गेले होते, त्यांची शरीरं आंगठ्याएवढी ... अप्यये (प्रलयांत) मात्स्ये (मत्स्यावतारीं) मनुः ... (हयग्रीव अवतारीं) मधुभिदा (मधुदैत्याला मारणारा अशानें) [सता], श्रुतयः (वेद) आहृताः (आणिले) ॥ १७ ॥ अप्यये (प्रलयांत) मात्स्ये (मत्स्यावतारीं) मनुः इला (पृथ्वी), ओषधयः च [गुप्ताः]. क्रौडे (वराहावतारीं) अम्भसः (उदकांतून) क्ष्मा (भूमीला) उद्धरता (वर आणणारानें) दितिज हत. कौर्मे अमृतोन्मथने (क्षिप्त), इला (पृथ्वी), ओषधयः च [गुप्ताः]. क्रौडे (वराहावतारीं) अम्भसः (उदकांतून) क्ष्मा (भूमीला) उद्धरता (वर आणणारानें) दितिज हत. कौर्मे अमृतोन्म-

गुप्तो ऽप्यये मनुरिलौषधयश्च मात्स्ये क्रौडे हतो दितिज उद्धरताऽम्भसः क्ष्माम् ॥ कौर्मे धृतो ऽद्रिरमृतोन्मथने स्वपृष्ठे
ग्राहात्प्रपन्नमिभराजममुंचदार्तम् ॥ १८ ॥ संस्तुन्वतो ऽब्धिपतितान् श्रमणानृषींश्च शक्रं च वृत्रवधनस्तमसि प्रविष्टम् ।
देवस्त्रियो ऽसुरगृहे पिहिता अनाथा जघ्ने ऽसुरेंद्रमभयाय सतां नृसिंहे ॥ १९ ॥

थने (अमृत घुसळण्याचे वेळीं) अद्रिः (पर्वत) स्वपृष्ठे धृतः. प्रपन्नं आर्तं (पीडित) इभराजं (गजेंद्राला) ग्राहात् (नक्रापासून) अमुंचत् (सोडिता झाला) ॥ १८ ॥ संस्तुन्वतः ... अब्धिपतितान् (समुद्रात पडलेल्या) श्रमणान् (श्रम भोगणाऱ्या) ऋषीन्, वृत्रवधनः तमसि (ब्रह्महत्यारूप पापांत) प्रविष्टं शक्रं, असुरगृहे पिहिता (कोंडलेल्या) अनाथा ... असल्यामुळें, तेथें एका गाईच्या पावलांत पाणी साठलें होतें, त्यांत सगळेजण पडून गटंगळ्या खाऊं लागले. तें पाहून इंद्रानें त्यांची टवाळी केली - म्हणून ... तेव्हां वालखिल्यऋषींनी भगवंताचा धांवा केला, तत्क्षणीं भगवंतानीं त्या समुद्रांत (!) पडलेल्या ऋषींना बाहेर काढिलें. वृत्रासुराचा वध केला म्हणून इंद्र ब्रह्महत्येच्या ... पडला होता, भगवंतांनीं इंद्राला त्या संकटांतून सोडविलें. बिचाऱ्या देवांच्या स्त्रिया कोणी रक्षण करणारा नाहीं म्हणून वारंवार दैत्यांच्या घरीं बंदीत पडत. भगवंतांनीं अनंत अव-

* एकनाथांनीं ह्यावर ह्या ह्याच दोन कथा दिल्या आहेत. त्या अशा —
' मार्कंडेया एके वेळीं । बुडतां अकाळ प्रलयजळीं । तेणें स्मरणं वनमाळी । मारी तत्काळीं वटपत्रशायी ॥ शालग्राम पूजितां ऋषीश्वरीं ' ... पू ... की ... । ... स्वप्न ... । ते देखोनि ऋषीश्वरीं । शिळा न बुडोन तुझ्या करीं । ऐसा शाप ते अवसरीं । श्रीमंकरीं दीधला ... ... ऋषींचे ... तरतां देखिले ऋषीश्वरीं । कादाया रिघतां भीतरीं । लहरीकरीं निर्बुजले ॥ ते काळीं ऋषीश्वरीं । आर्तिहरण स्तविला हरी । अवतरोनि श्रीहरि । ऋषींचे ...
॥ २१९ ॥ २० ॥ २१ ॥ २२ ॥ २३ ॥

तारांमध्यें त्यांना तेथून मुक्त केलें. नृसिंह अवतारांत त्यांनीं, साधूंना (प्रल्हादादिकांना) अभय द्यावें एतदर्थ. दैत्यराजाचा (हिरण्यकशिपूचा) वध केला ॥ १९ ॥
प्रतिपन्नंतराम यें देवदैत्यांच्या युद्धांत त्यानी देवाच्या कार्यसिद्धीसाठीं विविध रूपें धरून मोठमोठे दैत्य मारिले व भुवनाचें रक्षण केलें. वामन (ठेंगणा) होऊन निक्षेच्या
मिषानें त्यानी बळीपासून पृथ्वी काढून घेतली व ती अदितीच्या पुत्रांना (देवांना) दिली ॥ २० ॥ तोच भगवान् हैहयकुलाच्या नाशासाठीं परशुरामरूप अग्नि अवतरला व त्यानें
पृथ्वी एकवीस वेळां निःक्षत्रिय करून सोडिली. पुढें तोच भगवान् दाशरथि राम झाला व त्यानें समुद्रावर सेतु बांधून लंकावासी दशवदनाचा (रावणाचा) नाश केला ज्याची कीर्ति
देवस्त्रियः च [मोचयामास]. सतां अभयाय नृसिंहे असुरेन्द्र अस्मे (मारिता झाला) ॥१९ देवासुरे युधि सुरार्थे दैत्यपतीन् हत्वा (मारून) अन्तरेषु (मन्वन्तरात) कला भि
भुवनानि अदयात् (रक्षिता झाला) अथ वामन. भूत्वा याच्ञाच्छलेन (भिक्षेच्या मिषानें) बलेः इमां (ही) क्ष्मां (पृथ्वी) अहरत्. [तां] अदितेः सुतेभ्य समदात् ॥ २० ॥
हैहयकुलाप्ययाय भार्गवाग्निः (भार्गवरूप अग्नि) रामः त्रिःसप्तकृत्वः (तीन गुणिले सात म्हणजे एकवीस वेळा) गां (पृथ्वी) निःक्षत्रियां (क्षत्रियरहित) अकृत. सः लोकमलघ्न

देवासुरे युधि च दैत्यपतीन्सुरार्थे हत्वाऽन्तरेषु भुवनान्यदधात्कलाभिः ॥ भूत्वाऽथ वामन इमामहरद्बलेः क्ष्मां

याच्ञाच्छलेन समदाददितेः सुतेभ्यः ॥२०॥ निःक्षत्रियामकृत गां त्रिःसप्तकृत्वो रामस्तु हैहयकुलाप्ययभार्गवाग्निः ॥

सो ऽब्धिं बबंध दशवक्त्रमहन्सलंकं सीतापतिर्जयति लोकमलघ्नकीर्तिः ॥२१॥ भूमेर्भरावतरणाय यदुष्वजन्मा जातः

करिष्यति सुरैरपि दुष्कराणि ॥ वादैर्विमोहयति यज्ञकृतोऽतदर्हान् शूद्रान्कलौ क्षितिभुजो न्यहनिष्यदन्ते ॥२२॥

कीर्तिः (लोकांचीं पापें नष्ट करणारी कीर्ति ज्याची, असा) सीतापतिः [सन्] अब्धिं (समुद्राला) बबंध, सलंकं दशवक्त्रं अहन् (मारिता झाला) [स अद्य] जयति. ॥ २१ ॥
अजन्मा (नाहीं जन्म ज्याला असा) [सः] भूमेः भरावतरणाय यदुषु जातः [सन्] सुरैः अपि दुष्कराणि [कर्माणि] करिष्यति. यज्ञकृतः अतदर्हान् वादैः विमोहयति
सकल लोकांचीं पापें निर्दळिते असा तो सीतापति सांप्रत उत्कर्ष पावत आहे (सध्या दाशरथिराम अयोध्येंत राज्य करीत आहे) ॥ २१ ॥ तोच जन्मरहित परमात्मा भूमी-
चा भार उतरण्यासाठी यदुकुलामध्यें अवतार घेईल (रामकृष्णरूपी होईल) व, देव नाहीं करावयास कठिण, अशीं एकेक चरित्रें करील त्याच तो बुद्धरूपी होऊन, जे कोणी
अधिकार नसतांना यज्ञानुष्ठान करण्यास प्रवृत्त होतील, त्या पुरुषांशी वाद घालून त्यांना मोहित (कुंठित) करील. नतर शेवटीं कलियुगामध्यें शूद्र राजे झाले असतां, भगवान्

१ अग्नीसारखा प्रखर तेजस्वी बाळक. २ आजकल हा निमित्तमयतेमुळे त्रेतायुगामध्यें झाला हे उघड दिसतें

कल्कि अवतार धरून, त्याचा संहार उडवील. ॥ २२ ॥ हे महापराक्रमी राजा, विपुलकीर्तिसंपन्न त्रैलोक्याधिपतीचीं चरित्रें व जन्में अनंत असून अशीं पुष्कळ प्रकारें वर्णिलीं आहेत; - त्यांतील थोडीं मीं तुला सांगितलीं - ॥ २३ ॥ ॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने एकादशस्कंधे चतुर्थो ऽध्यायः ॥ ४ ॥

राजा म्हणाला - मुनिवरहो, आपण आत्मज्ञानी पुरुषांत परम श्रेष्ठ आहां. महाराज, जगामध्ये बहुतेक लोक हरीला भजत नाहींत व इंद्रियें आकळलेलीं नसल्यामुळें त्यांच्या विषयेच्छा शमलेल्या नसतात. अशा लोकांना अंतीं कोणती गति मिळते? ॥ १ ॥ चमस मुनि सांगूं लागला – आदिपुरुषाच्या मुख, बाहु, मांड्या व चरण या अवयवापा-

कलौ अन्ते: क्षितिभुजः शूद्रान् न्यहनिष्यत् (मारील). ॥ २२ ॥ महाभुज, भूरियशसः जगत्पतेः एवंविधानि भूरीणि (बहुत) जन्मानि कर्माणि च वर्णितानि " ॥ २३ ॥

इति श्रीमद्भागवतान्वये एकादशस्कंधे चतुर्थोऽध्याय ॥ ४ ॥

एवंविधानि कर्माणि जन्मानि च जगत्पतेः ॥ भूरीणि भूरियशसो वर्णितानि महाभुज ॥ २३ ॥
इति श्रीभा० महा० एकादशस्कंधे चतुर्थो ऽध्यायः ॥ ४ ॥ राजोवाच । भगवंतं हरिं प्रायो न
भजंत्यात्मवित्तमाः ॥ तेषामशांतकामानां का निष्ठा ऽविजितात्मनाम् ॥ १ ॥ चमस उवाच ।
मुखबाहूरुपादेभ्यः पुरुषस्याश्रमैः सह ॥ चत्वारो जज्ञिरे वर्णा गुणैर्विप्रादयः पृथक् ॥ २ ॥

राजा उवाच— " आत्मवित्तमाः (आत्मज्ञानी पुरुषामध्यें श्रेष्ठ अशा मुनींनो), [ये] प्रायः हरिं न भजंति. अविजितात्मना (नाहीं जिंकिलें मन ज्यांनीं अशा) अशांतानां तेषां का निष्ठा (परिणाम)? " ॥ १ ॥ चमसः उवाच— " पुरुषस्य मुखबाहूरुपादेभ्यः गुणैः, आश्रमैः सह विप्रादयः चत्वारः वर्णा पृथक् जज्ञिरे (जन्मले) ॥ २ ॥

सून सत्त्वादि गुणांच्या योगें ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ व सन्यास ह्या चार आश्रमांसह अनुक्रमें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र असे चार वेगवेगळे वर्ण उत्पन्न झाले (मुखापासून सत्त्वगुणाच्या योगें ब्राह्मण जन्मला, बाहूपासून सत्त्व व रज ह्या उभय गुणाच्या योगें क्षत्रिय उत्पन्न झाला, मांड्यापासून रज व तम ह्या दोन गुणाच्या मिश्रणानें वैश्य उद्भवला आणि पायापासून तमोगुणाच्या योगें शूद्र जन्म पावला). ॥ २ ॥

१ आश्रमोत्पत्तीचें प्रमाण म्हणून बालप्रबोधिनीकारानीं पुढील वचन दिलें आहे —

गृहाश्रमो जघनतो ब्रह्मचर्यं हृदो मम । वक्षस्थलाद्वने वासो न्यासः शीर्षणि च स्थित ॥

भगवान् म्हणतात 'गृहस्थाश्रम माझ्या कटिपुरोभागापासून झाला, ब्रह्मचर्य हृदयापासून उद्भव पावलें, वानप्रस्थाश्रम वक्षस्थलापासून जन्मला व सन्यास तर माझ्या मस्तकी राहिलेला आहे '

म्हणून, ह्या वर्णांपैकी जे कोणी पुरुष, साक्षात् आपला जनक जो सर्वशक्ति आदि पुरुष, त्याला अज्ञानामुळे भजत नाहीत किंवा समजत असूनही बुद्धिपुरःसर अवमानितात, ते वर्णाश्रमस्थानापासून भ्रष्ट होऊन अधोगतीस जातात. ॥३॥ आता स्त्रिया, शूद्र इत्यादि मनुष्यें ह्मटली ह्मणजे. त्याना हरिकथा ऐकायाला मिळायाच्या नाहीत की हरिकीर्तनाची कधीं गाठ पडायाची नाहीं, अशी असतात. अशा मनुष्याची तुमसारिख्या अधिकाऱ्यांनीं कींव करणे योग्य होय * (अशा अज्ञानी लोकावर तुमच्यासारख्यानी अनुग्रह करीत असावें, त्याना एषां ये साक्षात् आत्मप्रभवं ईश्वरं पुरुषं न भजन्ति, अवजानंति (अवमानितात) [च, ते] स्थानात् भ्रष्टाः [सन्त] अधः पतंति ॥३॥ केचित् दूरेहरिकथाः (दूर हरिकथा ज्याना असे), दूरेअच्युतकीर्तनाः (दूर अच्युताचें कीर्तन ज्याना असे) च ते. स्त्रियः शूद्रादयः च भवादृशां (तुजसारिख्यांना) अनुकंप्याः (कृपेचे विषय). ॥ ४ ॥ विप्र, राजन्यवैश्यौ च श्रौतेन

य एषां पुरुषं साक्षादात्मप्रभवमीश्वरम् ॥ न भजंत्यवजानंति स्थानाद्भ्रष्टाः पतंत्यधः ॥ ३ ॥

दूरेहरिकथाः केचिद्दूरे चाच्युतकीर्तनाः ॥ स्त्रियः शूद्रादयश्चैव ते ऽनुकम्प्या भवादृशाम् ॥ ४ ॥

विप्रो राजन्यवैश्यौ च हरेः प्राप्ताः पदांतिकम् ॥ श्रौतेन जन्मना ऽथापि मुह्यंत्याम्नायवादिनः ॥५॥

कर्मण्यकोविदाः स्तब्धा मूर्खाः पंडितमानिनः ॥ वदंति चाटुकान्मूढा यया माध्व्या गिरोत्सुकाः ॥६॥

(वैदिक उपनयनरूप) जन्मना हरेः पदांतिकं (चरणसंनिध) प्राप्ताः, अथ अपि मुह्यंति. [यतः] आम्नायवादिनः (वेदांतील अर्थवाद मोहविणारे ज्याना असे) ॥ ५ ॥ कर्मणि अकोविदाः (निष्णात नव्हत असे) मूर्खाः पंडितमानिनः स्तब्धाः (अभिमानी, ताठेखोर) यया माध्व्या (मोहक) गिरा (वाणीनें) उत्सुकाः [सन्तः] मूढाः, [तथा] चाटुकान् युक्तिप्रयुक्तीनीं शिक्षण देऊन सन्मार्गाला लावावें). ॥ ४ ॥ बरें आता ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य - ह्याजबद्दल विचार करू - हे लोक श्रौत जन्मानें (उपनयनानें) भगवताच्या चरणासंनिध प्राप्त झालेले असतात (उपनयनसंस्कार झाल्यावर वेदशास्त्रादिकाचें अध्ययन करून भगवद्भजनाचे योग्य अधिकारी होऊन राहिलेले असतात), तथापि वेदांतील अर्थवादवचनें त्यांना मोह घालायला तयार होतात आणि त्यामुळें ते वेडे (फलावर आसक्त) होऊन जातात ॥ ५ ॥ त्याना कर्माचे मर्म कळत नाहीं (कर्में कशीं केली

---

१ ' शेळी उसाची चवी गाढी । नेणोनि पाचोळा करडी । तैसी नेणोनि हरिभक्तीची गोडी । अज्ञानें बापुडीं विषयलुब्ध ' एकनाथ, ५६

* एक पित्याचे दोघे अर्भक । एक प्रबुद्ध एक बाळक । पित्यानें अवमानिता देख । ताडी जनक प्रबुद्धासी ॥
बाळक पित्याचे माथा चढे । उरीं लाता हाणे तयाकडे । तरी त्यासि दोष न घडे । दोषाचें सांकडें सज्ञानासी ' ॥ नाथ, ॥ ६४ ॥ ६५

२ कर्मांची व कर्मफलाची अवास्तव स्तुति करणारीं वाक्यें (हीं पुढील श्लोकाच्या टिपेंत पहा) या वचनाचा खरा उद्देश चित्तशुद्धीसाठीं मनुष्यानें कर्म करण्यास प्रवृत्त व्हावें एवढाच असतो.

३ ह्याच अर्थाचें गीतावचन.— यामिमां पुष्पितां वाचं प्रवदंत्यविपश्चितः । वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीतिवादिनः ॥ (पुढें चालू).

असता बाधक होणार नाहींत तें समजत नाहीं). - बरें पंडितांना विचारून समजून घ्यावें तर तसें ते करीत नाहींत, कारण, - आणि नाठा फार (नम्रतेचा गंध नाहीं), व अंतर्रीं
मूर्खपणा वसत असताही त्यांना ' आम्हीच कायते पंडित ' असा गर्व वाटत असतो. म्हणून ते मूढ लोक वेदांतील ज्या कर्मांमुळे केवळ फळ मिळविण्याविषयीं उत्कंठा
(गड बोट वाता) वदन्ति. ॥६॥ रजसा घोरसंकल्पाः (भयंकर संकल्प ज्यांचे असे) कामुकाः अहिमन्यवः (सर्पासारखा क्रोध ज्यांना असे) दांभिकाः (दंभी) मानिनः पापाः अच्युत-

रजसा घोरसंकल्पाः कामुका अहिमन्यवः ॥ दांभिका मानिनः पापा विहसंत्यच्युतप्रियान् ॥ ७ ॥

प्रियान् (अच्युत भगवान् प्रिय ज्यांना किंवा अच्युताचे जे प्रिय त्या भक्तांना) विहसंति. ॥ ७ ॥
होऊन जातात, त्याच्याच आधारावर गोड गोड भाषणें ('आम्ही स्वर्गांत जाऊन अप्सरांबरोबर विहार करूं ' इत्यादि मनोराज्यें) बोलून दाखवीत असतात ॥ ६ ॥ - शिवाय,
कर्माभिमानामुळें त्यांचे काम, क्रोध, दंभ इत्यादि विकार वाढतच जातात. पहा - रजोगुणाच्या प्राबल्यामुळें उत्तरोत्तर विषयेच्छा बळावत जाऊन ते भयंकर (जारणमारणादि)

(मागील टीप पुढें चालू)

कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् । क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥ ४३ ॥
भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् । व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥ ४४ ॥ गी० २

अर्थ :— हे पार्था, वेदांतील अर्थवादाचे ठिकाणीं रममाण झालेले, कर्म व त्यांचीं फळें यावांचून अन्य असें तत्त्व व त्याचें फळ मोक्ष काहींच नाहीं असें म्हणणारे, कामनारूपच झालेले व स्वर्गसुखच पर-
मपुरुषार्थ आहे असें मानणारे, असे मूढ लोक भोग आणि ऐश्वर्य यांची प्राप्ति करून देण्याविषयीं साधनभूत अशीं कर्मे पुष्कळ जींत सांगितलीं आहेत अशी व अर्थवादवाक्यरूप, पुष्पित, सुशोभित दिसणारी
अशी वाणी बोलतात तिनें ज्यांचें चित्त आपणाकडे ओढून घेतलें आहे, व जे भोग आणि ऐश्वर्य यांचे ठिकाणीं आसक्त झाले आहेत अशांच्या अन्तःकरणांत व्यवसायात्मक बुद्धि उत्पन्न होत नाहीं
— तत्त्वप्रकाश

१ ' अपाम सोममसृता अभूम (आम्ही सोम पिऊन अमर झालों). ' ' अक्षय्यं ह वै चातुर्मास्ययाजिनः सुकृतं भवति ' चातुर्मास्य याग करणाऱ्याचें अक्षय्य पुण्य प्राप्त होतें
' यत्र नोष्णं न शीतं स्यान्न ग्लानिर्नाप्यरातयः (तेथें उष्ण नसतें, शीत नसतें, ग्लानि नसते व शत्रूही असत नाहींत).
२ त्याच्या कथा नाथांनीं वर्णिल्या आहेत.—
' येथें सोमाचे भोग चोखड । आणि पुढें स्वर्गभोग जोडे । येणें वचनें बापुडे । यागाकडे धाव घेती ॥ करी सर्वस्वें नागवा । परी आचार्यत्व आह्मा येवो । ऐशी यांची
बुद्धि पहा हो । बागमरोहो आरंभिला ' ॥ ८७ ॥ ८८ ॥

कर्में करण्याचे संकल्प करूं लागतातः व - जरा कोठें काहीं न्यून पडले की - सर्पाप्रमाणें चवताळतात. तशा पुरुषाच्या आर्गी ढोंग व अभिमान ह्यांचा वसति निश्चित असावयाचा
चीच आणि तेच पापी लोक भगवताच्या प्रिय भक्ताचा उपहास करावयाचे. ॥ ७ ॥ - त्याच्या विषयेच्छा किती प्रबळ असतात तें सांगतात : - ते लोक स्त्रियांच्या पंक्तमध्यें
नेहमी तत्पर असतात, - वृद्ध जनाची कधींही शुश्रूषा करावयाचे नाहींत. - बरें त्याचे परस्परात सवड काय चालायाचे? तर ज्यामध्ये स्त्रीपुरुषसंगतिसुख हेंच मुख्य मानिलें जातें,
- आद्य कर्तव्य जी अतिथिसेवा, तिकडे लक्ष्यही दिलें जात नाहीं, - त्या गृहामधील 'आज अमुक मिळविलें उद्या अमुक संपादायाचें' इत्यादि मनोराज्यांची चर्चा - त्याच्या हिंसा-
उपासितस्त्रियः (सेवा चालविली स्त्रियाची ज्यानीं असे) ते अन्योन्यं मैथुन्यसुखेषु गृहेषु आशिषः (मनोराज्यें) वदंति, असृष्टान्नविधानदक्षिणं (नाहीं निर्माण अन्न विधि व दक्षिणा
वदंति ते ऽन्योन्यमुपासितस्त्रियो गृहेषु मैथुन्यपरेषु चाशिषः ॥ यजंत्यसृष्टान्नविधानदक्षिणं वृत्त्यै परं घ्नंति पशूनतद्विदः ॥ ८ ॥ श्रिया
विभूत्या ऽभिजनेन विद्यया त्यागेन रूपेण बलेन कर्मणा ॥ जातस्मयेनांधधियः सहेश्वरान् सतो ऽवमन्यंति हरिप्रियान्खलाः ॥ ९ ॥
ही ज्यात अशा रीतीनें) यजंति. अतद्विदः (हिंसेचे दोष न जाणणारे) परं (केवळ) वृत्त्यै (निर्वाहासाठीं) पशून् घ्नंति (मारितात) ॥ ८ ॥ श्रिया, विभूत्या, अभिजनेन (उत्तम कुळानें)
चेंही दिग्दर्शन करितों. ते लोक 'आम्ही अमुक अमुक यज्ञ केले' अशी प्रौढि मिरविण्यासाठीं - यज्ञ करितात - बोलून चालून तीं अनुष्ठाने लौकिकाकरितां आणि उपजीविका
चालण्यासाठीं केलेलीं; - त्यामध्यें अन्नशांति. प्रयोगविधि, दक्षिणा ह्याचा अभाव असावयाचाच यज्ञाचें निमित्त करून ते लोक केवळ पोट भरण्यासाठीं पशु मारितात पशुहिंसे
पासून दोष किती आहे तें समजून घेतो कोण? ॥ ८ ॥ शिवाय, धनादि संपत्ति, ऐश्वर्य, उत्तम कुळात जन्म, विद्या, दान, रूप, बल, कर्म, ह्यांच्या अनुकूलतेमुळें गर्व उद्भवून

१ 'जंव जंव पिकिजे कोरिफळें । तंव तंव कडूपण गाढें । तैसा कामनाशापुढें । वाढे क्रोध अत्युत्र ॥ क्रोध काळिया नाग खरा । देत द्वेषाचा फुकारा । घालो दृव्यते-
च्या आकारा । घुधुकारा साधु निंदेच्या ' ॥ नाथ, ९९–१०० २ ह्याचें गीतेमध्ये सुंदर वर्णन केलें आहे. तें असें —
'इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् । इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् । असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि ।' इत्यादि
अर्थ :— 'आज मी हें मिळविलें, आता मला अमुक मनोरथ प्राप्त होईल, हे तर सजजवळ आहेच; आणि हेंही द्रव्य माझें होईलच, हा शत्रु मीं मारिला, असेच दुसरेही मारीन ' इत्यादि
३ 'आशिषः ' म्हणजे ' आशीर्वाद ' असा अर्थ धरून बालप्रबोधिनीकारानीं ' तुम्हाला धनधान्य स्त्री पुत्र इत्यादि संपत्ति प्राप्त होवोत, असे परस्परास आशीर्वाद देत असतात ' असा अर्थ दाविला आहे
४ त्यांच्या मताचा अनुवाद नाथानीं विस्तृतपणें केला आहे : त्यातील थोडा भाग येथें उतरितों — ' मनुष्यजन्मीं हेंचि सुखी । नानाभोगविधीं भोगाव्या स्त्रिया ॥ जें स्त्रीभोगीं
सदा सुख । ते त्यागिती ते अतिमूर्ख । वैराग्यमिसें लोक । ठकिले देख महामूर्खी ॥ काय गृहाश्रमीं देव नसे । मग वना धावताती पिसे । त्याचचि देव वनीं वसे । तरी
काय मृग ससे न तरती ॥ ......जे जगामाजीं केवळ पिसीं । ते स्वयें होती सन्यासी । देवें दडोनि तयासी ' लाविलें भिकेसी दारोदार ' ॥ १२।१३।१४।१५।२१ न थ. १५६.
५ ' जैसें विंचवा विष थोडें । परी प्रबळ वेदनेसी चढे । तेवीं विद्या थोडी परी गाढें । गर्वाचें फुडें अतिभरितें ' ॥ ६०

त्याच्या बुद्धि अंध (विचारशून्य) होतात आणि मग ते दुष्ट लोक परमेश्वराचा व परमेश्वराचे प्रिय अशा सत्पुरुषाचा अवमान करूं लागतात ॥ ९ ॥ - वेदवचनाचा अर्थ उघड उघड असतो तरी लोकांना कळत नाहीं : पहा - जसें आकाश वस्तुमात्राला आतून बाहेरून व्यापून राहिलें आहे तसाच परमात्मा सकल प्राण्यामध्यें अन्तर्यामी व ईश्वर-रूपानें नित्य वसत असतो; तोच सर्वांनीं मिळविण्याजोगा प्रिय पुरुषार्थ होय, वेद आत्म्याचें असें उघडपणें वर्णन करीत आहेत पण ते विषयलंपट दुष्ट लोक तिकडे कानच देत नाहींत कारण त्याचे एकंदर वाद व विचार विषयसुख संपादण्यासाठीं व्यवहार कसकसे करावे ह्याविषयीं चाललेले असतात (वेद जरी वस्तुत निवृत्तिपर आहेत तरी त्याचा अर्थ ते

विद्यया, त्यागेन (दानानें), रूपेण, बलेन, कर्मणा [च] जातस्मयेन (झालेल्या गर्वानें) अन्धधियः (अंध बुद्धि ज्याच्या असे) खलाः सदीश्वरान सतः हरिप्रियान अवमन्यन्ते (अवमानितात) ॥ ९ ॥ यथा खं (आकाश), [तथा] शश्वत् (नित्य) सर्वेषु तनुभृत्सु (प्राण्यामध्यें) अवस्थितं आत्मानं अभीष्टं (प्रिय) वेदोपगीतं ईश्वरं अबुधाः न—शृण्वते (ऐकत नाहींत); [यतः] मनोरथानां वार्तया प्रवदन्ति. ॥ १० ॥ लोके जतो: (प्राण्यास) व्यवायामिषमद्यसेवा. (मैथुन, मांससेवन, आणि मद्यप्राशन) नित्या ([illegible]

> सर्वेषु शश्वत्तनुभृत्स्ववस्थितं यथा खमात्मानमभीष्टमीश्वरम् ॥ वेदोपगीतं च न शृण्वतेऽबुधा मनोरथानां प्रवदन्ति वार्तया ॥ १० ॥
> लोके व्यवायामिषमद्यसेवा नित्यास्तु जंतोर्न हि तत्र चोदना ॥ व्यवस्थितिस्तेषु विवाहयज्ञसुराग्रहैरासु निवृत्तिरिष्टा ॥ ११ ॥

तत्र (त्याविषयीं) चोदना (विधि) न. तेषु (त्यांविषयीं) विवाहयज्ञसुराग्रहैः (विवाह, यज्ञ आणि सौत्रामणियाग यांनीं) व्यवस्थिति (व्यवस्था) आसु ([illegible]
निवृत्तिः (त्याग) इष्टा (अपेक्षित) ॥ ११ ॥

लोक विषयसुख मिळविण्याचें साधन जें कर्मकांड त्याकडे लावितात) ॥ १० ॥ - ह्यावर कोणी शंका घेईल कीं ' ऋतुकालीं स्त्रीसंभोग, हवन करून उरलेल्या मांसाचें भक्षण, व सौत्रामणियागामध्यें मद्यपान करण्याचे शास्त्रांत विधि आहेत, इतकेंच नव्हे तर स्त्रीसंभोग न केला असता दोष सांगितले आहेत असें असतां, तुम्ही त्याची निंदा कशी करितां ? ' तर त्यास उत्तरः लोकामध्यें स्त्रीसंभोग, मांसभक्षण व मद्यपान करण्याकडे प्राण्याची प्रवृत्ति नेहमीं स्वभावतः असते म्हणून वेद ते करण्याबद्दल मुद्दाम आज्ञा

---

१ ' ऋतौ भार्यामुपेयात् (ऋतुकाळीं स्त्रीशीं गमन करावें) ', ' हुतशेषं भक्षयेत् (ज्योतिष्टोमादि यज्ञांत पशूच्या मांसाचा होम करून उरलेलें मांस खावें), सौत्रामण्यां सुराग्रहान् गृह्णाति (सौत्रामणि इष्टीमध्यें मद्यपात्रें ग्रहण करावीं म्ह० हवन करून उरलेलें मद्य प्यावें) '

२ ' ऋतुस्नातां तु यो भार्यां सन्निधौ नोपगच्छति । घोरायां भ्रूणहत्यायां पच्यते नात्र संशयः ॥
(जो पुरुष सन्निध राहत असतां ऋतुस्नात भार्येशीं गमन करणार नाहीं, तो भयंकर भ्रूणहत्येमध्यें पचत पडतो, यांत संशय नाहीं) '

करीत आहे असें नाहीं, तर प्राण्याची तिकडे जी ओढ लागलेली असते, तिला आळा घालण्यासाठी वेदानीं विवाह, यज्ञ व सौत्रामणि याग करावयाचा नियम घालून त्यांची करण्याची मर्यादा बांधून दिली आहे (बाबा, स्त्रीसंभोग पाहिजेच तर विवाहित स्त्रीशीच ऋतुकाळीच निषिद्ध दिन वर्जूनच एक वेळच रात्रीच पुत्रप्राप्तीसाठीच—सुखाकरिता नव्हे—गमन करीत जा, मांस खाणारच तर यज्ञ करून होमशेष पुरोडाशच भक्षीत जा, मद्य पिऊं नकोच पण पाहिजे तर सौत्रामणि याग करून त्यांतीलच अवशेष मद्य केवळ हुंगीत जा असे नियम करून त्या द्वारानें अनुमोदन दिल्यासारखें केलें आहे). वस्तुतः त्या तीन्ही गोष्टींकडून प्राण्यानी निवृत्त व्हावें हेंच वेदास इष्ट होय

स्पष्टीकरण :— 'ऋतौ भार्यामुपेयात्', 'हुतशेषं भक्षयेत्' आणि 'सौत्रामण्यां सुराग्रहान् गृण्हाति' ह्या वचनाचा अर्थ कसा करावयाचा त्या वचनावरून. प्राण्यानी स्त्रीसंग, मांसभक्षण व सुरापान ह्यापासून निवृत्त व्हावें, असा अभिप्राय कसा निघतो. ह्याबद्दल श्रीधरानीं बराच विचार केला आहे, त्याचें काशीनाथोपाध्यायकृत त्याच्याच्या आधारें येथें विवेचन लिहितो :—

वेदादिकामध्यें मनुष्याला कर्तव्य कर्में सांगणारीं जीं वचनें असतात त्याचे अपूर्वविधि, नियमविधि आणि परिसंख्याविधि असे तीन प्रकार आहेत —

(१) विधिरत्यन्तमप्राप्तौ (२) नियमः पाक्षिके सति । (३) तत्र चान्यत्र च प्राप्तौ परिसंख्येति गीयते ॥

(१) जी गोष्ट अत्यंत अप्राप्त असेल (प्राण्याला अगदी माहित नसेल), ती सांगणें ह्याला 'अपूर्वविधि' ह्मणतात. उदाहरण—अहरहःसंध्यामुपासीत (प्रतिदिनीं संध्योपासना करावी). संध्यावंदन करणें ही गोष्ट प्राण्याला अगदी ठाऊक नसलेली ह्या वेदवचनानें सांगितली ह्मणून ह्या वचनाला अपूर्वविधि ह्मणावयाचें (२) जी गोष्ट एका

[1] 'वेदें न करितां प्रेरणा । विषयावरी सहज वासना । स्वभावें सकळ जनां । सदा जाण सर्वांसी ॥ मांससेवन मद्यपाना । मिथुनीभूत मैथुना । ये अर्थीं सर्व जनां । तीव्र वासना सर्वदा ॥ ब्राह्मण जातां रजकीपाशीं । तें नेव कडू न लगे त्यासी । रजक जातां ब्राह्मणीपाशीं । तिखट त्यासी ते न लगे ॥ मळती स्त्री मळता नर । मैथुनीं होय वर्णसंकर । तो चुकवावया प्रकार । विवाहनिर्धार नेमिला वेदें ॥ करितां वधूवरां पाणिग्रहण । साक्षी देत द्विज देव हुताशन । इतर स्त्रिया मातेसमान । स्वदारगमन नेमिलें वेदें ॥ दिवसा मैथुन नाहीं स्त्रियेसीं । रात्री त्यजूनि पूर्व प्रहरासी । मैथुन स्त्रियेपासीं । मध्यरात्रीसी नेमस्थ । प्रजार्थ स्त्रीसेवन । ऋतुकाळीं नेमस्थ ॥ ऋतुकाळीं ज्या स्त्रीगमन । ते पुरुष ब्रह्मचारी पूर्ण । वेद निवृत्तिपर जाण । त्यागरूपें आपण सांगतें नेमी ॥' एकनाथ, २०८ । ९ । २० । २१ । २६ । २८ । २९ । ३० मांसभक्षण व सुरापान तर कधींच करू नये असें वेदाचें अभिप्रेत होय; ह्मणूनच वेदानें यज्ञाचा खटाटोप लावून दिला आहे नाथ ह्मणतात — 'आवडी खावया मांसा । अथवा स्वर्गींचिया आशा । जे करिती पशुहिंसा । तयां पुरुषां अधःपतन ॥ जें कर्मीं मद्यपान घडे । तो स्वधर्म ह्मणता जीभ झडे । लोलुप ते भुलले बापुडे । वेद दिशाकडे ओढिती ॥ याग करितां सौत्रामणी । स्वयें न व्हावें मद्यपानी । तें यज्ञशेष अवघ्राणी । परी सर्वथा वदनीं घालू नये' २३३ । ३७ । ३८.

निष्काम यज्ञकर्मांत पशुहिंसा करण्याचें अगदीं कारण नाहीं असा नाथाचा कटाक्ष आहे. पुढें ह्याच अध्यायाच्या तेरावा श्लोकाचें विवरण पहा

पक्षीं प्राप्त असेल तीं निश्चयें करावयास सांगणाऱ्या वचनाला नियमविधि ह्मणतात. उदाहरण—व्रीहीनवहन्ति (व्रीहि कांडावेच). पुरोडाशादिकांसाठीं तांदूळ निपजले पाहिजेत पण ते तयार करण्याचीं—भाताचा कोंडा काढण्याचीं—साधनें लोकांमध्यें अनेकप्रकारचीं आहेत : दळणें, कांडणें, नखांनीं सोलणें ह्यांपैकीं काहीं केलें तरी भाताचे तांदूळ होतात. अर्थात कांडणें हा प्रकार पक्षीं प्राप्त झाला. ह्मणून वेदवचनानें ' कांडावेच ' असा नियम ठरविला ह्मणजे दळणें अथवा सोलणें केलें असतां त्यावेळीं कांडणें अप्राप्त होतें (जरूरीचें नव्हतें) तें ह्या वचनानें प्राप्त करून दिलें. ह्मणून ' व्रीहीनवहंति ' हें वचन नियमविधि झालें. आणि (३) जेथें दोहोंची प्राप्ति नित्य असेल त्यापैकीं एकाची निवृत्ति करण्यासाठीं जो विधि असतो त्याला परिसंख्याविधि ह्मणतात. उदाहरण—गृहमेधीय इष्टिप्रकरणांतील ' आज्यभागौ यजति ' हें वचन. ह्या वचनाला अपूर्वविधि ह्मणतां येत नाहीं; कारण, येथें आज्यभागांची अत्यंत अप्राप्ति नाहीं, तर ' प्रकृतिवद्विकृतिः कर्तव्या ' (ज्यांमध्यें सकल अंगें विस्तारानें सांगितलीं असतात, त्या प्रकृति होत. जसे दर्शपूर्णमास. ज्यांमध्यें सकल अंगें सांगितलीं नसतात, त्या विकृति. प्रकृतीप्रमाणें विकृति करावी ह्मणजे प्रकृतींत जीं अंगें सांगितलीं असतील तीं विकृतींत तशीं करावीं). ह्या अतिदेशवाक्यानें प्रकृतींतील आज्यभागांची येथें प्राप्ति आहेच. बरें, ह्या (आज्यभागौ यजति) वचनाला नियमविधिही ह्मणतां येत नाहीं; कारण, जी गोष्ट पक्षीं प्राप्त असेल तीबद्दल नियम करावयाचा असतो. प्रस्तुतस्थलीं आज्यभाग तर नित्य प्राप्त आहेत करितां ' आज्यभागौ यजति ' हें वचन परिसंख्याविधि समजावयाचें. ह्मणजे ' प्रकृतिवद्विकृतिः कर्तव्या ' ह्या अतिदेशवाक्यानें जसे आज्यभाग प्राप्त झाले त्याप्रमाणेंच प्रयाजादि अंगसमुदायही ह्या इष्टींमध्यें प्राप्त झाला; त्या प्रयाजादि अंगसमुदायाच्या निवृत्तीसाठीं ' आज्यभागौ यजति ' हें वचन समजावयाचें व ह्याचा अर्थ ' आज्यभागच तेवढे करावे अर्थात अतिदेशवचनानें दुसरें जें प्राप्त झालें तें, ह्मणजे प्रयाजादि अंगसमुदाय करूं नये.'

अशी ह्या तीन विधींची उपपत्ति आहे. आतां ह्या तीन विधींपैकीं प्रकृतस्थलीं ह्मणजे ' ऋतौ भार्यामुपेयात् ' ' हुतशेषं भक्षयेत् ' आणि ' सौत्रामण्यां सुराग्रहान् गृह्णाति ' ह्या वचनांमध्यें कोणता विधि समजावयाचा त्याबद्दल विचार करूं :—

ऋतुकालीं स्त्रीशीं गमन करणें, मांस खाणें व मद्य पिणें ह्या गोष्टी प्राण्याला अगदीं माहित नसलेल्या वेदानें नवीन करावयास सांगितल्या असा प्रकार नाहीं. कारण, त्याकडे प्राण्याच्या मनाची ओढ स्वतःसिद्ध असते; अर्थात वरील वचनें अपूर्वविधि ह्मणता येत नाहींत. बरें, ह्याच गोष्टी जर पक्षीं प्राप्त असत्या, ह्मणजे जसें भाताचे तांदूळ करण्याच्या कामीं दळणें, सोलणें ह्यांबरोबर कांडणें हाही मार्ग एका पक्षीं प्राप्त (अन्यपक्षीं अप्राप्त) होता तसा प्रकार येथें असता तर ह्या वचनांना नियमविधि ह्मणतां आलें असतें. पण तसाही भाग येथें नाहीं. तर ह्या गोष्टी प्राण्याला स्वभावतः मनाच्या ओढीनें नित्यप्राप्त आहेत. अर्थात हा नियमविधिही नव्हे.

आतां राहिला अन्यनिवृत्ति करणारा परिसंख्याविधि. तो येथें होतो कीं नाहीं पाहूं.

स्वतंत्र परिसंख्याविधि असा कोठेच अगीकारावयाचा नाहीं. ह्मणजे परिसंख्याविधि मानून चकचकीत शब्दानी अन्यनिवृत्ति (अमुक गोष्ट करू नये अशी) कोठेंच करावयाची नाहीं. कोठें अपूर्वविधिद्वारा परिसंख्या मानावी, कोठे नियमविधिद्वारा ती मानावी व प्रत्यक्ष शब्दानीं अन्यनिवृत्ति न करिता फलत ती होईल असा अर्थ करावा ह्मणजे झाले कारण, परिसंख्याविधि मानून प्रत्यक्ष शब्दानीं अन्यनिवृत्ति करूं गेलें असता तीन प्रकारचे दोष घडतात ते असे –

श्रुतार्थस्य परित्यागादश्रुतार्थस्य कल्पनात् । प्राप्तस्य बाधादित्येवं परिसंख्या त्रिदूषणा ॥

(१) स्पष्ट सांगितलेल्या अर्थाचा त्याग, (२) न सांगितलेल्या अर्थाची कल्पना (३) आणि प्राप्त गोष्टीचा बाध, अशीं परिसंख्याविधीला तीन दूषणे आहेत.

उदाहरण–' इत्यश्वाभिधानीमादत्ते ' हें वचन येथें स्वतंत्र परिसंख्याविधि मानिला असता तीन दोष कसे येतात ते पाहूं

यज्ञांत गाडयाला एका बाजूला घोडा आणि दुसऱ्या बाजूला गर्दभ जोडून त्यात सोमवल्ली भरून आणावयाची असते त्या प्रसंगी वरील वचन आहे त्याचा अर्थ शब्दश उघड दिसणारा ' हा मंत्र (इमामगृभ्णन् रशनामृतस्य हा) ह्मणून घोड्याचा लगाम धरावा,' असा आहे 'इत्यश्वाभिधानीमादत्ते' हें वचन परिसंख्याविधि मानिलें ह्मणजे त्याचा अर्थ अन्यनिवृत्तीसाठी ' गर्दभाची दोरी धरूं नये ' असा करावयाचा. अर्थात (१) शब्दश निघणारा अर्थ ' घोड्याची दोरी धरावी ' हा सोडून द्यावा लागतो (२) गर्दभाची दोरी धरूं नये' हा मूळ शब्दावरून न निघणारा अर्थ कल्पावा लागतो, आणि (३) इमामगृभ्णन् रशनामृतस्य ह्या मत्राचा अर्थ तर ' ज्याचें फल कधी टळत नाही त्या यज्ञातील पशूची दोरी (लगाम) धरिते झाले ' असा आहे, त्यावरून घोड्याची व गर्दभाची अशा दोन्ही दोऱ्या धरण्याकडे त्या मत्राची प्राप्ति आहे, असे असता, गर्दभाची दोरी धरण्याकडे प्राप्त झालेल्या मंत्राचा बाध मानणें भाग पडतें. अशीं तीन दूषणे येतात. ती दूषणें न यावीं ह्मासाठी ' इत्यश्वाभिधानीमादत्ते ' हा स्वतंत्र परिसंख्याविधि न मानिता अपूर्वविधिद्वारा परिसंख्याविधि समजावा. ह्मणजे मत्रार्थावरूनच अश्वरशना धरण्याकडे मंत्राची योजना सिद्ध असता उगाच अश्वाभिधानीमादत्ते हा अपूर्वविधि का सांगितला ' तर त्याचें कांहीं फळ असलें पाहिजे तें फळ ' गर्दभरशनेची निवृत्ति ' असें समजावें. तत्रवार्तिककारानी असेंच सांगितलें आहे .—

अप्राप्तविधिरेवायमतो मन्त्रस्य निश्चितः । परिसंख्या फलेनोक्ता न विशेषः पुनः श्रुत' ॥

शाब्दीं परिसंख्या मानिली असता तीन दोष येतात, ह्मणून 'अश्वाभिधानीमादत्ते' हें वचन मत्राचा अपूर्वविधिच ठरला. ' गर्दभरशनेची निवृत्ति ' ही परिसंख्या फलत सांगितली जाते. बरें, इमामगृभ्णन् रशनामृतस्य ह्या मंत्राच्या अर्थावरून सामान्यत घोड्याची व गर्दभाची दोन्ही रशना धरणें प्राप्त झालें, आणि मागाहून ' अश्वाभिधानीमादत्ते ' ह्यानें विशेष (संकोच–घोड्याचीच तेवढी घ्यावी असा) केला, असेंही मानण्याचें कारण नाहीं

हें अपूर्वविधिद्वारा परिसंख्याविधीचें उपपादन झालें. आता कोठें नियमविधिद्वारा परिसंख्याविधि असतो उदाहरण—

पंच पंचनखा भक्ष्या ब्रह्मक्षत्रेण राघव । शशकः शल्लकी गोधा खड्गी कूर्मश्च पंचमः ॥

ज्यांना पाच नखें असतात, असे शशकादि पाच जातीचे प्राणी भक्षण करावे.

हें वचन अपूर्वविधि म्हणता येत नाहीं, कारण मनुष्यांना मांसभक्षणाची आवड असल्यामुळें तें त्याना नित्य प्राप्तच आहे. बरें हा परिसंख्याविधि मानावा तर तीन दोष येतात. राहता राहिला नियमविधि; तो येथें मानावयाचा पण. पंचपंचनखभक्षण आवडीनें नित्यप्राप्त असल्यामुळें ह्या नियमाला पक्षी अप्राप्त अशाचें पूरण करणें हें फल मिळत नाहीं. करिता परिसंख्या (इतरनिवृत्ति) हें ह्याच फल मानितात व शशकादि पाच प्राण्यावाचून इतराचें—वानरादिकांचें—मांस भक्षूं नये असा करून अर्थ करितात. एकदरीत नियमविधिद्वारा परिसंख्याविधि मानून वरील वचनाचा अर्थ लावितात. ‘ पंच पंचनखा भक्ष्याः ’ ह्या विधीचा विषय तरी ह्या पाच प्राण्यांचें मांस अवश्य खावें असा नाहीं कारण तें न भक्षिलें तरी कोठें प्रायश्चित्त सांगितलें नाहीं. मात्र ह्या पाचाहून वेगळ्या प्राण्याचें मांस खाल्लें तर प्रायश्चित्त आहे. तशीच गोष्ट स्त्रीगमन मांसभक्षण व सुरापान करावयास सांगणाऱ्या वचनाची समजावी. म्हणजे मैथुन, मांसभक्षण व सुरापान हीं मनाच्या स्वाभाविक ओढीमुळें मनुष्याला नित्य प्राप्त आहेत करितां ‘ ऋतौ भार्यामुपेयात् ’ ‘ हुतशेषं भक्षयेत् ’ आणि ‘ सौत्रामण्यां सुराग्रहान् गृण्हाति ’ इत्यादि वचनेंही नियमविधिद्वारा परिसंख्याविधिरूप सांगितलेलीं आहेत ह्यावरून ऋतुकालींच भार्येशींच गमन करावें अर्थात इतर कालीं व परस्त्रीशीं गमन करूं नये. होमशेषच मांस खावें, इतर मांस भक्षूं नये, सौत्रामणीमध्येंच सुराग्रह घ्यावे, इतरत्र घेऊं नयेत भार्यागमन केलेंच पाहिजे, मांस भक्षिलेंच पाहिजे किंवा सुरा घ्यावीच पाहिजे, असा अर्थ नाहीं. कारण ती न केलीं तरी प्रायश्चित्त सांगितलेलें नाहीं मात्र, परस्त्रीगमन, यज्ञावाचून मांसभक्षण व सौत्रामणि केल्याशिवाय मद्यपान करितां कामा नये.

एकंदरीत, वेदानें स्त्रीसंगादि करण्यास अनुमोदन असें तीव्र नियम घालून तद्द्वारा दिलें आहे ह्यावरून तीं करण्यापासून प्राण्यांनीं निवृत्त व्हावें हाच वेदाचा इष्ट अर्थ [illegible] अशा रीतीनें श्रीधरीय टीकेचें व्याख्यान केल्यावर शेवटीं काशीनाथोपाध्यायांनीं प्रस्तुत श्लोकाचें आपल्या मनाला सरळ दिसणारें [illegible] दाखवून दिलें आहे तें असें —

मैथुनादि गोष्टी मनुष्याला आवडीमुळें प्राप्त असल्यामुळें त्या करावयास सांगणारीं वचनें अपूर्वविधि नव्हत, तसेंच त्याची पक्षी प्राप्ति नाहीं अर्थात त्या वचनांना नियमविधि [illegible] म्हणता येत नाहीं. बरें तीं परिसंख्याविधि मानावीं तर तीन दोष येतात व शिवाय अपूर्व आणि नियम हे विधि परिसंख्येचें द्वार होण्याचा संभव नाहीं. [illegible] परिसंख्याविधींची गोष्टच बोलावयास नको. करितां हीं वचनें उपसंहाररूप मानावीं. उपसंहार म्हणजे सामान्यतः जी गोष्ट प्राप्त झाली असेल तिचा विशेष [illegible] करणें उदाहरण— पुरोडाशं

चतुर्धा करोति ' ह्या वचनानें जेवढे ह्मणून पुरोडाश, त्या सर्वांचे सामान्यतः चार भाग करणें प्राप्त झालें असता ' आग्नेयं चतुर्धा करोति ' ह्या वचनानें ' अग्निदेवतेचा पुरो-
डाश तेवढा चारप्रकारें विभागावा ' असा संकोच केला. ह्यालाच उपसहार ह्मणतात अशाच रीतीनें सामान्यत आवडीमुळें सगळ्या पाचनखी प्राण्याचे मासभक्षण प्राप्त झालें
असता ' पंच पंचनखा भक्ष्याः ' ह्या वचनानें ' पाच जातीचे मात्र पचनख प्राणी भक्षावे ' असा संकोच केला तसाच सामान्यत कोणत्याही स्त्रीशीं कोणत्याही काळीं आव-
डीमुळें मैथुन प्राप्त झालें असता ' ऋतौ भार्यामुपेयात् ' ह्या वचनानें ' भार्येशीच आणि ऋतुकाळींच गमन करावें ' असा संकोच केला हाच प्रकार मासभक्षण व मद्यपान
ह्याविषयीं समजावा. एतावता मैथुनादिकाची प्राप्ति विधिवचनानें मुळींच नाहीं तर ती केवळ रागत (आवडीमुळें) झालेली आहे अर्थात विरागी पुरुषाना त्यापासून निवृत्तिच इष्ट
विप्रशापेन इदं कुलं च नष्टप्रायं अभूत्. ॥ २६ ॥ ततः यदि मन्यसे, [तर्हि] परमं स्वधाम विशस्व (प्रवेश कर) वैकुंठ, सलोकान् लोकपालान् किंकरान् नः
पाहि. " ॥ २७ ॥ श्रीभगवान् उवाच— " विबुधेश्वर, यत् आत्थ (म्हणतोस), एतत् मे अवधारितं (निश्चयिलें) वः अखिलं कार्यं कृतं. भूमेः भारः अवतारितः ॥ २८ ॥
राहिलेला नाही. बरें, हें यादवांचें कुलही ब्राह्मणाच्या शापामुळें बहुतेक नष्ट झाल्यासारखें आहे. ॥ २६ ॥ म्हणून - आमची आपणापाशीं एवढी प्रार्थना आहे कीं - आता,
इच्छेस येत असेल तर, आपण आपल्या परम निजधामीं प्रवेश करावा, आणि हे वैकुंठा (महाविष्णो), लोकांसहित आम्हा लोकपालांचें रक्षण चालवावें आम्ही आपले सेवक
आहों ' ॥ २७ ॥ श्रीभगवान् म्हणाले — हे देवेश्वरा, तूं जें बोललास, तसाच माझ्या मनाचाही निश्चय आहे (अथवा तूं जें बोललास तें मीं लक्ष्यपूर्वक ऐकिलें, असाही अर्थ

१ म्हणजे आमच्या लोकीं येऊन आम्ही केलेली पूजा ग्रहण करावी आणि त्यायोगें आम्हाला कृतार्थ करून स्वलोकीं जावें. बालप्रबोधिनी

२ ह्या श्लोकापुढें बालप्रबोधिनीमध्यें पुढील श्लोक आहे :—

शुक उवाच । संस्तुतो भगवानित्थं विबुधैः पद्मजादिभिः । प्रतिनंद्याह तान् राजन् मायामनुज ईश्वरः ॥

अर्थ :— शुकाचार्य म्हणाले :— राजा, ब्रह्मादिदेवांनीं भगवंताची अशी प्रार्थना केली तेव्हा मायेनें मनुष्यरूप धरणाऱ्या त्या ईश्वरानें त्यांना गौरवून उत्तर दिलें —

करावा). मी तुमचें समस्त कार्य सिद्धीस नेलें आणि भूमीचा भार उतरून टाकिला. ॥ २८ ॥ - आता, तुह्मीं ज्याचा नुकताच निर्देश केला, - तें यादवाचे कुल बळानें,
शौर्यानें आणि संपत्तीनें उच्छृंखळ होऊन गेलें असून सगळ्या लोकाना ग्रासून टाकू इच्छीत आहे. परंतु जशी वेळा (किनारा) महासागराला आडवून धरिते (पुढें सरू देत
नाहीं), त्याप्रमाणें मी ह्या कुळाला सर्वतोपरी आटोपून धरिलें आहे ॥ २९ ॥ जर मी मदोन्मत्त यादवाच्या विस्तीर्ण कुळाचा संहार न करिता येथून जाईन तर हें कुळ आपली
मर्यादा सोडून वागूं लागेल व कोणालाही आवरणार नाहीं आणि तेणेंकरून हा लोक लवकरच नाश पावेल ॥ ३० ॥ ह्मणून आप्रत मी ब्राह्मणाचा शाप या निमित्तानें यदुकु-
मे वीर्यशौर्यश्रिया उद्धतं (उच्छृंखळ), लोकं जिघृक्षत् (ग्रहण करू, ग्रासू, इच्छिणारें) तत् इदं यादवकुल वेलया महार्णव. इव रुद्ध. ॥ २९ ॥ यदि दृप्ताना यदूनां विपुल कुल
असंहृत्य (न आटोपून) गंतास्मि (जाईन), [तर्हि] उद्वेलेन अनेन कुलेन अयं लोक विनंक्ष्यति (नाश पावेल). ॥ ३० ॥ ब्रह्मन्, अनघ, इदानीं कुलस्य द्विजशापत. नाश

यद्यसंहृत्य दृप्तानां यदूनां विपुलं
तदिदं यादवकुलं वीर्यशौर्यश्रियोद्धतम् ॥ लोकं जिघृक्षद्रुद्धं मे वेलयेव महार्णवः ॥ २९ ॥ यास्यामि भवनं
कुलम् ॥ गंतास्म्यनेन लोकोऽयमुद्वेलेन विनंक्ष्यति ॥ ३० ॥ इदानीं नाश आरब्धः कुलस्य द्विजशापतः ॥ स्वधाम
ब्रह्मन्नेतदंते तवानघ ॥ ३१ ॥ श्रीशुक उवाच । इत्युक्तो लोकनाथेन स्वयंभूः प्रणिपत्य तम् ॥ सहदेवगणैर्देवः ॥ ३३ ॥
समपद्यत ॥ ३२ ॥ अथ तस्यां महोत्पातान् द्वारवत्यां समुत्थितान् ॥ विलोक्य भगवानाह यदुवृद्धान्समागतान्

आरब्धः. एतदंते [वैकुंठं यास्यन्] तव भवनं यास्यामि. " ॥ ३१ ॥ श्रीशुक उवाच— लोकनाथेन इति उक्त. स्वयंभू. देव. तं प्रणिपत्य देवगणै. सह स्वधाम
समपद्यत (चालला, गेला) ॥ ३२ ॥ अथ भगवान् तस्यां द्वारवत्यां समुत्थितान् महोत्पातान् विलोक्य समागतान् यदुवृद्धान् आह— ॥ ३३ ॥
ळाचा नाश आरंभिला आहे. हा कार्यभाग सिद्धीस नेला कीं, वा पुण्यपुरुषा ब्रह्मदेवा, मी - वैकुंठलोकीं जाताना - तुझ्या भुवनास (सत्यलोकास) येईन ॥ ३१ ॥ श्रीशुका-
चार्य ह्मणाले.— राजा, सकल लोकाचे अधिपति जे भगवान् कृष्ण, त्यानीं अशी आज्ञा दिली असता ब्रह्मदेव त्याना नमस्कार करून देवगणासहवर्तमान आपल्या लोकीं गेला
असो. ॥ ३२ ॥ पुढें, इकडे द्वारकेमध्यें एकामागून एक मोठमोठाले उत्पात (दुश्चिन्हें)* उद्भवू लागले, ते पाहून भगवान् श्रीकृष्णानीं एकत्र जमून बसलेल्या वृद्ध वृद्ध यादवाना

* हे उत्पात नाथानीं वर्णिले आहेत.—
गगनीं निघाले त्रिकेतु। धूमकेतु दंडकेतु। शिखेसहित शिखाकेतु। गगना आंतु उगवले॥ मध्यान्हीं जहाला आघात। दिवसा उल्कापात होत। भूतें नागवीं नाचत।
(पुढें चालू)

श्रीभगवानुवाच । एते वै सुमहोत्पाता व्युत्तिष्ठंतीह सर्वतः ॥ शापश्च नः कुलस्याऽऽसीद्ब्राह्मणेभ्यो दुरत्ययः ॥ ३४ ॥
न वस्तव्यमिहास्माभिर्जिजीविषुभिरार्यकाः ॥ प्रभासं सुमहत्पुण्यं यास्यामोऽद्यैव मा चिरम् ॥ ३५ ॥ यत्र स्नात्वा
दक्षशापाद्गृहीतो यक्ष्मणोडुराट् ॥ विमुक्तः किल्बिषात्सद्यो भेजे भूयः कलोदयम् ॥ ३६ ॥

श्रीभगवान् उवाच—" इह एते सुमहोत्पाताः सर्वतः उत्तिष्ठंति (उठतात), न. कुलस्य ब्राह्मणेभ्यः दुरत्यय. शापः च आसीत्. ॥ ३४ ॥ आर्यका (श्रेष्ठहो), जिजीविषुभिः (जगू इच्छिणाऱ्या) अस्माभिः इह न वस्तव्यं. सुमहत् पुण्यं प्रभासं अद्य एव यास्यामः मा चिरम् ॥ ३५ ॥ दक्षशापात् यक्ष्मणा (क्षयरोगानें) गृहीत. उडुराट् (चंद्र) यत्र स्नात्वा सद्य. किल्बिषात् (पापापासून) विमुक्तः [सन्] भूयः कलोदय भेजे. (पावला). ॥ ३६ ॥

सांगितलें :- ॥ ३३ ॥ श्रीभगवान् म्हणाले :- ' यादवहो! द्वारकेमध्यें जिकडे तिकडे हे मोठमोठाले उत्पात उत्पन्न होत आहेत शिवाय, आपल्या कुलाला ब्राह्मणाकडून अति दुर्धर (अपरिहार्य) शाप झाला आहे. ॥ ३४ ॥ तेव्हां आता, आर्यहो, ज्याअर्थी आपल्याला जगण्याची इच्छा आहे, त्या अर्थी आपण येथें राहू नये, - हे बरें म्हणून मी म्हणतों, - आपण आजच अत्यंत थोर व पुण्यदायक अशा प्रभास क्षेत्रास जाऊं. विलंब नको. ॥ ३५ ॥ - त्या क्षेत्राचें माहात्म्य किती मोठें आहे, ऐका - दक्षाच्या शापामुळे न-क्षत्रराज (चंद्र) क्षयरोगानें घेरला होता. पण त्या प्रभासक्षेत्रीं स्नान केल्याबरोबर तत्काल रोगदु:खाचा निराम होउन त्याला पुन्हा कलाची वृद्धि प्राप्त झाली ॥ ३६ ॥

(मागील टीप पुढे चालू)

गगना आंत रडती ॥ वृक जंबूक नगरांआंत । दिवसा चौबारा कुंकात । नगरीं माळुवा भुकत । जन कापत देखोनी ॥ नगरा आंत बाहेरी । श्वानांचीं रडपीं भारी । मार्जा-रकळहो नगरीं । घरोघरी होतसे ॥ गाई आरडती मध्यरात्रीं । लेकुरें खेळती झुंझारी । माणसातें झडपिती घारी । घुबाती घरोघरीं दिवाभीतें ॥ वागीश्वरी क्षोभली गाढी । बोलों म्हणती आली यमधाडी । कारे धांवतां तातडी । आगीं उडी घालूं पहाती ॥ भूस्फोट भूमीकंप । अग्नि किरणीं तपे आतप । वारेनि सोडिला आहाकप । लागे झडत खरस्पर्शें ॥ धुळोरा उधळत नगरीं । रज भरती डोळ्यामाझारीं । डोळे चुरघती नरनारी । दिशा चारी धुपधुपिती ॥ २८२-२८९

१ ' प्रभास क्षेत्रास जाऊं' असें सांगण्यात भगवताचा आशय असा होता कीं ' यादव हे देवाचे अंश आहेत, ह्यांनीं पुन्हा आपापल्या अधिकारावर जावें हेंच योग्य होय हे द्वारकेत मरण पावले तर मुक्त होतील, तसें होता कामा नये. म्हणून ह्यांना द्वारकेंतून काढून प्रभासीं न्यावें. तें क्षेत्रही अभ्युदयप्राप्तीचें स्थान आहेच.' २ ही कथा नाथांनीं थोडक्यात वर्णिली आहे —

दक्षें निजकन्या चंद्रासी । सत्तावीस दिधल्या त्यासी । तो रतला रोहिणीसी । येरां सर्वांसी उपेक्षूनी ॥ दक्षें शापिले चंद्रासी । क्षयरोग लागला त्यासी २९९ । ३००

आपणही त्या तीर्थीं स्नान करून पितरांचें आणि देवांचें तर्पण करूं· उत्तमोत्तम ब्राह्मणांना अनेकगुणसंपन्न (षड्रस) अन्नाचें भोजन घालूं, ॥ ३७ ॥ त्या सत्पात्रीं भक्तिपुर सर मोठमोठीं दानें देऊं; आणि, नौकाच्या योगें समुद्र तरावा, तसें त्या दानाच्या योगें आपल्या पातकांतून तरून जाऊ ' ॥ ३८ ॥ शुकाचार्य ह्मणाले.– हे कुरुनंदना भगवंतानीं अशी आज्ञा दिली असता यादवानीं तीर्थास जाण्याचा निश्चय ठरवून आपापले रथ जोडिले ॥ ३९ ॥ राजा, उद्धव नित्य श्रीकृष्णाच्या सेवेंत तत्पर असे त्यानें - द्वारकेंत उद्भवणारीं - घोर दुश्चिन्हें पाहिलीं, भगवंतांचें भाषण ऐकिलें, - आणि तदनुरूप यादवानीं प्रभासाम जाण्याची चालविलेली - तयारीही अवलोकन केली. ॥ ४० ॥ नंतर

वयं तस्मिन् आप्लुत्य (स्नान करून) पितॄन्, सुरान् च तर्पयित्वा नानागुणवता अंधसा (अन्नानें) उशिज. (मनोहर, उत्तम) विप्रान् भोजयित्वा ॥ ३७ ॥ तेषु पात्रेषु श्रद्धया महांति दानानि उप्त्वा (पेरून, देऊन) नौभिः (नौकानीं) अर्णवं इव दानैः वृजिनानि (पापें) तरिष्याम.. " ॥ ३८ ॥ श्रीशुकः उवाच—कुलनंदन, भगवता एवं आदिष्टाः यादवाः तीर्थं गंतुं कृतधियः [संतः] स्यंदनान् समयूयुजन् (जोडिते झाले) ॥ ३९ ॥ राजन्, नित्य कृष्णं अनुव्रतः उद्धव. तत् निरीक्ष्य भगवता उदित (सांगितलेलें) श्रुत्वा

वयं च तस्मिन्नाप्लुत्य तर्पयित्वा पितॄन्सुरान् ॥ भोजयित्वोशिजो विप्रान्नानागुणवतांऽधसा ॥ ३७ ॥ तेषु दानानि पात्रेषु श्रद्धयोप्त्वा* महांति वै ॥ वृजिनानि तरिष्यामो दानैर्नौभिरिवार्णवम् ॥ ३८ ॥ श्रीशुक उवाच । एवं भगवताऽऽदिष्टा यादवाः कुलनंदन ॥ गंतुं कृतधियस्तीर्थं स्यंदनान्समयूयुजन् ॥ ३९ ॥ तन्निरीक्ष्योद्धवो राजन् श्रुत्वा भगवतोदितम् ॥ दृष्ट्वाऽरिष्टानि घोराणि नित्यं कृष्णमनुव्रतः ॥ ४० ॥ विविक्त उपसंगम्य जगतामीश्वरेश्वरम् ॥ प्रणम्य शिरसा पादौ प्रांजलिस्तमभाषत ॥ ४१ ॥ उद्धव उवाच । देवदेवेश योगेश पुण्यश्रवणकीर्तन ॥ संहृत्यैतत्कुलं नूनं लोकं संत्यक्ष्यते भवान् ॥ विप्रशापं समर्थोऽपि प्रत्यहन्न यदीश्वरः ॥ ४२ ॥

घोराणि अरिष्टानि दृष्ट्वा, ॥ ४० ॥ जगतां ईश्वरेश्वरं विविक्ते (एकांतीं) उपसंगम्य (भेटून) शिरसा पादौ प्रणम्य प्रांजलि. [सन्] तं अभाषत— ॥४१॥ उद्धव उवाच— " देव, देवेश, योगेश, पुण्यश्रवणकीर्तन, ईश्वर. भवान् नूनं एतत् कुलं संहृत्य लोकं संत्यक्षते (सोडणार), यत् समर्थः अपि विप्रशापं न – प्रत्यहन् (नाहीं नाशिता झाला) ॥४२॥

तो एकांतीं भगवंतासंनिध गेला, आणि चरणीं मस्तक ठेवून व हात जोडून त्याना ह्मणाला – ॥ ४१ ॥ उद्धव बोलला – ' भगवना, इंद्रादि देवांचे नियामक जे ब्रह्मादि देव, त्यांचाही तूं अधिपति आहेस हे योगेश्वरा, तुझें चरित्र ऐकिलें किंवा वर्णिलें असता पुण्य प्राप्त होतें श्रीकृष्णा तूं ईश्वर असल्यामुळें ब्राह्मणाचा शाप फिरविण्यास समर्थ आहेस. असें असूनही त्वां त्या शापाचा प्रतीकार केला नाहीं - ह्यावरून मला वाटतें कीं - तूं ह्या कुळाचा संहार करून निश्चयें मृत्युलोकाचा त्याग करणार ॥ ४२ ॥

* ' उप्त्वा ' ह्या शब्दाचा अर्थ ' पेरून ' असा आहे ' दानें पेरून ' असें ह्मणण्याचा आशय हा – जसें उत्तम शेतात पेरलेल्या बीजापासून बहुत फल प्राप्त होतें, तसें सत्पात्रीं दिलेलें दान बहुफलदायक होतें

केशवा, माझ्यानें तुझें चरणकमळ सोडून अर्धाक्षण सुद्धा राहवणार नाहीं म्हणून, नाथा, तूं मलाही आपल्या धामास घेऊन चल ॥ ४३ ॥ कृष्णा, तुझीं चरित्रे मनुष्याचें अत्यंत कल्याण करणारीं असून कानाना अमृतासारखी मधुर लागतात. ज्यानें त्याची गोडी एकवेळ अनुभविली, त्या मनुष्याची इतर विषयावर कधींही इच्छा जात नाहीं. ॥ ४४ ॥ [illegible] येत आम्ही तुझी निजणें, बसणें, फिरणें, उभें राहणें, स्नान, क्रीडा, भोजन इत्यादि प्रसंगीं नित्य सेवा केली आमचा आत्मा अर्थात अत्यंत प्रिय काय तो तू [illegible] तुला सोडून राहवेल कसें? ॥ ४५ ॥ - मी मायेच्या भीतीमुळें तुझी प्रार्थना करीत आहें असें नव्हे. [illegible] माझ्यानें तुला सोडवत नाहीं एवढेंच कारण. कारण, - आम्ही [illegible] केशव, अहं क्षणार्धं अपि तव अंघ्रिकमलं त्यक्तुं न—समुत्सहे (धजत नाहीं) नाथ, मा अपि स्वधाम नय ॥ ४३ ॥ कृष्ण. जनः नृणां परममंगलं कर्णपीयूष (कानाला गोड लागणारें) तव विक्रीडितं आस्वाद्य अन्यस्पृहां त्यजति. ॥ ४४ ॥ भक्ताः वयं शय्यासनाटनस्थानस्नानक्रीडाशनादिषु प्रियं आत्मानं त्वा कथं त्यजेमहि? ॥ ४५ ॥

नाहं तवांघ्रिकमलं क्षणार्धमपि केशव ॥ त्यक्तुं समुत्सहे नाथ स्वधाम नय मामपि ॥ ४३ ॥

तव विक्रीडितं कृष्ण नृणां परममंगलम् ॥ कर्णपीयूषमास्वाद्य त्यजत्यन्यस्पृहां जनः ॥ ४४ ॥

शय्यासनाटनस्थानस्नानक्रीडाऽशनादिषु ॥ कथं त्वां प्रियमात्मानं वयं भक्तास्त्यजेमहि ॥४५॥

त्वयोपभुक्तस्रग्गंधवासोऽलंकारचर्चिताः ॥ उच्छिष्टभोजिनो दासास्तव मायां जयेमहि ॥ ४६ ॥

वातरशना य ऋषयः श्रमणा[1] ऊर्ध्वमंथिनः॥ब्रह्माख्यं धाम ते यांति शांताः संन्यासिनोऽमलाः॥४७॥

वयं त्विह महायोगिन् भ्रमंतः कर्मवर्त्मसु ॥ त्वद्वार्तया तरिष्यामस्तावकैर्दुस्तरं तमः ॥ ४८ ॥

त्वया उपभुक्तस्रग्गंधवासोऽलंकारचर्चिताः उच्छिष्टभोजिनः दासाः [वयं] तव मायां जयेमहि (जिंकू) ॥ ४६ ॥ ये वातरशनाः (वायु हें कटिसूत्र ज्यांचें असे) [illegible] (ज्ञानाभ्यासाचे श्रम करणारे) ऊर्ध्वमंथिनः (ऊर्ध्वरेते, ब्रह्मचारी) ऋषयः, शांताः अमलाः संन्यासिनः च, ते ब्रह्माख्यं धाम यांति ॥ ४७ ॥ महायोगिन्, इह कर्मवर्त्मसु [illegible] असून त्वां उपभोगिलेलीं माळा, गंध, वस्त्रें व अलंकार हीं धारण करून आपलीं शरीरें शृंगारीत व नित्य तुझें उच्छिष्ट उपभोग सेवीत आहों. म्हणून आम्ही तुझ्या मायेला जिंकणारच. - यांत अगदीं संशय नाहीं. - ॥ ४६ ॥ वायु हें ज्याचें कटिसूत्र ते (दिगंबर) इंद्रियनिग्रही, ज्ञानाभ्यासी, ब्रह्मचारी. शांत व निष्पाप असे संन्यासी लोक तुझ्या ब्रह्मसंज्ञक स्थानास जातात (संन्यासी लोकांना तुझें स्थान मिळविण्यास ब्रह्मचर्य, तपश्चर्या इत्यादि फार क्लेश पडतात) ॥ ४७ ॥ पण हे महायोगिन् आम्ही तर कर्ममार्गात

1 श्रमणाः आहारादिसंकोचेन वर्षवातादिसहनेन च श्रमवन्तः आहारादि कमी करणें व पाऊस, वारा इत्यादि सोसणें हे श्रम करणारे

भ्रमण करितां करितां, तुझ्या भक्तजनांबरोबर तुझ्या चरित्रांची चर्चा करूं व त्या साधनानें हें दुस्तर संसारदुःख तरून जाऊं ॥ ४८ ॥ तुझ्या लीला, भाषणें, गति, हास्यें, अवलोकनें व थट्टा एकदरीत मनुष्याचे अनुकरण चालविताना तूं जें जे काही केलें त्याचें त्याचें स्मरण व कीर्तन सतत केलें असता आह्माला संसाराची भीति राहावयाची नाहीं अशी आमची खात्री आहे ' ॥ ४९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाले '– राजा, उद्धव हा श्रीकृष्णाचा निस्सीम प्रिय भक्त होता. त्यानें केलेली अशी विज्ञापना ऐकून घेतल्यावर देवकीपुत्र भगवंतानीं त्याला सांगितलें '– ॥ ५० ॥ इति एकादशस्कंधे षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

वयं तावकैः [सह] त्वद्वार्तया तमः तरिष्यामः. ॥ ४८ ॥ ते कृतानि, गदितानि, गत्युत्स्मितेक्षणक्ष्वेलि (क्ष्वेलि ह्म० परिहास, थट्टा) यत् नृलोकविडंबन [तत्] च स्मरतः, कीर्तयतः [च सतः तमः तरिष्यामः] " ॥ ४९ ॥ श्रीशुक उवाच— राजन् एवं विज्ञापितः भगवान् देवकीसुतः एकांतिनं प्रियं भक्तं उद्धवं समभाषत— ॥ ५० ॥ ॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे षष्ठो ऽध्यायः ॥ ६ ॥ श्रीभगवान् उवाच— " महाभाग, मा यत् आत्थ (ह्मणतोस), तत् मे चिकीर्षित

स्मरंतः कीर्तयंतस्ते कृतानि गदितानि च ॥ गत्युत्स्मितेक्षणक्ष्वेलि यन्नृलोकविडंबनम् ॥ ४९ ॥ श्रीशुक उवाच ।
एवं विज्ञापितो राजन् भगवान्देवकीसुतः ॥ एकांतिनं प्रियं भृत्यमुद्धवं समभाषत ॥ ५० ॥ इति श्रीभा० महा०
एकादशस्कंधे षष्ठो ऽध्यायः ॥ ६ ॥ श्रीभगवानुवाच । यदात्थ मां महाभाग तच्चिकीर्षितमेव मे ॥ ब्रह्मा भवो लोकपालाः
स्वर्वासं मे ऽभिकांक्षिणः ॥ १ ॥ मया निष्पादितं ह्यत्र देवकार्यमशेषतः ॥ यदर्थमवतीर्णो ऽहमंशेन ब्रह्मणा ऽर्थितः
॥ २ ॥ कुलं वै शापनिर्दग्धं नंक्ष्यत्यन्योऽन्यविग्रहात् ॥ समुद्रः सप्तमे ऽह्न्येतां पुरीं च प्लावयिष्यति ॥ ३ ॥

(करावयास इच्छिलेलें) एव. ब्रह्मा, भवः, लोकपालाः [च] मे स्वर्वासं (वैकुंठीं सहणें) अभिकांक्षिणः (इच्छितात) ॥ १ ॥ अहं ब्रह्मणा अर्थितः [सन्] यदर्थं अंशेन [सह] अवतीर्णः, [तत्] देवकार्यं मया अत्र अशेषतः (पूर्णपणें) निष्पादितं (सिद्धीस नेलें) ॥ २ ॥ शापनिर्दग्धं (शापानें जाळलेलें) कुलं अन्योन्यविग्रहात् (परस्परांशी युद्धानें) विनंक्ष्यति (नाश पावेल). समुद्रः सप्तमे अन्हि (दिवशीं) एतां पुरीं प्लावयिष्यति (बुडवील) ॥ ३ ॥

श्रीभगवान् ह्मणाले :– महाभागा उद्धवा, तूं जें ह्मणतोस, तें माझ्या मनांतून करणेंच आहे. कारण, ब्रह्मदेव, शंकर आणि लोकपाल, आतां मीं स्वलोकीं (वैकुंठीं) जाऊन राहावें, अशी इच्छा करीत आहेत ॥ १ ॥ भूमीवर जें काहीं देवाचें कार्य करावयाचें होतें आणि ज्यासाठीं ब्रह्मदेवाच्या प्रार्थनेवरून मीं अंशभूत बलरामासह येथें अवतार धरिला, तें सकल कार्य मीं पूर्ण केलें. ॥ २ ॥ ब्राह्मणाच्या शापानें जाळून टाकिलेलें हें यदुकुल परस्परांशीं कलह करून नाश पावेल आणि पुढें सातव्या दिवशीं ह्या द्वारका

नगरीला समुद्र बुडवून टाकील. ॥ ३ ॥ मी ज्या वेळीं ह्या लोकाला सोडून जाईन, त्या क्षणींच ह्यांतील समस्त मंगलें नाश पावतील आणि हे साधो, लागलाच कलिही ह्या लोकाला पूर्णपणें व्यापून सोडील (ह्या लोकावर आपला पूर्ण अंमल बसवील). ॥ ४ ॥ - ह्मणून माझें तुला असें सांगणें आहे कीं, - मी भूमितल सोडून गेलों ह्मणजे त्वा येथें राहू नये बा मंगलशीला (उद्धवा), कलियुगामध्यें जनाच्या मनाची ओढ अधर्माकडेच विशेष चालू लागेल ॥ ५ ॥ एवढ्यासाठीं, तू आप्तजन, बंधु ह्यावरील सगळा स्नेह सोडून देऊन मन मजकडे निश्चल लाव आणि सर्व भूतांना सम भावानें पाहून पृथ्वीवर पर्यटन करीत जा ॥ ६ ॥ - तू ह्मणशील ' ह्या लोकामध्यें कोणाच्या आगीं गुण अधिक, कोणा

साधो, मया अयं लोकः यर्हि (ज्यावेळीं) एव त्यक्तः, [तदा एव] अयं नष्टमंगल भविष्यति, अचिरात् कलिना अपि निराकृतः (पादाक्रांत, वेष्टित) [भविष्यति]. ॥ ४ ॥ भद्र, मया महीतले त्यक्ते[सति], त्वया इह न एव वस्तव्यं. कलौ युगे जनः अधर्मरुचिः भविष्यति. ॥ ५ ॥ त्वं स्वजनबंधुषु सर्वं स्नेह परित्यज्य (सोडून) मयि सम्यक् मन.

यर्ह्येवायं मया त्यक्तो लोकोऽयं नष्टमंगलः ॥ भविष्यत्यचिरात्साधो कलिनाऽपि निराकृतः ॥ ४ ॥
न वस्तव्यं त्वयैवेह मया त्यक्ते महीतले ॥ जनोऽधर्मरुचिर्भद्र भविष्यति कलौ युगे ॥ ५ ॥
त्वं तु सर्वं परित्यज्य स्नेहं स्वजनबंधुषु ॥ मय्यावेश्य मनः सम्यक् समदृग्विचरस्व गाम् ॥ ६ ॥
यदिदं मनसा वाचा चक्षुर्भ्यां श्रवणादिभिः ॥ नश्वरं गृह्यमाणं च विद्धि माया मनोमयम् ॥ ७ ॥

आवेश्य (ठेवून) समदृक् (सारखें पाहणारा) [सन्] गां (पृथ्वीवर) विचरस्व (फिरत रहा). ॥ ६ ॥ मनसा, वाचा, चक्षुर्भ्यां, श्रवणादिभिः च गृह्यमाण (घेतलें-समजलें-जाणारें) यत्, इदं नश्वरं मनोमयं (कल्पनामय) ' माया ' [इति] विद्धि. ॥ ७ ॥

मध्यें दोष अधिक, असा विषमपणा भरलेला आहे तेव्हा सर्वत्र समदृष्टि ठेवावी कशी ? ' तर तेंही सांगतों - बा, मनानें, वाणीनें, नेत्रांनीं, व कर्ण इत्यादि इंद्रियांनीं जे जे ह्मणून विषय ग्रहण करिता येतात (मनाला जें कळतें, वाणीला जें बोलून दाखविता येतें, नेत्रांनीं जें दिसतें, कानांनीं जें ऐकिता येतें व इतर इंद्रियांची ज्यावर प्रवृत्ति चालते) ते सर्व विषय मनाचे खेळ (काल्पनिक) अर्थात माया होत व ह्मणूनच ते नाशवंत आहेत असें समज. - अशा रीतीनें सर्वांची योग्यता सारखी झाली की विषमपणा कोठेंच दिसण्याला

१ घरादारावर प्रेम ठेवून नुसतें शरीरानें बाहेर पडणें कांहीं उपयोगी नाहीं, उलट तें अधिक त्रासदायक व अनर्थावह होतें नाथ, २१

२ जैशी स्वप्नींची राणीव (राज्य)। केवळ भ्रमचि जाणीव। तैसेंचि जाण हें सर्व। भववैभवविलास ॥ नाथ, ५६

आधार नाहीं. - ॥ ७ ॥ - सकल विषयांना मनाचे खेळ ह्मणण्याचें कारण असें : - मनुष्याचें मन स्थिर नसलें ह्मणजे त्याला भेदविषयक भ्रम उत्पन्न होतो. आणि तो भ्रमच गुणांचा व दोषांचा आधार होय. - ह्यावर कोणी ह्मणेल, वेदांनींच विधिनिषेध सांगून देऊन तद्द्वारा भेदाची सत्यता सिद्ध केली आहे; आम्ही नवा पाहतों असें नाहीं. तर त्यांना उत्तर : - वेदामध्यें कर्म (विहित), अकर्म (विहित कर्में न करणें) आणि विकर्म (निषिद्ध) हा जो भेद सांगितला आहे, तो ज्याच्या बुद्धीमध्यें - भ्रमाचे [illegible]

अयुक्तस्य (ईश्वरभक्ति न करणाऱ्या) पुंसः नानार्थः भ्रमः. सः गुणदोषभाक् (गुणदोषांस आधार). गुणदोषधियः कर्म, अकर्म, विकर्म इति भिदा [भवति]. ॥ ८ ॥

पुंसोऽयुक्तस्य नानाऽर्थो भ्रमः स गुणदोषभाक् ॥ कर्माकर्मविकर्मेति गुणदोषधियो भिदा ॥ ८ ॥

तस्माद्युक्तेंद्रियग्रामो युक्तचित्त इदं जगत् ॥ आत्मनीक्षस्व विततमात्मानं मय्यधीश्वरे ॥ ९ ॥

तस्मात् युक्तचित्तः युक्तेंद्रियग्रामः (आवरिला इंद्रियसमूह ज्यानें असा) [सन्] इदं जगत् आत्मनि विततं (पसरलेल्या) ईक्षस्व (पहा), आत्मानं अधीश्वरे मयि [ईक्षस्व]. ॥ ९ ॥

- गुणदोष खिळले असतील त्या पुरुषाला (अज्ञान्यालाच) उद्देशून आहे. ॥ ८ ॥ ह्मणून, उद्धवा, तूं आपला इंद्रियसमुदाय आंवरून धर, चित्त स्वाधीन ठेव, आणि हें सगळें पसरलेलें जग आत्माच्या (मोठ्या जीवाच्या) आधारें आहे असें पाहत जा. - ह्यावर तूं ह्मणशील, माझ्या (उद्धवाच्या) माडेनीन हान शरीरांत राहणाऱ्या लहानग्या आत्म्यावर

---

१ श्रीधरांनीं ' सः ' ह्याचा अर्थ ' भ्रमः ' असा धरिला आहे. पण बालप्रबोधिनीकार ह्मणतातः—यस्य एवं भ्रमः स एव पुमान् गुणदोषभाक् पुण्यपापसुखदुःखादिमान् भवति ह्म० ज्याला तसा भ्रम पडला तोच पुरुष गुणदोष भोगणारा ह्म० पुण्य पाप किंवा सुखदुःख भोगणारा होतो. २ परमात्मेसी जो विभक्त । तो पुरुष बोलिजे अयुक्त । एकनाथ, ५७.

३ कर्म अकर्म आणि विकर्म यांविषयीं एकनाथांचें मत श्रीधरांच्याहून भिन्न आहे असें मागें सांगितलें आहे. ह्या स्थलीं नाथांनीं आपल्या मताचें प्रतिपादन करून शिवाय श्रीधराचाही अर्थ [illegible] स्पष्ट लिहिली आहे. येथ ह्मणसी कर्म कोण । अकर्माचें काय लक्षण । विकर्माचा कवण गुण । तें ही संपूर्ण परियेसीं ॥ काया वाचा अथवा मन । करिजे तितुकें कर्म जाण । सूक्ष्मस्फूर्तीचें जें भान । तें मूळ जाण कर्माचें ॥ मनसा वाचा देहीं । सर्वथा कर्मबीज नाहीं । अकर्म ह्मणिजे ते पाहीं । न दडे ठायीं देह [illegible] ॥ जे कर्मावेगळें सदा । [illegible] कर्म लावितां ही न लगे । जें नव्हे कर्मठा जोगें । तें जाण सवेगें अकर्म ॥ विधि निषेध जोड दाडे । जेथ विशेष कर्म [illegible] । विकर्म त्यातें ह्मणणें घडे । थोर सांकडें [illegible] । कर्म सर्व साधारण । तेंचि विकारातें पावलें जाण । उठिले विधि निषेध दारुण । विकर्म जाण तें ह्मणिजे पैं ॥ जें विधीसीं नातुडे । तें निषेधाचें अंग चढे । करि[illegible] विकळ पडे । तेंही रोकडें निषिद्धची ॥ ऐसें कर्म विकारलें । तें विकर्मपदें वाखाणिलें । एवं कर्माकर्म दाविलें । विभागलें तुज जाण ॥ जीवासि आविद्य[illegible] त्याचीं कर्में आविद्यकें होती । श्रीधरव्याख्यानाची युक्ति । तेही उपपत्ती परियेसीं ॥ अविद्यायुक्त जीव परम । त्यासि नित्य क्रिया तेचि कर्म । नित्य न करणें तें अकर्म [illegible] विकर्म तें निषिद्ध ॥ ६२–७२. ४ श्रीधरांनीं ' विततं ' हें ' जगत् ' याचें विशेषण केलें आहे. बालप्रबोधिनीकार तें ' आत्मानं ' ह्याचें विशेषण करितात.

एवढें सगळें मोठें जग राहतें असें कसें पाहावें? तर वा, - तो जीवात्मा सकल चराचरांचा नियामक ब्रह्मरूप जो मी त्या माझ्या ठिकाणीं आहे अशी दृष्टि ठेव (आत्मा शरीरानें आच्छादित व समर्याद आहे असें समजूं नकोस, तो सर्वव्यापी ब्रह्मरूप अर्थात जगदाधार आहे असें पहा). ॥ ९ ॥ - तुला वाटेल कीं, अशा प्रकारें चित्त निर्मल केलें व कर्में करीत गेलें नाहीं तर देव विघ्नें करतील, तर ती शंकाही नलगे. - तुला वेदाचें निश्चित तात्पर्य कळलें व त्याप्रमाणें अनुभव मिळून तुझें चित्त आत्मानुभवानें संतोष पावलें, ह्मणजे तूं सकल प्राण्यांचा (देवादिकांचाही) आत्मरूप होशील; व मग तुला कोणाकडूनही विघ्नांची बाधा होणार नाहीं (ज्याचा भाव असा– अनुभव मिळेपर्यंत शास्त्रानुरूप कर्में करीत जावेंच. ज्याला अनुभव मिळाला तो सर्वांचा आत्माच होतो अर्थात त्याला कोणी विघ्नें करीत नाहींत.) ॥ १० ॥ - ह्यावरून कोणी ह्मणेल कीं, ज्ञानविज्ञानसंयुक्तः (ज्ञान झ० शास्त्रज्ञान, विज्ञान झ० अनुभव यानीं युक्त) शरीरिणां (प्राण्याचा) आत्मभूतः आत्मानुभवतुष्टात्मा [सन्] अंतरायैः (विघ्नैः) न—विहन्यसे. ॥ १० ॥

ज्ञानविज्ञानसंयुक्त आत्मभूतः शरीरिणाम् ॥ आत्मानुभवतुष्टात्मा नान्तरायैर्विहन्यसे ॥ १० ॥
दोषबुद्ध्योभयातीतो निषेधान्न निवर्तते ॥ गुणबुद्ध्या च विहितं न करोति यथा ऽर्भकः ॥ ११ ॥
सर्वभूतसुहृच्छांतो ज्ञानविज्ञाननिश्चयः ॥ पश्यन्मदात्मकं विश्वं न विपद्येत वै पुनः ॥ १२ ॥

यथा अर्भकः, [तथा] उभयातीतः (गुणदोषांहून पलिकडे असणारा) [अपि] निषेधात् निवर्तते, [परं] दोषबुद्ध्या न; विहितं (कर्तव्य) च करोति, [परं] गुणबुद्ध्या न. ॥ ११ ॥ सर्वभूतसुहृत् शांतः ज्ञानविज्ञाननिश्चयः विश्वं मदात्मकं पश्यन् पुनः न विपद्येत (क्लेश पावत नाहीं). " ॥ १२ ॥

ज्ञान झालें त्याच्या हातून भलतेंसलतें पाहिजेतें आचरण घडत असेल. तर तसेंही समजावयास नको. - ज्ञानानुभवी पुरुष निषेध आणि विधि ह्यांच्या चक्रांतून पलिकडे असतो - तरी तो पूर्वसंस्कारानुरोधानें निषिद्ध कर्में करण्यापासून माघारा वळतोच, मात्र माघारा वळण्याचें (निषिद्ध कर्में न करण्याचें) कारण त्याच्या बुद्धीला तें कर्म केलें असतां दोष घडेल असें वाटत असतें हें नव्हे. - तसेंच तो प्रायः विहित कर्मांचेंच अनुष्ठान करीत असतो - पण तो विहितकर्म केलें असतां आपल्याला कांहीं लाभ होईल (स्वर्गादि फळें मिळतील) अशा समजुतीनें तें करितो असें नव्हे. तर जसें लहान मूल एकादेवेळीं हात पाय हलवणें, रडणें इत्यादि कांहींतरी करितें, एकादेवेळीं कांहीं करीत नाहीं, तसेंच ज्ञान्याचीं कर्में संकल्पविकल्पांवांचून साहजिकपणें चाललेलीं असतात. ॥ ११ ॥ अशा प्रकारें जो पुरुष सकल प्राण्यांचा मित्र व शांत झाला तसेंच ज्याला वेदाचें तात्पर्य कळून

---

१ ब्रह्मादिकांसी जो ग्रासी । त्या काळाचा तूं आत्मा होसी । पाठी थापटूनि हृषीकेशी । उद्धवासी सांगतू ॥ नाथ, १०८.

२ निद्रितामार्गें बैसला वाघु । अथवा पुढें आला स्वर्गभोगु । त्यासि नाहीं रागविरागु । तैसा लागु ज्ञान्याचा ॥ नाथ, १२५.

३ शांति वरकर्मी उपयोगी नाहीं तर अंतरीं बाणली पाहिजे, आंत तळमळ चालली आहे आणि वरून धाकानें किंवा अशक्तपणामुळें निमूट बसावें लागत आहे, तर ती शांति नव्हे पहा :— (पुढें चालू.)

तदनुरूप आत्मानुभव निश्चयें मिळाला आणि जो सकल विश्व मद्रूप (ईश्वर) होय असें पाहूं लागला. त्याला पुनरपि हा दुःखमय संसार भोगावा लागत नाही. ॥ १२ ॥ शुकाचार्य ह्मणाले – राजा, महाभगवद्भक्त उद्धवाला श्रीकृष्णपरमात्म्यानी अशी आज्ञा दिली तरी त्याला तत्त्वज्ञान मिळावें अशी इच्छा होती ह्मणून त्यानें अच्युताला प्रणिपात करून पुन्हा प्रश्न केला ॥१३॥ - भगवतानी केलेला उपदेश आपल्या शक्तीबाहेर आहे असें वाटून उद्धवानें प्रश्न केला - उद्धव ह्मणाला – भगवन्, तूं योगाचें फळ देणारा असून योगवेत्त्या पुरुषाचा अतिगूढ ठेवा होस (किंवा, योगसाधन तुझ्या आश्रयाने केलें जातें, असा अर्थ करावा). योगमाधनामध्यें तुझें स्वरूप प्रकट होतें (अथवा, योग तुझें स्वरूप

श्रीशुकः उवाच— नृप, भगवता इति आदिष्टः महाभागवतः उद्धवः तत्वजिज्ञासुः [सन्] अच्युतं प्रणिपत्य आह— ॥ १३ ॥ उद्धवः उवाच— “ योगेश (योगाचें फळ देणाऱ्या), योगविन्यास (योगज्ञाचा ठेवा असा), योगात्मन् (योगामध्यें आत्मा - प्रकट - ज्याचा असा), योगसंभव (योगाचें उत्पत्तिस्थान असा), मे निःश्रेयसाय (कल्याणासाठीं)

श्रीशुक उवाच । इत्यादिष्टो भगवता महाभागवतो नृप ॥ उद्धवः प्रणिपत्याह तत्त्वजिज्ञासुरच्युतम् ॥१३॥ उद्धव उवाच ।
योगेश योगविन्यास योगात्मन्योगसंभव ॥ निःश्रेयसाय मे प्रोक्तस्त्यागः संन्यासलक्षणः ॥ १४ ॥ त्यागोऽयं दुष्करो
भूमन्कामानां विषयात्मभिः ॥ सुतरां त्वयि सर्वात्मन्नभक्तैरिति मे मतिः ॥ १५ ॥

संन्यासलक्षणः (सकळ सग सोडणें, हा) त्यागः प्रोक्तः. ॥ १४ ॥ भूमन्, विषयात्मभिः (विषयावर मन ज्याचें त्यांना) अयं कामानां (उपभोगाचा) त्यागः दुष्करः (करण्यास कठिण), सर्वात्मन्, त्वयि अभक्तैः सुतरां [दुष्करः] इति मे मतिः. ॥ १५ ॥

होय, असा अर्थ करावा). योगाची उत्पत्ति तुजपासून आहे. हे योगेश्वरा, त्वा माझ्या आत्यंतिक कल्याणासाठी मला संन्यासरूप (पुनश्च गृहदारादिकाचा संग्रह न करणें हा) त्यागाचा उपदेश केला, ॥ १४ ॥ पण, हे विश्वव्यापका, ज्याचीं अंतःकरणें विषयवासनांनीं पूर्णपणें व्यापिलेलीं असतात, त्याना हा त्याग करणें जड वाटेल. त्यातूनही, हे सर्वात्मका, जे पुरुष तुझी भक्ति करीत नाहींत त्याच्या हातून तर हा (त्याग) घडणे अत्यंत दुर्घट होय. असें माझ्या बुद्धीला वाटतें । १५ ॥

(मागील टीप पुढें चालू)

दाढ्यांवें निश्चळ होणें । दांत चावूनि साहणें । ते शांति ऐसें कोण ह्मणे । आक्रोशपणे साहनसे । शांति ह्मणिजे ते ऐसी । सागरीं अक्षोभ्यता जैसी । चढ वोहट नाहीं तिसीं । सर्व देशीं सर्वदा ॥ नाना सरितांचे खळाळ । आणूनि घालिती समळ जळ । तो निळभरी नव्हे डहुळ । अतिनिर्मळ निजांगें ॥ नाथ, १३५ । १३६ । १३७

१ हा अर्थ मूळ श्लोकातील पूर्वार्धातील जीं चार संबोधनें आहेत, त्याचा होय. हीं संबोधने देण्यात उद्धवाचा असा आशय दिसून देतो कीं, ‘ भगवन्, तू जो इतका वेळ मला उपदेश केला, तो स्वतःच्या सामर्थ्यावर लक्ष्य देऊन केला; माझा अधिकार किती अल्प आहे, इकडे अगदीं दृष्टि दिली नाहीं ’ असें श्रीकृष्णाला आग्रवावें २ आरोग्यादिकासाठीं मनुष्य सर्वस्वाचाही त्याग (दान) करितो पण हा त्याग तद्यापैकीं नव्हे तर हा एकदा केला की पुन्हा संसाराची आशा धरिता येत नाहीं

- त्यां ज्याला उद्देशून उपदेश केला तो - मी तर अत्यंत मूढ आहें, कारण, माझी बुद्धि तुझ्या मायेनें रचिलेल्या स्त्रीपुत्रादिपरिवारासहित देहावर ' देह हाच मी आणि ' हे स्त्रीपुत्रादिक माझीं ' अशा अभिमानानें पूर्णपणें आसक्त झालेली असते. - एकदरीत त्या एवढ्यावेळ केलेल्या उपदेशाला मी पात्र नाहीं. - ह्मणून, भगवंता, आता मला [illegible] रीतीनें हळूहळू शिक्षण दे कीं जेणेंकरून तूं सांगितलेलें साधन मला अनायासें पूर्ण मिळविता येईल. मी तुझा सेवक आहे ॥ १६ ॥ - तूं ह्मणशील ' मी तुला थोडक्यात म[illegible] दिलें, आता तुला विस्तारानें ऐकायास पाहिजे असेल तर दुसऱ्या कोणाला विचार ' तर त्याचेंही उत्तर मागतों - ईश्वरा, स्वप्रकाश व त्रिकालीं अबाधित अशा आत्मस्वरूप भगवन्, स॰ अहं सानुबंधे (परिवारासहित) त्वन्मायया विरचितात्मनि (रचिलेल्या देहावर) ' अहं, मम ' इति विग ढ॰ मूढमतिः [अस्मि]. तत् अहं भवता निगदितं यथा अंजसा (सहज) संसाधयामि, [तथा] भृत्यं मा अनुशाधि (शिकव) ॥ १६ ॥ विबुधेषु (देवामध्यें) अपि सत्यस्य (तीन्ही काळीं नाश न पावणारा अशा) स्वदृश (स्वप्र-

सो ऽहं ममाहमिति मूढमतिर्विगाढस्त्वन्मायया विरचितात्मनि सानुबंधे । तत्त्वंजसा निगदितं भवता यथा ऽहं
संसाधयामि भगवन्ननुशाधि भृत्यम् ॥ १६ ॥ सत्यस्य ते स्वदृश आत्मन आत्मनो ऽन्यं वक्तारमीश विबुधेष्वपि
नानुचक्षे ॥ सर्वे विमोहितधियस्तव माययेमे ब्रह्मादयस्तनुभृतो बहिरर्थभावाः ॥ १७ ॥ तस्माद्भवंतमनवद्यमनंतपारं
सर्वज्ञमीश्वरमकुंठविकुंठधिष्ण्यम् ॥ निर्विण्णधीरहमुह वृजिनाभितप्तो नारायणं नरसखं शरणं प्रपद्ये ॥ १८ ॥

काश—स्वतःसिद्ध ज्ञानसंपन्न) आत्मनः ते (तुजहून) अन्यं आत्मनः वक्तारं (उपदेशक) न—अनुचक्षे (पाहत नाहीं). बहिः (बाह्यविषयावर) अर्थभावाः (सत्य अशी समजूत ज्यांची ते) सर्वे इमे ब्रह्मादयः तनुभृतः तव मायया विमोहितधियः. ॥ १७ ॥ तस्मात् उह वृजिनाभितप्तः (दुःखानीं व्याप्त) अहं नरसखं (जीवाचा मित्र) नारायणं अनवद्यं (निर्दोष) पाचा मला उपदेश देणारा तुजवाचून दुसरा पुरुष देवामध्यें सुद्धा कोणी माझ्या दृष्टीला आढळत नाहीं कारण, ब्रह्मदेव आदिकरून ह्या सगळ्या शरीरधारी प्राण्यांच्या बुद्धि तुझ्या मायेनें मोहून गेलेल्या आहेत आणि ह्यांना विषयच सत्य भासत असतात - असले उपदेशक काय कामाचे ? - ॥ १७ ॥ ह्मणून, हे जीवाच्या मित्रा नारायणा, मी तुला शरण आलों. संसारांतील अनेक दुःखें भोगता भोगतां माझें मन अगदीं विटून गेलें (विरक्त झालें) आहे - दुसऱ्या कोणाकडे जावें ह्मटलें तर तुजवाचून इतर जीव कसे आहेत पहा कोणाचे

१ किंवा 'स्वदृशः' हें ' ते ' ह्याचें विशेषण करावें स्वतःसिद्धज्ञानसंपन्न अशा तुजहून वेगळा दुसरा २ पुसो जावें ब्रह्मयासी । तो गुंतला सृष्टिकर्मासी । प्रजाउत्पत्ति [illegible] । अह- र्निशीं चिंतीत ॥ जो आपुल्या निजस्वभावीं । सदा संसारू वाढवी । तो केवीं संसारू तोडवी । देखे न बुडवी सर्वथा ॥ नाथ, १७६ । ७७.

३ ' शरण आलों ' ह्मणजे ' सदुपदेशेन रक्षितारमध्यवस्यामि (तूंच सदुपदेशाच्या योगें रक्षण करणारा आहेस असा निश्चय करून राहिलों) '

यदुराजाला धर्माचें रहस्य पूर्णपणें समजत असे. - एके प्रसंगीं - वयानें तरुण असा कोणीएक अवधूत ब्राह्मण कशाची काळजी किंवा कोणाची भीति न बाळगता स्वैर पृथ्वीवर पर्यटन करीत असलेला त्या राजाच्या दृष्टीस पडला. त्यानें ब्राह्मणाच्या लक्षणावरून हा कोणी ब्रह्मवेत्ता असावा - असें तत्काळ ओळखिलें. व त्याच्या मुखानें काहीं ज्ञानाच्या गोष्टी ऐकाव्या अशा इच्छेनें - त्याला प्रश्न केला. ॥ २५ ॥ यदु ह्मणाला — ब्रह्मन्, आपण कोणताही व्यवसाय करीत नाहीं असें असताना आपल्याला ही अतिनिपुण (लोकात कोणामध्येही न आढळणारी) बुद्धि प्राप्त झाली कोठून — कीं ज्या बुद्धीचा आश्रय मिळाल्यामुळें आपण विद्वान् असताही लोकामध्यें एकाद्या धर्मवित् यदुः अकुतोभयं (नाहीं कोठूनही भय ज्याला अशा) चरंतं (फिरणाऱ्या) कविं तरुणं कंचित् अवधूतं (सर्वसंगपरित्यागी) द्विजं पप्रच्छ— ॥ २५ ॥ यदु उवाच— "ब्रह्मन्, अकर्तुः (उद्योग न करणारा, अशा) [ते] सुविशारदा (अतिनिपुण) इयं बुद्धिः कुतः ? यां (ज्या बुद्धीला) आसाद्य (पावून) विद्वान् भवान् बालवत् लोकं

अवधूतं द्विजं कंचिच्चरंतमकुतोभयम् ॥ कविं निरीक्ष्य तरुणं यदुः पप्रच्छ धर्मवित् ॥ २५ ॥

यदुरुवाच । कुतो बुद्धिरियं ब्रह्मन्नकर्तुः सुविशारदा ॥ यामासाद्य भवाँल्लोकं विद्वांश्चरति बालवत् ॥ २६ ॥

प्रायो धर्मार्थकामेषु विवित्सायां च मानवाः ॥ हेतुनैव समीहंते आयुषो यशसः श्रियः ॥ २७ ॥

त्वं तु कल्पः कविर्दक्षः सुभगो ऽमृतभाषणः ॥ न कर्ता नेहसे किंचिज्जडोन्मत्तपिशाचवत् ॥ २८ ॥

चरति. ॥ २६ ॥ मानवाः प्रायः आयुषः, यशसः, श्रियः [च] धर्मार्थकामेषु, विवित्सायां च समीहते (उद्योग करितात) ॥२७॥ त्वं तु कल्पः (समर्थ,कवि , (बुद्धिमान्) दक्षः (कुशल), सुभगः (सुंदर), अमृतभाषणः (मधुर बोलणारा) [च] जडोन्मत्तपिशाचवत् किंचित् न कर्ता, न—ईहसे (इच्छीत नाहींस) [च] ॥ २८ ॥ अज्ञान बालकाप्रमाणे वर्तत असता ? ॥ २६ ॥ - पृथ्वीच्या पाठीवर जिकडे तिकडे हा प्रकार दिसून येतो की - धर्म, अर्थ, काम व आत्मविचार हीं करण्याकडे मनुष्यें प्राय आपण होऊन प्रवृत्त होत असतात; आणि त्याची ती प्रवृत्ति तरी आयुष्य, कीर्ति किंवा संपत्ति मिळविण्याच्या हेतूनेंच पडलेली असते ॥ २७ ॥ आणि आपण तर कोणतेंही कर्म करीत नाहीं व कसलीही इच्छा धरीत नाहीं, तर एखाद्या अज्ञान, मद्य पिऊन धुंद झालेल्या किंवा पिशाचानें झपाटलेल्या मनुष्याप्रमाणे वागत असता - बरें, आपल्याला

---

१ ह्यावर नाथाचीं ओंव्यांतील टोंगी व्यवहाराचें वर्णन फारच सुंदर केलें आहे तें असें :—

प्रायशा ये लोकीं लोक । धर्मअर्थकामकामुक । येचि त्रिवर्गी ज्ञान देख । अत्यवश्यक करिताति ॥ आह्मी स्वधर्म करितों ह्मणती॥ ज्ञानसध्येची कीर्ति मिरविती । रोकडी गायत्रीचें फळ देती। अर्थप्राप्तीलागोनी ॥ वेदोक्त आह्मी करितों याग। संस्थापितों वेदमार्ग। शेखीं तो करिती जीविकायोग। स्वर्गभोग वांछिती । एक ह्मणती आह्मी स्वधर्मक ।

(पुढें चालू)

शक्ति, ज्ञान, निपुणता, सौंदर्य आणि भाषणचातुर्य ह्यांपैकीं कोणताही गुण अनुकूल नसल्यामुळें उदासीन राहणें भाग पडतें, असें ह्मणावें तर तसेंही नाहीं – आपण सशक्त, ज्ञानसंपन्न, कुशल, सुंदर व अमृताप्रमाणें मधुर भाषण करणारे आहां. ॥ २८ ॥ हे सगळे जन काम व लोभ एतद्रूप वणव्याच्या योगें पोळून निघत आहेत, असें असतांना आपण गंगोदकांत उभा राहिलेल्या हत्तीप्रमाणें, त्या अग्नीपासून पूर्णपणें मुक्त आहां व अगदीं ताप पावत नाहीं ! ॥ २९ ॥ ब्रह्मन्, आह्मी आपल्याला प्रश्न करीत आहों त्या जनेषु कामलोभदवाग्निना दह्यमानेषु (पोळणारे) [सत्सु], अग्निना मुक्तः (सोडिलेला) गंगांभस्थ (गंगेच्या उदकांत उभा) द्विप (हत्ती) इव न तप्यसे ॥ २९ ॥ ब्रह्मन्, त्वं

जनेषु दह्यमानेषु कामलोभदवाग्निना ॥ न तप्यसे ऽग्निना मुक्तो गंगाऽम्भस्थ इव द्विपः ॥ २९ ॥ त्वं हि नः

पृच्छतां ब्रह्मन्नात्मन्यानंदकारणम् ॥ ब्रूहि स्पर्शविहीनस्य भवतः केवलात्मनः ॥ ३० ॥ श्रीभगवानुवाच ।

यदुनैवं महाभागो ब्रह्मण्येन सुमेधसा ॥ पृष्टः सभाजितः प्राह प्रश्रयावनतं द्विजः ॥ ३१ ॥

पृच्छतां नः केवलात्मनः (एकाकी) स्पर्शविहीनस्य (विषयसुखरहित) भवतः आत्मनि आनंदकारणं ब्रूहि. " ॥ ३० ॥ श्रीभगवान् उवाच— सुमेधसा (महाबुद्धिमपन्न) ब्रह्मण्येन यदुना पृष्टः सभाजित. (सत्कारिलेला) महाभागः [सः] प्रश्रयावनतं नृपं प्राह— ॥ ३१ ॥

अर्थीं, आपल्या अंतरीं इतका आनंद असण्याचें कारण काय, तें आह्माला निवेदन करावें. - आमचा समज तर असा आहे कीं, संसारसुखें भोगावीं तेव्हांच आनंद प्राप्त होतो - आणि आपण तर - स्त्री, घर इत्यादिकांचा संबंध न ठेविता - केवळ एकाकी वागत असता, अर्थात वैषयिक सुखें सर्वथा सोडून दिलीं आहेत, - मग आपल्याला आनंद मिळतो कोठून ? - ॥ ३० ॥ श्रीभगवान् ह्मणाले – उद्धवा, ब्राह्मणाचा पूर्ण भक्त व उत्तमबुद्धिसंपन्न अशा यदुराजानें त्या महाभागाला सत्कारून ह्याप्रमाणें प्रश्न के[ला] तेव्हां त्या

(नागील उप पुढ चालू)

कुशमृत्तिका नाशिती उदक । समयीं आलिया याचक । ने वेळीं भीक न घालिती ॥ दांभिक वाढवावया स्फीती । वैष्णवदीक्षा अवलंबिती । देवपूजा झळफळीत दाविती । शंख लाविती कीं ह्यातीं ॥ आयुष्यदानी पुण्यपुरुष । आह्मी चिकित्सक अहिंस । स्थावर जंगम जीव अशेष । मारूनिया यश मिरविती ॥ यश वाढवावयाचें कारण तुळापुरुष करिती दान । देह सुवर्णिष्ठे परिपूर्ण । धन त्यासमान जोखिती ॥ परि परमार्थाचिया चाडा । कोणी वेंचीना कवडा । भूल कैसी पडली मूढा । स्वार्थ रोकडा विसरले ॥ पूर्वी अदृष्टीं नाहीं प्राप्ती । ते श्रीकामा उपास्ती करिती । श्रियेचा स्वामी श्रीपती । त्यातें न भजती अभाग्य ॥ लक्ष्मी विश्वगुरु हरीची [राणी] । तीतें जो तो राखे अभिलाषूनी । ने दिती हरीची हरिंखंगोनी । त्यातें पतनीं हारि पवर्वी ॥ रोगग्रस्तीं आयुष्य मागती । यालागीं सविता उपासिती । देह नश्वर हे न आठवे चित्तीं । पडली भ्रांति भिन्नपदा ॥ २८९ । ९२.

ब्राह्मणानें, राजा आपल्या चरणीं भक्तिपुरःसर लीन झाला - अर्थात हा उपदेशास अधिकारी आहे असें पाहून - त्याला मागितलें ॥ ३१ ॥ ब्राह्मण ह्मणाला – ' राजा, मी आपल्या बुद्धीनेंच वरिलेले असे माझे बहुत गुरु आहेत. त्यापासून शिक्षण घेऊन मी मुक्त होत्साता भूमीवर पर्यटन करीत असतों ते गुरु कोणते, - ते सांगतों - ऐक – ॥ ३२ ॥ (१) पृथिवी, (२) वायु, (३) आकाश, (४) उदक, (५) अग्नि, (६) चंद्रमा, (७) सूर्य, (८) कपोत, (९) अजगर, (१०) समुद्र, (११) पतंग, (१२) मधुकृत्, (१३) हत्ती, ॥ ३३ ॥ (१४) मध लुटून नेणारा, (१५) हरिण, (१६) मासा, (१७) पिंगला वेश्या, (१८) कुरर पक्षी, (१९)

ब्राह्मणः उवाच— " राजन्, मे बुद्ध्युपाश्रिताः बहवः गुरवः संति, यतः बुद्धिं उपादाय (घेऊन) मुक्तः [सन्] इह अटामि (फिरतों) तान् शृणु ॥ ३२ ॥ (मूळाप्रमाणें). ॥ ३३ ॥ ३४ ॥ राजन्, एते चतुर्विंशतिः गुरवः मे आश्रिताः [अहं] एतेषां वृत्तिभिः (वर्तनांनीं) इह आत्मनः शिक्षाः (उपदेश) अन्वशिक्षं (शिकलों)

ब्राह्मण उवाच । संति मे गुरवो राजन्बहवो बुद्ध्युपाश्रिताः ॥ यतो बुद्धिमुपादाय मुक्तो ऽटामीह तान् शृणु ॥ ३२ ॥ पृथिवी वायुराकाशमापो ऽग्निश्चंद्रमा रविः ॥ कपोतो ऽजगरः सिंधुः पतंगो मधुकृद्गजः ॥ ३३ ॥ मधुहा हरिणो मीनः पिंगला कुररो ऽर्भकः ॥ कुमारी शरकृत्सर्प ऊर्णनाभिः सुपेशकृत् ॥ ३४ ॥ एते मे गुरवो राजंश्चतुर्विंशतिराश्रिताः ॥ शिक्षा वृत्तिभिरेतेषामन्वशिक्षमिहात्मनः ॥ ३५ ॥ यतो यदनुशिक्षामि यथा वा नाहुषात्मज ॥ तत्तथा पुरुषव्याघ्र निबोध कथयामि ते ॥३६॥

॥ ३५ ॥ नाहुषात्मज (नहुषाचा पुत्र जो ययाति त्याच्या मुला), पुरुषव्याघ्र (नरश्रेष्ठा), यत¹, यत्, यथा वा अनुशिक्षामि, तत् तथा ते कथयामि, निबोध (समजून घे) ॥ ३६ ॥

लहान मूल, (२०) कुमारी, (२१) बाण तयार करणारा, (२२) सर्प, (२३) पोटांतून धागे काढणारा किडा (भिंतीवरील कोळी), आणि (२४) किड्याला सुंदर रूप देणारा प्राणी (कुंभारीण माशी), ॥ ३४ ॥ राजा, मी ह्या चोवीस गुरूंचा आश्रय केला आहे, व ह्यांच्या वर्तनावरून मी जगामध्यें, आपण कसें वागावें, ते सर्व शिकलों. ॥ ३५ ॥ हे मनुजश्रेष्ठा ययातिपुत्रा, आतां मी कोणापासून काय व कसकसें शिकलों, तें तसतसें तुला सांगतो, चित्त देऊन ऐक – ॥ ३६ ॥

१ ऊर्णा नाभौ यस्य । ज्याच्या नाभीमध्यें तंतु असतात, तो; कोळी, कातीण.
२ शोभनं रूप कीटस्य करोति सः–किड्याला सुंदर रूप देणारा प्राणी. कुंभारीण

(१) पृथ्वीपासून मी हें व्रत शिकलों कीं, प्राणी दैवाच्या अधीन वागत असतात (तें नाचवितें तसे नाचतात), हें तत्त्व लक्षांत धरावें आणि त्यांनीं कितीही तुडविलें किंवा छळिलें तरी धैर्य धरून असावे (निमूटपणें सोसावें, क्षमा करावी) व आपला मार्ग सोडू नये ॥ ३७ ॥ - पर्वत आणि वृक्ष हे भूमीचेच भाग आहेत. त्यापासून कोणते गुण घेतले, तें ऐक - नित्य आपले सर्व व्यापार परोपकारासाठीं असावे. आणि आपला जन्म केवळ दुसऱ्याच्या उपजीविकेसाठीं आहे ही गोष्ट साधकानें पर्वतापासून शिकावी आणि त्यानें वृक्षाचा शिष्य होऊन आपला देह केवळ पराधीन आहे ह्या तत्त्वाचा उपदेश घ्यावा (पर्वत आपल्या पाठीवर उत्पन्न होणारे झाडेंझुडपें गवत, झरे

दैववशानुगैः (दैवाच्या अधीन वागणाऱ्या) भूतैः आक्रम्यमाणः (तुडविला जाणारा) अपि धीरः तत् (तें भूतांचें पराधीनत्व) विद्वान् मार्गात् न चलेत्. [इति] क्षितेः (पृथ्वी-पासून) व्रतं अन्वशिक्षं. ॥ ३७ ॥ साधुः (योगी) भूभृतः (पर्वतापासून) शश्वत् (नित्य) परार्थसर्वेहः (परोपकारासाठीं सर्व व्यापार ज्याचे) परार्थैकांतसंभवः (दुसऱ्यासाठीं केवळ

भूतैराक्रम्यमाणो ऽपि धीरो दैववशानुगैः ॥ तद्विद्वान्न चलेन्मार्गादन्वशिक्षं क्षितेर्व्रतम् ॥ ३७ ॥ शश्वत्परार्थसर्वेहः परार्थैकांतसंभवः ॥

साधुः शिक्षेत भूभृत्तो नगशिष्यः परात्मताम् ॥३८॥ प्राणवृत्त्यैव संतुष्येन्मुनिर्नैवेंद्रियप्रियैः ॥ ज्ञानं यथा न नश्येत नावकीर्येत वाङ्मनः ॥३९॥

जन्म ज्याचा असा) [भवेत्], नगशिष्यः (वृक्षाचा शिष्य) [सन्] परात्मतां (पराधीनपणा) शिक्षेत्. ॥ ३८ ॥ यथा ज्ञानं न नश्येत, वाक्, मनः [च] न—अवकीर्येत (चचल होणार नाहीं), [तथा] मुनिः प्राणवृत्त्या (प्राणाच्या उपजीविकेनें व प्राणामारख्या वृत्तीनें) एव संतुष्येत्, इंद्रियप्रियैः न एव [संतुष्येत्] ॥ ३९ ॥

इत्यादि पदार्थ परोपकारीं लावीत असतो, आणि वृक्ष तर आपलें शरीर म्हणजे खाद्या, फांद्या, खोड वगैरे मुद्धा लोकांनीं तोडून नेलें तरी नेऊं देतो, तशी साधूची वृत्ति असावी). ॥ ३८ ॥ (२) - वायुही दोन प्रकारचा आहे : एक शरीरात संचार करणारा प्राणवायु व दुसरा बाह्य. त्यापैकीं प्राणापासून कोणता उपदेश घ्यावयाचा तो ऐक - प्राणाला केवळ कसला तरी आहार मिळाला की पुरे होतें - तो आहार दिसण्यात सुंदर किंवा खाण्याला गोडच पाहिजे अशी अपेक्षा नसते - मुनीनें तरी प्राणाचा निर्वाह चालेल

१ लोक भूमीबद्दल 'ही जमीन माझी, ही जमीन माझी' असा अभिमान धरून मारे भाडाभाडी करीत असतात, पृथ्वी लोकांचे ते भेदव्यवहार निमूटपणें सपादीत असते, पण स्वताचा अखंड एकपणा मोडीत नाहीं, त्याप्रमाणें योग्यानें, कर्में कितीही भिन्न प्रकारचीं घडत असलीं तरी, आपली अखंडदंडायमानवृत्ति अचल राखावी नाथ, ६३ व ६४ ओंव्यांचा आशय · शिवाय, येथ पृथ्वी भूतीं पूजिली। ना तरी विष्ठामूत्रीं गांजिली। हर्षविषादा नाहीं आली। निश्चळ ठेली निजक्षांती॥ पृथ्वी दाहें करूनि जाळिली। नांगर घालूनि फाळिली। लातवणें तुडविली। तोडिली झाडिली पैं भूतीं॥ तो अपराधु न मानूनि क्षिती। सर्वांचि भूतांतें प्रसन्न होती। तेथेंचि पिकवूनि नाना संपत्ती। तृप्ति देती भूतांतें॥ नाथ, ३६७। ७१। ७२

२ पर्वताचें दातृत्व केवढें असतें पहा.— ग्रीष्मागमीं सर्व सरे। परी तो देता मागें न सरे। (दाखाल भगवान् न्यी कर्मा पड़ देत नहीं एह–) सर्वांचि भगवंतें कीजे पुरें वर्षोनि जलधरें समृद्धि॥ जंव जंव उल्हासें दाता देतु। तंव तंव पुरवी जगन्नाथु। विकल्प न धरितां मनांतु। देतां अच्युतु अनिवार॥ नाथ, ३८१। ८२.

तेवढ्यानेंच संतोष मानावा, इंद्रियांना आवडतील ते पदार्थ खाण्याची ओढ ठेवूं नये. - आहार काहीच न स्वीकारिला तर मन व्याकुळ होउन - ज्ञानाचा नाश होईल असे तर होतां कामा नये, - म्हणून देहनिर्वाह केलाच पाहिजे. - मात्र वाणी आणि मन ही व्यग्र होणार नाहींत अशी व्यवस्था ठेवावी - सौंदर्य, गोडी ह्या गुणाची अपेक्षा धरिली [illegible] वाणीचें आणि मनाचें चाचल्य व्हावयाचेंच. करितां त्यची अपेक्षा ठेवूंच नये म्हणजे झालें - ॥३९॥ - आतां बाह्य वायूपासून काय शिकावयाचें ते सांगतो - विषयांचे धर्म [illegible] उष्ण, गोड, कडू इत्यादि) नाना प्रकारचे असतात, व ते विषय सर्वत्र पसरलेले असल्यामुळें - आपला त्याच्याशी संबंध घडावयाचाच - परंतु योग्यानें विषयांमध्यें प्रवेश करताही आपलें चित्त त्या विषयांच्या गुणदोषांनीं अलिप्त राखावें आणि कोठेंही आसक्त होऊं नये उदाहरण वायूचें (पहा वायु वनांत, वगैरे, सुगंधि पदार्थांवर व त्याच्या विरुद्ध [illegible] नानाधर्मेषु विषयेषु सर्वतः आविशन् (शिरणारा) योगी गुणदोषव्यपेतात्मा [सन्] वायुवत् न—विषज्जेत (आसक्त न होतो) ॥ ४० ॥ इह पार्थिवेषु (पृथ्वीचीं कार्यें असा) देहेषु प्रविष्टः तद्गुणाश्रयः (त्या देहाच्या धर्मांना अवलंबून राहणारा) आत्मदृक् (आत्म्याकडे दृष्टि ठेवणारा असा) योगी गंधैः वायु इव गुणैः न युज्यते ॥ ४१ ॥ अंतर्हित. (देहांत

विषयेष्वाविशन्योगी नानाधर्मेषु सर्वतः ॥ गुणदोषव्यपेतात्मा न विषज्जेत वायुवत् ॥ ४० ॥ पार्थिवेष्विह
देहेषु प्रविष्टस्तद्गुणाश्रयः ॥ गुणैर्न युज्यते योगी गंधैर्वायुरिवाऽऽत्मदृक् ॥ ४१ ॥ अंतर्हितश्च स्थिरजंगमेषु
ब्रह्मात्मभावेन समन्वयेन ॥ व्याप्त्याऽव्यवच्छेदमसंगमात्मनो मुनिर्नभस्त्वं विततस्य भावयेत् ॥ ४२ ॥

राहणारा) [अपि] मुनिः ब्रह्मात्मभावेन (ब्रह्म आत्मा होय अशा भावनेनें), स्थिरजंगमेषु समन्वयेन (अनुवृत्तीने) व्याप्त्या [च] विततस्य (सर्वव्यापी) आत्मनः असंग [illegible] दुर्गंधि स्थलीं असा सर्वत्र संचार करितो. पण कोठें चिकटून राहिला आहे काय? अमुक पदार्थ किंवा स्थळ वायूला आवडलें आणि तो तेथें चिकटून राहिला. असें कधीं [illegible] काय? नाहीं. तशीच आसक्तिरहित चित्तवृत्ति योग्यानें राखावी.) ॥ ४० ॥ - वायु सुगंध, थडपणा, उष्णता, इत्यादि गुणांनीं विशिष्ट असा भासतो तरी वस्तुतः त्याच्या ठिकाणीं कोणतेही धर्म नाहींत, त्याप्रमाणें देहादिकांच्या धर्मांशी योग घडल्यामुळें आत्मा अहंप्रत्ययास येतो तरी तो देहधर्मांनीं युक्त नाहीं, ही गोष्ट तरी मी वायूपासूनच शिकलों पहा :- जसा वायु नानाप्रकारच्या गंधांनीं युक्त नसतो तसाच आत्मज्ञानी योगी पृथ्वीचें कार्य असा ह्या देहामध्यें प्रविष्ट असा आणि त्या देहाच्या बाल्य, [illegible] इत्यादि गुणाचा आश्रय करून वागत असला तरी त्या गुणानीं युक्त होत नाहीं ॥ ४१ ॥ (३) - आकाशापासून काय शिकलो तें ऐक - आत्मा स्थावर व जंगम सर्व

१ क्षुधेचिया तोंडा । मिळो कोंडा अथवा मांडा । तरी रसनेचा पांगडा । न धरी वडकुडा तयासि ॥ नाथ, ४१२. [illegible] शिकण्याजोगा आहे: पहा :— ब्रह्मादिकांचा देह पाळूं । कीं श्वानाचा देह टाळूं । ऐसा न मनीच विटाळू । राग कृपाळू समभावें ॥ तैसें योगियाचें कर्म । न धरी [illegible] मनोधर्म । कदा न देखे अधमोत्तम । मानावमान समभावें ॥ नाथ ४१६ । १७. २ जैसा वायूचे भेटी । सुगंध कांहीं घालेनी गांठी । त्याची आसक्ति नाहीं [illegible] उठाउठी सांडितू ॥ नाथ, ४२८.

पदार्थांमध्यें समन्वयानें (ईश्वराची सत्ता आहे ह्मणून त्या पदार्थांची सत्ता जाणवते अशा व्याप्तीनें) सर्वत्र – सूत्र जसें मण्यांत असतें तसा एकाच भागावर नव्हे – व्यापून भरून राहिलेला आहे. ह्मणून देहाच्या अंतरी राहत असताही मुनीनें, आत्मा ब्रह्मस्वरूप होय अशा भावानें, आत्मा देहादिकांशी सयुक्त नाहीं आणि अर्थात त्याला व्यवच्छेद (तुटके-पणा, इयत्ता) नाहीं अशी आकाशाच्या दृष्टांतानें भावना करावी (आकाश सर्वत्र भरून राहिलें असताही घटादि पदार्थांशीं आसक्त होत नाहीं व विभाग किंवा मोजमाप पावत नाहीं, तसाच आत्मा आहे अशी भावना करावी). ॥ ४२ ॥ - शिवाय, आत्मा नित्य असल्यामुळें त्याचा उत्पत्तिनाशवान अशा देहादिकांचा संबंध नाहीं पहा - जसा वायुनें इतस्ततः चाळविलेल्या मेघाची फळी, धूळ इत्यादि पदार्थांचा आकाशाशीं स्पर्श घडत नाहीं, तसा अंतर्यामी पुरुषाला तेज, उदक व पृथ्वी एतद्रूपी असे कालानें निर्मिलेले जे देह ति नसणें), अव्यवच्छेदं, (परिच्छेद, मोजमाप, इयत्ता नसणें) नभस्त्वं (आकाशाप्रमाणें) [च] भावयेत् (समजो) ॥ ४२ ॥ [यथा] नभः (आकाश) वायुना ईरितैः (प्रेरिलेल्या) मेघाद्यैः, तद्वत् पुमान् तेजोऽब्नमयैः (तेज, उदक व पृथ्वी एतद्रूप) भावैः कालसृष्टैः गुणैः न स्पृश्यते ॥ ४३ ॥ प्रकृतितः (स्वभावतः) स्वच्छ स्निग्ध. (स्नेहयुक्त) माधुर्य

तेजोऽब्नमयैर्भावैर्मेघाद्यैर्वायुनेरितैः ॥ न स्पृश्यते नभस्तद्वत्कालसृष्टैर्गुणैः पुमान् ॥ ४३ ॥ स्वच्छः

प्रकृतितः स्निग्धो माधुर्यस्तीर्थभूर्नृणाम् ॥ मुनिः पुनात्यपां मित्रमीक्षोपस्पर्शकीर्तनैः ॥ ४४ ॥ तेजस्वी

तपसा दीप्तो दुर्धर्षोदरभाजनः ॥ सर्वभक्षोऽपि युक्तात्मा नादत्ते मलमग्निवत् ॥ ४५ ॥

(मधुर) तीर्थभूः (पवित्रतेचें स्थान) अपां (उदकाचें) मित्रं मुनिः ईक्षोपस्पर्शकीर्तनैः (दर्शन, स्पर्श व वर्णन यांनीं) नृणां पुनाति. ॥ ४४ ॥ युक्तात्मा (योगी) तेजस्वी तपस्वी विकारी गुण त्याचा संबंध नाहीं. ॥४३॥ (४) - उदकापासून कोणते गुण घ्यावे, तें ऐक - मुनीनें उदकाची मैत्री संपादावी (ज्याचे गुण पारखे असतील त्याची मैत्री जमते असा नियम आहे ह्मणून उदकासारखे गुण आपल्या आगीं करून घ्यावे ते गुण असे –) उदक स्वभावतः स्वच्छ व स्निग्ध असून मधुर आणि मनुष्यांना शुद्धता मिळण्याचें स्थान असतें, मुनीनें तसें व्हावें आपलें चित्त निर्मळ (रागद्वेषादिदोषरहित) राखावें, प्राणिमात्राशी प्रेमळपणें वागावें, त्याशी गोड बोलावें आणि मनुष्यांना शुद्धि मिळण्यास आगर होऊन राहावें. (ह्मणजे मुनि आपलें दर्शन, स्पर्श व वर्णन करणाऱ्या जनांना पवित्र करितो) ॥४४॥ (५) - अग्नीपासून शिक्षणीय गुण कोणते, तें ऐक – अग्नि तेजस्वी व

१ वैर सर्पमुंगुसासीं । आकाश दोहींचें हृदयवासी । वैरनिर्वैरता आकाशासी । ते स्थिती योगियासी पाहिजे ॥ नाथ, ४३८.

२ ' अघान्मित्रं ' असा कोठें पाठ सांपडतो. त्यापक्षीं अर्थ ' मित्राला पापापासून पवित्र करितो ' असा करावा ३ नाथ ह्मणतात, योगाच्या गुणांना उदकाची उपमा उपयोगी पडणार किती? कारण— जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ । उदक सुखी करी एक वेळ । योगिया सर्व काळ सुखदाता ॥ उदकाचें सुख तें किती । सवेंचि क्षणें तृषित होती । योगिया दे स्वानंदतृप्ति । सुखासि विकृति पैं नाहीं ॥ इत्यादि ४६६ । ६७. ४ देवाचें कीर्तन करणें सोडून मुनीचें वर्णन करीत बसणार कोण अशी शंका कोणी काढील तर तिचें उत्तर नाथ देतात :—

(पुढें चालू)

तापशक्तीनें प्रकाशमान असतो. त्याचा अपमान करणें कोणालाही कठीणच जातें, शिवाय त्याचें धान्याचें कोठार अथवा द्रव्याची थैली काय तें उदर असतें (उदरांत जें काहीं मांठविता येईल तेवढें येईल, दुसरा सांठा कोठें काहीं तो करून ठेवीत नाही) आणि तो आवडनिवड न करितां मिळेल तो पदार्थ भक्षण करितो. पण काही खाल्लें तरी मळून त्याच नाही (वाईट खाल्ल्यामुळें अग्नि बिघडला, व निरुपयोगी झाला, असें कधी होत नाही) ज्यानें आपलें चित्त जिंकिलें तो योगी तसा (अग्नीसारखा) असतो म्हणजे तो ज्ञान नि-शयानें तेजस्वी, तपश्चर्येच्या योगें प्रकाशमान, कोणालाही अवमान करिता येणार नाही असा, उदर हें संग्रहस्थान समजणारा (धनधान्यादिकांचा संग्रह न करणारा), व मनु-जगत्या जें मिळेल तें सर्व भक्षून पुन्हा निर्मळ राहणारा असतो. ॥ ४५ ॥ - अग्नीपासून घेण्यासारखे आणखीही गुण आहेत, ते असे – तो कित्येक स्थळीं आच्छादित असतो. दीप्तः (प्रकाशमान) दुर्धर्षोदरभाजनः (पराभवण्यास कठिण असा व उदर हेंच संग्रहस्थान ज्याचें असा) सर्वभक्ष अपि अग्निवत् मलं न—आदत्ते (स्वीकारीत नाहीं) ॥ ४५ ॥ क्वचित् छन्नः (गुप्त) क्वचित् स्पष्टः श्रेयः (कल्याण) इच्छता उपास्यः (उपासना करण्याजोगा) सर्वत्र दातृणां (दान करणारांचें) प्रागुत्तराशुभं (पूर्वींचें पुढें व घडणारें पाप) दहन् भुङ्क्ते (भक्षितो,

क्वचिच्छन्नः क्वचित्स्पष्ट उपास्यः श्रेय इच्छताम् ॥ भुंक्ते सर्वत्र दातृणां दहन्प्रागुत्तराशुभम् ॥ ४६ ॥

स्वमायया सृष्टमिदं सदसल्लक्षणं विभुः ॥ प्रविष्ट ईयते तत्तत्स्वरूपो ऽग्निरिवैधसि ॥ ४७ ॥

जाळितो, नाहींसें करितो). ॥ ४६ ॥ स्वमायया सृष्ट सदसल्लक्षण (उच्चनीचरूप) इदं प्रविष्टः विभुः एधसि (काष्ठांत) अग्नि इव तत्तत्स्वरूप ईयते (प्रतीतीस येतो) ॥ ४७ ॥ कोठें आपलें स्वरूप प्रगट करितो, ज्यांना आपलें कल्याण व्हावें अशी इच्छा असते. त्या लोकांनी त्याची उपासना करणें योग्य असतें, व तो सर्व स्थळीं दाते (होम करणारे) पुरुष जें काहीं हविर्द्रव्य देतील तें भक्षून त्यांचीं भूत भविष्य पापें जाळून टाकितो, तसेंच साधकानें वर्तन ठेवावें (एकाद्या प्रदेशांत गुप्त असावें, कोठें प्रगट फिरावें, कल्या-णेच्छु जनांचें उपास्य दैवत व्हावें, व जो कोणी जें काही देईल तें भक्षून दात्याची प्राचीन व भविष्यकाळीं घडणारीं पापें जाळीत असावें) ॥ ४६ ॥ अग्नि ज्या काष्ठामध्यें प्रविष्ट होतो, त्या काष्ठाच्या आकारासारखा, लांब, वाटोळा, चपटा वगैरे दिसतो, मूळचे अग्नीला ते गुण नाहींत तसा आत्मा व्यापक असूनही स्वतःच्या मायेनें निर्मिलेल्या उच्च नीच भूतामध्यें (देवतिर्यगादियोनींत, किंवा ब्राह्मण, शूद्र इत्यादि वर्णांमध्यें) प्रविष्ट झाला असता त्या त्या भूताच्या रूपासारखा प्रतीतीला येतो. - पण त्याला वस्तुतः उच्चनीचता

सांडूनि भगवंताचें कीर्तन । केल्या भक्तांचें नामस्मरण । कैंवी तुटे भवबंधन । ऐसें न म्हणें सर्वथा ॥ देवाहि पूर्वी नामचि नव्हा । त्यासि भक्तीं प्रतिष्ठूनि पाहीं । नामरू-पादि सर्वही । नाना विलासही अर्पिले ॥ नाथ, ४७८ । ७९.

१ पेरिर्यांच्या ही ठायीं । भावबळें भाविक पाहीं । अर्पिती जें जें कांहीं । तेणें मोक्ष पाही मुमुक्षा ॥ तें पडताचि योगियाच्या मुखीं । संचित क्रियमाण आसकीं । जाळो-नियां एकाएकीं । करी सुखी निजपदीं ॥ नाथ, ५०१ । २.

नाहींत. - ॥ ४७ ॥ (१) - चंद्रापासून काय उपदेश घेतला तें सांगतों, ऐक - कला वाढल्या किंवा क्षय पावल्या तरी चंद्राला वृद्धि क्षय हीं नसतात, त्याप्रमाणें ज्याचा मार्ग
(गति, चाल) स्पष्ट कळून येत नाहीं, त्या कालाच्या योगें जन्मापासून मृत्यूपर्यंत जे विकार घडतात ते सगळे देहाचे होत, आत्म्याचे नव्हत ॥ ४८ ॥ - अग्नीपासून
घेतलेला आणखी एक गुण सांगावयाचा राहिला. तो ऐक :- कालाचा वेग प्रवाहासारखा आहे (नदीचें पाणी सारखें वाहत असतें पण वाहून गेलेल्या पाण्याच्या जागी वरून
अव्यक्तवर्त्मना (अस्पष्ट मार्ग ज्याचा, अशा) कालेन चंद्रस्य कलानां इव विसर्गाद्याः (जन्म आदि ज्यांत असे) श्मशानान्ताः (मृत्यु शेवटीं ज्यांच्या, असे) भावाः देहस्य, आत्मनः

विसर्गाद्याः श्मशानांता भावा देहस्य नाऽऽत्मनः ॥ कलानामिव चंद्रस्य कालेनाव्यक्तवर्त्मना ॥ ४८ ॥
कालेन ह्योघवेगेन भूतानां प्रभवाप्ययौ ॥ नित्यावपि न दृश्येते आत्मनोऽग्नेर्यथाऽर्चिषाम् ॥ ४९ ॥

न. ॥ ४८ ॥ यथा अग्नेः अर्चिषां (ज्वालांचे), [तथा] ओघवेगेन (प्रवाहासारखा वेग ज्याचा अशा) कालेन आत्मनः (आत्म्याचे उपाधिभूत अशा) भूतानां (देहादिकांचे) नित्यौ
दुसरें पाणी येतें ह्मणून पात्र रिकामें पडत नाही व पाण्याची गति लक्षांत भरत नाही, तशीच कालाची गति आहे, आजपर्यंत अगणित युगें काल निघून गेला व पुढेंही असाच
जाणार, ह्या क्षणीं जो काल आहे तो पुढल्या क्षणीं नाहीं, असा कालप्रवाह नकळत अखंडपणानें चाललेला आहे) त्या कालाच्या योगें, आत्म्याच्या उपाधिभूत देहादिकांचे ज-
न्मनाश नित्यें क्षणोक्षणी चाललेले असतात, पण ते दिसून येत नाहींत ह्याला उदाहरण अग्नीच्या ज्वालांचें (अग्नि धडाडून पेटलेला असला ह्मणजे आपल्याला ज्वाला एकसा-

१ चंद्रमंडळ उदकमय आहे, आणि सूर्य तेजोमय आहे सूर्य आणि चंद्र दोघे एका नक्षत्रावर आले कीं चंद्राच्या (हा सूर्यमंडळापेक्षा वर आहे पंचमस्कंध अ० २२ श्लो० ८ पहा) आणि आपल्या (भूलोकाच्या)
मध्ये सूर्य असल्यामुळें चंद्र आच्छादून जातो व आपल्याला दिसत नाहीं ती अमावस्या होय ('**अमावस्या**' शब्दाचा अर्थ तरी '**अमा-सह-वसतः चंद्राकौं अस्यां सा**' ह्मणजे 'चंद्रसूर्य हे
ज्या दिवशीं एकत्र राहतात ती' असा आहे) पुढें साठ घटिकांनीं चंद्र दुसऱ्या नक्षत्रावर जातो आणि सूर्याला तर दुसऱ्या नक्षत्रावर जाण्याला तेरा अहोरात्रें लागतात ह्मणून प्रतिपदेपासून, चित्रमयूर्खी
असणाऱ्या सूर्याचा पंधरावा पंधरावा भाग प्रतिदिनीं एकेक अधिक असा उदकमय चंद्रमंडळांत प्रतिबिंब पावलेला दिसून येतो ह्याला कला असें ह्मणतात असें होताहोता पंधराव्या दिवशीं सूर्यचंद्रामध्यें तेरा
नक्षत्रांचें अंतर पडून सत्तावीसनक्षत्रात्मक राशिचक्राच्या मध्यावर समोरासमोर चंद्रसूर्य येतात आणि त्यावेळीं संपूर्ण सूर्यबिंब चंद्रमंडळांत प्रतिबिंबित दिसतें ती पौर्णिमा. चंद्राच्या सोळा कला ह्मणतात, त्या
पौर्णिमेपर्यंत प्रतितिथीची एकेक अशा पंधरा व अमावस्याप्रतिबिंब सोळावें ह्या होत पुन्हा कृष्ण प्रतिपदेपासून दोघांचीं मंडळें बाजूला गेलीं कीं प्रतिदिनीं प्रतिबिंबित भाग कमी होत जातो, त्याला कलांचा ऱ्हास
ह्मणतात. एकंदरीत वृद्धिक्षय कलांचे होतात, ते उदकमय चंद्रमंडळाला लागू नाहींत. २ प्रतिक्षणं देहोत्पत्तिविनाशानंगीकारे प्रत्यवयवं भुक्ताम्नादेरवयवसंयोगविभागाभावेन
देहवृद्धिऱ्हासाद्यभावप्रसंगात् नित्यप्रलयस्य द्वादशे वक्ष्यमाणत्वाच्च । प्रतिक्षणीं देहाचे उत्पत्ति नाश होतात ही गोष्ट न स्वीकारिली तर, आपण जे अन्नादि पदार्थ भक्षण
करितो त्याचे प्रत्येक अवयवामध्यें तत्तदवयवद्वारानें संयोग व विभाग होत नाहींत असें ह्मणावें लागेल आणि देहाची पुष्टि कृशता इत्यादि कांहींच होऊं नयेत असा प्रसंग येईल, आपला अनुभव तर पौष्टिक

(पुढें चालू)

वाटत्या दिसतात, पण वस्तुतः प्रतिक्षणींची प्रत्येक ज्वाला निराळी असते, क्षणापूर्वी आढळणारी जी ज्वाला दिसली ती पुन्हा म्हणून आपल्याला दिसायाची नाही, निश्चयाने ज्योतीवर जी ज्वाला दिसते ती नवी उत्पन्न झालेली दुसरी होय. तिचीही व्यवस्था पहिलीप्रमाणेंच व्हावयाची व असाच क्रम सतत चालावयाचा त्याप्रमाणे आपल्या देहाचे प्रतिक्षणीं जन्म नाश होत आहेत. क्षणापूर्वी जो देह होता, तो आता नाहीं व आता आहे तो पुढल्या क्षणात नसणार शरीराचे प्रत्येक भाग प्रतिक्षणी नवे उत्पन्न होऊन जुने नाश पावतात सूक्ष्म दृष्टीने पाहणाराच्या ध्यानात ही गोष्ट आलेली असेल की, आपल्या शरीरावरील त्वचा, केस नखे, हीं सूक्ष्म प्रमाणाने रोज वाढतात आणि वरची जीर्ण झालेली ती गळून जात असतात. अंतर्व्यवस्था सगळी अशीच आहे. हीच गोष्ट नीट लक्षात येण्याला खरजेचे उदाहरण घ्यावे फोड बरा होतो केव्हा? नासलेला सगळा भाग झडून जाऊन त्या ठिकाणीं नवा येतो तेव्हा. पण नवी त्वचा वगैरे येणें खरजेच्या फोडापुरतीच असतात असे नाहीं, तर तो फोड भरेपर्यंत त्या जागेवर तितकी नवी त्वचा आली तितकी सर्वांगावर येऊन

अपि प्रभवाप्ययौ (उत्पत्ति व नाश) न दृश्येते. ॥ ४९ ॥ गोपतिः (किरणांचा स्वामी, सूर्य) गोभिः (किरणांनीं) गाः (उदकाला) इव योगी यथाकाल (योग्य वेळीं) गुणैः (इंद्रियांनीं) गुणान् (विषय) उपादत्ते (स्वीकारितो), विमुंचति, तेषु न—युज्यते [च]. ॥ ५० ॥ स्वे (स्वरूपीं) अवस्थितः (राहिलेला) आत्मा भेदेन न बुद्ध्यते, स्थूलमतिभि

गुणैर्गुणानुपादत्ते यथाकालं विमुंचति ॥ न तेषु युज्यते योगी गोभिर्गा इव गोपतिः ॥ ५० ॥

बुध्यते स्वे न भेदेन व्यक्तिस्थ इव तद्गतः ॥ लक्ष्यते स्थूलमतिभिरात्मा चावस्थितोऽर्कवत् ॥ ५१ ॥

व्यक्तिस्थः (व्यंजक उपाधीमध्यें राहणारा) [सः] तद्गतः (त्यांत प्रविष्ट झाल्यासारखा) इव अर्कवत् लक्ष्यते ॥ ५१ ॥

त्या जागची जुनी त्वचा झडून गेली असें समजावें. शरीरांतील रक्त मांस इत्यादि सर्व प्रतिक्षणीं अशीच बदलतात. असो) - एकंदरीत देह क्षणभंगुर आहे हे लक्षात घेऊन त्यावर आसक्त राहूं नये तर वैराग्य धरावें. - ॥ ४९ ॥ (७) सूर्यापासून दोन गुण घ्यावयाचे आहेत पैकीं पहिला गुण हा - सहस्रकिरण (सूर्य) आपल्या किरणांच्या योगें उदक शोषून घेतो व योग्य काळीं (पावसाळ्यात) त्याची परत वृष्टिही करितो पण त्या कर्तृत्वाबद्दल अभिमान अगदीं बाळगीत नाहीं, तसाच योगी पुरुषही इंद्रियांच्या योगें विषय ग्रहण करितो, व योग्य प्रसंगी (कोणी याचक आला असता) त्याला ते देऊनही टाकितो पण त्या विषयावर आसक्त होत नाहीं (मी अमुक मिळविलें आणि दान केलें ह्याबद्दल अभिमान धरीत नाहीं). ॥ ५० ॥ - सूर्यापासून घेतलेला दुसरा गुण असा - आकाशस्थ सूर्यमंडळ - एकच आहे पण पाण्यानें भरलेल्या दहा पांच भांड्यांत त्याचें

पदार्थ मळिले असता ते त्याला अवयवीं मिळून देह पुष्ट होतो, स्थूल पदार्थ जळे असता शरीर कृश होते, असा अहे करिता देहाचे प्रतिक्षणीं उत्पत्तिनाश सारखेच चाललेले आहेत असें ह्या प्रसंगात सम. स्पष्ट वर्णन येणार आहेच. (अध्याय ४ श्लो० ३६ पहा) मल्हारीमार्तंड कवि म्हणतात— अनिवार काळनदीची गति । लक्ष लक्षेना निश्चिती । ते सूक्ष्मचि गति दिसते अतिनिगुती परिवेसीं ॥ दीपू तोचि तोहा म्हणती । परी शिखा क्षणक्षणा जाती । ते लक्षेना सूक्ष्म गती । अर्थी म्हणती विझाला ॥ ५२८ , २९.

ठेविलीं आणि त्यांत पाहिलें तर प्रत्येक भांड्यांतील प्रतिबिंबाच्या रूपानें सूर्य दहा पाच प्रकारचा दिसतो, - तसाच आत्मा स्वस्वरूपीं राहिलेला असता भिन्नपणानें स्फुरत नाहीं पण व्यंजक देहादि उपाधींमध्यें प्रतिबिंबित झाला असता स्थूलबुद्धि पुरुषाना उपाधीत शिरल्यामागखा भिन्न रूपानें भासू लागतो ॥ ५१ ॥ (८) - कपोतापासून काय शिकलों, तें ऐक:- कोणी कशावरही अति प्रेम किंवा लालनाची आवड ठेवू नये, ठेवील तर त्याची बुद्धि कपोतासारखी दीन होऊन त्याला संताप भोगावा लागेल ॥ ५२ ॥ क अपि केनचित् अतिस्नेहः, प्रसंगः (लालनाची आसक्ति) वा न कर्तव्यः. कुर्वन् [सन्] दीनधीः कपोतः इव संतापं विंदेत (पावेल) ॥ ५२ ॥ अरण्ये वनस्पतौ कृतनीडः (केलें घरटें ज्यानें असा) कश्चन कपोतः कपोत्या भार्यया सार्धं कतिचित् समाः (वर्षे) उवास (राहत असे) ॥ ५३ ॥ गृहधर्मिणौ (गृहस्थाश्रमातील धर्म

नातिस्नेहः प्रसंगो वा कर्तव्यः क्वापि केनचित् ॥ कुर्वन्विंदेत संतापं कपोत इव दीनधीः ॥ ५२ ॥

कपोतः कश्चनारण्ये कृतनीडो वनस्पतौ ॥ कपोत्या भार्यया सार्धमुवास कतिचित्समाः ॥ ५३ ॥

कपोतौ स्नेहगुणितहृदयौ गृहधर्मिणौ ॥ दृष्टिं दृष्ट्यांऽगमंगेन बुद्धिं बुद्ध्या बबंधतुः ॥ ५४ ॥

शय्यासनाटनस्थानवार्ताक्रीडाशनादिकम् ॥ मिथुनीभूय विस्रब्धौ चेरतुर्वनराजिषु ॥ ५५ ॥

पाळणारे) स्नेहगुणितहृदयौ (प्रेमानें बांधलीं गेलीं हृदयें ज्यांचीं असे) कपोतौ दृष्ट्या दृष्टिं, अंगेन अंगं, बुद्ध्या बुद्धिं [च] बबंधतुः. ॥ ५४ ॥ मिथुनीभूय (दोघें मिळून) विस्रब्धौ कोणीएक कपोत (ढिवा) पक्षी अरण्यात एका वृक्षावर घरटें बांधून, आपली भार्या जी कपोती तिजसहवर्तमान, कित्येक वर्षें राहत असे ॥ ५३ ॥ गृहधर्म स्वीकारून (संसार-सुखाचा उपभोग घेत) राहणाऱ्या त्या दंपत्याचीं हृदयें प्रेमपाशानें परस्परावर इतकीं जडून गेलीं होतीं कीं, जणो त्यांनीं आपली देह व इंद्रियें—दृष्टि दृष्टीशीं, अंग अंगाशीं व बुद्धि बुद्धीशीं अशीं—एकत्र बांधून ठेविलीं होतीं. ॥ ५४ ॥ त्यांनी निजणें, बसणें, फिरणें, उभें राहणें, सुखदु:खाच्या गोष्टी बोलणें, खेळणें, खाणें इत्यादि सर्व व्यवहार दोघांनीं मिळून

१ सूर्यो थिल्लरामाजी (डबक्यात) बिंबला । मूढ ह्मणती थिल्लरी बुडाला । त्याचे कपें कंपु मानिला । डहुळें डहुळला ह्मणती तो ॥ त्या थिल्लराते नातळतां । गगनीं अलिप्त जैसी सविता । तैसीच योग्याची योग्यता । देहावीता देहकर्में ॥ नाथ, ५३९ । ४०

२ बालप्रबोधिनीकार 'स्वे न' अशीं दोन पदें वेगळीं न काढिता 'स्वेन' हें एकच पद समजून 'स्वेन अवस्थितः [अपि] स्थूलबुद्धिभिः भेदेन लक्ष्यते' असा अन्वय लावितात, त्याचा अर्थ 'स्वस्वरूपानें राहिलेला (एक) असताही त्याला डोबळबुद्धीचे (अज्ञानी) लोक भेदभावानें पाहतात' असा होय

३ देखोनि मृगजळाचा पूरू । मूर्ख करू जाती तारू । तैसा मिथ्या हा संसारू । भयंकर मूर्खांसी ॥ नाथ, ५४५.

करावे (एकानें दुसऱ्याला क्षणमात्र विसंबूं नये), आणि निःशंकपणें वनराजीमध्यें फिरत असावें. ॥ ५५ ॥ राजा, - कपोती आपल्या पतीला हांसत मुरडत पाहणें, गोड गोड बोलणें इत्यादि विलासांनीं - संतोषवी म्हणून कपोताचें मन तिजविषयीं सदय व सुप्रसन्न असे नित्य. ज्या ज्या पदार्थांवर इच्छा जाईल तो तो इच्छित पदार्थ मिळविण्यात कितीही कष्ट पडले तरी, त्यानें तिला आणून द्यावा. कारण, इंद्रियें जिंकिलीं नसल्यामुळें - तो तिचा अगदीं दास झाला होता - ॥ ५६ ॥ - पुढें भगीत अग, - कपोतीच्या उदरीं गर्भ राहिला आणि योग्य काळ प्राप्त झाला (दिवस पूर्ण भरले) असता ती साध्वी घरट्यामध्यें पतीच्या सन्निध, अंडीं प्रसवली ॥ ५७ ॥ ती अंडीं - प्रथम पाण्याने ...

(विश्वासयुक्त, निर्भय) [संतौ] वनराजिषु शय्यासनाटनस्थानवार्ताक्रीडाशनादिकं चेरतुः (फिरत) ॥ ५५ ॥ राजन्, तर्पयन्ती (मन रिझविणारी) सा अनुकंपिता (... ज्यावर अशी) [सती] यं यं वांछति (इच्छा करी), अजितेंद्रियः (नाहीं जिंकिलीं इंद्रियें ज्यानें असा) [सः] तं तं कामं कृच्छ्रेण (मकष्टानें) अपि समनयत् ॥ ५६ ॥ ... कपोती प्रथम गर्भं गृह्णती (धरणारी) काले आगते [सति], स्वपत्युः सन्निधौ अंडानि सुषुवे (प्रसवली) ॥ ५७ ॥ काले तेषु हरेः दुर्विभाव्याभि (...) —

यं यं वांछति सा राजंस्तर्पयंत्यनुकंपिता ॥ तं तं समनयत्कामं कृच्छ्रेणाप्यजितेंद्रियः ॥५६॥ कपोती प्रथमं गर्भं गृह्णती काल आगते ॥ अंडानि सुषुवे नीडे स्वपत्युः संनिधौ सती ॥ ५७ ॥ तेषु काले व्यजायंत रचितावयवा हरेः ॥ शक्तिभिर्दुर्विभाव्याभिः कोमलांगतनूरुहाः ॥ ५८ ॥ प्रजाः पुपुषतुः प्रीतौ दंपती पुत्रवत्सलौ ॥ शृण्वंतौ कूजितं तासां निर्वृतौ कलभाषितैः ॥ ५९ ॥ तासां पतत्रैः सुस्पर्शैः कूजितैर्मुग्धचेष्टितैः ॥ प्रत्युद्गमैरदीनानां पितरौ मुदमापतुः ॥ ६० ॥

शक्तिभिः रचितावयवाः (रचिले अवयव ज्यांचे असे) कोमलांगतनूरुहाः (कोमल अंगें व पंख ज्यांचे असे) [पक्षिण] व्यजायन (जन्मले) ॥ ५८ ॥ तासां कूजित (...) कलभाषितैः (मधुर भाषणांनीं) निर्वृतौ (सुखी) पुत्रवत्सलौ दंपती प्रीतौ [संतौ] प्रजाः पुपुषतुः ॥ ५९ ॥ पितरौ अदीनानां (आनंदी) तासां सुस्पर्शैः, पतत्रैः (...), हरीच्या - स्वभाव, कर्म इत्यादि - अचिंत्य शक्तीच्या योगें, पक्ष्यांचे आकार रचिले गेले. त्यांचे अवयव व पंख कोमल होते (अंडीं फुटून त्यांतून कोंवळीं पिलें बाहेर पडलीं). ॥ ५८ ॥ - तीं अपत्यें पाहून - दंपत्याला फार संतोष वाटला. उत्तरोत्तर त्यांची पिलांवर अधिकाधिक प्रीति जडत गेली. पिलांचें कूजित व मंजुळ भाषण ऐकून त्या जोड्याला सुख वाटे. अशा रीतीनें समाधानानें तीं आपल्या संततीचें पोषण चालवीत असत । ५९ । पिलांचे मऊ मऊ पंख, चिव चिव शब्द, मनोहर आणि आनंदित

१ हा संबोधनाचा उद्देश, तुला हा प्रकार अनुभवानें अवगत असेल, असें यदूला आठवावें हा होय. २ अनुकंपिता - कृपापूर्वक मनें दिला ... इच्छित पदार्थ आणावयास लावावें. ... ...

मुद्रेनें वागडन सामोरे येणें इत्यादिकांच्या योगें आईबापांस मोठा संतोष होई ॥ ६० ॥ प्रेमानें उभयतांचीं हृदयें एकमेकांवर अत्यंत जडून गेलीं होतीं विष्णुमायेनें पूर्ण मोह झा-
ल्यामुळें त्याच्या बुद्धि दीन झाल्या होत्या (त्यांना दुसरा तिसरा कांहीं विचार सुचत नसे तर) ते जोडपें केवळ आपल्या लहान अर्भकांचें पोषण करण्यांत गुंगून राहिलें होतें
॥ ६१ ॥ एके प्रसंगीं तें कुटुंबवत्सल दंपत्य, पिलांसाठीं अन्न मिळवून आणण्याकरितां, बाहेर निघालें, व कोठें तरी अन्न सांपडेल ह्या आशेनें त्या अरण्यांत पुष्कळ वेळ इकडे
तिकडे फिरत राहिलें. ॥ ६२ ॥ इकडे त्यांचीं पिलें आपल्या घरट्याच्या आसपास वागडत होतीं तीं सहजगत्या त्या वनप्रदेशीं फिरणाऱ्या एका पारध्याच्या दृष्टीस पडलीं.

कूजितैः, मुग्धचेष्टितैः (बाळलीलांनीं), प्रत्युद्गमैः (सामोरें येण्यानीं) च मुदं (आनंद) आपतुः (पावले) ॥ ६० ॥ अन्योन्यं स्नेहानुबद्धहृदयौ विष्णुमायया विमोहितौ दीन-
धियौ [तौ] शिशून् (लहान) प्रजाः पुपुषतुः ॥ ६१ ॥ एकदा तासां अन्नार्थं अर्थिनौ (इच्छा करणारे) कुटुंबिनौ तौ तस्मिन् कानने (वनांत) परितः (चहूकडे) चिरं (पुष्कळ वेळ)
चेरतुः (फिरत राहिले) ॥ ६२ ॥ यदृच्छातः (सहजगत्या) वनेचरः (त्या वनांत फिरणारा) कश्चित् लुब्धकः (पारधी) स्वालयान्तिके (आपल्या घरट्यासमीप) चरतः (वागडणाऱ्या

स्नेहानुबद्धहृदयावन्योऽन्यं विष्णुमायया ॥ विमोहितौ दीनधियौ शिशून्पुपुषतुः प्रजाः ॥ ६१ ॥
एकदा जग्मतुस्तासामन्नार्थं तौ कुटुंबिनौ ॥ परितः कानने तस्मिन्नर्थिनौ चेरतुश्चिरम् ॥ ६२ ॥
दृष्ट्वा तांल्लुब्धकः कश्चिद्यदृच्छातो वनेचरः ॥ जगृहे जालमातत्य चरतः स्वालयान्तिके ॥ ६३ ॥
कपोतश्च कपोती च प्रजापोषे सदोत्सुकौ ॥ गतौ पोषणमादाय स्वनीडमुपजग्मतुः ॥ ६४ ॥
कपोती स्वात्मजान्वीक्ष्य बालकान् जालसंवृतान्॥ तानभ्यधावत्क्रोशंती क्रोशतो भृशदुःखिता ॥ ६५ ॥

तान् दृष्ट्वा जालं आतत्य (पसरून) जगृहे (धरिता झाला) ॥ ६३ ॥ प्रजापोषे सदा उत्सुकौ गतौ कपोती, कपोतः च पोषं (पोषणाचें साधन, अन्न,) आदाय स्वनीडं (आपल्या
घरट्यास) उपजग्मतुः ॥ ६४ ॥ कपोती बालकान् स्वात्मजान् जालसंवृतान् (जाळ्यानें वेष्टिलेले) क्रोशतः वीक्ष्य भृशदुःखिता क्रोशंती [सती] तान् (अभ्यधावत) ॥ ६५ ॥

तत्काल त्यानें आपलें जाळें पसरून त्यांत त्या पिलांना धरिलें ॥ ६३ ॥ कपोत आणि कपोती संततीचें पालन पोषण करण्यास नित्य उत्सुक असत. व त्या कामासाठींच तीं बाहेर
गेलीं होतीं, आतां तीं भक्ष्य घेऊन परत आपल्या घरट्याजवळ आलीं ॥ ६४ ॥ - तों दैवानें त्यांना दाखविण्यासाठीं विपरीतच खेळ मांडून ठेविला होता - आपलीं लहान
लहान बाळें जाळ्यांत गुंतून गेलीं असून आक्रोश करीत आहेत असें दृष्टीस पडतांच कपोतीला अत्यंत दुःख झालें व तिनें धाय मोकलीत त्यांजकडे धाव घेतली. ॥ ६५ ॥

स्नेहपाशाचे वारंवार एकावर एक वेढे बसून तिचें हृदय पूर्ण बद्ध झालें होते आणि परमेश्वराच्या मायेनें तिचें चित्त इतकें वेडें करून सोडिलें होतें कीं, बद्धदीन पिलें जाळ्यांत सापडलीं गेलीं आहेत असें दिसत असतांना, तिला - आपण उडी घातली तर आपलीही हीच दशा होईल ह्या गोष्टीचें - भान राहिलें नाहीं आणि शेवटी तीही स्वतः जाळ्यांत पडून बद्ध झाली ! ॥ ६६ ॥ कपोतावर - आलेला तो प्रसंग कोण वर्णू शकेल ? - जिवापेक्षाही प्रिय अशीं अपत्यें फासांत सापडलीं आणि आपल्या अनुरूप भार्येनेंही तीच वाट धरिली तेव्हां बिचारा अतिदुःखाकुल होऊन विलाप करूं लागला :- ॥ ६७ ॥ ' केवढाहो माझा घात झाला पहा ! पदरी पुण्याई अगदीं थोडी, म्हणून माझी बुद्धि दुष्ट (विषयासक्त) अजमायया असकृत् (वारंवार) स्नेहगुणिता (प्रेमानें बद्ध) दीनचित्ता सा बद्धान् पश्यंती [अपि] अपस्मृतिः (गेली स्मृति जिची अशी) [सती] स्वयं शिचा (जाळ्यानें) अबध्यत (बांधली गेली.) ॥ ६६ ॥ अतिदुःखितः दीनः कपोतः बद्धान् आत्मनः अपि अधिकान् प्रियान् स्वात्मजान्, आत्मसमां भार्यां च विललाप—॥ ६७ ॥ ' अहो अल्पपुण्य-

सा ऽसकृत्स्नेहगुणिता दीनचित्ता ऽजमायया ॥ स्वयं चावध्यत शिचा बद्धान्पश्यंत्यपस्मृतिः ॥ ६६ ॥ कपोतश्चाऽऽत्मजान्बद्धानात्मनो ऽप्यधिकान्प्रियान् ॥ भार्यां चाऽऽत्मसमां दीनो विललापातिदुःखितः ॥६७॥ अहो मे पश्यतापायमल्पपुण्यस्य दुर्मतेः ॥ अतृप्तस्याकृतार्थस्य गृहस्त्रैवर्गिको हतः ॥ ६८ ॥ अनुरूपा ऽनुकूला च यस्य मे पतिदेवता ॥ शून्ये गृहे मां संत्यज्य पुत्रैः स्वर्याति साधुभिः ॥ ६९ ॥ सो ऽहं शून्ये गृहे दीनो मृतदारो मृतप्रजः ॥ जिजीविषे किमर्थं वा विधुरो दुःखजीवितः ॥ ७० ॥

स्य दुर्मतेः मे अपायं (नाश) पश्यत ! अतृप्तस्य अकृतार्थस्य [सतः], त्रैवर्गिकः (त्रिवर्ग पुरुषार्थांचें साधन) गृहः (गृहाश्रम) हतः. ॥ ६८ ॥ यस्य मे अनुरूपा अनुकूला पतिदेवता [भार्या] शून्ये गृहे मां संत्यज्य साधुभिः (पुण्यवान) पुत्रैः [सह] स्वः (स्वर्गाला) याति. ॥ ६९ ॥ सः मृतदारः मृतप्रजः दीनः विधुर दुःखजीवित अहं राहिली ! ऐहिक सुखाबद्दल मला तृप्ति वाटली नाहीं आणि पारलौकिक कल्याणाची जोड मीं मिळविली नाहीं अशा स्थितींतच, - धर्म, अर्थ, काम - हे त्रिविध पुरुषार्थ साधण्याचें स्थान, असा माझा गृहाश्रम नष्ट झाला ! ॥ ६८ ॥ माझी भार्या कशी अगदीं माझ्या मनाप्रमाणें वागणारी व पतीला (नवऱ्या) देवाप्रमाणें भजणारी होती पण आता ती ह्या ओसाड घरांत मला टाकून आपल्या पुण्यवान पुत्रांसहवर्तमान स्वर्गास जात आहे ' ॥ ६९ ॥ बायको मेली, मुलें मेलीं, आणि आतां मला विधुरावस्थेंत दीनपणें ह्या

१ वल्लभाचार्यैरधिकार इत्यनाहुः— स्वर्याति यातीत्यपि तत्र प्रेमवशाच्छ्रेष्ठत्वाभिमानेनोक्तं लोकेऽप्येवमेवोक्तिः प्रसिद्धा ।
' स्वर्गास जात आहे ' हें वाक्य तरी वाक्कोवर प्रेम फार असल्यामुळें ती श्रेष्ठ पुण्यवान होती असा अभिमानानें कपोताच्या मुखांतून निघालें, एवढेंच लोकव्यवहारांत प्रेमाच्या माणसाबद्दल असेंच म्हणण्याची चाल प्रसिद्ध आहे त्याच्या हातून पुण्य किंवा पाप किती घडलें आहे, ह्याबद्दल मागून कोणी शंका काढीत नाहीं अथवा, प्रेमानें प्राणी इतके आंधळे होऊन जातात की प्रेमपात्र व्यक्तींचे दुर्गुण त्यांना मुळींच दिसत नाहींत, तर त्याच्या कृति सगळ्याच चांगल्या असल्याचा त्यांचा समज असतो, हेंही तात्पर्य समजावें.

सोसाव घरात कष्टमय आयुष्य कठावें लागणार! तर अशा संकटात मीं तरी जीवंत रहावे कशामाठीं' ॥ ७० ॥ (अवधूत म्हणाला: – राजा.) त्याचीं ती बायकापोरें जाळ्यानें त्यांच गुरफाटलेलीं मृत्युमुखीं धडपडत पडली होतीं त्याची ती स्थिति समोर दिसत असताही, दीन व वेडा झालेला तो कपोत आपण होऊन जाळ्यात पडला' ॥ ७१ ॥ तो कुटुंबी कपोत, तीं त्याचीं पिले आणि ती कपोती हीं हातीं सापडलीं असता तो क्रूर पारधी कृतकार्य होऊन घरीं परत गेला. ॥ ७२ ॥ तात्पर्य काय कीं, जो कोणी कुटुंबी पुरुष चित्त शांत न राखिता - सुख दुःख, लाभ हानि, जयापजय इत्यादि - द्वंद्वामध्येंच रमून कपोतपक्ष्याप्रमाणे कुटुंबभरण करीत राहतो. तो आपल्या परिवारासह नाश पावतो ॥ ७३ ॥

शून्ये गृहे किमर्थं जिजीविषे (जगण्याची इच्छा धरू)[1] ' ॥ ७० ॥ तथा शिग्भिः (जाळ्यानीं) आवृतान् (वेष्टित) मृत्युग्रस्तान् विचेष्टतः (धडफडणाऱ्या) तान् पश्यन् अपि कृपणः अबुधः (वेडा) स्वयं शिक्षु (जाळ्यात) अपतत्. ॥ ७१ ॥ क्रूरः लुब्धकः गृहमेधिनं तं कपोतं, कपोतकान्, कपोतीं च लब्ध्वा सिद्धार्थः (कृतकार्य) [सन्] गृहं प्रययौ ॥ ७२ ॥ एवं पतत्रिवत् (पक्ष्याप्रमाणें) कुटुंबं पुष्णन् (पोसणारा) कुटुंबी अशान्तात्मा द्वंद्वारामः (सुखदुःखादि द्वंद्वांत रमणारा) कृपणः सानुबंधः (परिवारासह) अवसीदति (क्लेश

तांस्तथैवाऽऽवृतान् शिग्भिर्मृत्युग्रस्तान्विचेष्टतः ॥ स्वयं च कृपणः शिक्षु पश्यन्नप्यबुधो ऽपतत् ॥ ७१ ॥ तं लब्ध्वा लुब्धकः क्रूरः कपोतं गृहमेधिनम् ॥ कपोतकान्कपोतीं च सिद्धार्थः प्रययौ गृहम् ॥ ७२ ॥ एवं कुटुंब्यशांतात्मा द्वंद्वारामः पतत्रिवत् ॥ पुष्णन्कुटुंबं कृपणः सानुबंधो ऽवसीदति ॥ ७३ ॥ यः प्राप्य मानुषं लोकं मुक्तिद्वारमपावृतम् ॥ गृहेषु खगवत्सक्तस्त- मारूढच्युतं विदुः ॥ ७४ ॥ ॥ इति श्रीभा० महा० एकादशस्कंधे सप्तमो ऽध्यायः ॥ ७ ॥ ब्राह्मण उवाच ।

सुखमैंद्रियकं राजन्स्वर्गे नरक एव च ॥ देहिनां यद्यथा दुःखं तस्मान्नेच्छेत तद्बुधः ॥ १ ॥

पावतो) ॥ ७३ ॥ यः अपावृतं (उघडें) मुक्तिद्वारं (मोक्षाचें द्वार) मानुषं लोकं प्राप्य गृहेषु खगवत् (पक्ष्याप्रमाणें) सक्तः, तं आरूढच्युतं (चढून पडलेला असाम) विदुः. " ॥ ७४ ॥

॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे सप्तमो ऽध्यायः. ॥ ७ ॥

ब्राह्मणः उवाच—"राजन्, देहिनां यथा दुःख, [तथा] यत् ऐंद्रियक (इंद्रियाचें) सुख, [तत्] स्वर्गे, नरके एव [अस्ति] तस्मात् बुधः तत् न इच्छेत. ॥ १ ॥

मनुष्यदेह म्हणजे उघडून ठेविलेलें मोक्षाचें द्वार होय. असा हा देह मिळाला असता जो पुरुष कपोतपक्ष्याप्रमाणें गृहावर आसक्त होतो, तो उच्चपदवीला चढून पुन्हा खालीं आदळला, असें विद्वान् लोक समजतात ॥ ७४ ॥ ॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने एकादशस्कंधे सप्तमो ऽध्यायः ॥ ७ ॥

ब्राह्मण (अवधूत) म्हणाला — राजा, (१) - प्रारब्धजन्य सुखदुःखभोग मिळणें अवश्य असल्यामुळें त्यासाठीं उद्योग करण्यामध्ये आयुष्य फुकट घालवू नये ही गोष्ट मी

1 श्रेयोमार्गसोपानमारुह्य च्युतं कल्याणमार्गाच्या पायऱ्यावर चढून जाऊन पुन्हा खालीं पडला, असें.

अजगरापासीं शिकलों; म्हा: - जसें - इच्छा केली अथवा न केली तरी - दुःख मिळतें, तसें इंद्रियसंबंधी सुखही प्राण्याला, तो स्वर्गामध्ये असेल किंवा नरकांत वसेल तेथें मि- ळायाचेंच. म्हणून शहाण्या मनुष्यानें त्याची इच्छा करीत बसूं नये ॥ १ ॥ ह्याताठीं योग्यानें अजगरासारखी वृत्ति स्वीकारावी आणि कोणतीही क्रिया न करितां (उदासीन राहून), सहजगत्या जो ग्रास प्राप्त होईल — मग तो मिष्ट असो, अथवा नीरस असो, मोठा असो वा लहान असो — तेवढा भक्षण करावा. ॥ २ ॥ अन्न अगदींच न मिळे तर आहारच करूं नये व कोणताही उद्योग न करितां, दैवदत्त फल उपभोगीन ('दैवच उपभोग देणारें होय अशा निश्चयानें धैर्य धरून) महासर्पा (अजगरा) प्रमाणें पुष्कळ आजगरः (अजगरासारखी वृत्ति ज्याची, असा) अक्रियः (क्रिया न करणारा) सुमृष्टं (स्वादिष्ट) विरसं, महांतं, स्तोकं (लहान) एव वा यदृच्छया (सहज) एव आपतितं (प्राप्त) ग्रासं ग्रसेत्. ॥ २ ॥ यदि ग्रासः न उपनमेत् (प्राप्त होणार नाहीं), [तदा] महाहिः (मोठा सर्प) इव दिष्टभुक् (दैवानें प्राप्त होईल तें भोगणारा) अनुपक्रमः (उद्योग न करणारा) निराहार

ग्रासं सुमृष्टं विरसं महांतं स्तोकमेव वा ॥ यदृच्छयैवाऽऽपतितं ग्रसेदाजगरो ऽक्रियः ॥ २ ॥

शयीताहानि भूरीणि निराहारो ऽनुपक्रमः ॥ यदि नोपनमेद्ग्रासो महाहिरिव दिष्टभुक् ॥ ३ ॥

ओजःसहोबलयुतं बिभ्रद्देहमकर्मकम् ॥ शयानो वीतनिद्रश्च नेहेतेंद्रियवानपि ॥ ४ ॥

भूरीणि (बहुत) अहानि (दिवस) शयीत (निजून राहो). ॥ ३ ॥ ओजःसहोबलयुतं (इंद्रियबल, मानसिकशक्ति, व शरीर बल यांनीं युक्त) अकर्मकं (व्यापाररहित) देहं बिभ्रत् (धरणारा) शयानः (निजणारा), वीतनिद्रः (गेली निद्रा ज्याची असा) च [भवेत्], इंद्रियवान् अपि न ईहेत (व्यापार न करो.) ॥ ४ ॥ दिवस स्वस्थ पडून रहावें. ॥ ३ ॥ - तूं म्हणशील ' सामर्थ्य असतांना देखील निजून राहवें कीं काय? ' तर होय - इंद्रियबल, मनाचा उत्साह व शारीरिक बल हीं असलीं तरी, देह कोणत्याही व्यासंगाला न लावतां, पडून रहावें. मात्र झोंप घेऊं (स्वार्थाकडे, आत्मविचाराकडे दुर्लक्ष करूं) नये आणि इंद्रियें पटु असतांही - पहाणें, ऐकणें - इत्यादि व्यापार सुद्धां करूं नये. ॥ ४ ॥

१ प्रारब्धकर्मानें सुख मिळायाचें असेल तर तें उद्योग न केला तरी मिळायाचेंच, वरें मिळायाचें नसेल तर शेंकडों उद्योग केले तरी मिळायाचें नाही

नाथ म्हणतात:— भोगितां उर्वशीशीं । जे सुख स्वर्गीं इंद्रासी । तेंचि विष्ठेमाजी सूकरासी । सूकरीपाशीं निश्चित ॥ हें जाणोनि साधुजन । उभय भोगीं न घालिती मन नेदवे प्रेतासी आलिंगन । तेवीं साधुजन विषयासी ॥ जीत साप धरावा हातीं । हे प्राण्यासी घडे चित्ती । नेवीं विषयाची आसक्ति । साधु न धरिती सर्वथा । [illegible] २०,

२ हा अजगराचा उपदेश: म्हा:— अजगरासी बळ उदंड । देहीं पराक्रम प्रचंड । परी न करी उद्योगाचें बंड । पसरोनि तोंड पडतसे । नाथ, २३

(१०) - समुद्रापासून काय शिकलों, तें ऐक : - मुनीची वृत्ति, ज्यानें उदक शान्त आहे, अशा सागरासारखी असावी, ह्मणजे तो मुद्रेवरून प्रसन्न दिसावा पण अंतरीं खोल असावा, - लोकांना त्याच्या अभिप्रायाबद्दल, आहे झालें असा असा, अशी - कल्पना करितां येऊं नये आणि - तेज पाहिल्याबरोबरच अवमान करणें अशक्य वाटावें, त्यानें - अखंड स्वरूपाविर्भावामुळें, देशांत किंवा काळांत - मर्यादित नसावें, आणि - रागद्वेषादि विकारांनीं - क्षोभून जाऊं नये. ॥ ५ ॥ - वर्षाऋतूमध्यें अनेक - नद्या समुद्राला येऊन

मुनिः स्तिमितोदः (निश्चल उदक ज्याचें असा) अर्णवः (समुद्र) इव प्रसन्नगंभीरः, दुर्विगाह्य· (प्रवेश करण्यास कठिण) दुरत्ययः (पराभवण्यास कठिण), अनन्तपारः, अक्षोभ्यः (न डवळण्या-

मुनिः प्रसन्नगंभीरो दुर्विगाह्यो दुरत्ययः ॥ अनंतपारो ह्यक्षोभ्यः स्तिमितोद इवार्णवः ॥ ५ ॥ समृद्धकामो हीनो वा नारायणपरो मुनिः ॥

नोत्सर्पेत न शुष्येत सरिद्भिरिव सागरः ॥ ६ ॥ दृष्ट्वा स्त्रियं देवमायां तद्भावैरजितेंद्रियः ॥ प्रलोभितः पतत्यंधे तमस्यग्नौ पतंगवत् ॥ ७ ॥

जोगा) [च भवेत्]. ॥ ५ ॥ समृद्धकामः, हीन· वा नारायणपरः मुनिः सरिद्भि· (नद्यांनीं) सागरः इव न—उत्सर्पेत (उच्छृंखल न होवो), न शुष्येत. ॥६॥ अजितेंद्रिय· देवमाया मिळवात - ह्मणून समुद्र कधीं वाढत नाहीं, - वरें ग्रीष्मऋतूंत नद्या सुकून जातात तरी समुद्राचें पाणी कमी होत नाहीं, त्याप्रमाणें, जवळ उपभोगाची समृद्धि असो वा अभाव असो, मुनीनें उच्छृंखल होऊं नये किंवा वाईट वाटूं देऊं नये (आनंद मानूं नये किंवा शोक करूं नये) तर नारायणाकडे लक्ष देऊन स्वस्थ असावें ॥ ६ ॥ - रूप[3], गंध, स्पर्श, शब्द आणि रस ह्या पांच विषयांनीं मोहून गेल्यामुळें अनुक्रमें पतंग, भ्रमर, गज, हरिण व मत्स्य. हे पांचजण नाश पावले ह्मणून त्या पांच विषयांवर आसक्ति

१ नाथ ह्मणतात .— ज्याला पाण्यांत जावें कसें व बाहेर निघावें कसें तें पूर्ण ठाऊक असेल तोच समुद्रांत आंघोळीला उतरतो, इतर लोक लाटांच्या उसळ्या पाहून धावरून जातात, तशी योग्याची वृत्ति असावी ह्मणजे भळत्यालाच त्याची सलगी करितां येऊं नये, आणि भक्ताला मात्र सुखानें सेवा करितां यावी ॥ ४६ ॥ ४७ ॥ ओंव्यांचा आशय

२ नाथ ह्मणतात .— समुद्रापासून उपदेश घेऊन त्याप्रमाणें वागतां वागतां योग्यानें आपल्या आंगीं समुद्रापेक्षा अधिक योग्यता मिळविली पहा .—

समुद्रामाजी जळ । लाटांखालीं अति चंचळ । योगिया अंतरीं अति निश्चळ । नाहीं तळमळ कल्पना ॥ समुद्र क्षोभे वेळोवेळे । योगिया क्षोभेना कवणें काळें । सर्वथा योगी नुचंबळे । योगबळें सावध ॥ समुद्रीं भरतें पर्वसंबंधें । योगिया परिपूर्ण सदानंदें । समुद्रीं चढू वोहटू चादें । योगिया निजबोधें सदा सम ॥ समुद्र सर्वांप्रती क्षार । तैसा नव्हे योगीश्वर । तो सर्वां जीवांसीं मधुर । बोधु साचार पैं त्याचा ॥ ५५ ॥ ५६ ॥ ५७ ॥ ५८ ॥

३ पतंग-मातंग-कुरंग-भृंग-मीना हताः पंचभिरेव पंच । एकः प्रमादी स कथं न हन्यते यः सेवते पंचभिरेव पंच ॥

- रूप, स्पर्श, शब्द, गंध व रस ह्या पांच विषयांनीं अनुक्रमें (प्रत्येकानें एकेकाला असें) पतंग, गज, हरिण, भ्रमर आणि मत्स्य ह्या पांचांना ठार केलें (प्रत्येक विषयाचा विखार इतका जबर आहे) तेव्हां जो पुरुष, सावध न होतां, ते पांचही विषय एकदां पांच इंद्रियांनीं सेवन करितो, तो कसा बरें मारिला जाणार नाहीं!

न करण्याविषयीं ते पाचजण माझे गुरु झाले. त्या प्रत्येक गुरूपासून कोणता गुण घेण्याजोगा आहे, तें क्रमशः निरूपण करितों - (११) स्त्री म्हणजे देवाची मूर्तिमंत माया होय तो. ज्यानें इंद्रियें आकळिली नाहींत, त्या पुरुषाच्या दृष्टीस पडली पुरे की तिच्या शृंगारलीलांनी तो मोहून जातो. आणि, जसा पतंग चकचकीत ज्वाळेला पाहून भुलून अग्नीत उडी घालतो तसा, तो वेडावलेला पुरुष निबिड अज्ञानांधकारांत पतन पावतो. ॥७॥ स्त्री, सुवर्ण, अलंकार, वस्त्रें इत्यादि द्रव्यें मायेनें रचिलेला बाजार होय. ज्या मूढाचें मन, ते पदार्थ उपभोग होत, अशा समजुतीनें त्यांजकडे ओढ घेत राहतें, तो मनुष्य पतंगाप्रमाणें डोळे फुटून नाश पावतो! ॥ ८ ॥ (१२) - भ्रमरापासून काय शिकावें तें सांगतों - मुनीनें माधुकरी

स्त्रियं दृष्ट्वा तद्भावैः (तिच्या हावभावांनीं) प्रलोभितः (लुब्ध झालेला) [सन्] अज्ञो पतंगवत् अंधे तमसि पतति. ॥ ७ ॥ मायारचितेषु योषिद्धिरण्याभरणाम्बरादिद्रव्येषु (स्त्री, सुवर्ण, अलंकार, वस्त्रें इत्यादि पदार्थांवर) उपभोगबुद्ध्या प्रलोभितात्मा (लोभलें चित्त ज्याचें, असा) मूढः नष्टदृष्टि [सन्] पतंगवत् नश्यति. ॥ ८ ॥ मुनि. स्तोक (थोडा) स्तोक

योषिद्धिरण्याभरणांबरादिद्रव्येषु मायारचितेषु मूढः ॥ प्रलोभितात्मा ह्युपभोगबुद्ध्या पतंगवन्नश्यति नष्टदृष्टिः ॥ ८ ॥

स्तोकं स्तोकं ग्रसेद्ग्रासं देहो वर्तेत यावता ॥ गृहानहिंसन्नातिष्ठेद्वृत्तिं माधुकरीं मुनिः ॥ ९ ॥ अणुभ्यश्च महद्भ्यश्च

शास्त्रेभ्यः कुशलो नरः ॥ सर्वतः सारमादद्यात्पुष्पेभ्य इव षट्पदः ॥ १० ॥

ग्रासं ग्रसेत्, यावता देहः वर्तेत. गृहान् अहिंसन् [सन्] माधुकरीं (भ्रमराची अशा) वृत्तिं आतिष्ठेत् (आचरो) ॥ ९ ॥ षट्पदः (सहा पाय ज्याला तो, भ्रमर) पुष्पेभ्यः इव कुशलः

(मधुकराची—भ्रमर फुलांना न दुखविता मलेकातून आपल्या निर्वाहापुरता थोडथोडा मध काढून घेतो तशी) वृत्ति स्वीकारावी, व गृहस्थाश्रम्याला त्रास न द्यावा (एकावर ओझें न घालतां), जेवढ्यानें आपल्या शरीराचा निर्वाह चालेल तेवढा थोडा थोडा ग्रास मधीत फिरावें (कोणाही एकाच्या घरीं भोजनास राहूं नये भ्रमर एखाद्या कमळाचा गंध विशेष आवडला की लोभानें त्यावरच पुष्कळ वेळ बसतो, आणि अस्तमानी कमळ मिटून गेलें म्हणजे आत अडकून पडतो, तशी आपली स्थिति होऊ न देण्याविषयीं योग्यानें दक्षता राखावी. तो एकाच्याच घरीं विशेष जाऊं येऊं लागला तर तेथें मोह उद्भवून बंधन पावेल करिता त्यानें एका घरीं कोठेंच राहू नये) । ९ ॥ शिवाय, जसा भ्रमर लहानमोठ्या

१ दिव्याला मिठी मारण्यामध्यें पतंगाला कांहीं तरी सुख मिळतें काय? आलिंगन दिव्याबरोबर मरणाचा मार्ग मात्र वरावा लागतो [illegible] वर उडी घालतोच. तसेंच पुरुष स्त्रियांच्या नादीं लागून ठकतात तरी पुन्हा दुसरे त्याच्यावर आसक्त होतातच नाच, ७४।७५ ओंव्याचा अर्थ

२ नाथ म्हणतात:— 'स्त्री, सुवर्ण, अलंकार व वस्त्रें यांपैकीं कोणताही पदार्थ, एकटा सुद्धा, आपल्यावर आसक्ति ठेवणाऱ्या पुरुषाला नरकांत [illegible] एकत्र असलेले असतात. तेव्हां इतक्याच्या तावडींत एकदम सांपडलेल्या पुरुषाची सुटका व्हावी कशी? ७९। ८० ओंव्यांचा अर्थ

सगळ्या फुलांतून सार (मध) घेत असतो तसें कुशल पुरुषानें लहानमोठ्या सकल शास्त्रांतून तत्त्व ग्रहण करावें ॥ १० ॥ - मधुहन्[1] ह्या दोन जाती आहेत भ्रमर आणि मधमाशी. फुलांतून मध काढून घेणारे ते भ्रमर (भुंगे, हे संचय करीत नाहींत) आणि पोळ्यामध्यें मध साठवून तयार करतात त्या मधमाशा पैकी भ्रमरापासुन घेण्याजोगा गुण सांगितला. आता मधमाशीजवळ काय शिकावें तें सांगतों :- भिक्षुकानें ' हें सध्याकाळी खाऊ ', ' हें उद्या भोजनास उपयोगीं पडेल ' अशा विचारानें भिक्षान्नाचा संग्रह अगदीं करूं नये तर हातावर भिक्षा घ्यावयाची आणि उदरांत साठवावयाची असा बेत ठेवावा. कारण, संग्रह करणारा प्राणी मधमाशीसारखा नाश पावतो (माशा मध साठवून ठेवितात

नरः अणुभ्यः (लहान), महद्भ्यः (मोठ्या) च सर्वतः शास्त्रेभ्यः सारं आददात् (घेतो) ॥१०॥ सायतन (सध्याकाळासाठीं), श्वस्तनं (उद्यासाठीं) वा भिक्षितं न संगृह्णीत,

सायंतनं श्वस्तनं वा न संगृह्णीत भिक्षितम् ॥ पाणिपात्रोदरामत्रो मक्षिकेव न संग्रही ॥ ११ ॥
सायंतनं श्वस्तनं वा न संगृह्णीत भिक्षुकः ॥ मक्षिका इव संगृह्णन्सह तेन विनश्यति ॥ १२ ॥
पदाऽपि युवतीं भिक्षुर्न स्पृशेद्दारवीमपि ॥ स्पृशन्करीव बध्येत करिण्या अंगसंगतः ॥ १३ ॥

पाणिपात्रोदरामत्रः (हात हें पात्र व उदर हें साठवण ज्याचें असा) [भवेत्], संग्रही [तु] मक्षिका इव न—भवेत् (जीवंत राहत नाहीं) ॥११॥(मू०)॥१२॥ भिक्षुः पदा अपि (पायानेंही) ह्मणून तो मध लुटून नेण्यासाठीं जो कोणी येतो तो माशाला मारून मध घेऊन जातो त्याप्रमाणें अन्नादिकाचा संग्रह केला असता परिणाम भोगावा लागेल हें लक्षात वागवून यतीनें संग्रह करणें सोडून द्यावें). ॥११॥ सध्याकाळसाठीं किंवा उद्यासाठीं ह्मणून भिक्षुकानें कसलाही संग्रह करू नये संग्रह करणारा पुरुष मक्षिकाप्रमाणें त्या संग्रहाबरोबर नाश पावतो ॥ १२ ॥ (१३) भिक्षूनें स्त्रीला— फार तर काय पण स्त्रीच्या आकाराची लाकडाची बाहुली केली असली तरी तिला देखील — नुसत्या पायानें सुद्धा स्पर्श करू नये स्पर्श करणारा

---

1 मधु कृतति सः मधुकृत्– मधु काढून घेणारा. 2 मधु करोति सः मधुकृत् मध तयार करणारा 3 नाथ, ह्मणतात — ' गुरुत्वें म्यां मानिली माशी । येक राया दों प्रकारेंसी । एक ते मोहळमाशी । ग्रामवासी दुसरी ॥ पहा पां घरींची माशी । बैसल्या साखरेच्या राशी । हातीं धरोनि घाली मुखासी । संग्रहो तिशी पैं नाहीं ॥ ' नाथ, १७ । ८ चोवीस गुरूंच्या गणनेंत ' मधुकृत् ' शब्द आहे (मागील अध्यायाचा ३४ श्लोक पहा) त्या शब्दानें ग्रामवासी साखरखाऊ माशीचा संग्रह होईलसें वाटत नाहीं, ह्मणून श्रीधरानीं भुंगे व मधमाशा हा भेद केला. परंतु तसा अर्थ केला तर ह्या श्लोकाचा व पुढल्या श्लोकाचा अर्थ एकच होईल ह्मणून नाथानीं ग्रामवासी माशीचा संग्रह करून पौनरुक्त्य घालविलें

3 सायंतनश्वस्तनशब्दौ तत्कालभक्ष्यपरौ (येथें सायतन व श्वस्तन ह्या शब्दाचा अर्थ त्या काळीं भक्षण करावयाचे पदार्थ ' असा आहे) बालबोधिनी

4 नाथ ह्मणतात '— नको स्त्रियांची भेटी । नको स्त्रियांची गोष्टी । स्त्री देखितांची दृष्टी । उठाउठीं पळावें ॥ पळत पळत पायांतळीं । आल्या काष्ठाची पुतळी । तेही नातळावी कुशळीं । निर्जीव स्त्री छळी पुरुषातें ॥ १२५ । २६.

पुरुष, जसा हत्तिणीच्या अंगस्पर्शामुळें हत्ती बांधिला जातो तसा, बंध पावतो. ॥ १३ ॥ चतुर पुरुषानें स्त्रीसमागमास कधींही प्रवृत्त होऊं नये, नर, स्त्री ह्मणजे आपला मृत्यु होय, - असें समजून असावें. कारण, जो कोणी स्त्रीसमागमास प्रवृत्त होईल, - त्याला, दुसरे हत्ती हत्तींस मारितात तसा, त्याच्यापेक्षा अधिकशक्तिमपन्न पुरुषाच्या हातचा मार मिळावा लागतो. ॥ १४ ॥ (१४) - दान आणि भोग हे द्रव्याचे दोन उपयोग होत, ते न करिता नुसतें बहुत वित्त साचवून ठेविलें तर ते दुसऱ्याच्या हातीं लागावयाचें. ही गोष्ट मी मध लुटून आणणारापाशीं शिकलों. पहा. - लोभी पुरुष पुष्कळ दुःखें व कष्ट सोसून जो द्रव्यसंचय करून ठेवितात, त्याचा ते दानाकडे विनियोग करावयाचे नाहींत किंवा उपभोगाकडेही करीत नाहींत, आणि शेवटीं तें द्रव्य, भलताच एखादा बलाढ्य पुरुष येऊन घेऊन जातो व उपभोगितो. पुढें त्याच्या हातूनही तिसराच कोणी लाववितो व त्याच्या

दारवी (काष्ठाची स्त्री) अपि युवतीं (तरुणीला) न—स्पृशेत् (न शिवे), स्पृशन् [पुरुष.] करिण्याः अंगसंगतः करी इव बध्येत ॥१३॥ प्राज्ञः (शहाणा पुरुष) कर्हिचित् (कधीं) आत्मनः मृत्युं स्त्रियं न—अधिगच्छेत् (अवलंबन न करो). यथा अन्यैः गजैः गजः, [तथा] बलाधिकैः सः हन्येत (मारिला जाईल) ॥१४॥ लुब्धैः (लोभी पुरुषांनीं) दुःखसंचित

नाधिगच्छेत्स्त्रियं प्राज्ञः कर्हिचिन्मृत्युमात्मनः ॥ बलाधिकैः स हन्येत गजैरन्यैर्गजो यथा ॥१४॥ न देयं नोपभोग्यं च लुब्धैर्यद्दुःखसंचितम् ॥

भुंक्ते तदपि तच्चान्यो मधुहेवार्थविन्मधु ॥१५॥ सुदुःखोपार्जितैर्वित्तैराशासानां गृहाशिषः ॥ मधुहेवाग्रतो भुंक्ते यतिर्वै गृहमेधिनाम् ॥१६॥

यत् न देयं न उपभोग्यं च, तत्, मधुहा (मध हरण करणारा) मधु इव, अर्थवित् (लक्षणावरून द्रव्याचें स्थान जाणणारा) अन्यः भुंक्ते, तत् अपि [अन्य , तत्] च अन्य [भुंक्ते]. ॥ १५ ॥ मधुहा इव यतिः सुदुःखोपार्जितैः वित्तैः गृहाशिषः आशासानां (इच्छिणाऱ्या) गृहमेधिनां (गृहस्थांच्या) अग्रतः भुंक्ते ॥ १६ ॥

जवळून चवथा पसार करितो इत्यादि. ह्याला उदाहरण मधमाशांनीं साठवलेला मध एखादा - भिल्ल वगैरे - मधलुटारू येऊन घेऊन जातो हें होय. - ह्यावर कोणी ह्मणेल ' द्रव्य अगदीं अगदीं गुप्त स्थळीं खोल पुरून ठेविलें असलें ह्मणजे दुसऱ्याला समजेल कसें व तो नेईल कसा ? ' तर बा ! चिन्हावरून व लक्षणांनी - द्रव्य कोठें आहे व तें आपल्या हातीं कसें येईल, तें हरण करणाराला कळत असतें. - मधमाशा आपलें पोळें रानांत उंच वृक्षाच्या ढोलींत किंवा पर्वताच्या दरडीत अतिदुर्गम स्थळीं रचितात. पण भिल्ल तेथेंही जाऊन शोध लावून मध आणतात की नाहीं ? झालें तर. - ॥ १६ ॥ - स्वतः काहीं उद्योग न केला तरी आपल्याला भोग मिळावयाचा तो मिळतोच ही गोष्ट मी त्याच गुरूपाशीं (मध

१ रानांतील हत्ती धरण्यासाठीं लोक अशी युक्ति करितात: एक मोठा खड्डा खणून त्यात [illegible] (गारा) [illegible], [illegible] अथवा [illegible] बाजूला, लाकडाची रचलेली हत्तीण उभी करून ठेवतात. ती [illegible] हत्तीण [illegible] हत्ती [illegible]

२ माशा मधु न खाती काकुळती । झाडी त्याचे हात लावती । स्वादु श्रीमन सेविती ज्यासि लक्ष्मीपति प्रसन्न । नाथ, ८८

हरण करणाराजवळ) शिकलों : पहा :- गृहस्थाश्रमी पुरुष अतिशय दुःखें व कष्ट सोमून द्रव्य सपादितात व त्याच्या योगें आपल्याला गृहातील सुखें मिळतील अशा आशा करीत
असतात. पण, जसा माशानीं कष्ट करून साठवलेला मध त्याच्या तोंडी पडायाच्या पूर्वीं लुटारू भिल्ल पसार करितो, तसा सन्यासी पुरुष गृहस्थाश्रम्याना भोग मिळण्यापूर्वींच त्या-
च्या वित्ताचा उपभोग घेत असतो, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. ॥ १६ ॥ (१९) - हरिणापाशीं काय शिकलों तें ऐक :- पारध्याचें गाणें ऐकून हरिण वेडावून जातो व शेवटीं
बंधनात सापडतो; त्या हरिणापासून उपदेश एवढा घ्यावा कीं, वनात राहणाऱ्या (सर्वसंगपरित्यागी) यतीनें ग्राम्य (विषयप्रतिपादक) गायन श्रवण करूं नये, - भगवत्कीर्त-
नाला निषेध नाहीं. तें ऐकावेंच. - ॥ १७ ॥ - उदाहरण पहा .- हरिणीचा पुत्र जो मुनि ऋष्यशृंग, त्याला ग्राम्य विषयानीं भरलेलीं स्त्रियाची नृत्यें, वाद्यें व गायनें पहाण्या-

वनचरः यतिः कचित् ग्राम्यगीतं (गावढळ गायन) न—शृणुयात् (न ऐको), [इति] मृगयोः (पारध्याच्या) गीतमोहितात् (गायनानें मोहून गेलेल्या) बद्धात् हरिणात् शिक्षेत
(शिको). ॥१७॥ योषिता (स्त्रियाचीं) ग्राम्याणि नृत्यवादित्रगीतानि जुषन् (सेवन करणारा) मृगीसुतः (हरिणीचा पुत्र) ऋष्यशृंग. आसां क्रीडनकः (खेळणें) वश्य. [बभूव]. ॥ १८ ॥

ग्राम्यगीतं न शृणुयाद्यतिर्वनचरः कचित् ॥ शिक्षेत हरिणाद्बद्धान्मृगयोर्गीतमोहितात् ॥ १७ ॥
नृत्यवादित्रगीतानि जुषन् ग्राम्याणि योषिताम् ॥ आसां क्रीडनको वश्य ऋष्यशृंगो मृगीसुतः ॥ १८ ॥
जिव्हया ऽतिप्रमाथिन्या जनो रसविमोहितः ॥ मृत्युमृच्छत्यसद्बुद्धिर्मीनस्तु बडिशैर्यथा ॥ १९ ॥
इंद्रियाणि जयंत्याशु निराहारा मनीषिणः ॥ वर्जयित्वा तु रसनं तन्निरन्नस्य वर्धते ॥ २० ॥

जिव्हया रसविमोहितः असद्बुद्धि जनः मृत्यु ऋच्छति (पावतो)
यथा बडिशैः (मासानें लिंपलेले अशा लोखंडी काट्यानीं—गळानीं) मीनः, [तथा] अतिप्रमाथिन्या (अति दुर्निवार) जिव्हया रसविमोहितः असद्बुद्धि जनः मृत्यु ऋच्छति (पावतो)
॥ १९ ॥ मनीषिणः निराहाराः [सतः] रसनं (जिव्हा) वर्जयित्वा इंद्रियाणि आशु (लवकर) जयति. निरन्नस्य तत् वर्धते. ॥ २० ॥

त्या स्त्रियाचें खेळणें बनला व परतंत्र होऊन त्या नाचवतील तसा नाचू लागला ॥ १८ ॥ - (१९)
ऐकण्याचा नाद लागला; - शेवटीं त्याचा परिणाम असा झाला कीं - तो मुनि त्या स्त्रियाचें खेळणें बनला व परतंत्र होऊन त्या नाचवतील तसा नाचू लागला ॥ १८ ॥ - (१९)
मत्स्यापाशीं काय शिकलों, तें सागतों .- जिव्हा हें इंद्रिय अतिशय उच्छृंखळ व अनिवार आहे, त्याच्या योगें मनुष्याला विविध रस चाखण्याचें वेड लागतें कीं त्याची बुद्धि भ्रष्ट
होते व तो, जसा मासा गळाच्या योगें (गळाला लाविलेलें मास खावयाच्या लोभास पडला कीं) मरतो तसा, मृत्यु पावतो ॥ १९ ॥ - जिव्हेला अनिवार म्हणण्याचें कारण असें -
विवेकी पुरुष आहाराचा त्याग करून त्या उपायानें रसनेशिवाय इतर सर्व इंद्रियें तत्काल जिंकितात पण तें रसनेंद्रिय (जिव्हा) मात्र अन्न सोडिलें कीं उलट अधिक क्षुब्ध होतें

१ कारण, गृहस्थानें खाल अन्न अगोदर दिलें पाहिजे असा विधि आहे पहा:— यतिश्च ब्रह्मचारी च पक्वान्नस्वामिनावुभौ । तयोरन्नमदत्त्वा तु भुक्त्वा चांद्रायण चरेत् ॥
यति आणि ब्रह्मचारी हे दोघे शिजलेल्या अन्नाचे धनी होत. त्याना अन्न न देता जो भोजन करील त्याला चांद्रायण प्रायश्चित्त घ्यावें लागे. २ 'हरिण' शब्दानें हरिणीचा मुलगा ऋष्यशृंग हाही गृहीत समजावा

(ह्याचा भाव असा :– आहार सोडिला तर इतर इंद्रियें निःशक होऊन आपल्या स्वाधीन राहतात व विषयाकडे ओढ घेत नाहीत ही गोष्ट खरी, पण जिव्हेची मात्र खाण्याकडे ओढ अधिकाधिक लागते. बरें, अन्न खाऊं लागलें तर सगळी इंद्रियें टवटवीत होऊन क्षोभ करतात करिता मुनीनें, गोडच पाहिजे, चांगलेंच पाहिजे. अशी आसक्ति न धरिता, जें मिळेल तें औषधाप्रमाणें भक्षीत जावें म्हणजे जिव्हा आणि बाकीचीं अशीं कोणतींच इंद्रियें क्षोभ पावणार नाहीत). ॥ २० ॥ मनुष्यानें इतर सगळीं इंद्रियें जिंकिलीं असतां तरी जोंपर्यंत रसनेंद्रिय त्याच्या स्वाधीन झालें नाहीं तोंपर्यंत त्याला जितेंद्रिय म्हणता येत नाहीं. रसना (जिव्हा) जिंकिली की सगळें जिंकिलें असें. ॥२१॥ (१७) राजा, पूर्वी विदेहनगरामध्यें पिंगला नावाची एक वेश्या राहत असे. तिच्यापासून मीं काही शिक्षण घेतलें आहे तें सांगतों ऐक – ॥ २२ ॥ ती स्वैरसंचार करणारी स्त्री (वेश्या) एके दिवशीं रात्रीच्या

यावत् रसनं न जयेत्, तावत् विजितान्येंद्रियः पुमान् जितेंद्रियः न स्यात्. रसे जिते [सति] सर्वं जितं. ॥ २१ ॥ नृपनंदन, विदेहनगरे पुरा 'पिंगला' नाम वेश्या आसीत्. मे तस्याः किंचित् शिक्षितं [तत्] निबोध. ॥२२॥ एकदा संकेते (रतिस्थानीं) कान्तं (प्रिय पुरुषास) उपनेष्यती (नेणारी) सा स्वैरिणी उत्तमं रूपं बिभ्रती [सती] काले बहिर्द्वारि [स्थिता] अभूत्. ॥ २३ ॥ पुरुषर्षभ, अर्थकामुका [सा] मार्गे आगच्छतः (येणाऱ्या) पुरुषान् वीक्ष्य तान् शुल्कदान् (मूल्य देणाऱ्या) वित्तवतः कान्तान्

तावज्जितेंद्रियो न स्याद्विजितान्येंद्रियः पुमान् ॥ न जयेद्रसनं यावज्जितं सर्वं जिते रसे ॥२१॥ पिंगला नाम वेश्याऽऽसीद्विदेहनगरे पुरा ॥ तस्या मे शिक्षितं किंचिन्निबोध नृपनंदन ॥२२॥ सा स्वैरिण्येकदा कांतं संकेत उपनेष्यती ॥ अभूत्काले बहिर्द्वारि बिभ्रती रूपमुत्तमम् ॥२३॥ मार्ग आगच्छतो वीक्ष्य पुरुषान्पुरुषर्षभ ॥ तान् शुल्कदान्वित्तवतः कांतान्मेने ऽर्थकामुका ॥२४॥ आगतेष्वपयातेषु सा संकेतोपजीविनी ॥ अप्यन्यो वित्तवान्को ऽपि मामुपैष्यति भूरिदः ॥ २५ ॥

मेने. ॥ २४ ॥ आगतेषु (आलेले) अपयातेषु (निघून गेलेले) [सत्सु], संकेतोपजीविनी (संकेतावर–पुरुषाला एकांतीं नेणें यावर–निर्वाह चालविणारी) सा 'अन्यः अपि कः अपि वित्तवान् भूरिदः (बहुत द्रव्य देणारा) मां उपैष्यति' ॥ २५ ॥

वेळीं, एकाद्या कांताला रतिस्थानीं घेऊन जावें अशा इच्छेनें, उत्तम रूप धारण करून (नटून सजून), बाहेरच्या दारांत बसली होती. ॥ २३ ॥ हे पुरुषश्रेष्ठा, मार्गानें समोरून येणारे कोणी पुरुष दृष्टीस पडले कीं तिला, हे श्रीमंत असून सुरतसुखोपभोगासाठीं आपणाकडे येत आहेत व आपल्याला मूल्य देतील असें वाटावें. कारण, तिला द्रव्य मिळावें अशी फार इच्छा होती ॥ २४ ॥ पुरुषांना एकांतीं नेऊन रतिसुख देणें (व तन्मूल्य वित्त घेणें) ह्यावर करणारी तिची उपजीविका असल्यामुळें जे आगंतुक होतेसे वाटले ते पुरुष पुढें निघून गेले कीं 'दुसरा कोणी तरी धनाढ्य पुरुष मजकडे येईल व मला बहुत द्रव्य देईल' - अशी तिनें आपल्या मनाची समजूत घालीत जावें - ॥२३॥

१ हें पूर्वी 'प्राणवृत्त्यैव संतुष्येत्' ह्या श्लोकांत सांगितलें असून पुन्हा येथें सांगण्याचे कारण, जिव्हेंद्रियाचें दुर्निवारत्व कळवावें, हें होय

या प्रकारें अंतरीं द्रव्याची दुराशा मरून राहिल्यामुळें तिला झोंप येईना ती काहीवेळ द्वारांत उभी राही, पुन्हा आत जाई, लागलीच बाहेर येई, असें चालता चालता मध्य रात्रीचा समय येऊन पोंचला. - तरी कोणी पुरुष तिजकडे आला नाहीं. - ॥ २६ ॥ द्रव्याच्या आशेनें तिचें अंतःकरण दीन झालें व मुख सुकून गेलें पण त्या वित्ताच्या चिंतेमुळेंच तिच्या अंतरीं परिणामी सुखदायक असें पूर्ण वैराग्य एकदम उदय पावलें ॥२७॥ चित्तामध्यें तीव्र वैराग्यवृत्ति बाणली असतां त्या वेळीं तिच्या मुखातून जे उद्गार निघाले, ते जसेचे तसे - मी तुला सांगतो ' - ऐक. - तूं ह्मणशील ' वैतागलेल्या स्थितींतील तिचे उद्गार ऐकून मला काय करावयाचें आहे? ' तर बा, त्याचा उपयोग मोठा आहे - वैराग्य

एवं दुराशया ध्वस्तनिद्रा [सती] द्वारि अवलंबती निर्गच्छती. प्रविशती च [सती] निशीथ (मध्यरात्र) समपद्यत. ॥ २६ ॥ वित्ताशया शुष्यद्वक्त्राया (सुकत चाललें मुख जिचें अशा) दीनचेतसः तस्याः चिंताहेतुः सुखावहः परमः निर्वेदः (वैराग्य) जज्ञे (झाला) ॥२७॥ निर्विण्णचित्ताया. (खिन्न मन जिचें अशा) तस्या. गीत मम यथा (जसेंच्या तसें) शृणु निर्वेदः (विरक्तपणा) पुरुषस्य आशापाशानां (आशारूपाशा) यथा असिः (खड्ग), [तथा च्छेत्ता]. ॥ २८ ॥ अंग नृप, यथा विज्ञानरहित मनुजः ममतां [न जहाति, तथा]

एवं दुराशया ध्वस्तनिद्रा द्वार्यवलंबती ॥ निर्गच्छंती प्रविशती निशीथं समपद्यत ॥ २६ ॥ तस्या वित्ताशया शुष्यद्वक्त्राया दीनचेतसः ॥ निर्वेदः परमो जज्ञे चिंताहेतुः सुखावहः ॥ २७ ॥ तस्या निर्विण्णचित्ताया गीतं शृणु यथा मम ॥ निर्वेद आशापाशानां पुरुषस्य यथा ह्यसिः ॥२८॥ न ह्यंगाजातनिर्वेदो देहबंधं जिहासति ॥ यथा विज्ञानरहितो मनुजो ममतां नृप ॥ २९ ॥ पिंगलोवाच । अहो मे मोहविततिं पश्यताविजितात्मनः ॥ या कांतादसतः कामं कामये येन बालिशा ॥ ३० ॥ संतं समीपे रमणं रतिप्रदं वित्तप्रदं नित्यमिमं विहाय ॥ अकामदं दुःखभयाधिशोकमोहप्रदं तुच्छमहं भजेऽज्ञा ॥ ३१ ॥

अजातनिर्वेदः (नाहीं झालें वैराग्य ज्याला असा पुरुष) देहबंधं न जिहासति. ॥ २९ ॥ पिंगला उवाच— ' अहो अविजितात्मनः (नाहीं जिंकिलें मन जिनें अशा) मे मोहविततिं (खुळेपणाचा पसारा) पश्यत ! येन या बालिशा [अहं] असतः (तुच्छ) कांतात् कामं (उपभोग) कामये (इच्छितें) ॥ ३० ॥ अज्ञा अहं समीपे संतं रतिप्रदं वित्तप्रदं नित्यं इमं

हें पुरुषाचे आशापाश तोडून टाकण्यास खड्गासारखें होय. ॥ २८ ॥ कारण, राजा, आत्मसाक्षात्कार झाल्यावाचून जशी मनुष्याची ममता सुटायाची नाहीं. त्याचप्रमाणें ज्याला वैराग्य उत्पन्न झालें नाहीं, त्याला, देहबंध (देहच आत्मा असा अभिमान) सोडून द्यावा, अशी इच्छा कदापि व्हावयाची नाहीं. असो ॥ २९ ॥ पिंगला ह्मणाली .–'अहो, माझा मोह (वेडेपणा) किती वाढत गेला आहे पहा ! मला विवेक अगदीं नसल्यामुळें स्वताचें चित्त जिंकितां आलें नाहीं आणि ह्मणूनच मी क्षुद्र पुरुषापासून आपले मनोरथ पूर्ण होतील अशी इच्छा धरून बसल्यें ! ॥३०॥ खरा मनोहर, सुखदाता, - लक्ष्मीपति असल्यामुळें पाहिजे तितकें - वित्त देण्यास समर्थ व कधींही नाश न पावणारा असा प्रत्यक्ष परमेश्वर जवळ (अंत-

थामी) असताना, ह्याला सोडून मी, ज्याच्याकडून उपभोग मिळायाचे नाहींत इतकेंच नव्हे तर उलट जो दुःख, भय, चिंता, शोक आणि मोह मात्र देत असतो, त्या तुच्छ पुरुषाची सेवा करितें! खरोखरच मला स्वार्थाचें ज्ञान नाहीं, - ह्यात अगदी संशय नाहीं. - ॥३१॥ अहो! पुरुषाना मकतस्थळीं रति देऊन वृत्ति (निर्वाहसाधन -- द्रव्य) मगाढणें हा उपजी- विकेचा प्रकार अत्यंत निंद्य होय; असें असतांना मी त्याचा अवलंब करून आत्म्याला व्यर्थ शिणविलें^१ - पहा - स्त्रीलंपट व द्रव्यलोभी पुरुष ह्मणजे अत्यन्त शोचनीय^३ (विक्रम येण्याजोगा). पण तशा पुरुषानें आपलें शरीर विकत घ्यावें ह्मणजे त्यायोगे आपल्याला वित्त व रतिसुख हीं मिळतील अशी मी इच्छा धरून असतें^२ ॥ ३२॥ ह्या (पुरुषशरीररूप) रमणं विहाय (सोडून) अकस्मदं दुःखभयाधिशोकमोहप्रदं तुच्छं भजे! ॥ ३१॥ अहो साकेत्यवृत्त्या मया अतिविगर्ह्यवार्तया (अति निंद्य उपजीविकेच्यायोगें) वृथा आत्मा परितापितः (क्लेश पावविले ज्याला असा)! [यतः अहं] स्त्रैणात् अर्थतृषः (द्रव्यलोभी,) कृपण) अनुशोच्यात् (कींव करण्याजोगा अशा) नरात् [तेन] क्रीतेन (विकत घेतलेल्या)

अहो मया ऽऽत्मा परितापितो वृथा सांकेत्यवृत्त्या ऽतिविगर्ह्यवार्तया ॥ स्त्रैणान्नराद्या ऽर्थतृषो ऽनुशोच्यात्

क्रीतेन वित्तं रतिमात्मनेच्छती ॥ ३२ ॥ यदस्थिभिर्निर्मितवंशवंश्यस्थूणं त्वचारोमनखैः पिनद्धम् ॥

क्षरन्नवद्वारमगारमेतद्विण्मूत्रपूर्णं मदुपैति का ऽन्या ॥ ३३ ॥

आत्मना (शरीरानें) वित्तं रतिं इच्छती. ॥ ३२ ॥ यत् अस्थिभिः (हाडानीं) निर्मितवंशवंश्यस्थूणं (निर्मिलें वंश ह्मo आढें, वंश्य ह्मo पाखाड्या व स्थूणा ह्मo खांब हीं ज्याचीं असा) त्वचारोमनखैः पिनद्धं (आच्छादित) क्षरन्नवद्वारं (पाझरतात नऊ द्वारें ज्याचीं असा) विण्मूत्रपूर्णं एतत् अगारं (गृहास) मत् (मजवाचून) अन्या का उपैति ? ॥ ३३ ॥

घराची - एकंदर रचना किती घाणेरडी असते पहा :- ह्याचें आढे, वासे (पाखाड्या) व खांब सगळी हाडें भरलेलीं आहेत (पाठीचा कणा हें आढें, बरगड्या हे वासे आणि हा- तापायांचीं हाडें हे खांब समजावे)! वर आच्छादन (शाकार) कसलें असतें तर त्वचा, केंस आणि नखें ह्यांचें^१ तसेंच ह्याचीं नऊ द्वारें। दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या मुख, गुद व शिश्न ह्या मोऱ्या) सारखीं पाझरत असतात^१ आणि आत विष्ठा व मूत्र पुष्कळशी भरून राहिलेली आहेत^१ अशा पुरुषशरीर ह्या - रमणीय मानून - मजवाचून अन्-

१ आपुला पूर्ण न करवे काम। ते मज करिती केवीं निष्काम। त्याचेनि संगें मोहभ्रम। दुःख परम पावलें ॥ नाथ, २२३

२ अल्प द्रव्य जेणें देणें। त्याची जाती कोण हे नाहीं पाहणें। याहोनि काय लाजिरवाणें। निंदित जिणें पै माझें। नाथ, २२८

३ जया पुरुषासी देह विकणें। तें अत्यंत हीनदीनपणें। काय सांगों त्याचीं लक्षणें। सर्व गुणें अपूर्ण ॥ वित्त न देववे कृपणता। काम न पुरवे पुरता। प्रीति न करवे न- स्वता। सेवीं मागुता तो नेदी ॥ पैशिया पालाव सुख। वाछिनां वाढे परम दुःख। जळो त्याचे न पाहें मुख। वोकारी देख येतसे। नाथ, २२९। ३०। ३१.

वाचून दुसरी कोणी तरी सापडेल काय? ॥ ३३ ॥ विदेहाच्या ह्या राजधानीमध्ये इतकी मूर्ख बुद्धि अशी माझीच एकटीची असेल. कारण, जी खुळी मी, - चागली सत्संगतीत राहत असताही, - आत्मसुखदायक अशा ह्या अच्युताला सोडून दुसरा भोग मिळण्याची इच्छा धरित्ये ॥ ३४ ॥ - ह्मणून आता पुढे मी असे करणार - हा परमेश्वर प्राण्याचा मित्र, अत्यंत प्रिय, अधिपति व आत्मा होय. मी आत्म्याच्या योगेच - आत्मनिवेदन करून (सर्वस्व अर्पून) - त्याला पूर्णपणे आपलासा करून घेईन व, जशी लक्ष्मी राहिली आहे तशी, त्याशीं रमून राहीन. ॥ ३५ ॥ - ईश्वरावाचून दुसरा कोणताही पुरुष भजण्याजोगा नाहीं, कारण, - शब्दादि विषय ह्मणा, विषयोपभोग देणारे पुरुष ह्मणा, किंवा विदेहानां अस्मिन् पुरे अहं एका एव मूढधी, या असती (मूर्ख) [अहं] अस्मात् आत्मदात् अच्युतात् अन्य काम इच्छंती [आस]. ॥ ३४ ॥ अयं आत्मा शरीरिणां सुहृत्, प्रेष्ठतमः, नाथः [च]. अहं तु आत्मना एव विक्रीय (विकत घेऊन) यथा रमा, [तथा] अनेन रमे ॥ ३५ ॥ आद्यन्तवंतः कालविद्रुता. ये कामाः, कामदा नराः, देवाः वा [ते]

विदेहानां पुरे ह्यस्मिन्नहमेकैव मूढधीः ॥ या ऽन्यमिच्छंत्यसत्यस्मादात्मदात्काममच्युतात् ॥ ३४ ॥

सुहृत्प्रेष्ठतमो नाथ आत्मा चायं शरीरिणाम् ॥ तं विक्रीयाऽऽत्मनैवाहं रमे ऽनेन यथा रमा ॥ ३५ ॥

कियत्प्रियं ते व्यभजन्कामा ये कामदा नराः ॥ आद्यंतवंतो भार्याया देवा वा कालविद्रुताः ॥ ३६ ॥

नूनं मे भगवान्प्रीतो विष्णुः केनापि कर्मणा ॥ निर्वेदो ऽयं दुराशाया यन्मे जातः सुखावहः ॥ ३७ ॥

भार्यायाः (पोष्य स्त्रीचे) कियत् (केवढेसें) प्रियं व्यभजन् (विभागिते झाले)? ॥ ३६ ॥ नूनं मे केन अपि कर्मणा भगवान् विष्णु प्रीत. यत् दुराशायाः मे सुखावह अयं निर्वेद देव ह्मा, हे सगळे उत्पत्तिनाशवंत आणि काळाच्या भीतीनें पळून जागारे (कालगतीने नाश पावणारे) आहेत ह्यांनीं आजपर्यंत, आपल्या पोष्य (जिचे पोषण केवळ आपल्यावर अवलंबून असतें, त्या) स्त्रीचे प्रिय ते केले आहे केवढेसें? - काहीच नाहीं. मग त्या विषयाची, पुरुषाची किंवा देवाची सेवा करावी काय ह्मणून? - ॥ ३६ ॥ मला वाटतें, सांप्रत माझ्या कोणत्या तरी प्राचीन पुण्य कर्मानें भगवान् विष्णु मजवर प्रसन्न झाला आहे. कारण, मी दुष्ट आशा धरून वागलेली असताही, आज मला परिणामीं सुख

1 कारण, ह्या नगरींतील बाकीचे सगळे लोक सदाचारी व ज्ञानी आहेत. 2 अच्युतात् स्वरूपतो गुणतश्च च्युतिरहितात् जो स्वरूपापासून भ्रष्ट पावत नाहीं व गुणानीं हीन होत नाहीं त्या वालप्रबोधेनी जो निकटवर्ती हृदयस्थ । पुरुषीं पुरुषोत्तम अच्युत । वीर्यच्युतीवीण रमत । संतोष देत निजात्मता ॥ अच्युते ज्यासि निजसुख दीधलें । तें सुख च्यवना काही केलें । पैशिया हृदयस्था विसरलें । आणिका भुललें अकामदा ॥ नाथ, २४४ । ४५.

3 जे निजसर्वे सर्वदा दुःखी । ते मायेसी काय करिती सुखी । अवघी पडली काळमुखी । न दिसे ये लोकी सुखदाता ॥ नाथ, २५२.

दायक असें हें वैराग्य झालें (भगवंताच्या प्रसन्नतेवांचून हा लाभ घडणें शक्य नाहीं). ॥ ३७ ॥ माझें भाग्य मंद असेल, तर मला हे वैराग्यजनक क्लेश कदापि मोठे नसते - वैराग्याची थोरवी किती वर्णावी - त्याच्या योगें मनुष्य गृहादि सकल परिवाराचा त्याग करून शांति (मोक्षसुख) मिळवितो ॥ ३८ ॥ ह्मणून आता मी, त्या श्रीविष्णूनें केलेला उपकार (हे वैराग्य) शिरसा धारण करून व ग्राम्य पुरुषावर अथवा विषयावर जडलेल्या दुष्ट आशा सोडून त्याच परमेश्वराला शरण जातें ॥ ३९ ॥ आतां [illegible] तापासून पुढें मी चित्तवृत्ति संतुष्ट राखीन, - परमात्माच सुखदाता होय ह्या - तत्त्वावर विश्वास ठेवीन, दैवयोगें जें मिळेल त्यावरच निर्वाह चालवीन व ह्या [illegible]
(वैराग्य) जातः. ॥३७॥ मंदभाग्यायाः [मे] एवं निर्वेदहेतवः क्लेशाः मा स्युः येन पुरुषः अनुबंधं (देहादि परिवार) निर्हृत्य (त्यागून) शमं (शांति) ऋच्छति ([illegible]) ॥ ३८ तेन (त्या विष्णूनें) उपकृतं शिरसा आदाय ग्राम्यसंगताः दुराशाः त्यक्त्वा तं अधीश्वरं शरणं व्रजामि. ॥३९॥ संतुष्टा एतत् ([illegible]) श्रद्दधती ([illegible]) यथालाभेन जीवती

मैवं स्युर्मंदभाग्यायाः क्लेशा निर्वेदहेतवः ॥ येनानुबंधं निर्हृत्य पुरुषः शममृच्छति ॥ ३८ ॥ तेनोपकृतमादाय शिरसा ग्राम्यसंगताः ॥ त्यक्त्वा दुराशाः शरणं व्रजामि तमधीश्वरम् ॥ ३९ ॥ संतुष्टा श्रद्दधत्येतद्यथालाभेन जीवती ॥ विहराम्यमुनैवाहमात्मना रमणेन वै ॥ ४० ॥ संसारकूपे पतितं विषयैर्मुषितेक्षणम् ॥ ग्रस्तं कालाहिना ऽऽत्मानं को ऽन्यस्त्रातुमधीश्वरः ॥ ४१ ॥आत्मैव ह्यात्मनो गोप्ता निर्विद्येत यदा ऽखिलात् ॥ अप्रमत्त इदं पश्येद् ग्रस्तं कालाहिना जगत् ॥ ४२ ॥

अहं अमुना एव आत्मना रमणेन विहरामि. ॥४०॥ संसारकूपे पतितं, विषयैः मुषितेक्षणं (चोरिली दृष्टि ज्याची असा), कालाहिना (काळसर्पानें) ग्रस्तं आत्मानं त्रातुं (रक्षण) करण्यास अन्यः अधीश्वरः (समर्थ)[2] ॥४१॥ यदा अखिलात् निर्विद्येत (विरक्त होईल), [तदा] आत्मा एव आत्मनः गोप्ता (रक्षक) अप्रमत्तः इदं जगत् कालाहिना ग्रस्तं पश्येत्. ॥ ४२ ॥
बरच विहार करीत राहीन. ॥ ४० ॥ आत्मा संसारकूपांत पडला आहे विषयानीं त्याचा विवेक हरून घेतला आहे व काळसर्प त्याला गिळीत आहे. अशा स्थितीतून त्याची मुक्तता करण्यास समर्थ असा त्या भगवंतावांचून दुसरा कोण बरें सांपडेल? - ह्मणूनच मी इतर ब्रह्मादि देवांना सोडून देऊन त्या विष्णूचेच शरण जाणार. - ॥ ४१ ॥ - मात्र कोणी असें समजूं नये कीं, मीं आपलें रक्षण करून घ्यावें अशा कामनेनें विष्णूच्या भजनास लागत आहें. कारण सर्वांविषयीं वैराग्य पावून आत्मा [illegible]

१ दुस्तरत्वात्संसार एव कूपः संसाराला कूप ह्मणण्याचें कारण, त्यांत पडलेल्या प्राण्याला बाहेर निघणें अतिशय कठिण जातें हें होय [illegible]
२ सर्प चावून विष आंगांत भिनलें ह्मणजे मनुष्याला मूळ कडू लागतो व कडुलिंब गुळासारखा गोड वाटतो. तद्वतच काळसर्पानें ग्रासलेल्या (मनुष्याचे) [illegible] —
केवळ विषप्राय विषय कडू । तो प्रपंचिया झाला गोडू । अमृतप्राय परमार्थ गोडू । तो जाहला कडू विषयिकां ॥ नाथ, २८२

सामर्थ्यवान् आहे. पहा :- ज्या वेळीं प्राणी सावध होऊन, हें जग कालसर्पानें ग्रासलें आहे, असें पाहूं लागेल व सर्व विषयांबद्दल विरक्त होईल, त्यावेळीं आत्माच आत्म्याचें रक्षण करणारा होय (वेगळ्या रक्षकाची अपेक्षा राहत नाहीं). - ह्मणून मी केवळ प्रेमानें —कोणत्याही कामनेनें नव्हे—भगवानाचें भजन करणार - ॥ ४२ ॥ ब्राह्मण (अवधूत) ह्मणाला'— राजा, पिंगलेनें आपल्या बुद्धीचा असा निश्चय ठरविला, रतिसुख देणारा कोणी पुरुष यावा अशा इच्छेमुळें द्रव्याविषयीं दुष्ट आशा उद्भवली होती ती तोडून टाकिली आणि शांति स्वीकारून शय्येवर शयन केलें. ॥ ४३ ॥ - एकंदरीत सारांश काय, तर - आशा परम दुःखाचें मूळ होय व आशा सोडून दिली कीं अत्यंत सुख प्राप्त होतें

ब्राह्मणः उवाच— एवं व्यवसितमतिः (निश्चित बुद्धि जिची अशी) सा कांततर्षजां (पुरुषाविषयीं इच्छेनें जन्मलेल्या) दुराशा छित्वा (तोडून) उपशमं आस्थाय (अवलंबून) शय्यां उपविवेश. ॥४३॥ हि आशा परमं दुःखं. नैराश्यं परमं सुखं. यथा पिंगला कांताशां संछिद्य (तोडून) सुखं [यथा तथा] सुष्वाप (झोंपी गेली) ॥ ४४ ॥

ब्राह्मण उवाच । एवं व्यवसितमतिर्दुराशां कांततर्षजाम् ॥ छित्त्वोपशममास्थाय शय्यामुपविवेश सा ॥ ४३ ॥

आशा हि परमं दुःखं नैराश्यं परमं सुखम् ॥ यथा संछिद्य कांताशां सुखं सुष्वाप पिंगला ॥ ४४ ॥

इति श्रीभा॰महा॰एका॰पिंगलोपाख्याने ऽष्टमो ऽध्यायः ॥ ८ ॥ ब्राह्मण उवाच । परिग्रहो हि दुःखाय यद्यत्प्रियतमं नृणाम् ॥ अनंतं सुखमाप्नोति तद्विद्वान्यस्त्वकिंचनः ॥ १ ॥

॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे अष्टमो ऽध्यायः. ॥ ८ ॥ ब्राह्मण. उवाच—नृणां यत् यत् प्रियतमं, [तस्य तस्य] परिग्रहः (जवळ बाळगणें) उदाहरण हेंच पहा :— कांताची आशा तोडून टाकिल्याबरोबर पिंगलेला सुखानें झोंप लागली. ॥ ४४ ॥ इति एकादशस्कंधे अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

ब्राह्मण (अवधूत) ह्मणाला'— राजा, (१८) - आतां कुरर (टिटवा) पक्ष्यापासीं काय शिकलों, तें सांगतों : - मनुष्यांना जें जें काहीं अत्यंत प्रिय वाटतें त्या त्या वस्तूचा ती परिग्रह करितात (ती ती प्रिय वस्तु जवळ बाळगितात) ह्मणून तो परिग्रहच त्यांना दुःख देण्यास कारण होतो. हें जाणून जो पुरुष कसलाही संग्रह करणें सोडून देईल. त्याला

१ ऐसें कळलें की तत्त्वता । येथ आपणचि आपणिया त्राता । ... नाथ, २८७. २ जें आशापाशाचें छेदन । तेंच समाधीचें निजस्थान । ते निजसमाधि पावोन । पिंगला जाण पहुडली ॥ अवधूत सांगे यदूसी । प्रत्यक्ष वेद्याश्चता वेश्येसी । ते निराश होता मानसीं । निजसुखासीं पावली ॥ नाथ, ३२४ व ३२७.

३ यामें कपोतांच्या स्थानांमें एकदें सिद्ध झालें आहे कीं, कुटुंबाचा परिग्रह करणाराला दुःख प्राप्त होतें आता कुररापासून ही गोष्ट घ्यावयाची कीं, एकाकी राहणाऱ्या सन्यासानें सुद्धां ' मठाची उठाठेव शिष्यसंप्रदाय इत्यादि परिग्रह चालू नयेत, नाहीं तर जगांत आपल्याला अशीं उदाहरणें आढळतात कीं घरदार सोडून निःसंग झाल्यावर देखील मनाला परिग्रहाभिमान सुटत नाहीं पहा —

अनंत सुख प्राप्त होतें. ॥ १ ॥ - उदाहरण पहा :- टिटव्याजवळ मास होतें, ह्मणून त्याच्यापेक्षां बलाढ्य व ज्याच्याजवळ मास नव्हतें ते पक्षी त्याला मारूं लागले पण ते मास
टाकून देतांच तो सुख पावला. ॥ २ ॥ (१९) - लहान मुलापासून काय शिक्षण घेतलें, तें ऐक - लहान मुलाप्रमाणेंच मला मान नाही, अवमान नाही, आणि गृह पुत्र इत्यादि

दुःखाय. तत् (तें) विद्वान् (जाणणारा) यः अकिंचनः (नाहीं काहीं ज्याजवळ असा, दरिद्री) सः अनंत सुखं आप्नोति. ॥ १ ॥ ये बलिनः निरामिषाः (नाहीं मास ज्याजवळ ते) ते
सामिषं (मासयुक्त) कुररं (टिटव्याला) जघ्नुः. सः तत् आमिषं (मास) परित्यज्य सुखं समविंदत. ॥ २ ॥ मे मानावमानौ न स्तः. गेहपुत्रिणां (गृह व पुत्र ज्याला आहेत त्यांना

सामिषं कुररं जघ्नुर्बलिनो ये निरामिषाः ॥ तदामिषं परित्यज्य स सुखं समविंदत ॥ २ ॥ न मे
मानावमानौ स्तो न चिंता गेहपुत्रिणाम् ॥ आत्मक्रीड आत्मरतिर्विचरामीह बालवत् ॥ ३ ॥

असते ती) चिंता न; [अहं] इह बालवत् आत्मक्रीडः (स्वतांशींच खेळणारा), आत्मरतिः (स्वतावरच प्रेम ज्याचें असा) [सन्] विचरामि. ॥ ३ ॥
परिवाराच्या धन्यांना जी चिंता वहावी लागते तीही (घराची व मुलाबाळांची काळजी) नाही. तर मी ह्या जगामध्यें आपल्याशींच खेळत व स्वतावरच प्रेम ठेवून आनंदांत
असतों. ॥ ३ ॥

(मागील टीप पुढें चालू)

नाथ ह्मणतात :—
परिग्रहो जिणोनि गाढा । लंगोटी त्यजूनि झाला उघडा । नागवे माथां वेऊनि धडा । लाविल्या झाडा शिरपित ॥ त्या वृक्षाचें कोणी नाम नेणे । त्यानि आम्हां केलें
सांडी । थोर परिग्रहाची सांकडी । दु:खें पीडी सर्वांसी ॥ नाथ, २९ । ३०.

१ बालबोधिनीकार ह्मणतात :— बलिनः श्येनगृध्रादयः हे 'बलाढ्य पक्षी ससाणा, गिधाड इत्यादि' समजावे पण ससाणा वगैरे असा अर्थ घेतल्यास तर टिटव्याला त्यांपासून त्रास होत नाहीं
होता येणार नाहीं, अर्थात दृष्टांताचें सौरस्य जाईल. करितां नाथ ह्मणतात, 'हे बलाढ्य पक्षी टिटव्याचे जातभाईच समजावे —
तें आमिष देखोनियां फार । बळी जे निरामिष कुरर । ते धांविन्नले सत्वर । लहान थोर मिळोनि ।... एक झडपिती पांखीं । एक चपेटे हाणिती नखीं । एक टिटवी
तिती मुखीं । परम दु:खी होतसे ॥ ... हे माझे स्वजाती पहा हो । साडोनियां सुहृद्भावो । मज कां करूं आले अपावो । तो अभिप्रावो विचारी । आमिष माझिया दु:खासी
मूळ । मज पासीं आमिषकवळ । तो त्यजूनि तत्काळ । सुखी सुनिश्चळ बैसला ॥ ४१ ॥ ४४ ॥ ४६ ४७.

चिंतेतून सुटलेले आणि परमानंदसागरामध्यें पोंहत राहिलेले असे - जगात - काय ते दोघेच असतात एक अज्ञानी व कसलीही खटपट न करणारें असें लहान मूल, आणि दुसरा जो कोणी गुणमय प्रकृतीहून पर अशा परमात्मरूपीं प्राप्त झाला तो (तत्त्वज्ञानी) ॥ ४ ॥ - (२०) कुमारीपासून काय शिकलों ते ऐक तिची गोष्ट अशी आहे - एके ठिकाणी एका उपवर मुलीला मागणी घालणारे काहीं पाहुणे तिच्या घरी आले. ह्यावेळीं आईबाप इत्यादि नात्याचीं माणसे सगळी कोठेंशीं गेलीं असल्यामुळे पाहु-

द्वौ एव चिंतया मुक्तौ, परमानंदे आप्लुतौ (मम) [च], यः विमुग्धः (अज्ञानी) जडः (निरुद्योगी) बालः, यः [च] (गुणेभ्यः (गुणाहून) पर (पलिकडे असणाऱ्या [illegible]) गतः ॥ ४ ॥ कश्चित् कुमारी बंधुषु क अपि यातेषु (गेलेले) [सत्सु], आत्मानं वृणानान् (वरणारे) गृहं आगतान् तान् स्वयं अर्हयामास (सत्कारिते झाली ॥ ५ ॥

द्वावेव चिंतया मुक्तौ परमानंद आप्लुतौ ॥ यो विमुग्धो जडो बालो यो गुणेभ्यः परं गतः ॥४॥

कश्चित्कुमारी त्वात्मानं वृणानान्गृहमागतान् ॥ स्वयं तानर्हयामास क्वापि यातेषु बंधुषु ॥ ५ ॥

तेषामभ्यवहारार्थं शालीन्रहसि पार्थिव ॥ अवघ्नंत्याः प्रकोष्ठस्थाश्चक्रुः शंखाः स्वनं महत् ॥ ६ ॥

पार्थिव, तेषां अभ्यवहारार्थं (भोजनासाठीं) रहसि (एकांतीं) शालीन् (भात, साळी) अवघ्नत्याः (कांडणाऱ्या) [तस्याः] प्रकोष्ठस्थाः (मनगटांत असलेले) शंखाः (शंख—शंखाच्या

ण्याचें आदरातिथ्य करण्याचें काम त्या मुलीला स्वतांलाच करावें लागलें ॥ ५ ॥ राजा, पुढें त्याना भोजन देण्यासाठीं - तांदूळ तयार केले पाहिजेत ह्मणून ती घरातच - गुप्त स्थळी (पाहुण्याच्या दृष्टीस पडणार नाहीं अशा जागी) भात कांडूं लागली पण घाव घालताना तिच्या मनगटातील शंखवलयें (बांगड्या) मोठ्यानें खुळखुळ वाजूं लागली ॥६॥

---

१ निश्चितपणा आणि परमसुख ह्या दोन गोष्टींत अज्ञ अर्भकाचें आणि तत्त्वज्ञान्याचें सादृश्य असतें बाकी दोघाची भावी स्थिति अगदीं वेगळी असते कारण पहा:—

पाहतां बालकाचे ठायीं । गुप्त वासना असे देहीं । ते अंकुरोनि पाहीं । अवश्य अपायीं घालील ॥ तैसे नव्हे योगिया गुणातीत । जो पूर्णानंदें पूर्ण भरित । त्यासि सुखदुःखाची मात । नाहीं जगांत सर्वथा ॥

जोंपर्यंत सर्पण असतें, तोंपर्यंत अग्नि त्याला जाळितो, काष्ठ संपलीं कीं आगि स्वकीय तेजोरूपात प्रविष्ट होतो. त्याप्रमाणें योगी समस्त गुणाना जिंकून गुणांपलिकडील निर्गुण परमात्मरूपीं पावला, त्याला संसारदुःखें होणार कोठून ? नाथ, ७७ । ७८ व ८३ । ८४ ओंव्याचा आशय.

२ पुसती घरीं आहे कोण । लाजे नोवरी धरी मौन । त्यासि न देतां दर्शन । पूजाविधान ते मांडी ॥ वातायनद्वारा आसनें । दिधलीं समस्तां कारणें । इत्यादि नाथ, ८९।९०

३ त्यांच्या पाहुणेराची चिंता । उशिरां येईल माझी माता । ते काळीं साळी सडिता । विलंब सर्वथा होईल ॥ ऐसें विचारुनि जाण । साळी स्वइं निद्धे आपण । इत्यादि नाथ, ९२।९३

मुलगी मोठी समंजस होती. - घरांत तांदूळ देखील नाहीत; आयत्या वेळी आपण स्वतःच भात कांडीत आहों - इतकी आपली दीन स्थिति पाहुण्यांना कळून येणें [illegible] बरे वाटेना. ह्मणून लज्जेस्तव तिनें आपल्या बांगड्या एकेक एकेक अशा उतरून काढिल्या आणि प्रत्येक हातांत दोनदोनच शेष ठेविल्या ॥ ७ ॥ तरी पण पुन्हा [illegible] तांच त्या दोन दोन बांगड्यांचा देखील शब्द निघूं लागला. ह्मणून शेवटीं तिनें त्यांतील आणखी एकेक वलय उतरून ठेविलें आणि प्रत्येक हातांत एकेकच बांगडी राहिली तेव्हा केलेल्या बांगड्या) महत् [यथा तथा] स्वनं (शब्द) चक्रुः. ॥ ६ ॥ महती (महाबुद्धिमती) सा तत् (तें [illegible]) जुगुप्सितं (निंद्य) मत्वा ([illegible]) व्रीडिता (लाजलेली) ततः पाण्योः (हातांतील) एकैकशः शंखान् बभंज (उतरिती झाली), द्वौ द्वौ अशेषयत्. ॥ ७ ॥ अवघ्नत्याः ([illegible]) [तस्याः], उभयोः अपि शंखयोः घोषः अभूत् तत्र अपि

सा तज्जुगुप्सितं मत्वा महती व्रीडिता ततः ॥ बभंजैकैकशः शंखान्द्वौ द्वौ पाण्योरशेषयत् ॥ ७ ॥ उभयोरप्यभूद्घोषो ह्यवघ्नंत्याः स्म शंखयोः ॥ तत्राप्येकं निरभिददेकस्मान्नाभवद्ध्वनिः ॥ ८ ॥ अन्वशिक्षमिमं तस्या उपदेशमरिंदम ॥ लोकाननुचरन्नेतॉल्लोकतत्त्वविवित्सया ॥ ९ ॥ वासे बहूनां कलहो भवेद्वार्ता द्वयोरपि ॥ एक एव चरेत्तस्मात्कुमार्या इव कंकणः ॥ १० ॥

मन एकत्र संयुञ्ज्याज्जितश्वासो जितासनः ॥ वैराग्याभ्यासयोगेन ध्रियमाणमतंद्रितः ॥ ११ ॥

एकं निरभिदत् (फोडिती झाली), एकस्मात् ध्वनिः न अभवत्. ॥ ८ ॥ अरिंदम, लोकतत्त्वविवित्सया एतान् लोकान् अनुचरन् ([illegible]) अहं तस्याः इमं उपदेश अन्वशिक्ष (शिकलों). ॥ ९ ॥ बहूनां वासे कलहः द्वयोः अपि वार्ता (गोष्टी) भवेत्; तस्मात् कुमार्याः कंकण इव एक एव चरेत् ॥ १० ॥ अतन्द्रित. ([illegible]) मात्र ध्वनि होईनासा झाला. ॥ ८ ॥ हे शत्रुमर्दना राजा, मी लोकाचें यथार्थ स्वरूप समजून घेण्यासाठीं ह्या लोकांत फिरता फिरता - [illegible] गेलों होतों, व त्या ठिकाणी - त्या मुलीपासून हा उपदेश शिकलों की, ॥ ९ ॥ बहुत मनुष्ये एकत्र राहिली असता कलह उत्पन्न होतो; दोघे असले तरी [illegible] होतात; म्हणून [illegible] कानें, कुमारीच्या कंकणाप्रमाणें, एकटें राहत असावें. ॥ १० ॥ (२१) - चित्ताची एकाग्रता केली असता द्वैत स्फुरत नाहीसे होतें [illegible] समाधि [illegible] होतो [illegible]

---

१ बालप्रबोधिनीकार ' महती ' ह्या पदाचा अर्थ ' मोठ्या कुळांत जन्मलेली ' असा करितात, व त्यांस [illegible]

२ या शंखवलयाचा ध्वनी । पडे पाहुण्यांचे कानीं । ते अत्यंत लाज मज लागूनी । नव वधू कांडणीं बैसली ॥ नाथ, ९७.

३ मूळांत ' बभंज ' पद आहे; त्याचा खरा अर्थ ' फोडिती झाली ' असा असता येथें ' उतरून ठेविती झाली ' असा घेतला त्याचें कारण—

जरी कंकण फोडूं आतां । तरी ते सुहृदींच अशुभता । शतायु हो माझा भर्ता । न फोडी सर्वथा हा हेतु । नाथ, ९८

४ हें संबोधन देण्याचा आशय नाथांनीं असा काढिला आहे :— ' राजा, तुला गर्व वाटत असेल की मी भूमीवरील सगळे राजे जिंकिले [illegible] व्यर्थ होय. आता, यत्न करशील तर ह्या शत्रूंना जिंकणें तुजसारख्याला दुःसाध्य नाहीं ' १०२ । १०४

वाणकारापाशीं शिकलों : पहा : - योग्यानें आळस सोडून देऊन प्रथम आसन जिकावें (साध्य करावें—स्थिर बसण्याची सवय करावी, प्राणायाम करण्यास ही सवय अत्यत उपयोगाची आहे), नंतर प्राणवायु वश करून घ्यावा. - मन हें श्वासाच्या अधीन असल्यामुळे श्वास जिकिला असता निश्चल होते आणि मग तें वश झालेलें मन एका आश्रयावर—हा आश्रय पुढील श्लोकात वर्णिला आहे—लावावें - ह्यावर कोणी ह्मणेल क्षणभर मन निश्चल झालें तरी जर कदाचित् विषयवासनेनें पुन्हा विक्षेप पावले अथवा सुषुप्तीमध्यें होतें तसे मुळीच लीन होऊन गेलें तर काय करावें ? तर तेंही सागतो. - विषयाविषयीं वैराग्य धरावें - ह्मणजे चित्त विक्षेप (चाचल्य) पावणार नाहीं, - व अभ्यासयोगानें तें लक्ष्यावर स्थिर करावें - ह्मणजे सुषुप्तींतल्याप्रमाणें सर्वथा लीन होण्याची भीति नको. - ॥ ११ ॥ - चित्त स्थिर करण्याचा आश्रय परमानदरूप भगवान् होय जे हे

जितासनः (जिंकिलें आसन ज्यानें असा), जितश्वासः (जिंकिला प्राणवायु ज्यानें, असा) [च सन्] वैराग्याभ्यासयोगेन ध्रियमाण (स्थिर केलें जाणारें) मनः एकत्र सयुज्यात् (जोडो) ॥ ११ ॥ यत् एतत् मनः यस्मिन् लब्धपदं (मिळालें स्थान ज्याला असें) [सत्] शनैः शनैः (हळूहळू) कर्मरेणून् (कर्मांचे सूक्ष्म भाग वासना) मुचति (सोडितें), [तस्मिन् युंज्यात्

यस्मिन्मनो लब्धपदं यदेतच्छनैः शनैर्मुचति कर्मरेणून् ॥ सत्त्वेन वृद्धेन रजस्तमश्च विधूय निर्वाणमुपैत्यनिधनम् ॥१२॥

तत्] वृद्धेन (वाढलेल्या) सत्त्वेन रजः, तमः च विधूय (झाडून, दूर करून) अनिधन (नाहीं इधन ह्मणजे जाळण्याजोगा भाग, गुणकार्य ज्याला असें) निर्वाण (वृत्तिरहित स्थितीस) उपैति ॥१२॥

लयविक्षेप पावणारें मन, तें त्या आश्रयावर स्थिरता पावलें की हळूहळू कर्मवासना सोडू लागते. - ह्यावर कोणी ह्मणेल कीं कर्मवासना सुटल्या तर चित्त विक्षेप पावणार (चंचल होणार) नाहीं, पण निद्रेंतल्याप्रमाणें त्याचा लय होणें टाळायाचें कठिणच पडेल तर त्याला उत्तर .- सत्त्वगुणाची वृद्धि झाली असता मन रज आणि तम हे गुण सोडून देते - विक्षेप आणि लय हे अनुक्रमें रज आणि तम ह्या गुणाची कार्यें होत, ते गुणच नाहींतसे झाले की त्याची कार्यें विक्षेप व लय हीं व्हावयाचींच नाहींत व - रज आणि तम जाळून टाकणारा सत्वगुणही आपोआप लीन होतो. अशा रीतीनें सगळीं गुणकार्यें नाहींतशीं झालीं असता चित्तामध्ये कोणत्याही वृत्ति उठत नाहीतशा होतात व तें ध्येय भगवताच्या आ-

१ जैसा अग्नि असे काष्ठाच्या मेळीं । मथिल्या काष्ठाची करी होळी । काष्ठ नाशूनि तत्काळीं । त्यजूनि इगळी उपशमे ॥ तैसें वाढोनि सत्व उत्तम । नाशूनि साडी हे रजतम । पाठी सत्त्वाचाही संभ्रम । स्वयें उपरम पावला ॥ नाथ, १४४ । ४५

२ योगशास्त्रात सागितलें आहे कीं, मनसो वृत्तिशून्यस्य ब्रह्माकारतया स्थितिः । या ऽसप्रज्ञातनामा ऽसौ समाधिरभिधीयते ॥ मन गुणवृत्तींनीं रहित होऊन ब्रह्मरूपानें राहू लागणे, ह्याला ' असप्रज्ञात ' नावाचा समाधि ह्मणतात

कारानें राहू लागतें. ॥ १२ ॥ अशा प्रकारें आत्मरूपीं चित्त चिकटून राहिलें असता मनुष्यास बाह्य किंवा आंतर अशा कोणत्याही विषयाचें (द्वैताचें) स्फुरण होत नाहीं ह्याला उदाहरण बाण तयार करणाराचें. त्या कारागीराचें चित्त आपला बाण - सरळ करण्याच्या - कामीं इतकें गढून गेलें होतें कीं त्याच्या जवळून - नगारे नौबती वाजवीत - राजाची स्वारी गेली, पण तो समारंभ त्यानें मुळींच पाहिला नाहीं (स्वारी निघून गेल्यावर बऱ्याच वेळानें मागून एक मनुष्य येऊन त्या कारागिराला ' इकडून महाराजांची स्वारी गेली काय? ' म्हणून विचारू लागला, तों कारागिराकडून त्याला ' मी नाहीं बोवा कोठें पाहिली ' असें उत्तर मिळालें ;' ॥ १३ ॥ (२७) - सर्पापासून काय शिकलों तें ऐक :— सर्प लोकांच्या भीतीनें एकटा फिरतो, नेहमीं एका स्थळीं राहत नाहीं, प्रमत्त असत नाहीं (सावध असतो), गुहेंत शयन करितो, वर्तनावरून विषारी किंवा निर्विष तें

यथा इषुकारः (बाण करणारा) इषौ (बाणावर) गतात्मा (गुतलें मन ज्याचें असा) [सन्] पार्श्वे (बाजूकडे) व्रजंतं (जाणाऱ्या) नृपतिं (राजाला) न ददर्श एवं नरः आत्मनि अवरुद्धचित्तः (ठाविलें चित्त ज्यानें असा) बहिः, अंतरं वा किंचित् न वेद. ॥ १३ ॥ मुनिः एकः, एकचारी (एकटा फिरणारा) अनिकेतः (गृहरहित) अप्रमत्तः गुहाशय (गुहेंत

तदैवमात्मन्यवरुद्धचित्तो न वेद किंचिद्बहिरंतरं वा ॥ यथेषुकारो नृपतिं व्रजंतमिषौ गतात्मा न ददर्श पार्श्वे ॥ १३ ॥ एकचार्यनिकेतः स्यादप्रमत्तो गुहाशयः ॥ अलक्ष्यमाण आचारैर्मुनिरेको ऽल्पभाषणः ॥ १४ ॥ गृहारंभो ऽतिदुःखाय विफलश्चाध्रुवात्मनः ॥ सर्पः परकृतं वेश्म प्रविश्य सुखमेधते ॥ १५ ॥ एको नारायणो देवः पूर्वसृष्टं स्वमायया ॥ संहृत्य कालकलया कल्पांत इदमीश्वरः ॥ १६ ॥

एकांतीं राहणारा), आचारैः (वर्तनीं) अलक्ष्यमाणः (न ओळखिला जाणारा) अल्पभाषणः (थोडें बोलणारा) [च] स्यात्. ॥ १४ ॥ गृहारंभः (घर बांधणें) अध्रुवात्मनः (नश्वर देहास) अतिदुःखाय, विफलः च. सर्पः परकृतं (दुसऱ्यानें रचिलेल्या) वेश्म (गृहास) प्रविश्य सुखं एधते (नांदतो) ॥ १५ ॥ एकः नारायणः देवः ईश्वरः स्वमायया पूर्वसृष्ट

कळून येत नाहीं, कोणाच्या साह्याची अपेक्षा ठेवीत नाहीं व कधीं काळीं थोडे शब्द उच्चारितो. तशी साधकाची वृत्ति असावी. म्हणजे - मुनीनें एकटें फिरावें [illegible] नये, नित्य सावध असावें, एकांतीं रहावें, वर्तणुकीवरून लोकांना स्वताची स्थिति ओळखूं देऊं नये, साह्याची अपेक्षा धरूं नये व फारसें बोलूं नये ॥ १४ ॥ शिवाय, अनेक घर बांधणें अतिदुःखास कारण असतें आणि देह नश्वर असल्यामुळें तें निष्फळही होय - पहा - सर्प दुसऱ्यानें केलेल्या गृहांत (' आयत्या बिळांत ') शिरून सुखानें नांदत असतो. ॥ १५ ॥ (२३) - एकटा ईश्वर कोणत्याही मदतनीसाची अपेक्षा न धरितां जगाचें सृष्टिसंहार चालवितो हें तत्त्व नाभीतून [illegible] कोळ्याच्या [illegible]

१ कुमारीपासून ' समानशीलाच्या (योग्याच्या) ही समागमांत राहूं नये ' हा उपदेश घेतला आणि सर्पापासून ' जनांच्या उपसर्गांपासून दूर राहावें ' हें शिकवल्याचें, [illegible]
२ हो कां योगियाचा आचार । करितां देखती लहान थोर । सविकल्पनिर्विकल्प विचार । न कळे साचार कोणासी ॥ नाथ. १६७

ओळखिलें: पहा - नारायण देव एक (इतर साधनाची अपेक्षा न धरणारा) आहे. तो ईश्वर आपल्या मायेनें पूर्वी निर्मिलेलें हें विश्व कल्पांतसमयीं काळशक्तीच्या योगें आटोपून घेऊन ॥ १६ ॥ एकटा आत्म्याच्या आधारावर सर्वांना आश्रयभूत होऊन राहिला. त्याच्याठिकाणीं सजातीय किंवा विजातीय भेद अगदीं नव्हता त्या वेळीं आत्म्याच्या प्रभावरूप काळानें सत्त्वादि तीन गुण ह्या शक्ति समानप्रमाणावस्थेस पावविल्या होत्या. तो आदिपुरुष परमात्मा प्रकृति (गुणाची साम्यावस्था) व पुरुष (प्रकृति ज्याचा उपाधि तो चिदंश) याचाही नियामक होय. ॥ १७ ॥ ब्रह्मादि मोठे देव आणि अन्य मुमुक्षु जीव यानीं मिळविण्याजोगें उत्तम पद तो भगवान (पूर्वी निर्मिलेलें) इदं कल्पांते कालकलया (काळशक्तीनें) संहृत्य (आवरून) ॥ १६ ॥ एकः एव अद्वितीयः आत्माधारः अखिलाश्रयः अभूत्. आत्मानुभावेन कालेन सत्त्वादिषु शक्तिषु साम्यं (सारखेपणास) नीतासु [सतीषु], प्रधानपुरुषेश्वरः आदिपुरुषः ॥१७॥ निरुपाधिक. केवलानुभवानंदसंदोहः कैवल्यसंज्ञित परावराणां परम. आस्ते. ॥ १८ ॥

एक एवाद्वितीयोऽभूदात्माधारोऽखिलाश्रयः ॥ कालेनाऽऽत्मानुभावेन साम्यं नीतासु शक्तिषु ॥ सत्त्वादिष्वादिपुरुषः प्रधानपुरुषेश्वरः ॥ १७ ॥ परावराणां परम आस्ते कैवल्यसंज्ञितः ॥ केवलानुभवानंदसंदोहो निरुपाधिकः ॥ १८ ॥ केवलात्मानुभावेन स्वमायां त्रिगुणात्मिकाम् ॥ संक्षोभयन्सृजत्यादौ तया सूत्रमरिंदम ॥ १९ ॥ तामाहुस्त्रिगुणव्यक्तिं सृजंतीं विश्वतोमुखम् ॥ यस्मिन्प्रोतमिदं विश्वं येन संसरते पुमान् ॥ २० ॥

अरिंदम, [सः] केवलात्मानुभावेन त्रिगुणात्मिका स्वमायां संक्षोभयन् (खवळविणारा) [सन्] तया आदौ सूत्रं (महत्तत्त्व) सृजति (निर्मितो). ॥ १९ ॥ विश्वतोमुख (सर्व होय. कारण, कैवल्य (मोक्ष) ही संज्ञा त्याला आहे. ज्याच्या ठिकाणीं कोणताही उपाधि नाहीं अशा केवळ (स्वयमेव स्फुरणाऱ्या) अनुभवरूप आनंदाचा तो समूह असतो. ॥ १८ ॥ शत्रुमर्दना राजा, तो परमात्मा केवळ आत्म्याचें सामर्थ्य जो काल त्याच्या योगें त्रिगुणमय मायेला क्षुब्ध करून प्रथमारंभीं सूत्र (क्रियाशक्तिप्रधान महत्तत्त्व) निर्मितो. ॥ १९ ॥ त्या मूत्रालाच त्रिगुणव्यक्ति (तीन गुणाचें कार्य) असें ह्मणतात. तीच (तें महत्तत्त्व) अनेक मुखानीं (विविध प्रकारानीं) हें त्रिगुणात्मक विश्व - अहंकाराच्या द्वारानें - उत्पन्न करिते. - त्या त्रिगुणकार्य अशा महत्तत्त्वाला सूत्र ह्मणण्याचें कारण असें कीं, - हें विश्व त्याच्यामध्यें ओंवून राहिलेलें आहे, व त्या प्राणवायुरूपी मूत्राच्या योगें

---

१ ईश्वराचा मायेशीं संबंध कसा प्रकारचा आहे: पहा — धुई दाटली आकाशीं । आकाश नातळे धुईशीं । तेवीं निजांगें वागवूनि मायेशीं । अलिप्त तियेसी वर्तत ॥ नाथ, ६८९.

२ किंवा नाथांच्या मताप्रमाणें 'पर ह्मणजे ब्रह्मादि देव व अवर ह्म० मनुष्यांपासून स्थावरापर्यंत सर्व याचा परम ह्म० नियामक व चालक ' असाही अर्थ करावा १९६

३ ह्यालाच ब्रह्मांडांतर्वर्ती सूत्रसंज्ञक प्राण ह्मणतात. ह्या अर्थाची श्रुति– ' वायुर्वै गौतम सूत्र वायुना वै गौतम सूत्रेणायं च लोकः परश्च लोकः सर्वाणि च भूतानि संदृब्धानि ' गौतमा, वायुच सूत्र होय. गौतमा, वायुरूप सूत्रानेंच हा लोक, परलोक व समस्त भूतें बांधलेलीं आहेत. नाथ ह्मणतात —

जीव संसार पावतो. ॥ २० ॥ जसा कोळी आपल्या पोटातून निघालेले धागे मुखानें बाहेर पसरितो (त्याचें जाळें बांधितो) व त्याच्याशी काहीं वेळ खेळून पुन्हा ते बाऊन टाकितो, तशाच रीतीनें परमेश्वर स्वतापासून जग निर्मून, त्यात क्रीडा करून शेवटी तें आटोपून घेतो. ॥ २१ ॥ (२४) - भगवन्ताचें ध्यान करण्य न जे गट्न गेरे, त्याना भगवंतासारखें स्वरूप प्राप्त होईल ह्यात कांही नवल नाहीं, हें तत्व मी कुमारिणमाशीपाशी शिकलों पहा. - प्राणी प्रेमानें, द्वेषामुळें अथवा भयामुळें आपलें मन, [illegible] लागेल अशारीतीनें, एकाग्रपणें ज्याज्या ठिकाणीं लावील त्याच्या त्याच्या सारखें स्वरूप त्या प्राण्याला प्राप्त होतें ॥ २२ ॥ राजा, कुमारिणमाशी आणलेल्या [illegible] बाजूनीं) सृजतीं तां त्रिगुणव्यक्ति (तीन गुणाचें कार्य असतें) आहु., यस्मिन् इदं विश्व प्रोतं (गोवलेलें); येन पुमान् संसरते ॥ २० ॥ यथा ऊर्णनाभि ([illegible] ज्याच्या तो, कोळी) हृदयात् [उद्धृतां] ऊर्णां वक्त्रतः (मुखानें) संतत्य (पसरून) तया विहृत्य भूयः तां ग्रसति. एवं महेश्वर [करोति]. ॥ २१ ॥ देही धिया स्नेहात्

> यथोर्णनाभिर्हृदयादूर्णां संतत्य वक्त्रतः ॥ तया विहृत्य भूयस्तां ग्रसत्येवं महेश्वरः ॥ २१ ॥
>
> यत्र यत्र मनो देही धारयेत्सकलं धिया ॥ स्नेहाद्द्वेषाद्भयाद्वापि याति तत्तत्सरूपताम् ॥ २२ ॥
>
> कीटः पेशस्कृतं ध्यायन्कुड्यां तेन प्रवेशितः ॥ याति तत्सात्मतां राजन्पूर्वरूपमसंत्यजन् ॥ २३ ॥

द्वेषात्, भयात् वा अपि यत्र यत्र सकलं (एकाग्र) मनः धारयेत्, तत्तत्सरूपतां याति. ॥ २२ ॥ राजन्, तेन कुड्या (भिंतीत) प्रवेशितः पेशस्कृतं (कुमारिण) ध्यायन् कीटः (किडा) पूर्वरूपं असंत्यजन् (न सोडणारा) [सन्] तत्सात्मता याति. ॥ २३ ॥

भिंतीमध्यें मरून (भिंतीवर बांधिलेल्या आपल्या घरात कोंडून) ठेविते. - तो किडा आता शत्रु येऊन मला खाईल, आता मारील अशा भीतीनें - कुमारिणीचें ध्यान करितां आपलें पूर्वीचें शरीर सोडिल्यावाचूनच तिच्यासारखें स्वरूप पावतो (कुंभारिण बनून जातो). - किड्याला एकाच शरीरात जर [illegible] स्वरूप मिळतें तर [illegible] देहांतरीं भगवत्सारूप्य मिळेल ह्यात नवल काय ?). - ॥ २३ ॥

(मागील टीप पुढे चालू)

एवढी संसार उत्पत्ति । करावया इच्छी व्युत्पत्ति । याला्गीं नावें क्रियाशक्ति । साच्य समर्था बोलिजे ॥ या क्रियाशक्तिमंत्राच्या ठायीं । जग ओविलें असे पाहीं । आडव तिडवें ठायींच्या ठायीं । गोवून लवलाहीं वाढत ॥ नाथ, ६६४ । ६५.

१ नाथाचें मत येथें भिन्न आहे. ते म्हणतात : ' देहान्तरीं भगवत्सारखें रूप मिळणें ह्या भागध्यान काहीं अप नाहीं. तर ह्या देहांतच [illegible] प्राप्त होते [illegible], कीटकास भ्रमरत्व जोडे । हें तीव्रध्यानें न घडे ते घडे । विचारिता दोन्ही मूढें । जड जड बांधेलें ॥ भगवद्ध्यान नव्हे तैसें । [illegible] भगवद्रूपाच असे । [illegible] नासे । अनायासें तद्रूप ॥ येथें देहें याचि वृत्ती । आपुली आपण न जाणे मुक्ती । तेथवें भगवत्पदप्राप्ति । ते वृथा व्युत्पत्ति नव्हेही ॥

समर्था (राजा), ह्या गुरूंपासून असें हें ज्ञान मीं संपादन केलें. आता स्वतांच्या शरीरापासून कोणता उपदेश घेतला, तो सांगतों, ऐक ॥ २४ ॥ देह हा माझा गुरु होय कारण, तो (१) वैराग्य आणि (२) विवेक उत्पन्न करून देणारा आहे. (१) - वैराग्य कसें देतो, पहा - ह्याला (देहाला) जन्म आणि मृत्यु लागलेले आहेत आणि संतत दुःख हेंच ह्याचे परिणामींचें फळ होय, - तेव्हा ह्या देहावर व ह्याच्या संबंधी दारदार इत्यादि परिवारावर प्रेम काय म्हणून धरावें ' अशा दृष्टीनें वैराग्य सहजच प्राप्त होतें. (२) बरें, विवेक कसा मिळतो पहा :- हा देह आहे म्हणूनच मला तत्त्वाचे पूर्णपणे विचार करिता येतात. - अशा रीतीनें देहाचे मजवर अतिशय उपकार आहेत

प्रभो, मे एव एतेभ्य: गुरुभ्य: एषा मतिः (उपदेश) शिक्षिता. वदतः मे स्वात्मोपशिक्षितां (आपल्या देहापासून शिकलेली) बुद्धिं शृणु ॥ २४ ॥ सत्त्वनिधन (जन्ममृत्यु) सततार्त्युदर्क (सतत दुःख हें उत्तरफल) [च] बिभ्रत् (धारण करणारा) विरक्तिविवेकहेतु (वैराग्याला व तत्त्वविचाराला साधन) देह: मम गुरु: अनेन तत्त्वानि यथा (पूर्णपणें) विमृशामि (विचार

एवं गुरुभ्य एतेभ्य एषा मे शिक्षिता मतिः ॥ स्वात्मोपशिक्षितां बुद्धिं शृणु मे वदतः प्रभो ॥ २४ ॥ देहो गुरुर्मम विरक्तिविवेकहेतुर्बि-भ्रत्स्म सत्त्वनिधनं सततार्त्युदर्कम् ॥ तत्त्वान्यनेन विमृशामि यथा तथाऽपि पारक्यमित्यवसितो विचराम्यसंगः ॥२५॥ जायात्मजार्थ-पशुभृत्यगृहाप्तवर्गान् पुष्णाति यत्प्रियचिकीर्षया वितन्वन् ॥ स्वांते सकृच्छ्रमवरुद्धधनः स देहः सृष्ट्वाऽस्य बीजमवसीदति वृक्षधर्मा ॥२६॥

करितों). तथा अपि 'पारक्यं' (दुसऱ्याचा) इति अवसितः (निश्चयें जाणणारा) असंगः [सन्] विचरामि. ॥ २५ ॥ यत्प्रियचिकीर्षया जायात्मजार्थपशुभृत्यगृहाप्तवर्गान् वितन्वन्

खरें; - तथापि, तो ' दुसऱ्याचा ' आहे म्हणजे ' कोल्ह्याकुत्र्याचें निदान अग्नीचें तरी भक्ष्य होय ' अशा निश्चयानें मी त्यावरील आसक्ति सोडून खुशाल फिरत असतों ॥ २५ ॥ - देहापासून परिणामीं फल संतत दुःखच प्राप्त होतें म्हणून सांगितलें, तें कसें तें पहा - मनुष्य ज्या देहाचें प्रिय करण्याच्या इच्छेनें (देहाला भोग मिळण्याकरिता) अनेक कष्ट सोसून धन मिळवितो व स्त्री, पुत्र, द्रव्य, पशु, सेवक, गृह व आप्तसमुदाय हा पसारा वाढवून पोशीत असतो, तो देह आयुष्य संपताच नाश पावतो ! - वर एवढ्यानें

---

१ ह्या श्लोकावर नाथांचें व्याख्यान व त्यावरील दृष्टांत फारच उत्तम आहेत पहा —
देहापेक्षे वोखटें (वाईट पदार्थ) । पृथ्वीमाजी नाहीं कोठें । देहा ऐसें गोमटें (चांगली वस्तु) । पाहतां न भेटे त्रिलोकीं ॥ वोखटें म्हणूनि त्यागावें । तें मोक्षसुखासी लागद हें हो का गोमटें म्हणोनि भोगावें । तें अवश्य जावें नरकासी ॥ तरी हें त्यागावें ना भोगावें । मध्यभावें विभागावें । आत्मसाधनीं लागावें । निजस्वभावें हितार्थी ।
त्यालाच समर्पक दृष्टांत पहा :— जैसें भाडियाचें घोडें । आसक्ति सांडोनि पुढें । येणें वरी नेणें घडे । स्वार्थचुडेलागूनी ॥ ८५१ पासून ५८.

२ किंवा 'सकृच्छ्रं अवरुद्धधनः ' हें देहाचें विशेषण समजावें. ' ज्यानें कष्ट सोसून द्रव्य मिळविलें तो ' देह.

तरी दु:ख संपतें असें आहे काय? नाहीं. तर - हा देह नाश पावण्यापूर्वी पुरुषाला दुसरा देह मिळण्याम बीज असें कर्म करून ठेवितो ('मर्त्यों तरी समर्थ होउन उद्धरेन' असा पैकीच प्रकार हा). कारण, देहाचे धर्म वृक्षासारखे आहेत (जसा वृक्ष बीजापासून उत्पन्न होतो व नवा वृक्ष उद्भवण्यास साधन असें बीज उत्पन्न करून ठेवून मग मरतो तसाच देह कर्मामुळें उद्भवला असून मरणापूर्वी पुनर्जन्माला बीजभूत कर्म तयार करून ठेवणारा आहे) ॥ २६ ॥ त्याच्या (देहाला) जिव्हा एकीकडे (मधुर रस खाण्याकडे) ओढीत असते; तहान दुसरीकडे - पाण्याकडे - ओढिते, दुसऱ्या बाजूनें उपस्थ - रतिसुखाकडे - आकर्षित असते त्वचा स्पर्शाकडे, - उदर - अन्नाकडे, - व कान (पसरणारा) सकृच्छ् (कष्टानें) [यथा तथा] अवरुद्धधन' (मिळविलें धन ज्यानें असा) [सन्] पुरुषाचि (पोचितो), स वृक्षधर्मा देह असत दीन स्मृत्वा करतो अजर्द-दति (नाश पावतो). ॥ २६ ॥ जिव्हा एकतः अमुं अपकर्षति (ओढितें); कर्हि तर्षा (तहान), शिश्न अन्यत, त्वक्, उदर, श्रवण [वा] कुतश्चित् आकर्षतात इतर अन्यतः, चपलदृक्, कर्मशक्तिः (कर्मेंद्रिय) [च] क्वच, बव्ह्यः सपत्न्य (सवती) गेहपति (घरधन्याला) इव लुनति (तोडतोडून नेतात) ॥ २७ ॥ देव. आत्मशक्त्या मायया वृक्षान

जिह्वैकतो ऽमुमपकर्षति कर्हि तर्षा शिश्नो ऽन्यतस्त्वगुदरं श्रवणं कुतश्चित् ॥
घ्राणो ऽन्यतश्चपलदृक् क्व च कर्मशक्तिर्बह्व्यः सपत्न्य इव गेहपतिं लुनन्ति ॥ २७ ॥
सृष्ट्वा पुराणि विविधान्यजया ऽऽत्मशक्त्या वृक्षान्सरीसृपपशून्खगदंशमत्स्यान् ॥
तैस्तैरतुष्टहृदयः पुरुषं विधाय ब्रह्मा ऽवलोकधिषणं मुदमाप देवः ॥ २८ ॥

सरीसृपपशून् (सरपटणारे प्राणी व पशु यास), खगदंशमत्स्यान् (पक्षी, डास व मासे यास) [इति] विविधानि पुराणि (शरीरे) सृष्ट्वा तैः तैः अतुष्टहृदय [सन्] ब्रह्मावलोकधिषणं (ब्रह्मसाक्षात्कार मिळविण्याची बुद्धि ज्याला अशा) पुरुषं विधाय (निर्मून) मुदं आप. ॥ २८ ॥

- मधुर शब्द ऐकण्याकडे - ओढून नेत असतात; एकीकडून नाकाची - सुगंधाकडे - ओढ चालते, दुसऱ्या बाजूनें चचल नेत्र - स्वरूप पाहण्याकडे - ओढीत असतात व कर्मेंद्रियें - आपापल्या विषयाकडे - ओढून नेत असतातच. एकंदरीत पुष्कळशा सवती घरधन्याला तोडतोडून नेतात तशीं इंद्रियें देहाची कुतरओढ करीत असतात - अशा स्थितीत सुख ते कसें मिळावें? - ॥ २७ ॥ - हा मनुष्यदेह किती दुर्लभ आहे पहा - देवानें आपली शक्ति जी जन्मरहित माया तिच्या योगें प्रथम वृक्ष, सरपटणारे प्राणी, पशु पक्षी, डास इत्यादि नानाप्रकारांचीं शरीरें निर्माण केलीं, परंतु त्या त्या अनेक जातींच्या शरीराकडे - पाहून - देवाच्या चित्ताचें समाधान झालें नाहीं - कारण त्यांत आत्मप्राप्ति करून घेण्याची शक्ति

कोणीच दिसेना. - शेवटी त्यानें ज्यामध्यें ब्रह्मसाक्षात्कार मिळविण्याजोगी बुद्धि आहे असा हा मनुष्य देह उत्पन्न केला तेव्हा त्याला आनंद वाटला ॥ २८ ॥ हा नरजन्म अत्यंत दुर्लभ आहे, ह्मणजे अनेक जन्में भोगावी तेव्हा शेवटी कधी काळी मिळतो. आणि हा क्षणभंगुर आहे खरा परंतु ह्यापासून उत्तम पुरुषार्थ साधून घेता येण्याजोगा आहे ह्याच्या पाठीमागें निरंतर अनेक मृत्यु व अपमृत्यु लागलेले असतातच असा हा नरदेह प्राप्त झाला असता, विचारी पुरुषानें वेळ न मोडिता, देह पडला नाही तो, आत्यंतिक कल्याण संपादण्याच्या यत्नाला लागावे, - विषयसुख भोगण्यात कालक्षेप करूं नये, कारण, - विषय हे सर्वत्र (पश्वादियोनींमध्यें मुद्धा) असतातच ॥ २९ ॥ राजा, अशा प्रकारे विचार धीरः बहुसंभवाते (अनेक जन्मांच्या शेवटी) अनित्य अपि अर्थद (पुरुषार्थ देणारें) सुदुर्लभ इदं मानुष्यं (मनुष्यजन्म) लब्ध्वा अनुमृत्यु (मृत्यमागून मृत्यु ज्याच्या असे) [एतत्] यावत् न पतेत्, [तावत्] तूर्णं (लवकर) निःश्रेयसाय (कल्याणार्थ) यतेत (यत्न करो) विषयः सर्वतः स्यात् खलु ॥ २९ ॥ एवं आत्मनि सजातवैराग्य विज्ञानालोकः (अनेक

लब्ध्वा सुदुर्लभमिदं बहुसंभवाते मानुष्यमर्थदमनित्यमपीह धीरः ॥ तूर्णं यतेत न पतेदनुमृत्यु यावन्निःश्रेयमाय

विषयः खलु सर्वतः स्यात् ॥ २९ ॥ एवं संजातवैराग्यो विज्ञानालोक आत्मनि ॥ विचरामि महीमेतां मुक्तसंगो

ऽनहंकृतिः ॥३०॥ न ह्येकस्माद्गुरोर्ज्ञानं सुस्थिरं स्यात्सुपुष्कलम् ॥ ब्रह्मैतदद्वितीयं वै गीयते बहुधर्षिभिः ॥३१॥

गुरूपासून मिळविलेलें तत्त्वज्ञान हा प्रदीप ज्याचा असा) अनहंकृतिः [अहं] मुक्तसंग [सन्] एतां महीं विचरामि. ॥ ३० ॥ एकस्मात् गुरोः सुस्थिर (अचल निश्चल) सुपुष्कलं करिता करितां मला वैराग्य झालें, तेव्हा मी देहादिकावरची आसक्ति सोडिली व अहंकार दूर केला आता, विविध गुरूपासून संपादिलेलें हें ज्ञानच मला दीपाप्रमाणें - पाहिजे त्या वस्तूंचें यथार्थ स्वरूप पाहण्यास - प्रकाश पुरविते व मी आत्मरूपी स्थिर राहूनच ह्या पृथ्वीवर पर्यटण करीत असतो ॥ ३० ॥ - राजा, तू ह्मणशील एवढे पुष्कळ गुरु कशाला केले पाहिजेत[2] श्वेतकेतु, भृगु इत्यादि महात्म्यानी काही बहुत गुरु केले नव्हते तर त्याचेंही कारण सांगतो - एका गुरूपासून ज्ञान अतिपुष्कळ व अतिस्थिर असे होत

१ ह्मणून नाथ ह्मणतात:— पावोनिया मनुष्यपणा । जो न साधी ब्रह्मज्ञाना । तो दाढीचा मेढा जाणा । विषयाचरणा विचरतू ॥ २३९.

२ कल्याणसंपादनासाठीं किती दक्ष असावें ह्याला उत्तम दृष्टांत.— साधावया आत्मलक्ष । सावधान विजवगचे मन । तेणे साक्षेपे आपण । सायुज्य लक्ष साधावे ॥ नाथ, २४२ ब्रह्मज्ञान न संपादितां पोकळ शास्त्रज्ञान, सन्यास, वेदाध्ययन, मौन, धर्माचरण, अग्निहोत्र, इत्यादि खटपटी व ढोंग चालविणाराची ह्या स्थली नाथानी पुष्कळच कानउघाडणी केली आहे तो भाग उत्तम आहे खरा परंतु विस्तीर्ण असल्यामुळें येथें घेता आला नाहीं १४८ पासून पुढील ओंव्या पहाव्या

३ देहासक्ति व अहंकार सुटल्यावर देह कसा चालावा, तें नाथ सांगतात.— जैं पुरुषाची अहंता गळे । ते देह अदृष्टयोगे चळे । जेवीं सुकलें पान वायुबळें । पडिले लोळे सर्वत्र ॥ २८७

नाहीं कारण, ब्रह्म हें अद्वितीय (एक) असतांना ऋषींनीं बहुत प्रकारांनीं वर्णिलें आहे (ह्याचा भाव असा — हे चोवीस गुरु ह्मणजे परमार्थाचा उपदेश करणारे आहेत असें [illegible]
नाहीं, तर हे अंतरी जे असंभावना, विपरीतभावना इत्यादि संशय असतात त्यांचें अन्वयव्यतिरेक यांनीं दूरीकरण करणारे होत ह्मणून हे पुष्कळ असणें योग्यच आहे ज्ञान-
दाता गुरु एकच असें पुढें सांगायाचें आहेच). ॥ ३१ ॥ श्रीभगवान् ह्मणाले.— उद्धवा, त्या ब्राह्मणाची (दत्तात्रेयाची) बुद्धि गंभीर असे त्याने यदुला असें सांगून त्याचा
निरोप घेतला तेव्हां राजानेंही वंदन करून त्याची पूजा व प्रार्थना केली पुढें तो ब्राह्मण संतुष्ट होत्साता जसा आला तसाच सहज [illegible] गेला ॥ ३२
(असत पुष्कळ) ज्ञानं न स्यात्. ऋषिभिः सनत् भक्तिनीय ब्रह्म वै बहुधा गीयते. ॥३१॥ श्रीभगवान् उवाच— गभीरधीः [illegible] बुद्धि [illegible] । स विप्र तं यदुं इति उक्त्वा
आमंत्र्य (निरोप घेऊन) राज्ञा वंदितः अभ्यर्थितः (प्रार्थिलेला) प्रीतः [सन्] यथागतं ([illegible]) ययौ. ॥ ३२ ॥ न ([illegible]) पूर्वेषां पूर्वजः स अवधूतवचः [illegible]

श्रीभगवानुवाच । इत्युक्त्वा स यदुं विप्रस्तमामंत्र्य गभीरधीः ॥ वंदितोऽभ्यर्थितो राज्ञा ययौ प्रीतो यथागतम् ॥ ३२ ॥ अवधूतवचः
श्रुत्वा पूर्वेषां नः स पूर्वजः ॥ सर्वसंगविनिर्मुक्तः समचित्तो बभूव ह ॥ ३३ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसं-
वादे नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ श्रीभगवानुवाच । मयोदितेष्ववहितः स्वधर्मेषु मदाश्रयः ॥ वर्णाश्रमकुलाचारमकामात्मा समाचरेत् ॥१॥

सर्वसंगविनिर्मुक्तः समचित्तः बभूव. ॥ ३३ ॥ ॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे नवमोऽध्यायः ॥ ९ ॥
श्रीभगवान् उवाच — मया उदितेषु (सांगितलेल्या) स्वधर्मेषु अवहितः (दक्ष असावा) मदाश्रयः. (माझा आश्रय ज्याला असा) अकामात्मा ([illegible]), [सन्]
उद्धवा, आपल्या पूर्वजांचाही पूर्वज अशा त्या यदुराजानें अवधूताचें भाषण ऐकून - त्या उपदेशाप्रमाणें - सकल संग सोडून दिले व मनाला समतेनें ठेविलें [illegible]
पावला) ॥ ३३ ॥ ॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्पणे एकादशस्कंधे नवमोऽध्यायः ॥ ९ ॥
भगवान् ह्मणाले:— उद्धवा, मीं - पंचरात्रादि ग्रंथांत - जे स्वधर्म सांगून ठेविले आहेत ते आचरण्याविषयीं सावध राहून (त्यांत विशेष [illegible] , [illegible] , चि-

१ एक ह्मणती ब्रह्म सगुण । एक ह्मणती तें निर्गुण । ऐसे वाद करिती दारुण 'युक्तिखंडण अभिमानें' ॥ एक ह्मणती ब्रह्म सप्रपंच । एक ह्मणती निष्प्रपंच [illegible] ३०७।८
२ आपलें कुळ ब्रह्मज्ञानसंपन्न आहे ह्याविषयीं भगवंताला [illegible] अभिमान होता, असें हें वाक्य सुचवितें [illegible] —
कपोत-मीन-हरिण-कुमारी-गज-रक्षक' [illegible] इत्यादि गुरवो मताः ॥ [illegible]
(कपोत, मत्स्य, हरिण, कुमारी, गज, सर्प, पतंग व टिटवा हे अष्ट गुरु [illegible] कोणत्या गोष्टीचा त्याग करावा हें शिकण्यासाठीं [illegible])

सामर्थ्ये कसलीही (फलाची) इच्छा न धरितां, माझाच आश्रय धरून वर्ण. आश्रम व कुल याना विहित असे आचार पाळीत जावें ॥ १ ॥ - इच्छा सुटल्या कशा तेंही सांगतों. ऐक[1] - मनुष्यानें स्वधर्माचरणाच्या योगे चित्त शुद्ध करून घ्यावे आणि — विषयावर मन ठेवणारे प्राणी, विषयत्र सत्य होत अशा समजुतीनें, नाना प्रकारचे उद्योग आरंभीत असतात, पण त्या सर्वांचें फळ त्याना अगदी विपरीत प्राप्त होतें[2], — ही गोष्ट लक्षपूर्वक पाहून असावे - फळ विपरीत दिसू लागलें कीं आपोआपच इच्छा सुटतात - वर्णाश्रमकुलाचारं समाचरेत्. ॥ १ ॥ विशुद्धात्मा (अति निर्मळ चित्त ज्याचे असा) [सन्] विषयात्मनां (विषयावर चित्तें ज्याचीं, अशा) देहिनां गुणेषु (विषयावर) तत्त्वध्यानेन

अन्वीक्षेत विशुद्धात्मा देहिनां विषयात्मनाम् ॥ गुणेषु तत्त्वध्यानेन सर्वारंभविपर्ययम् ॥ २ ॥
सुप्तस्य विषयालोको ध्यायतो वा मनोरथः ॥ नानात्मकत्वाद्विफलस्तथा भेदात्मधीर्गुणैः ॥ ३ ॥

(सत्य अशा समजुतीनें) सर्वारंभविपर्ययं (सगळ्या उद्योगाचें विपरीत फल) अन्वीक्षेत (पाहो) ॥ २ ॥ [यथा] सुप्तस्य (झोंप घेणाराचा, स्वप्न पाहणाराचा) विषयालोकः (विषयाचें पाहणें), ॥ २ ॥ - शिवाय, लोक ज्याच्या इच्छा धरितात ते विषय तरी खरे आहेत कोठें[3] पहा. - जसे निजलेल्या मनुष्याला स्वप्नात दिसणारे पदार्थ किंवा चिंतन करणाराच्या मनोराज्यातील खेळ नानारूप (एका आश्रयावर अनेक कल्पिलेले) असल्यामुळे निष्फळ असतात, तशीच इंद्रियाच्या योगें बाह्य विषयावर जी भेदरूप (विविध इच्छा) बुद्धि उत्पन्न होते

(मागील टीप पुढे चालू)

मधुकृन्मधुहर्ता च पिंगला च त्रयोऽप्ययः । उपादेयार्थविज्ञाने शेषाः पृथ्व्यादयो मताः ॥ २ ॥
(मधुकर, मध हरण करणारा व पिंगला हे तीन गुरु ग्राह्य करावें काय व टाकावें काय तें शिकण्यासाठीं केलेले आहेत व बाकीचे पृथ्वी इत्यादि गुरु ग्राह्य तत्त्वे समजण्यासाठींच मानिलेले होत)
तदवांतरभेदश्च तत्र तत्र स्फुटीकृतः । अध्यायत्रितये चाष्ट नवाष्टावीरिताः क्रमात् ॥ ३ ॥
(त्यांचे अवांतर भेद ठिकठिकाणीं स्पष्ट सांगितले आहेतच. सातवा आठवा व नववा ह्या तीन अध्यायामध्यें क्रमानें आठ, नऊ, व आठ असे गुरु वर्णिले आहेत)

१ फलाची इच्छा धरावयाची नाहीं तर कर्में करण्याकडे प्रवृत्ति व्हावी कशी ? अशी कोणाला शंका येईल तर तिचें उत्तर ' मदाश्रय ' ह्या पदामध्यें आहे साधकानें माझा आश्रय करावा म्हणजे केवळ माझ्या प्रीत्यर्थ कर्में आचरावीं. बालप्रबोधिनी

२ वैलाची कास दुहितां । सिंपीभरी दूध न ये हातां । तेवीं मनोरथ उपासितां । न लभे सर्वथा निजसुख ॥ नाथ, ७२

३ स्वप्नीं देखिलें आत्ममरण । जागृतीं मिथ्या म्हणे आपण । तैसा स्वरूपीं जागा जाहल्या जाण । जन्ममरण त्या नाहीं ।' जंव जव भेदाची रूढी । तववरी जन्ममरण बाधी । भेद मिथ्या जाहलिया त्रिशुद्धी । असेवीं बाधा ते नाहीं ॥ नाथ, ८८ । ८९.

ती विफळें होय. ॥ ३ ॥ माझ्या आराधनीं तत्पर असणाऱ्या पुरुषानें नित्यनैमित्तिक मात्र कर्में करीत असावें; सकाम कर्में सोडून द्यावीं; आत्मविचाराला लागल्यावर मग तर निष्काम नित्यनैमित्तिक कर्मांच्या विधींचाही आदर करूं नये. ॥ ४ ॥ माझ्या सेवेंत तत्पर अशा पुरुषानें अहिंसादि यम वारंवार (आदरानें) पाळावे, व केव्हां केव्हां (शक्ति असेल किंवा वेळ सांपडेल तेव्हां आत्मज्ञानाला विरोध न येईल अशा रीतीनें) शुद्धता इत्यादि नियमही धारण करावे, आणि ज्याला माझें ज्ञान असेल त्या शांतिसंपन्न

ध्यायतः (चिंतन, मनोराज्य, करणाराचा) वा मनोरथः नानात्मकत्वात् (नानात्व असल्यामुळें) विफलः, तथा गुणैः (इंद्रियांनीं) भेदात्मधीः [विफला]. ॥ ३ ॥ मत्परः निवृत्तं कर्म सेवेत, प्रवृत्तं त्यजेत्. जिज्ञासायां संप्रवृत्तः कर्मचोदनां नाद्रियेत् (न आदरो). ॥ ४ ॥ मत्परः अभीक्ष्णं (वारंवार) यमान्, क्वचित् (कधीकधी) नियमान् [च] सेवेत. मद्-

निवृत्तं कर्म सेवेत प्रवृत्तं मत्परस्त्यजेत् ॥ जिज्ञासायां संप्रवृत्तो नाद्रियेत्कर्मचोदनाम् ॥४॥ यमानभीक्ष्णं सेवेत नियमान्मत्परः क्वचित् ॥

मदभिज्ञं गुरुं शांतमुपासीत मदात्मकम् ॥ ५ ॥ अमान्यमत्सरो दक्षो निर्ममो दृढसौहृदः ॥ असत्वरोऽर्थजिज्ञासुरनसूयुरमोघवाक् ॥६॥

भिज्ञं (मला जाणणाऱ्या) शांतं मदात्मकं गुरुं उपासीत. ॥ ५ ॥ अमानी अमत्सरः दक्षः निर्ममः दृढसौहृदः असत्वरः अर्थजिज्ञासुः अनसूयुः (दोष न देणारा) अमोघवाक् (निरर्थक न बोलणारा). ॥ ६ ॥

गुरूची उपासना करावी. गुरु केवळ मद्रूप (ईश्वर) होय. ॥ ५ ॥ - गुरूची सेवा करितांना कोणते धर्म पाळावे तें ऐका : - मान अवाजवी धरूं नये. मत्सर सोडून, आळस टाकून द्यावा; स्त्रीपुत्रादिकांवर ममता ठेवूं नये; गुरूवर मात्र प्रेम दृढ धरावें; चित्ताची गडबड (व्यग्रता) होऊं देऊं नये; तत्त्वज्ञानाची इच्छा धरावी. कोणाच्या गुणांत दोष काढूं नये; निरर्थक भाषणें बोलूं नये. - हीं च शिष्याचीं लक्षणें होत. - ॥ ६ ॥

---

१ गुणैः मनुष्यादिशरीरैः भेदेन आत्मनि धीः देवमनुष्यादिशरीरे अहंप्रत्ययो ऽपि भ्रमः गुणांनीं म्ह० मनुष्यादि शरीरांच्या योगानें भेदानें आत्म्याचे ठायीं बुद्धि ठेवणें म्हणजे देव मनुष्य इत्यादि शरीरांवर मीपणा धारण करणें हाही भ्रमच होय.

२ स्मृति असेंच सांगते :- मोक्षार्थी न प्रवर्तेत तत्र काम्यनिषिद्धयोः । नित्यनैमित्तिके कुर्यात्प्रत्यवायजिहासया ॥

मोक्ष मिळवूं इच्छिणारानें सकाम व निषिद्ध कर्में करण्यास प्रवृत्त होऊं नये; प्रत्यवाय न घडावा, एवढ्याकरितां नित्यनैमित्तिक कर्में मात्र करीत जावें.

३ स्वकर्म केलिया फळ काये । चित्ताचा मळ मात्र जाये । भक्तजन निर्मळ होये । बाधूं न लाहे स्वकर्में ॥ नाथ, १०२.

४ नियमादरणे मन्निष्ठाया विघातः स्यात्तस्तदविरोधेन सेवेत न तद्विधानेनेत्यर्थः 'केव्हां केव्हां' म्हणण्याचा उद्देश असा की कदाचित् नियमांचें आचरण करण्यानें माझ्या निष्ठेला अडथळा होईल तो न व्हावा. म्हणून त्या निष्ठेस विरोध न येईल अशा रीतीनें नियम आचरावे. ५ किंवा, 'असत्वरः' याचा अर्थ बलदेवीनें टीकाकारांच्या मतानें 'एकदां पादरहित नन्दे चित्तांत अवतरलें ते सत्युदासीनतारहितः म्हणजे एकदा सांगितलेलें तत्त्व चित्तांत उतरलें नाहीं तरी उदासीनता न धरणारा' असा करतात.

-स्त्रीपुत्रादिकांवरील ममता सोडावी कशी तें सांगतों, ऐक - आत्म्याचें प्रयोजन सर्व स्थळीं सारखेंच असतें (सर्व देहामध्यें आत्मा एक असल्यामुळें स्त्रीपुत्रादिकांच्या देहांत व ह्या स्वदेहांत आत्म्याला सुखादिक सारखींच आहेत मग स्त्रीपुत्रादिकांवर ममताभिमान ठेवण्याचें विशेष कारण ते काय काहींच नाहीं) अशा विचारानें स्त्री, पुत्र, घर, शेतें, आप्तजन, द्रव्य इत्यादिकांविषयीं उदासीनता धरावी. ॥ ७ ॥ आत्मा स्थूल व सूक्ष्म अशा दोन्ही शरीराहून वेगळाच आहे, कारण तो द्रष्टा (पाहणारा—अर्थात दृश्य पदार्थांहून वेगळा) आणि

जायापत्यगृहक्षेत्रस्वजनद्रविणादिषु सर्वेषु आत्मन अर्थं (सुखदुःखादि प्रयोजन) समं इव पश्यन् उदासीनः [गुरु प्रपद्येत] ॥ ७ ॥ यथा दाहक प्रकाशक अग्निः

जायापत्यगृहक्षेत्रस्वजनद्रविणादिषु ॥ उदासीनः समं पश्यन्सर्वेष्वर्थमिवाऽऽत्मनः ॥ ७ ॥ विलक्षणः स्थूलसूक्ष्माद्देहादात्मेक्षिता स्वदृक् ॥ यथाऽग्निर्दारुणो दाह्याद्दाहकोऽन्यः प्रकाशकः ॥८॥ निरोधोत्पत्त्यणुबृहन्नानात्वं तत्कृतान् गुणान् ॥ अतः प्रविष्ट आधत्त एवं देहगुणान्परः ॥ ९ ॥

दाह्यात् दारुणः अन्यः, [तथा] ईक्षिता (पाहणारा) स्वदृक् (स्वप्रकाश) आत्मा स्थूलसूक्ष्मात् देहात् विलक्षणः ॥ ८ ॥ [यथा] अंतः प्रविष्टः [अग्निः] निरोधोत्पत्त्यणुबृहन्नानात्वं, तत्कृतान् गुणान् [च], एवं परः (निराकाररूपी आत्मा) देहगुणान् आधत्ते. ॥ ९ ॥

स्वप्रकाश (जड वर्गाहून विलक्षण) आहे. उदाहरण पहा :— जाळणारा व प्रकाश देणारा अग्नि, जें जाळावयाचें व ज्याला प्रकाशित करावयाचें, त्या काष्ठाहून अन्य असतो ॥ ८ ॥ - ह्याच दृष्टांतावरून आत्मा नित्य, अनादि, व्यापक आणि एक आहे, असें सिद्ध होतें. पहा - अग्नि काष्ठामध्यें प्रविष्ट - झाला असता काष्ठानें केलेले नाश, उत्पत्ति लहानपणा, मोठेपणा, भेद इत्यादि गुण धारण करितो, (काष्ठ नाहींसे झालें कीं अग्नि नष्ट झालासा वाटतो, लाकूड लहान मोठें असेल तसा अग्नि लहान मोठा दिसतो), - पण ते

१ पृथ्वी, उदक, तेज, वायु, आकाश ह्या पांच महाभूतांचें कार्य असा हस्तपादादिविशिष्ट देह २ बुद्धि, इंद्रियें, मन व प्राण ह्यांच्या समुदायाला सूक्ष्म शरीर किंवा लिंगदेह म्हणतात

३ नाथ म्हणतात, हा अनुभव प्रत्येकाला आहेच पहा —म्हणे माझा डोळा दुखों लागला । परी न म्हणे मीचि दुखों आला । माझा पायोंचि मोडला । परी मी मोडला हे न म्हणे ॥ यापरी देही कर्ता । प्रत्यक्ष सांगे देहातीतता । २५७ । ५८

४ नाथ म्हणतात.— ह्यावर कोणी शंका घेईल कीं आत्मा द्रष्टा अर्थात दृश्याहून वेगळा आहेना ? तर मग मनच आत्मा झालें तर तसें नव्हे. मन हें अकरा इंद्रियांपैकी एक इंद्रिय अर्थात जड आहे लोखंडाचा गोळा अग्नींत घालून तापवून लाल केला म्हणजे इंगळाप्रमाणे दिसतो तरी पण तें लोखंडाचें तेज नव्हे, शस्त्र एका घावाबरोबर शत्रूचा शिरच्छेद करितें, त [illegible] शक्ति नव्हे. त्याप्रमाणे आत्म्यापासून मिळालेल्या प्रकाशशक्तीमुळे मन विषयांना प्रकाशित करीत असतें मन जडत्वें जड जाण । आत्मा स्वप्रकाशें प्रकाशघन । मन [illegible] । आत्मा स्वाधीन आत्मत्वें ॥ प्रत्यक्ष म्हणे माझें मन । परी मीच मन न म्हणे जाण । यालागीं मनाहोनि आत्मा भिन्न । वेगळेपण साक्षित्वें ॥ नाथ, २७० । ७१

५ अग्नि काष्ठामाजी वसे । परी तो काष्ठ होऊनि नसे । मथिल्या काष्ठीं प्रकट दिसे । जाळी उल्हासें काष्ठातें ॥ तैसा आत्मा देहीं असे । ना देहोचि होऊनि नसे । ज्ञानाग्नि जेव्हां प्रकाशे । जाळी अनायासें देहभाव ॥ नाथ, २८३ । ८४.

नाशादि गुण त्याचे स्वतःसिद्ध नव्हत, त्याचप्रमाणें परमात्मा देहात प्रविष्ट आहे म्हणजे देहाचे नाशादि गुण अनुभवितो [illegible] नो नित्यच आहे [illegible]
नित्यत्वादि धर्मांनींही त्याचें वैलक्षण्यच सिद्ध होतें. - ॥ ९ ॥ - ह्यावर कोणी शंका घेईल की काष्ठाच्या मंथनामुळें अग्नि [illegible] नाशादि [illegible] येथे देखावच आहे [illegible]
तर असंग आहे म्हणजे कोणाशी संयोग पावत नाहीं तेव्हां देहाशीं किंवा त्या देहाच्या धर्मांशीं त्याचा संबंध घडतो [illegible] जर संबंध पडला असे [illegible] त्याची निवृत्ति [illegible]
कशी ? तर त्याविषयीही सांगतों.- ईश्वराच्या अधीन असलेल्या मायेच्या गुणांनी जो हा सूक्ष्म देह [illegible] त्याच्या [illegible] ([illegible]), [illegible] हा [illegible]
पुरुषस्य (परमेश्वराच्या अधीन अशा) गुणैः यः असौ (हा सूक्ष्म), अयं (हा स्थूल) [च] देहः विरचितः, पुंस ([illegible]) [illegible] , [illegible]
आत्मनः विद्या [तस्य] छित् (तोडणारी) ॥१०॥ तस्मात् जिज्ञासया केवलं परं आत्मस्थं ([illegible]) आत्मानं [illegible] यथाक्रमं ([illegible] -

यो ऽसौ गुणैर्विरचितो देहो ऽयं पुरुषस्य हि ॥ समारस्तन्निबंधो ऽयं पुंसो विद्या छिदात्मनः ॥ १० ॥

तस्माज्जिज्ञासया ऽऽत्मानमात्मस्थं केवलं परम् ॥ संगम्य निरसेदेतद्वस्तुबुद्धिं यथाक्रमम् ॥ ११ ॥

आचार्यो ऽरणिराद्यः स्यादंतेवास्युत्तरा ऽरणिः ॥ तत्संधानं प्रवचनं विद्या संधिः सुखवहः ॥ १२ ॥

प्रथम स्थूलावरील मग सूक्ष्मावरील अशा क्रमानें) एतद्वस्तुबुद्धिं (ह्या देहादिकांवरील सत्यबुद्धि) निरसेत् (दूर करो) ॥ ११ ॥ आचार्यः ([illegible]) आद्य अरणि . अन्तेवासी ([illegible]) उत्तरारणि
स्यात् . तत्संधानं (त्यांना जोडणारें काष्ठ) प्रवचनं (उपदेश, व्याख्यान) विद्या सुखावहः संधि ([illegible]) ॥ १२ ॥

होतो. म्हणून स्वस्वरूपाचें ज्ञान हेंच त्या अध्यासमूलक संसाराचें छेदक होय. ॥ १० ॥ असें आहे त्या अर्थी मुमुक्षूने विचार [illegible] [illegible]
(देहामध्यें)च राहिलेला असून आत्मरूप, निःसंग व नित्य आहे असें पूर्णपणें ज्ञान मिळवावें आणि हे देहादिकच [illegible] [illegible] (प्रथम [illegible]
आत्मा मानणें सोडावें नंतर सूक्ष्म शरीराला, अशा रीतीनें) मोडून द्यावा. ॥ ११ ॥ - गुरूपासून मिळणारी विद्या [illegible] व [illegible] [illegible]
कारण - विद्या हा - अविवेक जाळून टाकणारा - अग्नि होय यज्ञासाठी अरणीपासून मंथन करून अग्नि उत्पन्न करितात, त्या [illegible] [illegible]

१ ईश्वराच्या मायेनें नाना कार्यें उपजविलीं असून जीवाला संसारांत घालण्यासाठी हा निरर्थक श्रम वाढविला आहे. अविवेक [illegible] [illegible]
चंद्राचें प्रतिबिंब पडलें तरी [illegible] त्या दवबिंदूचा संबंध असतो तर तो [illegible] प्रकाशन असतो, [illegible] अविवेक [illegible]

२ घोर सांसला होता विस्तार । त्याचा करितां निज निर्धार । हारपें निया सर्वाकार । उरे [illegible] निजरूपें ॥ पाहतां विवेकाचेनि [illegible] सर्पत्व जेवी [illegible] । तेवी ब्रह्म
सद्भावीं रोकडें । देह नातुडे उपत्वें ॥ नाथ, ३३५ । ३६.

अरणि आणि मध्यें मंथन करण्याचें एक काष्ठ अशों असते, त्याप्रमाणेंच विद्याग्नीची उत्पादक साधनें असतात पहा - गुरु हा पाहिला (खालचा) अरणि होय, शिष्य हा उत्तर (वरचा) अरणि समजावा, उपदेश हें त्या दोन अरणींना जोडणारें मथनकाष्ठ आणि त्याच्या संयोगापासून - अग्नीसारखी - सुखदायक विद्या उत्पन्न होते ॥ १२ ॥ निपुण शिष्यानें संपादन केलेली (किंवा निपुण गुरूनें उपदेशिलेली) ती अतिनिर्मल बुद्धि (ज्ञान), गुणापासून उत्पन्न झालेल्या मोहक समागला दूर करिते, आणि जीवाला संसार

वैशारदी (निपुण शिष्यानें मिळविलेली किंवा निपुण गुरूनें उपदेशिलेली) सा अतिविशुद्धबुद्धि गुणसंप्रसूता (गुणापासून जन्मलेल्या) माया धुनोति (दूर करिते), एतत् यदात्मं, [तान्]

वैशारदी साऽतिविशुद्धबुद्धिर्धुनोति मायां गुणसंप्रसूताम् ॥ गुणांश्च संदह्य यदात्ममेतत् स्वयं च शाम्यत्यसमिद्यथाऽग्निः ॥ १३ ॥ अथैषां कर्मकर्तॄणां भोक्तॄणां सुखदुःखयोः ॥ नानात्वमथ नित्यत्वं लोककालागमात्मनाम् ॥ १४ ॥

गुणान् संदह्य (जाळून) यथा असमित् (काष्ठरहित) अग्निः, [तथा] स्वयं शाम्यति. ॥ १३॥ अथ एषां कर्मकर्तॄणां सुखदुःखयोः भोक्तॄणां नानात्वं (भेद) अथ लोककालागमात्मनां भोगावा लागण्याचें निमित्त असें हें विश्व ज्याचें रूप त्या गुणाना जाळून टाकिल्यावर, ती बुद्धि (ज्ञान), जसा अग्नि काष्ठे सपून गेलीं की विझून जातो, तशी शांत होते. - एतावता शेवटीं कार्य, कारण आणि ज्ञान ह्यापैकीं कोणतेंच व्यवधान न राहिल्यामुळे तो पुरुष केवळ परमानंदरूप होतो - ॥ १३ ॥ आता - दुसऱ्या कोणाचीं बोलणीं ऐकून - तुज असें वाटेल कीं - कर्में करणारे व सुखदुःखादि भोगणारे जीवात्मे अनेक आहेत आणि स्वर्गादि लोक, काल, कर्मबोधक आगम व भोक्ता आत्मा हे नित्य आहेत, ॥ १४ ॥

१ ' विलक्षणः स्थूलसूक्ष्मात् ' ह्या श्लोकापासून येथपर्यंत ' आत्मा स्वप्रकाश, ज्ञानस्वरूप, नित्य व एक आहे त्याला कर्तृत्वादि धर्म देहरूप उपाधीमुळें मिळतात, आणि आत्मव्यतिरिक्त सर्व वस्तु अनित्य व मायामय होत, ह्मणून विरक्ति पावलेला पुरुष आत्मज्ञानानें मुक्त होतो, ' असें सांगितलें आता यद्यपि हें तत्त्व श्रुतिप्रतिपादित प्रमाणें घेऊन सिद्ध केलें आहे, तथापि इतर शास्त्रकाराचीं भिन्न मतें ऐकून कदाचित् उद्धवाला पुन्हा संशय उत्पन्न होईल करिता त्या विरोधी मताचें खंडण करण्यासाठी भगवान् प्रथम तीं मतें काय आहेत तें, उद्धवाची शंका ह्मणून, स्वमुखें प्रतिपादन करितात

२ जैमिनीयाचें मत असें आहे. पहा —

' मी ' अशा अनुभवानें जो कळतो तोच आत्मा होय तो प्रत्येक शरीरात वेगळा वेगळा असून तोच कर्मकर्ता व फलभोक्ता होय त्याचा मूळरूपाहून कोणी एक निर्विकार परमात्मा आहे असें नाही कारण, नाथ ह्मणतात :— ह्मणजे मानिती एकात्मता । तरी एकाचेनि सुखें सुख समस्ता । का एकाचेनि पापें पापता । न घडे सर्वथा सकळिकांसी ? ॥ ३८१ ॥

३ हे वादी असें ह्मणतात कीं वैराग्य होणें संभवतच नाहीं, कारण भोगस्थानें, भोगकाल, भोगप्राप्तीचे उपाय जी कर्में त्याचे प्रतिपादक वेद, व भोक्ता आत्मा हीं जर अनित्य असतील तर वैराग्य होणार, पण तसा भाग मुळीच नाहीं; तर तीं सगळीं नित्य आहेत.

तसेंच गंध, पुष्प, स्त्री इत्यादि सकल उपभोग्य पदार्थांची स्थिति जशी चालत आहे तशीच प्रवाहरूपानें नित्य चालणार, (जग मानव निर्मित आहे असे पूर्वी नव्हतें असें नाहींच तर हें नेहमी असेंच चालले आहे. जगाचा कर्ता ईश्वर म्हणून कोणी नाहींच आणि ही सृष्टि मायमयही नव्हेच) व ज्ञान तर प्रवाह इत्यादि त्या त्या भिन्न वस्तूंच्या आकारानें उत्पन्न होतें अर्थात अनित्य व भिन्न आहे. ॥ १५ ॥ वा उद्धवा, हें तुझें म्हणणें (मीमांसकादिकांचें मत) मान्य केलें तरी सर्व प्राण्यांना, देहाच्या संबंधामुळें - संवत्सर मास इत्यादि अनित्यत्वं ॥ १४ ॥ मन्यसे. सर्वभावानां (सकल गंधपुष्पादि पदार्थांची) संस्था यथा (दुर्लपणें) औत्पत्तिकी (नित्य) तत्तदाकृतिभेदेन धीः ज्ञान जायते, म्रियते (नष्ट पावतें) च. ॥ १५ ॥ अंग, एवं अपि सर्वेषां देहिनां देहयोगतः कालावयवतः (कालाचे अवयव जे संवत्सर, मास, पक्ष यांपासून) असकृत् (वारंवार) जन्मादयः भावाः (विकार) संति. ॥ १६ ॥

मन्यसे सर्वभावानां संस्था ह्यौत्पत्तिकी यथा ॥ तत्तदाकृतिभेदेन जायते भिद्यते च धीः ॥ १५ ॥

एवमप्यंग सर्वेषां देहिनां देहयोगतः ॥ कालावयवतः संति भावा जन्मादयोऽसकृत् ॥ १६ ॥

अत्रापि कर्मणां कर्तुरस्वातंत्र्यं च लक्ष्यते ॥ भोक्तुश्च दुःखसुखयोः को न्वर्थो विवशं भजेत् ॥ १७ ॥

अत्र अपि कर्मणां कर्तुः, सुखदुःखयोः भोक्तुः च अस्वातंत्र्यं (पराधीनपणा) लक्ष्यते (दिसून येतें). कः तु अर्थः (सुख) विवशं (परतंत्र) भजेत्? ॥ १७ ॥

इत्यादि कालाच्या अवयवांपासून जन्म वृद्धि नाश इत्यादि विकार वारंवार भोगावे लागतातच (ते चुकत नाहीत). - तेव्हां प्राण्यांना वैगुण्य कां होणार नाहीं? - ॥ १६ ॥ तसेंच, ह्या पक्षामध्येंही कर्में करणारा आणि सुखदुःखें भोगणारा पुरुष स्वतंत्र नाहीं असेंच स्पष्ट दिसून येतें. - कारण तो स्वतंत्र असता तर, दुःखभोगाची कधींच इच्छा नसल्यामुळें दुष्कर्में करताच ना. तो दुष्कर्में करून दुःखें भोगीत पडतो त्याअर्थी परतंत्र आहे हें उघड होय - बरें जो पुरुष पराधीन झाला त्याला सुख तें कोणतें व कसें प्राप्त होणार ...

---

१ सगळे भोग्य पदार्थ नाश पावणारे असते, तर वैराग्य होणें फार सोपें असतें. पण तसेंही नाहीं. २ आहे, आहे जग नाहीं । हें घडलें च नाहीं कहीं । जळेंवीण समुद्र पाहीं । उरला नाहीं सर्वथा ॥ नाथ, ३९८. ३ नित्यासि ईश्वरु कर्ता । तेंही न घडे गा सर्वथा । नित्याचा कोण नव्हे कर्ता । ईश्वरू सर्वथा येथ नाहीं ॥ नाथ ४०० ४ तसेंच ज्ञान एक हा सिद्धांतही ह्या वादांना मान्य नाहीं. कारण ते म्हणतात:— आत्मा नित्य ज्ञानरूप आहे असें नव्हेच तर ज्ञानच ... अनित्यत्व येईल, असेंही नाहीं; म्हटलें आहे:—' विक्रिया ज्ञानरूपाऽस्य न नित्यत्वे विरोधकृत्' ... ह्या वचनाचा नाथांनीं काढिलेला अभिप्राय येथें थोडा भिन्न आहे : पहा :— तरदेहीं ज्ञान उपजलें । तेंही देहाच नासिलें । फळें दुःखमूळ केलें । कोणें देखिलें कोठेंही? ॥ ज्ञानाचें परिपाकदशे । म्हणती अवघा संसारुचि नासे । सृष्टि प्रवाहरूपें नित्य असे । नित्य नासे कैसेनी? ॥ मनुष्याचें हृदयींचें ज्ञान । ... लाण । तरी खद्योततेजें जळे जाण । ग्रहगण शशिसूर्य ॥ ४०९ ॥ ४१० ॥ ४११ ॥ ... अर्थात त्यांची किंवा तिची प्राप्ति पुरुषार्थ नव्हेच. म्हणून ... ५ येथें ...

- तूं म्हणशील ' जे चांगल्या प्रकारें कर्मे करावयास जाणतात, ते सुखी व जे नमें जाणत नाहींत ते दुःखी ' तर तसेंही नव्हे - ज्ञानवान पुरुषानाही एखादे वेळीं सुख नाहींसे होतें तसेंच मूढजनानाही केव्हा केव्हा दुःख नाही अशी स्थिति असते - अर्थात ' आम्ही कर्माचरणात कुशल म्हणून सुखी आहो ' असें मानणें हा केवळ त्याचा निरर्थक अभिमान होय. ॥१८॥ बरें, ही गोष्ट मान्य करून चाललें की त्यांना सुख कसें मिळवावें व दुःख कसें घालवावें तें कळत असते, तरी पण, प्रत्यक्ष मृत्यूचें सामर्थ्य चालणार नाहीं करा तो उपाय कांहीं त्याना ठाऊक नसतो. ॥ १९ ॥ - तू म्हणशील ' तरी पण देह आहे तोपर्यंत सुख तर भोगायला मिळेल ' तर त्याचेंही उत्तर सागतों - बावा, मृत्यु जवळ

विदुषां (ज्ञानी) अपि देहिनां किंचित सुखं न विद्यते. तथा मूढानां दुःखं च [न] परं (केवळ) वृथा अहंकरण ॥ १८ ॥ यदि सुखदुःखयो प्राप्ति (मिळण्यातें साधन), विघातं (मिळविण्याचा उपाय) च जानंति, ते अपि यथा मृत्यु (प्रत्यक्ष) मृत्यु न प्रभवेत्, [तथा] योग (उपाय) न विदुः. ॥ १९ ॥ क नु अर्थ, काम. वा पर्व पुरु-

न देहिनां सुखं किंचिद्विद्यते विदुषामपि ॥ तथा च दुःखं मूढानां वृथाऽहंकरणं परम् ॥ १८ ॥ यदि प्राप्तिं विघातं च जानंति सुखदुः-
खयोः ॥ ते ऽप्यद्धा न विदुर्योगं मृत्युर्न प्रभवेद्यथा ॥ १९ ॥ को न्वर्थः सुखयत्येनं कामो वा मृत्युरंतिके ॥ आघातं नीयमानस्य
वध्यस्येव न तुष्टिदः ॥ २० ॥ श्रुतं च दृष्टवद्दुष्टं स्पर्धाऽसूयाऽत्ययव्ययैः ॥ बह्वंतरायकामत्वात्कृषिवच्चापि निष्फलम् ॥ २१ ॥

यति? [यतः] अंतिके (जवळ) मृत्युः. आघातं (वधस्थानीं) नीयमानस्य (नेला जाणाऱ्या) वध्यस्य इव [तस्य अर्थ] तुष्टिदः (संतोष देणारा) न ॥२०॥ यदि अंतरायैः (विघ्नांनीं) ... निश्चय टपून बसलेला आहे, तर ह्या पुरुषाला कोणता द्रव्यादि पदार्थ अथवा उपभोग सुख देईल बरें? वधस्तंभाकडे चालविलेल्या वध्य पुरुषाला - पुष्कळ हार तुरे इत्यादि उपभोग्य पदार्थ दिले तरी किंचितही संतोष वाटायाचा नाहीं - तसाच मृत्यु पुरुषाच्या मागें नित्य लागून राहिलेला आहे त्या अर्थी त्याला ऐहिक कोणत्याही विषयापासून सुख लागावयाचे नाहीं. ॥ २० ॥ - पर लोकातील सुखाची तीच गत आहे पहा - इह लोकी दिसणाऱ्या सुखाप्रमाणेंच, जें आपल्याला ऐकून ठाऊक आहे तें (स्वर्गादि लोकातील) सुखही हेवा, दुसऱ्याला नसते दोष देणें, नाश व ऱ्हास ह्या दोषानी ग्रासलेलें आहे, आणि त्या सुखामध्येही बहुत विघ्नें असतात म्हणून तें शेतकीप्रमाणेंच - त्यात पुष्कळ सुख असतें यते

१ आणि तो तंव स्वरूप माझें । श्रुतिमंत्र ते तव माझी बीजें । आणि हा मद्रूपही जें जें । नेहो माझें स्वरुप ॥ ऐसिया मज सर्वगताते । नास्तिक्य देवोनि निजचित्तें । ... स्वरवार्दे करिती थामातें । तोचि त्यातें बाधक ॥ मज यज्ञपुरुषातें सांडून । करिती इंद्रादिकांचे भजन । पण यामुळें परिणाम किती चमत्कारिक होतो पहा — चुकल्लिया ... सुख । सर्वांगीं सिरीसाकरेचा देख । लेपू देता न वचे मूक । आधेकदुःख तेणें होय ॥ नाथ, ३५८ । ५७ । ६२ । ६४
२ जैसें क्षयरोगाचे रोगियासी । अल्प कुपथ्य वाढी त्यासी । तैसें जाण कारण कर्मासी । अल्पदोषीं सविघ्न ॥ ५०८ ॥ नाथ.

जरी आपण ऐकितों तरी - निष्फल होय. ॥ २१ ॥ - विघ्नें घडत नाहींत असें अंतःकारिलें तथापि, त्याचा नाश व्हावयाचाच, हें दुःख टळतां येत नाहीं. पहा :- विघ्नकाय न घडतां कर्मानुष्ठान उत्तम प्रकारें सिद्धीस गेलें, तरी त्या योगें मिळविलेल्या स्थानीं अनुष्ठानकर्ता पुरुष कसकसा जातो, तें ऐक :- ॥ २२ ॥ याज्ञिक पुरुष ह्या लोकामध्यें यज्ञांच्या योगें इंद्रादि देवतांची आराधना करून स्वर्गलोकीं जातो, व तेथे देवांप्रमाणें, स्वतां संपादिलेले दिव्य भोग भोगितो. ॥ २३ ॥ तो मनोहर वेष धारण करितो व स्वतः

हतः (अडथळा न केलेला) धर्मः स्वनुष्ठितः, तेन अपि निर्जितं (मिळविलेलें) स्थानं [पुमान्] यथा गच्छति, तत् शृणु. ॥ २१ ॥ २२ ॥ याज्ञिकः इह यज्ञैः देवताः इष्ट्वा स्वर्लोकं याति. तत्र देववत् निजार्जितान् (स्वतां मिळविलेल्या) दिव्यान् भोगान् भुंजीत (भोगील). ॥ २३ ॥ देवीनां (अप्सरांच्या) मध्ये विहरन् हृद्यवेषधृक् (मनोहर वेष धरणारा)

अंतरायैरविहतो यदि धर्मः स्वनुष्ठितः ॥ तेनापि निर्जितं स्थानं यथा गच्छति तच्छृणु ॥ २२ ॥

इष्ट्वेह देवता यज्ञैः स्वर्लोकं याति याज्ञिकः ॥ भुंजीत देववत्तत्र भोगान्दिव्यान्निजार्जितान् ॥ २३ ॥

स्वपुण्योपचिते शुभ्रे विमान उपगीयते ॥ गंधर्वैर्विहरन्मध्ये देवीनां हृद्यवेषधृक् ॥ २४ ॥ स्त्रीभिः

कामगयानेन किंकिणीजालमालिना ॥ क्रीडन्न वेदाऽऽत्मपातं सुराक्रीडेषु निर्वृतः ॥ २५ ॥

[सः] स्वपुण्योपचिते शुभ्रे विमाने गंधर्वैः उपगीयते. ॥ २४ ॥ किंकिणीजालमालिना (घागऱ्यांच्या जाळ्या ज्यास आहेत असा) कामगयानेन (इच्छेप्रमाणे चालणाऱ्या विमानानें) स्त्रीभिः [सह] सुराक्रीडेषु (देवांच्या क्रीडास्थानीं) क्रीडन् निर्वृतः (सुखमग्न) आत्मपातं न - वेद (जाणत नाहीं). ॥ २५ ॥

पुण्यानें संपादिलेल्या सकळ उपभोगांनीं संपन्न अशा शुभ्र विमानांत बसून अप्सरांच्या समुदायामध्यें विहार करीत फिरतो. गंधर्व त्याचे गुण गात असतात. ॥ २४ ॥ तें विमान आंत बसणाराच्या इच्छेस येईल तिकडे गमन करणारें असून त्याला लहान लहान घुंगुरांच्या माळा गुंफिलेल्या असतात. त्या विमानांत बसून देवांच्या उद्यानांत क्रीडा करितां करितां तो त्या सुखांत इतका रंगून जातो कीं आपला पात होत आहे ही गोष्ट त्याच्या लक्षांत वागत नाहीं. ॥ २५ ॥

१ 'स्थान कसें मिळून जातें तें ऐक' असा ह्याचा अर्थ श्रीधरस्वामींनीं मानला, पण तो बरा नाहीं. वाक्यविचारकर्त्यानें 'पुमान्' हे पद अध्याहृत धरून 'तेन धर्मेण निर्जितं साधितं स्थानं पुमान् यथा गच्छति, तत्तथा शृणु' असा स्पष्ट अन्वय दाखवून दिला आहे. तसेंच

वाय म्हणतात :— कर्में ज्या स्थानाप्रति जाये। तेथें गेलिया जें जें लाहे। तें तें सांगेन मी पाहें। सावध होयें उद्धवा ॥ ३२० ॥

अशा रीतीनें, पुण्य संपेपर्यंत तो स्वर्गामध्यें आनंद भोगीत असतो, व पुण्य संपलें की, त्याची इच्छा नसते तरी, कालानें ढकलून दिल्यावरोबर तो खाली पडतो ' ॥ २६ ॥
- प्रवृत्ति दोन प्रकारांची आहे . एक विधीच्या अनुसारें काम्य कर्माच्या ठिकाणीं किंवा दुसरी विधि उल्लंघून अधर्माचरणामध्यें पैकीं पहिली (काम्य कर्मप्रवृत्तीची) गति सांगितली, आता दुसरीची (अधर्मप्रवृत्तीची) सांगतो - जर कदाचित् पुरुष दुष्टाच्या (विषयी लोकाच्या) संगतीमुळें अधर्ममार्गांत रमून जाईल व इंद्रियें स्वाधीन नसल्यामुळे चित्त विषयव्याप्त होऊन, तो दीन. भोगेच्छानीं व्याकुळ, स्त्रीलंपट व भोगासाठी भूतांची हिंसा करणारा होईल, ॥ २७ ॥ शिवाय, तो - दुष्ट जनानीं मोह घातल्यामुळे वनादिका-
यावत् पुण्यं समाप्यते, तावत् स्वर्गे प्रमोदते (आनंद भोगितो). क्षीणपुण्यः कालचालित. (कालानें हलविलेला, लोटिलेला) [सन्] अनिच्छन् अपि अर्वाक् (अधोलोकीं) पतति ॥२६॥ यदि असतां (दुष्ट विषयी लोकाच्या) संगात् अधर्मरतः अजितेंद्रिय. वा कामात्मा कृपण. लुब्ध. (भोगेच्छानीं व्याप्त) स्त्रैण. (स्त्रीलंपट) भूतविहिंसक , ॥ २७ ॥ [तर्हि] प्रेतभूतगणान् यजन् जंतुः अविधिना पशून् आलभ्य (मारून) अवश. नरकान् गत्वा अत्युल्बण (अति भयंकर) तम. (अज्ञानपूर्ण स्थावर योनीस) याति. ॥ २८ ॥ देहेन दुःखो-

तावत्प्रमोदते स्वर्गे यावत्पुण्यं समाप्यते ॥ क्षीणपुण्यः पतत्यर्वागनिच्छन्कालचालितः ॥ २६ ॥ यद्यधर्मरतः संगादसतां वा ऽजितेंद्रियः ॥ कामात्मा कृपणो लुब्धः स्त्रैणो भूतविहिंसकः ॥ २७ ॥ पशूनविधिना ऽऽलभ्य प्रेतभूतगणान्यजन् ॥ नरकानवशो जंतुर्गत्वा यात्युल्बणं तमः ॥ २८ ॥ कर्माणि दुःखोदर्काणि कुर्वन् देहेन तैः पुनः ॥ देहमाभजते तत्र किं सुखं मर्त्यधर्मिणः ॥२९॥ लोकानां लोकपालानां मद्भयं कल्पजीविनाम् ॥ ब्रह्मणो ऽपि भयं मत्तो द्विपरार्धपरायुषः ॥३०॥

दर्काणि (दुःख हें परिणामीं फल ज्याचें अशीं) कर्माणि कुर्वन् पुनः तैः देह आभजते (पावतो). तत्र मर्त्यधर्मिण (मरण स्वभावधर्म ज्याचा अशाला) सुख किं ? ॥ २९ ॥ कल्पजीविना (कल्पपर्यंत वाचणाऱ्या) लोकानां, लोकपालाना [च] मत्(मजपासून)भय द्विपरार्द्धपरायुषः (दोन परार्धें हें मोठें आयुष्य ज्याचें त्या) ब्रह्मण अपि मत्त. भय ॥ ३० ॥
साठीं - विधि सोडून पशु मारील आणि त्याच्या योगें प्रेतगणाचें व भूतगणाचें यजन करीत जाईल, तर तो प्राणी परवश होत्साता नरकांत जाऊन शेवटीं घोर (अज्ञानपूर्ण) स्थावर योनींत पडेल. ॥ २८ ॥ - एकंदरीत कर्मामध्यें प्रवृत्त होणाराला सुख मिळत नाहीं व त्याचें दुःखही निवृत्त होत नाहीं. पहा - ह्या रीतीनें देहाच्या योगें, परिणामीं दुःखदायक अशीं कर्में करितां करितां त्या कर्मांमुळें तो पुनः देह मिळवितो तेथें तरी पुरुषाला सुख कोणतें मिळणार? कारण, मृत्यु त्याच्यामागें नित्य लागलेला असतोच ॥ २९ ॥
- ह्यावर तूं ह्मणशील ' स्वर्गादि लोक नित्य आहेत, मरणधर्मी नव्हत. तेव्हां, लोकपालांना तरी सुख नित्य असलेंच पाहिजे कर्में करून तीं स्थानें मिळवावीं ह्मणजे झालें ' तर त्यांचेही

१ उल्बणं अज्ञानबहुलं स्थावरत्वम् ।

उत्तर सांपडते :- लोक आणि लोकपाल ह्यांचें आयुष्य कल्पपर्यंत असतें, तेवढें मरलें की त्यानाही मजपासून भय आहेच [illegible] तर काय ? ज्या ज्याचे दोन परार्धपर्यंत मोठें आ-युष्य असतें, त्या ब्रह्मदेवालाही मजपासून भय आहेच. - एतावता, प्रवृत्तिमार्ग साळा एकून नेकून अनर्थावह होय. ह्मणून वैराग्य धरून त्यापासून निवृत्त व्हावें हेंच योग्य - । २८ ।
- आत्मा कर्ता व भोक्ता असेंही ह्मणतां येत नाहीं' पहा :- इंद्रियें कर्मे करितात, - आत्मा तीं करितो असें नाहीं. - व सत्त्वादि गुणच इंद्रियांना विविध कर्मव्यापार करण्यास प्रवर्तवितात, - आत्मा प्रवृत्तिकर्ता नव्हे, - जीव त्या गुणाशी (इंद्रियादिकांशी) संयुक्त झाला की त्याचा अभिमान वाळगून [illegible] ह्मणून कर्मफलें भोगितो (आत्म्यावर [illegible])
गुणाः (इंद्रियें) कर्माणि सृजंति. गुणाः (सत्वादि) गुणान् (इंद्रियांस) अनुसृजते. गुणसंयुक्त ([illegible]) असा ([illegible]) जीव तु कर्मफलानि भुंक्ते । ३१ ।

गुणाः सृजंति कर्माणि गुणोऽनुसृजते गुणान् ॥ जीवस्तु गुणसंयुक्तो भुंक्ते कर्मफलान्यसौ ॥ ३१ ॥
यावत्स्याद्गुणवैषम्यं तावन्नानात्वमात्मनः ॥ नानात्वमात्मनो यावत्पारतंत्र्यं तदैव हि ॥ ३२ ॥
यावदस्यास्वतंत्रत्वं तावदीश्वरतो भयम् ॥ य एतत्समुपासीरंस्ते मुह्यंति शुचाऽर्पिताः ॥ ३३ ॥

यावत् गुणवैषम्यं स्यात्, तावत् आत्मनः नानात्व. यावत् आत्मनः नानात्व, तदा एव पारतंत्र्य. । ३२ ॥ यावत् अस्य अस्वतंत्रत्व, तावत् ईश्वरात् भय [illegible]
केवळ उपाधिकृत होय). ॥ ३१ ॥ जोंपर्यंत गुणांनी केलेला विषमभाव (अहंकारादि कार्यें) आहे, तोंपर्यंत आत्म्याचें नानात्व (भेद) [illegible] - उद्धवा, ह्यावर तू [illegible]
की ' जर आत्मा एक आहे तर इंद्रादि लोकपालांना व ब्रह्मदेवाला सुद्धां आत्म्यापासून भय आहे असें [illegible] ह्मणतो, [illegible] तर [illegible]
व्हावयाचें. ' तर त्याचेंही उत्तर सांगतों .- आत्म्याचें नानात्व असेपर्यंत आहे तोंपर्यंत परतंत्रपणाही असतो ([illegible] । ३२ । व तें [illegible] परतंत्रपणा [illegible]

---

१ ह्या अर्थाची श्रुतिः— भीषाऽस्माद्वातः पवते भीषोदेति सूर्यः । भीषाऽस्मादग्निश्चेन्द्रश्च मृत्युर्धावति पंचमः ।
परमेश्वराच्या भीतीनें वायु वाहतो, व सूर्य उगवतो आणि [illegible]
स्वताचा ईश्वरपणा प्रगट करून ' मुळींच ईश्वर नाहीं ' या मताचें खंडण केलें [illegible]
२ कवळें (कावीळ) अध्यासिला डोळा । तो चंद्रमा देखे पिवळा । तैसा आत्मा कर्ता भासे स्थूळा । केवळ निश्चळ [illegible] ([illegible]) । व [illegible]
ह्मणती चंद्रमा पळे । तैसा आत्मा कर्ता मानिती स्थूळें । उपाधिमेळें अध्यास । नाथ, ६२३ । २४ ३ [illegible] आपुलेंचि निजमुख । आणि सा करी आपणास्वरूप ।
तैसें अविद्यायोगें मायिक । द्वैत देख ने दाखवी ॥ आरशामाजी आपुला । जो देखणें स्वयें देखिला । तेथें आपण नाहीं द्विधा झाला [illegible]
नाथ, ६८८ । ८९

तोंपर्यंत प्राण्याला ईश्वराचें भय असतेंच. - एतावता सिद्धान्त हा की - जे कोणी हें (गुणवैषम्य, त्यानें केलेलें कर्म व स्त्री, पुत्र, स्वर्ग इत्यादि भोग) सेवितात ते शोकव्याप्त होऊन मोह पावतात. ॥ ३३ ॥ काल, आत्मा, कर्मप्रतिपादक आगम, स्वर्गादि लोक, - उत्पत्त्यादि परिणाम होण्याला निमित्तभूत - स्वभाव व - त्याच्या उपभोगाचें कारण - धर्म हीं सर्व मायेच्या गुणाचा क्षोभ झाला असता मलाच नावें मिळतात, ती मजहून वेगळी नाहींत (एतावता, ती जशीं अनित्य तशीच मायामय होत) एकदरींत निवृत्तिमार्गच मोक्षसाधन असल्यामुळें श्रेष्ठ होय. ॥ ३४ ॥ - एतावता. आत्मा एक होय, त्याला गुणाचें कार्य जो देह त्याच्या सबंधामुळें संसार भोगावा लागतो व आत्मज्ञानानें मुक्ति मिळते असें सांगितलें आणि इतर मताचें खंडन करून तोच सिद्धान्त दृढ केला आता त्यावर पुन्हा शंका घेऊन - उद्धव म्हणाला – प्रभो, जीव देहादि गुणकार्याच्या ठिकाणीं वागत वैषम्य, संसार) समुपासीरन्, ते शुचा अर्पिताः [संत.] मुह्यन्ति. ॥ ३३ ॥ गुणव्यतिकरे (गुणामध्यें न्यूनाधिक्यभाव) सति, मा ' काल', आत्मा, आगम, लोक., स्वभाव,

काल आत्माऽऽगमो लोकः स्वभावो धर्म एव च ॥ इति मां बहुधा प्राहुर्गुणव्यतिकरे सति ॥ ३४ ॥

उद्धव उवाच । गुणेषु वर्तमानोऽपि देहजेष्वनपावृतः ॥ गुणैर्न बध्यते देही बध्यते वा कथं विभो ॥ ३५ ॥

धर्मः एव च ' इति बहुधा प्राहुः. ॥ ३४ ॥ उद्धव उवाच— देही गुणेषु वर्तमान अपि देहजेषु कथं न बध्यते ? गुणैः अनपावृत (न आच्छादिलेला) [कथं] वा बध्यते ? ॥३५॥ असताही देहापासून उद्भवणाऱ्या सुखदु.खादि कर्मांच्या ठिकाणीं बद्ध होऊ नये कसा ? तो आकाशाप्रमाणें अनाच्छादित व अमर्याद असल्यामुळे बंध पावत नाहीं म्हणावें तर आरंभीं तरी बंधनांत सापडतो कसा ? - पहिल्यापासूनच तो बद्ध होऊ नये (देहादि गुण नसतील तेव्हा मुक्ति मिळते की असतील तेव्हा ? पहिल्या पक्षात ज्ञानाला साधन कांहीं नसावयाचें म्हणून मुक्ति मिळूं नये. दुसऱ्या पक्षीं तो देहादिकांत राहत असता देहापासून उद्भवणारीं जीं सुखदु खादि कर्में त्यांत बद्ध होऊं नये कसा ' आकाशाप्रमाणे त्या कर्मांनी अनाच्छादित म्हणावा तर मुळी कधी बंधच होऊ नये ह्याचा निर्णय काय ?) ॥ ३९ ॥

१ ह्यावरील एकनाथाचें व्याख्यान बोध होण्यास विशेष उपयोगी आहे पहा —

उद्धव म्हणे कृष्णनाथा । आत्मा देहामाजीं असतां । बंधन पावे जी तत्त्वतां । कीं सर्वथा पावेना ॥ गुण असतां मुक्ति घडे । कीं गुण गेलिया मुक्ति जोडे । हेंचि सांगावें मजपुढें । अति निवाडें निश्चित ॥ गुण असतां मुक्ति घडे । हे सर्वथा बोलणें कुडें । ज्वर असतां आरोग्य न घडे । वृक्ष न वाढे भिरुडेसी ॥ बाहीं बांधोनिया पाषाण । समुद्रामाजीं तरे कोण । तैसे देहीं असतां त्रिगुण । मुक्तपण कैसेनी ॥ . . गुण गेलिया मुक्ति । हेंही न घडे गा श्रीपति । गुणाचें कार्य देहेंद्रियें । ते गुण जाऊनि देह राहे । भूमीविण वृक्ष होये । हे अवद्ध पाहे बोलणें ॥ कारण जाऊनि कार्य राहे । हें बोलणें घडे काये । गुण जातां देहोचि जाये । मुक्त वर्तताहे कैसेनी ॥ एवं गुण असतां नसतां । मुक्ति न घडे गा सर्वथा । येचि विषयीं कृष्णनाथा । तुज मी तत्त्वतां पूसतु ॥ ७११ ते ७२०.

माद्न-
ज्ञान्
१ ॥

- ते गुण असतील तेव्हा त्यांच्या अहंकारामुळें बंध पावतो व अहंकार सुटला की मुक्त होतो असें मानावें तरी पुन्हा माझी जिज्ञासा आहेच की - तो बद्ध किंवा मुक्त पुरुष वागतो कसा, विहार कसे करितो, ओळखितां येतो कोणत्या लक्षणांनी भोजन कर्म करितो, मलमूत्रादिविसर्ग करितो कोणत्या प्रकाराने, निजतो कसा बसतो कसा, किंवा चालतो कशा रीतीने? ॥ ३६ ॥ अच्युता, तूं प्रश्नाची उत्तरें जाणणारामध्यें श्रेष्ठ आहेस करितां ह्याविषयींच्या माझ्या प्रश्नाचें उत्तर सांग आत्मा एकच नित्यबद्ध (जीव) व नित्यमुक्त (ईश्वर) कसा, ह्याविषयीं मला भ्रम उत्पन्न होतो.[२] ॥ ३७ ॥ ॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्पणे एकादशस्कंधे दशमो ऽध्यायः ॥ १० ॥

श्रीभगवान् ह्मणाले .— - उद्धवा, एकच आत्मा नित्यबद्ध व नित्यमुक्त कसा ह्याविषयी तुला भ्रम आहे ह्मणतोस तर तुला त्याचा विरोध वास्तविक आहे असे वाटतें की कथ वर्तेत, विहरेत् वा? कैः लक्षणैः ज्ञायेत? किं भुंजीत उत विसृजेत् वा? [कथं] शयीत, आसीत, याति वा? ॥ ३६ ॥ अच्युत, प्रश्नविदांवर, एतत् मे प्रश्नं ब्रूहि एकः एव नित्यमुक्तः, नित्यबद्धः [च] इति मे भ्रमः ॥ ३७ ॥ ॥ इति श्रीमद्भागवतान्वये एकादशस्कंधे दशमो ऽध्यायः ॥ १० ॥

कथं वर्तेत विहरेत्कैर्वा ज्ञायेत लक्षणैः ॥ किं भुंजीतोत विसृजेच्छयीताऽऽसीत याति वा ॥ ३६ ॥
एतदच्युत मे ब्रूहि प्रश्नं प्रश्नविदां वर ॥ नित्यमुक्तो नित्यबद्ध एक एवेति मे भ्रमः ॥ ३७ ॥ इति
श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे दशमो ऽध्यायः ॥१०॥ श्रीभगवानुवाच ।
बद्धो मुक्त इति व्याख्या गुणतो मे न वस्तुनः ॥ गुणस्य मायामूलत्वान्न मे मोक्षो न बंधनम् ॥१॥

श्रीभगवान् उवाच — बद्धः, मुक्त मे गुणतः वस्तुतः न. गुणस्य मायामूलत्वात् मे मोक्ष न बंधन न इति मे व्याख्या ॥ १ ॥

आत्मा बद्ध आहे व मुक्त आहे असा व्यवहार केवळ माझ्या जगीन तुमना प्रतीतीला येतो एवढेंच? पहिला पक्ष (विरोध वास्तविक असे) तर मानिता येत नाहींच कारण, - आत्मा बद्ध आहे व मुक्त आहे असा व्यवहार उपाधीमुळें होतो तर वास्तविक असतो, तसे उपाधिकृत असणाऱ्या सत्त्वादि गुणरूप उपाधीमुळें चालतो, तो वास्तविक नव्हे. - ह्यावर कोणी ह्मणेल ' असा तद्रूपाचा नाक उपाधीमुळें होतो तर वास्तविक असतो, तसे उपाधिकृत बंधमोक्ष वास्तविक का ह्मणूं नये? तर त्याचेंही कारण सांगतो - गुणांना मूळ कारण माया होय. - ती माया माझ्या ठिकाणी मिथ्या आहे, - तेव्हा तन्मूलक गुणांनी केले बंधन मला नाहीं, बंध नाहीं अर्थातच मोक्षही नाहीं. बंधमोक्षाचा निर्णय माझ्या मतें असा आहे (किंवा ह्या श्लोकाच तुमच्या रीतीने अर्थ होतो तो, असा — आत्मा बद्ध किंवा

१ जरी आत्म्याशीं नित्यमुक्तता । तरी दोहींचि नये बद्धता । एकचि बद्ध मुक्त ह्मणतां । भ्रम अच्युता वाटत ॥ आत्मा एकचि तत्त्वता । त्यासी बद्धता आणि मुक्तता । एकासीच दोन अवस्था । कृष्णनाथा केवीं ॥ नाथ, ७३६ । ३७. २ या अर्थाच्या पक्षीं अन्वय असा उवाच [आत्मा] बद्ध मुक्त इति [या] व्याख्या [सा] मे गुणतः [अस्ति], वस्तुतः न. गुणस्य मायामूलत्वात् मे बंधनं न, मोक्षः [वा] न.

मुक्त असें ह्मणणें केवळ माझ्या सत्वादि गुणाच्या अधीन आहे, वास्तविक नव्हे गुणाना मूळ कारण माया. - अर्थात त्या गुणाचा नियामक जो मी - त्या मला बंध नाही व मोक्षही नाहीं.) ॥ १ ॥ जसा स्वप्न ह्मणजे बुद्धीचा भ्रमात्मक खेळ, तमाच शोक, मोह, सुख, दुःख, देहाची प्राप्ति हा सर्व पसारा मायेनें रचिलेला केवळ भासमात्र होय, जीवाची ही संसृति वास्तविक नव्हे.* ॥ २ ॥ - एतावना, नित्यबद्ध व नित्यमुक्त हा विरोध खरा नव्हेच आता त्याची प्रतीति मात्र उपाधींनी केलेली घडते पहा - उद्धवा, विद्या (ज्ञान) आणि अविद्या ह्या दोन माझ्या तनु (शक्ति) होत. - माझ्या शक्ति ह्मणण्याचें कारण, - त्या माझ्या मायेनें निर्मिलेल्या (मायावृत्तिरूप) आहेत हे होय. ह्याच दोघी शरीरधारी शोकमोहौ, सुखं, दुःखं, देहोत्पत्तिः च मायया [भवति] यथा स्वप्न आत्मनः (बुद्धीची) ख्यातिः (विवर्त, भ्रम) [तथा] संसृति वास्तवी न. ॥ २ ॥ उद्धव, शरीरिणा

शोकमोहौ सुखं दुःखं देहोत्पत्तिश्च मायया ॥ स्वप्नो यथाऽऽत्मनः ख्यातिः संसृतिर्न तु वास्तवी ॥२ ॥

विद्याऽविद्ये मम तनू विद्ध्युद्धव शरीरिणाम् ॥ मोक्षबंधकरी आद्ये मायया मे विनिर्मिते ॥ ३ ॥

एकस्यैव ममांशस्य जीवस्यैव महामते ॥ बंधोऽस्याविद्ययाऽनादिर्विद्यया च तथेतरः ॥ ४ ॥

विद्याविद्ये मम तनू (शक्ति) विद्धि (जाण); मोक्षबंधकरी आद्ये [ते] मे मायया विनिर्मिते. ॥ ३ ॥ महामते, अविद्यया एकस्य एव मम अंशस्य अस्य जीवस्य एव जीवाना अनुक्रमें मोक्ष व बंध प्राप्त करून देतात (विद्या मोक्ष देते व अविद्या बंधान घालिते - ह्यावर कोणी ह्मणेल मोक्ष व बंध हे अनुक्रमें विद्येचें व अविद्येचे कार्य असें ह्मटले तर ते अनादि व नित्य होणार नाहींत ' तर तसे नव्हे. - त्या माझ्या शक्ति अगदीं पुरातन आहेत, - ह्मणून जोंपर्यंत मी त्या अविद्येला प्रवर्तवीत असतों तोंपर्यंत बंध असतो, व ज्यावेळीं विद्या देतों तेव्हा मोक्ष मिळतो असे समजावें - ॥ ३ ॥ - ' शरीरधारी जीवाना मोक्ष व बंध देणाऱ्या ' असें ह्मटलें ह्यावरून एकाद्याला अशी भ्रांति पडेल कीं जीव आणि

---

१ आत्मा व्यापक गुण परिच्छिन्न । याही हेतू न घडे बंधन । समुद्राचें प्राशन । केवीं राजण करू शके ॥ मोहरीमाजी मेरु राहे । पशामाजी पृथ्वी समाये । मुंगी गज गिळोनि जाये । खद्योत खाये सूर्यातें ॥ मशक ब्रह्मांडातें आकळी । पतंग प्रळयानळ गिळी । तरी आत्मा गुणाचे मेळीं । गुणकल्लोळीं बाधवेना ॥ यापरी न समवे बद्धता । बद्धते सवें गेली मुक्तता । बद्ध मुक्त अवस्थापरता । जाण तत्त्वता आत्मा मी ॥ नाथ, ४७ । ४८ । ४९.

बालप्रबोधिनी

* अत एकस्याप्यध्यासप्राप्तत्वाद्बद्धत्वं वस्तुतस्तदभावान्नित्यमुक्तत्वं च घटत इत्याशय. ।

ह्मणून एकाच आत्म्याला अध्यासप्राप्तीस्तव बंध आणि वस्तुतः तो नसल्यामुळें नित्यमुक्ति ह्या दोन्ही घडतात असा भाव

२ तन्यते मोक्षबंधावाभ्यामिति तनू ज्यानीं मोक्ष व बंध विस्तारिले जातात त्या शक्ति ३ स्कंद पुराणात ह्मटलें आहे — बंधको भवपाशेन भवपाशाच्च मोचकः । कैवल्यदः परं ब्रह्म विष्णुरेव सनातनः ॥ संसारपाशानें बांधणारा व संसारबंधातून सोडवून कैवल्यपद देणारा परब्रह्म सनातन (नित्य) विष्णुच होय.

ईश्वर असे विषय भिन्न दाखवून विरोध दूर केला. तर तसें नव्हे. बंधाची आणि मोक्षाची व्यवस्था अशी आहे - हे महाबुद्धिमता, जीव आणि आत्मा एकच होत त्या जीवाला अविद्येच्या योगें अनादि काळापासून बंध व ज्ञानाच्या योगें तसाच मोक्षही प्राप्तच आहे. ॥ ४ ॥ - ह्यावर तू ह्मणशील ' जीव आणि आत्मा एकच नव्हे तुम्ही (परमात्मा) ... बंध असेलच. तर तसें नाहीं - तो ह्या जीवालाच आहे. - पुन्हा तुम्ही शंका घेतलीच कीं आत्मा अभिन्न आहे तर जीव तो वेगळा कोणता आणि त्याला बंध, मोक्ष, सुख दुःख इत्यादि प्राप्त होतात ह्याची व्यवस्था काय? ' तर तेंही सांगतो. - तो जीव माझा अंश होय (जसा चंद्र एक असता उदकादि उपाधींच्या योगें त्याचे बिंब व प्रतिबिंब असे भेद होतात, आणि जसे उदकाला घडणारे कंपादि धर्म त्यातील प्रतिबिंबावर दिसून येतात. आकाशातील बिंबाशीं त्याचा संबंध नसतो शिवाय जशीं प्रतिबिंबेंही उपाधिभेदानें परस्परांहून भिन्न - राजणातलें प्रतिबिंब वेगळें, परळ्यातलें वेगळें, घागरीतलें वेगळें नदीतलें वेगळें, इत्यादि - असतात ह्मणून एक भांडें फुटलें तर त्यांतील तेवढें प्रतिबिंब बिंबाशीं

अनादिः बंधः. तथा विद्यया इतरः च. ॥ ४ ॥ तात, अथ बद्धस्य, मुक्तस्य, एकधर्मिणि (एका आश्रयावर) स्थितयोः विरुद्धधर्मिणोः. [जीवेश्वरयोः च] वैलक्षण्य (भेद), ते वदामि. ॥ ५ ॥

अथ बद्धस्य मुक्तस्य वैलक्षण्य वदामि ते । विरुद्धधर्मिणोस्तात स्थितयोरेकधर्मिणि ॥ ५ ॥

मिळून जातें, त्याच्याबरोबर दुसऱ्या भांड्यातील प्रतिबिंब जात नाहीं, त्याचप्रमाणें अविद्येनें प्रतिबिंबलेल्या माझ्या अंशभूत जीवालाच अविद्येमुळे बंध असतो व तो जीव उपाधिभेदानीं भिन्न असल्यामुळें बंधमोक्षांबद्दल कोणत्याही प्रकारची अव्यवस्था नाहीं. ज्याला अविद्या उपाधि आहे तो बद्ध व ज्याचा उपाधि नष्ट झाला तो मुक्त असे समजावें) ... - ही बंधमोक्षाची व्यवस्था सांगितली, - आता बद्ध आणि मुक्त ह्यांचा विलक्षणपणा (भेद)ही तुला सांगतो तो विलक्षणपणा दोन प्रकारचा आहे एक जीवाचा व ईश्वराचा आणि दुसरा जीवांचा परस्परामध्यें असलेला. पहा : - जीव व ईश्वर ह्या उभयतांचे धर्म एकमेकांशी अगदी विरुद्ध (जीवाचा धर्म शोक तर ईश्वराचा आनंद असे), आहेत पण ते एका आश्रयावर (शरीरावर) - नियम्यनियंतृभावानें (जीव नियम्य आणि ईश्वर नियामक अशा भावानें) - रहातात ॥ ५ ॥

१ हें संबोधन देण्यात भगवंताचा उद्देश असा दिसतो कीं, मी आत्मा जो तुला सांगत आहें, ... उद्धवा ...

२ जीव एकचि त्रिजगतीं । हे जाण उद्धवा निश्चितीं । जेवि नाना दीपांचिया दीप्ती । तेजाची ज्योति अभिन्न ॥ जैसी दीप एक होती । तैसें दिसती ... जडस्वापाधीं भेदभासी । ऐक्यवृत्ती अखंडत्वीं ॥ चंदनतुकडे बहुवस । परी सर्वां परिचि सुवास । तैसा जीव ... अविनाश । परमेश आत्मा ॥ नाथ, ३०३१ ...

३ ह्या अर्थाचें एक वचन आहे:— यथैकस्मिन् घटाकाशे रजोधूमादिभिर्युते । न सर्वे सम्प्रयुज्यन्ते तथा जीवा सुखादिभिः ॥ जसें एका घटामधील आकाश धुळीनें किंवा धुरानें संयुक्त झालें ह्मणजे ...

हे दोघे (जीव व ईश्वर)* पक्षी योग्यतेनें सारखे असून परस्पराचे मित्र आहेत व सहजगत्या (आकस्मिकपणें) हे उभयता एकाच वृक्षावर (देहामध्यें, हृदयांत) घरटें करून राहतात. ह्यांपैकीं एकजण (जीव) त्या अश्वत्थ वृक्षापासून उद्भवलेले अन्न (फळ) खातो व दुसरा भक्षण करीत नसूनही शक्तीनें अधिक मोठा आहे. ॥ ६ ॥ जो कर्मफल पत्नौ सदृशौ (सारखे) सखायौ (एकविचारी मित्र) सुपर्णौ. पतौ यदृच्छया वृक्षे कृतनीडौ (केलें घरटें ज्यांनीं असे) तयोः एक पिप्पलान्नं खादति (खातो) अन्यः निरन्न

सुपर्णावेतौ सदृशौ सखायौ यदृच्छयैतौ कृतनीडौ च वृक्षे ॥ एकस्तयोः खादति पिप्पलान्नमन्यो

निरन्नो ऽपि बलेन भूयान् ॥६॥ आत्मानमन्यं च स वेद विद्वानपिप्पलादो न तु पिप्पलादः ॥

यो ऽविद्यया युक् स तु नित्यबद्धो विद्यामयो यः स तु नित्यमुक्तः ॥ ७ ॥

बलेन भूयान् (अधिक मोठा) ॥६॥ अपिप्पलादः (कर्मफल न खाणारा) विद्वान् सः आत्मानं अन्यं च वेद. पिप्पलाद [जीव.] तु न [वेद]. यः अविद्यया युक्, सः नित्यबद्ध. भोगीत नाहीं तो पक्षी (ईश्वर) विद्वान् असून स्वतःला आणि दुसऱ्याला (जीवाला) ही जाणितो; व भोगणारा तर कोणालाच (स्वताला सुद्धा) ओळखीत नाहीं म्हणून जो अविवेकें युक्त आहे, तो नित्य (अनादिकाळापासून) बद्ध होय व जो ज्ञानमय आहे, तो (ईश्वर) तर नित्यमुक्त होय (कारण, माया जरी ईश्वराच्या आधारानें असते तरी

* प्रभा दीप दवडीना वेगळा । दीप प्रभेसी नव्हे निराळा । तेवीं जीवशिवाचा मेळा । एकत्र स्वलीळा नांदती सदा ॥ नाथ, १६७

१ श्रुतिवचनः— ऊर्ध्वमूलमवाक्शाखं वृक्षं यो वेद सप्रति ।

गीतेमध्येंही ह्याचें असेंच वर्णन आहे —

ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ॥ छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥

२ जीव व ईश्वर ह्यांना पक्षी म्हणण्याचें कारण हे – जसे ' पक्षी ' वृक्षाहून वेगळे असतात तसे हे दोघे देहरूप वृक्षाहून भिन्न आहेत ज्ञानरूपानें त्यांचा परस्परांशीं ' सारखेपणा ' आहे ' मित्र ' म्हणण्याचें कारण हे एकमेकांला सोडून राहत नाहींत व एक मतानें वागतात हें होय. ' सहजगत्या ' म्हणण्याचें कारण ह्यांच्या येण्याचें निमित्त जें माया त्याचें कोठे वर्णन केलेलें (करिता येण्याजोगें) नाहीं, हे शरीराला ' वृक्ष ' म्हणण्याचें कारण, तो ' तोडून टाकण्याजोगा (वृश्च्यते सः)' आहे, हें. शरीरवृक्षावरील घरटें म्हणजे ' हृदयाकाश '. ह्या वृक्षाला ' अश्वत्थ म्हणण्याचें कारण तो–' न श्व. तिष्ठति– उद्या न राहणारा म्ह॰ क्षणभंगुर ' आहे हें होय. शरीरवृक्षापासून उत्पन्न होणारें अन्न म्हणजे कर्मफल, जीव कर्मफल भोगितो व ईश्वर अभोक्ता असून ज्ञानादि शक्तींनीं सपन्न आहे.

ह्याच अर्थाची श्रुतिः—

द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते । तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभिचाकशीति ॥

तिजमध्यें ज्ञानाला आवरण घालण्याची व आपल्या आश्रयाला ह्म० ईश्वराला मोहविण्याची शक्ति नाही) ॥ ७ ॥ - हा जीवामध्यें आणि ईश्वरामध्यें असलेला भेद सांगितला, आता बद्ध व मुक्त अशा जीवामध्येंच परस्परामध्यें काय विशेष असतो तो सांगतो, ऐक. - ज्ञानी (मुक्त) पुरुष - संस्काराच्या अनुरोधानें - यद्यपि देहावर राहत असतो तरी तो वस्तुतः देहावर नसतोच. उदाहरण– असा स्वप्नांतून जागा झालेला पुरुष स्वप्नातील देहावर नसतो तसा (जागा झाल्यावर ' स्वप्नांत आपण वाघाच्या तोंडीं सांपडलों होतों किंवा राज्यावर बसलों होतों ' ही गोष्ट आठवली तरी मनुष्याला दुःख किंवा सुख वाटत नाहीं ह्मणून तो स्वप्नदेहावर नसतो तसेंच ज्ञानी पुरुषाला, त्याचा देहावर अभिमान नसल्यामुळें देहनिमित्तक सुखदुःख नसतें अर्थात तो देहावर नसतो हें उघड आहे). आणि दुर्बुद्धि (अज्ञानी) पुरुष, वस्तुतः देहामध्यें राहत नसताही, देहस्थ असतो (अभिमानानें देहा- यः विद्यामय. (ज्ञानरूप), सः नित्यमुक्तः. ॥ ७ ॥ यथा स्वप्नात् उत्थितः, [तथा] विद्वान् देहस्थः अपि देहस्थः न (भवति), स्वप्नदृक् [तथा] कुमतिः अदेहस्थः

> देहस्थो ऽपि न देहस्थो विद्वान् स्वप्नाद्यथोत्थितः ॥ अदेहस्थो ऽपि देहस्थः कुमतिः स्वप्नदृग्यथा ॥ ८ ॥
> इंद्रियैरिंद्रियार्थेषु गुणैरपि गुणेषु च ॥ गृह्यमाणेष्वहं कुर्यान्न विद्वान्यस्त्वविक्रियः ॥ ९ ॥ दैवाधीने शरीरे ऽस्मिन् गुणभाव्येन कर्मणा ॥ वर्तमानो ऽबुधस्तत्र कर्ता ऽस्मीति निबध्यते ॥ १० ॥

अपि देहस्थः ॥ ८ ॥ इंद्रियैः इंद्रियार्थेषु, गुणैः अपि गुणेषु गृह्यमाणेषु [सत्सु], यः विद्वान्, [स] ' अहं ' [इति] न कुर्यात् [अत] अविक्रिय ॥ ९ ॥ अबुध दैवाधीने पासून उद्भवणारीं सुखदुःखें भोगीत असतो). उदाहरण स्वप्न पाहणाराचें (वास्तविक मनुष्य आंथरुणावर पडलेला असतो, पण स्वप्नांत आपण वाघाच्या तोंडीं सांपडलों असें पाहून खरी स्थिति विसरल्यामुळें भिऊन जातो तशीच गोष्ट अज्ञानी जीवाची आहे ह्मणजे जीव हा वस्तुतः ज्ञानरूप असल्यामुळें त्याचा शरीराशीं संबंध नाहीं पण त्याच [illegible] ल्यावर बळेंच चिकटवून घेऊन तो देहनिमित्तक सुखदुःखें भोगीत असतो) ॥ ८ ॥ इंद्रियांनीं आपापले विषय ग्रहण केले तरी जो ह्मणून ज्ञानी आहे तो त्याविषयीं अहंकार (ते विषय मीं ग्रहण केले असा अभिमान) धरीत नाहीं, - कारण, तो समजतो कीं - गुणांनीं गुण ग्रहण केले, - त्यांत आपल्याकडे काय आहे - व असा अभिमान न [illegible] मुळें तो निर्विकार (रागद्वेषादि विकारांनीं रहित) असतो. ॥ ९ ॥ आणि अज्ञानी पुरुष तर पूर्वकर्माच्या अधीन असणारें जें हें शरीर त्यामध्यें राहत असता, इंद्रियांनीं [illegible]

१ स्वप्नींचें राज्य आणि भीक । जागृतीं मिथ्या दोन्ही देख । तैसें देहासि जें सुख दुःख । तें मिथ्या देख मुक्तासी । नाथ, २१७

२ स्वप्नीं काय लागले खड्गाचे । तेणें जागृतीं ह्मणे मी न वांचें । ऐसें निबिड भरितें भ्रमाचें । तें बद्धतेचें लक्षण । नाथ, २२२

३ ज्ञान अर्थानें गीतावचन— तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः । गुणा गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते ॥

हे महाबाहो (अर्जुना), तत्त्वज्ञानी तर, गुणकार्यं इंद्रियें गुणकार्य विषयांत जातात असें समजून गुणकर्मविभागावर आसक्त होत नाहीं

कर्मांच्या योगें त्या देहादिकांवर 'मीच तीं कर्में करणारा' अशा अभिमानानें बांधला जातो ॥ १० ॥ - दुसऱ्यानें (इंद्रियांनीं) केलेलें कर्म मला बंधक होतें, असें समजून - तो ज्ञानी पुरुष वैराग्य धरितो आणि शयन, आसन, फिरणें, स्नान, पाहणें, स्पर्श करणें, हुंगणें, भोजन, श्रवण इत्यादिकांच्या ठिकाणीं, जसा अज्ञानी बंध पावतो, तसा बद्ध होत नाहीं कारण, तो (विद्वान्) स्वतां केवळ साक्षिभूत राहून इंद्रियांकडून ते ते विषय भोगवीत असतो, अज्ञान्यासारखा स्वतां भोगीत (भोगितों असा अभिमान धरीत) नाहीं

अस्मिन् शरीरे वर्तमान. गुणभाव्येन (गुणांकडून घडणाऱ्या) कर्मणा तत्र ' कर्ता अस्मि ' इति निबद्ध्यते. ॥ १० ॥ एवं शयने, आसनाटनमज्जने, दर्शनस्पर्शनघ्राणभोजनश्रवणा-दिषु [च विरक्तः] ॥ ११ ॥ विद्वान् तत्र तत्र गुणान् आददन् (सेवविणारा) [सन्] तथा न बध्यते यथा खं (आकाश), सविता (सूर्य), अनिलः (वायु) [च तथा]

एवं विरक्तः शयन आसनाटनमज्जने ॥ दर्शनस्पर्शनघ्राणभोजनश्रवणादिषु ॥११॥ न तथा बध्यते विद्वांस्तत्र तत्रादयन् गुणान् ॥ प्रकृतिस्थो ऽप्यसंसक्तो यथा खं सविता ऽनिलः ॥ १२ ॥ वैशारद्येक्षया ऽसंगशितया छिन्नसंशयः ॥ प्रतिबुद्ध इव स्वप्नान्नानात्वाद्विनिवर्तते ॥ १३ ॥

प्रकृतिस्थः अपि असंसक्तः. ॥ १२ ॥ असंगशितया (वैराग्याच्या योगें तीक्ष्ण) वैशारद्या (अतिनिपुण) ईक्षया (ज्ञानदृष्टीनें) छिन्नसंशय: (तोडिले संशय ज्यानें असा) [सन्] स्वप्नात्

- असें होण्याला तरी कारण - तो देहादिकांच्या ठिकाणीं राहत असूनही त्यावर आसक्त नसतो, हें होय उदाहरण, आकाश, सूर्य व वायु यांचें (आकाश सर्वत्र राहत असूनही कोणाशीं संलग्न झालेलें नसतें, सूर्य उदकांत प्रतिबिंबित झाला तरी त्यावर आसक्त नसतो. व वायु सर्वत्र फिरतो तरी कोठें चिकटून राहत नाहीं तसाच ज्ञानी देहावर राहतो तरी अभिमान धरीत नाहीं). ॥ ११ ॥ १२ ॥ ज्ञानी पुरुष वैराग्याचा योगें तीक्ष्ण करून घेतलेल्या ज्ञानदृष्टीनें (तद्रूपखड्गानें) आपले समस्त* संशय तोडून टाकितो व मग अर्थात जसा जागा

१ गीतेमध्यें असेंच सांगितलें आहे.—

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः । अहंकारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते ॥

(प्रकृतीचे गुण सर्वतोपरी कर्में करीत असतात, आणि अहंकारानें वेडावून गेलेला हा जीव 'मीच कर्ता' असें मानितो !)

गेल्या तीन श्लोकांनीं 'कसा वागतो ?' ह्या प्रश्नाचें उत्तर दिलें मुक्त पुरुष सुखदुःखरहित व निरभिमान अशा वृत्तीनें देहावर राहतो, बद्ध पुरुष साभिमान अर्थात सुखी किंवा दुःखी असतो

जो न करितांचि चोरी । मी चोर ह्मणे राजद्वारीं । तो मारिजे लहान थोरीं । तैशी परी जड जीवा ॥ नाथ २४२.

२ हें 'काय उपभोगितो' ह्याचें उत्तर 'बद्ध पुरुष देहादिकांचा अभिमान धरून कर्मफलें भोगितो; मुक्त इंद्रियांकडून विषय भोगवून स्वतां अलिप्त राहतो

३ सूर्य कांती सविता । अग्नि उपजवूनि अकर्ता । तैसा निजतत्त्वाचा ज्ञाता । करोनि अकर्ता कर्मासी ॥ नाथ ४१६.

* देहाद्विलक्षणो भिन्नो न वा स्वतंत्रः परतंत्र ईश्वराद्भिन्नो ऽभिन्नो वेत्यादिरूपाः संशयाः

झालेला मनुष्य स्वप्नांतील मोहांतून सुटतो, तसा तो ज्ञानी देहादि विविध प्रपंचांतून मुक्त होतो. ॥ १३ ॥ ज्या पुरुषाच्या प्राण, इंद्रियें, मन व बुद्धि यांच्या वृत्ति संकल्परहित (अमुक करावयाचें, अमुक पाहावयाचें, इत्यादि संकल्प करीत नाहींत.) आल्या तो पुरुष देहावर राहत असला तरी - संकल्पशून्य वृत्तींनीं विहार करीत असतो म्हणून - देहाच्या सुखदुःखादि गुणांनी मुक्त असतो. ॥ १४ ॥ - इतका वेळ सांगितलेलीं हीं बद्धमुक्तांचीं लक्षणें आंतर असल्यामुळें केवळ ज्यांची त्यांनाच कळण्याजोगीं असतात आता त्यांची समजण्याना समजण्याजोगीं बाह्य लक्षणें सांगतों : - दुष्ट लोक किंवा हिंस्र प्राणी शरीराला पीडा देत असले अथवा एखादे वेळीं कोठें कोणी सज्जनतया त्याची पूजा करू लागले तरी,

प्रतिबुद्धः (जागा झालेला) इव नानात्वात् (भेदापासून–देहादिप्रपंचातून) विनिवर्तते. ॥ १३ ॥ यस्य प्राणेंद्रियमनोधियां वृत्तयः वीतसंकल्पाः (... ...), सः देहस्थः अपि तद्गुणैः विनिर्मुक्तः. ॥ १४ ॥ हिंस्रैः (दुष्टांनीं किंवा घातुक पशूंनीं) यस्य आत्मा यदृच्छया येन [केन अपि] किंचित् हिंस्यते, क्वचित् अर्च्यते वा [सः] बुधः

यस्य स्युर्वीतसंकल्पाः प्राणेंद्रियमनोधियाम् ॥ वृत्तयः स विनिर्मुक्तो देहस्थोऽपि हि तद्गुणैः ॥ १४ ॥ यस्याऽऽत्मा हिंस्यते हिंस्रैर्येन किंचिद्यदृच्छया ॥ अर्च्यते वा क्वचित्तत्र न व्यतिक्रियते बुधः ॥ १५ ॥ न स्तुवीत न निंदेत कुर्वतः साध्वसाधु वा ॥ वदतो गुणदोषाभ्यां वर्जितः समदृङ्मुनिः ॥ १६ ॥ न कुर्यान्न वदेत्किंचिन्न ध्यायेत्साध्वसाधु वा ॥ आत्मारामोऽनया वृत्त्या विचरेज्जडवन्मुनिः ॥ १७ ॥

[चेत्] तत्र न व्यतिक्रियते. ॥ १५ ॥ साधु, असाधु वा कुर्वतः, वदतः [वा] न स्तुवीत, न निंदेत. गुणदोषाभ्यां वर्जितः समदृक् मुनिः ॥ १६ ॥ किंचित् न कुर्यात्, न वदेत्, साधु, असाधु वा न ध्यायेत् [च]. आत्मारामः मुनिः अनया वृत्त्या जडवत् विचरेत् ॥ १७ ॥

जो ज्ञानसंपन्न असेल, तो पुरुष त्यामुळें विषाद किंवा हर्ष कोणताही फारसा विकार पावत नाहीं. * ॥ १५ ॥ आपल्याशी लोक बऱ्या रीतीनें वागोत किंवा वाईट रीतीनें वागोत, चांगलें म्हणोत वा वाईट म्हणोत, जो कोणाची स्तुति करीत नाहीं किंवा कोणाची निंदाही नाहीं तर गुणदोषांनीं रहित व समदृष्टि राहतो, तो मुनि मुक्त होतो ॥ १६ ॥ मुनि (ज्ञानी, मुक्त) काहीं करावयाचा नाहीं, कांहीं बोलावयाचा नाहीं, बरें किंवा वाईट कशाचेंही चिंतन करावयाचा नाहीं तर स्वस्वरूपीं रममाण राहून, पवन वेड्यासारखा, ह्या प्रमाणें

१ हें 'विहार कोणत्या रीतीनें करितो?' ह्याचें उत्तर : मुक्तपुरुष संकल्परहित इंद्रियवृत्तींनीं विहार करितो व बद्धपुरुष संकल्पयुक्त वृत्तींनीं विहार करितो.

नाथ म्हणतात— खळाळ लेणया प्रमाण नेणे। तरी आगी शोभे लेइलेपणें। तेवीं कर्मे विगुनली करणें। मुक्त अकर्ता अलिप्त ॥ नाथ ४८८.

२ ह्याच्या उलट असलेलीं तीं बद्धाचीं लक्षणें समजावीं. * याज्ञवल्क्यानें म्हटलें आहे:— यः कण्टकैर्वितुदति चंदनैर्यश्च लिंपति अक्रुद्ध अपरितुष्टश्च समस्तस्य च तस्य च।

एखादा कोणी आपल्या काटे टोंचीत असला तरी ज्ञानी पुरुष त्याच्यावर रागावत नाहीं, बरें दुसरा कोणी चंदनाची उटी देह लावीत असला तरी त्याच्यावर संतुष्ट होत नाहीं, ... उर्धा देण्याऱ्यांशीं सारख्याच वृत्तीनें असतो.

कृतीनें वागत असेल. ॥१७॥ मनुष्यानें शब्दब्रह्मात (वेदाचा अर्थ जाणण्यात) पारंगतपणा मिळविला पण त्यांत सांगितलेल्या ध्यान धारणादि भावनांच्या अनुष्ठानानें ब्रह्मादिसाक्षात्कार मिळविण्याचा प्रयत्न चालविला नाहीं तर त्याच्या त्या शास्त्राभ्यासाच्या श्रमाचे फल केवळ श्रमच होय. उदाहरण पहा. एखाद्यानें जिला व्यायल्याला फार दिवस झाले ती (भाकड) गाय पाळिली तर त्याच्या पदरीं श्रमावाचून दुसरें कोणतें फळ पडेल बरें? - कोणतेंच नाहीं तसलाच हा प्रकार समजावा. - ॥ १८ ॥ बा उद्धवा, जिचें दूध काढून घेतलें (जिच्यापासून पुढें दूध मिळायाचें नाहीं) असली गाय, जिच्या अंतरीं प्रेम वसत नाही अशी भार्या, पराधीन (प्रतिप्रसंगी दुःख देणारा) देह, इहपरलोकीं निरुपयोगी असो.

शब्दब्रह्मणि (वेदमध्ये) निष्णातः (अर्थानें पारंगत) परे यदि न निष्णायात्, [तर्हि] अधेनु (भाकड गाईला) रक्षत इव तस्य श्रम. श्रमफल ॥ १८ ॥ अंग, दुग्धदोहां (दोहून-काढून-घेतलें दूध जिचें, जीपासून पुढें कधीं दूध मिळायाचें नाहीं अशा) गां, असतीं (कामशून्य) भार्या, पराधीनं देहं, असत्प्रजा (कुमतवान), अतीर्थीकृत

> शब्दब्रह्मणि निष्णातो न निष्णायात्परे यदि ॥ श्रमस्तस्य श्रमफलो ह्यधेनुमिव रक्षतः ॥ १८ ॥ गां दुग्धदोहामसतीं च भार्यां देहं पराधीनमसत्प्रजां च ॥ वित्तं त्वतीर्थीकृतमंग वाचं हीनां मया रक्षति दुःखदुःखी ॥ १९ ॥ यस्यां न मे पावनमंग कर्म स्थित्युद्भवप्राणनिरोधमस्य ॥ लीलाऽवतारेप्सितजन्म वा स्याद्वंध्यां गिरं तां बिभृयान्न धीरः ॥ २० ॥

(सत्पात्रीं न अर्पिलेलें) वित्तं, मया हीनां वाचं च [यः] रक्षति, [सः] दुःखदुःखी. ॥ १९ ॥ अंग, यस्यां मे पावनं (शुद्धि देणारें) अस्य स्थित्युद्भवप्राणनिरोध (पालन उत्पत्ति जीवन व संहार एतद्रूप) कर्म, लीलावतारेप्सितजन्म (लीलेनें धरिलेल्या अवतारांतील लोकप्रिय जन्म) वा न स्यात्, तां वंध्यां (निष्फळ) गिरं धीरः न—बिभृयात् (न वागवो)

संतति, सत्पात्रीं दान न केलेलें अर्थात अपकीर्तीची व पापाची जोड देणारें द्रव्य, व माझें कीर्तन न करणारी वाणी, ह्यांचें पालन जो कोणी करितो त्याला दुःखामागून दुःखें भोगावी लागतात. ॥ १९ ॥ उद्धवा, माझें चरित्र जगाचें पालन, उत्पत्ति, जीवन व निरोध ह्यांचें कारण असून श्रवणकीर्तन करणारांना पवित्रता देतें नसेच, मी लीलेसाठीं जे रामकृष्णादि अवतार धरिले ते सकल लोकांना फार प्रिय आहेत. बा, तीं माझी चरित्रें किंवा रामकृष्णादि नांवें ज्या वाणीमध्यें वसत नसतील असली निष्फळ वाणी बुद्धिमान पुरुषानें धारण

---

१ जो शरीर कर्मांविषयींही उदासीन असतो, तो मुक्त होय. तसा नसेल तो बद्ध समजावा. हींच सगळीं मुमुक्षूचीं साधनें जाणावीं

२ तशा लोकांना नाथांनीं उत्तम उपमा शोधून दिली आहे'—

जेथूनि क्षीर स्रवती सड। तेथें लागोनि गोचिड। अशुद्ध (रक्त) सेविती अतिमूढ। तेवीं विद्वांस दृढ विषयासीं ॥ गोचिडाचे मुखीं क्षीर दिधें। तो अशुद्धा वांचोनि नें वे घे। तेवीं ज्ञान विकोनि अर्थे। विद्वांसू मागे विषयातें ॥ नाथ, ५२४। २५.

करूं (उच्चारूं) नये ॥ २०॥ मुमुक्षु पुरुषानें असा विचार करून आत्म्याच्या ठिकाणी पडलेला भेदभ्रम (देहादिकांचा अध्यास) दूर करावा आणि [illegible] सर्वव्यापी (परिपूर्ण) अशा माझ्या ठिकाणीं लावून मग आराम पावावें (नुसतें शास्त्रात पांडित्य करून स्वस्थ राहू नये). ॥ २१ ॥ आता, उद्धवा, [illegible] ब्रह्मरूप माझ्या ठिकाणीं लावण्याचें सामर्थ्य नसेल - तर तो नादच सोडून दे, - आणि निष्कामपणें (फलाची इच्छा न धरिता, केवळ माझ्या प्रीत्यर्थ) [illegible] जा - ह्मणजे माझ्या भक्तीनेंच तूं कृतार्थ होशील. - ॥२२॥ पुरुषानें मजवर विश्वास ठेवून अत्यन्त कल्याणकारक व लोकांना पवित्र करणाऱ्या अशा माझ्या कथा ऐकाव्या, [illegible]

॥ २० ॥ एवं जिज्ञासया (विचारानें) आत्मनि नानात्वभ्रमं अपोह्य (दूर करून) सर्वगे मयि विरजं (शुद्ध) मनः अर्प्य ([illegible]) उपारमेत. ॥ २१ ॥ यदि [illegible] मयि निश्चलं मनः धारयितुं अनीशः (असमर्थ), [तर्हि] निरपेक्षः [सन्] सर्वाणि कर्माणि समाचर. ॥ २२ ॥ उद्धव, श्रद्धालु सुभद्राः [illegible]

एवं जिज्ञासयाऽपोह्य नानात्वभ्रममात्मनि ॥ उपारमेत विरजं मनो मय्यर्प्य सर्वगे ॥ २१ ॥ यद्यनीशो धारयितुं मनो ब्रह्मणि निश्चलम् ॥ मयि सर्वाणि कर्माणि निरपेक्षः समाचर ॥ २२ ॥ श्रद्धालुर्मे कथाः शृण्वन्सुभद्रा लोकपावनीः ॥ गायन्ननुस्मरन्कर्म जन्म चाभिनयन्मुहुः ॥ २३॥ मदर्थे धर्मकामार्थानाचरन्मदपाश्रयः ॥ लभते निश्चलां भक्तिं मय्युद्धव सनातने ॥ २४ ॥ सत्संगलब्धया भक्त्या मयि मां स उपासिता ॥ स वै मे दर्शितं सद्भिरञ्जसा विन्दते पदम् ॥ २५ ॥

शृण्वन्, गायन्, अनुस्मरन् कर्म, जन्म च मुहुः अभिनयन् (अनुकरण करणारा) मदर्थे धर्मकामार्थान् आचरन् मदपाश्रय [पुरुष] सनातने मयि निश्चलां भक्तिं लभते ॥ २३ ॥ २४ ॥ सः सत्संगलब्धया मयि भक्त्या मां उपासिता. सः सद्भिः दर्शितं मे पदं अञ्जसा (अनायासें) विन्दते ([illegible]) ॥ २५ ॥

व अवतार याचें कीर्तन व स्मरण करावें, व त्याचें वारंवार स्वतः अनुकरणही चालवावें, ॥२३॥ आणि माझ्या प्रीत्यर्थ धर्म, काम व अर्थ ह्याचें पालन करीत जावें व केवळ [illegible] धरून राहावें. उद्धवा, असें करणाऱ्या पुरुषाला सनातन (अनादि नित्य) अशा माझ्या ठिकाणीं निश्चल भक्ति प्राप्त होते ॥ २४ ॥ [illegible] ठिकाणीं अशी भक्ति प्राप्त झाली कीं तो पुरुष माझें ध्यान करणारा होतो आणि मग तो ध्यानशील पुरुष साधूंनीं दाखवून दिलेल्या माझ्या स्वरूपास [illegible] होतो. ॥ २५ ॥

१ कामानां भगवदर्थे सेवनं तत्प्रसादतया स्रग्गंधवासोऽलंकारधारणं अर्थस्य तदर्थसेवनं च तदाराधनोपयोगिधनाद्युपार्जनम्. भगवत्प्रीत्यर्थ कामसेवन ह्मणजे त्याचा प्रसाद ह्मणून माळ, गंध, वस्त्रें, अलंकार इत्यादि धारण करणें [illegible] अर्थसेवन ह्मणजे त्याच्या आराधनास उपयोगी पडणारें द्रव्यादि [illegible]

ह्यावर उद्धवानें प्रश्न केला.– प्रभो, तुझी कीर्ति उत्तम (अज्ञानातून पार पाडणारी) आहे - जगामध्यें ज्याच्या त्याच्या बुद्धीप्रमाणे कल्पिलेले साधु अनेक आहेत - पण तुला मान्य असा साधु कोणत्या प्रकारचा असा? - तसेंच भक्ति देखील लोकांत पुष्कळ प्रकारची प्रसिद्ध आहे पण - तुझ्या ठिकाणीं उपयोगी पडेल (तुला आवडेल) अशी व नारदादि साधूंनी जिचा आदर केला ती भक्ति कशा प्रकारची आहे? ॥ २६ ॥ भगवंता, तूं ब्रह्मदेवादि पुरुषाचा नियामक, सकल लोकाचा अध्यक्ष व जगाचा चालक आहेस माझे तुजवर अत्यंत प्रेम असून मी तुला शरण आलों व तुझ्या चरणीं लीन झालों आहें करिता, प्रभो, हें (साधूचें आणि भक्तीचें लक्षण) मला निवेदन करावें ॥ २७ ॥ तू आकाशाप्रमाणे असंग असे परब्रह्म आहेस कारण, प्रकृतीहून पर असा पुरुष तूच असे असताना, हे भगवंता, भक्ताच्या इच्छेप्रमाणे तू हें मर्यादित (साडेतीन हात) शरीर धरण

उद्धवः उवाच— उत्तमश्लोक, प्रभो, तव कीदृग्विधः साधु मतः? सद्भिः आदृता कीदृशी भक्ति त्वयि उपयुज्येत (उपयोगी पडते)? ॥ २६ ॥ पुरुषाध्यक्ष, लोकाध्यक्ष, जगत्प्रभो, प्रणताय अनुरक्ताय प्रपन्नाय मे एतत् कथ्यताम्. ॥ २७ ॥ भगवन्, प्रकृतेः परः पुरुषः व्योम (आकाश, आकाशाप्रमाणे असंग) परमं ब्रह्म त्वं स्वेच्छोपात्तपृथग्वपु

उद्धव उवाच । साधुस्तवोत्तमश्लोक मतः कीदृग्विधः प्रभो ॥ भक्तिस्त्वय्युपयुज्येत कीदृशी सद्भिरादृता

॥२६॥ एतन्मे पुरुषाध्यक्ष लोकाध्यक्ष जगत्प्रभो ॥ प्रणतायाऽनुरक्ताय प्रपन्नाय च कथ्यताम् ॥ २७ ॥

त्वं ब्रह्म परमं व्योम पुरुषः प्रकृतेः परः ॥ अवतीर्णोऽसि भगवन्स्वेच्छोपात्तपृथग्वपुः ॥ २८ ॥

श्रीभगवानुवाच । कृपालुरकृतद्रोहस्तितिक्षुः सर्वदेहिनाम् ॥ सत्यसारोऽनवद्यात्मा समः सर्वोपकारकः

॥२९॥ कामैरहतधीर्दान्तो मृदुः शुचिरकिंचनः ॥ अनीहो मितभुक् शान्तः स्थिरो मच्छरणो मुनिः ॥ ३० ॥

(स्वेच्छेने स्वीकारिलें सनर्थक शरीर ज्यानें असा) [सन्] अवतीर्णः असि. ॥ २८ ॥ श्रीभगवान् उवाच— कृपालु, सर्वदेहिनाम् अकृतद्रोह (नाहीं केला द्वेष ज्याने असा), (भक्त क्षमाशील), सत्यसारः (सत्य हे बल ज्याचे असा) अनवद्यात्मा (निंदादि दोषांनी रहित मन ज्याचें, असा), समः, सर्वोपकारकः, ॥ २९ ॥ (मूळाप्रमाणे). ॥ ३० ॥

विविध अवतरला आहेस. ॥ २८ ॥ श्रीभगवान् म्हणाले:– उद्धवा, - माझ्या मताप्रमाणे साधूचीं लक्षणें अशीं असतात - तो कृपाळु असतो (त्याला दुसऱ्याचें दुःख पाहवत नाहीं), सर्व प्राण्यांपैकीं कोणापाशीही त्याचा द्वेष नसतो, त्याच्या आंगीं क्षमा असते, सत्य हेंच त्याचें बळ होय. त्याच्या ठिकाणीं असूयादि (उगाच एखाद्याला खोड्या ठेवणें वगैरे) दोष नसतात; - सुख किंवा दुःख कसलाही प्रसंग आला तरी - त्याची चित्तवृत्ति सारखी (हर्षविषादरहित) असते, तो यथाशक्ति सर्वांवर उपकार करीत असतो, ॥२९॥ विषयाच्या योगें त्याचें चित्त कधींच क्षुब्ध होत नाहीं, त्याचीं बाह्य इंद्रियें आवरलेलीं असतात, त्याचें चित्त मृदु असून आचरण शुद्ध असतें, तो कसलाही संग्रह करीत नाहीं,

आ-मा-स्र
समू-सान्न
॥ ७६ ॥

तोही दक्ष व्यवहार (ऐहिक सुखासाठीं उद्योग) चालवीत नाहीं, अल्प आहार करितो. अंतःकरण शांत राखितो. स्वधर्माचरणात स्थिर असतो, व माझाच एक आश्रय
ना आत्मविचारात निमग्न राहतोः ॥ ३० ॥ असेंच तो कधीं प्रमत्त (बेसावध) नसतो, त्याचें चित्त निर्विकार असतें. संकटांत प्रसंग आला तरी तो धैर्य [illegible]
बोध - क्षुधा, तृषा, शोक, मोह, जरा आणि मृत्यु हे - सहा गुण (विकार) त्यानें जिंकिलेले असतात. तो मान ची अपेक्षा करीत नाहीं पण [illegible]
माझेंच गात दक्ष असतो, कोणाला फसवीत नाहीं, करुणेनेंच एखादें परोपकाराचें काम करण्यास प्रवृत्त होतो. व त्याला सकल गोष्टींचें सम्यक् ज्ञान असते [illegible]
(सू) ॥ होय, त्या रूपाने मींच धर्म सांगून ठेविले आहेत तरी पण जो पुरुष, धर्म आचरिले असता चित्तशुद्धि इत्यादि गुण प्राप्त होतात व न आचरिले तर [illegible]

एवं गुणान्, दोषान् [च] आज्ञाय मया (वेदरूपें त्वा) आदिष्टान् (सांगितलेले) अपि स्वकान् सर्वान् धर्मान् संत्यज्य [यः] मा भजेत, स सत्तमः ॥ ३२ ॥

त्तो गभीरात्मा धृतिमान् जितषड्गुणः ॥ अमानी मानदः कल्पो मैत्रः कारुणिकः कविः ॥ ३१ ॥ आज्ञायैवं गुणान्दो-
षान् मयाऽऽदिष्टानपि स्वकान् ॥ धर्मान्संत्यज्य यः सर्वान्मां भजेत स सत्तमः ॥ ३२ ॥ ज्ञात्वाऽज्ञात्वाऽथ ये वै मां यावा-
न्यश्चास्मि यादृशः ॥ भजंत्यनन्यभावेन ते मे भक्ततमा मताः ॥ ३३ ॥ मल्लिङ्गमद्भक्तजनदर्शनस्पर्शनार्चनम् ॥ परिचर्या स्तुतिः
प्रह्वगुणकर्मानुकीर्तनम् ॥ ३४ ॥ मत्कथाश्रवणे श्रद्धा मदनुध्यानमुद्धव ॥ सर्वलाभोपहरणं दास्येनाऽऽत्मनिवेदनम् ॥ ३५ ॥

[अहं] यावान् (अनंत, अपरंपार), यः (सर्वात्मा), यादृशः (सच्चिदानंदादिरूप) च अस्मि [तं] मां ज्ञात्वा, अथ (किंवा) अज्ञात्वा (न जाणून), ये अनन्यभावेन
भजति, ते मे भक्ततमाः मताः. ॥ ३३ ॥ (सू०), ॥ ३४ ॥ उद्धव, (सू०), ॥ ३५ ॥

दोष लागतात असें कळत असताही, ते धर्म ईश्वराच्या ध्यानामध्यें विक्षेप करितात म्हणून सोडून देतो व ईश्वरभक्तीनेंच सकल [illegible] मान्य होतात अशा निश्चयानें माझी भक्ति चाल-
वितो तोही पुरुष असाच श्रेष्ठ साधु होय. ॥ ३२ ॥ मी जो (सर्वात्मा) जसा (सच्चिदानंदादिरूप) व जेवढा (देशकालानीं अमर्यादित), असें त्या [illegible] जाणत किंवा न जाणतांहि जे
कोणी अनन्यभावानें माझें भजन करितात, ते माझ्या मतें अत्यंत श्रेष्ठ भक्त होत. । ३३ ॥ - आता [illegible] प्रिय भक्ति कोणती ते ऐक - माझ्या मूर्ति व माझे भक्तजन ह्यांचें दर्शन
स्पर्श (आलिंगनादि) व पूजन करावें; त्यांची सेवा व स्तुति चालवावी; त्यांना प्रणाम करावे, त्यांचे गुण व चरित्रें [illegible] ३४ उद्धव माझ्या [illegible]

१ किंवा ' अज्ञात्वा ' असें पद काढिता ' ज्ञात्वा ' असेंच [illegible] व ' विशेषनः पुन. [illegible] ' असा [illegible]
२ जेवीं दुधाळाचीं मांजर । रिधी पहावया सादर । तेवीं [illegible] कथासार । निरंतर उल्लास ॥ ना. ए. १२३५.

ठेव.वी, माझें सतत चिंतन चालवावें, जें काही मिळेल तें सर्व मला अर्पण करावें, सेवेसाठीं स्वताचा देहही मला निवेदन करावा, ॥ ३५ ॥ माझीं जन्में व चारित्रें यांचें कीर्तन करावें, माझ्या पर्वोत्सवांना (जन्माष्टमीसारख्या उत्साहाना) अनुमोदन द्यावें, गायन, नृत्य, वाद्यें, सभा, यांच्या योगें माझ्या मंदिरात उत्साह करावा, ॥ ३६ ॥ वर्षांतील सगळ्या पर्वदिवशीं व विशेषतः चातुर्मास्यातील जन्माष्टमी एकादशी इत्यादि तिथींला माझ्या दर्शनासाठी यात्रा कराव्या फुलाची वगैरे महापूजा बांधावी, वेदोक्त व तंत्रोक्त दीक्षा धारण करावी; एकादशीचे उपवास इत्यादि माझीं व्रतें पाळावीं; ॥ ३७ ॥ माझी मूर्ति स्थापन करण्याविषयी इच्छा धरावी, मजसाठी उद्यानें (फुलाचीं) उपवनें (फळाचीं), क्रीडा-

॥३६॥ सर्ववार्षिकपर्वसु यात्राबलिविधान, वैदिकी, तान्त्रिकी [च] दीक्षा, मदीयव्रतधारणं, ॥३७॥ मदर्चास्थापने श्रद्धा (माझी मूर्ति स्थापण्याविषयीं इच्छा), उद्यानोपवनाक्रीडपुरमंदिरकर्मणि स्वतः, [सामर्थ्ये असति] संहत्य (पुष्कळांनीं मिळून) च, उद्यमः, ॥ ३८ ॥ अमायया (निष्कपटपणें) समार्जनोपलेपाभ्यां (झाडणें सारवणें यानीं), सेकमंडलवर्तनैः

मज्जन्मकर्मकथनं मम पर्वानुमोदनम् ॥ गीततांडववादित्रगोष्ठीभिर्मद्गृहोत्सवः ॥ ३६ ॥ यात्रा बलिविधानं च सर्ववार्षिकपर्वसु ॥
वैदिकी तांत्रिकी दीक्षा मदीयव्रतधारणम् ॥३७॥ मदर्चास्थापने श्रद्धा स्वतः संहत्य चोद्यमः ॥ उद्यानोपवनाक्रीडपुरमंदिरकर्मणि
॥ ३८ ॥ संमार्जनोपलेपाभ्यां सेकमंडलवर्तनैः ॥ गृहशुश्रूषणं मह्यं दासवद्यदमायया ॥ ३९ ॥ अमानित्वमदंभित्वं कृतस्यापरिकीर्तनम् ॥ अपि दीपावलोकं मे नोपयुंज्यान्निवेदितम् ॥ ४० ॥

(सडे व रांगोळीचीं मंडलें काढणें यानीं) [च] यत् दासवत् मह्यं गृहशुश्रूषणं, ॥ ३९ ॥ अमानित्वं, अदंभित्वं, कृतस्य अपरिकीर्तन, मे निवेदितं दीपावलोकं अपि न – उपयुं-

स्थानें, पुरें, मंदिरें हीं बांधण्याच्या कामीं - सामर्थ्य असल्यास - स्वता एकट्यानें, - तसें नसल्यास - पुष्कळांनीं मिळून उद्योग चालवावा, ॥ ३८ ॥ झाडणें सारवणें, सडे घालणें, रांगोळीची स्वस्तिकें किंवा सर्वतोभद्रादि मंडलें काढणें, अशी सेवकासारखी माझ्या मंदिरीं सेवा निष्कपटपणे चालवावी, ॥ ३९ ॥ मानाची अपेक्षा धरू नये दंभ माजवूं नये; केलेल्या धर्मकृत्याचा कोणाजवळही उच्चार करूं नये, मला जें - स्वता किंवा दुसऱ्यानेंही - निवेदन केलें असेल त्याचा - फार तर काय नसल्या - दि-

१ हाट हाटवटिया चौपासीं । नगर वसवावें देवापासीं । वेदाध्ययन शास्त्रश्रवणेंसीं । अहर्निशीं कीर्तनें ॥ नाथ, १२९१.

त्याच्या प्रकाशाचाही स्वतांच्या कार्यासाठीं उपयोग करूं नये. (किंवा दुसऱ्याला निवेदन केलेले पदार्थ नेत्रा अर्पूं नये, असा अर्थ करावा). ॥ ४० ॥ जो जो पदार्थ लोकांमध्यें अतिप्रिय ठरलेला असेल तसाच जो आपल्याला अत्यंत आवडत असेल तो तो पदार्थ मला निवेदन करावा त्यापासून अनन्तफळ प्राप्त होतें ॥ ४१ ॥ [illegible] सूर्य, अग्नि, ब्राह्मण, गाई, विष्णुभक्त, आकाश, वायु, उदक, पृथ्वी, आत्मा व सकल भूतें हीं - अकरा - माझी पूजा करण्याचीं स्थानें (आश्रय) होत. ॥ ४२ ॥ सूर्याच्या [illegible] त्याचा (उपभोग करूं नये). ॥ ४० ॥ लोके यत् यत् इष्टतमं, आत्मनः यत् अतिप्रियं, च तत् तत् मह्यं निवेदयेत्. तत् आनन्त्याय कल्पते [illegible] ॥ ४१ ॥ सूर्य, [illegible] अग्निः, ब्राह्मणाः, गावः, वैष्णवः, खं, मरुत् (वायु), जल, भूः, आत्मा, सर्वभूतानि [च] मे पूजापदानि. ॥ ४२ ॥ अग [illegible] सूर्ये त्रय्या—विद्यया ([illegible]

यद्यदिष्टतमं लोके यच्चातिप्रियमात्मनः ॥ तत्तन्निवेदयेन्मह्यं तदानंत्याय कल्पते ॥ ४१ ॥ सूर्योऽग्निर्ब्राह्मणो गावो वैष्णवः खं मरुज्जलम् ॥ भूरात्मा सर्वभूतानि भद्र पूजापदानि मे ॥ ४२ ॥ सूर्ये तु विद्यया त्रय्या हविषाऽग्नौ यजेत माम् ॥ आतिथ्येन तु विप्राग्र्ये गोष्वंग यवसादिना ॥ ४३ ॥ वैष्णवे बंधुसत्कृत्या हृदि खे ध्याननिष्ठया ॥ वायौ मुख्यधिया तोये द्रव्यैस्तोयपुरस्कृतैः ॥ ४४ ॥

पादक सूक्तांनीं) अग्नौ हविषा विप्राग्र्ये आतिथ्येन गोषु यवसादिना (त्वन इत्यादिकांच्या योगें) यजेत. ॥ ४३ ॥ वैष्णवे बंधुसत्कृत्या, हृदि खे ध्याननिष्ठया, वायौ मुख्यधिया [illegible] ठिकाणीं माझी पूजा तीन वेदांत सांगितलेल्या सूक्तांनीं उपस्थानादिकांच्या योगें करावी. अग्नीमध्यें मला होमद्रव्यें देऊन [illegible] श्रेष्ठ ब्राह्मणाच्या ठिकाणीं उत्तम आतिथ्याच्या योगें व गाईंच्या ठिकाणीं त्यांना तृणादि देऊन त्या योगें माझें पूजन चालवावें. ॥ ४३ ॥ विष्णुभक्ताच्या ठिकाणीं, त्यांचा बंधुप्रमाणें सत्कार करणें हा, उपचारानें मला

---

१ श्रीधर म्हणतात, हा विशेष केवळ स्वतःवर उपयुक्त असतो, [illegible] — षष्टिवर्षसहस्राणि उपवासैस्तु यत्फलं परिकीर्तितम् । विष्णोर्नैवेद्यसिक्थेन तत्फलं भुंजतां कलौ ॥ हृदि रूपं मुखे नाम नैवेद्यमुदरे हरेः पादोदकं च निर्माल्यं मस्तके यस्य सोऽच्युतः [illegible] सहा महिने उपवास केले असता जें फळ मिळतें म्हणून वर्णिलें आहे, तें फळ कलियुगामध्यें, विष्णूला अर्पिलेल्या नैवेद्याच्या [illegible], नैवेद्य उदरामध्ये, व चरणतीर्थ आणि निर्माल्य मस्तकीं [illegible] तो साक्षात् अच्युत होय.

देवासी समर्पिलें आपण । का आणिकां केलें निवेदन । तें घेऊं नये आपण । देवलकपण तो होय । देवाचा प्रसाद घेतां । कोणें न द्यावा सर्वथा । आणीं वाढावा सम-स्तां । कलशमात्रता स्वयें घ्यावा ॥ दीपू समर्पिला श्रीहरी । तेणें न वर्तावें गृहव्यापारीं । हे दोन्ही आगमशास्त्रीं । स्मृतिकारीं सांगितलें [illegible] ॥ [illegible] १३०१ । ६ । ७

२ कारण असें वचन आहे- पितृशेषं तु यो दद्याद्धरये परमात्मने । रेतोधाः पितरस्तस्य भवन्ति क्लेशभागिनः. ॥ [illegible] निवेदन करून उरलेलें [illegible] अर्पण करितो, त्याचे पितर रेतःपायी होऊन क्लेश भोगीत पडतात).

आराधावें. आकाशांत म्हणजे हृदयांतरी ध्याननिष्ठेने माझी पूजा करावी. वायूच्या ठिकाणीं हाच प्राण अशा दृष्टीनें अर्चन करावें उदकामध्यें उदकादि सामग्रीच्यायोगें मला पूजावें ॥४४॥ भूमीवर (मूर्तीवर) रहस्यमंत्राच्या न्यासानी आराधना चालवावी, शरीरामध्ये आत्म्याची उपभोग समर्पून पूजा करावी. सर्वभूताच्या ठिकाणी, मी क्षेत्रज्ञ सर्वत्र समभावाने व पहाविने अशा बुद्धीनें, माझें यजन करावे. ॥ ४५ ॥ ह्या अकरा स्थानाच्या ठिकाणीं अशा प्रकारानें माझ्या चतुर्भुज, शंख, चक्र, गदा, व कमल ह्या आयुधांनी युक्त व शांत रूपाचे ध्यान करीत समाधानयुक्त मनानें अर्चन चालवावें. ॥ ४६ ॥ जो कोणी एकाग्र मनेकरून इष्टापूर्त कर्मांच्या योगे अशा रीतीने माझें आराधन करितो. त्याची मजवर उत्तम भक्ति अशा बुद्धीनें), तोये (उदकामध्यें) तोयपुरस्कृतैः द्रव्यैः, [यजेत]. ॥ ४४ ॥ स्थंडिले (भूमीवर) मंत्रहृदयैः , भोगैः आत्मनि (जीव त्याचे ठिकाणीं) आत्मान [यजेत्] क्षेत्रज्ञं मां सर्वभूतेषु समत्वेन यजेत. ॥ ४५ ॥ इति एषु धिष्ण्येषु (स्थानी) शंखचक्रगदाबुजैः युक्तं चतुर्भुज शांत मद्रूप ध्यायन् समाहित [सन्] अर्चेन् ॥ ४६ ॥ एवं यः समाहितः [सन्] मां इष्टापूर्तेन यजेत, सः साधुसेवया मत्स्मृतिः [सन्] मयि सद्भक्तिं लभते. ॥ ४७ ॥ उद्धव, प्रायेण सत्संगेन भक्तियोगेन विना सध्र्यङ् उपाय: न विद्यते.

स्थंडिले मंत्रहृदयैर्भोगैरात्मानमात्मनि ॥ क्षेत्रज्ञं सर्वभूतेषु समत्वेन यजेत माम् ॥४५॥ धिष्ण्येष्वित्विति मद्रूपं शंखचक्रगदाबुजैः ॥ युक्तं चतुर्भुजं शांतं ध्यायन्नर्चेत्समाहितः ॥ ४६ ॥ इष्टापूर्तेन मामेवं यो यजेत समाहित ॥ लभते मयि सद्भक्तिं मत्स्मृतिः साधुसेवया॥ ४७ ॥ प्रायेण भक्तियोगेन सत्संगेन विनोद्धव ॥ नोपायो विद्यते सध्र्यङ् प्रायणं हि सतामहम् ॥ ४८ ॥ अथैतत्परमं गुह्यं शृण्वतो यदुनंदन॥सुगोप्यमपि वक्ष्यामि त्वं मे भृत्यः सुहृत्सखा॥४९॥ इति श्रीभा०म०एका० भगवदुद्धवसंवादे एकादशो ऽध्यायः ॥११॥

हि अहं सतां प्रायणं (उत्तम आश्रय). ॥ ४८ ॥ यदुनंदन, अथ अतः एतत् परमं गुह्य शृणु. सुगोप्यं (अजत गुप्त) अपि वक्ष्यामि. [यतः] त्वं मे भृत्यः (भक्त), सखा, सुहृत् [च]. ॥ ४९ ॥ ॥ इति श्रीमागवतान्वये एकादशस्कंधे एकादशो ऽध्यायः ॥ ११ ॥

लभते. - अशी भक्ति उत्पन्न होण्याचे अंतरंग साधन - साधूंची सेवा हे होय. ती केली असता माझी स्मृति होते. ॥ ४७ ॥ उद्धवा, साधूंचा समागम करून भक्तियोग मिळविणे ह्यावांचून प्रायः संसार तरण्याचा दुसरा चांगला उपाय नाहीं. कारण, साधूंचा उत्तम आश्रय काय तो मी असतों - अर्थात सत्संग माझ्या प्राप्तीचें अंतरंग साधन होय - ॥ ४८ ॥ आतां हे यदुनंदना, तूं माझा सेवक, व अंतरंगीचा मित्र असून ऐकण्यास उत्सुक आहेस म्हणून मी ही एक परम गुह्य गोष्ट — अत्यंत गुप्त ठेवण्याजोगी आहे तरी — तुला सांगतों ऐक.— ॥ ४९ ॥ ॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने एकादशस्कंधे एकादशो ऽध्यायः ॥११॥

१ इष्ट म्हणजे वेदोक्त यज्ञयागादि कर्मे व पूर्त म्हणजे लोकोपयोगार्थ विहिरी, तळाव, उपवने इत्यादि बांधण.

श्रीकृष्ण उद्धवास ह्मणाले :- सर्व संगाचे दोष नाहींसे करणारा साधुसंग मला ज्याप्रमाणें वश करतो त्याप्रमाणें आसनप्राणायामादि अष्टांग योग मला वश करीत नाहीं. तसेंच सांख्य ह्मणजे तत्त्वविचार, अहिंसादि धर्म, वेदाध्ययन, कृच्छ्रचांद्रायणादि तप. सन्यास, अग्निहोत्रादि कर्मे, कूप (आड), आराम (बागें) इत्यादिकांचें निर्माण दान दक्षिणा, एकादश्युपवासादिक व्रतें, देवार्चन, मंत्रजप, गंगादिक तीर्थे. * यम, व नियम हीं सर्व साधनें मला वश करूं शकत नाहीत. ॥ १ । २ ॥ उद्धवा केवळ सत्-

श्रीभगवान् उवाच— यथा सर्वसंगापहः सत्संगः मां अवरुंधे (वश करितो), [तथा] योगः मां न—रोधयति (वश करीत नाहीं) सांख्य धर्म एव च न स्वाध्यायः (वेद

श्रीभगवानुवाच । न रोधयति मां योगो न सांख्यं धर्म एव च ॥ न स्वाध्यायस्तपस्त्यागो नेष्टापूर्तं न दक्षिणा ॥ १ ॥ व्रतानि यज्ञश्छंदांसि तीर्थानि नियमा यमाः ॥ यथाऽवरुंधे सत्संगः सर्वसंगापहो हि माम् ॥२॥ सत्संगेन हि दैतेया यातुधाना मृगाः खगाः ॥ गंधर्वाप्सरसो नागाः सिद्धाश्चारणगुह्यकाः ॥३॥ विद्याधरा मनुष्येषु वैश्याः शूद्राः स्त्रियोऽन्त्यजाः ॥ रजस्तमःप्रकृतयस्तस्मिंस्तस्मिन्युगे ऽनघ ॥ ४ ॥ बहवो मत्पदं प्राप्तास्त्वाष्ट्रकायाधवादयः ॥ वृषपर्वा बलिर्बाणो मयश्चाथ विभीषणः ॥ ५ ॥

ध्यायन), तपः, त्यागः [च] न. इष्टापूर्ते (यज्ञयागादिक, व वापीकूपतडागादिक) न दक्षिणा न. व्रतानि, यज्ञः, छंदांसि तीर्थानि नियमा, यमाः [च न] ॥ १ । २ ।
अनघ, तस्मिन् तस्मिन् युगे सत्संगेन रजस्तमःप्रकृतयः (राजस व तामस स्वभावाचे) (मू ॥ ३ । ४ । ५ ॥
संगानेंच दैत्य, राक्षस, पशु, पक्षी, गंधर्व, अप्सरा, नाग, सिद्ध, चारण, गुह्यक, आणि विद्याधर तसेच मनुष्यामध्यें वैश्य शूद्र, स्त्रिया, व अन्त्यज हे सर्व राजस तामस स्वभावाचे असून त्या त्या युगाचेठायीं माझ्या पदास प्राप्त झाले आहेत. वृत्रासुर, प्रल्हाद, वृषपर्वा, बलि बाणासुर, मयासुर, विभीषण, सुग्रीव, हनुमान, जांबवान गजेंद्र जटायु, तुलाधार

* यम आणि नियम हे श्लोक बारा बारा आहेत त्यांचें वर्णन पुढे श्रीकृष्ण करणार आहेत कळेल तें, तेथेंच पहावे

उद्धवा यमनियमनिर्धार। एकोणिसावे अध्यायीं सविस्तर। तुज मी सांगेन साचार। संक्षेपाकार बरावा ॥ ते यम नियम याग दारा। आणि सकळ साधन मला वाधया माझिया वनरा। मार्ग पुढारा चालेना ॥ ते गेलिया संतांच्या दारा। घरूनि साधूंच्या आधारा। अवघी आला माझिया घरा। एवं एवढा सत्संगति ।। तेणें सर्व सत्संगति। सर्वे सकळ संगातें छेदिती। ठाकठोक माझी प्राप्ति। पंथिस नव्हतो आणिका ॥ नाथ, २३ पासून ४०

१ सोनें बाडेपंधरें चोखडें। त्यासि रत्नाची संगति जोडे। तें अधिकाधिक मोल चढे। मुकुटीं चढे महाराजाचे ॥ तैसी पुण्य पुरुषा सत्संगति। जाहल्या अनंत सुख पावती। सुरवर त्यांतें वंदिती। शिवादि येती भेटीसी ॥ नाथ, ७०। ७१.

(वाणी), धर्मव्याध, कुब्जा, गोकुळांतील गोपिका, आणि यज्ञपत्न्या इत्यादि पुष्कळ लोकांना सत्समागमानेंच माझ्या पदाची प्राप्ति झाली आहे ॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥ ॥ ६ ॥ ह्या सांगितलेल्या लोकांत कोणी वेदाध्ययन केलें नाहीं व त्यासाठी कोणा विद्वानाची सेवा केली नाही, कोणतीही व्रतें किंवा तपेंही केली नाहींत तर केवळ माझ्या किंवा मद्भक्त जे संत त्यांच्या समागमानें ते मद्रूपतेस प्राप्त झाले आहेत ॥ ७ ॥ - त्यांत वृत्रासुरादि कित्येकांना अध्ययनादि साधनांतराचा संभव असेल तर असो परंतु गोपी, गायी इत्यादिकांना दुसरें कोणतेही साधन नव्हतें: उद्धवा! सत्समागमानें प्राप्त झालेल्या - केवळ भावानेंच (प्रीतीने) गोपी, गायी, वृक्ष (यमलार्जुनादिक), पशु (गजे-

(मूळाप्रमाणें. ॥ ६ ॥) बहवः मत्पदं प्राप्ताः. ॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥ ६ ॥ नाधीतश्रुतिगणाः (ज्यांनीं वेदसमूहाचें अध्ययन केलें नाहीं, ते) नोपासितमहत्तमाः (ज्यांनीं सत्पुरुषाची सेवा - अध्ययनार्थ - केली नाहीं, ते) अव्रतातप्ततपसः (ज्यांनीं तपें केलीं नाहींत) ते सत्संगात् [एव] मा उपागताः. ॥७॥ गोप्यः, गावः, नगाः (वृक्ष), मृगाः (पशु), नागाः

सुग्रीवो हनुमानृक्षो गजो गृध्रो वणिक्पथः ॥ व्याधः कुब्जा व्रजे गोप्यो यज्ञपत्न्यस्तथाऽपरे ॥ ६ ॥
ते नाधीतश्रुतिगणा नोपासितमहत्तमाः ॥ अव्रतातप्ततपसः सत्संगान्मामुपागताः ॥ ७ ॥ केवलेन हि
भावेन गोप्यो गावो नगा मृगाः ॥ येऽन्ये मूढधियो नागाः सिद्धा मामीयुरंजसा ॥ ८ ॥ यं न योगेन
सांख्येन दानव्रततपोऽध्वरैः ॥ व्याख्यास्वाध्यायसंन्यासैः प्राप्नुयाद्यत्नवानपि ॥ ९ ॥ रामेण सार्धं मथुरां
प्रणीते श्वाफल्किना मय्यनुरक्तचित्ताः ॥ विगाढभावेन न मे वियोगतीव्राधयोऽन्यं ददृशुः सुखाय ॥१०॥

(सर्प किंवा गज,) ये अन्ये मूढधियः, [ते च] सिद्धाः [सन्तः] केवलेन भावेन, अंजसा मा ईयुः (प्राप्त झाले.) ॥ ८ ॥ यत्नवान् अपि यं योगेन, सांख्येन, दानव्रततपोध्वरैः, व्याख्यास्वाध्यायसंन्यासैः [च] न प्राप्नुयात्. ॥९॥ श्वाफल्किना (अक्रूराने) मयि रामेण सार्धं मथुरां प्रणीते (नेलेला) [सति] (असता), विगाढभावेन (दृढ प्रेमानें) अनुरक्त-

द्रादिक), नाग (कालियादिक), आणि इतरही अत्यन्त मूढबुद्धि जीव कृतार्थ होऊन सुखानें मला प्राप्त झाले. ॥ ८ ॥ बा उद्धवा! माझी प्राप्ति तर इतकी दुर्लभ आहे कीं, योग, सांख्य, दानें, व्रतें, तपें, यज्ञ, व्याख्यानें, वेदशास्त्राध्ययन आणि संन्यास, इत्यादि साधनांनी अत्यंत यत्न करणाराही मला प्राप्त होत नाहीं ॥ ९ ॥ - आतां गोपींचें प्रेम मजवर कसें होतें म्हणशील तर, - ज्यावेळीं अक्रूरानें गोकुळास येऊन बलरामासह मला मथुरेस नेलें त्यावेळीं, अत्यंत दृढ प्रेमानें मजवर ज्यांचीं मनें आसक्त झालीं होतीं त्या गोपींना माझ्या

१ मज वेगळें जें जें सुख । तें गोपिकांस केवळ दुःख । कैशी आवडी अलौकिक । मज हृदयीं देख न विसबती ॥ नाथ, ३७.

वियोगामुळें दुःसह मनस्ताप होऊन त्यांना ज्यांत सुखकारक असें दुसरें कांहीं दिसलें नाहीं. ॥ १० ॥ वा उद्धवा, गोपींना अत्यंत प्रिय असा मी वृंदावनांत दृष्टीसमोर असतांना ज्या रात्री क्षणार्धाप्रमाणें वाटल्या होत्या त्याच रात्री माझा वियोग झाल्यानंतर त्यांना केवळ कल्पासारख्या मानूं लागल्या ॥ ११ ॥ [illegible] कालिक समाधिच प्राप्त झाला वाटते, कारण त्या विरहिणी गोपी सहवासानें व प्रेमानें माझे ठिकाणीं भक्तचित्त झाल्यामुळें त्यांना स्वतःचा देह [illegible] भान राहिलें नाहीं. जसें मुनि समाधिकाळी नामरूपात्मक हें जग कांहीं जाणत नाहींत त्याच प्रमाणें, व नद्या [illegible]

चित्ताः वियोगतीव्राधयः [गोप्यः] मे अन्यं सुखाय न ददृशुः ॥ १० ॥ अंग, वृंदावनगोचरेण प्रेष्ठतमेन [illegible] नीताः, ताः पुनः मया हीनाः [सत्यः] तासां कल्पसमाः बभूवुः ॥ ११ ॥ यथा मुनयः समाधौ नामरूपे, [तथा] मयि अनुषंगबद्धधियः [illegible] स्मानं तथा अदः (परलोक) इदं (हा लोक) [च] न अविदन् (न जाणत्या झाल्या) [किंतु] अब्धितोये ([illegible]) नद्य इव [मयि] प्रविष्ट [illegible]

तास्ताः क्षपाः प्रेष्ठतमेन नीता मयैव वृंदावनगोचरेण ॥ क्षणार्धवत्ताः पुनरंग तासां हीना मया कल्पसमा बभूवुः ॥११॥
ता नाविदन्मय्यनुषंगबद्धधियः स्वमात्मानमदस्तथेदम् ॥ यथा समाधौ मुनयोऽब्धितोये नद्यः प्रविष्टा इव नामरूपे
॥ १२ ॥ मत्कामा रमणं जारमस्वरूपविदोऽबलाः ॥ ब्रह्म मां परमं प्रापुः संगाच्छतसहस्रशः ॥१३॥ तस्मात्त्वमुद्धवो-
त्सृज्य चोदनां प्रतिचोदनाम् ॥ प्रवृत्तं च निवृत्तं च श्रोतव्यं श्रुतमेव च ॥ १४ ॥ मामेकमेव शरणमात्मानं सर्वदे-
हिनाम् ॥ याहि सर्वात्मभावेन मया स्या ह्यकुतोभयः ॥ १५ ॥

मत्कामाः अस्वरूपविदः (माझें स्वरूप न जाणणाऱ्या) शतसहस्रशः अबलाः संगात् रमणं जारं परमं ब्रह्म मां प्रापुः ॥ १३ ॥ तस्मात् उद्धव त्वं चोदना ([illegible]), प्रतिचोदना (स्मृति), प्रवृत्तं, निवृत्तं, श्रोतव्यं, श्रुतं एव उत्सृज्य ॥ १४ ॥ सर्वात्मभावेन ([illegible]) सर्वदेहिनां आत्मानं एकं मां शरणं याहि, [illegible]

गोपिकांची स्थिति झाली होती. ॥ १२ ॥ या प्रमाणें त्या शेकडों सहस्रश अबला केवळ माझ्यावर अनुरक्त होत्या, परंतु माझें स्वरूप [illegible] सुंदर, जार, अशा बुद्धीनेंही परब्रह्मस्वरूपी अशा मलाच प्राप्त झाल्या आहेत ॥ १३ ॥ हे उद्धवा, ज्याअर्थी माझ्या प्रेमस्वरूप [illegible] आहे त्या [illegible] स्मृति, विधि, निषेध, प्रवृत्ति, निवृत्ति, श्रोतव्य (ऐकावयाचें तें), श्रुत (ऐकलेलें), हें सर्व सोडून ॥ १४ ॥ सर्व जीवांचा आत्मा जो मी त्या मलाच एक सर्वात्मबुद्धीनें शरण ये,

आणि माझ्याच प्राप्तीने सर्वत्र निर्भय हो. ॥ १९ ॥ उद्धव ह्मणाला :- हे योगेश्वरांच्या ईश्वरा ! आपलीं भाषणें ऐकून माझ्या मनातील संशय निवृत्त होत नाही - पूर्वी तर आपण सांगितलें होतें कीं (' मयोदितेष्ववहित. ' ०) मीं सांगितलेल्या स्वधर्माचे ठिकाणीं तत्पर असावें आणि आता, सर्वधर्मादिकाचा परित्याग करून एक मलाच शरण ये असें सांगता यावरून, आत्म्याचे ठिकाणीं कर्तृत्व आहे कीं नाहीं, तसेंच कर्म करावें किंवा टाकावें - याविषयीं शंका येऊन माझें मन भ्रमात पडतें, - त्याकरिता हा संशय निवृत्त होईल असें सांगावें. - ॥ १६ ॥ श्रीकृष्ण ह्मणाले – (ईश्वर हा आपल्या मायाशक्तीच्या योगानें प्रपंचरूपी ह्म० जीवजगद्रूपानें भासतो त्या जगताच्या अध्यासामुळे जीवाना अनादि अज्ञानाचे योगानें कर्तृत्वादि प्राप्त होतें व त्यानंतर विधिनिषेधाचा अधिकार प्राप्त होतो. त्यावेळीं अंतःकरणशुद्धीकरिता कर्मे कर ह्मणून सांगितलें. चित्तशुद्धि झाल्यावर कर्मापासून येणारी जडता नाहींशी होण्याकरिता, भक्तियोगास प्रतिबंधक अशा कर्माविषयीं आदर सोडून दृढविश्वासानें मला भज ह्मणून सांगितलें, ज्ञान प्राप्त झाल्यावर मग काहींएक कर्तव्य (निर्भय) स्या. (हो). ॥ १५ ॥ उद्धवः उवाच—योगेश्वरेश्वर, तव वाचं शृण्वतः मे आत्मस्थ संशयः न निवर्तते, येन मनः भ्राम्यति ॥ १६ ॥ श्रीभगवान् उवाच— विवरप्रसूति. (षट्चक्रात प्रकाशित होणारा) स. एष. जीव (ईश्वर) प्राणेन घोषेण गुहां प्रविष्टः [सन्] मनोमय सूक्ष्म रूप उपेत्य (प्राप्त होऊन) " मात्रा, स्वर' वर्ण. '

उद्धव उवाच । संशयः शृण्वतो वाचं तव योगेश्वरेश्वर ॥ न निवर्तत आत्मस्थो येन भ्राम्यति मे मनः ॥१६॥

श्रीभगवानुवाच । स एष जीवो विवरप्रसूतिः प्राणेन घोषेण गुहां प्रविष्टः ॥ मनोमयं सूक्ष्ममुपेत्य रूपं मात्रा स्वरो वर्ण इति स्थविष्ठः ॥ १७॥ यथाऽनलः खेऽनिलबंधुरूष्मा बलेन दारुण्यधिमथ्यमानः ॥ अणुः प्रजातो हविषा समिध्यते तथैव मे व्यक्तिरियं हि वाणी ॥ १८ ॥

इति स्थविष्ठः (अतिस्थूल) [भवति]. ॥ १७ ॥ यथा अनिलबंधुः अनलः खे ऊष्मा, बलेन दारुणि—(काष्ठाचे ठायीं) अधिमथ्यमान. [सन्] अणुः, [पुन] प्रजात [सन्] राहत नाही, अशा प्रकारें आठ श्लोकानी श्रीकृष्ण उत्तर देणार आहेत त्यात वाण्यादिक इंद्रियांच्या द्वारे जीवास जन्ममरणास कारणभूत अशी ईश्वरापासून प्रपंचरचना कशी झाली तें सांगतात) सर्वांस जीवन देणारा आणि सर्वांहमानी असल्यामुळें सर्वांस प्रत्यक्ष असा परमेश्वर आधारादि सप्त चक्राचेठायीं अभिव्यक्त झाल्यासारखा होऊन ज्यास परावाणी असे नांव आहे त्या नादयुक्त प्राणासह आधारचक्रात प्रविष्ट होऊन मणिपूरचक्राचे ठिकाणीं पश्यन्तीनामक सूक्ष्म मनोमय रूपास आणि विशुद्धि चक्राचेठिकाणीं मध्यमाऽऽख्य-सूक्ष्म रूपास प्राप्त होऊन मग मुखाचे ठिकाणीं, मात्रा, स्वर, अक्षर इत्यादि रूपाने स्थूल वैखरीरूप होऊन मग अतिस्थूल वेदशाखादिरूप असा होतो ॥ १७ ॥ - परमेश्वर अव्यक्त असून सूक्ष्ममध्यमक्रमानें व्यक्त कसा होतो याविषयी दृष्टांत - ज्याप्रमाणें अग्नि हा आकाशात ऊष्मरूपाने अव्यक्तस्थितीत असून काष्ठाचेठिकाणीं मथन

केलें असता वायूचे साह्यानें अणु म्हणजे सूक्ष्म विस्फुलिंग(ठिणगी)रूप होतो. तोच पुढें पुष्ट होऊन होमद्रव्याचे योगानें अत्यंत वृद्धिंगत होतो तशीच ही वाणी माझी (ईश्वराची) अभिव्यक्ति होय. ॥ १८ ॥ याच प्रमाणें भाषण, घेणें, देणें, चालणें, मलत्याग, रति करणें, हुंगणें, रस चाखणें, पाहणें, स्पर्श करणे, ऐकणें, संकल्प, निश्चय, अभिमान, प्राणक्रिया, आणि सत्व, रज व तम यांपासून झालेला अधिदैविक, अध्यात्मिक व अधिभौतिक असा त्रिविध प्रपंच ही सर्व माझी (ईश्वराची) व्यक्ति (प्रकटता) आहे ॥ १९ ॥ - प्रपंच हा ज्या अर्थी ईश्वराची अभिव्यक्ति आहे त्या अर्थी प्रपंच हा ईश्वराहून भिन्न नाहीं - हा ईश्वर जगदुत्पत्तीपूर्वी अव्यक्त असा एकच होता परंतु पुढे हविषा (होमद्रव्यानें) समिध्यते (वृद्धिंगत किंवा प्रज्वलित होतो), तथा एव इयं वाणी मे व्यक्तिः (प्रकटता) ॥ १८ ॥ (मूळाप्रमाणें) च [मे व्यक्ति] ॥ १९ ॥ यद्वत् बीजानि योनिं (क्षेत्रास, शेतास) प्राप्य, [तद्वत्] अव्यक्तः एकः त्रिवृत् अब्जयोनिः (ब्रह्मांडाचा उत्पादक ईश्वर) आद्यः सः अयं जीवः वयसा (काळानें) विश्लिष्टशक्तिः (विभक्त आहेत

एवं गदिः कर्म गतिर्विसर्गो घ्राणो रसो दृक् स्पर्शः श्रुतिश्च ॥ संकल्पविज्ञानमथाभिमानः सूत्रं रजःसत्त्वतमोविकारः ॥ १९ ॥

अयं हि जीवस्त्रिवृदब्जयोनिरव्यक्त एको वयसा स आद्यः ॥ विश्लिष्टशक्तिर्बहुधेव भाति बीजानि योनिं प्रतिपद्य यद्वत् ॥२०॥

यस्मिन्निदं प्रोतमशेषमोतं पटो यथा तंतुवितानसंस्थः ॥ य एष संसारतरुः पुराणः कर्मात्मकः पुष्पफले प्रसूते ॥ २१ ॥

शक्ति ज्याच्या असा) [सन्] बहुधा इव भाति. ॥ २० ॥ यथा पटः तंतुवितानसंस्थः, [तथा] यस्मिन् अशेषं इदं ओतं, प्रोतं च, यः एषः पुराणः कर्मात्मकः संसारतरुः, काळाच्या योगानें वागादिक इंद्रियरूप शक्ति प्रगट झाल्यानंतर तो बहुरूप झाल्यासारखा भासतो. तोच सर्वांस कारणभूत असून तिन्ही गुणास आश्रयभूत आहे व त्यापासून हें ब्रह्मांडरूपी कमळ उत्पन्न झालें म्हणून तो ईश्वर जगत्कारण आहे. - एकच ईश्वर बहुरूप कसा झाला याविषयीं दृष्टांत - बीजें हीं शेतात पेरलीं असता तीं एकरूप असून नळादिसवनानें अनेकरूप होतात; तद्वत् ईश्वर एक असून मायाशक्तीनें अनेकरूप झाला. ॥ २० ॥ - हें सर्व जग मायाविरचित असल्यामुळें ईश्वराश्रितच आहे * ईश्वराहून भिन्न

---

* प्रपंच हा ईश्वराहून भिन्न नाहीं यासंबंधी नाथ लिहितात —

काष्ठाचा घोडा केला । अंगें ठायें अवि भिन्नला । तो काष्ठपणा नाहीं मुकला । सर्वांगीं शोभला काष्ठत्वें ॥ त्याचे पाहतां वेगळाले अवयव । मूर खादे काष्ठचि सर्व । तेवीं महाभूतें गुणप्रसव । स्वरूप सावेव शिवाचें ॥ सुवर्णाचें झालें लेणें । तें जेविं मिरवे सोनेपणें । तेविं महाभूतें विषय करणें । अभिन्नपणें शिवरूप ॥ फडा पुच्छ वाढला चाग । येथें आकारें म्हणती नाग । तो नाग नव्हे सोनेंचि चाग । तेवीं हें जग मद्रूप । प्रपंच ईश्वरासि अभिन्न । येचि अर्थी श्रीनारायण । उद्धवासी सांगे आपण । अभिन्नपण जीवशिवां ॥ एकनाथ, ॥ ७७ ॥ ८९ ॥

कांहीं नाहीं झाला दृष्टांत :- तंतुसमूहावर जसें वस्त्र त्याप्रमाणें ईश्वरस्वरूपाचे ठिकाणी हें समष्टिव्यष्ट्यात्मक जगत् ओतप्रोत आहे. - हें आत्मस्वरूपाचे ठायीं अज्ञानानें आरोपित असलेलें वृक्षतुल्य जग जीवास कर्तृत्वादिसंसारास कारणभूत आहे यासाठी परमात्मस्वरूपाचें विवेचन करून ज्ञान झाल्यानतर कर्मादिक सर्व टाकून द्यावे अशा अभिप्रायानें मी सर्वत्यागाविषयीं तुला सांगितलें :- हे उद्धवा! हा पुरातन म्हणजे अनादि, व कर्मात्मक - प्रवृत्तिस्वभाव - असा संसारवृक्ष पुष्प (विषयभोग) आणि फल (मोक्ष) प्रसवतो. ॥ २१ ॥ - हा प्रपंच वृक्षरूप कसा याविषयीं सांगतों :- वृक्षाप्रमाणें या प्रपंचास (जगास) पुण्य आणि पाप हीं दोन बीजें आहेत, असंख्य ज्या वासना त्या या संसारवृक्षाच्या मुळ्या आहेत. सत्व, रज, व तम हे तीन गुण याचे प्रकांड (पेरें, पेरीं) आहेत. पंचभूतें हीं याचे स्कंध (मोठ्या शाखा) आहेत, शब्दस्पर्शादि

[सः] पुष्पफले प्रसूते. ॥ २१ ॥ अस्य द्वे बीजे. शतमूलः त्रिनाल. पंचस्कंधः पंचरसप्रसूतिः दशैकशाखः द्विसुपर्णनीडः (दोन पक्ष्याचें घरटे ज्यावर आहे असा) त्रिवल्कलः

द्वे अस्य बीजे शतमूलस्त्रिनालः पंचस्कंधः पंचरसप्रसूतिः ॥ दशैकशाखो द्विसुपर्णनीडस्त्रिवल्कलो

द्विफलो ऽर्कं प्रविष्टः ॥ २२ ॥ अदंति चैकं फलमस्य गृध्रा ग्रामेचरा एकमरण्यवासाः ॥ हंसा य

एकं बहुरूपमिज्यैर्मायामयं वेद स वेद वेदम् ॥ २३ ॥

द्विफलः [एषः] अर्कं प्रविष्टः. ॥ २२ ॥ ग्रामेचराः गृध्राः (गिधाड, व लोभी) अस्य एकं फलं, अरण्यवासाः हंसाः च एकं अदंति. यः एकं मायामयं बहुरूपं इज्यैः (गुरूच्या साह्यानें) वेद, सः वेदं वेद (जाणतो) ॥ २३ ॥

पांच विषय हे पांच प्रकाराचे रस या वृक्षापासून उत्पन्न होतात; दहा इंद्रियें, व मन ह्या अकरा या जगद्वृक्षाच्या लहान लहान शाखा आहेत. तसेंच दोन पक्ष्याचें (जीवेश्वराचे) घरटें यावर आहे वात, पित्त व कफ ह्या तीन ह्यास त्वचा (साली) आहेत. आणि सुख व दुःख हीं दोन ह्या संसारतरूचीं फळें आहेत असा हा संसारवृक्ष सूर्यमंडलापर्यंत व्यापलेला आहे. ॥ २२ ॥ ह्या वृक्षाचीं जी दोन फळे सांगितली त्यापैकी एक फळ (दुःख) गृध्र (एक पक्षी व कामी) ह्मणजे कामी असे गृहस्थ भोगितात; आणि दुसरें फल अरण्यांत राहणारे हंस (पक्षी व परमहंस) संन्यासी भक्षण करितात; असो, अशा प्रकारें एकच परमात्मा मायाशक्तीच्या योगानें बहुरूप झाला आहे असें जो गुरूच्या उपदेशानें जाणतो तो सर्व वेदाचा तात्त्विक (सत्य) अर्थ जाणतो. ॥ २३ ॥

हे उद्धवा, अशा प्रकारें * सद्गुरूची सेवा करून माझ्या एकान्त भक्तीनें तीक्ष्ण केलेला जो ज्ञानरूपी कुठार त्याच्या योगानें जीवाच्या त्रिगुणात्मक लिंगशरीराचा उपाधि
एवं [त्वं] धीरः अप्रमत्तः (सावधान) [सन्] गुरूपासनया एव [जातया] भक्त्या शितेन (तीक्ष्ण) विद्याकुठारेण जीवाशयं (लिंगशरीर) विवृश्च्य आत्मानं सपद्य

एवं गुरूपासनयैकभक्त्या विद्याकुठारेण शितेन धीरः ॥ विवृश्च्य जीवाशयमप्रमत्तः
संपद्य चाऽऽत्मानमथ त्यजास्त्रम् ॥ २४ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे
भगवदुद्धवसंवादे द्वादशो ऽध्यायः ॥ १२ ॥


(प्राप्त होऊन) अथ अस्त्रं (विद्याकुठार) त्यज. ॥ २४ ॥ ॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे द्वादशो ऽध्यायः ॥ १२ ॥
सावधानपणें छेदून आणि परमात्मस्वरूपास प्राप्त होऊन नंतर अस्त्राचा म्हणजे ज्ञानसाधनाचा त्याग कर. ॥ २४ ॥

॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने एकादशस्कंधे द्वादशो ऽध्यायः ॥ १२ ॥

---

* सद्गुरुसेवेवांचून ज्ञानप्राप्ति व मुक्ति होत नाहीं आणि गुरुशुश्रूषेनें तो अवश्य होते अशाविषयीं नाथमहाराज लिहितात :—

न करितां गुरुभजन । नव्हे भववृक्षाचें छेदन । जरी कोटि कोटि साधन । आने ज्ञान केलिया ॥ भववृक्षातें छेदिती । केवळ जाण गुरुभक्ति । शरीरनिंदळगी निश्चिति । जैसी निजशक्ती सुरांची ॥ कुरी करावया दुरित । जेवि गंगाजळ समर्थ । तेवीं भवभया भस्म करित । जाण निश्चित गुरुभक्ति ॥ ६९ । ७० ॥ एकनाथ



- ' विद्यारूप कुऱ्हाडीच्या योगें लिंगशरीर तोडून टाकून मग साधन सोडून दे ' असें सांगितलें त्यावर असा शंका माहिल्याने उद्धवेत्र की तम इत्यादि तीन गुणांच्या वृत्ति प्रतिबंध करीत असता ज्ञान उत्पन्न होईल कसें[2] ' ह्मणून त्या गुणाची निवृत्ति व ज्ञानोत्पत्तीचा प्रकार सांगण्यासाठीं - श्रीभगवान् ह्मणाले – उद्धवा सत्त्व, रज व तम हे गुण प्रकृतीचे होत, आत्म्याचे नव्हत (हे आनंदादिकांप्रमाणें जर आत्मधर्म असते तर आत्मस्वरूप टरले असते व मग ह्यांची निवृत्ति झाली नसती आणि ज्ञानही उद्भवलें नसतें, पण तसा प्रकार नाहीं). ह्मणून सत्त्व गुण वाढवून त्याच्या योगें दुसऱ्या दोघांचा (रजस्तमाचा) नाश करावा आणि - सत्त्व इत्यादि वृत्तिरूप - सत्वगुणाचा - उपशम करावा -

श्रीभगवान् उवाच— सत्त्वं, रजः, तमः इति गुणाः बुद्धेः, आत्मनः न. सत्त्वेन अन्यतमौ, सत्त्वेन सत्त्वं च हन्यात् ॥ १ ॥ वृद्धात् सत्त्वात् पुंसः मद्भक्तिलक्षणः धर्मः

श्रीभगवानुवाच । सत्त्वं रजस्तम इति गुणा बुद्धेर्न चाऽऽत्मनः ॥ सत्त्वेनान्यतमौ हन्यात्सत्त्वं सत्त्वेन चैव हि ॥१॥ सत्त्वाद्धर्मो भवेद्वृद्धात्पुंसो मद्भक्तिलक्षणः ॥ सात्त्विकोपासया सत्त्वं ततो धर्मः प्रवर्तते ॥२॥ धर्मो रजस्तमो हन्यात्सत्त्ववृद्धिरनुत्तमः ॥ आशु नश्यति तन्मूलो ह्यधर्म उभये हते ॥ ३ ॥ आगमोऽपः प्रजा देशः कालः कर्म च जन्म च ॥ ध्यानं मन्त्रोऽथ संस्कारो दशैते गुणहेतवः ॥ ४ ॥

भवेत्. सात्विकोपासया सत्वं ततः धर्मः प्रवर्तते. ॥ २ ॥ सत्त्ववृद्धिः (सत्त्व गुणाची वृद्धि कारण ज्याला असा) अनुत्तमः धर्मः रजः, तमः [च] हन्यात् उभये हते [सति], तन्मूलः अधर्मः आशु नश्यति. ॥ ३ ॥ (मूळाप्रमाणें) ॥ ४ ॥

सत्त्वगुणाच्या योगेंच निरास करावा. ॥ १ ॥ - तिन्ही गुणांच्या वृत्ति परस्पराच्या नाशक आहेत मग सत्ववृत्तीनें इतर दोन्ही गुणवृत्तींचाच नियमानें नाश कसा करितां येईल? अशी शंका कोणी घेईल तर तिचें उत्तर सांगतों - सात्विक * पदार्थांच्या सेवनानें सत्त्वगुण वृद्धि पावतो व त्यापासून धर्माची उत्पत्ति होते पुरुषाचा सत्त्व गुण वाढला असता त्यापासून माझ्या भक्तीकडे पर्यवसान पावणारा (किंवा माझी भक्ति हा) धर्म उत्पन्न होतो ॥ २ ॥ सत्त्वगुणाची वृद्धि ज्यामध्ये कारण असा तो सर्वोत्तम धर्म रजोगुणाचा आणि तमोगुणाचा नाश करितो. त्या दोघांचा (रजस्तमोगुणाचा) नाश झाला असता तत्काळ तन्मूलक अधर्म नाश पावतो ॥ ३ ॥ (सात्विक पदार्थांच्या सेवनानें सत्त्वगु

---

१ वाढलेला सत्त्वगुणही नाहींसा केला पाहिजे, नाहीं तर तोच बाधक होऊन बसेल उदाहरण पहा —ज्याला सर्प चावला असेल त्यानें त्यागेलीं विष झाले असता तें उतारा ह्मणून हितकर होतें पण भलत्याच दिवशीं जर कोणी विष खाईल तर तो मरेल. नाथ, १८ * ये श्लोकीचें निरूपण । पहिलें उत्तरार्धें व्याख्यान । नाथ, ५०

२ रजोगुणापासून प्रीति, द्वेष इत्यादि विकार उद्भवून मनुष्याच्या हाते अधर्म घडवितात, व तमोगुणामुळें प्रमाद, आळस इत्यादि विकार उत्पन्न होऊन अधर्म वाढवितात, रजोगुण व तमोगुण नष्ट झाले कीं अर्थातच त्याचे कार्यभूत अधर्म घडण्याचे थांबतात.

णाची वृद्धि होते असें सांगितलें. ते सत्त्वृद्धीचे कारणभूत पदार्थ दाखवून देण्यामाठीं प्रथम सामान्यत तीन्ही गुणाची वृद्धि होण्याची कारणें सांगून देतात —) शास्त्र, उदक, प्रजा देश, काळ, कर्म, जन्म, ध्यान, मंत्र व संस्कार हे दहा पदार्थ गुणोत्पत्तींचीं कारणें होत. ॥ ४ ॥ ह्यापैकीं ज्या ज्या पदार्थांची शास्त्रज्ञानी पुरुष प्रशंसा करितात, तो तो पदार्थ सात्त्विक होय, ते ज्याची ज्याची निंदा करितात, तो तो पदार्थ तामस समजावा; व त्यांनीं ज्याची उपेक्षा केली (प्रशंसा किंवा निंदा काहीच केली नाही) तो पदार्थ राजस

वृद्धाः एषां यत् यत् प्रचक्षते (वाखाणतात), तत् तत् एव सात्त्विकं; [यत्] निंदंति, तत् तामसं, [यत्] तदुपेक्षितं ([illegible]) तत् राजसं

तत्तत्सात्त्विकमेवैषां यद्यद्वृद्धाः प्रचक्षते ॥ निंदंति तामसं तत्तद्राजसं तदुपेक्षितम् ॥ ५ ॥
सात्त्विकान्येव सेवेत पुमान्सत्त्वविवृद्धये ॥ ततो धर्मस्ततो ज्ञानं यावत्स्मृतिरपोहनम् ॥६॥

॥ ५ ॥ पुमान् सत्वाविवृद्धये सात्विकानि एव सेवेत. ततः धर्मः, ततः यावत् स्मृतिः (आत्मसाक्षात्कार), अपोहनं ([illegible]) [च, तावत्] ज्ञानं [भवति]. ॥ ६ ॥

समजावा. ॥ ५ ॥ पुरुषानें सत्त्वगुणाच्या वृद्धीसाठीं सात्त्विक पदार्थांचेंच सेवन करावें त्यापासून धर्म घडतो व त्यापासून पुढें ज्ञान प्राप्त होतें - ह्यावर कोणी शंका घेईल कीं महावाक्याचा उपदेश मिळेल तेव्हाच ज्ञान उत्पन्न होतें; तेव्हा सत्त्ववृद्धीचा किंवा धर्माचा येथें उपयोग काय? तर तिचेंही उत्तर सांगतात - आत्मसाक्षात्कार व स्थूल सूक्ष्म देहाचा आणि त्याला कारणभूत अशा गुणांचा निरास होईल इतकें हें ज्ञान असतें (नुसत्या महावाक्योपदेशाची एवढी शक्ति नसते) ॥ ६ ॥

---

१ ह्याचे त्रिविध भेद पुढें सहाव्या श्लोकाच्या टिपेंत पहा.

२ पदार्थ—	सात्त्विक	राजस	तामस	पदार्थ—	सात्त्विक	राजस	तामस
शास्त्रें—	निवृत्तिपर	प्रवृत्तिपर	पाखंड	कर्म—	नित्य निष्काम	सकाम	जारणमारण
उदकें—	तीर्थें	सुगंधी उदकें	मद्यादि प्रवाही पदार्थ	जन्म—	[illegible] दीक्षा	[illegible]	[illegible]
प्रजा म्ह० जन—	विरक्त	संसारी	दुराचारी	ध्यान—	[illegible]	[illegible]	[illegible]
देश—	एकांत	चवाठा रस्ता	द्यूतालय	मंत्र—	[illegible]	[illegible]	[illegible]
काल—	ब्राह्ममुहूर्त	प्रदोष	मध्यरात्र	संस्कार—	[illegible]	[illegible]	[illegible]

३ 'यावत्स्मृतिरपोहनम्' ह्याचें व्याख्यान बालप्रबोधिनीकारानें असें लिहिलें आहे — यावज्जीवं तद्विषयिका स्मृतिश्च भवति । देहाद्यहंममाभिमानस्यापोहनं निरासश्च भवति (जन्मभर सात्त्विकपदार्थांची स्मृति राहते व देहादिकांवरील अहंममाभिमानाचें निरसन होतें) ४ सत्त्वशुद्धीवाचून महावाक्योपदेश कांहीं उपयोगाचा नाही, पहा —

बांधलें उपजलें जे कुशी । स्तनपान करी अहर्निशीं । परी तें न देखे माउलीसी । दशा तैसी उपदेशा ॥ अजागळा लावितें जाण । मिथ्या मानी ह्मणती तें स्तन । त्या-परी सत्त्वशुद्धीविण । वृथा जाण उपदेश ॥ वाहते उदकीं लिहिलें लेख । तळीं अक्षर नुमटे एक । तेवी सत्त्वशुद्धीविण देख । निजज्ञान सुटक प्रकटेना ॥ नाथ, ६६।६८।६२

- ह्यावर कोणी शंका घेईल कीं ' देह गुणाच्या संबंधानें उद्भवलेला आहे, तो स्वनाच्या आश्रयभूत गुणाना आपणापासूनच उत्पन्न झालेल्या ज्ञानाचा योगें दूर करून स्वना उपराम पावतो ही गोष्ट घडावी कशी²' तर त्याविषयीं सांगतों : - वेळू परस्परावर घासले असता त्यापासून अग्नि उत्पन्न होतो व तो आपणापासून उद्भवणाऱ्या ज्वालांच्या योगें त्या वेळूंच्या वनाला जाळून मग आपोआप विझून जातो, तसाच गुणाच्या परस्परसंघर्षापासून जन्मलेला देहही त्या अग्नीसारखेंच काम (स्वताच्या जनकाचा ह्म० गुणाचा नाश) करून लय पावतो. ॥ ७ ॥ उद्धव ह्मणाला '— श्रीकृष्णा, विषय दु:खाचे वसतिस्थान होत. ही गोष्ट मनुष्याना कळत असते, तथापि ते कुत्रे, गर्दभ व बोकड ह्या पशूंसारखे निर्लज्जपणें

[यथा] वेणुसंघर्षजः (वेळूच्या घर्षणापासून उद्भवलेला) वन्हिः (अग्नि) तद्वनं दग्ध्वा (जाळून) शाम्यति, एवं तत्क्रिय (त्या अग्नीसारखी क्रिया ज्याची असा) गुणव्यत्ययज (गुण-परिणामापासून जन्मलेला) देह. शाम्यति. ॥ ७ ॥ उद्धवः उवाच— कृष्ण, मर्त्याः प्रायेण विषयान् आपदा (दु:खाचें) पद (स्थान) विदति, तथा अपि श्वखराजवत् (कुत्रा, गर्दभ

वेणुसंघर्षजो वह्निर्दग्ध्वा शाम्यति तद्वनम् ॥ एवं गुणव्यत्ययजो देहः शाम्यति तत्क्रिय. ॥ ७ ॥
उद्धव उवाच । विदंति मर्त्याः प्रायेण विषयान्पदमापदाम् ॥ तथाऽपि भुंजते कृष्ण तत्कथं
श्वखराजवत् ॥ ८ ॥ श्रीभगवानुवाच । अहमित्यन्यथाबुद्धिः प्रमत्तस्य यथा हृदि ॥ उत्सर्पति
रजो घोरं ततो वैकारिकं मनः ॥ ९ ॥

व बोकड यासारखें) तत् कथं भुंजते ? ॥८॥ श्रीभगवान् उवाच—प्रमत्तस्य हृदि 'अहं' इति अन्यथाबुद्धि यथा (पूर्णपणें) उत्सर्पति (उसळत असते) ततः वैकारिकं (सात्विक) मन

विषय भोगीत राहतात, हें घडतें तरी कसें (इंद्रियें स्वाधीन राखून सात्विक पदार्थांचें सेवन चालविले असता उत्तम पुरुषार्थ प्राप्त होतो असें असता व राजसादि विषय दु:खमय आहेत हें कळत असूनही लोक विषय सेवन करण्यांत गुंततात कसे)¹ ॥ ८ ॥ श्रीभगवान् ह्मणाले – उद्धवा, ज्या मनुष्याने तत्त्वविचार केला नाही, त्याच्या हृदयात - देहादिकाविषयी - ' अहं (मी) ' अशी मिथ्याबुद्धि पूर्णपणें उसळत असते व त्या अहंबुद्धीमुळें, मन सत्त्वप्रधान असलें तरी त्याला, घोर (दु:खरूप) रजोगुण व्यापून

---

१ हे मोडी तूं आपणी कुढी । की पक्षी आपुले पांख मोडी । नारळ नारळीतें तोडी । स्वमासाची गोडी व्याघ्र चाखे ॥ नाथ, ८७.

२ शुनी सक्रोधें धसवसी । ते गोड लागे श्वानासी । जीवित बांधिलें तिच्या पुच्छीं । तीमागमागेसीं हिंडतु ॥ अंगीं अंगा होतां भेटी । पक्रोध शुनी लागे पाठी । तरी न सोडी पुसाटी । कुकाल उठी कामासी ॥ ... .. ॥ खरी पळे पुढें पुढे । खरू धावे वाडेकोडे । लाता हाणोनि फोडी जाभाडे । तरी पुढे पुढे घसों लागे ॥ . . ॥ ना तरी बोकडाची गति जैसी । तैसी दशा दिसे पुरुषासी । मारूं आणिल्या पशुहंसीपासी । तरी शेळयासी सेविता ॥ नाथ, २०७ । ८ । १३ । १५.

मोडितो. ॥ ९ ॥ मन रजोगुणयुक्त आलें की त्यामध्यें ' ह्याचा अमुक रीतीनें उपभोग घ्यावा ' किंवा ' हें अशा रीतीनें भोगावें ' अशा विकल्पासहित संकल्प [illegible]
- ' किती तरी सुंदर रूप हें ', ' किती मनोहर भाव हा ' - अशा प्रकारें, त्या त्या गुणाचें ध्यान करितां करितां त्या दुर्बुद्धि [illegible]
मग इंद्रियें जिंकिलीं नसल्यामुळें कामवासनेच्या अधीन झालेला तो पुरुष उपभोगसामर्थ्य, [illegible]
कारण, रजोगुणाच्या वेगानें त्याला अगदीं वेडा करून सोडिलें असतें. ॥ ११ ॥ - तू [illegible]
(त्याला) [प्राति] घोरं (दुःखरूप) रजः [उत्सर्पति] (व्यापितें). ॥ ९ ॥ रजोयुक्तस्य मनसः सविकल्पकः [illegible]
तत. गुणध्यानात् दुर्मतेः दुःसहः कामः स्यात्. ॥ १० ॥ अविजितेन्द्रियः कामवशगः कर्माणि दुःखोदर्काणि ([illegible]) सपश्यन् [अपि] [illegible]
मोहितः [सन्] करोति. ॥ ११ ॥ यत् अपि रजस्तमोभ्यां विक्षिप्तधीः ([illegible]) [तथा अपि] [illegible]

रजोयुक्तस्य मनसः संकल्पः सविकल्पकः ॥ ततः कामो गुणध्यानाद्दुःसहः स्याद्धि दुर्मतेः ॥ १० ॥ करोति
कामवशगः कर्माण्यविजितेंद्रियः ॥ दुःखोदर्काणि संपश्यन्रजोवेगविमोहितः ॥ ११ ॥ रजस्तमोभ्यां यदपि
विद्वान्विक्षिप्तधीः पुनः ॥ अतंद्रितो मनो युंजन्दोषदृष्टिर्न सज्जते ॥ १२ ॥ अप्रमत्तो ऽनुयुंजीत मनो
मय्यर्पयन् शनैः ॥ अनिर्विण्णो यथाकालं जितश्वासो जितासनः ॥ १३ ॥ एतावान्योग आदिष्टो मच्छिष्यैः
सनकादिभिः ॥ सर्वतो मन आकृष्य मय्यद्धाऽऽवेश्यते यथा ॥ १४ ॥

पुनः मनः युंजन् [सन्] न सज्जते. ॥ १२ ॥ अप्रमत्तः अनिर्विण्णः ([illegible]) जितश्वासः जितासनः यथाकालं ([illegible]) [illegible]
[सन्] अनुयुंजीत. ॥ १३ ॥ मनः सर्वतः आकृष्य ([illegible]) अद्धा ([illegible]) मयि यथा ([illegible]) आवेश्यते ([illegible]), एतावान् योगः [illegible]
मात्र नव्हे - रज आणि तम ह्या गुणांनी यद्यपि बुद्धीचा मोह पावला तरी, विवेकी पुरुष [illegible]
रून धरितो आणि त्यावर सक्त होत नाहीं. ॥ १२ ॥ - आता एकाग्र [illegible]
त्याचा निरोध करण्याचा मुख्य उपाय मी सांगून देतों. - मनुष्यानें प्रमत्त न राहतां - व [illegible]
करून प्रतिदिनीं तीन वेळां मन नजकडे लावून स्थिर करीत जावें. ॥ १३ ॥ - [illegible]

असंभवनीय वाटेल. पण तें तसें नाहीं : पहा : - माझे शिष्य जे सनकादिक त्यांनीं, मन सर्व विषयावरून सोडवून प्रत्यक्ष माझ्या ठिकाणीं कृपेनें स्थिर करणें, एवढाच योग (चित्त जिंकण्याचा उपाय) सांगून ठेविला आहे. ॥ १४ ॥ - ह्यावर उद्धवाला शंका आली कीं, सनकादि मुनि फार पुरातन असल्यामुळें त्यांना श्रीकृष्णानें ह्या अवतारात उपदेश केला असेल हे तर संभवतच नाहीं, तेव्हां तें रूप (तो अवतार) तरी कोणतें असावें. ह्या शंकेच्या निवारणार्थ - उद्धवानें प्रश्न केला — केशवा, तूं सनकादि मुनींना कोणत्या काळीं व कोणत्या रूपानें योगाचा उपदेश केला, तो काळ व तें रूप मनजावें अशी माझी इच्छा आहे ॥ १५ ॥ श्रीभगवान् ह्मणाले — उद्धवा आदिष्टः. ॥ १४ ॥ उद्धवः उवाच— केशव, त्वं यदा येन रूपेण सनकादिभ्यः योगं आदिष्टवान्, [तं काल] एतत् रूपं [च] वेदितुं इच्छामि ॥ १५ ॥ श्रीभगवान् उवाच— हिरण्यगर्भस्य मानसाः सनकादयः पुत्राः पितरं सूक्ष्मां (कळण्यास कठिण) योगस्य ऐकांतिकीं (अगदीं शेवटली) गतिं पप्रच्छुः (विचारते झाले)— ॥ १६ ॥

उद्धव उवाच । यदा त्वं सनकादिभ्यो येन रूपेण केशव ॥ योगमादिष्टवानेतद्रूपमिच्छामि वेदितुम् ॥ १५ ॥

श्रीभगवानुवाच । पुत्रा हिरण्यगर्भस्य मानसाः सनकादयः ॥ पप्रच्छुः पितरं सूक्ष्मां योगस्यैकांतिकीं गतिम् ॥१६॥

सनकादय ऊचुः । गुणेष्वाविशते चेतो गुणाश्चेतसि च प्रभो ॥ कथमन्योऽन्यसंत्यागो मुमुक्षोरतितितीर्षोः ॥१७॥

श्रीभगवानुवाच । एवं पृष्टो महादेवः स्वयंभूर्भूतभावनः ॥ ध्यायमानः प्रश्नबीजं नाभ्यपद्यत कर्मधीः ॥ १८ ॥

सनकादयः ऊचुः— " प्रभो, चेतः (मन) गुणेषु (विषयांत) आविशते (प्रवेश करितें) गुणाः (विषय) च चेतसि (चित्तांत) [आविशन्ते] अतितितीर्षोः (विषयांच्या पार जाऊं इच्छिणाऱ्या) मुमुक्षोः अन्योन्यसंत्यागः (परस्परापासून सोडविणें) कथं [भवेत्] ? " ॥१७॥ श्रीभगवान् उवाच— एवं पृष्टः महादेवः भूतभावन (भूतांची उत्पत्ति करणारा, स्वयंभू) ब्रह्मदेवाचे मानस पुत्र जे सनकादिक, त्यांनीं आपल्या पित्याला, समजण्यास अति कठिण अशी योगाची निश्चित गति (पराकाष्ठा) कोणती, ह्याबद्दल प्रश्न केला ॥ १६ ॥ सनकादिक ह्मणाले :— प्रभो, चित्त - स्वाभाविक प्रेमादिकामुळें - विषयामध्यें प्रवेश करितें व ते विषय - वासनारूपानें - चित्तांत प्रविष्ट होतात मुमुक्षूला तर ते विषय उल्लंघून जावयाचें असतें. तेव्हा त्याचें त्या दोहोंना (चित्त व विषय यांना) परस्परापासून सोडवावें कसें ' ॥ १७ ॥ श्रीभगवान् (कृष्ण) ह्मणाले — उद्धवा, ब्रह्मा ह्मणजे सर्व देवांमध्यें मोठा स्वयंभू व सकल भूतांचा उत्पादक. पण, सनकादिकांनीं असा प्रश्न केला तेव्हा, पुष्कळ विचार केला तरी त्याला ह्या प्रश्नाचे बीज (सनकादिकांना कोणत्या गोष्टीचे

१ वासना ह्मणजे अशी.— फळ काळ दोन्ही नाहीं । तरी जैसें आंबे गोड पाहीं । ऐसे विषय चित्ताचे ठायीं । रिघाले कहीं न निघती ॥ पाणिली काता नाहेरा नाहें । चित्तीं रिघाली दुरी न राहे । यापरी विषयी पाहे । जडला ठायें चित्तेंसी ॥ नाथ, २७६ । ७७.

अज्ञान असल्यामुळें हा प्रश्न उद्भवला तें) कळेना. कारण, त्याची बुद्धि कर्मांत गुंतलेली (कर्मांनी व्यग्र करून सोडिलेली) होती ॥ १८ ॥ शेवटीं त्या देवानें, त्या प्रश्नातून पार पडण्यासाठीं (त्या प्रश्नाचें उत्तर कळण्यासाठीं), माझें चिंतन केलें. तेव्हा मी हंसरूपानें त्याच्या सन्निध गेलो. ॥ १९ ॥ मग पाहताच त्या मुनींनी जवळ येऊन चरणास वंदन केलें व ब्रह्मदेवाला पुढें करून (त्याच्या मुखें) मला ' आपण कोण? ' असा प्रश्न विचारिला. ॥ २० ॥ उद्धवा, तत्त्वज्ञान समजून घेणाऱ्या त्या मुनींनी मला असा प्रश्न केला; त्या वेळीं मी त्याना जें सांगितलें, तें वचन आता तू मजपासून नीट समजावून घे.— ॥ २१ ॥ - देहादिकाहून वेगळ्या आत्म्याचें ज्ञान झालें असता ताविषय पुरुषाला देहा-दिक विकार संभवतच नाहींत व मग आपोआपच विषयाचा आणि चित्ताचा वियोग होतो. हें सांगण्यासाठीं प्रथम मी प्रश्नाचें खंडन करणाऱ्या मिषानें त्याना आत्मानात्मविवेक

प्रश्नबीजं ध्यायमान. अपि न—अभ्यपद्यत (नाहीं जाणता झाला) [यतः] कर्मधी. (कर्मांमध्यें बुद्धि ज्याची असा) ॥ १८ ॥ स. देव प्रश्नपारतितीर्षया मा अचिन्तयत् तदा अहं हंसरूपेण तस्य सकाशं (समीप) अगमं. ॥ १९ ॥ ते मां दृष्ट्वा उपव्रज्य (जवळ येऊन) पादाभिवंदनं कृत्वा ब्रह्माणं अग्रत कृत्वा ' भवान् क ? ' इति पप्रच्छु. ॥ २० ॥

स मामचिंतयद्देवः प्रश्नपारतितीर्षया ॥ तस्याहं हंसरूपेण सकाशमगमं तदा ॥ १९ ॥ दृष्ट्वा मा त उपव्रज्य कृत्वा पादाभिव-
दनम् ॥ ब्रह्माणमग्रतः कृत्वा पप्रच्छुः को भवानिति ॥ २० ॥ इत्यहं मुनिभिः पृष्टस्तत्त्वजिज्ञासुभिस्तदा ॥ यदवोचमहं तेभ्यस्तदु-
द्धव निबोध मे ॥ २१ ॥ वस्तुनो यद्यनानात्वमात्मनः प्रश्न ईदृशः ॥ कथं घटेत वो विप्रा वक्तुर्वा मे क आश्रयः ॥ २२ ॥

उद्धव, तत्त्वजिज्ञासुभिः मुनिभिः इति पृष्टः अहं तेभ्य. यत् अवोचं, तत् मे निबोध— ॥ २१ ॥ विप्रा , यदि वस्तुन (परमार्थतः वस्तूचें) अनानात्व (अभेद), [तर्हि] वः (तुमचा) [कृतः] आत्मनः ईदृशः प्रश्नः कथं घटेत (योग्य होईल) ? वक्तु (उत्तर देणाऱ्या) मे वा कः आश्रय (आधार) ॥ २२ ॥

सांगण्यास प्रारंभ केला :— मी म्हटलें :- अगोदर हा तुमचा प्रश्न आत्म्याबद्दल आहे किंवा त्याच्या उपाधिरूप भूतसमुदायाला उद्देशून आहे ? - जर आत्म्याला असेल तर ज्या अर्थी तो (आत्मा) परमार्थतः सत्य आहे व त्याच्या ठिकाणीं अनेकपणा (भेद) नाहीं त्या अर्थी, ब्राह्मणहो, तुमचा असा प्रश्न योग्य होईल कसा ? (तुम्ही कोण ' हा प्रश्न योग्य होईल केव्हा ? अनेक आत्मे असतील तेव्हा त्याच्यापैकीं एका विशिष्ट आत्म्याबद्दल असें विचारणें रास्त ठरेल पण आत्मे अनेक नाहीत म्हणून हा तर्हा योग्य नाहीं.) बरें त्या प्रश्नाचें उत्तर देणारा जो मी, त्या मला तरी - उत्तर देण्याला - आश्रय काय ? आत्म्याच्या ठिकाणीं कोणतेही विशेष धर्म नाहींत तेव्हा मी त्यावर जाति, गुण इत्यादि कोणते विशेष मानून त्याच्या आश्रयानें उत्तर द्यावें) ? ॥ २२ ॥

१ चित्त व विषय हीं एकांत एक गुंतलेलीं वेगळीं करतां येत नाहींत. पण हंसरूपी भगवानांनीं हंसरूप धरिलें हंस मिश्रणांतून दूध व पाणी हीं वेगळीं करितो.

- तुह्मी ह्मणाल, आमचा प्रश्न मुळीं भूतसमुदायाला उद्देशून आहे. तरी पण, ब्राह्मणहो, - ज्याअर्थी देव, मनुष्य इत्यादिकांचे देह सगळे पांच भूतांची कार्यें ह्मणून समान योग्यतेचे असतात व पुन्हा परम कारणरूपानेंही ते अभिन्न आहेत त्याअर्थी तुमचा 'तुह्मी कोण' हा प्रश्न केवळ वाणीनें कांहींतरी शब्द उच्चारिला अशाच योग्यतेचा व निरर्थक ठरतो ॥ २३ ॥

- त्यापैकीं देह पंचभूतात्मक आहेत हें तर प्रत्यक्ष सिद्धच आहे. आता त्याचा परम कारणाशी अभेद कसा ते सांगतों' - मनानें, वाणीनें, दृष्टीनें व दुसऱ्याही इंद्रियांनी जें जें ग्रहण केलें जातें, तें तें मीच आहें, मजहून वेगळें नाहीं, असें तुह्मी तत्त्वविचारानें लक्षात घ्या (एवढ्यानें 'मी सर्वात्मक आहें' हें उत्तर आपोआप दिल्यामारखें होतें) ॥ २४ ॥

- उद्धवा, त्याच्या प्रश्नाचें खंडन करण्याच्या मिषानें प्रथम मीं आत्मस्वरूपाचें असें सामान्य निरूपण सांगितलें व पुढें, ब्रह्मदेवालाही ज्याचें समाधान करिता आलें नाही त्या

पंचात्मकेषु भूतेषु समानेषु [पुनः] वस्तुतः (परम कारणरूपानें) च [अभिन्नेषु सत्सु], 'भवान् कः' इति वः प्रश्नः वाचारंभः (केवळ वाणीचा उच्चार) अनर्थक ॥ २३ ॥ मनसा, वचसा दृष्ट्या, अन्यैः इंद्रियैः अपि [यत्] गृह्यते, [तत्] अहं एव. मत्तः अन्यत् न. इति अंजसा (तत्त्वविचारानें) बुध्यध्वं. ॥ २४ ॥ प्रजा. (मुलानो), चेत.

पंचात्मकेषु भूतेषु समानेषु च वस्तुतः ॥ को भवानिति वः प्रश्नो वाचारंभो ह्यनर्थकः ॥ २३ ॥

मनसा वचसा दृष्ट्या गृह्यते ऽन्यैरपींद्रियैः ॥ अहमेव न मत्तो ऽन्यदिति बुध्यध्वमंजसा ॥ २४ ॥

गुणेष्वाविशते चेतो गुणाश्चेतसि च प्रजाः ॥ जीवस्य देह उभयं गुणाश्चेतो मदात्मनः ॥ २५ ॥

गुणेषु आविशते. गुणाः च चेतसि [आविशते. सत्यं. तथा अपि] गुणाः, चेतः च [इति] उभयं मदात्मनः (ब्रह्मरूप) जीवस्य देहः (आरोपिलेला उपाधि) ॥ २५ ॥

प्रश्नाचें उत्तर देण्यास प्रारंभ केला ' मीं ह्मटलें - मुलानो (सनकादिकानो), चित्त विषयामध्यें प्रवेश करितें व विषय चित्तामध्यें शिरतात - असें जें तुह्मी ह्मटलें ते खरें आहे, पण - विषय आणि चित्त हीं दोन्ही मिळून जीवाचा उपाधिभूत देह आहेत, - हीं त्याचें खरें स्वरूप नव्हत, कारण, - तो वस्तुत मद्रूप (ब्रह्मरूप) आहे (ह्याचा आशय असा :— कर्तृत्व, भोक्तृत्व इत्यादिक रूपानीं विषयाच्या योगें गुरफाटलेलें चित्त — ज्याला बुद्धि, मन इत्यादि नावें आहेत तेंच — जर जीवाचें स्वरूप असतें तर चित्त व विषयांचा परस्पराशीं वियोग झाला नसता, पण जीवाचें खरें स्वरूप मी परब्रह्म आहें. चित्ताध्यासानें तें विषयाशीं संबद्ध झालें आहे. ह्मणून, स्वतः ब्रह्मस्वरूप आहें अशी भावना केली, विषय मिथ्यारूप आहेत असें अनुसंधान राखिलें व सर्वथा विरक्त होऊन भगवंताचें भजन चालविलें की त्या पुरुषाला परिपूर्ण स्वरूपीं स्थिर राहता येते) ॥ २६ ॥

१ कटक कुंडलें मुकुट माळा । करीं मुद्रिका कटीं मेखला । अलंकार पाहतां डोळा । सुवर्णावेगळा अंशु नाहीं ॥ का घडो गाडुगें बेळणी । परेळु राजणु परळणी । हे मृत्तिकेवांचूनी । आन कांहीं असेना ॥ नाथ, १२४ । २५. २ पुढील श्लोक पहा.

म्हणून, वारंवार - विषयांचें सेवन केल्यामुळें त्या संस्कारानें - विषयांमध्यें प्रवेश करणारें चित्त आणि पुन्हां वासनारूपानें चित्तात अतिशय उत्पन्न होणारे ते गुण (विषय) हीं दोन्ही, पुरुषानें मद्रूप (ब्रह्मरूप) होऊन, सोडून द्यावीं. * ॥ २६ ॥ - ह्यावर कोणी म्हणेल, ' जीवाला जागृति स्वप्न इत्यादि अवस्था आहेत तोंवर त्याला निर्विकार ब्रह्मरूपता यावी कशी ? ' तर तेंही सांगतों - जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति ह्या बुद्धीच्या अवस्था होत, - जीवाच्या नव्हेत त्या देवोद्वारें पुन्हा स्वाभाविक आहेत असें नाहीं तर - गुण-

मद्रूपः [सन्] अभीक्ष्णं (वारंवार) गुणसेवया गुणेषु आविशत् (शिरणारें) चित्तं, चित्तप्रभवाः गुणाः [इति] उभयं त्यजेत् ॥ २६ ॥ गुणतः जाग्रत्, स्वप्नः सुषुप्तं च [इति] बुद्धिवृत्तयः. जीवः तासां विलक्षणः. [यतः] साक्षित्वेन विनिश्चितः. ॥२७॥ यर्हि अयं संसृतिबंधः (ज्याअर्थी जो हा जन्ममरणप्रवाह चालतो, तो बुद्धि द० बुद्धि [illegible])

गुणेषु चाविशश्चित्तमभीक्ष्णं गुणसेवया ॥ गुणाश्च चित्तप्रभवा मद्रूप उभयं त्यजेत् ॥ २६ ॥
जाग्रत्स्वप्नः सुषुप्तं च गुणतो बुद्धिवृत्तयः ॥ तासां विलक्षणो जीवः साक्षित्वेन विनिश्चितः ॥२७॥
यर्हि संसृतिबंधोऽयमात्मनो गुणवृत्तिदः ॥ मयि तुर्ये स्थितो जह्यात्त्यागस्तद्गुणचेतसाम् ॥२८॥

तोंवें बंध) आत्मनः गुणवृत्तिदः, [तस्मात्] तुर्ये मयि स्थितः [सन् इमं] जह्यात् (सोडो) तत् (तेव्हां) गुणचेतसां त्याग ([illegible] विभाग) ॥ २८ ॥

मुळें आलेल्या असतात. जीव तर त्या तिहींहून विलक्षण (त्या तिन्ही अवस्थांनीं रहित) आहे कारण, तो त्या तिघांचा साक्षी निश्चित ठरलेला असतो ॥ २७ ॥ - ह्यावर अशी शंका येण्याचा संभव आहे कीं, तर मग ' मी जागा आहें ', ' मी स्वप्न पाहिलें ' इत्यादि अनुभव कसा येतो ? तर त्याचेंही कारण सांगतों - मनुष्यांच्या (बुद्धीच्या)

---

* मी देह हें मानोनि चित्तें । निजरूप विसरला भावार्थे । हें मिथ्याबंधन जीवातें । सत्यत्वें त्यातें अभिमानु ॥ मिथ्या बुद्धिबळांचा खेळ । हार जैती (जय) निष्फळ । तरी खेळत्या अभिमान प्रबळ । तैसें देहबळ जीवासी ॥ त्या खेळाचे घोडे हस्ती । पहिले काय जीत (जिवंत) होती । मा मारिले म्हणोनि रडती । तेवीं जन्मपर्का जीवासी ॥ हें निरसावया जीवबंधन । विशेष सांडावा देहाभिमान । अभिमान सांडिताचि जाण । मद्रूपपण सहजेंची ॥ नाथ, ३८३-८६.

१ सत्त्वाज्जागरणं विद्याद्रजसा स्वप्नमादिशेत् । प्रस्वापं तमसा जन्तोस्तुरीयं त्रिषु संततम् ॥

सत्त्वगुणापासून जागृति, रजोगुणाच्या योगें स्वप्न, आणि तमोगुणानें निद्रा ह्या अवस्था जीवाला प्राप्त होतात. चवथें (ज्ञान) तिन्हीं अवस्थांत सहज राहिलेलें असतें.

२ संसरणं देहादिषु योनिषु भ्रमणमनयेति संसृतिः बुद्धिः. तया बंधः. संसरण म्ह० देहादि योनींत फिरणें ज्याच्या योगें घडतें ती संसृति म्ह० बुद्धि [illegible] बंध दायक [illegible]

योगें बंध होऊन तो आत्म्याला त्या गुणकृत वृत्ति (जाग्रदादि अवस्था) प्राप्त करून देतो. असें आहे त्याअर्थी पुरुषानें तिन्ही अवस्थाहून वेगळा असणारा जो मी त्या मजठायी राहून हा संसृतिबंध सोडून द्यावा असें केलें असता विषय व चित्त हीं परस्परास सोडितात. ॥ २८ ॥ - बुद्धिकृत बंध तो काय व सोडावा कसा तें सांगतों ऐक¹ - आत्मा मूळ सच्चिदानंदरूप असता त्याला - शरीरादिकांविषयीच्या - अहंकारामुळे बंध प्राप्त होतो आणि तो बंध त्याच्या वास्तव स्थितीमध्यें विपर्यय आणितो (आनंदादि आवरून अनर्थ उत्पन्न करितो); हें जाणून पुरुषाने वैराग्य धरावें (हीं दुःखमय होत असें समजावें) व तुरीय ब्रह्मरूपीं स्थिर राहून देहाभिमान व तन्मूलक भोगचिंता हीं सोडून द्यावी ॥ २९ ॥

अहंकारकृतं बंधं आत्मनः अर्थविपर्ययं (अनर्थकारक, आनंदादि आच्छादणारा अशातें) विद्वान् निर्विद्य (दुःखरूप समजून) तुर्ये स्थितः [सन्] संसारचिंता त्यजेत् ॥२९॥ यावत् पुंसः नानार्थधीः (भेद सत्य अशी बुद्धि) युक्तिभिः न निवर्तेत, [तावत्] यथा स्वप्ने जागरणं, तथा अज्ञः (नाहीं नीट समजत ज्याला, तो) जागर्ति (जागतो) अपि स्वपन् (स्वप्न पाहणारा)

अहंकारकृतं बंधमात्मनोऽर्थविपर्ययम् ॥ विद्वान्निर्विद्य संसारचिंतां तुर्ये स्थितस्त्यजेत् ॥ २९ ॥
यावन्नानार्थधीः² पुंसो न निवर्तेत युक्तिभिः³ ॥ जागर्त्यपि स्वपन्नज्ञः स्वप्ने जागरणं यथा ॥ ३० ॥
असत्त्वादात्मनोऽन्येषां भावानां तत्कृता भिदा ॥ गतयो हेतवश्चास्य मृषा स्वप्नदृशो यथा ॥३१॥

[भवति]. ॥ ३० ॥ आत्मनः अन्येषां भावानां (पदार्थ) असत्वात् (सत्य नाहींत म्हणून) तत्कृता भिदा (भेद, वर्ण आश्रम इत्यादि), गतयः (स्वर्गादि फळें), हेतवः (त्याचीं कारणभूत कर्में) जोंपर्यंत पुरुषाची ' भेदच (प्रपंच) यथार्थ होय ' ही बुद्धि युक्तींनीं निवृत्त झाली नाहीं, तोंपर्यंत तो, यद्यपि कर्मादि करण्याविषयीं जागा असला तरी, स्वप्नच पहात आहे, असें समजावें कारण, तो अज्ञानी असतो (त्याला खरे काय तें दिसत नसतें), त्याची ती स्थिति म्हणजे स्वप्नातील जागेपणा होय ॥ ३० ॥ आत्म्याहून अन्य सकल पदार्थ (देहादिक) मिथ्या असल्यामुळें त्या पदार्थांनीं केलेला भेद (वर्णाश्रमादिरूप), त्याच्या स्वर्गादि गति (फलें), आणि त्याचीं हेतुभूत कर्मे ही सर्व आत्म्याला निरुपयोगी होत, उदाहरण, स्वप्न पाहणाराचें (स्वप्नात दिसलेले अनेक पदार्थ त्याला काहीं उपयोगी पडत नाहींत वेदामध्ये जी वर्णाश्रमाला उद्देशून भिन्न भिन्न कर्में सांगितलीं आहेत. तीं अज्ञा-

१ हो का लोखंडकाम घडतां । लोहाचे घाय अग्नीचे माथां । प्रत्यक्ष दिसती वाजतां । लोहतद्‌ात्मतासयोगें ॥ तेणें अग्निसंगें वाडेकोडे । लोहकामचि घडे मोडे । परी अग्नीसी घडमोड न घडे । तेणें पडिपाडें जीवू येथें ॥ जेवीं अग्निविण लोह न वढे । तेवीं आत्मसंयोगेंवीण पुढे । बुद्धि केवळ जड वेडे । कर्मक्रिया नातुडे सर्वथा ॥
नाथ, ४०५ । ६ । ७.

२ नानार्थेषु देवमनुष्यादिशरीरादिषु अहंममात्मिका धीः (विविध पदार्थांवरील म्ह० देव मनुष्यें इत्यादि शरीरावरील ' मी ' व ' माझीं ' अशी बुद्धि) बालप्रबोधिनी

३ गुरूपदिष्टशास्त्राभ्यासजन्याभिः युक्तिभिः (गुरुनें उपदेशिलेल्या शास्त्राच्या अभ्यासापासून समजलेल्या युक्तींनीं) बालप्रबोधिनी

न्यांसाठीं होत). ॥ ३१ ॥ - भेदनिवृत्तीच्या युक्ति कोणत्या तें सांगतों : ऐक :- पुरुषानें असा विचार करावा की, - ज्याचे धर्म क्षणिक आहेत (ज्यांना कालवशात् एकामागून एक बाल्य, तारुण्य इत्यादि अवस्था प्राप्त होत असतात), त्या देहादि पदार्थांना जागृतीमध्यें समस्त इंद्रियांच्या योगें जो उपभोगीत असतो, तसेच स्वप्नामध्यें जागृतीत पाहिलेल्या पदार्थांसारखे पदार्थ मनामध्यें उत्पन्न करून त्यांचा जो उपभोग घेतो आणि सुषुप्तीमध्यें जो त्या सर्वांना आटोपून टाकितो तो तीन्ही अवस्थांचा द्रष्टा [illegible] एकच आत्मा असला पाहिजे. कारण, तो इंद्रियांचा अधिपति आहे (इंद्रियें, मन व बुद्धि जड असल्यामुळें त्यांना स्वतः त्या अवस्था पाहतां येत नाहीं [illegible] मिळेल तेव्हांच त्याची प्रवृत्ति होते). शिवाय, - ज्यानें स्वप्न पाहिलें, तो मी झोंपेंत होतों तेव्हां मला कांहीं कळत नव्हतें व तोच मी आतां जागा आहें [illegible] च यथा स्वप्नदशः [तथा] अस्य मृषा (खोटीं). ॥ ३१ ॥ यः जागरे बहिः अनुक्षणधर्मिणः [illegible] अर्थान् [illegible] समस्तकरणैः (सगळ्या इंद्रियांनीं) भुंक्ते, [यः] स्वप्ने हृदि (मनांत) तत्सदृक्षान् (जागृतींत पाहिलेल्या [illegible]) [भुंक्ते य च] सुषुप्ते (झोंपेचे वेळीं) उपसंहरति ([illegible]) सः त्रिगुणवृत्तिदृक् (तीन गुणांपासून उद्भवणाऱ्या अवस्था पाहणारा) इंद्रियेशः स्मृत्यन्वयात् ([illegible]) एकः . ॥ ३२ ॥ एवं विमृश्य (विचार करून) गुणतः

यो जागरे बहिरनुक्षणधर्मिणो ऽर्थान् भुंक्ते समस्तकरणैर्हृदि तत्सदृक्षान् ॥ स्वप्ने सुषुप्त उपसंहरते स एकः स्मृत्यन्वयात्त्रिगुणवृत्तिदृगिंद्रियेशः ॥ ३२ ॥ एवं विमृश्य गुणतो मनसस्त्र्यवस्था मन्मायया मयि कृता इति निश्चितार्थाः ॥ संछिद्य हार्दमनुमानसदुक्तितीक्ष्णज्ञानासिना भजत मा ऽखिलसंशयाधिम् ॥ ३३ ॥ ईक्षेत विभ्रममिदं मनसो विलासं दृष्टं विनष्टमतिलोलमलातचक्रम् ॥ विज्ञानमेकमुरुधेव विभाति माया स्वप्नस्त्रिधा गुणविसर्गकृतो विकल्पः ॥ ३४ ॥

[याः] मनसः त्र्यवस्थाः, [ताः] मन्मायया मयि कृताः ([illegible]) [इति] निश्चितार्थाः. [यूयं] अनुमानसदुक्तितीक्ष्णज्ञानासिना (अनुमान व [illegible] साधूंचे उपदेश व श्रुति यांनीं तीक्ष्ण केलेल्या ज्ञानखड्गानें) अखिलसंशयाधिं (समस्त संशय [illegible]) संछिद्य हार्दं ([illegible]) मा ([illegible]) भजत ॥ ३३ ॥ मनसः विलासं (खेळ) दृष्टं (दिसलेलें) विनष्टं ([illegible]) अलातचक्रं (कोलतीच मंडल) [इव] अतिलोलं (अतिचंचल) इदं ([illegible]), विभ्रमं ([illegible]) ईक्षेत ([illegible]).

स्मृतिरूपानें त्या तीन्ही अवस्थांमध्यें अनुसंधान दिसून येतें, - ह्यावरूनही आत्मा एक आहे हेंच सिद्ध होतें. अशाच रीतीनें बाल्य, तारुण्य, [illegible] इत्यादि अवस्थांमध्येंही, मीं बाल्य व तारुण्य भोगिलें आतां वृद्धावस्था भोगीत आहें, असें सर्वत्र आत्मानुसंधान असतें ह्मणून आत्म्याचें ऐक्य पाहावें - ॥ ३२ ॥ सनकादि मुनींनो, अशाच रीतीनें विचार करून तुह्मी अनुमानानें, आणि साधूंचे उपदेश व श्रुति यांच्या योगें [illegible] ज्ञानखड्ग [illegible] त्या योगें [illegible] संशयाची गांठ (अहंकार) तोडून टाका, गुणामुळें मनाच्या ज्या तीन अवस्था होतात त्या अविवेकानें मजवर आरोपिल्या जातात वस्तुतः नाहींत. [illegible] आणि हृदयांत राहणाऱ्या मला भजत जा. ॥ ३३ ॥ - अनुमानादिक कशीं करावीं, तें ऐका - हें जग ह्मणजे केवळ [illegible] आहे - कारण पहा - हें केवळ मनाचा खेळ असून

द्रश्य व विनाशि आहे. उदाहरण स्वप्नाचें (स्वप्न मनाचा खेळ, दिसणारें व नष्ट होणारें असतें, तसेंच जग आहे ह्मणून जग हें स्वप्नासारखी भूत होय) तसेंच हें (जग) कोलतीच्या चक्राप्रमाणें अतिचंचल असतें (पेटलेली उदवत्ती गरगर फिरविली ह्मणजे विस्तवाचें लाल कडें दिसतें, ती जशी क्षणिक भूत तसेंच जग क्षणिक मूळ आहे) - आतां भ्रम झाला तरी आधार खरा असल्याशिवाय होत नाहीं ही गोष्ट खरी, तसाच जगाचा आधार खरा आहे पहा - ज्ञान एक असताना ते जगाच्या रूपानें त्रिविध भासत असतें ह्मणून गुणाच्या परिणामानीं जो त्रिविध भेद रचिलेला आहे तो केवळ माया होय. ॥३४॥ एवढ्यासाठीं पुरुषानें त्या दृश्य पदार्थावरून दृष्टि परतवून आत्मसुखाचा अनुभव घेत विज्ञानं एकं उरुधा (नानाप्रकारें) इव विभाति. [यः] गुणविसर्गकृतः त्रिधा विकल्पः, [सः] माया, स्वप्न [च]. ॥ ३४ ॥ ततः (त्या दृश्य जगावरून) दृष्टिं प्रतिनिवर्त्य (परतवून) निवृत्ततृष्णः, निजसुखानुभवः निरीहः (कोणतेही व्यापार न करणारा) [च सन्] तूष्णीं (स्वस्थ) भवेत्. क्व च यदि इदं संदृश्यते, [तत्] अवस्तुबुद्ध्या (मिथ्या अशा ज्ञानानें) त्यक्तं भ्रमाय न भवेत्. स्मृतिः आनिपातात् (देह पडेपर्यंत) ॥ ३५ ॥ यथा मदिरामदांधः (मद्याच्या मदानें धुंद) परिकृतं

दृष्टिं ततः प्रतिनिवर्त्य निवृत्ततृष्णस्तूष्णीं भवेन्निजसुखानुभवो निरीहः ॥ संदृश्यते क्व च यदीदमवस्तुबुद्ध्या त्यक्तं
भ्रमाय न भवेत्स्मृतिरानिपातात् ॥ ३५॥ देहं च नश्वरमवस्थितमुत्थितं वा सिद्धो न पश्यति यतोऽध्यगमत्स्वरूपम् ॥
दैवादपेतमुत दैववशादुपेतं वासो यथा परिकृतं मदिरामदांधः ॥ ३६ ॥

(पांघरलेलें) वासः (वस्त्र) [न वेत्ति, तथा] सिद्धः नश्वरं देहं अवस्थितं (बसलेला) उत्थितं (उठलेला) वा दैवात् अपेतं (दूर गेलेला) उत (किंवा) दैववशात् उपेतं (जवळ आलेला) वा न पश्यति. यतः स्वरूपं अध्यगमत् (जाणिता झाला) ॥ ३६ ॥

राहावें व तीच स्थिति निश्चल राहण्यासाठीं विषयेच्छा सोडून स्वस्थ काहीं व्यापार न करितां बसावें (मनाचे, वाणीचे किंवा शरीराचे कसलेही व्यापार करूं नयेत). - ह्यावर कोणी ह्मणेल, देह आहे तर सर्वथा द्वैतदृष्टि दूर होणें संभवत नाहीं ह्मणून पुन्हा संसार पाठीस लागेलच. तर त्याचें ही उत्तर सांगतों. - क्वचित् आहारादि आवश्यक कर्तव्याचे प्रसंगीं यद्यपि प्रपंच दिसून आला, तरी पूर्वीं मिथ्या मानून त्याचा त्याग केलेला असल्यामुळें तो आत्मनिष्ठ पुरुषाला पुन्हा मोह घालूं शकत नाहीं आता देह पडेपर्यंत संसाराचा संस्कारमात्रानें भास हा व्हावयाचाच. ॥ ३५ ॥ मद्याच्या मदानें [illegible] प्राशलेल्या मनुष्याला जसें आंगावर पांघरलेल्या वस्त्राचें - तें आंगावर आहे की नाहीं ह्याबद्दल - भान [illegible] मुख्य [illegible] ॥ १ ॥ [illegible]

१ देह, इंद्रियें [illegible]

ठिकाणींचा संग सोडून मन तुजवर लागलें जाईल, तो निष्काम भक्तियोग हेंच - उत्तम साधन - असें सांगितलें. (ह्याचा आशय असा - मोक्षसाधन ह्मणून त्या जो भक्तियोग सांगितला व दुसरे लोक इतर जीं साधनें वर्णितात, तीं सर्वच साक्षात् मोक्षसाधनें ह्मणून मुख्य समजावयाचीं किंवा त्यापैकीं काहीं प्रधान व बाकीचीं त्याचीं अंगें अशी व्यवस्था

न्यासवी होत). ॥ ३१ ॥ - भेदनिवृत्तीच्या युक्ति कोणत्या तें सांगतों : ऐक :– पुरुषानें असा विचार करावा कीं, - ज्याचें वर्ते क्षणिक आहेत (ज्याना कालवशात् एकामागून एक उत्पत्ति, तारुण्य इत्यादि अवस्था प्राप्त होत असतात), त्या देहादि पदार्थांना जागृतीमध्येंच समग्र इंद्रियांच्या योगें जो उपभोगीत असतो, तोच स्वप्नामध्यें जागृतीत पाहिलेले नित्य क्रिया करीत असलें, तरी दारूनें तो मृत्युमुखीं पडलेला असतो, [illegible]) [illegible]

अधीन असल्यामुळें, स्वतःचें उत्पादक कर्म जोंपर्यंत असतें तोंपर्यंत इंद्रियांसहवर्तमान देह धरून (जिवंत) असतोच [illegible]

दैववशगः खलु (आणि व इंद्रियें यासहित) देहः अपि यावत् स्वारंभकं कर्म, [तावत्] प्रतिसमीक्षते ([illegible]) एव खलु अधिरूढसमाधियोग ([illegible]) समाधिपर्यंत योग ज्यानें असा) प्रतिबुद्धवस्तुः (जाणिलें आत्मवस्तु ज्यानें तो) स्वाप्न (स्वप्नतुल्य) सप्रपंचं त पुनः न भजते. ॥ ३७ ॥ विप्र, सांख्ययोगयो यत् गुह्य एतत् मया व.

देहोऽपि दैववशगः खलु कर्म यावत् स्वारंभकं प्रतिसमीक्षत एव सासुः ॥ तं सप्रपंचमधिरूढसमाधियोगः स्वाप्नं पुनर्न
भजते प्रतिबुद्धवस्तुः ॥ ३७ ॥ मयैतदुक्तं वो विप्रा गुह्यं यत्सांख्ययोगयोः ॥ जानीत मागतं यज्ञं युष्मद्धर्मविवक्षया ॥ ३८ ॥
अहं योगस्य सांख्यस्य सत्यस्य र्तस्य तेजसः ॥ परायणं द्विजश्रेष्ठाः श्रियः कीर्तेर्दमस्य च ॥ ३९ ॥

उक्तं. मां युष्मद्धर्मविवक्षया (तुम्हांस धर्म सांगण्याच्या इच्छेनें) आगतं यज्ञं जानीत. ॥ ३८ ॥ द्विजश्रेष्ठा, अहं योगस्य, सांख्यस्य ([illegible]), सत्यस्य ([illegible] जाणण्या धर्माचें), ऋतस्य (प्रत्याक्षदि धर्माचें) तेजसः (प्रभावाचें), श्रियः, कीर्तेः, दमस्य च परायण ॥ ३९ ॥

व आत्मवस्तूचा साक्षात्कार झाल्या तो पुरुष तर त्या स्वप्नतुल्य प्रपंचसहित देहाचा कदापि [illegible] नाहीं ॥ ३७ ॥ [illegible] ([illegible] , योग, (अष्टांग) या शास्त्राचें रहस्य असें हें तत्त्व मी तुम्हांस सांगितलें ही गोष्ट [illegible] कीं, तुम्हांस [illegible] उपदेश [illegible] मी विष्णु [illegible] आलों [illegible] ॥ ३८ ॥ श्रेष्ठ ब्राह्मणांनो, योग, सांख्य, अनुष्ठित जाणारा धर्म, प्रमाण [illegible] जाणारा धर्म, [illegible], लक्ष्मी, कीर्ति, इंद्रियनिग्रह या सर्वांचा परम आश्रय मी आहे ॥ ३९ ॥

१ जेवीं कां माळियाचें घोडें । जेथें आणिलें तिजधामा रोकडें । मी आहे कीं गेलें कोणीकडे । हें स्मरेना पुढें तो जैसा ॥ जो का दैवयोगें पालखा चढे । तो पुढें तुटके मोचडे । आहेत कीं गेलें कोणीकडे । हें स्मरेना पुढें हरिखें । नाथ, ५२० । ९२.

मुक्त देहाविषयीं किती निरभिमान असतो, याला आणखी दृष्टांत :—

जन्मोनि छाया सरसीं वाढे । माझी ऐसी अहंता न चढे । नेसेंच देह आत्म्याकडे । मी म्हणोनि पुढें येवों न शके ॥ सदा छाया लागली असे, परी कोठें असे कोठें नसे । [illegible] ॥ हें त्याची तो न पुसे । देहाचें तैसें वर्तन झालें ॥ छाया विष्ठेवरी पडे । का पालखीमाजी चढे । एकसारखी सुख दुःख न जोडे [illegible] पाडे देहसंग । नाथ ६८३।६८४

माझ्या ठायीं गुण नाहींत व मी त्याची अपेक्षा घरीत नाहीं, परंतु समता, असंग इत्यादि सर्व गुण—हे सत्वादि गुणाचे परिणाम नव्हत, अर्थात नित्य आहेत—मला भजत असतात मी सर्वांचा हितकर्ता, प्रिय व आत्मा आहें ॥ ४० ॥ उद्धवा, अशा रीतीनें मीं त्या सनकादि मुनींचे संशय तोडून टाकिले, तेव्हा त्यानी परमभक्तिपुर सर सन्मानून स्तोत्राच्या योगें माझी स्तुति केली. ॥ ४१ ॥ त्या महर्षींनीं उत्तम प्रकारें पूजा व स्तुति केली तेव्हा, मी ब्रह्मदेवाच्या समक्ष तेथून परत गेलों ॥ ४२ ॥ इति त्रयोदशो ऽध्यायः ॥ १३ ॥

- एतावता, भगवद्भक्तीनें मोक्ष प्राप्त होतो, असें भगवतानी सागितलें. आता, दुसरे कित्येक लोक मोक्षाचीं साधनें दुसरींच सागत असतात, त्यांतील विशेष समजून घेण्यासाठी

साम्यासंगादयः (समता, अनासक्ति इत्यादि) अगुणाः (गुणपरिणाम नव्हत असे) सर्वे गुणाः निर्गुणं निरपेक्षकं सुहृदं प्रियं आत्मानं मा भजति. " ॥ ४० ॥ इति मे छिन्नसंदेहा: स-नकादयः मुनयः [मां] समाजयित्वा (सत्कारून) परया भक्त्या संस्तवैः अगृणत (स्तुति करिते झाले) ॥ ४१ ॥ तैः परमर्षिभिः सम्यक् पूजित', संस्तुत. [च] अहं परमेष्ठिन.

मां भजंति गुणाः सर्वे निर्गुणं निरपेक्षकम् ॥ सुहृदं प्रियमात्मानं साम्यासंगादयो ऽगुणाः ॥ ४० ॥
इति मे छिन्नसंदेहा मुनयः सनकादयः ॥ सभाजयित्वा परया भक्त्या ऽगृणत संस्तवैः ॥ ४१ ॥
तैरहं पूजितः सम्यक् संस्तुतः परमर्षिभिः ॥ प्रत्येयाय स्वकं धाम पश्यतः परमेष्ठिनः ॥ ४२ ॥
॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे त्रयोदशो ऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ ॥
उद्धव उवाच । वदंति कृष्ण श्रेयांसि बहूनि ब्रह्मवादिनः ॥ तेषां विकल्पप्राधान्यमुताहो एकमुख्यता ॥१॥
भवतोदाहृतः स्वामिन्भक्तियोगो ऽनपेक्षित. ॥ निरस्य सर्वतः संगं येन त्वय्याविशेन्मनः ॥ २ ॥

पश्यतः [सतः], स्वकं (आपल्या) धाम (स्थानास) प्रत्येयाय (परत गेलों). ॥ ४२ ॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे त्रयोदशो ऽध्यायः ॥ १३ ॥

उद्धव. उवाच— कृष्ण, ब्रह्मवादिनः बहूनि श्रेयांसि (मोक्षसाधने) वदंति. तेषां विकल्पप्राधान्य (पक्षीं मुख्यपणा) उताहो एकमुख्यता ? ॥१॥ स्वामिन्, भवता अनपेक्षित

उद्धवानें प्रश्न केला ' - उद्धव ह्मणाला :— श्रीकृष्णा, ब्रह्मवादी पुरुष कल्याणाची (मोक्षप्राप्तीचीं) साधनें बहुत वर्णितात. तेव्हा त्याना विकल्पानें प्राधान्य आहे (तीं सगळीच वेगवेगळ्या कारणानें प्रधान ह्मणता येतात) किंवा त्यापैकीं एकाद्यालाच मुख्य ह्मणावयाचें ? ॥ १ ॥ स्वामिन्, - शंका येण्याचे कारण असें कीं, - ज्या तर जेणेंकरून सर्व ठिकाणीचा संग सोडून मन तुजवर जडलें जाईल, तो निष्काम भक्तियोग हेंच - उत्तम साधन - असें सागितलें (ह्याचा आशय असा — मोक्षसाधन ह्मणून त्वा जो भक्तियोग सागितला व दुसरे लोक इतर जीं साधनें वर्णितात, ती सर्वच साक्षात् मोक्षसाधनें ह्मणून मुख्य समजावयाची किंवा त्यापैकीं काही प्रधान व बाकीचीं त्याची अंगें अशी व्यवस्था

आहे? तसेंच समळीच मुख्य असतील तर त्या सर्वांचीच फळें सारखीं आहेत किंवा त्याच्या फलांत काही न्यूनाधिकभाव असतो.) ॥ १ ॥ श्रीभगवान् म्हणाले — उद्धवा, [illegible] मुख्य साधन होय. इतर सकल साधनें सामान्य असताना लोक आपापल्या स्वभावानुसार पुष्पस्थानीय स्वर्गादिकांनाच फळ समजतात व वेदाचे [illegible] अर्थ करून त्या त्या स्वर्गा-च्या अभीष्ट फलप्राप्तीच्या साधनाला मुख्य म्हणतात. पहा : - ही वेदसंज्ञक वाणी प्रलयाचे वेळीं कालवशात् लुप्त झाली होती [illegible] सृष्टीच्या प्रारंभी मी ब्रह्मदेवाला हिचा उपदेश केला. हिजमध्यें, जेणेंकरून मजकडे चित्त लागलें जाईल, त्याच धर्माचें वर्णन केलें आहे. ॥ ३ ॥ त्या ब्रह्मदेवानें स्वताच्या पुत्र व [illegible] पूर्वज [illegible] त्याला [illegible] उपदेश [illegible] (निष्काम) भक्तियोगः उदाहृतः; येन मनः सर्वतः सर्वं निरस्य (दूर करून) त्वयि आविशेत्. ॥ २ ॥ श्रीभगवान् उवाच— कालेन प्रलये नष्टा वेदसंज्ञिता इयं वाणी [illegible] ब्रह्मणे प्रोक्ता, यस्यां मदात्मकः (माझ्या ठिकाणीं चित्त ज्याच्या योगें, असा) धर्मः. ॥ ३ ॥ तेन पूर्वजाय पुत्राय मनवे सा प्रोक्ता. ततः भृग्वादयः सप्त ब्रह्ममहर्षयः [illegible]

श्रीभगवानुवाच । कालेन नष्टा प्रलये वाणीयं वेदसंज्ञिता ॥ मया ऽऽदौ ब्रह्मणे प्रोक्ता धर्मो यस्यां मदात्मकः ॥ ३॥ तेन प्रोक्ता च पुत्राय मनवे पूर्वजाय सा ॥ ततो भृग्वादयो ऽगृह्णन्सप्त ब्रह्ममहर्षयः ॥ ४ ॥ तेभ्यः पितृभ्यस्तत्पुत्रा देवदानवगुह्यकाः ॥ मनुष्याः सिद्धगंधर्वाः सविद्याधरचारणाः ॥ ५ ॥ किंदेवाः किन्नरा नागा रक्षःकिंपुरुषादयः ॥ बह्व्यस्तेषां प्रकृतयो रजःसत्त्वतमो-भुवः ॥ ६ ॥ याभिर्भूतानि भिद्यंते भूतानां मतयस्तथा ॥ यथाप्रकृति सर्वेषां चित्रा वाचः स्रवंति हि ॥ ७ ॥

तेभ्यः पितृभ्यः तत्पुत्राः देवदानवगुह्यकाः, मनुष्याः, सविद्याधरचारणाः सिद्धगंधर्वाः, ॥ ५ ॥ किंदेवाः, किन्नराः, नागाः, रक्षःकिंपुरुषादयः [च अगृह्णन्] तेषां [illegible] तमोभुवः प्रकृतयः बह्व्यः ॥ ६ ॥ याभिः भूतानि, तथा भूतानां मतयः [च] भिद्यंते. हि सर्वेषां यथाप्रकृति चित्राः (विविध) वाचः स्रवंति [illegible] ॥ ७ ॥ त्याच्यापासून ती सप्त प्रजापति जे भृगुप्रभृति महर्षि, त्यांनी ग्रहण केली. ॥ ४ ॥ त्या पितरांपासून त्यांचे पुत्र जे देव, दानव, गुह्यक, मनुष्य, सिद्ध, गंधर्व, विद्याध-चारण, ॥ ५ ॥ किंदेव, किन्नर, नाग, राक्षस, किंपुरुष इत्यादिक, त्यांनीं तो (वेदवाणी) [illegible] या सर्वांचें जन्मस्थानें रज, सत्त्व व तम असे विविध अस-ल्यामुळें तिच्या (देवादि संततीच्या) वासनाही बहुत प्रकारच्या झाल्या. ॥ ६ ॥ त्या वासनांमुळें प्राणी भिन्न भिन्न प्रकारचे होतात व त्यांच्या बुद्धि भिन्न भिन्न [illegible] आणि

१ स्वरूपसामान्ये ऽपि भेदेन व्यवह्रियते (स्वरूप सारखें असून त्यांचे भेदानें व्यवहार [illegible]) [illegible]. २ [illegible]
३ हे द्वीपांतरातील मनुष्य समजावे. यांच्या शरीराला [illegible], घान, दुर्गंधि इत्यादि नसल्यामुळे हे देव की मनुष्य असा लोकांना संशय [illegible]
४ मुखानें किंवा शरीरानें मनुष्याकारचे दिसणारे, देवयोनिविशेष   ५ [illegible] मनुष्याचे [illegible]

त्या सर्वांच्या वाणीही स्वभावानुसार चित्रविचित्र निघतात (जो तो आपल्या प्रकृत्यनुरूप वेदाचा अर्थ करीत असतो). ॥ ७ ॥ अशी एकदर व्यवस्था आहे असो स्वभाववैचित्र्यामुळें मनुष्यांच्या बुद्धि भेद पावतात. कित्येक पुरुष अध्ययन वगैरे काहीं करीत नाहींत पण उपदेशपरंपरेनें त्यांच्या बुद्धींत भेद उत्पन्न होतो, काही लोकांच्या बुद्धि तर तर वेदविरुद्ध अर्थाकडेच लागलेल्या असतात. ॥ ८ ॥ हे पुरुषश्रेष्ठा, - सगळ्या प्रकृतींना मूळ कारण मायेचे गुण होत अर्थात - माझ्या मायेनें बुद्धींना मोह घातल्यामुळें ते

एवं प्रकृतिवैचित्र्यात् नृणां मतयः भिद्यते (भिन्न होतात) केषांचित् पारंपर्येण (उपदेशपरंपरेनें) [भिद्यंते]. अपरे पाखंडमतयः ॥ ८ ॥ पुरुषर्षभ, मन्मायामोहित-

एवं प्रकृतिवैचित्र्याद्भिद्यंते मतयो नृणाम् ॥ पारंपर्येण केषांचित्पाखंडमतयोऽपरे ॥ ८ ॥
मन्मायामोहितधियः पुरुषाः पुरुषर्षभ ॥ श्रेयो वदंत्यनेकांतं यथाकर्म यथारुचि ॥ ९ ॥
धर्ममेके यशश्चान्ये कामं सत्यं दमं शमम् ॥ अन्ये वदंति स्वार्थं वा ऐश्वर्यं त्यागभोजनम् ॥
केचिद्यज्ञतपोदानं व्रतानि नियमान्यमान् ॥ १० ॥

धियः पुरुषाः यथाकर्म यथारुचि अनेकांतं (नानाप्रकारचें) श्रेयः वदंति. ॥ ९ ॥ एके धर्मं, अन्ये यशः, [एके] कामं, [एके] सत्य, दम, शम च, [एके] लोक स्वताच्या कर्मानुसार व रुचीप्रमाणें कल्याणमार्ग अनेक प्रकारचे सांगत असतात ॥ ९ ॥ कित्येक लोकें नित्यनैमित्तिक कर्मच - मोक्षसाधन ह्मणतात, - दुसरे कीर्ति - पुरुषार्थसाधन असें सांगतात; - कोणी कामोपभोगच कर्तव्य मानितात, कित्येक जैण सत्य, दम व शम, हीं कल्याणमार्ग ह्मणतात, दुसरे काहीं लोकं ऐश्वर्यच स्वार्थ होय असा

१ शास्त्रमर्यादात्यागपूर्वकं भोजन विषयभोगमेव पुरुषार्थं वदन्ति-भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः । तस्मात्सर्वप्रयत्नेन ऋणं कृत्वा घृतं पिबेदितिवचनात् शास्त्रमर्यादा सोडून विषय भोगणें ह्राच पुरुषार्थ ह्मणतात कारण, 'शरीर जळून भस्म झाल्यावर पुन्हा मिळेल कोठून? ह्मणून होतील तितक्या प्रयत्नानीं ऋण करून तूप प्यावें' असें त्याचें वचन आहे

२ हे मीमांसक होत. ह्यांचे ह्मणणें असें असतें — मोक्षार्थी न प्रवर्तेत तत्र काम्यनिषिद्धयोः । नित्यनैमित्तिके कुर्यात्प्रत्यवायजिहासया ॥

(अर्थ मागें दिला आहे अ० १० श्लो० ४ टीप पहा) ३ हे अलंकारशास्त्री होत. ह्यांचें ह्मणणें—

यावत्कीर्तिर्मनुष्यस्य पुण्या लोकेषु गीयते । तावद्वर्षसहस्राणि स्वर्गलोके महीयते ॥

(जोंपर्यंत मनुष्याची निर्मळ कीर्ति लोकामध्यें वर्णिली जात असते, तोंपर्यंत हजारों वर्षे तो स्वर्गलोकीं आनंदानें नांदत राहतो). ४ कामशास्त्रकार वात्स्यायनादि.

५ योगशास्त्रकार ६ व्यवहारशास्त्रज्ञ. ह्यांचें ह्मणणें साम दान इत्यादि उपाय हेच पुरुषार्थसाधन होत.

उपदेश करितात, कोणी संन्यास व कोणी भोग हेंच मुख्य कर्तव्य समजतातः आणि दुसरे यज्ञानुष्ठान (देवतांचें पूजन), तप, दान व्रतें, नियम व यम हीं पुरुषार्थाचीं साधनें होत असे सांगत असतात ॥ १० ॥ परंतु, उद्धवा, ह्या सर्वांचीं फळें (ह्यांनी मिळविलेले स्वर्गादि लोक) कर्माच्या योगें मिळविल्यामुळें उत्पत्तिनाशवंतच असतात (नित्य नव्हत), त्याचा (फळाचा) परिणाम दुःख हा होतो. त्याचें पर्यवसान मोहामध्यें पडणें त्यात आनंद अल्पतर असतो व ह्यामुळें कर्मही ते - द्वेष, निंदा इत्यादिकांनीं युक्त असल्यामुळें - शोकानें व्यापलेलेच असतात. ॥ ११ ॥ हे सभ्य (उद्धवा), ज्यानें विषयांची इच्छा सोडून माझ्या ठिकाणीं चित्त ठेविलें त्याच्या अंतरीं मी परमानंदरूपानें प्रकाशत न त्यागभोजनं, अन्ये ऐश्वर्यं स्वार्थं वदंति. केचित् यज्ञतपोदान, व्रतानि, नियमान्, यमान् [च वदंति] ॥ १० ॥ एवं कर्मविनिर्मिता लोकाः आद्यन्तवन्त एव, दुःखोदर्काः (दुःख हें परिणामीं फळ ज्यांचें असें), तमोनिष्ठाः, क्षुद्रानंदाः, शुचा अर्पिताः (व्याप्त) [च]. ॥ ११ ॥ सभ्य, मयि अर्पितात्मनः सर्वतः निरपेक्षस्य आत्मना मया यत् सुख

आद्यंतवंत एवैषां लोकाः कर्मविनिर्मिताः ॥ दुःखोदर्कास्तमोनिष्ठाः क्षुद्रानंदाः शुचाऽर्पिताः ॥ ११ ॥

मय्यर्पितात्मनः सभ्य निरपेक्षस्य सर्वतः ॥ मयाऽऽत्मना सुखं यत्तत्कुतः स्याद्विषयात्मनाम् ॥ १२ ॥

अकिंचनस्य दांतस्य शांतस्य समचेतसः ॥ मयाऽऽसंतुष्टमनसः सर्वाः सुखमया दिशः ॥ १३ ॥

तत् विषयात्मनां कुतः स्यात्? ॥ १२ ॥ अकिंचनस्य दांतस्य समचेतसः शांतस्य मया आसंतुष्टमनसः (ज्याचें मन संतुष्ट झालें आहे) सर्वाः दिशः सुखमयाः ॥ १३ ॥ होतें, मग त्या स्वस्वरूपभूत परमानंदाच्या योगें त्याला जें सुख प्राप्त होतें तें (सुख) विषयांनीं ज्यांचीं चित्तें व्यापिलेलीं असतात, त्या पुरुषांना मिळेल कोठून - म्हणून भक्ति हेंच साधन श्रेष्ठ होय. - ॥ १२ ॥ - इतर साधकांचें सुख त्या त्या (स्वर्गादि) लोकांपुरतेंच असतें आणि भक्तांचें सुख तर सर्वत्र परिपूर्ण असतें पहा - ज्यानें कोणत्याही वस्तूचा संग्रह करणें सोडिलें, इंद्रियें आकळिलीं, मन शांत केलें, सर्वत्र सम बुद्धि ठेविली व माझ्या योगेंच (ईश्वराच्याच सेवानेंच) चित्त सर्वथा संतुष्ट राखिलें, त्याला सर्व दिशा सुखमयच

बालबोधिनी

१ यत्कृतकं तदनश्वरमिति व्याप्तेः. (' जें केलेलें तें नाशवंत ' असा नियम आहे यास्तव)

२ चार्वाक मतानें. नास्तिक. मागील पृष्ठावरील पहिली टीप पहा

३ सांडूनि फळाशा देहाभिमान । मज नार्पिती जे साधन । त्याचें फळ दुःखरूप जाण । जन्ममरणदायक ॥ तिहीं साधनीं साधिले लोक । ते अवघेच नश्वर देख । ते लोकींचें जें सुख । साकरेंसि विख रांधिलें ॥ त्याचें जिव्हाग्रीं गोडपण । परिपाकीं अचुक मरण । तैसा तो क्षुद्रानंद जाण । शोकासी कारण समूळ ॥ नाथ. ७८, ७९, ८०

४ आमाळ गेलिया सविता । सहजेंचि दिसे आंतौता । तेवीं गेलिया विषयावस्था । मी स्वभावता प्रकटची ॥ नाथ, ९०.

असतात. ॥ १३ ॥ ज्यानें माझ्या ठिकाणीं चित्त लाविलें तो भक्त ब्रह्मदेवाच्या स्थानाची इच्छा धरीत नाहीं, महेंद्रपदाची अपेक्षा ठेवीत नाही, सार्वभौम राज्य मागत नाहीं, रसातळाचें आधिपत्य कांक्षीत नाहीं, - अणिमामहिमा इत्यादि - योगसिद्धींची आशा बाळगीत नाही, फार तर काय मोक्ष सुद्धा इच्छीत नाहीं त्याला मजवाचून दुसरें काहीं अपेक्षित नसतें (मीच त्याला अत्यंत प्रिय असतों) ॥१४॥ उद्धवा, ब्रह्मदेव माझा पुत्र खरा तरी पण तू[2] (माझा भक्त) मला जितका अत्यंत प्रिय आहेस, तितका तो प्रिय वाटत नाहीं. शंकर केवळ मत्स्वरूप आहे पण मला तुझ्याइतका प्रिय नाही, संकर्षण प्रत्यक्ष भाऊ, पण त्यावर आणि लक्ष्मी तर पत्नी पण तिजवरही माझी तुझ्यावर आहे तितकी प्रीति नाहीं, फार तर

मयि अर्पितात्मा मत् विना अन्यत् पारमेष्ठ्यं (सत्यलोक) न, महेंद्रधिष्ण्यं न, सार्वभौमं न, रसाधिपत्य (पाताळींचें आधिपत्य) न, योगसिद्धी[1], अपुनर्भव (मोक्ष) वा न इच्छति. ॥ १४ ॥ यथा भवान् मे प्रियतमः, तथा आत्मयोनिः न, शंकरः न, संकर्षणः न, श्रीः न, आत्मा (ही श्रीमूर्ति) च न एव ॥ १५ ॥ अहं निरपेक्षं शांत निर्वैरं समदर्शन

न पारमेष्ठ्यं न महेंद्रधिष्ण्यं न सार्वभौमं न रसाधिपत्यम् ॥ न योगसिद्धीरपुनर्भवं वा मय्यर्पितात्मेच्छति मद्विना ऽन्यत्
॥ १४ ॥ न तथा मे प्रियतम आत्मयोनिर्न शंकरः ॥ न च संकर्षणो न श्रीर्नैवाऽऽत्मा च यथा भवान् ॥ १५ ॥ निरपेक्षं
मुनिं शांतं निर्वैरं समदर्शनम् ॥ अनुव्रजाम्यहं नित्यं पूयेयेत्यंघ्रिरेणुभिः ॥ १६ ॥ निष्किंचना मय्यनुरक्तचेतसः शांता
महांतो ऽखिलजीववत्सलाः ॥ कामैरनालब्धधियो जुषंति यत्तन्नैरपेक्ष्यं न विदुः सुखं मम ॥ १७ ॥

मुनिं ' अंघ्रिरेणुभिः (पायधुळीनें) पूयेय (पवित्र करून घेईन) ' इति नित्यं अनुव्रजामि (मागून जातों) ॥ १६ ॥ [ये] निष्किंचनाः (कसलाही संग्रह न करणारे) मयि अनुरक्त चेतसः (प्रीतियुक्त चित्तें ज्यांचीं असे) अखिलजीववत्सलाः कामैः अनालब्धधियः (अस्पृष्ट बुद्धि ज्याच्या असे) शांताः महांतः मम (माझे भक्त) यत् नैरपेक्ष्य सुख जुषन्ति (सेवितात), काय पण स्वताच्या ह्या मूर्तीवरही माझें तुझ्यावरच्यासारखें प्रेम नाहीं. ॥ १५ ॥ ज्यानें सकल इच्छा सोडिल्या, मन शांत केलें, वैरभाव गाळून टाकिला व सर्वत्र समदृष्टि ठेविली, त्या मुनीच्या पाठीमागून मी, त्याच्या पायधुळीच्या योगें - आपल्या उदरातील ब्रह्मांडाना - पवित्र करून घ्यावें ह्यासाठीं, नित्य फिरत असतों. ॥ १६ ॥ - शिवाय, माझ्या भक्तांना सुख इतकें इतके मिळतें, असें सांगण्यास समर्थ आहे कोण ? कारण, तें ज्याचें त्यालाच केवळ समजण्याजोगें व निरुपम असतें ' पहा '- ज्यांनीं कोणत्याही वस्तू-

---

१ विष्ठेमाजील समळे खणे । ते सूकरासी गोडपणें । त्यातें कंटाळनी शाहाणे । तेवी मद्भक्तीं साडणें सार्वभौमता ॥ नाथ, ११८

२ ' माझा भक्त मला जितका अतिप्रिय असतो ' असें मनांतून बोलावयाचें असताना भगवंताच्या मुखातून ' तू जितका अतिप्रिय आहेस ' असे उद्गार निघाले ह्याचें कारण हर्षातिरेक हे होय

घा संग्रह करणें सोडून दिलें, मनवरच मनाचें प्रेम ठेविलें, चित्त शांत केलें, अभिमान दूर घालविला, सकल प्राण्यांवर दया चालविली, व चित्तास विषयेच्छांचा स्पर्शदेखील होऊं न देण्याचा नियम पाळिला, त्या माझ्या भक्तांना कसलीही अपेक्षा नसल्यामुळें जें सुख भोगायास मिळतें, त्याची इतरांना कल्पना देखील करिता यावयाची नाही ॥ १७ ॥ - शिवाय, उत्तम भक्ताची गोष्ट तर एकीकडेच राहूं द्या. पण सामान्य भक्त देखील कृतार्थच असतो. उद्धवा - माझ्या भक्ताची इंद्रियें जिंकिलेली नसली व विषय त्याला पीडा देऊ (आपल्याकडे आकर्षण करूं) लागले तरी तो, त्याच्या जवळ भक्ति हें महाप्रबळ साधन असल्यामुळें तिच्या प्रभावानेच प्राय विषयांनी पराभविला जात नाही ॥ १८ ॥

तत् [ते एव] विदुः, [अन्ये] न. ॥ १७ ॥ अजितेंद्रियः मद्भक्तः विषयैः बाध्यमानः (पीडिला जाणारा) अपि प्राय प्रगल्भया (उत्तम) भक्त्या विषयैः न अभिभूयते ॥ १८ ॥ उद्धव, यथा सुसमिद्धार्चिः (फार पेटलेल्या ज्वाळा ज्याच्या आहे) अग्निः एधांसि (काष्टें) तथा मद्विषया भक्तिः कृत्स्नशः (सर्व) एनांसि (पापें) भस्मसात् करोति ॥ १९ ॥

बाध्यमानोऽपि मद्भक्तो विषयैरजितेंद्रियः ॥ प्रायैः प्रगल्भया भक्त्या विषयैर्नाभिभूयते ॥ १८ ॥

यथाऽग्निः सुसमृद्धार्चिः करोत्येधांसि भस्मसात् ॥ तथा मद्विषया भक्तिरुद्धवैनांसि कृत्स्नशः ॥ १९ ॥

न साधयति मां योगो न सांख्यं धर्म उद्धव ॥ न स्वाध्यायस्तपस्त्यागो यथा भक्तिर्ममोर्जिता ॥ २० ॥

उद्धव, यथा ऊर्जिता (वाढलेली) मम भक्तिः मां साधयति, [तथा] योगः न, सांख्यं, धर्मः [च] न, स्वाध्यायः, तपः, त्यागः [च] न. ॥ २० ॥

उद्धवा, जसा अग्नि (पाकादिकासाठीं पेटविलेला) ज्वाला पुष्कळ धडाडून पेटल्या असल्या ह्मणजे काष्ठें जाळून त्यांचें भस्म करून टाकितो, त्याप्रमाणे मद्विषयींची भक्ति — ती प्रेम, द्वेष कोणत्याही कारणामुळें उद्भवेना — समस्त पापें जाळून निर्मूळ करिते. ॥ १९ ॥ उद्धवा, मद्विषयीं वृद्धिंगत झालेली भक्ति जशी मला वश करून घेते तशा रीतीनें योग मला आकळीत नाहीं, सांख्य व धर्म वश करीत नाहींत. आणि वेदाध्ययन, तप व दान ही मला वश करून घेत नाहींत. ॥ २० ॥

---

१ किंवा, 'ज्यांना कसलीही अपेक्षा नसते, त्यांनाच तें सुख मिळवयाचें. अपेक्षा पुरवावी, फार तर काय मोक्षाची इच्छा करणारांना सुद्धां, तें मिळत नाहीं' असा अर्थ करावा

२ नाथ ह्मणतात:— चंद्रकिरणींचें अमृत । जेवीं वायसां अप्राप्त । तेवीं माझें निजसुख निश्चित । नव्हेचि प्राप्त अभक्तां ॥ २१२.

३ कश्चिद्भक्तस्यासमर्थतोऽभिभूता अपि दृश्यन्त इति प्रायोग्रहणम् (ज्याच्या टीकेंत, तथापि भक्तांचा थोडा मन गेल्यास हें त्याचें पुरुष पराभव पावतात हें लक्षांत आणून येथें 'प्रायः' पद घातलें.

४ जैसी नाकेंवीण मरव (शोभा)। कां शिरेंवीण अवयव। भर्तारेंवीण अहेव (सुवासिनी)। जाण पां तो सर्व विटंबू। तैसें माझे भक्तीवीण। सकळ साधनें वाउगीं जाण। नाथ २५७।५८

साधूंचा प्रिय व आत्मा असा मी केवळ श्रद्धामूलक भक्तीच्या योगें वश केला जातो. मजवर भक्ति जडली असता ती चांडालानासुद्धा नीच कुळांतील जन्म ह्या दोषापासून दूर करून शुद्ध करिते. ॥ २१ ॥ अंतःकरण माझ्या भक्तीनें रहित असेल तर त्याला सत्य, दया ह्या गुणांनी युक्त धर्म किंवा तपश्चर्येनें युक्त अशी विद्या (उपासना किंवा ज्ञान) हींसुद्धां नीटपणें पवित्र करूं शकत नाहींत. - एकंदरीत, भक्तीवाचून इतर साधनें व्यर्थ होत - ॥ २२ ॥ अंगावर रोमांच थरारत नाहींत, अंतःकरणाला पाझर फुटत नाहींत व नेत्रांतून अश्रुधारा चालत नाहींत तर भक्ति व्हावी कशी? व भक्तीवाचून चित्त शुद्ध व्हावें कसें? ॥ २३ ॥ - ईश्वराचे गुण वर्णन करितांना प्रेमभरास्तव - ज्याची वाणी सद्गदित

सतां प्रियः आत्मा अहं श्रद्धया एकया भक्त्या ग्राह्यः मन्निष्ठा भक्तिः श्वपाकान् [अपि] (चांडालपर्यंत सर्वांना) संभवात् (जन्मदोषापासून) अपि पुनाति (पवित्र करिते) ॥ २१ ॥ सत्यदयोपेतः धर्मः, तपसा अन्विता विद्या वा मद्भक्त्या अपेतं आत्मानं सम्यक् न प्रपुनाति. ॥ २२ ॥ रोमहर्षं विना (रोमांचावाचून), द्रवता (गहिंवरलेल्या) चेतसा विना, आनंदाश्रुकलया विना [भक्तिः] कथं [गम्यते]? भक्त्या विना आशयः (चित्त) [कथं] शुध्येत्? ॥ २३ ॥ यस्य वाक् गद्गदा, चित्तं च द्रवते, [यः] अभीक्ष्णं

भक्त्या ऽहमेकया ग्राह्यः श्रद्धया ऽऽत्मा प्रियः सताम् ॥ भक्तिः पुनाति मन्निष्ठा श्वपाकानपि संभवात् ॥ २१ ॥

धर्मः सत्यदयोपेतो विद्या वा तपसाऽन्विता ॥ मद्भक्त्या ऽपेतमात्मानं न सम्यक्प्रपुनाति हि ॥ २२ ॥ कथं विना

रोमहर्षं द्रवता चेतसा विना ॥ विना ऽऽनंदाश्रुकलया शुध्येद्भक्त्या विना ऽऽशयः ॥ २३ ॥ वाग्गद्गदा द्रवते

यस्य चित्तं रुदत्यभीक्ष्णं हसति क्वचिच्च ॥ विलज्ज उद्गायति नृत्यते च मद्भक्तियुक्तो भुवनं पुनाति ॥ २४ ॥

यथा ऽग्निना हेम मलं जहाति ध्मातं पुनः स्वं भजते च रूपम् ॥ आत्मा च कर्मानुशयं विधूय

मद्भक्तियोगेन भजत्यथो माम् ॥ २५ ॥

रुदति, क्वचित् हसति, [क्वचित्] विलज्जः [सन्] उद्गायति, नृत्यते च [सः] मद्भक्तियुक्त भुवनं पुनाति. ॥ २४ ॥ यथा अग्निना ध्मातं (तापविलेलें) हेम मलं जहाति (टाकितें), स्वं रूपं भजते च, [तथा] आत्मा मद्भक्तियोगेन कर्मानुशयं विधूय (दूर करून) अथो मां भजति. ॥ २५ ॥

होते, ज्याच्या चित्ताला द्रव फुटतो, जो वारंवार रडतो, केव्हां हसतो, निर्लज्जपणें गातो किंवा थयथया नाचतो, - एकंदरींत अशीं मजविषयींच्या सप्रेम भक्तीचीं लक्षणें ज्याच्या ठिकाणीं वठून आलेलीं दिसतात, - तो पुरुष सगळ्या भुवनाला पवित्र करितो. ॥ २४ ॥ जसें सुवर्ण अग्नीनें तापवावें तेव्हांच आंतील सगळे मळ टाकून देतें व पुन्हां आपलें मूळ रूप स्वीकारितें (वरून पुष्कळ धुतलें किंवा घासलें तरी आंतले मळ जात नाहीत), तशाच रीतीनें आत्माही माझ्या भक्तियोगाच्या योगें समस्त कर्मवासना दूर करून मग माझ्या

सान्द्
सान्व
१ ॥

स्वरूपास प्राप्त होतो - इतर साधनांत हें सामर्थ्य नसतें. - ॥ २५ ॥ माझ्या पवित्र कथा ऐकिल्या व वर्णिल्या असता त्याच्या योगें जसजसें चित्त शुद्ध होत जातें तसतसें सुरम्याला
अंजन घातलेल्या नेत्राप्रमाणें, सूक्ष्म वस्तु दिसूं लागते (ज्ञान हा भक्तीचाच अवान्तर व्यापार होय, तें भक्तीहून वेगळें नाहीं) ॥ २६ ॥ - विषय जन ह्मणजे चित्ताचा त-
द्या आकारानें परिणाम होय. आणि तो भक्त मनूं लागलें असता आपोआप होतो, त्यासाठी निराळा यत्न करावा लागत नाहीं पहा - विषयाचें चिंतन करणाराचें चित्त विष
यांवर आसक्त होतें, तसें मला स्मरणाराचें चित्त मजवरच लय लागून राहतें. ॥ २७ ॥ - एतावता, ज्याअर्थी इतर साधनें व त्यांची फळें - स्वप्नातलाग किंवा मनोराज्यामारखें
असौ आत्मा मत्पुण्यगाथाश्रवणाभिधानैः यथा यथा परिमृज्यते (शुद्ध होतो), तथा तथा. यथा एव अंजनसंप्रयुक्तं चक्षुः [तथा] सूक्ष्मं वस्तु पश्यति ॥ २६ (मुः , ॥ २७ ॥
तस्मात् यथा स्वप्नमनोरथं, [तथा] असदभिध्यानं (मिथ्या कल्पनाच) हित्वा (सोडून) मद्भावभावितं मनः मयि समाधत्स्व (लाव) . २८ ॥ स्त्रीणां, स्त्रीसंगिनां (स्त्रैणांचा ,

यथा यथाऽऽत्मा परिमृज्यतेऽसौ मत्पुण्यगाथाश्रवणाभिधानैः ॥ तथा तथा पश्यति वस्तु सूक्ष्मं
चक्षुर्यथैवांजनसंप्रयुक्तम् ॥ २६ ॥ विषयान् ध्यायतश्चित्तं विषयेषु विषज्जते ॥ मामनुस्मरतश्चित्तं
मय्येव प्रविलीयते ॥ २७ ॥ तस्मादसदभिध्यानं यथा स्वप्नमनोरथम् ॥ हित्वा मयि समाधत्स्व
मनो मद्भावभावितम् ॥ २८ ॥ स्त्रीणां स्त्रीसंगिनां संगं त्यक्त्वा दूरत आत्मवान् ॥ क्षेमे
विविक्त आसीनश्चिंतयेन्मामतंद्रितः ॥ २९ ॥ न तथाऽस्य भवेत्क्लेशो बंधश्चान्यप्रसंगतः ॥
योषित्संगाद्यथा पुंसो यथा तत्संगिसंगतः ॥ ३० ॥

[च] संगं दूरतः त्यक्त्वा आत्मवान्, क्षेमे (निर्भय) विविक्ते (एकांतीं) आसीनः, अतन्द्रित (तत्पर) [च सन्] मा चिंतयेत् ॥ २९ ॥ अस्य पुंसः यथा योषित्संगात्
(स्त्रीसंगानें) बंधः, यथा च तत्संगिसंगतः (स्त्री लंपट पुरुषाच्या सहवासानें) क्लेशः, तथा अन्यप्रसंगतः न. ॥ ३० ॥

केवळ मिथ्या कल्पनामय आहेत, त्याअर्थी त्याचा त्याग करून, माझ्या भजनानें शुद्ध केलेलें मन मजवर लाव. ॥ २८ ॥ पुरुषानें धैर्य धरावें स्त्रियांचा व स्त्रीसंगी
लोकांचा समागम दूर सोडून निर्भय आणि निर्जन अशा स्थानीं बसावें, व तेथें निरलसपणें माझें चिंतन करावें ॥ २९ ॥ पुरुषास स्त्रिया लोकांच्या समागमानें
जसे क्लेश सोसावे लागतात, व स्त्रियांच्या संगतीनें जसें बंधन प्राप्त होतें, तसे क्लेश किंवा तसें बंधन इतर कोणाच्याही सहवासानें प्राप्त होत नाहीं ॥ ३० ॥

उद्धव ह्मणाला :— हे कमलनयना, मुमुक्षूनें तुझ्या कोणत्या स्वरूपाचें ध्यान करावें, त्या ध्यानाचीं अंगें कोणतीं व ध्येय स्वरूपाचें वर्णन कसें, तें ध्यान त्वा मला कथन करावें ॥ ३१ ॥ श्रीभगवान् ह्मणाले :— उद्धवा, साधकानें अति उच नाहीं व विशेष सखलही नाहीं अशा मध्यम प्रमाणाच्या आसनावर शरीर सरळ ठेवून (पोंक येऊं न देता) सुख वाटेल तशा रीतीनें (स्वस्तिकादि आसनें घातलीं पाहिजेत असा नियम नाहीं) बसावें. - चित्त स्थिर राहावें बाहेर फाकूं नये ह्यासाठीं - नासिकेच्या अग्रावर दृष्टि लावावी व

उद्धवः उवाच—अरविंदाक्ष, मुमुक्षुः त्वा यथा (जशा अंगानीं), यादृशं (जशा प्रकारचा अशा), यदात्मकं (ज्या स्वरूपाच्याला) वा ध्यायेत्, एतत् ध्यान त्वं मे वक्तुं अर्हसि. ॥ ३१ ॥ श्रीभगवान् उवाच—समे आसने यथासुखं समकायः (सरळ शरीर ज्याचें असा) [सन्] आसीनः उत्संगे (मांडीवर) हस्तौ आधाय (ठेवून) स्वनासाग्रकृते-

उद्धव उवाच । यथा त्वामरविंदाक्ष यादृशं वा यदात्मकम् ॥ ध्यायेन्मुमुक्षुरेतन्मे ध्यानं त्वं वक्तुमर्हसि ॥ ३१ ॥

श्रीभगवानुवाच । सम आसन आसीनः समकायो यथासुखम् ॥ हस्तावुत्संग आधाय स्वनासाऽग्रकृतेक्षणः ॥ ३२ ॥

प्राणस्य शोधयेन्मार्गं पूरकुंभकरेचकैः ॥ विपर्ययेणापि शनैरभ्यसेन्निर्जितेंद्रियः ॥ ३३ ॥ हृद्यविच्छिन्नमोंकारं घंटानादं

बिसोर्णवत् ॥ प्राणेनोदीर्य तत्राथ पुनः संवेशयेत्स्वरम् ॥ ३४ ॥

क्षणः (आपल्या नाकाच्या अग्राकडे दृष्टि ज्याची असा) ॥ ३२ ॥ निर्जितेंद्रियः पूरकुंभकरेचकैः प्राणस्य मार्गं शोधयेत्, विपर्ययेण अपि शनैः अभ्यसेत्. ॥ ३३ ॥ घंटानादं अविच्छिन्न (सतत) ओंकार हृदि प्राणेन बिसोर्णवत् (कमळाच्या नाळांतील ततूप्रमाणें) उदीर्य (वर घेऊन) अथ पुनः तत्र स्वरं संवेशयेत् (ठेवो). ॥ ३४ ॥

हात मांडीवर ठेवावे. ॥ ३२ ॥ पूरक, कुंभक आणि रेचक करून प्राणाचा मार्ग शोधावा आणि उलट (रेचक, कुंभक व पूरक अशा) क्रमानेंही हळूहळू प्राणायामाचा अभ्यास चालवावा. इंद्रियें विषयावरून सोडवावीं. ॥ ३३ ॥ - प्राणायाम दोन प्रकाराचा आहे एक सगर्भ आणि दुसरा अगर्भ त्यामध्यें प्रणवगर्भ प्राणा-

१ 'मे ध्यानं मे वक्तुमर्हसि' असा कोठें पाठ आहे, ह्मणजे त्यात 'मे' हीं दोन पदें आहेत त्याचा विनियोग लावण्यासाठीं असा अर्थ करावा :— "मुमुक्षूनें तुझें ध्यान कसें करावें तें जिज्ञासूला सांगण्यासाठीं 'मला' सांग 'मग' ह्मणशील तर तुझी सेवा हाच पुरुषार्थ वाटतो, ध्यानाशीं मला काहीं कर्तव्य नाहीं "

२ कुंभक ह्म० प्राणवायु एका नाकपुडीनें ओढून आत भरणें, कुंभक ह्म० तो वायु आत कोंडणें व रेचक ह्म० वायु बाहेर सोडणें

३ इडेनी करावा प्राण पूर्ण । तो कुंभिनी राखावा जाण । मग तिनेंचि करावा रेचन । हें एक लक्षण अभ्यासीं ॥ कां पिंगलेनी करावा पूर्ण । तो तिनेंची करावा रेचन । हें एक अपार लक्षण । विचक्षण बोलती ॥ सर्वसंमत योगलक्षण । इडेनें करावा प्राण पूर्ण । तो कुंभकें राखावा स्तंभून । करावें रेचन पिंगलया ॥ हो का पिंगलेनी पूरावा प्राण । तोही कुंभकें राखावा कुंभून । मग इडेनी सांडावा रेचून । हे विपरीत लक्षण अभ्यासीं ॥ नाथ, ४२० । २१ । २२ । २३.

याम श्रेष्ठ होय. त्याचें लक्षण सांगतों :- मूलाधारचक्रापासून मेंतन चालणाऱ्या वंथनादामाऱ्ग्या हृदयात गहनाच्या आकाशात प्राणाच्या [illegible] ... त्यावर पुन्हा बिंदूची स्थापना करावी. ॥३४॥ अशा रीतीनें प्रणवयुक्त प्राणायाम करण्याचात प्रतिदिनी त्रिकाळ (प्रात:काळीं मध्यान्हीं व सायंकाळ) [illegible] ... महिन्याच्या आतच त्या पुरुषाला प्राणवायु वश होतो. - हे ध्यानाचें अंग सांगितलें. - ॥ ३५ ॥ - आता ध्येय वस्तूचें स्वरूप सांगण्यासाठीं प्रथम [illegible] ... रतों :- शरीराच्या आत जें हृदयकमळ आहे, त्याचें नाळ वर असून मुख खालीं आहे (कमळ जसें असतें तशी हृदयकमळाची रचना आहे) - त्याचें [illegible]

एवं प्रणवसंयुक्तं प्राणं एव त्रिषवर्षं (त्रिकाळ) दशकृत्व: (दहा वेळा) समभ्यसेत् [एवं कृते सति] मासात् अर्वाक् (अलिकडे) जितानिल ([illegible]) [भवति]. ॥ ३५ ॥ ऊर्ध्वनाल (वर नाळ ज्याचें असा) अधोमुखं (खालीं मुख ज्याचें असा) अष्टपत्र सकर्णिक ([illegible]) अन्त:स्थ हृत्पुंडरीक ([illegible]) [illegible]

एवं प्रणवसंयुक्तं प्राणमेव समभ्यसेत् ॥ दशकृत्वस्त्रिषवणं मासादर्वाग्जितानिल: ॥ ३५ ॥

हृत्पुंडरीकमंतस्थमूर्ध्वनालमधोमुखम् ॥ ध्यात्वोर्ध्वमुखमुन्निद्रमष्टपत्रं सकर्णिकम् ॥ ३६ ॥

कर्णिकायां न्यसेत्सूर्यसोमाग्नीनुत्तरोत्तरम् ॥ वह्निमध्ये स्मरेद्रूपं ममैतद्ध्यानमंगलम् ॥ ३७ ॥

समं प्रशांतं सुमुखं दीर्घचारुचतुर्भुजम् ॥ सुचारु सुंदरग्रीवं सुकपोलं शुचिस्मितम् ॥ ३८ ॥

ज्याचें असा), उन्निद्रं (फुललेल्या) [च] ध्यात्वा ॥ ३६ ॥ कर्णिकायां (गाभ्यामध्ये) उत्तरोत्तरं सोमसूर्याग्नीन् न्यसेत्. वह्निमध्ये ध्यानमंगल ([illegible]) एतत् मम रूपं स्मरेत्. ॥ ३७ ॥ समं प्रशांतं सुमुखं दीर्घचारुचतुर्भुजं (दीर्घ सुंदर चार भुज ज्यावर [illegible]) सुचारु ([illegible]) सुंदरग्रीवं सुकपोलं शुचिस्मितं [illegible]

म्हणजे सरोवरातील कमळाप्रमाणें - त्याचें मुख वर आहे असें चिंतन करावें, तसेंच तें फुललेलें असून त्यास आठ पाकळ्या आहेत व [illegible] ... ध्यानात आणावें. ॥३६॥ त्या कर्णिकेमध्यें एकावर एक सूर्य, चंद्र व अग्नि यांची स्थापना करावी आणि त्या अग्नीमध्यें माझ्या रूपाचें ध्यान करावें, हें [illegible] ... विषय होय. ॥ ३७ ॥ - माझें रूप असें चिंतावें. - त्याचे अवयव सम प्रमाणाचे (एकमेकास अनुरूप) आहेत, आकृति अत्यंत शांत असून मुख सुंदर आहे [illegible]

सुंदर चार बाहु आहेत; मूर्ति अत्यंत रमणीय आहे, मान सुंदर, व गाल मनोहर असून हास्याची शुभ्र प्रभा पडत आहे, ॥ ३८ ॥ दोन्ही कान सारखे असून त्यामध्ये घातलेली मकराकार कुंडलें चमकत आहेत, आंगावर भरजरी वस्त्र आहे, कांति मेघासारखी श्यामवर्ण आहे, - वक्षस्थलावर अनुक्रमें उजव्या व डाव्या बाजूस - श्रीवत्स आणि लक्ष्मी हीं चिन्हें वसत आहेत, ॥ ३९ ॥ शंख, चक्र, गदा, पद्म, आणि वनमाळा हीं मूर्तीला विशेष शोभा देत आहेत, नूपुराच्या योगें पाय शोभत आहेत, कौस्तुभ मण्याची प्रभा शरीरावर पसरली आहे; ॥ ४० ॥ तेजःपुंज अशा किरीट, कडीं, कटिसूत्र, बाहुभूषणें ह्या अलंकारांनीं त्याला चहूंकडून शोभा आणिली आहे, मूर्तिचे सर्व अवयव नी सुंदर व हृदयंगम

समानकर्णविन्यस्तस्फुरन्मकरकुंडलं (सारख्या कानात घातलेलीं चमकतात मकराकार कुंडलें ज्याचीं अशा) हेमांबरं (सुवर्णाचें वस्त्र ज्याचें अशा) घनश्याम श्रीवत्सश्रीनिकेतन ॥ ३९ ॥ शंखचक्रगदापद्मवनमालाविभूषितं नूपुरैः विलसत्पादं कौस्तुभप्रभया युतं ॥ ४० ॥ द्युमत्किरीटकटककटिसूत्रांगदायुतं सर्वांगसुंदर हृद्य प्रसादसुमुखेक्षण ॥ ४१ ॥

समानकर्णविन्यस्तस्फुरन्मकरकुंडलम् ॥ हेमांबरं घनश्यामं श्रीवत्सश्रीनिकेतनम् ॥ ३९ ॥
शंखचक्रगदापद्मवनमालाविभूषितम् ॥ नूपुरैर्विलसत्पादं कौस्तुभप्रभया युतम् ॥ ४० ॥
द्युमत्किरीटकटककटिसूत्रांगदायुतम् ॥ सर्वांगसुंदरं हृद्यं प्रसादसुमुखेक्षणम् ॥ ४१ ॥
सुकुमारमभिध्यायेत्सर्वांगेषु मनो दधत् ॥ इंद्रियाणींद्रियार्थेभ्यो मनसाऽऽकृष्य तन्मनः ॥
बुद्ध्या सारथिना धीरः प्रणयेन्मयि सर्वतः ॥ ४२ ॥ तत्सर्वव्यापकं चित्तमाकृष्यैकत्र
धारयेत् ॥ नान्यानि चिंतयेद्भूयः सुस्मितं भावयेन्मुखम् ॥ ४३ ॥

सुकुमार [रूपं] सर्वांगेषु मनः दधत् (ठेवणारा) [सन्] अभिध्यायेत्. धीरः मनसा इंद्रियार्थेभ्यः (इंद्रियांच्या विषयावरून) इंद्रियाणि आकृष्य (ओढून) तत् मनः सारथिना (सहाय) बुद्ध्या सर्वतः मयि प्रणयेत् (लावो). ॥ ४२ ॥ तत् सर्वव्यापक (सर्व मूर्ति व्यापणारें) चित्त आकृष्य एकत्र धारयेत्. भूयः अन्यानि न चिंतयेत्

असून प्रसन्न मुद्रेनें मुखाला व नेत्रांना शोभा आलेली आहे, ॥ ४१ ॥ अशा त्या सुकुमार (अतिकोमळ) मूर्तीचें, सर्व अवयवावर मन लावून, ध्यान करावें धैर्यवान् पुरुषानें मनाच्या योगें सर्व इंद्रियें त्याच्या उपभोग्य विषयावरून आकर्षून घ्यावीं, व तें मन, बुद्धिरूप सारथीच्या साह्यानें, सर्वावयवयुक्त अशा माझ्या ठिकाणीं पूर्णपणे लावून ठेवावे ॥ ४२ ॥ - हीं ध्येय वस्तूचीं विशेषणें सांगितलीं' आतां मुख्य ध्येय वस्तु सांगतों - नंतर, समग्र ध्येय मूर्तीला व्यापणारें तें चित्त काढून केवळ एका ठिकाणीं लावावे, पुन्हा

दुसऱ्या अंगाचें ध्यान करूं नये, तर सुहास्ययुक्त अशा मुखाचेंच तेवढें ध्यान करावें. ॥ ४३ ॥ चित्त त्या आश्रयावर (मुहास्य वदनावर) स्थिर झालें असतां तेथून काढून सर्वकारणरूप आकाशाच्या ठिकाणीं धारण करावें नंतर त्याचा (कारणत्वाचा) हीं त्याग करून शुद्ध तत्त्वरूपीं आरूढ व्हावें व मग कशाचेंही चिंतन (ध्यान करणारा व ध्येय स्वरूप हीं वेगळीं आहेत हेंही चिंतन) करूं नये. ॥ ४४ ॥ अशा रीतीनें चित्ताची एकाग्रता केली असतां, जसें तेज तेजांत मिळून जातें, त्याप्रमाणें तो पुरुष मलाच (ईश्वराला) आत्म्याच्या ठिकाणी पाहूं लागतो व आत्माच सर्वात्मक अशा माझ्याशीं मिळून गेल्या असें पाहतो ॥ ४५ ॥ जो योगी अशा अत्यंत तीव्र ध्यानाच्या योगें माझ्या सुस्मितं मुखं भावयेत्. ॥ ४३ ॥ तत्र लब्धपदं (मिळालें स्थान ज्याला असें) चित्तं आकृष्य व्योम्नि (आकाशीं) धारयेत् तत् त्यक्त्वा मदारोहः (मत्स्वरूपीं आरूढ) [सन्] किंचित् अपि न चिंतयेत्. ॥ ४४ ॥ एवं समाहितमतिः ज्योतिषि ज्योतिः [इव] मां एव आत्मनि, आत्मानं [च] सर्वात्मन् मयि संयुतं विचष्टे ॥ ४५ ॥

तत्र लब्धपदं चित्तमाकृष्य व्योम्नि धारयेत् ॥ तच्च त्यक्त्वा मदारोहो न किंचिदपि चिन्तयेत् ॥ ४४ ॥

एवं समाहितमतिर्मामेवाऽऽत्मानमात्मनि ॥ विचष्टे मयि सर्वात्मन् ज्योतिर्ज्योतिषि संयुतम् ॥ ४५ ॥

ध्यानेनेत्थं सुतीव्रेण युंजतो योगिनो मनः ॥ संयास्यत्याशु निर्वाणं द्रव्यज्ञानक्रियाभ्रमः ॥ ४६ ॥

॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे चतुर्दशो ऽध्यायः ॥ १४ ॥

श्रीभगवानुवाच । जितेंद्रियस्य युक्तस्य जितश्वासस्य योगिनः ॥ मयि धारयतश्चेत उपतिष्ठंति सिद्धयः ॥१॥

इत्थं सुतीव्रेण ध्यानेन मनः युंजतः (लावणाऱ्या) योगिनः द्रव्यज्ञानक्रियाभ्रमः आशु निर्वाणं (नाशाला) संयास्यति (जाईल) ॥ ४६ ॥

॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे चतुर्दशो ऽध्यायः ॥ १४ ॥

श्रीभगवान् उवाच— जितेंद्रियस्य युक्तस्य जितश्वासस्य मयि चेतः धारयतः योगिनः सिद्धयः उपतिष्ठंति (जवळ येतात) ॥ १ ॥

ठिकाणीं मन लावितो, त्याचा द्रव्य, ज्ञान व क्रिया (अनुक्रमें अधिभूत, अधिदैव व अध्यात्म असा त्रिविध द्रव्य, द्रष्टा व दर्शन असा) हा भ्रम तत्काळ नाहींसा होतो ॥ ४६ ॥

॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने एकादशस्कंधे चतुर्दशो ऽध्यायः ॥ १४ ॥

श्रीभगवान् म्हणाले :— उद्धवा, जो पुरुष प्राणवायु व इंद्रियें जिंकून चित्त स्थिर करितो आणि तें चित्त मजठायीं एकाग्रतेनें लावूं लागतो, त्याला सिद्धि प्राप्त होतात (त्या सिद्धि माझ्या प्राप्तीचीं विघ्नें होत. म्हणून योग्यानें त्यांना मोहून जाऊं नये) ॥ १ ॥

उद्धव ह्मणाला '—अच्युता, कोणती धारणा केली असता कोणत्या नांवाची व कशा प्रकारची सिद्धि प्राप्त होते आणि त्या सिद्धी किती आहेत. ते मला सांग - ह्या गोष्टी तुलाच ठाऊक असावयाच्या, कारण, - योग्याना सिद्धि देणारा तू होस. ॥ २ ॥ श्रीभगवान् ह्मणाले – उद्धवा. योगशास्त्रामध्ये निपुण पुरुषानीं सिद्धि अठरा प्रकारच्या सांगून दिल्या आहेत व धारणाही तितक्याच आहेत. त्यांपैकीं आठ सिद्धि माझ्याच आश्रयानें राहतात (माझ्या स्वरूपतेस पावणाराला माझ्याहून थोड्या न्यून अशानें प्राप्त होतात), आणि बाकी दहांच्या प्राप्तीला कारण सत्त्वगुणाचा उत्कर्ष हेच होय. ॥ ३ ॥ - त्या सिद्धींचीं नावे व स्वरूपे सांगतों ऐक - (१) अणिमा (शरीर सूक्ष्म होणें),

उद्धवः उवाच— अच्युत, कया धारणया सिद्धिः कास्वित्? कथंस्वित्? सिद्धय कति वा? ब्रूहि भवान् योगिना सिद्धिद . ॥ २ ॥ श्रीभगवान् उवाच— योगपारगैः

उद्धव उवाच । कया धारणया कास्वित्कथंस्वित्सिद्धिरच्युत ॥ कति वा सिद्धयो ब्रूहि योगिना सिद्धिदो भवात् ॥ २ ॥

श्रीभगवानुवाच । सिद्धयोऽष्टादश प्रोक्ता धारणा योगपारगैः ॥ तासामष्टौ मत्प्रधाना दशैव गुणहेतवः ॥ ३ ॥

अणिमा महिमा मूर्तेर्लघिमा प्राप्तिरिंद्रियैः ॥ प्राकाम्यं श्रुतदृष्टेषु शक्तिप्रेरणमीशिता ॥ ४ ॥ गुणेष्वसंगो वशिता

यत्कामस्तदवस्यति ॥ एता मे सिद्धय· सौम्य अष्टावौत्पत्तिका मताः ॥ ५ ॥

सिद्धयः, धारणाः [च] अष्टादश प्रोक्ताः. तासां अष्टौ मत्प्रधानाः दश गुणहेतवः एव. ॥ ३ ॥ मूर्ते अणिमा, महिमा लघिमा, इंद्रियै प्राप्ति, श्रुतदृष्टेषु प्राकाम्य, शक्तिप्रेरण; ईशिता, ॥ ४ ॥ गुणेषु असंग, वशिता, यत्काम., तत् अवस्यति, सौम्य, एता अष्टौ सिद्धय मे औत्पत्तिका (स्वाभाविक) मता.. ॥ ५ ॥

(२) महिमा (शरीर मोठे होणे), व (३) लघिमा (शरीर हलके होणे) ह्या सिद्धि देहाच्या होत, (४) प्राप्ति नावाची सिद्धि ह्म० सर्व प्राण्याच्या इंद्रियाशीं योग्याचा त्या त्या इंद्रियाच्या अधिष्ठात्री देवताच्या रूपाने संबंध घडणे ही होय, (५) आपल्याला जी ऐकून ठाऊक आहेत त्या स्वर्गादि पारलौकिक स्थानीं व जीं दिसण्याजोगीं आहेत त्या इह लोकीच्या स्थली भोगदर्शनाचे सामर्थ्य ही प्राकाम्य नावाची सिद्धि समजावी, (६) शक्तींची ह्म० मायेची व तिच्या अंशाची - अनुक्रमें ईश्वराच्या ठिकाणीं व इतराच्या ठिकाणीं - प्रेरणा ही ईशित्व[3] सिद्धि होय, ॥ ४ ॥ (७) विषय भोगीत असूनही त्याच्या ठिकाणीं आसक्त न होणे ह्याला वशिता सिद्धि ह्मणतात, आणि

१ ह्यावरून त्रिकालज्ञान इत्यादि क्षुद्र सिद्धि इतरानाही ठाऊक असतात हे सूचित होत

२ दश तु गुणहेतवः विषयप्राप्तिहेतुभूता एव तुच्छा इत्यर्थः (दहा तर विषयभोगप्राप्तीला कारणभूत एवढ्याच, अर्थात तुच्छ होत)

३ बालप्रबोधिनीकार ह्या सिद्धीचें स्वरूप ' दुसऱ्याच्या इंद्रियाना व अंतःकरणाना यथेच्छ प्रेरणा देता येणें ' एवढेच समजतात

(८) ज्या ज्या सुखाची इच्छा करावी तें तें सुख अमर्याद प्राप्त होणें. ही प्राकाम्य नावाची सिद्धि होय. - हे मैं[illegible] ' उद्धवा [illegible] माझ्या [illegible] सिद्धि [illegible]
- आणि निरतिशय - मानिलेल्या आहेत. ॥ ६ ॥ - आता गुणमूलक सिद्धि मग तो - (१) ह्या देहाच्या ठिकाणीं - [illegible], तहान, शोक, मोह, जरा, मृत्यु ह्या सहापैकीं - को-
णत्याही लहरी न उचंबळणें; (२) दूरचे ध्वनि ऐकणें, (३) दूरचे पदार्थ पाहणें (४) [illegible] (५) इच्छेस येईल तसें [illegible] (६)
दुसऱ्याच्या देहात प्रवेश करणें; ॥ ६ ॥ (७) इच्छेस येईल तेव्हा मरणें. (८) अप्सरांबरोबर देव ज्या क्रीडा करितात त्या पाहणें (९) [illegible]
प्राप्ति घडणें, आणि (१०) आज्ञा जिकडे तिकडे अकुंठित चालणें - ह्या दहा सिद्धि गुणनिमित्तक होत - [illegible] सिद्धि [illegible]
अस्मिन् देहे अनूर्मिमत्त्वं; दूरश्रवणदर्शनं; मनोजवः; कामरूपं; परकायप्रवेशनं. ६. स्वच्छन्दमृत्युः, देवानां सह क्रीडा [illegible] यथासंकल्पसंसिद्धिः अप्रतिहतागतिः [illegible]
सर्वत्र. स्वार जिचा नाही) आज्ञा [पुनः गुणहेतवः दश]. ॥७॥ त्रिकालज्ञत्वं, अद्वन्द्वं, [illegible] परचित्त [illegible] अग्न्यर्काम्बुविषादीनां प्रतिष्टम्भ [illegible]

अनूर्मिमत्त्वं देहेऽस्मिन्दूरश्रवणदर्शनम् ॥ मनोजवः कामरूपं परकायप्रवेशनम् ॥ ६ ॥ स्वच्छन्दमृत्युर्देवानां सह क्रीडानुदर्शनम् ॥
यथासंकल्पसंसिद्धिराज्ञाऽप्रतिहता गतिः ॥ ७ ॥ त्रिकालज्ञत्वमद्वंद्वं परचित्ताद्यभिज्ञता । अग्न्यर्काम्बुविषादीनां प्रतिष्टम्भोऽपराजयः
॥ ८ ॥ एताश्चोद्देशतः प्रोक्ता योगधारणसिद्धयः ॥ यया धारणया या स्याद्यथा वा स्यान्निबोध मे ॥ ९ ॥ भूतसूक्ष्मात्मनि मयि तन्मात्रं
धारयेन्मनः ॥ अणिमानमवाप्नोति तन्मात्रोपासको मम ॥ १० ॥

चालु न देणें), अपराजयः, ॥ ८ ॥ एताः योगधारणसिद्धयः उद्देशतः प्रोक्ताः. यया धारणया या, यथा वा स्यात्, [एतत्] मे निबोध [illegible] । भूतसूक्ष्मात्मनि मयि तन्मात्र
मनः धारयेत्, तन्मात्रोपासकः मम अणिमानं अवाप्नोति. । १० ॥
शीतोष्णादिकांपासून त्रास न होणें (३) दुसऱ्याचें मनोगत कळणें (४) अग्नि, सूर्य, उदक, विष इत्यादिकांच्या शक्ति [illegible] (५) [illegible]
- ह्या पाच क्षुद्र सिद्धि होत. - ॥ ८ ॥ योगधारणेच्या योगें प्राप्त होणाऱ्या ह्या सिद्धि [illegible] कोणती सिद्धि [illegible]
पासून ऐकून घे. ॥ ९ ॥ सूक्ष्म भूत ज्याच्या उपाधि अशा माझे ठिकाणीं जो पुरुष सूक्ष्म [illegible] मन [illegible]
अणिमा सिद्धि (शरीर सूक्ष्म होणें ही)* प्राप्त होते. ॥ १० ॥

* तो अच्छिद्रीं निघोनि जाये । अन्नाच्या डाळ्यामाजीं समाये । कोठेंही [illegible] । [illegible] । [illegible] ३, ७२

ज्ञानशक्ति महत्तत्त्व माझेंच रूप होय, त्या माझ्या ठिकाणीं जो पुरुष महत्तत्त्वाकार असें आपलें मन धारण करितो तो, आणि तसाच भूतांची (आकाशादि भूतोपाधि अशा माझी) वेगवेगळी उपासना करणारा पुरुष महिमा (शरीर मोठें होणें) ही सिद्धि पावतो. ॥ ११ ॥ वायु तेज इत्यादि भूतांचे परमाणु ज्याचे उपाधि अशा (परमाणुरूप) माझ्या ठिकाणी आपलें चित्त रमविणारा योगी कालाच्या परमाणूइतकें स्वरूप होणें ह्या लघिमा नामक सिद्धीस पावतो ॥ १२ ॥ सात्त्विक अहंकार ज्याचा उपाधि अशा माझ्या ठिकाणी एकाग्रपणे महति परे (ज्ञानशक्ति) आत्मन् मयि मन: दधत् [सन्] यथासंस्थ (महत्तत्त्वाकार) महिमान अवाप्नोति. भूताना च पृथक् पृथक् [तत्तद्भूतोपाधौ मयि मन: दधत् सन् तत्तन्महिमानं प्राप्नोति]. ॥ ११ ॥ भूताना परमाणुमये मयि चित्त रंजयन् योगी कालसूक्ष्मार्थतां (कालाच्या सूक्ष्म—परमाणुम) लघिमान अवाप्नुयात् ॥ १२ ॥ वैकारिके

महत्यात्मन्मयि परे यथासंस्थं मनो दधत् ॥ महिमानमवाप्नोति भूताना च पृथक् पृथक् ॥ ११ ॥ परमाणुमये चित्त भूतानां मयि रंजयन् ॥ कालसूक्ष्मार्थतां योगी लघिमानमवाप्नुयात् ॥ १२ ॥ धारयन्मय्यहंतत्त्वे मनो वैकारिकेऽखिलम् ॥ सर्वेंद्रियाणामात्मत्वं प्राप्तिं प्राप्नोति मन्मनाः ॥ १३ ॥ महत्यात्मनि यः सूत्रे धारयेन्मयि मानसम् ॥ प्राकाम्यं पारमेष्ठ्यं मे विंदतेऽव्यक्तजन्मनः ॥ १४ ॥ विष्णौ त्र्यधीश्वरे चित्तं धारयेत्कालविग्रहे ॥ स ईशित्वमवाप्नोति क्षेत्रक्षेत्रज्ञचोदनाम् ॥ १५ ॥

(सात्विक) अहंतत्त्वे मयि अखिलं (एकाग्र) मन, धारयन् मन्मनाः सर्वेंद्रियाणा आत्मत्वं (अधिष्ठातृत्व) प्राप्ति प्राप्नोति ॥ १३ । य महति आत्मनि सूत्रे मयि मानस धारयेत्, [सः] अव्यक्तजन्मनः (प्रकृतीपासून उत्पन्न झालेलें महत्तत्त्व उपाधि ज्याचा अशा) मे पारमेष्ठ्य प्राकाम्यं विंदते ॥ १४ ॥ [यः] त्र्यधीश्वरे कालविग्रहे (कालमति, सर्वांना चित्त लावणारा पुरुष मजकडे मन लागून गेले कीं सर्वांच्या इंद्रियांच्या अधिष्ठात्री देवता * होणे ह्या प्राप्ति नामक सिद्धीस पावतो ॥ १३ ॥ क्रियाशक्तिप्रधान व ज्याला सूत्र ह्मणतात त्या महत्तत्त्वरूप माझे ठिकाणीं जो कोणी आपले चित्त लावील, त्याला ज्याची उत्पत्ति प्रधानापासून झाली ते सूत्र ज्याचा उपाधि त्या माझी सर्वोत्कृष्ट अशी प्राकाम्य नावाची सिद्धि प्राप्त होईल. ॥ १४ ॥ त्रिगुणात्मक मायेचा नियता ह्मणून कालरूपी (सर्वांचे आकलन करणारा अतर्यामी) व सर्वव्यापी अशा माझे ठिकाणीं जो चित्त

१ तुळितां त्याच्या समान मारा । न पुरे सगळी सपर्वत धरा । पवढ्या महत्त्वाच्या उभारा । सिद्धिद्वारा तो पावे ॥ नाथ, ७४

२ जडपणा अयदीं नसतो, हें दर्शविण्यासाठीं 'कालाच्या परमाणूसरखा' असें ह्मटलें पृथ्वीच्या परमाणु ह्मटला कीं त्याला थोडा तरी जडपणा असणारच कालाचे स्पाधिकृत परमाणु कल्पिले आहेत ह्मतीयस्कंध अ० ११ पहा

* जे कां इंद्रिय व्यापार जगाचे । प्रकाशूनि हा देखे साचे । येर्‍हवीं ये इंद्रिय प्राप्तीचें । साधी सिद्धीचें वैभव ॥ नाथ, ८१०.

ठावील, त्या पुरुषाला ईशित्व ह्मणजे जीवाना व त्यांच्या उपाधींना (देहेंद्रियाना) प्रेरणा देणे ही सिद्धि मिळते. १५ । ज्याचा तुरीय ह्मणजे जे विश्व [illegible] आणि कारण ह्या तीनेही उपाधींनी रहित आहे) व भगवत् ह्या शब्दाने ज्याचे वर्णन केले जाते असे जे माझे नारायणरूप त्याचे ठिकाणी चित्त [illegible] योगी वशिता (विषय भोगीत असताही आसक्त न होणे) ही सिद्धि पावतो । १६ ॥ जो कोणी आपले मन निर्मळ करून निर्गुण ब्रह्मरूप माझे ठिकाणी लावितो तो पुरुष

आवळणारा-अंतर्यामी असा) विष्णौ चित्तं धारयेत्, सः क्षेत्रज्ञक्षेत्रचोदनां ईशित्वं अवाप्नोति. । १५ । तुरीयाख्ये । तुरीय-चतुर्थ-स्वरूप) भगवच्छब्दशब्दिते ([illegible] वर्णिलेल्या ह्मं० षड्गुणैश्वर्यसंपन्न) नारायणे मयि मन आदधत् मद्धर्मा योगी वशितां इयात्. । १६ । निर्गुणे ब्रह्मणि मयि विशद (निर्मळ) मन धारयन् परमानंद आप्नोति

नारायणे तुरीयाख्ये भगवच्छब्दशब्दिते ॥ मनो मय्यादधद्योगी मद्धर्मा वशितामियात् ॥१६॥ निर्गुणे ब्रह्मणि मयि धारयन्विशदं मनः ॥

परमानंदमाप्नोति यत्र कामोऽवसीयते ॥१७॥ श्वेतद्वीपपतौ चित्तं शुद्धे धर्ममये मयि ॥ धारयन् श्वेततां याति षडूर्मिरहितो नरः ॥१८॥

मय्याकाशात्मनि प्राणे मनसा घोषमुद्वहन् ॥ तत्रोपलब्धा भूतानां हंसो वाचः शृणोत्यसौ ॥ १९ ॥

यत्र कामः अवसीयते (समाप्त होतो). ॥ १७ ॥ श्वेतद्वीपपतौ शुद्धे धर्ममये मयि चित्त धारयन् नरः षडूर्मिरहित [सन्] श्वेतता (शुद्धतेते) याति. ॥ १८ ॥ आकाशात्मनि प्राणे मयि मनसा घोषं (नादाला) उद्वहन् (चिंतन करणारा) असौ हंस [illegible]) तत्र उपलब्धाः भूतानां वाचः शृणोति १९ ।

परमानंद पावतो. हा परमानंद प्राप्त झाला असतां सकल इच्छा समाप्त होतात (हीच नावाच्या नावाची सिद्धि होय) १७ [illegible] अनिरुद्ध [illegible] व शुद्धसत्त्वात्मक जो मी (अनिरुद्धमूर्ति), त्या माझे ठायीं चित्त धारण करणाराचे स्वरूप शुद्ध होते व त्या मनुष्याला क्षुधा, तृषा, शोक, मोह, जरा आणि मृत्यु [illegible] बाधा करीत नाहीत. ॥ १८ ॥ * आकाशरूपी व समष्टि भूताचा समष्टि प्राण जो मी त्या समष्टीचे मनाच्या योगें नादाचे जे चिंतन करितो तो येथे त्या आकाशात [illegible]

---

१ तो आपुलेनि प्रताप स्वभावी । मशका हाती मेरु विभाडवी । नीचहस्तें सृष्टि विध्वंसूनि मांडवी [illegible] सर्वां ईश्वरा हाती । [illegible]

२ किंवा, नाथ ह्मणतात— जीव, शिव आणि प्रकृति याहून पर [illegible] [illegible]

३ ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः । ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भग इतीरणा ॥

ऐश्वर्य, धर्म, कीर्ति, संपत्ति, ज्ञान व वैराग्य या सहा परिपूर्ण [illegible] [illegible]

* सर्वांस प्राप्तेसी शब्द महिमा अवकाश विश्रांतीस ये व्योमा । त्या आकाशाचाही मी आत्मा । मज मानी व्योमा रहित्वास ॥ नाथ १०१.

४ किंवा उपलब्धा शब्दांचा अर्थ ज्ञाता, जाणणारा, [illegible]

येणाऱ्या दूरदूरच्या वाणी श्रवण करितो (त्याला ' दूर प्रदेशातून बोललेले ऐकूं येणे ' ही सिद्धि प्राप्त होते). ॥ १९ ॥ नेत्रेंद्रियाचा सूर्याचे ठायीं आणि सूर्याचाही नेत्रेंद्रियाचे ठायीं संयोग करून त्या दोहोंच्या संयोगामध्ये जो कोणी माझें मनानें चिंतन करितो त्याची दृष्टि सूक्ष्म (दूरचे पदार्थ पाहणारी) होते व तो समस्त विश्व पाहू शकतो ॥२०॥ मनाला व देहाला त्याचा अनुयायी जो प्राणवायु त्या सहवर्तमान, मजठिकाणीं लावून जो माझी धारणा केली जाते तिच्या प्रभावानें जेथें मन जाईल तेथें देहही जाऊन पोचावा. ही सिद्धि प्राप्त होते. ॥ २१ ॥ मनाला उपादानकारण करून योगी जे जें देवादिकाचें रूप घेऊं इच्छितो त्या वेळीं योगी ते ते मनाचे इच्छिलेलें रूप घेऊं शकतो - कारण, अचिन्त्यशक्ति व नानारूपधारी जो मी त्या माझ्या ठिकाणीं मनाची धारणा करणें ह्या योगाचें सामर्थ्यच त्याला आश्रय असतें (ह्या योगबळाच्या आधारावर त्याला पाहिजे तसें रूप

त्वष्टरि (सूर्याचे ठायीं) चक्षु[1], चक्षुषि त्वष्टारं अपि संयोज्य मनसा तत्र मां ध्यायन् सूक्ष्मदृक् विश्वं पश्यति ॥ २० ॥ मयि मनः, देह [च] तदनुवायुना [सह] सुसंयोज्य मद्धारणानुभावेन यत्र मनः, तत्र आत्मा [याति]. ॥ २१ ॥ यदा मनः उपादाय यत् यत् रूपं बुभूषति (होऊं इच्छितो) तत् तत् मनोरूपं भवेत् मद्योगबल

चक्षुस्त्वष्टरि संयोज्य त्वष्टारमपि चक्षुषि ॥ मां तत्र मनसा ध्यायन्विश्वं पश्यति सूक्ष्मदृक् ॥ २० ॥ मनो मयि सुसंयोज्य देहं तदनु वायुना ॥ मद्धारणाऽनुभावेन तत्राऽऽत्मा यत्र वै मनः ॥ २१ ॥ यदा मन उपादाय यद्यद्रूपं बुभूषति ॥ तत्तद्भवेन्मनोरूपं मद्योगबलमाश्रयः ॥२२॥ परकायं विशन्सिद्ध आत्मानं तत्र भावयेत् ॥ पिंडं हित्वा ऽऽविशेत्प्राणो वायुभूतः षडंघ्रिवत् ॥२३॥

पार्ष्ण्या ऽऽपीड्य गुदं प्राणं हृदुरःकंठमूर्धसु ॥ आरोप्य ब्रह्मरंध्रेण ब्रह्म नीत्वोत्सृजेत्तनुम् ॥ २४ ॥

आश्रय.. ॥ २२ ॥ परकायं विशन् (प्रवेश करणारा) सिद्धः तत्र आत्मानं भावयेत्. पिंड (देह) हित्वा (टाकून) प्राणः वायुभूत (वायूमध्ये प्रविष्ट) षडंघ्रिवत् (भ्रमराप्रमाणें) आविशेत्. ॥ २३ ॥ पार्ष्ण्या (खोटेने) गुदं आपीड्य (बंद करून) हृदुरःकंठमूर्धसु प्राण आरोप्य ब्रह्मरंध्रेण ब्रह्म नीत्वा तनु उत्सृजेत् (सोडो) ॥ २४ ॥

धारिता येते). ॥ २२ ॥ दुसऱ्याच्या शरीरांत प्रवेश करावयाचा असेल, तेव्हा योग्यानें त्या देहामध्यें आत्म्याची भावना करावी व जसा भ्रमर एका फुलावरून दुसऱ्या फुलावर अनायासें उडून जातो तसा, आपला स्थूल देह सोडून, प्राण ज्यामध्ये मुख्य त्या लिंगशरीरासह, बाह्य वायूमध्ये प्रविष्ट होऊन त्या मार्गें त्या दुसऱ्याच्या देहांत प्रवेश करावा ॥ २३ ॥ - आतां शरीर सोडावें कसें व इच्छामरणसिद्धि ती काय तें सांगतो - योग्यानें आपल्या पायाच्या खोटेनें गुदद्वार बंद करून प्राणाला (प्राण ज्याची उपाधि त्या आत्म्याला) हृदय, उर, कंठ व मस्तक ह्या स्थानीं चढवावें आणि ब्रह्मरंध्रमार्गानें ब्रह्मस्वरूपी (हे एक उपलक्षण होय- किंवा आपल्या इच्छेस येईल त्या स्थानीं मनानें)

1 किंवा ' मन हें स्वतःला व प्राणवायूसह देहाला माझेठिकाणीं लावून जेथें जाईल तेथें देहही जातो, ' असा अर्थ करावा.

मिळून मग शरीराचा त्याग करावा. ॥ २४ ॥ आतां स्वर्गाच्या मनात देवांच्या उपवनांमध्यें क्रीडा करावी अशी इच्छा असेल, तर त्यानें मत्स्वरूप शुद्ध सत्त्वाचें चिंतन करावें. तेणेंकरून सत्त्वांशापासून उद्भवलेल्या देवांगना (अप्सरा) विमानाच्या योगें तेथें प्राप्त होतात. " २५ ". माझे स्वरूप सदैव सत्य असतात. माझे ठिकाणीं मन लावणारा व माझ्या उपासनेमध्यें तत्पर असा पुरुष बुद्धीनें कोणत्याही वेळीं कशाही प्रकारचा - संकल्प करो, त्याच्या संकल्पानुरूप त्या त्या वस्तु त्याला पूर्णपणें प्राप्त होतात. ॥२६॥ मी सर्वांचा नियामक व स्वतंत्र आहें; जो पुरुष ध्यानप्रभावानें माझ्या स्वभावास प्राप्त झाला, त्याची आज्ञा, माझी आज्ञा केव्हांही उल्लंघिली जात नाही तशीच,
सुराक्रीडे विहरिष्यन् मत्स्थं सत्त्वं विभावयेत्. सत्त्ववृत्तीः (सत्त्वांशापासून उत्पन्न झालेल्या) सुरस्त्रियः विमानेन उपतिष्ठन्ति. । २५ । पुमान् मत्परः मयि मनः युंजन् [सन्] बुद्ध्या यथा संकल्पयेत्, यथा वा मत्परः [भवति], तथा तत् समुपाश्नुते. । २६ ॥ यः पुमान् ईशितुः वशिनुः मद्भावं [प्राप्तः] [तस्य] आज्ञा, मदाज्ञा यथा मम,

विहरिष्यन् सुराक्रीडे मत्स्थं सत्त्वं विभावयेत् ॥ विमानेनोपतिष्ठन्ति सत्त्ववृत्तीः सुरस्त्रियः ॥ २५ ॥ यथा संकल्पयेद्बुद्ध्या यदा वा मत्परः पुमान् ॥ मयि सत्ये मनो युंजंस्तथा तत्समुपाश्नुते ॥ २६ ॥ यो वै मद्भावमापन्न ईशितुर्वशितुः पुमान् ॥ कुतश्चिन्न विहन्येत तस्य चाऽऽज्ञा यथा मम ॥ २७ ॥ मद्भक्त्या शुद्धसत्त्वस्य योगिनो धारणाविदः ॥ तस्य त्रैकालिकी बुद्धिर्जन्ममृत्यूपबृंहिता ॥ २८ ॥ अग्न्यादिभिर्न हन्येत मुनेर्योगमयं वपुः ॥ मद्योगश्रान्तचित्तस्य यादसामुदकं यथा ॥ २९ ॥

[तथा] कुतश्चित् न—विहन्येत (कोठेंही भग्न नाहीं). । २७ ॥ मद्भक्त्या शुद्धसत्त्वस्य धारणाविदः योगिनः त्रैकालिकी जन्ममृत्यूपबृंहिता बुद्धिः [भवति]. । २८ ॥ मद्योगश्रांतचित्तस्य (माझ्या योगानें थकलेलें चित्त ज्याचें आहे) मुनेः योगमयं वपुः यथा यादसां उदकं, [तथा] अग्न्यादिभिः न हन्येत. । २९
कोणाकडूनही मोडिली जाणार नाहीं. - ह्या गुणनिमित्तक सिद्धि होत. - । २७ । - आतां क्षुद्र सिद्धि निरूपण करितो - माझ्या भक्तीच्या योगें ज्याचें चित्त शुद्ध झालें व मन निकालज्ञ ईश्वराची धारणा ज्याला करून आली त्या योग्याला भूत भविष्य वर्तमान तिन्ही काळांच्या वस्तूंविषयीं व त्याचप्रमाणें जन्ममृत्यूविषयीं ज्ञान प्राप्त होतें. दुसऱ्याच्या मनांतील अभिप्राय ह्या धारणेनें जाणितां येतात. । २८ ॥ माझी योगधारणा करण्याने ज्याचें अन्तःकरण श्रम पावतें व ज्याचें शरीर योगमय झालें (अग्नि उदक इत्यादिकांनी ज्याला बाधा होत नाहीं अशा भगवत्स्वरूपाची धारणा ज्याच्या शरीरात असते त्याविषयीं), त्या पुरुषाच्या शरीरास अग्नि, उदक इत्यादिकांनीं पीडा होत नाहीं,

१ जेथें सत्त्वें स्थावा आपण । स्वर्गीं स्थापिले सुरगण । त्या सत्त्वगुणाचें धारण । निज हृदयीं आपण जो राखे । त्याला सुर स्त्रियांचें कामनिग्रा । तो पावे सुरस्वर्गांचें प्रतिष्ठा । विमानीं चढोनि वरिष्ठा । करी कामक्रीडा अप्सरांसीं ॥ नाथ, १५२ । ४८.

भा० स्क० ११, २६ ॥

नाहीं. उदाहरण पहा :– जळचर प्राण्यांना उदकाचा त्रास कधींच होत नाहीं (तशीच योग्याच्या त्या योगमय शरीराला अग्न्यादिकाची बाधा होत नाहीं) - शीत उष्ण, सुख दुःख इत्यादि द्वंद्वें सहन करण्याची शक्ति ह्या धारणेनेंच प्राप्त होते - ॥ २९ ॥ श्रीवत्सादि चिन्हें व सुदर्शनादि आयुधें यांनी सुशोभित व ध्वज, छत्र, चामर ह्या लक्षणांनी युक्त अशा माझ्या अवताराचें जो ध्यान करितो त्याचा कोठेंही पराजय होत नाहीं. ॥ ३० ॥ अशा रीतीनें वेगवेगळ्या योगधारणेच्या योगें माझी उपासना करणाऱ्या मुनीला पूर्वी सांगितलेल्या सिद्धि सर्वथा प्राप्त होतात. ॥ ३१ ॥ ज्यानें आपलीं ज्ञानेंद्रियें स्वाधीन करून घेतलीं, बाह्य इंद्रियें दमविलीं, आणि प्राणवायु व चित्त वश करून घेऊन माझें (अवस्था-

[यः] श्रीवत्सास्त्रविभूषिताः मद्विभूतीः ध्वजातपत्रव्यजनैः [सह] अभिध्यायन् [भवति], सः अपराजितः भवेत् ॥ ३० ॥ एवं योगधारणया मा उपासकस्य मुनेः पूर्वकथिताः

> मद्विभूतीरभिध्यायन् श्रीवत्सास्त्रविभूषिताः ॥ ध्वजातपत्रव्यजनैः स भवेदपराजितः ॥ ३० ॥
> उपासकस्य मामेवं योगधारणया मुनेः ॥ सिद्धयः पूर्वकथिता उपतिष्ठन्त्यशेषतः ॥ ३१ ॥ जितेंद्रि-
> यस्य दांतस्य जितश्वासात्मनो मुनेः ॥ मद्धारणां धारयतः का सा सिद्धिः सुदुर्लभा ॥ ३२ ॥
> अंतरायान्वदंत्येता युंजतो योगमुत्तमम् ॥ मया संपद्यमानस्य कालक्षपणहेतवः ॥ ३३ ॥

सिद्धयः अशेषतः उपतिष्ठंति. ॥ ३१ ॥ जितेंद्रियस्य दांतस्य जितश्वासात्मनः मद्धारणां धारयतः मुनेः का सा सिद्धिः सुदुर्लभा? ॥ ३२ ॥ उत्तमं योगं युंजतः मया संपद्यमानस्य कालक्षपणहेतवः (काळ घालविण्यास कारण) एताः अंतरायान् (विघ्न) वदंति. ॥ ३३ ॥

त्रयातीत नारायणाचें) ध्यान चालविलें, त्या पुरुषाला विशेष दुर्मिळ अशी सिद्धि आहे कोणती?[1] - कोणतीच नाहीं एवढी धारणा केली कीं पुरे आहे, विविध धारणाचे प्रयास अनावश्यक होत. - ॥ ३२ ॥ - अशा प्रकारें योगाभ्यासी पुरुषाला सिद्धि मिळतात खऱ्या, पण त्यानें त्या सिद्धीची इच्छा धरूं नये. कारण, - उत्तम योगाभ्यास करणाराला ह्या सिद्धि म्हणजे विघ्न होत असें म्हणतात जो पुरुष लवकरच माझी प्राप्ति करून घेणार, त्याला ह्या सिद्धि निरर्थक वेळ मोडण्याला कारण होतात (म्हणून योग्यानें ह्यांच्या नादी

---

1 ह्याला नाथांनीं अविद्यय उत्तम दृष्टांत दिला आहे पहा.—

पावत पावता वाराणसी । तो वसनीसि गेला वेश्यागृहासी । तेथें भुलोनि त्याच्या भोगासी । सर्वस्व तियेसी समर्पी ॥ इयेपासूनि जीवें प्राणें । सर्वथा वेगळें नाहीं जाणें । ऐसा संकल्प करोनि तेथें । वश्य होणें वेश्येसी ॥ जंव असे गांठी गाठोडी । तंव ते त्यापाशीं लुडबुडी । निःशेष वेंचलिया कवडी । बाहेरी दवडी तत्काळ ॥ तो स्वर्ग- तांही न जाये । निर्लज्ज निःसंग होऊनि राहे । तरी आपणचि लाहूनि जाये । तैशाचि पाहे महासिद्धि ॥ नाथ, १८९ ते १९२.

असूं नये). ॥ ३३ ॥ जन्म, औषधि, तपश्चर्या व मंत्र यांच्या योगें ह्या जगात जेवढ्या सिद्धि मिळतात, त्या मला ... योगें (ह्या ...) प्राप्त होतात. इतर (जन्मादि) साधनांच्या योगें पुरुषाला योगसिद्धि (मत्सेकतामुक्ति इत्यादि) मिळत नाहीत ॥ ३४ ॥ ... मी या सिद्धि देणारा व त्यांचें रक्षण करणारा आहें. - केवळ सिद्धींचाच अधिपति असें नव्हे तर - मी ... धर्माचा व त्याचा उपदेश करणाऱ्या

इह जन्मौषधितपोमंत्रैः यावतीः सिद्धयः, ताः सर्वाः योगेन आप्नोति. अन्यैः योगगतिं न व्रजेत् ॥ ३४ ॥ अहं सर्वासाम् अपि सिद्धीनां हेतुः, पतिः प्रभुः [च] अहं,

जन्मौषधितपोमंत्रैर्यावतीरिह सिद्धयः ॥ योगेनाप्नोति ताः सर्वा नान्यैर्योगगतिं व्रजेत् ॥ ३४ ॥

सर्वासामपि सिद्धीनां हेतुः पतिरहं प्रभुः ॥ अहं योगस्य सांख्यस्य धर्मस्य ब्रह्मवादिनाम् ॥ ३५ ॥

अहमात्माऽऽन्तरो बाह्योऽनावृतः सर्वदेहिनाम् ॥ यथा भूतानि भूतेषु बहिरन्तः स्वयं तथा ॥३६॥

इति श्रीमागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥

योगस्य, सांख्यस्य, धर्मस्य ब्रह्मवादिनां [च प्रभुः]. ॥ ३५ ॥ अहं सर्वदेहिनां आन्तर ...) अनावृत ...) बाह्य ... आत्मा यथा भूतानि भूतेषु बहिः, अंतः [च], तथा स्वयं. ॥ ३६ ॥ ॥ इति श्रीमागवतान्वये एकादशस्कंधे पंचदशो ऽध्यायः । १५ ।

पुरुषाचाही स्वामी आहें. ॥ ३५ ॥ कारण, मी सकळ जीवाचा अंतर्यामी अर्थात आत्मा होय - तसा पण माझ्या स्वरूपाला मर्यादा नाही तर - मी बाह्य म्हणजे व्यापक असतो. कारण, मी कशानेंही आच्छादिलेला नाहीं, तर जशीं महाभूतें उद्भिज्जादि चारही प्रकारच्या भूतामध्यें प्रविष्ट असून बाहेर व्यापून असतात त्याचप्रमाणें मीही सर्वांच्या अंतरीं व बाहेरून व्यापून असतों. ॥ ३६ ॥ ॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शनें एकादशस्कंधे पंचदशो ऽध्यायः ॥ १५ ॥

१ कोणाला जन्मतः कोणाला औषधिसेवनानें, कोणाला तपानें व कोणाला मंत्रसामर्थ्यानें सिद्धि प्राप्त झालेल्या असतात. उदाहरणें पहा —

सर्पासि वायुधारण । मीनांसि जलतरण । पक्ष्यांसि नभोगमन । हे जन्मसिद्धि जाण स्वाभाविक ॥ ... सिद्धि ... — श्वेतमांदारीं गजानन । ... तुळशी साधिल्या जाण । सकळ विद्यांचें होय ज्ञान । धनधान्यसमृद्धि ॥ पिचुमंद (लिंब) नित्य सेविल्या देख । त्यासी बाधीना कोणी विख ॥ ... सिद्धि ... — ... पराक चांद्रायण । आसार जलाशय धूम्रपान । तप करी जें जें भावून । तें तें सिद्धि जाण तो पावे ॥ ऐक मंत्रसिद्धीचें लक्षण । प्रेतावरी बैसोनि आपण । एक रात्र नेटका अनुष्ठान । प्रेतदेवता संपूर्ण प्रसन्न होय ॥ इत्यादि नाथ, २०१-२१०.

उद्धव ह्मणाला — भगवंता, ज्याला उत्पत्ति व नाश नाहीत तसेंच ज्याला आवरण नाहीं तें साक्षात् परब्रह्म तू होस तुजपासूनच सकल प्राण्याचें रक्षण, उपजीवन, नाश व उत्पत्ति हीं चालतात (तूं सगळ्या जगाचें उपादान कारण आहेस) ॥ १ ॥ तू ल्हान मोठ्या सकल प्राण्याच्या ठिकाणीं राहतोस, पण ज्यानीं आपलें चित्त जिंकिलें नाही त्याना समजण्यास कठिण आहेस. भगवन्, वेदाचें तात्पर्य जाणणारे पुरुष यथार्थपणें (सर्वकारणभूत अशा तुला जाणून) तुझी उपासना करितात ॥ २ ॥ - एतावता तू सर्वात्मा आहेस हें उघड होय. तथापि, भगवंता, - ते मोठेमोठे ऋषि ज्या ज्या वस्तूच्या ठिकाणी भक्तिपूर्वक तुझी उपासना चालवून उत्तम सिद्धि पावतात, त्या त्या वस्तु (तुझ्या विभूति)

उद्धवः उवाच— त्वं अनाद्यंतं (उत्पत्तिनाशरहित) अपावृतं (अनाच्छादित) साक्षात् परमं ब्रह्म, सर्वेषां अपि भावानां (पदार्थांचे) त्राणस्थित्यप्ययोद्भव ॥ १ ॥ भगवन् ब्राह्मणाः अकृतात्मभिः (नाहीं जिंकिलें चित्त ज्यानीं त्यानीं) दुर्ज्ञेयं त्वा उच्चावचेषु भूतेषु याथातथ्येन (यथार्थ जाणून) उपासते ॥ २ ॥ परमर्षयः भक्त्या त्वा येषु, येषु च भावेषु उपासीनाः [संत.] संसिद्धिं प्रपद्यते (पावतात), तत् मे वदस्व. ॥ ३ ॥ भूतभावन, भूतात्मा [त्वं] भूतानां गूढः चरसि ते मोहितानि भूतानि पश्यत त्वा

उद्धव उवाच । त्वं ब्रह्म परमं साक्षादनाद्यंतमपावृतम् ॥ सर्वेषामपि भावानां त्राणस्थित्यप्ययोद्भवः ॥ १ ॥
उच्चावचेषु भूतेषु दुर्ज्ञेयमकृतात्मभिः ॥ उपासते त्वा भगवन्याथातथ्येन ब्राह्मणाः ॥ २ ॥ येषु येषु च भावेषु
भक्त्या त्वां परमर्षयः ॥ उपासीनाः प्रपद्यंते संसिद्धिं तद्वदस्व मे ॥ ३ ॥ गूढश्चरसि भूतात्मा भूतानां
भूतभावन ॥ न त्वां पश्यंति भूतानि पश्यंतं मोहितानि ते ॥ ४ ॥ याः काश्च भूमौ दिवि वै रसायां विभूतयो
दिक्षु महाविभूते ॥ ता मह्यमाख्याह्यनुभावितास्ते नमामि ते तीर्थपदाङ्घ्रिपद्मम् ॥ ५ ॥

न पश्यंति. ॥ ४ ॥ महाविभूते, भूमौ (भूमीवर) दिवि, रसायां (पाताळलोकीं), दिक्षु (दिशाकडे) च याः काः विभूतयः, ते अनुभाविताः ताः मह्यं आख्याहि (सांग) ते तीर्थपदांघ्रिपद्मं (तीर्थांचें स्थान अशा चरणकमलास) नमामि. ॥ ५ ॥

मला सांग. ॥ ३ ॥ तूं प्राण्यामध्यें गूढपणें वागत असतोस, कारण, तूं आत्मा व नियामक होस त्या ह्या समस्त प्राण्याना मोह घातला आहे ह्मणून, भगवता, हे प्राणी तुला पाहू शकत नाहींत. तुझी दृष्टि मात्र सर्वांवर असते. ॥ ४ ॥ हे महाविभूते, तुझ्या ज्या काही विभूति भूमीवर, स्वर्गामध्ये, पाताळलोकी किंवा दिशाच्या ठायी असतील ह्मणजे त्वा ज्या कोणत्याही स्थळीं आपली विशेष शक्ति ठेविली असेल, त्या सर्व विभूति किंवा तीं सर्व स्थळें मला निवेदन कर सकल तीर्थांचा आश्रय अशा तुझ्या चरणकमलास मी वंदन करितो ॥५॥

श्रीभगवान् म्हणाले :– उद्धवा, तूं प्रश्न जाणणाऱ्या लोकांत श्रेष्ठ आहेस. - सांप्रत त्वां मज जो प्रश्न विचारिला असाच हा प्रश्न, पूर्वी कुरुक्षेत्रामध्यें शत्रूंशीं युद्ध करण्याच्या इच्छेनें आलेल्या अर्जुनानें मला केला होता. ॥ ६ ॥ - युद्धप्रसंगीं विभूति समजून घेण्याचा प्रसंग आला कसा तेंही सांगतों ऐक. - अर्जुनाच्या मनांत राज्यप्राप्तीसाठीं ज्ञातीचा वध करणें अधर्म व निंद्य होय, असें आलें व त्याला ' मी मारणारा ' आणि ' हा मेलेला ' अशी सामान्य मनुष्यमात्राची बुद्धि उपजून तो युद्धापासून विमुख झाला ॥ ७ ॥ तेव्हां मीं युक्तीनें त्या नरवीराची समजूत घातली. नंतर त्यानें सांप्रत तूं मला विचारीत आहेस हाच प्रश्न युद्धाच्या प्रारंभीं मला विचारिला होता. - त्याप्रसंगीं मी त्याला जें
श्रीभगवान् उवाच— प्रश्नविदां श्रेष्ठ, विनशने (कुरुक्षेत्रात) सपत्नैः (शत्रूंशीं) युयुत्सुना अर्जुनेन अहं एव एतत् प्रश्नं पृष्टः (विचारिलेला) ॥ ६ ॥ [अर्जुनः] ' अहं हन्ता अयं हतः. " इति लौकिक. (सामान्य समजुतीचा) [सन्] राज्यहेतुकं ज्ञातिवधं गर्ह्यं (निंद्य), अधर्मं [च] ज्ञात्वा ततः निवृत्तः ॥ ७ ॥ तदा स पुरुषव्याघ्र मे युक्त्या प्रतिबोधित

श्रीभगवानुवाच । एवमेतदहं पृष्टः प्रश्नं प्रश्नविदां वर ॥ युयुत्सुना विनशने सपत्नैरर्जुनेन वै ॥ ६ ॥

ज्ञात्वा ज्ञातिवधं गर्ह्यमधर्मं राज्यहेतुकम् ॥ ततो निवृत्तो हंता ऽहं हतो ऽयमिति लौकिकः ॥ ७ ॥

स तदा पुरुषव्याघ्रो युक्त्या मे प्रतिबोधितः ॥ अभ्यभाषत मामेवं यथा त्वं रणमूर्धनि ॥ ८ ॥

अहमात्मोद्धवामीषां भूतानां सुहृदीश्वरः ॥ अहं सर्वाणि भूतानि तेषां स्थित्युद्भवाप्ययः ॥ ९ ॥

अहं गतिर्गतिमतां कालः कलयतामहम् ॥ गुणानां चाप्यहं साम्यं गुणिन्यौत्पत्तिको गुणः ॥ १० ॥

(समजावलेला) [सन्] यथा त्वं, [तथा] रणमूर्धनि (युद्धाच्या आरंभीं) एवं मां अभ्यभाषत ॥ ८ ॥ उद्धव, अहं अमीषां भूतानां आत्मा, सुहृद् ईश्वरः [च], अहं सर्वाणि भूतानि, तेषां स्थित्युद्भवाप्ययः ॥ ९ ॥ अहं गतिमतां गतिः. अहं कलयतां (वश करणाऱ्यांत) कालः. अहं गुणानां अपि साम्यं (सत्त्वादि गुणांचें) [illegible]
उत्तर सांगितलें तेंच आतां तुम्हांही सांगतों · ऐक : - ॥ ८ ॥ उद्धवा, मी ह्या भूतांचा आत्मा, हित मित्र व ईश्वर (सर्वांचा सामान्यतः उत्पन्न), व हे [illegible] सर्व भूतें असून त्यांच्या पालनाचें, उत्पत्तीचें व प्रलयाचें कारण आहें ॥ ९ ॥ गतिमान् पदार्थांची गति मी आहे. दुसऱ्याला आपल्या अंकित करणाऱ्यांमध्यें मुख्य जो काळ तो मी समजावा. गुणांमध्यें सर्वत्र समता मी होय (किंवा सत्त्वादि गुणांमध्यें साम्य ह्म० प्रधान मी आहें) गुणवान् पदार्थांच्या ठिकाणीं जे स्वभावसिद्ध गुण ' उदाहरणार्थ आकाशाच्या ठिकाणीं

* भारावतारार्जुनसंवादिस्वात्सवाय प्रश्नः सार्थत्यानेनेति सूचयन् संबोधयति । प्रश्नविदांवरेति (तत्त्व अवतार जो अर्जुन त्याच्या [illegible] हा प्रश्न विशेष मान्य होय असें सुचविण्यासाठीं ' प्रश्नविदांवर ' हें संबोधन आहे) [illegible]

शब्द), तो मी. ॥ १० ॥ त्रिगुणात्मक पदार्थांतील - प्रथम सृष्टि जें - सूत्र (क्रियाशक्तिप्रधान) तें मी आहें. महतामध्यें महत्तत्त्व मी होय सूक्ष्मामध्येंही मी अत्यंत सूक्ष्म जीवरूपी समजावा (सूक्ष्म शरीर जीवाचा उपाधि असल्यामुळें व जीव समजण्यास कठिण असल्यामुळे त्याला सूक्ष्म असें म्हटलें) दुर्जय कोटीमध्ये अग्रगण्य जे मन तें मी होय ११ ॥ वेद पढविणारामध्यें मी ब्रह्मदेव समजावा. मंत्रामध्यें त्रिवर्णात्मक (अकार-उकार-मकाररूपी) ॐकार मी आहें अक्षरामध्यें अकार माझें स्वरूप होय छंदांमध्ये त्रिपदा गायत्री मी आहें. ॥ १२ ॥ सकल देवामध्यें इंद्र हा मत्स्वरूप होय. अष्टवसूमध्यें जो वसु हविर्भाग ज्याचे त्या देवाला नेऊन पोंचवितो तो अग्नि मी आहें अदितिपुत्रामध्ये विष्णु

गुणिनि [यः] औत्पत्तिकः (स्वाभाविक) गुणः, [स. अहं]. ॥ १० ॥ अहं गुणिनां अपि सूत्र (पहिलें कार्य क्रियाशक्ति सूत्र) अहं महतां महान् (महत्तत्व) अहं सूक्ष्माणां अपि जीवः. अहं दुर्जयानां मनः. ॥ ११ ॥ [अहं] वेदानां (वेद पढविणारामध्यें) हिरण्यगर्भः, मंत्राणां त्रिवृत् (त्रिवर्णात्मक) प्रणवः, अक्षराणां अकार अस्मि अहं छंदसां पदानि (त्रिपदा गायत्री). ॥ १२ ॥ अहं सर्वदेवानां इंद्रः, वसूनां हव्यवाट् (अग्नि) अस्मि अहं आदित्यानां विष्णु, रुद्राणां नीललोहित. (रुद्र) ॥ १३ ॥ अहं ब्रह्मर्षीणां भृगु अहं

गुणिनामप्यहं सूत्रं महतां च महानहम् ॥ सूक्ष्माणामप्यहं जीवो दुर्जयानामहं मनः ॥ ११ ॥ हिरण्यगर्भो वेदानां मंत्राणां प्रणवस्त्रिवृत् ॥ अक्षराणामकारोऽस्मि पदानि च्छंदसामहम् ॥१२॥ इंद्रोऽहं सर्वदेवानां वसूनामस्मि हव्यवाट् ॥ आदित्यानामहं विष्णू रुद्राणां नीललोहितः ॥ १३ ॥ ब्रह्मर्षीणां भृगुरहं राजर्षीणामहं मनुः ॥ देवर्षीणां नारदोऽहं हविर्धान्यस्मि धेनुषु ॥ १४ ॥ सिद्धेश्वराणां कपिलः सुपर्णोऽहं पतत्रिणाम् ॥ प्रजापतीनां दक्षोऽहं पितॄणामहमर्यमा ॥१५॥ मां विध्युद्धव दैत्यानां प्रह्लादमसुरेश्वरम् ॥ सोमं नक्षत्रौषधीनां धनेशं यक्षरक्षसाम् ॥ १६ ॥

राजर्षीणां मनुः. अहं देवर्षीणां नारदः धेनुषु हविर्धानी (कामधेनु) अस्मि. ॥ १४ ॥ अहं सिद्धेश्वराणां कपिलः, पतत्रिणां (पक्ष्यामध्यें) सुपर्ण अहं प्रजापतीनां दक्ष अहं पितॄणां अर्यमा. ॥ १५ ॥ उद्धव, मां दैत्यानां असुरेश्वरं प्रल्हाद, नक्षत्रौषधीनां सोमं, यक्षरक्षसां धनेशं विद्धि (जाण) ॥ १६ ॥

(वामन) मी समजावा. रुद्रामध्यें शंकर माझी विभूति होय ॥ १३ ॥ ब्रह्मर्षीमध्ये भृगु[2] मी, राजर्षीमध्ये मनु मी, देवर्षीमध्यें नारद मी व धेनूमध्यें कामधेनु माझी विभूति समजावी. ॥ १४ ॥ सिद्धेश्वरामध्यें कपिल व पक्ष्यामध्यें गरुड मी होय. प्रजापतीमध्यें दक्ष मी आणि पितरामध्यें अर्यमा मी आहें ॥ १५ ॥ उद्धवा, दैत्यामध्ये असुरेश्वर प्रल्हाद मी, असें समज. नक्षत्रें व ओषधि यांचा राजा चंद्र माझी विभूति होय. यक्ष व राक्षस यामध्यें धनाधिपति कुबेर मी समजावा ॥ १६ ॥

---

१ ओंकारावीण वर्णश्रेणी । ते जाण बालकाची काहाणी । मत्रीं ओंकार मी चक्रपाणी । सकल मंत्र त्याचेनि पावन ॥ नाथ, १७२.

२ आपुलें ब्रह्मा अपूज्य केला । शिवाचा नैवेद्य त्यागिला । विष्णूचे हृदयीं लाता हाणिला । भृगु वाखाणिला श्रीवत्सें ॥ नाथ, १७७.

गजेंद्रामध्यें मी ऐरावत. जलजंतूंमध्यें मी त्यांचा अधिपति वरुण आहे. लोकांना तापविणारे व प्रकाशमान अशा पदार्थांमध्यें सूर्य माझी विभूति समजावी. मनुष्यांमध्यें त्यांचा राजा मी असतों. ॥ १७ ॥ अश्वांमध्यें उच्चैःश्रवा (इंद्राचा घोडा) व धातूंमध्यें सुवर्ण मी आहें. लोकांचें नियमन करणाऱ्यांमध्यें यम व सर्पांमध्यें वासुकि मी आहें. [illegible] मोठमोठ्या नागांमध्यें शेष हा माझी विभूति होय. व ज्यांना शिंगें किंवा दाढा असतात त्यांमध्यें (पशूंमध्यें) सिंह मी आहें. या पुण्यपुरुषा, आश्रमांमध्यें चतुर्थाश्रम (संन्यास) व वर्णांमध्यें पहिला (ब्राह्मण) मी असतों. ॥ १९ ॥ तीर्थांमध्यें आणि प्रवाहांमध्यें गंगा मी व सरोवरांमध्यें (अचल उदकसमूहांत) समुद्र [illegible] आयुधांमध्यें धनुष्य [illegible]

[मां] गजेंद्राणां ऐरावतं, यादसां (जलजंतूंमध्यें) प्रभु वरुणं, तपनां (तापविणारांमध्यें) द्युमन्तं (तेजस्वीमध्ये), सूर्यं, मनुष्याणां च भूपतिं [विद्धि]. ॥ १७ ॥ तुरगाणां उच्चैःश्रवाः, धातूनां कांचनं अस्मि. अहं संयमतां यमः, सर्पाणां वासुकिः अस्मि. ॥ १८ ॥ अनघ, अहं नागेंद्राणां अनन्तः, शृंगिदंष्ट्रिणां मृगेंद्रः (सिंह) अहं आश्रमाणां तुर्यः (संन्यास), वर्णानां प्रथमः (ब्राह्मण). ॥ १९ ॥ अहं तीर्थानां, स्रोतसां (प्रवाहांमध्यें) [च] गंगा सरसां समुद्रः अहं आयुधानां धनुः धनुष्मतां त्रिपुरघ्नः

ऐरावतं गजेंद्राणां यादसां वरुणं प्रभुम् ॥ तपनां द्युमतां सूर्यं मनुष्याणां च भूपतिम् ॥ १७ ॥ उच्चैःश्रवास्तुरगाणां

धातूनामस्मि कांचनम् ॥ यमः संयमतां चाहं सर्पाणामस्मि वासुकिः ॥ १८ ॥ नागेंद्राणामनन्तोऽहं मृगेंद्रः शृंगिदं-

ष्ट्रिणाम् ॥ आश्रमाणामहं तुर्यो वर्णानां प्रथमोऽनघ ॥ १९ ॥ तीर्थानां स्रोतसां गंगा समुद्रः सरसामहम् ॥ आयुधानां

धनुरहं त्रिपुरघ्नो धनुष्मताम् ॥ २० ॥ धिष्ण्यानामस्म्यहं मेरुर्गहनानां हिमालयः । वनस्पतीनामश्वत्थ ओषधीनामहं

यवः ॥ २१ ॥ पुरोधसां वसिष्ठोऽहं ब्रह्मिष्ठानां बृहस्पतिः ॥ स्कन्दोऽहं सर्वसेनान्यामग्रण्यां भगवानजः ॥ २२ ॥

(शंकर). ॥ २० ॥ अहं धिष्ण्यानां (उच्चस्थानांमध्यें) मेरु, गहनानां (दुर्गम स्थानांमध्यें) हिमालयः अस्मि. अहं वनस्पतीनां अश्वत्थः, ओषधीनां यवः ॥ २१ ॥ अहं पुरोधसां वसिष्ठः, ब्रह्मिष्ठानां बृहस्पतिः. अहं सर्वसेनान्यां (सर्व सेनापतींमध्ये), स्कन्दः [illegible], अग्रण्यां [illegible] भगवान् अजः ॥ २२ ॥

व धनुर्धारी वीरांमध्यें त्रिपुरासुराला मारणारा (शंकर) मी समजावा. ॥ २० ॥ [illegible] वनस्पतींमध्यें अश्वत्थ व ओषधींमध्यें यव (सातू) मी आहें. ॥ २१ ॥ पुरोहितांमध्यें वसिष्ठ व ब्रह्मवादी पुरुषांमध्यें बृहस्पति मी आहें. [illegible] कार्तिकेय व [illegible] लोकनायकांमध्यें भगवान् ब्रह्मदेव मी आहें. ॥ २२ ॥

१ ओषधि म्ह० फळ पिकून तयार झालें की मरणारी उद्भिज्जें केळें [illegible]

यज्ञांमध्यें ब्रह्मयज्ञ मी व व्रतामध्यें अहिंसा व्रत माझें स्वरूप समजावें. शोधकामध्येही (धुणें, नाहणें, धामर्ण इत्यादिकांमध्ये) अत्यंत पवित्र असा वायु, अग्नि, सूर्य, उदक व वाणी एतद्रूप मी आहे. ॥ २३ ॥ अष्टांग योगामध्यें समाधि मी असून जय मिळवूं इच्छिणारामध्ये त्याची नीति (मसलती, मंत्र) मी असतों विवेकादि कौशल्यामध्ये आत्मानात्म-विवेकविद्या मी असून ख्यातिवादामध्यें कधीं नाहींसा न होणारा 'हें कीं हें' असा विकल्प मी आहे ॥ २४ ॥ स्त्रियामध्ये मी शतरूपा असून पुरुषामध्यें मी स्वायंभुव मनु समजावा

अहं यज्ञानां ब्रह्मयज्ञः, व्रतानां अविहिंसनं. वाय्वग्न्यर्काम्बुवागात्मा अहं शुचीनां अपि शुचिः ॥ २३ ॥ योगानां आत्मसंरोध, विजिगीषतां (जय मिळवूं इच्छिणारामध्यें) मंत्र (नीति, मसलती) अस्मि. कौशलानां आन्वीक्षिकी (आत्मानात्मविवेक). ख्यातिवादिनां विकल्प (संशय) ॥ २४ ॥ अहं स्त्रीणां तु शतरूपा, पुंसां स्वायंभुव मनु, मुनीनां

यज्ञानां ब्रह्मयज्ञोऽहं व्रतानामविहिंसनम् ॥ वाय्वग्न्यर्काम्बुवागात्मा शुचीनामप्यहं शुचिः ॥२३॥ योगानामात्मसंरोधो मंत्रोऽस्मि विजिगीषताम् ॥ आन्वीक्षिकी कौशलानां विकल्पः ख्यातिवादिनाम् ॥ २४ ॥ स्त्रीणां तु शतरूपाऽहं पुंसां स्वायंभुवो मनुः ॥ नारायणो मुनीनां च कुमारो ब्रह्मचारिणाम् ॥२५॥ धर्माणामस्मि संन्यासः क्षेमाणामबहिर्मतिः ॥ गुह्यानां सूनृतं मौनं मिथुनानामजस्त्वहम् ॥ २६ ॥ संवत्सरोऽस्म्यनिमिषामृतूनां मधुमाधवौ ॥ मासानां मार्गशीर्षोऽहं नक्षत्राणां तथाऽभिजित् ॥ २७ ॥

नारायणः, ब्रह्मचारिणां कुमारः. ॥ २५ ॥ धर्माणां संन्यासः, क्षेमाणां (निर्भय स्थानात) अबहिर्मति (अतर्निष्ठा) अस्मि अहं गुह्यानां सूनृत (मधुर भाषण), मौन [च], मिथुनानां अजः. ॥ २६ ॥ अनिमिषां (सावध असणारामध्ये), संवत्सरः अस्मि. ऋतूनां मधुमाधवौ. अहं मासानां मार्गशीर्षः. तथा नक्षत्राणां अभिजित् ॥ २७ ॥

मुनीमध्यें मी नारायण व ब्रह्मचाऱ्यामध्यें मी सनत्कुमार आहे ॥ २५ ॥ धर्मामध्ये मी संन्यास (प्राणिमात्राला अभय देणें), आहे व निर्भयस्थानामध्यें अंतर्निष्ठा हें माझें स्वरूप होय गुह्य गोष्टींमध्ये गोड बोलणें व मौन मी आहें (कारण, गोड बोलणाराचें तसेंच मौन धरणाराचेंही हृद्गत कोणाला कळून येत नाहीं) जोडप्यामध्यें - ज्याच्या देहापासून पहिले स्वायंभुव मनु व शतरूपा हें जोडपें जन्मलें तो - प्रजापति मी समजावा ॥२६ ॥ जे कधी प्रमत्त (बेसावध) नसतात, त्यामध्ये मुख्य जो संवत्सर तो मी होय (काल कधीं चुकत नाहीं,

---

१ एका वायूचेनि पवित्रपण । एक अग्नीस्तव पवित्र जाण । एकातें पवित्र करी जीवन । एक पावन वचनमात्रें ॥ नाथ, १९९

वावळी वगैरे लोकरीचे पदार्थ वायूने शुद्ध होतात, सुवर्णादि धातु अग्नीने शुद्ध होतात, कार्पासवस्त्रादि पदार्थ उदकानें पवित्र होतात, व पातकी लोक ब्राह्मणाच्या वचनानें (प्रायश्चित्त देऊन ब्राह्मणाने ' शुद्ध झालास ' म्हटलें कीं) शुद्धि पावतात.

२ वादांमाजी वाद अनंत । जेथ विकल्पा नाहीं अंत । तो वादु मी म्हणे अच्युत । ऐक निश्चित विकल्प ॥ अख्याति अन्यथाख्याति । शून्यख्याति सत्ख्याति । अनिर्वचनीय जे ख्याति । तो वादु निश्चितीं मी उद्धवा ॥ नाथ, २०५ । ७.

नेहमीं सारखा चालत असतो). ऋतूंमध्यें मधु व माधव हे दोन महिने (वसंतऋतु) मी आहें. महिन्यांमध्यें मार्गशीर्ष मी व नक्षत्रांमध्यें अभिजित् ([illegible] श्रवणाचा पहिला पाद) मी आहें. ॥२७॥ युगांमध्यें मी कृतयुग असून धैर्यसंपन्न पुरुषांमध्यें देवल व असित मी आहें. वेदाचे विभाग करणारांमध्यें द्वैपायन (व्यास) मी आहें आणि कवींमध्यें सूक्ष्मबुद्धि असा शुक्राचार्य मी होय. ॥२८॥ भगवंतांमध्यें (प्राणिमात्राची उत्पत्ति, प्रलय, आगमन, गमन, विद्या आणि अविद्या हीं सहा ज्याला समजतात [illegible]

अहं युगानां कृतं, धीराणां देवलः, असितः च. व्यासानां (वेदांचे विभाग करणारांमध्यें) द्वैपायनः, कवीनां (विद्वानांमध्यें) आत्मवान् काव्यः (शुक्र) अस्मि. ॥ २८ अहं [illegible] (सर्वज्ञांमध्यें) *वासुदेवः. भागवतेषु तु त्वं (तूं, उद्धव). किंपुरुषाणां (वानरांमध्यें) हनुमान्. विद्याध्राणां सुदर्शनः. ॥ २९ ॥ रत्नानां पद्मरागः अस्मि. सुपेशसां [illegible]

> अहं युगानां च कृतं धीराणां देवलो ऽसितः ॥ द्वैपायनो ऽस्मि व्यासानां कवीनां काव्य आत्मवान् ॥ २८ ॥
> वासुदेवो भगवतां त्वं तु भागवतेष्वहम् ॥ किंपुरुषाणां हनुमान्विद्याध्राणां सुदर्शनः ॥ २९ ॥ रत्नानां पद्मरागो ऽस्मि पद्मकोशः सुपेशसाम् ॥ कुशो ऽस्मि दर्भजातीनां गव्यमाज्यं हविःष्वहम् ॥ ३० ॥ व्यवसायिनामहं लक्ष्मीः कितवानां छलग्रहः ॥ तितिक्षा ऽस्मि तितिक्षूणां सत्त्वं सत्त्ववतामहम् ॥ ३१ ॥

कोमल पदार्थांत) पद्मकोशः. दर्भजातीनां कुशः अस्मि. अहं हविःषु गव्यं (गाईचें) आज्यं. ॥ ३० अहं व्यवसायिनां (उद्योगी पुरुषांचें) लक्ष्मीः. कितवानां ([illegible]) छलग्रहः (कपटप्रयोग). तितिक्षूणां तितिक्षा अस्मि. अहं सत्त्ववतां सत्त्वं. ॥ ३१ ॥

'भगवान्' *असें म्हणतात; त्यांमध्यें) वासुदेव (श्रीकृष्ण) मी आहें व भागवतभक्तांमध्यें तूं (उद्धव) मी हें घे. किंपुरुषांमध्यें (वानरमध्यें) हनुमान व विद्याधरांमध्यें सुदर्शन हे माझ्या विभूति होत. ॥ २९ ॥ रत्नांमध्यें पद्मराग व अतिकोमल वस्तूंमध्यें कमलाचा गाभा मी आहें. काश, दूर्वा इत्यादि दर्भांच्या जातीमध्यें कुश व हविर्द्रव्यांमध्यें गाईचें तूप मी आहें. ॥३०॥ उद्योगी पुरुषांची धनादि संपत्ति मी व कपटी लोकांच्या कपटयुक्ति मी आहें. सहनशील पुरुषांची सहनशीलता मी असून सात्त्विक पुरुषांचें सत्त्व मी असतें. २ [illegible]

---

१ मधु व माधव म्ह० अनुक्रमें चैत्र व वैशाख. [illegible]र्दिर्दे. २ …… उद्धव म्हणे वि[illegible] । [illegible] आजान । [illegible] प्रिय भक्त । हें जाणोनि अनंत बोलिला ॥ वानरांमाजी हनुमंत । तो मी म्हणे कृष्णनाथ । तेव उद्धव जाहला गर्वित । [illegible] जेथ वानर आणि वनचर [illegible] इति कृष्णाचे प्रियकर । न कळे हरिभक्तांचा पार । मी कोण किंकर ते ठायीं ॥ नाथ, २३० । ३१ । ३२.

४ उत्पत्तिं प्रलयं चैव भूतानामागतिं गतिम् । वेत्ति विद्यामविद्यां च स वाच्यो भगवानिति ।

१ कपटाचिये कपटगति । अगम्य जे छळण स्थिति । तो मी कृष्ण सात्त्विकमूर्ति । अनर्घ्य युक्ति छळणाची ॥ नाथ. २३८.

बलवान् पुरुषांचें शारीरबळ, इंद्रियबळ व मानसिक सामर्थ्य (उत्साह) मी असून भगवद्भक्ताचे भक्तीने केलेले कर्म मी असे समज नमाच त्या भगवद्भक्ताच्या उपास्य नऊ मूर्तीमध्ये (नवव्यूहपूजेतील वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न, अनिरुद्ध, नारायण, हयग्रीव, वराह, नृसिंह व ब्रह्मा ह्या नऊ मूर्तीमधील) पहिली व मुख्य जी मूर्ति (वासुदेव) ती मी आहे ॥३२॥ गंधर्वांमध्यें मी विश्वावसु व अप्सरामध्ये पूर्वचित्ति मी होय पर्वताचा स्थिरपणा हा गुण मी आहे व पृथ्वीचा विशेष गुण गंध मी होय ॥ ३३ ॥ उदकाचा मधुर रस मी आणि तेजस्वी पदार्थांमध्यें सूर्य मी आहे सूर्य, चंद्र व तारका याची प्रभा मी व आकाशाचा गुण परमसूक्ष्म (सूक्ष्म, अनाहत) शब्द मी आहे. ॥ ३४ ॥ ब्रह्मभक्तामध्ये बलि मी व

बलवतां ओजः, सहः [च] अहं सात्वतां कर्म (ईश्वरार्पित कर्म) [इति] विद्धि अहं सात्वतां नवमूर्तीनां परा (सर्वाश्रय) आदिमूर्तिः (प्रथम मूर्ति वासुदेव) ॥ ३२ ॥ अहं गंधर्वाप्सरसां विभावसुः, पूर्वचित्ति [च] अहं भूधराणां स्थैर्य अहं भुव गंधमात्रं ॥ ३३ ॥ अहं अपां परमः रसः, तेजिष्ठानां विभावसुः, सूर्येंदुताराणां

ओजः सहो बलवतां कर्माहं विद्धि सात्वताम् ॥ सात्वतां नवमूर्तीनामादिमूर्तिरहं परा ॥ ३२ ॥ विश्वावसुः पूर्वचित्तिर्गंधर्वाप्सरसामहम् ॥ भूधराणामहं स्थैर्यं गंधमात्रमहं भुवः ॥ ३३ ॥ अपां रसश्च परमस्तेजिष्ठानां विभावसुः ॥ प्रभा सूर्येंदुताराणां शब्दो ऽहं नभसः परः ॥ ३४ ॥ ब्रह्मण्यानां बलिरहं वीराणामहमर्जुनः ॥ भूतानां स्थितिरुत्पत्तिरहं वै प्रतिसंक्रमः ॥ ३५ ॥ गत्युक्त्युत्सर्गोपादानमानंदस्पर्शलक्षणम् ॥ आस्वादश्रुत्यवघ्राणमहं सर्वेंद्रियेंद्रियम् ॥ ३६ ॥ पृथिवी वायुराकाश आपो ज्योतिरहं महान् ॥ विकारः पुरुषो ऽव्यक्तं रजः सत्त्वं तमः परम् ॥ अहमेतत्प्रसंख्यानं ज्ञानं तत्त्वविनिश्चयः ॥ ३७ ॥

प्रभा, नभसः परः शब्दः ॥ ३४ ॥ अहं ब्रह्मण्यानां (ब्राह्मणाच्या भक्तामध्यें) बलिः, अहं वीराणां अर्जुनः, अहं भूतानां उत्पत्तिः, स्थितिः, प्रतिसंक्रमः (लय) [च] ॥ ३५ ॥ अहं गत्युक्त्युत्सर्गोपादानं, आनंदस्पर्शलक्षणं, आस्वादश्रुत्यवघ्राणं, सर्वेंद्रियेंद्रियं [च] ॥ ३६ ॥ पृथिवी, वायु, आकाश, आप ज्योति, अहं, महान्, विकार, पुरुष, वीरामध्ये अर्जुन माझी विभूति होय. भूताचे पालन, उत्पत्ति व प्रलय हे मी आहे ॥३५॥ चालणे, बोलणे, मलोत्सर्ग, घेणे, आनंद, स्पर्श, दर्शन, रुचि घेणे, ऐकणे, हुंगणे हे इंद्रियव्यापार व सर्व इंद्रियांच्या विषयग्रहणशक्तिही मी आहें ॥ ३६ ॥ पृथिवी (गंध), वायु (स्पर्श), आकाश (शब्द), उदक (रस), तेज (तेज), अहंकार आणि महत्तत्त्व ह्या सात प्रकृतिविकृति, पंचमहाभूतें व एकादश इंद्रियें मिळून सोळा प्रकारची कार्यें, जीव, प्रकृति, रज, सत्त्व व तम असे तीन गुण, आणि परब्रह्म ही सर्व मीच आहे ह्या तत्त्वाची संख्या, ह्यांचें लक्षणाच्या योगें ज्ञान व त्याचे फल तत्त्वनिश्चय मीच होय ॥ ३७ ॥

१ ज्ञान कर्म उभय इंद्रियें । त्या इंद्रियांचें मी इंद्रिय आहें । त्याची क्रिया जे जे आहे । ते माझेनि होये अभिव्यक्त ॥ नाथ, २६५

२ ह्याच अर्थाची सांख्यकारिका— मूलप्रकृतिरविकृतिर्महदाद्याः प्रकृतिविकृतयः सप्त । षोडशकश्च विकारो न प्रकृतिर्न विकृतिः पुरुषः ॥

जीव आणि ईश्वर अशीं माझीं दोन प्रकारचीं रूपें आहेत. गुणिगुणरूप किंवा क्षेत्रक्षेत्रज्ञरूप कोणतीही भाव (पदार्थ) मजवाचून नाही. तर मी च सर्वत्र, व सर्व मी. ॥ ३८ ॥ -उद्धवा, तूं क्षणशील 'असें थोडक्यांत काय सांगतोस, चांगलें विस्तारानें सांग.' तर बा, - मी पुष्कळ काळपर्यंत खटपट केली तर मला पृथ्वी इत्यादिकांचे परमाणु किती आहेत त्यांची संख्या काढितां येईल; परंतु तशी विभूतींची गणना करितां येणार नाही. कारण मी कोट्यवधि ब्रह्मांडें उत्पन्न करीत असतों. (मी निर्मिलेल्या ब्रह्मांडांतील संख्या [illegible] पंचाईत, तेव्हां त्यांतील विभूतींची गणना करितां यावी कशी?) ॥ ३९ ॥ - तथापि मी तुला थोडक्यांत विशेषतः माझ्या विभूति सांगतो. एवढें लक्षांत ठेव कीं - प्रधान, संवृत्ति, अव्यक्त, सत्वं, रजः, तमः, परं [च सर्वं अहं एव] अहं परमसंख्यानं, ज्ञानं, तत्वविनिश्चयः [च]. ॥ ३७ ॥ ईश्वरेण जीवेन गुणेन गुणिना सर्वात्मना सर्वेण अपि मया विना कश्चित् भावः (पदार्थ) न विद्यते. ॥ ३८ ॥ मया कालेन परमाणूनां संख्यानं (गणना) क्रियते, तथा कोटिशः अण्डानि सृजतः मे विभूतीनां [संख्यानं] न [क्रियते].

मयेश्वरेण जीवेन गुणेन गुणिना विना ॥ सर्वात्मनाऽपि सर्वेण न भावो विद्यते क्वचित् ॥ ३८ ॥

संख्यानं परमाणूनां कालेन क्रियते मया ॥ न तथा मे विभूतीनां सृजतोऽण्डानि कोटिशः ॥ ३९ ॥

तेजः श्रीः कीर्तिरैश्वर्यं ह्रीस्त्यागः सौभगं भगः ॥ वीर्यं तितिक्षा विज्ञानं यत्र यत्र स मेंऽशकः ॥ ४० ॥

एतास्ते कीर्तिताः सर्वाः संक्षेपेण विभूतयः ॥ मनोविकारा एवैते यथा वाचाऽभिधीयते ॥ ४१ ॥

॥ ३९ ॥ यत्र यत्र तेजः (प्रभाव), श्रीः (संपत्ति), कीर्तिः, ऐश्वर्यं, ह्रीः (मर्यादा), त्यागः (दान), सौभगं (मनोहरता), भगः (भाग्य), वीर्यं, तितिक्षा, विज्ञानं [च] सः मे अंशकः. ॥ ४० ॥ एताः सर्वाः विभूतयः ते संक्षेपेण कीर्तिताः. यथा [किंचित्] वाचा अभिधीयते, [तथा] एते मनोविकाराः [illegible] ॥ ४१ ॥ कीर्ति, ऐश्वर्य, लज्जा, दान, मनोहरपणा, भाग्य, बल, सहनशीलपणा, आणि विज्ञान हे गुण जेथें जेथें असतील तो तो माझा अंश होय. ॥ ४० ॥ या सर्व विभूति मी तुला संक्षेपानें निवेदन केल्या. - उद्धवा, आतां तात्पर्याची गोष्ट सांगतों. एवढें ध्यानांत धर कीं - ह्या माझ्या विभूति म्हणून ठिकठिकाणीं जिज्ञासूंच्या सोयीसाठीं कल्पिलेल्या आहेत [illegible] फारसा अभिनिवेश ठेवूं नये. - हे सगळे केवळ मनाचे खेळ, वाणीनें उच्चार करितां यावा म्हणून कल्पिलेले आहेत (आकाशकुसुम, ससाचें शिंग इत्यादि शब्दांप्रमाणें [illegible]

१ जीव आणि ईश्वर। गुणी आणि गुणावतार। क्षेत्रक्षेत्रज्ञ निर्धार। सर्वही साचार मीचि मी। नाथ, २५८.

२ किंवा, 'कालेन' हें 'मया' चें विशेषण करून अर्थ केला आहे तसा अर्थ लावावा:— पृथ्वीचिया परमाणुकणां। मी काळरूपें करीं गणना। परी विभूतिसंख्याप्रमाणा। मातेंनिही जाणा न गणवती॥ म्यां सृजिले अनंत ब्रह्मगोळ। ते मज गणवती ना सकळ। मा विभूति माझ्या केवळ। कोण तोटाळ गणूं शके। नाथ, २८२। ८३.

कल्पनेने घडलेले असतात–जगामध्यें वास्तविक ते पदार्थ असत नाहींत, तशाच ह्या विभूति काल्पनिक समजाव्या) ॥ ४१ ॥ ह्मणून उद्धवा, तू आपल्या वाणीचे निग्रहन कर, मन जिंक, प्राण व इंद्रियें आवरून घे आणि सत्त्वसंपन्न बुद्धीच्या योगें बुद्धीचा निग्रह कर ह्मणजे पुन्हा संसारमार्गांत पडणार नाहींस ॥ ४२ ॥ जो यति आपल्या वाणीचें व मनाचें बुद्धीच्या योगें उत्तम प्रकारें नियमन करणार नाहीं त्याचें व्रत, तप व दान कच्च्या घड्यांतील पाण्याप्रमाणें पाझरून जातें ॥ ४३ ॥ एवढ्यासाठीं माझ्या सेवेंत तत्पर राहणारानें आपली बुद्धि माझ्या भक्तीनें युक्त करून तिच्या योगें मन, वाणी व प्राण याचा निग्रह करावा ह्मणजे पुढें तो हळूहळू कृतार्थ होतो ॥ ४४ ॥

वाचं यच्छ (आवर). मनः यच्छ. प्राणान्, इंद्रियाणि च यच्छ. आत्मना आत्मानं यच्छ. भूयः अध्वने (संसारमार्गाय) न—कल्पसे (योग्य होणार नाहींस) ॥ ४२ ॥ यः यतिः धिया वाङ्मनसी सम्यक् असंयच्छन् (न आवरणारा) [भवति], तस्य व्रतं, तपः, दानं [च] आमघटाम्बुवत् (कच्च्या घड्यांतील पाण्याप्रमाणें) स्रवति (पाझरतें) ॥ ४३ ॥ तस्मात्

वाचं यच्छ मनो यच्छ प्राणान्यच्छेंद्रियाणि च ॥ आत्मानमात्मना यच्छ न भूयः कल्पसे ऽध्वने ॥ ४२ ॥

यो वै वाङ्मनसी सम्यगसंयच्छन्धिया यतिः ॥ तस्य व्रतं तपो दानं स्रवत्यामघटाम्बुवत् ॥ ४३ ॥

तस्मान्मनोवचःप्राणान्नियच्छेन्मत्परायणः ॥ मद्भक्तियुक्तया बुद्ध्या ततः परिसमाप्यते ॥ ४४ ॥

॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे षोडशो ऽध्यायः ॥ १६ ॥ ॥ ॥ ॥

उद्धव उवाच । यस्त्वया ऽभिहितः पूर्वं धर्मस्त्वद्भक्तिलक्षणः ॥ वर्णाश्रमाचारवतां सर्वेषां द्विपदामपि ॥ १ ॥

यथा ऽनुष्ठीयमानेन त्वयि भक्तिर्नृणां भवेत् ॥ स्वधर्मेणारविंदाक्ष तत्समाख्यातुमर्हसि ॥ २ ॥

मत्परायणः मद्भक्तियुक्तया बुद्ध्या मनोवचःप्राणान् नियच्छेत्, ततः परिसमाप्यते (कृतकृत्य होतो) ॥ ४४ ॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे षोडशो ऽध्यायः ॥ १६ ॥

कारण, जसा एकच चंद्र उदकाने भरलेल्या अनेक पात्रामध्यें प्रतिबिंबलेला असतो, तसा देहादिकांहून वेगळा असा एकच आत्मा समस्त प्राण्यांच्या आणि आपल्याही शरीरात राहिलेला आहे, आणि ती समळी (इतर प्राण्यांचीं व आपलें अशी सर्व) शरीरेंही - त्यांचीं कारणें पाहिलीं असता - एकरूपच (पंचमहाभूतरूपच) आहेत (अर्थात कोणाशी वैर धरण्याचे कारणच नाहीं). ॥ ३२ ॥ एखादे प्रसंगी वेळच्या वेळीं अन्न न मिळालें तरी विषाद मानूं नये. बरें मिळालें तरी आनंदून जाऊं नये, तर धैर्य धरून असावें कारण, दोन्ही गोष्टी (अन्न मिळणें व न मिळणें ह्या) दैवाधीन असतात. ॥३३॥ - ह्मणून भिक्षेचा प्रयत्न करूं नये, असें मात्र नव्हे तर - आहारप्राप्तीसाठीं उद्योग करावाच कारण, यथा इंदु (चंद्र) उदपात्रेषु (पाण्याच्या भांड्यात), [तथा] एक एव परः आत्मा भूतेषु. आत्मनि [च] अवस्थित भूतानि च एकात्मकानि ॥ ३२ ॥ धृतिमान् काले काले कचित् अशनं (अन्न) अलब्ध्वा (मिळवून—मिळालें नाहीं तरी) न—विषीदेत (खेद न पावो), लब्ध्वा न हृष्येत्. उभय दैवतंत्रित (दैवाधीन) ॥ ३३ ॥ आहारार्थं समीहेत (यत्न करो) तत् प्राणधारणं युक्त. तेन (प्राणधारणानें) तत्त्वं विमृश्यते (विचार केला जातो) तत् विज्ञाय विमुच्यते ॥ ३४ ॥ मुनि. यदृच्छया उपपन्नान्न (मिळालेलें अन्न)

एक एव परो ह्यात्मा भूतेष्वात्मन्यवस्थितः ॥ यथेंदुरुदपात्रेषु भूतान्येकात्मकानि च ॥ ३२ ॥ अलब्ध्वा न विषीदेन काले काले ऽशनं कचित् ॥ लब्ध्वा न हृष्येद्धृतिमानुभयं दैवतंत्रितम् ॥ ३३ ॥ आहारार्थं समीहेत युक्तं तत्प्राणधारणम् ॥ तत्त्वं विमृश्यते तेन तद्विज्ञाय विमुच्यते ॥३४॥ यदृच्छयोपपन्नान्नमद्याच्छ्रेष्ठमुतापरम् ॥ तथा वासस्तथा शय्या प्राप्तं प्राप्त भजेन्मुनिः ॥ ३५ ॥ शौचमाचमनं स्नानं न तु चोदनया चरेत् ॥ अन्यांश्च नियमान्ज्ञानी यथा ऽहं लीलयेश्वरः ॥ ३६ ॥ न हि तस्य विकल्पाख्या या च मद्वीक्षया हता ॥ आदेहांतात्कचित्ख्यातिस्ततः संपद्यते मया ॥ ३७ ॥

श्रेष्ठं, उत अपरं अद्यात्. तथा वासः (वस्त्र), तथा शय्या, प्राप्तं प्राप्त भजेत्. ॥ ३५ ॥ यथा ईश्वरः अहं लीलया, [तथा] ज्ञानी शौच, आचमन, स्नानं, अन्यान् नियमान् च आचरेत्, चोदनया (विधीनें) न. ॥ ३६ ॥ हि तस्य विकल्पाख्या (भेदप्रतीति) न. या [आसीत्, सा] मद्वीक्षया (माझ्या ज्ञानानें) हता कचित् आदेहांतात् ख्याति (भेद) त्याला प्राणधारण करणें अगत्याचें आहे - कसें ते पहा - प्राणधारणाच्या योगें तत्त्वविचार करिता येतो व तत्त्वविचार केला असता तत्त्वज्ञान होऊन तो मुक्त होतो ॥ ३४ ॥ - एवढ्यावरून, मिष्टान्न मुळीं वेऊंच नये, असें मात्र नव्हे. तर - सहजगत्या जें प्राप्त होईल ते अन्न - चांगलें किंवा वाईट कसेंही असो - भक्षण करावें, तसेंच वस्त्र, तशीच शय्या जें जें मिळेल तें तें मुनीनें सेवीत जावें. ॥ ३५ ॥ शुद्धता, आचमन, स्नान व दुसरेही नियम ज्ञान्याने वेदाज्ञा ह्मणून चालवूं नये, तर जसा मी ईश्वर लीलेनें कर्मे करितो, त्याप्रमाणें करीत असावें (ज्ञान्यानें विधींचा दास होऊन राहूं नये, कारण, तो तसा वागेल तर त्याच्या ज्ञाननिष्ठेला विरोध येईल) ॥ ३६ ॥ - त्याला वेदोक्त विधीचें

दास्य करावें लागत नाहीं कां, तें ऐक १ - त्याला मुळीं भेदभावाची प्रतीतिच नसते. जी कांहीं भेदप्रतीति पूर्वी होती, ती माझें ज्ञान होतांच नष्ट झाली. असें असतें. केव्हा केव्हा जी थोडी भेदप्रतीति भासते, ती देखील देह पडेपर्यंतच असावयाची. पुढे तो मत्स्वरूपीं मिळून जातो (मुक्त होतो). ॥ ३७ ॥ - एतावता, ज्याला वैराग्य व परोक्ष ज्ञान आहे त्याच्यासाठीं सन्यास आणि त्याचे धर्म सांगितले. आता ज्याला केवळ वैराग्य आहे, त्या ज्ञानसंपादनेच्छु पुरुषानें काय करावें तें सांगतो - विषयसुख भासून परिणामीं दुःख प्राप्त होतें, हा निश्चय होय. म्हणून त्या विषयाविषयीं ज्याला वैराग्य झालें, पण माझी प्राप्ति करून देणाऱ्या धर्मांचें मात्र ज्ञान लाधलें नाहीं त्या पुरुषानें धैर्य धरून एकाद्या ब्रह्मज्ञानी गुरूला शरण जावें. ॥ ३८ ॥ त्यानें गुरु केवळ ईश्वर होत अशी भावना धरावी, त्यावर प्रेम ठेवावें, - 'हेच आपल्याला कृतार्थ करितील' असा - विश्वास असों द्यावा,

ततः मया संपद्यते. ॥ ३७ ॥ दुःखोदर्केषु (दुःख परिणाम ज्याचा असा) कामेषु जातनिर्वेदः (झालें वैराग्य ज्याला असा) आत्मवान् (धैर्यसंपन्न) अजिज्ञासितमद्धर्मः (नाहीं जाणिले भागवत धर्म ज्यानें असा) मुनिं गुरुं उपाव्रजेत् (शरण जावो) ॥ ३८ ॥ श्रद्धावान् अनसूयक (दोष न देणारा) आदृतः भक्त. यावत् ब्रह्म विजानीयात् (जाणील),

दुःखोदर्केषु कामेषु जातनिर्वेद आत्मवान् ॥ अजिज्ञासितमद्धर्मो गुरुं मुनिमुपाव्रजेत् ॥ ३८ ॥ तावत्परिचरेद्भक्त. श्रद्धावाननसूयकः ॥ यावद्ब्रह्म विजानीयान्मामेव गुरुमादृतः ॥ ३९ ॥ यस्त्वसंयतषड्वर्गः प्रचंडेंद्रियसारथिः ॥ ज्ञानवैराग्यरहितस्त्रिदंडमुपजीवति ॥ ४० ॥ सुरानात्मानमात्मस्थं निन्हुते मां च धर्महा ॥ अविपक्वकषायो ऽस्मादमुष्माच्च विहीयते ॥ ४१ ॥

तावत् मा (मद्रूप) एव गुरुं परिचरेत् (सेवाकरो). ॥ ३९ ॥ यः तु असंयतषड्वर्गः (नाहीं दडिला सहाचा समूह ज्यानें असा), प्रचंडेंद्रियसारथिः (उच्छृंखल बुद्धि ज्याची असा), ज्ञानवैराग्यरहितः [च], त्रिदंडं उपजीवति, ॥ ४० ॥ धर्महा अविपक्वकषायः (नाहीं जळाले मल ज्याचे असा) [सः] सुरान् (देवाना), आत्मानं, आत्मस्थं मां च

त्याची कदापि निंदा करूं नये, आणि ब्रह्मज्ञान प्राप्त होईतों त्याची सतत सेवा चालवावी (ज्ञान प्राप्त झाल्यावर मग ' एकाकी फिरणें ' इत्यादि यतिधर्म पाळावे) ॥ ३९ ॥ - ज्याला अधिकार नाहीं (वैराग्य झालें नसेल) त्यानें सन्यास घेणे केवळ उपहासास्पद होय पहा :- ज्याचीं सहा इंद्रियें (मन व ज्ञानेंद्रियें) स्वाधीन नाहींत (किंवा ज्यानें कामक्रोधादि सहा शत्रु जिंकिले नाहीत), ज्याची बुद्धि विषयावर अत्यासक्त असते, ज्याला ज्ञान आणि वैराग्य हीं नाहींत आणि असें असून जो त्रिदंडीचा (सन्याशाचा) वेष धरून वागतो. ॥ ४० ॥ तो मनुष्य धर्माचा घातक होय. तो आराध्य देवाना, आपणा स्वताला आणि आत्मस्थ अशा मला - इनक्यांना - फसवितो असें होतें त्याच्या

१ ह्याला नाथ दृष्टांत देतात :—
उगमें संगम प्रवाह यती । सरितेचो नामरूपख्याती । जेवीं प्रळयोदकीं हरपती । तेवीं समरसती मजमाजी ज्ञाने ॥ नाथ, ६८

विषयवासना निर्मूळ झालेल्या नसतात. शेवटीं त्याला धड हा लोक नाही आणि धड पर लोकही नाही अशी त्याची दोहोंकडून फसगत होते (मन्यास घेतल्यामुळें विषयसुख भोगता येत नाहीं, वरें कर्में न केल्यामुळे परलोकप्राप्ति नाहीं, आणि चित्तशुद्धिही नाही) ॥४१॥ - आता चारी आश्रमाचे प्रधान धर्म सांगतो, एक - शांति आणि प्राणिमात्राला पीडा न देणें हा यतीचा धर्म होय तपश्चर्या आणि तत्त्वविचार हें वानप्रस्थाचें मुख्य कर्तव्य प्राण्याचे रक्षण आणि यजन हे गृहस्थाचे धर्म होत. आणि गुरूची सेवा करणें हा ब्रह्मचार्‍याचा धर्म समजावा. ॥ ४२ ॥ ब्रह्मचर्य, तपश्चर्या, शुद्धता (राग द्वेषादि न धरणे), संतोष आणि प्राणिमात्राशी प्रेमभावानें वर्तन, हे धर्म गृहस्थानेंही (अर्थात हे धर्म सर्वांनी

निन्हुते (फसवितो), [स.] अस्मात् (या लोकापासून), अमुष्मात् (पर लोकापासून) च विहीयते (च्युत होतो) ॥ ४१ ॥ भिक्षोः (यतीचा) शम , अहिंसा [च] धर्म वनौकस (वानप्रस्थाचा) तपः, ईक्षा (तत्त्वविचार) [च], गृहिणः भूतरक्षा, इज्या [च], द्विजस्य आचार्यसेवन. ॥ ४२ ॥ ऋतौ गन्तु गृहस्थस्य अपि ब्रह्मचर्यं, तपः, शौच, संतोषः, भूतसौहृदं [च], सर्वेषां मदुपासनं [धर्मः]. ॥ ४३ ॥ इति स्वधर्मेण अनन्यभाक् सर्वभूतेषु मद्भाव यः नित्यं मा भजन् [भजेत्, स. अचिरात् मद्भक्ति

भिक्षोर्धर्मः शमोऽहिंसा तप ईक्षा वनौकसः ॥ गृहिणो भूतरक्षेज्या द्विजस्याचार्यसेवनम् ॥ ४२ ॥ ब्रह्मचर्यं तपः शौचं संतोषो भूतसौहृदम् ॥ गृहस्थस्याप्यृतौ गंतुः सर्वेषा मदुपासनम् ॥४३॥ इति मां यः स्वधर्मेण भजन्नित्यमनन्यभाक् ॥ सर्वभूतेषु मद्भावो मद्भक्तिं विंदते ऽचिरात् ॥४४॥ भक्त्योद्धवानपायिन्या सर्वलोकमहेश्वरम् ॥ सर्वोत्पत्त्यप्ययं ब्रह्मकारणं मोपयाति सः ॥ ४५ ॥ इति स्वधर्मनिर्णिक्तसत्त्वो निर्ज्ञातमद्गतिः ॥ ज्ञानविज्ञानसंपन्नो नचिरात्समुपैति माम् ॥ ४६ ॥

विंदते. ॥ ४४ ॥ उद्धव, सः अनपायिन्या (न ढळणाऱ्या) भक्त्या सर्वोत्पत्त्यप्यय सर्वलोकमहेश्वरं ब्रह्मकारण (वेदाचा उत्पादक) मा उपयाति (जवळ येतो) ॥ ४५ ॥ इति स्वधर्मनिर्णिक्तसत्त्व. (स्वधर्मानें शुद्ध केलें चित्त ज्यानें असा) निर्ज्ञातमद्गति (जाणलें माझें ऐश्वर्य ज्याने असा) ज्ञानविज्ञानसंपन्नः नचिरात् मा समुपैति ॥ ४६ ॥

होत) पाळावे. गृहस्थ ऋतुकालींच भार्येशी गमन करण्याचा नियम पाळील तर तें त्याचे ब्रह्मचर्यच होय. माझी उपासना करणें हा सर्वांचाच विहित धर्म आहे ॥ ४३ ॥ अशा प्रकारें जो इतर स्त्रीपुत्रादिकावरील आसक्ति सोडून व सर्व भूताचे ठायीं माझी भावना ठेवून स्वधर्माच्या योगे नित्य मला भजतो, त्याला लवकरच माझी दृढ भक्ति प्राप्त होते ॥ ४४ ॥ उद्धवा, नंतर त्या अचल भक्तीच्या योगे तो पुरुष मज ईश्वराच्या समीप प्राप्त होतो मी सकल लोकाचा महाधिपति आहे, कारण सर्वांचे जन्म नाश मजपासून चालतात वेदाचा उत्पादक तरी मीच ॥ ४५ ॥ अशा प्रकारें स्वधर्माचरणाच्या योगे त्याचे चित्त शुद्ध होतें, मग त्याला माझे ऐश्वर्य कळून येतें, आणि नंतर अप्रत्यक्ष ज्ञान व शेवटी अप-

---

१ स्वधर्माची थोरवी नाथ वर्णन करतात '— स्वधर्म ऐसा दिनमणी । नैराश्ये उगवलिया स्वभुवनी । नो अज्ञाननिशा निरसूनी । स्वप्रकाशपणीं सदा वर्ते ॥ स्वधर्मा ऐसे निज अमृत । जे निर्विकल्पें सेवू जाणत । त्यासी जन्ममरणाचा आवर्त । मी श्रीअनंत लागो नेदी ॥ नाथ, ८१ । ८२.

रोक्षानुभव प्राप्त होऊन तो लवकरच माझ्या स्वरूपीं मिळतो (मुक्त होतो) ॥ ४६ ॥ ज्यांना वर्ण व आश्रम आहेत, त्या लोकांचा जो हा आचाररूप–ज्याचें फल पितृलोक-प्राप्ति आहे असा कर्मानुष्ठानरूप–धर्म, तोच जर माझ्या भक्तीनें युक्त (ईश्वरार्पणबुद्धीनें निष्कामपणें केलेला) असेल, तर उत्तम व मोक्षदायक होतो. ॥ ४७ ॥ बा साधो (उद्धवा), त्वा मला जो प्रश्न केला त्याचें उत्तर, स्वधर्माचरण करणारा भक्त मज परमात्म्याला कसा प्राप्त होतो तें, हें मी तुला सांगितलें ॥ ४८ ॥

वर्णाश्रमवतां [य] एषः आचारलक्षणः धर्मः, सः एव मद्भक्तियुतः [सन्] परः निःश्रेयसकरः. ॥ ४७ ॥ साधो, भवान् मां यत् पृच्छति, एतत् ते यथा स्वधर्मसंयुक्तः भक्तः परं मां समियात् (पावेल), [तथा] अभिहित (सांगितलें). ॥ ४८ ॥ ॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे अष्टादशो ऽध्यायः ॥ १८ ॥

वर्णाश्रमवतां धर्म एष आचारलक्षण. ॥ स एव मद्भक्तियुतो निःश्रेयसकरः परः ॥ ४७॥ एतत्ते
ऽभिहितं साधो भवान्पृच्छति यच्च माम् ॥ यथा स्वधर्मसंयुक्तो भक्तो मां समियात्परम् ॥ ४८ ॥
॥ इति श्रीभा० महा० एकादश० अष्टादशो ऽध्यायः ॥ १८ ॥ श्रीभगवानुवाच । यो
विद्याश्रुतसंपन्न आत्मवान्नानुमानिकः ॥ मायामात्रमिदं ज्ञात्वा ज्ञानं च मयि संन्यसेत् ॥ १ ॥

श्रीभगवान् उवाच— यः विद्याश्रुतसंपन्नः (अनुभवापर्यंत ज्ञानानें संपन्न) आत्मवान् (प्राप्त झालें आत्मतत्त्व ज्याला असा), नानुमानिक (केवळ परोक्षज्ञानवान् नव्हे असा) [च] [स]

॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने एकादशस्कंधे अष्टादशो ऽध्यायः ॥ १८ ॥ श्रीभगवान् ह्मणाले – उद्धवा, ज्याला अनुभवापर्यंत ज्ञान होऊन आत्मतत्त्व प्राप्त झालें व जो केवळ शाब्दिक ज्ञानवानच राहिला नाही, त्यानें, हें द्वैत आणि त्याचे निवृत्तिसाधन हा मजवर शुद्ध मायेचा खेळ होय, असें जाणून त्या ज्ञानसाधनाचाही त्याग केला

१ देहादि प्रपंच अनुमानानें बाधित ठरला तरी जोंपर्यंत आत्मसाक्षात्काराच्यायोगें नष्ट झाला नाहीं, तोंपर्यंत ज्ञानाभ्यास चालवावा; तेणेंकरून मुक्ति प्राप्त होते असें मार्ग [illegible] आतां अपरोक्षज्ञान होऊन प्रपंच लीनप्राय झाला असतां त्याला कर्तव्य असें कांहींच नसतें असें सांगतात

१ पूर्वे आहे माझें गमन । पूर्वे जाय धरून स्मरण । परी दिग्भ्रम चढल्या जाण । पश्चिमे आपण पूर्व मानी ॥ तैसें शाब्दिक शास्त्रज्ञान । बोले ज्ञान करी जान । तेणें नव्हे समाधान । सर्वथा जाण साधका ॥ नाथ. १८ । १९.

२ ह्यालाच विद्वत्संन्यास ह्मणतात.

कारण, ज्ञान्याला अपेक्षित फल काय तो मीच. तें फळ मिळविण्याचें साधन मीच मान्य असतों आणि त्याचा स्वर्ग (अभ्युदय) व मोक्ष (मतागनिर्वृत्ति) ही मीच एकंदरीत त्याला मजहून अन्य कोणतीच वस्तु प्रिय नसते. - ह्मणूनच त्याला कांहीं मिळवावयाचें किंवा त्यासाठीं कांहीं करावयाचें नमते - ॥ २ ॥ - अशाविषयी विद्वानाचा अनुभवही प्रमाण आहे पहा : - परोक्ष आणि अपरोक्ष ह्या उभय ज्ञानानीं संपन्न पुरुष माझें पदच श्रेष्ठ असें समजतात ह्मणूनच ज्ञानी मला अत्यंत प्रिय असतो

इदं मायामात्रं ज्ञात्वा ज्ञानं मयि संन्यसेत्. ॥ १ ॥ ज्ञानिनः तु अहं एव इष्ट. (अपेक्षित) स्वार्थः (फळ), हेतुः (त्याचें साधन), च संमतः. मत् ऋते (वाचून) अन्य अर्थः स्वर्गः (अभ्युदय), अपवर्गः (मोक्ष) एव च प्रियः न. ॥ २ ॥ ज्ञानविज्ञानसंसिद्धाः मम श्रेष्ठं पदं विदुः अतः ज्ञानी मे प्रियतमः. असौ ज्ञानेन मां बिभर्ति (वागवितो) ॥ ३ ॥ तपः,

ज्ञानिनस्त्वहमेवेष्टः स्वार्थो हेतुश्च संमतः ॥ स्वर्गश्चैवापवर्गश्च नान्यो ऽर्थो मदृते प्रियः ॥ २ ॥ ज्ञानविज्ञानसंसिद्धाः

पदं श्रेष्ठं विदुर्मम ॥ ज्ञानी प्रियतमो ऽतो मे ज्ञानेनासौ बिभर्ति माम् ॥ ३ ॥ तपस्तीर्थं जपो दानं पवित्राणीतराणि च ॥

नालं कुर्वंति तां सिद्धिं या ज्ञानकलया कृता ॥ ४ ॥ तस्माज्ज्ञानेन सहितं ज्ञात्वा स्वात्मानमुद्धव ॥ ज्ञानविज्ञानसंपन्नो

भज मां भक्तिभावतः ॥ ५ ॥ ज्ञानविज्ञानयज्ञेन मामिष्ट्वा ऽऽत्मानमात्मनि ॥ सर्वयज्ञपतिं मां वै संसिद्धिं मुनयो ऽगमन् ॥ ६ ॥

तीर्थं, जपः, दानं, इतराणि पवित्राणि च, या ज्ञानकलया कृता, तां सिद्धिं न अलं (अतिशय) कुर्वंति. ॥ ४ ॥ तस्मात् उद्धव, ज्ञानेन सहितं [यथा तथा] स्वात्मानं ज्ञात्वा ज्ञानविज्ञानसंपन्नः [सन्] भक्तिभावतः मां भज. ॥ ५ ॥ मुनयः ज्ञानविज्ञानयज्ञेन आत्मनि सर्वयज्ञपतिं आत्मानं मां इष्ट्वा (आराधून) संसिद्धिं मां अगमन् ॥ ६ ॥

कारण, तो ज्ञानानें मला अंतरीं धारण करितो. ॥ ३ ॥ ज्ञानाच्या एका अंशानें जी सिद्धि मिळते, ती तपश्चर्या, जप, दान व इतर पवित्र पदार्थ या सर्वांच्या योगेंही पूर्णपणें प्राप्त होत नाही. ॥ ४ ॥ ह्मणून, उद्धवा, साक्षात्कार होईपर्यंत स्वात्मज्ञान संपादन कर आणि परोक्ष व प्रत्यक्ष दोन्ही ज्ञानानीं संपन्न होत्साता माझेंच भक्तिपूर्वक भजन करीत रहा (इतर सगळें सोडून दे). ॥ ५ ॥ - प्राचीन काळीं अनेक - मुनि, सकळ यज्ञांचा अधिपति व अंतरात्मा जो मी, त्या मला आत्म्याच्या ठिकाणीच ज्ञानविज्ञानयज्ञाच्या

---

१ ज्ञान कशाला ह्मणतात व विज्ञान कशाला ह्मणतात व याचा यज्ञ कसा ह्याचें नाथानीं वर्णन केलें आहे तें असें —

स्वयें स्वयंपाक केला आपण । न जाणे कडु मधुर लवण । जंव चाखिला नाहीं आपण । ते दशा सज्ञान ज्ञान ह्मणती ॥ केलिया रसाचें रसस्वादन । स्वयें गोडी सेवी आपण । ऐसी दशा तें विज्ञान । उद्धवा जाण निश्चितीं ॥ किंवा जीव परमात्मा दोनी एक । ऐसें जाणणें ते ज्ञान देख । मेळय भोगणें परमात्मसुख । विज्ञान सम्यक त्या नांव ॥ ६३।६४।६५.

(पुढें चालू)

योगें आराधून उत्तम सिद्धि पावले. ॥ ६ ॥ - त्याच ज्ञानाचा संक्षेपतः उपदेश करितों - उद्धवा, तुझ्या ठिकाणी - देह, इंद्रियें व देवता असा - त्रिविध जो विकार (कार्यवर्ग) राहत आहे, तो केवळ माया होय, - यथार्थ नव्हे - कारण, तो सुसता मध्यें काही वेळ भासत असतो, आरंभींही नसतो व अंतीही असत नाही (उदाहरण —दोरीवर होणारा सर्पाचा भास. तो जमा मध्यें तेवढा कांहीं वेळ असतो, पूर्वी तीच दोरी आपण पुष्कळ वेळा पाहिली होती तेव्हा नव्हता व पुढें दोरी खरी असें कळले की नाहीसा होणारच, अर्थात तो सर्प खरा नव्हे तसें हा देहेंद्रियादि प्रपंच पूर्वी नव्हता, पुढें नसणार व मध्येंच काहीवेळ भासतो ह्मणून खरा नव्हे) ह्मणून त्या देहेंद्रियादि विकाराला जेव्हा जन्मनाशादि उद्धव, त्वयि यः त्रिविधः विकारः (कार्यवर्गः) आश्रयति, [सः] माया. यत् अंतरा(मध्यें) पतति (भासतो), आद्यपवर्गयोः न. यत् (जेव्हा) अस्य अमी जन्मादय स्युः,

त्वय्युद्धवाऽऽश्रयति यस्त्रिविधो विकारो मायांऽतरा पतति नाद्यपवर्गयोर्यत् ॥ जन्मादयो ऽस्य यदमी तव तस्य किं स्यु-
राद्यंतयोर्यदसतो ऽस्ति तदेव मध्ये ॥ ७ ॥ उद्धव उवाच । ज्ञानं विशुद्धं विपुलं यथैतद्वैराग्यविज्ञानयुतं पुराणम् ॥
आख्याहि विश्वेश्वर विश्वमूर्ते त्वद्भक्तियोगं च महद्विमृग्यम् ॥ ८ ॥

तदा तस्य तव किं ? यत् असतः (मिथ्याभूत पदार्थाच्या) आद्यंतयोः अस्ति, तत् एव मध्ये. ॥ ७ ॥ उद्धवः उवाच— विश्वेश्वर, विशुद्धं वैराग्यविज्ञानयुतं पुराणं एतत् ज्ञान विपुल यथा [तथा कथय]. महद्विमृग्यं त्वद्भक्तियोगं च आख्याहि. ॥ ८ ॥
विकार होतात, तेव्हा त्याचा आश्रयभूत अशा तुला त्याचे काय असावयाचे? - काही नाहीं - मिथ्याभूत सर्पाच्या आरंभीं व अंतीं जें काहीं (दोरी) असते, तेच मध्येंहीं असतें, त्याप्रमाणें देहेंद्रियाच्या उत्पत्तीपूर्वी जे असते व नाशानंतर जें असणार तें आत्मरूपच तू निर्विकार ब्रह्म होस ॥ ७ ॥ - ज्ञानादिकाचा विशेष समजून घेण्यासाठी - उद्धवानें प्रश्न केला - हे विश्वाधिपते समस्त विश्व तुझी मूर्ति होय. भगवंता, वैराग्य आणि शाब्दिक ज्ञान यासहित हें पुरातन विशुद्ध ज्ञान निश्चित कशा प्रकारें होईल, तें मला सांग तसेच मोठमोठे पुरुष (ब्रह्मादि देव) ज्याचा शोध करितात तो तुझा भक्तियोग मला निवेदन कर ॥ ८ ॥

ज्ञाना वह— जे ज्ञानघनें अतिसंपन्न । परम पवित्र विज्ञानें जाण । ऐसे ब्रह्मभूत जे ब्राह्मण । यज्ञद्वारा करिती भजन माझें ॥ हृदयाच्या निज भुवनीं । चिद्रत्नाची भूमि खणोनी । शम दम विरक्ति कुंडें तीन्ही । केली आवो साधूनी श्रद्धेचा ॥ तेथें अक्षराक्षर अरणी दोन्ही । गुरुमंत्रे दृढ मथुनी । काढिला सूक्ष्म निर्धूमाग्नी । कुंडी स्थापुनी पेटविला ॥ शुद्ध सत्त्वाचें घृत तेथ । रजतमद्रव्येंसीं मिश्रित । वैराग्य स्रुवेनें आहुति देत । मंत्र तेथ युक्तीचे ॥ घेऊनी विद्याशस्त्र लखलखित । सकल पशूंचा करूनी घात । तेणें यज्ञपति श्रीअनंत । केला तृप्त निज बोधें ॥ तेथें पूर्णाहुति सकारण । घालिता जीवभावाचे अवदान । यज्ञभोक्ता श्रीनारायण । परमात्मा जाण सुखी केला ॥ ज्ञानेश्वर ७७
१ ज्ञानें नाथानीं उदाहरण दिलें आहे तें असें.— सूर्यांआदी मृगजळ नसे । अस्तमानी उरले न दिसे । मध्ये काहीं आभासे । तेथही नसे जळलेश ॥ ८९

ईश्वरा, मी ह्या भयंकर संसारमार्गातील तापत्रयांनी गांजून व तापून गेलो आहें व मला तुझ्या चरणद्वयाहून वेगळा दुसरा आधार कांहीं दिसत नाहीं. तुझे चरण हें चहूकडून अमृताची
वृष्टि करणारें छत्र होय ॥९॥ हे महानुभावा, हा जन (मी) संसारकूपात पडला असून तेथे ह्याला कालसंज्ञक सर्प चावला आहे ह्याला क्षुद्र सुखाची इच्छा ही अतिशय तहान लागते
म्हणून तूं ह्याला कूपातून बाहेर काढ आणि मोक्षबोधक वचनाची ह्यावर वृष्टि कर ॥१०॥ श्रीभगवान् म्हणाले – उद्धवा पूर्वी अजातशत्रु (धर्म) राजाने अशाच प्रकारचा हा
प्रश्न, धर्मरक्षक जनामध्यें श्रेष्ठ जे भीष्माचार्य, त्यांना केला होता त्याप्रसंगीं आम्ही सगळेजण तो संवाद ऐकण्यासाठीं बसलेले होतो. ॥ ११ ॥ भारती युद्ध समाप्त झाले असतां,
ईश, तापत्रयेण अभिहतस्य घोरे भवाध्वनि संतप्यमानस्य अमृताभिवर्षात् (अमृताची वृष्टि करणारें अशा) तव अंघ्रिद्वंद्वातपत्रात् (चरणद्वयरूप छत्राहून) अन्यत् शरणं न पश्यामि
॥९॥ महानुभाव, अस्मिन् बिले (संसारकूपात) संपतितं कालाहिना (कालरूप सर्पाने) दष्टं (दंश केलेल्या) क्षुद्रसुखोरुतर्षं (क्षुद्र सुखाविषयीं पुष्कळ तृषा म्ह० इच्छा ज्याला अशा) एनं जनं
कृपया समुद्धर, आपवर्ग्यैः (मोक्षबोधक) वचोभिः आसिंच. ॥१०॥ श्रीभगवान् उवाच—पुरा अजातशत्रुः राजा सर्वेषां नः अनुशृण्वतां [सतां], इत्थं एतत् धर्मभृतां व-

तापत्रयेणाभिहतस्य घोरे संतप्यमानस्य भवाध्वनीश ॥ पश्यामि नान्यच्छरणं तवाङ्घ्रिद्वंद्वातपत्रादमृताभिवर्षात् ॥ ९ ॥ दष्टं जनं
संपतितं बिले ऽस्मिन् कालाहिना क्षुद्रसुखोरुतर्षम् ॥ समुद्धरैनं कृपया ऽपवर्ग्यैर्वचोभिरासिंच महानुभाव ॥१०॥ श्रीभगवानुवाच ।
इत्थमेतत्पुरा राजा भीष्मं धर्मभृतां वरम् ॥ अजातशत्रुः पप्रच्छ सर्वेषां नो ऽनुशृण्वताम् ॥ ११ ॥ निवृत्ते भारते युद्धे सुहृन्नि-
धनविह्वलः ॥ श्रुत्वा धर्मान्बहून्पश्चान्मोक्षधर्मानपृच्छत ॥ १२ ॥ तानहं ते ऽभिधास्यामि देवव्रतमुखाच्छ्रुतान् ॥ ज्ञानवैराग्यवि-
ज्ञानश्रद्धाभक्त्युपबृंहितान् ॥ १३ ॥ नवैकादश पंच त्रीन्भावान्भूतेषु येन वै ॥ ईक्षेताथैकमप्येषु तज्ज्ञानं मम निश्चितम् ॥ १४ ॥

भीष्मं पप्रच्छ. ॥ ११ ॥ भारते युद्धे निवृत्ते [सति], सुहृन्निधनविह्वल. [धर्म] बहून् धर्मान् श्रुत्वा पश्चात् मोक्षधर्मान् अपृच्छत ॥१२॥ अहं ते देवव्रतमुखात्
(भीष्माच्या मुखें) श्रुतान् ज्ञानवैराग्यविज्ञानश्रद्धाभक्त्युपबृंहितान् तान् अभिधास्यामि (सांगेन) ॥ १३ ॥ येन नव एकादश पंच त्रीन् भावान् भूतेषु, अथ एषु अपि एक
आप्तजनाच्या मृत्यूमुळे शोकाकुल होऊन गेलेल्या धर्मराजानें, - भीष्माचार्यांच्या मुखें - बहुत धर्म श्रवण केले आणि नंतर त्यांना मोक्षधर्म विचारिले ॥ १२ ॥ त्यावेळी भीष्माचा-
र्यांच्या मुखातून ऐकिले ते धर्म मी आतां तुला निवेदन करितो. त्यांत ज्ञान (परोक्ष), वैराग्य, विज्ञान (अपरोक्ष), श्रद्धा व भक्ति ह्या अंगाचे निरूपण केलेलं आहे ॥ १३ ॥
- पहिल्यानें ज्ञान म्हणजे काय तें सांगतो, ऐक : - नऊ (प्रकृति, पुरुष, महत्तत्त्व, अहंकार व पांच सूक्ष्मभूतें), अकरा (पांच ज्ञानेंद्रियें पांच कर्मेंद्रियें व मन). पांच

१ उद्धवाला विश्वास येण्यासाठीं विद्वानांच्या सर्वांत ठरलेला निर्णयच सांगावा अशा विचारानें भगवान् सांगू लागले –

(महाभूतें) व तीन (सत्व, रज, तम हे गुण) - मिळून हीं अठ्ठावीस तत्त्वें - ब्रह्मदेवापासून स्थावरांपर्यंत समस्त कार्यांमध्यें प्रविष्ट झालेलीं आहेत असें ज्या ज्ञानानें दिसून येतें आणि ह्या सकळ तत्त्वामध्ये एक परमात्मतत्त्वच भरून राहिले आहे असे ज्या ज्ञानाच्या योगें पाहता येते (कार्यकारणात्मक हें विविध विश्व दिसत असन हीं हे परमकारणात्मकच होय, त्याहून वेगळें नाहीं, असें ज्या ज्ञानाच्या योगें पुरुषाला दिसून येईल), ते माझें ज्ञान (परोक्ष) होय हा निश्चय आहे ॥ १४ ॥ - आता अपरोक्षज्ञान ह्मणजे काय ते, ऐक • - पूर्वी (परोक्षज्ञानाच्या वेळी) ज्या एक परमात्मतत्त्वानें व्यापलेलीं अनेक तत्त्वें पाहत होता, त्याना आता तशा दृष्टीनें पाहत नाहीं, तर ते एक परमकारणरूप ब्रह्मच, असें पाहतो ह्या ज्ञानालाच विज्ञान ह्म० अपरोक्ष ज्ञान ह्मणतात (ह्याचा एकंदर आशय असा — एकाद्याला पूर्ण दिशाभूल झालेली आहे, तर ती भूल दुसऱ्यानें नुसतें त्याला, ती अमुक दिशा नव्हे, अमुक आहे, असें सांगितलें तरी निवृत्त होत नाही, त्या निवृत्तीला साधन त्याला तसा निश्चित अनुभव पटला पाहिजे हे होय. तसेच, मनुष्याला हें जगत् किंवा द्वैत प्रत्यक्ष दिसत असते, त्याला नुसतें पूर्वीचें परोक्षज्ञान असलें ह्म० जगात एक आत्मा भरून राहिला आहे असें तो पाहू लागला ईक्षेत (पाहील), तत् ज्ञानं (परोक्ष ज्ञान) मम निश्चितं. ॥ १४ ॥ यत् एकेन येन त्रिगुणात्मना भावाना स्थित्युत्पत्त्यप्ययान् तथा (पूर्वीप्रमाणें) न ईक्षेत एतत् एव विज्ञानं

एतदेव हि विज्ञानं न तथैकेन येन यत् ॥ स्थित्युत्पत्त्यप्ययान्पश्येद्भावाना त्रिगुणात्मनाम् ॥ १५ ॥
आदावंते च मध्ये च सृज्यात्सृज्यं यदन्वियात् ॥ पुनस्तत्प्रतिसंक्रामे यच्छिष्येत तदेव सत् ॥ १६ ॥

(अपरोक्ष ज्ञान). ॥ १५ ॥ आदौ, मध्ये, अंते च सृज्यात् (कार्यातून) सृज्यं यत् अन्वियात् (मागोमाग जाईल), पुनः तत्प्रतिसंक्रामे (त्याचा लय झाला असता) यत् शिष्येत तरी जग आत्म्याहून वेगळें सत्य असें त्याला वाटणारच. आता अपरोक्षज्ञान झालें कीं तो, जसें वस्त्र जळलें तरी त्या राखाडीत देखील त्याची वीण, तंतु ही जशींच्या तशी दिसतात, तसें जग मिथ्या ठरलें असून संस्कारमात्रानें उरलेलें आहे असें पाहतो, त्याहून वेगळी जगाची सत्ता त्याला वाटत नाहीं) - आता एकच आत्मा सकल कार्यांत प्रविष्ट होतो कसा व कार्यें कारणाहून भिन्न नाहींत कशीं ते सांगतो, ऐक • जर ह्या कार्यांना उत्पत्त्यादिक विकारच नसते, तर त्याचें कारण एक ह्मणता आलें नसतें व हीं एकरूप व मिथ्या ठरलीं नसती. परंतु तसा प्रकार नाहीं: कारण, - ह्या त्रिगुणात्मक (सावयव) पदार्थांचे उत्पत्ति, स्थिति व प्रलय होतात, हे पहावें ॥ १५ ॥ आणि जें वस्तु कोणत्याही कार्याच्या उत्पत्तिसमयीं व अंतीं (दुसरा परिणाम होण्याच्या वेळीं) त्याचें कारण असतें मध्यावस्थेंत त्याचें आश्रय असतें, एका कार्यांतून दुसऱ्या कार्यांमध्ये त्याच्या अनुरोधानें जातें व त्या कार्यांचा लय झाला असता अवशिष्ट राहते तेंच वस्तु सत् होय असें पहावें ॥ १६ ॥

१ ह्या सत् वस्तूचें उदाहरण नाथानीं दिलें आहे तेः— जेवीं अलंकारा पूर्वी सोनें। अलंकारीं सोनें सोनेपणें। अलंकारनाशीं नाही नणे। जेवीं का सोनें निज स्थिती। ९४।

वेदवचनें, प्रत्यक्ष, मोठमोठ्या लोकांतील प्रसिद्धि आणि अनुमान हीं चार प्रमाणें होत विकल्प ह्मणजे भेदप्रपंच हा चारी प्रमाणामध्ये बाधित ठरतो ह्मणून, - सर्वत्र आत्मतत्त्व भरलेलें आहे असें पाहणारा - तो पुरुष त्या प्रपंचापासून विरक्त होतो ॥ १७ ॥ - त्याला स्वर्गादि सुखाची आशा नसतेच कारण, — तो विवेकी पुरुष, कर्मे विनाशी असल्यामुळे त्यांपासून मिळणारें ब्रह्मलोकापर्यंत सगळें अदृष्ट (आपण जे पाहिलेले नाहीं ते) सुखही ऐहिक सुखाप्रमाणेच दुःखरूप व नश्वर होय असें पाहतो (उरतें), तत् एव सत्. ॥ १६ ॥ श्रुतिः (वेदवाक्यें), प्रत्यक्षं, ऐतिह्य (लोकप्रसिद्धि), अनुमानं [एव] चतुष्टयं. प्रमाणेषु अनवस्थानात् (टिकत नाहीं ह्मणून) स विकल्पात् विरज्यते. ॥ १७ ॥ विपश्चित् (विवेकी) आविरिंचात् (ब्रह्मदेवापर्यंत) कर्मणः परिणामित्वात् (परिणाम ह्मणून) अमंगल (दुःखरूप) अदृष्टं (न दिसलेले पारलौकिक सुख) अपि दृष्ट-

श्रुतिः प्रत्यक्षमैतिह्यमनुमानं चतुष्टयम् ॥ प्रमाणेष्वनवस्थानाद्विकल्पात्स विरज्यते ॥ १७ ॥ कर्मणां परिणामित्वादाविरिंचादमंगलम् ॥ विपश्चिन्नश्वरं पश्येददृष्टमपि दृष्टवत् ॥ १८ ॥ भक्तियोगः पुरैवोक्तः प्रीयमाणाय ते ऽनघ ॥ पुनश्च कथयिष्यामि मद्भक्तेः कारणं परम् ॥ १९ ॥ श्रद्धा ऽमृतकथायां मे शश्वन्मदनुकीर्तनम् ॥ परिनिष्ठा च पूजायां स्तुतिभिः स्तवनं मम ॥२०॥ आदरः परिचर्यायां सर्वांगैरभिवंदनम् ॥ मद्भक्तपूजा ऽभ्यधिका सर्वभूतेषु मन्मतिः ॥ २१ ॥

वत् नश्वरं पश्येत्. ॥ १८ ॥ अनघ, भक्तियोग. पुरा एव उक्त. पुनः प्रीयमाणाय (संतोष पावणाऱ्या) ते मद्भक्तेः परं कारणं कथयिष्यामि. ॥ १९ ॥ शश्वत् मे अमृतकथायां श्रद्धा, मदनुकीर्तनं, पूजायां परिनिष्ठा, स्तुतिभिः मम स्तवन, ॥ २० ॥ परिचर्यायां (सेवेविषयीं) आदर., सर्वांगैः अभिवंदनं, अभ्यधिका मद्भक्तपूजा, सर्व- ॥ १८ ॥ हे पुण्यपुरुषा, मी तुला भक्तियोग पूर्वींच सांगितला आहे, परंतु त्यामुळें तुझें चित्त संतोष पावतें ह्यासाठीं मी तुला माझ्या भक्तीची निश्चित कारणें पुन्हा निवेदन करितों. ॥ १९ ॥ माझ्या अमृततुल्य कथा ऐकण्याविषयी नित्य आदर माझ्या कथांचे निरंतर व्याख्यान, माझी पूजा करण्याविषयी नेहमीं आवड, स्तोत्रांनी माझी स्तुति करणे, ॥ २० ॥ माझी सेवा करण्याबद्दल प्रीति, मला सर्वांगानीं प्रणाम करणें, माझ्या भक्ताची विशेषतः पूजा, सर्वभूतीं मी भरलेला आहें अशी बुद्धि, ॥ २१ ॥

---

१ 'नेह नाना ऽस्ति किंचन' इत्यादि वचनें २ पट ततूहून वेगळा नाहीं, घट मृत्तिकेहून वेगळा नाहीं, एकंदरींत कार्य कारणाहून वेगळें नसतें तसेंच चैतन्यव्यतिरिक्त काहीं दिसत नाहीं ३ प्रपंच, मिथ्या ज्ञेय, कारण, तो दृश्य आहे; उदाहरण शिंपेवर भासणारें रुपें इत्यादि ४ असें.— काळे पांढरे दोनी सुणीं (कुत्रीं)। जेवीं सम अपवित्रपणीं । तेवीं इहपरलोक दोनी । नश्वरपणीं समान ॥ नाथ, २११. ५ असें :— दीर्घ, वक्र आणि वर्तुळ । दिसती भिन्न भिन्न इंगळ । परी आगी एकचि केवळ । तेवीं भूतें सकळ मद्रूप ॥ नाथ ॥

मजसाठीं लौकिक व्यवहार चालविणें (माझ्या पूजेसाठीं उपचारद्रव्यें स्वता संपादणें), वाणीनें माझ्या गुणाचें वर्णन, मजकडे चित्त लावणे, सकल भोगेच्छा मोडून देणें, ॥ २२ ॥ माझ्या भजनाला अडचण करील त्या वस्तूचा, स्रक्चंदनादि भोगसाधनाचा आणि पुत्रलालनादि सुखाचाही त्याग करणें, आणि यजन, दान, होम, जप, व्रत आणि तप हीं कर्में मजसाठीं करणें, - हीं मजवर भक्ति जडण्याचीं कारणें होत. - ॥२३॥ उद्धवा, असे धर्म आचरून मला आत्मनिवेदन करणाऱ्या मनुष्याची मजवर प्रेमलक्षण भक्ति जडते मग त्या भक्ताला दुसरा कोणता कार्यभाग (साध्य किंवा साधन) अवशिष्ट राहतो बरें? - कोणताच नाहीं, तर सगळीं साध्यें व साधनें त्याला आपोआप प्राप्त होतात. - ॥ २४ ॥

भूतेषु मन्मतिः, ॥ २१ ॥ मदर्थेषु अंगचेष्टा, वचसा मद्गुणेरणं (माझ्या गुणाचें कीर्तन), मनसः मयि अर्पणं, सर्वकामविसर्जनं, ॥ २२ ॥ मदर्थे (माझ्या भजनासाठीं) अर्थपरित्यागः (त्यास विरोध आणणाऱ्या अर्थांचा त्याग), भोगस्य, सुखस्य च [त्यागः], यत् व्रतं, तपः च [तत्], इष्टं, दत्तं हुतं, जप्तं च मदर्थं ॥ २३ ॥ उद्धव, एवं धर्मैः आत्मनिवेदिनां मनुष्याणां मयि भक्तिः संजायते. अस्य अन्यः कः अर्थः अवशिष्यते? ॥ २४ ॥ यदा सत्त्वोपबृंहितं शांतं चित्तं आत्मनि अर्पितं, [तदा] धर्मं, ज्ञानं, सवै-

मदर्थेष्वंगचेष्टा च वचसा मद्गुणेरणम् ॥ मय्यर्पणं च मनसः सर्वकामविवर्जनम् ॥ २२ ॥ मदर्थे ऽर्थपरित्यागो भोगस्य च सुखस्य च ॥ इष्टं दत्तं हुतं जप्तं मदर्थं यद्व्रतं तपः ॥ २३ ॥ एवं धर्मैर्मनुष्याणामुद्धवाऽऽत्मनिवेदिनाम् ॥ मयि संजायते भक्तिः को ऽन्यो ऽर्थो ऽस्यावशिष्यते ॥ २४ ॥
यदा ऽऽत्मन्यर्पितं चित्तं शांतं सत्त्वोपबृंहितम् ॥ धर्मं ज्ञानं सवैराग्यमैश्वर्यं चाभिपद्यते ॥ २५ ॥
यदर्पितं तद्विकल्पे इंद्रियैः परिधावति ॥ रजस्वलं चासन्निष्ठं चित्तं विद्धि विपर्ययम् ॥ २६ ॥
धर्मो मद्भक्तिकृत्प्रोक्तो ज्ञानं चैकात्म्यदर्शनम् ॥ गुणेष्वसंगो वैराग्यमैश्वर्यं चाणिमादयः ॥ २७ ॥

राग्यं ऐश्वर्यं च अभिपद्यते ॥ २५ ॥ यत् तत् चित्तं विकल्पे (देह, गृह इत्यादि प्रपंचावर) अर्पितं [सत्] इंद्रियैः परिधावति, [तदा] रजस्वलं, असन्निष्ठं (निषिद्ध विषयावर आसक्त) च [भवति तत.] विपर्ययं (उलट प्रकार अधर्मादि) विद्धि. ॥ २६ ॥ मद्भक्तिकृत् धर्मः प्रोक्तः. ऐकात्म्यदर्शनं ज्ञानं. गुणेषु असंगः वैराग्यं अणिमादयः ऐश्वर्यं ॥ २७ ॥

- अर्थ किंवा अनर्थ प्राप्त होण्याला कारण चित्तच होय. पहा.- चित्त आत्मरूपी लाविलेलें, सत्त्वगुणानें भरलेलें व शांत असेल, तेव्हा पुरुषाला धर्म, ज्ञान, वैराग्य आणि ऐश्वर्य हीं प्राप्त होतात. आणि ज्या वेळीं तेंच चित्त शरीर, गृह इत्यादि प्रपंचावर लाविलेलें असेल व इंद्रियद्वारा विषयावर धाव घेत सुटेल तेव्हा तें अधिक मलयुक्त व निष्यासन विषयांवर आसक्त होत जातें आणि तेव्हा त्या पुरुषाच्या हातून विपरीत कार्यें (अधर्मादिक) घडतात असें समज ॥ २५ ॥ २६ ॥ जेणेंकरून मजविषयीं भक्ति उत्पन्न होईल, तोच

धर्म होय. कारण तोच शास्त्रांत उत्तम ह्मणून प्रतिपादिलेला आहे सर्वत्र एक आत्मा भरलेला आहे अशी दृष्टि जेणेंकरून होईल तेच ज्ञान विषयावरील आसक्ति सुटणे हे वैराग्य आणि अणिमादि सिद्धि हें ऐश्वर्य होय ॥ २७ ॥ - धर्मादिकाचीं लक्षणें लोकामध्यें वेगळीच प्रसिद्ध आहेत व भगवतानीं वेगळीच सांगितली त्यावरून भगवताच्या मतें यमनियमादिकाच्या सख्या व लक्षणें वेगळी असतील अशी उद्धवाच्या मनात कल्पना आल्यामुळें त्यानें प्रश्न केला - उद्धव ह्मणाला — हे शत्रुमर्दना प्रभो श्रीकृष्णा, यम किती प्रकारचा आहे? तसेच नियमाचे प्रकार किती? शम ह्मणजे काय? दम कोणता? तितिक्षेचे स्वरूप काय? धृति कशाला ह्मणावे? ॥ २८ ॥ दान ते काय? तप कोणते? शौर्य कशा-

उद्धवः उवाच — अरिकर्शन, यमः, नियमः च कतिविध प्रोक्त? कृष्ण, शमः कः? दमः कः? प्रभो, तितिक्षा, धृतिः च का? ॥ २८ ॥ दानं किं? तपः किं? शौर्यं किं? सत्यं, ऋतं [च किं] उच्यते? त्यागः कः? किं धनं इष्टं? यज्ञः कः? दक्षिणा का? ॥ २९ ॥ श्रीमन्, पुंसः बलं किंस्वित्? केशव, भगः, लाभः च कः? परा विद्या का,

उद्धव उवाच । यमः कतिविधः प्रोक्तो नियमो वा ऽरिकर्शन ॥ कः शमः को दमः कृष्ण का तितिक्षा धृतिः प्रभो ॥२८॥
किं दानं किं तपः शौर्यं किं सत्यमृतमुच्यते ॥ कस्त्यागः किं धनं चेष्टं को यज्ञः का च दक्षिणा ॥ २९ ॥ पुंसः
किंस्विद्बलं श्रीमन् भगो लाभश्च केशव ॥ का विद्या ह्रीः परा का श्रीः किं सुखं दुःखमेव च ॥ ३० ॥ कः पंडितः
कश्च मूर्खः कः पंथा उत्पथश्च कः ॥ कः स्वर्गो नरकः कः स्वित्को बंधुरुत किं गृहम् ॥ ३१ ॥ क आढ्यः को
दरिद्रो वा कृपणः कः क ईश्वरः ॥ एतान्प्रश्नान्मम ब्रूहि विपरीतांश्च सत्पते ॥ ३२ ॥

ह्रीः, श्रीः [च] का? सुखं, दुःखं एव च किं? ॥ ३० ॥ पंडितः कः? मूर्खः कः? पंथाः कः? उत्पथः कः? स्वर्गः कः? नरकः कः स्वित्? बंधुः कः? उत गृहं किं? ॥ ३१ ॥ आढ्यः कः? दरिद्रः वा कः? कृपणः कः? ईश्वरः कः? सत्पते एतान् प्रश्नान्, विपरीतान् च मम ब्रूहि. ॥ ३२ ॥

ला ह्मणावें? सत्य व ऋत कशाला ह्मणतात? त्याग कोणता? इष्ट धन कोणतें? यज्ञ कोणता? दक्षिणा कोणती? ॥ २९ ॥ हे श्रीमन् केशवा, पुरुषाचें बळ कोणतें? भाग्य कोणतें? लाभ कोणता? उत्तम विद्या कोणती? उत्तम लज्जा व उत्तम शोभा कोणती? सुख कशाला ह्मणावें? दुःख ते काय? ॥ ३० ॥ पंडित कोणाला ह्मणावे? मूर्ख कोण? मार्ग कोणता व कुमार्ग कोणता? स्वर्ग कोणता? नरक कोणता? बंधु कोण? गृह कोणतें? ॥ ३१ ॥ संपन्न कोणाला ह्मणावे? दरिद्री कोण? कृपण कोण? व ईश्वर कोण? हे सत्पालका, ह्या माझ्या प्रश्नांचीं उत्तरें व विपरीत प्रकार (अशम, अदम इत्यादिकाचीं लक्षणेंही) मला सांग ॥ ३२ ॥

श्रीभगवान् ह्मणाले:– (१) प्राणिमात्राचा छल न करणें, (२) सत्य, (३) मनानेंही परद्रव्याचा अपहार न करणें, (४) विषयादिकावर अनासक्ति, (५) लज्जा, (६) संचय न करणें, (७) धर्मावर विश्वास, (८) ब्रह्मचर्य, (९) मौन, (१०) स्थिरता, (११) क्षमा आणि (१२) अभय ॥ ३३ ॥ तसेंच (१) मानसिक शुद्धता, (२) बाह्यशुद्धि, (३) जप, (४) तप, (५) होम, (६) श्रद्धा, (७) अतिथीचा सत्कार. (८) माझें पूजन, (९) तीर्थयात्रा, (१०) दुसऱ्याच्या हितासाठीं उद्योग, (११) संतोष, व (१२) गुरूची सेवा ॥ ३४ ॥ हे बारा यम व बारा नियम दोन श्लोकात अनुक्रमे सांगितले आहेत या

श्रीभगवान् उवाच— (मूळाप्रमाणें). ॥ ३३ ॥ (मूळाप्रमाणें). ॥ ३४ ॥ तात, एते द्वादश सनियमा: यमा: उभयो: (दोन श्लोकात) स्मृता: हि [एते] पुंसा उपासिता:

श्रीभगवानुवाच । अहिंसा सत्यमस्तेयमसंगो ह्रीरसंचयः ॥ आस्तिक्यं ब्रह्मचर्यं च मौनं स्थैर्यं क्षमा ऽभयम् ॥ ३३ ॥
शौचं जपस्तपो होमः श्रद्धा ऽऽतिथ्यं मदर्चनम् ॥ तीर्थाटनं परार्थेहा तुष्टिराचार्यसेवनम् ॥ ३४ ॥ एते यमाः सनियमा
उभयोर्द्वादश स्मृताः ॥ पुंसामुपासितास्तात यथाकामं दुहंति हि ॥ ३५ ॥ शमो मन्निष्ठता बुद्धेर्दम इंद्रियसंयमः ॥
तितिक्षा दुःखसंमर्षो जिह्वोपस्थजयो धृतिः ॥ ३६ ॥

[संत:] यथाकामं (इच्छेप्रमाणें) दुहंति (पुरवितात). ॥ ३५ ॥ बुद्धे: मन्निष्ठता शम: इंद्रियसंयम: (इंद्रियें आवरणें) दम. दुःखसमर्ष (दुःख सोसणें) तितिक्षा. जिव्होपस्थजय: धृति. ॥ ३६ ॥

उद्धवा, हे आचरिले असतां पुरुषाला त्याच्या इच्छेप्रमाणें अभ्युदय किंवा मोक्ष देतात (सकाम पुरुषाचा उत्कर्ष करितात व निष्काम पुरुषाला मोक्ष देतात) ॥ ३५ ॥ मुमुक्षूनें ग्राह्य गुण जे शमादिक व त्याज्य जे दुःखादिक, त्यांची लक्षणें लोकामध्यें प्रसिद्ध आहेत, त्याहून माझ्या मताप्रमाणें निराळी आहेत, पहा - शम ह्मणजे बुद्धीची मजवर निष्ठा हा होय; - नुसत्या शांतीला शम अशी संज्ञा नाहीं, - दम ह्मणजे इंद्रियांचा जय, - चोरादिकांना दमविणें हा नव्हे - तितिक्षा ह्मणजे दैवीने प्राप्त होणारीं दुःखें-

१ किंवा ' उभयो: ' याचा अर्थ ' सकाम व निष्काम अशा उभयविध लोकांना ' असा करावा २ ह्यावें उदाहरण नाथ देतात — बुद्धि परमात्मीं मिळे जाण । जेथें सारासार लक्षण ॥
३ गोफणेचा सुवर्ण पाषाण । लागतां दुःख होय परम । तोचि ओळखिलिया सुवर्ण । दुःख जाऊनी सुख होये ॥ किंवा, स्वप्नींच दरिद्र आणि सधनता । जागृतीसी दोन्ही मिथ्या । तेवीं सुखदुःखा परता । देखणें तत्त्वता ते तितिक्षा ॥ नाथ

इंद्रियाचे वेग आवरून धरणें ही होय, - केवळ उद्विग्न न होणे ही नव्हे, - ॥ ३६ ॥
दिकाचीं दुःखें सोसणें, - मार सोसणे नव्हे, - धृति ह्मणजे जिव्हा आणि उपस्थ ह्या इंद्रियाचे वेग आवरून धरणें ही होय, कृच्छ्रचांद्रायणादिकाना खरें तप ह्मणना
प्राणिमात्राचा द्रोह करणें सोडून देणे हें उत्तम दान होय, - नुसतें द्रव्य देणें दान नव्हे, - उपभोगाविषयी उदासीन असणें हेच तप होय, - नुसते खरे बोलणे ह्मणजे सत्य नव्हे, - ॥ ३७ ॥
येत नाहीं, - वासनाचा प्रतिबंध करणे हच खरें शौर्य, - लढाया जिंकणे हा शूरपणा नव्हे, - ब्रह्मविचार हेंच सत्य होय, व त्याग ह्मणजे क[र्मा]चा सन्यास (कर्मं
ऋत ह्मणजे सत्य व मधुर भाषण, असे कवींनीं ह्मणून ठेविलें आहे, शौच (शुद्धता) कर्माचे ठिकाणीं आसक्ति न ठेवणें हें होय, - यज्ञ ह्मणजे मी परमेश्वर
सोडणे) हा झाटला जातो, ॥ ३८ ॥ धर्म हेच मनुष्याचें हितकर द्रव्य होय, - लोकप्रसिद्ध धन जें गुरेढोरें इत्यादि त्याला धन ह्मणता येत नाही ॥ ३७ ॥ कविभि ऋतं
दंडन्यास. (प्राण्याचा द्रोह सोडणें) परं दान कामत्याग. (भोगाविषयीं उदासीनता) तप स्मृतं. स्वभावविजय (वासनेचा प्रतिबंध) शौर्यं समदर्शन सत्य ॥ ३८ ॥ नृणां इष्ट (चागलें) धन धर्म भगवत्तम अहं यज्ञ ज्ञान-
सूनृता (सत्य व मधुर) वाणी परिकीर्तिता. कर्मसु असंगमः (अनासक्ति) शौच. त्याग. सन्यासः उच्यते

दंडन्यासः परं दानं कामत्यागस्तपः स्मृतम् ॥ स्वभावविजयः शौर्यं सत्यं च समदर्शनम् ॥ ३७ ॥
ऋतं च सूनृता वाणी कविभिः परिकीर्तिता ॥ कर्मस्वसंगमः शौचं त्यागः संन्यास उच्यते ॥ ३८ ॥
धर्म इष्टं धनं नृणां यज्ञोऽहं भगवत्तमः ॥ दक्षिणा ज्ञानसंदेशः प्राणायामः परं बलम् ॥ ३९ ॥
भगो म ऐश्वरो भावो लाभो मद्भक्तिरुत्तमः ॥ विद्याऽऽत्मनि भिदाबाधो जुगुप्सा ह्रीरकर्मसु ॥ ४० ॥

संदेश. (ज्ञानोपदेश) दक्षिणा. प्राणायामः परं बलं. ॥ ३९ ॥ मे ऐश्वर भाव (षड्गुणैश्वर्य) भग. मद्भक्ति उत्तम. लाभ. आत्मनि भिदाबाध (भेदाचा निरास) विद्या
हाच होय (ईश्वरार्पणबुद्धीनें यज्ञ करावा, क्रियाबुद्धीनें करूं नये), यज्ञाकरिता दक्षिणा ह्मणजे ज्ञानोपदेश ही समजावी, - सुवर्णादि देणे ही दक्षिणा नव्हे (कारण, त्या
ज्ञानोपदेशरूप दक्षिणेच्या योगें यज्ञरूप विष्णूची प्राप्ति होते), प्राणायाम हेंच श्रेष्ठ बळ होय (कारण दुर्जय जें मन ते प्राणायामाच्या योगें जिंकिता येते). ॥ ३९ ॥
- ऐश्वर्य, धर्म, कीर्ति, संपत्ति, ज्ञान व वैराग्य - हे माझे षड्गुणैश्वर्य, ह्यालाच भाग्य अशी संज्ञा आहे, माझी भक्ति हा उत्तम लाभ होय, - पुत्रप्राप्ति हा लाभ नव्हे, - आत्मरूपी
प्रतीतीला येणाऱ्या भेदाचें निरसन हीच विद्या होय, - एकदर सगळ्या ज्ञानाला विद्या ह्मणता येत नाही, - अकार्य कर्माविषयी त्यागबुद्धि ही लज्जा होय, - केवळ लोकप्रसिद्ध

१ हे कसे आवरावयाचें तें याप्रमाणें सांगतात — जेवीं कृष्णसर्प धरिजे हातीं । हे दोन्ही (जिव्हा आणि शिश्न) धरिजे तैशिया रीती । अलुमाळ ढिळावितां धृति । परतोनि खाती धरित्यासी ॥ ४४५ ॥

लाजेला लज्जा ह्मणतां येत नाहीं. - ॥४०॥ निरपेक्षता इत्यादि गुण हेंच भूषण होय, - किरीट कुंडलें भूषणें नव्हत, - सुखदुःखांकडे लक्ष न देणें हेंच सुख होय, - विषयभोग सुख नव्हे, - विषयभोगाची इच्छा धरणें हेंच दुःख समजावें, - हात माजणें किंवा रोग होणें हीं दुःखें नव्हत, - संसारबंधातून कसें सुटावें, किंवा बंध काय व मोक्ष काय हें ज्याला समजतें तोच पंडित, - सगळे विद्वान् तेवढे पंडित नव्हत, - ॥ ४१ ॥ देहादिकावर अहंता व ममता ठेवितो तो मूर्ख समजावा, - लौकिक वेडेचार करणारा मूर्ख नव्हे - माझी प्राप्ति करून देणारा निष्काम मार्ग, तोच मार्ग होय, - सडक हा मार्ग नव्हे, - चित्ताला चंचल करणारा प्रवृत्तिमार्ग तो कुमार्ग समजावा, - चोरादिकांनीं व्यापलेल्या रानटी रस्त्यालाच कुमार्ग

अकर्मसु (नित्य कर्मांविषयीं) जुगुप्सा (त्याज्यबुद्धि) ह्रीः. ॥ ४० ॥ नैरपेक्ष्याद्याः गुणाः श्रीः. दुःखसुखात्ययः सुखं कामसुखापेक्षा दुःखं बंधमोक्षवित् पंडित ॥ ४१ ॥

श्रीर्गुणा नैरपेक्ष्याद्याः सुखं दुःखसुखात्ययः ॥ दुःखं कामसुखापेक्षा पंडितो बंधमोक्षवित् ॥ ४१ ॥
मूर्खो देहाद्यहंबुद्धिः पंथा मन्निगमः स्मृतः ॥ उत्पथश्चित्तविक्षेपः स्वर्गः सत्त्वगुणोदयः ॥ ४२ ॥
नरकस्तमउन्नाहो बंधुर्गुरुरहं सखे ॥ गृहं शरीरं मानुष्यं गुणाढ्यो ह्याढ्य उच्यते ॥ ४३ ॥

देहाद्यहबुद्धिः मूर्खः. मन्निगमः (माझी प्राप्ति करून देतो तो) पथाः स्मृतः. चित्तविक्षेपः उत्पथः (कुमार्ग) सत्त्वगुणोदय स्वर्ग ॥ ४२ ॥ तमउन्नाह (तमोगुणाची वृद्धि) नरक. सखे, गुरु अहं बंधुः. मानुष्यं शरीरं गृहं. गुणाढ्यः आढ्य. (सधन) उच्यते. ॥ ४३ ॥

ह्मणता येत नाहीं; - सत्त्वगुणाची विपुल वृद्धि हाच स्वर्ग होय, - इंद्रलोक स्वर्ग नव्हे, - ॥४२॥ तमोगुणाची वृद्धि नरक समजावा. - कुंभीपाकादि नरक नव्हत - सख्या (उद्धवा), गुरु हाच बंधु होय, - सहोदर भ्राता बंधु नव्हे; - आणि तो (गुरु) ह्मणजे मी प्रत्यक्ष परमात्मा समजावा मनुष्याचें शरीर हेंच गृह होय (कारण, त्यांत सकल साधनें [illegible] आहेत व तेच भोगस्थान होय), - मोठमोठे वाडे, इमारती हीं घरें नव्हत, - ज्याच्या आंगीं विपुल गुण वसत असतील तोच धनी होय - पुष्कळ पैसेवाला श्रीमंत नव्हे - ॥४३॥

१ सकळ साम्राज्य वैभवेंसी । चतुर्दश भुवन विलासेसी । अगीं लक्ष्मी आलिया जयापाशीं । परी शुकोनी निसी पुसेना ॥ नाथ, ॥ ५१२ ॥ यावरून निरपेक्षता ह्मणजे काय हें सहज लक्षांत येतें.

२ एक एव परो बन्धुर्विषमे समुपस्थिते । गुरुः सकलधर्मात्मा यत्राकिंचनगो हरिः ॥
संकट उत्पन्न झालें असतां त्यांतून पार पाडणारा आप्त ह्मणजे एक सकलधर्ममूर्ति गुरु हाच होय. कारण, सर्वसंगपरित्यागी साधूनीं गाइलेला हरि त्या गुरुमूर्तीचे ठिकाणीं वास करितो

ज्यानें चित्त संतुष्ट नसतें तोच दरिद्री समजावा, - जवळ पैसा नसेल तो दरिद्री नव्हे, - ज्यानें आपलीं इंद्रियें जिकिलीं नाहीत त्या मनुष्याची स्थिति शोचनीय होय, - केवळ
दीन दुबळ्याबद्दल तितके वाईट वाटण्याचे कारण नाही, - विषयावर ज्याची बुद्धि आसक्त नसते तो स्वतंत्र समजावा, - राजा इत्यादि लोक स्वतत्र नव्हत, - आणि विषयावर
जो आसक्त असतो तो परतंत्र होय (एवढ्यावरून ह्या लक्षणाच्या उलट असतील तीं अशमादिकाचीं लक्षणे समजावी) ॥ ४४ ॥ उद्धवा, ही तुझ्या सर्व प्रश्नाची उत्तरे
मोक्षाला उपयोगी पडतील अशी उत्तम प्रकारें सांगितलीं फार सांगून उपयोग काय? गुणदोषाचें लक्षण थोडक्यात असें आहे'— गुण व दोष पाहणे हा दोष समजावा आणि ते
य. असंतुष्टः, [सः] दरिद्र. य. अजितेंद्रिय , [स] कृपणः (शोचनीय). गुणेषु (विषयावर) असक्तधी ईशः (स्वतत्र) गुणसग (विषयावर आसक्त) विपर्ययः ॥ ४४ ॥
उद्धव, ते सर्वे एते प्रश्नाः साधु निरूपिताः बहुना वर्णितेन किं? गुणदोषयो लक्षण [शृणु] गुणदोषदृशि (गुण व दोष पाहणें) दोष.. उभयवर्जित (गुणदोषरहित स्वभाव)
गुण . ॥ ४५ ॥

॥ इति श्रीमागवतान्वये एकादशस्कंधे एकोनविंशो ऽध्याय ॥ १९ ॥

दरिद्रो यस्त्वसंतुष्टः कृपणो यो ऽजितेंद्रियः ॥ गुणेष्वसक्तधीरीशो गुणसंगो विपर्ययः ॥ ४४ ॥ एत उद्धव ते
प्रश्नाः सर्वे साधु निरूपिताः ॥ किं वर्णितेन बहुना लक्षणं गुणदोषयोः ॥ गुणदोषदृशिर्दोषो गुणस्तूभयवर्जितः
॥ ४५ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे एकोनविंशो ऽध्यायः ॥ १९ ॥

उद्धव उवाच । विधिश्च प्रतिषेधश्च निगमो हीश्वरस्य ते ॥ अवेक्षते ऽरविंदाक्ष गुणं दोषं च कर्मणाम् ॥ १ ॥
वर्णाश्रमविकल्पं च प्रतिलोमानुलोमजम् ॥ द्रव्यदेशवयःकालान्स्वर्गं नरकमेव च ॥ २ ॥

उद्धवः उवाच— अरविंदाक्ष, विधि प्रतिषेध. ईश्वरस्य ते निगमः (आज्ञारूप वेद) कर्मणा गुण, दोष च अवेक्षते (पाहतो) ॥ १ ॥ वर्णाश्रमविकल्प (वर्णाचा व आश्रमाचा
भेद गुणदोषरूप), प्रतिलोमानुलोमज, द्रव्यदेशवय कालान्, स्वर्ग, नरकं एव च [अवेक्षते] ॥ २ ॥

॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने एकादशस्कंधे एकोनविंशो ऽध्यायः ॥ १९ ॥

दोन्ही न पाहणारा जो स्वभाव तो गुण होय. ॥ ४५ ॥

उद्धव म्हणाला — कमलनयना परमेश्वरा, विधि आणि निषेध तुझी आज्ञा वेद होय तो कर्मांचे गुण व दोष पाहत असतो (वेद काहीं कर्मे करावयास सांगतो अर्थात त्याचे
फळ पुण्य असें त्याला दिसत असतें व तो काहीं कर्में करण्याचा निषेध करितो अर्थात त्याचें फल पाप हें त्याला दिसत असतें, हे उघड होय). ॥ १ ॥ वर्णांचे आणि आश्र
माचे भेद ह्यामध्येंही वेदाला गुणदोष दिसतात (काहीं वर्ण व काहीं आश्रम उत्तम आणि इतर कमी प्रतीचे असें वेदाचें मत दिसते अर्थात वेदाला गुणदोष दिसतात हें उघड आहे)

प्रतिलोमज व अनुलोमज प्रजा हे गुणदोष (अनुलोमज लोक चांगले व प्रतिलोमज वाईट असे) वेदाला दिसतात. द्रव्य, देश, वय व काल ह्यानही त्याला गुणदोष आढळतात
(वेदाला काहीं द्रव्यें, देश, वयें व काळ कर्मानुष्ठानास योग्य व काहीं अयोग्य वाटतात) व त्याने त्याचीं फळें स्वर्ग व नरक हीं गुणदोषरूप पाहून ठेविली आहेत.।' २ ॥
- देवा, तू ह्मणतोस 'गुण व दोष पाहणें ह्याच दोष होय,' असे असेल व - गुण आणि दोष ही भेददृष्टि ठेवायाची नसेल तर तुझी विधिनिषेधरूप वेदवाणी (कर्मकांडांतील)
प्रवृत्त व्हावी कशी? - होऊंच नये :- आणि वेदवचनावाचून मनुष्याचें आत्यंतिक कल्याण (मोक्षप्राप्ति) तरी व्हावें कसें? - कारण ज्ञानप्राप्तीसाठीं तरी साधनविधि व निषेधं पा
गुणदोषभिदादृष्टिं अंतरेण निषेधविधिलक्षणं तव वचः कथं [तथा] तव वचः अंतरेण नृणां निःश्रेयस [कथ स्यात्]? ॥३॥ ईश्वर, तव वेद. पितृदेवमनुष्याणां अनुपलब्धे

गुणदोषभिदादृष्टिमंतरेण वचस्तव ॥ निःश्रेयसं कथं नृणां निषेधविधिलक्षणम् ॥ ३ ॥

पितृदेवमनुष्याणां वेदश्चक्षुस्तवेश्वर ॥ श्रेयस्त्वनुपलब्धे ऽर्थे साध्यसाधनयोरपि ॥ ४ ॥

(अप्राप्त) अर्थे, साध्यसाधनयोः अपि श्रेयः (श्रेष्ठ) चक्षुः (नेत्र, प्रमाणक) ॥४॥
व्हावे लागतातच. तीं वचने तर गुणदोष पाहणारी अर्थात दुष्ट ठरलीं तेव्हा मानणार कोण? - (किंवा ह्याच श्लोकाचा दुसऱ्या रीतीनें अर्थ करावा तो असा - तुझी वेदवाणी विधि-
निषेधरूप अर्थात गुण व दोष ह्या भेददृष्टीनें भरलेली आहे. त्या वेदवाणीवाचून मनुष्याचें कल्याण होईल कसें? अथवा ह्याच श्लोकाचा निराळा अर्थ असा - गुण व दोष अशी
भेददृष्टि ठेविल्यावाचून विधिनिषेधरूप तुझी सगळी वेदवाणी - तत्त्वमस्यादि वाक्याप्रमाणें - मोक्षपर होईल कशी?' सगळा वेद तर निवृत्तिपर अंगीकारिला जातो हे जमावें कसें?')
॥ ३ ॥ - तूं ह्मणशील 'पितर व देव सर्वज्ञ आहेत. ते प्रत्यक्ष अनुभव घेऊन मनुष्यांना कल्याणमार्ग सांगतीलच' तर त्याबद्दलही सांगतो ईश्वरा, पितर काय, देव काय,

[1] उच्चवर्ण स्त्रीच्या ठिकाणीं हीनवर्ण पुरुषापासून झालेली संतति 'प्रतिलोमज' होय उदाहरण- सूत (ब्राह्मणाच्या ठिकाणीं क्षत्रियापासून झालेला), वैदेहक (ब्राह्मणाच्या पोटीं वैश्यापासून झालेला) इत्यादि
उच्चवर्ण पुरुषापासून हीनवर्ण स्त्रीच्या उदरीं झालेली संतति 'अनुलोमज' होय उदाहरण- मूर्धावसिक्त (ब्राह्मणापासून क्षत्रिय वर्णाच्या स्त्रीच्या पोटीं झालेला पुत्र), अंबष्ठ (ब्राह्मणापासून वैश्यस्त्रीच्या
पोटीं झालेला पुत्र) असत्संततिस्तु विज्ञेया प्रतिलोमानुलोमजा.। प्रतिलोमज वाईट व अनुलोमज चांगले समजावे. [2] 'स्वाध्यायोऽध्येतव्यः श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः।
(वेदाचें अध्ययन, श्रवण, मनन व निदिध्यासन चालवावें)' इत्यादि [3] 'नानुध्यायेद्बहून् शब्दान् वाचो विग्लापनं हि तत्।
(पुष्कळसे ग्रंथ पढू नये, कारण तो वाणीला शीण मात्र होय)' इत्यादि
[4] ह्या पक्षीं अन्वय— गुणदोषभिदादृष्टिं निषेधविधिलक्षणं तव वचः अंतरेण नृणां निःश्रेयसं कथं ?
[5] ह्या पक्षीं अन्वय— गुणदोषभिदादृष्टिं अंतरेण निषेधविधिलक्षणं [अपि] तव वचः नृणां निःश्रेयसं कथं [स्यात्]?

आणि मनुष्य काय, ह्या सर्वांचे उत्तम नेत्र ह्मणजे तुझी वेदवाणी होय त्यांना अगम्य वस्तूंचें (स्वर्ग मोक्ष इत्यादिकांचें) व साध्यसाधनाचेंही (अमुक अमुकाचे साधन आणि हे ह्याचें साध्य असें) ज्ञान वेदाच्या आधारेंच होत असतें. - एतावता गुणदोषदृष्टि नसली की मोक्षरूप कल्याण प्राप्त होणार नाहीं - ॥ ४ ॥ गुण व दोष अशी भेददृष्टि तुझ्या आज्ञेपासून (वेदामुळेंच) उद्भवलेली आहे, आपोआप झाली नव्हे, आणि तुझ्या वचनानेंच त्या भेदाचा अपवादही मी ऐकतो. ह्मणून मला असा हा भ्रम उत्पन्न झाला आहे, - ह्याची तू निवृत्ति कर. - ॥५॥ श्रीभगवान् ह्मणाले — उद्धवा, - विषय एक असताही अधिकारिभेदानें विरोध दिसून येतो पहा - मी मनुष्याना मोक्षसाधन प्राप्त व्हावे अशा इच्छेने ज्ञान, कर्म (निष्काम) आणि भक्ति असे तीन उपाय सांगून दिले आहेत (ह्यानाच अनुक्रमें ज्ञानकाड, कर्मकाड व उपासनाकाड ह्मणतात) ह्याहून अन्य मोक्षप्राप्तीचा उपाय कोठेच नाहीं ॥६॥

गुणदोषभिदादृष्टि: ते निगमात् [भवति], स्वत न. निगमेन (तुझ्या वचनानें) भिदायाः अपवाद इति ह भ्रम [भवति तं निवर्तय]. ॥ ५ ॥ श्रीभगवान् उवाच— मया नृणां श्रेयोविधित्सया ज्ञानं, कर्म, भक्तिः च [इति] त्रयः योगाः प्रोक्ताः. कुत्रचित् अन्य उपायः न अस्ति ॥ ६ ॥ इह कर्मसु निर्विण्णाना (दुःखरूप

गुणदोषभिदादृष्टिर्निगमात्ते न हि स्वतः ॥ निगमेनापवादश्च भिदाया इति ह भ्रमः ॥ ५ ॥ श्रीभगवानुवाच ।

योगास्त्रयो मया प्रोक्ता नृणां श्रेयोविधित्सया ॥ ज्ञानं कर्म च भक्तिश्च नोपायोऽन्योऽस्ति कुत्रचित् ॥ ६ ॥

निर्विण्णानां ज्ञानयोगो न्यासिनामिह कर्मसु ॥ तेष्वनिर्विण्णचित्तानां कर्मयोगस्तु कामिनाम् ॥ ७ ॥ यदृच्छया

मत्कथादौ जातश्रद्धस्तु यः पुमान् ॥ न निर्विण्णो नातिसक्तो भक्तियोगोऽस्य सिद्धिदः ॥ ८ ॥

समजून कर्मफलाविषयीं विरक्त) न्यासिनां (कर्मे सोडणाराना) ज्ञानयोग.. तेषु अनिर्विण्णचित्तानां (नाहीं विरक्त चित्तें ज्याचीं अशा) कामिनां कर्मयोग ॥ ७ ॥ य. पुमान् यदृच्छया मत्कथादौ जातश्रद्ध, ननिर्विण्ण, नातिसक्त [च], अस्य भक्तियोगः सिद्धिद.. ॥ ८ ॥

ह्यापैकीं, ज्याना कर्माचा कंटाळा आला (कर्मफळें दुःखरूप होत असें वाटून त्याविषयीं वैराग्य झालें) आणि अर्थात ज्यांनी कर्मे करणें सोडिलें, त्याना ज्ञानयोग सिद्धि देतो, तसेंच, ज्यांना कर्मफळें दुःखरूप वाटत नाहींत व तीं भोगण्याविषयीं विरक्ति प्राप्त झाली नाहीं, त्या पुरुषाना तर कर्मयोगच सिद्धिप्रद होय, ॥ ७ ॥ आणि ज्या पुरुषाच्या अतरीं काहीं भाग्यवशात् माझ्या कथा ऐकणें, गाणें इत्यादिकाविषयीं श्रद्धा उत्पन्न झाली. पण जो कर्मफळें भोगण्याबद्दल विरक्तही झालेला नाहीं व अतिशय आसक्तही नव्हे, त्या पुरुषाला भक्तियोग सिद्धिदायक होतो (सागण्याचा आशय असा :— काम्य कर्मे करण्याकडे ज्याची प्रवृत्ति त्याकडे विधिनिषेधाचा सर्वथा अधिकार पोचतो, निष्काम कर्मे करणाराकडे त्याच्या शक्त्यनुसार न्यूनाधिक प्रमाणानें तो असतो, व तो देखील ज्ञान व भक्ति याचा अधिकार येईपर्यंतच असतो; ज्ञानाचा व भक्तीचा अधिकार आला कीं विधिनिषेधाचा अ-

विकार पुष्कळच कमी होतो; आणि भक्तीनें व ज्ञानानें जे सिद्ध झाले, त्यांजकडे विधिनिषेधांचा अमदीं संबंध राहत नाहीं) ॥ ८ ॥ - कर्मयोग किती दिवस करावा तें सांगतो - जोंपर्यंत वैराग्य झालें नाहीं किंवा माझ्या कथांचें श्रवण व कीर्तन इत्यादि करण्याविषयीं अंतरीं श्रद्धा उद्भवली नाहीं, तोंपर्यंत पुरुषानें नित्यनैमित्तिक कर्में आचरावीं ॥ ९ ॥ उद्धवा, स्वधर्माचरणामध्यें दक्ष असा मनुष्य, जर फलप्राप्तीची इच्छा न धरितां यज्ञानुष्ठान करीत राहील, मात्र त्यानें निषिद्ध किंवा काम्य कर्में करितां कामा नये, तर तो स्वर्गाला किंवा नरकीं जाणार नाहीं (नरकांत पडण्याचीं कारणें दोन :— एक विहित कर्म न करणें व दुसरें निषिद्ध कर्म करणें हा पुरुष स्वधर्माचरणामध्यें तत्पर असतो म्हणजे विहित कर्में करीत असतो आणि निषिद्ध वा काम्य कर्में तीं कधींही करीत नाहीं अर्थात नरकास जात नाहीं. वरें, तो यज्ञकर्में स्वर्गादि लोक मिळावे ह्या इच्छेनें करीत नाहीं यावता न निर्विद्येत, यावत् वा मत्कथाश्रवणादौ श्रद्धा न जायते, तावत् कर्माणि कुर्वीत. । ९ ॥ उद्धव, स्वधर्मस्थ यज्ञैः यजन् अनाशीः काम (फलाची इच्छा न करणारा) यदि अन्यत् न समाचरेत्, [तर्हि] स्वर्गनरकौ न याति. ॥ १० ॥ अस्मिन् लोके वर्तमानः स्वधर्मस्थः अनघः (निषिद्धाचा त्याग करणारा) शुचिः (रागादिमलरहित) विशुद्ध

तावत्कर्माणि कुर्वीत न निर्विद्येत यावता ॥ मत्कथाश्रवणादौ वा श्रद्धा यावन्न जायते ॥ ९ ॥ स्वधर्मस्थो यजन्यज्ञैरनाशीःकाम उद्धव ॥ न याति स्वर्गनरकौ यद्यन्यन्न समाचरेत् ॥ १० ॥ अस्मिँल्लोके वर्तमानः स्वधर्मस्थोऽनघः शुचिः ॥ ज्ञानं विशुद्ध-माप्नोति मद्भक्तिं वा यदृच्छया ॥ ११ ॥ स्वर्गिणोऽप्येतमिच्छंति लोकं निरयिणस्तथा ॥ साधकं ज्ञानभक्तिभ्यामुभयं तदसाधकम् ॥ १२ ॥ न नरः स्वर्गतिं कांक्षेन्नारकीं वा विचक्षणः ॥ नेमं लोकं च कांक्षेत देहावेशात्प्रमाद्यति ॥ १३ ॥

ज्ञानं, यदृच्छया मद्भक्तिं वा आप्नोति. ॥ ११ ॥ [यथा] निरयिणः तथा स्वर्गिणः अपि ज्ञानभक्तिभ्यां साधकं एतं लोकं (नरदेहं) इच्छन्ति. उभयं (स्वर्गदेह व नरकस्थ देह) तदसाधकं. ॥ १२ ॥ विचक्षणः (विवेकी) नरः [यथा] नारकीं, [तथा] स्वर्गतिं न कांक्षेत, इमं लोकं च न कांक्षेत [यत] देहावेशात् प्रमाद्यति (अवधानरहित होतो) । १३ ॥ म्हणून स्वर्गलोकींही जात नाहीं) ॥ १० ॥ तर तो स्वधर्मनिष्ठ. निषिद्ध कर्में वर्ज्य करणारा व निर्मळ (रागद्वेषादि मलांनीं रहित असा) पुरुष ह्याच देहांत असतांना विशुद्ध ज्ञान पावतो किंवा काहीं दैवयोगानें त्याला माझी भक्तिही प्राप्त होते. ॥ ११ ॥ हा नरदेह ज्ञान आणि भक्ति ह्या दोहोंचा साधक होय म्हणून जसे नरकांतील लोक मनुष्यदेह मिळण्याची इच्छा करितात, तसेच स्वर्गस्थ देवही ह्याच्या प्राप्तीची आशा करीत असतात. कारण स्वर्ग आणि नरक ह्या दोन्ही ठिकाणचीं शरीरें ज्ञान व भक्ति साधण्याच्या कामाचीं नाहींत. ॥ १२ ॥ एवढ्यासाठीं विवेकसंपन्न पुरुषानें, जशी त्याला नरकास जाण्याची इच्छा नसते, तशीच स्वर्गी जाण्याची इच्छा धरूं नये आणि नरदेह अत्युत्तम आहे तरी आपण पुन्हा मनुष्यजन्मास यावें, अशीही कामना ठेवूं नये कारण, देहावर आसक्ति असली कीं मनुष्याचें स्वार्थाकडे अवधान राहत नाहीसें होतें ॥ १३ ॥

तर त्या मनुष्यानें हा देह भक्ति आणि ज्ञान साधून देणारा आहे असें जाणावें व जरो हा पुरुषार्थ सिद्ध करून देणारा आहे तरी नश्वर आहे हें लक्षात वागवून, प्रमत्त न राहता, मृत्यु येण्यापूर्वी, मोक्ष मिळविण्याच्या यत्नास लागावे ॥ १४ ॥ पक्षी ज्यावर आपलें घरटें बांधून राहतो त्या वृक्षाला यमासारखे निर्दय पुरुष तोडू लागले तर तो (पक्षी) त्या आपल्या आश्रयभूत वृक्षाला सोडून देऊन सुख पावतो, कारण, त्याची वृक्षावर आसक्ति नसते, ॥ १५ ॥ त्याचप्रमाणे रात्र आणि दिवस ही आयुष्य तोडीत आहेत हे लक्षात येताच भयामुळें ज्या मनुष्याचा आगाचा थरकाप होतो, आणि जो कसलीही इच्छा न धरिता देहादि सर्व ठिकाणची आसक्ति सोडून देतो, तो परमात्म्याचे ज्ञान संपादून शांति एतत् विद्वान् सः इदं अर्थसिद्धिदं अपि मर्त्यं (मरणारें असास) ज्ञात्वा अप्रमत्त [सन्] मृत्योः पुरा अभवाय (मोक्षासाठी) घटेत (यत्न करो) ॥१४॥ अलंपट (आसक्ति न ठेवणारा) खगः (पक्षी) यमैः (यमासारखे दुष्ट) एतैः छिद्यमान कृतनीड (केले घरटें ज्यावर अशा) स्वकेत (आपल्या आश्रयभूत) वनस्पतिं (वृक्षास) उत्सृज्य (सोडून) क्षेम याति. ॥ १५ ॥ अहोरात्रैः छिद्यमानं आयुः बुद्ध्वा भयवेपथुः (भयानें कंप ज्याला असा) मुक्तसंगः परं बुद्ध्वा निरीह [सन्] उपशाम्यति. ॥ १६ ॥ आद्य (सकल फळाचे मूळ) सुदुर्लभ

एतद्विद्वान्पुरा मृत्योरभवाय घटेत सः ॥ अप्रमत्त इदं ज्ञात्वा मर्त्यमप्यर्थसिद्धिदम् ॥ १४ ॥ छिद्यमानं यमैरेतैः

कृतनीडं वनस्पतिम् ॥ खगः स्वकेतमुत्सृज्य क्षेमं याति ह्यलंपटः ॥ १५ ॥ अहोरात्रैश्छिद्यमानं बुद्ध्वाऽऽयुर्भ-

यवेपथुः ॥ मुक्तसंगः परं बुद्ध्वा निरीह उपशाम्यति ॥ १६ ॥ नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं प्लवं सुकल्पं

गुरुकर्णधारम् ॥ मया ऽनुकूलेन नभस्वतेरितं पुमान्भवाब्धिं न तरेत्स आत्महा ॥१७॥ यदा ऽऽरंभेषु निर्विण्णो

विरक्तः संयतेंद्रियः ॥ अभ्यासेनाऽऽत्मनो योगी धारयेदचलं मनः ॥ १८ ॥

(कोट्यवधि उद्योगानीं मिळण्यास कठिण) सुलभ (अनायासें प्राप्त) सुकल्पं (फार दृढ) गुरुकर्णधारं (गुरु हा नावाडी ज्याचा अशा) अनुकूलेन नभस्वता (वायूनें) मया ईरित (प्रेरिलेल्या) नृदेहं प्लवं (नौकेस) [प्राप्य य] पुमान् भवाब्धि न तरेत्, स आत्महा ॥ १७ ॥ यदा आरंभेषु निर्विण्ण (उद्विग्न), विरक्त. [च, तदा] संयतेंद्रिय योगी [सन्] (परम सुख) पावतो. ॥ १६ ॥ नरदेह सकल फळाचे मूळ होय (ह्यामध्ये कर्मे करून पाहिजेत ती फळें मिळविता येतात). हा - कोट्यवधि प्रयत्नानीही - प्राप्त करून घेणे अशक्य असते, पण - सहज - दैवयोगानें मिळाला म्हणून - सुलभ वाटतो हें शरीर संसारसमुद्रातून तरून जाण्याचे साधन नौकाच होय ही नौका चांगली दृढ आहे, गुरु (त्या चा शरण गेले पुरे कीं) हिला चालविणारा नावाडी होतो, मी ईश्वर (स्मरण केलें पुरे कीं) अनुकूल असा वारा होऊन हिला इष्ट स्थानीं नेण्यास साह्य करितो, अशी उत्तम साधनें अनुकूल असता जो मनुष्य संसारसमुद्रातून तरून जाणार नाही तो केवळ आत्मघाती समजावा. ॥ १७ ॥ - एतावता, कर्मयोग हा वैराग्यद्वारा ज्ञान व भक्ति साधून

देणारा आहे ह्मणून ज्याला वैराग्य झालें नसेल त्यानें निष्काम कर्में करावीं, हा मार्ग उक्त होय. आता ज्याला उत्तम वैराग्य झालें असेल त्यानें काय करावें व काय सोडावें ते सा-गतों, ऐक - ज्यावेळीं पुरुषाला कर्में दु:खमय होत असे दिसून आल्यामुळें तीं करण्याविषयी उद्वेग प्राप्त होईल व त्याच्या फलाबद्दल कटाळा वाटू लागेल त्यावेळीं त्यानें योगाभ्यासद्वारा इंद्रियांचें नियमन करून आत्मविषयक वृत्ति संतत राखण्याचा यत्न चालवावा आणि मन निश्चल राहील असें करावें ॥ १८ ॥ - एकदमच पूर्ण धारणा होणें शक्य नाहीं करिता थोडें मनाच्या कलानेंच घेत जावें. पहा. - धारणा करताना जेव्हा मन झटकन भ्रमण करूं लागेल (विषयाकडे जाईल) व चचल होईल तेव्हा, सावधपणें, थोडीशी त्याची अपेक्षा पूर्ण करून, त्या मार्गानें त्याला आपल्या अधीन करून घ्यावें. ॥१९॥ - तूं ह्मणशील 'मनाच्या इच्छा पुरवू लागलें तर ते पहिल्यासारखेंच चचल होईल ' तर त्याबद्दलही सांगतो -

आत्मनः अभ्यासेन मनः अचलं [यथा तथा] धारयेत्. ॥ १८ ॥ धार्यमाणं मन॰ यर्हि आशु भ्राम्यत् अनवस्थित (चचल) [भवति, तदा] अतंद्रित॰ सन् अनुरोधेन (कलानें, थोडें इच्छित पुरवून त्या द्वारें) मार्गेण आत्मवशं नयेत्. ॥ १९ ॥ जितप्राण॰, जितेंद्रिय॰ [च सन्] मनोगतिं (मनाचा मार्ग, फिरणें) न विसृजेत् सत्त्वसंपन्नया बुद्ध्या

धार्यमाणं मनो यर्हि भ्राम्यदाश्वनवस्थितम् ॥ अतंद्रितो ऽनुरोधेन मार्गेणाऽऽत्मवशं नयेत् ॥१९॥
मनोगतिं न विसृजेज्जितप्राणो जितेंद्रियः ॥ सत्त्वसंपन्नया बुद्ध्या मन आत्मवशं नयेत् ॥ २० ॥
एष वै परमो योगो मनसः संग्रहः स्मृतः ॥ हृदयज्ञत्वमन्विच्छन्दम्यस्येवार्वतो मुहु. ॥ २१ ॥

मनः आत्मवशं नयेत्. ॥ २० ॥ [यथा] मुहु॰ दम्यस्य (शिकवावयाजोग्या) अर्वतः (घोड्याला) हृदयज्ञत्व (मन ओळखण्यास झा॰ आपल्याला पाहिजे ती चाल शिकविण्याला) अन्विच्छन् (अपेक्षा करणारा) [तद्गतिं अनुवर्तते, तथा] एषः मनस॰ संग्रह॰ (आवरणें) परमः योगः (उपाय) स्मृत . ॥ २१ ॥

मनाच्या गतीबद्दल उपेक्षा करू नये (तें कोठें जातें तें सावधपणें पाहत असावें तसें न केल्यास बहकेल), प्राण जिंकावा, इंद्रियें स्वाधीन करून घ्यावी आणि सत्त्वगुणयुक्त बुद्धीच्या साह्यानें मनाला आपल्या अंकित करून घ्यावें. ॥ २० ॥ अशा प्रकारें मनाला त्याच्या कलानें वागून स्वाधीन करून घेणें हा योग (उपाय) उत्तम झटला आहे ह्याला दृष्टांत पहा :— एखाद्या - उच्छृंखळ - घोड्याला शिकवावयाचें आहे तर शिकविणारा पुरुष त्याला आपलें मन कळावें (आपल्याला पाहिजे तशा गतीवर त्यानें चालावें) ह्यासाठीं वारंवार हाच उपाय योजितो (पहिल्यानें कांहीं वेळ घोड्याला हव्या त्या गतीवर चालू देतो, तरी तेव्हा लगाम धरूनच चालतो, त्याची उपेक्षा करीत नाहीं व असें करिता करिता तो त्याला आपल्या अंकित करून घेतो). ॥ २१ ॥

- अशा रीतीनें मन किंचित् वश झालें असता त्याला अत्यंत निश्चल करें करावें ते सागतों - महत्तत्त्वापासून देहापर्यंत सर्व पदार्थांचीं—अनुक्रमानें (प्रकृतीपासून महत्तत्त्व, महत्तत्त्वापासून अहकार अशा क्रमानें) उत्पत्ति व उलट क्रमानें (पंचभूतें अहंकारात लय पावतात अशा उलट रीतीनें) लय—ही होतात असे तत्त्वविवेकानें चिंतन, मन निश्चल होई तोंपर्यंत, करीत जावें ॥ २२ ॥ - ह्यावर तूं ह्मणशील कीं ' सहस्रावधि उपाय केले तरी मन विषयाकारता सोडणार नाही मग वारवार उपदेशाचा शीण पाहिजे कशाला ! ' तर त्याविषयींही सागतों. महत्तत्त्वापासून देहापर्यंत सर्व पदार्थ उत्पत्ति व नाश पावणारे आहेत, त्या सर्वांचा आधार आत्मा होय; त्याच्या अविवकामुळें हा ससार

यावत् मनः प्रसीदति, [तावत] साङ्ख्येन (तत्त्वविवेकानें) सर्वभावानां प्रतिलोमानुलोमत. (उलटसुलट) भवाप्ययौ अनुध्यायेत्. ॥ २२ ॥ निर्विण्णस्य विरक्तस्य उक्तवेदिनः (गुरूचा उपदेश लक्ष्यात घेणाऱ्या) पुरुषस्य मन. चिंतितस्य अनुचिंतया दौरात्म्य (देहादिकाचा अभिमान) त्यजति ॥ २३ ॥ मनः यमादिभि योगपथैः, आन्वीक्षिक्या (तत् व त्वं ह्मा उभय पदाचा शोध ह्या) विद्यया, मम अर्चोपासनादिभि. (पूजन ध्यान इत्यादींनीं) वा योग्य (स्मरण्यास योग्य अशा परमात्म्यास) स्मरेत्, अन्यैः न [स्मरेत्]. ॥ २४ ॥ योगी यदि प्रमादेन विगर्हितं (निंद्य) कर्म कुर्यात, [तर्हि] योगेन (ज्ञानाभ्यासानें) एव अहः (पाप) दहेत् (जाळो) तत्र कदाचन अन्यत् (प्रायश्चित्तादि) न ॥ २५ ॥

सांख्येन सर्वभावानां प्रतिलोमानुलोमतः ॥ भवाप्ययावनुध्यायेन्मनो यावत्प्रसीदति ॥ २२ ॥ निर्विण्णस्य विरक्तस्य पुरुषस्योक्तवेदिनः मनस्त्यजति दौरात्म्यं चिंतितस्यानुचिंतया ॥ २३ ॥ यमादिभिर्योगपथैरान्वीक्षिक्या च विद्यया ॥ ममार्चोपासनाभिर्वा नान्यैर्योग्यं स्मरेन्मनः ॥ २४ ॥ यदि कुर्यात्प्रमादेन योगी कर्म विगर्हितम् ॥ योगेनैव दहेदंहो नान्यत्तत्र कदाचन ॥ २५ ॥

प्राप्त झाला आहे; ह्या संसाराविषयी - पुरुषाला उद्वेगे वाटून वैराग्य झाले आणि गुरूनें केलेला उपदेश लक्ष्यात घेऊन तो त्याचें चिंतन व पुन पुन निदिध्यासन करू लागला कीं त्याचे मन देहादेकांवरील अभिमान सोडितें ॥ २३ ॥ तसेंच, यमनियमादि योगमार्ग, ' तत् ' आणि ' त्वं ' ह्या पदार्थांचे शोधन ही विद्या, किंवा माझें पूजन व ध्यान, ह्या उपायानीं मन योग्य अशा परमात्म्याला स्मरूं लागतें, इतर उपायानी स्मरत नाही, - ह्मणून इतर साधनें करू नये - ॥ २४ ॥ - ह्यावर कोणी ह्मणेल ' पाप घडलें तर यो-

१ तत्त्वविवेक ह्मणजे हें सर्व जग वस्तू(परमेश्वरा)पासून उत्पन्न होऊन पुन्हा त्याच्याच ठिकाणीं लय पावणार हा विचार जसें —

नग न घडतां सोनेंचि साचें । नग घडवितां सोनें न वचे । नग मोडिता सोन्याचे । घडमोडीचें भय नाहीं ॥ मेघापूर्वी शुद्ध गगन । मेघ विरल्या गगनीं गगन । मेघा रूबाळा गगन जाण । आलिप्त जाण संचलें ॥ नाथ, २३० । ३१. २ हा उद्वेग कसा झाला पाहिजे याचें नाथ उदाहरण देतात —

मधमधीत अमृतफळ । त्यावरी सर्पें घातली गरळ । तेवीं विषयमात्र सकळ । देखे केवळ महाबाधा ॥ नाथ, २४५.

त्याला प्रायश्चित्त घेतलेंच पाहिजे ' तर तसें नाहीं. - योग्याच्या हातून प्रमादामुळें जर काहीं निंद्य कर्म घडेल, तर त्याचें तें पाप ज्ञानाभ्यासानेच जळून जातें, त्यासाठीं दुसरें (कृच्छ्रादि प्रायश्चित्त) नलगे. ॥ २५ ॥ - उद्धवा, ह्यावर तुला शंका येईल कीं, ' नित्यनैमित्तिक कर्म अंतःकरणाच्या शुद्धीला कारण आहे, आणि हिंसादिकर्म अशुद्धिकारक ह्मणून दोष होय, त्यामध्यें त्या दोषाची निवृत्ति करणारें कृच्छ्रादि प्रायश्चित्तही गुणच, असें विधिनिषेधांनी सांगितलें आहे. तेव्हां तें प्रायश्चित्त केल्यावांचून तुमच्या ज्ञानाभ्यासरूप योगानेंच पापाचें निरसन करिता यावें कसें ? ' तर त्याबद्दलही सांगतों. - गुण ह्मटलें आहे कशाला ? तर आपापल्या अधिकाराच्या ठिकाणीं निष्ठा ठेवणें एवढ्यालाच पहा - कर्में मुळीं स्वभावतःच अशुद्ध आहेत. - विधिनिषेधवचनांनीं - अमुक कर्म गुणरूप व अमुक दोषरूप असें विधान सांगून तद्द्वारा त्या कर्मांचा संकोच केला आहे उद्देश हा कीं, स्वे स्वे अधिकारे या निष्ठा, सः गुणः परिकीर्तितः. अनेन गुणदोषविधानेन जात्यशुद्धानां (स्वभावतः अपवित्र) कर्मणां, संगानां (आसक्तीचें) [च] त्याजनेच्छया (सोडविण्याच्या इच्छेनें) नियमः (संकोच) कृतः. ॥ २६ ॥ [यः] मत्कथासु जातश्रद्धः, सर्वकर्मसु निर्विण्णः, कामान् दुःखात्मकान् वेद, परित्यागे अपि अनीश्वरः. ॥ २७ ॥

स्वे स्वेऽधिकारे या निष्ठा स गुणः परिकीर्तितः ॥ कर्मणां जात्यशुद्धानामनेन नियमः कृतः ॥ गुणदोषविधानेन संगानां त्याजनेच्छया ॥ २६ ॥ जातश्रद्धो मत्कथासु निर्विण्णः सर्वकर्मसु ॥ वेद दुःखात्मकान्कामान्परित्यागेऽप्यनीश्वरः ॥ २७ ॥

पुरुषांची त्यावर असलेली आसक्ति सोडवावी (ह्याचा अभिप्राय असा - पुरुषाला प्रवृत्तीहून वेगळी अशुद्धि ह्मणून काही नाहीं, प्रवृत्ति हीच अशुद्धि होय कारण, स्वाभाविक प्रवृत्तीनेंच तो मलिन झालेला असतो आणि त्याला एकदम सर्वथा निवृत्त करणें शक्य नाहीं, ह्मणून विधिनिषेधवचनांनीं अमुकच करावें व अमुक करूं नये असें सांगून त्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीचा संकोच केलेला असतो, व त्याचें पर्यवसान निवृत्ति करण्याकडेच असतें. वेद प्रवृत्तिपर नव्हे. ही गोष्ट पुढील अध्यायांत येणार आहेच एतावता, योग्याला स्वाभाविक प्रवृत्ति नसते, ह्मणून प्रायश्चित्तादि विधि त्याला लागू नाहींत) ॥ २६ ॥ - आतां भक्तीचा अधिकारी कोण व त्यानें भक्तियोग कसा करावा तें सांगतों - उत्पन्न

---

१ हें उपलक्षण होय ह्यावरून ' भक्तानें, चुकून काहीं पाप घडल्यास, त्याच्या क्षालनासाठीं नामसंकीर्तनादि करावें ' असें सूचित होतें २ ह्याविषयीं नाथ ह्मणतात — हृदयीं नाहीं अनुतापवृत्ती । वरी वरी गा शास्त्रोक्ती । लावूं जाता शेण माती । पाप निश्चितीं तेणें न जाय ॥ नाथ, ३०७. ३ ह्याचा अभिप्राय नाथांनीं सांगितला आहे — न प्रेरिता शास्त्रें श्रुती । विषयीं स्वाभाविक प्रवृत्ती । तिची करावया निवृत्ती माझी वेदोक्ती प्रवर्तली ॥ एकाएकी विषयत्याजन । करावया अशक्त जाण । त्यासी वेद दावी दोषगुण । त्यागावया जाण विपर्यासी ॥ हे माता हे सहोदर । येथ करूं नये व्यभिचार । हें वदे न बोलता अधिकार । तें यथेच्छाचार विषयाचा ॥ नाथ ३०४-६ विषयांची जे प्रवृत्ती । तेची अविद्येचा निश्चितीं जे विषयाची अति निवृत्ती । ती नाव मुक्ती उद्धवा ॥ करावया विषयनिवृत्ती । वेदें दाविली कर्मप्रवृत्ती । वर्णाश्रमाचारस्थिती । विषयासक्तिछेदकु ॥ नाथ, ३१३-१८

माझ्या कथाविषयीं श्रद्धा उत्पन्न झाली व ह्मणूनच इतर सकल कर्मांबद्दल कंटाळा वाटू लागला (मात्र त्याचीं फळे नकोतशीं झालीं नाहींत), आणि जो विषय दु:खरूप होत असें जाणतो पण त्याचा परित्याग करण्याला मात्र धजत नाहीं, - तो भक्तीचा अधिकारी होय - ॥ २७ ॥ अशी योग्यता प्राप्त झाल्यावर त्या श्रद्धालु पुरुषानें भक्तीच्या योगेंच सकल पुरुषार्थ साध्य होईल असा पूर्ण निश्चय करून प्रेमपुरस्सर माझी भक्ति चालवावी ते विषय सेवन करीत जावें - पण त्यावर आसक्ति मात्र ठेवू नये, तर - ते परिणामीं दु:ख देणारे होत ह्मणून त्याची निंदा करीत असावें ॥ २८ ॥ पूर्वीं मी जागोजाग जो भक्तियोग सांगून दिला आहे, त्या योगें जो पुरुष माझें नित्य भजन करितो, त्याच्या

[स.] ततः प्रीत' श्रद्धालुः दृढनिश्चयः दुःखोदर्कान् (दु:ख परिणामीं ज्याच्या अशा) तान् कामान् गर्हयन् (निंदणारा) [सन्] जुषमाण (भोगणारा) मा भजेत. ॥ २८ ॥ प्रोक्तेन (पूर्वीं सांगितलेल्या) भक्तियोगेन असकृत (नित्य) मा भजत. मुने' हृदि मयि स्थिते [सति], हृद्य्या. (हृदयात उद्भवणारे) सर्वे कामा. नश्यति ॥ २९ ॥

ततो भजेत मां प्रीतः श्रद्धालुर्दृढनिश्चयः ॥ जुषमाणश्च तान्कामान्दुःखोदर्कांश्च गर्हयन् ॥ २८ ॥

प्रोक्तेन भक्तियोगेन भजतो माऽसकृन्मुनेः ॥ कामा हृदय्या नश्यंति सर्वे मयि हृदि स्थिते ॥ २९ ॥

भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यंते सर्वसंशयाः ॥ क्षीयंते चास्य कर्माणि मयि दृष्टेऽखिलात्मनि ॥ ३० ॥

तस्मान्मद्भक्तियुक्तस्य योगिनो वै मदात्मनः ॥ न ज्ञानं न च वैराग्यं प्राय. श्रेयो भवेदिह ॥ ३१ ॥

अखिलात्मनि मयि दृष्टे [सति], अस्य हृदयग्रंथि (अहंकार) भिद्यते, सर्वसंशयाः छिद्यते, कर्माणि (प्रारब्धव्यतिरिक्त कर्मे) च क्षीयंते. ॥ ३० ॥ तस्मात् मद्भक्तियुक्तस्य मदात्मन. योगिन' इह प्रायः ज्ञानं श्रेय. (कल्याणाचें साधन) न, वैराग्यं च न. ॥ ३१ ॥

हृदयांत मी राहूं लागतों व मग अर्थातच त्याच्या हृदयातील समस्त विषयेच्छा नष्ट होतात ॥ २९ ॥ मी सर्वांचा अंतर्यामी आहे भक्ताला माझा साक्षात्कार झाला कीं त्याचा अहंकाररूप हृदयग्रंथि तुटून जातो, - असंभावना, विपरीतभावना इत्यादि - समस्त संशय फिटतात, व त्याची संसारमूलक कर्मे (संचित व क्रियमाण) क्षय पावतात. ॥ ३० ॥ - उद्धवा, याप्रमाणें मी तुला कर्म, ज्ञान व भक्ति ह्या तिहींची व्यवस्था सांगितली. आता, त्या सर्वांतही भक्तिच श्रेष्ठ होय कारण, भक्तीला कर्माची किंवा ज्ञानाची अपेक्षा नसते, आणि कर्माचें व ज्ञानाचें तर भक्तीवाचून चालायाचें नाहीं पहा - एकंदरीनें सिद्धांत हा कीं ज्यानें माझा भक्तियोग आरंभिला व मजकडे चित्त लाविलें त्या

१ विषय कसे सेवन करावे ह्याचें उदाहरण नाथ देतात — त्यागाच्या नाहीं सामर्थ्य शक्ति । त्यासी विषययोग जेव्हा येती । ते भोगी पैशिया रीती । जेवीं श्रृंगारिती छुळीं धावया ॥ नाथ, २४६. २ हीं कर्में कशीं क्षय पावतात ह्याचें उदाहरण नाथांनीं दिलें तें — घुर्ई दाटली चहूंकडे । ते चडवातें तत्काळ उडे । तेवीं माझ्या प्रकाशापुढे । वासनेचें उपडे समूळ जाळ ॥ नाथ, ॥ ७७ ॥

योग्याला ह्या लोकीं कल्याणप्राप्तीला साधन ज्ञान नलगे किंवा वैराग्य व्हावें लागत नाहीं, - तर भक्तीनेंच तो कृतार्थ होतो - ॥ ३१ ॥ कर्मानुष्ठानानें जें मिळतें, तपश्चर्येच्या योगें जें प्राप्त होतें, ज्ञानानें व वैराग्यानें जें लाभतें; योगाभ्यासानें, दानधर्मानें किंवा तीर्थयात्रादि इतर पुण्यसाधनांनीही जें मिळविलें जातें, तें चित्तशुद्धि इत्यादि सर्व फल माझ्या भक्ताला माझ्या भक्तियोगेंकरूनच अनायासें प्राप्त होतें. - हेंचसें काय पण, - जर कदाचित् तो इच्छा करील तर त्याला स्वर्ग, मोक्ष व माझें वैकुंठपद हीं सुद्धा मिळतातच. ॥ ३२ ॥ ३३ ॥ - 'इच्छा करील तर' असें ह्मणण्याचें कारण हें. - बुद्धिमान् व साधु असे जे माझे अनन्य भक्त, ते - केवळ मजवरच प्रेम करीत आनंदाने अ[illegible]
कर्मभिः यत्, तपसा यत्, ज्ञानवैराग्यतः, योगेन, दानधर्मेण, इतरैः (दुसऱ्या तीर्थयात्रादि) श्रेयोभिः (कल्याणोपायांनीं) अपि च यत्, ॥ ३२ ॥ [तत्] सर्वं मद्भक्तियोगेन मद्भक्तः अंजसा लभते. कथंचित् यदि वांछति, [तर्हि] स्वर्गापवर्गं, मद्धाम [च लभते], ॥ ३३ ॥ साधवः मम एकांतिनः धीराः भक्ताः किंचित् न वांछन्ति मया दत्तं अपुनर्भवं (पुनर्जन्मरहित, आत्यंतिक) कैवल्यं (ऐक्य, मोक्ष) अपि [न गृण्हंति]. ॥३४॥ नैरपेक्ष्यं (निरिच्छपणा) परं अनल्पकं (मोठें) निःश्रेयस (कल्याण व कल्याणाचें साधन, प्राहुः.

यत्कर्मभिर्यत्तपसा ज्ञानवैराग्यतश्च यत् ॥ योगेन दानधर्मेण श्रेयोभिरितरैरपि ॥३२॥ सर्वं मद्भक्तियोगेन मद्भक्तो लभतेऽञ्जसा ॥
स्वर्गापवर्गं मद्धाम कथंचिद्यदि वांछति ॥ ३३ ॥ न किंचित्साधवो धीरा भक्ता ह्येकांतिनो मम ॥ वांछन्त्यपि मया दत्तं
कैवल्यमपुनर्भवम् ॥ ३४ ॥ नैरपेक्ष्यं परं प्राहुर्निःश्रेयसमनल्पकम् ॥ तस्मान्निराशिषो भक्तिर्निरपेक्षस्य मे भवेत् ॥ ३५ ॥
न मय्येकांतभक्तानां गुणदोषोद्भवा गुणाः ॥ साधूनां समचित्तानां बुद्धेः परमुपेयुषाम् ॥ ३६ ॥

तस्मात् निराशिषः (याचना न करणाराला) निरपेक्षस्य (अपेक्षा न धरणाराला) मे भक्तिः भवेत्. ॥ ३५ ॥ साधूनां समचित्तानां बुद्धेः परं (पलिकडच्याला म्ह. ईश्वराला [illegible]) (प्राप्त झालेल्या) मयि एकांतभक्तानां गुणदोषोद्भवाः (विहित व निषिद्ध कर्मांपासून उद्भवणारे) गुणाः (पुण्यपापादिक) न ॥ ३६ ॥
त्याना दुसरी कशाची अपेक्षा नसते - मी आपण होऊन त्याना आत्यंतिक कैवल्य देऊं लागलों तरी तें देखील ते घेत नाहीत मग ते कशाचीही इच्छा करीत नाहीत - हें वेगळे सांगितलें पाहिजे कशाला¹ - ॥ ३४ ॥ निरपेक्षपणा हेंच उत्कृष्ट व मोठें कल्याण आणि कल्याण प्राप्तीचें साधन होय ह्मणून जो पुरुष काही मागणार नाही व [illegible] जी अपेक्षा ती धरणार नाहीं, त्यालाच माझी भक्ति प्राप्त होते. ॥ ३५॥ एतावता, जे पुरुष माझी अनन्य भावें भक्ति करितात, रागादि दोष दूर सारतात व सर्वत्र समबुद्धि ठेवितात ते, ज्यांच्या ठिकाणीं बुद्धीचा प्रवेश नाही, त्या ईश्वरस्वरूपी प्राप्त होतात. ह्मणून त्याना विहित व निषिद्ध कर्मांच्या योगें उद्भवणारे पुण्यपापादि गुण [illegible] ॥ ३६ ॥

¹ तो प्राय. भक्तीवाचून दुसरी कसली इच्छा करीतच नाहीं असें 'जर कदाचित्' ह्या पदावरून उघड होतें

जे कोणी पुरुष मीं सांगितलेल्या अशा ह्या मार्गांचें (माझ्या प्राप्तीच्या उपायाचें) अनुष्ठान करितात, ते निर्भय (जेथे काळाचें व मायेचें भय नाहीं) अशा माझ्या पदीं प्राप्त होतात. ॥ ३७ ॥ इति विंशतितमो ऽध्यायः ॥२०॥ श्रीभगवान् ह्मणाले — उद्धवा, जे पुरुष मी सांगितलेल्या ह्या भक्ति, ज्ञान व निष्काम व परम जें ब्रह्म त्याचें ज्ञान मिळवितात. ॥ ३७ ॥ इति विंशतितमो ऽध्यायः ॥२०॥

एवं मया आदिष्टान् एतान् मे पथः (मार्गांस) [ये] अनुतिष्ठंति (आचरितात), [ते] क्षेमं (निर्भय ह्म० काळ, माया यानीं रहित अशा) मत्स्थान विंदंति (पावतात), यत् परमं ब्रह्म तत् [च] विदुः ॥ ३७ ॥ ॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे विंशतितमो ऽध्याय. ॥ २० ॥ श्रीभगवान् उवाच — ये एतान् भक्तिज्ञानक्रियात्मकान् मत्पथः (मीं सांगितलेले मार्ग)

एवमेतान्मया ऽऽदिष्टाननुतिष्ठंति मे पथः ॥ क्षेमं विंदति मत्स्थान यद्ब्रह्म परमं विदुः ॥ ३७ ॥ इति श्रीभा० महा० एका० विंशतितमो ऽध्यायः ॥ २० ॥ श्रीभगवानुवाच । य एतान्मत्पथो हित्वा भक्तिज्ञानक्रियात्मकान् ॥ क्षुद्रान्कामांश्चलैः प्राणैर्जुषंतः संसरंति ते ॥ १ ॥ स्वे स्वे ऽधिकारे या निष्ठा स गुणः परिकीर्तितः ॥ विपर्ययस्तु दोषः स्यादुभयोरेष निश्चयः ॥ २ ॥

हित्वा (सोडून) चलैः प्राणैः क्षुद्रान् कामान् जुषतः [भवंति], ते संसरंति. ॥ १ ॥ स्वे स्वे अधिकारे या निष्ठा, स गुण परिकीर्तित विपर्यय दोष. स्यात्. उभयो कर्मे एतद्रूप मार्गास सोडून देऊन चंचल इंद्रियांच्या योगें क्षुद्र विषयसुखें भोगीत राहतात, ते संसारात पडतात (त्याना सकल गुणदोष भोगण्यासाठीं नानाप्रकारच्या योनींत जन्म घ्यावे लागतात). ॥ १ ॥ - ह्यावर कोणी ह्मणेल कीं, 'एकाच प्रकारच्या कर्मांनीं काहींना गुणदोष भोगावे लागावे आणि काहींना लागू नये असें का? अग्नीपासून ताप

१ जेथ नाहीं भवभयभ्रांती । जेथ नाहीं दिवसराती । जेथ नाहीं जीवस्थिती । ते ब्रह्म पावती मद्भक्त ॥ जेथ नाहीं रूपनाम । जेथ नाहीं काळकर्म । जेथ नाहीं मरणजन्म । तें परब्रह्म पावती ॥ जेथ नाहीं ध्येयध्यान । जेथ नाहीं ज्ञेयज्ञान । जेथ नाहीं मीतूंपण तें ब्रह्म पूर्ण पावती । ज्यासी नाहीं मातापिता । जे नव्हे देवो देवपिता । जे बहुता एकुलता । तें ब्रह्म तत्वता पावती ॥ जेथ नाहीं वर्णाश्रम । जेथ नाहीं क्रियाकर्म । जेथ नाहीं मायाभ्रम । ते परब्रह्म पावती ॥ जें गुणागुणां अतीत । जें लक्ष्यलक्षण रहित । जें स्वानंदें सदोदित । ते ब्रह्म प्राप्त मद्भक्ता ॥ नाथ, ॥ ४४७—५२ ॥ २ मागील अध्यायाच्या शेवटपर्यंत गुणदोषांच्या व्यवस्थेसाठीं कर्म, ज्ञान व भक्ति हे तीन योग सांगितले. पैकीं जे पुरुष ज्ञानसिद्ध व भक्तिसिद्ध असतील त्यांना गुणदोष काहींच नाहींत साधकांपैकीं ज्यानीं नित्यनैमित्तिकर्मनिष्ठेला प्रारंभ केला आहे त्यानीं प्रयत्न शक्त्यनुसार नित्यनैमित्तिक कर्में करणें हा गुण, त्याविरुद्ध वागणें ह्म० प्रायश्चित्त करणें दोष समजावा. ज्यांचीं अंतःकरणें कारण तीं चित्तशुद्धि करणारीं आहेत त्यानीं नित्यनैमित्तिक कर्में न केलीं किंवा निषिद्ध कर्में आचरिलीं तर तो दोष होय त्याच्या निवृत्तीसाठीं प्रायश्चित्त हा गुण समजावा आता ज्याचीं अंतःकरणें शुद्ध झालीं व ज्यानीं ज्ञाननिष्ठा आरंभिली, त्याना ज्ञानाभ्यासच सिद्धिदायक अर्थात गुण होय, त्याविरुद्ध वागणें ह्म० प्रायश्चित्तादि घेणें हा दोष समजावा भक्तिनिष्ठाना तर श्रवण कीर्तन इत्यादि करणें हाच गुण, त्याविरुद्ध वागणें ह्म० प्रायश्चित्त करणें दोष समजावा. अशा इतका वेळ पावेतों निर्णय ठरला. आता येथून पुढें जे सिद्धही नव्हत व साधकही नव्हत, तर ज्याना काम्य कर्में करणेंच मुख्य वाटतें त्यांच्यासाठीं सकळ पदार्थांचें गुणदोष विस्तारानें सांगावयाचे आहेत. त्याच्या प्रारंभीं, अतिविषयासक्त पुरुषांची भगवान् निंदा करितात.

किल्येकाना होतो व किल्येकांना होत नाही असें कधीं घडत नाही. [1] तर त्याचेंही उत्तर सांगतों - आपापल्या अधिकाराच्या ठिकाणी जी निष्ठा, तिला गुण म्हणतात व त्याहून उलट जो प्रकार तो दोष होय. गुण आणि दोष ह्या दोहोच्या लक्षणाचा निश्चय असा ठरलेला आहे (अर्थात काही कर्मे गुणरूप व काही दोषरूप असें नाहीं, तर ज्याचा जे कर्म करण्याचा अधिकार त्याने ते केले असता गुणरूप होतें, तेंच दुसरा कोणी म्हणजे अनधिकारी करील तर दोष घडतो) ॥ २ ॥ पदार्थ समान असताना त्याच्या ठिकाणी योग्यता, अयोग्यता, ग्राह्यता, अग्राह्यता आणि अर्थ व अनर्थ, सांगून दिले आहेत. उद्देश हा की लोकांना त्या त्या पदार्थांविषयी योग्य किंवा अयोग्य असा संदेह उत्पन्न होऊन त्याद्वारे त्यांच्या स्वाभाविक प्रवृत्तीस प्रतिबंध करावा ॥ ३ ॥ हे पुण्यपुरुषा, त्यामध्ये शुद्धि (योग्यता) आणि अशुद्धि (अयोग्यता)

(गुणदोषाचा) एषः निश्चयः ॥ २ ॥ अनघ, द्रव्यस्य विचिकित्सार्थं (संशयद्वारा स्वाभाविक प्रवृत्तीला प्रतिबंध करण्यासाठीं) धर्मार्थं, व्यवहारार्थं, यात्रार्थं इति च समानेषु अपि वस्तुषु शुद्ध्यशुद्धी, गुणदोषौ, शुभाशुभौ [च] विधीयेते. मया धर्म धुरं (भार) उद्वहतां (वाहणाराचा) अयं आचार दर्शितः ॥ ३ ॥ ४ ॥ भूम्यम्ब्वग्न्य-

शुद्ध्यशुद्धी विधीयेते समानेष्वपि वस्तुषु ॥ द्रव्यस्य विचिकित्सार्थं गुणदोषौ शुभाशुभौ ॥ ३ ॥
धर्मार्थं व्यवहारार्थं यात्रार्थमिति चानघ ॥ दर्शितोऽयं मयाऽऽचारो धर्ममुद्वहतां धुरम् ॥ ४ ॥
भूम्यंब्वग्न्यनिलाकाशा भूतानां पंच धातवः ॥ आब्रह्मस्थावरादीनां शारीरा आत्मसंयुताः ॥ ५ ॥

निलाकाशाः पंच धातवः आब्रह्मस्थावरादीनां भूतानां शारीरा (शरीराचे उत्पादक) ॥ ५ ॥

धर्मासाठी सांगितल्या आहेत (शुद्धीने धर्म होतो व अशुद्धीनें अधर्म घडतो असें ठरविलें आहे), गुण (ग्राह्यता) आणि दोष (अग्राह्यता) व्यवहारासाठीं सांगितले आहेत (उदाहरण- अशौचादि प्रसंगीही राजादिकांनी प्रजाचे न्यायव्यवहार इत्यादि पहावे, दुसरें मात्र काही करू नये, असा निर्णय ठरविला आहे) आणि अर्थ व अनर्थ हे यात्रानिर्वाहासाठीं सांगितले आहेत (आपत्तीचे प्रसंगीं उपजीविकेपुरतेंच साधन घेतले असता पाप नाही अधिक घेतले तर मात्र पाप लागते असें ठरविलें आहे) [illegible] (कर्मजड) लोकासाठी मी (मन्वादि रूपानीं) असा हा आचार दाखवून दिला आहे. ॥ ४ ॥ - उद्धवा, आता मी तुला शुद्धि व अशुद्धि याचे विभागाने विवेचन सांगणार आहें. परंतु, ते वेदोक्त आहे तरी त्यावर विशेषसा अभिनिवेश ठेवू नये कारण, मी पूर्वी (मागे तिसरा श्लोक पहा) सांगितलेच आहे की जेवढे म्हणून पदार्थ तेवढे सगळे अव-

---

1 ह्याची उदाहरणें नाथ देतात —

मुखाचा (अधिकारी) व्यापार बोलणं । तो नाके (अनधिकारी) करू जाता जाण । सुख दुडवूनी दारुण । दुःख आपण स्वयें भोगी ॥ नाथ ३८
गजाचें (अधिकारी) आभरण । गाढवासि (अनधिकारी) नव्हे भूषण । परी मारें मार्गी मरण । नेणी कर्म जाण अनधिकारी ॥ नाथ, ३९.

तात. कसे ते पहा :- ब्रह्मदेवापासून स्थावरादि समस्त प्राण्याची शरीरें निर्माण करणारी कारणे भूमि, उदक, अग्नि, वायु व आकाश ही पांचच होत - अर्थात सर्वांचे शरीर मारल्यात्र योग्यतेचीं आहेत हें उघड झाले इतकेच नव्हे तर तीं एकाच आत्म्याने युक्त आहेत (जीवरूपानेही ती सारखींच आहेत) ॥ ५ ॥ उद्धवा, देह सगळे सारखे असताना वेद त्याच्या ठिकाणी वेगवेगळ्या नामरूपाची (वर्ण, आश्रम ह्यांची) कल्पना करितो उद्देश हा कीं, त्या प्राण्याचे स्वार्थ सिद्ध व्हावे (त्याच्या प्रवृत्तीस नियम लागून तद्द्वारा त्याना पुरुषार्थ साधिता यावे) ॥ ६ ॥ हे सत्पुरुषवरा (उद्धवा), - ही कल्पना केवळ देहावरच केलेली आहे असे नव्हे, तर - देश, काळ, फले, निमित्तें, अविकारी याना व ग्राह्य जे तादूळ इत्यादि पदार्थ त्या सर्वांना मी गुण व दोष सागून ठेविले आहेत. उद्देश हा कीं प्राण्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीचा संकोच उद्धव, वेदेन समेषु अपि धातुषु एतेषा स्वार्थसिद्धये (धर्मादि पुरुषार्थाच्या सिद्धीसाठीं) विषमाणि नामरूपाणि कल्प्यते (रचिलीं आहेत) ॥ ६ ॥ सत्तम, मम देशकाला- भावाना, वस्तुना [च] गुणदोषौ कर्मणा नियमार्थ विधीयेते. । ७ ॥ देशाना अकृष्णसारः (नाहीं हरिण ज्यात तो) अशुचि अब्रह्मण्य (ब्राह्मणभक्तिरहित) [अत्र

वेदेन नामरूपाणि विषमाणि समेष्वपि ॥ धातुषूद्धव कल्प्यंत एतेषां स्वार्थसिद्धये ॥ ६ ॥

देशकालादिभावानां वस्तूनां मम सत्तम ॥ गुणदोषौ विधीयेते नियमार्थं हि कर्मणाम् ॥ ७ ॥

अकृष्णसारो देशानामब्रह्मण्यो ऽशुचिर्भवेत् ॥ कृष्णसारो ऽप्यसौवीरकीकटासंस्कृतेरिणम् ॥८॥

कर्मण्यो गुणवान्कालो द्रव्यतः स्वत एव वा ॥ यतो निवर्तते कर्म स दोषो ऽकर्मकः स्मृत.॥९॥

अशुचि'] भवेत्. कृष्णसारः (हरिणामुळे श्रेष्ठ) अपि असौवीरकीकटासंस्कृतेरिणं (ज्यामध्यें सुवीर ह्म० सत्पुरुष नाहींत तो कीकटदेश, व जेथे सडासमार्जन वगैरे [illegible] होत नाहींत किंवा ज्यात म्लेच्छाची वसति विशेष तो आणि क्षार भूमीचा प्रदेश) [अशुचि] ॥ ८ ॥ द्रव्यतः, स्वतः एव वा [य] कर्मण्यः (कर्माला योग्य) काल , [स] [illegible] करावा (त्या प्रवृत्तीला आळा घालावा). ॥ ७ ॥ - आता शुद्धि व अशुद्धि सागतो - ज्या प्रदेशात कृष्णसार (काळवीट, हरिण) नाहीत, तो प्रदेश अपवित्र होय त्यातूनही जेथे ब्राह्मणाविषयी भक्ति वसत नाही, तो देश तर अत्यत अशुद्ध. आत हरिण फिरतात ह्मणून ज्याला श्रेष्ठत्व आले आहे, पण त्यात सत्पुरुष राहत नाहीत त्या अर्थी तो कीकट (अंग, वग, कलिंग इत्यादि) देश अपवित्र होय (कीकट देशामध्येही सत्पुरुष असतील तर तो पवित्रच समजावा) तसेच जेथे सडासमार्जनादि संस्कार होत नसतील (किंवा, जेथे म्लेच्छाची वसति विपुल असेल) तो देश व उखर (क्षारयुक्त मृत्तिकेचा) प्रदेश हेही अपवित्र होत ॥ ८ ॥ कर्मोपयोगी द्रव्यसपत्ति मिळेल तेव्हा

१ स वै पुण्यतमो देशः सत्पात्र यत्र लभ्यते । (जेथे सत्पात्र मिळेल तो देश अत्यत पवित्र समजावा).

किंवा त्या कर्माला विहित वेळा (पूर्वाण्हादि) असेल तेव्हा तो काल तें कर्म करण्यास योग्य व गुणवान् समजावा. आणि जेव्हा - सामग्री न मिळाल्यामुळे किंवा राष्ट्रशादि कारणास्तव - कर्म चालत नाहीं तो तसेंच - ज्या वेळीं दहा दिवस अशौच वगैरे असल्या कारणानें - कर्म करणें अयोग्य असतें, तो काल दोषरूप (अशुचि) ह्मटला आहे ॥ ९ ॥ पदार्थाची शुद्धि किंवा अशुद्धि (१) दुसऱ्या पदार्थाच्या योगें, (२) वचनानें, (३) संस्कारानें, (४) कालानें, किंवा (५) त्याच्या अधिक-उणेपणावर अवलंबून होत असते - उदाहरणें पहा – (१) पदार्थाची दुसऱ्या पदार्थानें शुद्धि किंवा अशुद्धि अशी तंडुलादि पदार्थ दुसऱ्या उदकादि पदार्थांच्या योगें शुद्ध होतात व मद्यादि पदार्थांच्या संसर्गानें अपवित्र ठरतात, (२) वचनानें शुद्धि किंवा अशुद्धि अशी एकाद्या पदार्थाबद्दल हा शुद्ध किंवा अशुद्ध आहे असा संशय आला असता ब्राह्मणाला नमें विचारावें, त्यानें ' शुद्ध ' ह्मटल्यास शुद्ध अथवा अशुद्ध ह्मटल्यास तो तसा समजावा, (३) संस्कारानें शुद्धि किंवा अशुद्धि अशी फुले प्रोक्षण केल्यानें शुद्ध होतात व हुंगली तर अपवित्र होतात, (४) कालानें शुद्धि किंवा अशुद्धि अशी वृष्टीचें नवें उदक त्यावरून नऊ दिवस गेले कीं पवित्र होतें, वरें, अन्न कांहीं काल गेला (शिळें झालें) कीं अपवित्र होतें, (५) अधिकउणेपणामुळें शुद्धि किंवा अशुद्धि अशा चांडालादिकाचा स्पर्श झाला तरी तलाव इत्यादिकांतें पाणी मोठा संचय असल्यामुळें शुद्धच मानलें जातें, तेंच पुन्हा माठ्यांतलें पाणी थोडे असतें ह्मणून शूद्रस्पर्श होताच त्याज्य मानितात - ॥१०॥ - तसाच शुद्ध्यशुद्धींचा निर्णय कित्येक प्रसंगी - (१) शक्ति किंवा अशक्ति (२) ज्ञान व (३) समृद्धि याच्यावर अवलंबून होतो. - उदाहरणे पहा (१) सूर्यग्रहणादिनवर्षी सूतकान्न वगैरे मशक्त मनुष्यांना अपवित्र, पण तेंच अशक्तांना शुद्ध असतें (२) पुत्रजननादिकाचे वेळीं दहा दिवसापलिकडे कळल्यास शुद्धि (जननाशौच नाहीं), दहा दिवसाच्या आत कळल्यास अशुद्धि असते (जननाशौच धरावे लागतें) (३) जुनीं मळकट वस्त्रें श्रीमंताला अशुद्ध होत, दरिद्र्याला तींच शुद्ध असतात त्यातही पुन्हा विशेष आहे .- द्रव्य, वचन, संस्कार, काल इत्यादिक हीं पदार्थांना अशुद्ध ठरवून तद्द्वारा कर्म निवर्तते (दूर होतें), [य. च] अकर्मकः (कर्मास अयोग्य), सः दोष. स्मृतः. ॥ ९ ॥ द्रव्यस्य शुद्ध्यशुद्धी द्रव्येण, वचनेन, सस्कारेण अथ कालेन अथवा महत्त्वाल्पतया

द्रव्यस्य शुद्ध्यशुद्धी च द्रव्येण वचनेन च ॥ संस्कारेणाथ कालेन महत्त्वाल्पतया ऽथवा ॥ १० ॥

शक्त्या ऽशक्त्या ऽथवा बुद्ध्या समृद्ध्या च यदात्मने ॥ अघं कुर्वंति हि यथा देशावस्थानुसारतः ॥११॥

(मोठेपणानें व लहानपणानें), ॥ १० ॥ शक्त्या, अशक्त्या अथवा बुद्ध्या, समृद्ध्या च [भवतः] [द्रव्यादयः] आत्मने यत् अघं (दोष) कुर्वंति, [तत्] देशावस्थानु-

¹ काले मेघोदकं ग्राह्यं वर्ज्यं तु त्र्यहमेव हि । अकाले दशरात्रं स्यात्तत शुद्धिर्विधीयते ॥

(यथाकालीं पर्जन्यवृष्टि झाली असतां ते पाणी केवळ तीनच दिवस वर्ज्य असतें, पुढें उपयोगास घ्यावें मात्र अकालीं वृष्टि झाल्यास तें उदक दहा दिवस वर्ज्य करावें नंतर त्याची शुद्धि होते असें)

आपल्याला जें पाप उत्पन्न करितात, ते देश व अवस्था यांचें तारतम्य पाहून बेताबेताने करितात, सर्वत्र सारख्या प्रमाणानें करीत नाहींत - कर्में नें पहा' निर्भय प्रदेश असून
तेथें मनुष्य अशुद्ध पदार्थांचा उपयोग करील तर त्याला पाप लागेल, पण देश जर चोरांनीं व्यापलेला आणि भयपूर्ण आहे तर तेथे दोष नाहीं तसेंच जागात रोग वगैरे नाहीं,
चांगलें तारुण्य आहे अशा अवस्थेंत मनुष्याला अपवित्र पदार्थ उपयोगात आणल्यानें दोष लागतो, बाल्य, रोग इत्यादि अवस्थात लागत नाहीं) ॥ ११ ॥
- द्रव्याची शुद्धि द्रव्यानें होण्याचे प्रकार अनेक आहेत पहा :- धान्य, काष्ठ (लौकिक काष्ठें व यज्ञातील ग्रह, चमस इत्यादि काष्ठपात्रें), अस्थि, (हस्तिदंत वगैरे), तन्तु
(वस्त्रे), रस (तेल तूप इत्यादि), तैजस पदार्थ (सुवर्णादि) चर्म, व पार्थिव पदार्थ (रस्ते, चिखल, घरे, विटा, इत्यादि) याची शुद्धि दान, वायु, अग्नि, मृत्तिका व उदक
ह्या व दुसऱ्याही द्रव्यांच्या योगें होते, कित्येकाच्या शुद्धीला ह्यापैकीं अनेकाच्या योगाची अपेक्षा असते, कित्येक ह्यापैकीं एकेकाच्या योगेंच शुद्ध होतात. - उदाहरणें पहा धान्य
सारतः यथा (योग्यपणें) [कुर्वंति]. ॥ ११ ॥ धान्यदार्वस्थितंतूनां (धान्यें, काष्ठें, हाडें व तंतु यांची) रसतैजसचर्मणां पार्थिवानां (भूमि राग व मातीचे कार्य यांची) [च]

धान्यदार्वस्थितंतूनां रसतैजसचर्मणाम् ॥ कालवाय्वग्निमृत्तोयैः पार्थिवानां युतायुतैः ॥ १२ ॥
अमेध्यलिप्तं यद्येन गंधं लेपं व्यपोहति ॥ भजते प्रकृतिं तस्य तच्छौचं तावदिष्यते ॥ १३ ॥

युतायुतैः कालवाय्वग्निमृत्तोयैः [शुद्धि]. ॥ १२ ॥ अमेध्यलिप्त (अपवित्र पदार्थानें लिंपलेलें) यत् [यावता] येन गधं, लेप [च] व्यपोहति (सोडितें) प्रकृति
वायूनें व उन्हानें शुद्ध होतें. काष्ठें व काष्ठपात्रें मृत्तिकेनें व उदकानें शुद्ध होतात, अत्यंत अपवित्र पदार्थाचा स्पर्श झाला असेल तर काष्ठ तासलीं म्हणजे शुद्ध होतात हस्तिदंत
धुतल्यानें शुद्ध होतो. तंतुवस्त्रें उदकानें शुद्ध होतात दूध, तूप, मध इत्यादि रस गाळले व तापविले कीं शुद्ध होतात सुवर्ण तापवलें व धुतलें कीं पवित्र होतें चर्माची तेलाने
शुद्धि होते. मार्ग वायूनें पवित्र होतो इत्यादि त्यात देखील अपवित्रतेचें कारण लहान मोठें जसें असेल त्याप्रमाणें व देश, काल, अवस्था यांच्या तारतम्याने शुद्धीचे प्रकार
असतात. काकस्पर्श झाला तर मातीची घागर टाकण्याचें कारण नाहीं धुवून घेतली म्हणजे झालें; तोच अंत्यजाचा स्पर्श झाला तर ती त्याज्य होते इत्यादि - ॥ १२ ॥
अपवित्र पदार्थाचा लेप लागलेला जो पदार्थ ज्या व जितक्या प्रमाणाच्या उपायानें तो लेप आणि गध टाकून देईल व आपलें मूळ रूप स्वीकारील तो व तितक्या प्रमाणाचा उपाय

१ स्मृति असेंच सांगते— देशं कालं तथाऽऽत्मानं द्रव्यं द्रव्यप्रयोजनम् । उपपत्तिमवस्थां च ज्ञात्वा शौचं प्रकल्पयेत् ॥
(देश, काल, आत्मा, द्रव्य, द्रव्याचें प्रयोजन, उपपत्ति आणि अवस्था इतकें सगळें मनात घेऊन शुद्ध अशुद्धीचा निर्णय ठरवावा)

त्या पदार्थांचा शोधक समजावा (उदाहरण, एखाद्या काष्ठपात्राला घाणेच्या अपवित्र पदार्थाचा लेप घडला, तर तो लेप व ती घाण ज्या उपायानें साफ निघून जाईल—मग तो उपाय पाण्यानें धुणें, क्षार किंवा अम्ल लावणे किंवा सूत दोन सुतें भाग तासून काढणें काही असो, तो उपाय त्याचा शुद्धिकर समजावा) ॥ १३ ॥ - ही द्रव्यशुद्धि नाही झाली. आता कर्त्याची शुद्धि सांगतो . - आत्म्याची (साहकार ह्म० कर्मकर्त्या पुरुषाची) शुद्धि स्नान, दान, तप, कौमारादि अवस्था, शक्ति, उपनयनादि संस्कार, संध्योपासनादि कर्में व माझें (ईश्वराचें) स्मरण ह्याच्या योगें सांगितली आहे (जें कर्म करावयाचें असेल तदनुसार तारतम्यानें शुद्धिप्रकार समजावे) द्विजानें — हे एक उपलक्षण होय चारी वर्णांपैकी कोणत्याही मनुष्यानें — पूर्वोक्त प्रकारांनीं शुद्ध होऊन कर्म आचरण करावें. ॥ १४ ॥ मंत्राची शुद्धि - सद्गुरूच्या मुखानें - त्याचें पूर्ण ज्ञान करून घेणें ही होय कर्मशुद्धि ह्मणजे सकल कर्म मला (ईश्वराला) अर्पण करणे ही. - हा शुद्ध्यशुद्धींचा विचार झाला. आता धर्म व अधर्म काय ते ऐक देश, काल, द्रव्य कर्ता, मंत्र व कर्म (मूल रूपास) भजते (स्वीकारितें) [च] तावत् तत् तस्य शौचं इष्यते. ॥ १३ ॥ स्नानदानतपोवस्थावीर्यसंस्कारकर्मभिः मत्स्मृत्या च आत्मनः शौचं शुद्धः द्विजः कर्म आचरेत्. ॥ १४ ॥ मंत्रस्य परिज्ञानं (गुरुमुखे पूर्ण ज्ञान) [शोधकं]. मदर्पणं कर्मशुद्धि . षड्भिः धर्मः संपद्यते. विपर्ययः तु अधर्मः ॥ १५ ॥ क्वचित् गुणः अपि

स्नानदानतपोवस्थावीर्यसंस्कारकर्मभिः ॥ मत्स्मृत्या चाऽऽत्मनः शौचं शुद्धः कर्माचरेद्द्विजः ॥ १४ ॥

मंत्रस्य च परिज्ञानं कर्मशुद्धिर्मदर्पणम् ॥ धर्मः संपद्यते षड्भिरधर्मस्तु विपर्ययः ॥ १५ ॥ क्वचिद्गुणो

ऽपि दोषः स्याद्दोषो ऽपि विधिना गुणः ॥ गुणदोषार्थनियमस्तद्भिदामेव बाधते ॥ १६ ॥

दोषः स्यात्. दोषः अपि विधिना गुणः गुणदोषार्थनियमः (गुणदोषाचा एक पदार्थविषयीं नियम, किंवा गुणदोषासाठीं नियामक शास्त्र) तद्भिदां (गुणदोषाच्या भेदास) एव बाधते. ॥ १६ ॥

हीं सहा असली ह्मणजे त्याच्या योगें धर्म घडतो. ह्यात काहीं विपरीत प्रकार असला कीं तो अधर्म समजावा ॥ १५ ॥ - हा सांगितलेला गुणदोषविभाग नसो वास्तविक आहे असें समजूं नकोस कारण, - कोठे गुण देखील दोष होतो (उदाहरण, आपत्तिकालीं प्रतिग्रह केला ह्म० दान घेतलें तर तो दोष होतो. दुसरें उदाहरण— कुटुंबाचा धर्म त्याला गुणकारक पण आपल्याला दोषावह होय). तसेंच, कोठे दोष देखील विधिवलानें गुण होतो (उदाहरण— कुटुंबाचा त्याग हा दोष आहे पण विरक्तानें जर त्याग केला तर तो दोष नव्हे, तर उलट गुण होय). एतावता, गुणदोषाचा एका अर्थाविषयीं जो नियम तो त्या गुणदोषाच्या भेदाचाच बाध करितो (किंवा गुणदोषांना ठरविणारा जो शास्त्ररूप नियम तो त्या गुणदोषाच्या भेदाचाच बाध करितो अर्थात हे गुणदोष वास्तव नव्हत) ॥ १६ ॥

- दोष कित्येक स्थळीं दोष नसतो व कित्येक ठिकाणीं तर तो उलट गुणरूप होतो पहा:- एकाच प्रकारचें कर्म आचरणें - शुद्धाला दोषास्पद असतें पण - तेंच पतित मनुष्याना पातक नसतें - जसे, मद्यपान शुद्ध मनुष्याने केले असता त्याला दोषावह होतें, पण तेच एखाद्या पतिताने केले तर त्याला पुन्हा अधिक भ्रष्ट करू शकत नाहीं कारण, तो मूळ-चाच पतित म्हणून येथे दोषाला दोषत्व नाहीं असे आले - तसेच, स्त्रीसंग - हा यतीला दोषप्रद आहे, पण - गृहस्थाने तो प्रथम स्वीकारलेला असल्यामुळे त्याग - दोषावह होत नाहीं इतकेंच नव्हे तर उलट - गुणावह होतो - कारण, 'ऋतुकाली स्त्रीशी गमन करावें' असा विधिच आहे येथे दोष देखील गुणप्रद झालेला आहे दोन्ही गोष्टींला दृष्टांत पहा, अगोदरच जो खालीं निजलेला, तो खाली पडायाचा नाहीं ॥१७॥ - एतावता, गुणदोषाचे नियम करणारे जे विधि आहेत, त्याचें तात्पर्य प्रवृत्तीचा संकोच करून तद्द्वारा निवृत्ति कर-

समानकर्माचरण (एकाच प्रकारचे कर्म करणें) पतिताना पातक न. संग [गृहस्थस्य] औत्पत्तिकः (पूर्वी अंगीकारलेला) गुण अत्र शयान न पतति ॥ १७ ॥ यत यत. निवर्तेत, ततः ततः विमुच्येत शोकमोहभयापहः एष धर्म नृणा क्षेम . ॥ १८ ॥ पुंसः विषयेषु गुणाध्यासात् [रमणीयताबुद्धि] ततः संग भवेत्, तत्र संगात्

समानकर्माचरणं पतिताना न पातकम् ॥ औत्पत्तिको गुणः संगो न शयानः पतत्यधः ॥ १७ ॥
यतो यतो निवर्तेत विमुच्येत ततस्ततः ॥ एष धर्मो नृणां क्षेमः शोकमोहभयापहः ॥ १८ ॥
विषयेषु गुणाध्यासात्पुंसः संगस्ततो भवेत् ॥ संगात्तत्र भवेत्कामः कामादेव कलिर्नृणाम् ॥ १९ ॥
कलेर्दुर्विषहः क्रोधस्तमस्तमनुवर्तते ॥ तमसा ग्रस्यते पुंसश्चेतना व्यापिनी द्रुतम् ॥ २० ॥

काम. भवेत्. नृणा कामात् एव कलि: (कलह) ॥ १९ ॥ कलेः दुर्विषह (तीव्र) क्रोध तम (समार) त अनुवर्तते, तमसा पुंस व्यापिनी (सर्वत्र संचार करणारी) ण्याकडेच असतें : पहा - ज्या ज्या विषयापासून पुरुष निवृत्त होतो, त्या त्यापासून तो मुक्त होतो आणि हाच धर्म शोक, मोह व भय दूर करणारा अर्थात मनुष्याना कल्याण-प्रद होय. ॥ १८ ॥ - वरून वरून वेदाचा अर्थ प्रवृत्तिपर दिसतो खरा, पण वास्तविक तो तसा नव्हे कारण, प्रवृत्तिमार्ग किती अनर्थावह आहे पहा - विषय चागले, असे म्हटले की मनुष्याला ते चागले वाटू लागतात नंतर त्याची त्यावर आसक्ति जडते, आसक्तीपासून काम (प्राप्तीची इच्छा) उद्भवतो, कामापासूनच, - त्यामध्ये कोणी अडथळा आणला कीं त्याच्याबरोबर, - कलह उत्पन्न होतो, ॥ १९ ॥ कलहापासून तीव्र क्रोध उत्पन्न होतो, त्या क्रोधामागून संमोह उद्भवू लागतो, त्या संमोहाने लवकरच मनुष्याची

१ त्याची नाथ उदाहरणे देतात.—
जें निळीमाजी काळें केलें । त्यासी काय बाधावें काजळें । कां अंधारासी मसी माखिलें । तेणें काय मळलें त्याचें ॥ नाथ, १८५.

सर्वत्रसंचारिणी कार्याकार्यस्मृति ग्रासिली जाते. ॥ २० ॥ हे साधो (उद्धवा), कार्याकार्यस्मृति नाहींशी झाली कीं तो प्राणी नसल्यासारखाच होतो. कारण, पुढें तो मूर्छित व मेल्यासारखा असतो व त्याच्या पुरुषार्थाची हानि होते. ॥ २१ ॥ - त्याला मूर्छित व मेल्यासारखा का म्हटलें ते ऐक '– विषयाबद्दल त्याच्या अंतरीं पूर्ण अभिनिवेश जडलेला असल्यामुळे तो स्वतांलाही ओळखीत नाहीं व दुसऱ्यालाही जाणत नाहीं, तर केवळ वृक्षाप्रमाणे उपजीवनसाधनें मिळवून जीवन असतो व लोहाराच्या भात्याप्रमाणें श्वासोच्छ्वास करीत राहतो एवढेंच (अर्थात तो वृक्षासारखा मूर्च्छित व भात्याप्रमाणे मृततुल्य होय)[1] ॥ २२ ॥ - ह्यावर कोणी ह्मणेल की यज्ञ करणाराला स्वर्गादि फळें मिळतात अशी वेदवचनें आहेत. तेव्हा प्रवृत्तिमार्गी लोक स्वार्थाला मुकतात असें कसें ह्मणता येईल? तर त्याचेंही उत्तर सांगतों – ही फलश्रुति (स्वर्गादि फळें मिळतात असें मा-

चेतना (कार्याकार्यस्मृति) द्रुतं (त्वकर) प्रस्यते. ॥ २० ॥ साधो, तया विरहितः जंतुः शून्याय (नाहीं सारखेपणास) कल्पते. ततः मूर्छितस्य मृतस्य अस्य स्वार्थविभ्रंशः ॥२१॥ विषयाभिनिवेशेन आत्मानं न वेद, अपरं [च] न [विद. य] व्यर्थं वृक्षजीविकया (वृक्षासारख्या आयुष्कमानें) जीवन् [वर्तते, स मूर्छिततुल्यः], य. भस्त्रा (भाता) इव

तया विरहितः साधो जंतुः शून्याय कल्पते ॥ ततोऽस्य स्वार्थविभ्रंशो मूर्छितस्य मृतस्य च ॥ २१ ॥
विषयाभिनिवेशेन नाऽऽत्मानं वेद नापरम् ॥ वृक्षजीविकया जीवन्व्यर्थं भस्त्रेव यः श्वसन् ॥ २२ ॥
फलश्रुतिरियं नृणां न श्रेयो रोचनं परम् ॥ श्रेयोविवक्षया प्रोक्तं यथा भैषज्यरोचनम् ॥ २३ ॥

श्वसन् [वर्तते, स. मृततुल्यः], ॥ २२ ॥ नृणां इयं फलश्रुतिः श्रेयः (खरें कल्याण) न पर रोचन (गोडी लावण्याचें साधन) यथा भैषज्यरोचनं (औषध घेण्यास रुचि उत्पन्न करणारी वचनें) मनुष्यांना परम पुरुषार्थ साधून देणारी (स्वर्गादि फळे हाच उत्तम पुरुषार्थ असें सांगणारी) नव्हे - तर जे लोक अत्यंत बहिर्मुख (विषयासक्त) असतात त्यानाच पुढे मोक्षाचा उपदेश करावयाचा, पण प्रथम त्याची चित्तें शुद्ध झाली पाहिजेत, ती होण्यासाठीं त्यानीं कर्में करणें अवश्य आहे, - ह्मणून ही फलश्रुति अवांतर स्वर्गादि फळें देऊं करून कर्में करण्याविषयी केवळ रुचि उत्पन्न करणारी होय ह्याला लोकांतीलच उदाहरण पहा – मुलाला औषध पाजायाचें असतें ह्मणजे आपण काहीं तरी खाऊ देऊं करतों (पण औषध पिण्याचें खरें फळ खाऊ मिळणें हें असतें काय? नव्हे तर रोगनिवृत्ति हें खरें फळ होय खाऊ हे अवांतर फळ त्याप्रमाणेंच वेदामध्यें ज्योतिष्टोम करणाराला स्वर्ग मिळतो, इत्यादि ज्या फलश्रुति सांगितल्या आहेत, त्याचा उद्देश तरी मनुष्यांनीं कर्में करावीं, चित्त शुद्ध करून घ्यावें व त्यायोगें मोक्ष मि-

---

[1] पिब निंबं प्रदास्यामि खलु ते खंडलड्डुकान्। पित्रैवमुक्तः पिबति न फलं तावदेव तु ॥
(' बाळा, एवढा कडुलिंबाचा रस पी. मग मी तुला खडीसाखर आणि लाडू देईन ' असें बापानें सांगितलें कीं मुलगा ते औषध पितो पण त्याचें फळ खडीसाखर किंवा लाडू मिळणें हें नव्हे) तसेंच आई सांगते— शिखा ते वर्धते वत्स गुडूचीं श्रद्धया पिब । (बाळा, हा गुळवेलीचा काढा पी ह्मणजे कीं नाहीं तुझी शेंडी लांब होईल ') ह्याचें तात्पर्य तें नसेंच.

देऊ केलेली अवातर फळे समजावी) ॥ २३ ॥ - आणखी असे पहा - विषय (घरदार,
क्वावा, हाच मुख्य होय. स्वर्गादि फळें केवळ खाऊसारखीं गोडी लावण्यासाठी
गुरेढोरें इत्यादि भोग्य पदार्थ), प्राण (आयुष्य, इद्रियें, शक्ति इत्यादि), आणि आप्त जन (स्त्रीपुत्रादि), हीं आत्म्याला अनर्थावह (पारिणामी दुःखदायक) आहेत खरी, पण
मनुष्यप्राण्याची मने जन्मत च त्याच्यावर आसक्त असतात, त्याना (मनुष्याना) परम सुख कोणते ते कळत नसते, ते पापमार्गांत (काममार्गांत ह्म० देवादि योनीत) भ्रमण
करीत असतात व शेवटीं वृक्षादि तामस योनीत पडतात, मात्र ते वेदाला नमून असतात (वेद सागेल ते प्रमाण, असा विश्वास ठेवितात), असे आहे, तर स्वतः ज्ञाता वेद त्या
खाऊ) [तथा] श्रेयोविवक्षया (मोक्षमार्ग सागण्याच्या इच्छेनें) प्रोक्त ॥ २३ ॥ मर्त्या आत्मन. अनर्थहेतुषु कामेषु, प्राणेषु, स्वजनेषु च उत्पत्त्या एव आसक्तमनस ॥ २४ ॥
बुध. (ज्ञाता, वेद) स्वार्थ अविदुषः नतान् (नम्र, आपल्या वचनावर विश्वास ठेवणाऱ्या) वृजिनाध्वनि (काममार्गांत—देवादि योनींत) भ्राम्यत तम (तामस योनींत) विशत तान् पुन

उत्पत्त्यैव हि कामेषु प्राणेषु स्वजनेषु च ॥ आसक्तमनसो मर्त्या आत्मनो ऽनर्थहेतुषु ॥ २४ ॥ नतानविदुषः स्वार्थं भ्राम्यतो
वृजिनाध्वनि ॥ कथं युंज्यात्पुनस्तेषु तांस्तमो विशतो बुधः ॥२५॥ एवं व्यवसितं केचिदविज्ञाय कुबुद्धयः॥ फलश्रुतिं कुसुमितां
न वेदज्ञा वदंति हि ॥२६॥ कामिनः कृपणा लुब्धा. पुष्पेषु फलबुद्धयः ॥ अग्निमुग्धा धूमतांताः स्वं लोकं न विदंति ते ॥२७॥

तेषु कथं युज्यात्? ॥ २५ ॥ केचित् कुबुद्धय एवं व्यवसित (अभिप्राय) अविज्ञाय कुसुमिता (फुललेली, ऐकण्यास मनोहर, झोंकदार) फलश्रुति वदति हि वेदज्ञा. [तथा]
न वदति. ॥ २६ ॥ कामिनः कृपणाः लुब्धा पुष्पेषु (फुलाचे ठिकाणींच) फलबुद्धय (फल अशी बुद्धि ज्याची असे) अग्निमुग्धा (अग्निसाध्य कर्मांनीं वेडे झालेले) धूमतांता. (धूम-
लोकाना पुन्हा त्याच काममार्गांत प्रवृत्त करील कसा[1] ' - असे करील तर तो अनाप्त (योग्य उपदेश न करणारा—लोकाचा हितशत्रु) होईल[2] म्हणून तसा प्रकार मुळीच नव्हे -
॥ २४ ॥ २५ ॥ असा वेदाचा अभिप्राय न जाणून कित्येक दुर्बुद्धि (मीमांसक) लोक फुललेल्या (फुललेल्या वेलीसारख्या मनोहर) फलश्रुति[3] सागत बसतात - त्याना दुर्बुद्धि
म्हणण्यास मला अगदीं शंका वाटत नाही - कारण, ज्याना वेदाचें खरें तात्पर्य कळतें ते व्यासादिक तसें कधीं सागत नाहीं ॥ २६ ॥ - त्याच्या बुद्धि किती कुत्सित होऊन जा-
तात पहा :- अंतरीं भोगेच्छा प्रबळ असल्यामुळे ते दीन होऊन गेलेले असतात, पुढे त्याना विषयाचा अतिलोभ सुटतो, व फुले (फुलासारखी स्वर्गादि अवांतर फळे) तीच

1 बालप्रबोधिनीकार म्हणतात :— ' सूकरादि दुःखयोनींत ' 2 वेद असें करणार नाहीं ह्याचा दृष्टात नाथानीं दिला आहे तो असा — भरतया तरटमारू (चाबकाचा मार) केला । बुडत्याचे डोयीं दगड दिधला । आंधळा अंधकूपीं घातला । तैसा वेदु झाला अनर्थी ॥ वेदु जे विपत्ती गोवी । तें प्राणियातें कोण उगवी । राजा सर्वस्व नागवी । तैं कोण सोडवी दीनातें ॥ नाथ, २५० । २५१ 3 ही फलश्रुती कशी आहे पहा:— घोडा विकोनी पलाण (जीन) घेणे । लोणी देऊनी ताक मागणे । भात साडूनी वेळण पिणे । तैसे फळ भोगणें सकामीं ॥ नाथ, २७०.

मुख्य फळें मासतात ह्मणून ते अग्नीने (अग्नीच्या योगें साधावयाचीं जी यज्ञादि कर्में त्याबद्दल अभिमानानें) वेडावून जातात (विवेकशून्य बनतात) आणि शेवटीं त्याचें प… धूमसान धूममार्गांतच होते, त्याना आत्मतत्त्व कळत नाहीं. ॥ २७ ॥ ज्याचे नेत्र अंधकारानें व्यापले त्याना जवळचा पदार्थसुद्धा दिसत नाहीं त्याप्रमाणे त्या कर्मजड पुरुषा… जग ज्याच्यापासून झालें अर्थात जो हें विश्व होय (ज्यावेगळें विश्व नाहीं), त्या हृदयान्तर्वर्ती परमात्म्याचें ज्ञान नसतें. कारण, कर्म हे त्याचें पोट भरण्याचें साधन (… मास खाण्याची इच्छा असते ती पुरविण्याला आयतेंच अनुकूल प्रमाण) आणि - त्याच्या आधाराने पशु मारून खावे - व प्राणाची तृप्ति करावी, हेंच त्याचें मुख्य कर्तव्य असते - मार्गात पर्यवसान ज्याचें असे) ते स्वं लोकं (आत्मतत्त्व) न विदन्ति. ॥ २७ ॥ अंग, यथा नीहारचक्षुषः (अंधकाराने व्याप्त नेत्र ज्याचे ते) [तथा] उक्थशस्त्राः (… साधन शस्त्र ज्याचे असे) असुतृप. (इंद्रियाना संतोषविणारे) ते हृदिस्थ य. इदं, यतः [च इदं त] मां न जानन्ति, ॥ २८ ॥ विषयात्मकाः ते मे परोक्षं (… उघड न दिसणारे …

न ते मामंग जानंति हृदिस्थं य इदं यतः ॥ उक्थशस्त्रा ह्यसुतृपा यथा नीहारचक्षुषः ॥ २८ ॥

ते मे मतमविज्ञाय परोक्षं विषयात्मकाः ॥ हिंसाया यदि रागः स्याद्यज्ञ एव न चोदना ॥ २९ ॥

हिंसाविहारा ह्यालब्धैः पशुभिः स्वसुखेच्छया ॥ यजंते देवता यज्ञैः पितृभूतपतीन्खलाः ॥ ३० ॥

मतं अविज्ञाय [देवादीन् यजते] ' हिंसायां यदि रागः (आवड) स्यात्, [तर्हि] यज्ञे एव, चोदना न ' ॥ २९ ॥ हिंसाविहाराः (हिंसा हा खेळ ज्याचा असे) खला स्व- सुखेच्छया आलब्धैः (मारलेल्या) पशुभिः यज्ञैः देवताः पितृभूतपतीन् यजंते. ॥ ३० ॥

- माझे (वेद करणाऱ्या ईश्वराचें) मत तर असे आहे की - ' हिंसा करण्याची (मांस खाण्याची) आवड असेल तर यज्ञच करावा (यज्ञशेषावाचून इतर मांस नसे …) - मांस खायाला नको असले किंवा स्वर्गादि फळाची इच्छा नसली तरी - यज्ञ अवश्य केलाच पाहिजे असा विधि नाहीं. हा माझा गूढ अभिप्राय त्या विषयलंपट लोकांना समज- त नाहीं, ॥ २९ ॥ व हिंसा करणे हा एक त्यांना खेळच वाटत असतो, ह्मणून ते दुष्ट लोक स्वतःला सुख (खायाला मांस) मिळावें ह्या इच्छेनें पशु मारून त्यांच्या यज्ञांनीं …

१ ह्यालाच ' दक्षिणायन ' मार्ग ह्मणतात   धूमो रात्रिस्तथा कृष्ण षण्मासा दक्षिणायनम् । गीता०   नाथाच्या दृष्टान्तावरून हें आहीं स्पष्ट होतें —

तरी कोंदटल्या वृत्ती । धूमांकित होय स्थिती । जेवीं का आंधळ्याच्या अंध मार्गावी । आवरे रात्रीं आडवी (अरण्यात) चुके ॥ ज्ञान ७६९

२ किंवा उक्थ ह्म० कर्म हेंच शस्त्र ह्म० शस्त्र अर्थात कर्तव्य ज्याचे असे   ३ विलक्षणनिमित्त कर्मांना विशिष्ट प्रकारच्या कामनेचा संबंध नसतो तरी कर्मणा पितृलोकः ' कर्माने पितृलोक प्राप्त होतो)' ह्या वेदवचनावरून सामान्यतः पितृलोकप्राप्तीची इच्छा असतेच, शिवाय अंतःकरणशुद्धीचीही इच्छा असते कारण, ह्मटले आहे —

नाकामस्य क्रिया का चिदृश्यते चेह कर्हिचित् । यद्यद्धि कुरुते जन्तुस्तत्तत्कामस्य चेष्टितम् ।

(ह्या लोकात मनुष्याने कामनेवाचून केलेली कोणतीही क्रिया कोठेंच आढळत नाहीं प्राणी जें जें करितो ते तें सर्व कामनेचें चेष्टित होय)

अन्य देवनाची आराधना करितात ॥ ३०॥ परलोक म्हणजे नुसता ऐकायला मात्र गोड, पण खरे पाहू जाता स्वप्नासारखा भासमात्र व
संपादिलेल्या यज्ञानीं पितर, भूतपति इत्यादि
असत् होय. जसा एखादा व्यापारी - दुस्तर महासागर उल्लंघून जाऊन बहुत धन संपादावें अशा इच्छेनें हातचें सिद्ध द्रव्य घालवितो आणि शेवटीं हे नाही आणि तेंही नाहीं असा
दोहोंकडून फसतो, - तसे हे मूढ लोक परलोकीचें सुख आणि ह्या लोकातील उपभोग भोगण्याचे हृदयात संकल्प — निश्चय नव्हे हो, कारण, मध्यें पुष्कळ विघ्नें घडण्याचा
संभव असतो; तर नुसतीं मनोराज्ये — बांधितात आणि आपल्या अर्थांचा (द्रव्याचा किंवा पुरुषार्थांचा) कर्मांकडे व्यय करितात[1] ॥ ३१ ॥ त्यांचे स्वभाव रज सत्त्वतमोगुणी अ-
सतात, म्हणून ते आपल्याला अनुरूप अशा - राजस, सात्विक व तामस - इंद्रप्रभृति देवताची उपासना करितात, - पण ते गुणातीत जो मी - त्या माझें आराधन करीत नाहीत
यथा वणिक्, [तथा] स्वप्नोपमं (स्वप्नतुल्य) असंतं (नश्वर) श्रवणप्रियं (ऐकायाला मात्र गोड) अमुं लोकं, आशिष (ऐहिक भोग) [च] हृदि संकल्प्य (मनोराज्यें करून) अर्थान्
(द्रव्यें किंवा पुरुषार्थ) त्यजंति. ॥३१ ॥ रज.सत्वतमोनिष्ठा. रजःसत्वतमोजुष इंद्रमुख्यान् देवादीन् उपासते, तथा (यथार्पणें) एव मा न [उपासते] ॥ ३२ ॥ " इह उत्तै दे-
स्वप्नोपममभुं लोकमसंतं श्रवणप्रियम् ॥ आशिषो हृदि संकल्प्य त्यजंत्यर्थान्यथा वणिक् ॥३१॥ रजःसत्त्वतमोनिष्ठा रजःसत्त्वतमोजुषः ॥
उपासत इंद्रमुख्यान्देवादीन्न तथैव माम् ॥ ३२ ॥ इष्ट्वेह देवता यज्ञैर्गत्वा रंस्यामहे दिवि ॥ तस्यांत इह भूयास्म महाशाला महाकुलाः
॥ ३३ ॥ एवं पुष्पितया वाचा व्याक्षिप्तमनसां नृणाम् ॥ मानिना चातिस्तब्धानां मद्वार्ताऽपि न रोचते ॥ ३४ ॥
वता इष्ट्वा (आराधन) दिवि गत्वा रंस्यामहे (भोग भोगू). तस्य (त्या भोगाच्या) अंते इह महाकुलाः (उत्तम कुल ज्याचें असे) महाशालाः (मोठे घर ज्याचें असे) भूयास्म (होऊ)"
॥ ३३ ॥ एवं पुष्पितया (फुलेल्या) वाचा व्याक्षिप्तमनसां (चचल मनें ज्यांचीं अशा) मानिनां अतिस्तब्धानां (अतिगर्विष्ठ) नृणां मद्वार्ता अपि न रोचते (आवडत नाहीं) ॥३४॥
- आता इंद्रादिदेव तरी माझेच अंश होत, म्हणून ' आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरं ' ह्या न्यायानें कोणत्याही देवतेची पूजा केली तरी ती माझीच केल्यासारखी होते
ही गोष्ट खरी, परंतु - ते त्यांनी केलेलें माझें पूजन जसें व्हावें तसें होत नाहीं - कारण, त्यांची दृष्टि भेदयुक्त असते (त्यांना त्या त्या देवता भिन्न भिन्न वाटत असतात) -
॥ ३२ ॥ - त्यांची मनोराज्ये कसकशीं चालतात तें सांगतो, ऐक ·- ' आपण ह्या लोकीं यज्ञाच्या योगे देवताचें आराधन केल्यावर मग स्वर्गी जाऊन नानाप्रकारची सुखें
भोगूं, नंतर ते भोग संपल्यावर पुन्हा ह्या भूलोकीं एकाद्या उच्च कुलामध्ये जन्मून मोठ्या थोरल्या घरात राहू ' ॥ ३३ ॥ अशा फुलेल्या (मनोहर, मोहक, औदार) वच

१ असतं आतिशयाऽदर्शनेन दुःखजनक (असत् म्ह० त्याच्यापेक्षा अधिक चागलें सुख दिसले की दुःख उत्पन्न करणारा परलोकींही सुखाच तारतम्य असतेंच । बालपतोषिणी
२ सकामीं भुलले निश्चितीं । ऊरा सांडून मागती कणीस त्याचें ॥ नाथ, ३३९, त्याप्रमाणें त्यांची स्थिति होते.

यांनीं मनुष्याची मनें चंचल होऊन जातात; त्यांना त्यांबद्दल अभिमान वाटूं लागतो, शेवटीं ते गर्वानें अतिशय फुगून जातात, व मग त्यांना माझी वार्तासुद्धा आवडत नाहीं (म्हणून ते माझ्या सेवेकडे लक्ष देत नाहींत व अर्थात ह्या संसारामध्यें 'पुनरपि जननं पुनरपि मरणं' अशा फेऱ्या घालीत राहतात) ॥३४॥ ज्यामध्यें कर्म, ज्ञान आणि उपासना अशीं तीन कांडें (भाग) हे विषय आहेत, त्या ह्या सगळ्या वेदांचें पर्यवसान 'आत्मा (जीव) ब्रह्मच होय, - संसारी नव्हे - ' हेंच सांगण्याकडे आहे - असा वरून उघड [illegible] अर्थ दिसत नाहीं हे खरें, पण त्याचें कारण मी पूर्वीं सांगितलेंच आहे व पुन्हा सांगतों कीं - मंत्र (किंवा त्यांचे द्रष्टे ऋषि) खरा आशय सामान्य जनांना न [illegible]

त्रिकांडविषयाः इमे वेदाः, ब्रह्मात्मविषयाः (ब्रह्म आत्मा हे प्रतिपादन विषय ज्यांचा असे), ऋषयः परोक्षवादाः (उघड दिसणारा अर्थ वेगळा व खरा आशय वेगळा असें [illegible]) [illegible] मम प्रियं च. ॥ ३५ ॥ प्राणेंद्रियमनोमयं (परा, मध्यमा व पश्यंती एतद्रूप) अनंतपारं गंभीरं (अर्थ समजण्यास कठिण ज्याचा असें) समुद्रवत् दुर्विगाह्यं ([illegible])

वेदा ब्रह्मात्मविषयास्त्रिकांडविषया इमे ॥ परोक्षवादा ऋषयः परोक्षं मम च प्रियम् ॥ ३५ ॥
शब्दब्रह्म सुदुर्बोधं प्राणेंद्रियमनोमयम् ॥ अनंतपारं गंभीरं दुर्विगाह्यं समुद्रवत् ॥ ३६ ॥

शब्दब्रह्म सुदुर्बोधं. ॥ ३६ ॥

अशा गूढ रीतीनें बोलत असतात व मला तरी असें परोक्ष भाषणच (वर दिसणारा अर्थ वेगळा व आंतील आशय भिन्न असें बोलणेंच) आवडतें - कारण, तें ज्याचीं अंतःकरणें शुद्ध झालीं त्यांनाच कळावें असें आहे, सामान्य जनांना कळून उपयोगी नाहीं. नाहीं तर अधिकार नसला तरी जो उठला तो विनाकारण कर्में सोडून देऊं लागेल, आणि इतोभ्रष्ट-स्ततोभ्रष्टः होईल. - ॥ ३५ ॥ - ह्यावर कोणी शंका घेईल कीं 'मग जैमिनीसारखे वेदवेत्ते पुरुष तसें (सगळा वेद निवृत्तिपर असें) वर्णन का करीत नाहींत' तर [illegible]

१ जीव ब्रह्म कसा होतो ह्याचें नाथानीं वर्णन केलें आहे —

हें आपुली वेदगुह्य ज्ञान । जो जीव झाला ब्रह्मसंपन्न । तेथ कर्त्ता मिथ्या जाण । आश्रम वर्ण मग कैंचे ॥ तेथ कैंचें ध्येयध्याता ध्यान । कैंचें ज्ञेय ज्ञाता ज्ञान । नाहीं यज्य, याजक, यजन, । ब्रह्मीं परिपूर्ण पूर्णत्वे ॥ तेथ कैंचें कर्म कर्माचरण । कैंचा वेद वेदाध्ययन । कैंचें साध्य आणि साधन । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ तेथ कैंचें [illegible] कैंचें पाप कैंचें पुण्य । कैंचें जन्म कैंचें मरण । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वे ॥ तेथ कैंचा भेदू कैंचा बोधू । सदोदित परमानंदु । हा वेदार्थ शुद्ध उद्धवा ॥ नाथ, ३५५ [illegible] ३५९

२ हें कारण नाथानीं दृष्टांत देऊन स्पष्ट केलें आहे तें असें —

पारधी लावूनी बडिशपिंडी (गळाला लावलेल्या मांस पिंडाला) । मीनासी जळाबाहेर काढी । तेवीं दावूनी स्वर्गसुख गोडी । वेद जीवास वोढी परमार्थी ।' नाथ, ५८

३ मागें चालू अध्यायाचाच २१ वा श्लोक पहा.

उद्धवा, वेदाचें किंवा वेदार्थाचें तत्त्वतः ज्ञान मजवांचून दुसऱ्या कोणालाही नाहीं कारण, - शब्दब्रह्म ह्मणजे वेद - स्वरूपत व अर्थत अशा दोन्ही प्रकारांनीं - समजण्यास अत्यंत

कठिण आहे - शब्दब्रह्माचे स्थूल आणि सूक्ष्म असे दोन प्रकार आहेत पैकीं सूक्ष्माचे तीन भेद असून त्यांचें स्वरूप समजणें दुर्घट होय. ते भेद असे - पहिला प्राणमय–ज्याला परा

वाणी असें ह्मणतात तो–, दुसरा मनोमय–ज्याला पश्यती वाणी असें ह्मणतात तो–, आणि तिसरा इंद्रियमय – ज्याला मध्यमा वाणी ह्मणतात व जो वाणी ह्या इंद्रियाचा

व्यंजक आहे तो–. शिवाय, त्या सूक्ष्म शब्दब्रह्माचा अंत किंवा पार लागत नाहीं. - कारण, तें समष्टिप्राणादिरूप (सगळ्या जीवाचीं जीं प्राण, मनें व इंद्रियें ह्याचा सघात एतद्रूप)

असल्यामुळें व त्याच्या ठिकाणीं कोणतेही विशेष धर्म नसल्यामुळें देशत आणि कालतः अमर्यादित आहे - आणि त्याचा ठाव लागणें समुद्राच्या प्रमाणें अशक्य होय ॥ ३६ ॥

भूम्ना (अपरिच्छिन्न) ब्रह्मणा (निर्विकार) अनंतशक्तिना मया उपबृंहित (वाढविलेलें) [तत्] भूतेषु घोषरूपेण (नादरूपानें) बिसेषु (कमळाच्या नाळात) ऊर्णा (बारीक तंतु) इव

मयोपबृंहितं भूम्ना ब्रह्मणाऽनंतशक्तिना ॥ भूतेषु घोषरूपेण बिसेषूर्णेव लक्ष्यते ॥ ३७ ॥

यथोर्णनाभिर्हृदयादूर्णामुद्वमते मुखात् ॥ आकाशाद्घोषवान्प्राणो मनसा स्पर्शरूपिणा ॥ ३८ ॥

लक्ष्यते. ॥ ३७ ॥ यथा ऊर्णनाभिः (धाग्ये बेबींत ज्याच्या तो कोळी) हृदयात् मुखात् ऊर्णा उद्वमते (बाहेर ओकतो), [तथा] छंदोमय (वेदमूर्ति) अमृतमयः घोषवान् (नाद ह्या

- त्यापैकीं, अंतर्दृष्टि पुरुषानाच कळण्याजोगें शब्दब्रह्माचे सूक्ष्मरूप सांगतो - तें सर्व प्राण्याच्या अंतरी नादरूपानें वमत असतें आणि जसा कमळाच्या नाळामध्यें असलेला

बारीक ऊर्णातंतु सूक्ष्मदृष्टि पुरुषाना मात्र दिसतो तसें तें शब्दब्रह्माचे नादसंज्ञक सूक्ष्म रूप अंतर्दृष्टि पुरुषाना मात्र दिसून येते. अंतर्यामी राहत असून ज्याच्या स्वरूपाला मर्यादा

किंवा इयत्ता नाहीं तो मी त्याला आश्रय देऊन वृद्धिंगत करीत असतों. तरी पण मी ब्रह्मरूप आहे ह्मणून माझ्या स्वरूपाला विकार नाहीं - विकार नाहीं तरी मला त्याला प्रेरणा

देता येते; कारण - माझ्या शक्ति अनंत आहेत ॥ ३७ ॥ - आता शब्दब्रह्माचा स्थूल भेद जी वैखरी वाणी, ती कशी उत्पन्न होते ते सांगतों, ऐक - जसा कोळी (माशा व

१ ह्याच अर्थाची श्रुति — चत्वारि वाक्परिमिता पदानि तानि विदुर्ब्राह्मणा ये मनीषिणः । गुहा त्रीणि निहिता नेङ्गयन्ति तुरीयं वाचो मनुष्या वदन्ति ॥

अर्थ — शब्दब्रह्माचीं मोजलेलीं स्वरूपें चार आहेत अंतर्दृष्टि पुरुषानाच तीं चारी स्वरूपें अवगत असतात, इतराना नसतात कारण, त्यापैकीं तीन रूपें देहाच्या आत ठेविलेलीं असल्यामुळे आपलें रूप

प्रकाशित करीत नाहींत ह्मणून वाणीचा चवथाच भाग (वैखरीरूप) कायतो प्राणी बोलत असतात तो देखील बोलून मात्र दाखवितात एवढेंच, त्याना त्याचें तत्त्वज्ञान नसतें.

२ विकार नसताही विकार दिसतात ह्याचा दृष्टांत नाथ देतात — तेणें म्या वेद अधिष्ठित । या नाव बोलिजे उपबृंहित । अधिष्ठिता विकारी होत । जेवीं अभ्रांत चंद्रमा ॥ जो अग्नि

काष्ठीं अधिष्ठिता । त्यासी तात्काळ ये साकारता । मग प्रबळ आणि शांतता । या विकारावस्था अग्नीसी ॥ यापरी विकारी नव्हे जाण । मी अंतर्यामी नारायण । ब्रह्मस्वरूपें

परिपूर्ण । विकारनिर्दळ स्वयें कर्ता ।१९०।९१।९२.

घुंगुरटीं धरण्यासाठीं उजेडाच्या समोर कोनाकोपऱ्यांतून जाळीं बांधणारा प्राणी) हृदयातून मुखद्वारा तंतु बाहेर काढितो, त्याप्रमाणें प्राणोपाधि अर्थात त्या रूपानें वेदमूर्ति व स्वता अ-मृतमय असा हिरण्यगर्भरूप भगवान्, नाद हें उपादान कारण घेऊन, क, ख, ग. घ इत्यादि वर्णांचे संकल्प करणारें मन ह्या निमित्तानें हृदयाकाशांतून बृहती (वैखरी) वाणी उत्पन्न करितो. - त्या वाणीला बृहती (मोठी) म्हणण्याचें कारण असें :- तिचे मार्ग सहस्रावधि आहेत - कोणते ते पहा - पहिला ओंकार (हा येथें हृदयस्थ सूक्ष्म घ्यावयाचा. अकार, उकार व मकार एतद्रूप नव्हे कारण तो व्यक्त कोटींत पुढें येणारच). त्यापासून पुढें - उर, कंठ इत्यादि स्थानाच्या संबंधानें - स्पष्ट होणारे स्पर्श (कवर्ग, चवर्ग, टवर्ग, तवर्ग व पवर्ग हे कपासून मपर्यंत पंचवीस वर्ण) स्वर (अ, आ इत्यादि सोळा), ऊष्मे (श, ष, स, ह) आणि अंतस्थ (य, र, ल, व) हे वर्ण त्या वाणीला भूष-उपादानकारणानें युक्त) प्राण॰ (प्राणोपाधि हिरण्यगर्भ) स्पर्शरूपिणा (क पासून म पर्यंत पचवीस वर्णांना स्पर्श म्हणतात त्या स्पर्शांचा संकल्प करणारें अशा) मनसा आकाशात् (हृदयाकाशांत मन) सहस्रपदवीं (सहस्र मार्ग ज्याचे अशा) ओंकारात् व्यंजितस्पर्शस्वरोष्मांतस्थभूषिता विचित्रभाषावितता चतुरुत्तरैः (चार चार वर्ण उत्तरोत्तर अधिक ज्यांत अशा) (४१ श्लो०)

छंदोमयोऽमृतमयः सहस्रपदवीं प्रभुः ॥ ओंकाराद्व्यंजितस्पर्शस्वरोष्मांतस्थभूषिताम् ॥ ३९ ॥
विचित्रभाषावितर्ता छंदोभिश्चतुरुत्तरैः ॥ अनंतपारां बृहतीं सृजत्याक्षिपते स्वयम् ॥ ४० ॥
गायत्र्युष्णिगनुष्टुप् च बृहती पंक्तिरेवच ॥ त्रिष्टुब् जगत्यतिच्छंदो ह्यत्यष्ट्यतिजगद्विराट् ॥४१ ॥
किं विधत्ते किमाचष्टे किमनूद्य विकल्पयेत ॥ इत्यस्या हृदयं लोके नान्यो मद्वेद कश्चन ॥४२॥

[एतैः] छंदोभिः [उपलक्षिता] अनंतपारां बृहतीं (मोठ्या वैखरीला) सृजाति, स्वयं आक्षिपते (संहारितो) [च]. ॥ ३८ ॥ ३९ ॥ ४० ॥ ४१ ॥ "किं विधत्ते' किं आचष्टे (प्रकाशित करितो)? किं अनूद्य (अनुवाद करून) विकल्पयेत् (निषेधासाठीं कल्पितो)" इति अस्याः हृदयं (तात्पर्य) लोके मत् विना अन्य कश्चन न वेद ॥ ४२ ॥

वितात. पुढें तीच वाणी वैदिक व लौकिक अशा विचित्र भाषानीं विस्तारिली जाते. नतर तीमध्यें, एकापेक्षा एक चार चार अक्षरानीं मोठाले असे छद (वृत्त) होतात अशा रीतीनें ती अनंत व अपार होते. शेवटीं कोळी जसा स्वता पसरलेलें जाळें आपणच आटोपून घेतो, तसा तो भगवान् हिरण्यगर्भ ह्या वाणीचा उपसंहार स्वतःच करितो ॥ ३८ ॥ ॥ ३९ ॥ ४० ॥ - त्यापैकीं थोड्याशा छंदांचीं (वृत्तांचीं) नावें येथें देतों - ते छंद गायत्री, उष्णिक्, अनुष्टुभ्, बृहती, पंक्ति, त्रिष्टुभ्, जगती, अतिजगती, अष्टि अ-त्यष्टि, विराट् आणि अतिविराट् हे होत (पैकीं गायत्रीचीं अक्षरें चोवीस, उष्णिक्‌चीं अठ्ठावीस अशीं अनुक्रमें प्रत्येक छदाचीं मागील छदापेक्षां चार अक्षरें अधिक समजावीं) - एतावता, वैखरी वाणीचें सुद्धा स्वरूप सर्वथा कळणें अशक्य आहे, हें उघड होय. - ॥ ४१ ॥ ही वाणी - कर्मकांडामध्यें विधिवचनानीं - 'विधान कसलें करिते, - उपासना

कार्डांत मंत्रवचनांनीं - काय प्रकाशित करिते, - आणि ज्ञानकांडामध्यें - कशाचा अनुवाद करून विकल्प (निषेधासाठीं) करिते, असें हिचें हृदय मजवाचून ह्या लोकामध्यें कोणीही
जाणत नाहीं. ॥४२॥ - ह्यावर तूं ह्मणशील कीं, 'तुला वेदवाणीचें हृदय ठाऊक आहे, तर कृपा करून तेवढें मला सांग.' तर ठीक आहे. सांगतों ऐक.- ती वेदवाणी - कर्मकांडा-
मध्यें यज्ञरूपी - माझेंच विधान करिते, - उपासनाकांडामध्यें तत्तद्देवतारूपी माझेंच वर्णन करिते. - मजहून वेगळ्या देवतेचें करित नाहीं, - आणि ज्याचा (आकाशादि प्रपंचसमू-
हाचा) - 'तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः' इत्यादि वचनांनीं - विकल्प करून निषेध करिते, तें देखील मीच होय, - मजहून भिन्न नाहीं कारण, - सगळ्या वेदाचा
मां विधत्ते, मां अभिधत्ते (सांगते). [यः] विकल्प्य (कल्पून) अपोह्यते (निषेध केला जातो), [सः] अहं. एतावान् सर्ववेदार्थः – शब्दः मां (परमेश्वरास) आस्थाय (आश्रय
करून) भिदां (प्रपंच) मायामात्रं (केवळ माया) अनूद्य (असें बोलून), प्रतिषिद्ध्य (निषेधून) अंते प्रसीदति (स्वस्थ राहतो). ॥ ४४ ॥

मां विधत्ते ऽभिधत्ते मां विकल्प्यापोह्यते त्वहम् ॥ एतावान्सर्ववेदार्थः शब्द आस्थाय मां भिदाम् ॥
मायामात्रमनूद्यांते प्रतिषिध्य प्रसीदति ॥४३॥ इति श्रीभा० महा० एकादशस्कंधे एकविंशो ऽध्यायः ॥२१॥

इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे एकविंशोऽध्यायः ॥ २१ ॥

संक्षेपत अर्थ एवढाच आहे कीं, शब्द (वेद) परमार्थरूपी माझा आश्रय करून 'जेवढा ह्मणून भेद तेवढा सगळा केवळ मायामय होय' असें सांगतो व शेवटीं 'नेह नानाऽस्ति
किंचन' अशा वचनानें सकल भेदाचा निषेध करून प्रसन्नपणें स्वस्थ राहतो (ह्याचा अभिप्राय असा – अंकुरांत जो रस असतो तोच त्या वृक्षाच्या विस्तारामध्यें ह्म० त्याच्या
खोडांत, खांद्यांत, डाहाळ्यांत, पानांत असा सर्वत्र पसरलेला असतो, तद्वत् प्रणवाचा ह्म० ॐकाराचा अर्थ जो परमेश्वर तोच सगळ्या वेदाच्या कांडाचा व शाखांचाही अर्थ असणे
योग्य आहे, दुसरा तसा नाहीं) ॥ ४३ ॥

॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने एकादशस्कंधे एकविंशतितमो ऽध्यायः ॥ २१ ॥

---

१ नाथ (१) कर्मकांड, (२) उपासनाकांड व (३) ज्ञानकांड ह्यांचें स्पष्टीकरण करतात — मीच देवो मीच भक्तु । पूजोपचार मी समस्तु ।
मी कर्मविधिमध्यवर्ती । मी कर्मकर्ता क्रियाशक्ती । कर्मफळदाता मी श्रीपती । हा इत्यर्थ निश्चिती कर्मकांडाचा ॥ अवघा संसार काल्पनिक । तेथ वेद नियामक कोण
मीचि मातें पूजित् । हे इत्थंभूत् उपासना ॥ ज्ञानकांड अलौकिक । वेद आपला द्योतक (स्वरूप प्रगट करणारा) । जेथ मुळीं मुख्य अद्वैतता । तेथ कैंचा वक्ता कैंचा श्रोता ।
अर्थे ॥ मूळ संसारचि मायिक । तेथ वेद तोही तद्रूप देख । मृगजळीं नाहीं उदक । परी खोलही देख असेना ॥ जळगारा जळीं विरे । तेवीं वेदू अद्वैतीं मुरे । हें ज्ञानकांड साचोकारें (सत्य) । तुज म्यां खरें सांगितलें ॥ नाथ, ४०५
कैंचे कर्म कैंचा कर्ता । मा वेदवार्ता ते कैंची ॥

- सर्व वेदांचें पर्यवसान मोक्षाकडे -आहे, प्रवृत्तिमार्गाकडे नाहीं, असें सिद्ध केलें खरें तथापि त्यांत अवातर कित्येक भेद आहेत, ते असे कीं कित्येक विद्वानांचा तत्वसंख्ये-विषयीं मतभेद दिसतो, कित्येकांचा बाह्य विषयाच्या सत्यत्वमिथ्यत्वाविषयी व आत्म्याच्या एकत्वनानात्वाविषयीं परस्परविरोध आहे असें दिसतें त्यात निश्चितार्थ काय तो समजावा म्हणून - उद्धवानें प्रश्न केला .- हे विश्वेश्वरा, वेदामध्ये ऋषींनीं तत्वाची संख्या पुष्कळ प्रकारची सांगितली आहे. त्यात खरी तत्वें किती? आपण तर नव, नऊ, अकरा पांच व तीन - अशी अठ्ठावीस - आहेत असें येथे (१९ साव्या अध्यायात) सांगितलें तें मीं श्रवण केलें आहे. ॥ १ ॥ कित्येक ऋषींनीं तत्वें सव्वीस आहेत असें म्हटलें आहे कित्येकानी पचवीस म्हटलीं आहेत, इतर कित्येकानीं सात, कित्येकानीं नऊ, सहा, चार, अकरा व कित्येकानीं सतरा, सोळा व तेरा ठरविली आहेत. अशा निरनिराळ्या प्रकारची

उद्धवः उवाच— विश्वेश, प्रभो, ऋषिभिः कति तत्वानि सख्यातानि ? त्वं इह नव, एकादश, पंच त्रीणि च आत्थ (सांगता झालास) [वय तानि] शुश्रुम ॥ १ ॥ केचित् षड्विंशतिं (सव्वीस), अपरे पचविंशतिं, एके सप्त, [अपरे] नव, [एके] षट्, केचित् चत्वारि, अपरे एकादश प्राहुः. ॥ २ ॥ केचित् सप्तदश, एके षोडश, [एके] त्रयो-

उद्धव उवाच । कति तत्त्वानि विश्वेश संख्यातान्यृषिभिः प्रभो ॥ नवैकादश पंच त्रीण्यात्थ त्वमिह शुश्रुम ॥ १ ॥ केचित् षड्विंशतिं प्राहुरपरे पंचविंशतिम् ॥ सप्तैके नव षट् केचिच्चत्वार्येकादशापरे ॥ २ ॥ केचित्सप्तदश प्राहुः षोडशैके त्रयोदश ॥ एतावत्त्वं हि संख्यानामृषयो यद्विवक्षया ॥ गायंति पृथगायुष्मन्निदं नो वक्तुमर्हसि ॥ ३ ॥ श्रीभगवानुवाच । युक्तं च संति सर्वत्र भाषंते ब्राह्मणा यथा ॥ मायां मदीयामुद्गृह्य वदतां किं नु दुर्घटम् ॥ ४ ॥ नैतदेवं यथाऽऽत्थ त्वं यदहं वच्मि तत्तथा ॥ एवं विवदतां हेतुं शक्तयो मे दुरत्ययाः ॥ ५ ॥

दश प्राहुः. आयुष्मन्, ऋषयः पृथक् संख्यानां एतावत्त्व यद्विवक्षया (जें सांगण्याच्या इच्छेनें) गायति, इदं नः वक्तुं अर्हसि ॥ ३ ॥ श्रीभगवान् उवाच—ब्राह्मणा यथा भाषंते, [तत्] युक्तं. [यतः] सति च सर्वत्र [सर्वाणि तत्त्वानि]. मदीया माया उद्गृह्य (स्वीकारून) वदतां दुर्घटं किंनु ? ॥ ४ ॥ "त्वं यथा आत्थ, एवं एतत् न अह

तत्वाची गणना ऋषींनीं कोणत्या उद्देशानें केली आहे तें आम्हास सांगण्यास, हे नित्यमूर्ते भगवन्, आपण योग्य आहां ॥ २ ॥ ३ ॥ श्रीभगवान् म्हणाले – (उद्धव, ') ब्राह्मण जें जें व्याख्यान करितात तें सर्व - जरी व्याख्यान करणाराच्या उद्देशभेदामुळें एकमेकाच्या विरुद्ध दिसतें तथापि - युक्तिसिद्ध आहे वरें. खरे पाहू गेलें तर तसें (विरुद्ध) नव्हेहीं; कारण, - सर्वत्र अंतर्भूत सर्व तत्वें आहेतच. शिवाय, माझ्या मायेचा स्वीकार करून जे भाषण करितात त्यांना - निरनिराळ्या प्रकारानें विवेचन करणें - काय दुर्घट आहे ? - मृगजळाच्या परिणामाविषयीं वाद चालविला असता अघटित असें काहीच नाही - ॥४॥ - जर सर्वच सयुक्तिक आहे व भेद दिसतो तो मायेच्या अवलंबनामुळें आहे, तर त्या भेदाचे हेतु सिद्ध करण्याविषयीं वाद का असावे असें तू म्हणशील तर त्याचे कारण असें - तू म्हणतोस तें बरोबर नाहीं, माझेच मत सप्रमाण आहे, असा

प्रकारें निरनिराळे हेतु मनांत धरून वाद करण्याला - अंतःकरणाच्या वृत्तिरूपी - माझी त्रिगुणात्मक मायाच कारण आहे ती माया तरून जाणें फार कठीण आहे. ॥ ५ ॥ या त्रिगुणात्मक अंतःकरणातील वृत्तींत क्षोभ झाला असता (ह्मणजे सत्व, रज आणि तम या गुणाचें साम्य नाहींसे झालें ह्मणजे) व्याख्यानकारात मतभेद उत्पन्न होतो परतु शम व दम याचा उदय झाला असता (ह्मणजे अंतर्वृत्तीचा व बाह्य वृत्तींचा निग्रह केला ह्मणजे) हा मतभेद नाहींसा होऊन वाद मिटतो. ॥ ६ ॥ - सर्व प्रकारचीं व्याख्यानें सयुक्तिक कशीं आहेत तें स्पष्ट करून सांगतों.- हे उद्धवा, तूं सर्व पुरुषांत श्रेष्ठ आहेस. तत्वांचा कार्यकारणरूपानें परस्परात प्रवेश असतो - ह्मणजे मृत्तिका ही घटाचें कारण आहे व घट हा मृत्तिकेचें कार्य आहे. ह्मणून मृत्तिका नेहमी घटाला व्यापून असलीच पाहिजे तसेंच आकाशतत्व हें वायुतत्वाचें कारण असल्यामुळें त्या आकाशतत्वाचा वायुतत्वात नेहमीं प्रवेश यत् वन्मि (ह्मणतों) तत् तथा " एवं हेतुं विवदता (वाद करणारास) मे दुरत्ययाः (दुरतिक्रम) शक्तयः [हेतु], ॥ ५ ॥ यासां व्यतिकरात् (क्षोभामुळे) वदता पद (विषय) विकल्पः (भेद) आसीत्. शमदमे प्राप्ते [सति, विकल्पः] अप्येति (लय पावतो). तं अनु वादः शाम्यति (मिटतो). ॥ ६ ॥ पुरुषर्षभ, तत्वाना परस्परानुप्रवेशात् यथा

यासां व्यतिकरादासीद्विकल्पो वदता पदम् ॥ प्राप्ते शमदमेऽप्येति वादस्तमनु शाम्यति ॥ ६ ॥ परस्परानुप्र
वेशात्तत्त्वानां पुरुषर्षभ ॥ पौर्वापर्यप्रसंख्यानं यथा वक्तुर्विवक्षितम् ॥ ७ ॥ एकस्मिन्नपि दृश्यंते प्रविष्टानीतराणि
च ॥ पूर्वस्मिन्वाऽपरस्मिन्वा तत्त्वे तत्त्वानि सर्वशः ॥ ८ ॥

वक्तुः विवक्षितं, [तथा] पौर्वापर्यप्रसंख्यानं (कारण व कार्य असें कथन किंवा लहान मोठ्या संख्येनें गणना) [भवति] ॥ ७ ॥ एकस्मिन् अपि इतराणि प्रविष्टानि दृश्यते पूर्वस्मिन् (कारणतत्वात), अपरस्मिन् (कार्यतत्वांत) वा तत्वे सर्वशः तत्वानि. ॥ ८ ॥
ह्मणजे अन्वय आहे. असा तत्वाचा कार्यकारणरूपानें परस्परात प्रवेश आहे ह्मणून - तत्वांची गणना कार्यकारणरूपानें वक्त्याच्या मनोगताप्रमाणे अधिकउणी केलेली आढळते ॥ ७ ॥ एकाच कारणतत्वात इतर सर्व कार्यतत्वाचा प्रवेश असतो - जसें आकाशतत्वात त्यापासून होणाऱ्या वायुतेजादि कार्यतत्वाचा सूक्ष्मरूपाने प्रवेश असतो. तसेंच सुवर्णांत अनेक अलंकाराचा प्रवेश आहे ह्मणजे तेच सुवर्ण कर्त्याच्या इच्छेनुरूप अनेक अलंकाररूपानें बनविलें जातें - अथवा एका कार्यतत्वात इतर कारणतत्वाचा अन्वयरूपानें प्रवेश असतो - जसें पृथ्वीतत्वात उदक अग्नि वायु इत्यादि तत्वाचा अन्वय आहे. घटात मृत्तिकेचा अन्वय आहे - ॥ ८ ॥

---

१ कार्य व कारण ह्यांचें नाथांनीं थोडक्यात लक्षण सांगितलें आहे तें असें :— पूर्णस्थित जें तें कारण । त्यापासून उपजे कार्य जाण । हें कार्यकारणाचें लक्षण । तत्वविचक्षण बोलती ॥ २ एकाच कारणापासून अधिकउणीं कार्यें कशीं होतात ह्याचा नाथांनीं दृष्टांत दिला आहे:— साकरेचीं नारळें केळीं । पारे नीं साकरेचा नाहीं मुकली । तेवीं कारणाचीं कार्यें जाहालीं । असता संचली कारणत्वें ॥ नाथ, ८४.

म्हणून व्याख्यानाच्या अभिप्रायाला अनुसरून ऋषींनीं या तत्त्वांची कार्यकारणरूपानें जी अधिकउणी गणना केली आहे ती सयुक्तिक असल्यामुळे आम्ही तिचा स्वीकार करितों. ॥ ९ ॥ - आता ईश्वर आणि जीव यांचा भेद व अभेद दर्शविण्याच्या अभिप्रायानें तत्वाची गणना सव्वीस व पंचवीस कशी केली आहे तें सांगतों : जीव आणि ईश्वर हीं दोन भिन्न तत्वें आहेत असें कल्पून तत्वांची संख्या सव्वीस मानण्याचें कारण, उद्धवा, असें आहे कीं - अनादि अविद्येनें जीव हा बद्ध झालेला असून त्याला ईश्वराचे साहाय्याशिवाय स्वस्वरूपाचें ज्ञान स्वतन्त्रपणें होण्याचा संभव नाहीं. ईश्वर हा आत्मज्ञानी असून त्याच्या कृपेनें जीवाला स्वरूपसाक्षात्कार होतो - या का-

अतः अमीषां पौर्वापर्यं (कार्यकारणत्व) प्रसंख्यानं (गणना) [च] अभीप्सतां यथा यद्वक्त्रं (ज्यावें मुख) [प्रवर्तते, तत् सर्वं] युक्तिसंभवात् विविक्तं (निश्चित) गृण्हीम ॥ ९ ॥ अनाद्यविद्यायुक्तस्य पुरुषस्य आत्मवेदनं (आत्मज्ञान) स्वतः न संभवेत्, अन्यः तत्वज्ञः ज्ञानदः भवेत्. ॥ १० ॥ अत्र पुरुषेश्वरयोः अणु (थोडें) अपि वैलक्षण्यं (वेग-ळे-

पौर्वापर्यमतोऽमीषां प्रसंख्यानमभीप्सताम् ॥ यथा विविक्तं यद्वक्त्रं गृह्णीमो युक्तिसंभवात् ॥ ९ ॥ अनाद्यविद्यायुक्तस्य पुरुषस्याऽऽत्म-वेदनम् ॥ स्वतो न संभवादन्यस्तत्त्वज्ञो ज्ञानदो भवेत् ॥ १० ॥ पुरुषेश्वरयोरत्र न वैलक्षण्यमण्वपि ॥ तदन्यकल्पनाऽपार्था ज्ञानं च प्रकृतेर्गुणः ॥ ११ ॥ प्रकृतिर्गुणसाम्यं वै प्रकृतेर्नात्मनो गुणाः ॥ सत्त्वं रजस्तम इति स्थित्युत्पत्त्यंतहेतवः ॥१२॥

पणा) न. तत् अन्यकल्पना (वेगळेपणाची कल्पना) अपार्था (व्यर्थ) ज्ञान प्रकृतेः गुणः. ॥ ११ ॥ गुणसाम्यं प्रकृतिः. स्थित्युत्पत्त्यंतहेतवः सत्त्व, रजः तमः इति गुणाः प्रकृतेः. आत्मनः न. ॥ १२ ॥

रणास्तव जीवें व ईश्वरें यांचा भेद मानिला आहे. - ॥ १० ॥ असे जीव आणि ईश्वर हे चैतन्यरूपी असल्यामुळें त्यामध्यें भेद मुळींच नाहीं त्याच्या भेदाची कल्पनाही अगदीं व्यर्थ आहे. (म्हणून तत्वाची संख्या पंचवीस केली आहे) - आतां जीवेश्वराच्या ऐक्याचें जे ज्ञान त्या ज्ञानाला एक निराळेंच तत्व का मानू नये अशी शंका येईल तर त्याचेंही उत्तर असें कीं - ज्ञान हें सत्वगुणाची वृत्ति असल्यामुळें तो प्रकृतीचा गुण आहे. त्याचा प्रकृतितत्वात अंतर्भाव होतो, म्हणून ज्ञान हें निराळें तत्व नाहीं ॥ ११ ॥ - आत्ता ज्ञान हा जीवाचा धर्म दिसत असून तो प्रकृतीचा गुण कसा असें विचारशील तर त्याबद्दल सांगतों ऐक - सत्व, रज आणि तम या तिन्ही गुणांची समान अवस्था, जी

१ जीव आणि ईश्वर ह्यामधील भेद नाथांनी दाखविला आहे.— जीव नियम्य ईश्वर नियंता । जीव अज्ञान ईश्वर ज्ञानदाता । जीव परिच्छिन्न एकदेशी । ईश्वर सर्वथा सर्वज्ञ ॥ जीव हीन दीन अज्ञान । ईश्वर समर्थ सर्वज्ञ । जीवास दृढ कर्मबंधन । ईश्वर तो जाण निष्कर्मा ॥ नाथ, १०१ । २ २ जीवाला आत्मज्ञान झाल्यानंतर मात्र जीवेश्वरभेद राहत नाहीं कारण दोघांचीही स्वरूपस्थिति एकच. भेद हा अविवेकें कल्पित असतो तो आत्मज्ञानानें नष्ट होतो. ३ ह्याचा न्याय दृष्टांत देतात — स्वभावें पहातां दर्पण । एकाचें देखिजे दुजेपण । परि द्विधा नव्हेचि आपण । या परि जाण जीव शिव ॥ अज्ञानप्रतिबिंबित जीव । याचा द्रष्टा तो सदाशिव । तरी ऐक्यतेचें जें वैभव । तो निज स्वभाव मोडेना ॥ नाथ, ॥ ११२, १३ ॥

तिलाच प्रकृति ह्मणतात. ती समान अवस्था मोडून त्या गुणांचा न्यूनाधिकभाव आला ह्मणजे तेच गुण जगाची उत्पत्ति, स्थिति आणि प्रलय ही होण्याला कारणीभूत होतात आता ज्ञान हें सत्व गुणाची वृत्ति आहे ह्मणून तें प्रकृतीचाच गुण आहे, जीवाचा नव्हे कारण जीव हा अकर्ता असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं जगाच्या उत्पत्त्यादिकाना कारण जे गुण त्या गुणाचें आश्रयत्व संभवत नाही. ॥ १२ ॥ ह्मणून सत्वगुणात्मक ज्ञान - हा प्रकृतीचाच गुण होय - तसेच रजोगुणात्मक कर्म व तमोगुणात्मक अज्ञान ह्याचाही प्रकृतीच्या गुणातच अंतर्भाव समजावा. हीं निराळीं तत्वे नव्हेत. त्याचप्रमाणें गुणात क्षोभ ह्मणजे न्यूनाधिकभाव करणारा कालरूपी ईश्वर. व स्वभाव ह्मणजे प्रथमच जे मायेचे स्वाभाविक स्फुरण, ज्याला सूत्र अथवा महत्तत्त्व ह्मणतात, त्याचाही प्रकृतीतच अतर्भाव होतो (एतावता ज्ञान, कर्म, अज्ञान इत्यादिकाचा प्रकृतीमध्ये अतर्भाव असल्यामुळे कोणत्याही पक्षामध्यें तत्त्वाची वृद्धि होत नाहीं) ॥ १३ ॥ - आता अठ्ठावीस तत्वें कोणती तें सागतो.- पुरुष, प्रकृति, महत्तत्त्व, अहकार, आकाश, वायु, अग्नि, उदक, व पृथ्वी हीं नऊ तत्वें मीं (पूर्वी) सागितली आहेत, ॥ १४ ॥ श्रोत्र (कान), चक्षु, जिव्हा, नासिका, त्वचा, हीं पाच ज्ञानेंद्रियें, वाचा, हस्त, पाद, उपस्थ व गुद ही पाच कर्मेंद्रिये, व ह्या दोहोंना चालक ह्मणून उभयेंद्रियात्मक मन, अशीं, हे उद्धवा, हीं अकरा तत्वें, ॥ १५ ॥ आणि शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गध ह्या पाच विषयाच्या रूपानी परि-

इह सत्व ज्ञानं [प्रकृतेः गुणः], रजः कर्म, तमः अज्ञान उच्यते, गुणव्यतिकर (गुणामध्यें क्षोभ ज्यापासून तो) काल , स्वभाव. च सूत्र एव [एतेषा प्रकृतौ अतर्भाव] ॥ १३ ॥ मे पुरुषः, प्रकृतिः, व्यक्त (महत्तत्व), अहकार , नभ (आकाश), अनिल. (वायु), ज्योतिः (तेज), आप. (उदक), क्षिति. [च] इति नव तत्वानि उक्तानि ॥ १४ ॥

सत्त्वं ज्ञानं रजः कर्म तमो ऽज्ञानमिहोच्यते ॥ गुणव्यतिकरः कालः स्वभावः सूत्रमेव च ॥ १३ ॥

पुरुषः प्रकृतिर्व्यक्तमहंकारो नभो ऽनिलः ॥ ज्योतिरापः क्षितिरिति तत्त्वान्युक्तानि मे नव ॥ १४ ॥

श्रोत्रं त्वग्दर्शनं घ्राणो जिह्वेति ज्ञानशक्तयः ॥ वाक्पाण्युपस्थपाय्वंघ्रिः कर्माण्यंगोभय मनः ॥ १५ ॥

शब्दः स्पर्शो रसो गंधो रूपं चेत्यर्थजातयः ॥ गत्युक्त्युत्सर्गशिल्पानि कर्मायतनसिद्धयः ॥ १६ ॥

अंग, श्रोत्रं, त्वक्, दर्शनं, घ्राणः, जिव्हा इति ज्ञानशक्तयः, वाक्पाण्युपस्थपायु, अंघ्रि [च इति] कर्माणि, उभय मन [एव एकादश] ॥ १५ ॥ शब्दः, स्पर्शः, रसः, गधः, रूप च अर्थजातयः (विषयरूप) [पंच], गत्युक्त्युत्सर्गशिल्पानि (गति, भाषण, मलमूत्रोत्सर्ग व शिल्पकौशल) कर्मायतनसिद्धय (कर्मेंद्रियाचीं फलें) ॥ १६ ॥

१ जसें — चंद्र निश्चळ निज स्वभावें । तोच चाले त्या अभ्रासवें । दिसे जेवी सवेग धावे । तेवी गुणस्वभावे जीवात्मा ॥ नाथ- भावर्ण (दार्ष्टांतिकीज्ञान) हा अभ्राचा गुण असून आपण तो चद्राचा (दार्ष्टांतिकीजीवाचा) गुण असें समजतों.

णाम पावलेलीं पंच महाभूतें व सत्व, रज आणि तम हे तीन गुण, मिळून एकंदर अठ्ठावीस तत्वें झालीं. परंतु गमन, भाषण, उत्सर्ग ह्मणजे मलमूत्रत्याग व कलाकौशल्य अशीं हीं कर्मेंद्रियाचीं फळें आहेत, - ह्मणून हीं अधिक दुसरीं तत्वें नव्हेत. - ॥ १६ ॥ - असे तिन्ही मतांतील तत्वसंख्येचे भेद दाखविले आता ते ते भेद सांगणाराचा तात्पर्यार्थ मागतो '- हे विश्व उत्पन्न करण्याच्या आरंभीं कार्यकारणरूपी (अकरा इंद्रिये व पांच विषय मिळून सोळा कार्यें व महत्तत्त्व अहंकार व पंचमहाभूतें अशी सात कारणे मिळून बनलेली) प्रकृति ही सत्व, रज व तम गुणाच्या योगानें उत्पत्ति, स्थिति व प्रलयात्मक अवस्था धारण करिते. ही प्रकृति जगताचें उपादान कारण (घटाला माती या न्यायानें ,
प्रकृति. कार्यकारणरूपिणी [सती] अस्य सर्गादौ सत्त्वादिभिः गुणैः [सृज्याद्यवस्था] धत्ते अव्यक्तः (परिणाम न पावणारा, निमित्तभूत) पुरुष केवल ईक्षते (पहातो)

सर्गादौ प्रकृतिर्ह्यस्य कार्यकारणरूपिणी ॥ सत्त्वादिभिर्गुणैर्धत्ते पुरुषो ऽव्यक्त ईक्षते ॥ १७ ॥

व्यक्तादयो विकुर्वाणा धातवः पुरुषेक्षया ॥ लब्धवीर्याः सृजंत्यंडं संहताः प्रकृतेर्बलात् ॥ १८ ॥

सप्तैव धातव इति तत्रार्थाः पंच खादयः ॥ ज्ञानमात्मोभयाधारस्ततो देहेंद्रियासवः ॥ १९ ॥

॥ १७ ॥ विकुर्वाणा' व्यक्तादयः (महत्तत्वादिक) धातवः पुरुषेक्षया लब्धवीर्याः संहताः (एकत्र झालेले) [सतः] प्रकृतेः बलात् अंड सृजंति. ॥ १८ ॥ " सप्त एव धातव " आहे ह्मणून ती विकाराला पावते. पुरुष हा निर्विकार, असंग आहे. तो प्रकृतीचें ईक्षण (पाहणें) मात्र करितो. - यामुळें तो जगाचें निमित्त कारण मात्र होतो - ॥ १७ ॥ महत्तत्व, अहंकार इत्यादि तत्वे विकाराला पावतात. पुरुषाच्या (ईश्वराच्या) अवलोकनानें त्यात शक्ति उत्पन्न होते व प्रकृतीच्या आश्रयानें तीं तत्वें एकत्र होऊन ब्रह्मांड उत्पन्न करितात. ॥ १८ ॥ - आता तत्वें सात आहेत ह्मणून जे ह्मटलें आहे त्याचें निरूपण असें - आकाशादि पाच महाभूतें, त्याचा द्रष्टा जीव (हा सहावा) व दृश्य व द्रष्टा या दोहोंनाही आधार जो ईश्वर (तो सातवा). या सातापासून देह, इंद्रियें, प्राण, हीं उत्पन्न होतात - ह्मणून याचा कार्यवाने व प्रकृति, महत्तत्त्व व अहंकार याचा कारण-

१ प्रकृति आणि पुरुष यातील भेद नाथ सांगतात:— जगाचें आदिकारण । प्रकृति होय आपण । प्रकृतिरकारी पुरुष जाण । तो महाकारण या हेतू ॥ प्रकृति व्यक्त पुरुष अव्यक्त । हे विकारी तो विकाररहित । हे गुणमयी गुणभरित । तो गुणातीत निजांगें ॥ प्रकृति स्वभावें चंचल । पुरुष अन्वयत्वें अचल । प्रकृति बहुत्वें सबळ । पुरुष केवळ बंधातीत ॥ प्रकृति स्वभावें सदा शून्य । पुरुष केवळ चैतन्यघन । प्रकृतीस होय अवसान । पुरुष तो जाण अनंत ॥ प्रकृति केवळ निरानंद । याला तैं तेथ विषयछंद । पुरुष पूर्ण परमानंद । विषयकंदछेदक ॥ नाथ, १८० पासून ८४ २ जशी कासवीण हात पाय न हालविता व स्तनपान न करविता केवळ अवलोकनानें पिलाचें पोषण करिते त्याप्रमाणें पुरुषाच्या केवळ ईक्षणानें (पाहण्यानें) प्रकृति सृष्टि करू शकते, ती स्वतः जड असल्यामुळें पुरुषाच्या अवलोकनाशिवाय निचरानें उत्पत्ति वगैरे काही करवत नाहींन

त्यानें पंचमहाभूतात अंतर्भाव समजावा. - ॥ १९ ॥ - आता तत्वें सहा ह्मणतात तीं अशीं - महाभूतें पाच व सहावा ईश्वर तो ईश्वर आपण उत्पन्न केलेल्या पचभूताशी युक्त होऊन हें सर्व ब्रह्मांड उत्पन्न करून त्यात आपण प्रवेश करिता झाला ॥ २० ॥ - आता तत्वे चारच मानिली आहेत ती अशीं आत्म्यापासून जन्मलेली तेज, उदक व पृथ्वी हीं आत्म्यासहवर्तमान चार तत्वें होत. या चार तत्त्वानी ब्रह्मांडरूपी कार्याचें जन्म झालें - नाम, रूप आणि क्रिया एतद्रूपच सृष्टि मुख्यत्वें करून दिसत असल्यामुळे ही दृष्टीला प्रत्यक्ष होणारीं तीन तत्वें व त्यात क्रिया उत्पन्न करणारा चेतन आत्मा, इतक्यानें ह्या सृष्टीची व्यवस्था लागते ह्मणून अशा मताने मुख्य तत्वें चारच ठरविली आहेत - ॥ १९ ॥ "षट्" इति अत्र आपि पच भूतानि, षष्ठ. परः पुमान् आत्मसभूतैः तैः युक्तः [सन्] इद सृष्ट्वा समुपाविशत्. ॥२०॥ चत्वारि एव इति [पक्षे] तत्र अपि तेज आपः, अन्न [च] आत्मनः जातानि [आत्मना सह चत्वारि] तैः अवयविनः (कार्याचें) इद जन्म जात खलु. ॥ २१ ॥ सप्तदशके संख्याने एकमनसा [सह] पच पच भूतमात्रेंद्रियाणि, आत्मा सप्तदशः स्मृत इति [पक्षः] तत्र पच खाद्य. अर्थाः, ज्ञानं (जाणणारा, द्रष्टा, जीव), उभयाधार. आत्मा [च]. तत. देहेंद्रियासव [जायते].

षडित्यत्रापि भूतानि पंच षष्ठः परः पुमान् ॥ तैर्युक्त आत्मसंभूतैः सृष्ट्वेदं समुपाविशत् ॥ २० ॥ चत्वार्येवेति तत्रापि तेज आपो ऽन्नमात्मनः ॥ जातानि तैरिदं जातं जन्मावयविनः खलु ॥ २१ ॥ संख्याने सप्तदशके भूतमात्रेंद्रियाणि च ॥ पंच पंचैकमनसा आत्मा सप्तदशः स्मृतः ॥ २२ ॥ तद्वत्षोडशसंख्याने आत्मैव मन उच्यते ॥ भूतेंद्रियाणि पंचैव मन आत्मा त्रयोदश ॥२३॥

एकादशत्व आत्मा ऽसौ महाभूतेंद्रियाणि च ॥ अष्टौ प्रकृतयश्चैव पुरुषश्च नवेत्यथ ॥ २४ ॥

॥ २२ ॥ तद्वत् षोडशसंख्याने आत्मा एव मन उच्यते. [त्रयोदशपक्षे] पंच एव भूतेंद्रियाणि, मनः, [द्विविध] आत्मा [च एव] त्रयोदश. ॥ २३ ॥ एकादशत्वे असौ आत्मा, महाभूतेंद्रियाणि च. अथ अष्टौ प्रकृतयः, पुरुष. च इति नव. ॥ २४ ॥

॥ २१ ॥ - तत्वाची संख्या सतरा ठरविली आहे ती अशी - महाभूतें पाच, विषय पाच, ज्ञानेंद्रियें पाच, एक मन व सतरावा आत्मा ॥ २२ ॥ त्याचप्रमाणें तत्वाची संख्या सोळा ठरविताना आत्म्याळाच सकल्प विकल्प केल्यानें मन ही संज्ञा येते, - ह्मणून आत्मा व मन ही भिन्न तत्वें नाहीत असे कल्पून वरील सत्रा तत्वात एक तत्त्व उणें करून सोळा तत्वें मानितात. - पाच महाभूतें, पाच इंद्रियें, मन एक आणि आत्मा दोन प्रकारचा (जीव व ईश्वर), अशी तेरा तत्वें कल्पितात - यात पाच विषयाचा पाच महाभूतातच अंतर्भाव करितात. - ॥२३॥ तत्वे अकरा कल्पितात तीं अशी. पाच महाभूते पाच ज्ञानेंद्रियें व एक आत्मा. - यात जीवे व मन याचा आत्म्यातच अतर्भाव करितात - आठ

१ आत्मा व मन हीं भिन्नतत्वें नाहींत आत्मा क्रिया करूं लागला ह्मणजे त्यालाच मन ह्मणतात ह्याचीं उदाहरणें नाथ देतात.— राजा सिंहासनीं बैसला । तो राज्यत्वें पूज्य झाला । वसंत खेळता धाविन्नला । तरी काय मुकला राज्यपदा ॥ जेवीं सागर क्षोभला अति थोर । तरी तो बोलिजे सागर । जो निश्चळ राहिलिया नीर । तरी समुद्र समुद्रत्वे ॥ तेवी मनपणें अति चंचळ । कां आत्मत्वें निज निश्चळ । दोहींपरीं अविकळ । आप केवळ परमात्मा ॥ २०७ पासून ९ (टीप पुढें चालू)

प्रकृति (ह्मणजे प्रकृति, महत्तत्व, अहंकार व पाच महाभूते) व एक पुरुष मिळून तत्त्वें नऊ कल्पितात. - यात इतर सर्व विकाराचा अंतर्भाव करितात - ॥ २४ ॥ - प्रकृति व पुरुष याचा भेद समजावा ह्मणून ऋषींनीं अशा नानाप्रकारानीं तत्त्वाची गणना केली आहे ते सर्व प्रकार सयुक्तिक असल्यामुळें न्यायाला अनुसरूनच आहेत विद्वानाचें कोणतें भाषण अयोग्य आहे बरें ? - कोणतेंच नाहीं - ॥ २५ ॥ - प्रकृति आणि पुरुष याचा भेद तर प्रत्ययास येत नाहीं मग सत्वादि गुण हे प्रकृतीचेच आहेत, आत्म्याचे नव्हेत ही गोष्ट कशी समजावी, असें विचारण्याच्या उद्देशानें - उद्धव ह्मणाला — हे कृष्णा, जरी प्रकृति आणि पुरुष जड व चेतन अशा विभागेंकरून परस्परापासून भिन्न आहेत ही गोष्ट

इति तत्त्वाना नाना प्रसंख्यानं ऋषिभिः कृतं युक्तिमत्त्वात् (युक्तिसिद्ध आहे ह्मणून) सर्वं न्याय्यं. विदुषा अशोभनं किं ? ॥ २५ ॥ उद्धवः उवाच — कृष्ण, प्रकृतिः पुरुषः च उभौ

> इति नाना प्रसंख्यानं तत्त्वानामृषिभिः कृतम् ॥ सर्वं न्याय्यं युक्तिमत्त्वाद्विदुषा किमशोभनम् ॥२५॥ उद्धव उवाच ।
> प्रकृतिः पुरुषश्चोभौ यद्यप्यात्मविलक्षणौ ॥ अन्योऽन्यापाश्रयात्कृष्ण दृश्यते न भिदा तयोः ॥ प्रकृतौ लक्ष्यते ह्यात्मा
> प्रकृतिश्च तथाऽऽत्मनि ॥२६॥ एवं मे पुंडरीकाक्ष महान्तं संशयं हृदि ॥ छेत्तुमर्हसि सर्वज्ञ वचोभिर्नयनैपुणैः ॥ २७ ॥

यदि अपि आत्मविलक्षणौ, [तथा अपि] अन्योन्यापाश्रयात् तयोः भिदा न दृश्यते. प्रकृतौ आत्मा तथा आत्मनि प्रकृतिः च लक्ष्यते ॥२६॥ पुंडरीकाक्ष, सर्वज्ञ, एवं मे हृदि

खरी आहे तथापि ती एकमेकापासून भिन्न रूपानें कोठेंच प्रत्ययास येत नसल्यामुळें त्याचा भेद लक्षात येत नाहीं. प्रकृतीच्या ठिकाणीं आत्म्याचें व आत्म्याच्या ठिकाणीं प्रकृतीचें भान होतें. - ह्मणजे प्रकृतीचें कार्य जो देह तोच आत्मा व आत्मा तोच देह असें भ्रामक ज्ञान उत्पन्न होतें. अहंस्फुरणरूपी चेतन आत्म्याचा देहव्यतिरिक्त कोठें स्वतंत्रपणानें प्रत्यय येत नाहीं यामुळें परस्पराचा भेद समजत नाहीं. - ॥ २६ ॥ हे कमलनयना श्रीकृष्णा, तू सर्वज्ञ आहेस ह्मणून युक्तिकौशल्यानें परिपूर्ण अशा आपल्या भाषणानें तूं माझ्या अंतःकरणातील संशयाचें छेदन करण्यास समर्थ आहेस. ॥ २७ ॥

(मागील टीप पुढें चालू)

-२ अग्नि मन आणि आत्मा हीं तिन्ही एकच झाला हृष्टात नाथानीं दिला आहे·— द्रुति (कोष, पिशवी) मधु (मकरंद) आणि पिंवळा । तीं नावे एक चोखळा । सुवास सुस्वाद सुनीळा । एकत्र मेळा आम्रफळीं ॥ तेवीं जीव शिव आणि मन । तिन्ही एक रूपचि जाण । जेवीं हेममणी सपूर्ण । हेम सूत्रीं स्वज्ञान वोविलीं ॥ २२५ । २६ १ जेवीं उसाची निज गोडी । गूळसाकरेच्या मोडी । तेचि दिसे चढोवढी । तेवीं तत्वपरवडी निज तत्वें ॥ नाथ, २२३ २ प्रकृति व पुरुष एकच भासतात हे ज्ञाने ते पहा — जैसा तप्त लोहाचा गोळ । दिसे अग्नीची केवळ । तेवीं प्रकृतिपुरुषाचा मेळ । दिसे सबळ एकत्वें ॥ गोडी वेगळी साकर होये । परिमळावेगळा कापुर राहे । ते [illegible] वेगळी पाहे । प्रकृति लाहे अव्यक्ती ॥ नाथ, २४९.

तुझ्या कृपेनेंच जीवाना स्वरूपज्ञानाची प्राप्ति होते व तुझ्या मायेच्या शक्तीनेंच त्यांच्या ज्ञानाचा ऱ्हास होतो. - सर्व संशयाचें छेदन करून स्वरूपाचें यथार्थ ज्ञान तुझ्याशिवाय दुसरा कोण देऊं शकेल? कोणीही नाही कारण - तुझ्या मायेचा प्रभाव तूच एक जाणत आहेस इतर कोणासही तो समजत नाही ॥ २८ ॥ - असा उद्धवाने विनयपूर्वक प्रश्न केला असता प्रकृतीला विकारित्व, नानात्व, सापेक्षत्व व जडत्व असून पुरुष तिच्या अगदीं उलट म्हणजे निर्विकार, अद्वितीय, निरपेक्ष व स्वयंप्रकाश असा असल्यामुळें परस्पराच्या अत्यंत भेद आहे असें दर्शविण्याकरिता - भगवान् उद्धवाला म्हणाले — हे उद्धवा, तू पुरुषश्रेष्ठ आहेस प्रकृति आणि पुरुष याचा अत्यंत भेद (दिवसरात्रीप्रमाणे) अ-

महातं संशय नयनैपुणैः (युक्तीमध्ये प्रावीण्य ज्याचें अशा) वचोभिः छेत्तु अर्हसि ॥ २७ ॥ हि त्वत्तः जीवाना ज्ञान ते शक्तित अत्र (ह्या ज्ञानविषयीं) प्रमोष (भ्रंश) च त्वं त्व आत्ममायाया॰ गति वेत्थ अपरः न [वेद]. ॥ २८ ॥ श्रीभगवान् उवाच— पुरुषर्षभ, प्रकृति, पुरुषः च इति विकल्पः. गुणव्यतिकरात्मकः (गुणाच्या क्षोभानें केलेला) एषः सर्गः

त्वत्तो ज्ञानं हि जीवाना प्रमोषस्ते ऽत्र शक्तितः ॥ त्वमेव ह्यात्ममायाया गति वेत्थ न चापरः ॥ २८ ॥ श्रीभगवानुवाच । प्रकृतिः पुरुषश्चेति विकल्पः पुरुषर्षभ ॥ एष वैकारिकः सर्गो गुणव्यतिकरात्मकः ॥ २९ ॥ ममांग माया गुणमय्यनेकधा विकल्पबुद्धीश्च गुणैर्विधत्ते ॥ वैकारिकस्त्रिविधो ऽध्यात्ममेकमथाधिदैवमधिभूतमन्यत् ॥ ३० ॥ दृग्रूपमार्कं वपुरत्र रंध्रे परस्परं सिध्यति यः स्वतः खे ॥

(उत्पन्न केला जाणारा देहादि संघात) वैकारिकः (विकारवान्) ॥ २९ ॥ अंग, गुणमयी मम माया गुणैः अनेकधा विकल्पबुद्धीः विधत्ते. वैकारिक अध्यात्म एक अथ आधिदैव अन्यत् अधिभूतं च [इति] त्रिविधः. ॥ ३० ॥ दृक्, रूपं, अत्र रंध्रे [प्रविष्ट] आर्कं (सूर्याचें) वपु (अंश) [च] परस्परं सिध्यति. यः खे (आकाशात), [सः] स्वत गढी उघड आहे. - तो कसा असें विचारशील तर - प्रकृतीचे कार्य जो हा देह, इंद्रियें, मन, प्राण इत्यादिकाचा संघात (समुदाय) दिसत आहे तो त्रिगुणाच्या मिश्रणापासून उत्पन्न झाला असल्याकारणानें वृद्धि, क्षय, नाश इत्यादि विकारानीं पूर्ण भरला आहे ॥२९॥ - प्रकृतीचे नानात्व कसें आहे तें सांगतों - हे उद्धवा, माझी त्रिगुणात्मक माया ही नानाप्रकारचे भेद व भेदबुद्धि आपल्या गुणाच्या योगानें उत्पन्न करिते - ते भेद कोणते म्हणशील तर - हा विकारी कार्यवर्ग केवळ स्थूलरूपानेंच पाहिला तर अध्यात्म अधिभूत आणि अधिदैव अशा तीन प्रकारचा दिसतो. ॥ ३० ॥ - ती तीन रूपें (प्रकार) नेत्रेंद्रियाचा दृष्टान्त घेऊन दाखवितों - नेत्रेंद्रिय (अध्यात्म), रूप (अधिभूत) व नेत्रें-

---

१ प्रकृति पुरुष हे दोन्ही । सदा अत्यंत वेगळेपणीं । जैसा दिवस आणि रजनी । एक लोपोनी एकु प्रबळे ॥ दिवस लोपताची जाण । अंधकारेसी परिपूर्ण । येऊनिया तारागण । रात्री आपण उल्हासे ॥ तेवीं लोपता पुरुषाचें भान । घेऊनी कार्येसीं (देहादिकासीं) कारणगुण (सत्वरज इ०) । ज्ञानाज्ञानेंसीं परिपूर्ण । प्रकृति जाण थोरवे ॥ नाथ, २८० पासून २८२ २ गगनीं गंधर्वनगर जाण । माझ्या गोपुरें घन उपवन । दिसे तैशी प्रकृति आपण । नानाकारें जाण भासत ॥ नाथ, २८८.

द्रियांत प्रविष्ट झालेल्या सूर्यप्रकाश (अधिदैव) हीं तिन्ही जेव्हां असतील तेव्हां परस्परांची सिद्धि होते, यांपैकीं एकाचा अभाव झाला की दुसरीं दोन्ही सिद्ध होत नाहींत -- ह्मणजे नेत्र व त्याचा विषय (रूप) आहे पण प्रकाश नाही तर रूपदर्शन नाहीं -- पक्ष कीं ह्या त्रिपुटीपैकीं एक जर नसेल तर नेत्राचें कार्य जें रूपदर्शन तें सिद्ध होत नाहीं. अशी दुसऱ्याच्या साहाय्यावाचून एकाची देखील स्वतंत्र सिद्धि होत नाही - परंतु आकाशा- तसेच (अंधाळा) रूप व सूर्यप्रकाश आहेत पण डोळाच नाहीं तरही रूपदर्शन नाही. -- तील सूर्याला आपल्या सिद्धीसाठीं कोणाचीच अपेक्षा असत नाही तो स्वयंप्रकाश असून आपल्या प्रकाशानें सर्वांच्या नेत्रदेवतेला प्रकाश करितो व स्वत - अलिप्त असतो. तसा चेतन आत्मा अध्यात्मादि सर्व त्रिपुटींचें आदिकारण असून आपल्या चिद्रूपानें सर्व सिद्धींची सिद्धि करणारा सर्वप्रकाशक एक अलिप्त आहे. - त्रिपुट्यादि जड कार्यांची सिद्धि [सिध्यति]. यत् सः आत्मा, [सः] एषा आद्यः, अपरः (वेगळा), स्वया अनुभूत्या अखिलसिद्धसिद्धिः (सकल परस्परप्रकाशक पदार्थांचा प्रकाशक) [च. यथा] चक्षु, एवं

आत्मा यदेषामपरो य आद्यः स्वया ऽनुभूत्या ऽखिलसिद्धसिद्धिः ॥ एवं त्वगादिश्रवणादिचक्षुर्जिह्वादि

नासादि च चित्तयुक्तम् ॥ ३१ ॥ यो ऽसौ गुणक्षोभकृतो विकारः प्रधानमूलान्महतः प्रसूतः ॥

त्वगादि, श्रवणादि, जिह्वादि, नासादि चित्तयुक्तं [अंतःकरणाश्रितर्थ] च. ॥ ३१ ॥ य. गुणक्षोभकृत. विकारः प्रधानमूलात् महत प्रसूत, असौ वैकारिक (सात्विक), झाली हें चेतन आत्मा नसेल तर कोण ठरविणार? परंतु जड वस्तु असोत किंवा नसोत. चेतन आत्म्याला आता मी आहें किंवा नाहीं असा मुळीं कधीं संशय पडत नाही ह्मणू आत्मा स्वतःसिद्ध आहे. त्याच्या सिद्धीला कोणत्याही प्रमाणाची अपेक्षा नाही. - वर जशी नेत्रेंद्रियात त्रिपुटीची व्यवस्था दाखविली तशीच त्वचा, कर्ण जिव्हा, नासा इत्यादि सर्व इंद्रियात व मन, बुद्धि, चित्त, अहंकार यात समजावी ह्मणजे त्वचा (इंद्रिय, अध्यात्म), वायु (अधिदैव) व स्पर्श (विषय, अधिभूत) इत्यादि ॥ ३० ॥ - अहंकारापासूनच जन्ममरणरूपी संसार उत्पन्न झाला व अहंकाराच्या निवृत्तीनेंच तो नाहींसा होईल पहा. - महत्तत्त्वाचें उपादान कारण प्रकृति आहे. त्या महत्तत्त्वापासून

---

१ अध्यात्म, अधिभूत आणि अधिदैव ह्याना त्रिपुटी ह्मटलें आहे, व ह्या तिहींला एकमेकांची अपेक्षा असते २ ह्याना चित्तचतुष्टय ह्मटलें आहे हीं सर्व एकाचींच नावें त्याच्या निरनिराळ्या व्यापारावरून पडलीं आहेत:— चित्तचतुष्टयचमत्कार । मन बुद्धि चित्त अहंकार । हीं एकचिपरि भिन्न प्रकार । जैसा व्यापार तैसें नांव ॥ केवळ देहाकारें मीपण । तें सबळ अहंकार जाण । संकल्प विकल्प जे गहन । तेंची मन उद्धवा ॥ गत भोगाचें जें चिंतन । तें चित्ताचें लक्षण । केवळ निश्चयात्मक जाण । बुद्धि स्पष्ट ती नांव ॥३५०।५१।५२. ३ ह्या ठिकाणीं नाथ अहंकाराचें लक्षण सांगतात — स्वस्वरूपातें विसरून । दृढ जें स्फुरे मीपण । तोची अहंकार जाण । त्रिगुणात्मक ॥ ४ संसार ह्मणजे काय? जाणीवीचा जो विसरू । तोची स्वप्नसृष्टीचा विस्तारू । विस्तु (परमेश्वर) विमुख जो अहंकारु । तोची संसार गुणात्मक ॥ नाथ, ३७५ । ७६

गुणक्षोभ करणाऱ्या कालरूपी ईश्वराच्या निमित्तानें अहंकार उत्पन्न झाला तो सात्विक, तामस व राजस, असा तीन प्रकारचा असून तो मोहं उत्पन्न करणाऱ्या भेदबुद्धीचे कारण आहे ॥ ३२ ॥ - भेदबुद्धि (किंवा अहंकार) स्वरूपाच्या केवळ विस्मरणानें उत्पन्न झाली असल्याळें ती स्वरूपज्ञानाशिवाय शांत होणार नाहीं; - आत्मा शुद्ध चिन्मात्र आहे ही गोष्ट न समजल्यामुळे प्रकृतीहून (देहाहून) आत्मा भिन्न आहे किंवा अभिन्न आहे अशी भेदबुद्धि (किंवा अहंकार) वरून मतवादी व्यर्थ वाद करितात भेदवाद भ्रांतिमूलक अगदीं मिथ्या आहे खरा, - तथापि त्याच्या निवृत्तीकरिता सांख्ययोगादि साधनाची अपेक्षा आहे कारण, - स्वस्वरूपभूत माझ्या विस्मरणानें अत्यंत बहिर्मुख तामसः, ऐंद्रिय. (राजस) च त्रिवृत् अहं (अहंकार) मोहविकल्पहेतु ॥ ३२ ॥ "अस्ति" इति "नास्ति" इति [च] विवाद भिदार्थनिष्ठ [अपि] आत्माऽपरिज्ञानमयः [एव. अयं] व्यर्थः अपि स्वलोकात् (स्वस्वरूपभूत) मत्त पराङ्मुखधियां (परतल्या बुद्धि ज्याच्या, बहिर्मुख, अशा) पुंसां न एव उपरमेत ॥ ३३ ॥ उद्धव उवाच—

अहं त्रिवृन्मोहविकल्पहेतुर्वैकारिकस्तामस ऐंद्रियश्च ॥३२॥ आत्मापरिज्ञानमयो विवादो ह्यस्तीति नास्तीति भिदार्थनिष्ठः ॥ व्यर्थोऽपि नैवोपरमेत पुंसां मत्तः परावृत्तधियां स्वलोकात् ॥ ३३ ॥ उद्धव उवाच । त्वत्त. परावृत्तधियः स्वकृतै. कर्मभिः प्रभो ॥ उच्चावचान्यथा देहान् गृह्णंति विसृजंति च ॥३४॥ तन्ममाख्याहि गोविंद दुर्विभाव्यमनात्मभिः ॥ न ह्येतत्प्रायशो लोके विद्वांसः संति वंचिताः ॥३५॥

प्रभो, स्वकृतैः कर्मभि त्वत्त. परावृत्तधिय यथा उच्चावचान् देहान् गृण्हन्ति, विसृजति [च], ॥ ३४ ॥ गोविंद, अनात्मभि. दुर्विभाव्य तत् मम आख्याहि. लोके प्राय. (म्हणजे विषयासक्त) झालेल्या लोकांची भेदबुद्धि (या साधनाशिवाय) शांत होत नाहीं, - तर ते आपल्या भेदयुक्त केलेल्या कर्मांनीं उच्च नीच योनींत जन्ममृत्युप्रवाहरूपी संसार भोगीत फिरतात - ॥ ३३ ॥ उद्धव म्हणाला — हे भगवन्, ज्या प्राण्याची बुद्धि स्वत केलेल्या कर्मांमुळें तुझ्या स्वरूपापासून पराङ्मुख झाली आहे ते उच्च नीच योनींत देह कसे धरितात व कसे सोडितात? (प्रश्नाचा भाव असा की सदा सर्वव्यापक, अचल निराकार आत्म्याला एका देहातून दुसऱ्या देहात जाणें कसें संभवतें? त्याच्या हातून कर्में कशीं घडतात? व त्याला जन्म मृत्यु कसे येतात?) ॥ ३४ ॥ हे गोविंदा, तें सर्व मला सांग आम्ही मंदमतीचे असल्यामुळें आम्हास हा (सर्व मायाविलास) अतर्क्य आहे

१ विकारे क्षोभती तिन्ही गुण । हे विस्मरण मोहाचें लक्षण । तेणें विकारले तीन गुण । ते विकार भिन्न अवधारी ॥ ३७७

२ आत्मा प्रकृतीहून अगदीं भिन्न आहे याचें उदाहरण नाथ देतात — जेवीं कृष्ण पीत रक्त श्वेत । स्फटिक ठेविता तेथ तेथ । जरी तदाकार भासत । तरी तो जाणे शुद्धत्वें ॥ तैसा गुणसंगे जीवात्मा बद्ध । दिसे तरी तो अतिशुद्ध । हा नेणोनियां निजबोध । करिती विवाद मतवादी ॥ नाथ, ३८६ । ८७

३ दुसऱ्या देहात जाणें येणें वगैरे उद्धवाचे मतानें संभवत नाहीं याचीं उदाहरणें नाथ देतात — पृथ्वी रुसोनि ओसरी (दूर) राहे । आकाश पळोनि पल्हा (पलिकडे) जाये । तें देहींचा देहांतर पाहे । आत्मा लाहे संसरण ॥ कारण, आत्म्यावेगळें कांहीं । रितें ठाव उरलें नाहीं । तरी ये देहींचा ते देहीं । गमन लिंगी पाहीं कैसेनी ॥ ४०१।१०

हें जाणणारे जन बहुश' कोणी नाहींतच. कारण, सर्व तुझ्या मायेनें मोहित झाले आहेत. ॥ ३५ ॥ - लिंगदेहाच्या अध्यासानें आत्म्याला जाणें येणें जन्ममरणादि सर्व काही आहेसें दिसतें पण वस्तुत' तें मुळींच नाहीं असें दाखविण्याकरितां - श्रीभगवान् ह्मणाले'— पाच इंद्रियांशी सहवर्तमान मन (ह्मणजे लिंगदेह) हें कर्माच्या अधीन असल्यामुळें ते वासनेच्या योगानें एका देहांतून दुसऱ्या देहात जातें. असंग, अचल आत्मा त्या मनाहून भिन्न असूनही त्याच्यामागून जातोसा दिसतो, ह्मणजे त्या लिंगदेहाच्या अभिमानानें (लिंगदेहच मी असा अभिमान धरून) आपण जातों येतों असें तो मानितो. - जसें आकाश अचल परिपूर्ण असूनही घटाच्या जाण्यायेण्यानें घटांतील आकाशही त्या घटाबरोबर जातें येतेंसें दिसतें तसे. वस्तुतः तें हालतच नाहीं. - (येथें लिंगदेह मुख्य पाच इंद्रियें व एक मन मिळून महा तत्वाचा सांगितला आहे त्यांत इतर इंद्रियांचा व प्राणाचा अन्तर्भाव

श' एतत् विद्वांसः न सन्ति. हि [मायया] वंचिताः. ॥ ३५ ॥ श्रीभगवान् उवाच— नृणां पंचभिः इंद्रियैः युतं कर्ममयं मनः लोकात् लोकं प्रयाति अन्यः आत्मा तत् (त्या मनास) अनुवर्तते (अहंकारानें अनुसरतो). ॥ ३६ ॥ कर्मतंत्रं मनः दृष्टान् अथ अनुश्रुतान् वा विषयान् अनुध्यायत् [सत् ध्यायमानेषु विषयेषु] उद्यत् (प्राप्त होणारें) [पूर्वदेहेषु

श्रीभगवानुवाच । मनः कर्ममयं नृणामिंद्रियैः पंचभिर्युतम् ॥ लोकाल्लोकं प्रयात्यन्य आत्मा तदनुवर्तते ॥ ३६ ॥

ध्यायन्मनो ऽनु विषयान्दृष्टान्वा ऽनुश्रुतानथ ॥ उद्यत्सीदत्कर्मतंत्रं स्मृतिस्तदनुशाम्यति ॥ ३७ ॥

च] सीदत् (लय पावणारें) [भवति]. तदनु स्मृतिः शाम्यति. (नाहींशी होते). ॥ ३७ ॥

करून दहा इंद्रियें, पाच प्राण व एक मन मिळून षोडशकलात्मक लिंगदेह समजावा). ॥ ३६ ॥ - मनाला तरी पूर्व देहाचे प्रारब्ध भोग भोगून संपल्यानंतर त्या देहाचे स्मरण सुटल्यानें व संचिताप्रमाणें पुढें प्राप्त झालेल्या देहाचें स्मरण झाल्यामुळें पूर्व देह सुटून दुसरा देह मिळतो पहा - मन हें स्वकर्मानें बद्ध झालें आहे. अन्तकाळी त्याच्या बऱ्या वाईट कर्मांप्रमाणें त्याच्यापुढें प्राप्त झालेल्या दृष्ट किंवा श्रुत विषयाचें ध्यान करीत असता तदाकार होऊन त्यापुढें प्राप्त झालेल्या देहात ते मन प्रवेश करितें, व पर्वीचा देहें सुटतो तरी पूर्व देह सुटला व दुसरा धरिला हें त्यास काहींच स्मरण रहात नाही. - अन्तकाळीं देहाचें स्मरण सुटत चाललें ह्मणजे मनाला ज्या विषयाची अनिवृत्ति, अनिष्टत्व किंवा अनिन्द्य

१ नाथ नीही हाच दृष्टांत घेतला आहे .—

घट जेथ जेथ हिंडों बैसे । आकाश त्यासवें जात दिसे । परि ढळणें नाहीं आकाशें । आत्म्याचें तैसें गमन येथ ॥ ८२५

घट फुटोनी जेथ नाशे । तेथ आकाश आकाशीं सहज असे । नवा घट जेथ उपजों बैसे । तो तेथ आकाशें व्यापिजे ॥ ४२८

२ हें कसें होतें ह्याचा नाथ दृष्टांत देतात :— तैंचि विस्मरण कैसें । निज बाळत्वें प्रौढ वयसें । किशोर नाठवे मानसें । पूर्व देह तैसें विसरोनी जाय ॥ नाथ, ४३७

असेल तोच पुढें दिसूं लागतो व त्या स्मृतीच्या अनुरूप जन्म येतो. ह्मणजे मरणानंतर मनुष्ययोनींत अथवा अनेक पश्वादि जीवाच्या योनींत जन्मास येऊन ज्या ज्या विष-
याचें ध्यान करून देही पूर्वी मरतो त्या त्या विषयाचा भोक्ता, अथवा त्या विषयाचें उत्पादनकर्ता, अथवा त्या विषयाचा भारवाहता, अथवा त्या विषयाची चिंता करणारा
अथवा तो विषय ज्या जीवात आहे त्या जीवाप्रमाणें तद्रूपता धारण करणारा असा होतो. - ॥ ३७ ॥ प्राण्याला अंतकाळीं कर्मानें त्याच्या पुढें प्राप्त झालेल्या देवादिकांच्या श
रीरासारख्या शरीराशीं अति प्रीतीमुळें तादात्म्य ह्मणजे त्या शरीराची आकारता प्राप्त होते, किंवा यातनादेहाशीं भयशोकामुळें तादात्म्य होतें. या तादात्म्यामुळेंच त्याला पूर्व
शरीराचें विस्मरण होऊन त्याचा अभिमान अगदी सुटतो जीवाच्या अशा स्मरण सुटण्यालाच त्याचा मृत्यु झाला असें ह्मणतात वस्तुत देहाच्या नाशासारखा जीवाचा नाश होत
नाहीं. - भयप्रीत्यादिकें करून तत्तदाकारता कशी प्राप्त होते यास दृष्टांत, कीटकीला वारंवार येऊन टोंचणाऱ्या भृंगाचें अतिभीतीमुळें ध्यान लागल्यानें ती भृंगरूप होऊन उ-
विषयाभिनिवेशेन आत्मानं पुनः न स्मरेत् [इति] यत्, [सा एव] कस्यचित् हेतोः अत्यंतविस्मृतिः जंतोः मृत्युः उच्यते. ॥ ३८ ॥ भूरिद, यथा स्वप्नमनोरथः, [तथा]

विषयाभिनिवेशेन नाऽऽत्मानं यत्स्मरेत्पुनः ॥ जंतोर्वै कस्यचिद्धेतोर्मृत्युरत्यंतविस्मृतिः ॥३८॥ जन्म त्वात्मतया पुंसः सर्वभावेन भूरिद ॥
विषयस्वीकृतिं प्राहुर्यथा स्वप्नमनोरथः ॥३९॥ स्वप्नं मनोरथं चेत्थं प्राक्तनं न स्मरत्यसौ ॥ तत्र पूर्वमिवाऽऽत्मानमपूर्वं चानुपश्यति॥४०॥

सर्वभावेन आत्मतया विषयस्वीकृतिं जन्म प्राहुः. ॥ ३९ ॥ इत्थं असौ प्राक्तनं स्वप्नं, मनोरथं च न स्मरति, तत्र पूर्वं आत्मानं अपूर्वं इव अनुपश्यति ॥ ४० ॥
डून जाते. भरतराजाला अंतकाळीं मृगाचा शोक लागल्यामुळें मृगाचें जन्म आलें. पौंड्राला श्रीकृष्णाशीं अतिद्वेष केल्यामुळें अंतकाळीं कृष्णस्वरूपच प्राप्त झालें. - ॥ ३८ ॥ हे
उद्धवा, जीवाला जन्म येणें याचा अर्थ त्या जीवानें स्वप्न किंवा मनोराज्य याप्रमाणे दुसऱ्या देहाशीं तादात्म्य करणें ह्मणजे तो देहच मी असें समजून त्याचा अभेदानें स्वीकार
करणें हें होय. - ह्मणून जन्माच्या वेळेस देहासारखी जीवाची उत्पत्ति होत नाहीं मोठा राजा देखील स्वप्नात दरिद्री होऊन दुःख भोगितो तेव्हा जागृतींतील माझें राज्यपद होतें
तें आता गेलें असें त्यास कांहींच स्मरत नाहीं मी मूळचा दरिद्रीच आहें असें त्यास वाटतें तसेंच मनोराज्यात अतिदरिद्री देखील आपणास सार्वभौम समजून अधिकाराच्या
बळानें मनानेंच प्रमाद करूं लागतो त्याचा परिणाम जागृत शरीरावर होऊन कधींकधीं फार नुकसान होतें - ॥ ३९ ॥ स्वप्नात किंवा मनोराज्यात असणाऱ्या पुरुषाला आपला

१ जन्म आणि मरण ह्या शब्दाचा अर्थ करतात — मजूर राउळीचें (देवळातील, राजवाड्यातील) घृत नेता । ता तुरंगीं चढे मनोरथा । मन नाचूं लागे उल्हासता । स्वकल्पिता कल्पना ॥ वेंरी
सबळ वारूचें उड्डाण । ह्मणुनि उडूं जाता आपण । पडोनी घृतकुंभु होय भग्न । पुसती जन काय झालें ॥ बळें उडाला माझा घोडा । परि स्मरेना तो फुटला घडा । वेंरी
पडला रोकडा । नेणे बापुडा मनोरथें ॥ येथवरी तीव्र जें विस्मरण । त्या नाव देहाचें मरण । अति उद्यत जें मनाचें ध्यान । तेंची जन्म प्राण्यांसी ॥ नाथ, ४५२ पासून ५५
२ पुत्रादिकांचा करितों सर्वा केवळ अतिप्रेमामुळें मळे.

पूर्व देह स्मरत नाहीं तो पूर्वसिद्ध असूनही त्या अवस्थेंत मी नवीनच उत्पन्न झालों आहें असें समजतो. ॥ ४० ॥ मन हें इंद्रियाचें रहाण्याचे स्थान आहे. त्या मनानें अन्यदेहाशीं ऐक्य मानिल्यामें आत्म्याच्याठिकाणीं उत्तम मध्यम नीच असे देहाच्या अभिमानानें तीन प्रकार भासतात ज्या पुरुषाला दुष्ट पुत्र होतो त्याची सर्वांचे ठिकाणीं समबुद्धि असली तरी पुत्राच्या मित्राशीं मित्रबुद्धि व शत्रूशीं शत्रुबुद्धि अशी त्याची भेदबुद्धि होते तशी बाहेरचे विषय व आतलीं सुखदुःखादि अशी आत बाहेर भेददृष्टि आत्म्याच्या ठिकाणीं मनामुळें उत्पन्न होते. ॥ ४१॥ - आता सूक्ष्मरूपानें देहाला नित्य जन्म मृत्यु कसे आहेत तें सांगतों - हे उद्धवा, शरीराला जन्म व मृत्यु हे प्रत्येक क्षणाला होत असतात - कालाची गति सूक्ष्म इंद्रियायनसृष्ट्या (इंद्रियांचा आधार जें मन त्याची अन्य देहाच्या अभिमानानें जी सृष्टि तिनें) वस्तुनि इदं त्रैविध्यं भाति. यथा असज्जनकृत् (दुष्टपुत्राचा जनक) जनः. [तथा आत्मा] बहिरंतर्भिदाहेतुः [भवति]. ॥४१॥ अंग, अलक्ष्यवेगेन (नाहीं लक्ष्यांत येण्याजोगा वेग ज्याचा अशा) कालेन नित्यदा भूतानि भवन्ति, न भवन्ति (नाहींशीं होतात) च. सूक्ष्मत्वात् तत् न दृश्यते

> इंद्रियायनसृष्ट्येदं त्रैविध्यं भाति वस्तुनि ॥ बहिरंतर्भिदाहेतुर्जनो ऽसज्जनकृद्यथा ॥ ४१ ॥
> नित्यदा ह्यंग भूतानि भवंति नभवंति च ॥ कालेनालक्ष्यवेगेन सूक्ष्मत्वात्तन्न दृश्यते ॥ ४२ ॥
> यथा ऽर्चिषां स्रोतसां च फलानां वा वनस्पतेः ॥ तथैव सर्वभूतानां वयोऽवस्थादयः कृताः ॥ ४३ ॥
> सो ऽयं दीपो ऽर्चिषा यद्वत्स्रोतसा तदिदं जलम् ॥ सो ऽयं पुमानिति नृणां मृषा गीर्धीर्मृषायुषाम् ॥ ४४ ॥

॥४२॥ यथा अर्चिषां (ज्वालांचे), स्रोतसां (प्रवाहाचे), वनस्पतेः फलानां च, तथा एव सर्वभूतानां वयोवस्थादयः कृताः ॥४३॥ यद्वत् अर्चिषा 'स अयं दीपः' [इति, तथा च] स्रोतसा "तत् इदं जलं" [इति प्रत्यभिज्ञा, तथा] मृषायुषां (निरर्थक आयुष्य ज्यांचें त्या अविवेकी) नृणां "स अयं पुमान्" इति गीः (वचन) धीः [च] मृषा ॥ ४४ ॥

असल्यामुळें त्यानें केलेले हे जन्ममृत्यु अविवेकी पुरुषाच्या लक्ष्यांत येत नाहींत. ॥ ४२ ॥ जशी दिव्याच्या ज्योतीला नी एकसारखी परिणाम पावत असल्यानें, नदीच्या उदकाला त्याच्या एकसारख्या गमनानें व वनस्पतीच्या फळाला त्याचें रूप वारंवार बदलत असल्यानें क्षणोक्षणीं भिन्न अवस्था प्राप्त होत असते, त्याच अनुमानानें सर्व प्राण्याच्या शरीरांना काळाच्या अदृष्ट-गतीनें क्षणोक्षणीं बाल्य, यौवन, तेज, बळ, इत्यादि प्रकारानीं त्याच्या पूर्व अवस्थेचा नाश होऊन दुसरी अवस्था प्राप्त होत असते. ॥ ४३ ॥ दिव्याच्या ज्योती जरी क्षणोक्षणी बदलत असतात तरी त्याच्या सारखेपणामुळें पूर्वीची जी ज्योत तीच ही असें वाटतें नदीच्या एकमार्गाच्या प्रवाहामुळें पूर्वींचें जें उदक तेंच हें असें

१ हें कसें होतें ह्याचा दृष्टांत नाथ देतात.— निजमाता बाळवयसीं । प्रकटावयवीं लाडवी पुत्रासी । तेचि माता प्रौढवयेसी । होय त्या पुत्रा सलज्ज । ते बालावस्था काळें नेली । हे प्रौढवयसा नवी आली । यालागीं माता सलज्ज झाली । हे काळें केली घडमोडी ॥ नाथ. ४८० पासून ८१

मासतें. तसें प्रतिक्षणीं देहाची अवस्था बदलत असून पूर्वीचा जो तोच हा पुरुष असें अविवेकी जनांचें मिथ्या भाषण व भलताच समज असतो. ॥ ४४ ॥ ० 'देहात्मवाद्याला (देहच मी असें समजणाराला) कर्म, जन्म, मरण हीं आहेत, इतरास नाहींत हें कसें? एकाच घटाला एक मनुष्य तो घट आहे व दुसरा तो नाहीं असें कसें म्हणू शकेल?' अशी कोणी शंका घेईल तर तिचें उत्तर सागतों :- वस्तुतः अज्ञानी पुरुषाला (जीवाला) देखील आपल्या कर्माप्रमाणें जन्म मृत्यु येत नाहींत. जसें पंचमहाभूतांपैकीं अग्नि हा जरी कल्प संपेपर्यंत राहणारा आहे तथापि काष्ठाच्या संयोगानें तो उत्पन्न होतो व वियोगानें नाश (मृत्यु) पावतो असें आपणास भ्रांतीनें वाटतें तसें आत्मा अजन्मा व अमर असूनही देहाच्या संयोगवियोगामुळें त्याचा जन्म व मृत्यु झाला असें जें वाटतें ती केवळ भ्रांति होय. ॥४५॥ देहाच्या अवस्था किती त्या सागतात - १ निषेक (पित्याच्या देहात रेतोरूप होऊन तेथून मातेच्या उदरात प्रवेश), २ गर्भ (तेथें वृद्धि वाढणें), ३ जन्म (उदरातून बाहेर येणें), ४ (वयाच्या पाच वर्षें पर्यंत) बाल्यावस्था, ५ (सोळा वर्षें पर्यंत) कुमार अवस्था, ६ (पन्नास वर्षें पर्यंत) तारुण्य, ७ (साठ वर्षें पर्यंत) वयोमध्यमा, ८ जरा, ९ मृत्यु, अशा देहाच्या नऊ अवस्था आहेत ॥ ४६ ॥ ह्या लहान मोठ्या सर्व अवस्था देहाच्या आहेत (आत्म्याच्या नव्हेत). त्या मनाच्या संकल्पापासून उत्पन्न होतात व त्रिगुणाच्या संगामुळें (अज्ञानामुळें) जीव त्या आपल्या आहेत असें मानितो कदाचित्- ईश्वराच्या कृपेनें एखाद्या पुरुषाला विवेकाच्या बळानें ज्ञान झालें कीं आत्मा देहाचा द्रष्टा असल्यामुळें त्याला ह्या अवस्थाचा मुळींच संग नाहीं तर - तो त्याचा त्याग करितो (देहात्मबुद्धि सोडून अलिप्त राहतो). ॥ ४७ ॥

सः अपि पुमान् स्वस्य कर्मबीजेन मा जायते, म्रियते वा यथा दारुसंयुतः (काष्ठयुक्त) अग्निः, [तथा] अयं [अजन्मा अपि जायते इव] अमरः [अपि म्रियते इव]. ॥४५॥

मा स्वस्य कर्मबीजेन जायते सो ऽप्ययं पुमान् ॥ म्रियते वा ऽमरो भ्रात्या यथा ऽग्निर्दारुसंयुतः ॥४५॥

निषेकगर्भजन्मानि वाल्यकौमारयौवनम् ॥ वयोमध्यं जरा मृत्युरित्यवस्थास्तनोर्नव ॥ ४६ ॥ एता

मनोरथमयीर्ह्यन्यस्योच्चावचास्तनूः ॥ गुणसंगादुपादत्ते क्वचित्कश्चिज्जहाति च ॥ ४७ ॥

तनोः निषेकगर्भजन्मानि (निषेक म्ह० मातेच्या उदरीं प्रवेश), बाल्यकौमारयौवनं, वयोमध्य, जरा, मृत्युः [च] इति नव अवस्थाः. ॥ ४६ ॥ एता मनोरथमयी उच्चावचाः अ-

१ जैसा मिथ्या बाहुलाचा भेवो । बाळकें सत्य मानिला पहाहो । तैसा मृषा (खोटा) काल्पनिक देहो । सत्यत्वें पहाहो मानिला ॥ ५०३.

२ आत्मा अलिप्त कसा रहातो ह्याचा नाथ दृष्टांत देतात :—

झालिया सूर्यकिरण प्राप्त । जेवीं अग्नि स्रवे सूर्यकांत । तेथें याग का दाह होत । त्या कर्मानीत सूर्य जैसा ॥ नाथ, ५९५.

- आपल्या जन्माच्या व मृत्यूच्या वेळेस देहाचें जन्ममरण आपल्या प्रत्ययास येत नाहीं ह्मणून-पित्याच्या देहाचा मृत्यु व पुत्राच्या देहाचा जन्म पाहून आपल्या देहाच्या जन्म [illegible]चें अनुमान करावें. पित्याच्या आत्म्याचा मृत्यू किंवा पुत्राच्या आत्म्याचें जन्म कधींही आपल्या दृष्टीस पडत नाहीं. यावरून आत्मा जन्ममरणधर्मी जे देह त्याचा द्रष्टा जन्मल्या-मुळें तो स्वत कधींही जन्ममरणवान् होणार नाहीं. ॥ ४८ ॥ - ह्याला दृष्टांत असा - वृक्षाची बीजापासून उत्पत्ति व छेदनादिकेंकरून नाश पाहणारा जसा त्या वृक्षाहून अ-मर्दी भिन्न असतो त्याच न्यायानें देहाचा द्रष्टा (देहाचें जन्ममरण पाहणारा) आत्मा देहांत असूनही भिन्न लक्षणाचा विदेही आहे (देहाचे जन्ममरणादि धर्म त्यास स्पर्श [illegible] न्यस्य (देहाच्या) तनूः (अवस्था) गुणसंगात् उपादत्ते काश्चित् कश्चित् जहाति (सोडून देतो) च. ॥४७॥ आत्मनः भवाप्ययौ पितृपुत्राभ्यां अनुमेयौ। भवाप्ययवस्तूनां [illegible] (द्रष्टा) द्वयलक्षणः (तीं दोन्ही ह्म० उत्पत्ति व नाश हे धर्म ज्याचे असा) न [भवति]. ॥ ४८ ॥ यः बीजविपाकाभ्यां (विपाक ह्म० शेवटला परिणाम किंवा नाश) तरोः जन्मसंयमौ विद्वान्,

आत्मनः पितृपुत्राभ्यामनुमेयौ भवाप्ययौ ॥ न भवाप्ययवस्तूनामभिज्ञो द्वयलक्षणः ॥ ४८ ॥
तरोर्बीजविपाकाभ्यां यो विद्वान् जन्मसंयमौ ॥ तरोर्विलक्षणो द्रष्टा एवं द्रष्टा तनोः पृथक् ॥ ४९ ॥
प्रकृतेरेवमात्मानमविविच्याबुधः पुमान् ॥ तत्त्वेन स्पर्शसंमूढः संसारं प्रतिपद्यते ॥ ५० ॥
सत्त्वसंगादृषीन्देवान्रजसा सुरमानुषान् ॥ तमसा भूततिर्यक्त्वं भ्रामितो याति कर्मभिः ॥ ५१ ॥

[सः] द्रष्टा [यथा] तरोः विलक्षणः, एवं तनोः द्रष्टा [ततः] पृथक्. ॥ ४९ ॥ एवं अबुधः पुमान् प्रकृतेः आत्मानं तत्त्वेन अविविच्य स्पर्शसंमूढः (विषय वर मोहित) [सन्] संसारं प्रतिपद्यते. ॥ ५० ॥ कर्मभिः भ्रामितः [सन्] सत्त्वसंगात् ऋषीन्, देवान् [च] रजसा असुरमानुषान्. तमसा भूततिर्यक्त्वं याति [illegible] ॥ करूं शकत नाहींत). ॥ ४९ ॥ अशा यथार्थ दृष्टीनें प्रकृति आणि पुरुष यांच्या भिन्नत्वाचें विवेचन न केल्यामुळें अज्ञानी विषयासक्त होतो व जन्ममरणरूपी संसाराला [illegible] होतो. ॥ ५० ॥- देहाभिमानानें केलेल्या - नानाप्रकारच्या कर्मांनीं नानाप्रकारच्या योनीत तो भ्रमण करीत असतो सत्वगुणाच्या संगानें ह्मणजे सात्विक कर्में केल्यानें ऋषींच्या किंवा देवांच्या जन्माला जातो. राजसकर्मांच्या आचरणानें दैत्य किंवा मनुष्य योनींत उत्पन्न होतो. तामस कर्में केल्यानें भूतयोनींत किंवा पशुपक्षीवृक्षपाषाणादि तिर्यग्योनींत जन्म घेतो. ॥ ५१ ॥

१ ह्याचें नाथ उदाहरण देतात :—
घटीं काळविल्या अंजन । तरी तें काळें होय जीवन । परि बिंबप्रतिबिंबां आण । काळेंपण लागेना ॥ नाथ, ५६७.

- आत्मा अकर्ता असून त्याला कर्मानें नानायोनीत भ्रमण का करावें लागतें तें सांगतात: - जसा एखादा पुरुष नृत्य व गायन करणाऱ्या जनास पहूं लागला म्हणजे आपणही त्याचें अनुकरण करूं लागतो, म्हणजे त्या गायनातील स्वरतालादिकांच्या गति व शृंगारकरुणादि रसाचें मनांत चिंतन करूं लागतो, तसा बुद्धीच्या गुणांना पाहणारा आत्मा स्वत अकर्ता, असंग आहे तरी ते गुण आपलेच आहेत असें मानितो (या दृष्टांतानें पाहिलेल्या वस्तूचे धर्म पहाणारावर कसे भासूं लागतात ते दाखविलें आहे) ॥५२॥ - सोपाधिक वस्तूवर उपाधीचे धर्म भासूं लागतात याविषयीं दृष्टान्त असा - नद्या, तळीं, नाले, यातील उदकाच्या हालण्याधावण्यामुळें त्यात पडलेलें वृक्षाचें प्रतिबिंब देखील हालत आहे, धावत आहे, असें दिसतें तसे बुद्धीच्या चचलनिश्चलपणामुळें आत्माही चंचल निश्चल, विकारी आहेसा भासतो - आता द्रष्ट्याचे धर्म दृश्यात कसे भासतात तें दृष्टांतानें दाखवितो - आपल्या स्वत. सभोवती फिरणाऱ्या मनुष्याला आपल्या डोळ्याच्या फिरण्यामुळें भोंवतालचे सर्व पदार्थ फिरत आहेतसे दिसतें, - तसें सुखदुःखादिक केवळ बुद्धीचे (बलात्कारें त्याच्याकडून अनुकार करविलें जातें) ॥ ५२ ॥ यथा प्रचलन्त्यत , गायतः [च] पश्यन् यथा एव तान् अनुकरोति, एव बुद्धिगुणान् पश्यन् अनीहः अपि अनुकार्यते (बलात्कारें त्याच्याकडून अनुकार करविलें जातें) ॥ ५२ ॥ यथा प्रचलता अंभसा (उदकानें) तरवः अपि चला. इव, [यथा च] भ्राम्यमाणेन चक्षुषा भूः भ्रमती इव दृश्यते, ॥ ५३ ॥ दाशार्ह, यथा च मनोरथधियः (मनोराज्यातील समज),

नृत्यतो गायतः पश्यन्यथैवानुकरोति तान् ॥ एवं बुद्धिगुणान्पश्यन्ननीहो ऽप्यनुकार्यते ॥५२॥ यथा ऽम्भसा प्रचलता तरवो ऽपि चला इव ॥ चक्षुषा भ्राम्यमाणेन दृश्यते भ्रमतीव भूः ॥ ५३ ॥ यथा मनोरथधियो विषयानुभवो मृषा ॥ स्वप्नदृष्टाश्च दाशार्ह तथा संसार आत्मनः ॥ ५४ ॥ अर्थे ह्यविद्यमाने ऽपि संसृतिर्न निवर्तते ॥ ध्यायतो विषयानस्य स्वप्ने ऽनर्थागमो यथा ॥५५॥

स्वप्नदृष्टाः च मृषा, तथा आत्मन विषयानुभवः ससार. [मृषा] ॥ ५४ ॥ यथा विषयान् ध्यायत अस्य स्वप्ने अनर्थागम , [तथा] अर्थे अविद्यमाने अपि संसृति: न निवर्तते ॥ ५५ ॥ - विषयाचा उपभोग प्रत्यक्ष घडतोसें वाटणे ही बुद्धीच्याच वृत्ति (कल्पना) असून बुद्धि त्याचा आरोप विषयावर करिते, म्हणजे सुखदुःख हें विषयात आहे असें मानिते - ॥ ५३ ॥ - विषयाचा उपभोग प्रत्यक्ष घडतोसें वाटणे ही केवळ भ्रांति आहे हें स्वप्नाच्या व मनोराज्याच्या दृष्टांतानी उघड करून येते. उद्धवा, तू पवित्र दाशार्हकुलात जन्मला आहेस पहा कीं जसे मनोराज्यात व स्वप्नात आपणाला घडलेले विषयाचे बरेवाईट भोग जागृतीप्रमाणे अगदीं सत्य वाटतात, परतु त्या अवस्था गेल्यावर ती केवळ भ्रांति होती असे प्रत्ययास येतें तसा हा आपणाला खरा वाटणारा विषयानुभवरूपी संसार हें एक दीर्घ स्वप्न आहे, म्हणजे अगदीं मिथ्या (काल्पनिक) आहे ॥ ५४ ॥ - जर ससार हा मृगजलवत् मिथ्या आहे तर त्याच्या निरासार्थ विवेकवैराग्यादिक यत्न कशासाठीं करावे असे विचारशील तर - स्वप्न अगदीं मिथ्या खरें, तथापि त्यात प्राप्त आलेल्या सकटाचा परिहार जागृति अवस्था आल्याखेरीज होत नाहीं,

१ ही शंका नाथांनी दृष्टांत देऊन स्पष्ट केली आहे.—जैसीं वंध्यापुत्राचें लग्न । करावया कोणी न करी यत्न । का मृगजळीं बाधोनि धरण । पाट जाण कोणी काढीना ॥ नाथ, ६३४

तसा संसार जरी मिथ्या आहे, तथापि विषयासक्त झालेल्या जीवाला विवेकवैराग्यादि साधनांनीं ज्ञान प्राप्त झाल्याशिवाय जन्ममरणरूपी दुःखपरंपरेची निवृत्ति होत नाही. ॥ ५५ ॥ म्हणून उद्धवा, तूं या दुष्ट इंद्रियांच्या नादीं लागून विषय भोगूं नको आणि ही स्वरूपाच्या विस्मरणामुळें झालेली भ्रांति म्हणजे कल्पनामात्र आहे असें जाण - जागृत शरीराच्या विस्मरणानेंच स्वप्नसृष्टि भासूं लागते व ती खरीशी वाटते, व जागृतीच्या स्मरणाबरोबर ती मिथ्या ठरते व अदृष्ट होते तशी आपल्या ज्ञानस्वरूपाच्या विस्मरणानेंच पंचभूताचा जड देह व सर्व पंचभूतात्मक सृष्टि हीं भासूं लागतात. तीं स्वरूपाच्या स्मरणाबरोबर अशी अगदीं नष्ट होतात कीं स्वप्नासारखें त्याचें मागाहून तुमचें मालिन्य देखील राहत नाही. - ॥ ५६ ॥ आपलें अत्यंत कल्याण (आत्मप्राप्ति) इच्छिणाऱ्या पुरुषाचा दुष्टलोकांनीं तिरस्कार केला, अपमान केला त्याचा उपहास किंवा त्याची निंदा केली,

ति न निवर्तते. ॥ ५५ ॥ तस्मात् उद्धव, असदिंद्रियैः विषयान् मा भुंक्ष्व. आत्माग्रहणनिर्भातं (आत्म्याच्या अज्ञानामुळें भासलेला) वैकल्पिक भ्रम पश्य ॥ ५६ असद्भिः क्षिप्तः, अवमानितः, प्रलब्धः (उपहास केलेला), असूयितः (निंदिलेला) अथवा ताडितः, सन्निबद्धः, वृत्त्या परिहापितः (हाकलेली उपजीविका अशा) वा, ॥ ५७

> तस्मादुद्धव मा भुंक्ष्व विषयानसदिंद्रियैः ॥ आत्माग्रहणनिर्भातं पश्य वैकल्पिकं भ्रमम् ॥ ५६ ॥
>
> क्षिप्तो ऽवमानितो ऽसद्भिः प्रलब्धो ऽसूयितो ऽथवा ॥ ताडितः सन्निबद्धो वा वृत्त्या वा परिहापितः ॥ ५७ ॥
>
> निष्ठितो मूत्रितो वा ऽज्ञैर्बहुधैवं प्रकंपितः ॥ श्रेयस्कामः कृच्छ्रगत आत्मना ऽऽत्मानमुद्धरेत् ॥ ५८ ॥
>
> उद्धव उवाच । यथैवमनुबुध्येयं वद नो वदतां वर ॥ सुदुःसहमिमं मन्य आत्मन्यसदतिक्रमम् ॥ ५९ ॥

अज्ञैः निष्ठितः (थुंकी टाकली ज्यावर असा), मूत्रितः वा एवं बहुधा प्रकंपितः [अपि] कृच्छ्रगतः [अपि] श्रेयस्काम आत्मना आत्मानं उद्धरेत्. ॥ ५८ ॥ उद्धव उवाच— वदतांवर, एवं यथा अनुबुध्येयं, [तथा] नः वद. विश्वात्मन्, त्वद्धर्मनिरतान् शांतान् ते चरणालयान् (चरणाचा आश्रय ज्यानीं केला असा) ऋते (वाचून) विदुषां अपि

त्याला मारिलें, बांधिलें किंवा त्याच्या उपजीविकेचें साधन नाहीसें केलें, मूर्ख लोकांनीं त्याच्या आंगावर थुंकी किंवा मूत्र टाकिलें व अशा बहुत प्रकारांनीं आत्मचिंतनापासून त्याचें मन भ्रष्ट करण्याविषयीं यत्न केले, अशीं मोठीं संकटें जरी प्राप्त झालीं तरी मुमुक्षूनें तीं विवेकानें सहन करून आत्मनिष्ठेनें आपल्याला संसारबंधनांतून सोडवावें ॥ ५७, ५८ ॥

उद्धव म्हणाला:— हे श्रीकृष्णा, तूं उपदेश करणारामध्यें श्रेष्ठ आहेस. दुर्जनानीं कितीही छळ केला तरी तो सहन करणें हें - विवेकी पुरुषास देखील - अशक्य आहे असें मला वाटतें तर - मुमुक्षु जनांच्या अंतःकरणांत बोधानें अशा प्रकारची शांति उत्पन्न व्हावी या अभिप्रायानें - तुझें भाषण मला व तुझ्या इतर भक्तांना पूर्णपणें समजेल अशा रीतीनें

र्षय ॥ ५९ ॥ हे विश्वव्यापका देवा, जे साधु पुरुष शांत असून तुझ्या धर्माचरणात निमग्न असतात व तुझ्या चरणांचा आश्रय करून राहतात त्याखेरीज इतर मोठ्या विद्वान् पुरुषांचेंही बळ प्रकृतीच्या प्रभावापुढें चालत नाहीं - कपिल, नारद, सनकादि मोठ्या ज्ञात्या पुरुषाच्या ठिकाणी देखील अल्प कारणानें क्रोध उत्पन्न करून प्रकृतीनें त्यास घोंटाळ्यात घातलें आहे. ह्मणून सदा शांत राहून दुर्जनाचे अपराध सहन करणे ही गोष्ट फार दुर्घट दिसते. - ॥ ६० ॥ इति द्वाविंशातितमो ऽध्यायः ॥ २२ ॥

श्रीशुकाचार्य ह्मणाले '— राजा, भगवद्भक्तांतील अग्रगण्य जो उद्धव, त्यानें दाशार्हकुलाधिपतींची (श्रीकृष्णाची) अशा रीतीनें प्रार्थना केली तेव्हा ते भगवान् मुकुंद आप-

इमं आत्मनि असदतिक्रमं (दुर्जनकृत अमर्यादा) क्षुद्र सहं मन्ये. हि प्रकृतिः (स्वभाव) बलीयसी. ॥५९॥६०॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे द्वाविंशो ऽध्याय ॥ २२ ॥

बादरायणिः उवाच— एवं भागवतमुख्येन उद्धवेन आशंसित. श्रवणीयवीर्यः दाशार्हमुख्यः स. मुकुंदः भृत्यवचः सभाजयन् [सन्] त आबभाषे ॥१॥ श्रीभगवान् उवाच—

विदुषामपि विश्वात्मन्प्रकृतिर्हि बलीयसी ॥ ऋते त्वद्धर्मनिरतान् शांतांस्ते चरणालयान् ॥ ६० ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे द्वाविंशो ऽध्यायः ॥२२॥ बादरायणिरुवाच । स एवमाशंसित उद्धवेन भागवतमुख्येन दाशार्हमुख्यः ॥ सभाजयन्भृत्यवचो मुकुंदस्तमाबभाषे श्रवणीयवीर्यः ॥१॥ श्रीभगवानुवाच । बार्हस्पत्य स वै नात्र साधुर्वै दुर्जनेरितैः॥ दुरुक्तैर्भिन्नमात्मानं यः समाधातुमीश्वरः ॥ २ ॥ न तथा तप्यते विद्धः पुमान्बाणैः सुमर्मगैः ॥ यथा तुदंति मर्मस्था ह्यसता परुषेषवः ॥ ३ ॥ कथयंति महत्पुण्यमितिहासमिहोद्धव ॥ तमहं वर्णयिष्यामि निबोध सुसमाहितः ॥ ४ ॥

बार्हस्पत्य (बृहस्पतीच्या शिष्या), यः दुर्जनेरितैः दुरुक्तैः भिन्नं आत्मानं समाधातुं ईश्वरः, सः साधुः अत्र न. ॥२॥ यथा असता मर्मस्थाः परुषेषवः (कठोरभाषणरूप बाण) तुदंति (पीडा देतात), तथा सुमर्मगैः बाणैः विद्धः पुमान् न तप्यते ॥३॥ उद्धव, इह महत् [यथा तथा] पुण्यं इतिहासं कथयंति. अहं त वर्णयिष्यामि [त्वं] सुसमाहित [सन्] निबोध ॥४॥

ल्या सेवकाच्या भाषणाचें गौरव करीत त्याला सांगूं लागले. भगवताचीं एकंदर चरित्रें ऐकण्याजोगी असतात. ॥ १ ॥ श्रीभगवान् ह्मणाले — हे बृहस्पतीच्या शिष्या (उद्धवा), असा सत्पुरुष ह्या जगात कोणीच नाहीं कीं जो दुर्जनानीं उच्चारिलेल्या अपशब्दाच्या योगें क्षुब्ध झालेल्या मनाला शमविण्यास समर्थ होईल. ॥ २ ॥ कारण, दुष्टाचे दुरुक्तिरूप तीक्ष्ण बाण नेहमी अचुक मर्मालाच जाऊन खोंचतात, व त्यांच्या योगें मनुष्याला जसें अतिशय दुःख भोगावें लागते, तसे लोखडाचे बाण किती जरी मर्मावर नेमके येऊन लागले तरी त्यांच्या योगें तादृश दुःख होत नाहीं.॥३॥ तथापि मीं सांगितलेल्या उपायानीं सर्व कांहीं सोसता येतें. - उद्धवा, ह्याविषयींच एक महापुण्यकारक इतिहास उदाहरणार्थ सांगत

असत्यात. तो मी तुला निवेदन करितों, अत्यंत एकाग्र चित्तानें ऐक. ॥४॥ - तो इतिहास ह्मणजे - कोणी एका यतीनें केलेलें गायन (तत्त्वविचार) होय त्याला दुर्जनांनीं अतिशय
छळिलें, तेव्हां स्वतःच्या कर्मांचा विपाक आठवूं लागला. अशा प्रसंगीं धैर्य धरून त्यानें - जी विचारमुक्ताफळें गोंविलीं त्याची ती माळ खरोखर प्रत्येकानें हृदयीं वागविण्यासारखी आहे
॥५॥ - प्रथम त्याचें थोडेंसें चरित्र सांगतों, नंतर त्यानें गाइलेली गाथा निवेदन करीन. - माळव देशामध्यें कोणीएक मोठा धनसंपन्न ब्राह्मण राहत असे. तो शेती, व्यापार, उदीम इत्यादि
व्यवसाय करी, त्याचा स्वभाव पराकाष्ठेचा कद्रू (कवडीचुंबक), कामी, लोभी व अतिशय रागीट असा असे ॥ ६ ॥ त्याच्या घरीं कधीं धर्मकर्म व्हावयाचें नाहीं किंवा कधीं

[नत्र] दुर्जनैः परिभूतेन निजकर्मणा विपाकं स्मरता धृतियुक्तेन केनचित् भिक्षुणा गीत [शृणु]. ॥५॥ अवंतिषु कश्चित् श्रिया आढ्यतम (अति श्रीमन) वार्तावृत्तिः (शेत व्यापार ही वृत्ति ज्याची असा) कदर्यः (कृपण) कामी लुब्धः अतिकोपनः द्विजः आसीत्. ॥ ६ ॥ तस्य ज्ञातयः, अतिथय [च] वाङ्मात्रेण (नुसत्या शब्दांनीं) आदि न अर्चिताः

केनचिद्भिक्षुणा गीतं परिभूतेन दुर्जनैः ॥ स्मरता धृतियुक्तेन विपाकं निजकर्मणाम् ॥ ५ ॥
अवंतिषु द्विजः कश्चिदासीदाढ्यतमः श्रिया ॥ वार्तावृत्तिः कदर्यस्तु कामी लुब्धो ऽतिकोपनः ॥ ६ ॥
ज्ञातयो ऽतिथयस्तस्य वाङ्मात्रेणापि नार्चिताः ॥ शून्यावसथ आत्मा ऽपि काले कामैरनर्चितः ॥ ७ ॥
दुःशीलस्य कदर्यस्य द्रुह्यते पुत्रबांधवाः ॥ दारा दुहितरो भृत्या विषण्णा नाचरन् प्रियम् ॥ ८ ॥
तस्यैवं यक्षवित्तस्य च्युतस्योभयलोकतः ॥ धर्मकामविहीनस्य चुक्रुधुः पंच भागिनः ॥ ९ ॥

काले, शून्यावसथे (ओसाडासारख्या घरात) आत्मा अपि कामैः अनर्चितः. ॥ ७ ॥ दुःशीलस्य कदर्यस्य पुत्रबांधवाः द्रुह्यते (द्वेष करितात) दाराः, दुहितरः (कन्या) भृत्याः [च] विषण्णाः [संतः] प्रियं न आचरन्. ॥ ८ ॥ एवं यक्षवित्तस्य (सर्पाप्रमाणें केवळ राखून ठेवावयाचें द्रव्य ज्याला अशा) धर्मकामविहीनस्य उभयलोकतः च्युतस्य तस्य

ज्ञातिजनाची व पाहुण्याची नुसत्या गोड शब्दांनीं देखील संभावना व्हावयाची नाहीं, फार तर काय पण तो आपल्या शरीराची मुद्धा कधीं चांगलें वस्त्रपात्र लेवून कीं कधीं स्निग्ध
मधुर अन्न खाऊन जोपासना करीत नसे ! ॥ ७ ॥ असा त्याचा स्वभाव पराकाष्ठेचा खाष्ट व कृपण असल्यामुळें मुलगे, आप्तजन, बायको, मुली, चाकरमाणसें मगळीं त्याच्याशीं,
व त्याचा द्वेष करूं लागली. त्याच्या मनाप्रमाणें कोणी वागेना ॥ ८ ॥ यक्षाचें (सर्पाचें, भुताचें) काम जसें द्रव्याचें रक्षण करायाचें तसेंच ह्या ब्राह्मणाचेंही काम द्रव्य मा-

१ कदर्यूचें लक्षण स्मृतीमध्यें असें सांगितलें:— आत्मानं धर्मकृत्यं च पुत्रदारांश्च पीडयन्। देवतातिथिभृत्यांश्च स कदर्य इति स्मृत. ।. स्वतःच्या पोटाला खावया नाहीं, धर्मकृत्यें नाव नको, मुलांना, बायकोला, देवतांना, अतिथींना व चाकरमाणसांना सर्वतोपरी त्रास द्यायचा, असा ज्याचा स्वभाव तो कदर्य ह्मटला जातो.

त्यानें धर्मही साधिला नाहीं व कामही भोगिला नाही अर्थात तो दोन्ही लोकाना (ह्या लोकाला व पर-
चून ठेवायाचें (त्याचा उपयोग अगदीं करायाचा नाहीं) एवढेंच असे. ॥ ९ ॥ उद्धवा, तूं मोठा दाता आहेस (तुला काही त्याच्यासारखी भीति नाहीं काळजी नको)
लोकालाही) मुकला होता. शेवटीं पंचमहायज्ञदेवता त्याच्यावर कोपल्या. ॥ ९ ॥ पुढें काय प्रकार झाला तो ऐक .- त्या देवताच्या अनादरामुळें त्याचा पुण्याश नष्ट झाला, व त्याने जें मिळविण्याच्या कामी शेतीभाती इत्यादि आयासानीं अत्यत परिश्रम केले
- पुढें काय प्रकार झाला तो ऐक .- उद्धवा, काही ज्ञातींनीं घेतले, काही चोरानीं हरिलें, काहीं दैवानें (घर जळून वगैरे) नष्ट झाले,
होते, तें सगळें त्याचे धन नाश पावलें. ॥ १० ॥ - द्रव्य कसें गेलें तें ऐक - उद्धवा, (त्याच्या अपमानामुळे नष्ट झाला पुण्याश ज्याचा अशा त्याचा) बह्वायासपरिश्रम: (पुष्कळ आ-
पंचभागिनः (पंचमहायज्ञदेवता) चुक्रुधुः ॥ ९ ॥ भूरिद, तदवध्यानविस्रस्तपुण्यस्कंधस्य ब्रह्मबंधोः ज्ञातय. किंचित् जगृहु.. दस्यवः (चोर) किंचित् [जगृहु]. दैवत , कालत:,
यासानीं श्रम ज्याच्या साधनामध्यें असा) अर्थः अपि निधनं अगच्छत्. ॥ १० ॥ उद्धव,

तदवध्यानविस्रस्तपुण्यस्कंधस्य भूरिद ॥ अर्थो ऽप्यगच्छन्निधनं बह्वायासपरिश्रमः ॥ १० ॥
ज्ञातयो जगृहुः किंचित्किंचिद्दस्यव उद्धव ॥ दैवतः कालतः किंचिद्ब्रह्मबंधोर्नृपार्थिवात् ॥ ११ ॥
स एवं द्रविणे नष्टे धर्मकामविवर्जितः ॥ उपेक्षितश्च स्वजनैश्चिंतामाप दुरत्ययाम् ॥ १२ ॥
तस्यैवं ध्यायतो दीर्घं नष्टरायस्तपस्विनः ॥ खिद्यतो बाष्पकंठस्य निर्वेदः सुमहानभूत् ॥ १३ ॥

नृपार्थिवात् [च] किंचित् [नष्टं]. ॥११॥ एवं द्रविणे नष्टे [सति], धर्मकामविवर्जित. स्वजनैः उपेक्षित. सः दुरत्यया चिंता आप. ॥१२॥ एव नष्टराय. (नष्ट द्रव्य ज्याचें अशा)
तपस्विनः (ताप पावणाऱ्या) दीर्घं ध्यायतः खिद्यत. बाष्पकंठस्य सुमहान् निर्वेदः (वैराग्य) अभूत् ॥ १३ ॥
अपहारिलें व काहीं राजानें काढून घेतलें, अशा रीतीनें त्या नामधारी ब्राह्म-
कांहीं कालवशात् (पेंवात ठेवलेलें धान्यादिक) नाश पावलें, काही मनुष्यानीं (मुलथापा देणारानीं) त्याचें द्रव्य तर नष्ट झाले, तेव्हा
णाच्या - सर्व द्रव्याची वाट लागली. - ॥ ११ ॥ त्यानें धर्म आचरण केला नाहीं किंवा उपभोग भोगिले नाहींत व मागे सांगितल्या प्रकारानीं
आप्तजन त्याची उपेक्षा करूं लागले (त्याच्याकडे कोणी लक्ष्य देईना कीं त्याला थारा देईना) अर्थात त्या ब्राह्मणाला दुर्निवार चिंता उत्पन्न झाली ॥ १२ ॥ अशा रीतीने
संपत्ति नष्ट झाल्यामुळें संताप पावून तो ब्राह्मण पुष्कळ वेळ विचारात मग्न असे, खेदामुळें त्याचा कंठ भरून येई होता होता शेवटीं त्याला अत्यंत तीव्र वैराग्य उत्पन्न झालें १३॥

१ केवळ द्रव्य मिळण्याला तरी जी पुण्याई लागली होती ती.

आणि तो आपल्याशीच असें म्हणाला :— अहो मोठ्या दुःखाची गोष्ट की, मीं आपल्या शरीराला निरर्थक ताप दिला * कारण, पहा ! माझा द्रव्य मिळविण्याचा एवढा खटाटोप धर्माच्या कामीं पडला नाहीं कीं सुख भोगण्याच्याही उपयोगास आला नाहीं. ॥ १४ ॥ अथवा, जगांत बहुधा असा नियमच आढळतो कीं, कृपणाना द्रव्य कदापि सुखदायक होत नाहीं, ते त्याना इहलोकीं शरीराला कष्ट आणि मेल्यावर नरक (कारण, त्याच्या योगें धर्मानुष्ठान केलें नसतें) मिळण्याला कारण व्हावयाचें. ॥ १५ ॥ कीर्तिमान् पुरुषाची निर्मळ कीर्ति - कितीही पसरलेली असो; - व गुणवानाचे गुण कितीही प्रशंसनीय असोत, पण जर त्याच्या अंगीं थोडा तरी लोभ असेल तर तो त्याच्या त्या सगळ्या कीर्तीची व गुणांची माती करून टाकितो. उदाहरण पहा — सगळें रूप मनोहर असलें तरी जर एकेचठिकाणीं तोंडावर थोडेंसें पांढरें कोड उठलें आहे तर ते त्या मनु-

सः इदं आह—" अहो कष्टं! मे आत्मा वृथा अनुतापितः, यस्य ईदृशः अर्थायासः धर्माय न, कामाय न! ॥ १४ ॥ प्रायेण कदर्याणां (कृपणाचे) अर्थाः (द्रव्यें) कदाचन सुखाय न, इह आत्मोपतापाय (आत्म्याला त्रास देण्यास), मृतस्य नरकाय च [भवंति]. ॥ १५ ॥ श्वित्रः (पांढरें कोड) ईप्सितं रूपं इव स्वल्पः अपि लोभः यशस्विनां

स चाहेदमहो कष्टं वृथाऽऽत्मा मेऽनुतापितः ॥ न धर्माय न कामाय यस्यार्थायास ईदृशः ॥ १४ ॥ प्रायेणार्थाः कदर्याणां न सुखाय कदाचन ॥ इह चाऽऽत्मोपतापाय मृतस्य नरकाय च॥१५॥यशो यशस्विनां शुद्धं श्लाघ्या ये गुणिनां गुणाः ॥ लोभः स्वल्पोऽपि तान् हंति श्वित्रो रूपमिवेप्सितम् ॥ १६ ॥ अर्थस्य साधने सिद्धे उत्कर्षे रक्षणे व्यये ॥ नाशोपभोग आयासस्त्रासश्चिंता भ्रमो नृणाम्॥१७॥ स्तेयं हिंसाऽनृतं दंभः कामः क्रोधः स्मयो मदः ॥ भेदो वैरमविश्वासः संस्पर्धा व्यसनानि च॥१८॥

शुद्धं यशः, गुणिनां ये श्लाघ्याः गुणाः, तान् च हंति. ॥ १६ ॥ नृणां अर्थस्य साधने, [अर्थे] सिद्धे [सति, तस्य] उत्कर्षे, रक्षणे, व्यये, नाशोपभोगे च आयासः, त्रासः, चिंता, भ्रमः [च भवति]. ॥ १७ ॥ (मू.) ॥ १८ ॥

ष्याच्या सौंदर्याचा नाश करितें. ॥ १६ ॥ मनुष्यांना द्रव्य मिळवितांना व मिळाल्यावर त्याची वाढ करितांना आयास पडतात, पुढें रक्षण करतांना चोराटिकाचें भय वाटावें लागतें नंतर खर्चून संपेल कीं काय ही काळजी व भोगिलें तर - रोगादि उद्भवतील कीं काय हें - भय असतेंच; आणि नाश झाला असता चित्ताला भ्रम पडतो - एकंदर द्रव्य हें आरंभापासून समाप्तीपर्यंत दुःखदायक होय. - ॥ १७ ॥ शिवाय, चोरी, हिंसा, असत्य, दंभ, काम, क्रोध, गर्व, मद (उन्मत्तपणा), भेद (फितुरी), वैर, अविश्वास, स्पर्धा (चुरस) व तीन व्यसनें (स्त्री, द्यूत व मद्य हीं तीन), ॥ १८ ॥

१ चोरीपासून क्रोधापर्यंतचे सहा अनर्थ द्रव्यप्राप्तीसाठीं अंगिकारावे लागतात, व गर्वापासून पुढील नऊ (तीन व्यसनांसुद्धा) द्रव्य मिळाल्यावर प्राप्त होतात

हे पंधरा अनर्थ मनुष्यांना एका द्रव्यामुळें प्राप्त होतात, ही गोष्ट सर्वमान्य आहे म्हणून ज्याला कल्याणप्राप्तीची इच्छा असेल त्यानें, ज्याला 'अर्थ' अशी संज्ञा आहे, तो मूर्तिमत अनर्थ दूर टाकून द्यावा. ॥ १९ ॥ - द्रव्यामुळें भेद, वैर व स्पर्धा हीं कशीं उद्भवतात पहा - भाऊ, बायको, आईबाप, तसेच मित्र अशीं एकजिवाचीं व अतिप्रेमळ माणसें दमडीसाठीं स्नेह सोडितात आणि ती दमडी एका क्षणात त्या सर्वांना शत्रु करून सोडिते। ॥ २० ॥ ही मडळी अल्पस्वल्प द्रव्यासाठीं खवळतात आणि क्रोधाच्या भरात चटकन एकमेकाला सोडून जातात. - एवढेंच नव्हे तर - एकाएकीं सगळे प्रेम दूर झुगारून देऊन द्वेष आरंभितात व परस्पराचे घात करितात। ॥ २१ ॥ हे मनुष्यजन्म - ब्रा-

एते पचदश अनर्थाः नृणा अर्थमूला' मताः. तस्मात् श्रेयोर्थी अर्थाख्यं अनर्थ दूरत. त्यजेत्. ॥ १९ ॥ एकास्निग्धा. (एक जीवाचे व अति प्रिय) भ्रातर., दारा (पत्नी), पितरः तथा सुहृदः च भिद्यते, काकिणिना (वीस कवड्यानीं) सद्य' सर्वे अरय कृता. ॥ २० ॥ सरब्धा. (खवळलेले) दीप्तमन्यव. स्पृध (द्वेष करणारे) एते अल्पीयसा अर्थेन

एते पंचदशानर्था ह्यर्थमूला मता नृणाम् ॥ तस्मादनर्थमर्थाख्यं श्रेयोऽर्थी दूरतस्त्यजेत् ॥ १९ ॥ भिद्यते भ्रातरो दाराः पितरः सुहृदस्तथा ॥ एकास्निग्धाः काकिणिना सद्यः सर्वे ऽरयः कृताः ॥ २० ॥ अर्थेनाल्पीयसा ह्येते संरब्धा दीप्तमन्यवः ॥ त्यजंत्याशु स्पृधो घ्नंति सहसोत्सृज्य सौहृदम् ॥ २१ ॥ लब्ध्वा जन्मामरप्रार्थ्यं मानुष्यं तद्द्विजाग्र्यताम् ॥ तदनादृत्य ये स्वार्थं घ्नंति यात्यशुभां गतिम् ॥ २२ ॥ स्वर्गापवर्गयोर्द्वारं प्राप्य लोकमिमं पुमान् ॥ द्रविणे को ऽनुषज्जेत मर्त्यो ऽनर्थस्य धामनि ॥ २३ ॥
देवर्षिपितृभूतानि ज्ञातीन्बंधूंश्च भागिनः ॥ असंविभज्य चाऽऽत्मानं यक्षवित्तः पतत्यधः ॥ २४ ॥

सहसा सौहृद उत्सृज्य (सोडून) आशु त्यजंति, घ्नंति [च]. ॥ २१ ॥ अमरप्रार्थ्य मानुष्य जन्म, तत् द्विजाग्र्यता लब्ध्वा तत् अनादृत्य ये स्वार्थं घ्नंति, [ते] अशुभा गति याति. ॥ २२ ॥ स्वर्गापवर्गयो. द्वारं इमं लोकं प्राप्य कः मर्त्यः पुमान् अनर्थस्य धामनि द्रविणे अनुषज्जेत? ॥ २३ ॥ यक्षवित्त देवर्षिपितृभूतानि, ज्ञातीन्, बधून्, भागिन

ह्मणपणा - जे किती दुर्मिळ; - देव देखील ह्याच्या प्राप्तीची इच्छा धरून आहेत. - पण तें अनायासें प्राप्त झाले आहे नुसतें मनुष्यत्वच नव्हे तर - त्यात आणखी अत्युत्तम असा ब्राह्मणपणा मिळाला आहे, असें असताना त्या जन्माचा अनादर करून जे स्वार्थाचा नाश करितात (आत्महित साधीत नाहींत) ते अशुभ गतीस जातात - एकदरीत द्रव्याच्या लोभात गुंतणाऱ्या पुरुषाना इहलोकीं व परत्रही अनर्थच भोगावे लागतात - ॥ २२ ॥ स्वर्ग व मोक्ष मिळविण्याचे द्वार असा हा नरदेह प्राप्त झाला असता भोगता नरे मरणारे पुरुष अनर्थाचें केवळ माहेरघर अशा द्रव्यावर आसक्त होईल? - कोणी होणार नाही - ॥२३॥ जो मनुष्य देवें, ऋषि, पितरें, भूतें, गोत्रज, आप्त (विवाहादिकार्नी सबद्ध) यांनाही

१ ह्या पंचमहायज्ञदेवता होत. 'ऋषि' शब्दानें मनुष्ययज्ञाच्या व ब्रह्मयज्ञाच्या देवताचा सग्रह समजावा

विभागार्ह लोक व स्वतांचें शरीर यांना यथायोग्य विभाग न देतां (अन्नादिकांच्या योगें तृप्त न करितां) समंधाप्रमाणें द्रव्याचें नुसतें रक्षण करितो तो अधोगतीस [illegible]
मी द्रव्याचें संपादन व रक्षण करण्याच्या भरीस भरून राहिलों; त्यामुळें माझें द्रव्य, वय आणि बल सगळें नाश पावलें. विवेकी पुरुष त्या वित्तादिकांच्या योगें [illegible]
व्यवितात. आतां मी तर वृद्ध झालों. यापुढें मला कोणती बरें गोष्ट साध्य करून घेतां येईल ! ॥ २५ ॥ - द्रव्य [illegible] अनर्थाचें कारण होय असें - जाणत [illegible]
धनोद्यमांनीं वारंवार आपल्याला क्लेश कां बरें करून घेतो ? - मला वाटतें - खरोखर कोणाच्या तरी मायेनें हा लोक अत्यंत मोहून गेलेला आहे ! ॥ २६ [illegible]
मोहून गेला नाहीं आणि कांहीं नाहीं. धनादिकांच्या योगें उपभोगादि संपादावे अशा इच्छेमुळें लोक क्लेश भोगीत असतात दुसरें काय ? ' असें कोणी [illegible]
(भाग देणें योग्य ज्यांना त्यांना), आत्मानं च असंविभज्य अधः पतति. ॥ २४ ॥ व्यर्थया अर्थेहया प्रमत्तस्य [मम] वित्तं, वयः, बलं [च गतं], येन कुशलाः [illegible]
[अहं] किंनु साधये ! ॥ २५ ॥ विद्वान् असकृत् व्यर्थया अर्थेहया कस्मात् संक्लिश्यते ? नूनं अयं लोकः कस्यचित् मायया सुविमोहितः. ॥ २६ ॥ मृत्युना [illegible]

व्यर्थया ऽर्थेहया वित्तं प्रमत्तस्य वयो बलम् ॥ कुशला येन सिध्यंति जरठः किं नु साधये ॥ २५ ॥
कस्मात्संक्लिश्यते विद्वान्व्यर्थया ऽर्थेहया ऽसकृत् ॥ कस्यचिन्मायया नूनं लोको ऽयं सुविमोहितः॥२६॥
किं धनैर्धनदैर्वा किं कामैर्वा कामदैरुत ॥ मृत्युना ग्रस्यमानस्य कर्मभिर्वोत जन्मदैः ॥ २७ ॥ नूनं मे
भगवांस्तुष्टः सर्वदेवमयो हरिः ॥ येन नीतो दशामेतां निर्वेदश्चात्मनः प्लवः ॥२८॥ सो ऽहं कालावशे-
षेण शोषयिष्ये ऽगमात्मनः ॥ अप्रमत्तो ऽखिलस्वार्थे यदि स्यात्सिद्ध आत्मनि ॥ २९ ॥

धनदैः वा किं ? उत कामैः, कामदैः वा किं ? उत जन्मदैः कर्मभिः वा [किं] ? ॥ २७ ॥ नूनं मे भगवान् सर्वदेवमयः हरिः तुष्टः, येन [अहं] एतां दशां नीतः, [illegible]
(तारक नौका) निर्वेदः च [अभवत्]. ॥ २८ ॥ यदि [कालावशेषः] स्यात्, [तर्हि] सः अहं आत्मनि सिद्धः, अखिलस्वार्थे अप्रमत्तः [च सन्] कालावशेषेण [illegible]
सांगतों :- अहो, ह्या देहाला मृत्यु ग्रासीत आहे; तेव्हां त्याला धनांचा उपयोग काय ? किंवा धनदात्याशीं तरी काय कर्तव्य आहे ? उपभोग कशाला [illegible]
उपभोग देणारांचें तरी काय करायाचें ? तसेंच कर्में तरी हवींत कशासाठीं ? तीं एकामागून एक अनेक जन्म मात्र प्राप्त करून देतात. ॥ २७ ॥ [illegible]
सर्वदेवतारूप भगवान् हरि संतुष्ट झाला असावा; व त्यानेंच मला ह्या स्थितीस आणून पोंचविलें असावें. तो प्रसन्न झाला म्हणूनच आत्म्याला [illegible]
असें वैराग्य मला प्राप्त झालें. ॥२८॥ तो मी आतां अवशिष्ट राहिलेल्या काळांत — थोडीबहुत आयुष्यमर्यादा उरलेली असेल तर — आत्मरूपीं संतुष्ट [illegible]

(धर्मादिसाधनांत) दक्ष असेन व आपलें शरीर - तपश्चर्येच्या योगें - शोषवीन (किंवा, विश्वेशें लीन करीन). ॥ २९ ॥ मात्र, त्याकामीं त्रिभुवनाधिपति [illegible] अनुमोदन द्यावें. - कोणी ह्मणेल कीं 'देवांनीं अनुमोदन दिलें तरी तूं ह्यातारा थोडक्या काळांत सिद्धि मिळविशील कशी!' तर त्याबद्दलही सांगतों :- [illegible] ह्यानें एका मुहूर्तांतच ब्रह्मलोक साध्य करून घेतला. ॥ ३० ॥ श्रीभगवान् ह्मणाले :- उद्धवा, त्या अवंतिदेशीय ब्राह्मणोत्तमानें मनामध्यें असा निश्चय [illegible] मतादि ग्रंथि सोडिले आणि तो शांत व विचारशील असा यति झाला. ॥ ३१ ॥ तेव्हांपासून पुढें तो मन, इंद्रियें व प्राण हीं वश करून व सर्व ठिकाणीं [illegible] अंगं शोषयिष्ये (सुकवीन). ॥ २९ ॥ त्रिभुवनेश्वराः देवाः तत्र मां अनुमोदेरन् (अनुमोदन देतील). खट्वांगः मुहूर्तेन ब्रह्मलोकं समसाधयत्." ॥३० श्रीभगवान् उवाच— इति मनसा अभिप्रेत्य आवंत्यः द्विजसत्तमः हृदयग्रंथीन् उन्मुच्य शांतः मुनिः भिक्षुः अभूत्. ॥ ३१ ॥ संयतात्मेंद्रियानिलः सः एतां महीं चचार, असंगः अलक्षितः [च सन्] भिक्षार्थं नगरग्रामान् आविशत्. ॥ ३२ ॥ भद्र, असज्जनाः तं प्रवयसं (वृद्ध) भिक्षुं अवधूतं (मलिन) दृष्ट्वा बह्वीभिः परिभूतिभिः (तिरस्कारांनीं) [illegible] ॥ ३३ ॥ [illegible] केचित् त्रिवेणुं, एके पात्रं, कमंडलुं, पीठं च, एके अक्षसूत्रं, केचन कंथां चीराणि [च] जगृहुः. ॥ ३४ ॥ मुनेः दर्शितानि [संति] तानि प्रदाय पुनः आददुः [तथा] [illegible]

सत्र मामनुमोदेरन् देवास्त्रिभुवनेश्वराः॥ मुहूर्तेन ब्रह्मलोकं खट्वांगः समसाधयत ॥३०॥ श्रीभगवानुवाच ।

इत्यभिप्रेत्य मनसा ह्यावंत्यो द्विजसत्तमः ॥ उन्मुच्य हृदयग्रंथीन् शांतो भिक्षुरभून्मुनिः ॥ ३१ ॥

स चचार महीमेतां संयतात्मेंद्रियानिलः ॥ भिक्षार्थं नगरग्रामानसंगो ऽलक्षितो ऽविशत् ॥ ३२ ॥

तं वै प्रवयसं भिक्षुमवधूतमसज्जनाः ॥ दृष्ट्वा पर्यभवन् भद्र बह्वीभिः परिभूतिभिः ॥ ३३ ॥

केचित्त्रिवेणुं जगृहुरेके पात्रं कमंडलुम् ॥ पीठं चैके ऽक्षसूत्रं च कंथां चीराणि केचन ॥ ३४ ॥

प्रदाय च पुनस्तानि दर्शितान्याददुर्मुनेः ॥ अन्नं च भैक्ष्यसंपन्नं भुंजानस्य सरित्तटे ॥ ३५ ॥

त्या भूमीवर पर्यटण करी, भिक्षेसाठीं मात्र नगरांत व गांवांत शिरे पण आपली श्रेष्ठ योग्यता कोणालाही दाखवीत नसे. ॥ ३२ ॥ त्या सुशीला (उद्धवा), त्या [illegible] लिन भिक्षूस पाहून दुर्जन नानाप्रकारच्या तिरस्कारांनीं त्याचा अवमान करूं लागले :- ॥ ३३ ॥ कोणी त्याचा त्रिदंड हिसकीत; कोणी पात्र कमंडलु ओढीत; [illegible] आसन, कोणी रुद्राक्षांची माळ, कोणी कंथा (गोधडी), कोणी छाट्या ओढून घेऊन त्या मुनीला - 'अहो महाराज, ही आपली क्या' असें ह्मणून - ती ती [illegible] त्याच्या हातीं देत आणि पुन्हां त्याजजवळून हिसकून घेत. तो भिक्षा मागून अन्न मिळवून आणून नदीच्या तीरावर भोजन करीत बसला की, ॥ ३४ ॥ ३५ ॥

मूत्रयंति च पापिष्ठाः ष्ठीवंत्यस्य च मूर्धनि ॥ यतवाचं वाचयंति ताडयंति न वक्ति चेत् ॥३६॥

तर्जयंत्यपरे वाग्भिः स्तेनोऽयमितिवादिनः ॥ बध्नंति रज्ज्वा तं केचिद्बध्यतां बध्यतामिति ॥३७॥

क्षिपंत्येके ऽवजानंत एष धर्मध्वजः शठः ॥ क्षीणवित्त इमां वृत्तिमग्रहीत्स्वजनोज्झितः ॥ ३८ ॥

अहो एष महासारो धृतिमान् गिरिराडिव ॥ मौनेन साधयत्यर्थं बकवद्दृढनिश्चयः ॥ ३९ ॥

इत्येके विहसंत्येनमेके दुर्वातयंति च ॥ तं बबंधुर्निरुरुधुर्यथा क्रीडनकं द्विजम् ॥ ४० ॥

एवं स भौतिकं दुःखं दैविकं दैहिकं च यत् ॥ भोक्तव्यमात्मनो दिष्टं प्राप्तं प्राप्तमबुध्यत ॥४१॥

अति नीच पापी लोक त्या अन्नांत मुतत, व खाकरून त्याच्या मस्तकावर थुंकत. त्यानें मौन धरिलें असतें तरी ते त्याला बोलणें भाग पाडीत; कारण, न बोलेल तर मार देत. ॥३६॥ दुसरे कोणी 'हा चोर आहे' असें ह्मणून त्याला शब्दांनीं भीति दाखवीत. कित्येकजण 'बांधा बांधा' असें ह्मणून त्याला दोरीनें बांधीत. ॥ ३७ ॥ कोणी कोणी त्याची अवहेलना करण्यासाठीं निंदा करीत ह्मणत कीं, 'अहो हा - पोट भरण्यासाठीं - धर्माचें ढोंग करणारा महाठक आहे! जवळचें द्रव्य गेलें व इष्टमित्र कोणी थारा देईना तेव्हां ह्यानें ही वृत्ति धरिली झालें! ॥ ३८ ॥ अहो! हा - अतिशय बळकट व पर्वतासारखा धैर्यवान् आहे (तुह्मी कितीही त्रास दिला तरी सगळा सोशील) आणि निश्चय ढळूं न देता बग-

रित्तटे संपन्नं भैक्ष्यं अन्नं भुंजानस्य [सतः], ॥ ३५ ॥ पापिष्ठाः [अन्ने] मूत्रयंति; अस्य मूर्धनि ष्ठीवंति (थुकतात), यतवाचं (नियद्ध वाणी ज्याची असाला) वाचयंति (बो- लायला लावितात), न वक्ति चेत् ताडयंति. ॥३६॥ अपरे " अयं स्तेनः (चोर) " इति वादिनः [संतः] वाग्भिः तर्जयंति. केचित् " बध्यतां बध्यतां " इति [वदंतः संतः] रज्ज्वा तं बध्नंति. ॥३७॥ एके अवजानंतः [संतः] "एषः धर्मध्वजः, (धर्माचें ढोंग करणारा), शठः (फसव्या) क्षीणवित्तः, स्वजनोज्झितः [सन्] इमां वृत्तिं अग्रहीत्" [इति] क्षिपंति. ॥ ३८ ॥ " अहो एषः महासारः, गिरिराट् इव धृतिमान्, बकवत् दृढनिश्चयः मौनेन अर्थं साधयति. " ॥ ३९ ॥ इति एके एनं विहसंति (उपहास करितात) एके दुर्- वातयंति (त्यावर अधोवायु सोडतात). यथा क्रीडनकं (क्रीडासाधन) द्विजं (पक्ष्याला), [तथा] तं बबंधुः, निरुरुधुः च. ॥ ४०॥ एवं सः भौतिकं, दैविकं, दैहिकं, च यत् दुःखं [illegible]

ळ्याप्रमाणें मौनानें (निमूट बसून) आपला कार्यभाग साधून घेईल!' ॥ ३९ ॥ असें ह्मणून कित्येकजण त्याचा उपहास करीत! दुसरे [illegible] कोणी तर त्याला शृंखलांनीं बांधीत व क्रीडेसाठीं पाळलेल्या पक्ष्याप्रमाणें त्याला कोंडून (कारागृहामध्यें) ठेवीत. ॥ ४० ॥ अशा रीतीनें [illegible] (ज्वरादिकांमुळें उद्भवलेलें) व दैविक (थंडी वारा यांमुळें होणारें) जें जें दुःख प्राप्त होई, तें तें दैवानें प्राप्त झालेलें आपल्याला भोगलेंच पाहिजे [illegible] ॥४१॥

ते नराधम त्याला धर्मापासून भ्रंशविण्याचे यत्न करीत व [illegible] छळीत, पण तो पुरुष सात्विक धैर्य धरून राहिला आणि स्वधर्मापासून कधीही [illegible] नाही [illegible] त्याने

पुढील गाथा गाइली :– ॥ ४२ ॥ ब्राह्मण ह्मणाला – मला सुख किंवा दु ख प्राप्त होण्यास निमित्त हे लोक नव्हत, देवता नव्हत, आत्मा नव्हे, ग्रह, कर्म व काळ हे नव्हत, तर,

सुखदुःखाचें कारण केवळ मनच होय असें ह्मणतात तेंच ससारचक्र फिरवीत असतें. ॥ ४३ ॥ प्रबळ असें मनच विविध गुणवृत्ति उत्पन्न करितें [illegible]

विलक्षण अशीं शुक्ल (पांढरी – सात्विक), कृष्ण (काळीं – तामस) व लोहित (तांबडीं – राजस) कर्में उद्भवतात आणि त्या कर्मांमुळे [illegible] (त्याना

[तत्] प्रातं प्रातं आत्मन मोक्तव्यं दिष्ट अबुध्यत. ॥ ४१ ॥ पातयद्भि नराधमै. परिभूत. स्वधर्मस्थ [स] सात्विकीं धृतिं आस्थाय [illegible]

उवाच— " अयं जन. मे सुखदुःखहेतु न. देवता, आत्मा, ग्रहकर्मकाला: [च अपि] न मनः पर कारण आमनंति (ह्मणतात), यत् [illegible]

परिभूत इमां गाथामगायत नराधमैः ॥ पातयद्भि. स्वधर्मस्थो धृतिमास्थाय सात्त्विकीम् ॥ ४२ ॥ द्विज उवाच । [illegible]

सुखदुःखहेतुर्न देवताऽऽत्मा ग्रहकर्मकालाः ॥ मनः परं कारणमामनंति संसारचक्रं परिवर्तयेद्यत् ॥ ४३ ॥ [illegible] गुणान्सृजते

बलीयस्ततश्च कर्माणि विलक्षणानि ॥ शुक्लानि कृष्णान्यथ लोहितानि तेभ्यः सवर्णाः सृतयो भवंति ॥ ४४ ॥ अनीह आत्मा

मनसा समीहता हिरण्मयो मत्सख उद्विचष्टे ॥ मनः स्वलिंगं परिगृह्य कामान् जुषन्निबद्धो गुणसंगतोऽसौ ॥ ४५ ॥

मनः गुणान् सृजते. तत. विलक्षणानि शुक्लानि, कृष्णानि अथ लोहितानि कर्माणि, तेभ्यः सवर्णाः (सर्वास अनुरूप) सृतयः (गति) भवंति ॥ ४४ ॥ मत्सखः हिरण्मय

तर मग मनाप्रमाणेच अनुरूप अशा - पांढऱ्या, काळ्या, तांबड्या – अनुक्रमें उत्तम, अधम, व मध्यम अशा देव, तिर्यक् व नर इत्यादि) गति प्राप्त होतात. ॥ ४४ ॥ -

ससार असावा आत्म्याला असूं नये ' असें कोणी ह्मणेल तर त्याबद्दल सागतों - मन सगळे व्यापार करीत असतें व परमात्मा त्याच्या बरोबर मित्रत्वानें राहतो पण

त्याला मनाच्या कोणत्याही क्रियेचा संबंध नसतो, कारण तो माझा (जीवाचा) सखा असल्यामुळें ज्ञानशक्तिप्रधान आहे व ह्मणूनच तो केवळ कधीही गुप्त न होणाऱ्या आ-

१ सात्विक धृतीचें गीतेंत असें वर्णन आहे'—

धृत्या यया धारयते मन.प्राणेंद्रियक्रियाः । योगेनाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्विकी ॥

२ जीव आणि मन यांचा संबंध नाथ सांगतात —

मुळीं जीव भावाचा नियता । तोची मनाचेनि एकात्मता । मनाचिया सुखदुःखव्यथा । आपुले माथा नाथिल्या सोशी ॥ ६३० ॥

पण्या ज्ञानाच्या योगें सर्व व्यवहार पाहत असतो; आणि इकडे हा (मी जीव) तर आपल्या संसार प्रकाशित करणाऱ्या मनाला ' हें आत्माच ' अशा बुद्धीनें स्वीकारून त्या मनाच्या कर्मांवर आसक्ति धरिल्यामुळें भोग भोगूं लागतो व बद्ध होतो त्याचा भाव असा :– ही संसृति अविद्यामूलक अध्यासानें आत्म्याला लागली आहे, [illegible] कारण, अविद्यारहित जो ईश्वर त्याला ती नाहीं तर अविद्यासहित जीवाला तेवढी असते). दान, स्वधर्म (नित्यनैमित्तिककर्में), नियम, यम, अध्ययन, [illegible] व इतर समळीं कर्में या समळ्या उपायांचें फळ काय तें मनाचा निग्रह एवढेंच होय. कारण, - यद्यपि तीं ज्ञानाचीं अंगें ह्मणून प्रसिद्ध आहेत. तथापि - मनाचा निग्रह हेंच

आत्मा समीहता मनसा [सद् वर्तमानः अपि] मनीहः. असौ स्वलिंगं मनः परिगृह्य कामान् जुषन् गुणसंगतः निबद्धः. ॥ ४५ ॥ दानं, स्वधर्मः, नियमः, यमः, श्रुतं, कर्माणि सद्व्रतानि च सर्वे मनोनिग्रहलक्षणांताः. हि मनसः समाधिः (निग्रह) परः योगः (ज्ञान). ॥ ४६ ॥ यस्य मनः समाहितं [सत्] प्रशांतं, तस्य दानादिभिः

दानं स्वधर्मो नियमो यमश्च श्रुतं च कर्माणि च सद्व्रतानि ॥ सर्वे मनोनिग्रहलक्षणांताः परो हि योगो मनसः समाधिः ॥ ४६ ॥

समाहितं यस्य मनः प्रशांतं दानादिभिः किं वद तस्य कृत्यम् ॥ असंयतं यस्य मनो विनश्यद्दानादिभिश्चेदपरं किमेभिः ॥ ४७ ॥

मनोवशेऽन्ये ह्यभवं स्म देवा मनश्च नान्यस्य वशं समेति ॥ भीष्मो हि देवः सहसः सहीयान् युंज्याद्वशे तं स हि देवदेवः ॥ ४८ ॥

किं कृत्यं वद. यस्य मनः असंयतं सत् विनश्यत् (क्षीन होणारें) [भवति] चेत्, [तर्हि] एभिः दानादिभिः अपरं किं ? ॥ ४७ ॥ अन्ये देवाः (इंद्रियदेवता) मनोवशे अभवन्. मनः अन्यस्य वशं न समेति. भीष्मः (भयंकर मनोदेवता) देवः सहसः (बलवंताहून) सहीयान् (बलवत्तर). [यः] तं वशे युंज्यात्, सः देवदेवः. ॥ ४८ ॥

उत्तम ज्ञान होय (एतावता, मनोनिग्रह केला कीं सगळें केल्यासारखें होतें; त्यावांचून सर्व व्यर्थ होय). ॥ ४६ ॥ ज्याचें मन निश्चळ व अत्यंत शांत [illegible] दानादिकांच्या योगें कर्तव्य काय सांग बरें ? आणि ज्याचें मन चंचल असून - आळस इत्यादि कारणांमुळें - लय पावत असेल तर त्याला तरी ह्या दानादि [illegible] होणार ? - कांहींच नाहीं. - ॥ ४७ ॥ - कोणी ह्मणेल कीं ' त्या साधनांचा उपयोग इतर इंद्रियें जिंकणें हा होईल ' तर त्या ह्मणण्यांत कांहीं [illegible]

१ ह्याचा भाव दृष्टांत देतात :—

गंगा उतरावया महापूरीं । अतिप्रयासीं तांफा करी । तोची पूर ओसरल्यावरी । तापा आल्हेरी निःशेष ॥ तेवीं कामक्रोधादि वेगशून्य । त्याचें [illegible] त्यासी दानादिकीं प्रयोजन । नाहीं जाण निश्चित ॥ जेवीं सूर्योदय झालिया पाठीं । उपेगा नये लक्ष दिवटी । तेवीं निर्विकल्पता मनीं उठी । तें साधनकोटी [illegible]

नाथ, १६२ अहुन ५२.

देव (इंद्रियें किंवा इंद्रियांच्या अधिष्ठात्री देवता) मनाच्या स्वाधीन असतात, पण मन दुसऱ्याच्या अंकित कधींच होत नाही कारण, मन हा देव बळाहून किंवा बळाच्या हूनही बलवत्तर असल्यामुळें - योग्यानाही - भयंकर वाटतो म्हणून त्याला जो स्वाधीन करून घेईल तो देवाचाही देव (सकल इंद्रियांना जिंकणारा) होतो ॥ ४८ ॥ मनाचे वेग (रागद्वेषादि) असह्य होत म्हणूनच मन हा शत्रु मर्माला पीडा देणारा व दुर्जय आहे त्याला न जिकता जे कोणी लोक ह्या जगात त्याच्यासाठी कित्येक लोकांबरोबर दुष्ट कलह माज-वितात व कोणाला मित्र (अनुकूल), कोणाला उदासीन (मित्रही नव्हत व शत्रुही नव्हत असे) आणि कोणाला शत्रु (प्रतिकूल) करून घेतात, ते मूढ होत. ॥४९॥ त्याच्या बुद्धि केवळ अंध समजाव्या. ते मनुष्य केवळ मनानें कल्पित अशा ह्या स्वदेहाला 'मी' व - पुत्रादिकाच्या शरीराला - ' माझी ' असें मानून ' हा मी ' आणि ' हा दुसरा ' अशा भ्रमामुळे ह्या अपरंपार संसारात भ्रमण करीत राहतात ॥ ५०॥ - एनावता, मनच दु खाचें कारण होय (१) मन, (२) देवता, (३) आत्मा, (४) ग्रह, व (५) काल ही दु

तत् [ये] केचित् दुर्जयं असह्यवेगं अरुंतुदं (मर्मभेदी) त शत्रुं न विजित्य अत्र मर्त्यैः असद्विग्रह कुर्वंति, मित्राणि, उदासीनरिपून् च [कुर्वंति, ते] विमूढाः ॥४९॥ मनोमात्र

तं दुर्जयं शत्रुमसह्यवेगमरुंतुदं तन्न विजित्य केचित् ॥ कुर्वंत्यसद्विग्रहमत्र मर्त्यैर्मित्राण्युदासीनरिपून्विमूढाः ॥ ४९ ॥

देहं मनोमात्रमिमं गृहीत्वा ममाहमित्यंधधियो मनुष्याः ॥ एषो ऽहमन्यो ऽयमिति भ्रमेण दुरतपारे तमसि भ्रमंति

॥ ५० ॥ जनस्तु हेतुः सुखदुःखयोश्चेत् किमात्मनश्चात्र हि भौमयोस्तत् ॥ जिह्वां कचित्संदशति स्वदद्भिस्तद्वेदनायां

इमं देह " अहं मम " इति गृहीत्वा अंधधिय मनुष्याः " एषः अह, अय अन्य. " इति भ्रमेण दुरतपारे तमसि भ्रमति. ॥ ५० ॥ जन. सुखदु खयो हेतु चेत्, [तर्हि] अत्र आत्मनः किं ? हि भौमयोः (पृथ्वीच्या कार्यांना) तत् कचित् स्वदद्भिः (आपल्याच दातानीं) जिव्हा सदशति (चावतो) तद्वेदनायां कतमाय कुप्येत् ? ॥ ५१ ॥

त्याचीं कारणें नव्हत. कशीं ती पहा (येथून पुढें सहा श्लोकापर्यंत अनुक्रमानें ह्यापैकीं एकेक दु खाचे कारण नव्हे असे प्रतिपादन आहे) - (१) हे लोक जर सुख किंवा दु ख मिळण्याचें निमित्त होत असें मानिले तरी ह्या पक्षामध्यें सुद्धा आत्म्याकडे त्याचा काय संबंध आहे ? - आत्मा सुखदु:ख भोगणारा नव्हे व देणाराही नव्हे - ते (सुखदु.खदा-तृत्व व भोक्तृत्व) पृथ्वीचीं कार्यें जे दोन देह (सुखदु.ख देणारा व भोगणारा) त्याकडे असतें, - आत्म्याकडे नसतें, कारण आत्मा अमूर्त व अक्रिय असल्यामुळे तो कोणत्याही क्रियेचा कर्ता किंवा कर्म होत नाहीं. ह्यावर कोणी ह्मणेल की, 'तरी पण सुखदु खाचे पर्यवसान आत्म्याकडेच व्हावयाचें तर त्याला उत्तर हें कीं, दोन्ही देहात ज्या अर्थी आत्मा एकच आहे

त्या अर्थी कोणावरही रागावतां येत नाहीं. उदाहरण पहा :- एकादे वेळीं आपल्याच दांतांनीं जर आपली जीभ चावली तर त्या वेदनेबद्दल राग काढायाचा कोणावर? ॥ ५१ ॥ (२) आतां दुःखाचें कारण देवता असें मानिलें तरी त्या पक्षामध्यें सुद्धा आत्म्याकडे काय येतें? - काहीच नाहीं. कारण, - तें दुःखाचें ठेणें किंवा भोगणें विकार पावणाऱ्या त्या त्या इंद्रियाच्या देवतांकडे असतें (हातानें मुखाला मारिलें व मुखानें हाताचा डासा घेतला तर हात व मुख यांच्या देवता ज्या इंद्र व अग्नि त्यांना तें भोगावें लागलें. विकाररहित व अहंकारशून्य जो आत्मा त्याच्याकडे त्या दुःखाचा संबंध नाहीं). - शिवाय, देवता सर्व देहामध्यें एकच असतात म्हणजे आपल्या इंद्रियाच्या ज्या देवता त्याच सर्व प्राण्यांच्या त्या त्या इंद्रियाच्या देवता होत अर्थात कोणावरही रागावता येत नाहीं. उदाहरण पहा - आपल्याच देहामध्यें एकादे वेळीं एका अंगानें दुसऱ्या अंगाला मारिलें (समजा हातानें तोंडाला मारिलें) तर मनुष्य कोणावर रागावेल बरें? (तसेंच दुसऱ्याच्या हातानें आपल्या मुखाला मारिलें तरी रागावता येत नाहीं कारण, तो दुसऱ्याचा हात तरी आपल्या

कतमाय कुप्येत ॥ ५१ ॥ दुःखस्य हेतुर्यदि देवतास्तु किमात्मनस्तत्र विकारयोस्तत् ॥ यदंगमंगेन निहन्यते
क्वचित् क्रुध्येत कस्मै पुरुषः स्वदेहे ॥ ५२ ॥ आत्मा यदि स्यात्सुखदुःखहेतुः किमन्यतस्तत्र निजस्वभावः ॥
न ह्यात्मनोऽन्यद्यदि तन्मृषा स्यात् क्रुध्येत कस्मान्न सुखं न दुःखम् ॥ ५३ ॥

यदि देवताः दुःखस्य हेतुः, [तर्हि] तत्र आत्मनः किं? विकारयोः (विकार पावणाऱ्या देवांना) तत्. यत् क्वचित् स्वदेहे अंगेन अंगं निहन्यते, पुरुषः कस्मै क्रुध्येत? ॥५२॥

यदि आत्मा सुखदुःखहेतुः स्यात्, [तर्हि] तत्र अन्यतः किं? [सः] निजस्वभावः. हि आत्मनः अन्यत् न. यदि स्यात् [तर्हि] तत् मृषा कस्मात् क्रुध्येत? सुखं न, दुःखं न. ॥ ५३ ॥

हाताप्रमाणेंच इंद्र ह्या देवतेचें अधिष्ठान अर्थात आपल्या हातासारखाच होय). ॥५२॥ (३) आतां आत्म्याचाच सुखदुःखाकार परिणाम होतो म्हणून आत्माच सुखदुःखाचा हेतु होय असें म्हणावें, तरी त्या पक्षामध्यें सुद्धा दुसऱ्यापासून काय होतें? - कांहींच नाहीं. मग रागावायचें कोणावर? कोणावरच नाहीं. कारण - तें सुखदुःख होणें हा निज स्वभाव होय. - ह्यावर कोणी म्हणेल कीं सुख दुःख हें जरी आत्म्याचा परिणाम आहे तरी तो दुसऱ्यामुळें आलेला असतो. म्हणून तो ज्यामुळें घडला त्याच्यावर रागावायाचें तर त्याचें उत्तर सांगतों:- आत्म्याहून वेगळें कांहींच नाहीं. व जर आहे असें भासेल तर तें खोटें होय. अर्थात रागावायाचें कशासाठी कारण, - निमित्त नाहीं - व सुखदुःखही नाहीं. ॥ ५३ ॥

१ एक देह दुसऱ्या देहाला सुखदुःख देऊ शकत नाहीं ह्याचें दृष्टांत नाथ देतातः— जळामाजी जळ सूता (घालिता)। जेवीं जळासी नव्हे व्यथा । का दीपू दीपें एकवटतां। दीपासी सर्वथा दुःख न बाधी ॥ ७७५.

(४) ग्रह सुखदुःखाचें निमित्त ह्मणावें तर त्यापासून तरी जन्मरहित आत्म्याला काय व्हावयाचें आहे ? - कांही नाहीं - कारण, ग्रह पीडा देतात कोणाला ? जन्मास येणाऱ्या देहाला (देह
ज्या लग्नावर जन्मला त्यापासून बाराव्या किंवा आठव्या इत्यादि राशीला ग्रह आले कीं त्या देहाला सुखदुःख देण्यास निमित्त होतात). शिवाय, ग्रहाच्या पीडा अतरिक्षस्थ ग्रहालाच
(त्याच्या पाद किंवा अर्ध अशा दृष्टीच्या भेदानी) होतात. - त्याच्या दृष्टींत जो नसेल त्याला पीडा होत नाहींत (देहाला जी ग्रहाची पीडा होते ती तरी तो ज्या लग्नावर ज-
न्मास आला असेल त्या राशीबद्दल अभिमानामुळें होते), असें ह्मणतात. पुरुष (आत्मा) तर त्या ग्रहाहून व देहाहून वेगळा होय. तेव्हा त्यानें रागावावें कोणावर ? ॥ ६४ ॥
(५) आता कर्मच जर सुखदुःखाचें निमित्त असेल, तर - खुशाल असो बापडें. - त्यापासून आत्म्याला काय असणार ? - काहीं नाहीं. - कारण, कर्म मुळीं एकालाच जर जडत्व व अजडत्व
हीं असतील तर उद्भवणार (जड असेल तर विकार होणें संभवतें व तोच चेतन असेल तर हिताच्या अनुसंधानानें कर्म करण्यास प्रवृत्त होईल). - पण तशी गोष्ट मुळीच नाही -
ग्रहाः सुखदुःखयोः निमित्तं चेत्, [तर्हि] अजस्य आत्मनः किं? ते जनस्य वै [सुखदुःखदाः] ग्रहैः ग्रहस्य एव पीडा वदंति. ततः अन्यः पुरुषः कस्मै कुध्येत ? ॥ ५४ ॥
कर्म सुखदुःखयोः हेतुः अस्तु चेत्, [तर्हि] आत्मनः किं ? हि तत् जडाजडत्वे. देहः तु अचित्. अय पुरुषः सुपर्णः (शुद्धज्ञानरूप). कस्मै क्रुध्येत ? हि मूलं कर्म न. ॥ ५५ ॥

ग्रहा निमित्तं सुखदुःखयोश्चेत् किमात्मनोऽजस्य जनस्य ते वै ॥ ग्रहैर्ग्रहस्यैव वदंति पीडां क्रुध्येत कस्मै
पुरुषस्ततोऽन्यः ॥ ५४ ॥ कर्मास्तु हेतुः सुखदुःखयोश्चेत् किमात्मनस्तद्धि जडाजडत्वे ॥ देहस्त्वचित्पुरुषो
ऽयं सुपर्णः क्रुध्येत कस्मै न हि कर्म मूलम् ॥ ५५ ॥ कालस्तु हेतुः सुखदुःखयोश्चेत् किमात्मनस्तत्र
तदात्मकोऽसौ ॥ नाग्नेर्हि तापो न हिमस्य तत्स्यात् क्रुध्येत कस्मै न परस्य द्वंद्वम् ॥ ५६ ॥

कालः सुखदुःखयोः हेतुः चेत्, [तर्हि] तत्र आत्मनः किं ? असौ तदात्मकः. हि अग्नेः [हेतोः तदंशस्य ज्वालादेः] तापः न. हिमस्य तत् [तदंशस्य नाशकं] न
देह जड - ह्मणून त्याची कर्माकडे प्रवृत्ति संभवणार नाहीं. - आणि पुरुष (जीव) तर चेतन ह्म० शुद्ध ज्ञानरूप (अकर्ता). तेव्हा आता रागावायाचें कोणावर ? कारण सुखदुःखाचें मूळभूत
कर्मच मुळीं नाहीं. ॥ ६५ ॥ (६) आता काळच जर सुखदुःखाचा हेतु असेल तर त्यापक्षीही आत्म्याला काय असणार ? कारण आत्मा मुळीं काळरूपच (ब्रह्मरूप) होय
- स्वतापासूनच स्वतांला ताप किंवा पीडा होणें कधीच संभवत नाहीं. उदाहरण पहा. - अग्नीपासून त्याच्या अंशभूत ज्वाला जळून नाश पावल्या असे कधीच होत नाही. - ह्मावर
कोणी ह्मणेल कीं ' त्या ज्वालांना उपाधिभूत जीं काष्ठें ती जळली कीं ज्वाला नाहींतशा होतातच ' तर दुसरें उदाहरण घ्या - हिमाचें (बर्फाचें) शैत्य हिमाच्या बारीक बारीक
कणांना बाधकें न त्यांचे काम नष्ट झाले असें कधीं होत नाहीं. - शिवाय, अंशाची गोष्टच एकीकडे असूं द्या. - वस्तुतः हा मुळीं परमात्माच होय. परमात्म्याचा व सुखदुःखादि द्वंद्वाचा

काही संबंध नाही. ॥५६॥ - एकदरीत सुखदुःखांची ही सहाही कारणे नव्हत असे ठरले. ह्यांहून वेगळेंच कोणी उभे करूं लागेल तर तेही संभवायाचे नाहीं कारण, पहा - अहंकार ह्मणजे नसत्याच संसाराला प्रकाशित करणारा (उभारणारा) होय, त्याला जसा सुखदु खादि द्वंद्वाचा संबंध होईल, तसा प्रकृतीहून पर जो परमात्मा त्याला तो (सुखदु खादि द्वंद्वाचा संबंध) कोणत्याही निमित्तानें, कोठेंही व कशाही प्रकारें व्हावयाचा नाहीं (एकंदरींत तो संबंध अहंकारादि निमित्तामुळें उद्भवणारा आहे, वास्तव नव्हे) असें ज्याला समजलें तो पुरुष प्राण्याच्या निमित्तानें भय पावत नाहीं. ॥ ५७ ॥ फार प्राचीन काळचे मोठमोठे ऋषि ह्याच परमात्मनिष्ठेचा आश्रय करून राहिले ह्मणून तो मीही हिचा आधार धरून

स्यात् कस्मै कुध्येत ? परस्य (प्रकृतीहून पर अशा आत्म्याला) द्वंद्वं (सुखदु खादिक) न. ॥ ५६ ॥ यथा संसृतिरूपिण अहमः (अहंकाराला), [तथा] परत परस्य क्वचन क आपि केनचित् कथचन द्वंद्वोपराग. न स्यात. एवं प्रबुद्ध. भूतैः न बिभेति. ॥ ५७ ॥ सः अहं मुकुंदांघ्रिनिषेवया एव पूर्वतमैः महर्षिभि अध्यासिता एता परात्मनिष्ठा आ-

न केनचित्क्वापि कथंचनास्य द्वंद्वोपरागः परतः परस्य ॥ यथा ऽहमः संसृतिरूपिणः
स्यादेवं प्रबुद्धो न बिभेति भूतैः ॥ ५७ ॥ एतां स आस्थाय परात्मनिष्ठामध्यासितां
पूर्वतमैर्महर्षिभिः ॥ अहं तरिष्यामि दुरंतपारं तमो मुकुंदांघ्रिनिषेवयैव ॥ ५८ ॥
श्रीभगवानुवाच । निर्विद्य नष्टद्रविणो गतक्लमः प्रव्रज्य गां पर्यटमान इत्थम् ॥
निराकृतो ऽसद्भिरपि स्वधर्मादकंपितो ऽमूं मुनिराह गाथाम् ॥ ५९ ॥ सुखदुःखप्रदो
नान्यः पुरुषस्याऽऽत्मविभ्रमः ॥ मित्रोदासीनरिपवः संसारस्तमसः कृतः ॥ ६० ॥

स्थाय दुरंतपारं तमः तरिष्यामि. ॥ ५८ ॥ श्रीभगवान् उवाच— इत्थं नष्टद्रविणः निर्विद्य (वैराग्य पावून) गतक्लमः (श्रमरहित) प्रव्रज्य (संन्यास करून) गां पर्यटमान (फिरणारा) असद्भिः निराकृतः (अवमानिलेला) अपि मुनिः स्वधर्मात् अकंपितः (अढळ) [सन्] अमूं गाथा आह. ॥ ५९ ॥ पुरुषस्य सुखदु खप्रद अन्य न मित्रोदासीन-

मी मुकुंदाच्या चरणांची सेवा हेच चालवीन. ॥ ५८ ॥ श्रीभगवान् ह्मणाले – उद्धवा, अशा प्रकारें द्रव्य नष्ट झाल्यामुळें त्या ब्राह्मणाला वैराग्य उद्भवलें लागलेच त्याचे कष्ट दूर झाले. पुढें त्या मुनीनें संन्यास घेतला, पृथ्वीपर्यटन चालविलें, आणि असज्जनांनी पीडा दिली तरी स्वधर्मापासून न ढळता, ही (मागें सांगितलेली) गाथा गाइली ॥ ५९ ॥ - ह्यातील सारांश एवढाच कीं, - पुरुषाला सुख किंवा दुःख देणारा दुसरा कोणी नाही. मित्र, उदासीन व शत्रु हा सगळा संसार केवळ अज्ञानानें मनाचा खेळ रचिलेला

होय, - वास्तव नव्हे. - ॥ ६० ॥ म्हणून, बा उद्धवा, बुद्धि माझे ठिकाणीं निश्चल लावून तिच्या योगें सर्वतोपरी मनाचा निग्रह कर योगाभ्यासाचा मुख्य साध्य निष्कर्ष काय तो एवढाच होय. ॥६१॥ भिक्षूनें गाइलेली ही ब्रह्मनिष्ठा जो कोणी एकाग्रपणें चित्तीं धरील, लोकाना ऐकवील किंवा श्रवण करील, त्याला सुखदुःख, जयअपजय इत्यादि द्वंद्वाची बाधा अगदीं होणार नाहीं. ॥ ६२ ॥

॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने एकादशस्कंधे त्रयोविंशतितमो ऽध्यायः ॥२३॥

रिपवः संसारः तमसः कृतः आत्मविभ्रमः. ॥ ६० ॥ तस्मात् तात, मयि आवेशितया धिया युक्त [सन्] सर्वात्मना मन निगृह्णाण. एतावान् योगसंग्रहः. ॥ ६१ ॥ यः स-माहितः [सन्] एतां भिक्षुणा गीतां ब्रह्मनिष्ठां धारयन्, शृण्वन्, श्रावयन् [च भवति, सः] द्वंद्वैः न एव अभिभूयते ॥ ६२ ॥

इति भागवतान्वये एकादशस्कंधे त्रयोविंशोऽध्यायः. ॥ २३ ॥

तस्मात्सर्वात्मना तात निगृहाण मनो धिया ॥ मय्यावेशितया युक्त एतावान्योगसंग्रहः ॥ ६१ ॥
य एतां भिक्षुणा गीतां ब्रह्मनिष्ठां समाहितः ॥ धारयन् श्रावयन् शृण्वन् द्वंद्वैर्नैवाभिभूयते ॥ ६२ ॥
इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे भिक्षुगीतानाम त्रयोविंशो ऽध्याय· ॥ २३ ॥
श्रीभगवानुवाच । अथ ते संप्रवक्ष्यामि सांख्यं पूर्वैर्विनिश्चितम् ॥ यद्विज्ञाय पुमान्सद्यो जह्याद्वैकल्पिक भ्रमम्
॥ १ ॥ आसीज्ज्ञानमथो अर्थ एकमेवाविकल्पितम् ॥ यदा विवेकनिपुणा आदौ कृतयुगे ऽयुगे ॥ २ ॥

श्रीभगवान् उवाच— अथ (आता) ते (तुला) पूर्वैः (पुरातन ऋषींनीं) विनिश्चितं (निश्चित केलेलें) सांख्य (तत्त्वविचारात्मक शास्त्र) संप्रवक्ष्यामि, (सांगेन) यत् (जे) विज्ञाय (जाणून) पुमान् (पुरुष) सद्य· (तात्काळ) वैकल्पिक (भेदरूपी) भ्रमं जह्यात् (टाकील), ॥ १ ॥ अयुगे (प्रलयकाळीं) आदौ कृतयुगे, यदा (जेव्हा) विवेकनिपुणा (विचारी)

श्रीकृष्ण म्हणाले:— - अद्वितीय परमात्म्यापासून मायेच्या योगानें प्रकृतिपुरुषद्वारा सर्व द्वैत उत्पन्न होतें आणि पुन्हा तें त्याठिकाणींच लय पावतें, असें अनुसंधान ठेवणाऱ्या साधकाचा द्वैतभ्रम निवृत्त होतो यासाठी - उद्धवा ! तुला कपिलादिक पूर्वाचार्यांनीं निश्चित केलेलें 'सांख्य'[1] शास्त्र सांगतों ते जाणले असता मनुष्याचा भेदनिमित्तक सुखदुःखादिकरूप भ्रम तत्काळ नाहींसा होतो. ॥ १ ॥ पूर्वी प्रलयकाळी द्रष्टा, दृश्य इत्यादि सर्व प्रपंच मिळून एक ज्ञानरूपच पदार्थ होता, त्यात तिळमात्रही दुसरा काहीं विकल्प नव्हता.

---

१ प्रकृतिपुरुषाचे व्युत्पत्तीचें शास्त्र (वेदान्तशास्त्र) श्लोक १८ अध्याय १४ टीप पहा.

अशी स्थिति जशी प्रलयकाली होती तशीच प्रथमें कृतयुगांत व अन्य युगांतही जेव्हां जेव्हा विचारनिपुण असे नर उत्पन्न होतात तेव्हा ती असते कारण त्यास किंचिन्मात्रही ज्ञानस्वरूपाचे ठायीं भेदाचें भान कधींच असत नाहीं. ॥ २ ॥ असें निर्विकल्प ज्ञानरूप जें ब्रह्म तेंच केवळ माया आणि फल (प्रतिबिंब) अशा रीतीनें दोन प्रकाराचें होऊन वाणी व मन यास गोचर (विषयभूत) असें झालें. ॥ ३ ॥ या दोन प्रकारामध्यें एक पदार्थ कार्यकारणरूप प्रकृति होय; आणि दुसरा पदार्थ ज्ञान होय, यासच पुरुष असे

मयंति, [तदा आपि] अथो ज्ञानं, अर्थः [च] अविकल्पितं (भेदशून्य) एकं एव आसीत्. ॥२॥ केवलं निर्विकल्पितं सत्यं तत् बृहत् मायाफलरूपेण (दृश्य व त्याचें स्फुरण या रूपानें) वाङ्मनोगोचर (वाणीस व मनास विषय) [यथा तथा] द्विधा (दोन प्रकाराचें) समभवत्. ॥ ३ ॥ तयोः (दोहोंपैकीं) एकतरः (एक) अर्थः प्रकृतिः. सा उभयात्मिका. (कार्यकारणरूप). अन्यतमः (दुसरा) भावः ज्ञानं. सः पुरुषः अभिधीयते. ॥ ४ ॥ मया, पुरुषानुमतेन च प्रक्षोभ्यमाणायाः (क्षुब्ध केलेल्या) प्रकृतेः तमः, रजः, सत्वं इति गुणाः

तन्मायाफलरूपेण केवलं निर्विकल्पितम् ॥ वाङ्मनोऽगोचरं सत्यं द्विधा समभवद्बृहत् ॥ ३ ॥

तयोरेकतरो ह्यर्थः प्रकृतिः सोभयात्मिका ॥ ज्ञानं त्वन्यतमो भावः पुरुषः सोऽभिधीयते ॥४॥

तमो रजः सत्त्वमिति प्रकृतेरभवन्गुणाः ॥ मया प्रक्षोभ्यमाणायाः पुरुषानुमतेन च ॥ ५ ॥

तेभ्यः समभवत्सूत्रं महान्सूत्रेण संयुतः ॥ ततो विकुर्वतो जातो यो ऽहंकारो विमोहनः ॥ ६ ॥

अभवन् (झाले) ॥ ५ ॥ तेभ्यः (त्यापासून) सूत्रं (सूत्रात्मा) समभवत्. [ततः] महान् (महत्तत्त्व). [सः] सूत्रेण संयुतः. यः विमोहनः अहंकारः, [सः] विकुर्वतः (विकार पावणाऱ्या) ततः (त्या महत्तत्त्वापासून) जातः. ॥ ६ ॥

म्हणतात. ॥ ४ ॥ तम, रज आणि सत्व हे तीन गुण प्रकृतीपासून उत्पन्न झाले. उद्धवा ! मी जो परमेश्वर त्यानें पुरुषाच्या अनुमतानें प्रकृतीस क्षोभ केला असता त्या गुणांपासून क्रियाशक्तिमान् 'सूत्र' नावाचा प्रथम विकार झाला. त्यापासून महत्तत्त्व — ज्ञानशक्तिप्रधान — झालें. त्या महत्तत्त्वास विकार होऊन त्यापासून जीवास मोह करणारा अहंकार उत्पन्न झाला. ॥ ५ ॥ ६ ॥

१ जेथें अळें बीज शोषूनी । दोनी दळें उकलूनी । बिरू (अंकुर) निघाला त्यांतूनी । तरतरूनी तिवणा (त्रिपद) पैं ॥ १०६॥ नाथ.

तो अहंकार सात्विक, राजस, आणि तामस याप्रमाणें तीन प्रकाराचा होय तो चिजडग्रंथिरूप असून शब्दादि पंचविषय, इंद्रियें. मन व देवता याच्या उत्पत्तीस कारण होतो. - यद्यपि "तस्माद्वा एतस्मादात्मन आकाश संभूत" इत्यादि श्रुतींवरून प्रथम पंचमहाभूतें आकाशादि क्रमानें होतात तीं भूतें अपंचीकृत (एकमेकात मिश्रण न पावलेलीं) असताना त्यांपासून प्राणादिक्रमानें समष्ट्यात्मक सूक्ष्मशरीर उत्पन्न होतें. आणि पंचीकृत (एकमेकात मिश्रण पावलेल्या) भूतापासून हे स्थूल ब्रह्मांड उत्पन्न होतें त्या ब्रह्मांडात वैराज पुरुष वास्तव्य करतो. त्याचा अंतर्यामी लीलाविग्रहधारी क्षीरसमुद्रशायी श्रीनारायण होय. त्याच्या नाभिकमलापासून ब्रह्मदेव झाला नंतर त्यापासून यथाकालीं इतर जीवाची उत्पत्ति झाली. अशी उत्पत्तीची सरणी आहे तथापि येथें आधी महत्तत्त्वापासून अहंकार आणि नंतर त्यापासून भूतेन्द्रियादिक सर्व प्रपंच उत्पन्न होतो अशा रीतीने महत्तत्वादि क्रमानें सृष्टी सांगितली आहे म्हणून विरोध मनात आणण्याचें कारण नाहीं, कारण, जिज्ञासूंच्या मनात येण्याकरिता मृत्तिका व घट, लोह व लोखंडी पदार्थ, आणि अग्नि व ठिणग्या इत्यादि दृष्टांतावरून निरनिराळ्या प्रकारें सृष्टिक्रम सांगितला आहे तो केवळ बुद्धीत येण्याकरिता आहे त्यावरून त्यात मतभेद आहे असे समजू नये. - ॥ ७ ॥ असो. त्रिविध अहंकारापैकीं शब्दादि विषयास कारणभूत जो तामस अहंकार त्यापासून महाभूतें झालीं राजस अहंकारापासून दश इंद्रियें झालीं आणि सात्विक अहंकारापासून दिशा, वायु, सूर्य, वरुण, अश्विनीकुमार, अग्नि, इंद्र, विष्णु, मित्र आणि चंद्र ह्या देवता आणि मन उत्पन्न झालें ॥ ८ ॥ मी प्रेरणा केलेले हे सर्व सृष्ट पदार्थ एकमेकाचे साह्यानें कार्य करणारे झाले आणि त्यानी वैराजांतर्यामी जो मी त्या माझें निवासस्थान हें ब्रह्मांड उत्पन्न केलें ॥ ९ ॥ तें ब्रह्मांड पाण्यात स्थित असता त्याजमध्यें श्रीनारायणरूपी मी लीलाविग्रहानें प्राडुर्भूत झालों. मग माझ्या नाभीचे ठायी सर्व जगताला कारणभूत असें कमल उत्पन्न झालें. आणि

वैकारिकः (सात्विक) तैजस (राजस), तामसः च इति त्रिवृत् (त्रिगुणात्मक) चिदचित् मय. (चिजडरूप) अहं (अहंकार) तन्मात्रेंद्रियमनसां कारणं. ॥ ७ ॥ तन्मात्रिकात् (शब्दादि तन्मात्रास कारण अशा), तामसात् अर्थ. (महाभूतें) जज्ञे (उत्पन्न झाला). तैजसात् इंद्रियाणि [झालीं] (झालीं) वैकृतात् (सात्विक अहंकारापासून) एकादश देवता. आसन्. ॥ ८ ॥ मया संचोदिताः (प्रेरित) संहत्य (संघातरूपाने) कारिणः (कार्य करणारे) सर्वे भावाः मम उत्तम आयतन (स्थान) अंड (ब्रह्मांड) उत्पादयामासुः (उत्पन्न करिते झाले). ॥ ९ ॥ तस्मिन् सलिलसंस्थितौ अंडे अहं समभवं. मम नाभ्यां विश्वाख्य पद्म (कमल) अभूत्, तत्र च आत्मभू (ब्रह्मदेव) [आविरभूत्] (प्रगट झाला) ॥ १० ॥

वैकारिकस्तैजसश्च तामसश्चेत्यहं त्रिवृत् ॥ तन्मात्रेंद्रियमनसां कारणं चिदचिन्मयः ॥ ७ ॥ अर्थस्तन्मात्रिकाज्जज्ञे तामसादिंद्रियाणि च ॥ तैजसाद्देवता आसन्नेकादश च वैकृतात् ॥८॥मया संचोदिता भावाः सर्वे संहत्यकारिणः ॥ अंडमुत्पादयामासुर्ममायतनमुत्तमम् ॥ ९ ॥ तस्मिन्नहं समभवमंडे सलिलसंस्थितौ ॥ मम नाभ्यामभूत्पद्मं विश्वाख्यं तत्र चाऽऽत्मभूः ॥ १० ॥

त्याचे ठायीं ब्रह्मदेव उत्पन्न झाला; ब्रह्मदेवानें रजोगुणयुक्त मायार्थ—देह धारण करून पुन्हां वैराज पुरुषच तेथें प्रकट झाला. ॥ १० ॥ तो रजोगुणानें युक्त असून माझ्या अनुग्रहानें तप करून भूर्लोक (अतलादि सप्तपातालसह पृथ्वी), भुवर्लोक (अंतरिक्षलोक) आणि स्वर्लोक (स्वर्गलोक—यातच महर्लोक, जनोलोक, तपोलोक आणि सत्यलोक हेही समजावे) याप्रमाणें तीन लोक (निवासस्थानें) आणि त्यांचें पालन करणारे यास उत्पन्न करिता झाला. ॥ ११ ॥ - आता ही लोकसृष्टि करण्याचें प्रयोजन तुला सांगतो - यापैकीं स्वर्गलोक देवाचें निवासस्थान झाला. भुवर्लोक हा भूतांचें (पिशाचादिकांचें) निवासस्थान झाला, भूर्लोक मनुष्यादिकांचें स्थान झाला, महर्लोकादिक सिद्धांचीं स्थानें झालीं

रजसा युक्तः विश्वात्मा सः मदनुग्रहात् तपसा सपालान् (लोकपालसहित) भूः, भुवः, स्वः इति त्रिधा लोकान् असृजत् (उत्पन्न करिता झाला) ॥ ११ ॥ स्व देवानां ओक (स्थान) आसीत्. भूतानां भुवः (भुवर्लोक) पदं (स्थान), भूः मर्त्यादीनां लोकः. सिद्धानां त्रितयात् (भूर्लोक, भुवर्लोक, आणि स्वर्लोक याहून) परं. ॥१२॥ प्रभु असुराणां, नागानां

सो ऽसृजत्तपसा युक्तो रजसा मदनुग्रहात् ॥ लोकान्सपालान्विश्वात्मा भूर्भुवःस्वरिति त्रिधा ॥ ११ ॥
देवानामोक आसीत्स्वर्भूतानां च भुवः पदम् ॥ मर्त्यादीनां च भूर्लोकः सिद्धानां त्रितयात्परम् ॥ १२ ॥
अधो ऽसुराणां नागानां भूमेरोको ऽसृजत्प्रभुः ॥ त्रिलोक्यां गतयः सर्वाः कर्मणां त्रिगुणात्मनाम् ॥ १३ ॥
योगस्य तपसश्चैव न्यासस्य गतयो ऽमलाः ॥ महर्जनस्तपः सत्यं भक्तियोगस्य मद्गतिः ॥ १४ ॥
मया कालात्मना धात्रा कर्मयुक्तमिदं जगत् ॥ गुणप्रवाह एतस्मिन्नुन्मज्जति निमज्जति ॥ १५ ॥

[च] ओकः भूमेः अधः असृजत्. त्रिलोक्यां त्रिगुणात्मनां कर्मणां सर्वाः गतयः [सन्ति]. ॥ १३ ॥ योगस्य, तपसः, न्यासस्य (संन्यासाची) च एव महः, जनः, तपः सत्यं [च इति] अमलाः गतयः. भक्तियोगस्य मद्गतिः (वैकुंठलोक). ॥ १४ ॥ कर्मयुक्तं इदं जगत् कालात्मना धात्रा (निर्माण करणारा) मया एतस्मिन् गुणप्रवाहे उन्मज्जति

॥ १२ ॥ आणि भूमीचे अधोभागीं जीं अतलवितलादि सप्त तळें आहेत तीं असुर व नाग याचीं निवासस्थानें झालीं. - उद्धवा ! अशी व्यवस्था करण्याचें कारण एक - नानादिकांसहित या लोकत्रयामध्यें (भू, भुवः व स्वः) त्रिगुणात्मक कर्मांच्या सर्व गति होतात. ॥ १३ ॥ महर्लोक, जनोलोक, तपोलोक, आणि सत्यलोक ह्या योग, तप, आणि संन्यास यांच्या म्हणजे यानीं साध्य होणाऱ्या निर्मळ गति होत; आणि भक्तियोगाची किंवा भक्तियोगानें साध्य होणारी गति माझा लोक वैकुंठ होय. । १४ ॥ या उद्धवा ! त्यात मल्लोक वैकुंठ गतीवांचून इतर चंचल आहेत. कालात्मक असा मी परमेश्वर जीवास तत्तत्कर्मांचीं फळें देत असल्यामुळें हें कर्माधीन सर्व जग या गुणत्रयप्रवाहरूपी संसारामध्यें उन्मज्जन व

नियमन करीत आहे ह्मणजे सत्यलोकापर्यंत ऊर्ध्वगतीस आणि स्थावर योनीपर्यंत अधोगतीस सत्कर्मदुष्कर्मांच्या योगानें प्राप्त होत आहे. ॥ १५ ॥ हे उद्धवा! लहान, मोठा, कृश, व स्थूल जो जो पदार्थ प्रसिद्ध आहे तो तो सर्व प्रकृति आणि पुरुष या उभयतानी सयुक्त आहे ॥ १६ ॥ जो पदार्थ ज्याचा आदि (कारण) आणि अन्त ह्मणजे लयस्थान आहे तोच त्याचा मध्यही होय जसे अलंकारास आदि व अंत, किंवा कारण व लयस्थान सुवर्ण असल्यामुळें त्याचा मध्यही सुवर्णच होय तद्वत् आणि अशा रीतीने कार्याच्या आर्दी मध्यें आणि अंतीं असणारा जो पदार्थ तोच सत्य होय. जसें सुवर्ण, किंवा मृत्तिका केवळ मध्येंच भासणारा आणि आदिअंतीं नसणारा तो पदार्थ खरा नाहीं जसा अलंकार किंवा घट. - तर मग ही मिथ्या कार्यसृष्टी करण्याचें प्रयोजन काय ह्मणशील तर ऐक - हे उद्धवा! विकार ह्मणजे कार्य केवळ व्यवहाराकरितां आहे जसें शरीरावर सुशोभित रीतीनें धारण करण्याकरिता अलंकार किंवा जलानयनादि व्यवहाराकरिता घट तद्वत् ॥ १७ ॥ जो कारणरूप पूर्व पदार्थ उपादान कारणास घेऊन अन्य कार्य उत्पन्न

(उसळतें), निमज्जति (बुडतें) ॥ १५ ॥ अणुः, बृहत् (मोठा), कृशः, स्थूलः [च] यः यः भावः (पदार्थ) प्रसिद्ध्यति, सर्वः अपि प्रकृत्या, पुरुषेण च उभयसंयुक्तः ॥ १६ ॥ यः यस्य आदिः, अंतः च, सः तस्य मध्यं. [सः एव] सन्. यथा तैजसपार्थिवाः, [तथा] विकारः व्यवहारार्थः ॥ १७ ॥ पूर्वः भावः यत् उपादाय अपरं विकुरुते,

अणुर्बृहत्कृशः स्थूलो यो यो भावः प्रसिध्यति ॥ सर्वोऽप्युभयसंयुक्तः प्रकृत्या पुरुषेण च ॥ १६ ॥ यस्तु यस्यादिरंतश्च स वै मध्यं च तस्य सन् ॥ विकारो व्यवहारार्थो यथा तैजसपार्थिवाः ॥ १७ ॥ यदुपादाय पूर्वस्तु भावो विकुरुतेऽपरम् ॥ आदिरंतो यदा यस्य तत्सत्यमभिधीयते ॥ १८ ॥ प्रकृतिर्ह्यस्योपादानमाधारः पुरुषः परः ॥ सतोऽभिव्यंजकः कालो ब्रह्म तत्रितयं त्वहम् ॥ १९ ॥

[सः एव सन्. यत्] यदा यस्य आदिः अंतः [च विवक्ष्यते, तदा] तत् सत्यं अभिधीयते. ॥ १८ ॥ अस्य सतः उपादान (मूळकारण), [या] प्रकृतिः, [यः तस्याः] आ-

करतो तोच सत्य होय; जसा: मातीचा पिंड (गोळा) मातीस उपादानत्वानें स्वीकारून आपण निमित्तभूत होत्साता घटरूपी कार्यास उत्पन्न करतो तसेच— महत्तत्वादिक सद्रूपास उपादानत्वानें स्वीकारून अहंकारादि कार्यास उत्पन्न करतात. येथें (घटरूप) कार्यदृष्टीनें जशी मृत्पिंडास सत्यता आहे, तशी अहंकारादि कार्यदृष्टीने महत्तत्वादिकास सत्यता आहे. - तर मग श्रुतीनें मृत्तिकाच सत्य असें का ह्मटलें पिंड सत्य का ह्मटलें नाहीं असें ह्मणशील तर ऐक - परम कारण जें परब्रह्म त्यासच सत्यता प्रतिपादन करण्याची श्रुतीची इच्छा असल्यामुळें तिनें दृष्टांतांत मृत्तिकेसच सत्य ह्मटलें आहे. मृत्तिकेचा गोळा जरी घटसबंधानें कारण ह्मणून सत्य ह्मटला तरी मृत्तिकादृष्टीनें तो कार्य असल्यामुळे सत्य नाहीं; तद्वत् जगद्दृष्ट्या महत्तत्वादि कारणास सत्यता मानिली तरी ब्रह्मदृष्ट्या तीं कार्येंच असल्यामुळें त्यास सत्यता नाही. तर एक ब्रह्मच परम सत्य होय ॥ १८ ॥ उद्धवा! तूं आतां कदाचित् असें ह्मणशील कीं, प्रकृति, पुरुष, आणि काल हे स्वतः कार्यभूत नसून जगद्रूप कार्यास निमित्त कारणे आहेत, तर मग जगत्कारण परमात्म्यास

अद्वितीयत्व कसें [१] तर याविषयीं सांगतों. - ह्या जगताचें उपादान कारण जी प्रकृति ती, आणि तिचा आधार जो पुरुष तो, आणि गुणांचा क्षोभ करून जगत्कार्यास व्यक्तता देणारा जो काल तो, याप्रमाणें हें त्रयही ब्रह्मरूप मीच होय हें समजून भिन्न नाहीं कारण, प्रकृति तर माझी शक्तीच आहे आणि पुरुष व काल हे माझ्या अवस्था होत. ॥१९॥ या प्रकारें कालत्रयींही अव्यभिचारी असल्यामुळें ब्रह्मच सत्य आहे असें सांगण्याकरितां तें (ब्रह्म) सृष्टिकारण असल्यानें जगाचें आणि त्याचें सत्यत्व सांगून मध्येंही त्याचेंच सत्यत्व उपपादन करून शेवटीं लयकालींही मर्यादारूपानें तेंच सत्य आहे असें दर्शविण्याकरितां सृष्टीची जी प्रवाहरूप स्थिति आहे तिचा अवधि (मर्यादा) तुला सांगतों- उद्धवा ! नानाप्रकारच्या देहांत जन्म पावणाऱ्या जीवाला विविध भोग मिळवून देण्यासाठीं केलेली ही सृष्टी पिता, पुत्र, पौत्र इत्यादि रूपानें अविच्छिन्न असून फार मोठी आहे. ही स्थितिकाल आहे तोंपर्यंत अशीच राहते - स्थितिकालाचा अवधि कोणता ह्मणशील तर - जोंपर्यंत परमेश्वराचें अवलोकन आहे तोंपर्यंत स्थिति-

धारः परः पुरुषः, [च] अभिव्यंजकः (स्पष्ट करणारा) कालः, तत् त्रितयं ब्रह्म अहं. ॥ १९ ॥ यावत् ईक्षणं, तावत् स्थित्यंतः. [यावत् सः, तावत्] महान् गुणविसर्गार्थः. सर्गः (सृष्टि) पौर्वापर्येण नित्यशः प्रवर्तते. ॥ २० ॥ लोककल्पविकल्पकः विराट् मया आसाद्यमानः (व्याप्त जाणारा) [सन्] भुवनैः सह पंचत्वाय (लय) विशेषाय

सर्गः प्रवर्तते तावत्पौर्वापर्येण नित्यशः ॥ महान् गुणविसर्गार्थः स्थित्यंतो यावदीक्षणम् ॥ २० ॥
विराण्मया ऽऽसाद्यमानो लोककल्पविकल्पकः ॥ पंचत्वाय विशेषाय कल्पते भुवनैः सह ॥ २१ ॥
अन्नं प्रलीयते मर्त्यमन्नं धानासु लीयते ॥ धाना भूमौ प्रलीयंते भूमिर्गंधे प्रलीयते ॥ २२ ॥

कल्पते. ॥२१॥ मर्त्यं अन्ने प्रलीयते. अन्नं धानासु (बीजाचेठायीं) लीयते. धानाः भूमौ प्रलीयंते. भूमिः गंधे प्रलीयते. ॥ २२ ॥

काल समजावा. ॥२०॥ - आतां प्रलय तुला सांगतों :- ह्या लोकाचे सृष्टिप्रलय अनेक जेथें नेहमीं घडतात असें मीं व्यापलेलें हें भुवनांसहित ब्रह्मांड स्थितिकाल संपल्यावर पंचत्वास योग्य होतें. ह्मणजे पंचभूतांचे ऐक्यापासून झालेलें सर्व जग पाच प्रकारांनीं विभागास प्राप्त होऊन नाश पावतें. ॥ २१ ॥ - त्या ह्या आत्म्यापासून आकाश उत्पन्न झालें, आकाशापासून वायु, वायूपासून अग्नि, अग्नीपासून पाणी, पाण्यापासून पृथ्वी, पृथ्वीपासून ओषधी, ओषधीपासून अन्न आणि अन्नापासून पुरुष अशा प्रकारें श्रुतीनें सांगितलेल्या सृष्टिक्रमाच्या उलट जगलयाचा प्रकार आतां सांगतों - हें शरीर, - ज्यापासून पुष्ट होतें तें अन्न दुष्काळामुळें अनावृष्टि होऊन क्षीण (नष्ट) झालें असतां - त्यांतच लीन होतें. तें अन्न बीजामध्यें लय पावतें ह्मणजे बीजें मात्र शेष राहतात ती बीजें भूमीचेठायीं लय पावतात ह्मणजे पेरिलीं असतां उगवत नाहींत. भूमि गंधांत लीन होते ह्म०

१ जेवीं तंतु गसाव कोटीं पट । कोटी पटीं तंतू एकवट । पहातां आदिमध्य शेवट । द्वैताचें गोट दिसेना ॥ ४६६. तरंगा आदिमध्य अवसानीं । जेवीं पाणीपणें असे पाणी । तेवीं उत्पत्ति स्थिति निधानीं । वस्तु वस्तुपणीं अनश्वर ॥ नाथ, ४७२.

प्रलय काळींच्या सूर्यतापानें शुष्क होऊन व शेषाच्या मुखांतल्या अग्नीनें दग्ध होऊन गंधरूपानें मात्र अवशिष्ट राहते ॥२२॥ तो गंध - शंभरवर्षें अतिवृष्टि झाल्यामुळें कुजून जाऊन - उदकांत लीन होतो. याचप्रकारें उदकें - तेजानें शुष्क होऊन - रसात लीन होतात छ० रसरूपानें मात्र शेष राहतात. नंतर तो रसही त्या तेजात नाहीसा होतो तेज वायूनें पराभूत होऊन - रूपमात्रानें अवशिष्ट राहतें. ॥ २३॥ तें रूप वायूंत नाहीसें होऊन जातें व तो वायु कालप्रेरित अशा आकाशानें ग्रस्त होऊन स्पर्शमात्र अवशिष्ट राहतो. नंतर स्पर्श आकाशात लीन होतो, आणि ते आकाश भूतादि जो अहकार त्याजकडून ग्रस्त होऊन शब्दतन्मात्रामध्यें (सूक्ष्मशब्दात) लीन होते. याप्रकारें तामसाहंकाराचे कार्याचा शब्दापर्यंत लय आपणांस प्रवर्तक अशा अधिष्ठात्री देवतामध्यें (सूर्य, दिशा इत्यादिक पूर्वोक्त १०मध्यें) होतो इंद्रियाची प्रवृत्ति देवताधीन असल्यामुळें त्याचा लय देवताचे ठिकाणीं

गंधः अप्सु प्रलीयते. आपः स्वगुणे रसे [प्रलीयंते] रसः ज्योतिषि (तेजामध्यें) लीयते ज्योतिः रूपे प्रलीयते. ॥ २३ ॥ रूपं वायौ, सः च स्पर्शे लीयते. सः अपि अंबरे, (आकाशात) अंबरं शब्दतन्मात्रे [लीयते]. इंद्रियाणि स्वयोनिषु [लीयंते]. ॥ २४ ॥ सौम्य, योनिः ईश्वरे मनसि, [मनः च] वैकारिके लीयते शब्दः भूतादिं (अहंकारात) अप्येति (लीन होतो), प्रभुः भूतादिः महति [लीयते] ॥ २५ ॥ सः गुणवत्तमः (ज्ञानक्रियाशक्तिमान्) महान् स्वेषु गुणेषु लीयते ते अव्यक्ते (प्रकृतीमध्यें) सम्प्र

अप्सु प्रलीयते गंध आपश्च स्वगुणे रसे ॥ लीयते ज्योतिषि रसो ज्योती रूपे प्रलीयते ॥ २३ ॥
रूपं वायौ स च स्पर्शे लीयते सो ऽपि चांबरे ॥ अंबरं शब्दतन्मात्र इंद्रियाणि स्वयोनिषु ॥२४ ॥
योनिर्वैकारिके सौम्य लीयते मनसीश्वरे ॥ शब्दो भूतादिमप्येति भूतादिर्महति प्रभुः ॥ २५ ॥
स लीयते महान्स्वेषु गुणेषु गुणवत्तमः ॥ ते ऽव्यक्ते संप्रलीयंते तत्काले लीयते ऽव्यये ॥ २६ ॥

सांगितलो आहे. वस्तुत. इंद्रियास कारण जो राजसअहंकार त्याचेठायीं लय होतो असा शास्त्राचा अभिप्राय आहे. ॥ २४ ॥ त्या देवता सर्वेंद्रियांचें नियामक जे मन त्याचेठायी लीन होतात. आणि तें मन सर्व देवतासह सात्विक अहंकाराचे ठिकाणीं लीन होतें तामस अहकाराच्या कार्यापैकी अवशिष्ट राहिलेला शब्द तामसअहंकारात लीन होतो व तो सर्वजगन्मोहक त्रिविध (सात्विक, राजस आणि तामस) अहंकार महत्तत्त्वाचे ठिकाणीं लय पावतो ह्मणजे जडांशाचा त्याग करून केवळ ज्ञानक्रियाशक्तिरूप असा होतो ॥२५॥ तें महत्तत्व ज्ञान व क्रिया याशक्तींनीं युक्त असल्यामुळें अत्यंत गुणसंपन्न असून तें आपणास कारण जे सत्व, रज, तम हे तीन गुण त्यात लीन होतें ते तीन गुण अव्यक्तामध्ये लीन होतात ह्मणजे प्रकृतिसाम्यावस्थेस प्राप्त होतात आणि तें अव्यक्त कालाधीन असल्यामुळें त्या कालाचेठिकाणीं लीन होतें ह्मणजे त्या कालाशी एक होऊन रहातें ॥ २६ ॥

नंतर सर्वांचे सर्व व्यापार शांत झाले आहेत असा तो काल मायाप्रवर्तक अथवा ज्ञानमय असून सर्वांस जीवन देणारा जो महापुरुष त्याचेठायीं लीन होतो आणि तो (महापुरुष) जन्ममरणरहित, जो सर्वात्मा मी त्या माझेठायीं लय पावतो म्हणजे जीव हा प्रकृतीमध्यें लीन झाल्यानंतर त्यास भेदाचा किंवा द्वैताचा अभाव झाल्यामुळें तो परिपूर्ण ब्रह्म सद्रूपानें स्थिर होतो. आतां तो आत्मा (मी) मात्र आपलेच ठिकाणीं स्थित असल्यामुळें त्याचा लय अन्यत्र कोठें होत नाहीं कारण तो निरुपाधि असून सर्व जगताच्या उत्पत्तीस व प्रलयास अधिष्ठान व अवधि आहे. ॥ २७ ॥ उद्धवा अशा रीतीनें सृष्टि व लय ह्याचा विचार करणाऱ्या मनुष्याच्या मनात भेदनिमित्त

लीयते. तत् अव्यये काले लीयते.॥२६॥ कालः मायामये जीवे, जीवः अजे आत्मनि मयि [लीयते] विकल्पापायलक्षणः (उत्पत्तिप्रलयानीं लक्षिला जाणारा) केवलः आत्मा आत्मस्थः ॥ २७ ॥ एवं अन्वीक्षमाणस्य (विचार करणाराच्या) मनसः वैकल्पिकः (भेदनिमित्तक) भ्रमः कथं स्यात् ? [जातः वा] व्योम्नि अर्कोदये तमः इव हृदि [कथं] तिष्ठेत ॥ २८ ॥ परावरदृशा (भूतभविष्य जाणणारा अशा) मया संशयग्रंथिभेदनः एषः सांख्यविधिः प्रतिलोमानुलोमाभ्यां (उलटसुलट रीतीनें) प्रोक्तः ॥ २९ ॥

कालो मायामये जीवे जीव आत्मनि मय्यजे ॥ आत्मा केवल आत्मस्थो विकल्पापायलक्षणः ॥ २७ ॥ एवमन्वीक्षमाणस्य कथं वैकल्पिको भ्रमः ॥ मनसो हृदि तिष्ठेत व्योम्नीवार्कोदये तमः ॥ २८ ॥ एष सांख्यविधिः प्रोक्तः संशयग्रंथिभेदनः ॥ प्रतिलोमानुलोमाभ्यां परावरदृशा मया ॥ २९ ॥ इति श्रीभा० महा० एकादशस्कंधे चतुर्विंशो ऽध्यायः ॥ २४ ॥

श्रीभगवानुवाच । गुणानामसमिश्राणां पुमान्येन यथा भवेत् ॥ तन्मे पुरुषवर्येदमुपधारय शंसतः ॥ १ ॥

इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे चतुर्विंशो ऽध्यायः ॥ २४ ॥

श्रीभगवान् उवाच— पुरुषवर्य, पुमान् असमिश्राणां (विभक्त) गुणानां येन यथा भवेत्, तत् इदं शंसतः मे उपधारय. ॥ १ ॥

भ्रम कसा बरें उत्पन्न होईल? आणि झाला तरी हृदयात स्थिर कसा राहील? उदाहरण पहा:- सूर्योदय झाल्यावर आकाशात अंधकाराचा उद्भव व स्थिति दोन्हीही होत नाहींत. ॥ २८ ॥ हे उद्धवा, पूर्वापर जाणणाऱ्या अशा मीं हा संशयग्रंथीचा भेद करणारा सांख्य शास्त्राचा वीचार उलटसुलट रीतीनें तुला सांगितला. ॥२९॥ इति चतुर्विंशो ऽध्यायः ॥२४॥

श्रीकृष्ण म्हणाले :- हे पुरुषश्रेष्ठा ! उद्धवा ! आता परस्परविभक्त जे हे सत्वादि तीन गुण त्यापैकीं कोणत्या गुणानें मनुष्य कसा होतो हे मी तुला सांगतों, ते ऐक. ॥ १ ॥

१ उत्पत्ति स्थिति प्रळयांत । ब्रह्म अखंड निजानित्य । हेंची सांख्ययोगें प्राप्त । जाण निश्चित साधका ॥ ५९५ ॥ लिंग देह सेघव गिरिवर । सांख्य अत्यंत प्रलयसागर । जमवल्का विरवूनी करी नीर । एकाकार निजात्मता ॥ सकल संशयाचें च्छेदन । लिंगदेहाचें भेदन । करी तें सांख्ययोगज्ञान । उद्धवा जाण निश्चित । ९८ । ९९ ॥ नाथ,

शम म्हणजे अंतरिंद्रियांचा निग्रह, दम म्हणजे बाह्येंद्रियाचा निग्रह, तितिक्षा म्हणजे सहनशीलता, ईक्षा म्हणजे विचार, तप म्हणजे स्वधर्माचरण, सत्य, दया, पूर्वापरगोष्टींचें अनुसं-
धान, मिळेल तेवढ्यानें संतोष, खर्चिकपणा, विषयावर अप्रीति, श्रद्धा म्हणजे गुरु, देव इत्यादिकावर विश्वास. अनुचित कर्माविषयीं लज्जा, दान, सरलता, विनय आणि आत्मरूपीं
रति - ह्या सत्वगुणाच्या वृत्ति होत. - ॥२॥ अभिलाष (इच्छा), क्रिया (व्यापार), उन्माद म्ह० विद्येचा गर्व, तृष्णा म्ह० लाभ झाल्यावरही असंतोष, स्तंभ म्ह० गर्व, आशा
म्ह० धनादिकाळेनें देवतादिकाची प्रार्थना, भेदबुद्धि, सुख म्ह० विषयभोग, मदयुक्त उत्साह, स्तुतिप्रियता, अन्याचा उपहास, वीर्य म्ह० स्वताचे पराक्रमाचा आविर्भाव, आणि न्याय न
पाहतां शक्तीच्या जोरावर उद्योग करणें - ह्या रजोगुणाच्या वृत्ति होत. - ॥ ३ ॥ क्रोध, लोभ, असत्यभाषण, परपीडा, याचना, ढोंग, श्रम, कलह, शोक, भ्राति, दुःख (खेद),
(मूळाप्रमाणें) ॥ २ ॥ ३ ॥ ४ ॥ सत्वस्य, रजस०, तमसः च अनुपूर्वशः (अनुक्रमानें) एता० वृत्तयः वर्णितप्रायाः अथो सन्निपात (मिश्रण) शृणु ॥ ५ ॥ उद्धव, " अहं "

> शमो दमस्तितिक्षेक्षा तपः सत्यं दया स्मृतिः ॥ तुष्टिस्त्यागोऽस्पृहा श्रद्धा ह्रीर्दयादिः स्वनिर्वृतिः ॥ २ ॥
> काम ईहा मदस्तृष्णा स्तंभ आशीर्भिदा सुखम् ॥ मदोत्साहो यशःप्रीतिर्हास्यं वीर्यं बलोद्यमः ॥ ३ ॥
> क्रोधो लोभोऽनृतं हिंसा याच्ञा दंभः क्लमः कलिः ॥ शोकमोहौ विषादार्ती निद्राऽऽशा भीरनुद्यमः
> ॥ ४ ॥ सत्त्वस्य रजसश्चैतास्तमसश्चानुपूर्वशः ॥ वृत्तयो वर्णितप्रायाः सन्निपातमथो शृणु ॥ ५ ॥
> सन्निपातस्त्वहमिति ममेत्युद्धव या मतिः ॥ व्यवहारः सन्निपातो मनोमात्रेंद्रियासुभिः ॥ ६ ॥

इति या मतिः, [सः] सन्निपातः मनोमात्रेंद्रियासुभिः व्यवहार० सन्निपातः ॥ ६ ॥
दैन्य, तंद्रा (आळस), आशा, भय आणि अनुद्योगिता - ह्या तमोगुणाच्या वृत्ति होत. - ॥ ४ ॥ याप्रमाणें तुला सत्व, रज, आणि तम या तिन्ही गुणांच्या वृत्ति क्रमानें सा-
गितल्या. अवशिष्ट राहिलेल्या यातच तर्कानें समजाव्या. आता या गुणाच्या मिश्रणापासून होणाऱ्या वृत्ति तुला सागतों त्या ऐक.— ॥ ५ ॥ अहंता आणि ममता म्हणजे मी, माझे
अशी बुद्धि ही संनिपातात्मक म्हणजे गुणत्रयाच्या मिश्रणापासून उत्पन्न झालेली वृत्ति होय. - जसे मी शात, मी कामी, मी क्रोधी, तसेंच मला शाति आहे, काम आहे, मला
क्रोध आहे, इत्यादि सर्व वृत्ति अहंता आणि ममता यानी सबद्ध आहेत म्हणून त्रिगुणसंनिपातरूप आहेत - अर्थात् तन्मूलक सर्व व्यवहारही गुणत्रयसंनिपाताचेच कार्य होय,
कारण, मन, शब्दादि विषय, इंद्रियें आणि प्राण याच्यायोगानें सर्व व्यवहार होतो. त्यात मन सात्विक, शब्दादि विषय तामस, आणि प्राण व इंद्रियें (कर्मेंद्रिये) हीं राजस

१ कफ वात आणि पित्त । तिन्ही एकत्र जेथ होत । तेथ उपजे सन्निपात । तेवीं सन्निपात येथ त्रिगुणाचा ॥ नाथ, १३५.

आहेत. म्हणून यांपासून होणारा [illegible] संनिपातकार्य होय. ॥ ६ ॥ ज्यावेळीं हा पुरुष धर्म, अर्थ, आणि काम या तिहींचे ठायीं निष्ठावान् होतो त्यावेळीं [illegible] निष्ठा ती सन्निपातकार्य होय. कारण धर्म हा सात्विक, अर्थ तामस, आणि काम हा राजस होय या निष्ठेपासून होणारें फळही सन्निपातकार्यच समजावें. कारण धर्मनिष्ठेपासून श्रद्धा होते, कामनिष्ठेपासून रति होते आणि अर्थनिष्ठेपासून धनप्राप्ति होते, व हीं क्रमानें सत्व, रज आणि तम या गुणाचीं कार्यें आहेत ॥ ७ ॥ - आता केवळ धर्मनिष्ठाही सन्निपातकार्य होते याविषयीं तुला सांगतों - मनुष्याची निष्ठा जेव्हा काम्य धर्माचे ठिकाणीं असते, तशीच जेव्हां गृहस्थाश्रमाचेठायीं आसक्ति असते आणि नंतर नित्यनैमित्तिक स्वधर्माचेठिकाणीं स्थिति होते त्यावेळीं ती तीनप्रकाराची निष्ठा सन्निपातकार्यच समजावी. कारण, काम्य धर्म राजस, गृहासक्ति तामस आणि केवळ स्वधर्मनिष्ठा ती सात्विक होय

यदा असौ धर्मे, अर्थे, कामे च परिनिष्ठितः, [तदा] श्रद्धारतिधनावहः अयं गुणानां सन्निकर्षः (समुच्चय). ॥ ७ ॥ [यदा] प्रवृत्तिलक्षणे निष्ठा, [तथा] यर्हि पुमान् गृहाश्रमे, स्वधर्मे च अनुतिष्ठेत, [तदा] सा गुणानां समितिः (समुच्चय). ॥ ८ ॥ पुरुषं शमदमादिभिः सत्वसंयुक्तं, कामादिभिः रजोयुक्तं, क्रोधाद्यैः तमसा युक्तं अनुमीयात्

> धर्मे चार्थे च कामे च यदा ऽसौ परिनिष्ठितः ॥ गुणाना सन्निकर्षो ऽयं श्रद्धारतिधनावहः ॥ ७ ॥
> प्रवृत्तिलक्षणे निष्ठा पुमान्यर्हि गृहाश्रमे ॥ स्वधर्मे चानुतिष्ठेत गुणानां समितिर्हि सा ॥ ८ ॥
> पुरुषं सत्त्वसंयुक्तमनुमीयाच्छमादिभिः ॥ कामादिभी रजोयुक्तं क्रोधाद्यैस्तमसा युतम् ॥ ९ ॥
> यदा भजति मां भक्त्या निरपेक्षः स्वकर्मभिः ॥ तं सत्त्वप्रकृतिं विद्यात्पुरुषं स्त्रियमेव वा ॥ १० ॥
> यदा आशिष आशास्य मां भजेत स्वकर्मभिः ॥ तं रजःप्रकृतिं विद्याद्धिंसामाशास्य तामसम् ॥ ११ ॥

(अनुमानानें जाणावें). ॥ ९ ॥ यदा निरपेक्षः [सन्] भक्त्या स्वकर्मभिः मां भजति, [तदा] तं पुरुषं, स्त्रियं एव वा सत्वप्रकृतिं विद्यात्. ॥ १० ॥ यदा आशिषः (भोगेच्छा) आशास्य (इच्छून) स्वकर्मभिः मां भजेत, [तदा] तं रजःप्रकृतिं विद्यात्. [य.] हिंसां (परपीडेस) आशास्य [भजेत, तं] तामसं [विद्यात्]. ॥ ११ ॥

अर्थात् तिन्हींचा समुच्चय हा संनिपातकार्य होय. ॥ ८ ॥ - असो. या प्रकारें मिश्र व अमिश्र गुणवृत्ति दाखवून आता कोणत्या गुणानें पुरुष कसा होतो हें तुला सांगतो - पुरुषाचे ठिकाणीं पूर्वोक्त शमदमादि वृत्ति असतील तर तो सत्वगुणी आहे असें अनुमान करावें. काम, व्यापार इत्यादि लक्षणावरून तो मनुष्य राजस (रजोगुणी) समजावा आणि क्रोध, लोभादि वृत्तींवरून तो तमोगुणी जाणावा. ॥ ९ ॥ पुरुष असो किंवा स्त्री असो, जो जेव्हा निष्कामपणानें स्वकर्माचरणेंकरून भक्तिपूर्वक माझी सेवा करितो, तो सत्वगुणात्मक समजावा. ॥ १० ॥ जो मनुष्य जेव्हा काही विषयेच्छा मनांत धरून स्वकर्मानीं माझें आराधन करितो तेव्हा तो राजसप्रकृति समजावा, आणि शत्रुवधादिक इच्छा

धरून जो माझें भजन करितो तो तामस स्वभावाचा होय. ॥ ११ ॥ - आतां उद्धवा! तूं म्हणशील की, "गुणाच्या योगानें कर्तृत्व जसें जीवाचे ठिकाणीं आलें आहेच तें तुझेठायीही आहे. मग तुजमध्यें असा कोणता विशेष आहे की ज्याकारणानें तूं सेव्य आणि जीव सेवक हा नियम असावा? आणि ज्यामुळे तूही वारंवार म्हण तोस की जीवानीं माझें भजन करावें?" तर याविषयीं तुला सांगतों:- सत्व, रज, तम हे गुण जीवासच आहेत, मला (आत्म्यास) नाहींत, कारण ते जीवाचा उपाधि, व अपचीकृत भूताचे कार्य जें चित्त त्याचे ठिकाणीं अभिव्यक्त होतात व त्याच्यायोगानें तो जीवच देहेंद्रियादिकाचेठिकाणीं आसक्त होऊन बंधन पावतो मी या भूतकार्याचेठिकाणी सक्त नसल्यामुळें त्या गुणाच्या नियंतृत्वानें सृष्टिस्थितिलयकर्ता असूनही नित्यमुक्त आहे. हा मजमध्यें जीवापेक्षा मोठा विशेष आहे. ॥ १२ ॥ - असो. याप्रमाणें मिश्र व विसत्वं, रजः, तमः इति चित्तजाः गुणाः जीवस्य, मे न एव भूतानां [मध्ये] सज्जमानः (सक्त होणारा) [स.] यैः निबध्यते. ॥१२॥ यदा भास्वरं (प्रकाशमय) विशदं शिवं सत्वं इतरौ जयेत्, तदा पुमान् सुखेन, धर्मज्ञानादिभिः [च] युज्येत (युक्त होतो). ॥ १३ ॥ यदा सगं भिदा बलं रजः तमः, सत्वं [च] जयेत्, तदा दुःखेन, कर्मणा, यशसा,

सत्त्वं रजस्तम इति गुणा जीवस्य नैव मे ॥ चित्तजा यैस्तु भूतानां सज्जमानो निबध्यते ॥ १२ ॥ यदेतरौ जयेत्सत्त्वं भास्वरं विशदं शिवम् ॥ तदा सुखेन युज्येत धर्मज्ञानादिभिः पुमान् ॥ १३ ॥ यदा जयेत्तमः सत्त्वं रजः सगं भिदा बलम् ॥ तदा दुःखेन युज्येत कर्मणा यशसा श्रिया ॥ १४ ॥ यदा जयेद्रजः सत्त्वं तमो मूढं लयं जडम् ॥ युज्येत शोकमोहाभ्यां निद्रया हिंसया ऽऽशया ॥ ॥१५॥ यदा चित्त प्रसीदेत इंद्रियाणा च निर्वृतिः ॥ देहे ऽभयं मनो ऽसंगं तत्सत्त्वं विद्धि मत्पदम् ॥१६॥

श्रिया (लक्ष्मीनें) [च] युज्येत. ॥ १४॥ यदा मूढं लयं जडं तमः रजः, सत्वं च जयेत्, [तदा] शोकमोहाभ्यां, निद्रया, हिंसया, आशया [च] युज्येत. ॥ १५॥ यदा चित्त प्रसीदेत, इंद्रियाणां निर्वृतिः (उपरति), देहे अभयं, मनः असंगं च [भवेत्] तत् मत्पदं सत्वं [उद्रिक्त] विद्धि ॥ १६ ॥

भक्त अशा गुणांचीं कार्यें तुला सांगितलीं, आतां एकेक गुणाच्या आधिक्यापासून होणारी कार्यें सांगतो - प्रकाशमय, निर्मळ आणि शांत असा सत्वगुण जेव्हा इतरास (रजतमास) जिंकतो म्हणजे इतर दोन गुणापेक्षा त्याचें आधिक्य जेव्हा असतें, तेव्हा पुरुषास (मनुष्यास) सुख, धर्म, ज्ञान आणि शम, दम, इत्यादि वृत्तीचा योग होतो ॥ १३ ॥ जेव्हा संगजनक, भेदबुद्धीस कारण, आणि प्रवृत्तिस्वभाव अशा रजोगुणाचा इतराहून (सत्वतमाहून) उद्रेक (आधिक्य) असतो, तेव्हां मनुष्यास कीर्ति, संपत्ति, दुःख, आणि कर्म (व्यापार) या वृत्तींचा योग होतो. ॥ १४ ॥ जेव्हां विचारभ्रंशक, आवरणस्वभाव आणि अनुद्योगशील अशा तमोगुणाचा इतर दोन गुणाहून (सत्वरजाहून) उत्कर्ष असतो, तेव्हां मनुष्य शोक, मोह, हिंसा, निद्रा व आशा या वृत्तींनीं युक्त होतो. ॥१५॥ जेव्हा चित्त प्रसन्न असतें, सर्व इंद्रियास विषयापासून उपरति होते, देहसंबधानें निर्भयता

असून मन निस्संग असतें तेव्हां सत्त्वगुणाचा उद्रेक झाला आहे असें समजावें. उद्धवा, तो माझ्या ज्ञानाचें स्थान आहे असें समज. ॥ १६ ॥ जेव्हां मनुष्य कर्मलौल्यानें विकार पावून त्याचे बुद्धीस विक्षिप्तता (व्यग्रता) होते; ज्ञानेंद्रियास विषयापासून उपरति होत नाहीं, कर्मेंद्रियाचेठिकाणीं अस्वस्थता, आणि मन भ्रांतिवश व चंचळ अशी स्थिति होते, तेव्हा रजोगुणाचा उद्रेक आहे असें समजावें. ॥ १७ ॥ जेव्हां चित्त हें नाहींसें होतहोत, चिदाकारत्वानें परिणाम होण्याविषयीं असमर्थ होऊन लीन होतें आणि संकल्पात्मक मनही नष्ट होतें, व जेव्हा अज्ञान, ग्लानि, आणि खेद हे विकार असतात, तेव्हा तमोगुणाचें आधिक्य आहे असें समज. ॥१८॥ हे उद्धवा! सत्त्वगुणाचा उत्कर्ष झाला असता देवाचें बळ

[यदा] क्रियया विकुर्वन् आधीः (विक्षिप्तबुद्धि) [भवति], चेतसा (ज्ञानेंद्रियाची) अनिर्वृत्तिः, गात्रास्वास्थ्यं, मनः च भ्रांतं [भवति तदा] एतैः रजः [उद्रिक्तं] निशामय (समज). ॥१७॥ [यदा] सीदत् चित्तं चेतसः ग्रहणे अक्षमं [सत्] विलीयेत, मनः नष्टं, तम , ग्लानिः [च भवति], तत् तमः [उद्रिक्तं] उपधारय. ॥१८॥ उद्धव, सत्त्वे गुणे एधमाने (वृद्धिंगत) [सति] (असतांना), देवाना बलं एधते. रजसि [एधमाने] असुराणां, तमसि [एधमाने] रक्षसां [बलं विद्धि]. ॥१९॥ जंतोः सत्त्वात् जागरणं

विकुर्वन् क्रियया चाधीरनिर्वृत्तिश्च चेतसाम् ॥ गात्रास्वास्थ्यं मनो भ्रांतं रज एतैर्निशामय ॥ १७ ॥ सीदच्चित्तं विलीयेत
चेतसो ग्रहणेऽक्षमम् ॥ मनो नष्टं तमो ग्लानिस्तमस्तदुपधारय ॥ १८ ॥ एधमाने गुणे सत्त्वे देवाना बलमेधते ॥
असुराणां च रजसि तमस्युद्धव रक्षसाम् ॥१९॥ सत्त्वाज्जागरणं विद्याद्रजसा स्वप्नमादिशेत् ॥ प्रस्वापं तमसा जंतोस्तुरीयं
त्रिषु संततम् ॥२०॥ उपर्युपरि गच्छंति सत्त्वेन ब्राह्मणा जनाः ॥ तमसाऽधोऽध आमुख्याद्रजसान्तरचारिणः ॥ २१ ॥

विद्यात् (जाणावें). रजसा स्वप्नं आदिशेत्. तमसा प्रस्वापं [विद्धि]. तुरीयं त्रिषु संततं (व्यापक). ॥ २० ॥ ब्राह्मणाः जनाः सत्त्वेन उपरि उपरि गच्छंति. आमुख्यात् (स्थावरापर्यंत) तमसा अधः अधः [गच्छंति]. रजसा अंतरचारिणः [भवंति]. ॥ २१ ॥

वाढतें, रजोगुणाची वृद्धि झाली असता असुराचें बळ वृद्धिंगत होतें आणि तमोगुणाची वृद्धि असता राक्षसाचें बळ वाढतें. ॥ १९ ॥ - आता गुणाच्या उत्कर्षावरून अवस्थाभेद होतो तो तुला सांगतो :- सत्त्वगुणाच्या उद्रेकापासून जागृति होते, रजोगुणाच्या उत्कर्षानें स्वप्न होतें, आणि तमोगुणाच्या उत्कर्षापासून सुषुप्ति होते. तिन्ही अवस्थांचे ठिकाणीं एकरूप जें आत्मतत्त्व (साक्षीस्वरूप) ती तुर्यावस्था होय. ॥२०॥ - आता गुणोत्कर्षद्वारानें कर्मगतींचा भेद दर्शवितो [1] - वेदोक्त अनुष्ठान करणारे ब्राह्मण सत्त्वगुणाच्या उत्कर्षानें ब्रह्मलोकापर्यंत ऊर्ध्वगतीस जातात; तमोगुणाच्या योगें स्थावरापर्यंत अधोगतीप्रत पावतात, आणि रजोगुणाचे उद्रेकानें मध्यचारी असे मनुष्य होतात. ॥२१॥

१ जागृती स्वप्न सुषुप्ती । तिन्हीं अवस्थातें प्रकाशती । यालागी ते चौथी । तुरीय म्हणती सज्ञान ॥ जे जागृतातें जागवीत । जे स्वप्नी स्वप्नातें नांदवीत । जे सुषुप्तीतें निजवीत । त्यातें तुरीय म्हणत उद्धवा ॥२८६।२८७. नाथ म्हणत दृष्टांत देतात — जेवीं पुत्राचेनि जन्मालेपणें । पुरुषें पिता नाव पावणें । तेवीं तिन्हीं अवस्थागुणें । तुरीय म्हणणें वस्तूसी ॥ २८०.

- आतां देहापासून प्राणोत्क्रमण होतांना असलेल्या गुणोत्कर्षाचीं फलें तुला सांगतों :- सत्वगुणाची वृद्धि असतां मृत झालेले लोक स्वर्गलोकास जातात, रजोगुणाच्या वृद्धीत ज्याचा
लय झाला आहे ते मनुष्यलोकास प्राप्त होतात; तमोगुणाच्या उत्कर्षांत मृत झालेले नरकास जातात, आणि जे निर्गुण आहेत ते मत्स्वरूपास प्राप्त होतात ॥ २२ ॥ - आता
गुणोत्कर्षामुळें कर्माचे तीन प्रकार होतात ते तुला सागतों :- माझ्या प्रीतीकरिता मदर्पणबुद्धीनें केलेलें किंवा केवळ दास्यत्व मनात आणून निष्कामबुद्धीनें केलेलें स्वकर्म (यज्ञा-
ध्ययनादि) तें सात्विक होय. फलाविषयीं संकल्प करून केलेलें कर्म राजस होय, आणि हिंसेच्या उद्देशानें अथवा हिंसात्मक, व दांभिकपणानें किंवा मत्सराने केलेलें कर्म 'तामस
सत्त्वे प्रलीनाः स्वः याति. रजोलयाः नरलोकं [याति]. तमोलयाः निरयं याति. निर्गुणाः मा यत्र [प्राप्नुवंति]. ॥ २२ ॥ मदर्पण, निष्फल (निष्काम) वा [यत्]
निजकर्म, तत् सात्विकं. फलसकल्पं राजसं. हिंसाप्रायादि तामसं. ॥ २३ ॥ कैवल्यं (ऐक्यविषयक) सात्विक ज्ञानं. यत् वैकल्पिक (भेदविशिष्ट), तत् रजः प्राकृत तामस

सत्त्वे प्रलीनाः स्वर्यांति नरलोकं रजोलयाः ॥ तमोलयास्तु निरयं याति मामेव निर्गुणाः ॥ २२ ॥
मदर्पणं निष्फलं वा सात्त्विकं निजकर्म तत् ॥ राजसं फलसंकल्पं हिंसाप्रायादि तामसम् ॥ २३ ॥
कैवल्यं सात्त्विकं ज्ञानं रजो वैकल्पिकं च यत् ॥ प्राकृतं तामसं ज्ञानं मन्निष्ठं निर्गुणं स्मृतम् ॥ २४ ॥
वनं तु सात्त्विको वासो ग्रामो राजस उच्यते ॥ तामसं द्यूतसदनं मन्निकेतं तु निर्गुणम् ॥ २५ ॥
सात्त्विकः कारको ऽसंगी रागांधो राजसः स्मृतः ॥ तामसः स्मृतिविभ्रष्टो निर्गुणो मदपाश्रयः ॥ २६॥

ज्ञानं. मन्निष्ठं निर्गुणं स्मृतं. ॥ २४ ॥ वनं सात्विकः वासः. ग्रामः राजसः उच्यते. तामसं द्यूतसदनं मन्निकेत (माझें स्थान-देवालय) तु निर्गुणं. ॥२५॥ असंगी कारक. (कर्ता)
सात्विकः. रागांधः राजसः स्मृतः. स्मृतिविभ्रष्टः तामसः. मदपाश्रयः निर्गुणः. ॥ २६ ॥
होय. ॥ २३ ॥ - साप्रत सगुण व निर्गुण अशा भेदानें ज्ञानादिकाचे चार चार प्रकार तुला सागतों :- कैवल्यज्ञान ह्मणजे देहादिकाहून भिन्न अशा आत्मस्वरूपाचें ज्ञान तें सा-
त्विक होय. देहात्मविषयक जें ज्ञान (भेदयुक्तज्ञान) तें राजस ह्मणजे रजोगुणी होय, बाळ, मुके यासारखें जें प्राकृत ज्ञान तें तामस होय, आणि परमात्मविषयक जें ज्ञान ते निर्गुण सम-
जावें. ॥ २४॥ वनामध्यें वास करणें सात्विक, ग्रामवास हा राजस, द्यूतस्थानीं निवास तो तामस आणि माझें मंदिर हा निर्गुणवास होय. ॥ २५ ॥ कर्मफलाचे ठिकाणीं सक्त नसणारा

१ देवालयीं भगवद्भिंती । देखोनी माझी निजमूर्ती । साचार सुखाचे चित्तवृत्ती । ते निर्गुण वस्ती उद्धवा ॥ नाथ, ३४०.

द.
न्व-
३॥

कर्ता सात्त्विक होय; अतिविषयासक्त असणारा कर्ता राजसः पूर्वापरानुसंधानरहितत्वानें कर्म करणारा तामस आणि केवळ मदेकनिष्ठ असून निरभिमानत्वानें कर्म करणारा तो नि-
र्गुण होय. ॥ २६ ॥ आत्मज्ञानाविषयीं जी श्रद्धा ती सात्त्विकी होय; कर्माविषयीं श्रद्धा ती राजसी; अधर्माचेठिकाणीं धर्म अशी जी श्रद्धा ती तामसी; आणि माझ्या सेवेविषयीं
श्रद्धा ती निर्गुण होय. ॥ २७ ॥ शरीरास हितकारक व शुद्ध असून आयास न करितां प्राप्त झालेलें भक्ष्यभोज्यादिक तो सात्त्विक आहार होय; इंद्रियांस प्रिय असा कटु अम्ल,
लवण इत्यादि आहार तो राजस; पीडादायक असून अशुद्ध (अपवित्र) असा जो आहार तो तामस आणि मला निवेदित केलेला तो निर्गुण आहार समजावा. ॥ २८ ॥ नि-
अध्यात्मिकी श्रद्धा सात्त्विकी. कर्मश्रद्धा तु राजसी. अधर्मे या श्रद्धा, [सा] तामसी. मत्सेवायां [या श्रद्धा, सा] निर्गुणा. ॥ २७ ॥ पथ्यं पूतं अनायस्तं (आयासरहित)
आहार्यं सात्त्विकं स्मृतं. इंद्रियप्रेष्ठं राजसं. आर्तिदाशुचि (त्रासदायक व अपवित्र) तामसं. ॥ २८ ॥ आत्मोत्थं सुखं सात्त्विकं. विषयोत्थं राजसं. मोहदैन्योत्थं तामसं. मदपाश्रयं

सात्त्विक्याध्यात्मिकी श्रद्धा कर्मश्रद्धा तु राजसी ॥ तामस्यधर्मे या श्रद्धा मत्सेवायां तु निर्गुणा ॥२७॥
पथ्यं पूतमनायस्तमाहार्यं सात्त्विकं स्मृतम् ॥ राजसं चेंद्रियप्रेष्ठं तामसं चार्तिदाशुचि ॥ २८ ॥ सात्त्विकं
सुखमात्मोत्थं विषयोत्थं तु राजसम् ॥ तामसं मोहदैन्योत्थं निर्गुणं मदपाश्रयम् ॥ २९ ॥ द्रव्यं देशः
फलं कालो ज्ञानं कर्म च कारकः ॥ श्रद्धाऽवस्थाऽऽकृतिर्निष्ठा त्रैगुण्यः सर्व एव हि ॥ ३० ॥ सर्वे
गुणमया भावाः पुरुषाव्यक्तधिष्ठिताः ॥ दृष्टं श्रुतमनुध्यातं बुद्ध्या वा पुरुषर्षभ ॥ ३१ ॥

निर्गुणं. ॥ २९ ॥ द्रव्यं, देशः, फलं, कालः, ज्ञानं, कर्म, कारकः, श्रद्धा, अवस्था, आकृतिः, निष्ठा (स्वर्गादि गति) च [एवं] सर्वः एव त्रैगुण्यः (त्रिगुणात्मक) ॥ ३० ॥ पुरुषर्षभ,
दृष्टं, श्रुतं, बुद्ध्या अनुध्यातं (चिंतन केलेलें) [एवं ये] पुरुषाव्यक्ताधिष्ठिताः, [ते] सर्वे भावाः गुणमयाः. ॥ ३१ ॥
षयांवांचून आपलेचठिकाणीं प्रादुर्भूत झालेलें सुख तें सात्त्विक, विषयभोगापासून होणारें सुख तें राजस, मोह दैन्य यापासून होणारें सुख तें तामस आणि केवळ [illegible]
संबंधानें होणारें सुख तें निर्गुण होय. ॥ २९ ॥ उद्धवा! याप्रकारें द्रव्य (पदार्थ आहारादि) देश, फल, काल, ज्ञान, कर्म, कर्ता, श्रद्धा, अवस्था, आकार आणि निष्ठा
(स्वर्गादिगति) हे सर्व पदार्थ त्रिगुणात्मक आहेत. ॥ ३० ॥ हे पुरुषश्रेष्ठा! उद्धवा! केवळ वरील पदार्थच त्रिगुणात्मक आहेत असें नाहीं; तर प्रकृति व पुरुष यांच्या आश्रयानें
होणारे सर्व पदार्थ गुणमयच आहेत; जें कांहीं नेत्रांनीं पाहिलें, कानांनीं ऐकिलें अथवा जें कांहीं मनानें चिंतिलें तें सर्व त्रिगुणात्मक आहे. ॥ ३१ ॥

असो. पुरुषास गुणकर्मांमुळें ह्या अनेक संसृति (गति) होतात; उद्धवा ! ज्या पुरुषानें, ह्या चित्ताचे ठिकाणीं व्यक्त होणाऱ्या संसृति अथवा गति जिंकल्या आहेत ॥३२॥ तो भक्तियोगानें माझेठिकाणीं निष्ठावान् होऊन मद्रूपतेस (मोक्षप्राप्तीस) योग्य होतो. - या करितां विचारी पुरुषास हेंच योग्य आहे कीं, - ज्यामध्यें ज्ञान व आत्मानुभव होण्याचा संभव आहे असा हा मनुष्यदेह मिळाला असता ॥३३॥ बुद्धिमान् मनुष्यानीं या गुणाची आसक्ति सोडून माझें भजन करावें विद्वान् पुरुषानें सावधपणानें सर्व इंद्रियें जिंकून व विषयासक्ति सोडून माझें भजन करावें, ॥३४॥ सत्त्वगुणाच्या सेवनानें अर्थात् सात्विक पदार्थांच्या सेवनानें रज व तम या गुणास जिंकावें. नतर निरपेक्षत्वानें ह्मणजे उपशमानें [illegible] सत्त्व

पुंसः एताः गुणकर्मनिबंधनाः संसृतय. (गति). सौम्य, येन जीवेन चित्तजाः इमे गुणाः निर्जिताः, ॥३२॥ [सः] भक्तियोगेन मन्निष्ठः [सन्] मद्भावाय प्रपद्यते ([illegible] तस्मात् ज्ञानविज्ञानसंभवं इमं देहं लब्ध्वा ॥३३॥ विचक्षणाः गुणसंगं विनिर्धूय मां भजंतु. विद्वान् निःसंगः, अप्रमत्तः, जितेंद्रियः [च सन्] मां भजेत् ॥३४॥ मुनिः [illegible]

एताः संसृतयः पुंसो गुणकर्मनिबंधनाः ॥ येनेमे निर्जिताः सौम्य गुणा जीवेन चित्तजाः ॥ ३२ ॥

भक्तियोगेन मन्निष्ठो मद्भावाय प्रपद्यते ॥ तस्माद्देहमिमं लब्ध्वा ज्ञानविज्ञानसंभवम् ॥ ३३ ॥

गुणसंगं विनिर्धूय मां भजंतु विचक्षणाः ॥ निःसंगो मां भजेद्विद्वानप्रमत्तो जितेंद्रिय. ॥ ३४ ॥

रजस्तमश्चाभिजयेत्सत्त्वसंसेवया मुनिः ॥ सत्त्वं चाभिजयेद्युक्तो नैरपेक्ष्येण शांतधीः ॥ ३५ ॥

संपद्यते गुणैर्मुक्तो जीवो जीवं विहाय माम् ॥ जीवो जीवविनिर्मुक्तो गुणैश्चाशयसंभवै. ॥ मयैव

ब्रह्मणा पूर्णो न बहिर्नांतरश्चरेत् ॥३६॥ इति श्रीमा॰ महा॰ एकादश॰ पंचविंशो ऽध्यायः ॥ २५ ॥

वया रजः, तमः च अभिजयेत्. शांतधीः नैरपेक्ष्येण युक्तः [सन्] सत्त्वं अभिजयेत् ॥३५॥ गुणैः मुक्त जीवः जीवं (जीवत्वास कारण जें लिंगशरीर झालें) विहाय मां संपद्यते. [illegible] भवैः गुणैः [मुक्तः] जीवविनिर्मुक्तः जीवः ब्रह्मणा मया एव पूर्णः [सन्] न बहिः, न आंतर. चरेत्. ॥३६॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे पंचविंशो ऽध्यायः ॥ २५ ॥

गुणानें शांतचित्त होऊन तत्परतेनें त्या सत्वगुणासही जिंकावें ॥३५॥ असें झाले असता जीव हा गुणत्रयापासून मुक्त होऊन व जीवत्वास कारणभूत जें लिंगशरीर त्याचा [illegible] त्याग करून मला प्राप्त होतो; याप्रमाणें जीव जीवस्थापासून व चित्तोत्पन्न गुणापासून मुक्त होऊन परब्रह्मरूपी जो मी तेणेंकरून पूर्ण होत्साता मग बाहेर विषयोपभोगांत, किंवा अंतःकरणांत विषयचिंतनानें तो संचार करीत नाहीं. - अर्थात त्यास मांझी प्राप्ति झाल्यावर पुन्हा ससारगति होत नाहीं - ॥ ३६ ॥ इति पंचविंशो ऽध्यायः ॥ २५ ॥

श्रीकृष्ण ह्मणाले :— "...निःसंगो मां भजेद्विद्वानप्रमत्तो जितेंद्रियः" ह्मणजे बुद्धिमान् पुरुषानें जितेंद्रिय व सावधान असून निःसंग होऊन माझें भजन करावें असें मीं तुला सांगितलें आहे; त्या तुझ्या वचनावर अशी शंका येईल कीं, तर मग जीवन्मुक्तास सुद्धां संग (विषयासक्ति) हा दुर्निवार आहे मग त्यास सुद्धां विषयसंगापासून अनर्थ प्राप्त होईल, तर याविषयीं तुला सांगतों :- माझे स्वरूपाचें ज्ञान ज्यामध्यें होतें असा हा नरदेह मिळाल्यावर जो माझ्या भक्तिलक्षण धर्माचे ठिकाणीं स्थिर राहतो, तो आपले ठिकाणींच नियामकत्वानें स्थित असलेला परमानंदरूप जो परमात्मा मी त्या मला प्राप्त होतो. ॥१॥ - अर्थात् अशा मद्भक्तास विषयासक्ति ह्मणून कधींही होत नाहीं, कारण - तो ज्ञाननिष्ठेच्या योगानें गुणमय अशा जीवोपाधीपासून मुक्त होतो आणि हे मायारूपी गुण (अर्थात् त्रिगुणात्मक विषय) मिथ्या आहेत असें पाहतो, यामुळे तो सर्व विषयांचे ठि-

श्रीभगवान् उवाच — मल्लक्षणं इमं कायं (शरीर) लब्ध्वा मद्धर्मे आस्थितः [सन्] आत्मस्थं परं आनंदं आत्मानं मां समुपैति. ॥ १ ॥ ज्ञाननिष्ठया गुणमय्या जीवयोन्या विमुक्तः अवस्तुतः (मिथ्यात्वानें) दृश्यमानेषु मायामात्रेषु गुणेषु वर्तमानः अपि पुमान् अवस्तुभिः गुणैः न युज्यते. ॥ २ ॥ क्वचित् शिश्नोदरतृपां असतां संगं न कुर्यात्

श्रीभगवानुवाच । मल्लक्षणमिमं कायं लब्ध्वा मद्धर्म आस्थितः ॥ आनंदं परमात्मानमात्मस्थं समुपैति माम् ॥ १ ॥ गुणमय्या जीवयोन्या विमुक्तो ज्ञाननिष्ठया ॥ गुणेषु मायामात्रेषु दृश्यमानेष्ववस्तुतः ॥ वर्तमानोऽपि न पुमान्युज्यतेऽवस्तुभिर्गुणैः ॥ २ ॥ संगं न कुर्यादसतां शिश्नोदरतृपां क्वचित् ॥ तस्यानुगस्तमस्यंधे पतत्यंधानुगांऽधवत् ॥ ३ ॥ ऐलः सम्राडिमां गाथामगायत बृहच्छ्रवाः ॥ उर्वशीविरहान्मुह्यन्निर्विण्णः शोकसंयमे ॥ ४ ॥

तस्य अनुगः अंधानुगांधवत् अंधे तमसि पतति. ॥ ३ ॥ बृहच्छ्रवाः (मोठाकीर्तिमान्) ऐलः (पुरूरवा) सम्राट् (सार्वभौम) उर्वशीविरहात् मुह्यन् शोकसंयमे [सति] नि-काणीं व्यवहार करीत असतांही त्या मिथ्या गुणांचे ठिकाणीं संग (सक्तता) पावत नाहीं. ॥ २ ॥ उद्धवा ! असें जरी आहे तरी बुद्धिमान् मनुष्यानें शिश्न व उदर याचीच तृप्ति करणारे जे विषयीजन यांचा समागम करूं नये. असज्जनाचा संग करणारा मनुष्य अंधळ्याच्या पाठीमागें जाणाऱ्या अंधाप्रमाणें अंधतमामध्यें (नरकांत) पडतो ॥ ३ ॥ - याविषयीं तुला एक इतिहास सांगतों :- मोठा कीर्तिमान् असा सार्वभौम राजा ऐल (पुरूरवा) उर्वशीच्या वियोगानें मोहित होऊन - पुढें कुरुक्षेत्रामध्यें तिची गांठ पडल्यावर गंधर्वांनीं दि-लेल्या अग्नीच्या योगानें देवाचें यजन करून त्यायोगानें उर्वशीलोकास प्राप्त होऊन - वियोगदुःखाचा परिहार झाला असतां तिच्याशीं बहुतकाळ रममाण होऊन कंटाळल्यावर

१ त्यासी विषयाचें दर्शन । समूळत्वें मिथ्या जाण । करितां मृगजळाचें पान । कदा ओलेपण बाधेना ॥ ३७ ॥ नाथ.

त्यानें ही गाथा गाइली आहे ती मी तुला सांगतों. ॥ ४ ॥ - ह्या राजाची पूर्वीची मूढावस्था तुला सांगतों — ज्यावेळेस शापबंध मोडल्यामुळे उर्वशी आपणास सोडून जात आहे असें
राजानें (पुरूरव्यानें) पाहिलें तेव्हां तो नग्न असतां तसाच उन्मत्ताप्रमाणें विलाप करीत 'हे प्रिये! उभी रहा, मला या घोर अरण्यात एकट्याला सोडू नको तूं आणि मी एकांतात काही भाषण
बोलूं ' अशा रीतीनें बोलत विव्हळ होऊन तिच्या मागें जाऊं लागला. ॥ ५ ॥ - इतका विव्हळ होण्याचें कारण काय ह्मणशील तर ऐक - कित्येक वर्षांच्या रात्री निच्याबरोबर
क्षुद्र विषयसेवन करीत असून तिनें - (उर्वशीनें) त्याचें मन अगदीं आकर्षण केलें होतें. यामुळें त्यास किती रात्रि गेल्या व किती आल्या हें काहीं समजलें नाहीं - अर्थात् नित्य
वियोग होण्याचा प्रसंग आला असतां त्यानें व्याकुळ होणें साहजिकच आहे. - ॥ ६ ॥ - तो पुढें गंधर्वलोकास जाऊन तेथें पुष्कळ काळ उर्वशीशीं संभोग करून विरक्त झाल्यावर
विषण्णः (विरक्त) [सन्] इमां गाथां अगायत. ॥ ४ ॥ नृपः आत्मानं त्यक्त्वा व्रजंतीं तां " जाये, घोरे तिष्ठ. " इति विलपन् विक्लवः (चपल) उन्मत्तवत् नग्न [च सन्] अन्वगात् ॥ ५ ॥ क्षुल्लकान् कामान् अनुजुषन् (सेवन करणारा), अतृप्तः [नृपः] उर्वश्याकृष्टचेतनः [सन्] यातीः वर्षयामिनीः (वर्षांतील रात्रि) न वेद, आयतीः च

कामानतृप्तो
त्यक्त्वा ऽऽत्मानं व्रजंतीं तां नग्न उन्मत्तवन्नृपः ॥ विलपन्नन्वगाज्जाये घोरे तिष्ठेति विक्लवः ॥ ५ ॥ कामानतृप्तो
ऽनुजुषन्क्षुल्लकान्वर्षयामिनीः ॥ न वेद यांतीर्नायांतीरुर्वश्या ऽऽकृष्टचेतनः ॥ ६ ॥ ऐल उवाच । अहो मे
मोहविस्तारः कामकश्मलचेतसः ॥ देव्या गृहीतकंठस्य नायुःखंडा इमे स्मृताः ॥ ७ ॥ नाहं वेदाभिनिर्मुक्तः
सूर्यो वा ऽभ्युदितो ऽमुया ॥ मुषितो वर्षपूगानां बताहानि गतान्युत ॥ ८ ॥ अहो मे आत्मसंमोहो येनाऽऽत्मा
योषितां कृतः ॥ क्रीडामृगश्चक्रवर्ती नरदेवशिखामणिः ॥ ९ ॥

[वेद] ॥ ६ ॥ ऐलः उवाच — "अहो देव्या गृहीतकंठस्य कामकश्मलचेतसः (मदानें ज्याचें चित्त दूषित केलें आहे अशा) मे मोहविस्तारः । इमे आयुःखंडाः न स्मृताः ॥ ७ ॥ सूर्यः अभिनिर्मुक्तः, अभ्युदितः वा [इति] अहं न वेद अमुया मुषितः (आकर्षण केलेला) बत । उत वर्षपूगानां गतानि अहानि [न वेद]. ॥ ८ ॥ अहो मे आत्मसंदेहः, येन च-

त्यानें ही पुढील गाथा (कथा, गीत) गायिली आहे ती तुला सांगतों - पुरूरवा ह्मणाला — ' अहो माझ्या मोहाची पराकाष्ठा झाली! कामानें माझें मन दूषित असून त्यात या देवीनें
(उर्वशीनें) माझे कंठास आलिंगन दिल्यावर मग त्या आनंदात आयुष्याचे भाग जे रात्रि आणि दिवस ते किती गेले याचें मला स्मरणही राहिलें नाहीं ॥ ७ ॥ मी इजबरोबर रममाण
असतां सूर्य अस्ताला केव्हा गेला किंवा उदयाचलास केव्हां आला हेंही मला समजलें नाहीं. एकंदरीत या उर्वशीनें मला मोहित केल्यामुळें कित्येक वर्षसमूह व त्यातील गेलेल्या दिवस-
रात्रि मीं काहीं जाणल्या नाहींत! ॥ ८ ॥ काय हें आश्चर्य! काय हा माझा मनोमोह कीं ज्यामुळें मी सर्वराजशिरोमणि सार्वभौम असता मी आपला देह स्त्रियाचा क्रीडामृग

(खेळण्य,त्या हरिणाप्रमाणें [illegible] दूर ! ॥ ९ ॥ सार्वभौम राज्यादि ऐश्वर्याचा धनी असा मी चक्रवर्ती असून तृणाप्रमाणें माझा त्याग करून जाणाऱ्या अशाही स्त्रीच्या मागें मी उन्मत्ताप्रमाणें [illegible] ॥ १० ॥ लत्ताप्रहारानीं ताडण केलें तरी गर्दभ जसा विरिज्जाणानें गर्दभीच्या मागें लागतो तसा जो मी उर्वशी [illegible] जात असता तिच्या मागें लागलों त्या माझ्या ठिकाणीं पराक्रम, बल, आणि प्रभुत्व तरी कसलें ? ॥ ११ ॥ ज्याचें मन स्त्रियानीं हरण केलें त्याच्या विद्येचा [illegible] त्याचें तपही निरर्थक; त्याच्या संन्यासाचें किंवा शास्त्राध्ययनाचें काय फळ ? त्याचा एकान्तवास आणि मौन सर्व कांहीं व्यर्थ समजावें. ॥ १२ ॥ तस्मात् जो मी [illegible]

चक्रवर्ती (सार्वभौम) नरदेवशिखामणिः यात्मा योषितां क्रीडामृगः कृतः ! ॥९॥ सपरिच्छदं (राज्यादि सामग्रीसहित) ईश्वरं आत्मानं तृणं इव हित्वा (टाकून) यांतीं स्त्रियं उन्मत्तवत् [illegible] रुदन् [सन्] अन्वगमं ! ॥१०॥ यः अहं खरवत् पादताडितः [सन्] यांतीं स्त्रियं अन्वगच्छं, तस्य [मे] अनुभावः (पराक्रम), तेजः, ईशत्वं एव वा कुतः ? ॥ ११ ॥ [illegible] मनः हृत, [तस्य] विद्यया किं ? तपसा किं ? त्यागेन, श्रुतेन वा किं ? विविक्तेन, मौनेन च किं ? ॥१२॥ स्वार्थस्य अकोविदं मूर्खं पंडितमानिनं मां धिक्, य: [illegible]

सपरिच्छदमात्मानं हित्वा तृणमिवेश्वरम् ॥ यांतीं स्त्रियं चान्वगमं नग्न उन्मत्तवद्रुदन् ॥ १० ॥
कुतस्तस्यानुभावः स्यात्तेज ईशत्वमेव वा ॥ यो ऽन्वगच्छं स्त्रियं यांतीं खरवत्पादताडितः ॥ ११ ॥
किं विद्यया किं तपसा किं त्यागेन श्रुतेन वा ॥ किं विविक्तेन मौनेन स्त्रीभिर्यस्य मनो हृतम् ॥ १२ ॥
स्वार्थस्याकोविदं धिङ् मां मूर्खं पंडितमानिनम् ॥ यो ऽहमीश्वरतां प्राप्य स्त्रीभिर्गोखरवज्जितः ॥ १३ ॥
सेवतो वर्षपूगान्मे उर्वश्या अधरासवम् ॥ न तृप्यत्यात्मभूः कामो वह्निराहुतिभिर्यथा ॥ १४ ॥
पुंश्चल्या ऽपहृतं चित्तं को न्वन्यो मोचितुं प्रभुः ॥ आत्मारामेश्वरमृते भगवंतमधोऽक्षजम् ॥ १५ ॥

गोखरवत् स्त्रीभिः जितः ! ॥ १३ ॥ वर्षपूगान् उर्वश्याः अधरासवं सेवतः मे आत्मभूः (मनात उद्भूत होणारा) कामः यथा वह्निः आहुतिभिः, [तथा] न तृप्यति ॥ १४ ॥ पुंश्चल्या (जारिणीनें) अपहृतं चित्तं मोचितुं आत्मारामेश्वरं भगवंतं अधोक्षजं ऋते कः अन्यः प्रभुः ? ॥ १५ ॥

प्राप्त होऊनही स्त्रियानीं ज्या मला पशूप्रमाणें किंवा गर्दभाप्रमाणें जिंकिलें, त्या स्वार्थाविषयीं मूढ असून आपणास पंडित समजणाऱ्या मज मूर्खाला धिक्कार असो ! ॥ १३ ॥ आज कित्येक वर्षें मी उर्वशीचें अधरामृत सेवन करीत असतां, आहुतींच्या योगानें अग्नि जसा तृप्त होत नाहीं त्याप्रमाणें [illegible] पुन पुन [illegible] तृप्त होत नाहीं. ॥ १४ ॥ असो ! आतां आपल्याठिकाणीं रममाण होणारा व सर्व इंद्रियजन्य ज्ञानास अगोचर असा षड्गुणैश्वर्यसंपन्न परमेश्वर [illegible]

...केलेल्या पाते मनास तिजपासून मुक्त करण्यास समर्थ आहे? ॥ १५ ॥ - सर्वेच परमेश्वरनमादावांचुन देवांनी म.अ.न् वेदवाक्याच. उपदेश जरी केला नरी मनोमोह

...होत नाहीं. पहा - या देवीनें (उर्वशीनें) यथार्थ वचनेंकरून जरी मला बोध केला नरी अजितचित्त आणि दुर्बुद्धि जो मी त्याचा मनोगत मोह (अज्ञान) नाहींसा

...नाहीं. ॥ १६ ॥ - तस्मात् हा माझाच अपराध आहे, उर्वशीकडे काहीं दोष नाहीं. - उर्वशीनें आमचा काय अपराध केला आहे? जसें - रज्जूचें स्वरूप न जाणून नि-

...वर सर्पभ्रांति करून दुःखी होणाऱ्या मनुष्याचा अपराध रज्जूनें काय बरें केला आहे? काहीं नाहीं, तसें प्रस्तुत प्रसंगीं अजितेंद्रिय असा मीच खरा अपराधी आहें ॥ १७ ॥

आतां कोणी म्हणेल कीं, सौगंध्य, सौंदर्य, प्रेम इत्यादि गुणांनीं तीच या मोहाला कारण झाली नस्मात् हा तिचाच अपराध आहे? तर असें नाहीं. तिचे ठिकाणी ते गुण नाहीं. मी

देव्या सूक्तवाक्येन बोधितस्य अपि दुर्मतेः अजितात्मनः मे मनोगतः महामोहः न अपयाति ! ॥ १६ ॥ रज्जुस्वरूपाविदुषः सर्पचेतसः रज्ज्वा [इव एतया] नः किं अपकृतं ?

... यः अहं अजितेंद्रियः ॥ १७ ॥ दौर्गंध्याद्यात्मकः अशुचिः मलीमसः (मलीन) अयं कायः क ? सौमनस्याद्याः गुणाः क ? हि अध्यासः (आरोप) अविद्यया कृतः ॥ १८ ॥

बोधितस्यापि देव्या मे सूक्तवाक्येन दुर्मतेः ॥ मनोगतो महामोहो नापयात्यजितात्मनः ॥ १६ ॥ किमेतया नोऽपकृतं रज्ज्वा वा

सर्पचेतसः ॥ रज्जुस्वरूपाविदुषो यो ऽहं यदजितेंद्रियः ॥ १७ ॥ क्वायं मलीमसः कायो दौर्गंध्याद्यात्मको ऽशुचिः ॥ क गुणाः

सौमनस्याद्या ह्यध्यासो ऽविद्यया कृतः ॥१८॥ पित्रोः किं स्वं नु भार्यायाः स्वामिनो ऽग्नेः श्वगृध्रयोः ॥ किमात्मनः किं सुहृदा

मिति यो नावसीयते ॥ १९ ॥ तस्मिन्कलेवरे ऽमेध्ये तुच्छनिष्ठे विषज्जते ॥ अहो सुभद्रं सुनसं सुस्मितं च मुखं स्त्रियः ॥२०॥

यः किं पित्रोः स्वं (मालमत्ता), नु भार्यायाः, स्वामिनः, अग्नेः, श्वगृध्रयोः [वा स्वं], किं आत्मनः [स्वं], किं सुहृदां [वा स्वं] इति न अवसीयते (निश्चित होत नाहीं);

॥ १९ ॥ तस्मिन् अमेध्ये (अपवित्र) तुच्छनिष्ठे कलेवरे "अहो स्त्रियः मुखं सुभद्रं, सुनसं, सुस्मितं च ! " [इति] विषज्जते (सक्त होतो). ॥ २० ॥

आपल्या बुद्धीनेंच कल्पिलेले आहेत. पहा, - हा मलिन व दुर्गंधीनें भरलेला अपवित्र देह कोणीकडे? आणि सौमनस्य, शुचित्व, सौगंध्यादि गुण कोणीकडे? परंतु तिचे

(देहाचे) ठिकाणीं या सर्व गुणांचा आरोप मीं अज्ञानानें केला ! ॥ १८ ॥ देहावर ममत्वाभिमान हा मुद्धां कल्पितच आहे - पहा कीं, - हा देह का माता-

पितरांचा म्हणावा (त्यांनीं उत्पन्न केला म्हणून)? कीं भार्येचा (ती सर्व भोग देते म्हणून)? कीं धन्याचा (तो वेतन देतो म्हणून)? किंवा अग्नीचा (शेवटीं अंत्येष्टीच्या

वेळेस त्याची आहुति होतो यामुळें)? किंवा कुत्रीं गिधाडें याचा (अंतीं त्याचें भक्ष्य होतो म्हणून)? अथवा आपला (त्यानें ह्या० देहानें केलेल्या शुभाशुभाचा परिणाम आपणास

भोगावा लागतो म्हणून)? अगर इष्टमित्रांचा म्हणावा (कारण ते याजवर अनेक उपकार करितात म्हणून)? - एवंच हा देह अमक्याचाच आहे असा निश्चय करिता येत नाहीं -

॥ १९ ॥ अंतीं कृमि, विष्ठा किंवा भस्म यापैकीं कांहीं तरी होणाऱ्या अशा या अपवित्र व तुच्छ स्त्रीच्या शरीरावर ' अहाहा किती मनोहर या स्त्रीचें मुख आहे ! नासिका किती

सुरेल। मंदहास्य काय मनेचें। ' इत्यादि रीतीनें माझ्यासारखा मूढ सक्त होतो. ॥ २० ॥ अतएव स्त्रीचे शरीरावर अनेक गुणांचा आरोप करून रममाण होणारे माझ्यासारखे नर कृमि (किडे) तुल्यच समजावे. - कारण, त्वचा, मांस, रक्त, स्नायु, (शिरा), मेद, मज्जा आणि हाडें यांचा संघात (समुदाय) व विष्ठा, मूत्र, पू यांचें कोठार जो देह त्याचे ठिकाणीं रममाण होणारे जे नराधम त्यात आणि विष्ठामूत्रादिकांचे ठिकाणीं लुब्ध होणाऱ्या कृमीं(किड्या)मध्यें कितीसें वरें अंतर आहे ? ॥ २१ ॥ - असो अशा रीतीनें स्त्रिया अत्यंत बीभत्स (किळसवाण्या) आहेत - तथापि विचारी मनुष्यानें त्याचे ठिकाणीं अवलोकनादि प्रकारानें सुद्धा सक्तता ठेवू नये. कारण विषय व इंद्रियें यांच्या संयोगाम्- सून मनाचा क्षोभ होतो, - व मग किळसवाण्या पदार्थांची देखील किळस येत नाहीशी होते. - याचप्रमाणें स्त्रीलंपट जनाशींही संबंध ठेवूं नये. ॥२२॥ - आता कधींकधीं विषयाचें

त्वङ्मांसरुधिरस्नायुमेदोमज्जास्थिसंहतौ विण्मूत्रपूये रमतां, कृमीणां [च] अंतरं कियत् ! ॥ २१ ॥ अथ आपि अर्थवित् स्त्रीषु, स्त्रैणेषु च न उपसज्जेत विषयेंद्रियसंयोगात् मनः क्षुभ्यति. अन्यथा न. ॥२२॥ अदृष्टात् अश्रुतात् भावात् भावः न उपजायतें. प्राणान् (इंद्रियास) असंप्रयुंजतः (निगृहीत करणाराचें) मन. स्तिमित (निश्चळ) [सत्] शाम्यति.॥२३॥

त्वङ्मांसरुधिरस्नायुमेदोमज्जाऽस्थिसंहतौ ॥ विण्मूत्रपूये रमतां कृमीणां कियदंतरम् ॥ २१ ॥
अथाऽपि नोपसज्जेत स्त्रीषु स्त्रैणेषु चार्थवित् ॥ विषयेंद्रियसंयोगान्मनः क्षुभ्यति नान्यथा ॥ २२ ॥
अदृष्टादश्रुताद्भावान्न भाव उपजायते ॥ असंप्रयुंजतः प्राणान् शाम्यति स्तिमितं मनः ॥ २३ ॥
तस्मात्संगो न कर्तव्यः स्त्रीषु स्त्रैणेषु चेंद्रियैः ॥ विदुषां चाप्यविश्रब्धः षड्वर्गः किमु मादृशाम् ॥ २४ ॥

तस्मात् इंद्रियैः स्त्रीषु, स्त्रैणेषु च संगः न कर्तव्यः. विदुषां आपि षड्वर्गः (मनःषट्इंद्रियसमूह) अविश्रब्धः (अविश्वसनीय), मादृशां [अविश्रब्ध. इति] किमु ? ॥ २४ ॥

दर्शन न होता, डोळे मिटलेले असूनही मनाचा क्षोभ होतो ही गोष्ट खरी, तथापि तो तरी पूर्वी झालेल्या विषयदर्शनावाचून होत नाही. पहा कीं, - जो पदार्थ पूर्वी कधीं पाहिला नाहीं व ऐकिलाही नाहीं त्यापासून मनःक्षोभ होत नाहीं. यासाठीं इंद्रियांचा विषयांपासून निग्रह करणारा जो मनुष्य त्याचें मन निश्चल होऊन शांत होतें. ॥ २३ ॥ वास्तव मुक्त पुरुषानें स्त्रिया व स्त्रैण यांचे ठिकाणीं इंद्रियांची आसक्ति ठेवूं नये व यांचा संग करूं नये. कारण, मनसह हा इंद्रियसमूह मोठमोठ्या विद्वानांसमुद्धा अविश्वसनीय आहे मग मजसारख्या अविचारी मनुष्याची काय कथा ? ' ॥ २४ ॥

---

१ नारदें विनोदस्थळीं । कृष्णपत्नी मागितल्या साठीं । तो नारदी केला गंगातटीं । तेथ जन्मले पोटीं साठ पुत्र ॥ नाथ २७६.

श्रीकृष्ण ह्मणाले :- हे उद्धवा ! याप्रमाणें गायन करीत तो नरलोकी व देवलोकी प्रसिद्ध असा पुरूरवा राजा उर्वशीलोकाचा त्याग करून आपलेठिकाणींच (हृदयात) मज पर मात्म्यास जाणून आणि ज्ञानानें सर्व मोहाचा त्याग करून उपरम (विरक्ति) पावता झाला ॥ २५ ॥ यामुळे हे उद्धवा ! बुद्धिमान् पुरुषानें दु संगाचा त्याग करून सत्संगति निरंतर करावी. कारण सज्जन हे हितोपदेशानी मनाची विषयासक्ति नाहीशी करितात ॥ २६ ॥ - आता सज्जनाचें लक्षण तुला सागतो - सज्जन (साधु) निरिच्छ, मदेकचित्त, सम्र, समदृष्टि, अहंताममतारहित, द्वैतबुद्धिहीन आणि असंग्रही असतात. ॥ २७ ॥ - उद्धवा ! अशा सज्जनाच्या समागमास असता उपदेशाचीही अपेक्षा नाही केवळ त्याचे सा-

श्रीभगवान् उवाच— एव प्रगायन् सः नृपदेवदेव. ज्ञानविधूतमोहः [सन्] उर्वशीलोकं विहाय अथो आत्मनि आत्मानं मा अवगम्य उपारमत ॥ २५ ॥ तत बुद्धिमान् दुःसंगं उत्सृज्य सत्सु सज्जेत. संत. उक्तिभि एतस्य मनोव्यासंगं छिंदति ॥ २६ ॥ मच्चित्ता अनपेक्षाः समदर्शिन. प्रशाता निरहकारा निर्ममाः निर्द्वंद्वा. निष्परिग्रहा (संग्रहरहित) संतः [भवंति]. ॥ २७ ॥ महाभाग, तेषु महाभागेषु मत्कथा नित्य संभवंति हि ताः जुषतां (सेवन करणाऱ्या) नृणा अघ प्रपुनाति. ॥ २८ ॥ ये आदृता.

श्रीभगवानुवाच । एवं प्रगायन्नृपदेवदेवः स उर्वशीलोकमथो विहाय ॥ आत्मानमात्मन्यवगम्य मां वै उपारमज्ज्ञानविधूतमोहः ॥ २५ ॥
ततो दुःसंगमुत्सृज्य सत्सु सज्जेत बुद्धिमान् ॥ संत एतस्य च्छिंदंति मनो व्यासंगमुक्तिभिः ॥ २६ ॥ संतोऽनपेक्षा मच्चित्ताः प्रशांताः
समदर्शिनः ॥ निर्ममा निरहंकारा निर्द्वंद्वा निष्परिग्रहाः ॥ २७ ॥ तेषु नित्यं महाभाग महाभागेषु मत्कथाः ॥ संभवंति हि ता नृणां
जुषतां प्रपुनंत्यघम् ॥ २८ ॥ ता ये शृण्वंति गायंति ह्यनुमोदंति चाऽऽदृताः ॥ मत्पराः श्रद्दधानाश्च भक्तिं विंदंति ते मयि ॥ २९ ॥
भक्तिं लब्धवतः साधो किमन्यदवशिष्यते ॥ मय्यनंतगुणे ब्रह्मण्यानंदानुभवात्मनि ॥ ३० ॥ यथोपश्रयमाणस्य भगवंतं विभावसुम् ॥
शीतं भयं तमोऽप्येति साधून्संसेवतस्तथा ॥ ३१ ॥

[संतः] ताः शृण्वंति, गायंति, अनुमोदंति च, ते मत्पराः, श्रद्दधाना. (श्रद्धालु) च [सतः] मयि भक्ति विंदति. ॥ २९ ॥ साधो, अनंतगुणे आनंदानुभवात्मनि ब्रह्मणि मयि भक्ति लब्धवतः किं अन्यत् अवशिष्यते ? ॥ ३० ॥ यथा भगवतं विभावसुं (अग्नि) उपश्रयमाणस्य शीत, भय, तम. [च], तथा साधून् संसेवत. शीत, भय, [तम च]

निश्चयच तारक आहे. - हे महाभाग्यवंता ! त्या महाभाग्यशाली सज्जनाचे ठिकाणीं निरंतर माझ्या गुणकथा चालू असतात त्या श्रवण करणाऱ्या जनाचे पाप निःशेष नाहीसे करि-तात. ॥ २८ ॥ जे लोक माझ्या कथा ऐकतात, गातात, व त्यास आदरानें अनुमोदन देतात, ते मन्निष्ठ व श्रद्धावंत होऊन माझे ठिकाणी भक्ति पावतात ॥ २९ ॥ अनंतगुण, ब्रह्मरूप, आणि आनंदानुभवस्वरूप अशा माझेठिकाणीं ज्यास भक्ति उत्पन्न झाली आहे त्या सुपुरुषाचें कोणतें कर्तव्य अवशिष्ट राहतें ? - तर कोणतेंही नाहीं. - ॥ ३० ॥ ज्याप्रमाणे तेजस्वी

अशा अग्नीचा आश्रय करणाऱ्याचें शीत, भय आणि अंधकार नाहींसे होतात; त्याप्रमाणें साधूंची संगति करणाराचें कर्मजाड्य, संसारभय, आणि मूलाज्ञान हीं नाहींशीं होतात. ॥ ३१ ॥ पाण्यांत बुडणारांस जशी नौका आश्रय होते तद्वत् या भयंकर संसारसमुद्रामध्यें वारंवार निमज्जन व उन्मज्जन करणाऱ्या ह्मणजे उच्चनीच योनींस प्राप्त होणाऱ्या जीवांस शांत व ब्रह्मनिष्ठ असे संत हेच परम आश्रय होत. ॥३२॥ प्राणिमात्रास जीवन जसें अन्न, दुःखितांस रक्षक जसा मी, मनुष्यांस परलोकीं उपयोगीं पडणारें धन जसा धर्म, तसे संसारगर्तीपासून भिणारांस सज्जन आश्रय होत. ॥ ३३ ॥ संत हे आश्रितास नेत्र (अर्थात् सगुण व निर्गुण स्वरूपाचें ज्ञान) देतात. सूर्य हा सर्वलोकास आपल्या उदयानें

अप्स्विति. ॥ ३१ ॥ अप्सु (पाण्यात) मज्जतां दृढा नौः इव घोरे भवाब्धौ निमज्ज्य उन्मज्जतां परमायनं (मुख्य आश्रय) ब्रह्मविदः शांताः संतः. ॥ ३२ ॥ [यथा] प्राणिनां प्राणः (जीवन) अन्नं, [यथा] अहं आर्तानां शरणं, [यथा च] नृणां प्रेत्य (परलोकीं) धर्मः वित्तं, [तथा] अर्वाक् बिभ्यतः संतः शरणं. ॥ ३३ ॥ संतः चक्षूंषि दिशंति.

निमज्ज्योन्मज्जतां घोरे भवाब्धौ परमायनम् ॥ संतो ब्रह्मविदः शांता नौर्दृढेवाप्सु मज्जताम् ॥ ३२ ॥

अन्नं हि प्राणिनां प्राण आर्तानां शरणं त्वहम् ॥ धर्मो वित्तं नृणां प्रेत्य संतो ऽर्वाग्बिभ्यतो ऽरणम् ॥ ३३ ॥

संतो दिशंति चक्षूंषि बहिरर्कः समुत्थितः ॥ देवता बांधवाः संतः संत आत्मा ऽहमेव च ॥ ३४ ॥

वैतसेनस्ततो ऽप्येवमुर्वश्या लोकनिस्पृहः ॥ मुक्तसंगो महीमेतामात्मारामश्चचार ह ॥ ३५ ॥

इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे ऐलगीतं नाम षड्विंशो ऽध्यायः ॥ २६ ॥ ॥७॥

समुत्थितः अर्कः बहिः [चक्षुः ददाति]. संतः देवताबांधवाः. संतः आत्मा अहं एव. ॥ ३४ ॥ ततः वैतसेनः (ऐल, किंवा पुरूरवा) अपि एवं उर्वश्याः लोकनिस्पृहः मुक्तसंगः [सन्] आत्मारामः [भूत्वा] एतां महीं चचार ह. ॥ ३५ ॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे षड्विंशो ऽध्यायः ॥ २६ ॥

प्रकाश देतो खरा;- परंतु त्याचा प्रकाश बाह्यविषयाचे ठिकाणीं मात्र उपयोगीं पडतो, अंतरात्मज्ञानाविषयीं त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. तस्मात् अंतर्बाह्य प्रकाश देणारे साधुच होत.- उद्धवा! साधु हेच देव, साधुच बंधु, साधुच आत्मा, किंबहुना साधुच मी (परमेश्वर) होत. ॥ ३४ ॥ असो उद्धवा! याप्रकारें उर्वशीच्या लोकाविषयीं किंबहुना उर्वशीचे मुखावलोकनाविषयींही ज्यास इच्छा राहिली नाहीं असा तो पुरूरवा राजा स्त्रिया व स्त्रैण यांचा संग सोडून सत्समागमेंकरून आत्मस्वरूपींच रममाण होत्साता यथेच्छ संचार करिता झाला. ॥ ३५ ॥ ॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने एकादशस्कंधे षड्विंशतितमो ऽध्यायः ॥ २६ ॥

१ ह्या अध्यायाचा सारांश नाथ देतात :— न करितां भगवद्भक्ती । कदा नुपजे विरक्ती । विरक्तीवीण भगवत्प्राप्ती । नव्हे कल्पांतीं साधका ॥ अध्याय २६।२०.

उद्धव ह्मणाला :– हे महाशक्तिमंता, तुझें आराधन हें ज्याचें स्वरूप तो पूजाविधि मला निवेदन कर ह्मणजे कोणते भक्त कोणत्या कारणासाठीं, कोणत्या आश्रयावर (मूर्ति इत्यादि स्थानीं), कशा प्रकारे तुझी पूजा करितात, - तें मला सांग. - तूं सात्वताचा (भक्ताचा किंवा यादवाचा) अधिपति आहेस. ॥ १ ॥ - ह्याबद्दल पुन्हा प्रश्न कर-ण्याचें कारण असें :- नारद, भगवान् व्यास, अंगिराऋषीचे पुत्र सुरगुरु बृहस्पति व दुसरेही मुनि वारवार असें सांगत आले आहेत कीं मनुष्यांना कल्याणप्राप्तीचे (मोक्ष मिळ-विण्याचें) साधन हेंच (भगवंताचें आराधनच) होय. ॥ २ ॥ तो पूजाविधि प्रथमतः तुमच्या मुखकमलातून बाहेर निघाला असता (तुह्मी ब्रह्मदेवाला त्याचा उपदेश केला तेव्हा) भग-

उद्धवः उवाच :— प्रभो, भरतर्षभ, भवदाराधनं क्रियायोगं (पूजाविधि) समाचक्ष्व (सांग). ये सात्वताः (भक्त) यस्मात् त्वां यथा अर्चंति, [तत् कथय] ॥ १ ॥ नारदः, भगवान् व्यासः, आचार्यः अंगिरसः – सुतः (बृहस्पति) [इत्यादयः] मुनयः मुहुः एतत् नृणां निःश्रेयसं (कल्याणसाधन) वदंति. ॥ २ ॥ भगवान् अजः (ब्रह्मा) यत् ते

उद्धव उवाच । क्रियायोगं समाचक्ष्व भवदाराधनं प्रभो ॥ यस्मात्त्वां ये यथा ऽर्चंति सात्वताः सात्वतर्षभ ॥१॥
नारदो भगवान्व्यास आचार्योऽंगिरसः सुतः ॥२॥ निःसृतं ते मुखांभो
एतद्वदंति मुनयो मुहुर्निःश्रेयसं नृणाम् ॥ जाद्यदाह भगवानजः ॥ पुत्रेभ्यो भृगुमुख्येभ्यो देव्यै च भगवान् भवः ॥ ३ ॥ एतद्वै सर्ववर्णानामाश्रमाणां
च संमतम् ॥ श्रेयसामुत्तमं मन्ये स्त्रीशूद्राणां च मानद ॥ ४ ॥ एतत्कमलपत्राक्ष कर्मबंधविमोचनम् ॥
भक्ताय चानुरक्ताय ब्रूहि विश्वेश्वरेश्वर ॥ ५ ॥ श्रीभगवानुवाच । न ह्यंतो ऽनंतपारस्य कर्मकांडस्य चोद्धव ॥
संक्षिप्तं वर्णयिष्यामि यथावदनुपूर्वशः ॥ ६ ॥

मुखांबुजात् निःसृतं भृगुमुख्येभ्यः पुत्रेभ्यः, भगवान् भवः (शंकर) देव्यै च आह ॥ ३ ॥ मानद, सर्ववर्णानां, आश्रमाणां, स्त्रीशूद्राणां च संमतं (मान्य) एतत् श्रेयसां उत्तम मन्ये. ॥ ४ ॥ कमलपत्राक्ष, विश्वेश्वरेश्वर, कर्मबंधविमोचनं एतत् अनुरक्ताय (प्रेमळ) भक्ताय ब्रूहि. ॥ ५ ॥ श्रीभगवान् उवाच– उद्धव, अनंतपारस्य कर्मकांडस्य अंतः न, थ-

वान् ब्रह्मदेवानें तो आपल्या भृगुप्रभृति पुत्रांना निवेदन केला, नंतर भगवान् शंकरांनीं तो पार्वतीला सांगितला. ॥ ३ ॥ भगवंता, आपण लोकांना उत्तम पदवी प्राप्त करून देता. प्रभो, माझ्या बुद्धीचा तर असा निश्चय आहे कीं, सकल वर्ण, आश्रम, स्त्रिया आणि शूद्र ह्यांच्या कल्याणाचें उत्तम साधन हा पूजाविधिच होय, आणि ही गोष्ट सर्वांना मान्य आहे. ॥ ४ ॥ हे कमलदलनयना, विश्वाचे अधिपति जे ब्रह्मादि देव त्यांचाही नियामक तूं होस माझी तुजवर पूर्ण भक्ति व निस्सीम प्रेम आहे, त्या अर्थीं तूं, कर्मकांतून मुख्यांचें साधन; असा तो पूजाविधि मला सांग. ॥ ५ ॥ श्रीभगवान् ह्मणाले :– उद्धवा, कर्मकांडाचा अंत कधींच लागावयाचा नाहीं कारण, त्या विषयाचें

प्रतिपादन करणारे ग्रंथ अनंत आहेत, व त्यांत अनुष्ठानांचे प्रकारही अपरंपार सांगितले आहेत तरी मी तुला पूजाविधि थोडक्यांत अनुक्रमानें यथाभाग निवेदन करितों ॥ ६ ॥ माझें यजन (पूजा) करण्याचे प्रकार तीन आहेत.– एक केवळ वैदिक (ज्यात वेदोक्त मंत्र आणि वैदिकच अंगें आहेत तो पुरुषसूक्तात वगैरे सांगितलेला), दुसरा तांत्रिक (तंत्रोक्त मंत्र व तंत्रोक्तच अंगें ज्यात तो, पंचरात्रादि आगमात वर्णिलेला), आणि तिसरा मिश्र (ज्यात वेदोक्त व तंत्रोक्त अशा दोन्ही पद्धतींचा समावेश असतो तो अष्टाक्षरादि) ह्या तीन प्रकारांपैकी ज्याला जो प्रशस्त वाटेल त्या मार्गानेंच त्यानें माझी पूजा करावी ॥ ७ ॥ पुरुषानें प्रथम विहित काळीं आपल्या अधिकाराप्रमाणे वेदानें सांगितलेलें द्विजत्व

यावत् अनुपूर्वशः संक्षिप्त वर्णयिष्यामि. ॥ ६ ॥ (मू.) ॥ ७ ॥ पूरुषः स्वनियमेन उक्तं द्विजत्वं प्राप्य यदा, यथा श्रद्धया, भक्त्या [च] मा यजेत, तत् मे निबोध ॥ ८ ॥ भक्तियुक्तः [सन्] अर्चायां (मूर्तींवर) स्थंडिले, अग्नौ, सूर्ये, अप्सु (उदकांत), हृदि, द्विजे वा द्रव्येण, अमायया (निष्कामपणें) स्वगुरु मां अर्चेत्. ॥ ९ ॥ पूर्वं धौतदंतः [सन्]

वैदिकस्तांत्रिको मिश्र इति मे त्रिविधो मखः ॥ त्रयाणामीप्सितेनैव विधिना मां समर्चयेत् ॥ ७ ॥
यदा स्वनिगमेनोक्तं द्विजत्वं प्राप्य पूरुषः ॥ यथा यजेत मां भक्त्या श्रद्धया तन्निबोध मे ॥ ८ ॥
अर्चायां स्थंडिलेऽग्नौ वा सूर्ये वाऽप्सु हृदि द्विजे ॥ द्रव्येण भक्तियुक्तोऽर्चेत्स्वगुरुं माममायया ॥ ९ ॥
पूर्वं स्नानं प्रकुर्वीत धौतदंतोऽगशुद्धये ॥ उभयैरपि च स्नानमंत्रैर्मृद्ग्रहणादिना ॥ १० ॥

अंगशुद्धये उभयैः (वैदिक व तंत्रोक्त) अपि स्नानमंत्रैः मृद्ग्रहणादिना स्नानं प्रकुर्वीत. ॥ १० ॥

(उपनयन) प्राप्त करून घ्यावें आणि नंतर मजवर विश्वास ठेवून भक्तिपूर्वक माझी पूजा करावी. ती कशी करावी तें सांगतों लक्ष देऊन ऐक:– ॥ ८ ॥ मूर्ति, स्थंडिल, अग्नि, सूर्य, उदक, हृदय व ब्राह्मण हीं माझ्या पूजेचीं अधिष्ठानें (आधार) होत. पुरुषानें अतरीं मजविषयी भक्ति धरून, मीच (ईश्वरच) आपला गुरु होय अशा भावनेनें, ह्यांपैकीं कोणत्याही एका अधिष्ठानीं गंधमाल्यादि उपचारांच्या योगें निष्कपटपणें (ह्या पूजनापासून मला अमुक फळ मिळावें अशी कांहीं इच्छा न धरिता) माझी पूजा करावी ॥ ९ ॥ पूजेच्या पूर्वी काय करावें तें सांगतों ऐक:- प्रथम दंतधावन करावें आणि वेदोक्त व तंत्रोक्त अशा उभयविधही मंत्रांनीं शरीरशुद्धीसाठीं मृत्तिकाग्रहण, व भस्मगोमयलेपन क-

१ यत्पुरुषेण हविषा देवा यज्ञमतन्वत । वसंतो अस्यासीदाज्यं ग्रीष्म इध्मः शरद्धविः इत्यादि ॥
२ अष्टमे वर्षे ब्राह्मणमुपनयेद्गर्भाष्टमे वैकादशे क्षत्रियं द्वादशे वैश्यमाषोडशात् इत्यादि ३ हृदयीं जें माझें आवाहन । तें पूजास्थान साहावें ॥ नाथ, ५७१.

रून स्नान करावें. ॥ १० ॥ संध्योपासना, ब्रह्मयज्ञ इत्यादि जीं कर्में वेदानें अवश्य करावयास सांगितलीं आहेत, [1] तीं करणें सोडूं नये, तर - त्या कर्मांसह नित्य माझी पूजा करीत जावें. अंतःकरणामध्यें केवळ ईश्वराविषयींचेंच चिंतन चालवावें (विषयभोगाचे संकल्प करूं नये). अशा प्रकारें केलेली माझी पूजा संचित व क्रियमाण कर्मांचा क्षय करिते. ॥ ११ ॥ - पूर्वीं माझ्या पूजेचीं आठ अधिष्ठानें सांगितलीं त्यापैकीं पहिलें अधिष्ठान जी - मूर्ति ती आठ प्रकारची सांगितली आहे:- (१) पाषाणमय, (२) काष्ठमय, (३) सुवर्णादि धातूची केलेली, (४) मृत्तिका चंदन इत्यादिकाची रचलेली, (५) चित्ररूप, (६) वालुकामय, (७) मनोमय, आणि (८) रत्नमय. ॥ १२ ॥

वेदेन [यानि] संध्योपास्त्यादिकर्माणि आचोदितानि, तैः [सह] सम्यक्संकल्पः (उत्तम ह्म० ईश्वरविषयक संकल्प ज्याचा असा) [सन्] कर्मपावनीं (कर्मांतून शुद्ध करणारी, कर्मक्षय करणारी अशा) मे पूजां कल्पयेत्. ॥ ११ ॥ शैली (पाषाणमय), दारुमयी (काष्ठमय), लौही (धातुमय), लेप्या (लिंपलेली—चंदनाची किंवा चिकण मातीची), लेख्या (चित्ररूप),

संध्योपास्त्यादिकर्माणि वेदेनाऽऽचोदितानि मे ॥ पूजां तैः कल्पयेत्सम्यक्संकल्पः कर्मपावनीम् ॥ ११ ॥

शैली दारुमयी लौही लेप्या लेख्या च सैकती ॥ मनोमयी मणिमयी प्रतिमाऽष्टविधा स्मृता ॥ १२ ॥

चलाचलेति द्विविधा प्रतिष्ठा जीवमंदिरम् ॥ उद्वासावाहने न स्तः स्थिरायामुद्धवार्चने ॥ १३ ॥

अस्थिरायां विकल्पः स्यात्स्थंडिले तु भवेद्द्वयम् ॥ स्नपनं त्वविलेप्यायामन्यत्र परिमार्जनम् ॥ १४ ॥

सैकती, मनोमयी, मणिमयी च [इति] प्रतिमा अष्टविधा स्मृता. ॥ १२ ॥ चला, अचला (स्थिर) इति द्विविधा प्रतिष्ठा जीवमंदिरं (ईश्वराचें वसतिस्थान) उद्धव, स्थिरायां अर्चने उद्वासावाहने (विसर्जन व आवाहन) न स्तः. ॥ १३ ॥ अस्थिरायां विकल्पः स्यात्. स्थंडिले तु द्वयं भवेत्. अविलेप्यायां (चंदनाची, मातीची किंवा चित्ररूप नसेल तेथें)

ज्याच्या आधारें ईश्वर राहतो तें भगवंताचें मंदिररूप अधिष्ठान (मूर्ति इत्यादि) चल (हलणारें) आणि अचल (न हलणारें) असे दोन प्रकारचे आहे. उद्धवा, त्यापैकीं स्थिर अधिष्ठानावर उद्वासन (विसर्जन) आणि आवाहन हीं करावयाचीं नसतात. ॥ १३ ॥ चल अधिष्ठानावर तीं कोणी करितात कोणी करीत नाहींत, असा विकल्प आहे, [2] स्थंडिलावर दोन्ही केलींच पाहिजेत, मूर्ति मातीची, चंदनाची किंवा चित्ररूप नसेल तर तिला स्नान घालावें, इतरत्र (मातीच्या, चंदनाच्या किंवा चित्ररूप प्रतिमेवर) नुसतें मार्जनच करावें. ॥ १४ ॥

---

१ ही मानसपूजेसाठींच सांगितली आहे. २ शालग्रामावर आवाहन व विसर्जन करू नये; वालुकामयमूर्तीवर तीं करावींच. इतर ठिकाणीं केलीं तरी चालतें न केलीं तरी चालतें

- आतां भक्त सकाम किंवा निष्काम जसा असेल त्याप्रमाणें उपचारांमध्यें विशेष असतात, ते कसे तें सांगतो ऐक: पूजकाच्या अंतरीं काहीं फलप्राप्तीची इच्छा
असेल - तर त्यानें - अतिशय चांगलीं द्रव्यें संपादून त्यायोगें प्रतिमादि अधिष्ठानीं मला पूजोपचार अर्पण करावे. निष्कपट (निरिच्छ, फलप्राप्तीची इच्छा न करणारा.) भक्तानें
तर जशी मिळतील तशाच द्रव्यानीं माझें पूजन केलें तरी चालतें (झाला, चांगले उपचार मिळविलेच पाहिजेत, हा नियम लागू नाहीं) जेथें चंदनादि द्रव्यें मुळींच मिळणार
नाहीत तेथें ते ते उपचार मनामध्यें भावनेनें कल्पावे (किंवा ' हृदि भावेन चैव हि ' ह्याचा अर्थ ' मानस पूजेंत काल्पनिकच उपचार अर्पावे ' असा करावा). ॥ १५ ॥
- अधिष्ठानभेदाप्रमाणें मुख्य मुख्य पूजोपचारही भिन्न भिन्न योजावे लागतात: पहा:- उद्धवा, स्नान घालणें, अलंकारभूषणें लेवविणे हे उपचार मूर्तीवरच अर्पण करणें अतिप्र-
कल्पनं, अन्यत्र परिमार्जनं. ॥ १४ ॥ प्रतिमादिषु प्रसिद्धैः (उत्तम) द्रव्यैः मद्यागः. अमायिनः (निष्काम) भक्तस्य यथालब्धैः (मिळतील तसल्या द्रव्यानीं), हृदि भावेन (मनोमय
उपचारानीं) च एव [मद्यागः]. ॥ १५ ॥ उद्धव, अर्चायां स्नानालंकरण एव प्रेष्ठं. स्थंडिले तत्त्वविन्यासः (त्याला देवताची स्थापना). वन्हौ आज्यप्लुतं हविः. ॥ १६ ॥

द्रव्यैः प्रसिद्धैर्मद्यागः प्रतिमादिष्वमायिनः ॥ भक्तस्य च यथालब्धैर्हृदि भावेन चैव हि ॥ १५ ॥
स्नानालंकरणं प्रेष्ठमर्चायामेव तूद्धव ॥ स्थंडिले तत्त्वविन्यासो वह्नावाज्यप्लुतं हविः ॥ १६ ॥
सूर्ये चाभ्यर्हणं प्रेष्ठं सलिले सलिलादिभिः ॥ श्रद्धयोपाहृतं प्रेष्ठं भक्तेन मम वार्यपि ॥ १७ ॥
भूर्यप्यभक्तोपहृतं न मे तोषाय कल्पते ॥ गंधो धूपः सुमनसो दीपोऽन्नाद्यं च किं पुनः ॥ १८ ॥

सूर्ये अभ्यर्हणं (उपस्थानादि) प्रेष्ठं. सलिले सलिलादिभिः [यजनं]. भक्तेन श्रद्धया उपाहृतं वारि (उदक) अपि मम प्रेष्ठं. ॥१७॥ अभक्तोपहृतं भूरि अपि गंधः, धूप, सुमनसः,
दीपः, अन्नाद्यं च मे तोषाय न कल्पते. किं पुनः [वक्तव्यं]. ॥ १८ ॥

शस्त होय. स्थंडिलावर पूजा करावयाची असेल तेव्हा योग्य स्थानीं त्या त्या मंत्रानीं अंगदेवताची व प्रधानदेवताची स्थापना करावी. अग्नीमध्यें ईश्वराची आराधना क-
रणें झाल्यास आज्ययुक्त हविर्भागाच्या आहुति द्याव्या. ॥ १६ ॥ सूर्यमंडलरूप अधिष्ठानीं ईश्वराची आराधना कर्तव्य असेल तर त्यावेळीं उपस्थान, अर्घ्यदान इत्यादि
उपचार अत्यंत प्रशस्त समजावे. उदकरूप अधिष्ठानीं पूजा करणें झाल्यास उदकानें तर्पण करणें इत्यादि उपचाराच्या योगें करावी. - उद्धवा, तुला मी एक साधारण नियम
सांगून ठेवितों कीं, - भक्तानें केवळ उदक जरी भक्तिपुरःसर आणून दिलें तरी ते मला अतिशय प्रिय वाटतें. ॥ १७ ॥ आणि अभक्तानें गंध, धूप, पुष्पें, दीप, अन्न इत्यादि

(ह्यांत सगळा निर्णय समज.) ॥ १८ ॥ - ही अधिकारादि-
बहुत उपचार अर्पण केले तरी त्यापासून माझ्या अंतःकरणाला संतोष होत नाहीं ह्याहून अधिक काय सागावें? (ह्यांत सगळा निर्णय समज.) ॥ १८ ॥ - ही अधिकारादि- पूर्वेकडे
कांची व्यवस्था सांगितली आता पूजा कशी करावी तो प्रकार निवेदन करितों :- मनुष्यानें - दंतधावन स्नान इत्यादि करून - शुद्ध व्हावें, पूजेसाठीं उपचारद्रव्यें मिळवावीं, पूर्वेकडे
अग्रें करून दर्भ पसरून त्याचें आसन रचावें, आणि त्यावर पूर्वेकडे किंवा उत्तरेकडे तोंड करून बसून पूजा आरंभावी. प्रतिमा स्थिर असेल तर प्रतिमेकडे मुख करून बसावें
॥ १९ ॥ - नंतर गुरु, वडील मनुष्यें इत्यादिकांना नमस्कार करून - उपदेशानुरूप स्वताच्या शरीरावर न्यास करावे; व माझ्या मूर्तीवर हातानें मूलमंत्राचे न्यास करणें ह्या-
शुचिः, सम्भृतसंभारः प्राग्दर्भैः कल्पितासनः, प्राक् (पूर्वेकडे मुख ज्याचें असा), उदक् (उत्तरेकडे मुख ज्याचें असा) वा आसीन अर्चायां संमुख. [सन्] अर्चेत्. ॥ १९ ॥ कृतन्यास.
[सन्] कृतन्यासां मदर्चां पाणिना (हातानें) मृजेत् (स्वच्छ करो). कलशं, प्रोक्षणीयं च यथावत् उपसाधयेत्. ॥ २० ॥ तदद्भिः देवयजन, द्रव्याणि, आत्मानं एव च प्रोक्ष्य

शुचिः संभृतसंभारः प्राग्दर्भैः कल्पितासनः ॥ आसीनः प्रागुदग्वाऽर्चेदर्चायामथ संमुखः ॥१९॥ कृतन्यासः कृतन्यासां मदर्चां पाणिना
मृजेत् ॥ कलशं प्रोक्षणीयं च यथावदुपसाधयेत् ॥२०॥ तदद्भिर्देवयजनं द्रव्याण्यात्मानमेव च ॥ प्रोक्ष्य पात्राणि त्रीण्यद्भिस्तैस्तैर्द्रव्यैश्च
साधयेत् ॥ २१ ॥ पाद्यार्घ्याचमनीयार्थं त्रीणि पात्राणि दैशिकः ॥ हृदा शीर्ष्णाऽथ शिखया गायत्र्या चाभिमंत्रयेत् ॥ २२ ॥

आद्भिः [पूरितानि] त्रीणि पात्राणि तैः तैः द्रव्यैः साधयेत्. ॥ २१ ॥ दैशिक. (गुरूचा उपदेश मिळाला ज्याला असा) पाद्यार्घ्याचमनीयार्थं त्रीणि पात्राणि हृदा, शीर्ष्णा अथ शि-
त्यावर मग - निर्माल्य, गंधाचे लेप इत्यादि काढून पुसून - मूर्ति निर्मल करावी कलश व प्रोक्षणासाठीं घेतलेलें पात्र याचीही गंध, पुष्प, अक्षता इत्यादि उपचारानीं पूजा करावी.
॥ २० ॥ त्या कलशांतील उदकानें देवपूजेचें स्थान, पूजाद्रव्यें आणि स्वताचें शरीर यांवर प्रोक्षण करावें, आणि त्या उदकानेंच पाद्य, अर्घ्य आणि आचमन देण्यासाठीं तीन
पात्रें भरून तीं त्या त्या उपचाराना उचित अशीं द्रव्यें आत टाकून सिद्ध करावीं. आणि गुरूपदेशाप्रमाणें आचरण करणाऱ्या त्या पुरुषानें त्या तिन्हींपैकीं एकेका पात्रावर अनुक्रमें

1 जेवीं रजस्वलेचें पक्वान्न । उत्तम परि तें अतिहीन । तेवीं अभक्ताचें भजन । कदा जनार्दन स्पर्शेना ॥ नाथ, १६१.

2 किंवा 'प्राक्' याचा अर्थ 'पूर्वी' असा समजावा, आणि 'आसनावर बसण्यापूर्वी सकळ उपचारद्रव्यें जवळ मांडून ठेवावीं (एकदा आसनावर बसल्यावर पुन्हां वारंवार उठू नये)' असा अर्थ करावा.

3 पाद्ये श्यामाकदूर्वाब्जविष्णुक्रांतादिरिष्यते । पाद्यपात्रामध्यें श्यामाक (सावे) दूर्वा, कमळ, विष्णुक्रांत इत्यादि द्रव्यें असावीं.
गंधपुष्पाक्षतयवकुशाग्रतिलसर्षपाः । दूर्वा चेति क्रमादर्घद्रव्याष्टकमुदीरितम् ॥
अर्घ्यपात्रामध्यें गंध, फुलें, अक्षता, यव, दर्भाग्र, तिळ, सर्षप आणि दूर्वा हीं आठ द्रव्यें असावीं असें म्हटलें आहे. जातीलवंगककोलैर्मतमाचमनीयकम् । जायफळ, लवंग आणि कंकोळ या
द्रव्यांनीं आचमनीयोदक सिद्ध होतें.

हृदय, शीर्ष, व शिखा ह्या एकेक मंत्रानें प्रोक्षण करून पुन्हां तिन्हींवर गायत्रीमंत्रानें अभिमंत्रण करावें. ॥२१॥२२॥ नंतर वायु आणि अग्नि यांनीं - सुकवून व जाळून - उत्तम प्रकारें शुद्ध केलेल्या आपल्या शरीरामध्यें, नादांच्या शेवटीं सिद्धपुरुष जिचें ध्यान करितात, त्या हृदयकमलांतर्वर्ती व सूक्ष्म अशा माझ्या श्रेष्ठ जीवकलेचे (श्रीनारायणमूर्तीचें) ध्यान करावें. ॥ २३ ॥ त्या नारायणमूर्तीचेंच आत्मभावनेनें ध्यान केल्यावर, - जसा दीप प्रभेच्या योगें गृह व्यापितो त्याप्रमाणें - जिनें आपलें अमृतमय शरीर व्यापून सोडिलें असतां तेथेंच (शरीरामध्येंच) प्रथम मानस उपचारांनी तिचें पूजन करावें. मग पूजकानें तन्मय होऊन मूर्ति इत्यादि अधिष्ठानावर तिचें आवाहन करावें आणि स्थापनमुद्रेनें त्या

तथा, गायत्र्या च अभिमंत्रयेत्. ॥ २२ ॥ वाय्वग्निसंशुद्धे पिंडे हृत्पद्मस्था परां अण्वीं (सूक्ष्म) नादाते सिद्धभावितां मम जीवकला ध्यायेत्. ॥ २३ ॥ आत्मभूतया तया पिंडे व्याप्ते [सति,] संपूज्य तन्मय. [सन्] अर्चादिषु आवाह्य स्थाप्य न्यस्तांगं (अंगन्यासह्मणजे आवरणपूजा केली ज्याची अशा) मा प्रपूजयेत्. ॥२४॥ नवभिः धर्मादिभिः मम आसन,

पिंडे वाय्वग्निसंशुद्धे हृत्पद्मस्थां परां मम ॥ अण्वीं जीवकलां ध्यायेन्नादांते सिद्धभाविताम् ॥ २३ ॥

तया ऽऽत्मभूतया पिंडे व्याप्ते संपूज्य तन्मयः ॥ आवाह्यार्चादिषु स्थाप्य न्यस्तांगं मां प्रपूजयेत् ॥ २४ ॥

पाद्योपस्पर्शार्हणादीनुपचारान्प्रकल्पयेत् ॥ धर्मादिभिश्च नवभिः कल्पयित्वा ऽऽसनं मम ॥ २५ ॥

पद्ममष्टदलं तत्र कर्णिकाकेसरोज्ज्वलम् ॥ उभाभ्यां वेदतंत्राभ्यां मह्यं तूभयसिद्धये ॥ २६ ॥

तत्र कर्णिकाकेसरोज्ज्वलं अष्टदलं पद्म [च] कल्पयित्वा उभयसिद्धये उभाभ्यां वेदतंत्राभ्यां मह्यं पाद्योपस्पर्शार्हणादीन् उपचारान् प्रकल्पयेत्. ॥ २५ ॥ २६ ॥

अधिष्ठानीं तिची स्थापना करून अंगन्यास (आवरणपूजा) केल्यावर माझी पूजा आरंभावी. ॥ २४ ॥ - आतां पूजा कशी करावी तो प्रकार सांगतों :- प्रथम धर्मादि- काच्या आणि नऊ शक्तीच्या योगें माझें आसन कल्पून त्यावर कर्णिका आणि केसर याच्या योगें देदीप्यमान असें अष्टदळ कमळ कल्पावें (धर्म, ज्ञान, वैराग्य आणि ऐश्वर्य हे चार आग्नेयी, नैर्ऋत्य, वायव्य आणि ईशान्य अशा अनुक्रमें चार दिशांकडे माझ्या आसनभूत मंचकाचे पाय कल्पावे, अधर्म, अज्ञान, अवैराग्य आणि अनैश्वर्य हे चार दि-

कोणी मूळमंत्राच्या तीन भागांना हीं नांवें कल्पितात

१ गायत्रीच्या तीन चरणांला प्रत्येकीं अनुक्रमें हृदय, शीर्ष व शिखा अशीं नांवें आहेत असें कित्येक ह्मणतात

२ शरीरशुद्धीची ही भावना आहे शरीरातील कोष्ठामध्यें जो वायु आहे त्याच्यायोगानें शरीर सुकलें, आधारस्थ अग्नीच्यायोगें तें दग्ध झालें आणि ललाटस्थ चंद्रमंडलांतून सतत चाललेल्या अमृतवृष्टीनें तें अमृतमय होऊन गेलें ह्मणजे एकदरींत तें अत्यंत पवित्र झालें आहे अशी भावना करून नंतर त्यांतील हृदयकमळांत नारायणमूर्तीचें ध्यान करावयाचें.

३ प्रणवाचे पांच भाग आहेत :— अकार, उकार, मकार, बिंदु व नाद त्यांपैकीं नादरूप पांचव्या भागाच्याही अंतीं श्रीनारायणाचें ध्यान करितात.

४ तेव्हां मूर्तीचें जडपण । निःशेष न देखावें आपण । मूर्ति भावावी चैतन्यघन । मुख्य आवाहन या नांव ॥ ताथ, २१८.

खांबावरील चार माचवे किंवा दांडे मानावे. तीन गुण ह्या पट्ट्या समजाव्या. त्या मंचावर आठ पानांचें कमळ आहे अशी कल्पना करून त्या कमलाच्या प्रत्येक पाकळींत पूर्वादि दिशांच्या क्रमानें आठ व मध्यें एक मिळून नऊ शक्तींची स्थापना करावी. त्या नऊ शक्ति विमला, उत्कर्षिणी, ज्ञाना, क्रिया, योगा, प्रव्ही, सत्या, ईशाना आणि अनुग्रहा ह्या होत. त्या कमळाची कर्णिका व केसरें हीं चंद्र, सूर्य व अग्नि एतद्रूप अर्थात देदीप्यमान कल्पावीं). अशा स्थानीं मला वैदिक व तंत्रोक्त ह्या दोन्ही मार्गांनीं उभयसिद्धीसाठीं पाद्य, आचमन, अर्घ्य इत्यादि उपचार अर्पण करावे. ॥ २५ ॥ २६ ॥ तसेंच सुदर्शन (चक्र), पाचजन्य (शंख), गदा (कौमोदकी), खड्ग (नंदक), बाण, धनुष्य (शार्ङ्ग), नांगर आणि मुसल ह्या आयुधाचें - अष्टदिशांकडे व - कौस्तुम, माला (वैजयंती), आणि श्रीवत्सचिन्ह - यांचें वक्षस्थलीं - पूजन करावें ॥२७॥ नंद, सुनंद, प्रचंड, चंड, महाबल, बल, कुमुद आणि कुमुदेक्षण ह्या पार्षदांची आठ दिशांकडे आणि गरुडाची अग्रमार्गीं स्थापना करून पूजा करावी. ॥ २८ ॥ दुर्गा, विनायक, व्यास

सुदर्शनं पांचजन्यं गदासीषुधनुर्हलान् ॥ मुसलं कौस्तुभं माला श्रीवत्सं चानुपूजयेत् ॥ २७ ॥ नंदं सुनंदं गरुडं प्रचंडं चंडमेव च ॥ महाबलं बलं चैव कुमुदं कुमुदेक्षणम् ॥ २८ ॥ दुर्गां विनायकं व्यासं विष्वक्सेनं गुरून् सुरान् ॥ स्वे स्वे स्थाने त्वभिमुखान्पूजये-त्प्रोक्षणादिभिः ॥ २९ ॥ चंदनोशीरकर्पूरकुंकुमागुरुवासितैः ॥ सलिलैः स्नापयेन्मंत्रैर्नित्यदा विभवे सति ॥ ३० ॥ स्वर्णघर्मानुवाकेन महापुरुषविद्यया ॥ पौरुषेणापि सूक्तेन सामभी राजनादिभिः ॥ ३१ ॥

(सु.) ॥ २७ ॥ [अष्टदिक्षु] नंदं, सुनंदं, प्रचंडं, चंडं, महाबलं, बलं, कुमुदं, कुमुदेक्षणं च [पुरतः] गरुडं ॥२८॥ स्वे स्वे स्थाने अभिमुखान् दुर्गां, विनायकं, व्यासं, विष्वक्सेनं, गुरून्, सुरान् [च] प्रोक्षणादिभिः (अर्घ्यपाद्यादि उपचारानीं) पूजयेत् ॥२९॥ विभवे सति, नित्यदा स्वर्णघर्मानुवाकेन, महापुरुषविद्यया, पौरुषेण सूक्तेन, राजनादिभिः सामभिः [च] आणि मंत्रैः चंदनोशीरकर्पूरकुंकुमागुरुवासितैः सलिलैः स्नापयेत् ॥ ३० ॥ ३१ ॥

आणि विष्वक्सेन ह्यांची चार कोपऱ्यात स्थापना करावी; वाममार्गी गुरु, परमगुरु, परमेष्ठि गुरु आणि परात्पर गुरु याची स्थापना करावी, अष्टदिशांकडे इंद्रादि लोकपाल आहेत अशी कल्पना करावी आणि आपापल्या स्थानीं ईश्वराकडे मुख करून बसलेल्या त्या सकल देवताची अर्घ्यादि उपचारानी पूजा करावी. ॥ २९ ॥ द्रव्याची अनुकूलता असेल तर चंदन, वाळा, कापूर, केशर, कृष्णागर ह्या सुगंधी पदार्थांनीं उदक सुवासित करून त्याच्या योगें नित्य मला समंत्रक स्नान घालावें. ॥ ३० ॥ - स्नान घालताना मंत्र कोणते म्हणावे तें सांगतो ऐक.- स्वर्णघर्मानुवाक (सुवर्णं घर्मं परिवेदवेन हा) म्हणावा, महापुरुषविद्या (जित ते पुंडरीकाक्ष हें स्तोत्र) म्हणावी, पुरुषसूक्ताचा (सहस्रशीर्षेत्यादि) जप करावा; आणि राजन (इंद्रंनरोनेमधिताहवंते) इत्यादि सामें गावीं. ॥ ३१ ॥

नंतर माझ्या भक्तानें प्रेमपूर्वक मला वस्त्र, उपवस्त्र, अलंकार, पत्रावळि (गालावर, वक्षस्थलावर व हातावर रंगाच्या काढलेल्या वेली), माळा, फुलें, गंध. उटी याच्या योगें उचित प्रकारें शृंगारावें. ॥ ३२ ॥ तसेंच पूजकानें मला पाद्य, आचमन, गंध, फुलें, अक्षता, धूप दीप आणि नैवेद्य हे उपचार भक्तिपुरसर निवेदन करावे. ॥ ३३ ॥ नैवेद्यासाठीं स्वता-च्या वैभवानुसार गूळ, खीर, तूप, करंज्या, अनरसे, मांडे, चिरोटे इत्यादि, व सांजा, दहीं, नानाप्रकारचीं तोंडीलावणीं इत्यादि पदार्थ सिद्ध करावे. ॥ ३४ ॥ अभ्यंगस्नान, अंगाला सुगंधि तैले व उटणीं इत्यादि लावून रगडणें, आरसा दाखवणें, दंतधावन, पचामृतादिकानीं स्नान घालणें, नानाप्रकारचे भक्ष्य भोज्य पदार्थ, व गायन, नृत्य इत्यादि उपचार पर्वदिवशीं

मद्भक्तः सप्रेम [यथा तथा] मां वस्त्रोपवीताभरणपत्रस्रग्गंधलेपनैः यथोचितं अलंकुर्वीत. ॥३२॥ अर्चकः श्रद्धया मे पाद्य, आचमनीयं, गंधं, सुमनसः, अक्षतान्, धूपदीपोपहार्याणि च दद्यात्. ॥ ३३ ॥ [विभवे] सति, गुडपायससर्पींषि, शष्कुल्यापूपमोदकान्, संयावदधिसूपान् च नैवेद्यं कल्पयेत्. ॥ ३४ ॥ अभ्यंगोन्मर्दनादर्शदंतधावाभिषेचनं,

पाद्यमाचमनीयं च गंधं सुमनसोऽक्षतान् ॥
वस्त्रोपवीताभरणपत्रस्रग्गंधलेपनैः ॥ अलंकुर्वीत सप्रेम मद्भक्तो मां यथोचितम् ॥ ३२ ॥
धूपदीपोपहार्याणि दद्यान्मे श्रद्धयाऽर्चकः॥३३॥ गुडपायससर्पींषि शष्कुल्यापूपमोदकान्॥ संयावदधिसूपांश्च नैवेद्यं सति कल्पयेत् ॥ ३४ ॥
अभ्यंगोन्मर्दनादर्शदंतधावाभिषेचनम् ॥ अन्नाद्यगीतनृत्यादि पर्वणि स्युरुतान्वहम् ॥३५॥ विधिना विहिते कुंडे मेखलागर्तवेदिभिः॥ अग्नि-
माधाय परितः समूहेत्पाणिनोदितम् ॥३६॥ परिस्तीर्याथ पर्युक्षेदन्वाधाय यथाविधि ॥ प्रोक्षण्याऽऽसाद्य द्रव्याणि प्रोक्ष्याग्नौ भावयेत माम् ॥३७॥

अन्नाद्यगीतनृत्यादि [च] पर्वणि उत अन्वहं (प्रतिदिनीं) स्युः. ॥ ३५ ॥ विधिना विहिते मेखलागर्तवेदिभिः [उपलक्षिते] कुंडे अग्निं आधाय (स्थापन करून) उदितं पाणिना परितः समूहेत्. ॥ ३६ ॥ अथ परिस्तीर्य पर्युक्षेत्. यथाविधि अन्वाधाय, द्रव्याणि आसाद्य प्रोक्षण्या प्रोक्ष्य अग्नौ मा भावयेत. ॥ ३७ ॥

(एकादशी, जन्माष्टमी इत्यादि दिवशीं) निवेदावे, अथवा - अनुकूलता असेल तर - प्रत्येक दिवशीं अर्पण करावे. ॥ ३५ ॥ - ज्याला अधिक फलाची अपेक्षा असेल त्यानें अ-ग्नीच्या ठिकाणीही पूजा करावी. ती करण्याचा विधि असा :- आपल्या गृह्यसूत्रांत जो विधि सांगितला आहे त्याप्रमाणें मेखला, गर्त, वेदि यांनीं युक्त असें यथाप्रमाण कुंड बा-लावें, त्यामध्यें अग्नीची प्रतिष्ठापना करावी, आणि प्रदीप्त झालेल्या अग्नीला हातानें परिसमूहन करावें (अग्नि एकत्र जमवावा). ॥ ३६ ॥ दर्भांचीं परिस्तरणें घालून उदकानें स-मोंवतीं प्रोक्षण (पर्युक्षण) करावें, आणि मग यथाविधि अन्वाधान करून (व्याहृति म्हणून समिधाहुति देणें हें कर्म करून) - अग्नीच्या उत्तरेकडे होमोपयोगी - द्रव्यें मा-

१ याचा भंदवाचून कांहीं उपयोग नाहीं :— दधि दुग्ध साय साकर । नैवेद्या वाढिले परिकर । देव न पाहे उपचार । श्रद्धा श्रीधर तृप्त होय ॥ नाथ, २९६.

२ आरसा दाखवायचा तो कशाकरिता.— देव विसरला देवपणासी । तें देवपण भेटे देवासी । आरिसा दाखवावे आदर्शासी । तेणें देवदेवासी उल्हासू ॥ नाथ, ३०१.

वर्णी व प्रोक्षणीपात्रांतील उदकानें त्यावर प्रोक्षण करून - पुढें सांगितल्याप्रमाणें - अग्नीमध्यें माझ्या स्वरूपाचें ध्यान करावें :- ॥ ३७ ॥ माझा शरीरवर्ण तापविलेल्या सुव-
र्णासारखा आहे; शंख, चक्र, गदा आणि पद्म ह्या आयुधांच्या योगें माझे चारी भुज शोभत आहेत; आकृति शांत असून, मीं कमळाच्या केसराप्रमाणें पिंगट वर्णाचे वस्त्र परिधान
केलें आहे, ॥ ३८ ॥ माझ्या शरीरावर किरीट, कटकें, कटिसूत्र आणि उत्तम बाहुभूषणें - हे अलंकार त्यांच्या उचित स्थानीं - प्रकाशमान दिसत आहेत; वक्षस्थलावर श्रीवत्स
चिन्ह असून कौस्तुभमणि झळकत आहे; कंठामध्यें वनमाळा धारण केली आहे, ॥ ३९॥ अशा मूर्तीचें ध्यान करून तिची - मानस उपचारानीं - पूजा करावी, घृतानें भिजविलेल्या
समिधा अग्नींत टाकाव्या आणि आघारहोम (प्रजापतये स्वाहा आणि इंद्राय स्वाहा ह्या दोन मंत्रानीं अनुक्रमें कुंडाच्या वायव्य कोणापासून आरंभ करून अग्नीवरून आग्नेयी
(मू०) ॥३८।३९॥ [मं] ध्यायन् अभ्यर्च्य हविषा (घृतानें) अभिघृतानि (सिंचित) दारूणि (शुष्क समिधा) प्रास्य (घालून) आघारौ, आज्यभागौ, दत्वा बुध. मूलमंत्रेण, षोडशर्चा,

तप्तजांबूनदप्रख्यं शंखचक्रगदांबुजैः ॥ लसच्चतुर्भुजं शांतं पद्मकिंजल्कवाससम् ॥ ३८ ॥

स्फुरत्किरीटकटककटिसूत्रवरांगदम् ॥ श्रीवत्सवक्षसं भ्राजत्कौस्तुभं वनमालिनम् ॥ ३९ ॥

ध्यायन्नभ्यर्च्य दारूणि हविषाभिघृतानि च ॥ प्रास्याज्यभागावाघारौ दत्त्वा चाज्यप्लुतं हविः ॥४०॥

जुहुयान्मूलमंत्रेण षोडशर्चाऽवदानतः ॥ धर्मादिभ्यो यथान्यायं मंत्रैः स्विष्टकृतं बुधः ॥ ४१ ॥

अभ्यर्च्याथ नमस्कृत्य पार्षदेभ्यो बलिं हरेत् ॥ मूलमंत्रं जपेद्ब्रह्म स्मरन्नारायणात्मकम् ॥ ४२ ॥

(पुरुषसूक्तानें) मंत्रैः अवदानतः आज्यप्लुतं हविः धर्मादिभ्यः [च] यथान्यायं जुहुयात्. स्विष्टकृतं [च हुत्वा] ॥ ४० ॥ ४१ ॥ अभ्यर्च्य अथ नमस्कृत्य पार्षदेभ्यः बलिं ह-
कोणापर्यंत एक व नैर्ऋत्य कोणापासून आरंभून अग्नीवरून ईशानी कोणापर्यंत दुसरी अशा दोन आज्यधारा पाडणें ह्याना आघारहोम ह्मणतात ते) करून दोन आज्यभाग द्यावे (अ-
ग्नये स्वाहा व सोमाय स्वाहा ह्या दोन आज्याहुति द्याव्या). आणि अष्टाक्षरी मूलमंत्रानें व तसेंच सोळा ऋचाचा सूक्तानें (पुरुषसूक्तानें) प्रत्येक ऋचेला घृतयुक्त हविर्द्रव्याच्या आ-
हुति घेऊन होम करावा. नंतर धर्म, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य, अधर्म इत्यादि आसनादि स्थानीं स्थापित देवताना पूजाक्रमानें केवळ नाममंत्रानें (धर्माय स्वाहा, ज्ञानाय स्वाहा,
अधर्माय स्वाहा असें ह्मणून -) आहुति देऊन त्या ज्ञानसंपन्न पुरुषानें स्विष्टकृत् होम करावा (अग्नये स्विष्टकृते स्वाहा ह्मणून आहुति द्यावी). ॥ ४० ॥ ४१ ॥ - आणि
अग्नीमध्यें चिंतिलेल्या अंतर्यामी भगवंताला - पूजोपचार अर्पून व नमस्कार करून नंदादि पार्षदाना - अष्ट दिशाकडे बलि द्यावे. - नंतर पूजास्थानीं परत येऊन व देवाच्या

१ तुलसी पुरुषसूक्तानें पूजा करणें असेल तर सोच मूलमंत्र होय.- आणि प्रत्येक ऋचेला अवदान घेऊन होम करावा.

अग्रभागीं बसून नारायणरूप परब्रह्माचें चिंतन करीत शक्यनुसार (अष्टोत्तरशत, सहस्र, किंवा दहा वेळा तरी) मूलमंत्राचा जप करावा. ॥ ४२ ॥ - नंतर उभयस्थानी (अग्नी-मध्यें व मूर्तीकडे) भगवंताचें भोजन समाप्त झालें असें चिंतन करून - भगवंताला आचमन द्यावे आणि उच्छिष्ट भाग विष्वक्सेनाला निवेदन करावा (त्याने अनुमोदन दिले असें कल्पून मग सर्व आटोपल्यावर स्वतां भोजन करावें). नंतर मुखवासार्थ सुगंधयुक्त तांबूलादि अर्पण करून पुन्हा पुष्पांजलीनें पूजा करावी. ॥ ४३ ॥ नंतर माझ्या चारि-

रेत् नारायणात्मकं ब्रह्म स्मरन् [सन्] मूलमन्त्रं जपेत्. ॥ ४२ ॥ आचमनं दत्वा विष्वक्सेनाय उच्छेषं कल्पयेत्. अथ सुरभिमत् (सुगंधि) तांबूलाद्यं मुखवासं [कल्पयित्वा] अर्हयेत्. ॥ ४३ ॥ उपगायन्, नृत्यन्, मम कर्माणि गृणन्, अभिनयन्, मत्कथाः श्रावयन्, शृण्वन् [च सन्] मुहूर्तं क्षणिकः भवेत्. ॥ ४४ ॥ उच्च.वचै. पौ

दत्त्वाऽऽचमनमुच्छेषं विष्वक्सेनाय कल्पयेत् ॥ मुखवासं सुरभिमत्तांबूलाद्यमथार्हयेत् ॥ ४३ ॥
उपगायन्गृणन्नृत्यन्कर्माण्यभिनयन्मम ॥ मत्कथाः श्रावयन् शृण्वन् मुहूर्तं क्षणिको भवेत् ॥ ४४ ॥
स्तवैरुच्चावचैः स्तोत्रैः पौराणैः प्राकृतैरपि ॥ स्तुत्वा प्रसीद भगवन्निति वंदेत दंडवत् ॥ ४५ ॥
शिरो मत्पादयोः कृत्वा बाहुभ्यां च परस्परम् ॥ प्रपन्नं पाहि मामीश भीतं मृत्युग्रहार्णवात् ॥४६॥

राणैः स्तवैः, प्राकृतैः अपि स्तोत्रैः स्तुत्वा ' भगवन्, प्रसीद ' इति [वदन् सन्] दंडवत् वंदेत. ॥ ४५ ॥ बाहुभ्यां परस्परं [मत्पादौ गृहीत्वा] मत्पादयोः शिरः कृत्वा " ईश, भीतं प्रपन्नं मां मृत्युग्रहार्णवात् (मृत्युरूपी पिशाचापासून व समुद्रांतून) पाहि. " [इति विज्ञापयन् प्रणमेत्]. ॥ ४६ ॥

त्राचें गायन व कीर्तन करीत नृत्य करावें, माझ्या लीलांचे अभिनय करावे; माझ्या कथा लोकांना ऐकवाव्या, स्वतां श्रवण कराव्या व मुहूर्तभर व्यग्रता सोडून उत्सवात निमग्न व्हावें. ॥ ४४ ॥ पुराणांतील लहान मोठीं स्तोत्रें ह्मणावीं, प्राकृत पद्यें ह्मणून त्या योगेंही माझी स्तुति करावी आणि 'प्रसीद भगवन्' असें ह्मणून मला दंडवत् नमस्कार घालावा. ॥ ४५ ॥ - वंदन कसें करावें तें सांगतों :- दोन्ही हातानीं परस्पर माझे दोन्ही चरण — उजव्या हातात उजवा व डाव्या हातात डावा असे-धरावे आणि (किंवा,

१ निर्लज्ज नटाचे परी। हरिरंगणीं नृत्य करी। हावभाव कटाक्ष कुसरीं। अभिनयो धरी कर्मांचा॥ गोवर्धन उद्धरण। अंगें दावावें आपण। कां माडूनिया दृढ ठाण। त्र्यंबकभजन दावावें॥ ३३५। ३६ नाथ.

२ स्तुति करताना आपल्यास ती शुद्ध रीतीनें करितां येते किंवा नाहीं इकडे लक्ष देऊ नये,— शुद्ध नये स्तोत्र पठन। करितां अबद्ध गायन। पाठका दोष नलगे आण। तेणे होय निर्दळण महादोषा॥ नाथ, ३४०.

दोन्ही हात आपल्याच पाठीशीं जोडून धरावे. आणि अपराधी मनुष्याप्रमाणें) मस्तक माझ्या चरणांवर ठेवून ' ईश्वरा, संसाररूपी पिशाचाला आणि महासागराला भिऊन मी तुला शरण आलों. माझें रक्षण कर. ' ॥ ४६ ॥ अशी प्रार्थना करावी, मीं प्रसाद दिला अशा भावनेनें निर्माल्य आदरपूर्वक मस्तकीं धरावा आणि विसर्जन करणें असेल तर पूर्वी प्रतिमेवर ज्याचा न्यास केला तें तेज पुन्हां हृदयस्थ तेजाचे ठिकाणीं पोंचवावें (हृदयातरीं प्रविष्ट झालें अशी भावना करावी) ॥ ४७ ॥ प्रतिमा, स्थंडिल, अग्नि, सूर्य इत्यादि अधिष्ठानापैकीं (मूर्तीपैकीं) ज्यावर ज्यावेळीं मनुष्याची श्रद्धा असेल, त्या आश्रयावर त्या वेळीं त्यानें माझें पूजन करावें (अमुक अधिष्ठान मुख्य आणि अमुक अमुल्य असा काहीं प्रकार नाहीं). कारण, मी सर्वात्मा सकल भूताच्या आणि आत्म्याच्या (भक्ताच्या) ठिकाणींहि राहिलेला आहे. ॥ ४८ ॥ ह्याप्रमाणे वेदामध्यें आणि तन्त्रात

इति मया दत्तां शेषां (निर्माल्य) सादरं [यथा तथा] शिरसि आधाय उद्वास्यं चेत्, [तर्हि] तत् ज्योतिः पुनः ज्योतिषि उद्वासयेत् (विसर्जो) ।४७। यदा यत्र श्रद्धा [तत्र] तत्र अर्चादिषु (सूर्यादि अधिष्ठानीं) मां अर्चयेत्; सर्वभूतेषु, आत्मनि च सर्वात्मा अहं अवस्थित [अस्मि]. ॥४८॥ एवं वैदिकतान्त्रिकैः क्रियायोगपथैः अर्चन् पुमान् मत्तः अ-

इति शेषां मया दत्तां शिरस्याधाय सादरम् ॥ उद्वासयेच्चेदुद्वास्यं ज्योतिर्ज्योतिषि तत्पुनः ॥ ४७ ॥ अर्चादिषु यदा यत्र श्रद्धा मां तत्र चार्चयेत् ॥ सर्वभूतेष्वात्मनि च सर्वात्माऽहमवस्थितः ॥४८॥ एवं क्रियायोगपथैः पुमान्वैदिकतान्त्रिकैः ॥ अर्चन्नुभयतः सिद्धिं मत्तो विंदत्यभीप्सिताम् ॥ ४९ ॥ मदर्चां संप्रतिष्ठाप्य मंदिरं कारयेद्दृढम् ॥ पुष्पोद्यानानि रम्याणि पूजायात्रोत्सवाश्रितान् ॥ ५० ॥ पूजादीनां प्रवाहार्थं महापर्वस्वथान्वहम् ॥ क्षेत्रापणपुरग्रामान् दत्त्वा मत्सार्ष्टितामियात् ॥ ५१ ॥

भीप्सितां उभयतः (इहपरत्र) सिद्धिं विंदति. ॥४९॥ मदर्चां संप्रतिष्ठाप्य दृढं मंदिर कारयेत्. रम्याणि पुष्पोद्यानानि, पूजायात्रोत्सवाश्रितान् क्षेत्रापणपुरग्रामान् महापर्वसु अथ अन्वहं पूजादीनां प्रवाहार्थं दत्त्वा मत्सार्ष्टिता (मजसमान ऐश्वर्य) इयात् (पावेल) ।५०॥ ५१॥

सांगितलेल्या पूजाविधीच्या मार्गांनीं जो पुरुष माझी पूजा करितो त्याला ह्या लोकीं व परलोकींही मजपासून अभीष्ट सिद्धि प्राप्त होते. ॥ ४९ ॥ माझ्या मूर्तीची स्थापना करावी, तिजकरितां दृढ मंदिर बांधावें; - त्याच्या भोंवतीं - मनोरम पुष्पवाटिका करवाव्या, व प्रतिदिनीं पूजा चालावी, - एकादशी जन्माष्टमी यासारख्या विशेष पर्वदिवशीं - बहुजनाचे मेळे जमावे म्हणजे यात्रा भराव्या, - आणि वसंतादिकाळीं - उत्सव व्हावे ह्यासाठी शेतें, बाजाराच्या जागा, नगरें, व गाव देवाकडे उत्पन्न म्हणून लावून द्यावे. ह्या उत्पन्नाचा विनि-योग महापर्वणीला आणि प्रतिदिनीं पूजा, उत्साह इत्यादि अखंड चालण्याकडे व्हावा. अशी व्यवस्था जो कोणी करून ठेवील त्याला मजसमान ऐश्वर्य प्राप्त होते. ॥ ५० ॥ ५१ ॥

१ जेवीं बाळकाचिये मैळें । माता सर्वकुळ बोलें । तेवीं प्रेमाचि येईलें । त्याची कल्लोळें कीजिजे । नाथ, २६७.

माझी प्रतिमा स्थापन केल्यानें सार्वभौम पद मिळतें; मंदिर बांधिलें असतां त्रैलोक्याचें राज्य प्राप्त होतें, पूजादि अखंड चालण्याची व्यवस्था केली तर ब्रह्मलोक मिळतो आणि तीन्ही केली असता तो पुरुष मजशीं साम्य पावतो. ॥५२॥ - इतका वेळ सर्व प्रकार सकाम भक्तासाठीं सांगितला. आता निष्काम भक्ताला उद्देशून थोडें सांगतों:- जो पुरुष निरपेक्ष भक्तियोग चालवील, तो मजस्वरूपींच प्राप्त होतो. - निरपेक्ष भक्ति प्राप्त होईल कशी तेंही सांगतों. - जो मनुष्य अशा रीतीनें माझें पूजन करील, त्याला निष्काम भक्तियोग प्राप्त होतो. ॥ ५३ ॥ - देवाच्या पूजोत्सवादिकाकडे उत्पन्न तोडून देणाराला फळ काय मिळतें, तें सांगितलें, आता त्या उत्पन्नाचा अपहार केल्यानें काय होतें तें

प्रतिष्ठया सार्वभौम, सद्मना भुवनत्रय, पूजादिना ब्रह्मलोक, त्रिभिः मत्साम्यता इयात्. ॥ ५२ ॥ नैरपेक्ष्येण भक्तियोगेन मा एव विंदति. यः एवं मा पूजयेत, सः भक्तियोग लभते ॥ ५३ ॥ यः सुरविप्रयोः स्वदत्ता, परदत्ता [वा] वृत्तिं हरेत, सः वर्षाणां अयुतायुतं विड्भुक् (विष्ठा भक्षण करणारा कृमि) जायते. ॥ ५४ ॥ कर्तुं

प्रतिष्ठया सार्वभौमं सद्मना भुवनत्रयम् ॥ पूजादिना ब्रह्मलोकं त्रिभिर्मत्साम्यतामियात् ॥ ५२ ॥

मामेव नैरपेक्ष्येण भक्तियोगेन विंदति ॥ भक्तियोगं स लभत एवं यः पूजयेत माम् ॥ ५३ ॥

यः स्वदत्तां परैर्दत्तां हरेत सुरविप्रयोः ॥ वृत्तिं स जायते विड्भुग् वर्षाणामयुतायुतम् ॥ ५४ ॥

कर्तुश्च सारथेर्हेतोरनुमोदितुरेव च ॥ कर्मणां भागिनः प्रेत्य भूयो भूयसि तत्फलम् ॥ ५५ ॥

इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे सप्तविंशो ऽध्यायः ॥ २७ ॥

[यत् फलं] तत् सारथे (साह्य करणाराला), हेतोः (प्रेरणा करणाराला), अनुमोदितुः एव च प्रेत्य फलं. [यतः एते] कर्मणा भागिनः. भूयसि (अधिक साह्यादिक केलें असता) भूयः (अधिक) [फलं]. ॥ ५५ ॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे सप्तविंशो ऽध्याय' ॥ २७ ॥

सांगतों. - जो कोणी पुरुष स्वता दिलेल्या किंवा दुसऱ्यानें दिलेल्या देवब्राह्मणाच्या वृत्तीचा अपहार करितो, तो कृमि होऊन कोट्यवधि वर्षें नरकात विष्ठा भक्षण करीत पडतो. ॥ ५४ ॥ वृत्तिदान किंवा वृत्तीचा अपहार करणाराला जें फळ मिळतें तेंच त्याच्या साह्यकर्त्याला आणि त्याला प्रेरणा व अनुमोदन देणारालाही परलोकीं प्राप्त होतें. कारण, हे त्या कर्माचे विभागी आहेत. त्यातही पुन्हा ज्याचें साह्य व अनुमोदन इत्यादि जितक्या अशानीं अधिक असेल त्याला तितक्या अशानीं फळ अधिक मिळतें. । ५५ ॥

॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने एकादशस्कंधे सप्तविंशो ऽध्याय. ॥ २७ ॥

श्रीकृष्ण ह्मणाले :—हे उद्धवा! विचारी मनुष्यानें दुसऱ्याचा स्वभाव आणि कर्में याची स्तुति किंवा निंदा कांहींही करूं नये कारण प्रकृति आणि पुरुष यापासून झालेलें जग हे एकरूपच आहे. ॥ १ ॥ जो कोणी दुसऱ्याचे स्वभाव आणि कर्में याची प्रशंसा किंवा निंदा करितो तो या मिथ्या द्वैताचे ठिकाणी अभिमान बाळगीत असल्यामुळें ज्ञाननिष्ठारूप स्वार्थापासून शीघ्र भ्रष्ट होतो ॥ २ ॥ ज्याप्रकारे तैजस ह्मणजे राजस अहंकाराचें कार्य जो इंद्रियसमूह तो निद्रेने पराभूत झाल्यावर देहस्थित जीव केवळ मनाच्या योगानें स्वप्नरूप मायेस प्राप्त होतो, नंतर मनाचाही लय झाला असता त्याची (जीवाची) चेतना नष्ट होऊन जीव मृत्युसमान जी सुषुप्ति (गाढनिद्रा) तीस प्राप्त होतो, त्याच प्रमाणे द्वैताचे ठि-

श्रीभगवान् उवाच— प्रकृत्या, पुरुषेण च विश्वं एकात्मकं पश्यन् [पुरुष.] परस्वभावकर्माणि न प्रशंसेत्, न गर्हयेत् [वा] ॥ १ ॥ यः परस्वभावकर्माणि प्रशंसति, निंदति [वा], सः असति (मिथ्याभूत द्वैताचे ठिकाणीं) अभिनिवेशतः आशु स्वार्थात् भ्रश्यते ॥ २ ॥ तैजसे (राजसाहंकाराचें कार्य जो इंद्रियसमूह तो) निद्रया आपन्ने (घेरलेला) [सति], पिंडस्थ (शरीरांत राहणारा जीव) [मनोमात्रेण] मायां (स्वप्नरूप मायेला) प्राप्नोति, [ततः मनसि लीने सति] नष्टचेतन (नाहींशी झाली चेतना ज्याची असा)

श्रीभगवानुवाच । परस्वभावकर्माणि न प्रशंसेन्न गर्हयेत् ॥ विश्वमेकात्मकं पश्यन्प्रकृत्या पुरुषेण च ॥१॥ परस्वभावकर्माणि यः प्रशंसति निंदति ॥ स आशु भ्रश्यते स्वार्थादसत्यभिनिवेशतः ॥२॥ तैजसे निद्रयाऽऽपन्ने पिंडस्थो नष्टचेतनः ॥ मायां प्राप्नोति मृत्युं वा तद्वन्नानार्थदृक् पुमान् ॥ ३ ॥ किं भद्रं किमभद्रं वा द्वैतस्यावस्तुनः कियत् ॥ वाचोदितं तदनृतं मनसा ध्यातमेव च ॥ ४ ॥ छायाप्रत्याह्वयाभासा ह्यसंतोऽप्यर्थकारिणः ॥ एवं देहादयो भावा यच्छंत्यामृत्युतो भयम् ॥ ५ ॥

[सन्] मृत्युं (मृत्युतुल्य सुषुप्तीस) वा [प्राप्नोति] तद्वत् नानार्थदृक् (द्वैताभिमानी) पुमान् [विक्षेपं लयं च प्राप्नोति]. ॥ ३ ॥ अवस्तुनः (मिथ्या) द्वैतस्य [मध्ये] किं भद्रं, किंवा अभद्रं कियत् ? वाचा उदितं, [चक्षुरादिभिः दृश्यं], मनसा ध्यातं च [यत्], तत् अनृतम्. ॥ ४ ॥ छायाप्रत्याह्वयाभासाः (प्रतिबिंब, प्रतिध्वनि आणि आ-

काणीं सत्यत्वाभिमान बाळगणारा मनुष्य विक्षेप (अन्यथाभास) आणि लय यास प्राप्त होतो - ज्याप्रमाणें प्राज्ञाच्या (सुषुप्त्यभिमानी जीवाच्या) संसर्गानें विश्वाचा (जागृत्यभिमानीचा) भोगक्षयरूपी भ्रंश होतो त्याचप्रमाणें अनात्मरूप द्वैताच्या संपर्कानें आत्म्याचाही स्वरूपापासून भ्रंश होतो - ॥ ३ ॥ उद्धवा! मिथ्याभूत जें द्वैत त्यामध्ये चांगलें कोणतें व वाईट कोणतें? वाणीनें जें बोललेलें किंवा इतर इंद्रियांनी जें अनुभविलेलें तसेंच मनानें चिंतिलेलें तें सर्व मिथ्या होय ॥ ४ ॥ - आतां यावर तूं ह्मणशील की, "तर देहादि पदार्थही मिथ्याच होत; मग त्यांजपासून अर्थात् त्यावर अभिनिवेश ठेवल्यापासून भीति तरी कसली?" तर याविषयीं तुला दृष्टांतासह सांगतों - ज्याप्रमाणें छाया, प्रतिध्वनि, आणि आभास हे

१ निश्चळ दोरीचें निजरूप । भ्रमें भासला प्रचंड सर्प । तो मिथ्या परी भयरूप । महा खटाटोप उपजवी ॥ ८९.

पदार्थ वास्तविक नसूनही अर्थक्रिया (कर्म क्रिया) करितात; ह्मणजे खऱ्यासारखे भासतात. त्याप्रमाणें देहादिक पदार्थही त्यांचा लय होईपर्यंत भयदायक होतात ॥ ५ ॥ - आता तूं ह्मणशील कीं, सृष्ट्यादि श्रुतींनीच द्वैताचें निरूपण केलें आहे मग तें खोटें कसें असेल? तर ऐक'- हें जें जगत् उत्पन्न होतें तें व जो यास उत्पन्न करतो तो आत्माच होय. याचप्रमाणें ज्याचें रक्षण केलें जातें व जो रक्षण करतो तोही सर्वशक्तिमान् विश्वात्माच होय. तसें ज्याचा नाश होतो व जो नाश करतो तो एकच सर्वात्मा ईश्वर होय. ॥ ६ ॥ तस्मात् सर्व दृश्यवर्गाहून भिन्न जो आत्मा त्याहून अन्य पदार्थ श्रुतीनें निरूपण केला नाहीं. आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक अशी तीन प्रकाराची निरूपिलेली प्रतीति आ-

मस है) असंतः अपि अर्थकारिणः, एवं देहादयः भावाः (पदार्थ) आमृत्युतः (लीन होत तोंपर्यंत, किंवा मृत्युसुद्धा) भयं यच्छंति (देतात) ॥ ५ ॥ [यत्] सृज्यते, त्रायते, ह्रियते च, तत् इदं विश्वं, [तथा यः] सृजति, त्राति, हरति च [सः] प्रभुः विश्वात्मा ईश्वर. आत्मा एव. ॥६॥ तस्मात्, अन्यस्मात् (सृज्यपदार्थांहून व्यतिरिक्त अशा) आत्मनः

आत्मैव तदिदं विश्वं सृज्यते सृजति प्रभुः ॥ त्रायते त्राति विश्वात्मा ह्रियते हरतीश्वरः ॥६॥ तस्मान्न ह्यात्मनोऽन्यस्मादन्यभावो निरूपितः ॥ निरूपितेयं त्रिविधा निर्मूला भातिरात्मनि ॥ इदं गुणमयं विद्धि त्रिविधं मायया कृतम् ॥७॥ एतद्विद्वान्मदुदितं ज्ञानविज्ञाननैपुणम् ॥ न निन्दति न च स्तौति लोके चरति सूर्यवत् ॥८॥ प्रत्यक्षेणानुमानेन निगमेनात्मसंविदा ॥ आद्यन्तवदसज्ज्ञात्वा निःसङ्गो विचरेदिह ॥९॥

अन्यभावः निरूपितः न हि. इयं त्रिविधा निरूपिता भातिः आत्मनि निर्मूला. इदं गुणमयं त्रिविध मायया कृत विद्धि. ॥ ७ ॥ एतत् मदुदितं ज्ञानविज्ञाननैपुणं विद्वान् न निंदति, नच स्तौति, लोके सूर्यवत् चरति. ॥ ८ ॥ प्रत्यक्षेण, अनुमानेन निगमेन, आत्मसंविदा (स्वानुभवानें) [सर्वं दृश्य] आद्यंतवत्, असत् [च] ज्ञात्वा निःसंग [सन्]

त्याचे ठिकाणी निर्मूल आहे. - जें निर्मूल आहे त्याची प्रतीति कशी होते ह्मणशील तर, हे उद्धवा[1] - हें गुणमय त्रिविध जग मायेनें रचिलें आहे, असें समज (मायेच्या योगानें नसत्या पदार्थांचेंही भान खऱ्याप्रमाणें होतें). ॥ ७ ॥ हें मीं सांगितलेलें ज्ञान आणि विज्ञान (अनुभव) यांचें तत्त्व जाणणारा पुरुष कोणाची निंदा किंवा स्तुति करीत नाहीं, तर केवळ सूर्याप्रमाणे सर्वत्र समदृष्टि ठेवून लोकांत वागतो. ॥ ८ ॥ प्रत्यक्ष, अनुमान, श्रुति आणि अनुभव या चार प्रमाणानीं हें सर्व दृश्य जग उत्पत्तिनाशयुक्त अर्थात् मिथ्या आहे असें जाणून विचारी पुरुषानें त्याचे ठिकाणीं आसक्ति न धरून वर्तावें. ॥ ९ ॥

---

१ किंवा आमृत्युत ह्या पदाचा अर्थ मृत्युसुद्धा असा करावा ह्मणजे देहादि पदार्थ मृत्यूपर्यंत भयउत्पन्न करितात २ उत्पत्तिविनाशलक्षण । त्याचें देव सांगतो प्रमाण । नित्य भूतांचे जन्ममरण । देखिलें आपण प्रत्यक्ष ॥ अनुमान परी तो साचार । जें जें देखिजे साकार । मेरुपृथ्व्यादिआकार । तेही नश्वर प्रळयांतीं ॥ येचि अर्थीं वेदोक्ती । नाशवन अष्टधा प्रकृती । जीवभाव नासे प्रळयांतीं । गर्जती श्रुति येणें अर्थें ॥ येथें आपुला ही अनुभव असे । जड विकारी तें तें नासे । हें कळत असे गा आपैसें । जग अनायासें नश्वर ॥ नाथ, ११५ पासून ९८.

इतकें श्रीकृष्णाचें भाषण ऐकून उद्धव ह्मणाला — हे श्रीकृष्णा! आत्मानुभवानें दृश्य मिथ्या आहे असें जर आपण ह्मणतां, तर आत्मा स्वप्रकाश आणि देहादि द्वैत (दृश्य) हें जड असें होतें. आणि असें ह्मणावें तर हा संसारभास कोणाला हें सिद्ध होत नाहीं. कारण संसार हा आत्म्यास नाहीं, काकी तो द्रष्टा ह्मणजे सर्वांचा प्रकाशक आणि स्वयप्रकाश आहे ह्मणून; तसाच देहासही तो आहे असें ह्मणता येत नाहीं कारण देह हा अनात्मा, (जड) आणि दृश्य आहे ह्मणून, आता दोहोंसही नाहीं असें ह्मणावे तर त्याची प्रत्यक्ष उपलब्धि (प्रतीति) होते. तेव्हां मुळींच संसार नाहीं असेंही ह्मणता येत नाहीं. ॥ १० ॥ आत्मा हा अविनाशी, निर्गुण, शुद्ध, स्वयंप्रकाश आणि परिच्छेदरहित असा आहे आणि देह हा त्याहून विलक्षण प्रकारचा आणि जड आहे. जसें अग्नियुक्त काष्ठाचेठिकाणीं अग्नि आणि काष्ठ याचा भेद जरी दिसत नाही तरी अग्नि हा प्रकाशक, इह विचरेत्. ॥ ९ ॥ उद्धवः उवाच— ईश, संसृतिः आत्मनः न एव, देहस्य न. द्रष्टृदृश्ययोः अनात्मस्वदृशोः कस्य स्यात्, [यतः] उपलभ्यते ॥ १० ॥ आत्मा अव्ययः, अगुणः, शुद्धः, स्वयंज्योतिः, अनावृतः [अस्ति], देहः अचित्. अग्निवत् दारुवत् (काष्ठाप्रमाणें) [च वर्तमानयोः तयोः] इह संसृतिः कस्य [घटते] ॥११॥ श्रीभगवान् उवाच—

उद्धव उवाच । नैवात्मनो न देहस्य संसृतिर्द्रष्टृदृश्ययोः ॥ अनात्मस्वदृशोरीश कस्य स्यादुपलभ्यते ॥१०॥ आत्मा ऽव्ययो ऽगुणः शुद्धः स्वयंज्योतिरनावृतः ॥ अग्निवद्दारुवदचिद्देहः कस्येह संसृतिः ॥ ११ ॥ श्रीभगवानुवाच । यावद्देहेंद्रियप्राणैरात्मनः सन्निकर्षणम् ॥ संसारः फलवांस्तावदपार्थो ऽप्यविवेकिनः ॥ १२ ॥ अर्थे ह्यविद्यमाने ऽपि संसृतिर्न निवर्तते ॥ ध्यायतो विषयानस्य स्वप्ने ऽनर्थागमो यथा ॥ १३ ॥

अपार्थः अपि संसारः, यावत् देहेंद्रियप्राणैः अविवेकिनः आत्मनः सन्निकर्षणं तावत्, फलवान्. ॥ १२ ॥ अर्थे अविद्यमाने अपि, यथा स्वप्ने अनर्थागम [तथा], विषयान् आणि काष्ठ प्रकाश्य (प्रकाशित होणारें) होय, तद्वत् देह व आत्मा यामध्यें जरी भेद दिसत नाहीं तथापि आत्मा प्रकाशक आणि देह प्रकाश्य होय वास्तव या दोहोंसही संसृति (जन्ममरणप्रवाह) संभवत नाहीं मग ही कोणास आहे ? ॥ ११ ॥ श्रीकृष्ण ह्मणालेः— उद्धवा! तूं ह्मणतोस तें खरें आहे, परतु या दोहोंचा अविवेक ह्मणजे अन्योन्याध्यास हा या संसृतीस आश्रय आहे. पहा, जोंपर्यंत अविवेकी पुरुषाच्या दृष्टीने देह, इंद्रियें व प्राण याच्याशीं आत्म्याचा संबंध आहे तोपर्यंत हा संसार मिथ्या असूनही भासमान होतो, वस्तुतः तो कोणासच नाहीं. ॥१२॥ - आतां तूं ह्मणशील कीं देहादि पदार्थ जर असत् (मिथ्या) आहेत तर ते ससारभासास तरी कारण कसे होतील? तर याविषयीं सांगतों ऐका- उद्धवा, देहादि पदार्थांस जरी सत्यता नाहीं तरी विषयाचें चिंतन करणारास ससारप्रतीति होतेच, ती नाहीशी होत नाहीं, स्वप्नातील पदार्थ

खरे नसतात तरी स्वप्न पाहणारास ते खरे भासून त्यांपासून अनेक अनर्थांची प्राप्ति होते. ॥ १३ ॥ - उद्धवा! तूं म्हणशील कीं. मोठ्या प्रयत्नानें ज्ञानी झाला व जीवन्मुक्तदशेस पावला तरी त्यास विषयाची स्फूर्ति (प्रतीति) होणारच, तर मग मोक्ष हा त्यासही दुर्लभच म्हणावयाचा, कारण विषयस्फूर्ति आहे तोंपर्यंत मोक्षप्राप्ति नाहीं तर याविषयी सांगतों - बा यदुवर्या! जो मनुष्य जागा झाला नाहीं त्यास स्वप्न हें अनेक अनर्थांस कारण होतें. परंतु जो जागृत झाला त्यास त्या स्वप्नात पाहिले ते खरे असा मोह व स्वप्नात पाहिलेले अनर्थ प्राप्त होत नाहींत. स्वप्नवृत्तान्ताचें स्मरण असलें तरी त्यापासून काहीं अनर्थ न होता मनास चमत्कार मात्र वाटतो तद्वत ज्ञानी पुरुषास विषयप्रतीति झाली तरी त्यापासून काहीं अनर्थ न होता उलट त्यास विनोद मात्र होतो. ॥१४॥ - अहंकाररूपी देहादिसबंधच संसारास आश्रय आहे ही गोष्ट तुला अन्वयव्यतिरेकानीं सांगतो. - उद्धवा! शोक, हर्ष, भय, क्रोध, लोभ,

ध्यायत अस्य संसृतिः न निवर्तते. ॥१३॥ यथा प्रस्वापः (स्वप्न) अप्रतिबुद्धस्य (जागा न झालेल्याला) बह्वनर्थभृत्. स एव प्रतिबुद्धस्य मोहाय न कल्पते वै. ॥ १४ ॥ शोक-हर्षभयक्रोधलोभमोहस्पृहादयः, जन्म, मृत्युः च अहंकारस्य दृश्यंते, आत्मनः न. ॥१५॥ देहेंद्रियप्राणमनोभिमानः (देह, इंद्रियें, प्राण व मन याविषयीं अभिमान ज्याला असा) अंत-

यथा ह्यप्रतिबुद्धस्य प्रस्वापो बह्वनर्थभृत् ॥ स एव प्रतिबुद्धस्य न वै मोहाय कल्पते ॥ १४ ॥ शोकहर्षभयक्रोधलोभमोहस्पृहादयः ॥ अहंकारस्य दृश्यन्ते जन्म मृत्युश्च नात्मनः ॥ १५ ॥ देहेन्द्रियप्राणमनोभिमानोजीवोऽन्तरात्मा गुणकर्ममूर्तिः ॥ सूत्रं महानित्युरुधेव गीतः संसार आधावति कालतन्त्रः ॥ १६ ॥

रात्मा गुणकर्ममूर्तिः जीवः 'सूत्रं', 'महान्' इति उरुधा (अनेक प्रकारें) इव गीतः [अस्ति] कालतंत्रः (ईश्वराधीन) [सः] संसारे आधावति (चहूंकडे धावतो) ॥ १६॥

मोह, व इच्छा इत्यादि विकार आणि जन्म, मृत्यु हे अहंकारासच दिसून येतात, चिद्रूप - आत्म्यास नाहीत (कारण निद्रा व समाधि ह्यामध्यें ते विकार दिसून येत नाहींत व मी सुखी, मी दुःखी ही जशी सर्वांची समजूत आहे तशी चैतन्य किंवा आत्मा सुखी किंवा दुःखी आहे अशी प्रतीति कोणासही नाहीं. शिवाय कृशत्वादि देहधर्म जसे दृश्य आहेत त्याचप्रमाणें सुखादिकही दृश्य आहेत यामुळें ते द्रष्टा जो आत्मा त्याचे धर्म नव्हत) ॥ १५ ॥ - आता उद्धवा! यावर तू म्हणशील कीं जर हा संसार अहंकारास आहे तर मुक्तिही त्यासच असली पाहिजे. आणि जर असेल तर मुक्तिकाळीं अहंकार शिल्लक राहतो असें म्हणावें लागेल तर याविषयीं सांगतों ऐक.- देह, इंद्रिये, प्राण आणि मन

१ सुप्ते ऽहमि न दृश्यंते सुखदोषप्रवृत्तयः। अतस्तस्यैव संसारो न मे संसृतिसाक्षिणः॥
अहंकार लीन झाला असता सुख दुःख इत्यादि विकारांच्या प्रवृत्ति चालत नाहींत अर्थात संसार त्या अहंकाराचाच होय; संसृतीचा साक्षी जो मी (आत्मा) त्याचा नव्हे

यांचे ठिकाणी ज्यास अहंत्वाभिमान आहे असा आत्मांच देहादिकांचा अंतर्गत जीव होय गुण व कर्में हींच याची मूर्ति होय, यासच सूक्ष्म उपाधींमुळें सूत्रात्मा, महत्तत्त्व इत्यादि अनेक नामें दिलीं आहेत. असा हा परमेश्वराधीन जीव या संसाराचे ठिकाणीं चहुंकडे धावतो (अर्थात् अहंकाराचे तादात्म्याध्यासानें जीवास संसार आहे, तादात्म्यारोप नष्ट झाल्यावर मोक्ष होतो. अर्थात् मुक्तिकाळीं अहंकारावशेषरूप उक्त दोष येण्याचा संभव नाहीं). ॥१६॥ असो, आता, मन, वाणी, प्राण, आणि शरीर याचे ठिकाणी अहत्वाभिमानरूपी जो अहंकार हा निर्मूल असून अनेकरूपानी (देव दानव मानव इत्यादीनीं) इंद्रजालाप्रमाणें प्रकाशमान झाला आहे, तर यास गुरूच्या उपासनेने तीक्ष्ण केलेला जो ज्ञानरूप खड्ग त्यानें छेदून टाकून सर्व तृष्णारहित झालेला मुनि या जगात निःसंगपणाने विहार करितो. ॥ १७ ॥ चिज्जडाचा किंवा देहत्रय (स्थूल-सूक्ष्म-कारण देह) आणि आत्मा यांचा जो विवेक (विवेचन अथवा पृथक्करण) यासच ज्ञान ह्मणावें या ज्ञानाचीं साधनें वेद, स्वधर्म, प्रत्यक्ष (स्वताचा अनुभव), उपदेश, आणि अनुमान (तर्क) हीं होत

अमूलं बहुरूपरूपितं (नानाप्रकारच्या रूपानीं प्रकाशित) एतत् मनोवचःप्राणशरीरकर्म उपासनया शितेन (तीक्ष्ण) ज्ञानासिना (ज्ञानखड्गानें) छित्त्वा अतृष्णः मुनिः गां विचरति. ॥ १७ ॥ ज्ञानं विवेकः. निगमः (श्रुति), तपः (स्वधर्म), प्रत्यक्षं (स्वानुभव), ऐतिह्यं (उपदेश) अथ अनुमानं (तर्क) [इति तस्य साधनानि]. अस्य जगतः आद्यंतयोः यत् कालः (प्रकाशित करणारा), हेतुः (कारण) च तत् एव केवल मध्ये, [इदं तस्य फलं] ॥ १८ ॥ यथा सर्वस्य हिरण्मयस्य पुरस्तात् पश्चात् च [यत् अस्ति],

अमूलमेतद् बहुरूपरूपितं मनोवचःप्राणशरीरकर्म ॥ ज्ञानासिनोपासनया शितेन च्छित्त्वा मुनिर्गां विचरत्यतृष्णः ॥१७॥

ज्ञानं विवेको निगमस्तपश्च प्रत्यक्षमैतिह्यमथानुमानम् ॥ आद्यंतयोरस्य यदेव केवलं कालश्च हेतुश्च तदेव मध्ये ॥ १८॥

यथा हिरण्यं स्वकृतं पुरस्तात् पश्चाच्च सर्वस्य हिरण्मयस्य ॥ तदेव मध्ये व्यवहार्यमाणं नानापदेशैरहमस्य तद्वत् ॥१९॥

विज्ञानमेतत्त्रियवस्थमंग गुणत्रयं कारणकार्यकर्तृ ॥ समन्वयेन व्यतिरेकतश्च येनैव तुर्येण तदेव सत्यम् ॥ २० ॥

तत् एव स्वकृतं (नामल्या ह्म० अलंकाराच्या रूपानें न घडविलेलें) हिरण्यं (सुवर्ण) मध्ये नानापदेशैः (अनेक नावांनीं) व्यवहार्यमाणं [भवति], तद्वत् अस्य (ह्या विश्वाच्यामध्ये) अहम् (मी). ॥ १९ ॥ अंग, त्रियवस्थं (जागृति इत्यादि तीन अवस्था ज्याच्या असें) विज्ञानं (मन), कारणकार्यकर्तृ (कारण ह्म० अध्यात्म, कार्य ह्म० अधिभूत व कर्तृ ह्म० अधिदैव) गुण-

- आतां ज्ञानाचें फळ सांगतो :- या जगताच्या आदीं व अंतीं जें वस्तु (ब्रह्म) आहे तेंच याच्या मध्यस्थितींतही आहे. जग हें काहीं नाही ब्रह्मवस्तुच या सर्वांस प्रकाशक आहे आणि कारणही तेंच आहे असा निश्चय होणें हेंच या पूर्वोक्त ज्ञानाचे फळ होय. ॥१८॥ कटककुंडलादि अनेक अलंकाराच्या रूपानें न घडलेलें सोनें अलंकार घडण्याचे पूर्वीं जें होते, तेंच तो दागिना (आटवून) मोडल्यानंतर जें राहणार तेंच तो अलंकार असतानाही आहे, कडी, तोडे, कुंडले इत्यादि अनेक नामरूपभेदांनी भिन्न भिन्न व्यवहारास जरी प्राप्त झालें तरी सोनें तें एकच. तद्वत नामरूपादिभेदानें नानाविध व्यवहारास आश्रय जगत्कारण असा मी एकच आहे. जगत् हें मजहून भिन्न मुळींच नाही. ॥ १९ ॥ हे उद्धवा! जागृति,

स्वप्न आणि सुषुप्ति या तीन अवस्थानीं युक्त जी बुद्धि, तसेंच त्या अवस्थात्रयास कारणीभूत जें गुणत्रय (सत्व रज व तम) आणि त्याच प्रमाणें कारण, कार्य, व कर्ता ह्मणजे अध्यात्म, अधिभूत आणि अधिदैव हें गुणत्रयापासून उत्पन्न झालेलें जें त्रिविध जग हें सर्व सामान्य ज्ञानस्वरूप जो तुरीय ह्मणजे अवस्थात्रयसाक्षी चैतन्य त्याच्या व्याप्तीनेंच प्रकाशित होतें. - आता तूं ह्मणशील की, आह्मास या विशेष ज्ञानाशिवाय सामान्यज्ञानस्वरूप जो तुर्य (तुरीय) त्याची प्रतीति ह्मणून काहीं नाहीं तर याविषयी सागतो ऐक - या विशेषज्ञानाचा व्यतिरेक (अभाव) झाला असतां समाध्यादि अवस्थांचे ठिकाणीं जें अवशिष्ट राहातें तें तुरीय चैतन्य, आणि तेंच सत्य होय ॥ २० ॥ - या प्रकारे कालत्रयींही सतत असणाऱ्या तुरीय चैतन्याचें सत्यत्व तुला सांगितलें आता कांहीं काळ असणारें व कालांतरी नसणारे जें हे जग त्याची असत्यता तुला सागतो. - हे उद्धवा! जें सृष्टीच्या पूर्वी नव्हते व प्रलयानंतरही जे नाही; तें हे जग केवळ मध्येंच जरी भासमान होत आहे तरी तें कारणस्वरूपाहून भिन्न नाहीं केवळ त्यास नाव मात्र वेगळे आहे. कारण जो पदार्थ ज्या

त्रयं (तीन गुणाचें कार्य असें समस्त जग) [च], एतत् येन एव तुर्येण (वक्ष्या ह्म० सामान्य ज्ञानमात्रानें) समन्वयेन भवति (अनुगत होत्सातें प्रकाश पावतें), व्यतिरेकेन च यद् [अस्ति], तत् एव सत्यं ॥ २० ॥ यत् पुरस्तात् न, उत यत् पश्चात् न, तत् मध्ये च [पृथक्] न [अस्ति, किंतु] व्यपदेशमात्रं (नाममात्र) [यत] यत् परेण भूतं

न यत्पुरस्तादुत यन्न पश्चात् मध्ये च तन्न व्यपदेशमात्रम् ॥ भूतं प्रसिद्धं च परेण यद्यत् तदेव तत्स्यादिति मे मनीषा ॥ २१ ॥

अविद्यमानोऽप्यवभासते यो वैकारिको राजससर्ग एषः ॥ ब्रह्म स्वयंज्योतिरतो विभाति ब्रह्मेंद्रियार्थात्मविकारचित्रम् ॥ २२ ॥

प्रसिद्ध च, तत् तत् एव स्यात्, इति मे मनीषा (बुद्धि, समजूत) ॥ २१ ॥ यः एषः वैकारिकः (विकारसमूह) [स एव] अविद्यमानः (पूर्वी नसलेला) राजससर्गः (रजोगुणद्वाराने ब्रह्मकार्यभूत) अवभासते अपि (भासतोही ह्म० ब्रह्मानें प्रकाश्य आहे) ब्रह्म स्वयं (स्वत सिद्ध) ज्योतिः (प्रकाशक) अत इंद्रियार्थात्मविकारचित्रं (इंद्रियें, विषय, मन,

कारणापासून उत्पन्न झाला किंवा ज्यानें प्रकाशित केला तो पदार्थ कारणस्वरूप किंवा प्रकाशस्वरूपच होय असें माझे मन आहे - कारणावाचून कार्य किंवा प्रकाशावाचून प्रकाश्य ह्मणून भिन्न काहीं प्रत्ययास येत नाहीं - ॥ २१ ॥ - हे उद्धवा! हा जो सृष्टीच्या पूर्वी नसलेला विकारसमूह (सर्व जग) भासत आहे तो सर्व रजोगुणद्वारा ब्रह्माचेंच कार्य होय आणि भासकालीं ब्रह्मप्रकाशानेंच भासमान होत आहे. आतां ब्रह्म हें स्वत.सिद्ध आहे तें कोणाचे कार्य नाहीं. तसेच तें स्वयंप्रकाश असून सर्वांचे प्रकाशक आहे. ह्मणून इंद्रियें, शब्दादि विषय, मन, देवता, पंचभूतें इत्यादि आकारानी चित्रविचित्र (निरनिराळे) असें एक ब्रह्म भासत आहे ॥ २२ ॥ असो तस्मात् हे उद्धवा! या प्रमाणें श्रुति, स्वधर्माचरण, प्रत्यक्ष, उपदेश आणि अनुमान या साधनानीं, तसेंच पर ह्मणजे देहादि अनात्म पदार्थांच्या पूर्ण निरासानें आणि श्रीगुरूच्या साह्यानें आत्मस्वरूपाविषयींचा

संशय च्छेदून स्वरूपभूत आनंदानेंच संतुष्ट होत्साता विषयकामुक जे इंद्रियादिक या सर्वांपासून उपरत व्हावे ह्मणजे त्यावरील आसक्ति सोडावी ॥ २३ ॥ - उद्धवा! देहादिकाचा निरास ह्मणून जो सांगितला तो असा :- हे शरीर काही आत्मा नव्हे, कारण ते घटादिकासारखे पृथ्वीचे कार्य आहे याचप्रमाणे इंद्रियें, त्याच्या देवता, प्राण, मन, बुद्धि, चित्त, आणि अहंकार हेही आत्मा नव्हत, कारण हे सर्व अनाश्रित असल्यामुळे शरीराप्रमाणेच अन्नमय आहेत वायु, पाणी, तेज, पृथ्वी व आकाश हीं पंचभूते, शब्दादि पंचविषय आणि प्रकृति हीही आत्मा नव्हत, कारण ही सर्व जड आहेत आणि आत्मा हा चेतन आहे ॥ २४ ॥ माझे स्वरूप विवेचनपूर्वक निश्चितपणे ज्याने जाणले आहे त्यास

देवता व पंच भूतें एतद्रूप विचित्र) ब्रह्म विभाति ॥ २२ ॥ एवं स्फुट [यथा यथा] ब्रह्मविवेकहेतुभिः, तथा विशारदेन (निपुण) परापवादेन (देहादिकावरील आत्मत्वाच्या निरसनाने) [च] आत्मसंदेह छित्वा स्वानंदतुष्ट [सन्] अखिलकामुकेभ्य (सकल कामुकापासून ह्म० इंद्रियापासून) उपारमेत (निःसंग व्हावें) ॥ २३ ॥ पार्थिव (पृथ्वीचे कार्य) वपुः (शरीर) आत्मा न. अन्नमात्र मनः, धिषणा (बुद्धि), सत्वं (चित्त), अहंकृतिः, इंद्रियाणि, देवाः, असु (प्राण) च [आत्मा न] वायु, जल हुताश (अग्नि), ख (आ-

एवं स्फुटं ब्रह्मविवेकहेतुभिः परापवादेन विशारदेन ॥ छित्त्वाऽऽत्मसंदेहमुपारमेत स्वानंदतुष्टोऽखिलकामुकेभ्यः ॥ २३ ॥
नाऽऽत्मा वपुः पार्थिवमिंद्रियाणि देवा ह्यसुर्वायुजलं हुताशः ॥ मनोऽन्नमात्रं धिषणा च सत्त्वमहंकृतिः खं क्षितिरर्थसाम्यम् ॥२४॥
समाहितैः कः करणैर्गुणात्मभिर्गुणो भवेन्मत्सुविविक्तधाम्नः ॥ विक्षिप्यमाणैरुत किं नु दूषणं घनैरुपेतैर्विगतै रवेः किम् ॥ २५ ॥
यथा नभो वाय्वनलांबुभूगुणैर्गतागतैर्वर्तुगुणैर्न सज्जते ॥ तथाऽक्षरं सत्त्वरजस्तमोमलैरहंमतेः संसृतिहेतुभिः परम् ॥ २६ ॥
तथाऽपि संगः परिवर्जनीयो गुणेषु मायारचितेषु तावत् ॥ मद्भक्तियोगेन दृढेन यावद् रजो निरस्येत मनःकषायः ॥ २७ ॥

काश), क्षिति (पृथ्वी), अर्थसाम्यं (शब्दादि विषय व प्रकृति) [च जडत्वात् आत्मा न] ॥ २४ ॥ मत्सुविविक्तधाम्न (ज्यानें माझे स्वरूप जाणलें त्यास) समाहितै (स्थिर केलेल्या) गुणात्मभि करणै. (इंद्रियानीं) कः गुणः भवेत्? उत विक्षिप्यमाणैः दूषणं किंतु? रवेः घनैः (मेघ) उपेतैः (आलेल्या) विगतै (गेलेल्या) [वा] किं? ॥ २५ ॥ यथा नभ वाय्वनलांबुभूगुणैः, गतागतैः ऋतुगुणैः वा न सज्जते (सक्त होत नाहीं), तथा अहमतेः पर अक्षरं संसृतिहेतुभि. रजस्तमोमलैः [न युज्यते]. ॥ २६ ॥ तथा अपि यावत् दृढेन

गुणात्मक जी इंद्रियें ती जिंकली असता कोणता गुण उत्पन्न होणार आहे? आणि ती विक्षेप पावली असता ह्मणजे विषयाकडे चंचल झाली असता दूषण तरी काय येणार आहे? जसें मेघ आले किंवा गेले तरी सूर्यास त्यासंबधें गुणदोष काहीं लागत नाहीत तद्वत् ॥ २५ ॥ अथवा आकाश हें जसे वायु, अग्नि, उदक आणि पृथ्वी याचे गुण (शोषण, दाह, आर्द्रता, व मलिनता) अथवा ऋतूंचे धर्म आले किंवा नष्ट झाले तरी त्याच्याशी संबंध पावत नाही तसे अहंकाराहून पर जे अक्षर ब्रह्मवस्तु तें संसरणास कारणमूल सत्व रज व तम हे गुणरूपी मळ यांच्याशी संबंध पावत नाहीं. ॥ २६ ॥ जोपर्यंत माझा भक्तियोग दृढ होऊन विषयप्रीतिरूप

मनोवासना निरस्त झाली नाहीं तोंपर्यंत मार्गात्यांनीं अशाही या विषयाचे ठिकाणीं संग (अभिलाष) करूं नये. ॥ २७ ॥ जसा एखादा रोग झाला असून त्याची चिकित्सा (परिहार) बरोबर रीतीनें झाली नाही तर तो पुनः पुन्हा वृद्धिंगत होऊन मनुष्यास दुःख देतो तसे ज्यातील रागद्वेषादि वासना व तन्मूलक कर्में दूर झाली नाहीत व जें स्त्रीपुत्रादि विषयाकडे सक्त होतें तें मन कुयोगी म्हणजे अयथार्थज्ञानी पुरुषास स्वरूपापासून भ्रष्ट करितें ॥२८॥ उद्धवा ! जे अपूर्णज्ञानी कुयोगी, बंधु शिष्य इत्यादि रूपानें संबंध पावलेले जे देव त्यांनी केलेल्या विघ्नांनीं उपहत (भ्रष्ट) होतात ते अर्धवट ज्ञानी दुसऱ्या जन्मात पूर्वाभ्यासाच्या बळानें पुन्हा त्या ज्ञानयोगाचाच अभ्यास करितात, कर्मजालाच्या नादीं लागत नाहींत. ॥ २९ ॥ - आता तूं म्हणशील कीं, विद्वानांस सुद्धा सर्वप्रकारानीं कर्म हें दुस्त्यज आहे म्हणून पूर्णज्ञान्यास देखील पुन्हा संसारप्राप्ति होण्याचा

मद्भक्तियोगेन मनःकषायः (मनोमल) रजः निरस्येत, तावत् मायारचितेषु गुणेषु संगः परिवर्जनीयः. ॥ २७ ॥ यथा नृणां आमयः (रोग) असाधुचिकित्सितः [चेद्, तर्हि] पुनः पुनः प्ररोहन् [सन्] (वाढून) संतुदति (पीडा देतो), एवं अविपक्वकषायकर्म सर्वसंगं मनः कुयोगिनं विध्यति (त्रास देतें) ॥ २८ ॥ ये कुयोगिनः त्रिदशोपसृष्टैः (देवांनीं उत्पन्न केलेल्या) मनुष्यभूतैः अंतरायैः (विघ्नांनीं) विहताः (पराभूत) ते प्राक्तनाभ्यासबलेन भूयः योगं युंजंति, कर्मतंत्रं न. ॥२९॥ असौ जंतुः (देह) आनिपातात् (मरेपर्यंत) केन

यथा ऽमयो ऽसाधुचिकित्सितो नृणां पुनः पुनः संतुदति प्ररोहन् ॥ एवं मनो ऽपक्वकषायकर्म कुयोगिनं विध्यति सर्वसंगम् ॥ २८ ॥ कुयोगिनो ये विहतांतरायैर्मनुष्यभूतैस्त्रिदशोपसृष्टैः ॥ ते प्राक्तनाभ्यासबलेन भूयो युंजंति योगं न तु कर्मतंत्रम् ॥ २९ ॥ करोति कर्म क्रियते च जंतुः केनाप्यसौ चोदित आनिपातात् ॥ न तत्र विद्वान्प्रकृतौ स्थितो ऽपि निवृत्ततृष्णः स्वसुखानुभूत्या ॥ ३० ॥ तिष्ठंतमासीनमुत व्रजंतं शयानमुक्षंतमदंतमन्नम् ॥ स्वभावमन्यत्किमपीहमानमात्मानमात्मस्थमतिर्न वेद ॥ ३१ ॥

अपि चोदितः (प्रेरित) [सन्] कर्म करोति, क्रियते च विद्वान् तत्र प्रकृतौ स्थितः अपि स्वसुखानुभूत्या निवृत्ततृष्णः [सन्] न [करोति, न विक्रियते च] (विकार पावतो) ॥ ३० ॥ आत्मस्थमतिः तिष्ठंतं (उभा) आसीनं (बसलेला) उत व्रजंतं (जाणारा) शयानं (निजणारा), उक्षंतं (मूत्रोत्सर्ग करणारा), अन्नं अदंतं (खाणारा), अन्यत् किं अपि स्वभावं

संभव आहे तर याविषयीं सांगतों :- कांहीं संस्कारादिकांनीं प्रेरणा केलेला ज्ञानी पुरुषाचा देह मरणापर्यंत भोजनादि कर्में करितो व त्या योगानें पुष्ट्यादि विकारास प्राप्त होतो, परंतु तो ज्ञानी देहाचे ठिकाणीं स्थित असूनही कर्मकाळींही कांहीं विकार पावत नाही, कारण, कीं स्वसुखाच्या अनुभवानें त्याची सर्व विषयतृष्णा व अहंकार हीं निवृत्त झालेलीं असतात म्हणून तो तज्जन्य हर्षखेदादिक संसारास प्राप्त होत नाहीं. ॥ ३० ॥ - ज्ञात्याची बुद्धि निरंतर आत्मस्वरूपीं रममाण असल्यामुळें तो, देह उभा आहे की बसला आहे, चालत आहे किंवा निद्रित आहे, भोजन करीत आहे किंवा मूत्रोत्सर्ग करीत आहे अथवा आणखी कांहीं स्वभावप्राप्त कर्म करीत आहे हें कांहीं एक जाणत नाहीं. ॥ ३१ ॥

ज्ञानी हा बहिर्मुख अशा इंद्रियांचे विषय जरी पाहतो; तरी अनेकत्वामुळें ते स्वप्नांतील पदार्थांप्रमाणें मिथ्या आहेत अशा अनुमानाने बाधित करून विचारी पुरुष आत्मातिरिक्त सर्व जग सत्यत्वानें पाहात नाहीं. जसा—स्वप्नातून जागा झालेला मनुष्य स्वप्नातील विषय आपले आपण नाहींतसे होऊन संस्कारानें भासमान होत असताना सत्यत्वदृष्टीने पाहात नाहीं तद्वत्. ॥३२॥ - एवंच कर्मांच्या योगानें देह विकार पावत असताही आत्मा विकार पावत नाहीं ह्मणून तुला सांगितलें. यावर तू ह्मणशील कीं, हे अयोग्य आहे, कारण, आत्म्याचा बद्धावस्थेनें त्याग आणि मुक्तावस्थेनें स्वीकार ज्ञानदशेंत होत असल्यामुळें आत्म्यास निर्विकार कांहीं ह्मणता येत नाहीं. पाहा, कीं, साळी काडल्या असता साळीपणाचा त्याग करतात व तंदुलपणानें त्या घेतल्या जातात ह्मणून साळी निर्विकार ह्मणता येत नाहींत, तद्वत् तर याविषयी ऐक. बापा उद्धवा! - बधावस्थेत सत्वादिगुण व कर्में यानी भिन्न भिन्न असें अज्ञानकार्य देहेंद्रियादिक आत्म्याचे ठिकाणीं एकत्वानें जें गृहीत केलें होतें तें ज्ञानदृष्टीच्या योगानें निवृत्त होतें आत्मा हा कोणत्याही रूपाने घेतला जात नाहीं व कोण-

ईहमान (करणारा) आत्मानं (देहाप) न वेद. ॥ ३१ ॥ यदि [अपि] मनीषी (ज्ञानी) असदिंद्रियार्थं (मिथ्याभूत विषय) पश्यति, [तथा अपि] यथा उत्थाय तिरोदधानं (नाहींसें होणारें) स्वाप्नं (स्वप्नवृत्त), [तद्वत्] नानानुमानेन विरुद्धं अन्यत् वस्तुतया (सत्यत्वानें) न मन्यते. ॥ ३२ ॥ अंग, पूर्वं गुणकर्मचित्रं अज्ञान आत्मनि अविविक्त (अभिन्न)

यदि स्म पश्यत्यसदिंद्रियार्थं नानाऽनुमानेन विरुद्धमन्यत् ॥ न मन्यते वस्तुतया मनीषी स्वाप्नं यथोत्थाय तिरोदधानम् ॥३२॥
पूर्वं गृहीतं गुणकर्मचित्रमज्ञानमात्मन्यविविक्तमंग ॥ निवर्तते तत्पुनरीक्षयैव न गृह्यते नापि विसृज्य आत्मा ॥ ३३ ॥ यथा हि
भानोरुदयो नृचक्षुषां तमो निहन्यान्न तु सद्विधत्ते ॥ एवं समीक्षा निपुणा सती मे हन्यात्तमिस्रं पुरुषस्य बुद्धेः ॥ ३४ ॥
एष स्वयं ज्योतिरजो ऽप्रमेयो महानुभूतिः सकलानुभूतिः ॥ एको ऽद्वितीयो वचसां विरामे येनेषिता वागसवश्चरंति ॥ ३५ ॥

[यथा तथा] गृहीतं [आसीत्]. तत् पुनः ईक्षया (ज्ञानानें) एव निवर्तते. आत्मा न गृह्यते, न अपि विसृज्यः (त्याज्य) ॥ ३३ ॥ यथा भानोः उदयः नृचक्षुषां तमः निहन्यात्, सत् (घटादि पदार्थ) न विधत्ते (करीत नाहीं), एवं निपुणा सती मे समीक्षा (ज्ञान) पुरुषस्य बुद्धेः तमिस्रं (अज्ञान) हन्यात्. ॥ ३४ ॥ वचसां विरामे [सति], सकला-

त्याही प्रकारानें टाकला जात नाहीं. (उद्धवा ! या ह्मणण्याचें तात्पर्य असें कीं, मुक्ति ही जर कर्मांचें फल असती तर आत्मा विकारी झाला असता, परतु तसें नसून ती केवळ आरोपिताज्ञाननिवृत्तिरूप आहे यामुळें बंध आणि मोक्ष दोन्हीही आत्म्यास स्पर्श करीत नाहींत ह्मणून त्यास विकार नाहीं) ॥ ३३ ॥ - हाच विषय दृष्टातानें स्पष्ट सांगतों :- ज्याप्रमाणें सूर्याचा उदय केवळ मनुष्यांच्या नेत्रातील अंधकार नाहींसा करतो, परंतु पूर्वस्थित घटादिक पदार्थ कांहीं पुन्हा नवे करीत नाहीं तद्वत् पूर्ण अशी आत्मविद्या पुरुषाच्या बुद्धींतील अज्ञान मात्र नाहींसें करते, आत्मा कांहीं नवा उत्पन्न करीत नाहीं, ह्मणून तो निर्विकार आहे ॥ ३४ ॥ - आता आत्म्याचें निर्विकारत्व तुला सविस्तर सांगतों :- उद्धवा ! हा आत्मा स्वयंप्रकाश, जन्मरहित, इंद्रियजन्य ज्ञानास अगोचर, महान्, (देशकालवस्तुपरिच्छेदरहित), अनुभव-

स्वरूप आणि सर्वानुभवसिद्ध असा एकच आहे. त्यास विकारास कारण दुसरे कांहीं नाहीं ह्मणून तो अद्वितीय होय - आता तूं ह्मणशील की श्रुतींनी ज्याचे प्रतिपादन केले आहे अर्थात् श्रुत्यर्थांच्या विचाराने ज्याचे ज्ञान होतें तो स्वयप्रकाश कसा ? तर ऐक. - तो श्रुतीच्या वाणीसही अविषय आहे, - याविषयी "ज्यापासून मनासह वाणी निवृत्त होतात" अशा अर्थाची श्रुतिही प्रमाण आहे. - तसेच त्या आत्म्याचे प्रेरणेनेंच वाणी आणि प्राण (यात सर्व इंद्रियाचा समावेश समजावा) आपल्या विषयाचे ठिकाणी प्रवृत्त होतात. - याविषयींही प्रमाणभूत श्रुति आहेत त्यात "मन, प्राण, वाणी, चक्षु आणि श्रोत्र (कान) यास आपआपळे विषयाकडे कोण योजितो ? असा प्रश्न करून उत्तरामध्ये सागितले आहे कीं, आत्मा हा कानाचा कान, मनाचे मन, वाणीची वाणी, प्राणाचा प्राण आणि चक्षूचें चक्षु आहे." ॥ ३१ ॥ - आता आत्म्याचें अद्वितीयत्वप्रतिपादन करण्याकारिता भेदाचें असत्यत्व तुला सांगतों :- केवळ एकरूप अशा आत्म्याचेठिकाणीं नाना प्रकाराचा भेद जो भासत आहे हा केवळ मनाचा भ्रम होय कारण, रौप्यभ्रातीस शिपीवाचून जसा दुसरा आश्रय नाही, तसा या भेदभ्रातीस आत्म्यावाचून दुसरा आश्रय नाहीं. - याविषयी श्रुति प्रमाण आहेत. त्या अशा—' येथे दुसरे भिन्न काही नुभूतिः एष. स्वयज्योतिः, अजः, अप्रमेयः, महानुभूतिः, एकः, अद्वितीयः च, येन इषिता (प्रेरित) वाक्, असव [च] चरति ॥ ३५ ॥ केवले आत्मन् विकल्प. [इति] यत्, एतावान् आत्मसमोहः; हि यस्य स्वं आत्मानं ऋते अवलंबः न ॥ ३६ ॥ नामाकृतिभि ग्राह्य पंचवर्ण (पाचभौतिक) यत् द्वयं, [तत्] अबाधेनं [इति] पंडित-

एतावानात्मसंमोहो यद्विकल्पस्तु केवले ॥ आत्मन्नृते स्वमात्मानमवलंबो न यस्य हि ॥ ३६ ॥
यन्नामाकृतिभिर्ग्राह्यं पंचवर्णमबाधितम् ॥ व्यर्थेनाप्यर्थवादोऽयं द्वयं पंडितमानिनाम् ॥ ३७ ॥

मानिनां (स्वताला पंडित मानणाराची) [वेदांतेषु] अयं अर्थवादः [इति प्रतीतिः, तत्वविदां न] [यतः सा] व्यर्थेन अपि (सत्यत्वेनवून) [अस्ति] ॥ ३७ ॥ नाहीं, ' ' एक परमात्माच मायेच्या योगानें बहुरूप भासत आहे ' इत्यादि - ॥ ३६ ॥ कित्येक पंडितंमन्य (आह्मीच पडित आहो असे मानणारे) लोकाम—अर्थात् पूर्वमीमासकास— असे वाटतें कीं, हें नामरूपांनीं युक्त पचभूतात्मक जगत् (द्वैत) अबाधित आहे आणि एकत्वप्रतिपादक जे वेदातशास्त्र ते केवळ अर्थवाद ह्मणजे यज्ञ करणाऱ्या पुरुषाची स्तुति आहे. परंतु तत्त्ववेत्त्यास तसें वाटत नाहीं. कारण ती त्याची (पूर्वमीमासकाची) समजूत सत्याला सोडून आहे. - पहा कीं, वेदातशास्त्र जर अर्थवाद किंवा कर्त्याची स्तुति आहे असे ह्मणावे तर विधिवाक्याशी त्याची एकवाक्यता काहीं नाहीं. तसेंच अकर्ता, अभोक्ता व परमानदरूप अशा आत्म्याचे प्रतिपादन कर्मविधीचे शेष (अंग) होऊ शकत नाही. आता द्वैत हें अबाधित ह्मणजे सत्य आहे असेंही ह्मणता येत नाही, कारण, ते नामरूपात्मक, इंद्रियास ग्राह्य व पाचभौतिक असें आहे ह्मणून ते स्वप्नतुल्य आहे अर्थात् मिथ्या होय इत्यादि अनुमानानीं व ' वाचारंभणं विकारो नामधेयं ' इत्यादि श्रुतीनींही त्या द्वैताचा नाश (नाश) सागितला आहे. - ॥ ३७ ॥

योगाभ्यास परिपूर्ण झाला नाहीं, योगसाधन चाललें आहे अशा स्थितीमध्येंच जर योग्याच्या देहाला रोगादि उत्पन्न होऊन पीडा होऊ लागली तर तिच्या निरसनाचा प्रकार सांगितला आहे तो असा — ॥ ३८ ॥ कित्येक रोग योगधारणेनें जाळावे (सताप होत असेल तर सोमाची धारणा करावी, शैत्य पीडा देऊ लागेल तर सूर्याची धारणा करावी म्हणजे ते रोग नाश पावतात) कित्येक (वातादि) रोगाना वायुधारणेसहित आसनाच्या योगे नष्ट करावें - आणि पापग्रह, सर्प इत्यादिकाकडून - उपसर्ग होत असतील तर त्याचे तपश्चर्या, मन्त्र व औषधे याच्या योगें निरसन करावे ॥ ३९ ॥ - काम इत्यादि - काही रोगाचा नाश माझें निरतर ध्यान व नामसकीर्तन इत्यादि उपायानी करावा - आणि दंभ मान इत्यादि - अमंगलदायक विकाराचा संहार योगेश्वराची (सद्गुरूची) सेवा ह्या उपायाने करावा ॥ ४० ॥ कित्येक लोक चागले धैर्यसपन्न असूनही प्रथम ह्या व दुसऱ्या

अपक्वयोगस्य युंजत. योगिन. काय. उत्थितै. उपसर्गै. (रोगादिकानीं) विहन्येत, तत्र अय विधि' (प्रतीकार) विहित. ॥ ३८ ॥ काश्चित् उपसर्गान् योगधारणया, कांश्चित् धारणान्वितै.. आसनैः, तपोमंत्रौषधैश्च विनिर्दहेत् (जाळो). ॥ ३९ ॥ कांश्चित् अशुभदान् मम अनुध्यानेन, नामसकीर्तनादिभि , योगेश्वरानुवृत्त्या वा हन्यात् ॥ ४० ॥

योगिनो ऽपक्वयोगस्य युंजतः काय उत्थितैः ॥ उपसर्गैर्विहन्येत तत्राय विहितो विधि. ॥ ३८ ॥

योगधारणया कांश्चिदासनैर्धारणान्वितै ॥ तपोमंत्रौषधैः कांश्चिदुपसर्गान्विनिर्दहेत् ॥ ३९ ॥

कांश्चिन्ममानुध्यानेन नामसकीर्तनादिभि. ॥ योगेश्वरानुवृत्त्या वा हन्यादशुभदान्शनै ॥ ४० ॥

केचिद्देहमिमं धीरा. सुकल्पं वयसि स्थिरम् ॥ विधाय विविधोपायैरथ युंजति सिद्धये ॥ ४१ ॥

न हि तत्कुशलादृत्यं तदायासो ह्यपार्थक. ॥ अंतवत्त्वाच्छरीरस्य फलस्येव वनस्पतेः ॥ ४२ ॥

केचित् धीराः विविधोपायैः इमं देहं सुकल्पं (सुदृढ) वयसि (तरुण वयात) स्थिरं च विधाय अथ सिद्धये युजति ॥ ४१ ॥ तत् कुशलादृत्य (शहाण्यानी आदरण्याजोगे) नहि वनस्पते. फलस्य इव शरीरस्य अतवत्त्वात् तदायासः अपार्थक. ॥ ४२ ॥

नानाप्रकारच्या उपायानीं हें शरीरच सुदृढ व तरुणपणात नित्य स्थिर राहील असें करून घेतात आणि मग परकायप्रवेश इत्यादि सिद्धीच्या प्राप्तीसाठी त्यात्या योगधारणा करू लागतात, - ज्ञाननिष्ठारूप योग साधीत नाहींत. - ॥ ४१ ॥ परतु ते काम समजस पुरुषानी आदरण्याजोगे नव्हें कारण, जसे वनस्पतीचे फळ नश्वर असते तसे शरीर नाशवत आहे. (वनस्पति शाश्वत राहतो पण त्याचें फळ लवकरच नासून कुजून वगैरे नष्ट होते, तसा आत्माच सतत राहणारा व शरीर केव्हाना केव्हा तरी नाश पावणारे होय) म्हणून शरीर सुदृढ करण्यासाठी व सिद्धि मिळविण्यासाठी केलेले उद्योग निरर्थक ठरतात ॥ ४२ ॥

समाधि साध्य करण्यासाठीं तिचें अंग म्हणून असेच प्राणायामादि योग करूं लागलें म्हणजे केव्हां केव्हां शरीर सुदृढ (रोगादिकांनी रहित व तरुण स्थितींत राहणारें) असें होते पण तसें झालें तरी मजकडे चित्त लावणाऱ्या बुद्धिमान् पुरुषानें त्यावर विश्वास ठेवूं नये (आपलें शरीर नेहमीं असेंच राहील असें समजूं नये) व योगाभ्यास सोडूं नये ॥ ४३ ॥ केवळ माझा आश्रय धरून जो योगी अशा प्रकारें ही योगचर्या आचरण करील त्याला आत्मसुखाचा अनुभव मिळेल व त्याच्या समस्त इच्छा नाहींशा होतील अर्थात त्याला विघ्नाकडून कधींही अडथळा व्हावयाचा नाहीं (कारण, विघ्नें इच्छेमुळें उद्भवतात, ज्यानें माझा आश्रय धरिला त्याच्या समस्त इच्छा सुटतात मग विघ्नें उद्भवतील कोठून ? त्याचें

योग निषेवत. काय (शरीर) कल्पतां (सुदृढभाव) इयात् (पावेल) चेत्, मतिमान् मत्पर' योग उत्सृज्य तत् न श्रद्दध्यात् ॥ ४३ ॥ इमां योगचर्या विचरन् मद्व्यपाश्रय योगी स्वसुखानुभू, निस्पृह, [च सन्] अंतरायैः (विघ्नांनीं) न विहन्येत ॥ ४४ ॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे अष्टाविंशो ऽध्याय. ॥ २८ ॥

योग निषेवतो नित्यं कायश्चेत्कल्पतामियात् ॥ तच्छ्रद्दध्यान्न मतिमान्योगमुत्सृज्य मत्पर ॥ ४३ ॥

योगचर्यामिमां योगी विचरन्मद्व्यपाश्रय. ॥ नांतरायैर्विहन्येत नि.स्पृह स्वसुखानुभू. ॥ ४४ ॥

इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे ऽष्टाविंशो ऽध्यायः ॥ २८ ॥ उद्धव उवाच ।

सुदुस्तरामिमां मन्ये योगचर्यामनात्मनः ॥ यथाऽञ्जसा पुमान् सिध्येत्तन्मे ब्रूह्यञ्जसाऽच्युत ॥ १ ॥

प्रायश. पुंडरीकाक्ष युंजंतो योगिनो मनः ॥ विषीदंत्यसमाधानान्मनोनिग्रहकर्शिता. ॥ २ ॥

उद्धवः उवाच- अच्युत, अनात्मन (चित्त जिंकिलें नाहीं ज्यानें त्याला) इमां योगचर्यां सुदुस्तरां मन्ये पुमान् अंजसा (अनायासें) यथा सिध्येत्, तत् मे अंजसा (सुबोधपणें) ब्रूहि ॥ १ ॥ पुंडरीकाक्ष, मन. युजत. योगिन मनोनिग्रहकर्शिता [सत.] प्राय असमाधानात् विषीदति ॥ २ ॥

मूळच खणून निघते). ॥ ४४ ॥ इति अष्टविंशो ऽध्यायः ॥ २८ ॥ उद्धव म्हणाला — हे अच्युता, हे योगाचरण. ज्यानें चित्त जिंकलें नाहीं त्या पुरुषाच्या हातून घडणें मला अत्यंत दुर्घट वाटतें म्हणून, पुरुषाला प्रयासावाचून सिद्धि जशी प्राप्त होईल, तो प्रकार सुबोध रीतीनें मला निवेदन कर ॥ १ ॥ - योगसाधन किती कठिण आहे पहा - हे कमलनयना, बहुधा जे जे म्हणून योगी मनाचा निग्रह करूं जातात त्यांना त्यांना क्लेश प्राप्त होतात. कारण, मनाचा निग्रहच होत नाहीं - बरें, यदाकदाचित् निग्रह झाला

१ आकाश करवेल चौघडी । महामेरु बांधवेल पुडी । शून्याची मुरडवेल नरडी । परि या मनाच्या ओढी अनिवार ॥ ५४ ॥ नाथ

तसी तें अतिशय थकून जातात. ॥ १ ॥ योगसाधनांत असे कष्ट आहेत ह्मणूनच, हे कमलनयना, जे पुरुष सारासारविचार करण्यात चतुर असतात, ते तुझ्या चरणकमलाचीच सुखाने सेवा करीत राहतात, यांत संशय नाहीं तें समस्त आनंद प्राप्त करून देणारें आहे हे विश्वेश्वरा, जे कोणी पुरुष योगाभ्यासाने किंवा कर्मांमुळे अभिमानयुक्त होत्साते तुझ्या चरणकमलाची सेवा करीत नाहींत, त्याना तुझ्या मायेने मोहात पाडिलें,-असें मी समजतो -॥२॥ हे अच्युता, तू सकल प्राण्याचा हितकर्ता आहेस अनन्यभावें शरण आलेल्या दासाच्या तू पूर्णपणे अंकित असतोस, ह्यात आश्चर्य तें काय? कारण, ब्रह्मदेवासारख्या मोठमोठ्या देवानी आपली देदीप्यमान मुकुटाग्रे ज्याच्या चरणासनावर लोळविली (देवानी ज्याच्या पुढे मस्तके नमविली) तो स्वतां तू (रामावतारीं) वानराबरोबर प्रीतीने सख्य करून वागत होतास ॥ ४ ॥ तू सकल जगाचा प्रवर्तक, अतिप्रिय व ईश्वर (अवश्य सेवा

अथातः अरविंदलोचन, विश्वेश्वर, हंसा. आनंददुघ पदांबुज सुख [यथा तथा] तु श्रयेरन् [ये] योगकर्मभि मानिन [सत] न [श्रयते], अमी त्वन्मायया विहता ॥२॥ अच्युत, अशेषबधो, तव अनन्यशरणेषु दासेषु यत् आत्मसात्त्व (अंकितपणा) एतत् चित्र किं, य. स्वय ईश्वराणां श्रीमत्किरीटतटपीडितपादपीठ (सुंदर मुकुटाग्रानीं घासले चरणासन ज्याचे

अथात आनददुघं पदाबुजं हंसाः श्रयेरन्नरविंदलोचन ॥ सुखं नु विश्वेश्वरयोगकर्मभिस्त्वन्मायया ऽमी विहता न मानिन
॥ २ ॥ किं चित्रमच्युत तवैतदशेषबधो दासेष्वनन्यशरणेषु यदात्मसात्त्वम् ॥ यो ऽरोचयत्सह मृगैः स्वयमीश्वराणा
श्रीमत्किरीटतटपीडितपादपीठः ॥ ४ ॥ तं त्वा ऽखिलात्मदयितेश्वरमाश्रितानां सर्वार्थदं स्वकृतविद्विसृजेत को नु ॥ को वा
भजेत्किमपि विस्मृतये ऽनु भूत्यै किंवा भवेन्न तव पादरजोजुषा नः ॥ ५ ॥

असा) [अपि सन्] मृगैः सह अरोचयत् (प्रीतीनें सख्य करिता झाला)? ॥४॥ त अखिलात्मदयितेश्वर (सर्वांचा आत्मा, प्रिय व ईश्वर अशा) आश्रितानां सर्वार्थदं त्वां क नु स्वकृतवित् (स्वता तूं केलेले उपकार जाणणारा) विसृजेत (सोडील), कः वा न भजेत् ? भूत्यै, (ऐश्वर्यासाठी) अनु विस्मृतये (तुझ्या विस्मरणार्थ किंवा संसाराच्या विस्मरणार्थ) [च] किं अपि [क करण्याजोगा) असून आपल्या आश्रय करणाराना सकल अर्थ प्राप्त करून देतोस त्या बळि, प्रह्लाद इत्यादिकावर जे अनुग्रह केले, ते ज्याला ठाऊक असतील, (किंवा ा-ण्याच्या अतर्यामी राहून स्वतां त्याच्यावर नित्य किती उपकार करीत असतोस ह्याची ज्याला ओळख असेल), तो कोणता बरें पुरुष तुला सोडण्यास प्रवृत्त होईल (भजणार नाहीं)? - ह्याचा अर्थ, कांही फलप्राप्तीचा उद्देश मनात धरून तुझी सेवा करावयाची, असा मुळींच नव्हे. - तू तुझ्याव्यतिरिक्त दुसरें काही स्वर्गादि फल दिले, तरी त्याचा स्वीकार करणार कोण? - कोणी नाही. - कारण, ते केवळ इंद्रियभोगाला मात्र उपयोगी होऊन नतर तुझी विस्मृति पडण्याला साधन व्हावयाचे (किंवा, तुजवाचून दुसरी एकादी

१ किंवा असा अर्थ करावा.— अमी [त्वद्भक्ता'] त्वन्मायया न विहताः [अत'] योगकर्मभि' मानिन' न [अन्येतु त्वन्मायया मोहिता' सत मानिन भवन्ति] हे तुझे भक्त तुझ्या मायेनें मोहून गेलेले नसतात, ह्मणून त्याना योगाभ्यासाने किंवा कर्माच्या योगें अभिमान उत्पन्न होत नाहीं, इतराना तुझ्या मायेने मोहविलें असतें ह्मणून ते 'आह्मी योगसाधनात प्रवीण,' 'आह्मी कर्मकुशल' असा केवळ गर्व वाहूत असतात, मुक्त होत नाहींत

देवता अथवा धर्मज्ञानादि साधन ह्याची सेवा ऐश्वर्यभोगासाठी व संसाराच्या विस्मृतीसाठी ह्मणजे मोक्षाकरिता करणार कोण[१] त्याच्या साधनाशिवाय भोग व मोक्षादि फल प्राप्त होणार नाहीं, असा काहीं प्रकार नाही, कारण, आह्मी तुझ्या चरणकमलासंबंधीं रज कणाचे सेवन करितों त्याअर्थी आह्माला प्राप्त होणार नाही, असें फळ जगात आहे कोणतें? कोणतेंच नाहीं ॥५॥ -दुसऱ्याला मजण्याची गोष्टच नको अगोदर, त्या प्राण्यावर जो उपकार करून ठेविला आहे, त्याची फेड त्याने तुला आत्मनिवेदन केलें तरच होईल, अन्यथा व्हावयाची नाही पहा - ईश्वरा, तू बाहेर गुरुरूपानें व अतरी अंतर्यामिरूपानें राहून प्राण्याच्या अमगल विषयवासना निर्दाळितोस आणि त्याना आपले रूप प्रकट दाखवितोस ह्या तुझ्या उपकाराची फेड या भजेत][१] तव पादरजोजुषां न कि वा न भवेत् ? ॥ ५ ॥ ईश, तव कृतं स्मरत ऋद्धमुद' (वृद्धिंगत परमानद ज्याचा असे) कवय ब्रह्मायुषा अपि अपचिति (फेट) न एव उपयंति (पावतात), य. आचार्यचैत्यवपुषा (गुरु व अतर्यामी या रूपानीं) तनुभृतां बहि., अत [च] अशुभ विधुन्वन् [सन्] स्वगति व्यनक्ति ॥ ६ ॥ श्रीशुक उवाच—

नैवोपयंत्यपचितिं कवयस्तवेश ब्रह्मायुषाऽपि कृतमृद्धमुदः स्मरंतः ॥ योऽतर्बहिस्तनुभृतामशुभं विधुन्वन्

आचार्यचैत्यवपुषा स्वगतिं व्यनक्ति ॥६॥ श्रीशुक उवाच । इत्युद्धवेनात्यनुरक्तचेतसा पृष्टो जगत्क्रीडनकः

स्वशक्तिभिः ॥ गृहीतमूर्तित्रय ईश्वरेश्वरो जगाद सप्रेम मनोहरस्मित. ॥ ७ ॥ श्रीभगवानुवाच । हंत ते

कथयिष्यामि मम धर्मान्सुमंगलान् ॥ यान्श्रद्धयाऽऽचरन्मर्त्यो मृत्युं जयति दुर्जयम् ॥ ८ ॥

इति अनुरक्तचेतसा उद्धवेन पृष्ट. स्वशक्तिभि. जगत्क्रीडनक गृहीतमूर्तित्रय. ईश्वरेश्वर' मनोहरस्मित. [सन्] सप्रेम जगाद ॥ ७ ॥ श्रीभगवान् उवाच— हंत ते सुमगलान् मम धर्मान् कथयिष्यामि; यान् श्रद्धया आचरन् मर्त्य. दुर्जय मृत्यु जयति. ॥ ८ ॥

ब्रह्मज्ञानी पुरुषानामुद्धा ब्रह्मदेवाच्या इतकें आयुष्य मिळालें तरी तितक्या काळात देखील करिता येत नाहींच ते केवळ तुझे उपकार नित्य स्मरतात व त्यामुळें त्याचा आनद वृद्धिंगत होत असतो ॥ ६ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाले —राजा, भगवान् श्रीकृष्ण हे ब्रह्मादि देवाचेही नियामक होत जग हें केवळ त्याचें क्रीडासाधन (खेळणें) आहे ते आपल्या सत्त्वादिगुणरूप शक्तींच्या योगें - ब्रह्मा, विष्णु, महेश अशा - तीन मूर्ति धारण करितात आपल्याविषयीं ज्याच्या अंतरीं पूर्ण भक्ति, त्या उद्धवानें असा प्रश्न केला असता भगवनाच्या मुखावर मनोहर स्मितकळा दिसू लागली व त्यानीं प्रेमयुक्त भाषण करण्यास प्रारंभ केला — ॥७॥ श्रीभगवान् ह्मणाले —उद्धवा ! - तुझा प्रश्न ऐकून मला फारच आनद होत आहे -

१ या वै साधनसंपत्तिः पुरुषार्थचतुष्टये । तया विना तदाप्नोति नरो नारायणाश्रयः ॥
चतुर्विध पुरुषार्थ मिळविण्याची जी साधनसामग्री ती संपादिल्यावाचून पुरुषाला—जर तो नारायणाचा आश्रय करीत आहे तर – तिचीं साध्य फळे (पुरुषार्थ) मिळतात

आता मी तुला अत्यंत मंगलकारक असे माझे धर्म सांगतों मनुष्यानें श्रद्धापूर्वक त्यांचें आचरण केलें असता तो दुर्जय अशा मृत्यूला जिंकितो (संसारातून पार पडतो) ॥ ८ ॥ मनुष्यानें नित्य माझें स्मरण असों द्यावें, आपलें मन (संकल्पविकल्पात्मक) व चित्त (अनुसंधान) मजकडे लावावें, आपल्या मनामध्ये माझ्या धर्माविषयी प्रीति धरावी, आणि अशा रीतीनें हळू हळू सर्व कर्में मत्प्रीत्यर्थ आचरीत जावें. ॥ ९ ॥ माझे भक्त साधु जेथे वास करितात, ते देश पुण्यकारक होत, त्यांचा आश्रय धरावा, देव, दैत्य व मनुष्य यामध्यें जे कोणी माझे भक्त होऊन गेले किंवा विद्यमान असतात, त्यांचीं चरित्रें वर्णावीं, किंवा त्यांच्याप्रमाणे वर्तन ठेवावे ॥ १० ॥ एकट्यानें किंवा अनेकानीं एकत्र मिळून मज-

[मां] स्मरन् मयि अर्पितमनश्चित्त: मद्धर्मात्ममनोरति: मदर्थं सर्वाणि कर्माणि शनकै: कुर्यात् ॥ ९ ॥ साधुभि: मद्भक्तै: श्रितान् पुण्यान् देशान्, देवासुरमनुष्येषु मद्भक्ताचरितानि च आश्रयेत. ॥ १० ॥ पृथक्, सत्रेण (समुदायानें मिळून) वा गीतनृत्याद्यै:, महाराजविभूतिभि: [च] मह्यं पर्वयात्रा महोत्सवान् कारयेत्. ॥ ११ ॥

कुर्यात्सर्वाणि कर्माणि मदर्थं शनकैः स्मरन् ॥ मय्यर्पितमनश्चित्तो मद्धर्मात्ममनोरतिः ॥ ९ ॥

देशान्पुण्यानाश्रयेत मद्भक्तैः साधुभिः श्रितान् ॥ देवासुरमनुष्येषु मद्भक्ताचरितानि च ॥१०॥

पृथक् सत्रेण वा मह्यं पर्वयात्रामहोत्सवान् ॥ कारयेद्गीतनृत्याद्यैर्महाराजविभूतिभिः ॥ ११ ॥

मामेव सर्वभूतेषु बहिरंतरपावृतम् ॥ ईक्षेतात्मनि चाऽऽत्मानं यथा खममलाशयः ॥ १२ ॥

इति सर्वाणि भूतानि मद्भावेन महाद्युते ॥ सभाजयन्मन्यमानो ज्ञानं केवलमाश्रितः ॥ १३ ॥

अमलाशय यथा खं, [तथा] बहि:, अंत: [च] अपावृत (आवरणरहित) सर्वभूतेषु, आत्मनि च [स्थित] आत्मानं ईक्षेत (पाहो) ॥ १२ ॥ महाद्युते, इति केवलं ज्ञानं आश्रित: सर्वभूतानि मद्भावेन मन्यमान: सभाजयन् (सत्कारणारा) ॥ १३ ॥

प्रीत्यर्थ पर्वदिवशीं यात्रा महोत्सव करीत जावें, त्या प्रसंगीं मला सार्वभौमराजासारखे ऐश्वर्यभोग आणि गायन, नृत्य इत्यादि उपचार निवेदन करावे. ॥ ११ ॥ - आता अंतरंग भक्तीचें लक्षण सांगतों - पुरुषानें आपलें चित्त निर्मल (रागद्वेषादिमलानीं रहित) करून घ्यावे आणि सर्व प्राण्यांच्या ठिकाणीं व स्वतःच्या अंतरींही मी ईश्वरच भरलेला आहे असें पहात जावें. - एकटा ईश्वर सर्वत्र कसा राहतो, अशी शंका धरण्याचें प्रयोजन नाही, कारण,- तो विश्वामध्यें सर्वत्र आंत बाहेर भरलेला आहे त्याला कोणतेही आवरण नाही तो आकाशाप्रमाणें असंग असतो. ॥ १२ ॥ उद्धवा, तूं अतिशय ज्ञानसंपन्न आहेस जो मनुष्य अशा रीतीनें केवळ ज्ञानरूप दृष्टीच्या आश्रयानें, सकल प्राणिमात्र मद्रूप

(ईश्वररूप) होत, असें मानितो आणि त्यांशी मैत्र करितो, ॥ १३ ॥ तसेंच, (१) ब्राह्मण (उत्तम जातीचे) व चांडाल (अतिनीच जातीचे), (२) चोर (ब्राह्मणाचें द्रव्य हरण करणारे) व ब्राह्मणांचे भक्त, (३) सूर्य (अति मोठा तेजाचा गोळा) व बारीकशी अग्नीची फुणगी, (४) आणि शांत स्वभावाचे पुरुष व क्रूर स्वभावाचे पुरुष—एकदुरीत जातीनें, कृतीनें, गुणांनीं व स्वभावानें परस्परांशीं अगदीं विरुद्ध अशाही पदार्थांच्या किंवा व्यक्तींच्या अंतरीं मी एकच भरलेला आहे असें जो पाहतो तोच पंडित होय, असें विद्वानांचें मत आहे. ॥ १४ ॥ जो सर्व मनुष्यांच्या ठिकाणीं नित्य माझी (ईश्वराची) भावना करीत जाईल, त्या मनुष्याचे स्पर्धा (बरोबरीच्या मनुष्याविषयीं हेवा), असूया (आपल्यापेक्षा मोठ्या योग्यतेच्या पुरुषांना उगाच दोष ठेवणें), तिरस्कार (हीन मनुष्याबद्दल अवहेलना), व स्वतांबद्दल अहंकार, हे सर्व दोष ब्राह्मणे, पुल्कसे (चांडाळाचे ठिकाणीं), स्तेने ब्रह्मण्ये, अर्के, स्फुलिंगके (ठिणगीवर) अक्रूरे, क्रूरके च एव समदृक् पंडित मतः ॥ १४ ॥ नरेषु अभीक्ष्णं (वारंवार) मद्भाव भावयतः पुंसः साहंकाराः स्पर्धासूयातिरस्काराः अचिरात् वियंति. ॥ १५ ॥ स्मयमानान् (उपहास करणाऱ्या) स्वान्, दैहिकीं दृशं, व्रीडां (लज्जा) च विसृज्य आश्व-

गेला होता. - ॥ १५ ॥ राजा, नंतर त्यानें यादवांच्या मरणाचा इत्थंभूत वृत्तांत निवेदन केला. तो कानीं पडताच लोकांच्या हृदयात एकदम धक्का बसला व ते शोकानें मूर्च्छित झाले. ॥ १६ ॥ - काहीं वेळानें शुद्धीवर आल्यावर - कृष्णविरहानें व्याकुळ असे ते सर्वजण आपली मुखें बडवून घेत घेत, ज्याठिकाणी ज्ञातिजन गतप्राण होऊन पडले होते त्या स्थानी, सत्वर प्राप्त झाले. - ॥ १७ ॥ तेथें मुलगे बलराम व कृष्ण कोठे दिसत ना, तेव्हा देवकी, रोहिणी तसाच वसुदेव हीं अत्यंत शोकाकुल होऊन पडली त्याना देहाची देखील शुद्धि राहिली नाहीं, ॥ १८ ॥ शेवटीं भगवंताचा विरह अगदी सोसवेनासा झाल्यामुळें त्यानीं तेथल्या तेथें प्राण सोडिले. राजा, स्त्रियानी पतीच्या देहाना आलिंगन देऊन चिते-

वर आरोहण केलें :- ॥ १९ ॥ बलरामाच्या पत्न्यांनीं त्याच्या देहास आलिंगन करून अग्नीमध्यें प्रवेश केला वसुदेवाच्या पत्न्यांनीं त्याच्या देहाला आलिंगून व श्रीकृष्णाच्या स्नुषांनीं आपले पति जे प्रद्युम्नादिक त्याना आलिंगन देऊन अग्नीमध्यें प्रवेश केला रुक्मिणीप्रभृति कृष्णपत्न्यानीही श्रीकृष्णरूपी चित्त लावून देह अग्निमुखीं अर्पिले. ॥ २० ॥ अर्जुनाला त्याचा अत्यंत प्रिय मित्र जो श्रीकृष्णपरमात्मा त्याच्या विरहामुळें पराकाष्ठेचा खेद झाला, पण त्याने श्रीकृष्णानीं उपदेशिलेल्या उत्तम गीतावचनाच्या योगें आपलें सांत्वन करून घेतलें ॥ २१ ॥ बंधूंची (यादवांची) संतति नष्ट झाली; म्हणून अर्जुनानें मृतांचें पिंडोदक देणें इत्यादि उत्तर कार्य अनुक्रमाने

पिता झाऊहत्. ॥ १९ ॥ रामपत्न्यः तद्देहं उपगुह्य (आलिंगून), वसुदेवपत्न्यः तद्गात्रं [उपगुह्य], हरेः स्नुषाः प्रद्युम्नादीन् [उपगुह्य] अग्निं आविशन् रुक्मिण्याद्याः कृष्णपत्न्यः तदात्मिकाः [सत्यः], अग्निं आविशन् ॥ २० ॥ अर्जुनः प्रेयसः सख्युः कृष्णस्य विरहातुरः [सन्] सदुक्तिभिः कृष्णगीतैः आत्मानं सान्त्वयामास ॥ २१ ॥ अर्जुनः हतानां नष्टगोत्राणां बंधूनां सांपरायिकं (उत्तर कार्य) अनुपूर्वशः यथावत् कारयामास. ॥ २२ ॥ महाराज, समुद्रः हरिणा त्यक्तां द्वारकां, श्रीमद् भगवदालयं च

रामपत्न्यश्च तद्देहमुपगुह्याग्निमाविशन् ॥ वसुदेवपत्न्यस्तद्गात्रं प्रद्युम्नादीन्हरेः स्नुषाः ॥ कृष्णपत्न्यो ऽविशन्नग्निं रुक्मिण्याद्यास्तदात्मिकाः ॥ २० ॥ अर्जुनः प्रेयसः सख्युः कृष्णस्य विरहातुरः ॥ आत्मानं सान्त्वयामास कृष्णगीतैः सदुक्तिभिः ॥२१॥ बंधूनां नष्टगोत्राणामर्जुनः सांपरायिकम् ॥ हतानां कारयामास यथावदनुपूर्वशः ॥ २२ ॥ द्वारकां हरिणा त्यक्तां समुद्रो ऽप्लावयत्क्षणात् ॥ वर्जयित्वा महाराज श्रीमद्भगवदालयम् ॥ २३ ॥ नित्यं संनिहितस्तत्र भगवान्मधुसूदनः ॥ स्मृत्या ऽशेषाशुभहरं सर्वमंगलमंगलम् ॥ २४ ॥ स्त्रीबालवृद्धानादाय हतशेषान् धनंजयः ॥ इंद्रप्रस्थं समावेश्य वज्रं तत्राभ्यषेचयत् ॥ २५ ॥

वर्जयित्वा क्षणात् प्लावयामास (बुडविता झाला). ॥२३॥ तत् स्मृत्या अशेषाशुभहरं सर्वमंगलमंगल [अस्ति] भगवान् मधुसूदनः तत्र नित्यं संनिहितः. ॥ २४ ॥ धनंजयः हतशेषान् स्त्रीबालवृद्धान् आदाय इंद्रप्रस्थं समावेश्य तत्र वज्रं अभ्यषेचयत्. ॥ २५ ॥

यथाविधि पूर्ण करविलें. ॥ २२ ॥ राजाधिराजा, श्रीहरीनीं द्वारकेचा त्याग केला तेव्हा एका क्षणात समुद्रानें ती नगरी बुडवून टाकिली, मात्र भगवताचें सुंदर मंदिर तेवढें वर्ज्य केलें (बुडविलें नाहीं). ॥ २३ ॥ तें मंदिर स्मरणमात्रानें सकल पापाचा नाश करणारें असून सकल मंगलाचेही मंगळरूप होय त्या ठिकाणीं भगवान् मधुसूदन नित्य संनिहित आहेत. ॥ २४ ॥ पुढें अर्जुनानें, - श्रीकृष्णाच्या आज्ञेप्रमाणे - स्त्रिया, मुलें व वृद्ध जन अशी जी मंडळी हतांतून अवशिष्ट राहिली होती, त्याना घेऊन नेऊन इंद्रप्रस्थीं राहविलें

आणि तेथे वज्राला राज्याभिषेक करविला. ॥ २५ ॥ राजा, तुझे पितामह जे पांडव त्यांना अर्जुनाच्या मुखें ज्ञातिजनवधाचा वृत्तांत समजला; तेव्हां ते सगळेजण तुला वंशाचा आधार करून (राज्यावर बसवून) आपण महापथास गेले. ॥ २६ ॥ श्रीविष्णु देवाचेही अधिपति होत. त्यांच्या ह्या चरित्रांचें व अवतारांचे जो कोणी पुरुष - आरंभापासून शेवटपर्यंत - श्रद्धेनें वर्णन करितो, त्याला सकल पापें सोडून जातात. ॥ २७ ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न व समारतारक अशा परमात्म्याने अवतार घेऊन केलेलीं हीं मनोहर चरित्रे तशाच बाललीला

राजन्, ते सर्वे पितामहाः अर्जुनात् सुहृद्वधं श्रुत्वा, त्वां वंशधरं कृत्वा महापथं जग्मुः. ॥ २६ ॥ यः मर्त्यः देवदेवस्य विष्णोः एतत् जन्म, कर्माणि च श्रद्धया कीर्तयेत्, स सर्वपापैः प्रमुच्यते. ॥ २७ ॥ इत्थं इह, अन्यत्र च श्रुतानि शंतमानि (परम मंगलदायक) भगवतः हरेः रुचिरावतारवीर्याणि बालचरितानि च गृणन् (कीर्तन करणारा) मनुष्य

श्रुत्वा सुहृद्वधं राजन्नर्जुनात्ते पितामहाः ॥ त्वां तु वंशधरं कृत्वा जग्मुः सर्वे महापथम्

॥ २६ ॥ य एतद्देवदेवस्य विष्णोः कर्माणि जन्म च ॥ कीर्तयेच्छ्रद्धया मर्त्यः सर्वपापैः

प्रमुच्यते ॥ २७ ॥ इत्थं हरेर्भगवतो रुचिरावतारवीर्याणि बालचरितानि च शंतमानि ॥

अन्यत्र चेह च श्रुतानि गृणन्मनुष्यो भक्तिं परां परमहंसगतौ लभेत ॥ २८ ॥

इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे एकत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३१ ॥

परमहंसगतौ परां भक्तिं लभेत ॥ २८ ॥ इति श्रीभागवतान्वये एकादशस्कंधे एकत्रिंशोऽध्यायः ॥ ३१ ॥

परममंगलकारक होत. जो कोणी मनुष्य ह्या ग्रंथांत आणि इतरत्रही प्रसिद्ध अशीं हीं आख्यानें वर्णन करितो, त्याची, परमहंस पुरुष ज्याच्या स्वरूपीं प्राप्त होतात, त्या परमेश्वरावर उत्तम भक्ति जडते. ॥ २८ ॥

समाप्तो ऽयमेकादशः स्कंधः ॥ ११ ॥

॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने एकादशस्कंधः समाप्तः ॥

॥ अथ श्रीमद्भागवतार्थदर्शने द्वादशस्कन्धः प्रारभ्यते ॥

द्वादशस्कन्ध













श्रीमद्भागवतार्थदर्शन.

अनुक्रमणिका.

द्वादशस्कंध (आश्रय).

श्रीगणेशायनम ॥ श्रीशुकसद्गुरुपरमेश्वरायनमः॥श्रीरामायनमः॥श्रीबालकृष्णगुरुभ्यो नमः ॥राजानें प्रश्न केला:— मुनिवरा, यदुवंशाला सुभूषित करणारे कृष्णपरमात्मा निजधामीं गेले असतां पृथ्वीवर कोणाचा वंश चालू झाला, ते मला सांगावें. ॥ १ ॥ शुकाचार्य ह्मणाले:— राजा, बृहद्रथाच्या वंशामध्यें शेवटीं पुरंजय नावाचा जो राजा होईल (ह्मणून मागें वंशस्कंधान सांगितले), त्याचा अमात्य शुनक धन्याला मारून आपल्या प्रद्योतनावाच्या मुलाला राज्यावर स्थापील. त्याचा मुलगा पालक. त्याचा पुत्र विशाखयूप.

राजा उवाच—मुने, यदुवंशविभूषणे कृष्णे स्वधाम (आपल्या लोकीं, वैकुंठास) अनुगते [सति], पृथ्व्या कस्य वंशः अभवत्? एतत् मे आचक्ष्व (सांग) ॥ १ ॥ श्रीशुक उवाच—यः अन्त्यः " पुरंजयः " नाम भविष्यः बारहद्रथः, तस्य शुनकः अमात्यः स्वामिन हत्वा प्रद्योतसंज्ञं आत्मजं राजानं कर्ता (करील), यत् सुतः पालकः. तत्पुत्रः वि-

नमो भगवते वासुदेवाय राजोवाच । स्वधामानुगते कृष्णे यदुवंशविभूषणे॥ कस्य वंशोऽभवत्पृथ्व्यामेतदाचक्ष्व मे मुने ॥१॥ श्रीशुक उवाच । योऽन्त्यः पुरंजयो नाम भविष्यो बारहद्रथः ॥ तस्यामात्यस्तु शुनको हत्वा स्वा-मिनमात्मजम् ॥२ ॥ प्रद्योतसंज्ञं राजानं कर्ता यत्पालकः सुतः ॥ विशाखयूपस्तत्पुत्रो भविता राजकस्ततः ॥३॥ नंदिवर्धनस्तत्पुत्रः पंच प्रद्योतना इमे ॥ अष्टत्रिंशोत्तरशतं भोक्ष्यन्ति पृथिवीं नृपाः ॥४॥ शिशुनागस्ततो भाव्यः काकवर्णस्तु तत्सुतः ॥ क्षेमधर्मा तस्य सुतः क्षेत्रज्ञः क्षेमधर्मजः ॥५॥ विधिसारः सुतस्तस्याजातशत्रुर्भविष्यति ॥

दर्भकस्तत्सुतो भावी दर्भकस्याजयः स्मृतः ॥ ६ ॥

शाखयूपः. ततः राजकः भविता. ॥२॥३॥ तत्पुत्रः नंदिवर्धनः. पञ्च इमे प्रद्योतनाः नृपाः अष्टत्रिंशोत्तरशत (१३८) पृथिवीं भोक्ष्यन्ति. ॥ ४ ॥ ततः शिशुनागः भाव्यः. तत्सुतः काकवर्णः. तस्य सुतः क्षेमधर्मा. क्षेमधर्मजः क्षेत्रज्ञः. ॥ ५ ॥ तस्य विधिसारः सुतः अजातशत्रुः भविष्यति. तत्सुतः दर्भकः भावी. दर्भकस्य अजयः [सुतः] स्मृतः ॥६॥

त्यापासून राजक होईल. ॥२॥३॥ त्याचा मुलगा नंदिवर्धन. हे प्रद्योतन नावाचे (एक प्रद्योत व चौघे त्याचे वंशज) पांच राजे एकशें अडतीस वर्षें पृथ्वीचा उपभोग घेतील. ॥ ४ ॥ त्यापासून पुढें शिशुनाग होईल. त्याला काकवर्ण हा मुलगा. त्याचा पुत्र क्षेमधर्मा. क्षेमधर्म्यापासून क्षेत्रज्ञ जन्मेल. ॥५॥ त्याचा मुलगा विधिसार; त्याला कोणी शत्रु उद्भवणार नाहींत. त्याला दर्भक नांवाचा मुलगा होईल. दर्भकाचा मुलगा अजय झाला आहे. ॥ ६ ॥

---

१ हा पूर्वग्रथातील उपरिचर वसूचा मुलगा, जरासंधाचा दोविसाव्या अध्यायांत या वंशातील पुढे होणारे वीस राजे सांगितले आहेत, त्यातील शेवटला रिपुंजय तोच हा पुरंजय

अजेयाचा नंदिवर्धन. त्याचा मुलगा महानंदि. हे शिशुनाग नावांचे दहा राजे तीनशें साठ वर्षें ॥ ७ ॥ कलियुगामध्यें पृथ्वीचा उपभोग घेतील (पृथ्वीचें राज्य करितील). हे कुरुश्रेष्ठा राजा, महानंदीला शूद्रस्त्रीच्या पोटीं बलाढ्य ॥ ८ ॥ व क्षत्रियाचा नाश करणारा असा नंद नांवाचा मुलगा होईल. हा महापद्म सैन्याचा अथवा द्रव्याचा पति होईल म्हणून त्याला महापद्मपति हें नांव पडेल. ह्या राजापुढील राजे अधार्मिक व शूद्रप्राय होतील.॥९॥ या महापद्माची (नंदाची) आज्ञा कोणाला मोडवणार नाही. हा प्रतिभार्गव बनून पृथ्वीचें

आजेयः नंदिवर्धनः. ततः महानंदिः सुतः. कुरुश्रेष्ठ, दश एते नृपाः कलौ षष्ट्युत्तर शतत्रयं (३६०) समाः पृथिवीं भोक्ष्यंति. राजन् महानंदिसुत. शूद्रीगर्भोद्भव. बली ॥ ७ ॥ ८ ॥ महापद्मपतिः कश्चित् नन्दः क्षत्रविनाशकृत् [भवेत्]. ततः शूद्रप्रायाः अधार्मिकाः नृपाः भविष्यंति ॥ ९ ॥ सः महापद्मः द्वितीयः भार्गवः इव अनुल्लं-

नंदिवर्धन आजेयो महानंदिः सुतस्ततः ॥ शिशुनागा दशैवैते षष्ट्युत्तरशतत्रयम् ॥ ७ ॥ समा भोक्ष्यन्ति पृथिवीं कुरुश्रेष्ठ कलौ नृपाः ॥ महानंदिसुतो राजन् शूद्रीगर्भोद्भवो बली ॥ ८ ॥ महापद्मपतिः कश्चिन्नंदः क्षत्रविनाश-कृत् ॥ ततो नृपा भविष्यंति शूद्रप्रायास्त्वधार्मिकाः ॥९॥ स एकच्छत्रां पृथिवीमनुल्लंघितशासनः ॥ शासिष्यति महापद्मो द्वितीय इव भार्गवः ॥ १० ॥ तस्य चाष्टौ भविष्यंति सुमाल्यप्रमुखाः सुताः ॥ य इमां भोक्ष्यंति महीं राजानः स्म शतं समाः ॥११॥ नव नंदान् द्विजः कश्चित्प्रपन्नानुद्धरिष्यति ॥ तेषामभावे जगतीं मौर्या भोक्ष्यंति वै कलौ ॥ १२ ॥ स एव चन्द्रगुप्तं वै द्विजो राज्ये ऽभिषेक्ष्यति ॥ तत्सुतो वारिसारस्तु ततश्चाशोकवर्धनः[1] ॥ १३ ॥

घितशासनः [सन्] एकच्छत्रां पृथिवीं शासिष्यति. ॥ १० ॥ तस्य सुमाल्यप्रमुखाः अष्टौ सुताः भविष्यंति ये राजानः इमां महीं शतं समाः (वर्षे) भोक्ष्यंति. ॥ ११ ॥ कश्चित् द्विजः प्रपन्नान् (प्रसिद्ध किंवा विश्वासलेल्या) नव नन्दान् उद्धरिष्यति (मारील). कलौ तेषां अभावे [सति] मौर्याः जगतीं (पृथ्वीला) भोक्ष्यंति. ॥ १२ ॥ स. एव द्विजः चंद्रगुप्त

एकछत्री राज्य भोगील. ॥ १० ॥ याला (नंदाला) सुमाल्य इत्यादि आठ मुलगे होतील, व ते शंभर वर्षें पृथ्वीचें राज्य करितील. ॥ ११ ॥ या प्रसिद्ध नऊ नंदाचा (नंद व त्याचे आठ मुलगे याचा) कोणी - चाणक्य नांवाचा — ह्यालाच 'कौटिल्य' 'वात्स्यायन' इत्यादि दुसरीही नावें आहेत— - ब्राह्मण समूळ नाश करील ते नाहीसे झाले म्हणजे या कलियुगांत मौर्य नावाचे राजे पृथ्वीचें राज्य भोगितील. ॥ १२ ॥ नोच (मागील श्लोकांत सांगितलेला) ब्राह्मण (चाणक्य) चंद्रगुप्ताला राज्यासनावर बसवील,

[1] ही एक संख्या आहे १,००,०,००,००,००,०००.

चंद्रगुप्ताला वारिसार मुलगा होईल. वारिसारापासून अशोकवर्धन. ॥ १३ ॥ त्याचा सुयशा. त्याचा संगत. त्याचा शालिशूक. त्याला सोमशर्मा होईल ॥ १४ ॥
त्यापासून शतधन्वा. त्याला बृहद्रथ होईल हे दहा मौर्य राजे एकशेंसदतीस वर्षे ॥ १५ ॥ कलियुगामध्यें, हे कुरुश्रेष्ठा, पृथ्वीचें राज्य करितील. बृहद्रथानंतर अग्निमित्र राजा होईल
अग्निमित्राचा मुलगा सुज्येष्ठ होईल. ॥ १६ ॥ त्याचा वसुमित्र, त्याचा भद्रक. त्यापासून पुलिंद होईल. त्यापासून घोष त्याला वज्रमित्र नावाचा पुत्र होईल ॥ १७ ॥ त्यापासून
राज्ये मभिषेक्ष्यति. तत्पुत्रः वारिसारः. तत. अशोकवर्धनः. ॥ १३ ॥ तस्य सुयशा. [सुत] भविता. सुयश सुत. संगत तत. शालिशूक तस्य सोमशर्मा भविष्यति ॥१४॥
ततः शतधन्वा. तत् तस्य बृहद्रथ. भविता. कुरुकुलोद्वह, एते मौर्या. दश नृपाः कलौ सप्तत्रिंशच्छतोत्तर समाः पृथिवीं भोक्ष्यति ततः अग्निमित्र. तस्मात् सुज्येष्ठ.

सुयशा भविता तस्य संगतः सुयशःसुतः ॥ शालिशूकस्ततस्तस्य सोमशर्मा भविष्यति ॥ १४ ॥
शतधन्वा ततस्तस्य भविता तद्बृहद्रथः ॥ मौर्या ह्येते दश नृपाः सप्तत्रिंशच्छतोत्तरम् ॥ १५ ॥
समा भोक्ष्यन्ति पृथिवीं कलौ कुरुकुलोद्वह ॥ अग्निमित्रस्ततस्तस्मात्सुज्येष्ठोऽथ भविष्यति ॥ १६ ॥
वसुमित्रो भद्रकश्च पुलिंदो भविता ततः ॥ ततो घोषः सुतस्तस्माद्वज्रमित्रो भविष्यति ॥ १७ ॥
ततो भागवतस्तस्माद्देवभूतिरिति श्रुतः ॥ शुंगा दशैते भोक्ष्यन्ति भूमिं वर्षशताधिकम् ॥ १८ ॥
ततः कण्वानियं भूमिर्यास्यत्यल्पगुणान्नृप ॥ शुंगं हत्वा देवभूतिं कण्वोऽमात्यस्तु कामिनम् ॥ १९ ॥
स्वयं करिष्यते राज्यं वसुदेवो महामतिः ॥ तस्य पुत्रस्तु भूमित्रस्तस्य नारायणः सुतः ॥ २० ॥

भविष्यति. ॥ १५ ॥ १६ ॥ अथ वसुमित्रः. [तत.] भद्रकः [तत.] पुलिंद. सुत भविता. (मू.) ॥ १७ ॥ (मू) एते दश शुंगाः वर्षशताधिकं भूमिं भोक्ष्यन्ति ॥ १८ ॥
नृप, ततः इयं भूमिः अल्पगुणान् काण्वान् यास्यति. वसुदेवः [नाम] महामति अमात्य. कण्वः कामिन देवभूतिं शुगं हत्वा स्वय राज्य करिष्यति तस्य पुत्र. भूमित्र.
भागवत. त्यापासून देवभूति नावाचा मुलगा होईल. हे दहा शुंग नावाचे राजे शंभरवर्षापेक्षा अधिक (एकशेबारा) वर्षे राज्य करितील ॥ १८ ॥ राजा! त्यानंतर अल्पगुणी
अशा कण्ववंशाकडे पृथ्वीचें राज्य जाईल. (पर) स्त्रीरत अशा देवभूति नावाच्या शुंगाला मारून त्याचा कण्ववंशातील अमात्य वसुदेव हा स्वतः राज्य करील ह्याची बुद्धि

* बृहद्रथाचा सेनापति पुष्यमित्र आपल्या स्वामीला (बृहद्रथाला) मारून स्वतः राज्य चालवील. हा पहिला शुंग व त्यापुढील अग्निमित्रादि नऊ शुंग मिळून एकंदर दहा पुरुष शुंग होत.

विशाल असेल. वसुदेवाला भूमित्र नामक मुलगा होईल. त्याचा मुलगा नारायण. ॥ १९ ॥ २० ॥ हे काण्वायन राजे तीनशें पंचेचाळिस वर्षे कलियुगामध्यें राज्य करितील ॥२१॥ (चवथा) काण्ववंशज सुशर्मा याला त्याचा आंध्रजातीचा बली नामक अति दुष्ट शूद्र चाकर ठार मारील व आपण काही कालपर्यंत पृथ्वीपति होईल. ॥ २२ ॥ त्या बलीचा भाऊ कृष्ण हा नंतर पृथ्वीचा राजा होईल. त्याचा मुलगा श्रीशांतकर्ण होईल. याचा मुलगा पौर्णमास. ॥ २३ ॥ त्याचा मुलगा लंबोदर. त्यापासून चिबिलक नावाचा राजा होईल.

तस्य नारायणः सुतः ॥ १९ ॥ २० ॥ इमे काण्वायनाः कलौ युगे वर्षाणां त्रीणि शतानि, चत्वारिंशत्, पंच च भूमिं भोक्ष्यंति. ॥ २१ ॥ तद्भृत्य. बली, आंध्रजातीय. असत्तम. वृषलः सुशर्माणं काण्वं हत्वा कंचित् काल गां (पृथ्वीम्) भोक्ष्यति. ॥ २२ ॥ अथ कृष्णनामा तद्भ्राता पृथिवीपतिः भविता. तत्पुत्र. श्रीशांतकर्णः. तत्सुत. पौर्णमासः.॥२३॥ लंबोदरः तत्पुत्र., तत्सुतः चिबिलकः नृप.. चिबिकलात् मेघस्वातिः. तस्य [सुत.] अटमान.. ॥२४॥ [तत.] अनिष्टकर्मा [तत.] हालेय. तस्य आत्मजः तलकः

काण्वायना इमे भूमिं चत्वारिंशच्च पंच च ॥ शतानि त्रीणि भोक्ष्यन्ति वर्षाणां च कलौ युगे ॥२१॥
हत्वा काण्वं सुशर्माणं तद्भृत्यो वृषलो बली ॥ गां भोक्ष्यत्यंध्रजातीयः कंचित्कालमसत्तमः ॥ २२ ॥
कृष्णनामा ऽथ तद्भ्राता भविता पृथिवीपतिः ॥ श्रीशांतकर्णस्तत्पुत्रः पौर्णमासस्तु तत्सुतः ॥ २३ ॥
लंबोदरस्तु तत्पुत्रस्तस्माच्चिबिलको नृपः ॥ मेघस्वातिश्चिबिलकादटमानस्तु तस्य च ॥ २४ ॥
अनिष्टकर्मा हालेयस्तलकस्तस्य चाऽऽत्मजः ॥ पुरीषभीरुस्तत्पुत्रस्ततो राजा सुनंदनः ॥ २५ ॥
चकोरो बहवो यत्र शिवस्वातिररिंदमः ॥ तस्यापि गोमती पुत्रः पुरीमान्भविता ततः ॥ २६ ॥
मेदशिराः शिवस्कंदो यज्ञश्रीस्तत्सुतस्ततः ॥ विजयस्तत्सुतो भाव्यश्चंद्रविज्ञः सलोमधिः ॥ २७ ॥

तत्पुत्रः पुरीषभीरुः ततः सुनंदनः राजा. ॥ २५ ॥ [ततः] चकोरः, अरिंदम, यत्र शिवस्वातिः [चरन.] तस्य पुत्र. गोमती तत. पुरीमान् भविता. ॥ २६ ॥ मेदशिरा [ततः] शिवस्कंदः तत्सुतः यज्ञश्रीः ततः विजयः तत्सुतः चंद्रविज्ञः [ततः] सलोमधिः भविता ॥ २७ ॥

चिबिलकापासून मेघस्वाति. त्यापासून अटमान. ॥२४॥ त्यापासून अनिष्टकर्मा. पुढें हालेय. त्याचा मुलगा तलक. त्याचा पुत्र पुरीषभीरु. त्यापासून सुनंदन नामक राजा होईल. ॥२५॥ त्याचा चकोर त्यापासून ' बहु ' नावाचे आठ राजे होतील; त्यात - शेवटला - शत्रूंचा मर्म हरण करणारा शिवस्वाति नामक राजा होईल. त्या शिवस्वातीचा मुलगा गोमती त्यापासून पुरीमान् होईल. ॥ २६ ॥ त्याचा मुलगा मेदशिरा. त्याचा शिवस्कंद. त्याचा मुलगा यज्ञश्री. त्याला विजय हा मुलगा होईल. त्याला चंद्रविज्ञ. त्याला सलोमधि. ॥२७॥

कुरुपुत्रा, हे तीस राजे चारशें छप्पन्न वर्षें, पृथ्वीचा उपभोग घेतील. ॥ २८ ॥ नंतर अवभृति नगरीचे सात आभीर राजे होतील. नंतर दहा गर्दभी राजे. नंतर अत्यंत लोभी असे सोळा कंक राजे होतील. ॥ २९ ॥ त्यानंतर आठ यावन राजे होतील. नंतर चवदा तुरुष्कक नामक राजे होतील. नंतर दहा गुरुड नावाचे राजे. नंतर मौन नावाचे अकरा राजे होतील. ॥ ३० ॥ हे (अकरा मौन खेरीज करून) पासष्ट राजे एकहजार नव्याण्णव वर्षें पृथ्वीचें राज्य करितील. राहिलेले अकरा मौन राजे पृथ्वीचा ॥ ३१ ॥ तीनशे वर्षें उपभोग घेतील. हे राजे मरण पावल्यानंतर किलकिला नगरींत राजे राज्य करितील त्यांचीं नावें :— पहिला भूतनंद. नंतर वंगिरि. नंतर त्याचा भाऊ शिशुनंदि. नंतर यशोनंदि, नंतर प्रवीरक. हे राजे एकशेंसहा वर्षें राज्य करितील. ॥ ३२ ॥३३॥ त्यांना बाह्लिक नामक तेरा मुलगे होतील. तसाच दुसरा पुष्पमित्र नामक राजा होईल, त्याचा मुलगा दुर्मित्र ॥३४॥

सप्त आवभृत्याः अभीराः दश गर्दभिनः नृपाः, षोडश कंकाः भूपालाः च लोलुपाः (लोभी) भविष्यंति. ॥ २९ ॥ ततः अष्टौ यवनाः, चतुर्दश तुरुष्कका: च भाव्याः. भूयः दश गुरुडाः, एकादश एव मौनाः च [भाव्याः], एते कुरुनंदन, एते त्रिंशत् (३०) नृपतयः चत्वारि अब्दशतानि, षट्पंचाशत् च पृथिवीं भोक्ष्यति. ॥ २८ ॥ अंग एकादश मौनाः ॥ ३० ॥ त्रीणि अब्दशतानि क्षितिं भोक्ष्यति ततः तैः संस्थिते (नष्ट) [सति], किलकिलाया दशवर्षशतानि, नवाधिका नवतिं च पृथिवीं भोक्ष्यति.

एते त्रिंशन्नृपतयश्चत्वार्यब्दशतानि च ॥ षट्पंचाशच्च पृथिवीं भोक्ष्यन्ति कुरुनंदन ॥ २८ ॥
सप्ताभीरा आवभृत्या दश गर्दभिनो नृपाः ॥ कङ्काः षोडश भूपाला भविष्यंत्यतिलोलुपाः ॥ २९ ॥
ततोऽष्टौ यवना भाव्याश्चतुर्दश तुरुष्ककाः ॥ भूयो दश गुरुंडाश्च मौना एकादशैव तु ॥ ३० ॥
एते भोक्ष्यन्ति पृथिवीं दशवर्षशतानि च ॥ नवाधिकां च नवतिं मौना एकादश क्षितिम् ॥ ३१ ॥
भोक्ष्यंत्यब्दशतान्यंग त्रीणि तैः संस्थिते ततः ॥ किलिकिलायां नृपतयो भूतनंदोऽथ वंगिरिः ॥३२॥
शिशुनंदिश्च तद्भ्राता यशोनंदिः प्रवीरकः ॥ इत्येते वै वर्षशतं भविष्यंत्यधिकानि षट् ॥ ३३ ॥
तेषां त्रयोदश सुता भवितारश्च बाह्लिकाः ॥ पुष्पमित्रोऽथ राजन्यो दुर्मित्रोऽस्य तथैव च ॥ ३४ ॥

भूतनंदः, अथ वंगिरिः, शिशुनंदिः, तद्भ्राता यशोनंदिः, प्रवीरकः [च] इति एते नृपतयः वर्षशत, अधिकानि षट् [च] भविष्यंति. ॥ ३१ ॥ ३२ ॥ ३३ ॥ तेषां बाह्लिकाः त्रयोदश सुताः भवितारः. अथ पुष्पमित्रः राजन्यः [भविता]. अस्य दुर्मित्रः पुत्रः, तथा एव ॥ ३४ ॥

ह्या बाल्हिकापासून सात आंध्र, सात कौशल, विदूरपति व निषध असे एकाच कालीं (वेगवेगळ्या देशांत) राजे होतील. ॥ ३५ ॥ नंतर मागध देशाचा राजा विश्वस्फूर्जि नामक होईल त्याला दुसरा पुरंजय म्हणतील. हा ब्राह्मणादि चारही जातीना पुलिंद, यदु, मद्रक नावाचे म्लेच्छ करील. ॥३६॥ हा दुष्टबुद्धि राजा वर्णरहित अशा प्रजाचें रक्षण करील. हा पराक्रमी राजा क्षत्रियाचा नाश करून पद्मवती पुरींत राहून गंगाद्वारापासून तों प्रयागपर्यंतच्या राज्याचें पालन करील. ॥३७॥ सौराष्ट्र, अवंति, आभीर, शूर, अर्बुद व मालव ह्या

एककाला. इमे भूपाः सप्त आंध्राः, सप्त कौशलाः, ततः एव वैदूरपतयः नैषधाः [च] भाव्याः. ॥ ३५ ॥ मागधानां [राजा] विश्वस्फूर्जिः भविता [सः] अपरः पुरंजयः [सन्] वर्णान् पुलिंदयदुमद्रकान् करिष्यति. ॥ ३६ ॥ दुर्मतिः वीर्यवान् सः अब्रह्मभूयिष्ठाः प्रजाः स्थापयिष्यति, क्षत्रं उत्साद्य पद्मवत्यां पुरि अनुगंगां आप्रयागं गुप्तां (रक्षिलेल्या) मेदिनीं भोक्ष्यति. ॥ ३७ ॥ सौराष्ट्रावंत्याभीराः, अर्बुदमालवाः द्विजाः, शूद्राः च व्रात्याः (संस्काररहित) भविष्यंति. जनाधिपाः शूद्रप्रायाः

एक काला इमे भूपाः सप्तांध्राः सप्त कौशलाः ॥ विदूरपतयो भाव्या निषधास्तत एव हि ॥ ३५ ॥
मागधानां तु भविता विश्वस्फूर्जिः पुरंजयः ॥ करिष्यत्यपरो वर्णान्पुलिंदयदुमद्रकान् ॥ ३६ ॥
प्रजाश्चाब्रह्मभूयिष्ठाः स्थापयिष्यति दुर्मतिः ॥ वीर्यवान् क्षत्रमुत्साद्य पद्मवत्यां स वै पुरि ॥ अनुगं-
गामाप्रयागं गुप्तां भोक्ष्यति मेदिनीम् ॥ ३७ ॥ सौराष्ट्रावंत्याभीराश्च शूरा अर्बुदमालवाः ॥ व्रात्या द्विजा
भविष्यंति शूद्रप्राया जनाधिपाः ॥ ३८ ॥ सिंधोस्तटं चंद्रभागां कौंतीं काश्मीरमण्डलम् ॥ भोक्ष्यंति
शूद्रा व्रात्याद्या म्लेच्छाश्चाब्रह्मवर्चसः ॥ ३९ ॥ तुल्यकाला इमे राजन्म्लेच्छप्रायाश्च भूभृतः ॥
एते ऽधर्मानृतपराः फल्गुदास्तीव्रमन्यवः ॥ ४० ॥

[भविष्यंति]. ॥ ३८ ॥ अब्रह्मवर्चसः व्रात्याद्याः शूद्राः, म्लेच्छाः च सिंधोः तटं, चंद्रभागां, कौन्ती, काश्मीरमण्डलं [च] भोक्ष्यंति. ॥ ३९ ॥ राजन्, इमे म्लेच्छ-प्रायाः भूभृतः तुल्यकालाः [भविष्यंति]. एते अधर्मानृतपराः, फल्गुदाः (अल्प दान करणारे) तीव्रमन्यवः, ॥ ४० ॥

देशांतील द्विज उपनयनादि संस्काररहित व बहुतेक शूद्र असे होतील. ॥३८॥ तसेच सिंधुनदीच्या तीरचे प्रदेश, चंद्रभागा, कौंतींदेश व काश्मीर आणि त्याच्या आजूबाजूचे प्रांत ह्यांचे राज्य शूद्र व संस्काररहित ब्रह्मतेजोहीन आणि म्लेच्छ बनलेले असे द्विज चालवितील. ॥ ३९ ॥ हे राजा, म्लेच्छप्राय असे हे राजे एका कालींच होतील. हे धर्म मोडणारे, खोटें बोलणारे, अल्प दान करणारे व शीघ्रकोपी असे होतील. ॥ ४० ॥

तसेंच हे स्वतः स्त्री, बालक, गाई, ब्राह्मण ह्यांची हत्या करणारे, दुसऱ्याच्या स्त्रीवर व धनावर दृष्टि ठेवणारे, सुखदुःखानीं व्याप्त, अल्पशूर, अल्पकाल जगणारे, ॥४१॥ संस्कार-रहित, क्रियाहीन, रज व तम या गुणानीं व्यापलेले होतील आणि प्रजेला पिळून काढतील. हे राजे नांवाने मात्र क्षत्रिय पण आचरणानें म्लेंच्छ असे होतील. ॥ ४२ ॥ त्यांच्या हाताखालील देश (लोक) त्यांच्या सारख्याच स्वभावाचे, आचरणाचे व कलहप्रिय असे होतील. शेवटीं ते एकमेकापासून व राजांपासून पीडा भोगून क्षय पावतील. ॥ ४३ ॥

॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने द्वादशस्कंधे प्रथमो ऽध्यायः ॥ १ ॥

शुकाचार्य म्हणाले :— राजा ! पुढे दिवसानुदिवस कलियुगांत काळगतीमुळें, धर्म, सत्य, शुद्धता, क्षमा, दया, आयुष्य, बल व स्मृति एक एक नष्ट होत जाईल. ॥ १ ॥ कलियुगात मनुष्यांना कुलीनत्व, सदाचार व सद्गुण ह्यांविषयी प्रसिद्धि मिळण्याला कारण

स्त्रीबालगोद्विजघ्नाः, परदारधनादृताः, उदितास्तमितप्रायाः (क्षणांत आहेत, क्षणात नाहीत असे, हर्षशोकांनीं व्याप्त) अल्पसत्वाल्पकायुषः ॥ ४१ ॥ असंस्कृताः, क्रियाहीनाः, रजसा, तमसा [च] आवृताः [च भविष्यंति] राजन्यरूपिणः ते म्लेच्छाः प्रजाः भक्षयिष्यंति. ॥ ४२ ॥ तन्नाथाः तच्छीलाचारवादिनः (त्यांच्या सारखे स्वभाव, आचरण व भाषण ज्यांचीं असे) ते जनपदाः (देश) राजभिः, अन्योन्यतः च पीडिताः [संतः] क्षयं यास्यंति. ॥ ४३ ॥

॥ इति श्रीमद्भागवतान्वये द्वादशस्कंधे प्रथमो ऽध्यायः ॥ १ ॥

स्त्रीबालगोद्विजघ्नाश्च परदारधनादृताः ॥ उदितास्तमितप्राया अल्पसत्त्वाल्पकायुषः ॥४१॥ असंस्कृताः क्रियाहीना रजसा तमसाऽऽवृताः ॥ प्रजास्ते भक्षयिष्यन्ति म्लेच्छा राजन्यरूपिणः ॥४२॥ तन्नाथास्ते जनपदास्तच्छीलाचारवादिनः ॥ अन्योन्यतो राजभिश्च क्षयं यास्यंति पीडिताः ॥४३॥ इति श्रीभागवते महापुराणे द्वादशस्कंधे प्रथमो ऽध्यायः ॥ १ ॥ श्रीशुक उवाच । ततश्चानुदिनं धर्मः सत्यं शौचं क्षमा दया ॥ कालेन बलिना राजन्नंक्ष्यत्यायुर्बलं स्मृतिः ॥१॥ वित्तमेव कलौ नृणां जन्माचारगुणोदयः ॥ धर्मन्याय-व्यवस्थायां कारणं बलमेव हि ॥२॥ दांपत्ये ऽभिरुचिर्हेतुर्मायैव व्यावहारिके ॥ स्त्रीत्वे पुंस्त्वे च हि रतिर्विप्रत्वे सूत्रमेव हि ॥३॥

श्रीशुकः उवाच— राजन्, ततः अनुदिनं बलिना कालेन धर्मः, सत्यं, शौचं, क्षमा, दया, आयुः, बलं, स्मृतिः च नंक्ष्यंति. ॥ १ ॥ कलौ वित्तं एव नृणां जन्माचारगुणोदय.. धर्मन्यायव्यवस्थायां कारणं बलं एव. ॥ २ ॥ दांपत्ये (विवाहाविषयीं) अभिरुचिः (आवड) हेतुः (कारण). व्यावहारिके (धद्यात) माया (कपट) एव [हेतुः]. स्त्रीत्वे, पुंस्त्वे च

द्रव्यच होय (ज्याजवळ द्रव्य असेल, तोच कुलीन, सदाचारी व सद्गुणी) । धर्माची व न्यायाची व्यवस्था चालविण्यास कारण बलच होईल (धर्म व न्याय सगळा मनगटाच्या जोरावर चालावयाचा व ' बळी तो कान पिळी. ' धर्मशास्त्राची अथवा सारासारविचाराची वगैरे कांहीं अपेक्षा नाहीं) । ॥ २ ॥ पतिपत्नीभावाला (विवाह होण्याला) कारण आवडच होऊन राहील (ज्याला जी आवडेल त्यानें ती बायको करावी, कुल, गोत्र पाहायाची कांहीं जरूरी राहणार नाहीं) ! व्यापार धंद्यात कपट हेंच मुख्य होऊन बसेल (सचोटी राहाणार नाही) । स्त्रियांचा व पुरुषाचा चांगलेपणा त्यांच्या रतिकौशल्यावरून ठरूं लागेल (कुलावरून किंवा आचरणावरून नाहीं) । ब्राह्मणपणाला आधार काय ?

ज्ञानवंच ठरेल - अज्ञानाची गोष्टच [illegible] ॥ एखाद्याचा आश्रम कोणता, तें ओळखण्याला साधन त्याचें दंड चर्म इत्यादि लिंगच होय (कांहीं विशिष्ट प्रकारच्या आच रणावरून आश्रम ओळखतां यावे हा [illegible] नाहीं)! एका आश्रमातून दुसऱ्या आश्रमात जाण्याचें साधन तरी तीं चिन्हें बदलणें हेंच होईल (गृहस्थाश्रमातून चतुर्थाश्रमात जाणें म्हणजे पाढरी वस्त्रें भगवीं करणें एवढाच अर्थ होईल. वैराग्य, सर्वसंगपरित्याग ह्यांची अपेक्षा राहणार नाही)! निर्मोहाची पंचाईत असली - व लाच देण्याचा सामर्थ्य नसेल की - न्यायांत पराजय व्हावयाचा! पंडितपणा मिळवायला साधन अचावचा बोलणें! ॥४॥ आढ्यता मिरवली नाहीं (किंवा गरिबी पदरी असली) की, त्याच्यावर चोरीचे वगैरे

रतिः विप्रत्वे सूत्रं एव [कारणं]. ॥ ३ ॥ आश्रमख्यातौ (आश्रम कळण्यास) लिंगं (दंडादि चिन्ह) एव [हेतुः], अन्योन्यापत्तिकारण (एकांतून दुसऱ्या आश्रमीं जाण्यास) [च] पाडित्ये चापलं वचः [च हेतुः] अवृत्त्या (द्रव्याभावामुळें) न्यायदौर्बल्यं (न्यायात पराजय). ॥ ४ ॥ असाधुत्वे (चोरीचा वगैरे आरोप येण्यास) अनाढ्यता (सरळपणा, गरिबी) एव. साधुत्वे दंभः (ढोंग) एव. उद्वाहे स्वीकारः एव [हेतुः]. प्रसाधनं एव (भूषण) स्नान. ॥ ५ ॥ दूरे वार्ययनं (पाण्याचें स्थान) तीर्थं लावण्य (सौंदर्य) केशधारणं

लिङ्गमेवाऽऽश्रमख्यातावन्योऽन्यापत्तिकारणम् ॥ अवृत्त्या न्यायदौर्बल्यं पाण्डित्ये चापलं वचः ॥ ४ ॥
अनाढ्यतैवासाधुत्वे साधुत्वे दंभ एव तु ॥ स्वीकार एव चोद्वाहे स्नानमेव प्रसाधनम् ॥ ५ ॥ दूरे
वार्ययनं तीर्थं लावण्यं केशधारणम् ॥ उदरंभरता स्वार्थः सत्यत्वे धार्ष्ट्यमेव हि ॥ ६ ॥ दाक्ष्यं कुटुंबभरणं
यशोर्थे धर्मसेवनम् ॥ एवं प्रजाभिर्दुष्टाभिराकीर्णे क्षितिमंडले ॥ ७ ॥ ब्रह्मविट्क्षत्रशूद्राणां यो बली
भविता नृपः ॥ प्रजा हि लुब्धै राजन्यैर्निर्घृणैर्दस्युधर्मभिः ॥ ८ ॥

उदरंभरता (पोटभरूपणा) स्वार्थः (पुरुषार्थ). सत्यत्वे धार्ष्ट्यं एव. ॥ ६ ॥ दाक्ष्यं कुटुंबभरणं. यशोर्थे धर्मसेवनं. एवं दुष्टाभिः प्रजाभिः आकीर्णे (व्याप्त) क्षितिमंडले ॥ ७ ॥ ब्रह्मविट्क्षत्रशूद्राणां यः बली, [सः] नृपः भविता. प्रजाः लुब्धैः निर्घृणैः (निर्दय) दस्युधर्मभिः (चोरांसारखी वागणूक ज्याची असा) राजन्यैः ॥ ८ ॥

आरोप येतील! साधुपणाला कारण दंभच होऊन राहील! विवाहाला कारण स्वीकारच होऊन बसेल (विधीची अपेक्षा राहणार नाही)' स्नान केवळ अलंकारासाठीच केलें जाईल! ॥ ५ ॥ दूर असलेले जलाशय (गंगापुष्करादिक) हींच तीर्थें समजली जातील (गुरु इत्यादिकांना कोणी मानणार नाहीत)! सौंदर्याकरिता केश धारण केले जातील; पोटभरूपणा हाच पुरुषार्थ होऊन बसेल! खरें बोलले असता धृष्टपणा पदरीं येईल (किंवा धृष्टपणा करील तोच मनुष्य खरा असे लोक मानितील)' ॥ ६ ॥ कुटुंबपोषण करणें म्हणजे दक्षता ठरेल! धर्म आचरण करावयाचा केवळ कीर्तीसाठी! अशा प्रकार दुष्ट प्रजानीं हें पृथ्वीतल व्यापून गेलें म्हणजे ॥ ७ ॥ ब्राह्मण, वैश्य, क्षत्रिय शूद्र ह्यांचा जो

कोणी बली असेल तोच राजा होऊन बसेल. लोभी, निर्दय व चोरांप्रमाणें वागणारे क्षत्रिय प्रजांचीं ॥ ८ ॥ बायका व द्रव्यें लुटून घेतील; मग त्या (प्रजा) पर्वतावर अ-
रण्यांत जातील आणि शाक, मुळें, मांस, मध, फळें, फुलें, बिया खाऊन निर्वाह करून राहतील. ॥ ९ ॥ वृष्टि होणार नाही, दुष्काळ पडेल त्यामुळें व कराच्या ओझ्यानीं प्रजा
पिडून जाईल. थंडी, वारा, ऊन्ह पाऊस, दहिंवर व परस्पराशीं कलह आणि मारामाऱ्या ह्यांच्या त्रासानें पुष्कळ प्रजा नाश पावतील ! ॥ १० ॥ उपलेल्याना क्षुधा, तृष्णा,
व्याधि व चिंता ह्यांच्यामुळे फार संताप भोगावे लागतील. कलियुगामध्यें मनुष्यांच्या आयुष्याची परम मर्यादा ह्मणजे तीस किंवा वीस वर्षें होऊन बसेल ! ॥ ११ ॥

आच्छिन्नदारद्रविणाः (बलात्कारें घेतलीं स्त्रिया व धनें ज्यांचीं अशा) [सत्यः] गिरिकाननं यास्यंति, शाकमूला मिषक्षौद्रफलपुष्पाष्टिभोजनाः [च भविष्यंति. ॥ ९ ॥ दुर्भिक्षकरपी-
डिताः प्रजाः अनावृष्ट्या, शीतवातातपप्रावृड्हिमैः, अन्योन्यतः, क्षुत्तृड्भ्यां, व्याधिभिः, संतापेन, चिंतया च विनंक्ष्यंति. कलौ नृणां त्रिंशद्विंशतिवर्षाणि (तीन किंवा वीस वर्षे) परं

आच्छिन्नदारद्रविणा यास्यंति गिरिकाननम् ॥ शाकमूलामिषक्षौद्रफलपुष्पाष्टिभोजनाः ॥ ९ ॥
अनावृष्ट्या विनंक्ष्यंति दुर्भिक्षकरपीडिताः ॥ शीतवातातपप्रावृड्हिमैरन्योन्यतः प्रजाः ॥ १० ॥
क्षुत्तृड्भ्यां व्याधिभिश्चैव संतप्स्यंते च चिंतया ॥ त्रिंशद्विंशतिवर्षाणि परमायुः कलौ नृणाम्
॥ ११ ॥ क्षीयमाणेषु देहेषु देहिनां कलिदोषतः ॥ वर्णाश्रमवतां धर्मे नष्टे वेदपथे नृणाम्
॥ १२ ॥ पाखंडप्रचुरे धर्मे दस्युप्रायेषु राजसु ॥ चौर्यानृतवृथाहिंसानानावृत्तिषु वै नृषु ॥ १३ ॥
शूद्रप्रायेषु वर्णेषु च्छागप्रायासु धेनुषु ॥ गृहप्रायेष्वाश्रमेषु यौनप्रायेषु बंधुषु ॥ १४ ॥

आयुः॥१०॥११॥ कलिदोषतः देहिनां देहेषु क्षीयमाणेषु [सत्सु], वर्णाश्रमवतां नृणां वेदपथे धर्मे नष्टे [सति], ॥१२॥ धर्मे पाखंडप्रचुरे (पाखंडानें भरलेल्या) [सति], राजसु
दस्युप्रायेषु [सत्सु], नृषु चौर्यानृतवृथाहिंसानानावृत्तिषु [सत्सु], ॥१३॥ वर्णेषु शूद्रप्रायेषु [सत्सु], धेनुषु छागप्रायासु (बकरीवजा) [सतीषु] आश्रमेषु गृहप्रायेषु [सत्सु],
कलिदोषामुळें प्राण्याची शरीरें क्षीण (लहान) होऊन जातील, वर्णाश्रमी मनुष्याचे वैदिक धर्ममार्ग नष्ट होतील, ॥ १२ ॥ धर्मामध्ये पाखंडपणा फार होईल, राजे चोरांसारखे
होऊन जातील, लोक चोरी, असत्य, निरर्थक (यज्ञाकरितां नव्हे अशी) हिंसा इत्यादि नाना प्रकारांनी निर्वाह करूं लागतील, ॥ १३ ॥ चारी वर्ण बहुतेक शूद्रतुल्य होतील,
गाई शेळ्यांसारख्या (शरीरानें लहान व दूधही थोडें देणाऱ्या) होतील, चारी आश्रम बहुतेक गृहस्थच होतील (ब्रह्मचारी, वानप्रस्थ व संन्यासी देखील संसारिकासारखे वन-

[illegible]), योनिस्त्रियो (बायकोचे आप्त-[illegible] मुख्यतः बंधु मानले जातील, ॥ १४ ॥ ओषधि (अन्नें) बहुतेक सांप्यांसारखी (निःसत्त्व) होतील, तसे बहुतेक
शमीसारखे (छायारहित) होतील, मेघ [illegible] होतील (विजा पुष्कळ चमकतील, पण पावसाचा अभाव होईल), घरें बहुतेक ओसाड (धर्मादिरहित) होतील,
॥ १५ ॥ अशा प्रकारे कलियुगांत शेवटीं [illegible] लोकांची आचरणें दुःसह होऊन गेली असतां, धर्मरक्षणासाठीं भगवान् सत्त्वगुणाच्या योगें अवतार घेईल. ॥ १६ ॥ स्थावरजं-
गमात्मक जगाचा गुरु, महासमर्थ, विश्वाचा अंतर्यामी जो भगवान् विष्णु त्याचें जन्म साधूंच्या धर्माचें रक्षण करावें व कर्मांचा क्षय करावा (त्यांना मोक्ष द्यावा) ह्यासाठीं ज-
न्तुषु यौनप्रायेषु (बायकोचे सखी) [सत्सु], ॥ १४ ॥ ओषधीषु अणुप्रायासु (संव्यासारख्या) [सतीषु], स्थास्नुषु (वृक्ष) शमीप्रायेषु (शमीवजा) [सत्सु]. मेघेषु विद्यु-
त्प्रायेषु [सत्सु], सद्मसु (घरें) शून्यप्रायेषु (ओसाड) [सत्सु], ॥ १५ ॥ इत्थं कलौ गतप्राये जने खरधर्मिणि (दुष्ट धर्मयुक्त) [सति], भगवान् धर्मत्राणाय सत्त्वेन अवत-
रिष्यति. ॥ १६ ॥ अखिलात्मनः चराचरगुरोः ईश्वरस्य विष्णोः जन्म साधूनां धर्मत्राणाय, कर्मापनुत्तये [च भवति]. ॥ १७ ॥ शंभलग्राममुख्यस्य महात्मनः विष्णुयशसः

अणुप्रायास्वोषधीषु शमीप्रायेषु स्थास्नुषु ॥ विद्युत्प्रायेषु मेघेषु शून्यप्रायेषु सद्मसु ॥ १५ ॥ इत्थं कलौ गतप्राये जने तु
खरधर्मिणि ॥ धर्मत्राणाय सत्त्वेन भगवानवतरिष्यति ॥ १६ ॥ चराचरगुरोर्विष्णोरीश्वरस्याखिलात्मनः ॥ धर्मत्राणाय
साधूनां जन्म कर्मापनुत्तये ॥ १७ ॥ शंभलग्राममुख्यस्य ब्राह्मणस्य महात्मनः ॥ भवने विष्णुयशसः कल्किः प्रादुर्भ-
विष्यति ॥ १८ ॥ अश्वमाशुगमारुह्य देवदत्तं जगत्पतिः ॥ असिनाऽसाधुदमनमष्टैश्वर्यगुणान्वितः ॥ १९ ॥ विचरन्नाशुना
क्षोण्यां हयेनाप्रतिमद्युतिः ॥ नृपलिंगच्छदो दस्यून्कोटिशो निहनिष्यति ॥ २० ॥ अथ तेषां भविष्यंति मनांसि विशदानि
वै ॥ वासुदेवांगरागातिपुण्यगंधानिलस्पृशाम् ॥ पौरजानपदानां वै हतेष्वखिलदस्युषु ॥ २१ ॥

ब्राह्मणस्य भवने कल्किः प्रादुर्भविष्यति. ॥ १८ ॥ अष्टैश्वर्यगुणान्वितः (अष्टयोगसिद्धि या गुणानीं युक्त) अप्रतिमद्युतिः (अतुळ कांति ज्याची असा) जगत्पतिः. देवदत्त आशुगं
(शीघ्र चालणाऱ्या) असाधुदमनं (दुष्टाचा निग्रह करणाऱ्या) अश्वं आरुह्य आशुना (त्वरा चालणाऱ्या) हयेन (अश्वानें) क्षोण्यां (पृथ्वीवर) विचरन् (फिरणार) [सन्] असिना (तरवारीनें)
कोटिशः नृपलिंगच्छदः (राजचिन्हांनीं आच्छादित) दस्यून् (चोरांना) निहनिष्यति. ॥१९॥२०॥ अखिलदस्युषु हतेषु [सत्सु], अथ वासुदेवांगरागातिपुण्यगंधानिलस्पृशां तेषां पौर-
सर्वे. ॥ १७ ॥ शंभल गावामध्यें मुख्य असा महात्मा ब्राह्मण जो विष्णुयशा, त्याच्या घरीं भगवान् कल्कि अवतार प्रकट होईल. ॥ १८ ॥ जो अणिमादि अष्ट सिद्धींनी युक्त जगत्पति
भगवान् जलद चालणाऱ्या व दुष्टाचा निग्रह करणाऱ्या देवदत्त अश्वावर बसून ॥ १९ ॥ त्या शीघ्रगति अश्वाच्या योगें पृथ्वीवर फिरेल आणि राजाचे वेष घेऊन गुप्तपणें वागत
असलेल्या कोट्यवधि चोरांचा घात करील. त्याचें तेज अप्रतिम असेल. ॥ २० ॥ अशा प्रकारें सर्व चोरांचा नाश झाला असतां, वासुदेवाच्या अंगावरील उटीच्या अति-

पवित्र सुगंधानें युक्त असा वायु शरीराला लागल्यामुळें त्या नागरिक व देशोदेशींच्या लोकांचीं मनें निर्मळ होऊन जातील; ॥ २१ ॥ व सत्त्वमूर्ति भगवान् वासुदेव हृदयांत राहूं
लागला कीं त्यांची प्रजासंतति उत्तरोत्तर मोठी निपजत जाईल. ॥ २२ ॥ धर्मसंरक्षक हरि भगवान् कल्कि ज्या वेळीं अवतार घेईल, त्यावेळी कृतयुग चालू होईल व प्रजाची
उत्पत्ति सात्त्विक होऊं लागेल. ॥२३॥ - तो अवतार केव्हां होईल त्याची खूण सांगतों :- ज्या वेळी चंद्र, सूर्य त्याप्रमाणें पुष्यनक्षत्र आणि गुरु ह्या चौघांचा एका राशीवर एकदम
जानपदानां मनांसि विशदानि (निर्मळ) भविष्यंति. ॥ २१ ॥ सत्त्वमूर्तौ भगवति वासुदेवे तेषां हृदि स्थिते [सति], प्रजाविसर्गः स्थविष्ठः (मोठा) संभविष्यति. ॥ २२ ॥
भगवान् कल्किः धर्मपतिः हरिः यदा अवतीर्णः, तदा कृतं भविष्यति, प्रजासूतिः च सात्त्विकी [भविष्यति]. ॥ २३ ॥ यदा चंद्रः, सूर्यः तथा तिष्यबृहस्पती (पुष्य व गुरु)

तेषां प्रजाविसर्गश्च स्थविष्ठः संभविष्यति ॥ वासुदेवे भगवति सत्त्वमूर्तौ हृदि स्थिते ॥ २२ ॥ यदावतीर्णो भगवान्कल्किर्धर्मपतिर्हरिः ॥
कृतं भविष्यति तदा प्रजासूतिश्च सात्त्विकी ॥२३॥ यदा चंद्रश्च सूर्यश्च तथा तिष्यबृहस्पती ॥ एकराशौ समेष्यंति तदा भवति तत्कृतम् ॥२४॥
ये ऽतीता वर्तमाना ये भविष्यंति च पार्थिवाः ॥ ते त उद्देशतः प्रोक्ता वंशीयाः सोमसूर्ययोः ॥२५॥ आरभ्य भवतो जन्म यावन्नंदाभिषेचनम् ॥
एतद्वर्षसहस्रं तु शतं पंचदशोत्तरम् ॥२६॥ सप्तर्षीणां तु यौ पूर्वौ दृश्येते उदितौ दिवि ॥ तयोस्तु मध्ये नक्षत्रं दृश्यते यत्समं निशि ॥ २७ ॥

च एकराशौ समेष्यंति (एकदम प्रवेश करितील), तदा तत् कृतयुगं भवति. ॥ २४ ॥ ये अतीताः (गेलेले) ये वर्तमानाः, [ये] पार्थिवाः भविष्यंति च, ते ते सोमसूर्ययोः
वंशीयाः उद्देशतः प्रोक्ताः. ॥ २५ ॥ भवतः जन्म आरभ्य यावत् नंदाभिषेचनं एतत् वर्षसहस्रं पंचदशोत्तरं शतं [च भवति]. ॥ २६ ॥ दिवि निशि सप्तर्षीणां यौ पूर्वौ उदितौ
प्रवेश होईल, त्यावेळीं तें कृतयुग चालू होईल. ॥ २४ ॥ सोम व सूर्य ह्या उभय वंशांतील राजे आजपर्यंत जे होऊन गेले, सध्या जे आहेत व पुढें जे होणार ते संक्षेपानें
तुला सांगितले. ॥ २५ ॥ तुझ्या जन्मापासून तों नंदाला अभिषेक होईपर्यंत हीं एकंदर एक हजार एकशें पंधरा वर्षें. ॥ २६ ॥ आकाशात रात्रीं सप्तर्षींमध्यें पहिल्या प्रथम

१ प्रति बारा वर्षांनीं कर्क राशीला गुरु आला कीं, दोन तीन अमावास्यांना चंद्र, सूर्य व गुरु हे तिघे पुष्य नक्षत्रावर एकत्र जमण्याचा योग येतो; पण ह्या श्लोकांत 'एकदम प्रवेश' पाहिजे म्हटलें आहे, तसा योग येईल तेव्हां कृतयुग चालू होईल. २ एक हजार एकशें पंधरा ही संख्या काहीं तरी विवक्षेनें सांगितली; खरें म्हटलें तर परीक्षित् आणि नंद ह्यांचें अंतर १,४९८ वर्षें निघतें : पहा:— परीक्षिताच्या वेळीं मागध वंशांत मार्जारि राजा राज्य करीत होता; 'त्या वंशांत त्याच्यापासून पुरंजयापर्यंत पुढील वीस राजे एक हजार वर्षें राज्य करितील' असें नवमस्कंधाच्या २२ अध्यायाच्या ४९ श्लोकांत सांगितलें 'पुढें पांच प्रद्योतन राजे १३८ वर्षें व शिशुनागवंशीय ३६० वर्षें पृथ्वीचें राज्य भोगतील' असें ह्या स्कंधांत पहिल्या अध्यायाच्या अनुक्रमें ४ व ७ श्लोकांत सांगितलें आहे, मिळून १,४९८ वर्षें. ३ आकाशांत गाड्या-सारखा एक आठ ताऱ्यांचा पुंजका दिसतो, त्या गाड्याचें अग्र पूर्वेकडे असतें, तें सप्तर्षि. किंचित वर उचलेल्या त्याच्या दोंकाकडे (पूर्वेच्या बाजूला) एकच तारा दिसतो, तो मरीचि. त्याच्या मागें गाडीच्या जोडदांड्यासारखे नम्र झालेले दोन तारे दिसतात, ते अरुंधतीसह वसिष्ठ. त्याच्या पाठीमागें दांड्याच्या मुळाच्या जागीं एकच तारा दिसतो तो अंगिरा. राहिलीं मागली चौकटी, पैकीं ईशान्येचा अत्रि, त्याच्या दक्षिणेस पुलस्त्य, पुलस्त्याच्या पश्चिमेस पुलह, व त्याच्या उत्तरेचा क्रतु. पाठीमागले (पश्चिमेकडले) दोन तारे पुलह व क्रतु उगवताना समोर दिसतात.

उगवलेले जे दोन दिसतात, व त्यांच्यामध्यें दक्षिणोत्तर समान रेषेंत जें अश्विन्यादि नक्षत्रांपैकी एक नक्षत्र दिसून येतें, ॥ २७ ॥ ते ऋषि त्या नक्षत्राशी युक्त असे मनुष्याची शंभर वर्षेपर्यंत राहतात (सप्तर्षि मंडळाला एका नक्षत्रावरून दुसऱ्या नक्षत्रावर जाण्याला शंभर वर्षे लागतात). ते ब्राह्मण (ऋषि) सध्या तुझ्या वेळेला मघा नक्षत्रावर राहिलेले आहेत. ॥ २८ ॥ ते मघावर असतानाच ज्यावेळीं भगवान् विष्णूचा प्रकाशमान (शुद्ध सत्त्वमय) कृष्णसंज्ञक देह वैकुंठी गेला, त्या वेळी कलीने लोकामध्यें प्रवेश

(उगवलेले) दृश्येते, तयोः मध्ये यत् समं (सारख्या ओळींत) नक्षत्रं दृश्यते, ॥२७॥ तेन एव युक्ताः एते ऋषयः नृणां अब्दशतं (शंभर वर्षे) तिष्ठति (राहतात) ते द्विजा अधुना त्वदीये काले मघाः आश्रिताः [वर्तंते]. ॥ २८ ॥ भगवतः विष्णोः कृष्णाख्यः भानुः (शुद्धसत्त्वमय तेजस्वी देह) असौ [यदा] दिवं गतः, तदा कलिः लोकं अविशत् (शिरला),

तेनैव ऋषयो युक्तास्तिष्ठंत्यब्दशतं नृणाम् ॥ ते त्वदीये द्विजाः काले अधुना चाश्रिता मघाः ॥ २८ ॥
विष्णोर्भगवतो भानुः कृष्णाख्यो ऽसौ दिवं गतः ॥ तदा ऽविशत्कलिर्लोकं पापे यद्रमते जनः ॥ २९ ॥
यावत्सपादपद्माभ्यां स्पृशन्नास्ते रमापतिः ॥ तावत्कलिर्वै पृथिवीं पराक्रांतुं न चाशकत् ॥ ३० ॥
यदा देवर्षयः सप्त मघासु विचरंति हि ॥ तदा प्रवृत्तस्तु कलिर्द्वादशाब्दशतात्मकः ॥ ३१ ॥

यत् जनः पापे रमते. ॥ २९ ॥ यावत् सः रमापतिः पादपद्माभ्यां स्पृशन् आस्ते [स्म] तावत् कलिः पृथिवीं पराक्रांतुं (पराक्रम चालविण्यास) न अशकत् ॥ ३० ॥ यदा सप्त देवर्षयः मघासु विचरंति, तदा द्वादशाब्दशतात्मकः कलिः प्रवृत्तः ॥ ३१ ॥

केला. त्याच्या (कलीच्या) युगामध्यें लोक पापकर्मांत रममाण होतात. ॥ २९ ॥ - राजा[1] कृष्णावतार असतानाच कलियुगाचा संधिरूपाने प्रवेश झाला आहे खरा तथापि - जोंपर्यंत तो लक्ष्मीपति परमात्मा आपल्या चरणकमळाच्या योगें पृथ्वीला स्पर्श करीत असे, तोंपर्यंत कलीला भूमीवर आपला पराक्रम चालविता आला नाहीं. ॥ ३० ॥ ते देवर्षि (सप्तर्षि) ज्यावेळीं मघावर फिरतील, त्यावेळी कलियुगाचा खरा खरा प्रवेश होईल. ह्या युगाचें प्रमाण देवांचीं[2] १२०० वर्षे आहे ॥ ३१ ॥

१ तृतीय स्कंध अध्या. ११ श्लो. २० पहा. २ मनुष्याचें एकवर्ष म्हणजे देवाचे एक अहोरात्र या मानाने १२०० वर्षं, तृतीय स्कंध अ० ११ श्लो० १२ पहा

प्रद्योतनाचें राज्य चालू असेल व त्यावेळी कलीची वृद्धि होऊं लागेल पुढें
तेच महर्षि जेव्हां मघापासून पूर्वाषाढापर्यंत जातील तेव्हां (परीक्षितापासून पुढें ११०० वर्षांनी) - कृष्णपरमात्मा वैकुंठी गेले त्या दिवशीं त्याचक्षणीं कलियुगाचा
नंदापासून तर ह्या कलीचा अतिशयच उत्कर्ष होत जाईल. ॥ ३२ ॥ पूर्वीचे विद्वान् लोक असें ह्मणतात कां, मनें आत्मस्वरूपाचा प्रकाश करणारीं झाली,
प्रवेश झाला, असें ठरून आलें. ॥ ३३ ॥ दिव्यवर्षसहस्रात्मक हें कलियुग - संध्या व अंशें यांसह - निघून गेलें व मनुष्यांची उच्चनीच स्थिति सम-
ह्मणजे पुन्हा कृतयुग चालू होईल. ॥ ३४ ॥ असा हा मनूचा वंश ज्या अवस्थानीं वर्णिला आहे, तसाच भूमीवरील वैश्य, शूद्र व ब्राह्मण ह्यांच्याही तस्मिन् एव अहनि
यदा महर्षयः मघाभ्यः पूर्वाषाढा यास्यंति, तदा नंदात् प्रभृति एषः कलिः वृद्धिं गमिष्यति ॥ ३२ ॥ " कृष्णः यस्मिन् [दिने यदा] दिवं यातः, तदा नृणां मनः आत्मप्रकाशकं
(दिवशीं) कलियुगं प्रतिपन्नं (अनुभवलें) " इति पुराविदः (प्राचीन विद्वान्) प्राहुः ॥ ३३ ॥ दिव्याब्दानां सहस्रान्ते चतुर्थे [कलौ अतीते सति], युगे युगे ज्ञेयाः,
भविष्यति, [तदा] कृतं [भविष्यति]. ॥ ३४ ॥ इति एषः मानवः वंशः भुवि विट्शूद्रविप्राणां यथा संख्यायते (वर्णिला आहे), तथा ताः ताः [अवस्थाः]

यदा मघाभ्यो यास्यंति पूर्वाषाढां महर्षयः ॥ तदा नंदात्प्रभृत्येष कलिर्वृद्धिं गमिष्यति ॥ ३२ ॥ यस्मिन्कृष्णो दिवं यातस्तस्मिन्नेव
तदाऽहनि ॥ प्रतिपन्नं कलियुगमिति प्राहुः पुराविदः ॥ ३३ ॥ दिव्याब्दानां सहस्रांते चतुर्थे तु पुनः कृतम् ॥ भविष्यति यदा
नृणां मन आत्मप्रकाशकम् ॥ ३४ ॥ इत्येष मानवो वंशो यथा संख्यायते भुवि ॥ तथा विट्शूद्रविप्राणां तास्ता ज्ञेया युगे युगे
॥ ३५ ॥ एतेषां नामलिंगानां पुरुषाणां महात्मनाम् ॥ कथामात्रावशिष्टानां कीर्तिरेव स्थिता भुवि ॥ ३६ ॥ देवापिः शतनोर्भ्राता
मरुश्चेक्ष्वाकुवंशजः ॥ कलापग्राम आसाते महायोगबलान्वितौ ॥ ३७ ॥

॥ ३५ ॥ एतेषां नामलिंगानां (नाम हेंच गुणदर्शक ज्यांचे अशा) महात्मनां कथामात्रावशिष्टानां (केवळ कथारूपानें उरलेल्या) पुरुषाणां कीर्तिः एव भुवि स्थिता ॥ ३६ ॥ महा-
योगबलान्वितौ देवापिः शंतनोः भ्राता, इक्ष्वाकुवंशजः मरुः च [एतौ] कलापग्रामे आसाते. ॥ ३७ ॥
जाव्या. प्रत्येक युगांत असाच प्रकार चालावयाचा. ॥ ३५ ॥ ह्या पुरुषांची नावेंच त्यांच्या गुणांचीं द्योतक आहेत, सांप्रत त्यांच्या कथा मात्र अवशिष्ट आहेत व भूमीवर त्यांची
कीर्ति मात्र कायम राहिली आहे (त्यांचीं राज्यें, मुलें बाळें सर्व नष्ट झालीं, हें लक्ष्यांत आणून संसाराची क्षणभंगुरता ओळखावी व विरक्ति धरावी, हा ह्या सांगण्याचा उद्देश
होय). ॥ ३६ ॥ शंतनूचा भाऊ देवापि (सोमवंशीय) व इक्ष्वाकुवंशज मरु (सूर्य वंशीय) हे उभयतां पुरुष कलाप नांवाच्या गावामध्यें राहत असतात. त्यांनी मोठें योग-

१ श्रीधरांनीं ह्या श्लोकाचा अर्थ लावतांना मागील १,१४८ संख्येशीं एकवाक्यता करण्यासाठीं ही ओढाताण केली आहे. ह्याबद्दल थोडासा विचार प्रस्तावनेंत मिळेल. २ तृतीय स्कंध अ ११ श्लो २० पहा.

सामर्थ्य संपादन केलें आहे. ॥ ३७ ॥ वासुदेवाच्या उपदेशाप्रमाणें, कलियुगाची समाप्ति झाली असतां, ते ह्या लोकांत पुढें येऊन पूर्वीप्रमाणें वर्णाश्रमयुक्त धर्म प्रसिद्ध करितील. ॥ ३८ ॥ कृत, त्रेत, द्वापर आणि कलि हीं चार युगें ह्या अनुक्रमानें भूमंडळीं प्राण्यांवर चालत असतात. ॥ ३९ ॥ राजा! मी सांगितलेले हे व अमेन दुसरेही राजे भूमीवर 'माझी' 'माझी' असा अभिमान ठेवून शेवटीं तिला टाकून मरून गेले! ॥ ४० ॥ - जिवंतपणीं - देहाला 'राजा' हें मोठें नाव मिळालें तरी शेवटीं (मरणोत्तर) कृमि, विष्ठा

वासुदेवानुशिक्षितौ तौ कलेः अंते इह पत्य वर्णाश्रमयुतं धर्मं पूर्ववत् प्रथयिष्यतः (प्रसिद्ध करितील) ॥ ३८ ॥ भुवि प्राणिषु कृत, त्रेता, द्वापर, कलि, च इति चतुर्युगं अनेन क्रमयोगेन वर्तते. ॥ ३९ ॥ राजन्, मया प्रोक्ताः एते नरदेवाः तथा अपरे [च] भूमौ ममत्वं कृत्वा अंते इमां (हिला-पृथ्वीला) हित्वा निधन (मृत्यु) गताः. ॥ ४० ॥ अंते राजनाम्नः अपि यस्य कृमिविड्भस्मसंज्ञा [भविष्यति], तत्कृते [यः] भूतध्रुक् (प्राण्यांना छळणारा) [सः] किं स्वार्थं वेद यतः निरयः (नरक) [...]

ताविहैत्य कलेरंते वासुदेवानुशिक्षितौ ॥ वर्णाश्रमयुतं धर्मं पूर्ववत्प्रथयिष्यतः ॥ ३८ ॥ कृतं त्रेता द्वापरं च कलिश्चेति चतुर्युगम् ॥ अनेन क्रमयोगेन भुवि प्राणिषु वर्तते ॥ ३९ ॥ राजन्नेते मया प्रोक्ता नरदेवास्तथाऽपरे ॥ भूमौ ममत्वं कृत्वाऽन्ते हित्वेमां निधनं गताः ॥ ४० ॥ कृमिविड्-भस्मसंज्ञाऽन्ते राजनाम्नोऽपि यस्य च ॥ भूतध्रुक् तत्कृते स्वार्थं किं वेद निरयो यत. ॥४१॥ कथं सेयमखंडा भूः पूर्वैर्मे पुरुषैर्धृता ॥ मत्पुत्रस्य च पौत्रस्य मत्पूर्वा वंशजस्य वा॥४२॥तेजोऽब्‍न्नमयं कायं गृहीत्वाऽऽत्मतयाऽबुधाः ॥ महीं ममतया चोभौ हित्वाऽन्तेऽदर्शनं गताः॥४३॥

"सा इयं अखंडा भूः मे पूर्वैः पुरुषैः धृता [सती इदानीं] मत्पूर्वा च [सती] मत्पुत्रस्य, पौत्रस्य, वंशजस्य च कथं [स्यात्?' 'इति ममतां कुर्वंति] ॥ ४२ ॥ अबुधाः तेजोऽब्‍न्नमयं (तेज, उदक व अन्न याचा गोळा) कायं आत्मतया, महीं च ममतया गृहीत्वा अंते उभौ हित्वा अदर्शनं (नाशास) गताः ॥ ४३ ॥

किंवा भस्म ह्यांपैकीं कोणती तरी संज्ञा मिळावयाची हें निश्चित होय. मग त्या देहासाठीं (त्याला उपभोग मिळावे ह्मणून) प्राण्यांचा छळ करावयाचा व त्यायोगें नरकाचे द्वार उघडें करून घ्यावयाचें, ह्यांत मनुष्याला कोणता पुरुषार्थ वाटतो कोण जाणे! ॥ ४१ ॥ 'ह्या अखंड पृथ्वीचें राज्य माझ्या पूर्व पुरुषांनीं चालविलें. आतां हे मजकडे आलें, ततः माझ्या मुलाला, माझ्या नातवाला तसेंच पुढील वंशजाला चालवितां येईल कसें!' - हे सगळे विचार! - ॥ ४२ ॥ हा देह ह्मणजे तेज, उदक आणि अन्न ह्यांचा बनलेला गोळा. त

अज्ञानी राजे स्वतःच 'आत्मा (मी)' असें मानीत व भूमि 'माझी' असें ममत्व पण शेवटी दोघानाही (देहाला व पृथ्वीला) येथेंच टाकून ते मृत्यु पावले! ॥ ४३ ॥
राजा! जे जे भूपति आपल्या सामर्थ्याने पृथ्वीचें पालन करीत, ते ते सगळे काळानें कीर्तन करण्याचे प्रसंगी कथारूपानें मात्र दिसावे असे करून सोडिले' ॥ ४४ ॥

॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने द्वादशस्कंधे द्वितीयो ऽध्यायः ॥ २ ॥ शुकाचार्य ह्मणाले '— राजा! ही पृथ्वी आपल्यावर जय मिळविण्याच्या कामात गुंतून गेलेल्या राजांना पाहून हांसत असते :- ती ह्मणते - "अहो! मृत्यूची खेळणी असे हे राजे मला जिंकून वश करून घेण्याची इच्छा धरितात! ॥ १ ॥ नरपतींचा हा काम

राजन् ये ये भूपतयः ओजसा भुवं भुंजंति (भोगितात), ते सर्वे कथासु कालेन कथामात्रा कृता. ॥ ४४ ॥ ॥ इति श्रीभागवतान्वये द्वादशस्कंधे द्वितीयो ऽध्याय. ॥ २ ॥
श्रीशुकः उवाच—इयं भू. (पृथ्वी) नृपान् (राजे) आत्मनि जये व्यग्रान् दृष्ट्वा हसति- "अहो मृत्योः क्रीडनका. (खेळणीं) नृपा मा विजिगीषंति (जिंकू इच्छितात)! ॥ १ ॥
विदुषां अपि नरेंद्राणां एषः कामः मोघः (व्यर्थ) स्यात्. येन ये नृपा. फेनोपमे पिंडे अतिविश्रंभिता. (अत्यंत विश्वासलेले) ॥ २ ॥ 'पूर्वं षड्वर्गं (सहाचा समूह) निर्जित्य

ये ये भूपतयो राजन्भुंजते भुवमोजसा ॥ कालेन ते कृताः सर्वे कथामात्राः कथासु च ॥ ४४ ॥
इति श्रीभागवते महा० द्वादशस्कंधे द्वितीयो ऽध्यायः ॥ २ ॥ श्रीशुक उवाच । दृष्ट्वाऽऽत्मनि जये व्यग्रान्नृपान्हसति भूरियम् ॥ अहो मा विजिगीषंति मृत्योः क्रीडनका नृपाः ॥ १ ॥ काम एष नरेंद्राणां मोघः स्याद्विदुषामपि ॥ येन फेनोपमे पिंडे येऽतिविश्रंभिता नृपाः ॥२॥ पूर्वं निर्जित्य षड्वर्गं जेष्यामो राजमंत्रिणः॥ ततः सचिवपौराप्तकरींद्रानस्य कंटकान् ॥३॥ एवं क्रमेण जेष्यामः पृथ्वीं सागरमेखलाम् ॥
इत्याशाबद्धहृदया न पश्यंत्यंतिकेऽन्तकम् ॥ ४ ॥

(जिंकून) राजमंत्रिणः जेष्यामः (जिंकू). ततः सचिवपौराप्तकरींद्रान् कंटकान् (काटे) अस्य (दूर करून) ॥ ३ ॥ एवं क्रमेण सागरमेखलां पृथ्वीं जेष्यामः (जिंकू)' इति आशाबद्धहृदयाः [राजानः] अंतिके (समीप) अंतक (काळ) न पश्यति. ॥ ४ ॥
(इच्छा) अगदी फुकट जायाची! ते कितीका शहाणे असतना त्यांची स्थिति अशीच व्हावयाची! देह ह्मणजे फेंसासारखा क्षणभंगुर, पण त्या कामाने हा राजाचा [illegible] केवढा तरी अति विश्वास बसविला आहे! ॥ २ ॥ - ह्यांच्या कामना एकीमागून एक अशा चालतात - 'आपण प्रथम सहाही इंद्रियांचा समुदाय जिंकून मग राजांच्या [illegible] वश करून घेऊं, नंतर सचिव, नागरिक, आप्त, हत्तींचे रक्षक सगळ्यांना वळवून प्रतिपक्षीरूपी काटे दूर काढून टाकू, ॥ ३ ॥ अशा क्रमानें समुद्रानें वेढिलेली पृथ्वी जिंकू,

ह्या प्रकारच्या आशांनी त्याची हृदयें बद्ध झालेलीं असतात, ह्मणून जवळच - केंव्हा पाठीत असलेल्या - मृत्यूकडे त्याची दृष्टि जात नाहीं. ॥ ४ ॥ समुद्रवलयांकित मला जिंकून मग ते वेगानें सागरावर चालून जातात. पण आत्मजयापुढे ह्याचा (सार्वभौमराज्यसंपादनाचा) पाड काय? आत्मजय केला असता मुक्ति हें फळ मिळतें ! ॥ ५ ॥ मेजमें ठे मनु व कुशल उद्धरणारे त्याचे मुलगे जिला (पृथ्वीला) येथल्या येथें सोडूनच जसे आले तसे चालते झाले. त्या मला (पृथ्वीला) हे अज्ञानी लोक जिंकण्याचा प्रयत्न करीत असतात. - ह्यांच्या मूर्खपणाला ह्मणावें तरी काय ! - ॥ ६ ॥ माझ्यासाठी (पृथ्वीकरिता) पितापुत्राचे व भावाभावाचे देखील कलह होतात ! राज्यावरील ममतेनें ज्यांची मनें जखडून

[केचित्] समुद्रावरणां मां जित्वा [अपि अतितृष्णया] ओजसा अब्धिं (समुद्रात) विशन्ति ! आत्मजयस्य एतत् कियत्? आत्मजये मुक्ति फलं. ॥ ५ ॥ मूलं उद्दा. मनवः, तत्सुताः च यां विसृज्य (सोडून) एव यथागतं गताः, तां मा युद्धे अबुद्धयः जेष्यति ! ॥ ६ ॥ राज्ये ममताबद्धचेतसा असतां पितृपुत्राणां, भ्रातॄणां च अपि मत्कृते

समुद्रावरणां जित्वा मां विशंत्यब्धिमोजसा ॥ कियदात्मजयस्यैतन्मुक्तिरात्मजये फलम् ॥ ५ ॥ यां विसृज्यैव मनवस्त-
त्सुताश्च कुलोद्वहाः ॥ गता यथागतं युद्धे तां मां जेष्यंत्यबुद्धयः ॥ ६ ॥ मत्कृते पितृपुत्राणां भ्रातॄणा चापि विग्रहः ॥
जायते ह्यसतां राज्ये ममताबद्धचेतसाम् ॥ ७ ॥ ममैवेयं मही कृत्स्ना न ते मूढेतिवादिनः ॥ स्पर्धमाना मिथो घ्नंति
म्रियंते मत्कृते नृपाः ॥ ८ ॥ पृथुः पुरूरवा गाधिर्नहुषो भरतो ऽर्जुनः ॥ मांधाता सगरो रामः खट्वांगो धुंधुहा रघु ॥९॥
तृणबिंदुर्ययातिश्च शर्यातिः शंतनुर्गयः ॥ भगीरथः कुवलयाश्वः ककुत्स्थो नैषधो नृगः ॥ १० ॥ हिरण्यकशिपुर्वृत्रो
रावणो लोकरावणः ॥ नमुचिः शंबरो भौमो हिरण्याक्षो ऽथ तारकः ॥ ११ ॥

विग्रहः (युद्ध, वैर) जायते ! ॥ ७ ॥ " मूढ, कृत्स्ना, (सर्व) इयं मही मम. ते न " इतिवादिनः स्पर्धमानाः नृपाः मत्कृते मिथः (परस्पर) घ्नंति (मारतात), म्रियन्ते [च] ॥ ८ ॥ (स्पृ.) ॥ ९ ॥ (सू) ॥ १० ॥ ११ ॥

टाकिली ते असले लोक ह्मणजे दुष्टच होत ! ॥ ७ ॥ ' मूर्खा ! ही सगळी भूमि माझीच आहे, तुझी नव्हे, ' असें ह्मणून ते राजे मजसाठी परस्परांशी लढाई करतात, मारतात, करितात व शेवटीं मरून जातात ! ॥ ८ ॥ पृथु, पुरूरवा, गाधि, नहुष, भरत, अर्जुन, मांधाता, सगर, राम, खट्वांग, धुंधुमार, रघु, ॥ ९ ॥ तृणबिंदु, ययाति, शर्याति, शंतनु, गय, भगीरथ, कुवलयाश्व, ककुत्स्थ, नैषध, नृग, ॥ १० ॥ हिरण्यकशिपु, वृत्र, लोकांना छळणारा रडवणारा रावण, नमुचि, शंबर, भौम, हिरण्याक्ष, तारक ॥ ११ ॥

व दुसरेही पुष्कळ मोठमोठाले सामर्थ्यवान् दैत्य व राजे — सगळेच सर्वज्ञ व शूर आणि सगळे सर्व जिंकिणारे व कधींही पराजय न पावलेले पुरुष— ॥ १२ ॥ माझ्या ठिकाणी अतिशय ममता ठेवून राहिले होते, पण मृत्युलोकींचे मरणधर्मीच ते; (शुकाचार्य ह्मणतात —) वा राजा ! (पृथ्वीनें ह्मणून ठेविलें आहे कीं,) काळानें त्यांना कृतार्थ होण्यापूर्वी नामशेष करून सोडिलें ! " ॥ १३ ॥ राजा ! आजपर्यंत जे कित्येक महासमर्थ पुरुष ह्या लोकामध्यें कीर्ति प्रसृत करून परलोकीं निघून गेले, त्यांच्या ह्या कथा मी तुला निवेदन केल्या. ह्या आख्याने सांगणें ह्मणजे नुसते वाणीचे विलास आहेत, ह्यापासून परमार्थ निरूपण होत नाहीं. पण सांगण्याचा उद्देश हा कों, - त्याच्या श्रवणानें श्रोत्यांला - विषयाची निःसा-

अन्ये बहवः दैत्याः, ये महेश्वराः राजानः, [ते] सर्वे सर्वविदः शूराः, सर्वे सर्वजितः [स्वयं] अजिताः ॥ १२ ॥ मर्त्यधर्मिणः अकृतार्थाः [ते] विभो, मयि उच्चैः (अत्यंत) ममतां कृत्वा कालेन कथावशेषाः (नामशेष) कृताः ! " ॥ १३ ॥ विभो, लोकेषु यशः वितत्य (पसरून) परेयुषां (मरणाऱ्या) महीयसां (मोठ्याच्या) कथाः ते विज्ञानवैराग्यविवक्षया कथिताः. इमाः वचोविभूतीः (भाषणाचें सौंदर्य), पारमार्थ्यं (खरें तत्त्व) न. ॥ १४ ॥ यः अभीक्ष्णं (वारंवार) अमंगलघ्न (पापनाशक) उत्तमश्लो-

अन्ये च बहवो दैत्या राजानो ये महेश्वराः ॥ सर्वे सर्वविदः शूराः सर्वे सर्वजितो ऽजिताः ॥ १२ ॥ ममतां मय्यवर्तंत कृत्वोच्चैर्मर्त्यधर्मिणः ॥ कथावशेषाः कालेन ह्यकृतार्थाः कृता विभो ॥ १३ ॥ कथा इमास्ते कथिता महीयसां विताय लोकेषु यशः परेयुषाम् ॥ विज्ञानवैराग्यविवक्षया विभो वचोविभूतीर्न तु पारमार्थ्यम् ॥ १४ ॥ यस्तूत्तमश्लोकगुणानुवादः संगीयते ऽभीक्ष्णममंगलघ्नः ॥ तमेव नित्यं शृणुयादभीक्ष्णं कृष्णे ऽमलां भक्तिमभीप्समानः ॥ १५ ॥ राजोवाच । केनोपायेन भगवन्कलेर्दोषान्कलौ जनाः ॥ विधमिष्यंत्युपचितांस्तन्मे ब्रूहि यथा मुने ॥ १६ ॥

कगुणानुवादः संगीयते, तं एव कृष्णे अमलां भक्तिं अभीप्समानः [पुरुषः] नित्यं अभीक्ष्णं शृणुयात् (ऐको). ॥ १५ ॥ राजा उवाच— भगवन्, मुने, कलौ जनाः केन उपायेन उपचितान् (वृद्धिंगत) कलेः दोषान् विधमिष्यन्ति (दूर करितील) ? तत् मे यथा ब्रूहि ॥ १६ ॥

रता कळावी व तद्द्वारा वैराग्य व्हावें. ॥ १४ ॥ - पुरुषानें कर्तव्य पुरुषार्थसाधन ह्मटलें ह्मणजे इतकेंच कों, - पुण्यकीर्ति प्रभूचा जो अमंगलनाशक गुणानुवाद गाइला जातो. त्यांचेच प्रतिदिनीं वारंवार श्रवण करावें व अंतरीं ' कृष्णावर निष्काम प्रेमा जडो ' अशी इच्छा धरावी ॥ १५ ॥ राजानें प्रश्न केला.— सर्वज्ञ मुने ! कलियुगामध्यें वृद्धिंगत झालेले कलीचे दोष लोकांना कोणत्या उपायानें नष्ट करितां येतील, तें मला पूर्णपणें सांगण्याची कृपा करावी. ॥ १६ ॥

तसेच युगें कोणतीं प्रत्येक युगांतील धर्म कसकसे आहेत, प्रलय व कल्प यांचें प्रमाण काय आणि, महात्मा व्यापक ईश्वररूप जो काळ त्याची गति कशी आहे तेंही निवेदन करावें. ॥ १७ ॥ शुकाचार्य म्हणाले :— राजा! कृतयुगामध्यें धर्म चारी चरणांनीं युक्त असतो, त्या वेळचे लोक त्याचें पूर्णपणें पालन करितात. राजा, त्या व्यापक धर्माचे सत्य, दया, तप व दान हे चार चरण होत. ॥ १८ ॥ कृतयुगांतले जन प्रायः सगळे संतुष्ट, दयाळु, सर्वांशीं मैत्री ठेवणारे, शांत, इंद्रियनिग्रही, सहनशील, आत्मरूपीं रममाण, समदृष्टि व आत्माभ्यासी असतात. ॥ १९ ॥ त्रेतायुगामध्यें धर्माच्या चरणांपैकी चवथा भाग अधर्माच्या असत्य, हिंसा, असंतोष व कलह ह्या चार चरणांच्या

युगानि, युगधर्मान् प्रलयकल्पयोः मान, कालस्य ईश्वररूपस्य महात्मनः विष्णोः गतिं च [ब्रूहि] ॥ १७ ॥ श्रीशुक उवाच— नृप, कृते तज्जनैः धृतः धर्मः चतुष्पात् वर्तते. सत्यं, दया, तपः, दानं इति विभोः पादाः. ॥ १८ ॥ (मू.) ॥ १९ ॥ त्रेतायां धर्मपादानां तुर्यांशः (चवथा भाग) अनृतहिंसाऽसंतोषविग्रहैः अधर्मपादैः हीयते (क्षीण होतो)

युगानि युगधर्मांश्च मानं प्रलयकल्पयोः ॥ कालस्येश्वररूपस्य गतिं विष्णोर्महात्मनः ॥ १७ ॥ श्रीशुक उवाच । कृते प्रवर्तते धर्मश्चतुष्पात्तज्जनैर्धृतः ॥ सत्यं दया तपो दानमिति पादा विभोर्नृप ॥ १८ ॥ सन्तुष्टाः करुणा मैत्राः शान्ता दान्तास्तितिक्षवः ॥ आत्मारामाः समदृशः प्रायशः श्रमणा जनाः ॥ १९ ॥ त्रेतायां धर्मपादानां तुर्यांशो हीयते शनैः ॥ अधर्मपादैरनृतहिंसाऽसन्तोषविग्रहैः ॥ २० ॥ तदा क्रियातपोनिष्ठा नातिहिंस्रा नलंपटाः ॥ त्रैवर्गिकास्त्रयीवृद्धा वर्णा ब्रह्मोत्तरा नृप ॥ २१ ॥ तपःसत्यदयादानेष्वर्धं ह्रसति द्वापरे ॥ हिंसातुष्ट्यनृतद्वेषैर्धर्मस्याधर्मलक्षणैः ॥ २२ ॥
यशस्विनो महाशीलाः स्वाध्यायाध्ययने रताः ॥ आढ्याः कुटुंबिनो हृष्टा वर्णाः क्षत्रद्विजोत्तराः ॥ २३ ॥

हीयते (क्षीण होतो). ॥ २० ॥ नृप, तदा ब्रह्मोत्तराः वर्णाः क्रियातपोनिष्ठाः नातिहिंस्राः, नलंपटाः, त्रैवर्गिकाः, त्रयीवृद्धाः [च आसते] ॥ २१ ॥ द्वापरे हिंसातुष्ट्यनृतद्वेषैः अधर्मलक्षणैः धर्मस्य तपःसत्यदयादानेषु अर्धं ह्रसति (क्षीण होते). ॥ २२ ॥ (मू.) ॥ २३ ॥

योगानें हळूहळू क्षीण होत जातो. ॥ २० ॥ राजा, त्या वेळचे लोक कर्मनिष्ठ, तपस्वी, फारशी हिंसा न करणारे, अतिशय लंपट नाहीत असे, व धर्म, अर्थ आणि काम हे त्रिविध पुरुषार्थ साधण्यांत दक्ष असतात; त्या वेळच्या वर्णांत ब्राह्मण अधिक असून ते वेदत्रयीमध्यें (कर्मकांडांत) निष्णात असतात. ॥ २१ ॥ द्वापरयुगांत अधर्माचे चार पाद जे हिंसा, असंतोष, असत्य व द्वेष ह्यांच्या योगें तप, सत्य, दया व दान ह्या धर्माच्या चार चरणांतून अर्धा भाग नष्ट होतो. ॥ २२ ॥ त्या काळच्या लोकांना कीर्तीची फार आवड असते, ते स्वभावानें उदार, स्वाध्यायपठनांत रममाण, संपन्न, कुटुंबवत्सल व आनंदी असतात, त्या वेळीं वर्णांमध्यें क्षत्रिय व ब्राह्मण ह्यांचे प्राबल्य असतें ॥ २३ ॥

कलीमध्यें तर अधर्माचे चरण वाढत जाऊन त्यामुळें धर्माच्या चरणापैकीं चवथा भाग उरलेला असतो. - तशीच स्थिति साम्प्रत आहे. - व तो अवशिष्ट चतुर्थ अंशही क्षीण होत जाऊन शेवटी अगदीं नाहीसा होईल ! ॥ २४ ॥ त्या वेळचे (कलियुगातले) लोक म्हणजे लोभी, दुराचारी, निर्दय, शुष्क कर्मापाठी वैर करणारे, हतभागी व हावरे असतात. त्यांच्यामध्यें शूद्र आणि धीवर (मासे मारणारे) यांचें प्राबल्य असतें. ॥ २५ ॥ पुरुषाच्या ठिकाणीं सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण दिसून येतात व ते काळाकडून प्रेरणा मिळेल तसतसे क्रमानें आत्म्याच्या ठिकाणीं पालटून पालटून येत असतात. ॥२६॥ ज्या वेळीं मन, बुद्धि व इंद्रियें सत्त्वगुणाच्या ठिकाणीं अत्यंत प्रेमानें राहतात, त्या वेळ कलौ धर्महेतूनां तुर्यांशः एधमानैः (वाढणाऱ्या) अधर्महेतुभिः क्षीयमाण [भवति] अंते स अपि विनक्ष्यति. ॥ २४ ॥ (मू) ॥ २५ ॥ पुरुषे सत्त्व रज, तमः इति गुणाः दृश्यंते. ते कालसंचोदिताः [संत.] आत्मनि परिवर्तते. ॥ २६ ॥ मनोबुद्धींद्रियाणि यदा सत्त्वे प्रभवंति, तदा कृतयुग विद्यात्, यत् ज्ञाने, तपसि [च] रुचिः ॥ २७ ॥

कलौ तु धर्महेतूनां तुर्यांशो ऽधर्महेतुभिः ॥ एधमानैः क्षीयमाणो ह्यंते सो ऽपि विनंक्ष्यति ॥ २४ ॥

तस्मिन्लुब्धा दुराचारा निर्दयाः शुष्कवैरिणः ॥ दुर्भगा भूरितर्षाश्च शूद्रदाशोत्तराः प्रजाः ॥ २५ ॥

सत्त्वं रजस्तम इति दृश्यंते पुरुषे गुणाः ॥ कालसंचोदितास्ते वै परिवर्तंत आत्मनि ॥ २६ ॥

प्रभवंति यदा सत्त्वे मनोबुद्धींद्रियाणि च ॥ तदा कृतयुगं विद्याज्ज्ञाने तपसि यद्रुचिः ॥ २७ ॥

यदा धर्मार्थकामेषु भक्तिर्भवति देहिनाम् ॥ तदा त्रेता रजोवृत्तिरिति जानीहि बुद्धिमन् ॥ २८ ॥

यदा लोभस्त्वसंतोषो मानो दंभो ऽथ मत्सरः ॥ कर्मणां चापि काम्याना द्वापरं तद्रजस्तमः ॥ २९ ॥

यदा माया ऽनृतं तंद्रा निद्रा हिंसा विषादनम् ॥ शोको मोहो भयं दैन्यं स कलिस्तामसः स्मृतः ॥३०॥

बुद्धिमन्, यदा देहिनां काम्येषु कर्मसु भक्तिः भवति, तदा रजोवृत्तिः त्रेता इति जानीहि ॥ २८ ॥ यदा लोभः, असंतोषः, मानः, दंभः अथ मत्सरः काम्यानां अपि कर्मणां [विषये प्रीतिः] च [भवति], तत् रजस्तमः द्वापरं [जानीहि]. ॥ २९ ॥ यदा माया (कपट), अनृत, तंद्रा (आळस), निद्रा, हिंसा, विषादन, शोक, मोह, भय, दैन्य कृतयुग आहे असें समजावें. त्या युगात ज्ञान आणि तपश्चर्या ह्याविषयीं लोकाना प्रीति वाटत असते. ॥ २७ ॥ बुद्धिमता, ज्यावेळीं प्राण्याची भक्ति (मनाची ओढ) धर्म, अर्थ व काम ह्यांच्याकडे असते, तेव्हा त्रेतायुग चालू असतें असें जाण. ह्या युगात रजोगुणाचें प्राधान्य असावयाचें. ॥ २८ ॥ ज्या वेळीं लोभ, असंतोष, मान, दंभ व मत्सर ह्या विकाराचें प्राबल्य आणि सकाम कर्मे करण्याची रुचि ही असतील, तेव्हा द्वापर युग समजावें. ह्यात रज आणि तम ह्या मिश्र गुणाचें प्राबल्य असतें ॥ २९ ॥ कपट, असत्य

सूत उवाच । समाहितात्मनो ब्रह्मन्ब्रह्मणः परमेष्ठिनः ॥ हृद्याकाशादभून्नादो वृत्तिरोधाद्विभाव्यते ॥३७॥
यदुपासनया ब्रह्मन्योगिनो मलमात्मनः ॥ द्रव्यक्रियाकारकाख्यं धूत्वा यांत्यपुनर्भवम् ॥ ३८ ॥ ततो
ऽभूत्त्रिवृदोंकारो यो ऽव्यक्तप्रभवः स्वराट् ॥ यत्तल्लिंगं भगवतो ब्रह्मणः परमात्मनः ॥ ३९ ॥ शृणोति
य इमं स्फोटं सुप्तश्रोत्रे च शून्यदृक् ॥ येन वाग्व्यज्यते यस्य व्यक्तिराकाश आत्मनः ॥ ४० ॥

उच्चारिला जाणारा वर्ण वर्णमालेंत नाहीं करिता त्याचें सूक्ष्म वर्णन सांगतों :- ह्याचें उत्पत्तिस्थान अव्यक्त (स्पष्ट न कळणारें) आहे. हा स्वताच हृदयात प्रकाशित होतो. भगवान् परब्रह्म परमात्म्याचें (किंवा परमात्म्याला) हा (ओंकार) ज्ञान करून देतो. ॥३९॥ - परमात्मा कोणता तें ऐका- श्रोत्रेंद्रिय झोंपी गेलें असता (कानावर हात ठेवून ते घट्ट दाबून ठेविले असता) जो हा शब्द (हृदयातून निघणारा ॐकाररूप) ऐकतो तो परमात्मा होय. - तुह्मी ह्मणाल ' कान दाबले तरी जो शब्द ऐकूं येतो तो जीवच ऐकतो. ' तर तसें नाहीं; कारण, जीवाचें ज्ञान इंद्रियाधीन असतें; व ह्या वेळीं ऐकण्याचें इंद्रिय श्रोत्र झोंपी गेलेलें किंवा दाबून ठेविलेलें असतें, अर्थात तो शब्द जीवाला ऐकू येत

नाहीं, तर त्याचें श्रवण परमात्म्याच्या द्वारानेंच घडतें. परमात्म्याचें ज्ञान जीवाप्रमाणें इंद्रियाच्या अधीन नाहीं; कारण, - त्याच्या स्वरूपीं ईंद्रियेंच नाहीत. असो. त्या ओंका-
रापासून पुढे वाणी व्यक्त होते व त्याची व्याक्ति ह्दयाकाशात आत्म्यापासून आहे.॥ ४० ॥शिवाय, तो स्वनाच्या आश्रयभूत साक्षात् परब्रह्म परमात्म्याचा वाचक असून सर्व मंत्राचें,
उपनिषदाचें व वेदांचें बीज कारण होय. इतकें असून त्याचें स्वरूप सर्वदा एकसारखें (विकाररहित) आहे. ॥ ४१ ॥ भृगुकुलवरा, त्या ॐकाराचे वर्ण अकारादि तीन आहेत
त्या तीन वर्णांनीं ' तीन ' ह्या संख्येनें युक्त असे धर्म धारण केले जातात, ते धर्म सत्त्व रज तम हे तीन गुण, ऋक् यजुष् साम हे तीन वेद, भू: भुव: स्व हे तीन लोक व जा-
ग्रत् स्वप्न सुषुप्ति ह्या तीन अवस्था हे होत. ॥ ४२ ॥ त्या ॐकारापासून भगवान् जन्मरहित ब्रह्मदेवानें वर्णसमूह निर्मिला, त्या वर्णसमूहाची अन्तस्थ (य, र, ल, व), ऊष्मे-
सः स्वधाम्नः ब्रह्मणः परमात्मनः साक्षात् वाचक', सनातनं सर्वमंत्रोपनिषद्वेदबीजं ॥४१॥ भृगूद्वह, तस्य अकारादयः त्रय. वर्णा. अभवन, यै गुणनामार्थवृत्तय त्रय भावा
(धर्म) धार्यंते. ॥ ४२ ॥ भगवान् अजः ततः अंतस्थोष्मस्वरस्पर्शह्रस्वदीर्घादिलक्षण अक्षरसमाम्नाय (वर्णसमूहाप) असृजत् ॥ ४३ ॥ असौ विभु चातुर्होत्रविवक्षया चतुर्भिः

स्वधाम्नो ब्रह्मणः साक्षाद्वाचकः परमात्मनः ॥ स सर्वमंत्रोपनिषद्वेदबीजं सनातनम् ॥ ४१ ॥ तस्य ह्यासस्त्रयो वर्णा अकाराद्या
भृगूद्वह ॥ धार्यंते यैस्त्रयो भावा गुणनामार्थवृत्तयः ॥ ४२ ॥ ततो ऽक्षरसमाम्नायमसृजद्भगवानजः ॥ अंतस्थोष्मस्वरस्पर्शह्रस्वदी-
र्घादिलक्षणम् ॥ ४३ ॥ तेनासौ चतुरो वेदांश्चतुर्भिर्वदनैर्विभुः ॥ सव्याहृतिकान्सोंकारांश्चातुर्होत्रविवक्षया ॥ ४४ ॥ पुत्रानध्या-
पयत्तांस्तु ब्रह्मर्षीन्ब्रह्मकोविदान् ॥ ते तु धर्मोपदेष्टारः स्वपुत्रेभ्यः समादिशन् ॥ ४५ ॥ ते परंपरया प्राप्तास्तत्तच्छिष्यैर्धृतव्रतैः ॥
चतुर्युगेष्वथ व्यस्ता द्वापरादौ महर्षिभिः ॥ ४६ ॥

वदनैः सव्याहृतिकान् सोंकारान् चतुरः वेदान् असृजत् ॥४४॥ तान्, ब्रह्मकोविदान् ब्रह्मर्षीन् पुत्रान् अध्यापयत् (शिकविता झाला) धर्मोपदेष्टार ते तु स्वपुत्रेभ्य समादिशन्
(सामते झाले). ॥ ४५ ॥ ते परंपरया धृतव्रतैः तत्तच्छिष्यैः चतुर्युगेषु प्राप्ताः अथ महर्षिभिः द्वापरादौ (द्वापर आर्वी ज्याच्या अशा वेळीं, द्वापराच्या शेवटी) व्यस्ता. (विभागिले) ॥ ४६ ॥
(श, ष, स, ह) स्वर (अ, इ, उ इत्यादि), स्पर्श (क पासून म पर्यंत), ऱ्हस्व, दीर्घ, जिव्हामूलीय, उपध्मानीय इत्यादि लक्षणे होत. ॥ ४३ ॥ त्या वर्णसमूहाच्या योगें
सर्वव्यापी ब्रह्मदेवानें चार मुखाच्या योगें भू: भुवः स्वः महः जनः तप. सत्यं ह्या सप्त व्याहृतीसह ओंकारासुद्धा चार वेद निर्मिले; उद्देश इतकाच की त्याच्या योगे
चातुर्होत्र (चार ऋत्विजानी चालविलेलें यज्ञकर्म) केलें जावें. ॥ ४४ ॥ नंतर त्यानें (ब्रह्मदेवानें) ते वेद आपल्या मरीचिप्रभृति पुत्राला पढविले. हे ब्रह्मर्षि (ब्र-
ह्मदेवाचे पुत्र) वेदाचा उच्चार वगैरे करण्यात निष्णात होते. पुढें त्या धर्मोपदेशक मुनींनीं ते आपल्या पुत्राना शिकविले. ॥ ४५ ॥ अशा परंपरेने ते वेद, त्याच्या त्याच्या

शिष्यानीं यथाशास्त्र अर्थे पाळून, वागवून चतुर्युगात आणिले. द्वापरयुगाच्या शेवटीं महर्षींनी त्यांचे अनेक विभाग केले. ॥ ४६ ॥ कालगतीनें लोकांची आयुष्यमर्यादा कमी होत चालली, सत्व क्षीण झालें, व बुद्धिही दुष्ट बनल्या, हें पाहून ब्रह्मर्षींनीं वेदाचे विभाग पाडिले. - तरी पण मनुष्याच्या बुद्धीनें केले ह्मणून ते वेदभाग अनादरणीय झाले, असें ह्मणता येणार नाहीं; कारण, - ब्रह्मर्षींना त्यांच्या अंतरीं वसत असलेल्या अच्युताची तसें करण्याविषयीं प्रेरणा मिळाली होती, - अर्थात ते विभाग ईश्वरानेंच केले असें सिद्ध आहे. ॥ ४७ ॥ ब्रह्मन्, ह्या वैवस्वत मन्वंतरामध्येंही, ब्रह्मदेव, शंकर इत्यादि लोकपालानीं प्रार्थना केल्यावरून, जगन्नियता भगवान् धर्माचें मरक्षण करण्यासाठीं ॥ ४८ ॥

ब्रह्मर्षय. हृदिस्थाच्युतचोदिताः (अंतरीं राहणाऱ्या विष्णूनें प्रेरिलेले) [संतः] कालतः क्षीणायुषः क्षीणसत्वान् दुर्मेधान् [जनान्] वीक्ष्य वेदान् व्यस्यन् (विभागिते झाले) ॥ ४७ ॥ ब्रह्मन्, महाभाग, अस्मिन् अंतरे आपि लोकभावनः विभुः भगवान् ब्रह्मेशाद्यैः लोकपालैः धर्मगुप्तये (धर्माच्या रक्षणार्थ) याचितः (प्रार्थिलेला) [सन्] पराशरात् सत्यवत्यां अंशांशकलया (सत्वगुणांशानें) अवतीर्णः [सन्] वेदं चतुर्विधं चक्रे. ॥ ४८ ॥ ४९ ॥ ऋगथर्वयजुःसाम्नां राशीन् वर्गशः (विषयभेदानें) उद्धृ-

क्षीणायुषः क्षीणसत्त्वान्दुर्मेधान्वीक्ष्य कालतः ॥ वेदान्ब्रह्मर्षयो व्यस्यन्हृदिस्थाच्युतचोदिताः ॥ ४७ ॥ अस्मिन्नप्यंतरे ब्रह्मन्भगवाँ-
ल्लोकभावनः ॥ ब्रह्मेशाद्यैर्लोकपालैर्याचितो धर्मगुप्तये ॥ ४८ ॥ पराशरात्सत्यवत्यामंशांशकलया विभुः ॥ अवतीर्णो महाभाग
वेदं चक्रे चतुर्विधम् ॥ ४९ ॥ ऋगथर्वयजुःसाम्नां राशीनुद्धृत्य वर्गशः ॥ चतस्रः संहिताश्चक्रे मन्त्रैर्मणिगणा इव ॥ ५० ॥
तासां स चतुरः शिष्यानुपाहूय महामतिः ॥ एकैकां संहितां ब्रह्मन्नेकैकस्मै ददौ विभुः ॥ ५१ ॥ पैलाय संहितामाद्यां बह्वृचा-
ख्यामुवाच ह ॥ वैशंपायनसंज्ञाय निगदाख्यं यजुर्गणम् ॥ ५२ ॥

त्य (वेगळ्या निवडून काढून) मणिगणाः (रत्नसमूह) इव मंत्रैः चतस्रः संहिताः चक्रे. ॥ ५० ॥ ब्रह्मन्, महामतिः सः विभुः चतुरः (चार) शिष्यान् तासां एकैकां संहितां एकैकस्मै ददौ. ॥ ५१ ॥ पैलाय आद्यां बह्वृचाख्यां संहितां उवाच. वैशंपायनसंज्ञाय निगदाख्यं यजुर्गणं [ददौ]. ॥ ५२ ॥

पराशरापासून सत्यवतीच्या उदरीं मायेंतील सत्त्वगुणाच्या अंशानें व्यासरूपानें अवतरला, व हे महाभाग्यशाली पुरुषा, त्या समर्थानें वेदाचे चार भाग केले. ॥ ४९ ॥ जसा नाना जातींच्या रत्नांचा एक मोठा ढीग असावा व त्यांतून हिरे, माणकें वगैरे रत्नें निवडून काढून त्यांच्या, प्रत्येक जातीची वेगळी, अशा राशि कराव्या, त्याप्रमाणे व्यासानीं एका वेदराशीवरून ऋक्, यजुः, साम व अथर्व ह्यांच्या राशि भिन्नभिन्न प्रकरणाप्रमाणें निवडून काढून त्या मंत्रांच्या योगें त्यांच्या चार संहिता रचिल्या. ॥ ५० ॥ ब्रह्मन्, पुढें त्या महाबुद्धिवान् समर्थ पुरुषानें, चार शिष्यांना बोलावून, त्यांपैकीं एकएक एकेकाला दिली. ॥ ५१ ॥ बह्वृच (ऋग्वेद) नावाची आद्य संहिता पैलाला सांगितली, वैशंपायननामक

शिष्याला 'निगद' नांवाचा यजुर्वेद पढविला; ॥ ५२ ॥ तशीच चागल्या छंदावर गाइली जाणारी साम संहिता जैमिनीला शिकविली, व आपल्या सुमंतु शिष्याला अथर्वांगिरसी नावाची संहिता सागून दिली. ॥ ५३ ॥ पैलमुनीनें आपल्या सहितेचे दोन विभाग केले, पैकी एक त्याने इद्रप्रमितीला दिला व दुसरा बाष्कलाला शिकविला. बाष्कलानेंही आपली संहिता, ॥ ५४ ॥ तिचे चार माग करून, बोध्य, याज्ञवल्क्य, पराशर, व अग्निमित्र ह्या चौघाना दिली. बुद्धिमान् इद्रप्रमितीनें ॥ ५५ ॥ आपली सहिता माडूकेय ऋषीला शिकविली; ह्या विद्वान् ऋषि (माडूकेय) - इद्रप्रमितीचा पुत्र होय - माडूकेयाचा शिष्य जो देवमित्र त्यानें ती सौभर्यादिकाना शिकविली. ॥ ५६ ॥ माडूकेयाचा पुत्र

तथा साम्नां छंदोगसंहितां जैमिनये प्राह. "अथर्वांगिरसीं" नाम [संहितां] स्वशिष्याय सुमतवे [आह] ॥ ५३ ॥ पैल मुनि. स्वसहिता इद्रप्रमितये, बाष्कलाय च ऊचे भार्गव, सः अपि स्वकां संहितां चतुर्धा व्यस्य बोध्याय, याज्ञवल्क्याय, पराशराय, अग्निमित्रे [इति] शिष्येभ्यः आह. आत्मवान् इद्रप्रमिति. ॥ ५४ ॥ ५५ ॥ स्वां सहिता कविं मांडूकेयं ऋषिं अध्यापयत् (पढविता झाला) तस्य शिष्यः देवमित्रः सौभर्यादिभ्य ऊचिवान्. ॥ ५६ ॥ तत्सुत शाकल्य. ता सहिता पचधा व्यस्य वात्स्यमुद्गलशालीयगोखल्यशिशिरेषु अधात्. ॥५७॥ तच्छिष्य. जातूकर्ण्यः मुनि. सनिरुक्तां स्वसहितां बलाकपैजवैतालविरजेभ्यः ददौ ॥ ५८ ॥ बाष्कलिः प्रतिशाखाभ्यः वालखिल्याख्यसहिता चक्रे. बालायनिः, भज्यः कासारः च तां दधुः (वागविते झाले). ॥ ५९ ॥ एमि. ब्रह्मर्षिभि. एताः बहृचाः (पुष्कळ ऋचा ज्यात अशा, ऋग्वेदी) सहिताः धृता एतत् छदसा (वेदाचा) व्यासं (विस्तार) श्रुत्वा सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ६० ॥

साम्नां जैमिनये प्राह तथा छंदोगसंहिताम् ॥ अथर्वांगिरसीं नाम स्वशिष्याय सुमंतवे ॥ ५३ ॥ पैलः स्वसंहितामूच इंद्रप्रमितये मुनिः ॥ बाष्कलाय च सोप्याह शिष्येभ्यः संहितां स्वकाम् ॥ ५४ ॥ चतुर्धा व्यस्य बोध्याय याज्ञवल्क्याय भार्गव ॥ पराशरायाग्निमित्रे इंद्रप्रमितिरात्मवान् ॥ ५५ ॥ अध्यापयत्संहितां स्वां मांडूकेयमृषिं कविम् ॥ तस्य शिष्यो देवमित्रः सौभर्यादिभ्य ऊचिवान् ॥ ५६ ॥ शाकल्यस्तत्सुतः स्वां तु पंचधा व्यस्य संहिताम् ॥ वात्स्यमुद्गलशालीयगोखल्यशिशिरेष्वधात् ॥५७॥ जातूकर्ण्यश्च तच्छिष्यः सनिरुक्तां स्वसंहिताम् ॥ बलाकपैजवैतालविरजेभ्यो ददौ मुनिः ॥ ५८ ॥ बाष्कलिः प्रतिशाखाभ्यो वालखिल्याख्यसंहिताम् ॥ चक्रे बालायनिर्भज्यः कासारश्चैव तां दधुः ॥ ५९ ॥ बह्वृचाः संहिता ह्येता एभिर्ब्रह्मर्षिभिर्धृताः ॥ श्रुत्वैतच्छंदसां व्यासं सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ६० ॥

जो शाकल्य त्यानें आपल्या संहितेचे पाच विभाग करून ते वात्स्य, मुद्गल, शालीय, गोखल्य व शिशिर ह्या पाचाना शिकविले. ॥ ५७ ॥ शाकल्याचा शिष्य जो जातूकर्ण्य मुनि त्यानें निरुक्तासह आपली संहिता बलाक, पैज, वैताल व विरज ह्या चौघाना दिली. ॥५८॥ बाष्कलाच्या पुत्रानें, मागें सागितलेल्या सर्व शाखावरून वालखिल्य नावाची सहिता तयार केली. बालायनि, भज्य आणि कासार ह्यानीं ती अध्ययन करून वागविली. ॥ ५९ ॥ ह्या बहृच (ऋग्वेदी शाखेच्या) सहिता ह्या ब्रह्मर्षीनी धारण केल्या. ह्या वेदाचा वि-

त्यांचें श्रवण केला असता मनुष्य सर्व पापापासून मुक्त होतो. ॥ ६० ॥ वैशंपायनाचे शिष्य 'चरक अध्वर्यु' नावाचे होते. त्यांनी, आपल्या गुरूला जें करायला पाहिजे होतें, तें ब्रह्महत्येच्या पापाचा क्षय करणारें व्रत 'आचरण केलें' म्हणून - त्यांचें चरक असें नाव पडलें. - ॥ ६१ ॥ त्याचा (वैशंपायनाचा) शिष्य याज्ञवल्क्य म्हणाला — "अहो भगवन्, ह्यांच्या (दुसऱ्या शिष्यांच्या, चरकांच्या) शक्ति अगदी अल्प आहेत, ह्यांनीं केलेल्या व्रतानें उपयोग तो कितीसा होणार[1] मी आचरण करण्यास अत्यंत दुर्घट असें
वैशंपायनशिष्याः चरकाध्वर्यवः अभवन्. यत् गुरोः ब्रह्महत्यांहःक्षपण (ब्रह्महत्यारूप पापाचा क्षय करणारें) व्रत चेरुः (आचरिते झाले). ॥ ६१ ॥ तच्छिष्यः याज्ञवल्क्यः आह—"अहो भगवन्, अल्पसाराणां (थोडें सामर्थ्य ज्यांचें अशांच्या) चरितेन कियत् (केवढेंसें फळ)? अहं सुदुश्चरं चरिष्ये." ॥ ६२ ॥ इति उक्तः गुरुः अपि कुपितः [सन्]

वैशंपायनशिष्या वै चरकाध्वर्यवोऽभवन् ॥ यच्चेरुर्ब्रह्महत्यांऽहःक्षपणं स्वगुरोर्व्रतम् ॥ ६१ ॥ याज्ञवल्क्यश्च तच्छिष्य आहाहो भगवन्कियत् ॥ चरितेनाल्पसाराणां चरिष्येऽहं सुदुश्चरम् ॥ ६२ ॥ इत्युक्तो गुरुरप्याह कुपितो याह्यलं त्वया ॥ विप्रावमंत्रा शिष्येण मदधीतं त्यजाश्विति ॥ ६३ ॥ देवरातसुतः सोऽपि च्छर्दित्वा यजुषां गणम् ॥ ततो गतोऽथ मुनयो ददृशुस्तान्यजुर्गणान् ॥ ६४ ॥ यजूंषि तित्तिरा भूत्वा तल्लोलुपतयाऽऽददुः ॥ तैत्तिरीया इति यजुःशाखा आसन्सुपेशलाः ॥ ६५ ॥

"याहि (जा) विप्रावमंत्रा (ब्राह्मणाचा अवमान करणाऱ्या) शिष्येण त्वया अलं. मत् अधीत आशु त्यज" इति आह ॥ ६३ ॥ देवरातसुतः स अपि यजुषां गणं छर्दित्वा (ओकून) ततः गतः. अथ मुनयः तान् यजुर्गणान् ददृशुः. ॥ ६४ ॥ तल्लोलुपतया (त्याविषयीं लोभामुळें) तित्तिराः भूत्वा यजूंषि आददुः (स्वीकारिते झाले) [ताः] सुपेशलाः
व्रत करितों." ॥ ६२ ॥ याज्ञवल्क्य असें बोलला तेव्हां - चरकांना आला असेल ह्यात कांहीं आश्चर्य नाही पण - गुरुजीलाही क्रोध आला ते (वैशंपायन) म्हणाले .— "चालता हो. ब्राह्मणाचा अपमान करणाऱ्या शिष्याचा— तुझा— सबंध पुरे. मजजवळून अध्ययन केलेंस, तें लवकर टाकून दे." ॥ ६३ ॥ तो देवराताचा पुत्र(याज्ञवल्क्य)ही यजुर्वेदाचा समूह ओकून टाकून तेथून निघून गेला. पुढें ते यजुर्गण मुनींच्या दृष्टीस पडले, ॥ ६४ ॥ ऋषींच्या मनात त्याच्या प्राप्तीविषयीं लोभ उत्पन्न झाला, - पण ब्राह्मणानें

[1] ब्रह्महत्येचें कारण विष्णुपुराणात असें सांगितलें आहे
"पूर्वी एके दिवशीं मुनिगणांनीं अशी अट ठरविली होती कीं, आज जो ऋषि महामेरूवर समाजासह येईल, त्याच्या हातून सात रात्री गेल्या नाहींत तों ब्रह्महत्या घडेल ही अट एकट्या वैशंपायनानें मोडिली पुढें त्याच्या पायाचा स्पर्श घडून त्याच्या बहिणीचा मुलगा मरण पावला तेव्हां वैशंपायनानें शिष्यांना सांगितलें कीं, ब्रह्महत्येचें पाप घालविणारें व्रत आचरण करा"

वांति भक्षण करणें अनुचित, म्हणून - त्यांनीं तित्तिर पक्षी होऊन ते यजुर्गण भक्षण केले. ह्या कारणामुळें त्या यजुर्वेदाच्या अतिरम्य शाखांना तैत्तिरीय असें नांव पडलें ॥ ६५ ॥
ब्रह्मन्, पुढें याज्ञवल्क्यमुनीनें गुरूजवळ नाहीत (व्यासानें वैशंपायनाला विभागून सांगितले नाहींत) असे वेद शोधून काढण्यासाठीं भगवान् सूर्यनारायणाची उत्तम प्रकारें
स्तुति केली :— ॥ ६६ ॥ याज्ञवल्क्य म्हणाला :— (पुढील चार गद्यांत गायत्रीमंत्राचा अर्थ गुंफिला आहे) "भगवान् आदित्याला नमस्कार असो. सूर्यनारायणा, तू एकटाच ब्रह्म
देवापासून अतिक्षुद्र कीटकापर्यंत - उद्भिज्ज, स्वेदज, अंडज व जरायुज अशा - चार प्रकारच्या भूतसमुदायांनीं भरलेल्या सर्व जगाच्या अंतरीं आत्मरूपानें व बाहेरूनही काल-
लाः (अति सुंदर) तैत्तिरीयाः इति यजुःशाखाः आसन् ॥ ६५ ॥ ब्रह्मन्, ततः याज्ञवल्क्यः गुरोः अविद्यमानानि छंदांसि अधिगवेषयन् (शोधणारा) [सन्] अर्कं ईश्वरं उपतस्थे
(स्तविता झाला). ॥ ६६ ॥ याज्ञवल्क्यः उवाच—" ओं भगवते आदित्याय नमः, [यः] अखिलजगतां—ब्रह्मादिस्तंबपर्यंतानां (ब्रह्मदेवापासून स्तंबापर्यंत म्ह० क्षुद्रकिड्यापर्यंत) चतुर्वि-
धभूतनिकायानां (चार प्रकारच्या भूतसमुदायाच्या) अंतर्हृदयेषु आत्मस्वरूपेण, बहिः अपि कालस्वरूपेण— क्षणलवनिमेषोपचितसंवत्सरगणेन (उपचित म्ह० वाढविलेला) च [वर्त-

याज्ञवल्क्यस्ततो ब्रह्मंश्छंदांस्यधिगवेषयन् ॥ गुरोरविद्यमानानि सूपतस्थेऽर्कमीश्वरम् ॥६६॥ याज्ञवल्क्य उवाच । ओं नमो
भगवते आदित्यायाखिलजगतामात्मस्वरूपेण कालस्वरूपेण चतुर्विधभूतनिकायानां ब्रह्मादिस्तंबपर्यंतानामंतर्हृदयेषु बहिरपि
चाकाश इवोपाधिनाऽव्यवधीयमानो भवानेक एव क्षणलवनिमेषावयवोपचितसंवत्सरगणेनापामादानविसर्गाभ्यामिमां
लोकयात्रामनुवहति ॥ ६७ ॥ यदु ह वाव विबुधर्षभ सवितरदस्तपत्यनुसवनमहरहराम्नायविधिनोपतिष्ठमानानामखिलदु-
रितवृजिनबीजावभर्जन भगवतः समभिधीमहि तपनमंडलम् ॥ ६८ ॥

मानः] आकाशः इव उपाधिना अव्यवधीयमानः (न आच्छादिला जाणारा) भगवान् एकः एव अपां (उदकाच्या) आदानविसर्गाभ्यां (घेण्यासोडण्यानीं) इमां लोकयात्रां अनुवहति (चाल-
वितो) ॥ ६७ ॥ उह वाव विबुधर्षभ, सवितः, अहः अहः (प्रतिदिनीं) अनुसवनं (क्षणोक्षणीं) आम्नायविधिना उपतिष्ठमानानां अखिलदुरितवृजिनबीजावभर्जन, (सर्व पापाचीं
रूपानें वास करीत असतोस. अंतरीं राहतोस तरी पण तूं जीवाप्रमाणें उपाधीनें आच्छादिलेला नाहींस तर आकाशासारखा अलग सर्वव्यापी आहेस. तुझ्या बाह्य कालस्वरूपाची
क्षण, लव, निमेष इत्यादि अवयवांनीं भरलेले संवत्सरसमूह - हीं ठोकळ मानें होत, - त्याच्या योगें तूं उदक शोषून घेणें व त्याची वृष्टि करणें हीं कामें करून जगाची राहटी चा-
लवितोस. (ह्या गायत्रीच्या प्रथम चरणांतील वरेण्य पदाचा अर्थ झाला.) ॥६७॥ हे श्रेष्ठ देवा सवित्या, तुझें हें जें तेजोमंडळ प्रकाशत आहे, त्याचें आम्ही ध्यान करितों.

भगवंता, जे लोक त्रिकाळ वेदोक्त विधीप्रमाणें तुझें उपस्थान (स्तवन) करितात, त्यांचीं समस्त पापें, त्याचीं फळें दुःखें व त्याचें बीज अज्ञान तूं जाळून टाकितोस. (हा गायत्रीच्या पहिल्या चरणातील बाकीच्या पदाचा व दुसऱ्या चरणाचा अर्थ होय.) ॥ ६८ ॥ तो तूं स्वतः अंतर्यामी आत्मा होऊन ह्या विश्वांत स्थावरजंगमाचे समूह जे स्वाश्रय जीव त्याच्या मन, इंद्रिये व प्राणसमूह ह्या अचेतन (जड) वर्गाला प्रेरणा देतोस. (हा गायत्रीच्या तिसऱ्या चरणाचा अर्थ). ॥ ६९ ॥ तो अत्यंत दयाळू एकटा तूंच ज्याचा जबडा अत्यंत भयकर आहे, अशा अंधकारनामक मोठ्या अजगरपिशाचानें गिळून टाकिल्यामुळें हे लोक प्रेताप्रमाणें अचेतन होऊन पडले असें पाहून दयेनें केवळ आ-

व दुःखाचीं बीजें जाळणाऱ्या) तपन, यत् अदः भगवता मंडलं तपति, [तत्] समभिधीमहि (ध्यान करितों). ॥ ६८ ॥ यः स्वयं आत्मा अंतर्यामी [भवान्] निजनिकेतनानां (स्वाश्रय) स्थिरचरनिकराणां (स्थावर जंगम प्राण्याच्या समूहांचे) अनात्मनः (जड) मनइंद्रियासुगणान् प्रचोदयति (प्रेरणा देतो) ॥ ६९ ॥ यः एव परमकारुणिकः [भवान्] अतिकरालवदनांधकारसंज्ञाजगरगिलित (अति भयकर मुख ज्याचें असा अंधकारसंज्ञक जो अजगर त्यानें गिळलेल्या) इमं लोकं मृतक (प्रेत) इव विचेतनं विलोक्य अनुकंपया (दयेनें) ई-

य इह वाव स्थिरचरनिकराणां निजनिकेतनानां मनइंद्रियासुगणाननात्मनः स्वयमात्मांऽतर्यामी प्रचोदयति ॥ ६९ ॥ य एवेमं लोकमतिकरालवदनांधकारसंज्ञाजगरग्रहगिलितं मृतकमिव विचेतनमवलोक्यानुकंपया परमकारुणिक ईक्षयैवोत्थाप्याहरहरनुसवनं श्रेयसि स्वधर्माख्यात्मावस्थाने प्रवर्तयत्यवनिपतिरिवासाधूनां भयमुदीरयन्नटति ॥ ७० ॥ परित आशापालैस्तत्र तत्र कमलकोशांजलिभिरुपहृतार्हणः ॥ ७१ ॥

क्षया (दृष्टीनें) एव उत्थाप्य (उठवून) अहः अहः अनुसवनं स्वधर्माख्यात्मावस्थाने (स्वधर्म हें नाव ज्याचें असें जें आत्मस्वरूपीं राहणें म्ह० इंद्रियें अंतर्मुख करणें त्या) श्रेयसि प्रवर्तयति, अवनिपतिः (राजा) इव असाधूनां भयं उदीरयन् [सन्] अटति. ॥ ७० ॥ तत्र तत्र परितः कमलकोशांजलिभिः (कमळाचे कळे ओंजळींत ज्याच्या अशा) आशापालैः (दिग्पालनीं) उपहृतार्हणः (अर्पिली पूजा ज्याला असा) असि. ॥ ७१ ॥

पक्ष कटाक्ष फेंकून त्यांना जागृत करितोस व प्रतिदिनी वेळोवेळीं त्याला कल्याणमार्गाला लावितोस, तो कल्याणमार्ग म्हणजे आत्मस्वरूपाकडे लक्ष्य वळविणें हाच होय, ह्यालाच स्वधर्म अशी संज्ञा आहे. तसेंच नारायणा. जसा पृथ्वीपति (राजा) दुष्टाना शिक्षा करीत आपल्या राष्ट्रांत फिरतो, तसा तू असाधु जनाना भय दाखविण्यासाठीं भ्रमण करीत असतोस. (हा गायत्रीच्या तिसऱ्या चरणाचाच अर्थ). ॥ ७० ॥ दश दिशाकडून इंद्रादि दिग्पाळ ठिकठिकाणी ओंजळींत कमळाचे कळे घेऊन तुला पूजा अर्पण करितात. ॥ ७१ ॥

- तूं असा आहेस - म्हणून भगवंता, त्रिभुवनाच्या गुरूंनीं वंदिलेल्या तुझ्या चरणकमळाला मी, आपल्याला नूतन (दुसऱ्या कोणाला पूर्णपणें ठाऊक नाहींत असे) यजुर्वेद मिळावे, ह्या इच्छेनें भजत आहें. " ॥ ७२ ॥ सूत म्हणाले:— ऋषे, याज्ञवल्क्यानें अशी स्तुति करून प्रसन्न केलें असता, भगवान् सूर्यनारायणानें अश्वरूपानें प्रकट होऊन मुनीला नूतन यजुर्वेद दिले. ॥ ७३ ॥ पुढें त्या महासमर्थ मुनीनें त्या अपरिमित यजुर्मंत्राच्या पंधरा शाखा केल्या. अश्वरूपी सूर्यानें आपल्या 'वाजाच्या योगें त्या सन्यस्त' केल्या (घोड्याच्या मानेवरील केसास 'वाज' म्हणतात ; अर्थात मानेवरील केसाच्या योगें टाकिल्या. अथवा 'वाज' म्हणजे वेग चालण्याच्या वेगानें टाकिल्या) म्हणून त्यांना

अथ ह भगवन्, अहं अयातयामयजुःकामः (नाहीं लोटला प्रहर ज्यावर असे म्ह० नूतन यजुर्मंत्र इच्छिणारा) [सन्] त्रिभुवनगुरुभिः वंदितं तव चरणनलिनयुगलं उपसरामि " इति ॥ ७२ ॥ सूतः उवाच—एवं स्तुतः, प्रसादितः [च] सः भगवान् हरिः वाजिरूपधरः (घोड्याचे रूप धरणारा) [सन्] मुनये अयातयामानि (नूतन) यजूंषि अदात् ॥ ७३ ॥ विभुः यजुर्भिः दश पंच शाखाः अकरोत्. काण्वमाध्यंदिनादयः वाजसन्यस्ताः (घोड्याच्या केंसानीं किंवा वेगानें टाकिलेल्या) [ताः वाजसन्य] जगृहुः ॥ ७४ ॥ सामगस्य

अथ ह भगवंस्तव चरणनलिनयुगलं त्रिभुवनगुरुभिर्वंदितमहमयातयामयजुःकाम उपसरामीति ॥ ७२ ॥ सूत उवाच । एवं स्तुतः स भगवान्वाजिरूपधरो हरिः ॥ यजूंष्ययातयामानि मुनयेऽदात्प्रसादितः ॥७३॥ यजुर्भिरकरोच्छाखा दशपंचशतैर्विभुः ॥ जगृहुर्वाजसन्यस्ताः काण्वमाध्यंदिनादयः ॥ ७४ ॥ जैमिनेः सामगस्याऽऽसीत्सुमतुस्तनयो मुनिः ॥ सुन्वांस्तु तत्सुतस्ताभ्यामेकैकां प्राह संहिताम् ॥ ७५ ॥ सुकर्मा चापि तच्छिष्यः सामवेदतरोर्महान् ॥ सहस्रसंहिताभेदं चक्रे साम्नां ततो द्विजः ॥ ७६ ॥

हिरण्यनाभः कौशल्यः पौष्यंजिश्च सुकर्मणः ॥ शिष्यौ जगृहतुश्चान्य आवन्त्यो ब्रह्मवित्तमः ॥ ७७ ॥

जैमिनेः सुमंतुः तनयः मुनिः. तत्सुतः सुन्वान् ताभ्यां एकैकां संहितां प्राह ॥ ७५ ॥ तच्छिष्यः महान् सुकर्मा द्विजः अपि साम्नां सहस्र संहिताभेदं चक्रे ततः ॥ ७६ ॥ सुकर्मणः शिष्यौ कौशल्यः हिरण्यनाभः, पौष्यंजिः च जगृहतुः. अन्यः आवंत्यः ब्रह्मवित्तमः च जग्राह. ॥ ७७ ॥

'वाजसनी' असें नांव पडलें. त्या शाखा काण्व, माध्यंदिन इत्यादिकांनीं घेतल्या. ॥ ७४ ॥ साम गायन करणाऱ्या जैमिनीला सुमतु नावाचा मुनि पुत्र होता. त्याचा मुलगा सुन्वान्. जैमिनीनें सामसंहितेचे दोन भाग करून ते ह्या दोघांना (मुलाला व नातवाला) प्रत्येकाला एक एक असे शिकविले. ॥ ७५ ॥ जैमिनीचा सुकर्मा म्हणून एक महाबुद्धिमान् शिष्य होता. त्यानेंही सामवेदरूप वृक्षाचे सहस्र संहिताभेद केले. ते सामाचे संहिताभेद कौशल्य हिरण्यनाभ ब्राह्मण व पौष्यंजि ह्या उभयतानी स्वीकारिले. हे दोघेही सुकर्म्याचे

शिष्य होते. तसेंच आवंत्य ह्मणून दुसरा एक उत्तम ब्रह्मज्ञानी असा सुकर्म्याचा शिष्य होता, त्यानेंही त्याचे अध्ययन केलें. ॥ ७६ ॥ ७७ ॥ पौष्यंजि, आवंत्य व हिरण्यनाभ ह्यांचे सामगायन करणारे पाचशें शिष्य होते. त्यांनीं तेवढ्या शाखा यथाविभाग वाटून घेतल्या. ते उदीच्य (उत्तर दिशेकडे राहणारे) असूनही कालगतीनें लोक त्याना प्राच्य (पूर्वेकडील, प्राचीन) ह्मणूं लागले. ॥ ७८ ॥ लौगाक्षि, मागलि, कुल्य, कुशीद व कुक्षि ह्या पौष्यंजीच्या शिष्यांनीं शंभर शंभर शाखा घेतल्या, ॥ ७९ ॥ हिरण्यनामाचा शिष्य जो कृत, त्यानें चोवीस संहिता आपल्या शिष्याना सांगितल्या. बाकीच्या प्रसिद्ध संहिता आत्मज्ञानी अशा आवत्यानें आपल्या शिष्याना शिकविल्या (ह्या

पौष्यंज्यावंत्ययोः च अपि उदीच्याः (उत्तरेकडील) सामगाः शिष्याः पंच शतानि आसन्. तान् प्राच्यान् (पूर्वेकडील) प्रचक्षते (ह्मणतात). ॥ ७८ ॥ लौगाक्षिः, मागलिः, कुल्यः, कुशीदः, कुक्षिः एव च इति ते पौष्यजिशिष्याः शतं शतं संहिताः जगृहुः. ॥ ७९ ॥ हिरण्यनाभस्य शिष्यः कृतः स्वशिष्येभ्यः चतुर्विंशतिसंहिताः ऊचे. आत्मवान्

उदीच्याः सामगाः शिष्या आसन्पंचशतानि वै ॥ पौष्यंज्यावंत्ययोश्चापि तांश्च प्राच्यान्प्रचक्षते॥७८॥लौगाक्षिर्मागलिः कुल्यः कुशीदः कुक्षिरेव च ॥ पौष्यंजिशिष्या जगृहुः संहितास्ते शतं शतम् ॥७९॥ कृतो हिरण्यनाभस्य चतुर्विंशतिसंहिताः ॥ शिष्य ऊचे स्वशिष्येभ्यः शेषा आवंत्य आत्मवान् ॥ ८० ॥ इति श्रीभागवते महापुराणे द्वादशस्कंधे वेदशाखाप्रणयनं नाम षष्ठो ऽध्यायः ॥ ६ ॥ सूत उवाच । अथर्ववित्सुमंतुश्च शिष्यमध्यापयत्स्वकाम् ॥ संहितां सो ऽपि पथ्याय वेददर्शाय चोक्तवान् ॥ १ ॥ शौक्लायनिर्ब्रह्मबलिर्मोदोषः पिप्पलायनिः ॥ वेददर्शस्य शिष्यास्ते पथ्यशिष्यानथो शृणु ॥ कुमुदः शुनको ब्रह्मञ्जाजलिश्चाप्यथर्ववित् ॥ २ ॥

(बुद्धिमान्) आवत्यः [स्वशिष्येभ्यः] शेषाः [ऊचे]. ॥ ८० ॥ ॥ इति श्रीभागवतान्वये द्वादशस्कंधे षष्ठोऽध्याय. ॥ ६ ॥

सूतः उवाच— अथर्ववित् सुमंतुः शिष्यं स्वकां संहितां अध्यापयत् (शिकविता झाला). सः अपि पथ्याय, वेददर्शाय च उक्तवान्. ॥ १ ॥ शौक्लायनिः, ब्रह्मबलि, मोदोष,

रीतीनें सामसंहितेच्या अनंत शाखा झाल्या). ॥ ८० ॥ ॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने द्वादशस्कंधे षष्ठो ऽध्यायः ॥ ६ ॥

सूत ह्मणाले :— शौनका, अथर्ववेद जाणणारा जो सुमंतु त्यानें आपली संहिता आपल्या - कबंध नांवें - शिष्याला पढविली. त्यानेंही - तिचे दोन भाग करून - एक पथ्याला व एक वेददर्शाला अशी सांगितली. ॥ १ ॥ वेददर्शाचे शिष्य चार :— त्यांचीं नावें शौक्लायनि, ब्रह्मबलि, मोदोष व पिप्पलायनि हीं होत. आता पथ्याचे शिष्य सांगतों एक

ब्रह्मवर्चा, कुमुद, शुनक व जाजलि हे पथ्याचे तीन शिष्य होत. ॥ २ ॥ पुढें अंगिरा (शुनक) ऋषीचे बभ्रु व सैंधवायन हे दोन शिष्य अथर्वाच्या दोन संहिता शिकले. तसेच पुढें दुसरे सावर्णि इत्यादि - सैंधवायनादिकाचे शिष्य झाले. - ॥ ३ ॥ नक्षत्रकल्प, शांतिकल्प, कश्यपकल्प व आंगिरसकल्प इत्यादि ग्रंथाचे कर्ते त्या त्या नावाचे ऋषि हे अथर्ववेदाचे आचार्य होत. मुने, आता पौराणिक कोणते, तें सांगतों, ऐक.— ॥ ४ ॥ त्रय्यारुणि, कश्यप, सावर्णि, अकृतव्रण, वैशंपायन व हारीत हे सहा पौराणिक होत. ॥ ५ ॥ हे सहाजण, व्यासाचा शिष्य व माझा पिता जो रोमहर्षण त्यापासून, एक एक पुराणसंहिता शिकले (प्रथम व्यासांनी सहा संहिता तयार करून रोमहर्षणाला शि-

पिप्पलायनिः इति ते वेददर्शस्य शिष्याः. ब्रह्मन् अथो पथ्यशिष्यान् शृणु (मू) ॥२॥ अथ आंगिरसः शिष्यः बभ्रुः, सैंधवायनः एव च द्वे संहिते अधीयेतां, तथा अपरे साव-र्ण्यादयः [च अधीयेरन्] ॥ ३ ॥ मुने, नक्षत्रकल्पः, शांतिः, कश्यपांगिरसादयः च एते आथर्वणाचार्याः पौराणिकान् शृणु. ॥ ४ ॥ (मू) ॥ ५ ॥ व्यासशिष्यात् मत्पितु-

बभ्रुः शिष्योऽथांगिरसः सैंधवायन एव च ॥ अधीयेतां संहिते द्वे सावर्ण्याद्यास्तथाऽपरे ॥३॥ नक्षत्रकल्पः शांतिश्च कश्यपांगिरसादयः ॥
एते आथर्वणाचार्याः शृणु पौराणिकान्मुने ॥४॥ त्रय्यारुणिः कश्यपश्च सावर्णिरकृतव्रणः ॥ वैशंपायनहारीतौ षड्वै पौराणिका इमे ॥ ५ ॥
अधीयंत व्यासशिष्यात्संहितां मत्पितुर्मुखात् ॥ एकैकामहमेतेषां शिष्यः सर्वाः समध्यगाम् ॥ ६ ॥ कश्यपोऽहं च सावर्णी रामशिष्यो
ऽकृतव्रणः ॥ अधीमहि व्यासशिष्याच्चतस्रो मूलसंहिताः ॥७॥ पुराणलक्षणं ब्रह्मन्ब्रह्मर्षिभिर्निरूपितम् ॥ शृणुष्व बुद्धिमाश्रित्य वेदशास्त्रानु-
सारतः ॥ ८ ॥ सर्गोऽस्याथ विसर्गश्च वृत्तिरक्षांतराणि च ॥ वंशो वंशानुचरितं संस्था हेतुरपाश्रयः ॥ ९ ॥

र्मुखात् एकैकां संहितां अधीयंत. एतेषां शिष्यः अहं सर्वाः समध्यगां (शिकलों) ॥ ६ ॥ कश्यपः, सावर्णिः, रामशिष्यः अकृतव्रणः, अहं च व्यासशिष्यात् चतस्रः मूलसंहिताः अधीमहि. ॥ ७ ॥ ब्रह्मन्, ब्रह्मर्षिभिः वेदशास्त्रानुसारतः निरूपितं पुराणलक्षणं बुद्धिं आश्रित्य (लक्ष्य लावून) शृणु ॥ ८ ॥ अस्य सर्गः, विसर्गः, वृत्तिरक्षांतराणि, वंशः, वं-

कविल्या, नंतर हे सहाजण रोमहर्षणापासून एक एकजण एक एक संहिता शिकले) मी ह्या सहाहीजणांचा शिष्य होऊन त्या सगळ्या संहिता शिकलों. ॥६॥ कश्यप, मी (सूत) सावर्णि व रामशिष्य अकृतव्रण इतकेजण व्यासाच्या शिष्यापाशीं (रोमहर्षणाजवळ) चार मूळसंहिता पढलों (मूळसंहिता म्हटलें ह्यावरून संहिता पुष्कळ आहेत हें सूचित होतें). ॥ ७ ॥ ब्रह्मन्, ब्रह्मर्षींनीं पुराणाचें लक्षण वेदशास्त्राच्या अनुरोधानें सांगून ठेविलें आहे, तें - मी तुला निवेदन करितों. लक्ष्य लावून ऐकून घे. ॥ ८ ॥ (१) ह्या विश्वाचा सर्ग, (२) विसर्ग, (३) वृत्ति, (४) रक्षा, (५) मन्वंतरें, (६) वंश, (७) वंशानुचरित, (८) संस्था, (९) हेतु आणि (१०) आश्रय (ह्या दहा लक्ष-

---

१ द्वितीयस्कंधाच्या दहाव्या अध्यायांत शुकपरीक्षित्संवादामध्यें 'अत्र सर्गो विसर्गश्च स्थानं पोषणमूतयः ॥ मन्वंतरेशानुकथा निरोधो मुक्तिराश्रय ' असें पुराणाचें लक्षण सांगितलें आहेच. पण त्यांतील भेद लक्षांत यावा म्हणूनच येथें पुन्हा विस्तृत विवेचन केलें आहे.

णांच्या व्याख्या पुढें अनुक्रमानें दिल्या आहेतच.) ॥ ९ ॥ ह्या दहा लक्षणांनी युक्त जें असेल, त्याला विद्वान् लोक पुराण असें समजतात. ब्रह्मन् कोणी - (१) सर्ग (२) प्रतिसर्ग, (३) वंश, (४) मन्वंतरें (५) वंशानुचरित अशीं - पाच प्रकारांचीच लक्षणें वर्णिलीं आहेत. त्यातील व्यवस्था, ज्यात दहा लक्षणांचें वेगवेगळें निरूपण असेल तें महापुराण व ज्यात पाच लक्षणांचें मुख्यत्वें विवेचन असून यांचाचा त्याच्या पोटीं अंतर्भाव असेल तें अल्पपुराण, अशी समजावी ॥ १० ॥ (१) प्रकृती-च्या गुणामध्यें न्यूनाधिकपणा उत्पन्न होऊन तीपासून महत्तत्त्व, त्यापासून त्रिगुणात्मक अहंकार, त्यापासून पाच सूक्ष्मभूतें, इंद्रियें स्थूल भूतें व देवता ह्यांची उत्पत्ति

ईशानुचरितं, संस्था, हेतुः, अपाश्रयः च ॥ ९ ॥ [इति] दशभिः लक्षणैः युक्तं पुराणं तद्विदः विदुः केचित् महदल्पव्यवस्थया पचविधं [आहुः] ॥ १० ॥ अव्याकृतगुण-क्षोभात् (प्रकृतीच्या गुणांत न्यूनाधिकता झाली म्हणून) महतः त्रिवृतः अहमः भूतसूक्ष्मेंद्रियार्थानां संभवः सर्गः उच्यते. ॥ ११ ॥ पुरुषानुगृहीतानां एतेषां वासनामयः अयं समाहारः (समूह) बीजात् बीजं [इव] चराचर विसर्गः [उच्यते]. ॥ १२ ॥ चराणां भूतानां अचराणि (स्थावर) भूतानि वृत्तिः (उपजीवन). तत्र नृणां स्वेन, कामात् (इच्छेने)

दशभिर्लक्षणैर्युक्तं पुराणं तद्विदो विदुः ॥ केचित्पंचविधं ब्रह्मन्महदल्पव्यवस्थया ॥ १० ॥ अव्याकृतगुणक्षोभान्महतस्त्रिवृतो ऽहमः ॥ भूतमात्रेन्द्रियार्थानां संभवः सर्ग उच्यते ॥ ११ ॥ पुरुषानुगृहीतानामेतेषां वासनामयः ॥ विसर्गो ऽयं समाहारो बीजाद्बीजं चराचरम् ॥ १२ ॥ वृत्तिर्भूतानि भूतानां चराणामचराणि च ॥ कृता स्वेन नृणा तत्र कामाच्चोदनया ऽपि वा ॥१३॥ रक्षा ऽच्युतावतारेहा विश्वस्याऽनुयुगे युगे ॥ तिर्यङ्मर्त्यर्षिदेवेषु हन्यंते यैस्त्रयीद्विषः ॥ १४ ॥ मन्वंतरं मनुर्देवा मनुपुत्राः सुरेश्वरः ॥ ऋषयोंऽशावतारश्च हरेः षड्विधमुच्यते ॥ १५ ॥

चोदनया (प्रेरणेनें) अपि वा [या जीविका] कृता, [सा वृत्ति.] ॥ १३ ॥ अनुयुगे, युगे तिर्यङ्मर्त्यर्षिदेवेषु अच्युतावतारेहा (प्रभूची अवतारलीला) विश्वस्य रक्षा (रक्षण) [उच्यते], यैः त्रयीद्विषः (वेदाचे शत्रु) हन्यते (मारिले जातात). ॥ १४ ॥ मनुः, देवाः, मनुपुत्राः, सुरेश्वरः, ऋषयः, हरेः अंशावताराः च षड्विधं मन्वंतरं उच्यते ॥ १५ ॥ झाला सर्ग असें म्हणतात. ॥ ११ ॥ (२) ह्या तत्त्वावर ईश्वराचा अनुग्रह झाला असता त्यापासून पूर्वकर्मानुरूप स्थावरजंगमात्मक कार्यसमूह उद्भवून बीजापासून दुसरें बीज असा सृष्टिप्रवाह चालू होणें झाला विसर्ग असें म्हणतात. ॥ १२ ॥ (३) चर (जंगम) प्राण्यांची उपजीविका सामान्यतः चराचर भूतावर चालते. त्यात मनुष्याची स्व-भावतः, इच्छेनुसार अथवा प्रेरणेनेंही एखादी उपजीविका ठरविलेली असते, तिला ' वृत्ति ' असें म्हणतात. ॥ १३ ॥ (४) युगायुगाच्या ठिकाणी तिर्यग्योनि, मनुष्य, ऋषि किंवा देव ह्यामध्यें परमेश्वर अवतार घेऊन ज्या लीला करितो, तें विश्वाचें ' रक्षण ' होय. ते अवतार वेदाचा द्वेष करणाऱ्या दैत्याचा वध करितात. ॥ १४ ॥ (५) मनु, देव, म-

नूंचे पुत्र, देवेंद्र, ऋषि व ईश्वराचा अंशावतार हे सहा वर्ग - आपआपल्या अधिकारावर असून कामें चालवीत असतात - तें मन्वंतर होय. ॥ १५ ॥ (६) ब्रह्मदेवापासून जन्म-
लेल्या (शुद्ध) राजाचा जो तीन्ही काळी चालणारा वंश, त्याला ' वंश' असें ह्मणतात. (७) त्याचें व त्याच्या वंशात जन्मलेल्या पुरुषांचें जे चरित्र, तें ' वंशानुचरित ' होय.
॥ १६ ॥ (८) ह्या विश्वाचा मायेच्या योगें नैमित्तिक, प्राकृतिक, नित्य व आत्यंतिक असा चार [1]प्रकारानी लय होणें, ह्याला विद्वान् लोक ' संस्था ' ह्मणतात ॥ १७ ॥
(९) ह्या जगाचे उत्पत्ति वगैरे होण्याला निमित्त जो जीव व जो अविद्येच्या योगें कर्में करीत असतो, त्याला ' हेतु ' असें ह्मटलें आहे (विश्वाची सृष्टि वगैरे जीवाच्या

ब्रह्मप्रसूतानां (ब्रह्मदेवापासून जन्मलेल्या, शुद्ध) राज्ञां त्रैकालिकः (तीन्ही काळीं चालणारा) अन्वयः वंशः. तेषां, ये वंशधराः, [तेषां] च वृत्तं (चरित्र) वंशानुचरितं ॥ १६ ॥
कविभिः (विद्वानांनीं) अस्य स्वभावतः नैमित्तिकः, प्राकृतिकः, नित्यः, आत्यंतिकः [च] चतुर्धा लयः. " संस्था " इति प्रोक्ता. ॥ १७ ॥ अविद्याकर्मकारकः (अज्ञानामुळे कर्में कर-

राज्ञां ब्रह्मप्रसूतानां वंशस्त्रैकालिको ऽन्वयः ॥ वंशानुचरितं तेषां वृत्तं वंशधराश्च ये ॥१६ ॥ नैमित्तिकः

प्राकृतिको नित्य आत्यंतिको लयः ॥ संस्थेति कविभिः प्रोक्ता चतुर्धा ऽस्य स्वभावतः ॥ १७ ॥

हेतुर्जीवो ऽस्य सर्गादेरविद्याकर्मकारकः ॥ यं चानुशयिनं प्राहुरव्याकृतमुतापरे ॥ १८ ॥ व्यतिरेकान्वयो

यस्य जाग्रत्स्वप्नसुषुप्तिषु ॥ मायामयेषु तद्ब्रह्म जीववृत्तिष्वपाश्रयः ॥ १९ ॥

णारा) जीवः अस्य सर्गादेः हेतुः, य अनुशयिनं (खेळत पडणारा) प्राहुः. उत अपरे अव्याकृतं [आहुः] ॥ १८ ॥ यस्य मायामयेषु जाग्रत्स्वप्नसुषुप्तिषु जीववृत्तिषु (जीव ना-
वानें वर्तणाऱ्या विश्व-तैजस-प्राज्ञांत) अन्वयव्यतिरेकौ, तत् ब्रह्म अपाश्रयः उच्यते. ॥ १९ ॥

पूर्व कर्माचें फळ मिळण्यासाठीं होते ह्मणून त्याला सृष्टीचा हेतु ह्मणतात). त्यालाच कोणी ' [2]अनुशयी ' व दुसरे ' [3]अव्याकृत ' असें ह्मणतात ॥ १८ ॥ (१०) जागृति,
स्वप्न आणि निद्रा ह्या अवस्थामध्यें जीवत्वानें असणारे जे विश्व, तैजस व प्राज्ञ त्या मायामय तिघामध्यें साक्षिरूपानें परब्रह्मच असते (हा परब्रह्माचा विश्वात अन्वय), व स-
माधीमध्यें मायामय कोणतेही पदार्थ नसताना ब्रह्माचा साक्षात्कार असतो (हा व्यतिरेक) अशा प्रकारें अन्वयव्यतिरेकानीं - संसाराच्या प्रतीतीला आधार व नाशाचा अवधि हो-

---

१ ह्या चारी प्रकारच्या प्रळयाचें विस्तृत विवेचन ह्याच स्कंधाच्या चवथ्या अध्यायात आहे, तें पहावें. २ कर्माचें फळ भोगणारा. चैतन्यांश प्रधान मानून हे नाव दिले आहे ३ अवर्णनीय. हे प्रकृतीचें नाव आहे. ही जीवाचा उपाधि. उपाधि प्रधान मानून जीवाला हें नाव दिलें आहे.

उन राहिलेले - जें ब्रह्म तें 'आश्रय' होय. ॥ १९ ॥ - ह्याला दृष्टांत पहा:— मृत्तिका इत्यादि द्रव्य घटादि पदार्थांमध्यें तद्रूपानें प्रविष्ट झालेलें असतें (हा मृत्तिकेचा अन्वय) व घटाहून वेगळेंही बाहेर असतेंच (हा मृत्तिकेचा घटांत व्यतिरेक); घट, शराव इत्यादि नावामध्यें व त्याच्या वाटोळ्या आडव्या उभ्या रूपात तें द्रव्य (मृत्तिका) नुसतें सत्तारूपानेंच असतें. त्याप्रमाणें गर्भाधानापासून मरणापर्यंत सर्व अवस्थात ब्रह्म प्रविष्ट (अन्वित) असून अप्रविष्टही आहे. तेंच 'आश्रय' होय. ॥ २० ॥ ज्या वेळी पुरुष - वामदेवादिकांप्रमाणें हे सर्गादिक मायामय होत असें अनुसंधान केल्यामुळें, किंवा ह्या लोकींच आचरिलेल्या - योगसाधनानें जागृत्यादि तीन्ही वृत्ति सोडून विराम पावेल,

यथा पदार्थेषु द्रव्यं, रूपनामसु सन्मात्रं [यो, तथा] बीजादिपंचतांतासु (उत्पत्तीपासून मरणापर्यंतच्या) अवस्थासु [यत्] युतायुत, [तत् अपाश्रयः उच्यते] ॥ २० ॥ यदा चित्तं वृत्तित्रयं (तीन्ही अवस्था) हित्वा (सोडून) योगेन वा स्वयं विरमेत, तदा आत्मानं वेद, [ततः] ईहायाः (संसारापासून) निवर्तते ॥ २१ ॥ पुराविदः मुनयः एवं लक्षण-

पदार्थेषु यथा द्रव्यं सन्मात्रं रूपनामसु ॥ बीजादिपंचतांतासु ह्यवस्थासु युतायुतम् ॥ २० ॥ विरमेत यदा चित्तं हित्वा वृत्तित्रयं स्वयम् ॥ योगेन वा तदाऽऽत्मानं वेदेहाया निवर्तते ॥ २१ ॥ एवं लक्षणलक्ष्याणि पुराणानि पुराविदः ॥ मुनयोऽष्टादश प्राहुः क्षुल्लकानि महांति च ॥ २२ ॥ ब्राह्मं पाद्मं वैष्णवं च शैवं लैंगं सगारुडम् ॥ नारदीयं भागवतमाग्नेयं स्कांदसंज्ञितम् ॥ २३ ॥ भविष्यं ब्रह्मवैवर्तं मार्कंडेयं सवामनम् ॥ वाराहं मात्स्यं कौर्मं च ब्रह्मांडाख्यमिति त्रिषट् ॥ २४ ॥ ब्रह्मन्निदं समाख्यातं शाखा-प्रणयनं मुनेः ॥ शिष्यशिष्यप्रशिष्याणां ब्रह्मतेजोविवर्धनम् ॥ २५ ॥ इति श्रीभा० महा० द्वादशस्कंधे सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

लक्ष्याणि क्षुल्लकानि, महांति च अष्टादश पुराणानि प्राहुः ॥२२॥ (सू.) ॥२३॥२४॥ ब्रह्मन्, ब्रह्मतेजोविवर्धनं इदं मुनेः शिष्यशिष्यप्रशिष्याणां शाखाप्रणयनं समाख्यातं ॥ २५ ॥
॥ इति श्रीमद्भागवतान्वये द्वादशस्कंधे सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

त्यावेळीं त्याला आत्म्याचें ज्ञान होतें व तो संसाररूप सदसद्दोषांतून मुक्त होतो. ॥ २१ ॥ ह्या लक्षणाची लक्ष्य अशीं पुराणें प्राचीन विद्वान् मुनींनी लहान व मोठीं अठरा सांगितलीं आहेत:— ॥ २२ ॥ ब्राह्म, पाद्म, वैष्णव, शैव, लिंग, गारुड, नारदीय, भागवत, आग्नेय, स्कांदसंज्ञक, ॥ २३ ॥ भविष्य, ब्रह्मवैवर्त, मार्कंडेय, वामन, वाराह, मात्स्य, कौर्म, व ब्रह्मांडसंज्ञक मिळून अठरा. ॥ २४ ॥ ब्रह्मन्, व्यासमुनि, त्याचे शिष्य, शिष्याचे शिष्य व शिष्याच्या शिष्याचे शिष्य ह्यांनी शाखा कशा रचिल्या, तो हा प्रकार मी तुला सांगून दिला. - जे लोक हा श्रवण करितात, त्यांचें ब्रह्मतेज वृद्धिंगत होतें. ॥ २५ ॥

शौनक ह्मणाले :— बा सत्पुरुषा सूता, तूं वक्त्यांत श्रेष्ठ आहेस. अपरंपार अज्ञानांधकारांत भ्रमण करणाऱ्या पुरुषांना तूं पार दाखविणारा (त्यांचें अज्ञान घालविणारा) होस आता आह्मी विचारितों ती कथा सांग. ॥ १ ॥ लोक मृकंडाचा पुत्र जो मार्कंडेय ऋषि त्याला ' चिरायु ' असें ह्मणतात. कल्पांतकालानें सर्व जग ग्रासून टाकिलें, पण त्या वेळी तो अवशिष्ट राहिला, - हें घडलें कसें ? - ॥ २ ॥ तो चालू कल्पात आमच्या कुलामध्यें जन्मला हें उघड आहे, कारण त्याला ' भार्गवर्षभ (भार्गव वंशातील श्रेष्ठ) ' असें ह्मण तात. बरें ह्या कल्पांत अद्याप भुताचा नैमित्तिक किंवा प्राकृतिक कोणताही लय झालाच नाहीं. - मग मार्कंडेयाची ती कथा खरी कशी मानावी ? - ॥३॥ तो एकटाच समुद्रात भ-

शौनक. उवाच— सूत, साधो, चिरं जीव वदतांवर, न. वद. त्वं अपारे तमसि (अज्ञानांत) भ्रमतां (भटकणाऱ्या) नृणां पारदर्शनः [असि] ॥ १ ॥ जनाः मृकंडतनय ऋषिं चिरायुषं आहुः. यः कल्पांते उर्वरितः (अवशिष्ट राहिलेला), येन इदं जगत् ग्रस्तं ॥२॥सः अस्मिन् कल्पे अस्मत्कुलोत्पन्नः [यत.] भार्गवर्षभ. अधुना अपि भूताना क. अपि

शौनक उवाच । सूत जीव चिरं साधो वद नो वदतांवर ॥ तमस्यपारे भ्रमतां नृणां त्वं पारदर्शनः॥१॥
आहुश्चिरायुषमृषिं मृकंडतनयं जनाः ॥ यः कल्पांते उर्वरितो येन ग्रस्तमिदं जगत् ॥ २ ॥ स वा
अस्मत्कुलोत्पन्नः कल्पे ऽस्मिन्भार्गवर्षभः ॥ नैवाधुना ऽपि भूतानां संप्लवः को ऽपि जायते ॥ ३ ॥ एक
एवार्णवे भ्राम्यन्ददर्श पुरुषं किल ॥ वटपत्रपुटे तोकं शयानं त्वेकमद्भुतम् ॥ ४ ॥ एष नः संशयो
भूयान्सूत कौतूहलं यतः ॥ तं नश्छिंधि महायोगिन्पुराणेष्वपि संमतः ॥ ५ ॥ सूत उवाच । प्रश्नस्त्वया
महर्षे ऽयं कृतो लोकभ्रमापहः ॥ नारायणकथा यत्र गीता कलिमलापहा ॥ ६ ॥

संप्लवः (प्रलय) न एव जायते. ॥३॥ एकः एव अर्णवे (समुद्रात) भ्राम्यन् (फिरणारा) [सन्] वटपत्रपुटे शयानं एक अद्भुत तोकं (लहान) पुरुषं ददर्श. ॥ ४ ॥ सूत, नः भूयान् (मोठा) एषः संशयः. यतः कौतूहलं. तं नः संशयं छिंधि (तोड) महायोगिन्, भवान् पुराणेषु अपि संमत. ॥ ५ ॥ सूतः उवाच— महर्षे, त्वया लोकभ्रमापह. (लोकाचा भ्रम दूर मण करीत असतां वडाच्या पानाच्या द्रोणात निजलेला एक अद्भुत बाळ पुरुष (मुलगा) त्याच्या दृष्टीस पडला - ह्या गोष्टीची संगति जुळते कशी ? - ॥४॥ सूता, आह्माला हा मोठा संशय आहे, व त्याच्या निरसनाविषयीं मोठी उत्सुकता वाटत आहे. तूं तर महायोगी व पुराणांत देखील ' ज्ञाता ' ह्मणून प्रसिद्ध आहेस. त्याअर्थी आमची ही शंका दूर कर. ॥ ५ ॥ सूत ह्मणाले :— महर्षे, आपण केलेला हा प्रश्न लोकाचा भ्रम दूर होण्यास उत्तम साधन होईल, कारण, त्या निमित्तानें, कलीसंबंधी पापें नष्ट करणारी नारायणाची

१ चालू स्कंध अध्याय नवमा पहा.

कथा वर्णिली जाणार. असो. ॥ ६ ॥ - कथे, मार्कंडेयानें तप करून ईश्वराला संतोषविलें व त्यापाशीं 'मायेचा चमत्कार पहायास मिळावा' हा वर मागून घेतला. त्याप्रमाणें ईश्वराच्या मायेनें त्याला एकट्यालाच सात कल्प पाहायाला मिळाले, ते दुसऱ्या कोणाला दिसले नाहींत. हें आपल्या प्रश्नाचें संक्षेपात उत्तर; आता तोच प्रकार मी आपल्याला विस्तारानें सागतों ऐका :- मार्कंडेयाला पित्याकडून गर्भाधानापासून क्रमानें ब्राह्मणाला उचित ते सकळ संस्कार प्राप्त झाले. त्यानें धर्मप्रमाणें वेदाध्ययन केलें, तपश्चर्या व स्वाध्यायपठन करण्याचा क्रम ठेविला. ॥ ७ ॥ तो नैष्ठिक ब्रह्मचारी स्वभावानें शांत असून मस्तकीं जटा आगावर वल्कल हेंच वस्त्र, हातात कमंडलु, कठीं यज्ञोपवीत व कटीला मेखळा धारण करणारा) अयं प्रश्नः कृतः यत्र कलिमलापहा नारायणकथा गीता. ॥ ६ ॥ पितुः प्राप्तद्विजातिसंस्कारः मार्कंडेयः क्रमात् धर्मेण [पितु] छंदांसि अधीत्य तप स्वाध्यायसंयुत [बभूव]. ॥ ७ ॥ बृहद्व्रतधरः (वैष्ठिक ब्रह्मचर्य पाळणारा) शांतः जटिलः वल्कलांबरः नियमर्द्धये कमंडलुं, दंड, समेखल उपवीत, साक्षसूत्र कृष्णाजिनं, कुशान् च बिभ्रत्

प्राप्तद्विजातिसंस्कारो मार्कंडेयः पितुः क्रमात् ॥ छंदांस्यधीत्य धर्मेण तपःस्वाध्यायसंयुतः ॥ ७ ॥
बृहद्व्रतधरः शांतो जटिलो वल्कलांबरः ॥ बिभ्रत्कमंडलुं दंडमुपवीतं समेखलम् ॥ ८ ॥
कृष्णाजिनं साक्षसूत्रं कुशांश्च नियमर्धये ॥ अग्न्यर्कगुरुविप्रात्मस्वर्चयन्संध्ययोर्हरिम् ॥ ९ ॥
सायं प्रातः स गुरवे भैक्ष्यमाहृत्य वाग्यतः ॥ बुभुजे गुर्वनुज्ञातः सकृन्नो चेदुपोषितः ॥ १० ॥
एवं तपःस्वाध्यायपरो वर्षाणामयुतायुतम् ॥ आराधयन्हृषीकेशं जिग्ये मृत्युं सुदुर्जयम् ॥ ११ ॥
ब्रह्मा भृगुर्भवो दक्षो ब्रह्मपुत्राश्च ये ऽपरे ॥ नृदेवपितृभूतानि तेनासन्नतिविस्मिताः ॥ १२ ॥

संध्ययोः अग्न्यर्कगुरुविप्रात्मसु हरिं अर्चयन् ॥ ८ ॥ ९ ॥ वाग्यतः सः सायंप्रातः गुरवे भैक्ष्य (भिक्षा) आहृत्य (आणून) गुर्वनुज्ञातः [सन्] सकृत् बुभुजे, नो चेत् उपोषितः [आसीत्]. ॥ १० ॥ एवं वर्षाणां अयुतायुत तपःस्वाध्यायपरः हृषीकेशं आराधयन् [सः] सुदुर्जयं मृत्यु जिग्ये (जिंकिता झाला). ॥ ११ ॥ तेन ब्रह्मा, भृगु, भवः, दक्ष, करी. ॥ ८ ॥ नियमाच्या पूर्णतेसाठी तो कृष्णाजिन, अक्षसूत्र व दर्भ बाळगी, आणि अग्नि, सूर्य, गुरु, ब्राह्मण व आत्मा इतक्या स्थळीं दोन्ही संध्याच्या वेळीं हरीची आराधना करी. ॥ ९ ॥ तो सांजसकाळ भिक्षान्न आणून गुरूला निवेदी व गुरूनें अनुज्ञा दिली तर मौन धरून एकवेळ भोजन करी अनुज्ञा न मिळाल्यास उपोषित राही. ॥ १० ॥ त्यानें अशा रीतीनें लक्षावधि वर्षें तपश्चर्या व स्वाध्यायजप करण्यात निमग्न राहून हरीची आराधना चालविली व अत्यंत दुर्जय अशा मृत्यूस जिंकिलें ! ॥ ११ ॥ ती त्याची कृति (मृत्यूस जिंकणें) पाहून ब्रह्मा, भृगु, शंकर, दक्ष, दुसरेही ब्रह्मदेवाचे पुत्र, मनुष्य, देव, पितर, भूत सगळे लोक आश्चर्यानें अतिशय थक्क होऊन गेले. ॥ १२ ॥

अशा प्रकारें तो योगी नैष्ठिक ब्रह्मचर्यव्रत पाळून व अंतःकरणातील रागद्वेषादि क्लेश नाहींसे करून (मन अंतर्मुख करून) तप, स्वाध्याय व इंद्रियदमन ह्याच्या योगें अधोक्षज पर-
मेश्वराचें आराधन करीत राहिला.॥१३॥तो योगी अशा प्रकारें महायोगसाधनानें चित्ताची ईश्वराकडे एकाग्रता करीत असता पुष्कळ—सहा मन्वंतराइतका—काळ निघून गेला ॥१४॥
ब्रह्मन्, चालू सप्तम मन्वंतरात ही गोष्ट कळली तेव्हा इंद्राला त्याच्या तपाची - 'हा आपले स्थान घेतो की काय' अशी - भीति पडली ह्मणून त्यानें त्या तपात विघ्न आरंभिलें.॥१५॥
ये अपरे ब्रह्मपुत्राः, [ते] अतिविस्मिताः आसन् [तथा] नृदेवपितृभूतानि [विस्मितानि आसन्] ॥ १२ ॥ एवं बृहद्व्रतधरः योगी तपःस्वाध्यायसंयमैः ध्वस्तक्लेशांतरा-
त्मना (दूर झाले क्लेश ज्याचे अशा मनानें) [च] अधोक्षजं दध्यौ (ध्यान करिता झाला) ॥ १३ ॥ तस्य योगिनः एवं महायोगेन चित्तं युंजतः (ईश्वराकडे लावणारा) [सतः],
मन्वंतरषडात्मकः महान् कालः व्यतीयाय (निघून गेला) ॥ १४ ॥ ब्रह्मन्, पुरंदरः (इंद्र) सप्तमे अस्मिन् अंतरे एतत् ज्ञात्वा तपोविशंकितः [सन्] तद्विघातनं आरेभे. ॥१५॥

इत्थं बृहद्व्रतधरस्तपःस्वाध्यायसंयमैः ॥ दध्यावधोक्षजं योगी ध्वस्तक्लेशांतरात्मना ॥ १३ ॥
तस्यैवं युंजतश्चित्तं महायोगेन योगिनः ॥ व्यतीयाय महान्कालो मन्वंतरषडात्मकः ॥ १४ ॥
एतत्पुरंदरो ज्ञात्वा सप्तमेऽस्मिन्किलांतरे ॥ तपोविशंकितो ब्रह्मन्नारेभे तद्विघातनम् ॥ १५ ॥
गंधर्वाप्सरसः कामं वसंतमलयानिलौ ॥ मुनये प्रेषयामास रजस्तोकमदौ तथा ॥ १६ ॥ ते वै
तदाश्रमं जग्मुर्हिमाद्रेः पार्श्व उत्तरे ॥ पुष्पभद्रा नदी यत्र चित्राख्या च शिला विभो ॥ १७ ॥
तदाश्रमपदं पुण्यं पुण्यद्रुमलताऽंचितम् ॥ पुण्यद्विजकुलाकीर्णं पुण्यामलजलाशयम् ॥ १८ ॥
मत्तभ्रमरसंगीतं मत्तकोकिलकूजितम् ॥ मत्तबर्हिनटाटोपं मत्तद्विजकुलाकुलम् ॥ १९ ॥

तदा मुनये गंधर्वाप्सरसः, कामं, वसंतमलयानिलौ, रजस्तोकमदौ (रजोगुणाचे मूल ह्म० लोभ, व मद ह्या दोघास) [च] प्रेषयामास (पाठविता झाला) ॥ १६ ॥ विभो, ते हिमाद्रेः
उत्तरे पार्श्वे तदाश्रमं जग्मुः (गेले), यत्र पुष्पभद्रा नदी, चित्राख्या शिला च [अस्ति]. ॥ १७ ॥ पुण्यं पुण्यद्रुमलताचित (पवित्र वृक्षवेलींनीं पूजिलेलें) पुण्यद्विजकुलाकीर्णं
पुण्यामलजलाशयं मत्तभ्रमरसंगीतं मत्तकोकिलकूजितं मत्तबर्हिनटाटोपं (मत्त मयूररूप नटाची गडबड ज्यात असें) मत्तद्विजकुलाकुल तदाश्रमपदं, ॥ १८ ॥ ॥ १९ ॥
त्यानें मुनीवर गंधर्व, अप्सरा, मदन, वसंतऋतु, मलयवायु, रजोगुणाचें प्रिय अपत्य (लोभ) व मद इतकी सेना पाठविली. ॥ १६ ॥ समर्था, ती सगळी मंडळी हिमालयाच्या उत्तर
बाजूला त्या मुनीच्या आश्रमीं गेली. तेथें पुष्पभद्रा नावाची नदी वाहत असून चित्र नावाची शिला आहे. ॥ १७ ॥ त्या पवित्र आश्रमस्थानीं पुण्य वृक्ष व लता विपुल असून
अनेक पवित्र पक्ष्यांचे समूह राहत असत; तशींच जागोजाग पुण्यकारक निर्मळ सरोवरेंही होती. ॥ १८ ॥ त्यामध्यें - मधु पिऊन - मत्त झालेले भ्रमर गात असत व मत्त कोकिळ

शब्द करीत. तेथें मत्त मयूररूपी नटाच्या नृत्याची गडबड उडालेली असे व मत्त पक्ष्यांच्या समुदायानीं तें स्थल व्यापून सोडिलें होतें. ॥ १९ ॥ थंडगार झऱ्याचे तुषार घेऊन वायु त्या आश्रमात शिरला, तेथे पुष्पांनीं त्याला आलिंगन दिलें, - वृक्षाच्या दाट झाडींतून त्याला मंदपणें चालावें लागे - (एकंदरीत तेथें मलयवायु मंद, सुगंध व शीतळ असा वाहूं लागला). त्याच्या संचारामुळें मदनाला उद्दीपन मिळत चाललें. ॥ २० ॥ तेथें आपल्या शाखाविस्तारानीं एकमेकास आलिंगन देणाऱ्या वृक्षाच्या व वल्लीच्या समूहावर वसंतऋतूचा प्रादुर्भाव झाला, त्या वृक्षवल्लीवर कोमल पल्लवाच्या व पुष्पगुच्छांच्या पंक्ति प्रगट झाल्या, प्रदोषकाळीं चंद्रोदय होऊं लागला. ॥ २१ ॥ स्वर्गीच्या स्त्रियाच्या

हिमनिर्झरशीकरान् (गार झऱ्याचे कण) आदाय (घेऊन) प्रविष्टः सुमनोभिः (पुष्पानीं) परिष्वक्तः (आलिंगिलेला) वायुः स्मरं (मदनाला) उत्तंभयन् (उद्दीपन करणारा) [सन्] ववौ (वाहू लागला). ॥ २० ॥ उद्यच्चंद्रनिशावक्त्रः (उगवतो चंद्र रात्रीच्या आरंभीं ज्यात असा) कुसुमाकरः (वसंत) प्रवालस्तवकालिभिः गोपद्रुमलताजालैः (आलिंगणाऱ्या वृक्षवल्लींच्या समूहानीं) तत्र [आविः] (प्रकट) आसीत्. ॥ २१ ॥ गीतवादित्रयूथकैः गंधर्वैः अन्वीयमानः (मागून येणें केले ज्याच्या असा) आत्तचापेषु (धरिले धनुष्यबाण ज्यानें

वायुः प्रविष्ट आदाय हिमनिर्झरशीकरान् ॥ सुमनोभिः परिष्वक्तो ववावुत्तंभयन्स्मरम् ॥ २० ॥

उद्यच्चंद्रनिशावक्त्रः प्रवालस्तवकालिभिः ॥ गोपद्रुमलताजालैस्तत्राऽऽसीत्कुसुमाकरः ॥ २१ ॥

अन्वीयमानो गंधर्वैर्गीतवादित्रयूथकैः ॥ अदृश्यतात्तचापेषुः स्वःस्त्रीयूथपतिः स्मरः ॥ २२ ॥

हुत्वा ऽग्निं समुपासीनं ददृशुः शक्रकिंकराः ॥ मीलिताक्षं दुराधर्षं मूर्तिमंतमिवानलम् ॥ २३ ॥

ननृतुस्तस्य पुरतः स्त्रियो ऽथो गायका जगुः ॥ मृदंगवीणापणवैर्वाद्यं चक्रुर्मनोरमम् ॥ २४ ॥

असा) स्वःस्त्रीयूथपतिः (स्वर्गीच्या स्त्रीसमुदायाचा अधिपति) स्मरः (मदन) [तत्र] अदृश्यत (दिसला) ॥ २२ ॥ शक्रकिंकराः (इंद्राचे दूत), अग्निं हुत्वा समुपासीनं मीलिताक्षं (मिटले नेत्र ज्यानें, असा) दुराधर्षं [त] मूर्तिमंतं अनलं इव ददृशुः. ॥ २३ ॥ अथो तस्य पुरतः स्त्रियः ननृतुः, गायकाः जगुः (गाऊ लागले), मृदंगवीणापणवैः मनोरम

(अप्सराच्या) समूहाचा अधिपति मदन त्या स्थलीं हातीं धनुष्यबाण घेऊन फिरत असलेला दिसे. त्याच्या मागून गायकवादकाच्या ताफ्यासह गंधर्व चालत असत. ॥ २२ ॥ इंद्राच्या त्या सेवकाना, तो मुनि अग्नीमध्यें होम देऊन डोळे मिटून स्वस्थ बसला आहे, असें दिसलें व हा मूर्तिमान अग्निच असावा असें भासलें. त्याला वळवून स्वाधीन करून घेणें अशक्यच होतें. ॥ २३ ॥ पुढें स्त्रियानीं त्याच्या अग्रभागी नृत्य आरंभिलें, गायक गाऊ लागले व वादकानी मृदंग, वीणा पणव इत्यादि मधुर वाद्यें वाजविण्यास प्रारंभ

वसंतऋतु, रजोगुणाचे प्रिय अपत्य (लोभ) व इतरही इंद्राच्या सोडण्यासाठीं रोखून - धनुष्यावर जोडिलें. वसंतऋतु, रजोगुणाचे प्रिय अपत्य (लोभ) व इतरही इंद्राच्या
केला. ॥ २४ ॥ त्यावेळीं मदनानें आपलें पंचमुखी अस्त्र - त्याच्यावर सोडण्यासाठीं रोखून - धनुष्यावर जोडिलें. ॥२५॥ तेथें पुंजिकस्थली नावाची अप्सरा चेंडूंनी खेळत होती, स्तनाच्या गौरवामुळें (भारानें) तिच्या कटीला अतिशय पीडा
सेवकानीं त्याचें मन चंचल करण्याचा यत्न चालविला. ॥२६॥ तेथें पुंजिकस्थली नावाची अप्सरा चेंडूंनी खेळत होती, इतक्यात कटिसूत्र तुटून गेलें व वायूनें तिचें
होत होती, बुचड्यातून माळा गळून पडल्या होत्या, ती व तशीच तिची दृष्टि चेंडूच्या धोरणानें इकडून तिकडे भ्रमण करीत होती, इतक्यात कटिसूत्र तुटून गेलें व वायूनें तिचें
वार्य चक्रुः. ॥ २४ ॥ कामः स्वधनुषि पंचमुखं (पांच मुखें ज्याचीं असें) अस्त्रं संदधे (जोडिता झाला). तदा मधुः, रजस्तोकः, [अन्ये] इंद्रभृत्याः [च तस्य] मनः व्यकंपयन् (चाळ-
विते झाले). ॥ २५ ॥ वायुः कंदुकैः (चेंडूंनीं) क्रीडंत्याः (खेळणाऱ्या) स्तनगौरवात् (स्तनाच्या मोठ्या भारानें) भृश उद्विग्नमध्यायाः (थकली कटि जिची, अशा) अनुकंदुक चलत्या.
(फिरणाऱ्या) इतस्ततः भ्रमदृष्टेः केशविस्रंसितस्रजः पुंजिकस्थल्याः त्रुटितमेखलं (तुटला पट्टा ज्यावरील अशा) तत् सूक्ष्मं वासः (वस्त्रास) जहार (नेता झाला) ॥ २६ ॥ २७ ॥

संदधे ऽस्त्रं स्वधनुषि कामः पंचमुखं तदा ॥ मधुर्मनो रजस्तोक इंद्रभृत्या व्यकंपयन् ॥ २५ ॥ क्रीडत्याः पुंजिकस्थल्याः

कंदुकैः स्तनगौरवात् ॥ भृशमुद्विग्नमध्यायाः केशविस्रंसितस्रजः ॥ २६ ॥ इतस्ततो भ्रमद्दृष्टेश्चलंत्या अनुकंदुकम् ॥

वायुर्जहार तद्वासः सूक्ष्मं त्रुटितमेखलम् ॥२७॥ विससर्ज तदा बाणं मत्वा तं स्वजितं स्मरः ॥ सर्वं तत्राभवन्मोघमनी

शस्य यथोद्यमः ॥ २८ ॥ त इत्थमपकुर्वंतो मुनेस्तत्तेजसा मुने ॥ दह्यमाना निववृतुः प्रबोध्याहिमिवार्भकाः ॥ २९ ॥

इतींद्रानुचरैर्ब्रह्मन्धर्षितो ऽपि महामुनिः ॥ यन्नागादहमो भावं न तच्चित्रं महत्सु हि ॥ ३० ॥

तदा स्मरः तं स्वजितं (आपण जिंकला अशास) मत्वा बाणं विससर्ज (सोडिता झाला) यथा अनीशस्य (असमर्थ म्हणजे दुबळ्या माणसाचा) उद्यमः [तथा] तत्र सर्वं मोघं
(व्यर्थ) अभवत्. ॥ २८ ॥ मुने, ते मुनेः इत्थं अपकुर्वंतः (त्रास देणारे) तत्तेजसा दह्यमानाः (भाजणारे) [सर्प] अर्भकाः (मुले) अहिं (सर्पाला) प्रबोध्य (जागा करून) इव निव-
वृतुः (परतले). ॥ २९ ॥ ब्रह्मन्, इंद्रानुचरैः इति धर्षितः अपि महामुनिः अहमः (अहंकाराच्या) भावं न अगात् [इति] यत्, तत्, महत्सु चित्रं न ॥ ३० ॥
सूक्ष्म वस्त्र उडविलें. ॥ २६ ॥ २७ ॥ त्याच क्षणी मदनानें, आपण मुनीला जिंकलें अशी मनाशी गाठ घालून, त्याच्यावर बाण सोडिला पण, दुबळ्याचा यत्न फुकट जातो,
तशी मदनाची सर्व खटपट त्या मुनीवर निरर्थक झाली. ॥ २८ ॥ मुने, ते इंद्रदूत मुनीला असा त्रास देता देता त्याच्या तेजानें पोळ लागलें व शेवटी ज्यांनी मुलें
सर्पाला डिवचून जागें करून पळून जावीं तसे तेथून परतून गेले. ॥ २९ ॥ ब्रह्मन्, इंद्राच्या सेवकानी अशा रीतीनें पुष्कळ प्रकारें छेडिलें परंतु त्या मुनीला अहंकार-

१ शोषण, दीपन, संमोहन, तापन व उन्मादन हीं त्याच्या अस्त्राच्या पांच मुखांचीं नावें होत.

रूप विकार उद्भवला नाहीं. महात्म्याच्या ठिकाणीं हें चरित्र म्हणजे आश्चर्य वाटण्याजोगा प्रकार नव्हे. ॥ ३० ॥ अनुचर गणासह कामाचें मुख म्लान झालें असें पाहून व महर्षीचें तें सामर्थ्य ऐकून भगवान् इंद्राला पराकाष्ठेचा विस्मय वाटला. ॥ ३१ ॥ तो मुनि अशा प्रकारें तप, स्वाध्यायजप व इंद्रियनियमन ह्यांच्या योगें चित्ताची एकाग्रता करीत असतां त्याजवर अनुग्रह करण्यासाठीं हरि नरनारायणरूपानें तेथे प्रकट झाला. ॥ ३२ ॥ त्या दोन्ही मूर्त्ति अनुक्रमे शुक्ल व कृष्ण वर्णाच्या असून त्याचे नेत्र नूतन कमळासारखे होते उभयतानाही चार चार भुज असून आंगावर हरिणचर्म व वल्कल हीं वस्त्रें होतीं. दोघांच्या हातात पवित्रके व कंठात तीन (अथवा नऊ) पदरी उपवीतें असून त्यानीं एक एक

भगवान् स्वराट् (इंद्र) सगणं कामं निस्तेजसं दृष्ट्वा ब्रह्मर्षेः अनुभावं श्रुत्वा च परं विस्मयं समगात्. ॥ ३१॥ तस्य एवं तपःस्वाध्यायसंयमैः चित्तं युंजतः [सतः], नरनारायणः हरिः अनुग्रहाय आविरासीत् (प्रकट झाला) ॥ ३२ ॥ शुक्लकृष्णौ नवकंजलोचनौ (कंज म्हणजे कमल) चतुर्भुजौ रौरववल्कलांबरौ (रौरव म्हणजे हरणाचें चर्म) पवित्रपाणी त्रिवृत् (तीन पदरी किंवा तीन त्रिक नऊ पदरी) उपवीतकं, कमंडलुं, वैणवं (वेळूच्या) ऋजुं (सरळ) दंडं पद्माक्षमाला, उत जंतुमार्जनं (कीटक दूर करणारा कुंचा) वेदं (दर्भांची पेंडी) दधानौ

दृष्ट्वा निस्तेजसं कामं सगणं भगवान्स्वराट् ॥ श्रुत्वाऽनुभावं ब्रह्मर्षेर्विस्मयं समगात्परम् ॥ ३१ ॥ तस्यैवं युंजतश्चित्तं तपःस्वाध्यायसंयमैः ॥ अनुग्रहायाविरासीन्नरनारायणो हरिः ॥ ३२ ॥ तौ शुक्लकृष्णौ नवकंजलो-चनौ चतुर्भुजौ रौरववल्कलांबरौ ॥ पवित्रपाणी उपवीतकं त्रिवृत् कमंडलुं दंडमृजुं च वैणवम् ॥ ३३ ॥ पद्माक्षमालामुत जंतुमार्जनं वेदं च साक्षात्तप एव रूपिणौ ॥ तपत्तडिद्वर्णपिशंगरोचिषा प्रांशू दधानौ विबुधर्ष-भार्चितौ ॥ ३४ ॥ ते वै भगवतो रूपे नरनारायणावृषी ॥ दृष्ट्वोत्थायाऽऽदरेणोच्चैर्ननामांगेन दंडवत् ॥ ३५ ॥

विबुधर्षभार्चितौ प्रांशू (उंच काठीचे) तौ तपत्तडिद्वर्णपिशंगरोचिषा (चमकणाऱ्या विजेच्या वर्णाच्या पिंगट तेजाने) साक्षात् रूपिणौ तपः एव. ॥ ३३ ॥ ३४ ॥ [सः] ते भगवतः रूपे नरनारायणौ ऋषी दृष्ट्वा उच्चैः (फार) आदरेण उत्थाय दंडवत् अंगेन ननाम. ॥ ३५ ॥

कमंडलु व सरळ वेळूचा दंड धरिला होता. ॥ ३३ ॥ त्या दोघानीं कमलाक्षाची माळ, किडे, जंतु इत्यादिकाना बाजूला करण्यासाठीं एक कुंचा, व दर्भमुष्टि हीं हातीं धरिलीं होतीं. त्याची अंगकांति चमकणाऱ्या विद्युल्लतेसारखी दिसे म्हणून ते साक्षात् तपोमूर्तिच भासत. त्याचे बांधे उंच असून ते मोठमोठ्या देवाना देखील पूज्य होते. ॥३४॥ ते भगवताचे अवतार नरनारायण ऋषि दृष्टीस पडल्याबरोबर मार्कंडेय मुनीने उठून त्याना, अत्यंत आदरपूर्वक, शरीरानें दंडवत् प्रणाम केला ॥ ३५ ॥

त्यांच्या दर्शनानें आनंद होऊन त्याच्या देहाला, इंद्रियांना व मनाला शांति मिळाली, आंगावर रोमांच उभे राहिले व नेत्रात अश्रूंचा पूर लोटल्यामुळे त्याच्याने नरनारायणाकडे बघवेना. ॥ ३६ ॥ तो उठून हात जोडून नम्रपणें त्याच्यापुढें उभा राहिला व गद्गद वाणीनें ' ईश्वरांनो, आपणा उभयतांना नमस्कार असो. ' असे बोलला. उत्सुकतेमुळे तो त्यांना आलिंगनच देणार की काय, असा भास होई. ॥ ३७ ॥ त्यानें त्याना आसन देऊन व पाय धुऊन अर्घ्य, विलेपन, धूप, पुष्पें ह्या उपचारानीं त्याची पूजा केली. ॥ ३८ ॥ ते पूज्य व अनुग्रह करण्यास सिद्ध असे मुनि सुखासनी स्वस्थ बसले असता मार्कंडेयानें चरणास पुन्हा वंदन करून असें भाषण केले ॥ ३९ ॥ मार्कंडेय म्हणाला .—

तत्संदर्शनानंदनिर्वृतात्मेंद्रियाशयः (निर्वृत म्ह० शांत, आत्मा म्ह० देह) हृष्टरोमा (थरारले रोमांच ज्याचे असा) अश्रुपूर्णाक्षः सः तौ उदीक्षितुं (वर पाहण्यास) न— सेहे (नाहीं समर्थ झाला). ॥ ३६ ॥ उत्थाय प्रांजलि. प्रह्वः (नम्र) औत्सुक्यात् आश्लिषन् (आलिंगणारा) इव [सः] गद्गदाक्षरं [सन्] ईशानौ " नमोनम " इति बभाषे ॥ ३७ ॥ त्यो आसन आदाय पादयोः अवनिज्य (प्रक्षाळून) अर्हणेन (अर्घ्यानें), अनुलेपेन, धूपमाल्यै. च अपूजयत्. ॥ ३८ ॥ सुखं [यथा तथा] आसन आसीनौ प्रसादाभिमुखौ गरिष्ठौ

स तत्संदर्शनानंदनिर्वृतात्मेंद्रियाशयः ॥ हृष्टरोमा ऽश्रुपूर्णाक्षो न सेहे तावुदीक्षितुम् ॥ ३६ ॥

उत्थाय प्रांजलिः प्रह्व औत्सुक्यादाश्लिषन्निव ॥ नमो नम इतीशानौ बभाषे गद्गदाक्षरः ॥ ३७॥

तयोरासनमादाय पादयोरवनिज्य च ॥ अर्हणेनानुलेपेन धूपमाल्यैरपूजयत् ॥ ३८ ॥

सुखमासनमासीनौ प्रसादाभिमुखौ मुनी ॥ पुनरानम्य पादाभ्यां गरिष्ठाविदमब्रवीत् ॥ ३९ ॥

मार्कंडेय उवाच । किं वर्णये तव विभो यदुदीरितो ऽसुः संस्पंदते तमनु वाङ्मनइंद्रियाणि ॥

स्पंदंति वै तनुभृतामजशर्वयोश्च स्वस्याप्यथापि भजतामसि भावबंधुः ॥ ४० ॥

(महाथोर) मुनी पादाभ्यां पुन. आनम्य इदं अब्रवीत् — ॥ ३९ ॥ मार्कंडेयः उवाच— " विभो, तव किं वर्णये, यदुदीरितः (ज्यानें प्रेरिलेला) अजशर्वयोः (ब्रह्मा व शंकर यांचा) स्वस्य (माझा) अपि च असुः (प्राण) संस्पंदते (चालतो वागतो), तं अनु वाङ्मनइंद्रियाणि स्पंदंति. अथ अपि भजतां तनुभृतां, भावबंधु (आत्म्याचा हितकर्ता) असि. ॥ ४० ॥

" हे विश्वव्यापका, तुझ्या सामर्थ्याचें वर्णन काय करावें! तूं प्रेरिल्यामुळें प्राण चळन पावतो व मग त्याच्या अनुरोधानें वाणी, मन व इंद्रिये चालत असतात. - ही गोष्ट केवळ प्राकृत जीवांनाच लागू आहे असें नाहीं तर - ब्रह्मदेव, शंकर ह्यांचे प्राणादि तुझ्याच प्रेरणेमुळें चालतात हे वेदादिकात प्रसिद्ध आहे, अर्थात माझ्या स्वताच्या प्राणादिकांना ते लागू आहे. एकंदरींत तुजवाचून दुसऱ्या कोणालाही स्वातंत्र्य नाही, सगळे लोक लाकडाच्या बाहुलीप्रमाणे तू चालवशील तसे चालतात तरी तू जे लोक त्यांना तुजकडूनच मिळते हे उघड आहे.

तुला भजतात त्यांच्या आत्म्याचा (पिता पुत्र इत्यादिकांप्रमाणें केवळ देहाचा नव्हस) बंधु (हितकर्ता) आहेस. ॥ ४० ॥ - ईश्वरा, तूं ह्मणशील ' आह्मी दोघे (नरनारायण) धर्मऋषीचे पुत्र आहों, आह्मांकडून भाग्यांस प्रवर्तना देण्याचें काम कसें घडावें ' तर - भगवंता, तूं जसे मत्स्य कूर्म इत्यादि इतर नाना अवतार घेतोस, तसाच ह्या तुझ्या दोन मूर्तिही त्या त्रैलोक्याचें पालन करावें, ताप दूर घालवावे व त्याला मृत्यूपासून सोडवावें ह्या साठीं धरिल्या आहेत. जसा कोळी आपणच आपल्या पोटातून जाळे काढितो व शेवटीं आपणच खाऊन टाकितो, तसा तूं हें सगळें विश्व उत्पन्न करून संहारितोस. ॥ ४१ ॥ तूंच जगाचें रक्षण करितोस व स्थावरजंगमात्मक विश्वाला प्रेरणा देतोस. मी तुझ्या चरण-

भगवन्, यथा इदं सृष्ट्वा अवितुं (रक्षण करण्यासाठीं) नाना अन्यतनूः (दुसरे अवतार) बिभर्षि (घेतोस), [तथा] भगवतः इमे मूर्ती त्रिलोक्याः क्षेमाय, तापविरमाय, मृत्युजित्यै (मोक्षप्राप्तीसाठीं) च [स्तः]. ऊर्णनाभिः (धागे, ततु बेंबींत ज्याच्या तो कोळी) इव सर्वं पुनः ग्रससि ॥ ४१ ॥ तस्य अवितुः (रक्षणकर्त्या) स्थिरचरेशितुः [तव] आंघ्रिमूलं [भजामि], यत्स्थं (जेथें राहणाराला) कर्मगुणकालरुजः (रुजा इ० पीडा) न— स्पृशति (शिवत नाहींत). वेदहृदयाः (वेद हृदयात ज्याच्या ते वेदाचें तात्पर्य जाणणारे) मुनयः

मूर्ती इमे भगवतो भगवंस्त्रिलोक्याः क्षेमाय तापविरमाय च मृत्युजित्यै ॥ नाना बिभर्ष्यवितुमन्यतनूर्यथेदं सृष्ट्वा पुनर्ग्रससि सर्वमिवोर्णनाभिः ॥ ४१ ॥ तस्यावितुः स्थिरचरेशितुरंघ्रिमूलं यत्स्थं न कर्मगुणकालरुजः स्पृशंति ॥ यद्वै स्तुवंति निनमंति यजंत्यभीक्ष्णं ध्यायंति वेदहृदया मुनयस्तदाप्त्यै ॥ ४२ ॥ नान्यं तवांघ्र्युपनयादपवर्गमूर्तेः क्षेमं जनस्य परितोभिय ईश विद्मः ॥ ब्रह्मा बिभेत्यलमतो द्विपरार्धधिष्ण्यः कालस्य ते किमुत तत्कृतभौतिकानाम् ॥ ४३ ॥

तदाप्त्यै (त्याच्या प्राप्तीसाठीं) यत् अभीक्ष्णं स्तुवंति, निनमंति (अत्यंत नमन करितात), यजंति, ध्यायंति [च]. ॥ ४२ ॥ ईश, परितोभियः (चहूंकडून भय ज्याला अशा) जनस्य अपवर्गमूर्तेः (मोक्षरूपी) तव अंघ्र्युपनयात् (चरणाला शरण जाणें ह्याहून) अन्यं क्षेमं न—विद्मः द्विपरार्धधिष्ण्यः (दोन परार्ध स्थान ज्याचें असा) ब्रह्मा कालस्य ते अलं (पूर्णपणें) बिभेति कमळाचें भजन करितों (४४ व्या श्लोकांतील ' भजामि ' ह्या क्रियापदाशीं अन्वय). त्या चरणकमळाचा आश्रय धरणाराला कर्म, गुण किंवा काळ ह्याच्या निमित्तानें उद्भवणाऱ्या पीडा सोसाव्या लागत नाहींत. वेद ज्याच्या हृदयात असतात ते (वेदाचें तात्पर्य जाणणारे) मुनि त्याची (तुझ्या चरणाची) प्राप्ति व्हावी ह्मणून त्याला स्तवितात, अत्यंत नमन करितात, वारंवार पूजितात व अंतरी ध्यान असतात. ॥ ४२ ॥ ईश्वरा, तूं मोक्षरूपी आहेस. सृष्टीमध्यें लोकांच्या पाठीमागें चहूंकडून भयेंच भयें लागलेलीं आहेत. त्याचें कल्याण होण्याचा (निर्भय स्थान मिळण्याचा) मार्ग तुझ्या चरणास शरण जाणें ह्याहून वेगळा आह्माला ठाऊक नाहीं. ज्याचें स्थान दोन परार्धपर्यंत राहतें, तो ब्रह्मदेव देखील

तद्धै भजाम्यृतधियस्तव पादमूलं हित्वेदमात्मच्छदि चाऽऽत्मगुरोः परस्य ॥ देहाद्यपार्थमसदंत्यमभिज्ञमात्रं विंदेत ते तर्हि सर्वमनीषितार्थम् ॥ ४४ ॥ सत्त्वं रजस्तम इतीश तवात्मबंधो मायामयाः स्थितिलयोदयहेतवो ऽस्य ॥ लीलाधृता यदपि सत्त्वमयी प्रशांत्यै नान्ये नृणां व्यसनमोहभियश्च याभ्याम् ॥ ४५ ॥ तस्मात्तवेह भगवन्नथ तावकानां शुक्लां तनुं स्वदयितां कुशला भजंति ॥ यत्सात्वताः पुरुषरूपमुशंति सत्त्वं लोको यतो ऽभयमुतात्मसुखं न चान्यत् ॥ ४६ ॥ तस्मै नमो भगवते पुरुषाय भूम्ने विश्वाय विश्वगुरवे परदेवताय ॥ नारायणाय ऋषये च नरोत्तमाय हंसाय संयतगिरे निगमेश्वराय ॥ ४७ ॥

तव आत्मच्छदि (आत्म्याला आच्छादणारें) असत् (तुच्छ) अंत्यं (नश्वर) आभेज्ञमात्र (आत्मरूप) इदं देहादि हित्वा (टाकून) ऋतधियः (सत्यज्ञानरूप) आत्मगुरोः परस्य तव पादमूलं भजामि. [यदि पुरुष. त्वां भजति], तर्हि सर्वमनीषितार्थं विंदेत (पावेल) ॥ ४४ ॥ ईश, आत्मबंधो, सत्त्वं, रजः, तमः इति मायामयाः अस्य स्थितिलयोदयहेतवः लीला. यत् अपि तव धृताः, [तथा अपि] सत्त्वमयी नृणां प्रशांत्यै अन्ये न; याभ्यां व्यसनमोहभिय [भवंति]. ॥ ४५ ॥ तस्मात् भगवन्, कुशलाः (विद्वान्) इह तव, अथ तावकानां [च] शुक्लां स्वदयितां (आपल्याला प्रिय) तनुं भजंति यत् सात्वताः पुरुषरूपं उशंति (मानितात), अन्यत् न. यतः लोकः, अभयं, उत आत्मसुखं च. ॥ ४६ ॥ तस्मै भगवते पुरुषाय भूम्ने (व्यापक) विश्वाय विश्वगुरवे परदेवतायै हंसाय (बद केली वाणी ज्यानें

...तुझ्या - कटाक्षरूप - काळाला अत्यंत भीत असतो, मग त्या ब्रह्मदेवानें निर्मिलेले भौतिक प्राणी भीत असतील हें वेगळें सांगायला पाहिजे कशाला ? ॥ ४३ ॥ हे सत्यज्ञानस्वरूपा ईश्वरा, ह्मणून मी आत्मस्वरूपाला आच्छादून टाकणाऱ्या शरीरादिक निष्फळ, तुच्छ, नश्वर व आत्म्याहून वेगळे खरे नाहींत अशा पदार्थांना टाकून देऊन (त्यावरील अभिमान सोडून) तुझ्या चरणमूलाचें भजन करितों. तूंच जीवाचा नियामक अर्थात श्रेष्ठ आहेस. मनुष्य तुला भजेल तरच त्याला सकळ इच्छित गोष्टी प्राप्त होतात ॥ ४४ ॥ हे आत्म्याच्या हितकर्त्या ईश्वरा, यद्यपि सत्त्व, रज, तम हे तीन्ही गुण तुझ्या मायेची रूपें आहेत, त्यांच्यायोगें पाळन, उत्पत्ति व लय चालतात, व ते तूंच लीळेनें धारण केले हें सत्य आहे, तथापि त्यांतील सत्वमय मूर्तीच मनुष्यांना शांति मिळण्यास कारण आहे. बाकीच्या दोन (रजोगुणी व तमोगुणी) मूर्तींस भजलें - असता अनिष्ट प्रसंग ओढवतात - कारण, त्या दोहोंपासून, दुःख, मोह व भयें प्राप्त होतात. ॥ ४५ ॥ ह्मणून, भगवंता (नारायणा), विद्वान् लोक तुझ्या व तुझ्या भक्ताच्या (नराच्या) शुक्लवर्ण (सात्त्विक) मूर्तीला भजतात. ती त्यांना अत्यंत प्रिय वाटते. भगवद्भक्त जनांना, सत्त्वगुण हें भगवताचें प्रिय रूप होय, दुसरे (रज तम) नव्हत, असें वाटत असतें; त्यापासून वैकुंठलोक अभय व आत्मसुख प्राप्त होतें (दुसऱ्या ह्मणने रजोगुणी व तमोगुणी मूर्तींपासून तीं मिळत नाहींत). ॥ ४६ ॥ भगवंता, तूं व्यापक, सर्वांचा अंतर्यामी, विश्वरूपी, विश्वाचा गुरु व श्रेष्ठ दैवत

(भितो) अतः तत्कृतभौतिकानां [भयं इति] किमुत ? ॥ ४३ ॥

असून सध्या 'नारायणऋषि' आणि उत्तम 'नर' ह्या दोन रूपांनीं प्रगटला आहेस. तुझें स्वरूप शुद्ध आहे. त्या आपली वाणी आटोपून धरिली आहे. तूं वेदाचा प्रवर्तक होस. मी तुला नमस्कार करितों. ॥ ४७ ॥ - तूं वेदमार्ग कसा प्रवृत्त केला तें सांगतों :- तुझ्या मायेनें ब्रह्मदेवाचें आत्मज्ञान आच्छादिलें होतें व कपटी इंद्रियमार्गांनी त्याची बुद्धि भ्रमण पावत होती म्हणून त्याला तूं त्याच्या इंद्रियांत, प्राणामध्यें, हृदयांत व दृष्टिमार्गीं प्रवर्तकरूपानें विद्यमान असताही समजून आला नाहीस. पण पुढें सर्वांचा गुरु जो तू त्या तुजपासून वेद मिळाले तेव्हां त्यालाच तुझें ज्ञान झालें। ॥ ४८ ॥ वेद हे तुझ्या दर्शनाचें साधन होत. ते तुझें रहस्य उघड करून सांगतात. - वेदाच्या साह्यावाचून तें तुझें स्वरूप [illegible]

असा) निगमेश्वराय (वेदाचा प्रवर्तक) ऋषये नारायणाय, नरोत्तमाय च नमः. ॥ ४७ ॥ तन्मायया आवृतमतिः (वेष्टिलें आत्मज्ञान ज्याचें असा) वितथाक्षपथैः (कपट इंद्रियमार्गांनीं असा) [illegible] अखिल-भ्रमद्धीः (भ्रमण करिते बुद्धि ज्याची असा) सः उ आद्यः (ब्रह्मा) स्वखेषु (आपल्या इंद्रियांत) असुषु (प्राणांत), हृदि, दृक्पथेषु (नेत्राच्या मार्गीं, समोर) अपि सन्तं यं न वेद अखिल-गुरोः ते [प्रवर्तितं] वेदं उपसाद्य (पावून, मिळवून) [त्वां] साक्षात् [वेद]. ॥ ४८ ॥ आत्मरहःप्रकाशं (आत्म्याचें गूढ तत्व उघड करणारें) यद्दर्शनं निगमे [भवति], यत्र अ-

यं वै न वेद वितथाक्षपथैर्भ्रमद्धीः संतं स्वखेष्वसुषु हृद्यपि दृक्पथेषु ॥ तन्मायया ऽऽवृतमतिः स उ एव साक्षादाद्यस्तवाऽखिलगुरोरुपसाद्य वेदम् ॥ ४८ ॥ यद्दर्शनं निगम आत्मरहःप्रकाशं मुह्यंति यत्र कवयो ऽजपरा यतंतः ॥ तं सर्ववादविषयप्रतिरूपशीलं वंदे महापुरुषमात्मनिगूढबोधम् ॥ ४९ ॥ इति श्रीभा० द्वादशस्कंधे ऽष्टमो ऽध्यायः ॥ ८ ॥

जपराः (ब्रह्मदेवादि) कवयः (विद्वान्) यतत. (यत्न करणारे) अपि मुह्यति, तं सर्ववादविषयप्रतिरूपशील (सगळ्या वादाच्या विषयांत प्रत्येकांत मिसळणारा स्वभाव ज्याचा असा) आत्मनिगूढबोध (देहादिकांनीं आच्छादिलें ज्ञान ज्याचें असा) महापुरुषं त्वां वंदे. " ॥ ४९ ॥ ॥ इति श्रीभागवतान्वये द्वादशस्कंधे अष्टमो ऽध्याय ॥ ८ ॥

प कळणें दुर्घट आहे, - ब्रह्मदेवप्रभृति विद्वानांनी - सांख्य इत्यादि इतर मार्गांनीं - पुष्कळ खटपट केली तरी त्यांना त्या (तुझ्या स्वरूपा) विषयीं मोहच पडलेला राहिला. कारण, तुझा स्वभावच सकळ वादांचे विषय जे भेदादि त्या प्रत्येकांत त्या त्या प्रकारें मिळून राहिलेला आहे (तूं सर्वत्र सर्व रूपांनी राहतोस). तुझा विषयींचें ज्ञान देहादि उपाधिसमूहानें आच्छादून टाकिलेलें असतें. अशा हे महापुरुषा, तुला मी वंदन करितों. " ॥ ४९ ॥

॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शनें द्वादशस्कंधे अष्टमो ऽध्यायः ॥ ८ ॥

सूत म्हणाले :—ऋषे, बुद्धिमान् मार्कंडेय मुनींनीं नराचा सखा जो नारायण त्याची अशा प्रकारें स्तुति केली. तेव्हां तो भगवान् संतुष्ट होऊन त्या भृगुकुलश्रेष्ठ (मार्कंडेयास)
म्हणाला :— ॥ १ ॥ श्रीभगवान् बोलला :— " हे ब्रह्मर्षिवर्या ! त्वां आपलें चित्त एकाग्र केलें, माझ्या ठिकाणीं निश्चल भक्ति ठेविली आणि तप, वेदाध्ययन व इंद्रियनिग्रह हीं
आचरिलीं म्हणून तूं सिद्ध दशेस पोंचलास. ॥ २ ॥ तुझें नैष्ठिक व्रताचरण पाहून आह्मी[1] अत्यंत संतुष्ट झालों. मी वर देणाऱ्या लोकांचा अधिपति आहे तुझें कल्याण असो. म-
जपासून अपेक्षित वर मागून घे." ॥ ३ ॥ मार्कंडेय ऋषि म्हणाला— " हे देवाधिदेवा ! शरणागतांचीं दुःखें दूर करणाऱ्या अच्युता ! मला वर मिळविण्याच्या नादीं लावून त्व-

सूतः उवाच— धीमता मार्कंडेयेन इत्थं संस्तुतः भगवान् नरसखः नारायणः प्रीतः [सन्] भृगूद्वहं आह ॥ १ ॥ श्रीभगवान् उवाच— ' भो भो ब्रह्मर्षिवर्य, [त्वं] आ-
त्मसमाधिना, मयि अनपायिन्या भक्त्या, तपःस्वाध्यायसंयमैः [च] सिद्धः असि. ॥ २ ॥ वयं त्वद्बृहद्व्रतचर्यया (तुझ्या नैष्ठिक ब्रह्मचर्याचरणानें) ते परितुष्टाः. स्म ते भद्र-
वरदेशात् (वर देणारांत मुख्य) [मत्तः] (मजपासून) अभीप्सितं वर प्रतीच्छ (घे)" ॥ ३ ॥ ऋषिः उवाच— ' देवदेवेश, प्रपन्नार्तिहर, अच्युत, ते जितं भवान् समदृश्यत (दि-

सूत उवाच । संस्तुतो भगवानित्थं मार्कंडेयेन धीमता ॥ नारायणो नरसखः प्रीत आह भृगूद्वहम् ॥ १ ॥ श्रीभगवानुवाच ।
भो भो ब्रह्मर्षिवर्योऽसि सिद्ध आत्मसमाधिना ॥ मयि भक्त्याऽनपायिन्या तपःस्वाध्यायसंयमैः ॥ २ ॥ वयं ते परितुष्टाः
स्म त्वद्बृहद्व्रतचर्यया ॥ वरं प्रतीच्छ भद्रं ते वरदेशादभीप्सितम् ॥ ३ ॥ ऋषिरुवाच । जितं ते देव देवेश प्रपन्नार्तिहराच्युत ॥
वरेणैतावताऽलं नो यद्भवान्समदृश्यत ॥ ४ ॥ गृहीत्वाऽजादयो यस्य श्रीमत्पादाब्जदर्शनम् ॥ मनसा योगपक्वेन स भवान्मे
ऽक्षगोचरः ॥ ५ ॥ अथाप्यंबुजपत्राक्ष पुण्यश्लोकशिखामणे ॥ द्रक्ष्ये मायां यया लोकः सपालो वेद सद्भिदाम् ॥ ६ ॥

सलं) [इति] यत्, एतावता वरेण नः अलं ॥ ४ ॥ अजादयः योगपक्वेन मनसा यस्य श्रीमत्पादाब्जदर्शनं गृहीत्वा [कृतार्थाः भवंति], सः भवान् मे अक्षगोचरः ॥ ५ ॥
अथ अपि अंबुजपत्राक्ष, पुण्यश्लोकशिखामणे, मायां द्रक्ष्ये (पाहूं इच्छितों), यया सपालः लोकः सद्भिदां (एक ब्रह्मस्वरूपीं भेद) वेद " ॥ ६ ॥

आपला उत्कर्ष प्रकट केला. प्रभो ! आपण दर्शन दिलें एवढाच वर मला पुरे. ॥ ४ ॥ ब्रह्मादिदेव योगाभ्यासानें पक्व झालेल्या मनानें ज्याच्या शोभायुक्त चरणकमलाचें दर्शन
मिळवून कृतार्थ झाले, तो तूं माझ्या दृष्टीस पडलास - ह्यापेक्षा अधिक वर तो कोणता मिळवयाचा ? - ॥ ५ ॥ तथापि, हे कमलदलनयना, ब्रह्मादिक लोकपालांसह ह्या जनांना
जिच्या योगें करून सद्वस्तूच्या ठायीं भेद वाटूं लागतो, ती तुझी माया पहाण्यास मिळावी अशी मी इच्छा करितों. तूं पुण्यकीर्ति पुरुषांतील मुगुटमणि होस. " ॥ ६ ॥

---

१ सर्व देवांच्या अभिप्रायानें हें बहुवचन घातलें आहे. २ नर व नारायण दोघे एकच समजून हें एकवचन घातलें आहे.

सूत ह्मणाले :— मुने, मार्कंडेयानें अशा प्रकारें यथेच्छ स्तुति गाऊन पूजा केली असतां तो महासमर्थ भगवान् हासत हासत 'ठीक आहे (तुला माझी माया दिसेल)' असें ह्मणून बदरिकाश्रमीं गेला. ॥ ७ ॥ मार्कंडेय ऋषीच्या मनात तीच गोष्ट सारखी घोळत राहिली. तो आपल्या आश्रमातच राहून सूर्य, चंद्र, उदक, भूमि, वायु, आकाश, आत्मा ॥ ८ ॥ अशा सर्व स्थलीं हरीचें ध्यान करीत काल्पनिक उपचारानीं त्याला पूजीत असे. एके प्रसंगीं तो प्रेमाच्या अनावर वेगात गढून जाऊन पूजा विसरून गेला. ॥ ९ ॥ ब्रह्मन् भृगु-

सूतः उवाच— मुने, ऋषिणा इति ईडितः (स्तविलेला) काम अर्चितः भगवान् सः ईश्वरः स्मयन् (हांसणारा [सन्] "तथा" इति उक्त्वा बदर्याश्रमं प्रागात् ॥ ७ ॥ तं एव अर्थं चिंतयन् स्वाश्रमे एव वसन् सः ऋषिः अग्न्यर्कसोमांबुभूवायुवियदात्मसु, ॥ ८ ॥ सर्वत्र च हरिं ध्यायन् [सन्] भावद्रव्यैः (काल्पनिक उपचारानीं) अपूजयन्. कचित्

सूत उवाच । इतीडितोऽर्चितः काममृषिणा भगवान्मुने॥तथेति स स्मयन्प्रागाद्बदर्या-
श्रममीश्वरः ॥७॥ तमेव चिंतयन्नर्थमृषिः स्वाश्रम एव सः ॥ वसन्नग्न्यर्कसोमांबुभूवायु-
वियदात्मसु ॥ ८ ॥ ध्यायन्सर्वत्र च हरिं भावद्रव्यैरपूजयत् ॥ कचित्पूजां विसस्मार
प्रेमप्रसरसंप्लुतः ॥ ९ ॥ तस्यैकदा भृगुश्रेष्ठ पुष्पभद्रातटे मुनेः ॥ उपासीनस्य संध्यायां
ब्रह्मन्वायुरभून्महान् ॥ १० ॥ तं चंडशब्दं समुदीरयंतं बलाहका अन्वभवन्करालाः ॥
अक्षस्थविष्ठा मुमुचुस्तडिद्भिः स्वनंत उच्चैरभिवर्षधाराः ॥ ११ ॥

प्रेमप्रसरसंप्लुतः [सन्] पूजां विसस्मार. ॥९॥ भृगुश्रेष्ठ, ब्रह्मन्, एकदा तस्य मुनेः पुष्पभद्रातटे संध्यायां उपासीनस्य [सतः], महान् वायुः अभूत् ॥ १० ॥ चंडशब्दं समुदीरयंतं (उच्चारणाऱ्या) तं अनु करालाः (भयकर) बलाहकाः (मेघ) अभवन्, तडिद्भिः (विजांनीं) उच्चैः स्वनंतः (कडाडणारे) [सतः] अक्षस्थविष्ठाः (गाडीच्या आसाप्रमाणें मोठाल्या) अभिवर्षधाराः मुमुचुः. ॥११॥

कुलवरा (शौनका), एके वेळीं संध्यासमयीं तो मुनि पुष्पभद्रेच्या तीरावर बसला असता एकाएकीं प्रचंड वारा वाहूं लागला. ॥ १० ॥ तो वायु सोसाट्याचा शब्द उच्चारीत असतां त्याच्या मागून भयंकर मेघ येऊं लागले. त्यांनीं विजांचा कडकडाट करीत गाडीच्या आसाएवढाल्या मोठ्या धारानीं वृष्टि पाडण्यास प्रारंभ केला. ॥ ११ ॥

पुढें चहूंकडून वायूच्या वेगानें उचंबळणाऱ्या लाटांनीं चारी समुद्र भूतलाला पूर्ण ग्राशीत आहेत, असें दिसून आलें. त्या समुद्रात उग्र नक्र व महाभयंकर भोंवरे असून गंभीर गर्जना चालली होती. ॥ १२ ॥ आकाशाला व्यापून टाकणाऱ्या उदकानीं, तीक्ष्ण सूर्यकिरणानीं (किंवा वायूनीं) व विजांनी स्वता (मार्कंडेया) सुद्धा चारी (उद्भिज्ज, स्वेदज अंडज, जरायुज) प्रकाराचें विश्व आतून बाहेरून त्रासविलें व पृथ्वी पाण्यात बुडून गेली, असें पाहून मुनींच्या मनाला खेद झाला व तो भिऊन गेला. ॥ १३ ॥ मार्कंडे-

ततः क्ष्मातलं (पृथ्वीतल) आग्रसंतः (गिळणारे) समीरवेगोर्मिभिः (वायुवेगामुळें उठणाऱ्या लाटांनी) उग्रनक्रमहाभयावर्तगभीरघोषाः चतुः समुद्राः समंततः (भोंवतालीं) व्यदृश्यंत. ॥ १२ ॥ मुनिः आत्मना सह चतुर्विधं जगत् अतिद्युभिः (आक्रमिला स्वर्ग ज्यानीं असा) अद्भिः (उदकानीं), खरैः (तीव्र सूर्य किरणानीं किंवा वायूनीं), शतह्रदाभिः (विजांनीं) च अंतः, बहिः [च] उपतापित, क्ष्मा (पृथ्वी) [च] जलाप्लुता (पाण्याने बुडालेली) वीक्ष्य विमनाः (खिन्न) [सन्] समत्रसत् ॥ १३ ॥ तस्य एव उद्वीक्षतः [पश्यतः], ऊर्मिभी-

ततो व्यदृश्यंत चतुःसमुद्राः समंततः क्ष्मातलमाग्रसंतः ॥ समीरवेगोर्मिभिरुग्रनक्रमहाभयावर्तगभीरघोषाः ॥ १२ ॥ अंतर्बहिश्चा-
द्भिरतिद्युभिः खरैः शतह्रदाभीरुपतापितं जगत् ॥ चतुर्विधं वीक्ष्य सहात्मना मुनिर्जलाप्लुतां क्ष्मां विमनाः समत्रसत् ॥ १३ ॥
तस्यैवमुद्वीक्षत ऊर्मिभीषणः प्रभंजनाघूर्णितवार्महार्णवः ॥ आपूर्यमाणो वरषद्भिरंबुदैः क्ष्मामप्यधाद्द्वीपवर्षाद्रिभिः समम् ॥ १४ ॥
सक्ष्मांऽतरिक्षं सदिवं सभागणं त्रैलोक्यमासीत्सहदिग्भिराप्लुतम् ॥ स एकएवोर्वरितो महामुनिर्बभ्राम विक्षिप्य जटा जडांधवत् ॥ १५ ॥
क्षुत्तृट्परीतो मकरैस्तिमिगिलैरुपद्रुतो वीचिनभस्वता हतः ॥ तमस्यपारे पतितो भ्रमन्दिशो न वेद खं गां च परिश्रमेषितः ॥ १६ ॥

षणः (लाटांनीं भयकर) प्रभंजनाघूर्णितवाः (वायूनें खळाळविलें पाणी ज्याचें असा) महार्णवः वरषद्भिः (वृष्टि करणाऱ्या) अंबुदैः (मेघानीं) आपूर्यमाणः (भरला जाणारा) [सन्] क्ष्मा द्वीपवर्षाद्रिभिः समं अप्यधात् (आच्छादिता झाला) ॥ १४ ॥ सक्ष्मांतरिक्षं (पृथ्वी व आकाश यासह) सदिवं सभागणं (नक्षत्रासह) त्रैलोक्य दिग्भिः सह आप्लुत (बुडालेल) आ-सीत्. एकः एव उर्वरितः (उरलेला) सः महामुनिः जटाः विक्षिप्य जडांधवत् बभ्राम (फिरत राहिला) ॥ १५ ॥ क्षुत्तृट्परीतः (क्षुधेने व तृषेने व्याप्त) मकरैः, तिमिंगिलैः (मोठ्या

असें पाहत आहे इतक्यात, सोसाट्याच्या वाऱ्यानें समुद्राचें पाणी उसळू लागलें, लाटांनीं त्याचें स्वरूप भयंकर आलें, मेघानी सारखी वृष्टि चालवून त्यात भर चालविलीच होती, अशा त्या समुद्रानें द्वीपें खंडें व पर्वत ह्यासुद्धा पृथ्वी आच्छादून टाकिली. ॥ १४ ॥ भूमि, आकाश, स्वर्ग, नक्षत्रसमूह व दिशा ह्यासुद्धा सगळें त्रैलोक्य बुडून गेलें. बाकी उ-रलेला कायतो तो एकटा महामुनि (मार्कंडेय) वेड्याआंधळ्यासारखा जटा पसरून फिरत राहिला. ॥ १५ ॥ त्याला क्षुधेनें व तृषेने ग्रासून सोडिले होतें, मगरानीं व तिमिंगि-

र्जनीं उपक्रम चालविला होता, लाटा व वायु एकामागून एक तडाके मारीतच होते. अशा रीतीनें अपार अंधकारांत पडलेला तो मुनि फिरता फिरता थकून गेला. त्याला दिशा कोठे आहेत, आकाश कोणतें व पृथ्वी कोठें गेली काहीं उमज पडेना ! ॥ १६ ॥ तो एखादे वेळीं मोठ्या भोंवऱ्यांत सापडे. केव्हा त्याच्या आंगावर लाटाचे तडाके बसत, क्वचित् प्र-सगीं जलांतील प्राणी तो आपल्याला खायला मिळावा म्हणून दुसऱ्या सजातीय प्राण्याला मारून त्याला (मार्कंडेयाला) खात असत. ॥ १७ ॥ त्याला केव्हा शोक उत्पन्न होई,

लाटांनीं) [च] उपद्रुतः वीचिनभस्वता (लाटांनीं व वाऱ्यानें) हतः अपारे तमसि पतितः परिश्रमेषितः (श्रम पावलेला) [सः] भ्रमन् [सन्] दिशः, खं, गां (पृथ्वीला) च न वेद ॥१६॥ क्वचित् महावर्ते (मोठ्या भोवऱ्यात) गतः, क्वचित् तरलैः (लाटांनीं) ताडितः, क्व अपि स्वयं अन्योन्यघातिभिः (परस्परास मारणाऱ्या) यादोभिः (जलजंतूंनीं) भक्ष्यते. ॥ १७ ॥ क्वचित् शोकं, क्वचित् मोहं, क्वचित् दुःखं, सुखं, भयं, [च] क्वचित् मृत्यु अवाप्नोति, उत व्याध्यादिभिः अर्दितः (पीडिलेला) ॥१८॥ विष्णुमायावृतात्मनः [तस्य] तस्मिन्

क्वचिद्गतो महावर्ते तरलैस्ताडितः क्वचित् ॥ यादोभिर्भक्ष्यते क्वापि स्वयमन्योन्यघातिभिः ॥ १७ ॥
क्वचिच्छोकं क्वचिन्मोहं क्वचिद्दुःखं सुखं भयम् ॥ क्वचिन्मृत्युमवाप्नोति व्याध्यादिभिरुतार्दितः ॥ १८ ॥
अयुतायुतवर्षाणां सहस्राणि शतानि च ॥ व्यतीयुर्भ्रमतस्तस्मिन्विष्णुमायावृतात्मनः ॥ १९ ॥ स कदाचि-
द्भ्रमंस्तस्मिन्पृथिव्याः ककुदि द्विजः ॥ न्यग्रोधपोतं ददृशे फलपल्लवशोभितम् ॥ २० ॥ प्रागुत्तरस्यां
शाखायां तस्याऽपि ददृशे शिशुम् ॥ शयानं पर्णपुटके ग्रसंतं प्रभया तमः ॥ २१ ॥

भ्रमतः [सतः] अयुतायुतवर्षाणां सहस्राणि, शतानि च व्यतीयुः (गेलीं). ॥ १९ ॥ तस्मिन् भ्रमन् सः द्विजः कदाचित् पृथिव्याः ककुदि (उच्च प्रदेशीं) फलपल्लवशोभितं न्यग्रोधपोतं (वडाच्या लहानशा वृक्षास) ददर्श ॥ २० ॥ तस्य अपि प्रागुत्तरस्यां (ईशान्येच्या) शाखायां पर्णपुटके (पानाच्या द्रोणात) शयानं प्रभया तमः ग्रसंतं शिशुं (बाळाला)

केव्हा मोह पडे, कधी दुःख, कधी सुख, कधी भय, एखादेवेळीं मृत्यु येई व कधी व्याधि वगैरे पीडा देत असत. ॥ १८ ॥ अशा रीतीनें विष्णूच्या मायेनें मन वेष्टित होऊन तो त्या उदकांत भ्रमण करीत असतां शेंकडो सहस्र कोटि वर्षें निघून गेलीं. ॥ १९ ॥ एके वेळीं फिरता फिरता त्या ब्राह्मणाला पृथ्वीच्या एका उच्च प्रदेशी फळांनी व पल्लवांनी सुशोभित असा वडाचा लहानसा वृक्ष दिसला. ॥ २० ॥ आणि त्याच्याही ईशान्येकडील शाखेवर पानाच्या द्रोणात निजलेलं एक बाळ दिसून आलें. तो मुलगा आपल्या कांतीनें

अवकार गिळून टाकीत होता. ॥ २१ ॥ त्याचा अंगवर्ण उत्तम पाचमण्यासारखा श्यामळ असून मुखकमल रम्य होते, मान शंखासारखी (तीन वळ्यांनी युक्त) वक्ष स्थळ विशाळ नासिका सरळ व भ्रुकुटि सुंदर होत्या. ॥ २२ ॥ श्वासाच्या योगे हालणाऱ्या केसांनी, तो सुशोभित दिसत होता, शंखाप्रमाणें आत वळ्या असल्यामुळें त्याचे कान सुंदर दिसत असून त्यावर डाळिंबीची फुलें ठेविली होती, पोंवळ्यासारख्या अधरोष्ठाच्या कांतीनें त्याचें मूळचे अमृताप्रमाणें (किंवा चुन्याप्रमाणें) शुभ्र हास्य किंचित् तांबूस होऊन गेलें दुखडी. ॥ २१ ॥ महामरकतश्याम श्रीमद्वदनपंकजं कंबुग्रीव (शंखासारखी मान ज्याची अशा) महोरस्क सुनास सुंदरभ्रुव ॥ २२ ॥ श्वासैजदलकाभातं (श्वासानीं हालणाऱ्या केशानीं शोभलेला) कंबुश्रीकर्णदाडिमं (शंखासारख्या सुंदर कानात डाळिंबाचें फूल ज्याच्या अशा) विद्रुमाधरभासा (पोंवळ्यासारखा अधरोष्ठाच्या कांतीने) ईषच्छोणायितसुधास्मित (किंचित् तांबूस झाले अमृततुल्य हास्य ज्यांचे अशा) ॥ २३ ॥ पद्मगर्भारुणापांग हृद्यहासावलोकन श्वासैजद्वलिसंविग्ननिम्ननाभिदलोदर (श्वासानें हालणाऱ्या वळ्यांनीं चंचल आहे खोल नाभि ज्यावरील असे

महामरकतश्यामं श्रीमद्वदनपंकजम् ॥ कंबुग्रीवं महोरस्कं सुनासं सुंदरभ्रुवम् ॥ २२ ॥
श्वासैजदलकाभातं कंबुश्रीकर्णदाडिमम् ॥ विद्रुमाधरभासेषच्छोणायितसुधास्मितम् ॥२३॥
पद्मगर्भारुणापांगं हृद्यहासावलोकनम् ॥ श्वासैजद्वलिसंविग्ननिम्ननाभिदलोदरम् ॥ २४ ॥
चार्वंगुलिभ्यां पाणिभ्यामुन्नीय चरणांबुजम् ॥ मुखे निधाय विप्रेंद्रो धयतं वीक्ष्य विस्मितः
॥ २५ ॥ तद्दर्शनाद्वीतपरिश्रमो मुदा प्रोत्फुल्लहृत्पद्मविलोचनांबुजः ॥ प्रहृष्टरोमाऽद्भुत-
भावशंकितः प्रष्टुं पुरस्तं प्रससार बालकम् ॥ २६ ॥

पिंपळाच्या पानासारखें उदर ज्याचें अशा) ॥ २४ ॥ चार्वंगुलिभ्यां (सुंदर बोटें ज्यांचीं अशा) पाणिभ्यां (हातांनीं) चरणांबुज उन्नीय (उचलून) मुखे निधाय धयंतं (चोखणाऱ्या) [त] वीक्ष्य विप्रेंद्रः विस्मितः ॥ २५ ॥ तद्दर्शनात् वीतपरिश्रमः (गेले श्रम ज्याचे असा) मुदा प्रोत्फुल्लहृत्पद्मविलोचनांबुजः हृष्टरोमा [सः] अद्भुतभावशंकितः (भाव इ० रूप) [सन्] त होतें. ॥ २३ ॥ त्याचे कटाक्ष कमलगर्भासारखे किंचित् रक्तवर्ण असून अवलोकन मनोहर हास्ययुक्त होतें त्याचें उदर पिंपळाच्या पानासारखें असून त्यावरील वळ्या श्वासाच्या योगें हलत म्हणून त्याची गंभीर नाभि चंचल होत असे. ॥ २४ ॥ त्या मुलाच्या अंगुळि सुंदर होत्या. त्यानें आपल्या हातानी चरणकमल उचलून मुखात घालून त्याचें पान चालविलें होतें. अशी ती रम्य बालमूर्ति पाहून त्या श्रेष्ठ ब्राह्मणाला अत्यंत विस्मय वाटला. ॥ २५ ॥ त्याच्या दर्शनाबरोबर मार्कंडेयाचे श्रम दूर झाले. आनंदामुळें हृदयकमळ व नेत्रकमळें

प्रफुल्ल झाली. रोमाच थरथरले, अत्यंत आश्चर्यकारक रूप पाहून मनात शंका उद्भवली. व तो त्या बालकाला प्रश्न करण्यासाठी पुढें सरला. ॥ २६ ॥ इतक्यात तो मार्गव (मार्कंडेय) त्या बाळाच्या श्वासाबरोबर माशीप्रमाणें पटकन पोटात गेला. तेथें पाहतो तों प्रलयाच्या पूर्वी जसें हें जग बाहेर होतें, तसेंच सगळें आत माडलेलें दिसलें, तेव्हा तर त्याला परमावधि आश्चर्य वाटलें ॥ २७ ॥ आकाश, स्वर्ग, पृथ्वी, नक्षत्रगण, पर्वत, सागर, द्वीपें, खंडें, दिशा, देव असुर, वनें, देश, नद्या, नगरें, खाणी, खेडी, गौळवाड

बालकं प्रष्टुं पुर: प्रससार (सरला) ॥२६॥ तावत् स: भार्गव: शिशो: श्वसितेन अत:शरीरं यथा मशक, [तथा] अविशत् (शिरला), तत्र अपि यथापुरा न्यस्त अद: कृत्स्नश: (पूर्णपणें) अचष्ट (पाहता झाला), अतीव विस्मित: [सन्] अमुह्यत. ॥ २७॥ असौ खं, रोदसी, भगणान् (नक्षत्रसमूह), अद्रिसागरान्, सवर्षान् द्वीपान्, ककुभ:, सुरासुरान्, वनानि, देशान्, सरित:, पुराकरान् खेटान् (शेतीगाव), व्रजान्, आश्रमवर्णवृत्तय:, ॥ २८ ॥ महान्ति भूतानि अथ भौतिकानि, नानायुगकल्पकल्पन कालं, यत् किंचित् अन्य-

तावच्छिशोर्वै श्वसितेन भार्गव: सोऽत:शरीरं मशको यथाऽविशत् ॥ तत्राप्यदो न्यस्तमचष्ट कृत्स्नशो

यथा पुराऽमुह्यदतीव विस्मित: ॥२७॥ खं रोदसी भगणानद्रिसागरान् द्वीपान्सवर्षान्ककुभ: सुरासुरान् ॥

वनानि देशान्सरित: पुराकरान् खेटान्व्रजानाश्रमवर्णवृत्तय: ॥ २८ ॥ महांति भूतान्यथ भौतिकान्यसौ

कालं च नानायुगकल्पकल्पनम् ॥ यत्किंचिदन्यद्व्यवहारकारणं ददर्श विश्वं सदिवावभासितम् ॥२९॥

हिमालयं पुष्पवहां च तां नदीं निजाश्रमं तत्र ऋषीनपश्यत् ॥ विश्वं विपश्यन् श्वसिताच्छिशोर्वै

बहिर्निरस्तो न्यपतल्लयाब्धौ ॥ ३० ॥ तस्मिन्पृथिव्या: ककुदि प्ररूढं वटं च तत्पर्णपुटे शयानम् ॥

तोकं च तत्प्रेमसुधास्मितेन निरीक्षितोऽपांगनिरीक्षणेन ॥ ३१ ॥

त् व्यवहारकारण, [तत्] च [एवं] सत् इव अवभासित विश्वं ददर्श. ॥ २९ ॥ हिमालयं, पुष्पवहा तां नदीं, निजाश्रम, तत्र ऋषीन् [च] अपश्यत् विश्व पश्यन् [स:] शिशो: श्वसितात् बहि: निरस्त: (टाकिलेला) [सन्] लयाब्धौ न्यपतत् ॥ ३० ॥ तस्मिन् पृथिव्या: ककुदि प्ररूढ वट, तत्पर्णपुटे शयान तोक (बालक) च

आश्रम, वर्ण, त्याच्या निर्वाहाची साधनें, ॥ २८ ॥ महाभूतें, भूताची कार्यें, नाना युगाची व कल्पाची रचना करणारा काल, व अन्यही जें काही व्यवहाराला कारण असतें तें सगळें विश्व सत्यासारखें भासविलेलें त्याला तेथे दिसलें। ॥ २९ ॥ तो हिमालय, तेथे ती पुष्पवहा नदी, तिच्या तीरीं तो आपला आश्रम व त्यात असलेले ऋषि त्याच्या दृष्टीस पडले. तो असें विश्व पाहत असता, मुलाच्या उच्छ्वासाबरोबर एकदम बाहेर निघून प्रलयसमुद्रात येउन पडला। ॥ ३० ॥ तेथें पृथ्वीच्या उच्चप्रदेशीं उगवलेला तो वटवृक्ष व त्या

त्या पानाच्या द्रोणात निजलेला तो बालक त्याच्या दृष्टीस पडला. त्या बाळानें प्रेमपूर्वक अमृततुल्य हास्ययुक्त कटाक्षदृष्टीने ह्याच्याकडे पाहिले. नंतर ते
मुनि, ती मूर्ति नेत्राच्या योगें हृदयात स्थापून, अधोक्षजाला आलिंगन देण्यासाठी धावून गेला. ॥ ३१ ॥ ३२ ॥ इतक्यात, एखाद्या हतभागी मनुष्याने व्यापार
जसा त्याच्या वस्तु एकीमागून एक नाहीशा होतात व त्याचा उद्योग फुकट जातो, तसा तो महायोगी व बुद्धिगुहेंत राहणारा साक्षात् भगवान् त्या ऋषीच्या पुढून एकदम नाहीसा

[वीक्ष्य] तत्प्रेमसुधास्मितेन अपागनिरीक्षणेन निरीक्षितः [सन्] ॥ ३१ ॥ अथ नेत्राभ्यां हृदि धिष्ठितं (स्थापिलेल्या) बालकं वीक्ष्य अतिसंक्लिष्ट (फार थकलेला) [सन्]
अधोक्षजं परिष्वक्तुं (आलिंगण्यास) अभ्ययात् (पुढें गेला) ॥ ३२ ॥ तावत् सः भगवान् साक्षात् योगाधीशः गुहाशयः यथा अनीशनिर्मिता (हतभाग्याने निर्मिलेली) ईहा (ललि
व्यापार उद्योग), [तथा] ऋषेः सद्यः (तत्काल) अंतर्दधे (गुप्त झाला). ॥ ३३ ॥ ब्रह्मन्, अथ तं अनु वटः, स लिलं, लोकसंप्लव [च] क्षणात् अस्य तिरोधायि (लोपले) [स.]

अथ तं बालकं वीक्ष्य नेत्राभ्यां धिष्ठितं हृदि ॥ अभ्ययादतिसंक्लिष्टः परिष्वक्तुमधोक्षजम् ॥ ३२ ॥

तावत्स भगवान्साक्षाद्योगाधीशो गुहाशयः ॥ अंतर्दध ऋषेः सद्यो यथेहाऽनीशनिर्मिता ॥ ३३ ॥

तमन्वथ वटो ब्रह्मन्सलिलं लोकसंप्लवः ॥ तिरोधायि क्षणादस्य स्वाश्रमे पूर्ववत्स्थितः ॥ ३४ ॥

इ० भा० म० द्वा० मायादर्शनं नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ सूत उवाच । सएवमनुभूयेदं

नारायणविनिर्मितम् ॥ वैभवं योगमायायास्तमेव शरणं ययौ ॥ १ ॥ मार्कंडेय उवाच । प्रपन्नो

ऽस्म्यंघ्रिमूलं ते प्रपन्नाभयदं हरे ॥ यन्मायया ऽपि विबुधा मुह्यंति ज्ञानकाशया ॥ २ ॥

स्वाश्रमे पूर्ववत् स्थितः ॥३४॥ ॥ इति श्रीभागवतान्वये द्वादशस्कंधे नवमोऽध्याय ॥९॥ सूतः उवाच — सः एवं नारायणविनिर्मितं इदं योगमायायाः वैभवं अनुभूय (अनुभवून) तं एव शरणं ययौ. ॥ १ ॥ मार्कंडेयः उवाच — " हरे, प्रपन्नाभयदं ते अंघ्रिमूलं प्रपन्नः अस्मि, ज्ञानकाशया (ज्ञानाप्रमाणें प्रकाशणाऱ्या) यन्मायया विबुधाः अपि मुह्यंति." ॥२॥

झाला, ॥ ३३ ॥ त्यसें, त्याच्या मागून तो वटवृक्ष, तें उदक, तो लोकाचा प्रलय सगळें क्षणात नाहींसें झालें, - ऋषीला ईश्वराचें आलिंगन मिळालें नाही - व तो आपल्या आश्र
मात पूर्वीप्रमाणें स्वस्थ राहिला. ॥ ३४ ॥ ॥ इति द्वादशस्कंधे नवमो ऽध्यायः ॥ ९ ॥ सूत म्हणाले — ऋषिहो! तो मार्कंडेय मुनि नारायणानें निर्मिलेलें हें योगमायेचें वैभव
अशा प्रकारें अनुभवल्यावर त्याच प्रभूला शरण गेला. ॥ १ ॥ मार्कंडेय म्हणाला :— 'हरे, शरणागताला अभय देणाऱ्या तुझ्या चरणतलाला मी शरण आलों. - तुझें भजन न केलें

असतां - विद्वान् देखील ज्ञानाप्रमाणे प्रकाशमान असा तुझ्या मायेच्या योगें मोहून जातात.' ॥ २ ॥ सूत ह्मणाले .— ऋषे, अशा प्रकारें मार्कंडेयाचें मन निश्चल झालें एके प्रसंगी प्रमथगणांनीं वेष्टिलेले भगवान् रुद्र भवानीसह नंदिकेश्वरावर बसून आकाशमार्गें पर्यटन करीत असतां त्याची दृष्टि ह्या ऋषीवर गेली. ॥ ३ ॥ तेव्हां उमेनें ऋषीकडे पाहून शंकराला ह्मटलें :— "भगवन्, ह्या ब्राह्मणाकडे पहा. ह्याचीं देह, इंद्रियें व मन हीं निश्चळ होऊन राहिलीं आहेत. ॥ ४ ॥ तुफान शांत झालें असतां समुद्रांतील उदक व नक्रसमूह

सूतः उवाच — रुद्राण्या [सह] स्वगणैः वृतः वृषेण दिवि पर्यटन् भगवान् रुद्रः एवं निभृतात्मानं (निश्चळ मन ज्याचें असा) तं ददर्श ॥ ३ ॥ अथ उमा तं ऋषिं वीक्ष्य गिरिशं समभाषत— " भगवन्, यथा वातापाये (वायूचा नाश झाला असतां) निभृतोदझषव्रातः (शांत झालीं उदक व जलचरसमूह हीं ज्यांतील असा) अर्णवः (समुद्र), [तथा]

सूत उवाच । तमेवं निभृतात्मानं वृषेण दिवि पर्यटन् ॥ रुद्राण्या भगवान् रुद्रो
ददर्श स्वगणैर्वृतः ॥ ३ ॥ अथोमा तमृषिं वीक्ष्य गिरिशं समभाषत ॥ पश्येमं
भगवन्विप्रं निभृतात्मेंद्रियाशयम् ॥ ४ ॥ निभृतोदझषव्रातं वातापाये यथाऽर्णवम् ॥
कुर्वस्य तपसः साक्षात्संसिद्धिं सिद्धिदो भवान् ॥ ५ ॥ श्रीभगवानुवाच । नैवेच्छत्या-
शिषः क्वापि ब्रह्मर्षिर्मोक्षमप्युत ॥ भक्तिं परां भगवति लब्धवान्पुरुषेऽव्यये ॥ ६ ॥

निभृतात्मेंद्रियाशयं विप्रं पश्य. अस्य तपसः संसिद्धिं कुरु. भवान् साक्षात् सिद्धिदः " ॥ ४ ॥ ५ ॥ श्रीभगवान् उवाच— " भगवति अव्यये पुरुषे परां भक्तिं लब्धवान् [illegible] क्व अपि आशिषः, मोक्षं अपि न एव इच्छति. ॥ ६ ॥

हीं शांत होऊन जातात तशीच ह्याची स्थिति झाली आहे. भगवन्, आपण उपासकाना सिद्धि देतां, त्या अर्थीं ह्या ब्राह्मणाला तपाचें उत्तम फळ द्यावें." ॥ ५ ॥ श्रीभगवान् (शंकर) ह्मणाले :— " भवानि, ज्याची निर्विकार अंतर्यामी भगवंताच्या ठिकाणी परम भक्ति जडली, तो ब्रह्मर्षि उपभोग मिळविण्याची, फार तर काय, मोक्षाची देखील कधीही इच्छा करीत नाहींच. (तसाच हा पुरुष आहे). ॥ ६ ॥

तथापि, भवानि, आपण ह्या साधूशी संवाद करूं. मनुष्याना साधूंचा समागम घडणें हा परम लाभ होय. " ॥ ७ ॥ सूत ह्मणाले '— ऋषिवरा, साधु जे ।-व्यावण्याच। इच्छा
करिताव तें स्थान ते सकलविद्याधिपति सर्व जीवाचे चालक भगवान शंकर होत. ते इतकें बोलून त्या ऋषीजवळ गेले. ॥८॥ मार्कंडेयानें आपली बुद्धिवृत्ति अन्तरात्म्याकडे वळविली
होती ह्मणून त्याला ते जगाचे आत्मे साक्षात् भवानीशंकर आपल्याजवळ आले आहेत ही गोष्ट कळली नाहीं. त्याला त्या वेळीं देहाचें व विश्वाचेंही ज्ञान न्हव्हतें. ॥ ९ । भगवान्
शंकरानी तें जाणून, जसा वायु छिद्रात शिरतो तसा, योगमायेंकरून त्याच्या हृदयगुहेंतील आकाशात प्रवेश केला. ॥ १० ॥ मार्कंडेय आपल्या अंतरी देखील (केवळ
भवानि, अथ अपि एतेन साधुना संवदिष्यामः (संवाद करूं) हि नृणां साधुसमागम. अयं परमः लाभ. " ॥७॥ सूत. उवाच—इति उक्त्वा सतां गतिः सर्वविद्यानां ईशान.
सर्वदेहिनां ईश्वरः भगवान् तं उपेयाय (जवळ गेला) ॥८॥ रुद्धधीवृत्तिः (आवरिली बुद्धीची वृत्ति ज्याने असा) [सः] साक्षात् ईशयो जगदात्मनो. तयो. आगमन, आत्मान, विश्व
एव च न वेद. ॥ ९ ॥ भगवान् गिरीशः ईश्वरः तत् अभिज्ञाय (जाणून) योगमायया वायुः छिद्र इव तद्गुहाकाशं आविशत्. ॥ १० ॥ आत्मनि अपि प्राप्त तडित्पिंगजटा-

अथाऽपि संवदिष्यामो भवान्येतेन साधुना ॥ अयं हि परमो लाभो नृणां साधुसमागमः ॥ ७ ॥ सूत उवाच । इत्युक्त्वा
तमुपेयाय भगवान्स सतां गतिः ॥ ईशानः सर्वविद्यानामीश्वरः सर्वदेहिनाम् ॥८॥ तयोरागमनं साक्षादीशयोर्जगदात्मनोः॥
न वेद रुद्धधीवृत्तिरात्मानं विश्वमेव च ॥ ९॥ भगवांस्तदभिज्ञाय गिरीशो योगमायया ॥ आविशत्तद्गुहाकाशं वायुश्छिद्र-
मिवेश्वरः ॥ १० ॥ आत्मन्यपि शिवं प्राप्तं तडित्पिंगजटाधरम् ॥ त्र्यक्षं दशभुजं प्रांशुमुद्यंतमिव भास्करम् ॥ ११ ॥
व्याघ्रचर्मांबरधरं शूलखट्वांगचर्मभिः ॥ अक्षमालाडमरुककपालासिधनुःसह ॥ १२ ॥ बिभ्राणं सहसा भात विचक्ष्य
हृदि विस्मितः ॥ किमिदं कुत एवेति समाधेर्विरतो मुनिः ॥ १३ ॥

धरं (विजेसारख्या पिंगट जटा धरणाऱ्या) त्र्यक्षं दशभुज, उद्यतं (उगवणाऱ्या) भास्करं इव, प्रांशु (उंच) व्याघ्रचर्मांबरधर, शूलखट्वांगचर्मभि. सह अक्षमालाडमरुककपालासिधनु.
बिभ्राणं (धरणाऱ्या) हृदि सहसा भात (प्रकाशलेल्या) शिव विचक्ष्य (पाहून) विस्मित. [आसीत्] ॥ ११ ॥ १२ ॥ " इदं किं ! कुत. एव ! " इति समाधे. विरत ॥ १३ ॥
बाहेरच नव्हे) शंकर प्राप्त झाले हे पाहून आश्चर्यानें थक्क झाला. शंकरानीं विजेसारख्या पिंगट जटा धरिल्या होत्या. त्याना तीन नेत्र व दहा भुज होते त्यांची मूर्ति
उंच असून उगवणाऱ्या सूर्याप्रमाणें देदीप्यमान दिसे. ॥ त्यानी आंगावर व्याघ्रचर्मरूप वस्त्र पांघरलें असून शूल, खट्वांग, चर्म, अक्षमाळा, डमरु, कपाल, खड्ग व धनुष्य ॥
ही आयुधें धरिलीं होतीं. त्यानीं आपली मूर्ति हृदयात एकदम प्रकट केली. ती पाहून ' हे काय, व कोठून आलें ! ' असें ह्मणून मुनीनें समाधि उतरला ॥ ११ ॥ १२ ॥ १३ ॥

व नेत्र उघडले तों गणांसह उमेसहवर्तमान त्रैलोक्याचे एक गुरु भगवान् शंकर त्याच्या दृष्टीस पडले. तेव्हां मुनीनें त्यांना शिरसा वंदन केलें, ॥ १४ ॥ व गणासह भवानी-शंकरांची स्वागत, आसन, पाद्य, अर्घ्य, गंध, माळा, धूप, दीप ह्या उपचारांनीं पूजा केली, ॥ १५ ॥ आणि म्हटलें :– 'हे विश्वव्यापका ईश्वरा, आत्मसामर्थ्यानें तुझ्या सकळ इच्छा पूर्ण झालेल्या आहेत; तुजमुळें ह्या सगळ्या जगाला सुख प्राप्त होतें. तेव्हां तुझें आम्ही कोणतें कार्य करणार? ॥ १६ ॥ प्रभो, तूं वस्तुतः शिव (निर्गुण) अर्थात शान्त

मुनिः नेत्रे उन्मील्य (उघडून) सगणं सोमया (भवानीसह) आगतं [रुद्रं] ददर्श मुनिः त्रिलोकैकगुरुं रुद्रं शिरसा ननाम. ॥ १४ ॥ उमया सह सगणाय तस्मै स्वागतासनपाद्यार्घ्यगंधस्रग्धूपदीपकैः सपर्यां (पूजेला) व्यदधात् (करिता झाला), आह च— 'विभो, ईशान, आत्मानुभावेन पूर्णकामस्य ते किं करवाम, येन इदं जगत् निर्वृतं? ॥ १६ ॥

नेत्रे उन्मील्य ददृशे सगणं सोमयाऽऽगतम् ॥ रुद्रं त्रिलोकैकगुरुं ननाम शिरसा मुनिः ॥ १४ ॥
तस्मै सपर्यां व्यदधात्सगणाय सहोमया ॥ स्वागतासनपाद्यार्घ्यगंधस्रग्धूपदीपकैः ॥ १५ ॥ आह
चाऽऽत्मानुभावेन पूर्णकामस्य ते विभो ॥ करवाम किमीशान येनेदं निर्वृतं जगत् ॥ १६ ॥ नमः
शिवाय शांताय सत्त्वाय प्रमृडाय च ॥ रजोजुषे ऽप्यघोराय नमस्तुभ्यं तमोजुषे॥१७॥सूत उवाच ।
एवं स्तुतः स भगवानादिदेवः सतां गतिः ॥ परितुष्टः प्रसन्नात्मा प्रहसंस्तमभाषत॥१८॥श्रीभगवानु-
वाच । वरं वृणीष्व नः कामं वरदेशा वयं त्रयः ॥ अमोघं दर्शनं येषां मर्त्यो यद्विन्दते ऽमृतम्॥१९॥

शिवाय शांताय सत्वाय प्रमृडाय नमः. रजोजुषे अपि अघोराय तमोजुषे तुभ्यं नमः" ॥ १७ ॥ सूतः उवाच— एवं स्तुतः परितुष्टः प्रसन्नात्मा सतां गतिः सः भगवान् आदिदेवः प्रहसन् [सन्] तं अभाषत — ॥ १८ ॥ श्रीभगवान् उवाच — नः कामं वरं वृणीष्व (माग) त्रयः वयं वरदेशाः. येषां दर्शनं अमोघं (नित्य सफळ). यत् मर्त्यः अ-

आहेस. परंतु, तूंच सत्वगुण स्वीकारून लोकांना अत्यंत सुख देतोस, रजोगुण स्वीकारितोस व तमोगुणाचाही अंगिकार करून पुन्हा अघोर (भयंकर नव्हे असा) असतोस. तुला माझे अनेक नमस्कार असोत.' ॥ १७ ॥ सूत म्हणाले :– अरे, भगवान् शंकर हे सत्पुरुषाचें प्राप्तिस्थान होत. मार्कंडेयानें अशा प्रकारें स्तव केला असतां त्यांना संतोष वाटला व प्रसन्न अंतःकरणानें, हासत हांसत, ते मार्कंडेयाला म्हणाले :– ॥ १८ ॥ श्रीभगवान् (शंकर) बोलले :– 'मुने, आम्हापासून अपेक्षित वर मागून घे. आम्ही तिघे (ब्रह्मा

विष्णु महेश) वरदात्या लोकाचे भवितव्य आहों. ज्यांचें दर्शन कधींही निरर्थक नसतें व ज्यांपासून मनुष्याला मोक्ष मिळतो, ते आम्ही आहो. ॥ १९ ॥ - मुने, वर देणं ही
आम्ही आपली सेवा करीत आहों, हा आपल्यावर अनुग्रह करितों असा अर्थ नव्हे; कारण, आपण जगताला वंद्य आहां; पहा :- ब्राह्मण म्हणजे साधु, शांत व संगरहित अ-
सून भूतांविषयीं दयाळु असतात, त्यांची आह्मांवर अचळ भक्ति असते. ते कोणाशीं वैर करीत नाहींत तर सर्वत्र समदृष्टि ठेवितात. ॥ २० ॥ लोकांसहित सगळे लोकपाळ त्यांना
वंदन करितात, पूजितात व त्यांची सेवा चालवितात. मी, ब्रह्मदेव आणि स्वतः सर्वेश्वर हरि असे आम्ही सगळे त्यांच्या सेवेंत सादर असतों. ॥ २१ ॥ ते मजमध्यें, विष्णूंत ब्रह्म-
मूर्ते विद्यते. ॥ १९ ॥ ब्राह्मणाः साधवः, शांताः, निःसंगाः, भूतवत्सलाः, अस्मासु एकांतभक्ताः, निर्वैराः, समदर्शिन [च संति] ॥ २० ॥ सलोकाः लोकपालाः, अहं,
भगवान् ब्रह्मा, स्वयं ईश्वरः हरिः च तान् वंदंति, अर्चंति, उपासते [च]. ॥ २१ ॥ ते मयि, अच्युते, अजे च आत्मनः, जनस्य अपि अणु (अल्प) अपि भिदां न चक्षते

ब्राह्मणाः साधवः शांता निःसंगा भूतवत्सलाः ॥ एकांतभक्ता अस्मासु निर्वैराः समदर्शिनः ॥ २० ॥
सलोका लोकपालास्तान्वंदंत्यर्चंत्युपासते ॥ अहं च भगवान्ब्रह्मा स्वयं च हरिरीश्वरः ॥ २१ ॥
न ते मय्यच्युते ऽजे च भिदामण्वपि चक्षते ॥ नाऽऽत्मनश्च जनस्यापि तद्युष्मान्वयमीमहि ॥ २२ ॥
न ह्यम्मयानि तीर्थानि न देवाश्चेतनोज्झिताः ॥ ते पुनंत्युरुकालेन यूयं दर्शनमात्रतः ॥ २३ ॥ ब्राह्मणे-
भ्यो नमस्यामो येऽस्मद्रूपं त्रयीमयम् ॥ बिभ्रत्यात्मसमाधानतपःस्वाध्यायसंयमैः ॥२४॥ श्रवणाद्दर्शनाद्वापि
महापातकिनोऽपि वः ॥ शुध्येरन्नंत्यजाश्चापि किमु संभाषणादिभिः ॥ २५ ॥

(पाहात नाहींत). तत् वयं युष्मान् ईमहि (शरण आलों) ॥ २२ ॥ अम्मयानि (उदकरूप) तीर्थानि न. चेतनोज्झिताः (अचेतन जड) देवताः न. ते उरुकालेन पुनंति यूयं
दर्शनमात्रतः [पुनीथ]. ॥ २३ ॥ ये आत्मसमाधानतपःस्वाध्यायसंयमैः त्रयीमयं अस्मद्रूपं बिभ्रति, [तेभ्यः] ब्राह्मणेभ्यः नमस्यामः. ॥ २४ ॥ महापातकिनः
देवात, आत्म्यामध्यें व जनात देखील अणुमात्रही भेद मानीत नाहींत. म्हणून आम्ही आपणा सेवा करितों. ॥ २२ ॥ उदकाच्या राशि हीं खरी तीर्थें नव्हत व चेतनारहित मूर्ति हे देव
नव्हत; कारण, तीं तीर्थें व ते देव पुष्कळ काळपर्यंत सेवा करावी तेव्हा पवित्र करितात, आणि तुम्ही तर केवळ दर्शनानेंच प्राण्यांस उद्धरतां. ॥ २३ ॥ जे आमचें वेदत्रयीसज्ञक
रूप चित्ताची एकाग्रता, आलोचन, अध्ययन व मौनादि नियम ह्यांच्यायोगें धारण करितात (वागवितात), त्या ब्राह्मणाला आम्ही नमस्कार करितों. ॥२४॥ तुमचें केवळ नाम कानीं
पडलें किंवा तुमचें दर्शन घडलें तरी देखील महापातकीच नव्हत तर चांडाळ सुद्धा शुद्ध होतात, मग तुमच्याशीं संभाषण, समागम इत्यादिकांच्यायोगें पवित्र मिळेल हें काय

सांगितलें पाहिजे ?' ॥ २९ ॥ सूत ह्मणाले — ऋषे, ज्याचें शिरोभूषण चंद्र, त्या भगवंताचें धर्मरहस्ययुक्त व अमृततुल्य हें भाषण कर्णद्वारा प्राशन केलें तथापि मार्कंडेयाला तृप्ति वाटेना. ॥ २६ ॥ विष्णूच्या मायेनें त्याला पुष्कळ वेळ गरगरा फिरविलें व अत्यंत कृश केलें पण आता शंकराच्या भाषणामृतानें त्याचें सर्व क्लेशराशि दूर सारिले. तेव्हा तो भगवंताला ह्मणाला :— ॥ २७ ॥ मार्कंडेयऋषि बोलला :— 'अहो, ईश्वराची ही लीला प्राण्याना कळून येणें कठिण खरें, कारण स्वताचें नियमन करणारे (स्वतंत्र, ज्याना शास्ता कोणी नाही असे) जगदीश्वर स्वतां नमन व स्तुति करीत सुटतात ! ॥ २८॥ अथवा, बहुशः धर्मोपदेशक पुरुष प्राण्यानी धर्म स्वीकारावे ह्यासाठीं स्वता आच-

अपि, अंत्यजाः च अपि यः श्रवणात्, दर्शनात् वा अपि शुध्येरन्; समाषणादिभिः [शुध्यति इति] किमु ? " ॥ २५ ॥ सूतः उवाच—ऋषिः इति चंद्रललामस्य (चंद्र भूषण ज्याचे त्या शंकराचें) धर्मगुह्योपबृंहित अमृतायनं वचः कर्णयोः पिबन् [सन्] न अतृप्यत् ॥ २६ ॥ विष्णोः चिरमायया भ्रामितः भृशं कर्शितः सः शिव-वागमृतध्वस्तक्लेशपुंजः [सन्] तं अब्रवीत्— ॥ २७ ॥ ऋषिः उवाच— " अहो इयं ईश्वरलीला शरीरिणां दुर्विभाव्या ! यत् जगदीश्वराः ईशितव्यानि नमति, स्तुवंति

सूत उवाच । इति चंद्रललामस्य धर्मगुह्योपबृंहितम् ॥ वचोऽमृतायनमृषिर्नातृप्यत्कर्णयोः पिबन् ॥ २६ ॥ स चिरं मायया विष्णोर्भ्रामितः कर्शितो भृशम् ॥ शिववागमृतध्वस्तक्लेशपुंजस्तमब्रवीत् ॥ २७ ॥ ऋषिरुवाच । अहो ईश्वरलीलेयं दुर्विभाव्या शरीरिणाम् ॥ यन्नमंतीशितव्यानि स्तुवंति जगदीश्वराः ॥ २८ ॥ धर्मं ग्राहयितुं प्रायः प्रवक्तारश्च देहिनाम् ॥ आचरंत्यनुमोदंते क्रियमाणं स्तुवंति च ॥ २९ ॥ नैतावता भगवतः स्वमायामयवृत्तिभिः ॥ न दुष्येतानुभावस्तैर्मायिनः कुहकं यथा ॥ ३० ॥ सृष्ट्वेदं मनसा विश्वमात्मनाऽनुप्रविश्य यः ॥ गुणैः कुर्वद्भिराभाति कर्तेव स्वप्नदृग्यथा ॥ ३१ ॥

[च]. ॥ २८ ॥ प्रवक्तारः (धर्म सांगणारे) प्रायः देहिनां धर्मं ग्राहयितुं [स्वयं] आचरति, क्रियमाणं अनुमोदते, स्तुवंति च. ॥ २९ ॥ एतावता स्वमायामयवृत्तिभिः तैः भगवतः अनुभावः, यथा मायिनः कुहकं (कपट) [तथा इद, एतेन] न दुष्येत. ॥३०॥ यथा स्वप्नदृक्, [तथा] यः इद विश्व सृष्ट्वा आत्मना अनुप्रविश्य कुर्वद्भिः गुणैः कर्तृ-

रण करितात, अनुमोदन देतात व कोणी आचरिले असता त्याची प्रशंसा करितात. ॥२९॥ – देवा, आपण ह्मणाल.— ' ही गोष्ट मी करीन कसा ? कारण, ह्यामुळें माझा प्रभाव कमी होतो. ' तर ईश्वरा – तूं नमन स्तुति वगैरे करितोस ह्या तुझ्या मायामय वृत्ति आहेत, जसें प्रसिद्ध मायाव्याचें (गारुड्याचें) कपट तसेंच तुझें हें. – गारुड्याच्या कपटानें त्याचा प्रभाव कमी होत नाही तसाच – हे महामायावी भगवंता, ह्या नमनादि कृतींनी तुझ्या सामर्थ्याला दोष लागत नाहीं. ॥ ३० ॥ जसा स्वप्न पहाणारा पुरुष स्वप्नात अविद्येच्या योगानें अनेक पदार्थ उत्पन्न करून व त्यात प्रवेश करून व्यवहार चालवितो, तसा तू केवळ इच्छामात्रानें हें विश्व निर्माण करून त्यामध्ये आत्मरूपानें प्रवेश करि.

वाचा आसाति, ॥ ३१ ॥ तस्मै त्रिगुणाय गुणात्मने केवलाय अद्वितीयाय गुरवे ब्रह्ममूर्तये भगवते नमः. ॥ ३२ ॥ भूमन्, वरदर्शनात् त्वत् क नु परं वरं वृणे, यद्दर्शनात् पुमान् पूर्णकामः, सत्यकामः [च] भवेत्. ॥ ३३ ॥ अथ अपि पूर्णात् कामाभिवर्षणात् [त्वत्त.] भगवति, तत्परेषु, तथा त्वयि अच्युता भक्तिं एक वरं वृणे. " ॥३४॥

भगवंना, तूं त्रिगुणात्मक बनलास - तरी जीवासारखा गुणाच्या योगें तोस व वस्तुतः गुण सर्व व्यवहार चालवीत असतां तूंच ते चालविणारा असा अनुभवाला येतोस. ॥ ३१ ॥ तुजहून दुसरा कोणी नाहीं तूच गुरु व परब्रह्ममूर्ति आहेस. तुला नमस्कार असो. ॥ ३२ ॥ हे व्यापका, पराभव पावत नाहीस - तर गुणाचा नियामक असतोस. तूं एक आहेस, तुजहून दुसरा कोणी नाहीं तूच गुरु व परब्रह्ममूर्ति आहेस. तुझें दर्शन हा अत्युत्तम लाभ होय. तुझ्या दर्शनामुळें पुरुष सकलानंदरूप बनतो व त्याच्या सर्व इच्छा पूर्ण होतात. तेव्हा तुजपासून वेगळा वर तो कोणता वरें मागून घेऊं? ॥३३ ॥ तथापि मी एक वर तुजपाशी मागतों तूं स्वता पूर्णकाम व भक्ताच्या कामना पुरविणारा आहेस. माझी भगवंतावर, भगवद्भक्तावर तशीच तुजवर अटळ भक्ति जडावी, एवढाच वर

तस्मै नमो भगवते त्रिगुणाय गुणात्मने ॥ केवलायाद्वितीयाय गुरवे ब्रह्ममूर्तये ॥३२॥ कं वृणे नु परं भूमन्वरं त्वद्वरदर्शनात् ॥ यद्दर्शनात्पूर्णकामः सत्यकामः पुमान्भवेत् ॥ ३३ ॥ वरमेकं वृणे ऽथापि पूर्णात्कामाभिवर्षणात् ॥ भगवत्यच्युतां भक्तिं तत्परेषु तथा त्वयि ॥३४॥ सूत उवाच । इत्यर्चितो ऽभिष्टुतश्च मुनिना सूक्तया गिरा ॥ तमाह भगवान् शर्वः सर्वया चाभिनंदितः ॥३५॥ कामो महर्षे सर्वो ऽयं भक्तिमांस्त्वमधोऽक्षजे ॥ आकल्पांताद्यशः पुण्यमजरामरता तथा ॥३६॥ ज्ञानं त्रैकालिकं ब्रह्मन्विज्ञानं च विरक्तिमत् ॥ ब्रह्मवर्चस्विनो भूयात्पुराणाचार्यता ऽस्तु ते ॥३७॥

सूतः उवाच— मुनिना सूक्तया गिरा इति अर्चितः, अभिष्टुतः च भगवान् शर्वः शर्वया अभिनंदितः [सन्] तं आह — ॥३५॥ महर्षे, ते अथ सर्वः कामः [अस्तु] त्वं अधोक्षजे भक्तिमान् [भवेः]. आकल्पांतात् पुण्य यशः, तथा अजरामरता [च भवेत्] ॥३६॥ ब्रह्मन्, ब्रह्मवर्चस्विन [तव] त्रैकालिक ज्ञान, विरक्तिमत् विज्ञान [च] भूयात्. ते

मला दे.' ॥३४॥ सूत म्हणाले :— ऋषे, मुनीनें मधुर वाणीच्या योगें अशी पूजा व स्तुति केली असता भगवान् शंकर प्रसन्न होऊन वर देण्यास सिद्ध झाले. भवानीनें त्याना अनुमोदन दिलें, तें म्हणाले .— ॥ ३५ ॥ "महर्षे, तू इंद्रियनियामक प्रभूची भक्ति करितोसच, तुझी ही इच्छा पूर्ण होवो. कल्पसमाप्तीपर्यंत तुझी पवित्र कीर्ति राहील व तुला अजरामरपणा (वृद्धत्व व मरण न येणें) प्राप्त होईल. ॥३६॥ ब्रह्मन्, तुला त्रिकालज्ञान व वैराग्यासह उपनिषदांतील ज्ञान मिळेल. तुझ्या आंगी ब्रह्मवर्चस्व आहेच शिवाय तू पुराणाचार्य हो-

शील." ॥३७॥ सूत ह्मणालेः – ऋषे, तो त्रिनयन ईश्वर मुनीला असे वर देऊन त्यानें अनुभवलेलें भगवन्मायेचें वैभव उमेला सांगत सांगत तेथून निघून गेला. ॥ ३८ ॥ इकडे तो भृगुकुलदीपक मुनि-मार्कंडेयही उत्तम योगसामर्थ्य मिळालें तेव्हा ह्या पृथ्वीवर फिरत राहिला व अद्यापि फिरतच असतो. त्याची साक्षात् हरीच्या ठिकाणीं अढळ भक्ती जडून राहिलेली आहे. ॥ ३९ ॥ हें भगवान् बुद्धिसंपन्न मार्कंडेय मुनीनें अनुभवलेलें भगवन्मायेचें विलक्षण वैभव तुम्हा निवेदन केलें. ॥४०॥ ऋषिहो. तुह्मी ह्मणाल, 'मार्कंडेयाला सात कल्प आयुष्य असें जें वृद्ध जन ह्मणत आले तें शेवटीं विरुद्धच ठरलें. – तर त्याविषयीं सांगतों ऐका :- मार्कंडेयानें अनुभवलेलें हें भगवंताच्या मायेचें वैभव (अनेक कल्प) त्यालाच

पुराणसार्थता अस्तु " ॥ ३७ ॥ सूतः उवाच — सः त्र्यक्षः (तीन नेत्र ज्याला असा) ईश्वरः एवं मुनये वरान् दत्वा देव्यै तत्कर्म, मुने. पुरा यत् अनुभूत, [तत् च] कथयन् [सन्] अगात्. ॥ ३८ ॥ सः अपि अवाप्तमहायोगमहिमा भार्गवोत्तमः अद्य हरौ एकांतता गतः अधुना अपि विचरति. ॥ ३९ ॥ धीमतः मार्कंडेयस्य अनुभूतं एतत् भगवतः अद्भुत मायावैभवं ते अनुवर्णितं ॥ ४० ॥ नृणां संसृतिं आत्मनः माया [इति] अविद्वांसः केचित् एतत् कादाचित्कं (थोड्या वेळातील खेळ) अनादि (पुष्कळ

सूत उवाच । एवं वरान्स मुनये दत्त्वा ऽगात्त्र्यक्ष ईश्वरः ॥ देव्यै तत्कर्म कथयन्ननुभूतं पुरा ऽमुना ॥ ३८ ॥ सोऽप्यवाप्तमहायोगमहिमा भार्गवोत्तमः ॥ विचरत्यधुनाऽप्यद्धा हरावेकांततां गतः ॥ ३९ ॥ अनुवर्णितमेतत्ते मार्कंडेयस्य धीमतः ॥ अनुभूतं भगवतो मायावैभवमद्भुतम् ॥ ४० ॥ एतत्केचिदविद्वांसो मायासंसृतिमात्मनः ॥ अनाद्यावर्तितं नृणां कादाचित्कं प्रचक्षते ॥ ४१ ॥ य एवमेतद्भृगुवर्य वर्णितं रथांगपाणेरनुभावभावितम्॥संश्रावयेत्संशृणुयादु तावुभौ तयोर्न कर्माशयसंसृतिर्भवेत्॥४२॥इति भा०म०द्वादशस्कंधे दशमो ऽध्यायः॥१०॥

वेळ) आवर्तितं (चाललेलें) प्रचक्षते ॥ ४१ ॥ भृगुवर्य, उ यः एवं एतत् अनुवर्णितं संश्रावयेत्, शृणुयात् वा, [यौ] उभौ तौ [कृतार्थौ]. तयोः कर्माशयसंसृतिः न भवेत् ॥४२॥

॥ इति श्रीभागवतान्वये द्वादशस्कंधे दशमो ऽध्यायः ॥ १० ॥

एकदम एकदम दिसलें, – सगळ्यांना साधारणपणें दिसलें असें नव्हे. – ज्याना, मनुष्याच्या मागें लागलेला संसार ह्मणजे भगवंताची माया होय हें कळत नाहीं ते काही मूढ लोक हें सात कल्प पुष्कळ वेळपर्यंत (देवांचीं दोन हजार युगें ह्मणजे एक कल्प, असे सात कल्प) एकामागून एक चाललें होतें असें म्हणतात. – विद्वान् लोक असें समजतात कीं तो बालमुकुंदाच्या श्वासोच्छ्वासाबरोबर त्याच्या उदरात सात वेळा जाऊन बाहेर पडला, ते सात कल्प होत. – ॥ ४१ ॥ भृगुकुलवरा, चक्रपाणि भगवंताच्या प्रभावानें भरलेलें हें असें आख्यान मीं तुम्हा सांगितलें. जो मनुष्य हें लोकाना ऐकवील व जो स्वता ऐकेल त्या दोघानाही कर्मवासनामूलक संसार भोगावा लागणार नाहीं. ॥ ४२ ॥

॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने द्वादशस्कंधे दशमो ऽध्यायः ॥ १० ॥

॥ १ ॥ तंत्र-

शौनक म्हणाले :– हे भगवद्भक्ता सूता, तूं समस्त तंत्रसिद्धांताचें रहस्य जाणतोस. म्हणून बहुश्रुत लोकांत उत्तम जो तूं त्या तुला आम्ही एवढी गोष्ट विचारितों. मार्गी लोक उपासना कर्तव्य असता ज्ञानघन लक्ष्मीपति प्रभूच्या हस्तपादादि अंगाची, गरुडादि उपांगाची, सुदर्शनादि आयुधाची व कौस्तुभादिक अलंकाराची कल्पना कोणत्या तत्त्वानी कशी करितात, ॥ २ ॥ तें आम्हाला निवेदन कर. तुझें कल्याण होवो. आम्हाला उपासनापद्धति समजून घेण्याची इच्छा आहे. उपासनेमध्यें निपुणता प्राप्त झाली असता मर्त्याला अमरता मिळते ! ॥ ३ ॥ सूत म्हणाला :– मी गुरूंना वंदन करून तुम्हाला विष्णूच्या विराट्स्वरूपादिक विभूति सांगतों. ब्रह्मदेव आदिकरून आचार्यांनीं त्याचें

शौनकः उवाच—भागवत, बहुवित्तमं भवंतं इमं अर्थं पृच्छामः– भवान् समस्ततंत्रराद्धांते तत्त्ववित्. ॥ १ ॥ तांत्रिकाः केवलस्य श्रियः पतेः परिचर्यायां अंगोपांगायुधाकल्पं यथा च यैः कल्पयंति, ॥ २ ॥ त क्रियायोगं बुभुत्सतां (जाणूं इच्छिणाऱ्या) नः वर्णय, येन क्रियानैपुणेन मर्त्यः अमर्त्यतां यायात् ॥३॥ सूतः उवाच—गुरून् नमस्कृत्य

शौनक उवाच । अथेममर्थं पृच्छामो भवंतं बहुवित्तमम् ॥ समस्ततंत्रराद्धांते भवान्भागवत तत्त्ववित् ॥ १ ॥ तांत्रिकाः परिचर्यायां केवलस्य श्रियः पतेः ॥ अंगोपांगायुधाकल्पं कल्पयंति यथा च यैः ॥ २ ॥ तन्नो वर्णय भद्रं ते क्रियायोगं बुभुत्सताम् ॥ येन क्रियानैपुणेन मर्त्यो यायादमर्त्यताम् ॥ ३ ॥ सूत उवाच । नमस्कृत्य गुरून्वक्ष्ये विभूतीर्वैष्णवीरपि ॥ याः प्रोक्ता वेदतंत्राभ्यामाचार्यैः पद्मजादिभिः ॥ ४ ॥ मायाद्यैर्नवभिस्तत्त्वैः स विकारमयो विराट् ॥ निर्मितो दृश्यते यत्र सचित्के भुवनत्रयम् ॥ ५ ॥ एतद्वै पौरुषं रूपं भूः पादौ द्यौः शिरो नभः ॥ नाभिः सूर्यो ऽक्षिणी नासे वायुः कर्णौ दिशः प्रभोः ॥ ६ ॥

वैष्णवीः अपि विभूतीः वक्ष्ये, याः पद्मजादिभिः आचार्यैः वेदतंत्राभ्यां प्रोक्ताः ॥ ४ ॥ मायाद्यैः नवभिः तत्त्वैः विकारमयः सः विराट् निर्मितः, यत्र सचित्के (चैतन्यानें अधिष्ठित) भुवनत्रयं दृश्यते. ॥ ५ ॥ एतत् पौरुषं रूप—भूः प्रभोः पादौ. द्यौः (स्वर्ग) शिरः. नभः (आकाश) नाभिः. सूर्यः अक्षिणी. नासे वायुः. कर्णौ दिशः. ॥ ६ ॥

वैदिक व तांत्रिक मार्गांनी विवेचन करून ठेविलें आहे. ॥ ४ ॥ माया इत्यादि (प्रकृति, सूत्रात्मा, महत्तत्त्व, अहंकार व पांच सूक्ष्म भूतें ह्या) नऊ तत्त्वांच्या योगानें तो सोळा विकाराचा संघातरूप (अकरा इंद्रियें व पांच महाभूतें ह्या सोळा कार्यांचा गोळा) विराट् निर्मिला आहे. तो विराट् चैतन्ययुक्त झाला की त्यात हें त्रिभुवन दिसून येतें. ॥ ५ ॥ विराट् पुरुषाच्या रूपाची अवयवरचना अशी आहे :– पृथ्वी त्याचे दोन पाय होत; स्वर्ग त्याचें मस्तक, आकाश त्याची बेंबी, सूर्य त्याचे दोन नेत्र, वायु नाक-

पुच्छ, दिशा त्या प्रभूचे कान; ॥ ६ ॥ प्रजापति त्या ईश्वराचें जननेंद्रिय; मृत्यु हें गुद; इंद्रादि लोकपाल त्याचे बाहु, चंद्र मन, यम भ्रुकुटि, ॥ ७ ॥ लज्जा वरचा ओंठ, लोभ अवरोष्ठ; चांदणें हे त्याचे दात, भ्रम त्याचें हास्य; वृक्ष त्या व्यापक प्रभूचे रोम; व मेघ त्या पुरुषाच्या मस्तकावरील केंस होत, ॥ ८ ॥ लौकिक पुरुषाच्या शरीराचें प्रमाण जसें सात विती असतें तसेंच त्या विराट् पुरुषाचें प्रमाण सात लोकांची रचना एवढें होय; ॥ ९ ॥ तो जन्मरहित प्रभु शुद्ध जीवचैतन्य कौस्तुभमण्याच्या मिषानें धारण करितो व

प्रजापतिः ईशितुः प्रजननं (उपस्थेंद्रिय). अपानः (गुद) मृत्युः. तद्बाहवः लोकपालाः. मनः चंद्रः. भ्रुवौ यमः. ॥ ७ ॥ लज्जा उत्तरः, लोभः अधरः ज्योत्स्ना (चांदणें) दंताः. भ्रमः स्मयः. भूरुहाः (वृक्ष) भूम्नः रोमाणि (लव). मेघाः पुरुषमूर्धजाः. (ईश्वराच्या मस्तकावरील केंस). ॥ ८ ॥ यावान् अयं पुरुषः यावत्या संस्थया मितः, असौ महापुरुष. अपि लोकसंस्थया तावान् [मितः]. ॥ ९ ॥ विभुः अजः कौस्तुभव्यपदेशेन स्वात्मज्योतिः बिभर्ति, [या] व्यापिनी तत्प्रभा, [ता] साक्षात् श्रीवत्स

प्रजापतिः प्रजननमपानो मृत्युरीशितुः ॥ तद्बाहवो लोकपाला मनश्चंद्रो भ्रुवौ यमः ॥ ७ ॥ लज्जोत्तरोऽधरो लोभो दंता ज्योत्स्ना स्मयो भ्रमः ॥ रोमाणि भूरुहा भूम्नो मेघाः पुरुषमूर्धजाः ॥ ८ ॥ यावानयं वै पुरुषो यावत्या संस्थया मितः ॥ तावानसावपि महापुरुषो लोकसंस्थया ॥ ९ ॥ कौस्तुभव्यपदेशेन स्वात्मज्योतिर्बिभर्त्यजः ॥ तत्प्रभा व्यापिनी साक्षाच्छ्रीवत्समुरसा विभुः ॥ १० ॥ स्वमायां वनमालाख्यां नानागुणमयीं दधत् ॥ वासश्छंदोमयं पीतं ब्रह्मसूत्रं त्रिवृत्स्वरम् ॥ ११ ॥ बिभर्ति सांख्यं योगं च देवो मकरकुंडले ॥ मौलिं पदं पारमेष्ठ्यं सर्वलोकाभयंकरम् ॥ १२ ॥ अव्याकृतमनंताख्यमासनं यदधिष्ठितः ॥ धर्मज्ञानादिभिर्युक्तं सत्त्वं पद्ममिहोच्यते ॥ १३ ॥

उरसा [बिभर्ति]. ॥ १० ॥ नानागुणमयीं वनमालाख्यां स्वमायां, छंदोमयं पीत (पिवळें) वासः (वस्त्र), त्रिवृत्स्वर (तीन मात्रा ज्याच्या अंग) ब्रह्मसूत्रं [च] दधत् (धरणारा) [असतो]. ॥ ११ ॥ देवः सांख्यं, योगं च मकरकुंडले, सर्वलोकाभयंकरं पारमेष्ठ्यं पदं मौलिं (मस्तक) बिभर्ति. ॥ १२ ॥ अव्याकृत (प्रधान) अनंताख्य (शेषात्मक) आसनं. यत् अधिष्ठितः, [तत्] धर्मज्ञानादिभिः युक्तं पद्मं इह सत्त्वं उच्यते. ॥ १३ ॥

त्या कौस्तुभाची व्यापक प्रभा हाच त्याच्या वक्षस्थलावरील श्रीवत्स होय, ॥ १० ॥ तो अनेकगुणरूप आपली माया ही वनमाला नावाची माळ धारण करितो, वेद हें त्याचें पिवळें वस्त्र व त्रिमात्रात्मक स्वर (प्रणव—ॐकार) हें त्याचें ब्रह्मसूत्र (यज्ञोपवीत) होय. ॥ ११ ॥ तो देव सांख्य आणि योग ही दोन मकराकार कुंडलें धारण करतो. सर्व लोकांना अभय देणारें ब्रह्मलोकस्थान हें त्याचें मस्तक होय. ॥ १२ ॥ ज्याला अनंत (शेष) असें म्हणतात, व वेदांनीं न वर्णिलेल्या ज्या आसनाचा आश्रय धरून प्रभु राहिला

आहे त्या, धर्मज्ञानादिकांनी युक्त अशा कमलाला ह्या लोकांत सत्त्वगुण म्हणतात. ॥१३॥ मानसिक, ऐंद्रिय आणि शारीर अशा तीन्ही सामर्थ्यांनी युक्त मुख्य प्राणतत्त्व ही गदा प्रभूनें हातीं धरिली आहे, त्याच्या हातातील उत्तम शंख हा उदकाचें सार होय. सुदर्शन हें तेजाचें तत्त्व. ॥ १४ ॥ आकाशासारखें आकाशतत्त्व त्याचा खड्ग, त्याची ढाल तमोमय आहे; शार्ङ्ग धनुष्य कालरूप बनविलें असून, त्याचा बाणभाता कर्ममय आहे, ॥ १५ ॥ इंद्रियें त्याचे बाण म्हटले आहेत, क्रियाशक्तियुक्त मन त्याचा रथ, पंचसूक्ष्मभूतें त्या रथाचें बाहेर दिसणारें रूप; व मुद्रेच्या योगानें तो वरद, अभयद इत्यादि क्रियारूपें धारण करितो, ॥ १६ ॥ त्याचें देवपूजेचें स्थान सूर्यमंडळात किंवा अग्निमध्यें

ओजःसहोबलयुतं मुख्यतत्त्वं गदां, अपां तत्त्वं दरवरं (उत्तम शंख) तेजस्तत्त्वं सुदर्शनं [च] दधत्. ॥ १४ ॥ नभोनिभं नभस्तत्त्वं असिं (तरवार) तमोमयं चर्म (ढाल), कालरूपं धनुः शार्ङ्गं [च] तथा कर्ममयेषुधिं (कर्मरूप भाता) [च बिभर्ति] ॥ १५ ॥ इंद्रियाणि शरान्, आकूतीः (क्रियाशक्तियुक्त मन) अस्य स्यन्दनं (रथ),

ओजःसहोबलयुतं मुख्यतत्त्वं गदां दधत् ॥ अपां तत्त्वं दरवरं तेजस्तत्त्वं सुदर्शनम् ॥ १४ ॥
नभोनिभं नभस्तत्त्वमसिं चर्म तमोमयम् ॥ कालरूपं धनुः शार्ङ्गं तथा कर्ममयेषुधिम् ॥ १५ ॥
इंद्रियाणि शरानाहुराकूतीरस्य स्यंदनम् ॥ तन्मात्राण्यस्याभिव्यक्तिं मुद्रयाऽर्थक्रियात्मताम् ॥१६॥
मंडलं देवयजनं दीक्षा संस्कार आत्मनः ॥ परिचर्या भगवत आत्मनो दुरितक्षयः ॥ १७ ॥
भगवान्भगशब्दार्थं लीलाकमलमुद्वहन् ॥ धर्मं यशश्च भगवांश्चामरव्यजनेऽभजत् ॥ १८ ॥
आतपत्रं तु वैकुंठं द्विजा धामाकुतोभयम् ॥ त्रिवृद्वेदः सुपर्णाख्यो यज्ञं वहति पूरुषम् ॥ १९ ॥

तन्मात्राणि अस्य अभिव्यक्तिं आहुः, मुद्रया अर्थक्रियात्मतां [बिभर्ति] ॥ १६ ॥ मंडलं देवयजनं, दीक्षा आत्मनः संस्कारः, भगवतः परिचर्या आत्मनः दुरितक्षयः (पापनाश) ॥ १७ ॥ भगवान् भगशब्दार्थं लीलाकमलं उद्वहन्, भगवान् धर्मं, यशः च चामरव्यजने अभजत् ॥ १८ ॥ द्विजाः, अकुतोभयं वैकुंठं धाम आतपत्रं (छत्र) [अस्य]

आहे, गुरूनें केलेला उपदेश हा आत्म्याचा संस्कार (त्याची पूजा करण्याची योग्यता) होय, भगवंताची पूजा म्हणजे आपला पापक्षय होय (भगवंताची पूजा आपल्या सकल पापांचा क्षय होण्यासाठी करावयाची अशी भावना ठेवावी). ॥ १७ ॥ त्या भगवंतानें - हातामध्यें - 'भग' शब्दाचा अर्थ जे सहा गुण (ऐश्वर्यादि) तें लीलेसाठी कमळ धारिलें आहे. तो भगवान् धर्मरूप चामर (चवरी) आणि कीर्तिरूप व्यजन (पंखा) वाळगून आहे. ॥ १८ ॥ ब्राह्मणांनो, त्यानें तापनिवारणार्थ वैकुंठ (कैवल्य) संज्ञक

१ प्रथम स्कंध अ० ३ श्लोक १ टीप पहा.

गृहाचा आश्रय धरिला आहे, तेथें कोणतेंही भय नाहीं. सुपर्ण (गरुड) नांवाचा तीन प्रकारचा वेद हा त्या यज्ञपुरुषाचें वाहन होय. ॥ १९ ॥ भगवती चिद्रूप लक्ष्मीही त्या साक्षात् आत्मरूपी हरीची कधींही नाश न पावणारी शक्ति होय (चिद्रूपाचा व आत्म्याचा अभेद आहे अर्थात त्यापासून कधीं दूर होत नाहीं). पंचरात्रादि आगम हा त्याचा मुख्य पार्षद विष्वक्सेन समजला जातो. अणिमादि आठ गुण (सिद्धि) हे हरीचे नंदसुनन्दादि आठ द्वारपाळ होत ॥ २० ॥ ब्रह्मन्, तो स्वता पुरुषच वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न व अनिरुद्ध अशा चार मूर्तींचा व्यूह म्हटला जातो (ह्या चार संज्ञा कल्पून लोक त्याची चतुर्व्यूहरूपानीं उपासना करितात). ॥ २१ ॥ तोच भगवान विश्व, तैजस, प्राज्ञ आणि तुरीय (तीन्ही अवस्थाहून वेगळा चवथा) अशा वृत्तींनीं ओळखिला जातो · त्या चार वृत्ति ओळखण्याचीं साधनें अनुक्रमें बाह्य विषय, मन, अज्ञान आणि ज्ञ]. सुपर्णाख्यः त्रिवृत् (ऋग्यजुःसामत्रयीरूप) वेदः यज्ञं पूरुषं वहति. ॥ १९ ॥ अनपायिनी (अढळ, नित्य) [शक्तिः] साक्षात् आत्मनः हरेः भगवती श्रीः पार्षदाधिप. विष्वक्सेनः तंत्रमूर्तिः विदितः. [चि] अणिमाद्याः हरेः अष्टौ गुणाः, ते नंदादयः द्वास्थाः (द्वारपाळ). ॥२०॥ ब्रह्मन्, स्वयं वासुदेवः, संकर्षणः, प्रद्युम्नः, अनिरुद्धः इति मूर्तिव्यूहः

अनपायिनी भगवती श्रीः साक्षादात्मनो हरेः ॥ विष्वक्सेनस्तंत्रमूर्तिर्विदितः पार्षदाधिपः ॥ नंदादयो ऽष्टौ द्वास्थाश्च ते ऽणिमाद्या हरेर्गुणाः ॥ २० ॥ वासुदेवः संकर्षणः प्रद्युम्नः पुरुषः स्वयम् ॥ अनिरुद्ध इति ब्रह्मन्मूर्तिव्यूहो ऽभिधीयते ॥ २१ ॥ स विश्वस्तैजसः प्राज्ञस्तुरीय इति वृत्तिभिः ॥ अर्थेंद्रियाशयज्ञानैर्भगवान्परिभाव्यते ॥ २२ ॥ अंगोपांगायुधाकल्पैर्भगवांस्तच्चतुष्टयम् ॥ बिभर्ति स्म चतुर्मूर्तिर्भगवान्हरिरीश्वरः ॥२३॥ द्विजऋषभ स एष ब्रह्मयोनिः स्वयंदृक् स्वमहिमपरिपूर्णो मायया च स्वयैतत् ॥ सृजति हरति पातीत्याख्यया ऽनावृताक्षो विवृत इव निरुक्तस्तत्परैरात्मलभ्यः ॥ २४ ॥

अभिधीयते (म्हटला जातो). ॥ २१ ॥ सः भगवान् विश्वः, तैजसः, प्राज्ञः, तुरीयः इति वृत्तिभिः, अर्थेंद्रियाशयज्ञानैः च परिभाव्यते. ॥ २२ ॥ अंगोपांगायुधाकल्पैः [उपलक्षित] भगवान् हरिः चतुर्मूर्तिः [सन्] तत् चतुष्टयं बिभर्ति. भगवान् ईश्वरः [एव]. ॥ २३ ॥ द्विजऋषभ, सः एषः ब्रह्मयोनिः (वेदाचें कारण) स्वयंदृक् स्वमहिमपरिपूर्ण. स्वया ज्ञान ही होत (ज्यावेळीं बाह्य विषयाचें ज्ञान असतें ती जाग्रदवस्था, तिचा अभिमानी तो विश्व ओळखावा, ज्या वेळीं एकटें इंद्रिय मन अनेक विषय कल्पीत असतें, ती स्वप्नदशा, तिचा अभिमानी तैजस; ज्यावेळीं बाह्य विषय आणि मन ह्यांच्या संस्कारानें युक्त असें अज्ञान विलसत असतें, ती सुषुप्ति म्हणजे गाढ निद्रा अवस्था, तिचा अभिमानी प्राज्ञ; आणि त्या तीन्ही अवस्थाचा साक्षी चवथा). ॥ २२ ॥ मार्गे (विमाव्या श्लोकापर्यंत) वर्णिल्याप्रमाणें अंगें, उपांगें, आयुधें व वेष ह्यांनीं युक्त असताही तो भगवान् हरि वासुदेवादि चतुर्व्यूहमूर्ति बनतो आणि शिवाय विश्व, तैजस इत्यादि चार रूपेंही धरितो. - इतकें असून (विश्वतैजसादि रूपें धरितो तरी) त्याला जीवत्व येत नाहींच; कारण - तो षड्गुणैश्वर्यसंपन्न व जीवाचा नियामक आहे. ॥ २३ ॥ ब्राह्मणश्रेष्ठा, तो हा वेदाचा कर्ता, स्वतःसिद्धज्ञानी व आत्मसामर्थ्यानें पूर्ण भरलेला भगवान्

एकच आहे. पण तोच आपल्या मायेच्या योगानें हें विश्व उत्पन्न करितो, पाळितो व संहारितो ह्मणून त्याचें ज्ञान परिमित (मोजकें) नसताही त्याचें शास्त्रानें ब्रह्मा, विष्णु, शंकर ह्या तीन संज्ञांनीं वेगवेगळ्यासारखें वर्णन केलेलें आहे. - वस्तुत. तो भिन्न नाहीं, कारण - त्याच्या भक्तांनीं तो आत्म आहे असा अनुभव मिळतो. ॥ २४ ॥ हे श्रीकृष्णा, हे अर्जुनाच्या मित्रा, हे यदुवरा, तूं पृथ्वीला पीडा देणाऱ्या क्षत्रियांचे वश जाळितोस. तुझें सामर्थ्य कधीं क्षीण होत नाहीं. हे गोविंदा, गोपस्त्रिया आणि नारदादि सेवकजन तुझी पवित्र कीर्ति गात आले. तुझें चरित्र ऐकिलें असता कल्याण होतें. तूं आपल्या सेवकांचें (आमचें) रक्षण कर. ॥ २५ ॥ जो मनुष्य पहाटे उठून, शुद्ध होऊन

